THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_192605
UNIVERSAL
LIBRARY

Osmania University Library

Call No M83
A [illegible]

Accession No M7745

Author આપટે, હરિનારાયણ

Title પણ લક્ષ્યાંત કોણ લેતો

This book should be returned on or before the date last marked below

# पण लक्षांत कोण घेतो !

हरि नारायण आपटे

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

मुल्य ९० रुपये

१९९२

मुद्रक व प्रकाशक
सुनील अनिल मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६ सदाशिव पेठ,
पुणे–४११०३०.

हरि नारायण आपटे



जन्म

दिनांक ८ मार्च, १८६४ ]

मृत्यु

[ दिनांक ३ मार्च, १९१९

# १ : लहानपणची आठवण

* * * * * * * * * * * * * * * *

ते दिवसाची आठवण झाली म्हणजे मला अजूनदेखील हसूं येतें व मोठी मजा वाटते. तो दिवस म्हणजे आमचा केवढा आनंदाचा ! शेजारच्या ठकीच्या भावाचें नुकतेंच लग्न झाल्यामुळें तिच्या घरीं रुखवताचे पुष्कळ सामान उरलें होतें. मलाहि माझ्या आईनें थोडेंबहुत गोडधोड करून देण्याचें कबूल केलें होतें; व दादानें मला मुंडावळी वगैरे करून देईन म्हणून सांगितलें होतें. अशी एकंदर जय्यत तयारी होऊन बाहुलाबाहुलीच्या लग्नाला ते दिवशी संध्याकाळचाच मुहूर्त आम्हीं धरला होता मी मुलाची आई आणि ठकी मुलीची आई ! कोणाची आई कोणी व्हावें याबद्दल आदले दिवशीं कोण तंटा ! ठकी म्हणे मी मुलाची आई होईन, मी म्हणें मी होईन शेवटीं आमच्या दादानें तो आमचा न्याय निवडला. तो म्हणाला, " चिठ्या टाकाव्या म्हणजे झालें " मग त्यानेंच त्या चिठया लिहिल्या आणि डोळे मिटून ठकीला एक उचलावयास सांगितलें. तिला मोठी आशा होती कीं, आपणच मुलाची आई होऊं; पण दादानें ती चिठी उघडून पाहतांच त्यांत माझें नांव वाचलें. आमच्या दादावर आमचा साऱ्यांचा पूर्ण विश्वास. तो म्हणेल तें खरे आणि साऱ्यांनीं त्याच्या सांगण्याप्रमाणें करावयाचें. ठकीची आणखीदेखील त्यानें समजूत घातली. तो तिला म्हणाला : " ठके, तुझ्या इथं खरं खरं नाहीं बरं मुलाचं लग्न झालं नुकतंच ? मग आतां कां असं करतेस ? लुटपुटीचं तरी आमच्या इथं होऊं दे. " दादानें असें म्हटल्याबरोबर ठकीचा खेद सारा विरला. ती पहिल्याप्रमाणें आनंदली; पण तें दादाचें बोलणें ऐकून मला मात्र जरा वाईट वाटलें; कारण ठकी आपल्या भावाच्या लग्नांत नटे, मुरडे, उडे, बागडेहि; तेव्हां मला वाटे कीं, आपल्या दादाच्या लग्नांत आपण असेंच करूं. आणखी तें दादाचें लग्न केव्हां होईल असें मला झालें होतें. कोणी मुलगी सांगून आली, कीं ही आतां ठरलीच असें मला वाटे; पण शेवटीं पाहावे तों कांहीं नाहीं. लग्नाचे मुहूर्तदेखील गेले !

दादाचे बोलणें ऐकून मला वाईट वाटलें हे मीं आतां सांगितलेंच आहे. मीं लागलीच त्याला म्हटलें, " हें रे काय तुझं दादा ! तुझं नाहीं वाटतं आतां पुढल्या वर्षी लगीन व्हायचं ? आई तर कालच म्हणाली की, लगीन झाल्यावांचून पुढला मार्गेसर कांहीं जाऊं द्यायचा नाहीं. आणखी मुलगी कोण, ठाऊक आहे का ? " एवढे म्हणून मीं हसत हसत ठकीकडे पाहिलें, तों ती मुरका मारून व कपाळाची आंठी चढवून पण गालांतल्या गालांत हसत म्हणते : " जा मेलं ! हें ग काय हे यमिटले तुझं ? मी अशानं पुन्हा कध्धीं तुझ्या घरांत पाऊल घालायची नाहीं. एवढ्याकरिता का तूं मला खेळायला बोलावलंस ? "

मीं त्यावर पुनः हसत म्हटलें : " अबब ! केवढा तरी हा फणकारा हा ! जशी कांहीं आत्तांच तूं माझी थोरली वहिनी झालीस ! "

तें ऐकून तर ठकी जावयाला निघाली, तेव्हां दादा झट्कन् उठून तिला धरून म्हणतो : " ठके, तूं काय ऐकतेस ग तिचं ? ती अशीच चहाटळ आहे. यमे, तुझं मी मोतीं ओंवून द्यायचा नाहीं, आणखी गडी फू करीन बरं का ! " हे शेवटले शब्द मोठा रागाचा आव घालून दादा बोलत होता खरा, पण ठकीकडे पाहून तो चोरून हसत होता हें माझ्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. त्याचें बोलणें ऐकून मी पुनः मोठ्यानें हसून म्हणालें : " दादा ! लगीन झालं नाहीं तोंच तूं तिचा कैवार घेऊन माझी गडी फू करायला लागलास आं ? "

तें ऐकून तर ठकी गेलीच दाराच्या बाहेर, आणखी दादा माझ्याशीं बोलेनासा झाला. तेव्हां उपाय काय राहिला ? मी धावत धावत ठकीच्या घरीं गेलें आणि ठकीला हांका मारूं लागलें तों ठकी कुठें ओ देईना ! शोधून शोधून दमलें आणि हिरमुसलें होऊन परत आलें, तों ठकी आणि दादा एकमेकांशीं कुजबुजत बसलीं होतीं. माझ्याशीं, मी पायां पडेपर्यंत बोलूं नये असें ठकी दादास सांगत होती असें मला वाटलें. मी जाऊन त्यांच्या विनवण्या करूं लागलें. त्यांनीं जेव्हां माझ्याकडून पुनः चावटपणा करणार नाहीं असें पक्कें कबूल करून घेतलें, तेव्हां मला गय केली आणि पुनः खेळण्याचे व बाहुलीचें लग्न करण्याचें ठरलें. ते दिवशीं शनिवार असल्यामुळें दादा सकाळींच शाळेंत जाऊन आला होता, त्यामुळें त्याला दुपारीं खूप वेळ होता. आमचा तंटा मिटून लग्नाचें ठरल्याबरोबर मग त्या धांदलीला काय विचारतां ? जणूं काय मुहूर्त टळण्याची मोठी भीति ? मीं आपली मोत्यांची पुरचुंडी दादाच्या पुढें टाकली. तो मुंडावळी करण्यांत गुंतला. मी आईनें चोळ्या शिवतांना दिलेले निरनिराळे जरीचे, मखमलीचे, रेशमी, माधे असे तुकडे काढून त्यांच्या खणासारख्या घड्या घालूं लागलें व त्यांतल्या त्यांत मुलीला कोणत्या वेळीं कोणत्या घड्या व चोळ्या द्यावयाच्या, मुलीच्या आईला काय काय द्यावयाचें, आपण कशासाठीं रुसून बसावयाचें वगैरेंबद्दल अगदीं यथास्थित विचार करीत होतें. मुलाला अंगठीबद्दल रुसविण्याला तर राहावयाचेंच नाहीं, आधीं गोफच मागावयाचा, पण निदान हिऱ्याची अंगठी किंवा तीन तोळ्यांचें वळें घेतल्यावांचून, त्याचा रुसवा जावयाचाच नाहीं असा माझा पक्का निश्चय झाला. ठकीला पण अगदीं ठिकठिकाणीं वाकवीन. मी मुलाची आई, ती मुलीची; तिनें पायां पडलेंच पाहिजे. तिला असें टाकून बोलेन, तसें खोंचून बोलेन, असे एकसारखे बेत चालले होते. मधून मधून दादाला मी व मला दादा त्यासंबंधानेंच विचारीत होता. त्याच्या मुंडावळी झाल्या. मग आम्हीं उष्टी हळद आणण्याविषयीं ठकीला निरोप पाठविला. इतक्यांत पाहा काय कटकट ती, आई वर आली आणि म्हणते, ' यमे, या सुंदरीला ( माझी धाकटी अडीच तीन वर्षांची बहीण ) घे खेळायला ' मीं आईला पुष्कळ सांगितलें कीं, ती

आमचा खेळ उडवील, रडेल, तिथें घाण करील, पण आई कुठें ऐकते ? तिनें माझ्यापुढें तिला ठेवून दिलीच. मला मोठा राग आला. इतक्यांत सुंदरीहि रडूं लागली. तेव्हां तिला उचलून मीं आपल्या कमरेवर आदळली आणखी म्हटलें : ‘ काय तरी बाई या आईची कटकट आहे? आम्हांला पुरतें खेळूंदेखील देत नाहीं.’ ऐन खेळाच्या भरांत यावें आणि एखादानें येऊन काम सांगावें किंवा एखाद्या भावंडाला खेळवायला सांगावें म्हणजे जो राग येतो, त्याचा अनुभव ज्याला आला असेल, त्याला या माझ्या बोलण्याचें कांहींच वाटणार नाहीं. आमच्या दादानें तें बोलणें ऐकून तो मला म्हणतो : “ यमे, आईची कटकट म्हणतेस का ? तूं आतांशा फाजीलपणा भारी करायला लागली आहेस ! ”

“ नाहीं रे दादा ! माझ्या तोंडांत तें आपलं आलं. मी आतां नाहीं हो कधीं असं म्हणायची, ” असें म्हणून मीं त्याचा राग घालविला.

असो. थोड्याच वेळांत ठकी पांच-सात मुलींना बरोबर घेऊन आमच्या इथें उष्टी हळद घेऊन आली. तें पाहण्याबरोबर आपल्या इकडे बायका नाहींत, आपण एकटयाच असें माझ्या ध्यानांत आलें व मीं भराभर उष्टी हळद झाल्यावर दोघीचौघी निराळयाच मुली गोळा करून आणल्या. आईनें कबूल केल्याप्रमाणें सामान दिलें व आमचा एकच धुडगूस चालला. मीं इकडून तिकडे दडदड धावावें. एकदा तर सुंदरीला घेऊन मी पडलेंदेखील; आणि तिनें जो आकांत केला, तो कांहीं विचारूंच नका. तो ऐकून आई धावत आली, संतापली व ‘ दम धरा, तुमचें खेळणेंच बंद करून टाकतें ’ असें म्हणाली. मी आपली चोरासारखी उभी राहिलें. दादानें रदबदली केली, तेव्हां एकदाचा खेळ पुनः सुरू झाला. चार वाजण्याच्या सुमारास त्या आमच्या धुडगुसाला त्रासून ठकीच्या आईनें आम्हांला माझ्या घरींच सर्व खेळण्यास सांगितलें. तेव्हां मुलामुलींचा जानोसा घरांत होऊन आमच्या घरांत एकच गर्दी उडाली. हसणें काय, खिदळणें काय, आरडणें काय, ओरडणें काय, कांहीं कांही बेसुमार झाला ! शेवटीं पांच वाजण्याच्या सुमारास अंतरपाट धरून आम्ही सर्व मंगलाष्टकें म्हणूं लागलों. त्या वेळच्या त्या हसण्या-ओरडण्याला काय पुसतां ? आमच्या अंगांत जितकें म्हणून अवसान होतें तितकें खर्चून ‘ शुभमंगल सावधान ’ चाललें होतें. तीं मंगलाष्टकें म्हणजे काय असतात हें साऱ्यांना ठाऊक आहेच. त्यांत आमचा दादा फार नकली असल्यामुळें त्यानें किती वेळ तरी परोपरीचीं मंगलाष्टकें म्हटलीं. त्यानें म्हणावें, आम्हीं त्याचा सूर धरावा आणि पोट दुखेपर्यंत हसावें, असा एकसारखा हमामा चालला होता; पण इतक्यांत तो सर्व हमामा, तो सर्व धुडगूस एका क्षणाच्या आंत नाहींसा झाला. आमचे बाबा जे ऑफिसांतून आले ते वस्कन् आमच्या अंगावर येऊन, “ काय कारट्यांनीं वेवताबून सोडलं आहे, चला व्हा चालत्या आपल्या घरोघर. काय रे, ए गाढवा, तूं बारा वर्षांचा गधडा झालास तरी अजून असले खेळ खेळतोस ! चल निघ इथून ! या कार्टीला तर--” हे शब्द ऐकून मी तर पळालेंच. मला पळतांदेखील येईना. सर्व अंग लटलट कापूं लागलें.

सुंदरी तिथेंच रडत होती. मुली पहिल्या सपाटयासच पळाल्या. मी जी पळालें ती अगदीं खालीं जाऊन सैंपाकघरांत आईच्या पाठीमागें लपलें. ती मला 'कां ? काय ?' म्हणून पुष्कळ विचारूं लागली, पण माझ्या तोंडून एक शब्द निघेल तर शपथ! थोडासा धीर येऊन मी आईला कांहीं सांगणार, तोंच दादाहि घाबऱ्या घाबऱ्या खालीं आला व " आई आई, तुला बाबा आधींच्या आधी वर बोलावताहेत; चल, चल, ते आज असं कां करताहेत कोणाला ठाऊक " असें आईस म्हणूं लागला. ते त्याचे शब्द ऐकून आईचा चेहरादेखील खरकन् उतरल्यासारखा झाला. तिनें दादाला एक दोन प्रश्न विचारून माडीचा रस्ता धरला. दादाहि तिच्या मागून चालला होता, पण मीं त्याच्या लंगोटीचें शेपूट ओढलें; तो परत आल्यावर मी त्याला " तुला बाबा आणखी कांहीं बोलले का रे ? " म्हणून विचारूं लागलें; तेव्हां तो म्हणतो : " चल, मीं तुझी गडी फू केली आहे आजपासून; तूं मोठी अप्पलपोटी आहेस. मला एकटयालाच बाबांपुढें टाकून आपण पळून आलीस. " तें त्याचें बोलणें ऐकून माझें मन मला खाऊं लागलें व त्याच्या काकुळती करून मीं त्यास म्हटले : " दादा, असं काय बरं करतोस ? मी किनई फार घाबरलें. तूंच सांग बरं, तूं माझ्याएवढा असतास आणखी मी तुझ्याएवढी असतें तर असंच करतास कीं नाहीं बरं ? त्यांतून आजच्यासारखे कधींतरी बाबा रागावले होते का ? " अशा तऱ्हेनें त्याच्या विनवण्या केल्यावर त्यानें माझ्याशीं गट्टी केली व आम्ही दोघेंहि बाबांच्या वर्तनाबद्दल विचार करीत बसलो. दादा म्हणाला : " बाबा आपल्यावर इतके रागावले आहेत कीं, ते आज आपणां दोघांनाहि घराबाहेर घालवून देणार. ते मला म्हणालेदेखील कीं, दम धर गुलामा, तुला घराच्या बाहेर हांकलून देतों, एक क्षणभरदेखील ठेवीत नाहीं. अन् तुझ्याबरोबर त्या कारटीलादेखील ! कारटयांनीं जसं पिसाळून सोडलं आहे ! "

हें दादानें सांगितल्यावर मी तर नुसती गर्भगळित होऊन गेलें, पण दादानें मला खूप धीर दिला. वाचकहो, लहानपणीं एखादे यःकश्चित् संकट आलें तरी त्याचें केवढें महत्त्व वाटतें व मुलें त्याचा केवढा डोंगर करतात, याचा अनुभव तुम्हांपैकीं बहुतेकांस असेलच. आम्हांला तर असें पक्कें वाटलें कीं आतां आपल्याला बाबा घालवून देणार. आपण भिकारी होणार. दादा तर म्हणाला : " अजून माझं अक्षर चांगलं झालं नाहीं. नाहींतर मीं कारकुनाची चाकरी करून दोघांचं पोट भरलं असतं. आपण बाबांच्या हातपायां पडून क्षमा मागूं. पुनः करणार नाहीं, चुकलों असं म्हणूं, विनवण्या करूं, पण इतकं करून त्यांनीं ऐकलं नाहीं तर नाइलाज होईल. मी माधुकरी मागेन आणि तुझं व मी आपलं पोट भरीन. तूं भिऊं नकोस. मी तुला मुळींच अंतर देणार नाहीं. " असे नाना प्रकारचे बेत चालले आहेत व आम्ही दुःख करीत आहोंत, इतक्यांत आई मंद मंद पावलें टाकीत खालीं आली. तिचा तो त्या वेळचा चेहरा मला अजून स्पष्टपणें आठवतो आहे. तिच्या दोन्ही डोळ्यांतून अश्रु निघून ते गालावर पडले होते. डोळे किंचित् लाल झाले होते. आम्हांला पाहिल्यावर ती किंचित् स्तब्ध उभी राहिली, पण झटकन् भानावर येऊन

तिनें आपले डोळे पुसले व आम्हांला शांत व गंभीर अशा स्वरानें म्हणाली, " चला रे, आपल्याला आज रात्रीच्या गाडीनं आजोळीं जायचं आहे. चला व्हा वर! आपली बांधाबांधी करा!" ते तिचे शब्द ऐकून आमच्या मनाची काय स्थिति झाली असेल ती कल्पनेनेंच जाणावी!

आमच्या मनाची स्थिति काय झाली असेल हें कल्पनेनेंच जाणावें, असें मीं म्हटलें आहे, याचें कारण फार निराळें आहे. मुलांचें मन किती चंचल असतें हें लक्षांत वागवून जे तें वाक्य वाचतील, त्यांस मात्र त्या वाक्याचा खरा अर्थ कळेल. आई रडत रडत खालीं आली व " चला रे, आपल्याला आज रात्रीं आजोळीं जायचं" असें म्हणाली. यामुळें आम्हांला वाईट वाटलें, आश्चर्य वाटलें, आमचें मन चमत्कारिक झालें, आणि मी सांगतें याचें तुम्हांला कदाचित् आश्चर्य वाटेल पण मी आतां सांगतेंच—मला थोडासा आनंदहि झाला; त्याचें कारण फार निराळें होतें. तें असें: सरासरी पांच सहा वर्षें झालीं, आई आजोळीं गेली होती. मी त्या वेळीं अगदीं लहान होतें, म्हणजे मला पुरतें समजत नव्हतें. तेव्हांच्या आजोळच्या गोष्टी दादाला मात्र चांगल्या आठवत व तो कधीं कधीं मला सांगेहि; परंतु मला कांहींएक आठवत नसे, त्यामुळें नेहमी असें वाटे कीं, पुनः एकदा जर आम्ही सगळी आजोळीं जाऊं तर बरें होईल; कारण तेथें मजा म्हणजे कांहीं विचारूं नका—दादाच्या सांगण्यावरून मला वाटे हो, बाकी मला कांहीं आठवत नसे हें मीं तुम्हांला सांगितलंच आहे,—आजोळच्या गोष्टी निघाल्या कीं, मला नेहमीं तिकडे जावें असें वाटे, तेव्हां तो प्रसंग आज आला असं पाहून मला थोडेंसें बरें वाटलें यांत आश्चर्य करण्याजोगें काय होतें! आपल्याला काय कारणानें आज जावें लागत आहे आणि कसें जावें लागत आहे याबद्दल कांहीं मनांत आलें नाहीं.

आईचे ते शब्द ऐकून मीं दादाकडे पाहिले, परंतु दादाच्या चेहऱ्यावर कांहीं आनंद दिसेना. आई जे शब्द बोलली तेवढेच काय ते. त्यावर जास्त कांहींच बोलेना. तेव्हां मीं तिच्याजवळ जावें असा विचार केला आणि आतां कांहीं विचारणार तिला, तों जिन्यांत जडशी पावलें वाजली. तीं ऐकण्याबरोबरच माझा जीव भ्याला व मागे वळून पाहणार तों आमचे बाबा आमच्यापुढें येऊन उभे राहिले व पुढील शब्द माझ्या कानीं पडले, " अरे! ही कारटीं इथं दिखील बसलीं आहेत का? चोरांचा चांगलाच समाचार घेतला पाहिजे." असें म्हणून त्यांनीं दादाचा दंड धरला व त्याच्या एक थोबाडांत देऊन म्हटलें, " चल निघ इथून. निघ. कांहीतरी वाचीत बस जा. सारा दिवस शिंच्यांचा धुमाकूळ. काय ग ए कारटे, तो तिथे सगळा पसारा करून टाकला आहेस तो कोण आटपील?" असें म्हणून त्यांनीं मलाहि आईजवळून ओढलें, पण तिनें लागलीच त्यांचा हात एकीकडे करून " हें काय हें! त्या पोरांवर काय म्हणून राग? त्यांनीं काय केलं आहे?" असें म्हटलें. आईनें हात एकीकडे करून माझी सुटका झाली असें पाहण्याबरोबर मीं धूम ठोकली, ती इतक्या झपाट्यानें, कीं जातां जातां

## ६ : पण लक्षांत कोण घेतो !

जिन्यांत पडून माझ्या एका हातांतल्या बांगड्या वाढवल्या व माझ्या ढोंपराला चांगलेंच लागलें; पण मी थांबतें आहे कशाला ? उगीच परकर सावरायला उभी राहिलें तों "त्यांच्याकडे नाहीं तर काय ? तींच शिंचीं कपाळकरंटीं आहेत. गुलामांच्या नशिबीं—" असे बाबांच्या तोंडचे शब्द कानीं आले. तडक वर गेलें ती आधीं आपली आवराआवर करून ठेवूं लागलें. ते सगळे दागदागिने, त्या माळा, त्या बाहुल्या, त्या खेळायला घेतलेल्या सगळ्या जिनसा कशातरी गोळा केल्या. इतक्यांत दादाहि आला. त्याचा चेहरा या वेळीं किती म्लान झाला होता म्हणून सांगूं ? मीं त्याच्याकडे एकसारखी टक लावून पाहूं लागलें व तो माझ्याकडे पाहूं लागला. कोणाच्याहि तोंडांतून शब्द म्हणून निघेना. दादाच्या नाजूक गालावर तीं बाबांचीं पांच बोटें उठलेलीं पाहून मला अतिशय वाईट वाटलें; रडूंदेखील कोसळलें; पण मीं तसेंच दाबलें. बराच वेळ झाला, आम्ही आपलीं तशीच एकमेकांकडे पाहात स्तब्ध उभीं राहिलों. त्या वेळीं जर आमची कोणी तजबीर काढता तर बरें होतें. दादाकडे पाहतां पाहतां काय असेल तें असो. मीं एकदम त्याच्या गळ्याला मिठी मारली व ओक्साबोक्शीं रडूं लागलें. दादाच्याहि डोळ्याला तत्काळ पाणी आलें, परंतु त्यानें चटकन् "यमे, तुला वेड लागलं का ग ? बाबा आले आणखी त्यांनीं आपल्याला असं पाहिलं म्हणजे काय म्हणतील ? चल, तें सारं घेऊन आपण माडीवर जाऊन बसूं." असें म्हणून त्यानें माझी मिठी सोडविली. सोडवितांना पाहतों तों माझ्या एका हातांत बांगड्या मुळींच नाहींत. त्याला त्या कशा पिचल्या हें सांगितलं व बाबांनीं पाहिल्यास ते काय म्हणतील याचा विचार करीत आम्ही तिसऱ्या मजल्यावर गेलों.

आमचा तिसरा मजला कांहीं पाटलेला नव्हता. दोन्ही बाजूंना दोन पाखीं आणि मध्यें उंच होता. तिथें आमचें सामानसुमान ठेवण्याला, व दादाला लिहावाचायला जागा दिलेली होती. आम्ही वर गेल्यानंतर पहिली गोष्ट बांगडयांची निघाली. आपल्या हातांत बांगडया नाहींत हें बाबांना समजलें तर मार मिळण्याची पराकाष्ठेची भीति, तेव्हां ही गोष्ट लपवावी कशी ? इतक्यांत मीं दादाला म्हटलें : "दादा, परवां वाणं दिलीं त्या वेळीं आईनं हिरव्या बांगडया आणल्या होत्या, त्यांतल्या उरल्या आहेत गडया. पण तिनं त्या कुठं बरं ठेवल्या आहेत ? मला वाटतं देवावरच्या फळीवर आहेत त्या आणून भरून दिल्यास तर पाहा." मीं हें म्हटलें खरें, पण खालीं जावें कोणीं ! खालीं जाणें म्हणजे सडकून मार खाणेंच होतें. तेव्हां ती युक्ति कांहीं जमली नाहीं. शेवटीं दादालाच एक युक्ति सुचली. त्यानें माझ्या दुसऱ्या हातांत पांच सहा बांगड्या होत्या त्यांतल्या दोन तीन उतरून माझ्या मुंड्या हातांत भराव्या असें सुचविलें. मलाहि ती युक्ति आवडून आम्ही लागलीच त्याप्रमाणें करून टाकलेंहि. नशीब कसलें चमत्कारिक पाहा ! त्या एका हातांतल्या बांगडया उतरून दुसऱ्या हातांत भरतांना एक बांगडी आणखी पिचली, पण भाग्य एवढेंच की, कसेबसे दोनहि हात साजरे झाले. अशी सगळी व्यवस्था झाल्यावर मी आपलें सामान जुळवाजुळवी

करून माझ्या पेटींत टाकण्याच्या नादी लागलें व दादाहि जवळ बुक घेऊन मलाच मदत करीत होता; मधून मधून आमचें बोलणेंहि होत होतें, तें बोलणें अर्थातच बाबांच्या वर्तनावर होतें.

आमचे बाबा मोठे खाष्ट होते खरे, पण आज ते जरा विशेषच संतापले आहेत असें आम्हांस वाटलें. जिन्यांतून धावतांना पडलें तेव्हां त्यांच्या तोंडचे शब्द माझ्या कानीं पडले ते मीं दादाला सांगितले. दादानें तें ऐकले होते; आणखीहि तशाच प्रकारचे शब्द त्याच वेळीं ते बोलले होते. तेहि त्यानें मला सांगितले व एकंदर आम्हीं असें ठरविलें की, आज बाबा विशेष संतापले आहेत, आतां एक दोन दिवस त्यांच्या नजरेस पडण्याची सोय नाहीं. प्रसंग आला आहे तर आतां आमच्या बाबांचें थोडेंसें वर्णन देतें, म्हणजे पुढें मी जी हकीकत लिहिणार आहें, ती नीट समजण्यास ठीक पडेल.

आमचे बाबा शरीरानें चांगले धष्टपुष्ट होते व खूप उंच होते. त्यांचा वर्ण गोरा परंतु डोळे किंचित् पिंगट होते. ते दिसण्यांत मोठे भव्य किंवा उग्र दिसत असत असें म्हटलें तरी चालेल आणि वर्तनानें तसे होतेहि. त्यांच्यापुढें जाण्यास सगळीं कांपत. आमचा गडी शिवराम, मी अगदीं लहान होतें तेव्हांपासून आमच्या घरांत मी त्याला पाहात होतें. पण तोदेखील त्यांच्यापुढें जाण्यास फार भिई. एक भीत नसे आई. तिलादेखील ते एखादा वेळ बोलत. पण तें आपलें जितक्यास तितकेंच. तिला मात्र ते स्वतः जरा वचकत, याचे कारण मला फारा दिवसांनीं कळलें. तें कारण एवढेंच होतें कीं, ते कधींहि रागांत असले म्हणजे हिनें त्यांचे तोंडास तोंड द्यायचेंच नाहीं. त्या वेळीं ' हूं हूं ' करून वेळ मारून न्यावयाची व त्यांचा राग गेला म्हणजे ज्या गोष्टीबद्दल ते एवढे रागावले असतील तीच गोष्ट त्यांना समजून सांगून ती करून घ्यावयाची. हा तिचा मोठा गुण होता असें मीच म्हणतें असें नाहीं, प्रत्यक्ष बाबांच्या तोंडून मीं कित्येक वेळां या तिच्या गुणाचें वर्णन ऐकलेलें आहे. बाबांचा स्वभाव फार आग्रही--दुराग्रहि म्हटला तरी चालेल—असा होता. पण ती अशी शहाणी होती कीं, तिनें त्यांच्याकडून आग्रह सोडवून त्यांस आपल्या म्हणण्याप्रमाणें करावयास लावावयाचें. त्यांनीं कांहीं गोष्ट म्हटली कीं, हिनें पहिल्या सपाट्यास ' हो, करायचं तें ' असें म्हणावयाचेंच आणि थोडा वेळ निघून गेला म्हणजे मग हळूच त्यांच्याजवळ जाऊन " मघांशीं तें करायचं म्हटलं खरं, पण त्यांत अशा अशा अडचणी आहेत बरं का ? " असें म्हणून योग्य असेल त्याच तऱ्हेनें ती गोष्टच करून टाकायची. अशी कांहीं तिची विलक्षण चतुरता होती. दुसरी अशी एक गोष्ट होती कीं, ती भलत्या गोष्टींत कधींहि मन घालीत नसे. ज्या गोष्टींत तिचा अगर संसाराचा कांहीं संबंध नाहीं अशा गोष्टींत बोलूं नये असें तिचें म्हणणें असें व ती त्याप्रमाणें वागेहि. शेजारच्या ठकीची आई राधाबाई आणखी माझी आई या दोघी अगदीं फार चांगल्या मैत्रिणी असत. त्या राधाबाईनीं एक दिवस आमच्या आईला विचारलें : " कायहो

यशवदाबाई, तुमचे यजमान सगळ्यांवर रागवतात, जाजावतात, पण तुमच्यावर कधीं रागावलेले पाहात नाहीं मी, हे कसं काय ? आमच्या इथं नेहमीं म्हणत असायचे कीं, 'हा वासुदेवराव एवढा खाष्ट, पण बायकोपाशीं कसा सरळ असतो बोवा!' खरंच, कायहो एवढी जडीबुट्टी आहे तुमच्याजवळ? ती मला तरी सांगून ठेवा म्हणजे मी तरी करून पाहीन. आमच्या इथं असंच एखादे वेळीं वारं येतं! मग कांहीं विचारूं नका. तांबेभाडीं हापटून, जानवंशेंडी तोडून डोक्यांत राख घालायची वेळ येते म्हणून मी आपली विचारतें."

हे राधाबाईचें बोलणें ऐकून आई हसली व म्हणाली, "वा! राधाबाई, तुम्ही तरी बऱ्याच आहां हो! आपली भोळीभाबडी मी, माझी थट्टा करतां का! करा बाई." अशी एकंदर त्यांचीं बोलणीं झालीं, त्यांत आमच्या आईनें त्यांना आपल्या वर्तनाचें खरें इंगित सांगितलें. तें तिचें त्या वेळचे सांगणें इतके कांहीं माझ्या अंतःकरणांत त्या वेळीं भिनलें कीं, यावज्जन्मांत मी तें विसरणार नाहीं. मला मोठें आश्चर्य वाटतें कीं, मी इतकी लहान असून, मला त्या वेळीं तर काय, परंतु त्यानतर बराच कालपर्यंत कांहीं समजायला लागलें नसून, त्या दिवशींचे ते तेवढेच आईचे बोल माझ्या लक्षांत कसे राहिले कोण जाणे! ते तसे राहिले, यामुळें मला किती फायदा झाला, पुढल्या आयुष्यांत मला ते किती उपयोगी पडले याचे आजच मी कांहीं सांगू शकत नाहीं. कारण माझें सर्व चरित्र म्हणजे या आईच्या वचनांचें प्रतिबिंबच म्हटलें तरी चालेल. मजवर अनेकविध प्रसंग आले. त्यांतल्या बहुतेकांतून निभावून जाण्यास मला हे बोल व माझ्या आईपासून मिळालेलें थोडेंबहुत शिक्षण याच गोष्टी अतिशय उपयोगी पडल्या. मला वाटतें आईचे हें चतुर वर्तन जर मला पाहावयाला मिळालें नसतें व आपली चतुरता कोणत्या गोष्टींत आहे हें तिनें राधाबाईस सांगितलें त्या वेळीं जर मी तेथें नसतें, तर कित्येक प्रसंगांतून निभावणें मोठ्या मुष्किलीचें काम होतें. आज मी हा मजकूर लिहितें आहें, या वेळीं आईचें सर्व चरित्र मजपुढें स्पष्ट उभें आहे. आणि 'कोणाचा होऊं नये चाकर, आणि कोणाची होऊं नये बायको,' अशी जी आमच्या बायकांची म्हण आहे ती किती यथार्थ आहे हें मला चक्क दिसत आहे. अशी स्थिति असल्यावर मुलगी झाल्याबरोबर आमचे आम्हांसदेखील वाईट वाटावें व साऱ्यांनीं नाकें मुरडावीं यांत नवल तें काय? पण जाऊं द्या. आपली हकीकत पुढे सांगण्याचें टाकून मी हे काय करीत बसलें आहे?

आमच्या बाबांचें वर्णन करतां करतां थोडेंसें आईचेंहि वर्णन आलेंच आहे, परंतु पुढील गोष्ट सांगण्यापूर्वी तिचें व आमच्या कुटुंबांतील एकंदर माणसांचें वर्णन देणें हें अत्यावश्यक आहे. आमची आईदेखील स्वरूपानें फार चांगली होती. तिचे नाकडोळे जिथल्या तिथें नीटस असून ती मोठी उदार व मोठ्या मनाची असावी जसें तिच्या चेहऱ्यावरून वाटे आणि वास्तविक तशीच ती होतीहि. अहाहा! तिचे एक की दोन गुण वर्णन करून सांगूं! तिचा नीटनेटकेपणा, तिची बोलण्याचालण्याची ढब, तिची आम्हां

मुलांना सांगण्याशिकविण्याची तऱ्हा—साऱ्या गोष्टी कांही अवर्णनीय होत्या. माझे हातून या जगांत ज्या ज्या कांहीं बऱ्या गोष्टी घडल्या त्या त्या दोन माणसांच्या शिक्षणानें. एक लहानपणच्या आईच्या शिक्षणानें आणि मोठेपणीं—मी आतां नांवच कशाला लिहायला पाहिजे ? आणखी कोणाच्या असणार ! त्यांतहि दुसरें शिक्षण माझ्या मनावर बिंबायला कारण, आईच्या सुंदर शिक्षणानें मन तयार झालें होतें हें होय. आईच्या शिक्षणानें नम्रता, नीटनेटकेपणा, विनय, उद्योगीपणा, मितव्यय इत्यादि गोष्टी जर माझ्या मनांत आधींच रुजल्या नसत्या, तर त्याला पुढें मिळालेल्या शिक्षणजलाने अंकुर येऊन त्यांचे वृक्ष बनून, फुलें-फळें कधींच दृष्टीस पडतीं ना ! आमची आई म्हणजे एक देवता होती, यांत मला तर तिळमात्र संशय नाहीं त्या माउलीची थोरवी जितकी वर्णावी तितकी थोडीच आहे. आपलें माणूस आपल्याला फार आवडतें एवढ्याचसाठीं मी तिची स्तुति करतें असे मात्र कोणी समजूं नये; कारण माझ्या आईच्या शिक्षणाच्या योगानें पुढें काय काय झालें हे एकंदर कळून आलें म्हणजे मी म्हणतें हें अगदींच थोडें असें कित्येकांस तरी वाटण्याचा संभव आहे. अशी माझी आई होती म्हणून तिचें मीं एवढें विशेष विस्तारानें वर्णन दिलें आहे, यांत यदाकदाचित् कोणाला अतिशयोक्ति वाटली तरी त्यानें मला दोष देऊं नये; कारण माझी आई—इतक्याच काय ?—आणखी पुष्कळ गोष्टींच्या संबंधानें स्तुतीस पात्र होती अशी माझी पक्की खात्री आहे. तेव्हां मातृभक्त अशा मुलीनें थोडीशी तुमच्या मतें फाजील अशी स्तुति जरी यदाकदाचित् केली असली, तरी त्याबद्दल मला क्षमाच कराल अशी आशा आहे.

आमच्या बाबांस कलेक्टर कचेरींत हेडक्लार्कची (मुख्य कारकुनाची) जागा असून दीडशें रुपये पगार होता. शिवाय आमचें घरचें शेतीभातीचेंहि उत्पन्न बरेच होतें. आमचे बाबा आजोबांचे एकुलते एकच होते, परंतु त्यांचें आणि यांचें नीटसें पटत नव्हतें. याला अनेक कारणें होतीं. त्यांत मुख्य म्हटलें म्हणजे दोघांच्या स्वभावाचा सारखेपणा हें होय. दोघांचाहि स्वभाव फार हेकेखोर असे. आपण म्हणूं तें खरें करावयाचें, हा दोघांचाहि स्वभाव. त्यांत आजोबा तर फारच कडकडीत, जमदग्नीचाच अवतार ! आणि त्यांचेच बहुतेक गुण आमच्या बाबांच्या अंगीं उतरले होते असें आमची आई नेहमीं म्हणे. आमची आजी थोडीबहुत त्याच मासल्याची होती, आणि यामुळें आजोबा आणि आजीबाई यांचें कधीच पटलें नाहीं. इतकेंच नव्हे, पण केव्हां केव्हां असें होई कीं, सहा सहा महिन्यांत एकमेकांचे भाषण नाहीं. आजीबाईनीं माझ्या आईला जो सासुरवास केला आहे, तो जर मी सगळा सविस्तरपणें सांगूं लागलें तर तें एक रामायणच होऊन बसेल. आमची आई म्हणूनच तितक्याहि जाचाला न जुमानतां त्या कर्दनकाळ सासूच्या तोंडून तिनें वाहवा मिळविली. असो.

मीं आतां वर सांगितलेंच आहे कीं, आमचे आजोबा व आमचे बाबा यांचें कधीं पटत नसे. आमची आजी कधीं कधीं आमच्या बाबांजवळ येऊन राही, परंतु आजोबा

कधींहि येत नसत आणि याचें कारण काय, तर ते बाबांच्याजवळ असतांना आमच्या घरांत वैश्वदेव होत नसे हे होय ! एखाद्याला खोटें वाटेल सांगितलें तर, पण तुम्हांला खरोखर सांगतें, आमच्या घरांत वैश्वदेव होत नसे तो होत जावा, स्वतः बाबांनीं करावा, निदान आमच्या दादानें—त्याची नुकतीच तेव्हां मुंज झाली होती—करावा, असें आजोबांचें म्हणणें पडलें व आमच्या बाबांचें म्हणणें पडलें कीं, चाकरीच्या निमित्तानें हजार ठिकाणीं मला जाणें भाग पडणार; तेव्हां तें कांहीं होणें नाहीं. एवढ्यावरून काय ती बोलाचाली झाली, आणि जुंपली. शेवटीं ज्या घरांत असले नास्तिक सुधारलेले लोक आहेत, ज्या घरांत नैवेद्यवैश्वदेवदेखील होत नाहीं, त्या घरांत अन्न घेईल तो महाराच्या घरीं जेवील, असें म्हणून म्हातारा तणतणून खरोखरी घराच्या बाहेर चालता झाला. बाबा आपले जागच्या जागींच बसले. जागचे हलेनात देखील. शेवटीं आमची आई मर्यादाबिर्यादा एकीकडे ठेवून म्हाताऱ्याच्या पाठोपाठ गेली व त्यांच्या हातांपायां पडून 'तुम्ही आल्याखेरीज मी अन्न घ्यायची नाहीं,' असें तसें बोलून तिनें त्यांस मागें परतविलें. हे लोक तमाशा बघायला उभे राहिले ! आईला असें झालें कीं, आतां हे आहे तरी काय ? शेवटीं आमच्या आजोबांनाच काय वाटलें तें कोणास कळे, त्यांनीं हातपाय धुऊन दोन घास खाल्ले. पुन्हाः संध्याकाळीं अशाच कांहीं गोष्टीवरून दोघांचें कडकडून भांडण झाले, आणि आजोबा दुसरे दिवशी जे उठले ते न जेवतां न खातां पहिल्या गाडीनें चालते झाले. पुनः म्हणून त्यांनी बाबांच्या गावी किंवा त्यांच्याजवळ येण्याचें नांव काढलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर बाबांशीं अगर माझ्याशीं त्यांनीं नीट बोलूंसुद्धां नये. एक ते बोलत माझ्या आईशीं आणखी दादाशी. आमच्या आईवर त्यांचा भारी जीव ! ती त्यांना फार आवडे. दादाहि त्यांच्या प्रीतींतला; पण मला पाहिलें अगर मी त्यांच्याजवळ गेलें म्हणजे म्हणत 'ही कारटी आपल्या आजीसारखी आणखी बापासारखी निघणार. हा पोरगा बरीक आपल्या आईसारखा निपजणार खरा !' हे त्यांचें बोलणें ऐकलें कीं, आमच्या आजीनें खूप संतापावें; कारण तिची मी फार लाडकी होतें; दादावर तिचा जीव नव्हता असे नाही, पण कमीच ! अन् तसे असण्याचें कारण मी एवढेंच समजतें कीं, तो आजोबांना आवडत होता. आजोळीं जाण्याची गोष्ट निघाली कीं, मला एक प्रकारें आनंद व दुसऱ्या प्रकारें भय वाटत असे आजी तेथें आहे यामुळें आनंद होई खरा, परंतु आजोबा मनांत आले कीं, जिवाचा थरकांप होई. असो.

आमच्या एकंदर कुटुंबाची ही हालहवाल बरीच लांबलचक झाली आहे; तेव्हां ती आतां येथेंच संपवून, ज्या दिवसाची गोष्ट मीं सांगण्यास आरंभ केला, त्या दिवसाची पुढील हकीकत सांगण्यास पुनः सुरुवात करतें; परंतु तसें करण्यापूर्वी एवढेंच एक सांगून ठेवतें, कीं मी ज्या ज्या गोष्टी सांगणार व त्यासंबंधानें ज्या ज्या व्यक्तींचीं व प्रसंगांचीं वर्णनें देणार, त्या त्या सर्व गोष्टी, ते ते सर्व प्रसंग व तीं तीं सर्व माणसें मीं स्वतः खरोखर पाहिलेलीं आहेत; इतकेंच नव्हे, आमच्या सध्यांच्या स्थितींत तसले प्रसंग व तसलीं माणसें हव्या त्या मनुष्याच्या पाहण्यांत येतील. तर कोणीहि, मजवर

अतिशयोक्तीचा अगर कांहींतरी लिहिण्याचा आरोप करण्यापूर्वीं आपला अनुभव आपल्याला वाटतो इतका आहे कीं नाहीं, याचा विचार करावा. मीं लिहिलें आहे हें अक्षरशः खरें आहे.

◆ ◆ ◆

## २ : त्या वेळची एक जम्मत

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

माझें व दादाचें मागील प्रकरणांत ( लहानपणची आठवण ) सांगितल्याप्रमाणें अनेक गोष्टींवर—त्या गोष्टी बाबांच्या रागाशिवाय दुसऱ्या काय असणार ?—बोलणें होतां होतां अगदींच काळोख पडला. रात्रीं आम्हांला कोणी वरच्या माडीवर बसूं देत नसे. दादाला अभ्यास वगैरे करायचा तो सारा रात्रीं खालच्या माडींतल्या दिव्यापाशी बसूनच. मीहि जेवण होऊन निजेपर्यंत त्याच्याजवळच बसत असें; परंतु आज आम्हां दोघांपैकीं एकदेखील खाली जाण्यास धजेना. आमच्या पोटांत कावळे कोकावयास लागले; त्यांतून माझी तर भुकेनें अगदीं तिरपीट उडाली. दुपारी आम्हांला खेळायला दिलेल्या जिनसा खाण्यासदेखील वेळ मिळाला नाहीं; कारण, लग्न झाल्यानंतर मग जांवई व विहिणी मोठ्या थाटानें जेवणार होत्या. बाबांच्या संतापांत येण्यानें तें सारें कोणीकडच्या कोणीकडे नाहींसें झालें; इतकेंच नव्हे तर मानापमानासाठीं रुसून फुगून मुलीच्या आईला नाक घासण्यास लावण्याचा पक्का बेत करणाऱ्या विहिणी आतां अंधारांत येऊन बसल्या होत्या व त्यांस मार मिळण्याच्या भीतीमुळें जिन्याची पायरी उतरण्याचा देखील धीर होत नव्हता. अशी विहिणींची त्रेधा झाली होती आणि त्यांनीं आपल्या मुलाला म्हणजे जांवईबोवांना तर केव्हांच आपल्या खेळ ठेवण्याच्या पेटींत कोंबून ठेवलें होतें. बिचाऱ्या नवरीची वास्तपुस्त घेतो कोण ? असेल मेली कुठेंतरी पडलेली ! जिथें सासूच्या जिवाला चैन नाहीं तिथें सुनेला विचारतो कोण ! असो. आज लिहितांना मी आपलीच ते दिवसाची हकीकत मोठ्या मजेनें आठवून लिहितें आहे; परंतु ते दिवशीं खरोखर माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल, तें माझें मलाच विचारावें ! चांगला काळोख पडला, तेव्हां दादा म्हणाला : " यमे, चला आतां आपण खालीं जाऊन बसूं. नाहीं तर जेवायचं-बिवायचं झाल्यावर बाबा, ' अजून कां आला नाहीं ' म्हणून रागावून वर येतील. " मलाहि तें त्याचें बोलणें खरें वाटलें व मींहि त्याच्याचप्रमाणें त्यास म्हटलें. आम्ही दोघांनीं असें एकमेकांस म्हटलें खरें, परंतु जागचे हाललों नाहीं कोणीहि. पण असें किती वेळ चालणार ! दादानें कसलेंसें बुक हातीं घेतलें व माझा हात धरून तो मला ' ऊठ ' म्हणाला. मींहि विचार केला, कीं आतां खालीं गेल्याखेरीज गत्यंतर नाहीं. पण तुम्हांला खरोखर सांगतें कीं, मी जी ते दिवशीं खालीं गेलें ती अगदीं मोठ्या

जुलमानें ! तिन्हीसांजा झाल्या कीं क्षणभरदेखील तिसऱ्या मजल्यावर कधीं मी राह्यची नाहीं, ती मी आज रात्रभरदेखील तेथे बसेन असे मला वाटलें. पोटांत इतकी भूक लागली—आणि ते दिवशीं तर तिने आकांतच उडविला होता; कारण खेळाच्या भरांत व थाटाच्या मेजवानीच्या आशेनें आम्हीं मधल्या वेळींहि कांहीं खाल्लें नव्हतें—तरी पण मार मिळण्याची जबरदस्त भीति असल्यामुळें जेवणदेखील न मिळालेलें पत्करलें, पण खालीं जाणें नको असें झालें होतें. असो.

दादा व मी खाली गेलों, तीं मोठ्या बतावणीनेंच गेलों. दादा जो गेला तो एकदम समईजवळ जाऊन आपलें बुक उघडून बसला. तो मारे थाटानें डोके खालीं करून अगदी वाचनांत गढून गेला असें दिसलें. पण मला नाहीं वाटत त्याचें मन वाचण्याकडे असेलसें. मीहि त्याच्याजवळच जाऊन बसलें, व मधून मधून त्याला हलकेच कांहीं विचारी, पण तो मला तीनतीनदा दाबी. माझा विचारण्याचा हेतु एवढाच होता कीं, बाबा आहेत कुठे ? त्यांचें अंगरखापागोटें कोठे दिसेना, म्हणून मी त्याला विचारूं लागलें. तो तर कांहीं बोलेना, नुसता वरदेखील बघेना. इतक्यांत आमची आई वर आली व आम्हांस पाहून म्हणाली, “ आहांत कारे तुम्ही इथं ? चला तर मग जेवायला. बाहेर जायचं झालं आहे, केव्हां येणं होईल न् केव्हां नाहीं, याचा कांहीं नेम नाहीं. तुम्ही घ्या जेवून आणखी निजा कशी ! चला, मी तुम्हांला वाढतें. मग गोंधळ नको. ”

“ निजा कशीं ” हे शब्द ऐकून मला चमत्कारिक वाटलें. कारण आई, जेव्हां आम्ही सैंपाकघरांत होतों तेव्हां खालीं पहिल्या प्रथम आली होती त्या वेळीं, “ चला रे, आपल्याला आतां आजोळीं जायचं ” असे म्हणाली होती. तेव्हां हें तिचे बोलणें ऐकून अर्थातच मीं तिला विचारलें, “ आजीकडे नाहीं का जायचे म्हणून. ” परंतु तिनें, ‘ नाही, बेत फिरला. निदान आणखी आठ चार दिवस तरी नाहीं. ” एवढेंच उत्तर दिलें. तें तिचें एकंदर भाषण ऐकून मला काय काय वाटलें याचें वर्णन करीत बसण्यांत अर्थ नाहीं. मला बरें वाटलें, वाईटहि वाटलें; असें कां झालें हे कळून घेण्याची इच्छाहि झाली, आणखी कितीक गोष्टी तरी वाटल्या. पण त्यांतल्या त्यांत एवढी मोठी नशिबाची गोष्ट मी समजलें कीं, बाबा बाहेर गेले असून त्यांच्या आधीं आज आपल्याला जेवायला मिळणार ! रोजचा आमचा क्रम असा असे कीं, सकाळीं बाबांच्याबरोबर जेवण, मधल्या वेळीं दादा शाळेंतून सुट्टींत येत असे त्याच्याबरोबर खाणें आणि संध्याकाळीं पुन्हां बाबांच्याबरोबर जेवण. बाबांच्याबरोबर जेवण्याचें आम्हांला नेहमींच जरी नाहीं, तरी बहुश: फारच जड वाटत असे. ते रागांत असले कीं, आमच्या जेवणाची राळ ! आणि तुम्हांला सांगितलें तर आश्चर्य वाटेल—त्यांची सवय अशी असे कीं, सगळा रागजाळ जो काय व्हायचा तो जेवणाच्या वेळीं. कधीं म्हणजे त्यांनीं अगदीं संतोषानें हसत खेळत जेवण केलें आहे असें नाहीं. दादाला वर्गांतल्या अभ्यासाविषयीं विचारायचें झालें तरी जेवणाच्या वेळीं; कचेरींत कांहीं झालें असेल त्याचा राग जेवणाच्या वेळीं,

आणखी राग उत्पन्न करणाऱ्या ज्या कांहीं गोष्टीहि असतील त्या सर्व त्या वेळीं निघायच्या. आमच्या बाबांच्या स्वभावाचें वर्णन करूं लागलें म्हणणें मला अगदीं भानच नाहींसें होतें. ज्या गोष्टी कधीं कोणाजवळ सांगूं नयेत त्यादेखील सांगून द्याव्याशा वाटतात. आतां मला एक गोष्ट आठवली आहे, ती मला सांगितल्याखेरीज राहावतच नाहीं. एक दिवस त्यांनीं असा वरणभात कालवला आणखी आतां घास घेणार तों त्यांत त्यांना कुठे गुंतवळ सांपडला. मग त्यांच्या त्या रागाला काय विचारतां ! इतक्यांतच आई कांहीं कोशिंबिरी कीं कांहीं वाढायला आली, अन् जे ते संतापले ते त्यांनीं तिच्या हातांतील दगडी पार उडवून देऊन, तांब्या हापटून तिला शिव्या देत वाढलेल्या ताटावरून उठून चालते झाले. असा कांहीं त्यांचा आक्रस्ताळीपणा मोठा विलक्षण होता. पण आमच्या आईची शहामत ! ती त्या वेळीं एक शब्ददेखील न बोलतां मुकाट्यानें बसली. आम्हांला जेवूं घातलें व बराच वेळ झाल्यानंतर बाबांच्याकडे जाऊन तिनें आपल्या अजब युक्तीनें व मोहक बोलण्यानें त्यांना पुनः जेवायला आणून बसविलें. माझ्या लहानपणीं पाहिलेल्या ज्या कित्येक गोष्टी फारच स्पष्ट रीतीनें माझ्या आठवणीत आहेत; इतकेंच नव्हे, तर मला ज्यांचें अगदीं ठळक असें चित्र दिसतें आहे, त्यांपैकींच ही आतां सांगितलेली गोष्ट होय. काय करामत असेल त्या माउलीची ती विलक्षण खरी ! मी मोठी झाल्यानंतर नेहमीं वाटत असे कीं, माझे बाबा जर शांत असते व प्रत्येक गोष्टींत आई सांगेल त्याप्रमाणें वागते, तर त्यांना असंतोषाचा एक क्षणहि आला नसता ! वाचकहो ! काय सांगूं मी आपल्या आईची थोरवी ! तिचे नांव निघालें म्हणजे त्या नांवाचा जपच करीत बसावें, तिच्या गुणांचें यथेच्छ वर्णनच करीत बसावें असें वाटतें. अशा बायका घरोघर असतील, नसतील असें माझें म्हणणें नाहीं, परंतु तिची गोष्ट फारच निराळी होती. आमचे बाबा इतके विलक्षण संतापी, तिला इतकें सदोदित दुःख, परंतु ती एक दिवस कोणाच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या घरीं गाऱ्हाणीं सांगत बसली असेल तर शपथ ! प्रत्यक्ष तिची आई आमच्या येथें काशीयात्रेहून परत जातांना आठ दिवस येऊन राहिली होती, पण तिच्याजवळदेखील तिनें आपल्या दुःखाविषयीं कधीं कोणत्याहि प्रकारचे उद्गार काढले नाहींत. ती काय बोलत असे वगैरे तें सर्व कांहीं मी ऐकेंच. मला दुसरा उद्योग काय ? जेवावें, खावें, आणखी आईआजीच्या जवळ असावें इकडे तिकडे करीत !

आम्ही जेवायला गेलों. खूप भूक लागली असल्यामुळें मी यथास्थित जेवलें; तरी पण बाबा इतक्यांत येतील कीं काय ही धुगधुग होतीच. शेवटीं जेवण झालें व आम्ही वर गेलों. दादा व मी वर आल्यावर जरा इकडे तिकडे करतों तों मला झोप येऊं लागली व मी आमच्या अंथरुणावर जाऊन पडलें. पुढें मी सांगणार आहें, तें माझ्या कानावर कां व कसें आलें, हें पुरतेपणी समजण्याकरितां आमचीं अंथरुणें कोठें असत हें सांगितलें पाहिजे. आमचा दिवाणखाना होता, व तो जरा मोठा होता. तेव्हां त्याच्या एका बाजूला आम्ही निजत असूं—दादा व मी आणि बाबा अगदीं दुसऱ्या टोकाशीं. आम्ही पडलों लहान मुलें. दुसऱ्या कुठल्या खोलींत निजलों तर रात्रीं भिऊंबिऊं, सोबत कोणी

नाहीं म्हणून नाइलाजास्तव ही तजवीज केलेली होती. वास्तविक बाबा व आई नेहमी म्हणत कीं हे कांहीं बरें नव्हे. परंतु ज्या गोष्टीला इलाज नाहीं तेथें काय करणार ! असो. मला ताबडतोब झोप लागली आणि तीहि इतक्या थोड्या अवकाशांत व इतकी गाढ लागली, कीं त्यानंतर दादा मजजवळ केव्हां येऊन निजला, बाबा बाहेरून आले कीं नाहीं, आले असले तर केव्हां आले, व रात्रीं मग घरांत काय काय चमत्कार झाले, मला त्यांतलें यत्किंचित् देखील कांही माहीत नाहीं. सारा दिवसभर हमामा घातला म्हणून म्हणा, किंवा बाळपणचीच ती झोप म्हणून म्हणा, पण मला अशी गाढ झोप लागली कीं वा ! परंतु त्याचा परिणाम पुढें असा झाला कीं, मी पहाटेसच जागी झालें. चार वाजून गेले असावे; कारण, नंतर बऱ्याच वेळानें कुठलेसे पांच टोले मला ऐकूं आले. मी चांगली जागी झालें तों माझ्या कानीं पुढले शब्द पडले—ते जरा मोठ्यानेंच उच्चारलेले होते :—

" तुम्हीं इथं राहूं नये तें चांगलं. आतां काय प्रसंग येतो आणि काय नाहीं याचा कांहीं नेम आहे ? "

" माझ्याकडून जाण्याला काडीचीदेखील हरकत नाहीं हो, पण मी आपली म्हणतें कीं, आमच्या इथं राहण्यानं कांहीं येईल प्रसंग तो जास्ती व्हायचा नाहीं; बरं, आम्ही गेलों अन् तो यायचाच असला तर कांहीं टळायचा नाहीं. "

" मला कीं नाहीं हा असला वेदान्त नको ! मुकाटयानं जावं इथून तें ठीक, तुम्हांला बायकांना ज्या गोष्टी कळत नाहींत, त्या गोष्टींन तुम्ही बिलकुल बोलूं नये. करूं नये तें केलं, तूं सांगत होतीस तरीदेखील ऐकलं नाहीं, आतां त्याचीं फळं भोगावीं लागणार, तीं भोगलींच पाहिजेत. अशा वेळीं तूंय ऐकेनाशी झालीस तर राख लावून बैरागी होण्याचीच पाळी आली म्हणायची ! "

अशा तऱ्हेनें बाबा आणखी पुष्कळ बोलत होते. आई कांहींच बोलली नाहीं. ती पांच वाजल्यावर उठून खालीं चालती झाली. मी तशीच अंथरुणावर पडलें होतें. माझ्या मनाची स्थिति इतकी कांहीं भयंकर झाली कीं, ती वर्णन करता येत नाहीं. एक तर आईबापांचें एकान्तीं बोलणें चाललें असतां तें आपण ऐकिलें हें फारच वाईट काम केलें असें मला वाटलें. आमच्या आईनें ज्या कित्येक गोष्टी अगदीं लहानपणापासून आमच्या मनावर ठसविल्या होत्या, त्यांपैकींच दुसऱ्याचें एकान्तांतलें भाषण कधींहि आडून ऐकूं नये, इतकेंच नव्हे तर आपल्या मनांत नसतां कांहीं गोष्टी घडून जर तसा प्रसंग नाइलाजानें आलाच, तर त्या बोलणाऱ्या माणसास आपण जवळ आहोंत हें स्पष्ट किंवा अन्य मार्गानें कळवावें. परंतु नाइलाजामुळें ऐकावें लागलें, काय करावें ? आपला काय त्यांत दोष ? असें म्हणून आपण आपल्याला दोषमुक्त करून घेऊन दुसऱ्याचें गुह्य ऐकणें अगदीं वाईट, असें ती आम्हांस सांगे. वास्तविक म्हटलें म्हणजे बाबाचें बोलणें माझ्या कानीं पडतांच मी खोकून अगर दुसऱ्या कांहीं मार्गानें आपण जाग्या आहोंत

असें त्यांस कळवावयास पाहिजे होतें आणि मीं खरोखर दुसऱ्या एखाद्या अशा प्रसंगीं तसें केलें असतेंदेखील. पण सध्यांच्या वेळीं ' आतां काय प्रसंग येतो आणि काय नाहीं, याचा कांहीं नेम आहे ! ' हे बाबांचे शब्द ऐकून माझ्या मनाला जें वाटलें व जो धक्का बसला, त्याच्यासरशीं मी तें सर्व जणू काय विसरून गेलें, आणि न ऐकण्याविषयीं प्रयत्न करावयाचा एकीकडेसच राहून मी जास्त उत्कंठतेनेंच ऐकूं लागलें. मला असें वाटलें कीं, हें आहे तरी काय लचांड ? आईचें बोलणें तेंहि तसेंच विलक्षण ! ! आपल्या आईबापांवर काय प्रसंग येणार आहे आणि काय होणार आहे ? बाबांनीं अशी काय गोष्ट केली, आणि तिचीं फळें काय भोगावीं लागणार हें माझ्या लक्षांत कांहींच येईना !

या विवंचनेंत असतांनाच बाहेर चक्क उजाडलें. दादाहि उठला. दादा उठल्यानंतर ऐकलेली गोष्ट त्याला सांगावी किंवा काय असा विचार मनांत आला. परंतु आम्हांला कोठेंतरी बाहेरगांवीं जायचेच असें खास ठरलें असल्यामुळें बांधाबांधी करण्यांत, शेजाऱ्यापाजाऱ्यांना विचारण्यांत व जेवणाखाण्यांतच सारा वेळ गेला आणि दुपारी साडेबाराच्या गाडीनें आम्ही निघालो.

" दादा, तुला एक मोठी जम्मत सांगावयाची आहे. " एवढें मात्र मीं दादाला म्हटलें होतें.

लहानपणीं कांहीं होवो, ज्यापासून प्रत्यक्ष रीतीनें स्वतःला कांहीं दुखापत होत नाहीं त्या ' जमतीच ' असतात.

◆ ◆ ◆

## ३ : आमचा प्रवास

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

आनंद काय किंवा खेद काय, कोणत्याहि विकाराचा परिणाम, लहान वयांत मनावर फार वेळ कधींच टिकत नाहीं. या माझ्या म्हणण्याचा अनुभव प्रत्येकास असेलच. तेव्हां त्याच्याविषयीं विशेष फोड करून सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सध्या मला येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, दोन प्रहरीं आगगाडींत बसण्याच्या वगैरे गर्दीत पहांटे ऐकलेलें सर्व कांहीं मी विसरून गेल्यासारखींच झालें. आगगाडींतून प्रवास करण्याच्या आनंदापुढें सकाळीं ऐकलेल्या सर्व गोष्टींचा खेद तो कसचा राहणार ? त्या वेळीं तरी तो मी पुरता विसरून गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोणीहि गांवास जाऊं लागलें कीं, गाडींत बसण्याच्या हौसेमुळें त्याजबरोबर आपण जावें असें ज्या वयांत फार वाटावयाचें त्या वयांत आगगाडींतून प्रवास करण्याचा प्रत्यक्ष प्रसंग आल्यावर आणि तोहि नेहमीं

रागवणारे बाबा बरोबर नसतां,–( आमचे बाबा आमच्याबरोबर नव्हते हें येथें सांगावयास नकोच. त्यांनीं आपल्या कचेरीतला कृष्णाजीपंत नांवाचा कारकून आम्हांस पोंचविण्यासाठीं दिला होता. ) मग आनंदाला हो काय विचारतां ? अशा आनंदापुढें, सहज ऐकलेल्या आणि ज्यांचा अर्थ मुळींच समजला नाहीं असें म्हटलें तरी चालेल, अशा शब्दांपासून उत्पन्न झालेला खेद कितपत टिकणार ? तो तेव्हांच नाहींसा झाला. असो.

ज्याप्रमाणें मोठेपणीं कित्येक मंडळीस वनश्रीची शोभा पाहणें वगैरे कांहीं आवडत नसते, त्याप्रमाणें लहानपणीं कोणाचीहि स्थिति नसते. त्या वयांत सर्व कांहीं पाहावेंसें वाटतें कोणतीहि गोष्ट, मग त्यांत कळो न कळो, आपण पाहिलीच पाहिजे ही मोठी उत्सुकता. या नियमाला अनुसरूनच अर्थात् आगगाडींत खिडकीपासल्या जागेवर कोणीं बसावें, याविषयीं आम्हां बहीणभावंडांचा वाद सुरू झाला. दादा म्हणे मी मोठा आहें तेव्हां मी खिडकींत बसेन, आणि मी म्हणे मी बसेन. शेवटीं त्या वादांत खिडकीच्या बाहेर डोकें काढतां काढतां दादाची टोपीदेखील पडली, पण नशिबाची गोष्ट एवढीच कीं, गाडी चालू झाली नव्हती, आणि आमचें सामान आणणारा पोर्टर जवळच उभा होता; त्यास सांगून आईनें ती टोपी वर आणविली. हें झाल्यावर कोणाच्या धक्क्यानें टोपी पडली याबद्दल वाद कमी झाला असें मात्र समजू नका हो ! तो व्हावयाचा तितका होऊन शेवटीं आईनें दादाला " तूं मोठा आहेसना ? इकडे ये माझ्याजवळ बैस, " असें म्हणून आपल्याशी ओढलें, आणि मजकडे किंचित् डोळे मोठे करून मात्र पाहिलें. पण माझ्या कशाला तें लक्षांत येतें आहे ? इतका वेळ वाद होऊन शेवटीं आपणासच खिडकीपासली जागा मिळाली याच आनंदांत मी होतें. आईनें किंचित् दरडावण्याबरोबर दादा मात्र उगीच बसला. मी एकदा उगीच त्याच्याकडे वाकडा डोळा करून पाहिलें, तेव्हां त्यानें " बरं ! पाहून घेईन, तुझी आमची गडी फू ! " अशा अर्थाची खूण बरीक केली. पण मी आपल्या आनंदांत. ती मी त्याची काय त्या वेळीं पर्वा करतें आहें ? परंतु मजा काय झाली ती पाहा. ' साखरेचा खाणार त्याला देव देणार ' म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आम्ही बसलों होतों त्याच डब्यांत आणखी दोघी बाया पलीकडल्या खिडकीशीं बसल्या होत्या, त्यांनीं आमच्या दादाचें हिरमुसलें तोंड पाहून त्यास जवळ बोलावून खिडकीपाशीं जागा दिली, आणि आगगाडी चालू झाली. काय माझा स्वभाव असेल तो असो. दादास तिकडे जागा मिळाल्याबरोबर ' आपणांस जर ती जागा मिळती तर फार चांगलें झालें असतें. त्या बाजूची मजा दादास दिसेल. ती आपणांस दिसणार नाहीं, ' असें माझ्या मनांत येऊं लागलें आणि आतां उठून त्याच्या जागीं जातां येईना म्हणून मी आपल्या जागेवरूनच, पण त्याच्या बाजूला तोंड करून पाहूं लागलें. या यःकश्चित् गोष्टीदेखील मी एवढया सूक्ष्म तऱ्हेनें वर्णन करून सांगतें आहें याचें कित्येकांस आश्चर्य वाटेल; परंतु मनुष्याचा खरा स्वभाव कळण्यास अशा गोष्टी सांगितल्या तरच कांहीं उपयोग आहे. लहानपणीं कित्येक गोष्टी अशा अवस्थेंत असतात कीं, त्याच पुढें वाढल्यानें मनुष्याच्या एकंदर स्वभावाचें एक अंग होऊन बसतात, किंवा

आईबापांनीं त्यांचा समूळ उच्छेद केल्यास नायनाटहि होतो. ही स्थिति बऱ्या वाईट दोनहि प्रकारच्या गोष्टींस लागू आहे हें सांगणें नकोच.

आतां ज्याअर्थी मीं आपलें स्वतःचें चरित्र अगदीं मुळापासून सांगण्याचें योजिलें आहे, त्याअर्थी लहानपणापासून माझा स्वभाव होता कसा, तो पुढें कसा झाला, आणि तो तसा होण्यास कोणते बरेवाईट प्रसंग कारण झाले, हें सर्व सांगितलें पाहिजे. मी माझें चरित्र म्हणून सांगणार, परंतु मी कांहीं अद्वितीय स्त्री नसल्यामुळें जें माझें तेंच दहाजणींचें चरित्र असें समजावें. त्यांत आलेले प्रसंग मात्र निराळे असावयाचे. बाकी आम्हां बायकांचा आयुष्यक्रम सगळा एकसारखाच, असें म्हटलें तर मोठासा प्रत्यवाय नाहीं. तेव्हां होतां होईल तो लहानसहान गोष्टीदेखील नमूद करणें हें बरे असें वाटून मीं तसें करण्याचें योजिलें आहे; तरी पण आतां आगगाडींत जे जे प्रकार झाले, ते ते सर्व मी येथें सांगत बसत नाहीं. दादाचा आणि माझा किती वेळा खटका झाला, मीं त्याच्याजवळ कितीकदा माफी मागितली; पुनः थोडेसें कारण झाल्याबरोबर आपलें तेंच खरें करण्याकरतां कशी भांडलें, आणि 'शेजीवांचून सरेना आणि घडीभर पडेना' या न्यायाप्रमाणें पुनः त्याच्याशीं कशी लाडीगोडी लावण्यास गेलें, कांहीं जिन्नस स्टेशनवर आला कीं, तो घेण्याकरितां मी जाणती आणि सुंदरी नेणती, दोघी मिळून आईच्या पाठीमागे कसा त्रास दिला, या सर्व गोष्टी हें माझे चरित्र वाचणारांनीं आपला लहानपणचा अनुभव आठवून अगर ज्यांस मुलें असतील त्यांनीं आपला सध्यांचा अनुभव पाहून ध्यानांत आणाव्या. त्या बिचाऱ्या आईला माझ्या हटवादीपणामुळें ते दिवशीं किती दुःख झालें असेल, याचा जर मला त्या वेळीं अजमास होता तर किती बरें चांगलें झालें असतें! मीं तिला यत्किंचित्‌देखील दुखविले नसतें. ती केवढ्या विवंचनेंत होती हें आज मला डोळ्यापुढें दिसत आहे. तिचा तो खिन्न झालेला चेहरा आणि आम्हीं फारच त्रास दिला म्हणजे थोडेसें त्रासून दिलेलें एखादटुसरें उत्तर, हीं तिच्या मनाची अस्वस्थता पूर्णपणें दाखवीत होतीं. पण हें सारें मला आज दिसत आहे. त्या दिवशीं कांहीं वाटलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर एखादे वेळीं, आई आपण म्हटल्याप्रमाणें करीत नाहीं म्हणून रागहि आला असेल; परंतु जाऊं द्या. आतां त्यांबद्दल वाईट वाटून काय उपयोग? मला वाटतें, हल्लीं चांगल्या स्थितींत असलेल्या लोकांस आपल्या लहानपणीं आपण आईबापांस दिलेला त्रास आठवला म्हणजे केव्हां केव्हां वाईट वाटत असेल!

आमचें आजोळ—हो, पण बरी आठवण झाली. प्रथमतः जेव्हां मी "चला रे आपल्याला आज रात्रीं आजोळीं जायचें; चला व्हा वर!" असे आईचे शब्द सांगितले, तेव्हांच हें सांगावयास पाहिजे होतें; परंतु आम्ही आपल्या मूळ गांवीं आजाआजी (बाबांकडलीं) राहात असत त्यासच आजोळ म्हणत असूं, यामुळें तें सहज येऊन गेलें. आमच्या बाबांच्या व आजोबांच्या चमत्कारिक स्वभावानें थोडासा परकीय भाव उत्पन्न झाल्यामुळें आम्हांला आजोळ म्हटलें कीं, इकडचीं आजाआजी राहात असत तेंच दिसे;

आणि त्यालाच आम्ही आजोळ म्हणत असूं. हें येथें मुद्दाम सांगण्याचें कारण इतकेंच कीं, प्रचारांत आजोळ म्हटलें कीं, आईकडील आजाआजीचें घर असें समजलें जातें; परंतु आजोळ म्हटलें कीं, आमच्या स्वतःच्या घराखेरीज दुसऱ्या घराची कल्पनाच आमच्या मनांत आली नाहीं. असो.

आमचें आजोळ आगगाडीच्या स्टेशनगांवापासून फार जवळ—सुमारें सात किंवा आठ कोसांवर—होतें आणि सडकहि फार चांगली होती, यामुळें आम्ही चार साडेचार वाजल्यानंतर उतरतांच आईनें कृष्णाजीपंतांस लागलीच बैलगाडी करण्यास सांगितलें. स्टेशनच्या गांवीं आम्हांस उतरण्यास ठिकाण नव्हतें असें नाहीं; परंतु आमच्या आईस दुसऱ्याच्या घरीं जाऊन उतरणें अगदीं आवडत नसे, यामुळें तिनें गर्दी केली आणि गाड्याहि येथें ताबडतोब मिळण्याजोग्या असल्यामुळें कोणत्याहि प्रकारची अडचण पडली नाहीं. कृष्णाजीपंतांनी "मुलांना जेवूं घातल्याखेरीज जाण्यापेक्षां गांवांत केळकरांच्या येथें जाऊन पहाटेसच निघावें तें चांगलें नाहीं का होणार ?" असें विचारलें; परंतु तिनें तिकडे अगदीं काणाडोळा केला. "कांहीं नको कोणाच्या इथं जायला. मीं दशम्या करून आणल्या आहेत त्या मधें, त्या-ह्यांच्या विहिरीवर सहा साडेसहा वाजतां घालीन त्यांना खायला म्हणजे झालं, सुंदरीची खीर आहेच अजून थोडीशी." इतकें म्हणून तिनें गांठोडें उचललेंच. आम्हांला प्रवासाची हौसच, तेव्हां आम्हांलाहि कांहीं वावगें वाटलें नाहीं. कृष्णाजीपंतांनी गाडी ठरवून आंत सामान भरलें आणि आम्ही निघालों. कृष्णाजीपंत कांही गाडींत बसले नाहींत. ते म्हणाले, "संध्याकाळची वेळ आहे, मी अंमळ पाय मोकळे करण्यासाठीं चालतोंच." तें ऐकून दादाने तसाच विचार केला आणि तसें करण्यास आईची परवानगी मागितली. आईनें त्यास दिली. मग काय मला राहवतें ? मीहि हट्ट धरिला; परंतु आईनें एकदा दोनदा सौम्यपणानें "नको, तुला चालवायचें नाहीं, त्यालादिखील मी थोड्या वेळानें गाडींत बसायला सांगणार आहे" असे म्हटलें. मी फारच हट्ट धरून बसलें. त्या वेळचा मात्र आईचा त्रासलेला व त्यांत आणखी संतापलेला चेहरा मी ही हकीकत लिहीत असतांना तो माझ्या डोळयांसमोर स्पष्ट दिसत आहे. "जा काय हवें तें कर. पुनः मला विचारशील तर खबरदार" असें म्हणून तटकन् पलीकडे ढकलून दिलें आणि आपण सुंदरीला घेऊन गाडींत जाऊन बसलीदेखील. मला तिनें ढकलून दिल्याबरोबर मी खरोखर खालीं पडलें व रडूं लागलें. इतका प्रकार झाल्यावर मग कसलें पायीं चालणें आणि कसलें काय ! मला कृष्णाजीपंतांनीं पटकन् उचलून गाडींत टाकलें आणि गाडी चालू झाली. दादा आपला पुढें सूं निघाला त्याला ही मागली हकीकत मुळींच ठाऊक नाहींसें दिसलें. कृष्णाजीपंतहि थोड्या वेळानें पुढें गेले. मी गाडींत एकसारखी ओक्साबोक्शी रडत होतें. आईनें तिकडे यत्किंचित्देखील लक्ष दिलें नाहीं. ती आपली स्वस्थ बसली होती. सुंदरीला डुकल्या येऊं लागल्यामुळें तिनें एका बाजूस तिला निजवलें. माझें रडणें चालूच होतें. असा प्रकार सरासरी तासभर चालला असेल, इतक्यांत काय असेल तें असो, आईनें एकाएकीं मला आपल्याजवळ

ओढून घेतलें आणि पोटाशीं धरून, पाहतें तों आपणहि रडूं लागली. मग मात्र मला फारच चमत्कारिक होऊन गेलें. मीं आपलें रडें अगदीं आवरलें—तें आटपत आलेंच होतें म्हणा—आणि आईच्या गळ्याला मिठी मारून गप्प बसलें. पांच दहा मिनिटें झालीं नाहींत तोंच आई मला म्हणाली, " यमे, तुला अजून काळ वेळ कांहीं समजत नाहींना ? " हे शब्द बोलतांना तिचा कंठ किती दाटला होता म्हणून सांगूं ! वाचकहो, त्या वेळचे तिचे शब्द जितके माझ्या अंतःकरणांत भिनले तितके पुनरपि कोणाचेहि शब्द भिनले नसतील. त्या शब्दांत जणूं काय तिनें आपला जीव एकवटून घातला होता; किंवा तिचे अंतःकरण सारेंचे सारें तुटून त्यांत आलें होतें. तिची विवंचना आणि त्या विवंचनेमुळें तिचें हृदय किती होरपळलें होतें हें सर्व तिच्या शब्दांत स्पष्ट दिसलें; पण हें मला आतां कळतें आहे. त्या वेळीं कळतें तर किती चांगलें झालें असतें ! त्यानंतर जो मी आपल्या आईला अनेक प्रकारांनीं त्रास दिला तो खरोखर दिला नसता; निदान फार कमी दिला असता. असो; ते आईचे शब्द ऐकल्यावर मीं तिच्या गळ्याला जास्तच मिठी मारली. आम्ही दोघीहि रडूं लागलों. मला वाटतें सकाळपासून किंबहुना आदलें रात्रीपासून सांचत सांचत आलेलें सर्व दुःख एकान्त मिळतांच तिच्या मनांत नसतांहि तें बाहेर पडलें. पुढें तिच्या मनांत पुष्कळच बोलायचें होतें असें दिसलें; परंतु एवढ्याशा पोरीजवळ काय बोलायचें असें मनांत येऊन म्हणा, अगर आपण हें भलतेंच काय करितों असें मनांत येऊन म्हणा, ती अगदी गप्पच राहिली. बऱ्याच वेळानें मला एवढें मात्र म्हणाली : " यमे, मी रडलेंबिडलें असें आजीपाशीं सांगूं नकोस हो " इतके बोलून ती स्वस्थ बसली. बराच वेळ झाला. आम्ही दोघी एकमेकींकडे पाहात बसलों होतों. मला तर पेंगहि यायला लागली म्हणून मी पडलें; पण इतक्यांत कृष्णाजीपंत धावत गाडीशीं येऊन विचारतात, " कायहो, गणपति कुठें दिसेना हा ? "

" म्हणजे ? " आई घाबरून मोठ्यानें म्हणते.

◆ ◆ ◆

## ४ : मधलें विघ्न

* * * * * * * * * * * * * * *

तो प्रश्न विचारतांना आईची ती भयंकर मुद्रा पाहून त्या गृहस्थास काय वाटलें असेल याचें वर्णन करतां यायचें नाहीं. त्याचे तोंडांतून एक ब्र देखील निघेना. पुढच्या बाजूस गाडीवाला आपला नादांत गाडी हांकीत होता, त्यास हा प्रकार कांहींच कळला नाहीं असें दिसलें. " म्हणजे ? " असें म्हणून आई थांबली नाहींच. गाडी चालली असतांनाच तिनें खालीं उडी टाकली आणि " चला, चला आपण त्याला शोधूं " असें म्हणून ते येण्याची वाट न पाहतां ती धूम पुढें पळालीच " यमे, सुंदरी निजली आहे

बरं का ? " असें मात्र जातांना म्हणाली. कृष्णाजीपंत आपला क्षणभर चित्रासारखा उभाच राहिला होता. मीं तर केवढा गळा काढला याचा कांहीं सुमारच नाहीं. कृष्णाजीपंत केव्हां आईच्या मागोमाग गेला हें मला मुळींच कळलें नाही. इतक्यांत तो गाडीवाला मागें वळून मला विचारतो, " काय ग मुली, तुला रडायला काय झालं ? " त्याला नीट सांगायचं सोडून मी ' अरे ! काय विचारतोस रे ? माझा दादा कुठें नाहीं रे ! " असें कांहीं हेल काढून, कांहीं स्फुंदत त्याला म्हटलें, " अं ! अन् कुठं गेला तो ? अन् बाई बी कुठं गेल्या ? " मी आपली कांहीच त्याला उत्तर देईना. माझें एकसारखें रडणें चालू होतें, हे पाहून त्याला काय वाटलें असेल तें असो ! त्यानें गाडी उभी केली, बैल सोडले आणि बैलांच्या पुढे चार कडब्याचीं ताटे टाकून वेडा आपणहि निघून गेला. माझ्या रडण्याच्या भरांत माझ्या हें कांहींच लक्षांत आलें नाहीं. बरें आपणहि गेल्यावर या गाडींत दोन पोरी एकट्या करतील तरी काय असा त्या बिचाऱ्याच्या स्वप्नांत-देखील विचार आला नाहीं असें दिसतें. तो बराचसा दूर गेल्यावर मग मी शुद्धीवर आल्या-सारखी होऊन त्याला हांका मारूं लागले. पण कोणीदेखील ओ देईना. आतां काय करतां ! अगदीं तिन्हीसांज होण्याची वेळ झालेली. वाटेनें कोणी माणूसदेखील दृष्टीस पडेना कीं कोणाचा आवाज ऐकूं येईना. अशा वेळीं मी एकटी एवढीशीशी भर रानांत पडले. आतां तो प्रसंग मी नुसता आठवतें आहे. तरीदेखील माझ्या डोळ्यांस पाणी आल्या-खेरीज राहात नाहीं. मग त्या वेळीं मी किती रडलें असेन आणि किती नाहीं याचा कांहीं अजमास तरी कोणास करतां येईल काय ? अहो, आम्हां लहान पोरींना स्वयंपाकघरांतून माजघरांत दिवा घेऊन जायचें म्हटलें तरीदेखील सोबतीखेरीज व्हायचें नाहीं. मग एवढ्या थोरल्या रानांत—हो रानच नाहीं तर काय तें,—सगळीं गाठोडीन् बासनं घेऊन मी एवढीशीशी पोरगी अगदीं एकटी अन् माझ्याजवळ ती सुंदरी निजलेली ! त्या वेळच्या लहानपणच्या कल्पनांनीं कोणकोणती अचाट संकटें आपणांवर ओढवतील असे वाटलें ! थोडी कुठें चाहूल लागली कीं मनाचा थरकांप कसा होई. शेवटीं रडणें बंद करून भयानें अगदीं त्रेधा उडून गेलेली, मीं गांठोडी इकडली तिकडे करून त्यांवर पडून पासोडी वर होती ती पांघरून कशी गाडींत पडून राहिलें, हें माझें मलाच ठाऊक. जीव एकसारखा धाकधूक करीत होता. उरांत धडकी भरली होती. जरा कांहीं खुट् झालं कीं असं वाटे, कीं कोणीतरी आलें. त्या वयांत चोरांच्यापेक्षां भुतांचीच भीति फार वाटते. मी आपल्या पायांच्या खालून आजूबाजूनें व डोक्यावरून अशी ती पासोडी गुरफटून घेतली होती. भर रानांत गाडी उभी. पण मला उकडून घाम सुटला तरी पण मी पासोडी काढतें कशाला ? अशा स्थितींत एक एक क्षण म्हणजे एक एक घटका, आणि एक एक घटका म्हणजे प्रहराप्रमाणें वाटूं लागते. मी कितीक नवस केले याचा तर मुळींच सुमार नाहीं. अर्थात् माझे नवस म्हणजे पोरांच्या नवसाप्रमाणेंच असावयाचे. कुठें दोन पैशांचे पेढे, कुठें सव्वा पैशाची खडीसाखर, कुठें खणानारळाची ओटी—अर्थातच तो खण आणि तो नारळ आमच्या भातुकलीच्या खेळांतला ! शिवाय मी तुळशीला रोजच्या शंभर

प्रदक्षिणा घालीन म्हणूनहि नवस केला. पण जाऊं द्या. अशा जर मीं त्या वेळच्या सगळ्या कुळकथा इत्थंभूत सांगितल्या तर मग एक भारूडच होईल. सबब मी आपली आतां पुढल्या हकीकतीलाच सुरुवात करतें.

मी एकटी त्या गाडींत पडलें असतांना बराच वेळ झाला. पाखरांचा वगैरे कलकलाट कमी होत चालला व अंधारहि मला जास्ती वाटूं लागला. त्या मेल्या वेळ्या गाडीवाल्यानें गाडी उभी केली होती ती अगदींच वाटेंत. इतक्यांत मागून एक गाडी येते आहे असा मला भास झाला. मी अगदीं कान लावून ऐकूं लागलें. किती वेळां तेवढ्याकरितां श्वासदेखील आवरून धरला असेल. क्षणोक्षणीं पाठीमागून येते आहे ती गाडीच येते आहे, अशी माझ्या मनाची खात्री होऊं लागली. ही जर कोणी आपल्या-सारख्यांचीच असली तर ठीक, नाहीं तर जर का नुसतेच कोणी धटिंगण असले तर मग आतां आपलें कसें होणार ? हा दुसरा विचार मनांत येऊन थोडा वेळ झाला नाहीं तोंच ती बैलगाडी माझ्या गाडीच्या मागें येऊन ठेपलीच. ती ठेपलीशी वाटण्याबरोबर मी तट्कन् उठून बसलें; व बोलणार तोंच त्या गाडीचा गाडीवान, 'ए गाडीवान' ए गाडीवान, कोण अडाणी आहे रे ? गाडी बाजूला घे,' असें ओरडूं लागला.

त्याचे हे शब्द ऐकण्याबरोबर मीं त्याला म्हटलें, "अरे, आमचा गाडीवान दादाला शोधायला गेला आहे!" हे माझे शब्द ऐकून त्याला काय वाटलें असेल तें त्याचें त्यालाच ठाऊक ! तो आपला गाडीवरून चट्कन उतरून आमच्या गाडीजवळ आला व इकडे तिकडे पाहतो तों गाडींत ओझींपाझीं आणि मी एवढीशीशी पोरगी; सुंदरी पांघरुणानें गुरफटलेली त्याला दिसलीच नाहीं. पण तोहि आपल्या गाडीत एकटाच होता. मला मागून कळलें कीं, तो कांहीं लाकडें वगैरे पोंचवावयाला गेलेला परत रिकामी गाडी घेऊन चालला होता. असो.

त्यानें मला एकटीला पाहण्याबरोबर कींव आल्यासारखें दाखविलें व मीं एकटीशी ? गाडीवान कुठें गेला ' वगैरे विचारूं लागला. मीं त्याला सर्व हकीकत सांगितली. ती कुठपासून म्हणतां ? अगदीं घरून निघाल्यापासूनची म्हटलेंत तरी हरकत नाहीं. त्यानें ती ऐकून घेतल्यासारखे केलें आणि आपला लागला गांठोडीं चापसायला. अंमळशें चापसावें, खालीं टाकावें, दुसरे चापसावें, उचलून पाहावें, जडसें वाटलें सोडून पाहावें, बरें झालें तितक्यांत सुंदरी त्याच्या हातीं लागली नाहीं. त्याचें तें करणें पाहून मी रडूं लागलें व मोठ्यानें "हें रे काय बाबा ?" एवढेंच म्हणूं लागलें पण तो दटावून "गप्प बैस कारटे, नाहीं तर टाकीन त्या विहिरींत नेऊन !" असें म्हणाला. मी आपल्या-कडून पुष्कळ यत्न केला, परंतु माझें रडें थांबेना. शेवटीं मी आईला, गाडीवानाला आणखी कृष्णाजीपंताला मोठमोठ्यानें हांका मारूं लागलें. दोन तीन हांका मारतें न मारतें तोंच त्या मेल्यानें माझ्या तोंडावर सपाटून चापटी मारलीन् आणि "बोंबलतेस नाहीं का, कारटे ?" असें म्हणून मला उचललेन्. माझे दांत त्याच्या चापटीसरसे शिणशिणले आणि ते

ओठांत जोरानें रुतून त्यांतून रक्त वाहायला लागलें. इतकें झाल्यावर अर्थातच मीं ओरडण्याचें बंद केलें; पण मोठमोठ्यानें जरी नाहीं तरी माझें रडणें सुरू होतेंच. त्या मेल्यानें मला उचलून माझी मोटकळी करून दूर नेऊन जमिनीवर हापटलें, माझ्या पोटरींत एक कांटा-देखील गेला आणखी " जास्त ओरडशील तर मी जवळच आहें, डोकींत धोंडा घालीन, कधीं सोडणार नाहीं, कारटे " असें म्हणून तिथून चालता झाला. मी आपली तशीच विवळत पडलें. सुंदरीची आतां मला आठवणहि नाहींशी झाली. मोठ्यानें ओरडण्याची अर्थातच आतां अगदीं बंदी झाली. तरी पण अशा तऱ्हेनें मला किती वेळ राहवतें ? मी पुनः मोठमोठ्यानें रडूं ओरडूं लागलें. आपल्या हातानें कांटा काढला व आतां पळावें म्हणून उठणार तों, " यमे, यमे, कुठें आहेस ग ? " असे शब्द माझ्या कानीं पडले. वाचकहो ! ते शब्द कानी पडतांच माझें मन किती शांत व किती आनंदी झालें याचे वर्णन करूं लागलें तर तुम्हांला खरेंदेखील वाटणार नाहीं. माझ्या दादावर माझी प्रीति किती होती हें मला त्या वेळीं कळलें. तीं त्याची हांक ऐकण्याबरोबर मी एवढीशीशी, पण माझ्या अंगांत कितीतरी बळ आल्यासारखें झालें ! " ही इथं आहे ! " असें मोठ्यानें ओरडून मीं त्यास कळविलें. मग कृष्णाजीपंत व आईहि सुंदरीला घेऊन धावत येऊन मला " मी इथें कशी आल्यें, गाडीवाला कुठे गेला ? " वगैरे विचारूं लागली. कांहींतरी अचाट झालें असावें असें त्यांस तीं गाठोडीं विस्कळित पडलीं होतीं व मी नसून सुंदरी मोठमोठ्यानें ओरडत होती, त्यावरूनच वाटलें होतें. मीं आपली सगळी हकीकत सांगितल्याबरोबर आईनें मला पुनः एकदा घट्ट पोटाशीं धरलें आणि " अशी कशी तुम्हां दोघींना टाकून गेलें ? " म्हणून मोठ्यानें आपली रडूं लागली. मग दादानें व कृष्णाजी-पंतांनीं तिचें शांतवन करून गाडीपाशीं आणलें. गांठोडीं वगैरे पाहतां त्यांतलें कांहींच गेलें नव्हतें हें पाहून बरीक सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. पण मग कृष्णाजीपंतांनीं असा अदमास केला कीं, आम्हीं मोठमोठ्यानें बोलत यमीला हांका मारीत येत असतांना त्या गाडी-वानानें ऐकून आतां इथें राहणें बरें नाहीं, असें समजून कांहींएक न घेतांच सूं केलें असावें. असो अशी एकंदर हकीकत झाली. इतक्यांत गाडीवालाहि आला. माझें मन जरा ठिकाणावर येताच मी " पण दादा, तूं कुठें गेला होतास ? " म्हणून त्याला विचारलें, तों तो आपला हसूं लागला. शेवटीं हसण्याबद्दल आईनें त्याला दटावलेंदेखील. त्याची हकीकत कांहींच नव्हती. तो आपला पुढें चालला होता. आणखी कोणी वाटसरूहि बरोबर चालले होते. कृष्णाजीपंत मात्र थोडेसे मागें होते. इतक्यांत, वाटसरांपैकीं एकानें ' तो पाहा चाष ' असें म्हणून एका पांखराकडे बोट दाखविलें. आमच्या दादानें कुठे गोष्टींत ऐकलें होतें कीं, चाष पक्ष्याला डावी घातली म्हणजे फार चांगलें. मग काय ? आमचे नादी नारायण लागले त्या नादाला ! वाटसरू बिचारे पुढें गेले. तो पक्षी या झाडावरून त्या झाडावर असा उडत उडत रस्त्यापासून दूर गेला. ही स्वारी त्याच्या मागोमाग भटकतच होती. बराच वेळ झाला तो पक्षी इकडे तिकडे करून दिसेनासा झाला. राजेश्री बराच वेळ त्याला धुंडून थकले आणखी मग भानावर आले. मग लागले

आपली मूळची वाट बघायला. ती का त्याला सांपडते ! तो आणखी चुकूं लागला. इकडे कृष्णाजीपंत बराच वेळ, दादा पुढें आहे, गाडी मागून येतेच आहे, अशा समजुतीवर चालले होते; पण त्याचा कांहींच पत्ता दिसेना. इतका तो पुढें गेला नसेल असें मनांत येऊन त्यांनीं त्याला हांका मारण्यास सुरुवात केली; पण 'ओ' कांहीं येईना, तेव्हां अर्थातच त्यांना जास्त जास्त शंका येऊं लागली. पुष्कळ इकडे तिकडे पाहिल्यानंतर शेवटीं त्यांनीं असा विचार केला कीं, आमच्या आईला कळविल्याखेरीज आतां शोधीत बसण्यांत अर्थ नाहीं; कारण आपण शोधायला गेलों आणि गाडी मुक्कामाला आली म्हणजे मग आम्ही दोघेहि नाही असें पाहून जास्तच भिण्याला कारण होईल. शिवाय तो गृहस्थ आपला सारासार विचारानें जरा कमीच होता. त्यानें एकदम आईला येऊन सांगितलें. आमची आई काय विचारतां ! आम्हां पोरांवर तिचा सारा जीव ! ती तटकन् खालीं उतरून शोधायला निघाली. त्या वेळीं आम्हां पोरींना टाकून आपण जातों आहों, हें तिच्या ध्यानांतदेखील आलें नाहीं. पाठीमागून गाडीवालाहि गेला. मंडळींनीं बराच वेळ इकडे तिकडे शोध केला. आसपासच्या शेतांतून जाऊन शेतकऱ्यांजवळ शोध केला. पोराच्या कानांतल्या भिकबाळीनें कांहींतरी घात केला असें मनांत येऊन आई रडण्याच्या बेतांत आली; परंतु इतक्यांत तिचा जीव की प्राण जो आमचा दादा तो तिच्या दृष्टीस पडला. तो एका शेतकऱ्यास बरोबर घेऊन येत होता. शेतकरी लोकांस आपल्या आसपास दहावीस कोसांतल्या गांवांची व तेथल्या मुख्य मुख्य लोकांची माहिती असते. आमचा दादा कांही मुखदुर्बळ नव्हता. त्यानें जो भेटेल त्यास अमुक गांवची वाट कोणती म्हणून विचारण्याचें आरंभलें. शेवटीं एका शेतांत खळ्यावर दोनचार शेतकरी बसले होते, त्यांच्याजवळ जाऊन त्यानें तोच प्रश्न केला. त्यांतील एकानें त्यास 'तूं कोण, कोठला ?' वगैरे विचारलें, तेव्हां यानें भरभर बाबांचें, आजोबांचें वगैरे नांवें सांगितलीं. त्या शेतकऱ्यांस आमच्या घराण्याची सारी माहिती होती. त्यानें लागलीच दादास सारी हकीकत सांगून 'चल, मी तुला गाडी गांठून देतों' असें म्हटलें व तो निघाला. ते मग कृष्णाजीपंतास व आईस भेटलेच. असो.

अशा तऱ्हेनें सर्व हकीकती एकमेकांनीं एकमेकांस सांगितल्यावर आम्हीं लवकरच त्या विहिरीपाशीं गेलों. तेथें आईनें आम्हांस खाऊं घातलें. कृष्णाजीपंतांसहि दशमी खाण्याविषयीं आग्रह केला. आईला मीं आपले सगळे नवस सांगितले ते ऐकून दादा खदखदा हसूं लागला. तें पाहून मी त्याच्यावर रागावलें व म्हटलें, "हसतोस काय रे मला तूं ? बरं, मी आतां पुनः सांगायचीच नाहीं तुला !" तें माझें बोलणें ऐकून तर पाहिलें तों तो जास्तच हसूं लागला, आणि मला कसा म्हणतो, "अग यमे, किती केलं तरी तूं पोरीचीच जात. मुळूमुळू रडायची, अन् नवस करायची. मी नाहीं असा रडलों, उलट हें माझं उपरणं भिकबाळी दिसूं नये म्हणून कानांवरून बांधलं. आणखी ऐटींत ज्याला त्याला विचारीत चाललों होतों."

" पुरे मेली तुझी ऐट ! त्या माझ्या गाडीवानासारखा भेटला असता धटिंगण म्हणजे मग बघितली असती कशी काय तुझी ऐट आहे ती ! "

" कांहीं नाहीं. मला त्यानं उचललं असतं तर असा कडकडून त्याच्या हाताला चावलों असतों की यंव, तुझ्यासारखं नुसतं रडत नसतों बसलों. "

" बरं उगीच तोंडाच्याच तेवढया गप्पा ! तोंडपाटीलक्या घ्या याच्या ऐकून तेवढया ! ! "

" बरं, आपण भागूबाई भित्री खाकेंत कुत्री ! अन् लोकांला म्हणते, अहो, गप्पा नका मारूं ! "

हें दादाचें बोलणें ऐकून मला भारीच वाईट वाटलें आणि मी आईस म्हटलें, " आई अ ! पाहा ग कसा कसं करतो तें ! "

आईनें आम्हां दोघांसहि गप्प केलें. शेवटी दादानेंहि आईकडे पाहून माझी थट्टा करण्याचें सोडून दिलें. योग्य वेळीं आम्ही आपल्या घरीं जाऊनहि पोंचलों.

आम्ही आपल्या लहानपणच्या अनेक गोष्टी विसरलों असूं, परंतु जेव्हां जेव्हां म्हणून आमच्या मोठेपणीं दादाची व आमची गांठ पडे व लहानपणच्या गोष्टी निघत तेव्हां तेव्हां प्रथम या प्रवासाची हकीकत निघाली नाहीं असे कधीच झालें नाहीं.

माझें लग्न होऊन तिकडची व माझी ओळख झाल्यावर एक दिवस एकमेकांच्या लहानपणच्या गोष्टी निघाल्या. त्या वेळीं मीं ही हकीकत अर्थातच सांगितली; तेव्हां " अरे वा ! तर मग चोराच्या हातून सुटलेलं हें रत्न आमच्या गळयांत पडलं आहे एकूण ! " असें तिकडून म्हणायचें आणि तेव्हांपासून माझें नांवच ' चोराच्या हातचें रत्न ' म्हणून ठेविलें होतें. दादा आला कीं या गोष्टी निघाल्याच ! आणखी मला चिडवण्याकरितां म्हणून मग तिकडून एकदा तरी दादाला असं म्हणणं व्हायचं, " काय हो, गणपतराव, चोरानंदिखील ज्या रत्नाला नेलं नाहीं, असलं रत्न आमच्या गळयांत बांधलंतना तुम्हीं ? "

◆ ◆ ◆

# ५ : आजोबा आणि आजीबाई

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें आम्ही एकदाची घरीं जाऊन सुखरूप पोंचलों. पोंचल्यानंतर अर्थातच वाटेंतल्या विघ्नांबद्दल दोनचार दिवस घरींदारीं, शेजारीं-पाजारीं वाटाघाट चालली होती. कोणी म्हणे, " असली कसली हो ही आई ! आपली

एवढ्याश्या पोरीला भर रानात एकटीला टाकून पोराच्या शोधाला गेली. कांहीं पोराला कोणीं खाल्ला होता कीं काय ? " कोणी म्हणत, " अहो, तें असंच आहे; पोरांत आणि पोरींत इतकं अंतर आहे. " कोणी कांहीं कोणी कांही; पण आपल्या याच्यासंबंधानें गोष्टी बोलत. कित्येक मंडळी तर " तुझ्यावर आईचं मुळींच प्रेम नाहीं; नेली असती चोरांनीं जरी तुला, तरी त्याच्याबद्दल कोणाला कांही वाटलं नसतं ? " असें बोलून मला खिजविण्याचा प्रयत्न करीत आणि मीहि वेडी त्यांच्या बोलण्यावर भरंवसा ठेवून चिडत असें; अशा वेळीं दादा जवळ असला तर तो बरीक माझी समजूत करीत असे. असो.

अशा तऱ्हेनें पहिले एक दोन दिवस गेल्यानंतर निराळीच कुरकूर घरांत सुरू झाली असावी असें दिसतें. आजोबांनीं एक दिवस दादाला आपल्या खोलींत नेलें व " काय रे गणू , तूं इथें कां रे आलास ? इकडे येण्याचा एकाएकीं कां रे बेत झाला ? " वगैरे गोष्टी विचारल्या. त्याला बिचाऱ्याला काय ठाऊक ? त्यानें आपणांस ठाऊक नाहीं असें सरळ उत्तर दिलें; आणि खरोखर आम्हा पोरांना यत्किंचित् देखील त्यांतली माहिती नव्हती. म्हाताऱ्या माणसांना सगळ्या कांहीं गोष्टी आपणांस कळाव्या ही इच्छा फार असते. कोणतीहि गोष्ट आपणांस न कळत, गुप्त तऱ्हेनें झाली असें त्यांस कळलें कीं त्यांचें पित्त खवळलेंच म्हणून समजावें. आमच्या बाबांचा आणि आजोबांचा कशाहि संबंधानें पत्रव्यवहार झालेला मला तर कांहीं कधीं आठवत नाहीं. तेव्हां ज्या कारणानें आम्हां चौघांस बाबांनीं गांवीं रवाना करून दिलें, त्या कारणासंबंधानेंहि त्यांनी त्यांस अर्थातच लिहिलें नसावें. बरें आपणहोऊन पत्र पाठवून विचारावें तर तो उत्तर नीटपणें पाठवील अशी खात्री कोठें आहे ? " ज्या गोष्टींत आपणांस कांही कर्तव्य नाहीं त्या गोष्टीची चौकशी हवी कशास ? " असे आपले चिरंजीव आपणांस उलट लिहिणार नाहींत कशावरून ? अशा अर्थाचे शब्द आजोपाशीं उच्चारलेले मीं कितीकदां तरी आडून ऐकले आणि ही आमच्या आजोबांची भीति केवळ काल्पनिक होती असें नव्हे हो. माझी खात्री आहे कीं, आजोबांनीं जर बाबांना पत्र लिहिलें असतें, तर त्यांनी म्हटल्याप्रमाणेंच जरी नाहीं, तरी तसल्याच मासल्याचें त्यांना पत्र आलें असतें. आजीनें तर आईला कितीकदा तरी विचारलें म्हणतां ! पण काय असेल तें असो, " तिनें मला माहिती नाहीं. मला मुलांना घेऊन जा म्हणून सांगितलें, मी आपली आलें. " असे उत्तर दिलें. तें तिचें उत्तर ऐकून मला फारच चमत्कारिक वाटलें. कारण आमच्या येण्याचें खरे कारण आईला खास ठाऊक आहे असें मला वाटत होतें; आणि आईने तर आजीला वरच्यासारखें उत्तर दिलें. मीं दादालाहि ह्याचें कारण विचारलें, परंतु तो मला म्हणाला, " आईला खरोखरीच कारण ठाऊक नसेल म्हणून तिनें आजीला तसें सांगितलें असेल. यमे, तुला भारी रिकाम्या उठाठेवी करायला पाहिजेत. पाहूं ग तुझी जीभ ! तुझ्या जिभेला बहुतकरून टोक नसेल म्हणून तुला इकडचें तिकडे करायची हौस वाटते, " असें म्हणून खरोखर माझें तोंड उघडून माझी जीभ त्यानें पाहिलीन् व तो लागलीच म्हणतो,

" मीं म्हटलं नाहीं ? नाहींच तुझ्या जिभेला टोक, अन् म्हणूनच तुला या असल्या उठाठेवी उरकतात. "

हें दादाचें बोलणें ऐकून मी कोणत्या हुरूपानें त्याच्याजवळ बोलायला गेलें आणि तो हें काय बोलूं लागला. आपण मोठ्या आशेनें एखाद्याकडे जावें आणि त्यानें भलताच दोष आपल्याला लावून धुडकावून द्यावें म्हणजे मग कोणत्या माणसाला राग येणार नाहीं बरे ? त्यांतून माझ्यासारखी लवकर रागावणारी असली म्हणजे मग तर कांहीं विचारायलाच नको. मला माझ्या दादाचा किती किती तरी राग आला म्हणून सांगूं ? मी तर त्याला खूप बोललें; पण तो तरी कसला चमत्कारिक ? गप्प बसावयाचे टाकून जिभेला टोक नसण्यासंबंधानें तो मला आणखी आणखीच चिडवूं लागला. तो जों जों असें म्हणूं लागे, तों तों मलाहि असें वाटे कीं, आपल्या जिभेस टोक नाहीं; आणि असें वाटूं लागलें की, जास्त जास्त संताप आलाच. शेवटीं त्या संतापाचें पर्यवसान असें झालें कीं, तो माझें तोंड पुनः जीभ पाहण्याकरितां—अर्थात् मला आणखी चिडविण्याकरितां—उघडूं लागला. मी त्यास प्रथम उघडूं दिलें; त्याला माझी जीभ पाहण्याकरितां आत बोटे घालूं दिलीं आणि जीं म्हणतां कडकडून चावलें आहे ! त्यासरसा तो मोठ्यानें ओरडलाच. आतां अर्थात् आई आपणांस शिक्षा करणार असें मला पक्कें समजून आलें, त्यासरशी मीच किंकाळी फोडून रडत आरडत आजीकडे धावत गेले व तेथें तिनें काय झालें वगैरे विचारलें तरी " म–ला–दादा–अंःअं–दादानं अंः " या शब्दांच्यावर कांहीं-एक सांगितलें नाहीं. वेळ अशी दुपारीं एक वाजण्याची होती. किती विचारलें तरी माझ्या तोंडून जास्त कांहीं निघत नाहीं असें पाहून तिनें दादाला यथास्थित चार शिव्या दिल्या. " तो मेला असाच दांडगा आहे. दुसऱ्या कोणासारखा होईल ? तिकडचेंच वळण. दम धर आतां दुपारीं त्याची चांगली खरडपट्टी काढतें. नीज. ये. " असें म्हणून तिनें माझी समजूत केली व ती मला आपल्यापुढें घेऊन निजली; परंतु माझ्या चळवळीमुळें कीं काय कोण जाणे, तिला झोप येईना. तेव्हां काय तिच्या मनांत विचार आला असेल तो असो. तिनें एकदम मला अगदीं पुढें ओढले आणि ती मला म्हणते :—

" यमे पोरी, तुला आहे का ग ठाऊक कां तुझ्या आईला न् तुला इथें पाठविलीं एकाएकीं ती ? "

वाचकहो ! तुम्हांला कधीं तुमच्या आजीनें ( तुमच्यावर जिची भारी मर्जी अशा आजीनें ) कांहीं विचारलें आणि तुम्हांला ठाऊक असल्यास तुम्हीं सांगितलें नाहीं असें आठवतें काय ? कोणतीहि गोष्ट कुठें कांहीहि होवो, आपण पाहिली कीं, आपल्या आवडत्या आजीच्याजवळ सांगितली नाहीं, असें मला वाटतें, मुलांच्या हातून व्हावयाचेंच नाहीं. त्यांतून आजीनें जरा अंजारून गोंजारून विचारलें तर मग कांहीं पुसूंच नका. खरें म्हटलें तर मला पक्कें असें कांहींदेखील ठाऊक नव्हतें; परंतु आजीचा तो मोठा विश्वास उत्पन्न करणाऱ्या आवाजानें विचारलेला प्रश्न ऐकण्याबरोबर,

आम्ही जे दिवशीं आजोबांकडे येण्यास निघालों त्या पहाटेस जे बाबांचे व आईचे शब्द मीं ऐकले होते ते मला आठवले. शिवाय गाडींत असतांना आईनें मला पोटाशी धरलें व ती एकाएकी रडली वगैरे गोष्टीहि माझ्या ध्यानांत आल्या—मग काय विचारतां? माझ्या आईनें "मीं रडलेंबिडलें हें आजीला सांगूं नको हो," असें बजावून सांगितलें होतें तें सर्व मी अगदीं विसरून गेलें. त्या पहाटेस जें काय मीं ऐकलें होतें व पुढलें आईचें तें दुःख उत्पन्न करणारें रडणें वगैरे सगळ्या गोष्टी मीं गुलगुल गुलगुल करून आजीच्या गळ्यांत हात घालून व तिच्या अंगावर एक पाय टाकून कानांत सांगितल्या. तें ऐकल्याबरोबर तिनें मला त्यांच्यासंबंधानें आणखी पुष्कळ गोष्टी खोदखोदून विचारल्या; पण मला जास्त कांहीं ठाऊक नसल्यामुळें तेंच तेंच पुनः पुनः सांगण्यापलीकडे आणखी तें मी काय करणार होतें! मीं सांगितलेल्या गोष्टी ऐकून आजीचा जीव अगदी भिऊन गेलासा दिसला. तिनें मला खोदखोदून विचारलें, परंतु आणखी कांहींहि मला माहिती नाहीं असें म्हणण्याबरोबर ती एकदम उठली आणि आजोबा निजले होते तेथे गेली. आपण सांगितलेली गोष्ट आतां ही आजोबांना कळविणार हे मी तेव्हांच समजलें आणि म्हणून मीहि तिच्या मागोमाग गेलें. तिनेंहि मला येऊं नको वगैरे कांहीं म्हटलें नाहीं.

"पाहिलंत, माझी पोरगी कशी चाणाक्ष आहे ती! तिनं सगळं मला सांगितलंन्. नाहीं तर तुमचा गण्या!" (आम्हां दोघासंबंधानें आजी व आजोबा बोलूं लागलीं म्हणजे असेंच चाले. माझी पोरगी आणखी तुमचा गण्या असें आजीनें म्हणावे; माझा गणू आणि तुझी कारटी असें आजोबांनीं म्हणावें!)—

"काय? काय सांगितलंन्? तिला काय ठाऊक असायचं आहे? धड परकरदेखील नेसायला येईना कीं शेंबूड काढायला येईना."

"अहाहा! अन् त्या पोराला भारी अक्कल! एवढा थोरला चवदा वर्षांचा घोडा झाला तरी अजून पत्रदिखील वाचायला येईना. तो गुणाजी पाटील म्हणत होता कीं, एक कलिक्टरचा रपोट का फपोट वाचायला दिला होता तर कांहीं येईनान् जाईना? नाहीं तर ही माझी पोरगी! सगळं खडान् खडा तिनं मला सांगितलंन् काय काय झालं इथं येण्याच्या पूर्वीं तें."

हे शेवटले शब्द ऐकण्याबरोबर आजोबांचे डोळे लागलीच जरा मोठे झाले व पहिला आम्हां दोघांच्या गुणावगुणाबद्दलचा वाद सोडून देऊन मीं काय सांगितलें तें आधीं ऐकण्याविषयीं त्यांनीं आपली आतुरता दाखविली. आजी तर तें सांगण्याच्या उद्देशानेंच आली होती; तेव्हां थोडा वेळ आढेवेढे घेऊन पण शेवटीं मीं जें काय सांगितलें होतें तें—अर्थात् त्यांत थोडेंबहुत तिखटमीठहि घालून—सर्व सांगितलें. तें ऐकण्याबरोबर आजोबांची वृत्ति घाबरल्यासारखी झाली आणि आजीहि मजविषयींची अभिमानवृत्ति सोडून देऊन त्यांच्याप्रमाणें चिंताक्रांत झाल्यासारखी बसली. शेवटीं "हें आहे तरी काय? हा आम्हांला अगदींच कांहीं कळवीत नाहीं. आम्ही याची नाहीं कीं काय कोणी?

जा ग, ग्रमे, आपल्या आईला पाठवून दे इकडं अन् तूं मात्र अगदीं येऊं नकोस, चुगलखोर शिंची ! आईबापांचं बोलणं चोरून ऐकून, तें लागलीच इला सांगून ! अन् मीं विचारलं तेंव्हां मला ठाऊक नाहीं म्हणालीस नाहीं का ? एक मासला आजीचा नू नातीचा. चल नीघ. जा, आईला इकडं लावून दे. " असें ते म्हणाले.

ते त्यांचे शब्द ऐकण्याबरोबर जी का म्हणतां माझ्या उरांत धडकी भरली आहे ! आजी माझी कड घेऊन कांहीं बोलायला लागली होती, पण मी कसची तेथें उभी राहतें आहें ! मी जी धूम पळालें ती परसांत वाळत घातलेल्या डाळीवर आई हात फिरवीत होती तिच्याजवळ गेलें आणि तिला घाबऱ्याघाबऱ्या तुला आजोबा आधीं वर बोलावताहेत असें म्हणून ती वर मजकडे बघून "कशाला, काय" म्हणून विचारीत आहे तों मी तेथून पार पळूनहि गेलें. कारण आईनें कशाला म्हणून विचारलें, तर सांगा काय ? आतां आई आपणावर रागावणार हें तर मला खासच ठाऊक होतें; कारण एक तर तिच्या नकळत ऐकलेली गोष्ट तिच्याजवळ न सांगतां मीं आजीजवळ सांगितली आणि दुसरे तिनें आजीजवळ बोलूं नको म्हणून स्पष्ट सांगितलें असतां बोललें.

मग आपल्यास आतां ती चांगलीच शिक्षा देणार असें वाटलें यांत नवल तें काय ? वाचकहो, हे माझें करणें अतिशय निंद्य-असें तुम्ही म्हणत असाल ! पण काय करूं ? आजीनें विचारल्याबरोबर तें पोटीं राहीचना. आजी विचारीपर्यंत तें राहिलें; मी आपण होऊनच बोललें नाहीं, ह्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें; परंतु इतर गोष्टींत मन व्यापृत असल्यामुळें मला त्याची आठवण झाली नाहीं. आठवण झाली असती तर मी सांगितल्या-वांचून राहिलें नसतें. दुसरें असें कीं, आजीला सांगितलें असतां ती रागवण्याचा संभव मुळींच नव्हता; परंतु दुसऱ्या कोणाजवळहि—आईजवळहि मी जरी बोलले असतें, तरी त्या दिवशींच्या त्या दिवशीं मला कां नाहीं सांगितलेंस ? असें म्हणून ती खास रागावेल अशी मनाची खात्री होती. तें कांहीं असो, एकंदर आपल्या हातून फार मोठी चूक झाली. आपण आपल्या आईची आज्ञा मोडली. ती आतां आपणावर रागावणार. आजी जवळ असल्यामुळें शिक्षा होणार नाहीं ही खात्री होतीच. पण न जाणों ! आतां याला युक्ति काय करावी ? अशा मोठ्या घोटाळ्यांत मी होतें. आपला सगळ्या विश्वासाचा आधार काय तो दादा, त्याला विचारल्यास तो कांहींतरी युक्ति सांगेल, असें माझ्या मनांत आलें. पण उपयोग काय ! त्याचें नी माझें तर आज चांगलेंच भांडण झालेलें. तो आज कसचा आपल्याशीं नीट बोलतो ? निदान त्याच्या बोटांवर उठलेले आपल्या दातांचे वण तरी बुजले पाहिजेत ना ? ते वण नाहींसे होईपर्यंत त्यांबद्दलची त्याची आठवण कशी नाहींशी होणार ? अशा तऱ्हेनें बऱ्याच विवंचनेंत मीं कांहीं वेळ काढिला. शेवटीं सहज अंगणांत गेलें तो तेथें दादा, चोरूच्या ताटाची बैलगाडी तयार करीत आहे असें मीं पाहिलें. मग काय विचारतां ! मीं लागलींच त्याच्याजवळ गेलें. तो कांहीं बोलण्याच्या आधींच मी त्याच्या विनवण्या करूं लागलें;

परंतु तो कसला वस्ताद ! त्यानें मजकडे ढुंकूनहि न पाहतां आपलीं तार्टेबिटें गोळा केलीं, चाकू उचलला आणि तो तेथून निघून जाण्यास उठला. मी अर्थातच जरा पुढें झालें व त्याचा हात धरूं लागलें त्यासरशीं त्यानें मला झिडकारून म्हटलें, " यमे, मीं तुझ्याशीं बिलकूल बोलायचें नाहीं असा निश्चय केला आहे. तूं उगीच आतां माझ्याशीं लाडीगोडी लावायला येऊं नको. हे पाहिलेस का वण ? मी आतां कधीं कधीं देखील तुझ्याशीं बोलणार नाहीं कीं खेळणार नाहीं. चल सोड हात ! " असें बोलून तो धूम चालताच झाला. हे त्यानें केल्याबरोबर बरीक माझें अंतःकरण अतिशय सद्गदित झालें. मी आपली परसांतल्या उंबराच्या झाडाखालीं मागल्या भिंतीकडे तोंड करून रडत बसलें. दादा म्हणजे खरोखर तुम्हांला सांगतें मला एक देवच वाटे. तोच आज रागावल्यावर आणि आईहि खूप रागावणार अशी खात्री बाळगण्याजोगे वर्तन केलें असल्याबद्दल मन एकसारखें खात असल्यावर, ढळढळां रडूं येण्यास माझ्यासारख्या पोरीला आणखी तें काय पाहिजे ? गेलें आपली आणि बसलें रडत. आपण केलें हें अगदीं गैर केलें असें एकसारखे जिवाला खात होतें. त्यांत आजोबा, आजी आणखी आई यांचें काय चाललें आहे याबद्दलहि माझ्या मनांत विचार आला. पण तो किती ? एक क्षणभर राहिला असेल नसेल ! मुख्य विचार तो आईच्या न् दादाच्या रागाबद्दल ? आतां हें आपणावर या दोघांच्या रागरूपानें आलेलें संकट जाणार कसें ? मी ज्या उंबराच्या झाडाखालीं बसलें होतें, त्याच्याखालीं एक सांबाची पिंडी, तिच्यापुढे नंदी आणि दत्ताच्या पादुका होत्या. त्यांच्याकडे माझी दृष्टि गेली; मग काय विचारतां ! त्यांच्यापुढें नाक घासतां घासतां आणि पाया पडतां पडतां पुरेवाट झाली; काय त्या वेळीं मीं नवस केले ! तुळशीला प्रदक्षिणा कितीतरी घालीन म्हणून नेम केला ! मागल्या एका प्रकरणांत मीं म्हटलंच आहे कीं, आम्हां पोरींचे ते दुसरे नवस काय असायचे ? कुठें खणा-नारळानें देवीची ओटी भरायची ! कुठें सव्वा पैशाची खडीसाखर वांटायची ! कुठें रोज येऊन पाणी घालीन, त्याच्या आधीं जेवायची नाहीं असा निश्चय करायचा. ते सगळे नवस झाले. पुनः पुनः पायां पडणें झालें—सर्व प्रकार झाले. अशा तऱ्हेनें विचार करतां करतां व नवससायास होतां होतां अगदीं संध्याकाळ झाली, तरी मला घरांत जावें असें वाटेना. पण अंधार पडत चालल्यावर मग कसलें बसवतें ? मी उठणारच होतें, इतक्यांत " यमे ! " अशी रागानें मारलेली हांक माझ्या कानीं पडली. आणि त्यासरशी उरांत धडकीच भरली !

आईची ती रागानें मारलेली हांक ऐकण्याबरोबर उरांत धडकी भरेल यांत नवल तें काय ? धडधडीत अपराध केलेला, त्यासंबंधानें शिक्षा होणार अशी मनाची पक्की खात्री झालेली, मग काय विचारतां ? जसा एखादा चोर भीत भीत, कांपत कांपत न्यायाधीशासमोर जातो, त्याप्रमाणें मी आपली एकापुढें एक पावलें टाकून चाललें होतें. मोठी पंचाईत काय ती एवढीच होती कीं आई अगदीं दाराच्या उंबरठ्यावरच उभी होती, त्यांतून आंत जावें कसें ? तेथें जाण्याबरोबरच रट्टा बसणार. परंतु नशिबानें एवढे

बरें झालें कीं, मला येतांना पाहिल्याबरोबर आई दारांतून आंत गेली. मी आपली मुकाटयानें पावलें टाकीत दाराजवळ गेलें व आई इकडे तिकडे उभी आहे कीं काय, हें पाहण्यासाठीं आधीं नुसतीच डोकावून पाहूं लागलें. मग ती तेथें नाहीं अशी खात्री झाल्याबरोबर तडक आंत जाऊन बसलें. आजीची पाठ म्हणजे लहानश्या अपराधी नातवंडांच्या आश्रयाचा अतिशय बळकट असा किल्लाच होय. मला तर असें वाटलें कीं, आतां ब्रह्मदेवाच्यानें देखील आपणांस शिक्षा करवणार नाहीं, मग इतरांची काय कथा ?

ते दिवशीं सर्व कारभार आजीच्या जवळ बसून चालले, इकडे तिकडे एकटें जाण्याची कांहीं सोय नव्हती, कारण न जाणो आजीला सोडून एकटेंदुकटें कोठें गेल्यास आईच्या तावडींत सांपडण्याचा संभव ! जेवण झाल्याबरोबर आजीचें अंथरुण उलगडून तिचीच चौघडी पांघरायला घेऊन आमची स्वारी निजली. मजवर आजीचें प्रेम जरी फार होतें, तरी आम्ही एका ठिकाणीं फार दिवस राहात नसल्यामुळें तिच्याजवळ रात्रीं निजण्याची सवय नसे. पण आजची सगळीच स्थिति निराळी. थोडया वेळानें मला झोप लागली; परंतु काय चमत्कार असेल तो असो. मला ते दिवशीं स्वप्नांत दुसरें कांहीं दिसलें नाहीं. आईचा आणि दादाचा राग आणखी पहाटे जागी होऊन पाहतें तों अरे बापरे ! आई माझे अंगावर हात ठेवून बसलेली. मी जागी झालें असें समजून तिनें मला फारच प्रेमानें " यमे, पोरी, आजपर्यंत तुला सांगितल्या शिकवल्या गोष्टींचं कांहींच चीज झालं नाहीं, त्याच्याबद्दल मला फार वाईट वाटतं. एक तर असलं बोलणं तुम्ही पोरांनीं मुळींच ऐकायचं नव्हे. बरं ऐकलं तर ज्याचं त्याच्याजवळ सांगायचं कीं दुसऱ्याजवळ ? सासूबाईनीं मला विचारलं तेव्हां मीं त्यांना काय उत्तर दिलं तें ऐकलं होतंसना तूं ? आतां या तुझ्या बोद्दचकपणानं माझ्याकडे विनाकारण खोटेपणा आला कीं नाहीं ? अग, तिकडून जर कांहींएक बोलायचं नाहीं असं सांगितलं नसतं तर तुला वाटतं का मीं कांहींतरी सांगून वेळ मारून नेली असती म्हणून ? अन् सांगितलंस तें सांगितलंस त्याचं मला कांहीं एवढं वाटत नाहीं, पण पोरी, ही असली संवय वाईट ना ? अशी घाणेरडी संवय जर तुझ्या अंगांत मुरूं दिली, तर तुझं सासरीं होणार तरी कसं ? आतां कांहीं तूं लहान नाहींस, समजलीस ? तुझ्याएवढी मी होतें तर चार वर्सं झालीं होतीं लग्न होऊन. छे, छे, छे ! मला नाहीं वाटलं तूं इतकी लबाड असशील म्हणून ? आतां तुला दुसरी शिक्षा कांहीं नाहीं; तुझ्याशीं बोलायचंच नाहीं कांहीं दिवस. " हे आईचे शब्द ऐकण्याबरोबर मात्र मला फार वाईट वाटलें. कारण आमची आई बोलल्याप्रमाणें करण्यास कधींहि चुकणारी नव्हे हें मी पक्कें जाणत होतें. वाचकहो, त्या वेळीं तिनें दोन रट्टे मला दिले असते तरी मला इतकें वाईट वाटलें नसतें, परंतु तिचा न बोलण्याचा निश्चय ऐकून मला प्रथम जरी तितकें नाहीं तरी मागून फारच वाईट वाटलें.

◆ ◆ ◆

# ६ : आली तुम्हांला ही हुंडी !

* * * * * * * * * * * * * * * *

आमची आई किती दृढ निश्चयाची होती हें मीं मागें एकदा सांगितलेंच आहे. एकदा तिने अमुक गोष्ट करावयाची नाहीं असें म्हटलें म्हणजे मग कांहीं तेथें फरक म्हणून व्हावयाचा नाहीं. तिनें माझ्याशीं बोलावयाचें नाहीं असा निश्चय केला, तो पंधरा दिवसपर्यंत तस्सा चालविला. मीं आपल्याकडून किती म्हणतां यत्न केले आहेत ! परंतु सर्व व्यर्थ. आजीच्या वगैरे देखत मीं मुद्दाम जाऊन तिच्याशीं बोलावें, परंतु तिनें 'हूं' च्या पलीकडे कधींहि उत्तर देऊं नये. शेवटीं एक दिवस काय तिचें तिलाच वाटलें आणि ती माझ्याशीं बोलली; परंतु आपणांस ज्या गोष्टींत कांहीं करावयाचें नाहीं त्या गोष्टींत आपण कधींहि बोलूं नये, दुसऱ्या कोणाचें कांहीं बोलणें ऐकल्यास तें तिसऱ्या-जवळ सांगूं नये वगैरे अनेक तऱ्हेचा तिनें मला उपदेश केला. आणि मीं जेव्हां त्या तऱ्हेनें वागण्याचें अगदीं पक्कें कबूल केलें, तेव्हां ती माझ्याशीं पहिल्याप्रमाणें बोलूं लागली. अस्तु.

परंतु मी आतां मधल्या कांहीं दिवसांची हकीकत न सांगतां एकदम महिना दोन महिने गेले, असें सांगून पुढील हकीकत सांगतें. या महिन्या दोन महिन्यांत फेरफार काय तो इतकाच झाला कीं, आमचे बाबा येऊन चार दिवस राहिले होते व नंतर आईला, सुंदरीला आणि दादाला मात्र घेऊन गेले. दादालाहि नेण्याचा विचार नव्हता, परंतु त्याची शाळा बुडते आणि शिकण्याचा जम राहात नाहीं यासाठींच त्याला नेलें. मला मात्र एकटीला ठेविली. मी पुष्कळ रडलें, कढलें पण माझें ऐकतो कोण ? आईनें दिखील माझ्यासाठीं पुष्कळ आग्रह धरला असें मला वाटतें, परंतु बाबांनीं कोणाचेंहि ऐकलें नाहीं. मला आजीजवळच ठेवून आपण चौघें चालतीं झालीं.

इतक्या काळांत काय काय उलाढाली झाल्या हें मला बिलकूल समजलें नाहीं, परंतु बाबांच्या चाकरीची कांहींतरी डळमळ असावी असें मला वाटलें; कारण बाबा गेल्यानंतर एक दोन दिवसांतच आजोबा आजीजवळ म्हणाले : " करावं तसं भरावं. हेच जर नसते रुपये भरले तर ? पण नाहीं. मोठी चाकरी पाहिजे ! घ्या आतां मोठी चाकरी. हीच राहूं द्या म्हणजे मिळवली ! " या बोलण्याचा मला वास्तविक कांही अर्थ समजला नाहीं; समजलें तें एवढेंच कीं, बाबांची चाकरी जाण्याचा कांहींतरी संभव आहे. अस्तु.

बाबा गेल्यानंतर बरेच दिवस कांहींएक झाल्यावांचून गेले. सगळें स्थिरस्थावर झाल्यासारखें झालें. बाबांचेंहि कुशलतेचें पत्र आलें. इकडे शेजारपाजारची मंडळी आतां माझ्या आजीकडे येऊन " हं. आतां आली तुम्हांला ही हुंडी, कधीं करून टाकतां लग्न ?

वेळींच करून टाका. हो, ही आपली लहानशी नवरी चांगली दिसेल. आतांशा पाहिल्या त्या आपल्या घोडनवऱ्या ! कोणी दहा वर्सांची, कोणी अकरा वर्सांची ! अहो, मी परवां पुण्यास गेलें होतें तर एक नवरी बाई चौदा वर्सांची पाहिली. इश्श मेलं, काय हे ? त्या आईबापांना लाजा तरी कशा नाहीं वाटत एवढया मुली करायला ? त्या मुलीला पदर घेतल्याखेरीज कांहीं सोय नव्हती, तुम्ही नका हो अशी ठेवूं ? त्या आपल्या धानुरीच्या फडक्यांचा मुलगा चांगला आहे तेरा वर्षांचा. त्यांच्याहि मनांतून फार आहे लवकर लग्न करावं असं. ते मुलगीच पाहताहेत चांगली मिळाली तर, पाहा तें जुळलं तर." या व अशा तऱ्हेचीं बोलणीं काढीत. आमची आजी काय ? त्यांच्यांतलीच. तिनेंहि होय होय म्हणून इकडे तिकडे स्थळें पाहण्याच्या नादीं लागावें. दोनतीनदा तर मला पाहण्यासहि मंडळी आली होती. काय चमत्कार असेल तो असो ! त्या वेळीं मला त्या गोष्टीचें मोठें कौतुक वाटे. आपणांस मंडळी पाहायला येणार असें मला कळलें म्हणजे मोठा आनंद होई. मी जरा आपली परकरचोळी नीटनेटकी करी, कुंकूंबिंकू चांगलें लावी व केसबीस अगदीं विखरूं देत नसे. मलाहि असें वाटे कीं, आपलें लग्न एकदाचे लवकर झालें म्हणजे बरें. त्यांतून शेजारपाजारच्या सातसात आठआठ वर्षांच्या मुली लग्न झालेल्या माहेराहून सासरीं आणि सासरहून माहेरीं येतांना पाहिल्या व त्यांच्या अंगावरील दागदागिने पाहिले, म्हणजे मला वाटे कीं, आपलें लग्न केव्हां एकदा होईल, आणि आपणहि असेच दागदागिने अंगावर चढवून नागगोंडयांनीं भूषविलेला असा वेणीचा शेपटा पाठीवर लडबड करीत, बिंदी कपाळावर चढवून पुतळ्यांची, हरपररेवडयांच्या वगैरे माळा गळ्यांत घालून त्यांतील कारलें पोटावर लडबडवीत, वाळ्यातोरडयांच्या नादावर ठुमकत मुरडत चालत इकडे तिकडे केव्हां हिंडूं; त्याचप्रमाणें नव्या नवरीस पाहायला येणाऱ्या लोकांनीं आपणांस नवऱ्याचे नांव घे म्हणून सांगावें आणि मग आपण बळेंच मुरका मारून लाजलाजून पुरेंसें करावें; आणि शेवटीं नाइलाज म्हणूनच जणू काय घेतें असें बाह्यतः दाखवून परंतु मनांत तर मोठी हौस असून तें फार प्रिय असें नांव घेण्यास केव्हां आपणांस सांपडेल; लोकांच्या मुलींप्रमाणें आपणांसहि नवऱ्याच्या पुढें जेवायला बसून त्याच्या तोंडांत घांस देण्याचा सुप्रसंग कधीं येईल असें मला वाटूं लागलें होतें.

वाचकहो, एवढया लहान वयांत मला असें वाटूं लागलें होतें हें वाचून तुम्हांला कदाचित् आश्चर्य वाटेल, परंतु तसें आश्चर्य वाटण्याचें खरोखर कांहींएक कारण नाहीं. माझ्या एकंदर चरित्रक्रमावरून व माझ्या ज्या अनेक मैत्रिणी मला भेटल्या त्यांच्या एकंदर वर्तनावरून व बोलण्याचालण्यावरून माझ्या मनाची अशी पक्की खात्री झाली आहे कीं, लग्नें, मुलेंबाळें आणि चूल यांखेरीज बायकांना कांहींदेखील ठाऊक नसतें. अगदीं लहानपणापासूनचा मी आपला चरित्रक्रम आठवतें आहें, तर मला त्यांत दुसरें कांहीं आठवत नाहीं. आम्हांला लोकें बोललेलीं समजूं लागल्यापासून म्हणजे तीनचार वर्षांपासून आमच्या कानींकपाळीं एकसारखे हे शब्द पडत असतात : " पोरीला कशाला

एवढे ढंग पाहिजेत ! उद्यां सासरीं जायचं आहे. " हं, अशी पालथी मांडी घालूं नकोस." " हं, पोरीच्या जातीला असले लाड नाहीं हो, कामाचे." " कारट्या येतात कशाला जन्माला कुणास ठाऊक." इत्यादि, इत्यादि. हीं वाक्यें मी आपली उगीच मासल्या·करितां म्हणून येथें दिलीं आहेत. याच्याहूनहि हृदयाला घरें पाडणारीं वाक्यें आमच्या कानांवर नेहमीं येऊन पडत असतात. तें वय अगदीं बिनसमजुतीचें असतें म्हणूनच बरें आहे. या असल्या प्रकारच्या बोलण्यांचा जितका परिणाम व्हावयाचा तितका होत नाहीं, परंतु जो परिणाम मुख्यतः व्हावयाचा तो होतोच होतो; तो कांहीं चुकत नाहीं. आपला बायकांचा जन्म म्हणजे अतिशय वाईट. आपला जन्म आपल्या सुखाकरितां नव्हे. लहानपणीं बापाच्या, तरुणपणीं नवऱ्याच्या व वृद्धपणीं मुलांच्या सुखाकरितां आपला जन्म आहे. बायका आणि सुख यांची भेट कधींहि होणार नाही, कष्ट आणि आपण यांची गट्टी अतिशय जबरदस्त, आपल्याला स्वतंत्रता मुळींच नाहीं, इत्यादि गोष्टी आमच्या मनावर इतक्या चोख तऱ्हेनें ठसतात कीं, ईश्वरानें आपणां बायकांस निर्माण केलें आहे तें निव्वळ पुरुषांच्या सुखासाठींच असें आम्हांस निःसंशय वाटूं लागतें; इतकेंच नव्हें, तर आमची कोणी कधीं कींव करूं लागला तर आम्ही त्याजवर उलटून पडूं आणि पडतोंहि. वाचकहो, असें जरी आहे, तरी आमची स्थिति आम्हांस दुःसह वाटत नाहीं असें यत्किंचितहि समजूं नका. 'कोणाची होऊं नये बायको आणि कोणाचा होऊं नये चाकर' ही म्हण आमच्या तोंडून हजार वेळां तुम्हीं ऐकली असेल आणि त्या एका म्हणींत जितका अर्थ आहे, तितका कोणत्याहि म्हणींत नसेल.

जर आम्हांला गत्यंतर नाहीं तर आम्ही लग्नमुंजी, दागदागिने, मिरवणुकी इत्यादि इत्यादि खेरीज बोलणार काय ? आमचे नेहमींचे बोलण्याचे विषय हेच. कोठें दुसऱ्याच्या घरच्या कुटाळक्या कराव्या; अमकीनें काय फिरकीचं फूलच घातलें होतें; ती आतांशा पिंपळपानी कुंकूच लावते; त्या सराट्यांच्या मुलीला पंधरावें वर्ष लागलें तरीं नहाणदेखील येईना; खराट्यांची मुलगी तेरा वर्षांची होऊन तिला चौदावें वर्ष लागलें, तिला नहाण-देखील आलें असेल, पण अजून लग्न होईना. या चाहटळ व बाष्कळ विषयांखेरीज आम्हांला बोलण्याला विषय नाहींत; असणार कोठून ? तीन चार वर्षांपासून " समोर होता कोनाडा, त्यांत होता गहूं अन् आईबापांनीं लगीन नाहीं केलं तर नांव कोणाचं घेऊं " अशा प्रकारचे आमचे धडे ! मी यांत यत्किंचित्‌देखील खोटें लिहीत असेन तर पाहा आपल्या घरोघर म्हणजे झालें.

वर मीं सांगितलेंच आहे कीं आमची आजी माझ्या लग्नाविषयी खटपट करूं लागली, आणि आजोबाहि त्यांच्या स्वभावाप्रमाणें तिला 'नाहीं' म्हणून मोडून काढीत, पण आपणहि कोणाचा मुलगा केवढा आहे, आणि कोण कसा आहे याच्या शोधास लागले. त्यांना दुसरा उद्योगच नसल्यामुळें त्यांनीं आसपास अनेक गांवीं शोध चालविला. दोनतीन स्थळें चांगलीं आलींशीं त्यांस वाटलीं, परंतु तीं आमच्या आजीच्या मनास

येईनात आणि आजीला एकदोन बरीं वाटलीं तीं त्यांच्या मनास येईनात, तेव्हां काय विचारतां ! एक दिवस जें भांडण जुंपलें तें कांहीच्याबाहींच ! आजोबा पूजेला बसले होते आणि बोलतां बोलतां जे संतापले ते काय अनर्थ ! त्यांनीं पुढला बाणच उचलून ताडकन् आजीकडे फेंकला. बरें तर बरें; तो आजीच्या कपाळाबिपाळाला लागायचा; पण तिचें नशीब म्हणून तो पलीकडे पाटा होता त्याला लागून दुसऱ्या बाजूला उडाला आणि भंगून पडला. तरी आजोबांचें बोलणें चाललेंच होतें. तें पाहून आजीलाहि संताप आला. ती सैंपाक करीत होती. तिनें संतापासंतापानें लाकडें पुढें ओढलीं, जवळच्या तांब्यांतलें पाणी चुलींत ओतलें आणि आपण पाठीमागल्या दारीं जाऊन रडत बडबडत बसली. इतकें सगळें होण्याचें कारण काय म्हणाल तर तसें कांहीं मोठेंसें नाहीं. आजोबा म्हणत होते एक स्थळ, आजी म्हणत होती तें उपयोगाचें नाहीं ते म्हणाले, " तुम्हांला बायकांना कांहीं समजत नाहीं. " ती म्हणाली, " घरांतल्या गोष्टी काय असतात हें तुम्हांला पुरुषांना कळत नाहीं. ती सासू फार खाष्ट आहे. ती पोरीला गांजील. " हा काय तो वादाला प्रारंभ आणि मग चाललें वाढत. त्याचा शेवट मीं सांगितला अशा तऱ्हेचा झाला. आजोबा डोक्यावर पागोटें ठेवून तावातावानें बाहेर चालते झाले, आणि आजी संतापून त्रासून सैपाकघरांत धाबळी टाकून निजली. मी आपली वेड्यासारखी इकडे तिकडे करीत होतें. नशीब माझें कीं, ते दिवशीं दुसरें कांहीं खायला द्यायला नव्हतें म्हणून मला आजीनें सकाळींच भात करून घातला होता, नाहीं तर उपाशी मरण्याचीच पाळी. आजोबा आणि आजीबाई राहिलींच कीं नाहीं दोन वाजेपर्यंत उपाशी.

पुढें एकदाचें असें स्थळ आढळलें कीं, तें दोघांच्याहि मर्जीप्रमाणें दिसलें व त्या स्थळीं मला द्यावी असा दोघांचाहि संकेत झाला. नंतर आमच्या बाबांस पत्र लिहिण्याचें ठरून त्याप्रमाणें आजोबांनी पत्र लिहिलें; त्यांत आपल्याकडून खूप त्यांनीं लिहिले होतें; परंतु पंधरावीस दिवसांत उत्तरच आलें नाहीं. शेवटीं त्यांनीं आपण स्वतः जाऊन येण्याचा बेत केला, व ते निघणार इतक्यांत बाबांचें पत्र आलें. त्यांत पुढील मजकूर होता, " मुलगी लहान आहे, शिवाय सध्यां आपण संकटांत आहोंत. एव्हां त्यासंबंधानें मुळींहि विचार करूं नये ! "

हा मजकूर वाचण्याबरोबर मग काय विचारतां ! दोघांच्याहि अंगाचा तिळपापड उडाला. कसा, तो मी आतां वर्णन करून सांगण्याची कांहीं जरुरी नाहीं आणि मलाहि आपलें लग्न लवकर होत नाहीं याबद्दल थोडेंसें वाईट वाटलें.

◆ ◆ ◆

## ७ : एवढें काय बर [redacted] असावें ?

* * * * * * * * * * * * * * * *

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें बाबांचें पत्र आल्यावर मग काय विचारतां ? घरांत आजोबा आणि आजीबाई यांची रोज भांडणें चालू झालीं. आजोबांनीं तर वेडीन् वांकडी शपथ वाहून असा निश्चय केला कीं, आपणहोऊन आतां या पोराच्या कामांत कधींच पडावयाचें नाहीं. वेडीन् वांकडी शपथ हा शब्द लिहितांना मला आपल्या पुरुषांच्या एका विलक्षण संवयीची आठवण झाली आहे, तिच्याविषयीं येथें लिहिलें तर केवळ अप्रासंगिक होईल हें जरी खरें आहे, तरी त्या संवयीविषयीं माझ्या मनांतून केव्हां ना केव्हांतरी लिहावें असें असल्यामुळें मी आतांच लिहितें. न जाणों हें माझें चरित्र माझ्या हातून पुरें होतें कीं नाहीं, तेव्हां या वेळीं हें प्रकरण लिहितांना माझ्या मनांत जे विचार आले आहेत ते तसेच दाबून ठेवले नाहींत याबद्दल वाचकहो, मला आपण क्षमा करा. या गोष्टीविषयीं माझें व दादाचेंहि आणि तिकडचें व माझेंहि बोलणें झालें. त्या वेळीं दोघांचेंहि असें म्हणणें पडलें कीं, आपल्या लोकांत बायकांच्यादेखत काय शब्द उच्चारावे आणि काय नाहीं, याचा पुरुषांना मुळीं सुमारच नसतो. कित्येक लोक तर रागाच्या अगर केव्हां केव्हां आनंदाच्याहि भरांत आले म्हणजे त्यांचें त्यांना भानच राहात नाहीं. मग त्यांच्या तोंडांत जे कांहीं वाईटसाईट शब्द येतील तसे उच्चारण्याला अगर बाष्कळपणाच्या अथवा गाढवपणाच्या कोटया करण्याला ते मुळींच मागेंपुढें पाहात नाहींत. त्यांना त्यांत कांहींच वावगें वाटत नाहीं. दादानें तर आपल्या स्वतःच्या अनुभवानें असें आम्हांला एके दिवशीं एक उदाहरणहि सांगितलें. तिकडचें नांव घेऊन तो म्हणाला, " काय तुम्हांला सांगूं ? चांगला प्रतिष्ठित माणूस, वकिली करतो; परंतु हलकट तऱ्हेचें बोलणें म्हणजे त्याला कांहींच वाटत नाहीं. आपल्या आयाबहिणींच्या देखत, त्याच्या घरांत राहणाऱ्या बिऱ्हाडांतल्या बायकांच्या देखत तो आपला जें तोंडाला येईल तें भकत असतो. एक दिवस मी त्याच्या घरांतच राहणाऱ्या एका गृहस्थाकडे गेलों होतों तिथे हे राजश्री बसले होते, आणि शिमग्याचे दिवस जवळ आले होते, मग काय विचारतां ? यांचे ते दिवस म्हणजे अगदीं मोठया आनंदाचे. मी ज्या गृहस्थाच्या घरीं गेलो होतों त्या गृहस्थाचें स्वयंपाकघर औरसचौरस सातआठ हात असेल नसेल; तेवढ्यांत ते दोघेतिघे भाऊ जेवायला बसलेले, त्यांच्या बायका वाढीत होत्या, त्यांची सर्वांत वडील बहीण – पोक्त बाई – चुलीपाशीं बसलेली आणि मी व ते दीड शहाणे राजेश्री त्या ठिकाणीं मागल्या बाजूला त्यांतल्या त्यांत अडचण करून गप्पा मारण्यासाठीं म्हणून बसलों होतों. त्या राजेश्रींना आली लहर आणि त्यांनीं दुसऱ्याला कांहीं प्रश्न विचारून त्या गृहस्थानें कांहीं उलट प्रश्न विचारल्याबरोबर, त्यांनीं त्याला इतकें हलकटपणाचें उत्तर दिलें कीं, कांहीं विचारायलाच नको. बरे कांहीं लाज तरी

झाल्या गोष्टीची ? मुळींच नाही. उलट ते गद्धेजी खो खो करून हसतच होते. मला भारी संताप येऊन मी तेथून ताबडतोब उठून चालता झालों."

ही हकीकत दादा सांगत असतांनादेखील संतापल्यासारखा झाला होता आणि खरोखर ज्याच्या तोंडून घाणेरडे शब्द कोणत्याहि प्रसंगीं निघत नाहींत त्यानें हा असा प्रकार घरांतल्या बायकांच्या देखत झालेला पाहिला म्हणजे राग येणें व वाईट वाटणें हे साहजिकच आहे.

ही गोष्ट ऐकून तिकडे तर काय झालें तें विचारूंच नका. "गणपतराव, तुम्ही नुसते उठूनच आलां; तर मी तर त्या गृहस्थाला –"

इतकीं अक्षरें निघताहेत तोंच मीं मध्यें बोलून तें प्रकरण तितकेंच थांबविलें; कारण असल्या गोष्टीविषयीं संताप किती येत असे याचा कांहीं नेमच नाहीं; तेव्हां म्हटलें विनाकारण संताप करीत बसण्यापेक्षां विषय बदलावा हें बरें. दादानेंहि तें माझें करणें जाणलें आणि आम्हीं विषयाचा ओघ बदलला. वास्तविक ही सर्व हकीकत पुढें केव्हांतरी सांगावयाची; परंतु तिची आतांच मला आठवण झाली म्हणून सांगितली.

हाय हाय ! ही हकीकत लिहीत असतांना या वेळीं माझ्या मनाची काय स्थिति झाली आहे हें कोणासतरी कळणार आहे काय ? ती तिकडील संतापलेली मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें स्पष्ट दिसत आहे. आतां ती मूर्ति कधींतरी माझ्या दृष्टीस पडणार आहे काय ? बाई, यमुने, तुझें नशीब फुटकें त्याला काय उपाय ?

अग बाई, पण मी हें काय वेडयासारखें लिहितें आहे ? हें मीं आपलें चरित्र लिहिण्याला बसतांना असा पूर्ण निश्चय केला होता कीं, आरंभापासून शेवटपर्यंत जशा गोष्टी घडल्या तशाच लिहावयाच्या; परंतु काय करूं ? मधें मधें अंतःकरण उचंबळून आलें म्हणजे कांहीं राहावत नाहीं.

आजोबांच्या वेडयावांकडया शब्दांनीं वाहिलेल्या शपथेवरून एकदर पुरुषांच्या संवयीवर साधारणपणें लिहितां लिहितां मी कोणीकडच्या कोणीकडेच वाहवलें. वाचकहो, तुम्ही आपल्या अनुभवावरूनच पाहा बरें, मीं जी संवय पुरुषांना असते म्हणून सांगितली ती खरी कीं खोटी ती ! माझ्या वाचकांपैकीं ज्या स्त्रिया असतील त्या तर माझें म्हणणें अगदीं अक्षरशः खरें आहे असें म्हणतील, यांत यत्किंचित्‌देखील मला शंका नाहीं; परंतु कित्येक निर्मळ मनाचे पुरुषहि त्याचप्रमाणें सांगतील. जे दिवशीं आमच्यांतून ही संवय जाईल तो दिवस खरा भाग्याचा ! आमच्या तिकडे नेहमीं म्हणायचें कीं याला उपाय एक. पुरुषांच्या समाजांत स्त्रियांचा प्रवेश होऊन दळणवळण जास्त वाढलें पाहिजे; आणि मलाहि पण तें म्हणणें अगदीं खरें वाटतें.

म्हाताऱ्या माणसाचे निश्चय टिकले तर अगदीं सतत टिकतात; नाहींतर केव्हांच लयाला जातात ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आमच्या आजोबांनीं शपथा आणा वाहिल्यावर आठचार दिवस — फार तर पंधरा दिवस म्हणा — माझ्या लग्नाबद्दल — नांवदेखील

घ्यावयाचें नाहीं असें केलें. आजी तर एकसारखी तडफड करीत होती. "आमचं मेलं कांहींच कोणी ऐकत नाहीं. म्हातारीं माणसं झालीं म्हणजे त्यांनीं आपली वाट धरावी तें चांगलं. त्यांना मग कोणी विचारीनासं होतं. म्हणे मुलगी लहान आहे. लहान का झाली घोडी आतां ? एवढयापणीं तर आम्ही लग्नं होऊन सासरीं नांदू लागलों होतों. छे, छे, छे ! आतां हे चावटपणेच भारी निघाले आहेत. एव्हां नाहीं करायचं तर केव्हां, न्हाण आल्यावर का करायचं ? जा म्हणावं येऊं नकोस तूं. आम्हीच टाकूं लग्न करून. तुझी एवढी प्रतिष्ठा नको." असें एकसारखें तिचें चाललें होतें. शिवाय होई काय कीं, जो येई तो "कसं काय, यमीच्या लग्नाचं ठरलं ना ?" असें विचारी. आणि बायकांनीं तर तिचें नुसतें डोकें उठविलें होतें. जिनें यावें तिनें—"हं, हातचं स्थळ जाऊं देऊं नका बरं ! असं चांगलं स्थळ मिळायचं नाहीं. हुंडापांडा शें-दोनशें जास्त मागितला तर कांकूं करूं नका, तुम्हांला कांहीं देवानं आज कमी नाहीं केलं; बरं, स्थळ तितक्या हुंडयाजोगं नाहीं असं नाहीं. जितका हुंडा द्याल तितका तिथं कमीच म्हटला तरी चालेल. बिंदीबिजवऱ्या-सकट दागिने, घर चांगलं कुटुंबवत्सल, नुसत्या चित्रावती गोळा करून खाल्ल्यान् पोरीनं, तर तिचं पोट भरेल. सासूसासरा, दीरजावा, मुलंलेकरं कांहीं म्हणजे आज त्यांना कमी आहे असं नाहीं. बरं दोन्हीकडे हौसेचंच, ती विहीण तर अगदीं इतकं इतकं दिखील कमी करायची नाहीं. अहो, एवढं कार्य त्यांच्या घरांत झालं म्हणजे आतां दहाबारा वर्षांत कांहीं व्हायच नाहीं, म्हणून त्यांचा एवढा आग्रह ! शिवाय ती म्हातारी आहे त्यांची, तिच्या देखत एकदा त्याचं लग्न झालं पाहिजे म्हणून त्यांची एवढी गळ !" अशी त्या बायकांचीं बोलणी ऐकलीं म्हणजे मग तर आजीच्या मनांत जें काय होतं असें तें पुसूच नका. तिला तोंड बांधून बुक्क्यांचा मार झाला. स्थळ दोघांच्याहि मनास येण्याबरोबर अधिक विचार न करतां जिकडे तिकडे बोलल्याप्रमाणें बोलणें चालविलें आणि मग बाबांचें तसें पत्र आलें, मग काय विचारतां ? तिकडून बोलायला जागा नाहीं, इकडून माझ्या मुलाचें असें पत्र आलें, सबब आम्हांला कर्तव्य नाहीं असेंहि सांगण्याची चोरी ! तसें सांगावें तर लौकिक जाणार. "हं; तुमचा मुलगा तुमचं ऐकत नाहीं ? आपला मुलगा आपलं ऐकत नाहीं तर आपण पडावं कशाला असल्या भानगडींत ?" आजोबांच्याकडे कांहीं बोलायला जावें तर त्यांनीं या बाबतीत बोलावयाचें नाहीं अशी पक्की शपथ वाहिलेली, जिकडून तिकडून तिला बिचारीला पंचाईत. शेवटीं तिला जेव्हां अगदीं सळो का पळो झाल्यासारखें झालें, तेव्हां एक दिवस काय तिच्या मनांत आलें, ती आजोबांच्या जवळ गेली आणि अगदीं रडकुंडीस येऊन म्हणते, "लोक आतां तोंड नाहीं काढूं देत बरं का ? पहिल्यानं जाऊन मुलगा पाहून टिपणं जुळवून पाहिलीं, आणखी आतां तिकडचं नांवदिखील घ्यायचं नाहीं, हें काय ? त्या पोराला काय, अब्रू गेली तरी इकडचीच जाईल ना ? हें असं पुढें होणार म्हणून मला जर आधीं कळतं कीं नाहीं, तर मग मीं या कामांत एक अवाक्षरदिखील काढलं नसतं; पण आतां तसं मुकाटयानं बसून कसं चालेल ? खरंच सांगतें, मला अगदीं तोंडघशीं पडल्यासारखं झालं आहे, आणखी मीं जें सारं केलं

तें इकडल्या जिवावर ना ?" असें म्हणून काय कारण असेल तें असो, आजी डोळ्यांतून पाणी गाळूं लागली.

तें पाहून आजोबांनाहि वाईट वाटलें. क्वचित् आजीच्या तोंडून "मीं जें सारं केलं तें इकडल्या जिवावर ना !" हे शब्द निघाल्याबरोबर खूष होऊनहि ते पुढें लिहिल्याप्रमाणें बोलले असतील : "अग, जरा तूं धीर धर, सध्यां अगदीं बोलूं नकोस. सगळं तुझ्या मनाप्रमाणं होईल, मी त्या पोराच्या बुजगावणीला भिणार नाहीं असा. मी साफ त्याला आज नाहीं तर उद्यां पत्र लिहिणार आहें कीं, "आम्ही या पोरीचें लग्न करून टाकणार. मुहूर्त धरला म्हणजे तुम्हांला पत्र लिहू. आपली मर्जी असली तर आपण सर्वजण या. न आले तरी वाहवा. आम्ही स्वतः देवदेवक बसवून कार्य उरकून घेऊं, आपल्यावांचून अडेल असं नाहीं. आपल्याला जरी मुलगी लहान वाटली तरी आम्हांला वाटत नाहीं, आणखी मुलीवर आपली सत्ता आहे आणि आमची नाहीं असा आपला समज असला तर तो अगदीं चुकीचा आहे ही खात्री बाळगावी. मुलगी सध्यां आमच्या ताब्यांत आहे. आम्ही काय पाहिजे तशी व्यवस्था लावूं. आपल्या पोराचं जें काय वाटेल तें आपण करा. मुलगी आमची आहे.' असं पत्र लिहिलं म्हणजे मग काय करतो ? चट् येईल. अन् असं पत्र ल्याहायला मला त्याच्या बापाचीदिखील भीति वाटत नाहीं." हें शेवटलें बोलणें ऐकल्याबरोबर मला जें हसूं आलें तें कांहीं केल्या आवरेना' मी आपली एकसारखी हसत सुटलें. त्यांत आणखी आजी म्हणाली, "हें काय हें असलं बोलणं ?" मग काय पुसतां ? हसूं अधिकच वाढलें. आजोबाहि ते दिवशीं थोडेसे खुषींत असल्यासारखे दिसले. तेहि माझ्याबरोबर हसूं लागले, आणि म्हणतात : "पोरी, त्याच्या बापाचंदेखील मला भय नाहीं असं म्हटलं म्हणून हसतेस का ? खोटं का मीं म्हटलं ? आहे का माझं मला भय ?" असें म्हणून तेहि मजबरोबर हसूं लागले. त्या त्यांच्या एकंदर बोलण्यानें आजीहि आज जरा खुषींत आली होती; तीहि हसूं लागली. एकंदरींत तो दिवस मोठ्या आनंदांत गेला खरा; कारण संध्याकाळपर्यंत रोजच्याप्रमाणेंच कांहीं कुरबूर न होतां, आजोबा किंवा आजीबाई एकमेकांवर मुलींच न रागावतां, तो दिवस गेला.

मला एका ठिकाणीं कोठेंतरी असें वाचलेलें आठवतें कीं, पुढें मोठें थोरलें वादळ व्हायचें असलें म्हणजे आधीं कांहीं वेळ अतिशय शांतता असते. पुढें कांहीं फार मोठें दुःख येणार असलें म्हणजे आधीं कधीं न झालेला असा आनंद होत असतो. कितीकांच्या तोंडून तर मीं असें ऐकलें आहें कीं, कधी न झालेला असा आनंद आपल्याला झाला, कीं कांहींना कांहींतरी आपणांवर संकट येणार म्हणून आपण समजावेंच. या म्हणण्याचा अनुभव मला बरीक फार चांगला आला. जे दिवशीं आतां वर सांगितलेला प्रकार झाला, त्याच्या दुसरेच दिवशीं बाबांचें एक पत्र आजोबांना आलें, तें वाचण्याबरोबर त्यांचें तोंड खरकन् उतरलें. आजी तेथें जवळच होती. तिनें चटकन् 'काय लिहिलें आहे

पत्रांत ' म्हणून विचारलें; परंतु आजोबांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. ते त्या पत्राकडे पाहात होते. आजीच्या मनांत माझ्या लग्नाखेरीज दुसरा विचार नव्हता. तिला वाटलें कीं, मागल्या पत्राप्रमाणेंच यांत कांहींतरी असेल म्हणून तिनें पुन्हां म्हटलें, " कां, आणखी कांहीं पाणउतारा करण्याजोगं लिहिलं आहे वाटतं ! शर्थ झाली बाई त्या पोराची. "

तें तिचें बोलणें ऐकूनहि आजोबांनीं कांहीं उत्तर दिलें नाहीं. तेव्हां तर तिची खात्रीच झाली कीं, दुसरें कांहीं नमावें. ती आणखी विचारूं लागली, तों आजोबा संतापल्यासारखे होऊन माझ्या अंगावर आले आणि म्हणतात, " खडतर नशिबाची कारटी कुठली ! चल नीघ इथून, सारा दिवस मोठ्या माणसांच्याजवळ बसायला पाहिजे ! चल नीघ, निघतेस कीं नाहीं ? " अग बाई ! हे शब्द ऐकण्याबरोबर जी मी घाबरलें, ती आधीं आजीच्या जवळ जाऊन तिच्या आड लपणार होतें; पण तो माझ्या मनांतला हेतु आजोबांनीं तेव्हांच ताडलासें दिसलें. त्यांनीं माझा दंड धरून एक चपराक लगावलं आणि मला बाहेर घालवून दिली. मी आपली बिचारी बाहेर जाऊन गाल चोळीत भोंकाड पसरून बसलें; परंतु माझा कड घेऊन आजी आजोबांशीं भांडत बसली असावी असें बरीक मला वाटलें. कारण शब्द मोठमोठ्यानें ऐकूं येत होते. त्यांत " तुम्हांला दयाच नाहीं. मायाच नाहीं. " " त्या पोरीनं काय केलं होतं ? " " एकदाची डोक्यांत धोंडा घालून मारून टाका म्हणजे सुटलांत " असे कांहीं शब्द ऐकूं येत होते. त्यावरून माझा तर्क असा झाला कीं, पत्रबित्र कोणीकडच्या कोणीकडे राहून हाच वाद चालला असावा; पण थोड्या वेळानें अगदीं सामसूम झाली. बराच वेळ आजी येईना; मला तर पुन्हा आजोबांच्या पुढें जाण्यास धीर होईना, तेव्हां मी आपली तशीच बसून राहिलें. पोटांत भुकेनें अगदीं प्रलय मांडला. बराच वेळ गेल्यावर आजीनें मला हांक मारिली, त्यासरशीं मी तिच्याकडे गेलें नाहीं. कारण माझी खात्री होती कीं, ती लौकरच माझी समजूत करण्याकरितां येईल, आणि तो माझा समज खरा झालाच. ती ताबडतोब मला समजावयाला आली; तिला पाहण्याबरोबर काय विचारतां ? आमच्या रडण्याला पुन्हा उकळी फुटली; कडावर कढ येऊं लागले, हुंदक्यांची तर गणतीच नाहीं. तिनें मला उठविण्याकरितां पुष्कळ यत्न केले, दादाबाबा केलें, माईताई केलें; परंतु माझें " ए " एकसारखें चालूंच होतें. शेवटीं तीदेखील त्रासली आणि " बस अशीच तर मग; तेच येऊन तुला उठवतील " असें म्हणून जाऊं लागली, तेव्हां मी जास्तीच मोठा सूर काढून पाय आपटीत तिचा पदर धरून गेलें. तिनें माझी पुनः समजावणी चालविली, इतक्यांत आजोबांचा आवाज ऐकूं आला. अर्थातच माझी समजूत ताबडतोब होऊन मी सरळ सूत झालें.

आजीनें मला अंग धुण्यास घातलें, आणि परकरचोळी नेसवून लाडू खाण्यास दिला. इतकें सगळें चाललें होतें खरें, परंतु आजीचें चित्त कांहीं ठिकाणीं नव्हतें असें दिसलें; ही

गोष्ट माझ्या विशेष ध्यानांत आली. दुपारच्या जेवणाच्या वेळीं; कारण त्या दिवशीं दुपारीं तर आजोबा आणि आजीबाई एकमेकांशीं बोललींच नाहींत. एकदा आजी काय ती “ मग आतां दुपारीं उत्तर ल्याहायचंना मंडळींना इकडे पाठवून दे म्हणून ? छे बाई ! सारा दिवस काळजी—” इतकेंच म्हणून थबकली. कारण आजोबांनीं खूप रागानें तिच्याकडे पाहिलें. तोंडांतून अक्षर काढलें नाहीं एकय् , पण एकंदरींत मी एवढें समजलें कीं, कांहीं ना कांहींतरी विलक्षण मजकूर त्या पत्रांत असावा. असो. रोज जेवणावर कांहीं ना कांहींतरी वाद होऊन आदळहापट चालावयाची. आज त्यांतला प्रकार कांहींच नाहीं. आज त्यांना संताप आला होता हें तर स्पष्ट दिसतच होतें. परंतु त्यांत कांहीं ना कांहींतरी खेदाला कारण असावें असेंहि वाटत होतें. त्यांचा संताप आज अगदीं मनांतल्या मनांत धुमसत होता असें दिसलें. हे सगळें मी फारच चोरून पाहात होतें, कारण ते दिवशीं कांहीं वर मान करून पाहण्यालासुद्धां मला धीर नव्हता. दिवस कसा तरी निघून गेलाच. संध्याकाळ झाली, मी नित्याप्रमाणें झोपींहि गेलें परंतु पहांटे जागी झालें व पाहतें तों आजी आपली उठून बसलेली. आजी इतक्या पहांटें कधीं उठत नसे; आपली जागी असे; म्हातारपणामुळें तिला आतां झोप येत नसे, त्यामुळें ती अर्थातच जागी होई लवकर. पण आजच्यासारखी पायावर पाय टाकून निश्चिंत बसलेली नसे; हें आज नवीनच पाहून मी तिला “ आजी, अशी कां ग आज बसलीस? बाबांचं पत्र काय ग आलं ? ” असें विचारलें.

◆ ◆ ◆

## ८ : अगदींच एकाएकीं !

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

आजीला मीं हा प्रश्न विचारला. परंतु ती कांहींच बोलेना. माझी मोठी खात्री असे कीं, आपण कांहीं विचारलें आणि आपणांस आजी सांगणार नाहीं असें कधीं होणार नाहीं.

दुसऱ्यांचा काय असेल तो असो, परंतु माझा अनुभव असा आहे कीं, मुलांस आजी म्हणजे एक परम दैवत असतें. प्रत्यक्ष आईबद्दलदेखील त्यांना इतकी ममता व खात्री वाटत नाहीं, इतकी आजीबद्दल वाटत असते. कोणी कांहीं देईना, आजीजवळ जातांच तें आपलें मिळावयाचें. कोणीं आपल्यास मारलें, आजीजवळ गाऱ्हाणें नेतांच त्याचें निरसन व्हावयाचें व मारणारास चांगलें बक्षीस मिळावयाचेंच. कोणीं दटावलें किंवा धाक दाखविला तर “ मी आजीला सांगेन अं ! ” असा महामंत्र म्हणतांच सटरफटरांची त्रेधा उडावयाची ही मनाची खात्री; अपराध जरी आपला असला, सर्वथा जरी आपली चूक असली तरी आजीकडून खरा न्याय मिळावयाचा आणि तो नेहमीं आपल्या वतीनें. अशा एक की दोन गोष्टी आजीच्या चांगुलपणाबद्दल सांगूं ! अहो,

तिला कोठेंहि कांहीं मिळो किंवा घरांत आणलें जावो, त्यांतला बराच अंश नातवंडासाठीं ठेवला नाहीं असें व्हावयाचें नाहीं. घरांत झालेल्या चांगल्याचुंगल्या जिनसांचा भाग उघडउघड जितका मिळावयाचा, त्याच्यापेक्षां दुप्पट तरी आजीकडून नातवंडांस एकीकडे मिळावयाचाच. यांत जर का एकुलतें एक नातवंड असलें किंवा एक दोन नातवंडांतून आजीच्या विशेष आवडीचें नातवंड असलें, तर मग कांहीं विचारूंच नका. त्या नातवंडाच्यासारखी चैन कोणाचीच नसावयाची. आमच्या घरीं जरी फारशी मंडळी नव्हती व मी कधीं आजीजवळ फार दिवस एकसारखी नव्हतें, तरी पण तिची मर्जी मजवरच फार असे; आणि लोकहि त्याप्रमाणें म्हणूं लागले, तों तों ती जरी तोंडानें "मला काय तीहि सारखी, गणू सारखान् सारींच सारखी" असें म्हणे, तरी पण मजवरच तिचें प्रेम अधिकाधिक बसत चालल्याचें दिसून येऊं लागलें. त्यांत आणखी मजा ही कीं, पोरीच्या जातीला स्वाभाविक असा जो लाघवीपणा तो माझ्यांतहि बराच असल्यामुळें मी तिची मर्जीहि संभाळीत गेलें. अशी एकंदर अनेक कारणें एके जागीं होऊन माझी आजीवर व तिची मजवर अधिकाधिक ममता जडत चालली; तेव्हां आपण कांहीं विचारलें असतां आपणांस आजी खास सांगेल असें वाटून मीं तीस वरील प्रश्न विचारला यांत नवल नाहीं.

मीं प्रश्न केला खरा, पण त्याचें उत्तर मुळींच मिळालें नाहीं; कदाचित् मीं म्हटलें तें तिनें ऐकिलें नसेल असें समजून मी अर्धवट उठून आपलें डोकें तिच्या मांडीवर ठेवलें, व आपले हात तिच्या गळ्याभोंवतीं घालून, तिचें तोंड खालीं करून मोठ्या कळवळ्यानें तिला म्हटलें, "ए, आजी अ, तूं आज अशी कां ग बसलीस? बाबांच्या पत्रांत कांहीं आहे होय?" तरी उत्तर नाहीं. तेव्हां मीं आपलें तोंड आणखी तिच्या तोंडाजवळ नेऊन म्हटलें, "हें ग काय आजी, तूं आज बोलत नाहींस? अशी कां बसलीस सांग मला?" हें ऐकून ती लागलीच म्हणाली, "यमे, तुला काय पोरीला सांगायचं आहे? उगीच निजायचं टाकून एव्हांपासून कशाला जागी होऊन बसली आहेस? नीज मुकाट्यानं." हें ती बोलली खरी, परंतु तितक्यांत ऊनऊन पाण्याचा थेंब माझ्या हातावर पडला; त्यावरून तिच्या डोळ्यावाटें पाणी येत असावें असा माझा तर्क झाला आणि मग मात्र वाटलें कीं, कांहींतरी विलक्षण झालें असावें.

मी आपली लहानपणापासून मोठी चौकस असें. कोणतीहि गोष्ट असो. ती आपल्या देखत घडली आणि आपल्यास समजली नाहीं, तर मला चैन पडायचें नाहीं. हरतऱ्हा करून तें काय-तें आपणांस समजून घेतलें पाहिजे असें आपलें मला वाटे; इतकेंच नव्हे, तर त्याबद्दल मोठी उत्कंठा वाटून तें पक्केपणीं समजून येईपर्यंत मनाला मोठी चुटपुट लागावयाची; तें समजण्याकरितां हजारदा हजारांना प्रश्न करायचे; त्यांनीं लतकोडग्याप्रमाणें धुडकावून लावलें तरी पण मनांतली उत्कंठा कांहीं जावयाची नाहीं. बाहेरून मात्र त्यांच्यावर संतापून गेलेंसें दाखवावयाचें. हा अवगुण—मी याला

अवगुणच समजतें, कारण कोणतीहि गोष्ट काय, मर्यादेच्या बाहेर जाऊन, ती आपल्यांत न राहतां आपण तिच्या ताब्यांत राहिलों, म्हणजे तिला अवगुणाचेंच स्वरूप येतें — माझ्या अंगीं अजूनदेखील थोडाबहुत आहेच; कारण लहानपणापासून तो अंगांतून निघून जाण्याजोग्या गोष्टी फारच थोडया घडल्या. उलट, तो गुण अंगांत अधिक अधिक मुरून जाईल अशाच गोष्टी अतिशय घडल्या. ज्यांचा माझा जन्माचा संबंध त्यांच्या सदुपदेशानें वास्तविक ही खोड निघून जावयाची, परंतु ती खोड जास्त जडण्यासच तितकें कारण व्हायचें. दिवसभर बाहेर कुठें कॉलेजांत वगैरे असावयाचें, तेथें कांहीं फूस झालें तरी तें मला येऊन सांगितल्याखेरीज राहावयाचेंच नाहीं. आम्हांला बायकांना कांहीं मौज वाटायची नाहीं, कांहीं समजायचें नाहीं अशी गोष्ट एखादे वेळ मला तिकडून सांगायचें झालें कीं, मी मेली म्हणेंदेखील, कीं, ' जे तें मला येऊन सांगायचं हे काय ! ' पण हे म्हणणें आपलें वरवरच हो ! मनांतून तर, आपल्याजवळून एवढीदेखील गोष्ट चोरून ठेवीत नाहींत हें पाहून कितीतरी गर्व वाटे ! पण—पण—मी लहानपणची हकीकत लिहीत असतांना, या पुढल्या गोष्टी आधींच कशाला आठवतें ? यापासून मनाला उद्वेग मात्र होतो.

तेव्हां या माझ्या स्वभावाला अनुसरूनच माझें आजीजवळचें वर्तन होतें. आजीनें मला वरील उत्तर दिलें, परंतु मीं आपला लघळपणा न सोडतां तिच्या गालाला माझा गाल लागेपर्यंत तोंड तिच्या तोंडाजवळ नेऊन अतिशय लडिवाळपणानें " हें काय बरं आजी ? तूं अशी बसलीस की नाहीं म्हणजे मला नाहीं बरं वाटत. मला सांगच काय झालं तें " असें म्हटलें. जणू काय आतां आपल्याला कळण्याबरोबर त्याचा परिहार करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहेच ! अहाहा ! त्या वेळचें तें आमचें दोघींचें चित्र आज अगदीं माझ्या डोळ्यांपुढें चक्क दिसत आहे ! आणि परमेश्वरा ! असे आनंदाचे दिवस आतां मला पुनः कधींहि दिसावयाचे नाहींत असें मनांत येऊन तर जें दुःख होत आहे तें कांहीं पुसूंच नका. असो.

इतकें मीं अगदीं लघळपणानें विचारलें तरी आजीनें " कांहीं नाही ग पोरी ! तुला कनई यमे, भारीच जें तें विचारायची खोडी. पोरीच्या जातीला काय, एकदा सांगितलं गप्प बसायला कीं गप्प बसावं. नीज अशी नीट; अन् झोप येत नसली तर मी दोन भूपाळ्या म्हणतें त्या ऐक; नाहीं तर व्यंकटेशस्तोत्र म्हणतें तें ऐक; " असें म्हणून लागलीच " उठि लवकर वनमाळी, उदयाचळीं मित्र आला " ही तिची नेहमींची भूपाळी तिनें म्हणण्यास सुरुवात केली.

तिच्या तोंडून भूपाळी ऐकणें फारच आनंदकारक असे. तिचा कंठ मधुर असे असें नाहीं, परंतु भूपाळी अगर कोणतेंहि भक्तिरसाचें गाणें म्हणतांना तिचें सर्व अंतःकरण त्यांत अगदीं गढून गेले आहे असें वाटे, आणि ती मधून मधून मला त्या गाण्यांतला अर्थ सांगे. तिची पहांटे भूपाळ्या म्हणण्याची वेळ झाली म्हणजे मी आपली त्या वेळीं जागी होई. कधीं कधीं ती व्यंकटेशस्तोत्र म्हणे व त्याचाहि मधून मधून मला अर्थ सांगे. हें

सर्व मला गोड लागे; परंतु आपण विचारलें त्याचें उत्तर न देतां आपला निषेध करून जेव्हां तिनें आपल्या भूपाळयांसच सुरुवात केली तेव्हां मला तें मुळींच गोड लागलें नाहीं. उलट मी तिजवर रुसून आपलें पांघरूण अगदीं पायांपासून डोक्यापर्यंत ताणून व त्यांत सर्वांग अगदीं गुरफटून टाकून घोंघट घालून बसलें. थोडासा वेळ झाला, अजून आपणांस " यमे, अशी कां तूं निजलीस ? तुला रुसायला काय झालं ? " असें आजी कांहीं विचारीत नाहीं, ती आपली भूपाळ्याच म्हणत आहे, हें पाहून आपलें रुसणें आजीच्या लक्षांत आलें कीं नाहीं याविषयीं मला शंका आली; तेव्हां मुद्दाम तिच्या अंगासरशीं जाऊन मी चळवळ करूं लागलें; किंबहुना मी आपल्या अंगाचा गुघडाच मांडला म्हटलें तरी चालेल; पण " हं, हें काय हें ! नीट नीज " याच्या पलीकडे कांहीं तिच्या तोंडून शब्द निघाले नाहींत, परंतु मला तेवढेच तिचे शब्द पुरले. मी लागलीच " मी नाहीं जा. मला आपलं असंच करायचं अन् आतां मुळीं मी कधीं कांहीं विचारायचीच नाहीं तुला." असें जों म्हणतें आहें तोंच बाहेर कोणी " दार उघडा हो दार ! आई अं ! आजी अं !" अशा हांका मारीत आहे असें ऐकूं आलें. मीं ते शब्द तेव्हांच ओळखले आणि त्या भरांत सर्व रुसणेंबिसणें विसरून जाऊन " आजी, आजी, बाबा आणखी दादा हांका मारताहेत " असें म्हटलें; इतक्यांत पुनः हांका आल्या. मग तर संशयनिवृत्तिच झाली; आणि आजीनें जाऊन दार उघडलें, त्याबरोबर मंडळी आंत आली. बाबा, आई, दादा, आणखी आमचा गडी शिवराम अन् आईच्या कडेवर तो सुंदरीचा हणगोबा—तीन वर्षांची जवळ जवळ झाली पण आपली कडेवर बसायची !—ही मंडळी एकाएकीं आलेली पाहण्याबरोबर मला फारच आश्चर्य वाटलें कारण आधीं कांहींच कुणकुणदेखील नव्हती यांच्या येण्याबिण्याची. " त्याला माणसं इकडे पाठवून द्यायला ल्याहायचं ना !" एवढें आजी आजोबांच्याजवळ काय म्हणाली तेवढेंच. पण माझ्या कुठलें लक्षांत ? दादा आलेला पाहून मला फार आनंद झाला; आणखी मी झटकन् उठून आपला चिमुकलासा खोपा नीट करीत व केस सांवरीत त्याच्याजवळ गेले; व मोठ्या आवडीनें सुंदरीलाहि ' ये ' म्हणून तिच्यापुढें हात केले; परंतु ती पोरगी होती अर्धवट झोपेंत आणि मी तिला बोलावणार ! मग काय विचारतां ? तिनें मुरका मारून जी मान फिरविली ती कांहीं विचारूंच नका.

ही मंडळी आल्यानें आजी किंवा आजोबा यांस कांहीं आश्चर्य वाटलेंसें दिसलें नाहीं. आज नाहीं उद्यां यायचीच असें त्यांस ठाऊक असावें असें दिसलें.

दादा आल्यामुळें माझी मात्र चैन उडाली. प्रथम जसें थोडेंसें एकलकोंड्यासारखें वाटत असे, तसें वाटण्याचें कांहीं कारण उरलें नाहीं. मी आपली जात असें शेजारींपाजारीं खेळायला. पण दादाची कांहीं मजा निराळीच असे. त्याचा स्वभाव नकल्या असे. शिवाय निरनिराळे खेळ व युक्त्या काढण्यांत त्याचा हातखंडा असे. तो मोठा युक्तिवान् असे; त्याला आपलीं चित्रें काढण्याचा थोडाबहुत नाद असे; कुठें बोरूचीं ताटें घेऊन तीं सोलून

त्यांचीं गाड्याघोडीं तयार करावीं; कुठें कागदाचे फुगे करावे. एक नी दोन ! तो आपला सगळ्या कामांत अगदीं तरबेज असे. अहो, आमचे पोरींचे खेळ—सागरगोटे वगैरे यांत-देखील तो आपला तयार ! त्यानें आपली माझ्यावर आटकी हटकून लावावी आणि मग मला चिडवावें, व मीं त्यास " रांड्यागाघोजी " नाहीं तर " बायकांत पुरुष लांबोडा " असे कांहींतरी म्हणावें. मग त्यानें रागवावें; मींहि रागवावें; आणि थोड्याच वेळांत त्याच्याकडे जाऊन लघळपणा करून सल्ला करावा; अशी आपली मजा नेहमीं चालावयाची. तरी पण आमचें दोघांचें प्रेम फारच असे. मला जर यत्किंचित् कांहीं कोणीं उगीच बोललें तर त्याला मोठा राग येऊन तो माझा कैवार घेई, व मीहि तशा प्रसंगीं त्याच्यासंबंधानें तसेंच करी. आई तर नेहमीं म्हणे कीं, हीं दोघें इतकीं भांडतात संवरतात अन् लागलीच क्षणाभऱ्यांत एक कशीं होतात ! अगदीं लहानपणीं म्हणजे मी सरासरी दीड दोन वर्षांच्या वयाची असतांना आई नाहीं तर आजी अशी मजा सांगत कीं, " गणूला कोणीं दटावलं, किंवा राग भरलं कीं या पोरीनं आपलं भोकाड पसरावं. आपली हिची मजा पाहण्यासाठीं हिच्या देखत मुद्दामच लोक गणूच्या अंगावर खोट्या रागानं ओरडत, आणि मग हिनें एकसारखं जें रडावें तें इतकें कीं, त्यानें तिची समजूत करून तिला उगी करीपर्यंत ! " आंतलें कारण काय असेल तें असो; पण दादाच्याबद्दल माझ्या मनांत अतिशयच प्रेम आहे खरें. आणि मला वाटतें त्याच्या मनांत माझ्याविषयीं फार फार प्रेम आहे. असें बहीणभावंडांचें प्रेम फारच क्वचित्, यांत शंका नाहीं. अहो, आम्ही लहानपणापासून कधीं एकमेकांपासून कांहीं गोष्टी चोरून ठेवल्या नाहींत, तसेंच मला कांही नवीन कळलें —मग तें कुठें फुस् झालेलें का असेना—मीं त्याला जाऊन सांगायचें, अन् त्याचेंहि तसेंच होतें.

तो आल्यावर आमचें सकाळचें खाणेंपिणें झाल्यावर मीं त्याला आपलें घरकुल वगैरे दाखविलें. आजीनें कांहीं नवीन चुली घालून दिल्या होत्या, बोळकीं करून दिलीं होती, तीं त्याला दाखविलीं; तरी पण एकाएकीं बाबा, आई वगैरे मंडळी एकदम कां आली, हा प्रश्न केव्हां एकदा त्याला करीन असें मला झालें होतें; पण आई, आजी इकडेतिकडे करीत होत्या त्यांनीं ऐकल्यास आणि विशेषतः आईनें ऐकल्यास, आपल्याला दादाकडून कांहीं कळायचें एकीकडेच राहून न कळायची तजवीज होईल व न जाणों आणखीहि कांहीं बक्षिशी मिळेल असें वाटून मीं आपली बोललें नाहीं. त्यांत आणखी बाबा आलेले. ते म्हणजे जमदग्नीचाच अवतार ! काय करतील आणि काय नाहीं. तथापि आम्ही थोडीशीं बाहेरविहेर गेलों तितक्यात संधि साधून दादाला प्रश्न तर केलाच; परंतु दादा मला म्हणाला, " यमे, मीं मघांपासून चारदा म्हटलं कीं तुला सांगावं म्हणून; पण किनई आईनं अगदीं मला मुकाट्यानं राहण्यास सांगितलं आहे. कुठें कुठें अगदीं कोणाजवळ बोलतां कामा नये, असं तिचं अगदीं निक्षून सांगणं आहे. अन् तुला सांगितलं म्हणजे तूं कोठें बोलशील आणखी कुठें नाहीं याचा कांहीं नेम नाहीं; तेव्हां न सांगावं तेंच चांगलं. " असें ऐकतांच मी त्याला " बरें हो दादा, तूं देखील असं

करूं लागलास का ?" असें म्हणून व पुष्कळ गयावया करून त्याच्या मागें लागलें. त्याच्या मनांतून सांगावयाचें नव्हतें असें नाहीच. तो आपली माझी मजा करीत होता. शेवटीं "सांगतों, पण पाहा जर कुणाच्या कानांवर तुझ्याकडून गेलं तर; मग पुनः म्हणून तुला कोणतीहि गोष्ट सांगणार नाहीं; इतकंच नाहीं, तर तुझ्यावर मी काडीभरदेखील विश्वास ठेवणार नाहीं." असें तीनतीनदा बजावून सांगून तो अगदीं माझ्याजवळ आला, त्यानें आपलें तोंड माझ्या कानाशीं अगदीं आणलें, इकडे तिकडे पाहिलें आणि काय होतें तें सांगितले. तें ऐकल्याबरोबर, तसें कां झालें वगैरे जरी मला कळलें नाहीं तरी पण झाली ही गोष्ट फार वाईट झाली असें मला तेव्हांच वाटलें. माझ्या वयाच्या मानानें, मी कित्येक गोष्टीत जरी अगदीं वेंधळी होतें तरी कित्येक गोष्टींत माझ्याइतकी समजूत फारच थोडया मुलींना असेल अशी स्थिति होती. दादानें सांगितलेली गोष्ट ऐकतांच माझें तोंड उतरलें व त्याचेंहि उतरलें. आम्ही आपलीं बहीण-भावंडे एकमेकांकडे टक लावून क्षणमात्र उभी राहिलों होतों. शेवटीं मीं त्यास म्हटलें, "मुलीच ?" त्यानें उत्तर दिलें, "नाहीं. अजून मुलीच असं नाहीं, पण परवां कृष्णाजीपंत म्हणत होते आईजवळ कीं, त्याचा कांहींच नेम नाहीं." .

आम्ही आणखी कांहीं त्यासंबंधानेंच बोलणार तों इतक्यांत आजोबांनी दादास हांक मारली. तेव्हां आम्ही दोघेंहि परसांतून आंत घरांत गेलों. दादानें गोष्ट सांगितली ती माझ्या मनांत आपली होतीच, पण किती जरी माझी समजूत माझ्या वयाच्या मानानें प्रौढ असली तरी मी लहान होतें आणि त्या वयाला योग्य जो विसराळूपणा तोहि माझ्या अंगांत ओतप्रोत असल्यामुळें थोडया वेळांत मनांतून सर्व नाहींसें झालें.

बाबा, आई वगैरे मंडळी आल्यानंतर दोनतीन दिवसांनीं दुपारच्या सुमारास काय असेल तें असो, आजोबांच्या खोलींत कडाकडीचें भांडण सुरू झालें असावें असें आम्हांस वाटलें. मी दादाला तसे कांहीं म्हणणार, तोंच आमच्या कानीं पुढील खूप रागानें उच्चारलेले शब्द पडले. ते शब्द एवढेच ! "तुम्हांला कोणीं त्याची पंचाईत सांगितली आहे ! माझ्यावर जर प्रसंग आला तर माझें मी पाहून घेईन. करणारा मी, निस्तरणारा मी !" हे शब्द बाबांच्या तोंडचे होते. आजोबांचेंहि तोंड कांहीं स्वस्थ नव्हतें; तेहि सडकून बोलत होते. प्रकरण जास्त जास्त पेटतच चाललेंसे दिसलें, इतक्यांत आईनें आम्हां दोघांस परसांत बोलाविलें व मागल्या दारानें आम्हांला बरोबर घेऊन ती शेजारच्या घरीं गेली. त्या वेळीं कांहीं मला त्या तिच्या करण्याचा उद्देश मुळींच समजला नाहीं. अहो, ती आपलें घर सोडून कधींदेखील दुसऱ्याच्या घरीं जाऊन बसावयाची नाहीं; पण ते दिवशीं चांगली चार घटका बसली, आणखी आम्हांला घेऊन; त्याचें कारण मला पुढें चांगलें कळलें. आमची आई म्हणजे एक अद्वितीय बायको होती. तिच्या एकंदर स्वभावाबद्दल मीं एकदा लिहिलेंच आहे; परंतु तिची चतुरता आणि दक्षता हीं तर कांहीं अवर्णनीयच होतीं. त्याचप्रमाणें तिच्यासारखी बायको मीं तर कधींच कोठें पाहिली नाहीं. अमुक संकट आलें आणि तिचा सगळा धीर नाहींसा

झाला, असें कधीं झालें नाहीं. मागल्या पुढल्या गोष्टींचें धोरण धरून सर्व गोष्टी तिनें करावयाच्या. तिच्या पाठीमागें आमचे बाबा तर तिची अनेक वेळां यथास्थित स्तुति करीत. मात्र ते थोडेसे खुषींत असावेत. या तिच्या चतुरतेला अनुसरूनच तिचें त्या दिवसाचें वागणें होतें. बाबांचा आणि आजोबांचा वाद सुरू झाला म्हणजे एकमेकांच्या तोंडून काय शब्द निघतील आणि काय नाहीं, आणि त्या भांडणाची मजल कोठपर्यंत जाईल, आणि कोठपर्यंत नाहीं, कशाचा नेम नसे. तेव्हां असलें विचित्र बोलणें आम्हां पोरांच्या कानांवर मुळींच न पडणें चांगलें असा विचार करून तिनें आम्हांला घरांतून बाहेर नेण्याची युक्ति योजिली. खरोखर ती जितकी चतुर, शांत व दक्ष होती तितके जर बाबा शांत असते व तिचें नेहमीं ऐकते तर त्यांना अतिशय सुख होऊन आम्हां मुलांना मिळालें त्याच्यापेक्षां फारच उत्तम शिक्षण मिळून ओळ फार चांगली लागली असती. मिळालें एवढें कांहीं वाईट मिळालें नाहीं; परंतु तें एकातर्फी होतें. बाबांच्यातर्फेनें त्यांत पडावी तशी भर पडत नसे. आमच्या शिकण्याच्या—माझें कसलें मेलें दगडाचें शिकणें ! मला धड ट-फ करायलादेखील येत नव्हतें. कधींमधीं शाळेंत जाऊन दोन अक्षरें शिकलें असेन तेवढेंच. पण दादाच्या शिक्षणासंबंधानें तरी काय ? लहर लागली म्हणजे एखादे दिवशीं नंबरबिंबर विचारायचा, खालींबिलीं असला तर, 'कां ?' वगैरे थोडीबहुत चौकशी करावयाची; थोडीशी तब्बेत नादुरुस्त असली तर त्या बिचाऱ्याला विनाकारण दोनचार चापटया बसायच्या; ही काय ती त्याची काळजी ! आई मात्र आम्हांला न मारतां, तिचा खरा धाक असे. बाबांचा धाक मार खाण्याच्या भयानें, आईचा धाक कशानें वाटे तें कांहीं सांगतांच येत नाहीं. माझें हें चरित्र लिहितांना आईबापांचें वर्णन मी हें तिसऱ्यानें लिहीत आहें; परंतु काय करूं ? प्रसंग आला म्हणजे आईची स्तुति केल्याखेरीज मला राहवत नाहीं; पण आतां त्याचें चर्वितचर्वण करायचें नाहीं. असा एकदा निश्चय करून मीं आपला पुढला इतिहास सांगतें.

बराच वेळ शेजारीं बसल्यानंतर आई व आम्ही घरीं परत आलों, तेव्हां भांडणाचें अगदीं नांवदेखील नाहींसें झालें होतें. सायंकाळीं बाबा बाहेर गेले. रात्रीं जेवणींखाणीं झालीं; परंतु त्यांचें व आजोबांचें यत्किंचित्‌देखील भाषण नाहीं. त्यांनीं रात्रीं निजावयाचे पूर्वी शिवरामला मात्र हांक मारिली, व त्यांस, "अरे, उद्यां सकाळीं पहाटे आपल्याला इथून जायचें, तर एखादी गाडी आण पाहून, अन् इथें सोडून त्याला विसार दे. पहांटे तीन वाजतां ऊठ बरं का ?" इतकें म्हणून ते जाऊन निजले. ते जाणार याच्याबद्दल मला कांहीं वाटलें नाहीं, पण दादाला नेणार कीं काय याचीच काय ती मला मोठी भीति होती; परंतु दादा व आई येथेंच कांहीं दिवस म्हणजे ज्या कारणामुळें त्यांना येथें आणून ठेवलें, त्या कारणाचा निकाल होईपर्यंत राहायची असा बेत झाला होता.

पहांटेच्या सुमारास बाबा व शिवराम दोघे निघून गेले. शिवराम फक्त त्यांस स्टेशनपर्यंत पोंचविण्यास गेला. तो आमच्याजवळच सुंदरीला संभाळण्यासाठीं व घरांतलें काम करण्यासाठीं राहावयाचा होता.

# ९ : त्याचा निश्चयच झाला

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

बाबा जाऊन सुमारें महिना झाला. आम्ही मोठ्या आनंदांत होतों. दादाला शाळा नाहीं, कांहीं नाही; तरी पण आई त्याला ल्याहायला अगर कांहींतरी वाचायला बसवी; व मलाहि केव्हां केव्हां आजीला चोरून त्याच्याजवळ ल्याहायला बसवी. तिच्या मनांतून मी ल्याहायला वाचायला थोडेंसें शिकावें असें फार होतें. तिला स्वतःला बाळबोध लिहिणें वाचणें अगदीं चांगलें येत असे. पांडवप्रताप वगैरे पोथ्या ती चांगल्या वाचीत असे, परंतु मला तें कांहीं आवडत नसे. आजीची पाठबीठ सांपडली नाहींच तर मी दादाजवळ बसें; पण होतां होईल तों टाळाटाळीच !

बाबा गेल्यापासून त्यांच्याकडून पत्र मुळींच नाहीं. आजोबांचें व त्यांचें भांडण होऊन ते गेले असल्यामुळें, आज नाहीं उद्यां पत्र येईल असें सर्वांनीं म्हणतां म्हणतां महिना गेला, सव्वा महिना गेला, दीड महिना झाला. पत्र नाही कीं कोणाबरोबर एक बोटभर चिठ्ठी नाहीं, निरोप नाहीं, शिरोप नाहीं. आई, आजी यांच्या चर्या नेहमीं उदासीन. आजोबा नेहमीं ताठ्यांत आणि कुर्‍यांत, परंतु त्यांचीदेखील चर्या पालटली ! आपण होऊन त्याला आतां पत्र पाठवावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चयच केला होता. हेकेखोराशीं हेकेखोर मिळाले आणि आजीला व बिचाऱ्या माझ्या आईला मात्र अतोनात त्रास झाला. तिला रात्रीं झोप येत नसे. आपण जर कधीं जागें होऊन चापसून वगैरे पाहिलें तर ही बसलेली तरी असावयाची अगर ' काय ग यमे ? ' असें तरी म्हणायची. शेवटीं तिच्यानें अगदीं राहवेना. तिनें दादाला एक दिवस एकीकडे नेऊन त्याच्याकडून एक पत्र–लहानसेंच, पण पत्र–लिहवलें. तिला पक्कें ठाऊक होतें कीं, जाते वेळीं जें आजोबांचें व त्यांचें भांडण झालें त्याचाच हा परिणाम त्यांतून नेहमींच्या स्थितींत असतांना जर पत्र आलें नसतें, तर मग गोष्ट निराळी होती. त्याबद्दल एवढें कांहीं वाटण्याचें कारण नव्हतें. परंतु सध्यांची स्थिति तसली नव्हती, सध्यांचा प्रसंग थोडा आणीबाणीचाच होता. काय होतें आणि काय नाहीं याचा नेम नव्हता. हो, वेळीं—पण मी वडिलांविषयीं असें कसें लिहूं ? जाऊं द्या.

दादानें लिहिलेलें पत्र जाऊन सुमारें सात आठ दिवस झाले, तरी बाबांकडून बोटभर चिठ्ठी कीं खुशालीचा निरोप ? रामाचें नांव ! सगळ्या माणसांना तळमळ लागली होती. मी आपली लहान. लहान म्हणजे अगदींच नाहीं कांहीं. मला थोडेंबहुत समजूं लागलें होतें–तर मलादेखील बाबांचें पत्र नाहीं म्हणून मनाला कांहीं चमत्कारिक वाटे. दादा थोडासा माझ्याहून मोठा होता. त्याला तर विशेषच वाईट वाटे परंतु आईची व आजीची स्थिति फारच विलक्षण झाली होती. त्यांत मजा ही कीं, त्यांना तोंड बांधून

बुक्क्यांचा मार म्हणतात, तसें झालें होतें. पत्र नाहीं म्हणून आजोबांच्या जवळ गोष्ट काढावी तर आजीच काढील तेव्हां ! पण तिची कांहीं प्राज्ञा नव्हती. कारण भांडणाच्या शेवटीं आजोबांच्या तोंडून कांहींतरी फारच अभद्र व ओंगळवाणी शिवी येऊन त्यांनीं पुनः आपल्या लेकाच्या कामांत पडावयाचें नाहीं कीं त्याची विचारपूस करावयाची नाहीं, अशी शपथ वाहून घेतली असें पाठीमागून पुष्कळ वर्षांनीं माझ्या कानीं आलें. त्यांचे एकंदर शब्द काय होते ते देखील पुढें मला कळले, परंतु ते शब्द इथें लिहून दाखविण्याजोगे मुळींच नाहीत. मी तर इथें लिहिणार नाहींच नाहीं, परंतु दुसऱ्या कोणी ते पुस्तकांत लिहिले तर तें देखील अतिशय वाईट ! आमच्या आजोबांसारखे फटकळ, रागीट व ज्यांना बोलण्याचा सुमार मुळींच नाहीं, असे म्हातारे कांही थोडे नाहीत; त्यांपैकीं कितीकांच्या तोंडून तसले शब्द निघत असतील त्यावरून वाचणारांनीं कल्पना करावी.

अशी भयंकर शपथ वाहिल्यावर आजीचा धीर तरी व्हावा कसा त्यांच्याजवळ बाबांना पत्र लिहिण्याची गोष्ट काढण्याला ! बरें, आईनें काढावी तर तिला तरी काय खात्री कीं आजोबा लिहितीलच किंवा त्यांनीं लिहिलें तरी बाबा उत्तर पाठवितीलच ! अशी स्थिति असल्यामुळें जें तें माणूस अगदीं झुरू लागलें. काय करावें तें कोणासच सुचेना. शेवटीं सास्वासुनांनी मुकाट्यानें गड्यास पाठविण्याचा विचार केला व त्याप्रमाणें शिवरामला जाण्यायेण्याचें भाडें देऊन व त्याजबरोबर दादाकडून लिहविलेलें पत्र देऊन त्याची रवानगी केलं. या गोष्टीस चारच दिवस झाले. दुसऱ्या दिवशीं गड्याची येण्याची वाट होती. संध्याकाळचा ऐन तिन्हीसांजाचा वेळ ! आजी कुठें बाहेर गेली होती. दादाहि तिच्याबरोबर तिला सोबत म्हणून गेला होता. मी आपली, इकडे तिकडे करीत होतें. तिन्हीसांजा झाल्या म्हणजे मला एकटीला कुठें बसण्याची सोयच नाहीं. कोणीना कोणी तरी माणसांच्या जवळ असावें लागे, म्हणून मी आईला शोधूं लागलें तों आईहि कोठें दिसेना. घरांत अंधार पडत चालल्यामुळें माझी अंधाराच्या जागीं तिला शोधण्याची कांहीं सोय नव्हती. आजोबा तेवढे एकटें अंगणांत कायसेंसें करीत होते. त्यांच्याजवळ जाण्याची गोष्टच नको. मीं आई, आई करून पुष्कळ हांका मारल्या. आई कोठेच ओ देईना म्हणून मी देवघराकडे गेलें तों तेथें ती देवाच्यापुढें दोनहि हात उभे जोडून एका बाजूला धरलेले आणि त्यावर एक कानशील ठेवून उकिडवी बसलेली ! मीं हलकेंच तिच्या पाठीमागून जाऊन—मला काय वाटलें असेल तें असो—तिच्या गळ्याला मिठी मारली आणि मोठ्या काकूळतवाणीनें तिला "आई अ, आज तूं अशी कां बरें बसलीस ?" असें म्हटलें आणि तिच्या डोळ्यांतून घळघळ पाणी येत आहे असें दिसलें. मग मात्र मी चपापलें आणि मिठी सोडून एकीकडे झालें; परंतु आई एक चकारशब्ददेखील बोलली नाहीं. तो थोडा वेळ तशीच बसली होती. नंतर आजीची व दादाची चाहूल ऐकल्यामुळेंच कीं काय कोणास कळे, ती झटकन् उठली व तिनें आपले डोळे पुसून ती तेथून उठून

बाहेर आली. तिला पाहतांच आजीनें " काय ग, नाहींना आला शिवराम ! आतां काय करावं ? " आई नुसतें ' येईल आतां उद्यां ' असें म्हणाली आणि स्वयंपाक-घरांत गेली.

कोणतीहि गोष्ट घडो, माझी मोठी विश्वासाची जागा दादा आणि दादाची मी, अशी त्या वेळीं स्थिति होती; तेव्हां आज पाहिलेली गोष्ट मीं दादास थोड्याच वेळांत सांगितली यांत नवल नाहीं. ती ऐकून दादा म्हणाला, " यमे, उद्यां जर तो गडी नाहीं आला, तर मीं अगदीं निश्चय केला आहे कीं, आपण स्वतः बाबांच्याकडे जाऊन त्यांची हकीकत काय आहे ती पाहून येऊन आईचं समाधान करावयाचं. हें बघ यमे, आपल्या आईसारखी आई कुठेंतरी असेल का ग ? अन् बाबा तिलादेखील असें दुःख देतात ! त्यांचंन् आजोबांचं एक भांडण झालं म्हणून तिनं, आजीनं आणखी आपण काय बरं केलं आहे ? मीं दोन पत्रं लिहिलीं पण त्याचं एवढं तरी उत्तर ?—अन् यमे, तूंदिखील दांडगाई करून तिला दुःख देतेस. परवां सुंदरीचं अंगडं धुवायला तिनं सांगितलं तेव्हां कां ग नाहीं धुतलंस ? ' मी नाहीं जा धुवायची ' असें उत्तर देऊन पळालीस नाहीं का ? "

" तूं तरी बराच आहेस रे दादा, एवढंतेवढं ध्यानांत ठेवणारा ! ती कुशी मला हांक मारीत होती एकसारखी, म्हणून तिच्याकडे जाण्याच्या गर्दींत मीं नाहीं धूत म्हटलं असेल; पण तूं तेवढंच ध्यानांत ठेवून एवढं मला बोलून तें काय घेतोस ! अन् तूं नाहींच आईला कधीं ' नाहीं होय ' म्हणत कांहीं तिनं सांगितलं तर ? "

" नाहीं. मी नाहीं तुझ्यासारखीं कधीं तिला उत्तरं देत. अन् आताच्यासारख्या वेळीं तर कधींच नाहीं. "

" बरं बरं. हजारदा दाखवून देईन. "

" दे दे दाखवून पाहूं. "

अशा तऱ्हेनें बोलाचालीला सुरुवात झाली. परंतु मींच दम खाऊन म्हटलें, " बरं, पण तें जाऊं द्या. आतां याच्यापुढें आपण दोघेंहि असा बेत करूं कीं, आईला म्हणून अगदीं यत्किंचितहि दुःख द्यायचं नाहीं, कीं तिनें सांगितलेलं काम ऐकल्याशिवाय राहायचं नाहीं. " या माझ्या म्हणण्यास दादानेंहि संमति देऊन आम्ही दोघांनीं शपथा वाहून घेतल्या आणि मग दादानें दुसरे दिवशीं बाबांच्याकडे जाण्याचा बेत केला होत, त्यावर आमचें बोलणें सुरू झालें.

तो म्हणाला : " आईच्याजवळ एकदा गोष्ट काढून पाहावयाची. तिनं जर रुकार दिला, तर फारच चांगलं झालं; नाहीं तर मीं तसाच जाण्याचा बेत केला आहे. "

" तिला न विचारतांच ? "

पण...४

"हो !"

"अन् पैसे कुठले ?"

"काय करायचे आहेत पैसे—माझ्याजवळ एक अधेली आहे तेवढी पुरेल खायला चार दिवस. मी आपला पायींच जाईन."

"मी नाहीं तुला जाऊं द्यायची एकटा ! मी येईन तुझ्याबरोबर."

"भलतंच एखादं ! तुला वेड तर नाहींना लागलं ?"

◆ ◆ ◆

## १० : गेलाच तो

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

दादाचें बोलणें मला अर्थातच खरें वाटेना पैसा ना आडका आणखी हा एवढासासा मुलगा इतक्या लांब जाऊन बाबांचा समाचार आणणार कसा ? तरीपण दुसरें असेंहि वाटलें कीं, न जाणो कदाचित् हा जाईलहि; तर आपणहि याच्याबरोबर जावें; म्हणून मीं त्यास म्हटलें, "दादा, मीदेखील तुझ्याबरोबर येतें. आपण दोघें मिळून जाऊं." तें माझें बोलणें ऐकून दादा जो हसायला लागला तो कांहींच्या कांहींच ! कांहीं केल्या त्याचें हसूं म्हणून आवरेना. त्याचें तें खिदळणेंच—हसूं कसलें ? ऐकून आजी आम्ही होतों तेथें आलीदेखील; "व अरे गणपती, आहे तरी काय ? एवढा तुला हर्ष कसला झाला हा ?" म्हणून विचारूं लागली; आणि मी आतां "कनी, आजी, दादा" असें म्हणून त्याच्या भावी प्रवासाची हकीकत जों सांगण्यास आरंभ करणार, तों त्यानें मजकडे एवढाले डोळे करून पाहिलें, आणि ओंठ चावून मला गप्प बसण्याबद्दल दरडावणी दाखविली. तेव्हां मी लागलीच "कांहीं नाहीं, तो आपला उगीच हसत होता" असें म्हटलें, पण आजीचें तेवढ्यानें कुठलें समाधान व्हायला ? शिवाय, तिनें तें दादानें माझ्यावर वटारलेले डोळे व ओंठ चावून मुकाट्यानें दरडावणें पाहिलें होतें असें दिसलें, कारण ती लागलीच म्हणाली, "कायरे, तिच्या चेष्टा करून पुनः आणखी तिलाच दाबतोस का ? तूं आतांशा फारच शेफारला आहेस नाहीं तरी. दम धर. एक दिवस तुला चांगलंच त्याच्याबद्दल बक्षीस देईन !" ती इतकें बोलली, परंतु दादा कांहींएक बोलला नाहीं मीं कदाचित् कांहीं बोलेन म्हणून माझ्या मांडीला त्यानें एक चिमटा घेऊन "हं खबरदार ! पुनः कांहीं बोलशील तर !" असें म्हटल्यासारखा दरडावणीचा चेहरा करून मजकडे पाहिलें. हें त्याचें करणें आजीच्या लक्षांत आलें नसतें, परंतु चिमटा घेण्याबरोबर मीं 'स् स् स्' असा शब्द केला. त्याबरोबर ती समजली व तिनें त्याचा एकदम कान धरला व जोरानें पिळला, पण त्यानें एक अवाक्षर-देखील तोंडांतून काढलें नाहीं.

आजी व आजोबा यांचे विळ्याभोपळ्याइतकें उजू होतें, हें वाचकांस माहीत असेलच. त्यांच्या आवडीनिवडी अगदीं एकमेकांच्या उलट. आजीनें माझा कैवार घेण्यास जीं कांहीं कारणें असतील, त्यांत मुख्य कारणांपैकींच 'मी आजोबांना आवडत नव्हतें,' हें एक कारण होतें असें म्हणा, अगर आजोबांचें दादावर मन असण्याला 'मी आजीला आवडत होतें' हें म्हणा, परंतु प्रकार असा होता कीं, आजोबांनीं एक म्हटलें कीं तें खरें असो किंवा नसो, आजीचें मत निराळेंच पडायचें म्हणून समजावें, आणि आजी जें म्हणेल त्याच्या उलट आजोबांचें म्हणणें असावयाचेंच. कोणत्याहि वेळीं आजीचें म्हणणें चाललें आहे असें नाहीं बोलूनचालून ती बायकोच, तेव्हां तिचें कुठें काय चालणार आहे ? तरीपण वेळ आली म्हणजे ती आपला हेका नुसता शब्दांनींच का होईना—पण चालवायचीच. माझें व दादाचें बोलणें तें काय आणि त्याच्यापासून पुढें अनर्थ झाला तो तरी केवढा !

आजीनें दादाचा कान धरला, व सडकून पिळला, तरी तो आपला बिचारा मुकाट्यानें बसला. हूं कीं चूं देखील त्यानें केलें नाहीं, त्यामुळेंच जणूं काय राग येऊन आजीनें त्याच्या तोंडांत मारली, ती अंमळ जोरानें लागली असावी, कारण दादा लागलीच मोठ्यानें ओरडला. वास्तविक म्हटलें म्हणजे आजी त्याला असें मारायची नव्हे. आजपर्यंत त्याला ती अनेक वेळां रागे भरली, तिला तो माझ्याइतका आवडतहि नसे, परंतु तिनें त्याजवर असा कधींच हात टाकला नव्हता. मला वाटतें मनुष्य वैतागलें म्हणजे त्याला कित्येक वेळां सुमार राहात नाहीं. त्यांतलीच तिची स्थिति झाली असावी. बाबांचें पत्र नाहीं यामुळें अगदीं त्रासून गेल्याकारणानें तिला अगदीं चमत्कारिक झालें असावें आणि त्या त्रासिकपणाच्या लहरींतच तिच्या हातून तें झालें दादा ओरडलेला ऐकल्याबरोबर काय आहे, म्हणून पाहण्यासाठीं आजोबा आले, आणि आजी त्याला मारते आहे, हें पाहण्याबरोबर ते तिच्या अंगावर धावून गेले. तोंडानें शिव्या सुरू झाल्याच; आजीनें तरी दादाला सोडून तेथून निघून जावें, तर तिला अधिकच चेव आल्यासारखा दिसला आणि तिनें संतापानें दादाच्या आणखी एक तोंडांत मारली, मग काय विचारतां ! आमचे आजोबा ते ! त्यांनीं लागलीच आजीच्या हाताला हिसडा देऊन व तिला नाहीं नाहीं त्या शिव्या देऊन एकीकडे केली. ती अधिकाधिकच बोलूं लागली. आजोबांचें तोंड तर जें सुरू झालें तें कांहीं विचारूंच नका. शेवटीं येथपर्यंत मजल आली कीं, आजोबांनी संतापानें हात उगारून आजीच्याहि एक तोंडांत मारली, आणि " लाथेखालीं तुडवून टाकीन ( पुढच्या शिव्या मी येथें लिहीत नाहीं ) पुनः त्याला कीं कोणाला हात लावशील तर !" असें ते म्हणाले. इतक्यानेंच संपलें नाहीं. त्यांची दृष्टि तितक्यांत मजकडे गेली. मी आधींपासून भीतच होतें. माझी अगदीं गाळण उडून गेली होती. परंतु म्हाताऱ्यानें आजीच्या तोंडांत देण्याबरोबर मी आश्चर्यानें अगदीं चकित होऊन गेलें. माझें भान नाहींसें झालें. हें आहे तरी काय असें वाटलें, परंतु आजोबांचे डोळे आपणांकडे वळले हें पाहण्याबरोबर मग माझें

काय झालें असेल, याचा तुम्हीच विचार करा. मी थरथरा कांपूं लागलें. आज आपली धडगत दिसत नाहीं अशाबद्दल माझी खात्री झाली. मला हें लिहिण्याला अगर वाचकांनी वाचण्याला जितका वेळ लागला व लागेल त्याच्या दशांश वेळांत वरील सर्व गोष्टी घडल्या. आजोबांची दृष्टि मजवर लागल्याबरोबर आजीकडलें माझें लक्ष उडून आत्म-रक्षणाकडे लागलें. इतक्यांत "या कारटीनेंच कांहींतरी आग लावून दिली असेल, ही मोठी चोमडी आहे !" असे आजोबांच्या तोंडचे शब्द माझ्या कानीं पडले व लागलीच माझ्या दंडाला धरून मला कोणीं ओढलें व फाडकन् माझ्या तोंडांत बसून माझें कानशील झणाणलें आणि डोळ्यांपुढें काजवे दिसूं लागले. एवढीच काय ती मला आठवण आहे. पुढे सुमारें पाव अर्धी घटका काय झालें त्याचें मला यत्किंचित्‌देखील स्मरण नाहीं. याचें कारण मला वाटतें मला घेरी आली असावी, अगर मी आपल्या पहिल्या चापटी-बरोबर आलेल्या तिरीमिरीत गर्क असल्याकारणानें दुसऱ्या चापट्या मिळाल्या असल्यास त्या मला कळून आल्या नसाव्यात. परंतु थोडया वेळानें मी पाहूं लागलें तों आजोबा व दादा तेथें नाहींत. आजी मात्र एकटी तेथें जमिनीवर पडलेली आहे. ती तशी पडलेली पाहून त्या वेळी माझ्या मनांत काय विचार आले असतील ते असोत, तें कांहीं मला आज आठवत नाहीं. आठवतें काय तें एवढेंच, कीं तिची ती अवस्था पाहून थोडीबहुत स्फुंदत स्फुंदत पण मी तिच्याजवळ गेलें व तिच्यापुढें जाऊन निजणार तों तिनें मला लोटून दिलें. तरी मी आपली घुसलेच तिच्यापुढें. दुसरें कांहीं मला आठवत नाही. आज आतां हें लिहितांना मात्र तें त्या दिवशींचें चित्र माझ्या डोळ्यांपुढें अगदीं चकचकीत दिसतें आहे. विशेषतः तें स्पष्ट दिसण्याचें कारण त्या दिवशीं घडलेल्या हकीकतीवर आमचें अनेक वेळां पुढें बोलणें होऊन मी व दादानें आजोबांच्या त्या दिवसाच्या वर्तणुकीबद्दल फारच दोष दिला. आतां आमचे आजोबाच ते, त्यामुळें माझा इलाज नाहीं; परंतु दुसऱ्या एखाद्या म्हाताऱ्याच्या आचरणाबद्दल जर मी लिहीत असतें, तर खरोखरच मीं त्यास पशु म्हटलें असतें. अहो बरोबरीची बायको. तिचीं नातवंडें तिथें जवळ उभीं—अन् नातवंडें नसलीं मेलीं जवळ म्हणून तरी काय झालें ?—अन् त्या साठपासष्ट वर्षांच्या म्हाताऱ्यानें सत्तावन अठ्ठावन वर्षांच्या आपल्या बायकोच्या फाडकन् तोंडांत मारली ! याचा अर्थ तरी काय ? मला पक्कें ठाऊक आहे कीं, कित्येक लोकांस हें मीं लिहिलेलें खोटें वाटेल व कित्येकांना कडू वाटेल, परंतु काय करूं ? मी आपलें चरित्र लिहितें आहें. तें अगदीं खरें खरें असें लिहितें आहें. ज्या गोष्टी घडल्या नाहींत अशा गोष्टी यांत मुळींच येणार नाहींत व आल्याहि नाहींत; एवढें सांगितल्यानें जर माझ्या अविश्वासी वाचकांपैकी कोणाची खात्री होणार नसेल, तर त्यांना एवढेंच सांगावयाचें कीं, एकदाच मी जें हें आपलें चरित्र लिहितें आहें, त्यांत खोटें, बनावट, जें मीं प्रत्यक्ष पाहिलें अगर अनुभविलें नाहीं, अशाचा गंधदेखील नाहीं. कोणतीहि गोष्ट अधिक आगळी करून सांगण्याचा माझा हेतूच नाहीं. असो.

वर सांगितलेला सर्व प्रकार घडल्यावर मग रात्रींच्या जेवणाखाण्याचा कसा काय बोजवारा झाला असेल हें आतां वर्णन करून सांगण्याची जरूरच नाहीं; इतका हा गोंधळ चालला असतांना आई कुठें होती हें कांहीं मला ठाऊक नाहीं; पण ती कांहीं वेळानें आजीजवळ येऊन तिला 'दशमो खाण्यास चला' म्हणून आग्रह करू लागली. आजी उठेना; तिकडे आजोबाहि कांहीं खाण्यास येईनात. शेवटीं आईनें आम्हां दोघांस जेवूं घातलें; मला तर फारच भूक लागली होती; जणू काय आजोबांनीं दिलेल्या चपराकीनें व त्यावर रडण्याचा खूप व्यायाम झाल्याकारणानेंच ती प्रज्वलित झाली! जेवणखाण झाल्यावर मी व दादा आपल्या अंथरुणावर जाऊन निजण्याच्या बेतांत होतों; परंतु दादाच्याजवळ आतां जाऊन निजावें कसें, याची मोठीच भीति वाटूं लागली. आपल्यामुळेंच एवढें सगळें झालें, तेव्हां तो आपल्यावर रागावला असेल असें मला खात्रीनें वाटलें; परंतु तो आधीं जाऊन अंथरुणांत पडल्याबरोबर मीहि त्याच्या पांघरुणांत घुसलें; मात्र दुसऱ्या बाजूस तोंड केलें. तो तर कांहीं बोलेना. तो बोलत नाहीं हें पाहून मला तर कांहीं चैन पडेना. मी आपली चळवळ चळवळ करूं लागलें. तों आपला मख्खच! त्यानें हातदेखील हालविला नाहीं. आमच्या आईचे बहुतेक गुण दादाच्या अंगांत होते. त्यांतलाच निश्चयीपणा हा एक होता. परंतु हा गुण त्याच्या अंगांत लहानपणीं जितका दिसला, तितका पुढें दिसेना; मग पुढें कांहीं ज्या गोष्टी घडल्या व ज्या माणसाचें त्याच्या मनावर जास्त वजन पडलें त्याच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें त्याचा तो गुण कमी झाला कीं काय कांहीं कळेना. कांही असो. ते दिवशीं रात्रीं तो कांहीं माझ्याशीं मुळींदेखील बोलला नाहीं व मलाहि झोप लागली; परंतु मी मध्येंच—केव्हां, किती वाजले, तें कांहीं माझ्या लक्षांत नाहीं, पण—जागी झालें आणि काय असेल तें असो, दादाचा बाबांकडे जाण्याचा जो निश्चय झाला होता, तो माझ्या ध्यानांत आला; त्याबरोबर दादा गेला कीं काय हे पाहण्यासाठींच कीं काय पण मनांत कांहींएक विचार नसतां माझा हात एकदम दादाच्या जागीं गेला आणि चापसून पाहतें तों दादा अंथरुणावर मुळींच नाहीं! मग काय विचारतां! मी एकदम किंचाळल्यासारखी, "आई अ! आजी अ!" करून ओरडलें आणि एकसारखी रडूं लागलें. आई नित्याप्रमाणें आपली जागी होतीच असें दिसलें. तिनें लागलीच "यमे, यमे, काय झालं बेटा! अशी आरडलीस कां? अग रडतेस कां?" असें विचारलें; परंतु "दादा" या एका शब्दाखेरीज दुसरा शब्द कांहीं माझ्या तोंडांतून निघेना! तेव्हां तिनें झटकन् दिवा लावला व पाहतें तों खरोखरीच दादा अंथरुणावर नाहीं! हें आहे तरी काय? मला रडण्यापलीकडे कांहीं सुचेना!. "दादा! दादा गेला?' असे अर्धवट शब्द मी उच्चारीत होतें. शेवटीं आईनें आजोबांस हांका मारल्या. 'गणू कोठें नाहीं, हें काय?' असें विचारूं लागली. त्यांनादेखील मोठें आश्चर्य वाटलें. जिकडे तिकडे त्यास ते हांका मारूं लागले. परंतु तो कोठंच ओ देईना. इतक्यांत मी शुद्धीवर आल्यासारखी झालें आणि आईला आमच्या आदल्या दिवसाच्या बोलण्याची अथपासून इतिपर्यंत सर्व हकीकत सांगितली. त्याबरोबर

तिनें तें आजोबांस सांगितलें आणि अर्थातच आजोबांनीं त्याच्या पाठोपाठ जाण्यासाठीं डोकीवर पागोटे ठेविलें व मला 'गाढवी, हें आधींच कां नाहीं सांगितलेंस आम्हांला ?' असें म्हणत म्हणत दाराच्या बाहेर गेले. 'बरोबर कोणी माणूस घेऊन तरी जा' असें आईनें मोठ्याने ओरडून सांगितलें, पण त्यांनीं ऐकलेंच नाहीं. ते चालते झाले. हा प्रकार घडला तेव्हां माझ्या मनांत काय वाटलें असेल तें निराळेंच. परंतु वाचकहो, माझ्या आईच्या मनांत काय झाले असेल याचा विचार तुम्हीच करा. तिच्या मनांत त्या वेळीं कितीतरी निरनिराळे विकार जागृत झाले असतील. आपला मुलगा गेला तो कुठें गेला असेल, वाट चुकला असेल, पडला असेल, झडला असेल, कीं वाटेंत कोणी त्याच्या भिकबाळीच्या लोभानें त्याला धरून त्याचें काय केलें असेल ! ! ! एक कीं दोन कुतर्क तिच्या मनांत उभे राहिले असतील बरें ! आपला मुलगा किती मातृभक्त, आपल्यावर त्याची इतकी प्रीति, हें पाहून तिला समाधान होण्याला यत्किंचित्‌देखील अवकाश नव्हता. यामुळें तिला तो विचारदेखील सुचला नसेल. आणि यदाकदाचित् आला असलाच तर तो किती वेळ टिकला असेल ? एक क्षणभर देखील नसेल. तिचें सर्व चित्त त्याच्या वाटेकडे लागलें. माझी धाकटी बहीण सुंदरी रडूं लागली; मीं तिला आपल्याजवळ घेतलें. पण तिनें गोंधळ केला. आईचें लक्ष तिच्याकडे जाईना. आजीचीहि तीच स्थिति झाली. तिला तर कांहीं बोलवतच नव्हतें असें दिसलें. बऱ्याच वेळानें तिनें एक मोठा थोरला सुस्कारा टाकला, आणि ती एवढेंच म्हणाली, "यंदांच्या साली काय काय संकटें येणार आहेत आमच्यावर, आणखी काय नाहीं ! देवा नारायणा, तूं आहेस !" आई स्तब्ध बसली होती. करते काय बिचारी ! इतक्यांत उजाडलें. आजोबांना जाऊन बराच वेळ झाला. दादाचा ठिकाण नाहीं. दादा रात्रीं नाहींसा केव्हां झाला हेंहि कोणास ठाऊक नाहीं. आईला कधीं आतांशा झोप लागायची नाहीं ती लागली केव्हां आणि हा गेला केव्हां, कांहींच उमज पडेना. बरें गेला त्याची चाहूल ऐकूं आली नाहीं, याचेंदेखील आश्चर्य वाटलें. पण ती आश्चर्य वाटण्याची अगर विचार करीत बसण्याची वेळ नव्हती. तो आतां पुनः दृष्टीस पडतो कसा, असें होऊन गेलें. मला तर तो पूर्वी वाटेंत हरवला असतांनाचें स्मरण झालें व त्याबरोबर तो खास पुनः आपल्यास भेटणार असेंहि वाटलें; पूर्वी तसा तो भेटला होता.

होतां होतां सकाळचे आठ वाजले. दादाचा ठिकाण नाहीं, आजोबांचा ठिकाण नाहीं. आई-आजींना रडतां रडतां भुई थोडी झाली ! माझी काय स्थिति झाली ती पुसूंच नका. सुंदरीला काय कळत होतें ! परंतु तिने रडून रडून गोंधळ केला. तेव्हां तिला आईनें प्यावयास दिलें. शेजारची मंडळी व कुणबी माणसें तेथें येऊन सुस्कारे टाकीत व "पण असा कसा मुलगा गेला ?" "कोणीच कसा पाहिला नाहीं !" "ह्या पोरीनें त्याचा बेत आधींच रात्रीं कसा आईला, नाहीं तर कोणाला सांगितला नाहीं ?" असें एक ना दोन अनेक प्रश्न विचारीत, नुसती धांदल करीत होतीं. खरोखर उपयोग एकाचाहि नाहीं. कुणब्यांच्या बायका नसत्याच विव्हळत होत्या. अशी एकंदर स्थिति होती.

दहा वाजले; कोणाचाहि ठिकाण नाहीं इतक्यांत आजीला कांहीं आठवण होऊन ती एकदम म्हणाली, "तो मेला गडीदेखील येईना, आज हटकून यायचा तो; त्याला बहुतकरून गणू वाटेंत भेटला असेल, अन् तो न् तो दोघे आतां येतील. काळजी करायला नको. पण हें वेडं पोर आपलं आचरटासारखं गेलं कसं? त्याला एवढया रात्रीं एकटं बाहेर पडायची भीति कशी नाहीं वाटली? तो बाहेर गेला तेव्हा चांदणंदेखील असेल कीं नाही कोणास कळे?" आई कांहींच बोलली नाहीं. आजीनें मजकडे पाहिलें. आजीच्या त्या धीराच्या बोलण्याचा आईवर जरी कांहीं परिणाम झालासा दिसला नाहीं, तरी मजवर खास झाला. मला असें वाटलें कीं, दादाला शिवराम येतांना भेटून दादा आपल्याला त्याच्याबरोबर परत येऊन भेटणार. अशी मनाची खात्री होण्याला आणखी एक कारण झालें, तें हें कीं, पोटांत भूक लागली. पोटांत भूक लागतीना तर इतक्या लवकर तशी आशा उभी राहतीना. किंवा असें का म्हणानात कीं, ती आशा मनांत उभी राहण्याबरोबर पोटांत कावळे कोकावत होते. त्यांचें ओरडणें माझ्या कानीं पडूं लागलें, पण बोलतां कसें? सुंदरीचें ठीक होतें. तिला कांही विशेष खटपट करावयास नको होती. सडकून रडली कीं आलंच कांहींतरी खायला. मला तसें कसें करतां येतें! मी रडूं लागलें, तर भाऊ हरवला म्हणून रडतें आहे, असें म्हणून उगी मात्र करायला येती; पण मला भूक लागली असें म्हटलें असतें तर कोणी 'काय तरी आचरट पोरगी ही, हिचा भाऊ हरवला आणखी आपण खाण्यासाठीं धादावली आहे, पाहा!' असें म्हणतीं. तें कसेंहि असो; पण माझी स्थिति आजीच्या लक्षांत आली असावी असें दिसलें. कारण मजकडे पाहून लागलीच ती आईस म्हणाली, "ऊठ, ऊठ, आतां अगदीं काळजी करायला नको. पोरगा त्या गडयाला भेटणार अन् परत येणार, अन् जवळच कुठें असला तर एव्हांना भेटून अर्ध्या अधिक वाटेवर येणंदिखील झालं असेल. त्या पोरीकडे पाहा; तिला उगी कर, बारा वाजायला आले, तिला खायला नाहीं कांहीं सकाळपासून. अग खरं यमे, कालचें असेलच. चल, मी तुला देतें भात कालवून." असें म्हणून आजी आतां जाणार, इतक्यांत ज्या गडयाची आम्ही वाट पाहात होतों तो गडी घरापासून थोडया अंतरावर दिसला, पण त्याबरोबर दादा कांहीं नाहीं.

◆ ◆ ◆

## ११ : गडी आला

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मग काय विचारतां! एकच हलकल्लोळ होण्याची वेळ आली. मी जो दादाच बाबांकडे जाऊन आईला त्यांचा समाचार कळविण्याबद्दलचा बेत सांगितला, त्यावरू सर्वांनीं अर्थातच असें अनुमान बांधलें होतें कीं, तो बाबांच्या गांवीं जाण्याच्या रस्त्याल

गेला असावा; परंतु गडी त्याच रस्त्यानें परत येत असतांना त्याला भेटला नाहीं, तेव्हां अर्थातच तो त्या रस्त्यानें गेला नाहीं, किंवा जाऊन मध्यें कोठेंतरी वाट फुटतें त्या ठिकाणीं वाट चुकून भलत्याच रस्त्याला गेला असेल, याखेरीज दुसरा कांहीं तर्क करण्याला जागाच नव्हती. तो गडी पुरता आला असेल नसेल तोंच त्याला सगळ्यांनीं वेढून " गणू कुठें आहे ? गणू नाहीं का तुला भेटला ? " या प्रश्नांची गर्दी केली. ज्या कामासाठीं वास्तविक त्याला पाठविला होता तो प्रश्न कोणीदेखील विचारीना ! असो. त्यानें अर्थातच " नाहीं, मला कांहीं कोणीं वाटेवर भेटलें नाहीं " असें म्हटलें.

तें ऐकल्याबरोबर मीं त्याला विचारलें, " कोणी म्हणजे आजोबादेखील भेटले नाहीत ? "

" नाहींत."

" म्हणजे ! गणू एक वाट चुकला असेल पण मामंजी तर भेटावे ! " माझी आई सद्गदित कंठानें म्हणाली. तिची या वेळची मुद्रा माझ्या डोळ्यासमोर अजून स्पष्ट दिसत आहे. तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहात होते. परंतु ती त्यांस मुद्दाम मागें ठेवीत होती, असें तिच्या चेहऱ्यावरून अगदीं स्पष्ट दिसत होतें; त्याचप्रमाणें आपल्या अंतःकरणांत दुःखानें अतिशय कहर केला आहे ही गोष्ट बाहेर होतां होईल तों दिसूं नये अशाबद्दल ती फारच आतुर होती, असें दिसलें. तिच्या त्या प्रश्नाचें शिवरामानें थोडा वेळ कांहींएक उत्तर दिलें नाहीं. तो आपला इकडे तिकडेच पाहूं लागला. परंतु आजीनें तसाच प्रश्न पुनः केला, तेव्हां त्यानें खरें काय तें सांगितलें. तें हें–" मी आलों आहें खरोखर काल रात्रीचा, परंतु बारा वाजण्याच्या सुमारास भूतवाडीला ( हें खेडें आमच्या गांवापासून फारच जवळ होतें ) आलों आणखी तिथंच निजलों. सकाळीं लवकर उठून यायचं, तर मावशीच्या इथं कांहीं गोडधोड होतं अन् थोडंसं कामयू होतं म्हणून राहलों; जेवून निघालों तो हा आतां आलों. " हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकण्याबरोबर सगळ्यांच्या जिवावरलें एक ओझें उतरल्यासारखें झालें. इतका वेळ जें असें वाटत होतें कीं, दादा खचित वाट चुकला असावा, तें आतां वाटण्याला कारण नव्हतें. दादाची व या गड्याची व आजोबांचीहि गांठ पडण्याचा संभव नव्हता; अर्थात् आशेला कारण राहिलें.

दादाच्याबद्दल असा निकाल झाल्यावर अर्थातच ती पुनः गोळा झालेली आसपासची सर्व मंडळी गेली; आजीनें त्या गड्यास घरांत बोलावलें, व बाबांच्याबद्दल हकीकत विचारली. त्यानें ' ते चांगले खुशाल आहेत, काळजी करूं नका ' असें आश्वासन दिलें. परंतु तो कांहींना कांहींतरी चोरून ठेवीत असावा असें दिसलें; मग तें कांहीं असो. ही गोष्ट आजीच्या लक्षांत आली नाहीं; आईच्या मात्र आली. तरी ती त्या वेळीं कांहीं बोलली नाहीं. आजी मात्र " आतां ठीक आहे. गणूची कांहीं काळजी करायला नको. त्याला कुठून हवा तिथून शोधून आणतील. ती ही एक काळजी मोठी

होती, तेवढी दूर झाली एवढ्यानं फार चांगलं झालं." असें म्हणून आंत गेली. मी तेथेंच होतें; परंतु तें आईच्या लक्षांत आलें नसावें किंवा तिनें त्याकडे दुर्लक्ष केलें असावें. तिनें शिवरामाला पुनः विचारलें, "कायरे, तूं तिथं गेलास तेव्हां तब्येत कशी काय होती? तुझ्यावर कांहीं रागावणं–जाजावणं नाहींना झालं?" तो आईचा प्रश्न ऐकून त्यानें, "नाहीं कांहीं" असें उत्तर दिलें खरें, परंतु त्याच्या चेहऱ्यावरून कांहीं तें उत्तर खरें नसावें, असें आईला वाटलें असें दिसलें. कारण ती लागलीच त्याला म्हणाली, 'अरे, तूं माझ्यापासून कांहीं लपवून ठेवूं नकोस. काय जे खरं असेल तें सांग. तुला काय?"

या तिच्या बोलण्यानें धीर येऊनच कीं काय त्या वेडयानें, "सांगूं तर मग खरं बाई! मी घरांत जाऊन त्यांच्यापुढें पत्र टाकतांच 'मी कांहीं मेलों नाहीं, चांगला जिवंत आहे, असें जाऊन सांग जा.' असं म्हणाले, आणखी माझ्या अंगावर त्यांनीं तें फोडलेलं पत्र फेकून दिलं. नंतर कांहीं वेळ ते तसेच स्वस्थ बसले आणखी मीहि दाराजवळ उभा राहिलों. थोडया वेळानं त्यांनीं ब्राह्मणाला हांक मारून मला जेवायला घालून वाटेला लावण्याविषयीं सांगितलं. मी जेवलों खाल्लों अन् पुनः एकदा निघते वेळीं त्यांच्यासमोर जाऊन 'कांहीं पत्रबित्र असलं तर द्या.' म्हणून म्हटल तेव्हां 'जा. खुशाल आहेत म्हणून सांग जा. पत्रबित्र कांहीं नाहीं.' असं म्हणाले. तेव्हां त्यांची तब्येत चांगली होती. मी आतां निघणार इतक्यांत कृष्णाजीपंत आले. त्यांनीं मला पाहतांच सर्व हकीकत विचारून घेतली. नंतर कांहीं वेळ ते स्तब्ध उभे राहिले व शेवटीं मला म्हणाले, 'अरे, इथंच थांब थोडा. मी वरून रावसाहेबांकडून जाऊन येतो अन् मग सांगतों तुला काय तें!' ते गेल्यापासून दहाच मिनिटांच्या आंत आले व त्यांनीं मला आपल्या घरीं नेलें; तेथें कांहीं वेळ बसवून माझ्याजवळ दोन लखोटे दिले. एक हा तुमच्याजवळ द्यायला सांगितला. 'अगदीं दुसऱ्या कोणाजवळ देऊं नको' म्हणून तीन-तीनदा बजावून सांगितलं. 'अन् बाई, दुसराबी तुमच्याजवळ द्यायला सांगितला होता. पण — पण" असे म्हणत म्हणत तो उठून जाऊंच लागला. आईला त्याचें म्हणणें कांहींच कळेना. "अरे काय, म्हणतो आहेस काय? नीट सांग काय तें." असें ती त्याला म्हणाली; तों तो दारांत गेला अन् तिथूनच "तो, बाई, माझ्या हातून गहाळ झाला" असें म्हणून सूं पळालाच. आई दाराकडेच बघत राहिली. तिला तें त्या वेडयाचें करणें कळेनाच असें दिसलें. एक लखोटा मात्र तिच्यापुढे पडला होता. त्याकडे तिचें लक्षच नव्हतें. इतक्यांत आजीनें तिला परसांतून हांका मारल्या. हिचें एक नाहीं–दोन नाहीं–इतक्यांत पितां पितां मांडीवर झोपी गेलेली सुंदरी जागी होऊन रडूं लागली तेव्हां तिचें लक्ष ठिकाणी आलेंसें दिसलें. तिनें तो लखोटा हातानें झटकन् उचलून ओंच्यांत घातला; इतक्यांत मी तिच्या दृष्टीस पडलें त्याबरोबर ती मला म्हणाली, "यमे, सासूबाईंच्याजवळ अगर दुसऱ्या कोणाजवळ बोलूं नको या पत्राबद्दल कांहीं, बरं का!" असें म्हणून तिनें सुंदरीस कडेवर घेतलें आणि तीहि आंत गेली. मी हे सर्व

पाहून खरोखरच अगदीं भांबावून गेलें. त्यांत आणखी भूक लागलेली ! एवढीशी मी, पण ' आतां करावं तरी काय, ' असें होऊन जाऊन शेवटीं रडत रडत आजीच्याजवळ खायला मागितलेंच. तिनेंहि सैंपाकघरांत जाऊन मला आदले दिवसाचा भात उरला होता तो, त्याच्यावर थोडेंसें गोड केलेलें कालवण घालून कालवून दिला. तो गारगोट्या झालेला भात ! – पण मला त्या वेळीं अगदीं अमृतासारखा लागला. म्हण आहेना, ' भुकेला कोंडा अन् निजेला धोंडा. ' अशी म्हण आहे ती अगदींदेखील खोटी नाहीं. पोटांत अगदीं सडकून तावलें होतें. त्या वेळीं तो भात तर काय, पण आणखीदेखील कांहीं असतें, तरी गोड लागलें असतें; त्या वेळीं दादाची आठवण झाली नाहीं; बाबांची आठवण झाली नाहीं; तो आईला शिवरामनें दिलेला लखोटा ध्यानांत आला नाहीं; कांहींएक नाहीं. ते ' तूं जा, मी आलोंच ' असें म्हणतच कीं काय, एकापाठीमागून एक पोटांत चाललेले भाताचे गोळे आणि मधून मधून त्यांच्या प्रवासाला मदत करणारे पाण्याचे घोट एवढेंच काय दिसत होतें. तो सगळा भात जेव्हां पक्का पोटांत गेला, तेव्हां मग मी शुद्धीवर आल्यासारखी झालें; आणि मला दादाची आठवण झाली. मग मनाला वाटूं लागलें कीं, ' पक्की दोनप्रहर झाली, दादानें काय खाल्लें असेल ? तो कुठें असेल ?' पण हा विचार बाळपणी कुठवर राहणार ! मीं आतां काय करावें, या विचारांत होतें. तोंच शेजारची कुशी मला खेळण्यासाठीं बोलवायला आली, आणि तिच्याजवळ दादाबद्दल बोलत बोलतच मी तिच्या घरीं जाऊन खेळांत गुंतलें. चार वाजण्याच्या सुमारास परत आलें तरी दादाहि नाहीं आणि आजोबाहि नाहींत. आई व आजी दोघी मात्र एकमेकीजवळ बसल्या आहेत आणि कांहीं बोलत आहेत असें दिसलें. आईचा चेहरा या वेळीं फारच निस्तेज झाला होता आणि मला असें वाटलें कीं, त्या कृष्णाजी-पंतांच्या पत्रांत कांहींना कांहींतरी विलक्षण मजकूर होता, तो वाचून तिला कांहींतरी जास्त काळजी उत्पन्न झाली असावी. ती काय असावी आणि काय नाहीं याचा विचार करण्याची माझी स्थितीच नव्हती, आणि मला वाटतें, त्या वेळच्या माझ्या वयाचीं मुलें तसला विचार करण्यास योग्यहि नाहींत; परंतु एका पाठीमागून एक अशा विलक्षण गोष्टी घडत असल्यामुळें मी त्या तेवढ्या वयांत जितकी विचारी झालें तितकी, त्यापूर्वी तर नांवच नको, पण पुढेंहि झालें नसेन. मी आपलें चरित्र लिहिण्यास जेथून प्रारंभ केला आहे तेथून सहा महिन्यांत आजपर्यंत सांगितलेले सर्व प्रकार घडले. ते कोणाहि माझ्या वयाच्या मुलीस विचारी करण्यास समर्थ होते. मग मी तर काय थोडीशी फाजील चौकसच होतें. माझें विचारूंच नका. असें सर्व होतें तरी माझा स्वभाव कसा बदलेल ? बोलूनचालून लहान वयाची; तेव्हां झाल्या विचाराचें अगर दुःखाचें थोडयाबहुत अवकाशानें विस्मरण हें व्हायचेंच; अर्थात् इतर मुलांपेक्षां उशीरानें, पण झाल्याखेरीज राहायचें नाहीं.

अगदीं संध्याकाळची वेळ झाली, दादा नाहीं; आजोबा नाहींत; काळोख पडला; कोणाचा ठिकाण नाहीं. कोणी कोणी शेजारची मंडळी मधून मधून समाचार घेण्यास

येत, आणि जात. चांगले रात्रीचे नऊ वाजले, कोणीं आलें नाहीं, आईचें अगदीं अवसान गेलेंसें दिसलें. सुंदरीनें रडून रडून कल्लोळ मांडला. आई साऱ्या दिवसांत जेवली नव्हती, तिच्यामुळें आजीहि उपाशीच होती. आजोबा केव्हां केव्हां शेजारपाजारच्या गांवीं जाऊन दोन दोन दिवस राहात. यामुळें आजीला घरांत एकटे निजण्याची वगैरे संवय होती; व गेल्या दोन महिन्यांत मी तेथें असतांनाहि असे एक दोन प्रसंग आले; परंतु आज मला सारें घर जास्तच भयाण दिसूं लागलें. इकडे तिकडे करून मीं आपली मुकाट्यानें सुंदरीला निजविलें होतें तिथें जाऊन तिच्याजवळ निजलें; ती किती बेतानें पण! हो, नाहीं तर ती पोरटी उठून भोंकाड पसरायची!

इकडे तिकडे विचार करतां करतां मला तर झोप लागली. पुढें सकाळपर्यंत मी जागी होतें आहें कशाला? जागी होऊन पाहतें तों आसपास कोणीच नाहीं, आई मात्र कण्हत पडली आहे. आई कण्हते आहे हें पाहण्याबरोबर माझ्या मनाला काय काय वाटलें असेल तें पाहा. मी निजलें तेव्हां आई चांगली होती, आणखी सकाळीं जागी होऊन पाहतें तों आई बऱ्याच मोठ्यानें कण्हते आहे. "आईअ, दादा आला काग? तूं का कण्हते आहेस?" हे प्रश्न विचारीत विचारीतच मीं तिच्याजवळ गेलें व तिच्या अंगावर हात ठेवला तों माझा हात भाजला म्हणण्यास हरकत नाहीं. इतका तिच्या अंगांत ताप! अंग कसें धग्‌धग् करीत होतें. हा ताप बहुशः रात्री भरला असावा हें उघडच आहे. "आई, काय ग ताप हा! केव्हां आला? दादा आला का? आजोबा कुठें आहेत." वगैरे अनेक प्रश्न मीं तिला विचारले; परंतु मी असली वेडी—ती बिचारी आपल्या घोरांत! एकसारखी कण्हते आहे आणि तळमळते आहे. अन् तशांत असल्या चौकशा कराव्या कशाला? त्यांतून 'दादा आला का?' ही चौकशी करण्याचें कांहींतरी कारण? आला असता तर आईच्या उशापायथ्याशीं कोठेंतरी दिसताना? तापाच्या गुंगींत ती विसरून गेली असली, तर उलट तिला आठवण देऊन तिचें दुःख जागृत करण्यापलीकडे माझ्या त्या प्रश्नाचा कांहींदेखील उपयोग झाला नसेल! तिनें मला उत्तर दिलें नाहीं हें उघड आहे. तिच्याजवळ बराच वेळ बसून मग मी आंत गेलें, तों तेथें आजी एकीकडे रडत व एकीकडे सुंदरीला भरवीत होती. मीं आईला केलेले प्रश्न पुनः तिला केले, तेव्हां तिनें म्हटलें, "कोणी आलं नाहींन् गेलं नाहीं, आतां करूं तरी काय? पाठवूं तरी कोणाला शोध करायला? आणखी ती तापानं एकसारखी कण्हते आहे. ही कारटी तर क्षणभर तिच्यावांचून राहात नाहीं, अन् तुला सारा दिवस धिंगाणा घालण्याखेरीज कांहीं दिसतच नाहीं. का अंमळ बसशील, का पोरीला घेशील—का कांहीं काम करायला लागशील! छे, रामाचं नांव! आत्तां उठलीस निजून. आतां याच्यापुढें—चल. जा. बसली तिथं फत्‌कल घालून!" तिनें असें म्हणतांच मी तेथून चालती झालें. सध्यांचा वेळ कांहीं लाडाचा नव्हता हें मी जाणून होतें; तेव्हां दादाचें आणि आजोबांचें झालें तरी काय? याच्याबद्दल विचार करीत मी माजघरांतून परसाच्या बाजूस चाललें होतें, तों मध्येंच पायांच्या जवळ मला कसलासा पांढरा कागद दिसला. हा पांढरा

कागद जर मीं त्या वेळीं पायानें दडपला नसता तर मीं तिकडे लक्षदेखील दिलें नसतें; कारण असे पांढरे कागद घरांत पडलेले काय थोडे दिसतात ! परंतु हा कागद जाडसा पायाला लागला म्हणून मीं तो उचलून हातीं घेतला. पाहतें तों त्या गड्यानें आईजवळ दिलेला आमच्या कृष्णाजीपंतांचा लखोटा ! तो फोडून कोणींतरी वाचलेला, परंतु तोच तो लखोटा ध्यानांत येण्याबरोबर मी एवढीशी मुलगी पण माझ्या मनांत किती विचार आले ? आधीं माझ्या चौकस स्वभावामुळें त्या लखोटयांत आहे काय, हें जाणण्याची इच्छा झाली हें कोणास सांगण्याची जरूरच नाहीं; परंतु वाचायला येण्याच्या नांवानें ओचं ठो म्हटलं तरी चालेल. आईनें आपल्याकडून मेहनत घेऊन मला थोडंसं ल्याहाय-वाचायला शिकवलं होतं; पण तें लिहिणं बाराखडयांच्या पलीकडे अजून गेलं नव्हतं. आणखी वाचणं जोडाक्षरांच्या अगर अनुस्वारांच्या तिथंच थांबून राहिलं होतं. आईला वाचतां चांगलंच येत होतं, लिहितां बरीक चांगलं येत नव्हतं. कारण तिला कधीं लिहिण्याचा सराव नव्हता. कधीं एखाद वेळीं ती माहेरीं पत्रें पाठवी अन् पुढें तर दादाकडूनच लिहवी. वाचण्याचा मात्र तिनें पुष्कळ सराव केला होता. पांडवप्रताप, भक्तिविजय, वगैरे ग्रंथ तिनें नेहमीं दुपारीं वाचीत बसावें; शिवलीलामृत तर तिला अगदीं पाठ येत असे; तिला वाचतां येतें हें आम्ही मुलें, बाबा व बाबांचे स्नेही कृष्णाजीपंत यांखेरीज कोणालादेखील ठाऊक नव्हतें. कृष्णाजीपंतालादेखील ठाऊक असण्याचें कारण ती स्वतः त्यांचेजवळ बोले, कांहीं आणण्यासंवरण्याचें असलें तर त्यांच्याकडून आणवी, यामुळें थोडेंबहुत भावासारखेंच यांचें नातें झाल्यासारखें झालें होतें. बाकी कोणापाशीं ती कधीं बोलत नसे. शेजारींपाजारी कधीं विनाकारण जायची नाहीं. यामुळें दुपारीं कामधंदा झाला कीं, तिनें आपलें नेहमीं वाचीत बसावें अगर शिवीत बसावें; पण याविषयीं लवकरच आतां विस्तारानें लिहिण्याची पाळी येणार आहे, तेव्हां आतां त्या लखोटयाकडेच वळावें हें बरें. वाचायला येत नसल्यामुळें अर्थात् मीं तो आईजवळ नेऊन द्यायचा; कारण, ' आजीला कळवूंदेखील नको त्या लखोटयाची गोष्ट. ' अशी आईची ताकीद होती, ती मीं विसरलें नव्हतें. परंतु क्षणभर माझ्या मनांत असा विचार आला कीं, तो आपल्याजवळच ठेवून आपल्याला लागला तर पाहावा, न लागला तर दुसऱ्या कोणाजवळ नेऊन वाचून पाहावा. पहिला विचार तर मीं अंमलांत आणलाच. परसांत जाऊन तो लखोटयांतला कागद काढून पाहिला, पण तो फारच चमत्कारिक लिहिलेला होता, अर्थात् मला वाचतां येईचना. इकडे तिकडे पुष्कळ पाहिलें पण काय उपयोग ? मला असं वाटतं कीं, दादा असता तर तेव्हांच वाचता. त्यालादेखील अजून मोडी चांगलें वाचतां येत नव्हतें. पण पत्र होतें बाळबोधींत. तेव्हां त्याला तें वाचायला मुळींच अवघड गेलें नसतें; पण आतां उपयोग काय ! मीं तो कागद पुष्कळ उलथापालथा केला; पण उपयोग काय ? चार कीं पांच शब्दांखेरीज मला मुळींच कोठें कांहीं लागलें नाहीं. त्या चारपांच शब्दांपैकीं तीनच शब्द मला आतां चांगले आठवताहेत व तेव्हां मीं ते शब्द वाचले, पण तेव्हां मला त्यांचा अर्थ समजला नव्हता.

हें ध्यानांत राहण्याचें कांहींच कारण नव्हतें; परंतु पुढें तेच शब्द पुष्कळ येऊन त्यांचें महत्त्व काय तें समजलें, यामुळें हे शब्द आपण त्या पत्रांत वाचले ६. आठवूं लागलें. ते शब्द हेच-' नाकबूल ' ' जामीन ' हे दोन आणखी '५०००' हे आ. इतके काय ते होते. मीं आतां वर सांगितलेंच आहे कीं, ह्या शब्दांचें महत्त्व मला मुळींदेखील कळलें नाहीं. ह्या पत्रांत कांहींतरी गुपित आहे, आणखी तें कोणाला दाखवितां कामा नये, हें मात्र आईच्या आदले दिवसाच्या दाबण्यावरून ध्यानांत होतें; तेव्हां त्याचें करावें काय हा विचार साहजिकच आला. मीं त्याचा निकाल दादा येईपर्यंत आपलेजवळ ठेवून मग त्याला दाखवावें, असा केला.

◆ ◆ ◆

## १२ : हा काय आणखी अनर्थ !

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

त्या कागदाबद्दल अशा तऱ्हेचा निश्चय झाल्यानंतर मीं तो लपवून कोठें ठेवावा या विचारांत थोडासा वेळ घालविला, इतक्यांत जो विचार माझ्या मनांत केव्हांच यायला पाहिजे होता, तो विचार माझ्या मनांत एकदम आला. हा कागद काल गड्यानें आईला आणून दिलेला तो होय. हे लक्षांत येण्याबरोबर तो आईजवळ नेऊन देणें हें अगदीं रास्त होतें. तें मीं केलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर तो उघडून मीं वाचला; आतां मला मजकूर मुळींच समजला नाहीं हा भाग अगदीं निराळा ! परंतु तें आपल्या आईला बरें वाटणार नाहीं असें कांहींतरी आपण केलें खास, हें मनाला वाटूं लागलें.

मनुष्याचें मन वाईटाकडे जितकें लवकर वळतें, तितकें तें चांगल्या गोष्टीकडे वळत नाहीं. सुविचार आणि कुविचार या दोहोंची लढाई मनांत जुंपली, म्हणजे शेंकडा ऐशीं ठिकाणीं कुविचारमहाराजांचीच फत्ते होते, असें अनुभविक लोकांचें म्हणणें आहे. मीं कांहीं अध्यात्मज्ञान संपादन केलेलें नाहीं; तेव्हां मला त्याच्याबद्दल विवेचन करतांच येत नाहीं, आणि करण्याची इच्छाहि नाहीं. मला माझें चरित्र कांहीं हेतूनें लिहावयाचें आहे; माझ्या पश्चात् तें प्रसिद्ध होऊन त्यापासून कोणाला कांहीं आमच्या दीन स्थितीबद्दल कींव वाटूं लागली तर माझी इच्छा अगदीं परिपूर्ण होईल. हें चरित्र अर्धेच न पडतां आजतागाईत अगदीं पुरें व्हावें हीच त्या दीनदयाळ परमेश्वराच्या जवळ हात जोडून प्रार्थना आहे. तो पुरवील तरच होणार आहे.

माझें मन तरी निदान त्या वेळेस सुविचाराकडे वळलें नाहीं. आईच्या जवळ हें पत्र आतां पुनः नेलें असतां ती आपणावर रागावेल असें एक वाटलें, आणि शेवटीं असेंहि वाटलें कीं, तिला हें पत्र पाहिल्यानें वाईट वाटेल. कांहीं असो, तें पत्र मीं

दाखवितां लपवून ठेवलें खरें; नंतर सकाळचे विधि काय करायचे ते करून ..र्न सुंदरीकरितां केलेल्या भातांतच माझ्यासाठीं भात टाकला होता तो चटकन् ..ून मग आईकडे आलें आजी आधींच तेथें येऊन बसली होती, व सुंदरीस थोपटून मारून मुटकून निजविण्याच्या विचारांत होती मला पाहिल्याबरोबर तिनें " धर ग हिला; अन् जा बाहेर खेळ इकडेतिकडे-" असें म्हटलें. ही वेळ फाजीलपणा करण्याची नव्हे हें जाणून म्हणा, किंवा कसें ह म्हणा, परंतु मी तिला कडेवर घेऊन बाहेर चालती झालें आतां दादाचा, आजोबांचा किंवा कागदाचा सर्व विचार पार निघून जाऊन खेळावें काय आणि कोठें हाच काय तो विचार ! कोणा शेजाऱ्यापाजाऱ्यानें अगर जाणाऱ्यायेणाऱ्यानें जर विचारलेंच की, 'तुझा भाऊ किंवा तुमचा मुलगा सांपडला का म्हणून,' तर तेवढयापुरती आठवण व्हायची.

आमच्या शेजारीं एक बिऱ्हाड असे. त्यांच्या इथे एक मुलगी असे. तिचे नांव यापूर्वी एकदा दोनदा आलेलें वाचकांच्या लक्षांत असेलच. ही कुशी मुलगी माझ्या बरोबरीचीच होती. तिचें माझें चांगलें मेनकूट जमे, कारण दोघींचे स्वभाव सारखवटच होते. आधीं खेळणें म्हटलें कीं, माझ्याप्रमाणेंच तिचा पहिला पाय असे; आणि शिवाय माझ्याप्रमाणेंच तिला आपल्यापेक्षां लहान म्हणजे सुंदरीएवढाल्या मुलींचा कंटाळा; आणखी एक तिसरें कारण असें की, ती मी म्हणेन तसें ऐके ! इतकीं सगळी कारणें एके ठिकाणीं जुळल्यावर मग काय विचारतां ? मी आपली उठल्यासुटल्या तिच्या घरची वाट धरायची ! त्याप्रमाणें आतांहि धरली.

तिच्या घरीं जातें तों तेथे आणखी दोन नव्या मुली आणि एक सरासरी दहा अकरा वर्षांचा मुलगा माझ्या नजरेस पडला कुशी व तीं तिघें खेळण्यांत दंग झालीं होतीं. मीं तेथें जाण्याबरोबर ती मुलें माझ्याकडे अशी टेहळून पाहूं लागलीं. त्यातून तो मुलगा आपल्या बटबटीत डोळ्यांनीं मजकडे पाहूं लागला; तें पाहून मला फारच चमत्कारिक वाटलें; इतकेंच नव्हे—तर मला तो आवडेनासाच झाला; परंतु त्या वयांतली आवडनिवड ती काय ? क्षणांत आम्ही सगळींजणें खेळूं लागलों.

तीं मुलें कुशीचीं आतेभावंडें होतीं. मुलगा किती वर्षांचा होता हें मीं वर सांगितलेंच. एक मुलगी तिचें नांव बनी, सुमारें तेरा वर्षांची होती. दुसरी सात आठ वर्षांची होती. बनीचें लग्न नुकतेंच झालें होतें असें मला कळलें. ही सर्व मंडळी पुण्यास राहणारी होती. इतकीच काय ती त्यांच्याबद्दल त्या वेळीं मला माहिती लागली. असो.

आमची ओळखदेख होऊन खेळायला सुरुवात झाल्यानंतर ती धाकटी मुलगी मध्येंच म्हणाली, " कुशे, आपण नवराबायकोचा खेळ खेळूं ग ! " तेव्हां तो बटबटीत डोळ्यांचा मुलगा—त्याचें नांव धोंडू होतें—अगदीं आनंदून म्हणाला, " हो, हो ! तोच खेळ चांगला; मी मुलगा आहें तेव्हां मी नवरा आहेच. आतां माझी बायको कोण होणार ? साळे, ( हें त्या लहान मुलीचें नांव ) तूं " इतक्यांत तो पुढें काय बोलणार तें

आधींच जाणून त्याची वडील बहीण डोळे वटारून म्हणाली, " धोंड्या, हें रे काय गाढवा, ती तुझी बहीण आणखी तिला बायको करतोस का ? "

हे शब्द ऐकल्याबरोबर मातीचें ढेकूळ पाण्यांत विरघळतें तशी त्याची स्थिति झाली; परंतु तितक्यांत तो म्हणतो कसा – " नाहीं ग ताई, मी तिला म्हणत होतों, कीं तूं हा खेळ खेळायचा असं म्हटलंस, तर मी नवरा आहे पण मला बायको देशील कीं नाहीं शोधून ? " हे शब्द बोलतांना तो अशी कांहीं दृष्टि करून मजकडे पाहात होता कीं, मला त्याच्या एक मुस्कटांतच द्यावीशी वाटली आतां ही बायको होण्याची पाळी मजवर येणार असे मला तेव्हांच वाटलें, कारण कुशी त्याची मामेबहीण, आणि साळी न् बनी तर सख्ख्याच बहिणी ! त्याबरोबर मी कपाळाला आंठ्या घातल्या आणि म्हटलें, " कुशे, मी नाहीं ग बाई असला चावटपणाचा खेळ खेळायला येणार ! चांगले आपले साधे खेळ खेळायचे असले तर मी राहतें इथं, नाहींतर मी आपली जातें कशी आपल्या घरीं ! इश्श ! हे कसले मेले चावटपणाचे खेळ अन् हा नवरा ! " हें माझें झणकाऱ्याचें बोलणें पुरतें झालेंदेखील नाहीं, तोंच बनी नाकाला विंचू डसल्यासारखी तटकन् माझ्याजवळ आली, अन् म्हणते, " अहाहाहा ! मोठी आली चांगले खेळ खेळणारी ! आता तुला नवरी व्हायचंच नसेल अगदीं ! जन्मभर अशीच राहणार आहेस' मोठी आली दिमाख दाखवायला ! अन् म्हणे ' हा नवरा ! ' ' हा नवरा ! ' काय ग झालंय या नवऱ्याला ! सात जन्म तपश्चर्या केली पाहिजे हा असला नवरा खेळांतदेखील मिळायला, समजलीस ! " हे शब्द बोलतांना तिचा चेहरा रागानें असा कांहीं झाला होता कीं, मीं म्हटलें आतां ही मला डसणार ! तो अगदीं थापट नाकाच्या चेहऱ्याचा कुत्रा असतो की नाहीं – काय त्याला बुलडॉग की काय म्हणतात,– त्याची हुबेहूब प्रतिमा होती आणि त्यांत तो फणकारा, मग काय विचारतां ! ते त्या बंधुराजांच्या डोळ्यांपेक्षांहि बटबटीत डोळे, मला तर वाटलें मजवर वटारतां वटारतां आतां माझ्या अंगावर बंदुकीच्या गोळ्यासारखे येऊन लागणार ! तिच्या भावाला, " अन् हा नवरा " म्हटल्याबद्दल तिला काय तो झटका आला ! अन् मला तर खरोखरच त्या पोराला पाहिल्याबरोबरच तो आवडेनासा झाला, हें मीं वर सांगितलेंच आहे.. तिची ती रागाची बडबड संपलो न संपली तोंच ती आपल्या भाऊरायाकडे वळली, आणि त्याच्या तोंडावरून हात फिरवून म्हणाली, " धोंडू, पायपोस गेला, नाहीं ही तुझी बायको झाली तर ! असल्या छप्पन्न हजार शूर्पणखा तुझ्या पायाशीं लोळतील ! काय मेली सुभद्रा लागून गेली आहे ! मोठ्या दिमाखानें म्हणते, ' अन् हा नवरा ! ' पाहीनना आतां कसला मदनाचा पुतळा मिळतो आहे तो ! " असा एकसारखा तिच्या तोंडाचा पट्टा सुरू होता. तेव्हां मध्येंच त्यांचे बंधुराज म्हणतात, ' अग ताई, ही असली हिडीस बायको पाहिजे आहे कोणाला ? आपलं म्हटलं घटकाभर खेळायचं तर विड्या तोडाव्या, घास द्यावे अन् मौज करावी झालं ! " इतक्यांत कुशीबाईनाहि पुळका आला आपल्या आतेभावाचा, अन् ती लागलीच ठमकाऱ्यानें म्हणते, " अग बनूताई, तिचा दादा काय तो अगदीं

चांगला हो ! –" इतकें जों ती बोलते आहे तोंच तिकडे घरकुलाजवळ कायसें धब्बकन् वाजलें, आणि आम्ही सारीच काय म्हणून तिकडे पाहतों तों सुंदरीनें जाऊन उतरंडी पाडली. तीं उतरंडी होती मातीची. तीं पांचीच्या पांची मडकीं फुटलीं, मी झटकन् पुढें जाऊन आतां सुंदरीला उचलणार तोंच त्या बनूताईहि तिकडून तावातावानें आल्या; मी वांकायला अन् ती वांकायला एकच गांठ पडली; मी वांकत होतें सुंदरीला उचलण्यासाठीं, ती वांकत होती तिला एक रट्टा देण्यासाठीं; दोघी दोहींकडून एकदम वांकण्याबरोबर माझें व तिचें डोकें एकमेकींवर आदळलें; मग काय विचारतां ! तिनें जो एक रट्टा सुंदरीच्या पाठीत दिला, त्यासरशीं ती पोरगी तर अगदी कळवळली; तें लक्षांतदेखील न आणतां ती आपल्या डोक्याला लागल्याबद्दलच कांगावा करूं लागली! आणि एकसारखी " अवदसा, वेसवा," अशा नाहीं नाहीं त्या शिव्या देऊं लागली. खरोखर सांगतें त्या दिवसापर्यंत मीं तसल्या त्या शिव्या कोणाच्या तोंडून ऐकल्या नव्हत्या ! तिच्यापुढें आपल्याला बोलण्याचा कांहीं धीर होईना. सुंदरीनें तर रडून रडून आकांत केलान्; माझ्या डोळ्याला तर टचकन् पाणी आलें, कुशीच्या आईला जाऊन गाऱ्हाणें सांगावें असें माझ्या मनांत आले; पण तें देखील मी न करतां आपली सूं पळालें. छे, छे. छे, बाई ! अशी मुलगी मीं कुठें पाहिली नव्हती.

मीं घरीं आलें, ती थेट आईजवळ गेलें; आईचें कण्हणें आतां कांही कमी झालें होतें; सुंदरीला जवळ नेण्याबरोबर "ही इतकी कां रडतें ?" असें आईने विचारलें; त्याला उत्तर कांहीं मला सुचेना; कांहींतरी टाळाटाळी करून मीं वेळ मारून नेली. आईनें तिला प्यावयास घेतलें आणि उगी केलें; परंतु एकंदर मीं पाहिलें, तिचा चेहरा अतिशय फिक्कट पडला होता. ताप आतां कांहीं कमी झाला होता; आजी जवळ नव्हती, आपली अंग धुण्याच्या गडबडींत होती; अंग धुऊन ती ओलेत्यानेंच आंत आली, आणि दांडीवरचें सोंवळें लुगडें ओढीत मला म्हणाली, " यमे पोरी, तूं सांगितलंस तसं गणू तुझ्याजवळ बोलला होता खरा का ? कां आपलं कांहींतरी सांगितलंस ! मला बाई, आतां वाटायला लागलं आहे कीं, मीं ते दिवशीं त्याला चापटी मारली म्हणून तो गेला नसेल ना ? " हे आजीचे शब्द ऐकल्यामुळें म्हणा, किंवा दुसऱ्या कारणानें म्हणा, पण आईच्या डोळ्यांतून अश्रु पडलेले मला दिसले. प्रथम तिचें तोंड वळलेलें असल्यामुळें आजी आलेली तिला दिसली नाहीं; परंतु तिचें बोलणें ऐकण्याबरोबर ती उठून बसली. वास्तविक तिला उठून बसण्याइतकी कांहीं त्या वेळीं शक्ति नव्हती; परंतु सासू जवळ आल्यानंतर कोणती मर्यादशील सून होतां होईल तो उठून तिला मान दिल्याखेरीज राहील ? त्यांतून आमच्या आईसारखी सून आणि आजीसारखी सासू ! आजीनें आपल्या पणामध्यें असतांना आमच्या आईला फार जाच केला; परंतु तितकाहि जाच सोसून शेवटीं त्याच सासूकडून आमच्या आईने वाहवा मिळवून घेतली व कित्येक वेळां तर आपल्या लेकाला 'अशी बायको मिळाली असून तो असा काय वागतो ?' असें, व 'आपण लहानपणीं हिला विनाकारण त्रास दिला,' असेहि उद्गार एकदोन वेळां तिच्या तोंडून निघालेले

मला आठवतात. असो. आम्ही जन्मण्याच्या पूर्वी आजीनें आमच्या आईला कशीहि जरी वागविली असली तरी आतां आम्हांला समजूं लागल्यापासून पाहिलें तों तिनें माझ्या आईला अगदीं लेकीप्रमाणें केलें. आईला ती एवढेंदेखील कमी करीत नसे. आतां कधीं ती तिला घालून पाडून बोलली नाहीं. आधीं आईची वागणूकच दुसऱ्याचा शब्द घेण्याजोगी कधीं नसे. अन् एकेकाचा कांहीं गुण असतो कीं, त्याला कोणी कधीं वाईट म्हणून म्हणायचेंच नाहीं. आजोबा आमचे कसे होते, हें आतां वाचकांना चांगलेंच ठाऊक झालें असावें; परंतु त्यांचा माझ्या आईवर किती जीव असेल, हें मीं मागें सांगितलेंच आहे. असो.

आजीचा तो प्रश्न ऐकून मी तिला, "नाहीं ग, माझ्याजवळ तो खरोखरच तसें बोलला होता," असें उत्तर देणार तों आजी लुगडें ओढून देवघरांत गेलीदेखील, मी मग तिच्या पाठोपाठ गेलें नाहीं. आई पुनः अंथरुणावर पडली, तिच्याजवळच बसलें.

सुमारें दहाचा सुमार झाला असेल, कदाचित् साडेदहादेखील वाजून गेले असतील. मला अगदीं कंटाळा आला. 'आतां करावें तरी काय' या विचारांत मी होतें. तोंच बाहेर आजोबांचा शब्द ऐकलासा मला भास झाला. त्याबरोबर मी मोठ्यानें "आई, आजोबा आले पण दादाचं बोलणं नाही कुठें ऐकूं येत !" असं ओरडलें. मी असें ओरडलें मात्र, तों आईनें "आं ?" असें मोठ्यानें केलें व ती एकाएकी डोळे फिरवूं लागली. मला अतिशय भय वाटलें. "आजी आजी, ही आई पाहा कसं करते आहे ती ?" अशी खूपच मोठ्यानें मी किंकाळी मारली. नुकताच सुंदरीचा डोळा लागला होता. ती एकदम त्यामुळें दचकून मोठमोठ्यानें रडूं लागली. एकच गोंधळ उडाला. तो "आं? आहे तरी काय ?" असें ओरडत आंतून आजी व बाहेरून आजोबा मोठ्यानें ओरडत आलीं ! त्यांच्या मागोमाग दादाहि आलाच. तो जर अशा विलक्षण प्रसंगीं न येतां आदले दिवशीं अगर सकाळींच आला असता तर मीं आनंदानें त्याला तत्काळ मिठी मारली असती. पण ही वेळ कांहीं भयंकर होती. "ती आई पाहा कसं करते आहे" असें मी ओरडतें व ही मंडळी धावून येते तों आईचें तोंड कसेंसेंच दिसूं लागलें.

"हा काय आणखी अनर्थ !" असें म्हणून आजी जवळ जाऊन पाहते तों आई अगदीं बेशुद्ध ! इतकीदेखील चळवळ नाहीं. दांतखिळी बसलेली ! डोळे मिटलेले ! हातपाय अगदीं ताठलेले ! पदर अस्ताव्यस्त झालेला !—प्रेतकळा म्हणजे काय ती मला त्या वेळीं कांहीं माहिती नव्हती, परंतु तसा सर्व प्रकार झाला होता. आजीनें डोळ्यांला पाणी लावलें. आजोबा मात्रेकरितां ओरडूं लागले. दादा नुसता तिच्याकडे पाहात तटस्थ उभा राहिला. मला वाटतें, त्याला कांहीं सुचेनासें होऊन गेलें असावें. त्याच्या डोळ्यांवाटें अश्रु मात्र गळत होते. मी तर अतिशयच गोंधळून गेलें होतें. रडूं कोसळून डोळ्यांवाटें एकसारख्या धारा चालल्या होत्या. त्यांतल्या त्यांत काय चमत्कार असेल तो असो, ती पोरगी सुंदरी इतका वेळ ओरडून अगदीं कल्लोळ करीत

होती, पण आतां अगदीं चिट् का मिट् ! अशा प्रसंगीं मला वाटतें, देवच लेकरांना चांगली बुद्धि देतो. आजीनें धावत जाऊन आपला झोळगा आणला. मी बसलें होतें तिथें येऊन मला एक चापट मारून "पोरी, सहाण आण जा आधीं," असें सांगितलें. माझ्या आधींच दादानें धाव मारून सहाण आणली. आतां आजी काय करणार, हें कांहीं समजेना. तिनें एक सुंठीचें कुडें झट्कन् काढून खसाखसा चार वेढे उगाळले आणि चट्कन् आईचा एक डोळा उघडून त्यांत तें अंजन घातलें. त्याबरोबर जसें एखादें माणूस झोपेंत मोठयानें ओरडतें तशी फारच विलक्षण किंकाळी आईनें मारली; आणि "आला का तो ? का नाहीं ! गेला का मला टाकून ?" असे शब्द कांहीं चमत्कारिक तऱ्हेनें तिनें उच्चारले. ते ऐकण्याबरोबर माझ्यानें अगदीं राहवेना ! मी एकदम "दादा, ये रे" असें म्हणून आईच्या गळ्याला मिठी मारून मोठयानें रडूं लागलें; दादाहि आपले डोळे पुशीत आईजवळ येऊन तिच्या अंगावर पडला. तरी आईचें, "नाहीं का आला ? नाहींच का तुम्हांला सांपडला ? कोणी भिकबाळीसाठीं त्याचा प्राण नाहींना घेतला ? अयाई ग !" असें म्हणून ती केवढयानें रडूं लागली ! मीं लागलीच, "अग आई, हा बघ दादा, तुझ्या अंगावर पडून रडतो आहे हा. आई, असं ग काय करतेस ?" असें मोठयानें म्हटलें तरी तिचें आपलें तेंच. आजीनें इतक्यांत मात्रा उगाळून तिला चाटविली. आजोबांनीं तिच्या डोळयांला पाणीबिणी लावलें; पण ती कांहीं शुद्धीवर येईना. तिच्या अंगांत अधिक अधिक ताप भरला; तिची बडबड जास्तच चालू झाली. शेवटीं सकाळच्यापेक्षां दुप्पट ताप भरला. बडबड फारच वाढली. आजोबांनीं "सुंदरीला घेऊन बाहेर जा" असें म्हणून आम्हां दोघांना बाहेर घालवून दिलें; तरी मी थोड्या वेळानें एकदा आंत डोकावून आलेंच. तापाची गुंगी आली म्हणून म्हणा कीं दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा, पण त्या वेळीं आईची बडबड अगदीं कमी होऊन तिचा डोळा लागलासें दिसलें.

घरांत जिकडे तिकडे अगदीं उदासीनता दिसूं लागली. कोणी एकमेकांशीं मोठयानें बोलेनादेखील. आधीं मुळीं इनमिन साडेतीन माणसें ! त्यांत आजोबांचें व आजीचें मोटें सूत ! तेव्हां बोलणारी मंडळी तरी कोण राहिली ? येऊन जाऊन मी आणखी दादा आम्हांला दोघांना आजोबांनीं बाहेर घालवून दिलें. माझ्या कडेवर अर्थातच सुंदरी होती. आई निजली होती तिथून थोडया अंतरावर जातें तोच दादा माझ्या कानांत बोलल्याइतकें हलकेंच म्हणतो, "यमे, आईला ताप केव्हां ग आला ?" तो त्याचा प्रश्न ऐकून मीं त्यास काय बरे उत्तर दिलें असेल ? मीं त्याला चटकन् म्हटलें, "महाराज, हे आपलेच प्रताप; समजलांत ? आपण गेलांत आणखी त्याच रात्रीं तिला ताप भरला. (वास्तविक अशी गोष्ट नव्हती, परंतु मीं दिलें थोडेंसें अधिक करून !) फार चांगलं ! अन् मला म्हणत होतास ना ते दिवशीं कीं, यमे तूं आईला फार छळतेस म्हणून ? बाबा रे माझा छळ बरा, पण हा असला —" मी कांहीं पुढें बोलणार तोंच त्याच्या चेहऱ्याकडे माझी नजर गेली व पाहतें तों त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचे पूर लोटण्याच्या बेतांत होते. त्यानें

पट्कन् माझ्या खांद्यावर हात टाकला व तो मला म्हणाला, "काय करूं ग! मी करायला गेलों एक आणखी झालं दुसरंच!" हें तो बोलतों आहे तोंच माझी दृष्टि त्याच्या कानांकडे गेली व मीं त्यास झट्कन् विचारलें, "दादा, दादा, अरे तुझी भिकबाळी रे काय झाली?"

जणूं काय दादाला पुरता रडविण्यास एवढ्याच प्रश्नाची जरूर होती. तो प्रश्न ऐकण्याबरोबर त्याच्या डोळ्यांतून घळघळां पाणी आलें, त्याच्या तोंडून शब्द निघेना. इतक्यांत माझ्याजवळ सुंदरी होती, ती माझ्या खांद्यावर मान टाकून निजलीशी मला वाटली; अर्थातच मी आत जाऊन हिला निजवून येतें असें म्हणून आंत गेलें. मला वाटतें, मी त्या वेळीं आंत गेलें हेंच बरें झालें; कारण तेवढ्यानें दादाचें अस्वस्थ झालेलें अंतःकरण अगदीं शांत होण्यास वेळ मिळाला; परंतु दादाची हकीकत ऐकण्यासाठीं मी अगदीं उतावळी झाल्यामुळें आंत गेलें ती अगदीं धावत गेलें.

सुंदरीची झोप म्हणजे अगदीं कावळ्यासारखी! त्यांत ती नुकनीच निजून उठलेली. ती झाली तट्कन् जागी, अन् लागली क्यां क्यां करून रडायला! आंत आजोबा नुकतेच स्नान करून येत होते. तो सूर ऐकून व मला पाहून ते जे माझ्या अंगावर वस्कन् आले तें कांहीं पुसूंच नका. "द्वाड कारटी शिंची, नुसती त्या पोरीला घेऊन अंगणांत खेळव म्हटलं तर रडवते आहे तिथे! आपली आई आजारीबिजारी, वाटतं आहे का कांहीं मनाला! नाहीं तर तो पाहा पोरगा, आईला काळजी लागली म्हणून रात्रीं अपरात्रीं निघून गेला—चल निघ इथून, नाहींतर मारतो एक—"

'मारतों' हा शब्द ऐकण्याबरोबर मी तिथें उभी राहतें आहें कशाला? पावलें परत फिरवून अंगणाकडे धाव मारली. इतक्यांत आजोबांनीं दादाला मोठ्यानें हांक मारली. अर्थातच त्याला आंत जावें लागलें. मी बसलें तशीच हाका मारीत!

काय असेल तें असो, आतां माझ्यानें राहवतच नाहीं म्हणून मी येथेंच आतां मनांत आलेले विचार लिहितें. माझ्या मनांत आलेली गोष्ट अन् त्या वेळीं घडून मनाप्रमाणें झाली आहे, असें मला अगदीं लहानपणापासून तों आजपर्यंत कधींहि आठवत नाहीं. मोठाल्या गोष्टीचें तर नांवच नको. अगदीं यःकश्चित् गोष्ट, पण तीदेखील अगदीं मनांत आली, अन् लागलीच घडली असें कांहीं झालें नाहीं. कांहीं ना कांहीतरी त्यांत आपल्या अडचणी यायच्याच. एकेकाचा तो आपला जन्मकाळचाच-गुण असतो, कीं तो कोणतीहि गोष्ट आरंभूं द्या, आधीं त्याला त्यांत यश यायचें नाहीं, आणि यदाकदाचित् आलेंच, तर पहिल्या सपाटयास मुळींच नाहीं. मग हातीं घेतलेलें काम कितीहि हलकें अगर सहज होण्याजोगें असेना! आजी नेहमीं म्हणेच कीं, 'या पोरीच्या हातावर गहूं नाहीं; हिला कांहीं कोणत्या गोष्टींत यश यायचं नाहीं.' अन् तें तिचें म्हणणें माझ्या पुढें पुढें अगदीं मनावर पक्कें ठसलें होतें. तशीच दुसरी एक गोष्ट अशी असते कीं, कित्येकांचा जन्मकाळचा गुण असा असतो, तो कितीहि चांगल्या हेतूनें कांहीं करायला जाऊं द्या,

त्याला कोणी बरं म्हणायचं नाही. मुळीं ती गोष्ट करण्यांत त्याचा हेतु चांगला होता असेंच कोणाला वाटायचं नाहीं. याहि वर्गांत मी होतेंच. मला कधीं कोणी बरं म्हटलं नाहीं असं जरी म्हटलं तरी शोभण्याजोगें आहे. कसं, तें माझं सारं चरित्र लिहिलं गेलं तर सहजच समजेल. एवढी स्वतःचं चरित्र लिहितां येण्याजोगी शिकलेली बायको, आणखी हें असें वेडगळ काय लिहितें, असें पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे; परंतु माझे खरे विचार लिहिण्याचा निश्चय करून ज्याअर्थी मीं हें चरित्र लिहिण्यास आरंभ केला आहे, त्याअर्थी लोक काय म्हणतील याचा मुळींच विचार न करतां मीं आपलें काम करावें हें बरें. असो.

हे विचार याच घटकेस लिहिण्यास कारण झालें, तिकडे वळावें तें बरें. सुंदरी निजली म्हणून मी तिला आंत घेऊन जात असतांना मला एकदम त्या लपवून ठेवलेल्या पत्राची आठवण झाली, आणि वाटलें कीं, या पोरटीला मी एकदा कोठेंतरी ठेवीन केव्हां आणि दादाला तें पत्र दाखवून त्यांतला मजकूर वाचून तो मला सांगेल केव्हां ! पण पुढें सारेंच ओंफस् झालें. दादा एकदा जो आंत गेला तो पुनः लवकर कांहीं बाहेर आला नाहीं. मला आंत जाण्याची फार भीति ! तरी पण थोड्या वेळानें मी दबकत दबकत आंत गेलें, तों दादा व आजोबा जेवायला बसण्याच्या बेतांत होते. आजीनें मला पाहिलें, व म्हटलें, " यमे, तुझी आई जागीबिगी झाली आहे काय पाहून ये. असली तर तिला म्हणावं थोडंसं कांहीं खा; नको, नाहीं तर नुसती पाहून ये, मग मीच जाईन तिला विचारायला. " आई अजून जागी झाली नव्हती. मीहि त्या वेळीं जेवलें. जेवतांना आजोबा " जर त्या पोराला आतां कोणीं कुठें गेला होता, कां गेला होता, काय हरवलं, सांडलं, विचारलं कीं नाहीं तर माझ्या नाहीं हो कामी पडायचं ! " अशा अर्थाचे कांहीं शब्द बोलले. अर्थातच ते शब्द आजीला उद्देशून होते. तीहि " कोणाचा खोळंबलाय पायपोस त्याला विचारायला ? आपला धडधा ह्यानं सांपडला एवढंच पुष्कळ झालं ! " असें कांहींतरी पुटपुटली.

संध्याकाळच्या सुमारास आई जागी झाली. तिला फारच गाढ झोंप लागली होती. दादा आलेला तिनें शुद्धींत पाहिला नव्हताच, त्यामुळें पहिला तिचा प्रश्न " यमे, गणू आला का ग ? का नाहीं अजून ? " हाच होता. दादा तिच्या उशाशींच होता. सुंदरी तिच्यापुढें निजली होती. आजी जवळच समईपाशीं फुलवाती भिजवीत होती. तो तिचा प्रश्न तोंडांतून निघण्याचा अवकाश ! मी चटकन् म्हटलें, " अग, हो, तो बघ तुझ्या उशाशीं ! " हे शब्द माझ्या तोंडांतून पुरते निघाले असतील नसतील ! ती तटकन् उठून बसली. ती इतक्या कांहीं आवेशानें, कीं कांहीं पुसूंच नये. मी तर घाबरून पलीकडेच सरलें. आई उठली ती क्षणभर–का चांगली मिनिटभर म्हणा ना–एकसारखी दादाकडे पाहात होती. मग काय तिच्या मनांत आलें कोणास कळे ! तिनें एकदम आपले हात पुढें केले आणि त्याला घट्ट पोटाशीं आवळून ती एकसारखी रडूं लागली.

आजोनें तें पाहतांच तिच्या मनांत कांहीं शंका आल्याप्रमाणें होऊन ती अगदीं आमच्या जवळ आली. दादाहि एकसारखा रडतच होता. आई " कुठें रे गेला होतास! अं? मला टाकून?" असे कांहीं शब्द अर्धवट उच्चारीत, परंतु रडत होती. आजी जवळ आहे वगैरे कांहीं तिला भानच नाहीं असें दिसलें. तिला पुनः वायूचा झटकाच आला असें दिसलें. परंतु आतांचा हा झटका कांहीं फारसा नव्हता. थोडा वेळ रडणें झाल्यावर ती हसूंच लागली; आणखी मलाहि हांका मारून तिनें आपल्याजवळ घेतलें; दादा पलीकडे जाऊं लागला पण त्याला जाऊं दिलें नाहीं; आम्हांला दोघांना तिनें इतकें कांहीं पोटाशीं घट्ट धरिलें कीं, कांहीं पुसूंच नये. इतक्यांत आजीनें तिला हांक मारली, तों ती तिच्याकडे एकेक एवढाला डोळा करून पाहूं लागली. इतक्यांत आजी "आतां हें आहे तरी काय आज?" असें म्हणाली. त्यासरशीं आई रडूं लागली, अन् म्हणाली, "माझ्या बाळांना नाहीं ना हो तुम्ही अंतर देणार!" तें ऐकून आजीनें, "अग, तूं हें आरंभलं आहेस तरी काय? तुला वेड तर–" इतकें आजी बोलते आहे तों पुनः आई धाडकन् खालीं पडली आणि सकाळच्याप्रमाणें हुबेहूब तिची अवस्था झाली. आम्हां मुलांची अशा वेळीं काय स्थिति झाली असेल बरें! आजीनें आजोबांना केवढ्या मोठ्यानें हांक मारली. पुनः अंजन वगैरे सर्व उपचार दुपारच्यासारखे झाले व ती थोडीशी शुद्धीवर आली, परंतु अतिशय ताप भरला. त्या रात्रीं आम्हांला झोप कसली! आजोबा तेथेंच बसले होते. आजी आईच्या जवळ बसली होती. त्यांना तर दिव्यानें रात्र उजाडली. आम्ही दोघेंहि बराच वेळ जागून तिथेंच आईच्या पायथ्याशीं मुटकुंडी मारून पडलों. मला झोप लागली. आईचें विव्हळणें चालूंच होतें.

◆ ◆ ◆

## १३ : पत्र दाखविलें

असा प्रकार दोन दिवस चालू होता. तिचा ताप हटेना. बाबांना पत्र टाकलें. वैद्याचें औषध सुरू केलेंच होतें; पण कांहीं उपयोग होईना. पहिला ताप न निघतां तिच्या अंगांत रोज नवा ताप भरे.

आजोबा व आजी दोघेंहि "हें दुखणें आतां कोणत्या थरावर जाईल कांहीं सांगवत नाहीं" असेंदेखील तिसरे दिवशीं म्हणालीं, असें दादानें मला सांगितलें. आमचीं साऱ्यांचीं तोंडें अगदीं चिमणीसारखीं झालीं. सुंदरीला मीच बरोबर घेई. दादा आणखी मी मिळून कशीतरी तिला आईपासून दूर ठेवीत होतों. तिला एक पिण्याचा चाळा असल्यामुळें त्या तसल्या तापांत आईला तिला प्यायला द्यावें लागत असें! याचा परिणाम पुढें काय झाला हें समजेलच. दोन दिवसांत कांहीं मला न् दादाला बोलायला

वेळ मिळाला नाहीं. तें चोरून ठेवलेलें पत्र दादाला दाखविण्याला तर मुळींच वेळ झाला नाहीं. बहुतकरून तो नाहीं तर मी आईजवळ बसलेली असेच, यामुळें दादा रात्रीं गेल्यानंतर त्याची हकीकत काय झाली ? त्याची भिकबाळी कुठें गेली ? वगैरे गोष्टींची तुटक तुटक हकीकतच काय ती कळली. रात्रीं अंथरुणांत कुजबुजावें तर आजी तेथेंच आणि आजोबाहि जवळच पलीकडे ! तिसरे कीं चौथे दिवशीं मात्र आम्हांला आजीनें बाहेर जाण्यास सांगितलें. आईच्या प्रकृतीलाहि जरा विशी-एकुणिशी उतार पडला होता, त्यामुळें आमचें मनहि जरा स्थिर होतें.

मला वाटतें पुष्कळ वेळां या गोष्टींचा आपणां पुष्कळांस अनुभव आला असेल, कीं एखादी गोष्ट कोणास सांगण्याचा अगर विचारण्याचा प्रसंग येईपर्यंत ती गोष्ट आपण त्यास सांगावी कीं नाहीं, याबद्दल शंका उत्पन्न होत नाहीं. प्रसंग येईल केव्हां आणि आपण सांगूं केव्हां, किंवा विचारूं केव्हां, असें आपणांस होऊन गेलेलें असतें; परंतु प्रसंग येऊन ठेपला, कीं मग सांगूं कीं नको, विचारूं कीं नको, असें होऊन मन घुटमळायला लागतें. तशांतलीच माझी अवस्था ते दिवशीं झाली. त्यांतून आपण सांगणार अगर विचारणार ती गोष्ट चांगलीच आहे, वावगी मुळींच नाहीं, निदान ज्याला आपण सांगणार त्याला ती वावगी वाटायची नाहीं, अशी मनाची खात्री असली तर मग कांहीं हरकत नसते; परंतु त्याबद्दल जर शंका असली, तर मग सांगण्याविचारण्याची शंका उत्पन्न होणें अगदीं साहजिकच आहे. आतांपर्यंत मला असें झालें होतें कीं, दादाची माझी एकीकडे गांठ पडेल केव्हां अन् मी त्याला तें पत्र दाखवून त्यांतला मजकूर कळवून घेईन केव्हां! पण आतां तशी वेळ आली तेव्हां "दाखवूं का नको ? दाखवलं तर आधीं तो म्हणेल काय ? आपल्याला त्यांतला मजकूर सांगेल कीं नाहीं ?" अशा शंका मनांत यायला लागल्या. तेव्हां पहिल्यानें त्याच्या हकीकतीच्याच गोष्टी काढण्याचा बेत करून मीं त्यास म्हटलें, "दादा, मीं पुष्कळदा म्हटलं, कीं तुला विचारूं नये, पण नाहींच माझ्यानं राहवत. खरंच सांग, तुझी भिकबाळी कुठें गेली ?" हे माझे शब्द ऐकून दादा किंचित् कावराबावरा झालासा दिसला; तरी पण मला लागलीच म्हणाला, 'यमे, माझी भिकबाळी चोराला मिळाली." इतकें बोलून कांहीं वेळ अगदीं स्तब्ध राहिला, आणि मजकडे टक लावून पाहूं लागला. तें त्याचें पाहणें कांहीं विलक्षणच होतें. त्याचे डोळे मजकडे होते खरे; परंतु मन कोठेंतरी दुसरीकडे होतें. मग ती भिकबाळी गेली त्या वेळीं घडलेल्या सर्व गोष्टी त्याच्या नजरेसमोर दिसूं लागल्या; त्या पाहण्याकडे त्याचे डोळे गुंतले होते कीं काय सांगवत नाहीं. तो तसाच मजकडे पाहात राहिला; तेव्हां मला कसेंसेंच होऊन मी त्यास चटकन् म्हटलें, "हें रे काय हें ? असं काय वेडयासारखं माझ्याकडे पाहतोस ?" असें मी बोललें, तेव्हां तो भानावर आल्यासारखा झाला. नंतर माझ्या खांद्यावर हात ठेवून व माझ्या तोंडाकडे नीट पाहून म्हणाला, "यमे, पुनः तूं त्या भिकबाळीचें माझ्याजवळ नांव काढूं नकोस. मला कीं नाहीं तिचं नांव काढलं म्हणजे फार वाईट वाटतं. जगांत इतके लुच्चे असतील असं मला वाटलं

नव्हतं." इतकें बोलून तो किंचित् थांबला व पुनः म्हणाला, "अर्ध्या वाटेवर गेल्यानंतर आपण वाट चुकलों कीं काय म्हणून एका वाटसरूला विचारायला गेलों. त्यानें मला 'तुम्ही अगदींच भलत्या वाटेला आलां, चला आतां आडव्या रस्त्यानें, तुम्हांला स्टेशनच्या वाटेवर नेऊन घालतों.' असें म्हणून मला भलत्याच वाटेला नेलें. पुढें तो भला माणूस आहे असें समजून त्यानें विचारल्यावरून मी कुठें जातों...वगैरे सारी हकीकत त्याला सांगितली. त्यानें ती सगळी ऐकून घेऊन तो मला म्हणाला, 'तुम्ही पायीं जाण्याच्या भरीला न पडतां स्टेशनावर जाऊन आगगाडीतूनच जा.' 'पैसे नाहींत' असें मीं सांगतांच 'कांहीं भिकबाळी–सल्लाबिल्ला असला तर या काढून, मी देतों या जवळच्या गांवांतून तुम्हांला पैसे आणून' असें तो म्हणाला. काय मला त्या वेळीं भुरळ पडली कोणास ठाऊक? वाटलं कीं कांहीं होवो; जर आपल्याला आईची काळजी दूर करायला सांपडते आहे, तर दिली भिकबाळी तरी हरकत नाहीं. आणखी झालों कबूल. इतक्या बेताला गोष्टी येताहेत तों अगदीं फटफटीत उजाडलें. एका झाडाखालीं जाऊन त्यानें माझी भिकबाळी पाहिली व 'फासा कांहीं चांगलासा वोळवला नाहीं' असें म्हणाला आणि पाहतां पाहतां चट्कन् काढून घेतली व हातावर घेऊन मला म्हणतो, 'वा! आहेत दाणे नामी गोळीबंद बरं का! ह्या जवळच्या गांवांत गोपाळशेट सोनार आहे आमचा चुलता (तोहि सोनारच होता असें दिसलें) त्याच्या जवळून घेऊं पांचपन्नास रुपये' असें म्हणून तो पुढें चालला. भिकबाळी कानांतून निघून त्याच्या हातीं गेल्यावर मग मला धागधुग वाटूं लागली. आई काय म्हणेल, बाबा काय म्हणतील, आजोबा काय म्हणतील, असे विचार मनांत आले. ती भिकबाळी या इकडे असे शब्द अगदीं ओंठावर येऊन येऊन परत जात. इतक्यांत 'तो पाहिला का ससा?' असें ओरडून तो भिकबाळी घेतलेला गृहस्थ जो सपाटून पळत सुटला तो कांहीं पुसूंच नये. मी आपला ससा कुठें आहे तो पाहण्याच्या भरांत जागच्या जागींच उभा राहून त्या पळणाऱ्या चोराकडे पाहात राहिलों. तो जो पळत चालला तो अगदी दिसेनासुद्धां झाला. तो आतां भेटेल, मग भेटेल म्हणून मीहि पुढें चाललों, पण त्याचा पत्ता लागेना. वाटेनें कोणीहि चिटपांखरूंहि भेटेना. पुष्कळ वेळ झाला आणि तो लुच्चा जेव्हां दिसेना; तेव्हां मात्र माझी निराशा होऊन मी मट्कन् एका झाडाखालीं बसलों. आपल्याला त्या चोरानें खास फसवलें असें माझ्या मनांत आलें. आतां करावें काय, तें मला सुचेना. कोणत्या भलत्याच वाटेला आपण आलों, आणखी जायचें कोठें, कांहींच सुचेना. शेवटला उपाय जो असतो, तो मीं केला. मी पुष्कळ वेळपर्यंत रडत बसलों, पण उपयोग काय? रडून रडूनदेखील थकलों. आतां आपलें घर कसें दिसणार? आईची भेट कशी होणार? यमी कशी भेटेल? आजोबा काय करतील? एक कीं दोन? या गोष्टी एकसारख्या मनांत येऊन राहून राहून रडें कोसळत होतें. इतक्यांत एक ब्राह्मणी पागोटें घातलेला गृहस्थ समोरून येतांना एकसारखा माझ्याकडे पाहातच होता. तो आला त्या वेळीं चांगले आठ नऊ वाजायला आले असतील. त्यानं माझ्याजवळ येऊन

मी रडतों आहें असें पाहिलें आणि मला म्हटलें, 'मुला, तूं कुणाचा रे? असा कां एकटा रडत बसला आहेस?' तो त्याचा प्रश्न ऐकून मला फारच रडूं कोसळलं. तो गृहस्थ मोठा दयाळू दिसला. त्यानं मला उठवलं, माझी पाठ थोपटली, उगा उगा केलं, आणि हळूहळू प्रश्न करून सगळी हकीकत विचारली. मींहि त्याला ती सांगितली. तो तेथून बऱ्याच अंतरावरच्या एका गांवचा कुळकर्णी होता; परंतु आपला गांव फारच लांब, त्यामुळें त्यानें मला आपल्याबरोबर एकाच्या घरीं नेलें व जेवूंखाऊं घातलें. मी अतिशय दमून गेलों होतों म्हणून मला पडायला सांगितलं, तों एक-दिडाचा सुमार झाला. 'ऊन उतरलं म्हणजे मी तुला गडी आणखी घोडं देऊन लावून देतों तुझ्या गांवीं' असं त्यानं म्हटलं. मी थोडासा पडलों तों आधीं चालून चालून दमून गेल्यामुळें मला झोंप लागली व मी पांचाच्या सुमाराला जागा झालों. कुळकर्णीबोवांनीं सर्व तयारी करून ठेविली होती. आतां मी इतक्यांत निघणार तोंच दुरून आजोबा आलेले मला दिसले. मग मला काय झालं असेल तें तूंच पाहा. सर्व हकीकत ऐकल्यावर त्यांनीं मला घट्ट धरलें व 'आज हा पोरगा आम्हांला देवानें परत दिला. त्या चोरानं जर भिकबाळीसाठीं याला मारलं असतं, तर काय घ्या! अहो, अशीं उदाहरणं कांहीं थोडींथोडकीं नाहीं घडत!' असें कुळकर्ण्यांकडे बघून ते म्हणाले. बराच वेळ बोलण्यांत गेल्यावर त्या कुळकर्ण्यानें आजोबांना रात्रीं फराळ करून निघण्याविषयीं आग्रह केला. आजोबांनीं नाहीं होय म्हणत त्यांच्या बोलण्यास मान दिला. नंतर अर्थातच चंद्रोदय झाल्यावर निघण्याचा बेत होऊन आम्ही निघालों ते आलों." अशी एकंदर दादानें आपली हकीकत सांगितली. ती त्या वेळीं त्यानें कशी सांगितली ती इत्थंभूत आतां मला आठवत नाहींच. परंतु जशी मला आठवली तशी, जणू काय तोच सांगतो आहे, अशी मीं येथें सांगितली आहे. ही हकीकत वाचली म्हणजे कित्येकांस मोठी विलक्षण वाटेल, किंबहुना आम्हां बहीण-भावंडांचें चरित्र लहानपणापासूनच कांहीं चमत्कारिक होतें असें वाटेल; आणि कांहीं अंशांनीं तें तसें होतेंहि. असो.

ही सर्व हकीकत दादाच्या व माझ्या प्रश्नोत्तरांत निघाली, ती तशीच दिली असती तर कंटाळवाणी झाली असती; सबब ती तशीच न देतां एकसारखा तोच बोलतो आहे अशा रीतीनें दिली आहे. असो.

ती त्याची चमत्कारिक हकीकत ऐकल्यावर अर्थातच त्यासंबंधानें आमचें बोलणें झालें व मला कांहीं वेळ त्या पत्राचें अगदीं विस्मरण झालें. इतक्यांत दादा मला म्हणाला, "यमे, मी गेल्यापासून घरांत काय हकीकत झाली, ती नाहीं कुठें मला सांगितलीस?" हा त्याचा प्रश्न ऐकल्याबरोबर चटकन् मला त्या पत्राची आठवण झाली व इतका वेळ आमचे दोघांचें अगदीं विश्वासाचें बोलणें झाल्यामुळें आतां तें पत्र त्याला दाखवावें कीं नाहीं, अशाबद्दल मला मुळींच शंका राहिली नाहीं. मीं त्याला तें बाबडतोब दाखविण्याचा निश्चय केला व तो गेल्यापासून परत येईपर्यंत जें जें कांहीं

घडलें त्याची कच्ची हकीकत त्याला इत्थंभूत कळवून त्या पत्राविषयीं सविस्तर हकीकत सांगितली. ती सर्व ऐकून तो थोडासा स्तब्ध बसला आणि लागलीच मला " आण, आण कुठें आहे तें पत्र पाहूं ? " असें मोठया उत्कंठेनें म्हणाला; परंतु ते शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडेपर्यंत आतां हा आपल्याला काय म्हणतो आणि काय नाहीं, याची मला मोठी धास्ती वाटत होती. हो, न जाणो असें पत्र तूं चोरून ठेवलेंस कां, असें म्हणून मजवरच उलटून पडून आईकडे जाऊन अगर आजोबांकडे जाऊन बोलतो कीं काय ? परंतु त्याच्या त्या मागण्यानें माझी भीति दूर होऊन मी धावत धावत जाऊन पत्र आणून त्याच्या हातांत दिले. तें पत्र त्याला देण्यासाठीं मी इतकी उतावळी झालें होतें, कीं त्याच्यासाठीं धावत येत असतांना उंबऱ्याच्या तिथें परकरांत पाय अडखळून पडलेंदेखील ! पण त्या वेळची घाई कोण ? आणखी पडण्याकडे लक्ष जाईल कसें? झट्कन् सांवरून त्याच्याजवळ जाऊन पत्र दिलें. त्यानें तें पत्र माझ्या हातून घेतलें, आणि माझा हात धरून तो अंमळ बाजूला गेला. तेथें तें पत्र त्यानें उघडलें आणि आपल्याशींच चांगलें मनन करून वाचलें. वाचतां वाचतां त्याचें तोंड क्षणोक्षणीं अधिक गोरेंमोरें होत होतें. आणि माझी खात्री आहे कीं, त्याची चर्या जसजशी बदलत चालली होती, तसतशी माझीदेखील बदलत जात असावी. हें आहे तरी काय असें वाटून भीति व उत्कंठाहि आणखी माझ्या मनांत जास्त उत्पन्न होत होती हें वर सांगितलेंच आहे. आतां हें याचें मनन संपणार तरी केव्हां असें मला होऊन गेलें. मीं अगदीं टक लावून पाहात होतें. पत्र तर एवढेंसें आणि हा इतकें मनन कसलें करतो आहे ? असें वाटून मी इतकी कांहीं उतावीळ झालें कीं, कांही विचारूं नका. वास्तविक त्याला वेळ अतिशय लागला असें नाहीं. मला ही सर्व हकीकत लिहिण्यास जितका वेळ लागला तितकादेखील वेळ त्यास पत्र वाचण्यास लागला नाहीं; परंतु ज्याचें मन अतिशय उतावळें झालेलें असतें त्यास पळाची घटका आणि घटकेचा प्रहर वाटतो. शेवटीं मला राहवेना. मीं त्याचा दंड धरून हालवून त्यास म्हटलें, " अरे, इतका वेळ काय असा वाचतो आहेस ? बोलशील कीं नाहीं ? " मी इतकें बोलण्याला आणि त्याच्या डोळ्यांतून एक पाण्याचा थेंब पट्कन् बाहेर पडण्याला एकच गांठ पडली. मग मात्र माझें काळीज चर्र झालें व वाटलें कीं, या पत्रांत कांहीं ना कांहींतरी फारच वाईट बातमी असली पाहिजे; त्याखेरीज आईची तशी अवस्था आणि दादा लहान असून त्याचीदेखील अशी अवस्था झाली नसती. असें मनांत येण्याबरोबर तर जास्तीच उत्कंठा लागली, इतक्यांत त्यानें माझा दंड घट्ट धरला आणि तो माझ्याकडे चमत्कारिक दृष्टीनें पाहून म्हणाला, " यमे, मी तुला सांगतों तें ऐकशील ? " मीं मोठया उत्सुकतेनें उत्तर दिलें, " हो, तूं सांग मला काय तें. "

दादा : " कांहीं नाहीं. या पत्रांत काय आहे तें मला विचारूं नकोस एवढंच. तूं लहान आहेस, तुला त्यांतलं कांहीं समजणार नाहीं. " हे शब्द उच्चारतांना त्याचा आवाज, चेहरा यांवरून त्या पत्रांतील मजकूर मला मुळींच कळूं न देण्याविषयीं त्याचा

पक्का निश्चय झाला आहे असें स्पष्ट दिसलें. तेव्हां हें त्याचें बोलणें ऐकण्याबरोबर माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना आज माझी मलाच काय ती करायला येते; इतरांना मुळींच करतां येणार नाहीं. इतके दिवस ज्या आशेवर आपण बसलों ती सर्व व्यर्थ गेली. त्या पत्रांत काय आहे हें समजण्याची आतां कांहीं मुळींच आशा नको असें मनाला खास वाटलें. आपण इतका वेळ जतन करून ठेवलेलें पत्र त्याच्याजवळ दिलें, याच्याकरितां मुद्दाम ठेवलें, व यानें आपण मात्र वाचलें आणि मी इतकी उत्कंठित असतांना त्यांतला मजकूर मलाच सांगत नाहीं, हें पाहून मला त्या वेळीं त्याचा किती राग आला असेल याचे ज्याला अनुमान होईल त्यानें करावें. त्या रागाच्या सपाटयांत मला असें वाटलें कीं, त्याला कडकडून चावावें. निदान त्याच्या हातून तो कागद ओढून घेऊन आपल्याजवळ ठेवावा, त्याला ओरबाडावें, असे एक ना दोन कितीतरी विचार माझ्या मनांत आले. तो मात्र अगदीं मुखस्तंभासारखा पुनः पुनः त्या पत्राकडे पाहात उभा राहिला होता; जणूं काय मोठा कारस्थानी पुरुष एखाद्या राज्याची उलाढाल करण्याचा विचार करतो आहे! मला त्याचा किती संताप आला म्हणतां! शेवटीं मी त्याला "दादा, तुला सांगायचं आहे कीं नाहीं मला त्या पत्रांत काय आहे तें?" हा प्रश्न विचारला; परंतु तो त्याला ऐकूंहि गेला नसावा, कारण त्यानें हूं कीं चूं देखील केलें नाहीं. मीं कांहीं वेळ वाट पाहिली; तो बोलेना तेव्हां त्याच्या दंडाला एक हिसडा देऊन म्हटलें "हे रे काय हें? सांगतो आहेस कीं नाहीं तें मला! नाहीं तर माझं मला पत्र दे इकडे, हो सांगतें आहे, अन् पुनः—"

"यमे, तुझ्यासारखी गाढव मुलगी दुसरी पाहिली नाहीं बोवा! तुला एकदा सांगितलं ना, तूं मला या पत्रांतला मजकूर विचारूं नको अन् मी तुला सांगणार नाहीं म्हणून? तें पत्रदेखील आतां तुला मिळायचं नाहीं." हे त्याचे अगदीं शांतपणें उच्चारलेले शब्द ऐकून तर माझ्या अंगाची अगदीं लाही लाही झाली. अंगाला आग लागल्याप्रमाणें मी थयथय नाचूं लागलें. गंगायमुनांचे प्रवाह वाहूं लागले आणि शेवटीं त्या रागाच्या सपाटयांत त्याला, "माझंच पत्र घेऊन मला सांगत नाहींन् पत्र देत नाहीं म्हणतोस का? मेल्या, चावटा, दम धर!" असें म्हणून मी तावातावानें त्याच्या हातच्या त्या पत्रावर झांप घातली; परंतु तो पटकन् दूर होऊन त्यानें त्या पत्राची घडी घालून ती त्याच्या पाकिटांत घातली, आणि पुनः पूर्वीप्रमाणेंच अगदीं शांतपणानें म्हणाला, "यमे, तूं लहान आहेस. तुला या पत्रांतला मजकूर कळूं नये हें चांगलं. कळला तरी तुला कांहीं समजायचं नाहीं. कां उगीच गडबड करतेस?" एवढें बोलून तो आपला मुकाटयानें तेथून चालता झाला.

आपण अतिशय रागांत असावें आणि ज्यावर आपण रागावलों, तो मनुष्य अगदीं शांतपणें बोलत असावा, म्हणजे आपला राग दुणावण्यास चांगलेंच कारण होतें. हा अनुभव पुष्कळांस आला असेल. त्याप्रमाणेंच या प्रसंगींहि गोष्ट झाली. दादा शांतपणानें

मला उत्तर देऊन व त्यांत मला पक्की मूर्ख ठरवून माझ्या त्या पत्राची घडी करून संथपणानें ती पाकिटांत टाकून खुशाल चालता झाला, आणि मी अर्थातच त्या मानानें अधिक संतापून त्याच्या त्या संथपणानें थक्क होऊन म्हणा, किंवा आतां याचें करावें तरी काय, हें कांहींच न सुचून म्हणा, पण एक क्षणभर जागच्या जागींच अगदीं सावकाश धीमेपणानें चाललेल्या त्या आपल्या निर्दय भावाकडे पाहात उभी राहिलें; पण असें किती वेळ चालणार! तो आतां घरांत जाणार तों मी भानावर येऊन धूम त्याच्या पाठीमागें गेलें. पण तो कसला माझ्या हातीं लागतो? तो गेलाच आणि अर्थातच तें पत्रहि आतां माझ्या हातून गेलें. पत्र मजजवळ होतें तोंपर्यंच आंतला मजकूर कळण्याची कांहींतरी आशा होती, तीहि समूळ नाहींशी झाली. असें झालें तेव्हां आमचें शेवटलें हत्यार आम्ही उपसून एका कोपऱ्यांत जाऊन तें पाजळीत बसलों मनांतला विचार हा कीं, तें हत्यार आपण पाजळतों आहों असें पाहून तरी दादा भिऊन आपल्याकडे येईल व आपली समजूत करून थोडाबहुत तरी मजकूर सांगून देईल. इतक्यांत एक फारच चांगला विचार मनांत आला. त्याबरोबर मन मोठें प्रफुल्लित झालें. हा उपाय आपण योजण्याबरोबर दादाचा पराभव होऊन आपली मनधरणी करण्यासाठीं तो काय पाहिजे तें करील अशी खात्री वाटली. आतां तो उपाय अमलांत आणायचाच, असा निश्चय करून मी तितक्यांतल्या तितक्यांत दादाजवळ गेलें आणखी त्याला मोठया दिमाखानें नाक फुगवून व ते रडणारे डोळे वटारून म्हटलें, " दादासाहेब, आपण पत्रांतला काय मजकूर आहे तो मला सांगा, नाहीं तर मी सारी हकीकत आईला जाऊन सांगतें ! " इतकें म्हणून जणूं काय आपल्या या अजब युक्तीचा कसा काय परिणाम होतो, हें पाहण्यासाठींच मी त्याच्यापासून थोडी दूर होऊन त्याच्या तोंडाकडे टक लावून पाहात उभी राहिलें. त्याचा चेहरा बदलला, त्यानें कपाळाला किंचित् आठया घातल्या व 'आतां काय करावें' असा कांहींतरी विचार त्याच्या मनांत चालला असावा असें दिसलें. चेहरा किंचित् बदलल्याबरोबर मीं जिंकली, आतां आपल्याला तो सर्व हकीकत अगदीं चुंबित होऊन सांगणार अशी खात्री वाटली. अर्थात् माझी थोडीशी आनंदी वृत्ति होऊं लागली. इतक्यांत तो आपल्या दातांनीं आपला खालचा ओठ चावून कपाळाला बऱ्याचशा आठया घालून म्हणाला, " तूं, आई इतकी आजारी असतांना तिच्याजवळ असलीं मूर्खासारखीं गाऱ्हाणीं सांगणार काय? जा, जाऊन सांग जा; पण ध्यानांत धर, तूं आईच्या जवळ हें सांगायला गेलीस, कीं मी इकडे आजोबांकडे जाऊन हें पत्र तुला कसं सांपडलं, त्याचं तूं काय केलंस, हें अगदीं सगळं सांगेन. मग कसं काय होईल तें तुझं तूं पाहा म्हणजे झालं ! "

हे शब्द ऐकण्याबरोबर माझ्या मनाची काय बरें स्थिति झाली असावी? आपला हा शेवटचा उपाय हरला. त्या उपायानें आपलेच दांत आपल्या घशांत उतरणार ! हें पाहण्याबरोबर व आतां आपल्या हातीं रडत बसण्यापलीकडे कांहीं नाहीं, तेंहि रडायचें

तें एकीकडे जाऊनच रडलें पाहिजे, नाहीं तर कोणी 'का रडने ? वगैरे चौकशी केली असतां आपल्याला खरें सांगावें लागेल; आपण खोटानाटा बहाणा केला तर तो चांडाळ दादा आहेच आपली पाठ पुरवायला, हें सगळें मनांत उमें राहून माझें मन अगदीं गोंधळून गेलं, आणि संतापानें मागलें पुढलें भान न राहून मी 'दादिटला खायपिटला, द्वाड कुठला, मारून टाक एकदा आजोबांकडून मला !' असें म्हणून त्याच्या दंडास अशी म्हणतां कडकडून चावून पळालें, कीं कांहीं पुसूं नये. मी किती जोरानें चावलें तें आपलें माझ्या दातांना कीं त्याच्या दंडाला ठाऊक ! इतके दांत आंत रुतले होते. मी जी पळालें ती तडक कुशीच्या घरीं गेलें. ते दिवशीं तिच्या घरीं तें भांडण झाल्यावेळेपासून मीं तिच्याशीं अगदीं अबोलाच धरला होता; पण या वेळीं अगदीं गत्यंतरच नाहीसें आलें. घरांत बसण्याची सोयच नव्हती, आपल्या कृतीबद्दल सूड उगवायला दादा आपल्या पाठीमागें धावत येईल, कीं सर्व हकीकत सांगून आजोबांकडून त्या साऱ्याचें उट्टें काढील, कांहींच सुमार लागेना. मी कुशीच्या दाराजवळ जातें तों तिथें दारांतच तो बनीचा भाऊ धोंडया उभा होता. मला दुरून पाहण्याबरोबर तो माझ्याकडे तोंड वेडावून हातवारे करीत मला म्हणतो : "या लतकोडगाबाई, आलांत वाटतं माझी बायको व्हावयाला ?" आधींच मी संतापांत, त्यांत नुकनीच मी दादाला चावून आलें, त्याचा त्वेष अंगावर चढलेला, मग काय विचारतां ? "अडलाय माझा खेटर तुझी बायको व्हावयाला !" असें म्हणत जी का चवताळून त्याच्या अंगावर धावून गेलें म्हणतां ! पण तो तितक्यांत चट्कन् आंत होऊन त्यानें दाराच्या दोन्ही फळ्या झपाट्यानें झांकायला अन् मी दाराच्या चौकटीवर हात ठेवायला एकच गांठ पडली. माझ्या हाताचें कातडें दाराच्या सांधींत सांपडून असा चिमटा बसला, कीं मी मोठमोठ्यानें ओरडूं लागलें. पण तो मेला दार उघडीना. उलटी खिडकींतून मजा पाहूं लागला. माझ्या हाताच्या अशा वेदना होऊं लागल्या कीं कांहीं विचारूं नका. मी अधिक मोठ्यानें ओरडलें, तेव्हां त्या मेल्या कुशीनें दार उघडलें. तो कारटा पळूनच गेला. माझा हात अगदीं हिरवानिळा झाला. चिमटा फारच जबरदस्त बसला. त्याच्यामुळें वेदना तर होतच होत्या; पण निलाजरा धोंडया खिडकींतून हसत मजा पाहात उभा राहिला होता, त्याची मला फारच चीड आली. त्या कारट्याला शिव्या देत कुशीला सारी हकीकत सांगून, "तो जर आतां तावडींत सांपडेल तर अशी कडकडून चावेन कीं याद राखेशी !" असें शेवटीं म्हणत होतें, तोंच त्या अवदसा बनुबाई फणफणे करीत आल्या, "चाव ग कशी चावतेस ती ? हा बघ इथें आहे तो," असें म्हणून तिनें मला जोरानें आपल्याकडे ओढून पुनः ढकलून दिलें. तें तिचें त्या वेळचें भयंकर स्वरूप पाहून माझी त्रेधा उडाली. तो पूर्वीचा सारा त्वेष अगदीं मावळला, आपलें कांहीं चालत नाहीं असें पक्कें दिसून आलें; इतक्यांत तें वात्रट पोरटें आपल्या त्या भयंकर बहिणीच्या आड दडून म्हणतें, "आपल्या नवऱ्याला चावणारी अशी नाहीं बोवा आपण कुठें बायको पाहिली !"

हें त्याचें चहाटळपणाचें बोलणें ऐकून तर असा अंगाचा तिळपापड झाला कीं अगदीं विचारूं नये. पण करतां काय, त्या दोघी अवदसा, मी पडलें एकटी. आपली माघारी वळलें, तों तो ' भागूबाई भित्री, खाकेंत कुत्री, ' असें म्हणून मला चिडवीतच होता. याप्रमाणें ते दिवशीं जिकडून तिकडून फजिती होऊन तो दिवस मीं मोठ्या कष्टांतच काढला. दुःखांत सुख एवढेंच होतें, कीं मला भीती पडली होती त्याप्रमाणें दादानें कांहींएक केलें नाहीं. फक्त तो माझ्याशीं अगदीं बोलेनासा झाला व एकंदरीनें उदासच होता.

◆ ◆ ◆

## १४ : सटरफटर

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी घडून सुमारें एक महिना झाला. या पत्रांत मजकूर काय होता, हें मला शेवटीं कळलें नाहीं तें नाहींच. ते दिवसापासून दादा जो उदास झाला तो एकसारखा तसाच होता. माझ्याशीं तर तो एक दोन दिवस एक अक्षरदेखील बोलला नाही. पुढें बोलूं लागला. परंतु तें आपलें जितक्यास तितकेंच! काय असेल तें असो; ते दिवसापासून त्याचें पोरपण अजिबात जाऊन तो अगदीं मोठ्या विचारी पोक्त वयाच्या [illegible] बनला. तो माझ्याशीं कधीं हसत-खेळत नसे. नेहमीं कांहीं ना कांहींतरी लिहिण्या-वाचण्याच्या नादांत असे. बाकी राहील तो वेळ त्यानें आईच्या उशापायथ्याशीं बसून तिची शुश्रूषा करण्यांत अगर होतां होईल तों तिचें मन रिझविण्यांत घालवावा. त्याचें मन पुनः आपल्याकडे येऊन आपल्याबरोबर त्यानें नेहमीप्रमाणे खेळावें, बोलावें म्हणून मीं माझ्या हातून जितक्या होतील तितक्या खटपटी केल्या. एक दिवस तर त्याला एकीकडे गांठलें व डोळ्यांत अश्रु आणून मोठ्या अंतः-करणपूर्वक त्याच्या पायांदेखील पडलें आणि त्याला म्हणालें, " दादा, मी चावलें त्या दिवसापासून तूं कां बरं माझ्यावर इतका रुसला आहेस? ही बघ. मी तुझ्या पायां पडतें, पण माझ्याशीं बोल. माझी गडी फू करूं नकोस. मी अगदीं तुझ्या गळ्याची शपथ वाहतें, आईच्या पायांची शपथ वाहतें, पण तूं पहिल्यासारखा माझ्याशीं हसत बोलत जा. " असें म्हणून मी खरोखरीच रडावयास लागलें. मी किती जरी दादाशीं भांडलें बोललें तरी मला त्याच्यावांचून घटकाभरदेखील होत नसे; आणि आज तर जवळ जवळ महिना झाला, त्याचें माझ्याशीं अगदीं उदासीनपणाचें वर्तन होतें, त्यामुळें माझ्या खेळांत कीं कशांतदेखील मला पहिल्याइतकी मौज वाटेना. शेजारीं कुशीकडे जावें तर तिकडे त्या बनीमुळें पटेना! ती सटवी अजून इथेंच होती. असो.

वर सांगितल्याप्रमाणें मी पायां पडून जेव्हां एक दिवस दादाच्या जवळ रडलें,

तेव्हां तो एखाद्या पोक्त माणसाप्रमाणें मला पोटाशीं धरून म्हणाला, "यमे, तूं चावल्यामुळें मी तुझ्याशीं बोलत-हसत-खेळत-सवरत नाहीं असं मुळीच नाहीं बरं. माझं मन असं व्हायला कारण काय तें तुला पोरीला मुळींच समजायचं नाहीं, समजलीस ! मला आपला अभ्यास करायचा असतो, उदाहरणं करायचीं असतात, यामुळं मी आपल्या कामांत असतों."

"हें काय रे दादा, मला समजायचं नाहीं म्हणजे मी अगदीं लहानच आहें वाटतं ? मला सारं समजतं आहे. सांग तूं मला. मला ठाऊक आहे. ते दिवसाच्या त्या पत्रांत बाबांच्याबद्दल कांहींतरी आहे. अन् त्यामुळं असेल कदाचित् तुझं ..."

इतकें मीं बोलतें आहें तों दादाचा चेहरा कसा चमत्कारिक होऊन तो आपला तेथून चालता झाला आणि मी आपल्या पोरस्वभावाप्रमाणें व त्यांत थोडासा चौकसपणाचा फाजील भाग असल्यामुळें आपल्या मनाशींच आश्चर्य करीत बसलें.

याप्रमाणें कांहीं दिवस गेले. बाबांकडून पत्रें येत तीं आजोबा वाचीत. परंतु त्या पत्रांत काय आहे, काय नाहीं याचें अक्षरदेखील ते घरांत सांगत नसत. कोणीं विचारलेंच तर "कांहीं नाहीं. खुशाल आहे" एवढेंच उत्तर देत. होतां होतां एक दिवस कांहीं पत्र आलें. तें वाचल्याबरोबर, त्यांनीं बाबांकडे जाण्याची तयारी करण्यास सांगितलें. ते एकटेच निघाले. दादानें मोठ्या काकुळतीला येऊन मला न्या म्हणून त्यांस म्हटलें, परंतु त्यांनीं कांहीं ऐकलें नाहीं. ते एकटेच निघून गेले. दादा फारच हिरमुसलें तोंड करून बसला; इतकेंच नव्हे, एकीकडे जाऊन रडतांनाहि मी त्याला पाहिलें. तो रडतो आहे असें पाहून मी अर्थातच त्याच्याजवळ गेलें, तें त्याला कळलेंदेखील नाहीं. त्याच्या गळ्याला पाठीमागून मिठी मारली. लाघवीपणांत मी कांहीं कमी नव्हतें. परंतु त्या वेळीं मला लाघवीपणा मुद्दाम करावा लागलाच नाहीं. तें भरतें आपोआपच आलें. त्याला मोठ्या प्रेमानें मागून मिठी मारून मीं त्यास एकदम म्हटलें, "दादा, असा कां बरं एकीकडे येऊन रडतोस ! मला कां नाहीं काय झालं तें सांगत ?" हे माझे शब्द ऐकल्याबरोबर त्यानें चट्कन् वळून माझ्याकडे पाहिलें आणि डोळेबिळे अगदीं चक्क पुसून पुनः तो त्याच्या अंगीं नवीन आलेला पोक्तपणा आणून मला म्हणाला, "पोरी, तुला काय सांगायचं आहे ? तुला समजत नाहीं तेंच बरं आहे." इतकें बोलून तो झट्कन् तेथून गेला. जणू काय त्याला वाटलें, आतां क्षणभर जास्त उभें राहिल्यास या पोरीच्या लाघवीपणामुळें आपल्या तोंडून काय आहे तें बाहेर पडेल, अशी त्याला मोठीच भीति वाटली असावी.

आईची प्रकृति दिवसानुदिवस सुधारत चालली होती, कीं बिघडत चालली होती हें मला कांहीं समजेनासें झालें होतें. तिचा ताप दिवसानुदिवस अगदीं हटत चालला; परंतु ती फारच क्षीण होत चालली. तिला अन्न नीट जात नसे; परंतु पुढें पुढें तिची प्रकृति सुधारत गेली हें खरें. कारण ती लवकरच अंथरुणावरून उठून इकडून तिकडे

हिंडण्याजोगी झाली. बाहेरून ताप अगदींच गेला असें ठरलें, फक्त शक्ति येण्याचेंच काय तें उरलें होतें. तिचे हातपाय अगदीं काय झाले होते म्हणून सांगूं? तथापि आजी वगैरे तिच्या जिवावरलें एक अरिष्टच गेलें असें म्हणत असे, यावरून तिला आतां कोणत्याहि रीतीचा धोका नाहीं असें आम्हांस वाटे. त्या आईच्या दुखण्यांत मीं कांहीं तिच्याजवळ दादाच्या इतकी पुष्कळ बसलें नाहीं. कारण सुंदरी जागी असली म्हणजे मला तिला घेऊनच दुसरीकडे कुठेंतरी जावें लागत असे. दुखणें लागून बरेच दिवस झाले तरी ती पोरटी आपली तिच्या अंगावर पीतच असे. शेवटीं ज्या वैद्याचें औषध तिला सुरू होतें, त्यानें निक्षून सांगितलें, की या पोरीचें पिणें जर तुम्ही तोडणार नाहीं, तर माझ्या औषधांनीं कांहीदेखील होणार नाहीं. एक तिला तोडा तरी नाहीं तर औषध तरी बंद करा. हें वैद्यबोवांनीं सांगितल्या दिवसापासून तिला तोडण्याचें ठरलें व अर्थातच त्यामुळें तिला आईपासून जितकें होईल तितकें दूर घेऊन जाऊन खेळविण्याचें, संभाळण्याचें व केव्हां केव्हां परस्पर दूध पाजण्याचेंदेखील काम मीच करीत असें. ती एवढी थोरली पोरगी पण पिण्याकरितां जशी ल्हसल्हस करीत असे. अन् तिला त्याचा विसर पाडायला कितीतरी सायास पडले! पण एकदाची ती तुटली एवढ्यानें बरें झालें. कारण तिला तोडल्या दिवसापासून आईची प्रकृति सुधारत चालली असें वैद्यबोवा म्हणत असत. असो.

याप्रमाणें बरेच दिवस गेले. आजोबांना जाऊनहि पुष्कळ दिवस झाले म्हटलें तरी चालेल. त्यांचेकडून दोनतीन खुशालीचे कागद आले. जिकडे तिकडे अगदीं स्वस्थता झाल्यासारखी झाली. दादाचेंहि मन पहिल्याइतकें उदास नसावें असें दिसलें, कारण तो अगदीं पहिल्याप्रमाणें जरी नाहीं तरी माझ्याशीं हसूं बोलूं व थोडाबहुत खेळूसवरूंहि लागला. तिकडे ती अवदसा बनी, तिची ती धाकटी बहीण आणखी तो वात्रट पोरगा धोंड्या सारीं आपल्या घरीं गेली, त्यामुळें कुशीची आणखी माझी पुनः गट्टी जुळली. ती इतकी, कीं ती स्वतःच आतां माझ्याबरोबर त्या पोरांना वाईट म्हणून शिव्या देऊं लागली आणखी माझी स्तुति करूं लागली. त्या बनीला आणखी त्या धोंड्याला तर ती फारच नांवें ठेवूं लागली. मला अर्थातच तें चांगलें वाटलें, कारण आतां सुंदरी जागी असल्यास तिला खेळवण्याच्या निमित्तानें हवी तेव्हां घेऊन आपले कुशीच्या घरीं येऊन हवा तसा हमामा आणखी हुतुतू घालावा असें झालें होतें. कुशीचें घर मोठें आणि ती आपल्या आईची फार लाडकी असल्यामुळें तिला हवें तें करायला मुळींच आडकाठी नसे.

अशा तऱ्हेनें थोड्याबहुत आनंदांत दिवस चालले असतां, एक दिवस संध्याकाळीं पांच वाजल्यावर सुंदरीला कडेवर घेऊन मी तिला खेळविण्यासाठीं गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या करीत होतें, इतक्यांत केव्हांचा बाहेर गेलेला दादा घरीं आला. त्याच्याकडे मी सुंदरीला घेऊन धाव मारली व "दादा, दादा, तिला घेऊन खेळव रे, मी—" इतकें बोलून मी त्याच्याकडे वर डोळे करून नीट पाहतें, तों त्याचा चेहरा इतका कांहीं विलक्षण रडका दिसला, की कांहीं पुसूं नये. त्याच्या त्या चेहऱ्यावर मूळची कळा मुळींच कशी ती दिसत

नव्हती. कांहीं असो, त्या वेळीं मी इतकी कांहीं घाबरलें व स्वस्थ उभी राहिलें, की तो माझ्या जवळून केव्हां निघून गेला हें कांहीं माझ्या मुळींच समजण्यांत आलें नाहीं. मी एवढीशीशी पोर, पण मला हें आहे तरी काय असें वाटून मी अगदीं गोंधळून व गांगरून गेलें. दादा बाहेर गेला तेव्हां मोठया आनंदानें रोजच्याप्रमाणें गेला. आणखी परत आला तो असा कां ? असें मनांत येऊन मी विचार करीत उभी राहिलें. पण मला पोरीला कसलें काय ध्यानांत येतें ? पण समजण्याची तर हाव फार ! दादाला विचारलें असतां तो सांगेल असें तर मनास वाटेना. न जाणो कांहीं विशेष असेल तर तो घरांत तरी कोणाजवळ बोलेल असें वाटून मी त्याच्या पाठोपाठ घरांत गेलें. तो तडक आईच्याजवळ जाऊन बसला. त्याचें तोंड इतकें रडकें वगैरे झालेलें आईच्या कांहीं लक्षांत आलें नाहीं असें दिसलें. तसें असतें, तर तिनें त्याला त्यासंबंधानें कांहींतरी विचारलें असतें. दोघेंहि अगदीं मुकाटयानेंच बसलीं होतीं. होतां होतां त्याच्या चेहऱ्यावरील ती कळाहि नाहींशी झाली व तो पूर्वी होता इतकाच उदासीन झाला.

दुसरे दिवशीं त्याची व माझी गांठ पडली. त्या वेळीं मी त्यास तें विचारलें, परंतु त्यानें अगदींच उडवाउडवी करून मला धुडकावली आणि आपला तेथून चालता झाला.

यानंतर सुमारें आठ दिवसांनीं आजोबा परत आले. ते आले ते दिवशीं घरांत जिकडे तिकडे उदासीनता आली होती; परंतु ते आल्यावर त्यांचें व आईचें कांहीं बोलणें झालें, यावरून आईलाहि ते दिवशीं मीं थोडीशी आनंदांत पाहिली. दादाहि त्या दिवशीं रोजच्यापेक्षां जास्त आनंदांत दिसला.

नंतर मध्यंतरीं आणखी कांहीं नवलविशेष न होतां सुमारें महिना दीड महिना गेला. बाबांच्याकडून एक दोन खुशालीचीं पत्रेंहि आलीं; आईची प्रकृति जो खालावली ती कांहीं फारशी सुधारेना. ती आतां अगदीं पहिल्याप्रमाणें झाली नाहीं; इतकेंच नव्हे, तर तिची प्रकृति क्षीण होत चालली व अंग दिवसानुदिवस पांढरें होत चाललें. ताप वगैरे तर नव्हता.

अशी स्थिति असतां बाबांकडून एक पत्र आलें, त्यांत मजकूर होता कीं, सर्व मंडळींना घेऊन पुण्यास राहण्याचा विचार ठरविला आहे, तेथें दादाची शिकण्यासवरण्याची सोय चांगली राहील, आणि सर्वच ठीक होईल. शिवाय आईच्या औषधपाण्याची व्यवस्था होण्यासहि पुणें फार चांगलें.

हें पत्र आल्यानंतर आम्हां साऱ्यांचें पुण्यास जाण्याचें ठरलें. बाबा आठ दिवसांनीं आम्हांस नेण्यासाठीं येणार होते, त्याप्रमाणें आले व आम्ही सर्व मंडळी पुण्यास येऊन राहिलों.

◆ ◆ ◆

# १५ : आमचें नवें घर

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

पुण्यास आम्ही सदाशिव पेठेंत कर्व्यांच्या वाड्यांत भाड्यानें राहिलों. याच वाड्यांत आणखीहि एका गृहस्थाचें बिऱ्हाड होतें. हा गृहस्थ असाच एका ऑफिसांत नोकरीवर असून त्याच्या घरांत त्याची आई, त्याची बायको व त्याचीं दोन मुलें इतकींच काय तीं माणसें होतीं. एक मुलगा होता तो सरासरी पांच वर्षांचा व मुलगी होती ती सुमारें माझ्या वयाची—कदाचित् थोडी लहान असेल ! तिच्या हातांत नव्याच कंगण्या-पाटल्या होत्या—मला वाटतें, हळदीचा पिवळेपणादेखील अजून गेला नव्हता—यावरून तिचें लग्न नुकतेंच झालें असावें असें दिसलें; परंतु माझ्या या चरित्राशीं या मुलीचा थोडाबहुत संबंध आहे; तेव्हां अर्थातच तिच्याबद्दल जास्तीकमती कांहीं लिहिण्याचा प्रसंग पुढें येईल. तिचें लग्न झालें हें सांगण्याचें कारण इतकेंच, कीं आमची आजी ( ती आमच्याबरोबर पुण्यास आलीच होती ) त्या मुलीला पाहिल्या दिवसापासून माझ्या लग्नाकरितां पुनः तळमळूं लागली. पुण्यास येऊन चांगले दोन महिने होईपर्यंत ती कांहीं-एक बोलली नाहीं; परंतु पुढें तिच्यानें राहवेनाच. तिनें बाबांच्याजवळ गोष्ट काढली माझ्या लग्नाची. बाबांनीं प्रथम होय, नाहीं, इतक्यांत कशाला पाहिजे, वगैरे बोलायचें तें बोलून शेवटीं ' बरं तर मी आतां पाहायला लागतों मुलगे ' असें तिला म्हटलें, तेव्हां आजीला मोठें समाधान वाटलें आणखी—आणखी—मी तरी आतां चोरून लपवून कशाला ठेवूं ? माझ्यादेखील मनाला अंमळ बरें वाटलें. ती दुर्गी-अगदीं माझ्या बरोबरीची, माझ्यापेक्षां वयानं लहानच—अन् तिचें लग्न झालेलें, हें पाहून, माझ्या मनालाहि आपलें लग्न केव्हां होईल असें त्या वेळीं वाटणें हें किती साहजिक आहे ! व तें होण्याचा आतां लवकर प्रसंग येणार असें कळण्याबरोबर मग आणखी काय पाहिजे ? मी आपल्या मनांत चांगली आनंदलें म्हटलें तरी चालेल.

आतां आपल्याला लोक पाहायला येतील. मग " मुली, तुझं नांव काय ? " म्हणून विचारतील; आपण खालीं मान घालून तितक्या हलकें—अगदीं कानांत बोलल्या-प्रमाणें—" यमू " असें उत्तर देऊं. आपल्या भावाचें नांव सांगूं. सारांश, विचारतील तें तें सांगूं आणि जा म्हटलें, कीं तेथून जाऊन दाराच्या आड लपून पुढें काय बोलतात तें ऐकूं-असे नाना तऱ्हेचे विचार—अर्थात् संतोष देणारे विचार-माझ्या मनांत येऊं लागले. कारण या सर्व सुखाचा अनुभव आतां आपल्याला खास येणार. आजपर्यंत मला पाहायला असे एकदाच आले होते. पण त्या वेळीं मीं तितकें लाजून उत्तर द्यावयास पाहिजे होतें तितकें लाजणें माझ्याकडून झालें नाहीं. याबद्दल आजीनें कानउघाडणी केली होती. ती मी पूर्वीं जरूर नसल्यामुळें जरी विसरलें होतें, तरी योग्य प्रसंग येतांच मला तें ताबडतोब आठवलें.

बाबांनीं आजीला अभिवचन दिल्यानंतर थोडेच दिवसांत आजीच्या खटपटीनें एक गृहस्थ मला पाहण्यास दुपारीं येणार होते, तर आजीनें स्वतः व दुर्गीकडून, मीं बोलावें कसें, बसावें कसें, पाहावें कसें, यांबद्दल कमींत कमी अगदीं दहा वेळ सांगितलें. दोन वेळां तर मजकडून त्याची हुबेहूब नक्कल करवूनहि पाहिली. दुर्गी पाहायला येणारा गृहस्थ बनली. आणि तिनें मला सुमारें दहा रीतींनीं दहा प्रश्न विचारले. तिला त्या गोष्टीचा अगदीं चांगला व ताजा अनुभव; यामुळें तिच्या शिक्षणापासून मला बराच उपयोग झाला. मी आईची सरी, ठुशी वगैरे घालून, वेणीफणी, काजळकुंकू जें काय करायचें तें करून अगदीं तयार होऊन वाट पाहात होतें. आजीहि त्या गृहस्थाची वाट पाहात होती. बाबा दुपारचे अंमळ पडत. ते जरा लवकर उठून बसले. खालीं कोणाचा जोडा वाजला, कीं ते गृहस्थच आले असें वाटून आजी तीनतीनदां "यमे" म्हणून मला हाका मारी व तितक्या वेळां मी दुर्गीच्या बरोबर तिच्या बिन्हाडांत पळून जाण्याची तयारी करी. इतकी सगळी आमची जय्यत तयारी झाली असतांना आणि त्या गृहस्थानें मुळींच येऊं नये, यासारखें त्याला लाजिरवाणें कांहीच नव्हतें; पण ती लाजिरवाणी गोष्ट त्यानें शेवटीं केलीच. तो नाहीं तो नाहींच आला. आजीची अगदीं निराशा झाली. त्यांत विशेष हें झालें, कीं बाबांनीं आपली विनाकारण झोप मात्र गमावली, अशाबद्दल आजीला बोलून दाखविलें! मग काय विचारतां? तिला त्या गृहस्थाचा इतका राग आला, कीं मी आपली मुलगी पुनः कधीं त्याला दाखवायचीच नाहीं असा तिनें निश्चय केला. माझी तर फारच निराशा झाली; कारण विशेष नीटनेटकें दिसण्यासाठीं मीं कितीतरी प्रयत्न केले होते! वेणीचे केस अगदीं तडतडतील इतकी तर ती आंवळायला सांगितली होती आणि त्याप्रमाणें घातल्यामुळें केस खूप तडतडत होतेहि; परंतु जोंपर्यंत पाहायला येणार-येणार अशी उमेद होती, तोंपर्यंत त्याबद्दल विशेषसें कांहीच वाटलें नाहीं; पण संध्याकाळ होत आली तसतशी ती वेणी जास्त तडतडून, तो गृहस्थ आतां खास येत नाहीं असें नक्की झाल्यावर तिच्या तडतडण्यास आणि माझ्या व आजीच्या चडफडण्यास अगदीं सुमार नाहींसा झाला. "यायचं नव्हतं तर सांगावं कशाला येतों म्हणून? कांहीं कोणी पायावर लोळण घेतली होती कीं काय?" असल्या प्रकारचे उद्गार आजीच्या तोंडून बाहेर पडत होते. अर्थात् त्यांचा प्रतिध्वनि माझ्याहि हृदयांत थोडाबहुत होतच होता; परंतु संध्याकाळीं एकंदर हकीकत आजीच्या तोंडून बाबांनीं काढली, त्यांनला इत्यर्थ इतकाच होता, कीं आजी तुळशीबागेंत गेली होती. तिथें तिच्या नव्या ओळखींपैकीं कोणा एका बाईनें सांगितलें, कीं माझ्या भाच्याचा पुतण्या फार चांगला आहे लग्नाचा, त्याला आपली नात देत असलां तर पाहा. मुलगा हुशार आहे. त्याच्या चुलत्याला सव्वाशें रुपये पगार आहे. मीं त्यांना सांगून उद्यां आदितवार आहे, आले तर देतें पाठवून मुलगीला बघायला. इतकें त्या बाईचें सहज बोलणें झालें. तें खात्रीपूर्वक समजून आजीनें जिकडे तिकडे दिली बातमी पसरून कीं, त्या गृहस्थानें अगदीं खात्रीपूर्वक येण्याचा निरोप त्या मामीबरोबर पाठविला आणि त्या गृहस्थाला पगार आहे ३५०

रुपये ! पुढें खराखरा एकंदर मजकूर पाहूं जातां बाबांना असें कळून आलें कीं, गृहस्थाचा खरा पगार फक्त पाऊणशें असून लग्नाचा मुलगा तो त्याचा तुळतुळत पुतण्या. त्यानें मेहेरबानीनें आपल्या त्या पुतण्याला निव्वळ विद्याभ्यासासाठीं जवळ बाळगलें आहे ! असो. परंतु परमेश्वराच्या कृपेनें मला पाहण्याला पुष्कळ मंडळी आली, आणि मला जी मुरके मारण्याची, लाजण्याची वगैरे हौस होती व मर्यादशीलपणा दाखविण्यासाठीं आपलें नांव सांगायचें तें देखील अगदीं कानांत सांगितल्याप्रमाणें उच्चारायची हौस होती तीहि अगदीं परिपूर्ण झाली.

◆ ◆ ◆

## १६ : पोरी, आतां तुझें होणार तरी कसें ?

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

काय असेल तें असो, आम्ही पुण्यास आल्यापासून आमचे पूर्वीचे सुखाचे दिवस गेले असें मला वाटतें. तितक्या त्या लहानपणीं मुलांच्या जातीप्रमाणें दुःखाचें कारण एकीकडे गेलें, कीं सुखच सुख असें होत असे, यांत नवल नाहीं; परंतु आज एकंदर मागें वळून पाहतांना मला असेंच वाटतें, कीं आम्ही आजोबांच्या घरीं जाण्याला निघालों तेव्हांपासून माझ्या दुःखाला प्रारंभ झाला; आणि त्याचा शेवट कशांत होणार हें अजून मला टवळीला पाहायचेंच आहे. आतां याच्यापुढें खरें सुख तें मला काय होणार हें माझें मला दिसतेंच आहे ! असो.

ह्या प्रकरणाला आरंभ करतांना माझ्या मनांत हे असले विचार येण्याचें कारण आमच्या आईची प्रकृति हें होय. आम्ही पुण्यास आल्यानंतर दोनतीन महिने तिची प्रकृति सुधारत चालली असें आम्हांस वाटलें, परंतु वास्तविक स्थिति तशी नव्हती. तिच्या अंगांत बारीक ताप होताच; त्याची हेळसांड केल्यामुळें म्हणा, किंवा काय झालें असेल तें असो; परंतु तिला आतां पहिल्याप्रमाणें कांहीं तकवा नव्हता, इतकेंच नव्हे तर दिवसानुदिवस तिला असें वाटूं लागलेलें दिसलें, कीं आपण थोडे दिवसांनीं मरणार. हें मी कशावरून म्हणतें, याचें कारण लवकरच आतां मी सांगणार आहें.

आईची प्रकृति याप्रमाणें दिवसानुदिवस क्षीण होत चालली, आणि त्यांत भरीला भर तर तिला डोहाळे लागले. त्या डोहाळ्यांच्या ओकण्यानें तर तिला फारच त्रास झाला. तशांत आणखी तिला अन्नहि जाईना. आधींच आतां तिची झोप थोडीबहुत कमी झाली, आणि सुंदरी तर फारच किरकिरी झाली. इतके दिवस तिला आजीचा सहवास होता, पण तिच्याजवळ कांहीं ती फार वेळ टिकत नसे. बाबांना आतां कांहीं उद्योग नव्हताच असें दिसलें, कारण ते आतांशा हपिसांत वगैरे कुठें जात नसत. याचें कारण

काय तें मला अद्यापि कळलें नव्हतें, आणि मलाच ज्याअर्थी, ज्या वेळची हकीकत मी लिहितें आहें त्या वेळपर्यंत कळलें नव्हते, त्याअर्थी वाचकांनाहि तें अगोदरच कळविणें मला रास्त दिसत नाहीं.

सुंदरी काय ती माझ्या एकटीच्याजवळ राही; पण मी कसली खेळाडू ! मीं तिला इकडे तिकडे थोडेंसें खेळवावें, आणखी आपल्याला खेळायला जाण्याची हुक्की आली, कीं तिला आईच्याजवळ टाकून शेजारी पळून जावें; या माझ्या कृत्याबद्दल मला पाठीमागून किती पश्चात्ताप झाला, हा जर माझ्या भगिनींना कळेल, तर त्या तसें कधींहि करणार नाहींत अशी माझी अगदीं खात्री आहे. ती किरकिरी पोरगी आपल्या आईला किती त्रास देत असेल, आणि त्यामुळें आधींच आजारी, त्यांत चिंतेनें ग्रासलेल्या आपल्या आईची काय स्थिति होत असेल, याचा जर विचार मला आतांप्रमाणें करतां येता, तर मग काय पाहिजे होतें ! परंतु माझें मोठें नशीब, कीं त्या सद्गुणी आईच्याच योगानें मी थोडे दिवसांत निवळलें, आणि माझा थोडासा तरी तिला उपयोग झाला.

एके दिवशीं दुपारीं सुमारें तीन वाजले होते. घरांत जिकडे तिकडे अगदीं सामसूम झाली होती. बाबा नुकतेच बाहेर गेले होते. आजीहि सुंदरीला घेऊन कोणा दूरच्या नातेवाइकाच्या घरीं गेली होती. दादा शाळेंत गेला होता. आई मात्र आमच्या आडव्या माडींत अगदी एकटी बसली होती. वास्तविक मी अशा वेळीं घरीं नसायचीच, परंतु शेजारची दुर्गी आपल्या सासरीं गेली असल्यामुळें आज जणूं काय माझा अगदीं इलाजच नाहींसा झाल्यामुळें, मी घरांतल्या घरांतच आपल्या घरकुलापाशीं खडबड करीत होतें. इतक्यांत मला असें वाटलें कीं, आई बसली त्या खोलींतून हुंदका आला असावा. काय आहे तें पाहावें असें अगदीं चटकन् मनांत येऊन माझे पाय आईकडे जाण्यास वळलेच, आणि आंत जाऊन पाहतें तों आई आपल्या अंथरुणावर पडली असून भिंतीकडे तोंड करून रडत असावी असें दिसलें. ती एक माझ्यासाठीं आणि एक आजीसाठीं अशा दोन नव्या चोळ्या शिवीत बसली होती. ते खणाचे तुकडे तसेच इकडे तिकडे पडले होते. ते तिनें गोळा करून गुंडाळूनहि ठेवले नव्हते. सुईदोऱ्याचें फणेरें तसेंच उघडें असून त्याला सुई कशीतरी उभीच खोचली होती. हें आहे तरी काय ? असें मनांत येऊन मी क्षणभर बुचकळ्यांत पडल्यासारखी दारांतच उभी राहिलें. आतां तिचे हुंदके मला ऐकूं आले नाहींत, तरी पण ती रडते आहेच असें तिच्या सुस्काऱ्यांवरून वाटलें, आणि एकदम तिच्याजवळ गेलें, व " आई " असें म्हणतें तों माझी नजर तिच्या अंबाड्याकडे गेली, ( ती आजारी पडल्यापासून आतां वेणी बहुतकरून घालीत नसे. ) त्यांत एक सुई खोचून ठेवलेली होती. मीं हाक मारण्याबरोबर तीं वळून मजकडे पाहणार तोंच वर सांगितल्या-प्रमाणें माझी नजर त्या अंबाड्याकडे जाऊन मीं ती सुई पाहिली म्हणून बरें झालें; नाहीं तर ती सुई तिच्या मानेला खास लागली असती. तापामुळें आधींच तिचे पुष्कळसे केस गेले होते, आणि मला वाटतें, दुःखाचा उमाळा येण्याबरोबर अंथरुणावर पडण्यासाठीं

घाईघाईनें उठतांना तिनें ती सुई अंबाड्यांत खोंचून ठेवली, ती अंमळ खालींच खोचली गेली. असो; पण नशिबानें माझी नजर तिकडे जाऊन तें अरिष्ट टळलें. मीं चट्कन् ती सुई काढून घेतली आणि त्या फणेऱ्याला टोंचून ठेवायला गेलें. तोंडानें " आई, काय झालं तुला ? तूं रडतेस कीं ? " हा प्रश्न मी उच्चारीतच होतें व वळून पुनः आईच्या जवळ गेलें, तों तिनें मला पट्कन् धरलें आणि अगदीं जवळ पोटाशीं घेऊन ती म्हणाली, " पोरी, आतां तुझं होणार तरी कसं ? "

इतकें म्हणून पुनः तिच्या डोळ्यांतून खळकन् पाणी येऊन तें माझ्या गालावर पडलें आणि मलाहि रडूं येऊन मी अधिकच तिच्या कुशींत शिरलें. तिनेंहि मला अगदीं घट्ट पोटाशीं आवळून धरलें व ती कांहीं वेळ स्तब्ध उभी राहिली. मला तें सर्व पाहून फारच रडूं येऊं लागलें, इतक्यांत तिनें माझें तोंड कुरवाळून म्हटलें, "पोरी यमे, माझ्या पाठीमागें तुझं कसं काय ? तो गणू मुलगा आहे, झालं म्हटलं तर त्याला आतां समजायला लागलं आहे. तो पाहा बरं आतांशा कसा—" इतकें बोलून ती थांबली. माझें रडूं चाललेंच होतें. तिनें मला उगी केलें आणखी पुढें म्हणाली, " यमे, तूं आतां लहान नाहींस, तुला आतां सगळं समजावं, पण समजत नाहीं याला काय करावं ? तुला घरांतलं कामधाम कांहीं सुचत नाहीं. तुझं सासरीं होणार कसं ' ल्याहायला वाचायला शिकावं थोडंसं, तें तरी तुझ्या कधीं मनांत येतं ? अग, माझं जर उद्यां कांहीं बरंवाईट झालं ( हे शब्द उच्चारतांना तिचा गळा किती दाटून आला होता हें एक मला कीं तिचें तिलाच ठाऊक ! दुसऱ्या कोणाला सांगून अगर वर्णन करून कधींहि ध्यानांत येणार नाहीं ) तर मला दुसऱ्या कोणाबद्दल कांहीं वाटावयाचं नाहीं. गणूचं गणूला समजायला लागलं आहे, अन् थोडंबहुत त्याला जरी न समजलं तरी त्याला कांहीं दुसऱ्याच्या घरीं नांदायला जायचं नाहीं. पण तुला दुसऱ्याच्या घरीं नांदायला जायचं आहे, समजलीस ? काय करावं आतां तुला ? कांहीं सांगेन–शिकवीन, तर तूं माझ्या धाऱ्यालादेखील उभी राहीनास; अंमळ सुंदरीला खेळवायचं तेंदेखील तुझ्या जिवावर येतं. पण पोरी, असं नाहीं बरं उपयोगी ! आपल्या बायकांच्या जातीला असं असल्यावर निभाव कसा लागणार ? तूं खेळ. खेळायला कोण नको म्हणेल ? पण इकडे पाहा, सारा दिवस जर दंगा करीत बसलं, तर मग कांहीं शिकायचं सवरायचं तें केव्हां ? तुला कितीकदा सांगितलं कीं, तूं शाळेंत जात जा म्हणून; तर तूं आजीकडे जाऊन रडत बसतेस. बरं, नाहीं तर नाहीं शाळा, पण माझ्याजवळ तरी बसून चार अक्षरं शीक, कांहीं शिवायटिपायला शीक. अग, हे दिवस जाऊन एकदा सासरीं जाऊं लागलीस म्हणजे कांहींतरी येईल का ? मग आईबापांची शिक्षाच ही अशी, म्हणून आमच्या–" ती पुढें कांहीं बोलणार तोंच मला फार मोठ्यानें हुंदका येऊन मी तिच्या गळ्याला घट्ट मिठी मारून एकदम ओक्साबोक्शीं रडूं लागलें. आजपर्यंत आई मला असें कधीं बोलली नव्हती, आणि आज बोलत होती तें रागाचं मुळीच नसून निव्वळ तिच्या पोटांत भडभडून येऊनच बोलत होती. मग तिच्या मनांत काय विचार आले असतील आणि

काय नाहीं हें एका परमेश्वरासच ठाऊक ! परंतु त्या वेळच्या तिच्या बोलण्याचा माझ्या मनावर फारच विलक्षण परिणाम झाला. मला, आपण आजपर्यंत आईचें ऐकलें नाहीं, तिच्या मर्जीविरुद्ध वागलों याबद्दल फार वाईट वाटलें, आणि आतां यापुढें मुलीदेखील न खेळतां आईच्याजवळ बसून ती सांगेल शिकवील तें मन लावून ऐकायचें व ती सांगेल त्याच्याबाहेर अगदीं म्हणून जावयाचें नाहीं, असा मीं कट्टा निश्चय केला.

मनुष्य जितके निश्चय करतो, त्यांतले फारच थोडे त्याच्या हातून शेवटास जातात; त्यांतून पोरपणीं तर निश्चयाप्रमाणें वागणें कसें तें मुळींच माहीत नसतें म्हटलें तरी चालेल. हा अनुभव प्रत्येकाला असेलच. कोणीं रागें भरलें, कीं तेवढ्यापुरतें फारच वाईट वाटून पुनः तसली चूक करायची नाहीं, असा निश्चय पोरपणीं आपण करतों, परंतु असले निश्चय खरोखर टिकतात किती, याचा जर आपण आढावा काढून पाहिला, तर शेवटास न गेलेल्या निश्चयांची संख्या पाहून आपणांस हसूं आल्यावांचून राहणार नाहीं.

तथापि कांहीं कांहीं वेळप्रसंग असेच असतात, कीं त्या वेळीं केलेला निश्चय आपण होतां होईल तो शेवटास नेतों. वर सांगितलेला मजवरचा प्रसंग अशाच तऱ्हेचा होता; मग त्या वेळीं केलेला माझा निश्चय कितपत शेवटास गेला आणि कितपत नाहीं हें आतां माझ्या येथून पुढल्या चरित्रावरून दिसून येणारच आहे.

वर सांगितल्याप्रमाणें मनांतल्या मनांत निश्चय करून मी थांबलें नाहीं. लागलीच आईला त्याप्रमाणें बोलून दाखविलेंहि आणि त्या वेळीं बोलून दाखविल्याप्रमाणें अगदीं करण्याचा माझा निश्चयहि झाला. त्यांतल्या त्यांत वाचायला शिकण्याचा माझा निश्चय फारच दृढ होता.

आपल्या मनांत केलेले सर्व निश्चय आईला बोलून दाखविल्यानंतर माझ्या मनाला थोडेंसें समाधान वाटलें, हें सांगायला पाहिजे असें नाहीं. आपल्या हातून एखादी चांगली गोष्ट झाली म्हणजे आपल्यास फार समाधान होतें, याचा अनुभव पुष्कळांस असेलच ! आजचे निश्चय म्हणजे फारच चांगल्या गोष्टी होत्या. एक निश्चय केला होता, तो तर इतका चांगला होता, कीं तो नुसता केल्यामुळेंच मला आनंद झाला. मग शेवटास गेलेला, किंबहुना थोडाबहुत पार पडलेला पाहून मला पुढें किती आनंद झाला असेल याचा सुमारच नाहीं. तो निश्चय कोणता म्हणाल तर, आपल्या आईचें एकूणएक ऐकायचें, तिच्या आज्ञेबाहेर यत्किंचित्‌देखील जायचें नाहीं, हा होय. हा निश्चय दादानें व मी मागें एके दिवशीं केला होता, हें वाचकांस आठवत असेल; परंतु तो त्यानें फार पाळला आणि मीं पाळला नाहीं. तो तेव्हांपासूनच समजूत आलेल्या मोठ्या पुरुषाप्रमाणें वागूं लागला. आतांशा तो आमच्यांत खेळायला येईनासा झाला. दिवसभर आपल्या लिहिण्यावाचण्यांत निमग्न असे. मी होऊन त्याच्याजवळ जाऊन कांहीं ‘ बाहुली करून दे ’ किंवा ‘ डबा अगर होडी करून दे ’ अशी पाठीस लागलें, तर त्यानें तेवढ्यापुरता तेवढा वेळ घालवावा; परंतु पुनः आपल्या उद्योगाकडे वळावें. तसेंच तो आपला बराच

वेळ आईच्या जवळ बसून काढी. त्याच्याप्रमाणेंच आपण करावें असा बेत करून मी त्याप्रमाणें करूंहि लागलें.

दुसरेच दिवशीं दादाच्या पाठीस लागून मीं एक पहिलें पुस्तक आणविलें आणि दुपारच्या प्रहरीं आईजवळ बसून शिकूं लागलें. त्याचप्रमाणें तिनें किंवा आजीनें कांहीं सांगितलें तरी हूं कीं चूं न करतां आपल्याकडून होईल तसें काम करण्यास सुरुवात केली. ते दिवसापासून माझ्यामध्यें अतिशय फरक झाला. मी अगदीं खेळत नसें असें नाहीं. पोरीच्या जातीला खेळणें अगदीं अवश्य तेवढें मी खेळतच असें; परंतु पहिल्यानें जसा खेळण्याखेरीज दुसरा कांहीं चाळाच नसे, तसें आतां राहिलें नाहीं, त्यामुळें दररोज मला अधिकाधिक समाधान वाटूं लागलें. आतां आपलें ज्या माणसावर अतिशय प्रेम असतें त्याला समाधान झालेलें पाहिलें म्हणजे आपल्याला किती आनंद होतो! तो आनंद मला त्या वेळीं प्रथमतः अनुभवण्यास सांपडला. त्यानंतर तसला आनंद मला अनेक वेळां अनुभवण्यास मिळाला; परंतु त्या सगळ्यांचें श्रेय माझ्या वर सांगितलेल्या निश्चयाला व आईला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मीं अशी निवळलें हें पाहून आईला व घरांतल्या सगळया माणसांना फार फार आनंद झाला, असें सर्वांच्या बोलण्याचालण्यावरून मला कळून आलें. त्यांतून मी आजीला कांहीं कामबीन करूं लागूं लागलें आणि एखादें काम चांगलें निर्मळ तिच्या मनासारखें केलें म्हणजे तर तिला असें होऊन जाई, कीं कांहीं पुसूं नये. तिनें ते दिवशीं माझी दृष्ट काढलीच म्हणून समजावें आणि असें कांहीं झालें, म्हणजे मला तर फारच समाधान वाटे. अशा समाधानांत खरोखर काय सुख आहे, हें अनुभवावांचून कोणासदेखील कळणार नाहीं. तें समाधान अगदीं अवर्णनीय आहे. दिवसभर हुतुतू घालायला मिळून हवें तसें नाचायला मिळालें आणि हव्या तितक्या भातुकल्या खेळायला मिळाल्या तरी जें समाधान होत नाहीं, असलें समाधान, एखादें बारीक काम वडिलांच्या मर्जीप्रमाणें केल्यामुळें संतुष्ट होऊन त्यांनीं केलेल्या स्तुतीनें होतें. माझ्या इतक्या वयाच्या मुलींनीं तर काय, परंतु अगदीं मोठमोठ्या माणसांनीं अनुभव घेऊन पाहावा.

मी निश्चय केल्या दिवसापासून अगदीं एकदम निवळलें. आज अगदीं अल्लड खेळाडू पोरगी होतें, आणखी उद्यां पोक्त बाईसारख्या शहाणपणाच्या गोष्टी सांगून संसार करूं लागलें असें नाहीं; मीं जें केलें तें इतकेंच, कीं आईपासून फारशी दूर गेलें नाहीं. पहिल्यानें जशी हातावर पाणी पडलें न पडलें तों धाव पळ दुर्गीच्याकडे, नाहीं तर पलीकडच्या घरीं कुठें तरी जा, असें व्रत होतें तें सोडलें; मग काय विचारतां? माझ्या आईसारख्या आईजवळ नेहमीं ज्यांना बसण्यास व वेळच्या वेळीं आपण कुठें चुकतों तें कळून, केव्हां काय करावें, कसें करावें याच्याबद्दल मोठ्या प्रेमानें केलेला थोडथोडा उपदेश ऐकून तो मनांत सांठवून ठेवण्यास सांपडत असेल, त्यांच्या भाग्याची थोरवी काय आहे ती मला तेव्हांच कळली. माझ्या हातून एवढीशी चूक होवो कीं मोठी थोरली

चूक होवो तिनें मुळींदेखील न रागावतां अगदीं शांतपणानें माझी चूक माझ्या अगदीं चांगली नजरेस आणून देऊन त्याबद्दल चार शब्द सांगावे.

तिनें वेळोवेळीं केलेला उपदेश मी आठवून आठवून जर लिहूं लागलें तर त्याचें एक पुस्तकच होईल आणि मला तरी निदान वाटतें, कीं असें पुस्तक झालें तर तें कांहीं वावगें होणार नाहीं. त्याच्यापासून माझ्या लहान लहान बहिणींना फारच उपयोग होईल. परंतु माझ्या चरित्रांत तें लिहिणें कदाचित् कंटाळवाणें होईल, तेव्हां मी तें लिहिण्याच्या भानगडींत न पडतां उगीच केव्हां केव्हां मात्र त्यांतले मासले म्हणून देत जाईन म्हणजे झालें.

अगदीं यःकश्चित् गोष्ट ! परंतु तेवढ्यावरून तिनें मला किती चांगला उपदेश केला, याचें एकच उदाहरण मी या ठिकाणीं सांगून देतें. तें आतां मला चांगलें आठवलें आहे. पुनः कदाचित् अगदीं विसरून जाईन. कांहीं नाहीं, एक दिवस सकाळीं आईनें माझी वेणी घातली; मीं तोंड पुसून कुंकूं लाविलें आणि आपली धुतलेली परकरचोळी घेऊन खालीं अंग धुण्याला गेलें. त्यानंतर मी कितीक वेळां आईच्या माडींत आलें गेलें पण तिच्या उशाच्या बाजूला एक समई थोडी वाटेंत असल्यासारखी होती, आणि अगदीं उशाच्या तिथें वेणी घालायचें सामान—फणी, करंडा, काजळाची डबी, तेलाची बाटली, आरशी वगैरे सगळ्या जिनसा तशाच अस्ताव्यस्त पडल्या होत्या. आतां मीं सांगितलेंच, कीं मी त्या खोलींत कितीकदा तरी आलें असेन, इतकेंच नव्हे, तर त्या समईच्या अगदीं जवळून त्या सामानाला लाथाडूनदेखील गेलें असेन, परंतु ती समई उचलून म्हणजे समयांच्या कोपऱ्यांत ठेवावी, किंवा तें वेणीफणीचें सामान त्याच्या करंडींत भरून जिथल्या तिथें ती नेऊन ठेवावी हें कांहीं मला मुळींदेखील सुचलें नाहीं. माझ्या दहापांच खेपा झाल्या तरीदेखील तें मला सुचलें नाहीं हें पाहून कीं काय कोणास ठाऊक ! पण आईनें मला एकदा हाक मारली, आणखी म्हणाली, " यमे, तूं वेणी घालून गेल्याला किती वेळ झाला बरं ? " मी कांहींच बोललें नाहीं. आधीं मला तिच्या प्रश्नाचा झोकदेखील कळला नाहीं. मी कांहीं बोलत नाहींसें पाहून ती मला आणखी म्हणाली, " पोरी, आपण निजून उठल्याबरोबरच ती समई उचलून जिथल्या तिथं नेऊन ठेवायची, एवढं तुला समजलं नाहीं ना ? बरं शेवटीं वेणी घालून कुंकूं लावून कोण गेलं ? तूंच ना ? मग हें सामान करंडींत भरून करंडी जिथल्या तिथं कोनाड्यांत कोण नेऊन ठेवील ? अग, हीं कामं म्हणजे अगदीं जातांयेतांचीं; ज्याचीं त्यालाच सुचलीं पाहिजेत. मघांपासून मी पाहतें आहें बरं हिच्या कांहीं मनांत येतं का ? कामाचं धोरण राखावं लागतं तें हेंच. जातां येतां—कुठें कांहीं पडलं झडलं नीट उचलून जागच्या जागीं ठेवून, नाहीं तर ज्याचं कोणाचं असेल, त्याच्या स्वाधीन करून असं वागावं, नाहीं तर लोक वेंधळी म्हणतात. तें बघ तिथं सुंदरीचं अंगडं पडलं आहे. असं कांहीं सासरीं दिराननंदांचं पडलं असलं तर उचलावं, सवरावं, धुवायबिवायचं असलं तर

धुऊन टाकावं. कामाच्यासंबंधानें अंगाखांद्याकडे पाहूं नये, जें काय कोणी सांगेल, किंवा आपल्याला सुचेल, तें आपलं करून सोडावं. ' हिला कामच सुचत नाहीं. तिला कामच करायला नको. पोशीच आहे ! ' असलीं बोलणीं ऐकून घेण्याची पाळीच आणूं नये. अग, हीं असलीं कामं फार का असतात पोरीच्या जातीला ! पण तेवढ्यांतच जर कां चुकलं, तर मग झालंच म्हणून समजावं--"

असे एक ना दोन ! हजारों प्रसंग येऊन त्या माउलीनें मला माझें हित कशांत आहे, हें सांगितलें. शिवाय दुपारच्या प्रहरीं ती मला वाचायला शिकवी, तेव्हां जर कांहीं प्रसंग आला, तर ती कधींहि तो वायां जाऊं देत नसे; यामुळें पुढें पुढें मला खेळायलादेखील जावेंसें वाटेनासें होऊं लागलें. एकदा दोनदा तर मीं खरोखर दुर्गी बोलवायला आली असतां तिला ' येत नाही ' म्हणून सांगितलें. तिनें शेवटीं आईकडून मला सांगवून नेलें.

माझी आजी कांहीं इतकीहि नव्हती; तिनें मला पुराणांतल्या गोष्टी सांगून रिझवावें एवढेंच. त्या वेळीं तें आपलें रिझवणें एवढेंच वाटे; परंतु पुढें त्या पुराणांतल्या गोष्टींचाहि मला फार फार उपयोग झाला. असो.

पुण्यास आल्यावर अशा तऱ्हेनें आमची दिनचर्या चालली होती. आईची प्रकृति दिवसानुदिवस विशेष बिघडत चालली असें दिसूं लागलें. बाबांनीं वैद्य वगैरे आणले, परंतु ती गर्भारशी असल्यामुळें ' औषध देतां येत नाहीं, बाळंत झाल्यावर पाहूं ' असें कायसें त्यांनीं सांगितलें. कांहीं चाटणेंफाटणें मात्र त्यांनीं दिलीं आणि ती तीं घेतहि असे; परंतु ती आतां या बाळंतपणांतून धड कशी काय उठते, याचा मोठा विचारच होता. कारण जसजसे दिवस होत चालले तसतसा तिला गर्भारपणाचा विशेष त्रास होत गेला असें दिसलें. तिनें कधीं त्याबद्दल बोलून दाखविलें नाहीं, कधीं कुरकूर केली नाहीं. परंतु तिला त्रास होत असावा असें उघड उघड दिसत होतें. एक तर तिच्या हातापायांस व गालांस थोडीशी टापशी आली होती असेंहि दिसलें. पुढें पुढें तर ती सूज चांगली दृष्टीस पडे. त्यावरूनच कीं दुसऱ्या कांहीं चिन्हांवरून असेल, आजी बाबांच्या जवळ बोलत असतांना " आतां हें काय होणार आहे कांहींच समजत नाहीं. पण चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं, " असें म्हणाली व त्यावर बाबा सुस्कारा टाकून " हूं अं ? काय नशिबीं असेल तें होईल ! " असें म्हणाले. आमच्या बाबांच्या तोंडून असले शब्द निघणें हें मोठें विलक्षण होतें. कारण ते मनाचे मोठे निष्ठुर होते. मात्र आमच्या आईच्या संबंधानें सगळी गोष्ट निराळी होती. कांहीं असो, आतां सांगितलेले दुःखाचे उद्गार त्या वेळीं निघाले ही गोष्ट अगदीं अक्षरशः खरी आहे.

हें आजीचें व बाबांचें संभाषण जे दिवशीं मीं ऐकलें, ते दिवशींच दादाला एकीकडे गांठून त्याला सांगितलें. आतांशा तो आणखी उदास होत चालला होता. तरी पण माझ्याशीं अगदीं आनंदानें बोलला आणि बोलतहि असे. त्याचें माझें मी

सांगितलेल्या हकीकतीवरून थोडेंसें बोलणें झालें. त्याचें व माझें असें मीं म्हटलें आहे, त्यापेक्षां माझें एकटीचेंच म्हटलें तर विशेष शोभेल. कारण माझ्या तोंडून ती हकीकत ऐकून तो अगदींच स्तब्ध बसला. उगीच दोनचार शब्द बोलला असेल नसेल. त्या हकीकतीमुळें त्याला कांहीं दुःख होणारी गोष्ट आठवून त्याचा चेहरा मालवल्यासारखा झाला असावा. मग आईची धडगत दिसत नाहीं, ती आपल्याला सोडून जाणार, असें त्याला आधींपासून वाटत असून त्यांत मीं सांगितलेल्या या हकीकतीनें विशेष खात्री झाली कीं काय, कांहीं समजेना. असो.

एकंदरींत आईच्या प्रकृतीचें वगैरे मान व आमच्या घरची एकंदर स्थिति याप्रमाणें होती. एवढें सांगून मी इतर कांहीं गोष्टींकडे वळतें.

◆ ◆ ◆

## १७ : मला पाहायला येतात

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

इतक्या सगळ्या घरांतल्या काळज्या होत्या खऱ्या, पण आजीचा माझ्या लग्नाबद्दलचा नाद चालू होताच. आणि काय असेल तें असो, बाबाहि आतांशा तिला होस हो देऊं लागले होते. त्यांचा तो पहिला आग्रह—माझें इतक्या लवकर लग्न न करण्याबद्दलचा—आतांशा फारसा दिसला नाहीं. तथापि लहानपणीं लग्नें करूं नयेत, मुलीला निदान बारावें वर्ष लागलें पाहिजे, असें त्यांचें मत होतें असें दिसलें. कारण, कोणी स्नेहीमंडळी आली म्हणजे त्यांच्या गप्पा चालत, त्या वेळीं त्यांचे तोंडून तसे उद्गार ऐकलेले मला आठवतात. या त्यांच्या बोलण्यावरून एका गृहस्थानें एक दिवस त्यांना विचारलेंदेखील, कीं " असं जर तुमचं मत आहे, तर मग तुम्ही आपल्या मुलीच्या लग्नाबद्दल कां एवढी गर्दी करतां ? " त्या वेळीं त्यांनीं असें उत्तर दिलें,—" अहे आमच्या म्हातारीचा नाद, ती करते आहे खटपटी; होईल जाईल तें अजून लांबच आहे ! " असो. त्यांचें मत कसेंहि असलें, तरी पण माझ्या लग्नाबद्दल थोडयाबहुत खटपटी चालू होत्याच. आजीच्याबरोबर देवळाविवळांत मी गेलें असलें तर त्या ठिकाणीं बायकांत या गोष्टी निघायच्या नाहींत कसें कधींच व्हायचें नाहीं.

सरतेशेवटीं एका रविवारीं दुपारीं दोघेतिघे गृहस्थ आणि त्यांच्याबरोबर एक पंधरा सोळा वर्षांची मुलगी व एक विधवा बाई—वृद्धशीच होती—इतकी मंडळी आमचे घरीं आली. मंडळी अगदीं अकल्पित आल्यामुळें आजीची अगदीं त्रेधा उडाली. इतक्यांत बाबांनीं दादाला हाक मारून ' यमीला घेऊन ये रे ! ' म्हणून सांगितलें. त्या वेळीं माझ्या मनांत काय झालें आणि काय नाहीं माझें मलाच ठाऊक ! ' मी कधीं भ्यायची नाहीं. उत्तर अगदीं खडखडीत देईन, ' असें जें दुर्गीजवळ केव्हां, केव्हां, ती

माझी थट्टा करूं लागली म्हणजे मी म्हणें, तें सर्व विसरलें आणि थोडीशी घाबरलें. तरी पण जें पाहिजे होतें तें मिळाल्यावर जसा आनंद होतो, तसा थोडाबहुत गुप्त आनंदहि मला झाला.

दादा मला आतां बोलवायला येतो असें पाहण्याबरोबर मी जवळ होतें तरी पळून अगदीं मागील दारीं गेलें. तो मला शोधीत शोधीत तेथें आलाच, आणि त्यानें मला 'तुला पाहायला आले आहेत, चल' असें म्हटलें. इतक्यांत आजीनेंहि मला हाका मारल्या. मीं बराच वेळ ऊं ऊं करून ओढून चंद्रबळ आणलें. शेवटीं मला पाहायला आले आहेत, ही बातमी लागून दुर्गीहि धावत आली व तिनें मला ओढून घरांत नेलें, आणि माझे केसबीस विसकटले होते ते आजीनें फणी घेऊन नीट केले. माझें ऊं ऊं चाललेंच होतें. दुर्गी मला 'अग अग म्हशी, अन् मला कां नेशी' असें म्हणून माझी थट्टा करीतच होती. शेवटीं कोरा परकर, कोरी चोळी वगैरे नेसून तयारी झाली. आजीनें लागलीच मला पाहून "कशी पण माझी बाई दिसते आहे, कोण नांवं ठेवणार आहे हिला! दुर्गे, तीट लाव ग हिला, नाहींतर दृष्टबिष्ट लागायची एखादी!" असें ती म्हणते आहे तों दुर्गीनें तीट लावलीदेखील. इतक्यांत दादा पुनः मला हांक मारायला आला, आणखी ती विधवा बाई आईच्या जवळ बसली होती, तिनेंहि आजीला हाक मारली. नंतर सारी मंडळी बाबांच्या बसायच्या जागीं गेली. दाराजवळ जातां जातां लाजून लाजून माझी अगदीं मुरकुंडी वळली. शेवटीं दुर्गीनें पुढें होऊन माझा हात धरून मला ओढल्यासारखें केलें आणि मग मात्र मी आंत गेलें. आंत जातांच बाबांनीं मला जवळ बोलावलें आणि त्या पाहायला आलेल्या गृहस्थांपैकीं सगळयांत वृद्ध गृहस्थानें मला बसण्यास सांगितलें. दुर्गी मोठी धिटकुली, तीहि माझ्याजवळ उभी राहिली आणि मला नीट बसण्याविषयीं व वर बघण्याविषयीं, माझें अंग डंवचून खुणा करीत होती. मला 'खालीं बस' म्हणून सांगितल्याबरोबर मी एक दोन मुरके मारून उकीडवी बसलें आणि खालीं जाजमाकडे डोळे लाविले. जणूं काय मला पाहायला आलेल्या लोकांना फक्त माझें डोकेंच पाहायचें होतें. इतक्यांत एका गृहस्थानें मला "वर पाहा पाहूं!" असें म्हटलें; त्यानें असें म्हटल्यावर तर मला मुळींच वर मान करवेना. मी अगदीं एकसारखी मान खालीं घालून बसलें. जशी कांहीं जाजमावरल्या पटाचीं घरें मोजण्यांत मी अगदीं गढून गेलें आहें. इतक्यांत आजी, ती विधवा बाई, आणखी त्या बाईबरोबर आलेली ती १५।१६ वर्षांची मुलगी—सगळया तेथें आल्या. तेव्हां त्या पाहायला आलेल्या गृहस्थांपैकीं सगळयांत तरुण गृहस्थ असा मुलगेलासाच होता, तो त्या मुलीला उद्देशून म्हणाला, "वारुबाई, पाहिली का भावजय? येते का मनास?" हे त्याचे शब्द ऐकण्याबरोबर मला आपली भावी नणंद पाहण्याची इच्छा होऊनच कीं काय, मीं हळूच वांकडया नजरेनें त्या मुलीकडे पाहिलें, तों ती "इतक्यांत झाली का आमची भावजय?" असें म्हणाली, व तो वृद्ध गृहस्थ, "वाहवा! बाजार भरला नाहीं तोंच कमरा बांधतां का?" असें म्हणून आपणच हसायला लागला. अर्थात् सर्वजणांना हसावें लागलें; परंतु

तितक्यांत त्यानें मला पुनः वर पाहण्यास सांगून माझें नांव विचारलें. मी अगदीं तोंडांतल्या तोंडांत 'यमू' असें उत्तर दिलें व वर मुळींच पाहिलें नाहीं. तेव्हां त्या दुर्गीनें 'हें काय ? मोठयानें बोल' असें म्हटलें व मला मोठयानें डंवचलें. मला मोटा त्या वेळीं संताप आला. इतक्यांत बाबांनीं व त्या वृद्ध गृहस्थानेंहि मोठयानें बोलण्यास सांगितलें. शेवटीं मनाचा हिय्या करून मोठयानें आपलें नांव सांगितलें. तितक्यांत त्यानें दुसरा प्रश्न केला; तो—मला भावंडें वगैरे किती आहेत, असा होता. त्याचेंहि उत्तर मीं दिलें. एक-दोन उत्तरें देण्याबरोबर मला जरा धीर आला आणि आतां वर वगैरे पाहायला कांहीं हरकत नाहीं असें मनाला वाटून, आतां कोणी वर पाह्यला सांगितल्यास चटकन् पाहायचें असा बेत करतें तोंच तो मुलगेलासा गृहस्थ विचारतो, "तुला कांहीं वाचायबिचायला येतं का ?"

तो त्या गृहस्थाचा प्रश्न ऐकून माझ्या मनाला काय वाटलें असेल बरें ! आतां उत्तर काय द्यावें, या विचारांत मी पडलें. 'होय' म्हणावें तर मला अजून चांगलेंसें वाचतां येत नव्हतें, नाहीं म्हणावें तर आपली फजितीच आपल्या तोंडानें सांगणें आहे; त्या बोलघेवडया दुर्गीनें मला उत्तर देण्याची पाळीच आणली नाहीं. तिनें आपणच झट्कन् म्हटलें, "हो, ती अशी फडाफड बुकें वाचते कीं यंव् ! आणूं का मी तिचें एखादें बूक ?" इतकें बोलून, माझ्या टंवकारून पाहण्याकडे यत्किंचित्‌देखील लक्ष न देतां ती तडक दादाच्या अभ्यासाच्या जागेकडे धावत गेली. मला त्या वेळीं तिचा असा राग आला कीं कांहीं पुसूं नये ! पण काय करावें ! त्या वेळीं अगदीं सांपळयांत सांपडलेल्या वाघाप्रमाणेंच माझी स्थिति झाली होती. तिला या वर्तनाबद्दल जें काय शासन करायचें तें अगदीं मनांत दाबून ठेवावें लागलें. त्या वेळीं मीं तिचें शासन जें काय केलें तें फक्त चोरून डोळे वटारले आणि तशा दृष्टीनें हलकेंच तिच्या पळणाऱ्या मूर्तीकडे पाहात होतें. आतां हा राग एवढा काय म्हणून आला म्हणाल, तर माझ्या मनांत आपल्याला वाचतां येतें हें त्यास कळूं नये असें होतें म्हणून नव्हे; बरें, कळावें असें माझ्या मनांत होतें असेंहि नाहीं. खरें जर पुसाल तर मला थोडेंबहुत दुर्गीच्या वर्तनाबद्दल बरेंदेखील वाटलें असेल; पण तें मी आपल्या मनापासून लपवून ठेवायला पाहात होतें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. असो. पण बाबांनीं तर दुर्गीच्याहीपेक्षां कमाल केली. आपली ही पोरगी किती विलक्षण हुशार आहे हें दाखविण्याच्या उत्सुकतेनेंच कीं काय, पट्कन् एक शेजारचें वर्तमानपत्र माझ्यापुढें करून 'हं हें घे; दाखव भराभर वाचून पाहूं !' असें म्हटलें. वर्तमानपत्र पुढें येतांच त्या तरुण मुलानें तें पट्कन् उचललें आणि त्यांत एक पत्र होतें तें वाचण्यास सांगितलें, माझी आतां मात्र फारच त्रेधा उडाली. अंगाला घाम सुटला, असें म्हटलें तरी खोटें होणार नाहीं. आधींच मला वाचतां येत नाहीं असें मला वाटत होतें आणि त्यांत आतां मी घाबरल्यासारखी झालें. आपली ही परीक्षेची वेळ मोठी कठीण आहे असें वाटून मन मोठें चमत्कारिक झालें. इतक्यांत दुर्गाबाईहि ठमकत आल्या, आणि 'हें घ्या एक बूक' म्हणून म्हणल्या. तेंहि पुस्तक त्या तरुण मुलानें

आपल्या हातीं घेतलें; तेव्हां आतां यांतूनहि हा आपल्यास कांहींतरी विचारणार असें मला वाटलें. दुर्गाबाईंनीं बोटांनीं डंवचून व बाबांनीं आणि आजीनें " हं चल वाच; लाजायला काय झालं ? " असें म्हणून माझी अगदीं पाठ पुरविली. शेवटीं एकदां तोंड उघडून घाबरत घाबरत वाचूं लागलें. बाबा " घाबरूं नको, नीट वाच " म्हणून उत्तेजन देतच होते; दहावीस ओळी वाचतें तों तो तरुण मुलगा मला थांबण्यास सांगून ' वर्तमानपत्र मिटून काय वाचलें तें सांग ' म्हणून विचारूं लागला; तों ती त्याच्याबरोबर आलेली वृद्ध बाई झट्कन् म्हणते, " पुरेरे ! तिची काय परीक्षा घेतोस कीं काय ? पुरे झालं वाचून घेतलं तेवढं. मुली, तूं आपली जा आंत आतां ! " तें ऐकण्याबरोबर मला अगदीं सुटल्यासारखें वाटलें; परंतु तितक्यांत त्या वृद्ध गृहस्थानें ' मुली, ऊठ पाहूं ' असें म्हटलें. मी त्याच्या सांगण्याप्रमाणें उठल्यानंतर त्यानें मला पलीकडच्या कोनाड्यांत एक कागद पडला होता तो आणण्यास सांगितलें. मी लाजत लाजत पण झटकन् गेलें, व पुनः मुरकत मुरकत परत येऊन त्याच्यापुढें तो कागद ठेवून उभी राहिलें. आणखी थोडा वेळ अशाच तऱ्हेनें मला कांहीं विचारूनसवरून ती मंडळी जाण्यास निघाली, तों आईनें आंतून त्या मुलीला कुंकूं लावण्यासाठीं ' करंडा आण ' म्हणून सांगितलें. मी जाऊन तो आणल्यावर आजीनें मलाच " त्या मुलीला कुंकूं लाव " असें सांगितलें. त्या वेळीं ती मुलगी आणि तिच्याबरोबर आलेली ती वृद्ध बाई या कांहीं आपसांत कुजबुजत माझ्याकडे पाहात बाहेर जाण्याच्या बेतांत होत्या. आतांपर्यंत मीं त्या मुलीच्या तोंडाकडे नीट न्याहाळून पाहिलेंच नव्हतें; परंतु आतां तिला कुंकूं लावायला गेलें, त्या वेळीं मी एकदम दचकल्यासारखी होऊन किंचित् मागें सरकलें, ती मुलगी कांहींशी लहान असती तर ती बनीच आहे असें मीं म्हटलें असतें. परंतु ती बनीहून थोडीशी उंच होती. बाकी तोंडावळा अगदीं एक ! तेंच नकटें नाक; तेच फुगीर गाल; तेच बटबटीत डोळे. आणखी मग मला असेंहि वाटलें, तोच कर्कश आवाजहि असावा; कारण ती त्या वेळीं जरी हलकें बोलत होती तरी त्या बनीच्या आवाजाची जी कांहीं खुमास ती त्यांत नव्हती असें नाहीं. मी मागें सरकलें ती क्षणभरच ! मग चट्कन् त्या मुलीला कुंकूं लाविलें आणि एकदाची ती मंडळी निघून गेली.

अर्थातच मग आमच्या घरच्या मंडळींचें बोलणें सुरू झालें. " मिळालें तर स्थळ कांहीं वावगें नाहीं. मुलगा चांगला हुशार आहे; उद्यां परीक्षेला जाईल. त्याला बाप नाहीं एवढंच काय तें, पण त्याचं कांहीं मोटंसं नाहीं " असें कांहीं आजी व बाबा म्हणत होतीं आई आपली कांहींच न बोलतां आंत चालती झाली. काय असेल तें असो; ती आतांशी असल्या कांहीं गोष्टींत फारसें मनच घालीत नसे. तिला सगळ्या गोष्टींचा कंटाळा आल्यासारखें झालें होतें, परंतु याविषयीं आतांच कांहीं न लिहितां पुढें वेळ आल्यावर सांगेन. आई आंत निघून गेल्यावर मी थोडा वेळ तेथेंच उभी राहिलें होतें. हेतु हा कीं, बाबा आणि आजी काय बोलतात तें ऐकावें. ती मुलगी बनीची कोणी नातलग. तीहि अगदीं जवळची, बहीणबिहीण आहे कीं काय ? या गोष्टीचा खुलासा व्हावा असें मला फार

वाटत होतें; कारण माझ्या मनांत असें आलें कीं, जर आपल्याला त्याच घरीं देण्याचें ठरलें आणि ती मुलगी आणि ती बनी, या दोघी आपल्या नणंदा असल्या तर मग आपली कांहीं धडगत नाहीं. बनीचें आणि माझें जें कडाकडीचें भांडण झालें, तें अजून अगदीं ताज्यासारखें माझ्या ध्यानांत होतें, आणि त्या भांडणावरून जर पुढें कसें काय होणार याचें अनुमान काढायचें, तर अर्थातच आनंद मानायला फारशी जागा नव्हती. माझ्या मनाला तर आपलें पक्कें वाटलें, कीं त्या मला पाहायला आलेल्या मुलीचा आणि बनीचा कांहीं ना कांहींतरी अगदीं – अगदीं जवळचा – संबंध असला पाहिजे. आजीचें व बाबांचें थोडेंसेंच बोलणें झालें, त्यांत त्या गोष्टीचा मुळींच खुलासा झाला नाहीं; कारण त्यांच्या गोष्टी आपल्या अशातशा चालल्या होत्या. मी मध्यें तोंड घालून विचारीन तर तें बरें नव्हे असें माझेंच मन मला सांगूं लागलें. इतक्यांत आजी बाबांना म्हणाली, "ही म्हातारी कोण ठाऊक आहे का ?" पण बाबांच्याकडून कांहींच हुंकार येईना; कारण त्यांस तितक्यांतल्या तितक्यांत किंचित् डुलकी लागली. अर्थातच आजीहि थोडीशी आडवी होण्यासाठीं गेली आणि माहिती मिळण्याबद्दल निराशा होऊन मी आपली दुर्गीकडे जाण्यास निघालें.

या वेळीं मी कांहीं फार लहान नव्हतें; मला किंचित् किंचित् समजूं लागलें होतें असें म्हणण्यास कांहीं हरकत नव्हती. माझें लग्न व्हावें असें तर मला वाटतच होतें. लग्न म्हणजे काय, संसार म्हणजे काय, त्याचीं संकटें असतात काय ! या गोष्टींच्या विचाराचें वारेंदेखील मला ठाऊक नव्हतें, हें अगदीं उघडच आहे. त्या वेळीं लग्न याचा अर्थ मी एवढाच समजत होतें कीं, बाशिंग बांधणें, मळवट भरणें, मुंडावळी बांधणें, बोहोल्यावर बसणें, गौरीहाराजवळ बसणें, विड्या तोडून सुपाऱ्या लपविणें, भरपंक्तीत बसून आपल्या नवऱ्याला आपण घास देणें व त्याच्या हातून आपण घेणें. लग्न हा शब्द उच्चारला, कीं या गोष्टींखेरीज दुसरें कांहींदेखील माझ्या मनांत येत नसे. आणि माझी अगदीं पक्की खात्री आहे, कीं आजमितीला जितकीं लग्नें होतात त्यांत शेंकडा शंभर मुलींची लग्नाविषयींची कल्पना आणि त्याबद्दलचे विचार माझ्या वेळच्या विचारांहून काडीमात्र निराळे नसतील. असतील कोठून ? ज्या वयांत आम्हांला कोणत्याच गोष्टींत कांहीं कळत नाहीं, त्या वयांत लग्नासारख्या व संसारासारख्या विलक्षण जबाबदारीच्या विषयाबद्दल आम्हांला काय बरें कल्पना व्हाव्या ? लग्न होईल तर बरें, असें वाटणें म्हणजे आपल्या लग्न झालेल्या मैत्रिणींप्रमाणें आपल्यालाहि एकदा ठुमकायमुरडायला कधीं सांपडेल असें वाटणेंच होय. याच्या पलीकडे काय असणार ? तेव्हां मलाहि आपलें लग्न लवकर होईल तर बरें असें वाटत होतें, तें अर्थातच आतां सांगितलेल्या इच्छेमुळें होय, हें पुनः पुनः सांगायला पाहिजे असें नाहीं. कांहीं होवो, पण आपलें लग्न एकदाचें लवकर होवो, असें मला वाटत होतें; पण त्या बनीच्या प्रतिमेला पाहिल्याबरोबर एकदम मला असें वाटलें कीं, या घरीं मला न दिली तर बरी; दुर्गी त्या बायका जाण्याच्या आधींच तिच्या आईच्या हांक मारण्यावरून आपल्या घरांत गेली होती, तिला असलें कांहीं

ठाऊक तर विचारावें, असें माझ्या मनांत आलें आणि मी तिकडे जाण्यास निघालें. आपल्या मनाला काय वाटतें हें तिच्याखेरीज इतर कोणालाच सांगणें शक्य नव्हतें. वडील मंडळीजवळ अर्थातच हा असला प्रश्न विचारणेंदेखील रास्त होणार नाहीं, आणि तो विचारावा असें प्रथमतः माझ्या मनांतदेखील आलें नाहीं. येऊन जाऊन विचारायचें दादाला; पण त्याच्या हल्लींच्या पोक्त वर्तणुकीमुळें मी एखादी गोष्ट त्यास एकदम विचारायला थोडी भिऊं लागलें होतें. दुर्गीला विचारावें; तिला जर कांहीं ठाऊक नसलें तर मग दादा आहेच; असें वाटून मी दुर्गीकडे गेलें; तों ती आईला डाळ भरडायला लागली होती. मी तेथें जातें तों ती वात्रट एकदम " ओ हो ! आतां यमूबाईचें सयंवर ना ? " असें म्हणून फिदी फिदी हसायला लागली. मला तिच्या बोलण्याचा अर्थच समजेना. " यमूबाईचं लगीन ना ! " असें म्हणण्याचें सोडून तिनें जेव्हां 'सयंवर ना' असें म्हटलें तेव्हां मी किंचित् गोंधळून गेलें आणि तिला " हें ग काय दुर्गे ? सारा वेळ मेली थट्टाच ! " असें म्हणणार, तों व तिच्या आईनेंहि तिला दाबलें; पण ती कसची वस्ताद ! ती आपल्या आईला मुळींच गुंडाळून ठेवून पुनः माझी "आतां सयंवर ना, सयंवर ना !" म्हणून थट्टाच करूं लागली. शेवटीं तिच्या आईनें तिला " पुरे झाली आतां थट्टा ! हें काय हें सारा वेळ ? जा. थोडी राहिली आहे डाळ, मी टाकीन भरडून. खेळा घटकाभर जाऊन " असें म्हटलें. दुर्गी म्हणजे कामाच्या संबंधानें माझी सख्खी—पण वडील बहीण होती. तिला असा कांहीं कामाचा कंटाळा, कीं कांहीं पुसूं नये. त्यांत आणखी अशी मजा असे, कीं तिच्या आईची तिच्यावर भारी मर्जी ! अन् ती आपल्या आजीला मुळींच आवडत नसे. आजीचा सारा जीव त्या नातवावर होता तरी दुर्गी मोठी खंबीर असल्यामुळें कोणाचें फारसें ऐकत नसे. पण जाऊं द्या. दुर्गीची हकीकत माझ्या हकीकतींत पुष्कळच येणार असल्यामुळें तिची, तिच्या आईबापांची व तिचा ज्यांच्याशीं अगदीं जन्माचा संबंध झाला होता त्यांचीहि हकीकत लवकरच एका प्रकरणांत मी सांगणार आहें.

दुर्गी व मी एकटीच आहोंत, असें पाहण्याबरोबर मला पाहायला आलेली ती मंडळी कोण, कुठली आणि ती मुलगी कोण, वगैरे मीं विचारलें, तेव्हां तिला कांहीं माहिती नव्हती असें मला कळलें. आणखी असें कळलें कीं, जो मुलगेलासा बोवा, ज्यानें माझें वाचून घेतलें तोंच माझा भावी नवरा आणि तो आपण होऊन मला पाहायला आला असें तिचें म्हणणें होतें, आणि म्हणूनच ती मला " आतां सयंवर ना ? सयंवर ना ? " असें म्हणून माझी थट्टा करीत सुटली, परंतु तो तिचा वृथा भ्रम होता. एवढें बरीक खरें, कीं ज्यांच्यासाठीं मला पाहायला आले होते, त्यांचे कोणीतरी स्नेहीच ते तरुण गृहस्थ होते, आणि आपल्या स्नेह्याची भावी बायको कशी काय आहे हें पाहण्यासाठीं—त्या वृद्ध गृहस्थानें त्यांस बोलावण्याबरोबर पडत्या फळाची आज्ञा म्हणून ते आले असावे.

काय असेल तें असो. ते दिवसापासून मला माझ्या स्वतःबद्दल मोठी काळजी

वाटूं लागली. ती काळजी एवढीच, कीं आपल्याला सासर कसें मिळेल! ही अशी काळजी वाटूं लागण्याचें कारण किती यःकश्चित् होतें, हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. त्या बनीच्या प्रतिमेला पाहिल्या दिवसापासून मला आपलें असें वाटूं लागलें, कीं मला जर यांच्या घरीं दिलें, तर आपली कांहीं धडगत नाहीं. आपला जन्म निव्वळ दुःखांत जाणार! असें वाटण्याला खरोखर पाहतांना कांहीं कारण नव्हतें म्हटलें तरी चालेल; कारण एक तर ती आलेली मुलगी बनीची बहीणच असावी हें खरें कशावरून? त्याबद्दल अजून मला मुळींच माहिती नव्हती; आणि दुसरें मी म्हणतें, कीं यदाकदाचित् ती बनीचीच बहीण असली, तरी पण तिचा स्वभाव किंवा तिच्या घरांतल्या साऱ्या माणसांचा स्वभाव अगदीं बनीच्याचसारखा असेल असें तरी कशावरून? हे विचार त्या वेळीं माझ्या मनांत मुळींदेखील आले नाहींत. मला आपलें असे वाटलें, कीं ही बनीची बहीण असावी. आणि यांच्या घरांतलीं सारीं माणसें यांच्याचसारखीं अगदीं झाडून वाईट स्वभावाचीं असलीं पाहिजेत. जे दिवशीं ती मंडळी मला पाहायला आली, ते दिवशीं हे सर्व विचार माझ्या मनांत एकसारखे घोळत होते. एकदोन दिवस गेल्यानंतर अर्थातच माझ्या स्वभावाप्रमाणें व वयाप्रमाणें मी तें सर्व विसरून गेलें.

◆ ◆ ◆

## १८ : आणखी पाहणारे

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी घडून सुमारें दोन महिने—अधिकच दिवस—गेले असतील. इतक्या अवकाशांत मला पाहण्याला पुष्कळ मंडळी आली. पहिल्यापहिल्यानें मला जें कौतुक वाटत असें, तें आतां तितकें वाटेनासें झालें. आतां आपलें तें अंगवळणीं पडल्यासारखें झालें. एक वेळची मात्र मला फारच चांगली आठवण आहे.

एके दिवशीं दोघे गृहस्थ (दोघेहि चांगले पन्नाशीच्या वरचे—एक तर चांगला साठीच्या जवळ असेल!) असे मला पाहायला आले. रीतीप्रमाणें बाबांनीं मला बोलाविलें. त्या वेळीं काय झालें असेल तें असो, मग मी काय अडखळलें म्हणून का काय कोणास ठाऊक, त्या गृहस्थांपैकीं एका गृहस्थाच्या मनांत माझ्या चालण्यांत कांहींतरी गौणपणा असावा असें आलें असावें असें दिसलें. मी जवळ जाऊन बसल्याबरोबर तो मजकडे असा टवकारून बघायला लागला. रीतीप्रमाणें एकदोन प्रश्न केल्यानंतर त्यानें मला पांचसहा र ड या अक्षरांचे शब्दच उच्चारायला सांगितले. त्यानें ते शब्द माझ्या तोंडून निघतील असे कांहीं प्रश्नच मला विचारले असते म्हणजे मला कांहींदेखील वाटलें नसतें; परंतु त्यानें मुद्दाम कांहीं कठीण कठीण शब्द निवडून अमुक म्हण तमुक म्हण असें सांगितलें,

तेव्हां मला फारच चमत्कारिक वाटलें. मी कांहीं अगदीं वेडगळ नव्हतें. मला तेव्हांच त्याचा हेतु समजला, त्यामुळें मला असें वाटलें कीं, आतां खरोखर आपल्या तोंडून ते शब्द बोबडे बोबडे असे निघतात कीं काय ? परंतु नशिबानें तसें कांहीं न होतां ते शब्द मीं अगदीं स्पष्ट उच्चारले.

तो गृहस्थ थोडासा विक्षिप्तच होता असें मला वाटतें; आणि त्याच्याबरोबर आलेला गृहस्थ निव्वळ अजागळ–' होस हो ' देणारा दिसला. यानें त्याच्याकडे पाहून दांत विचकले म्हणजे त्यानेंहि विचकावे, एवढंच ! मी बोबडी आहें कीं काय, याची परीक्षा झाल्यानंतर अर्थातच माझे डोळेहि त्यानें नीट तपासून पाहिले. त्यानें आपला हात साफ माझ्या डोकीवर ठेवून खस्कन् माझी मान वर उचलली; आणि तो माझा चेहरा चांगला निरखून पाहूं लागला. मला खरोखर त्या वेळीं इतकी लाज वाटली कीं कांहीं पुसूं नये. पण काय करूं ? कांहीं आमचा इलाज आहे ! असें वाटलें, कीं त्याचा हात झटकून टाकून चालतें व्हावें. बाबांनादेखील त्या वेळीं थोडेंसें चमत्कारिक वाटलें असावे असें दिसलें; कारण मी तितक्यांत त्यांच्याकडे हळूच चोरून बारीक नजरेनें पाहिलें त्या वेळीं त्यांची मुद्रा कांहीं बरीशी दिसली नाहीं तथापि ते कांहीं बोलले नाहींत. माझा चेहरा पाहणें संपल्यावर त्या गृहस्थानें माझ्या हातांत तबकांतला चुनाळ देऊन " जा धावत आणि यांत चुना नाहीं तो चुना भरून आण पाहूं " असे सांगितलें. यांत ' धावत ' या शब्दावर त्याचें काय तें सारें होतें. आतां त्यानें जरी ' धावत जा ' म्हणून सांगितलें, तरी मला कसें धावतां येतें ? मी आपली हळूहळू चालत गेलें इतक्यांत दुसरा साठीच्या बेताचा अजागळ गृहस्थ म्हणतो, " अग, तुला नानासाहेबांनीं धावत जायला सांगितलं ना ? " तरी मी आपली तशीच जाऊन चुनाळ भरून घेऊन आलें. वास्तविक त्यांत एक टांकभरदेखील अधिक चुना मावला नाहीं. पण त्या गृहस्थाच्या मनांत मुळीं मी पायानें अधू आहें कीं काय, हेंच पाहायचें होतें; तेव्हां कांहींतरी काम त्यानें त्या वेळीं मला सांगितलें. एवढ्यानेंच संपलें नाहीं. मीं चुनाळ भरून आणून तबकांत ठेवला व उभी राहिलें; तेव्हां पुनः मला बसवून तो बाबांना म्हणतो, " हिचा गण कोण ? " बाबांनीं ' देवगण ' असें सांगितलें, त्याबरोबर खुष होऊनच जणूं काय त्यानें माझ्या पाठीवर शाबासकी व त्या अजागळ गृहस्थाच्या मांडीवर टाळीऐवजीं थापटी दिली. नंतर त्यानें माझे हात उचलून वगैरे पाहिले, आणि तो त्या बरोबरीच्या गृहस्थास म्हणाला, " ही अंमळ ठेंगणी होणार, नाहीं बरं ? " त्याबरोबर " हो ! फार ठेंगणी होणार. हिच्या वयाच्या मानानें तर फारच ठेंगणी ! " असें त्या ' होस हो ! ' गृहस्थानें उत्तर दिलें. तें ऐकून नानासाहेब पुनः म्हणतात, " छे, छे ! वयाच्या मानानें कांहीं फार ठेंगणी नाहीं, ती बेताचीच आहे. माझं म्हणणं कीं एकंदरींत ती ठेंगण्या अंगाची होणार. "

बरोबरीचे गृहस्थ लागलीच म्हणतात, " हं, माझं म्हणणं तेंच. मी तरी एकंदरींतच

म्हणतों. तिच्या वयाच्या मानानं ती अगदीं बेताची आहे. किंबहुना थोडीशी उंचच म्हटली तरी चालेल. ”

नानासाहेब : छट्. उंच कसली ? तुम्हांला कांहीं समजत नाहीं, शास्त्रीबोवा !

हे नानासाहेबांचे शब्द ऐकण्याबरोबर शास्त्रीबोवांनीं नुसतेंच दांत विचकले आणि ते स्वस्थ बसले. मला ही गोष्ट आठवली म्हणजे राहून राहून हसूंच येतें. आणि ही गोष्ट ध्यानांत विशेष राहण्याला कारण पुढें घरांत त्या दोघांच्या वर्तनावर पुष्कळ टीका झाली हें होय. असो. याप्रमाणें आणखीहि कित्येक बाबतींत माझी परीक्षा झाल्यानंतर ते गृहस्थ उठून गेले.

आतां मी जें कांहीं लिहिणार आहें, हें तितक्या जोरानें त्या वेळीं माझ्या मनांत आलें नाहीं; परंतु त्या वेळचा माझा व त्यानंतर पुष्कळ मुलींचा जो अनुभव मला कळला व मीं पाहिला त्यावरून मला तें येथें लिहिल्याबांचून राहावतच नाहीं. गुरांच्या बाजारांत कसाई लोक मेंढरीं-बकरीं घेतात त्या वेळीं त्यांची कशी काय परीक्षा करितात तीहि मला ठाऊक नाहीं; किंवा हौशी लोक चांगलेसे घोडे घेतांना कशी काय परीक्षा करितात तीहि मला ठाऊक नाहीं; पण मीं जें ऐकिलें आहे तेवढ्यावरून मला वाटतें, कीं आम्हां मुलींना पाहायला येणारी मंडळी आमची परीक्षा करितात, ती अगदीं त्याच मासल्याची असली पाहिजे. अंतर एवढेंच कीं, त्या गुरांना कळत नसतें आणि आम्हां मुलींना कळत असतें. मीं एकदा असले उद्गार जवळ काढले होते, तेव्हां मला हंसून सांगायचें कीं, “ एकदा गुरांचा बाजार मुद्दाम मी तुला दाखवीन आणि मग तुझी तूंच तुलना कर. ” चालवून काय पाहतात, बोलवून काय पाहतात ! आणि आतां त्या नानासाहेबांचें पाहणें जें वर सांगितलें, तसले प्रसंग तर माझ्या कित्येक मैत्रिणींवर त्यांच्या लग्नापूर्वी आलेले त्यांनीं मला सांगितले आहेत. आम्ही बरोबरीच्या चारचौघी जमलों म्हणजे केव्हां केव्हां या अशा लहानपणच्या गोष्टी निघतातच; तेव्हां एकमेकींचे अनुभव आम्ही एकमेकींना सांगतों. माझ्या एका मैत्रिणीनें तर एकदा मला असें सांगितलें, कीं तिला पाहण्याला आलेल्या एका गृहस्थानें तिची जीभ पाहिली. मग त्याचा काय हेतु होता कोणास ठाऊक ? या चाली एकंदर बऱ्या कीं वाईट, यावर मत देण्याचा माझा अधिकार नाहीं, आणि तशीं मतें द्यावीं अशासाठीं मी आपलें चरित्र लिहीतहि नाहीं. आम्हां मुलींना आपल्या आयुष्यक्रमाबद्दल साधारणतः वाटतें काय आणि आमचे स्वतःचे बरेवाईट अनुभव असतात काय, हें माझ्या पश्चात् लोकांना कळावें आणि त्यांत खरोखर कांहीं सुधारण्याजोगें वाटलें तर त्यांनीं तशी तजवीज करावी, एवढाच माझा हेतु आहे. कुठें कांहीं उणिवा असल्या, तरी त्या लक्षांत आल्यावांचून कोणीच भरून काढणार नाहीं, आणि त्या उणिवांपासून ज्यांचें नुकसान होतें, त्यांनीं तसें कळविल्या-वांचून तर लोकांच्या लक्षांत त्या येण्याचा संभवच नाहीं, हा अनुभव सर्व जगास आहेच. ईश्वराच्या कृपेनें मला चार अक्षरें लिहिण्याचें सामर्थ्य आलें आहे; तेव्हां माझ्या

भगिनींपैकीं इतर कोणी पुढें येईपर्यंत वाट न पाहतां व एकंदरींत मनुष्याचा आणि त्यांत माझ्यासारख्या व्यथिष्ट माणसाचा तर मुळींच भरंवसा नाहीं हें जाणून व त्याचप्रमाणें मनाला विरंगुळा काय तो आतां एवढाच आहे; म्हणून दादाच्या सांगण्यावरून मीं हें आपलें चरित्र लिहिण्यास आरंभ केला. देवाच्या दयेनें असेंच आजतागायतपर्यंतचें लिहिलें जावो म्हणजे झालें. आणखी कांहीं त्याच्याजवळ मागण्याचें उरलें नाहीं.

मीं नुकतेंच वर लिहिलें आहे, कीं आमच्या चाली एकंदरींत लोकांना बऱ्या कीं वाईट हें लिहिण्याचा माझा अधिकार नाहीं; परंतु आम्हां मुलींना त्या बऱ्या वाटतात कीं वाईट वाटतात, हें लिहिण्यास कांहीं हरकत असेलसें वाटत नाहीं. ज्या वेळीं आम्हांला लोक पाहण्यासवरण्यास येतात, त्या वेळीं आम्हांला तादृश ज्ञान नसतें हें उघडच आहे; परंतु आजमितीला जर मला कोणीं विचारलें कीं, ' मुली पाहण्याची चाल कशी काय आहे ? ' तर मी अगदीं स्पष्टपणें सांगेन, कीं ' ही असली चाल अगदीं वाईट. ' गुरें खरेदी करावयाचीं तशीच जर मुलींची स्थिति असली तर कोणास ठाऊक ! पण सध्यांच्या चालीवरून तर त्यांत आणि यांत मला कांहीं अंतर दिसत नाहीं; असो. याच्यापेक्षां जास्त कठोरपणानें माझ्यानें लिहवतच नाहीं आणि मी अधिक लिहीतहि नाहीं.

नानासाहेब व शास्त्रीबोवा उठून गेल्यानंतर बाबांचें व आजीचें बोलणें झालें व त्यांत त्यांनींदेखील त्या गृहस्थास नांवें ठेविली; तेव्हां तर मला त्या गृहस्थांचा फारच राग आला आणि पुढें जेव्हां आमच्या घरांत असें कळलें ( तें कळलें चांगलें पंधरावीस दिवसांनंतर )—कीं ते नानासाहेब त्या शास्त्रीबोवांच्यासाठींच मला पाहण्याला आले होते ! तेव्हां तर माझी अगदीं त्रेधा उडाली. ती वात्रट दुर्गी तर मला ' शास्त्रीणबाई, शास्त्रीणबाई ' असें म्हणूं लागली, आणि तिनें सुंदरीलाहि ( ही आतां कांहीं शब्द उच्चारूं लागली होती ) तें नांव शिकवून ठेविलें. ती पोरटीहि बोबड्या बोबड्या शब्दांनीं ' थात्तनबाई ' असें म्हणूं लागली. पोरींना जें काय शिकवावें तें आपलें. त्यांनीं बोलावें दुर्गीचा भाऊ केव्हां केव्हां तिच्याच चिथावणीवरून " राळ्याचा भात पंक्तीला, म्हातारा नवरा गमतीला " असें म्हणे. नानासाहेब मला पाहुला आले होते, ते शास्त्रीबोवांसाठीं हें आम्हांला कळलें, त्यानंतर सुमारें आठनऊ दिवसांनीं नानासाहेबांकडून तशाबद्दल स्पष्ट निरोप बाबांना आला. तो काय होता, हें मला अगदीं पक्कें कळलें नाहीं; परंतु त्यांतला इत्यर्थ एवढाच होता कीं, ' शास्त्रीबोवांचें वय फार नाहीं; त्यांना आपली मुलगी देत असलां तर पाहा. ' हा निरोप आला ते दिवशीं जेवायला बसतांना बाबाहि थट्टेनें आजीला म्हणाले कीं, " नवरा कांहीं वाईट नाहीं; नाहीं ग आई ? दागिने चांगले घालील, दक्षिणा पुष्कळ मिळवील, शालजोड्याहि पुष्कळ असतील त्याच्याजवळ आजपर्यंत मिळविलेल्या; शिवाय त्यांचे यजमान नानासाहेब आहेतच अधिकउणं बघायला. माझ्या मतं द्यावी यमीला तिथं. " हे शब्द बाबांनीं निवळ थट्टेनें उच्चारले, पण मला

वेडीला तें कांहींएक कळलें नाहीं. त्यांचें म्हणणें अगदीं खरोखरीच असें समजून मी जेवणाचें पान पुढें लोटून तट्कन् उठलें आणि रडत रडत आईकडे गेलें. आधीं बरेच दिवस त्या दुर्गीनें अगदीं भंडावून सोडलें होतें, ह्यामुळें भरतें आलेंच होतें आणि त्यांत बाबांचें बोलणें! मग काय विचारतां? आईच्याजवळ जाऊन तिच्या उशाशीं एकसारखी रडत बसलें. मला त्या वेळीं अगदीं पक्कें वाटलें, कीं आपल्याला आतां त्या म्हाताऱ्याला देणार. आम्ही गरीब गाई! कसायाच्या हातीं दिल्या तरी काय करणार! मला त्या वेळीं काय वाटलें आणि काय नाहीं, हें कांहीं सांगतां येत नाहीं, इश्श ग बाई! कसला मेला तो शास्त्रीबोवा? मला अजून त्याची आठवण झाली कीं अंगावर शहारे येतात. मी अशी रडत बसलेली पाहून आईनें मला काय झालें, काय नाहीं, पुष्कळ विचारलें; पण एक नाहीं दोन नाहीं; माझा एकसारखा रडण्याचा सपाटा चालू होता. मला मुळीं असें वाटलेंच, कीं आपलें त्या म्हाताऱ्याशीं खास लग्न लागणार. आजीनें व बाबांनीं माझी किती समजूत केली, मला नाना तऱ्हेनें समजावून सांगितलें; पण छे, माझें एकसारखें भोंकाड पसरलें होतें. दादानेंदेखील येऊन माझी पुष्कळ समजूत केली, पण आजी सोंवळ्याचीं ओंवळी होऊन मला घेऊन गेली व मला तिनें जेवूं घातलें. बाबा तर सडकून रागावलेच. आणखी मी पांच मिनिटे जर जास्त रडतें, तर त्यांनी माझ्या डोक्यांत खचित कांहींतरी घातलें असतें आणि मी तितक्या पंथाला गोष्टी येईपर्यंत रडत बसलेंहि असतें; पण तितक्यांत आजी येऊन मला घेऊन गेली म्हणून बरें झालें.

अशा एकेक मला पाहायला येणाऱ्यांच्या मजा आठवतात, आणि आठवल्या म्हणजे राहून राहून मनाला खेद व आश्चर्य वाटतें. त्यांतून त्या वयांत आम्हांला काय कळत असतें आणि काय वाटत असतें याचा विचार केला म्हणजे तर फारच चमत्कारिक वाटतें. असो. अशा माझ्या स्वतःच्या अनुभवाच्या अगर माझ्या पुष्कळ मैत्रिणींच्या अनुभवाच्या कित्येक गोष्टी आठवायलाच बसलें तर आठवून लिहितां येतील. परंतु त्या साऱ्या आपल्या एकाच मासल्याच्या आहेत. फरक फारच थोडा, तेव्हां या भानगडींत न पडतां आपल्या पुढल्या हकीकतीकडे वळावें तें बरे.

ज्या वर्षांतली मी ही गोष्ट लिहितें तें वर्ष तर माझें लग्न झाल्यावांचून गेलें. तितक्या वेळांत दादालाहि बऱ्याच मुली सांगून आल्या; परंतु माझें लग्न झाल्याखेरीज दादाचें करावयाचें नाहीं, असें बाबांचें म्हणणें असल्यामुळें अर्थातच कोणीं मुली झटून पाहिल्या नाहींत. बाकी आजीला लहानशी नातसून यावी असें फार वाटत होतें; आणि खरें म्हटलें तर मलाहि 'वन्सं' म्हणण्याला वहिनी पाहिजे असें फार वाटत होतें कारण वन्संना वहिनी म्हणजे एक तोंडीं लावणें असतें. त्यांतून नणंदभावजया चांगल्या स्वभावाच्या असल्या तर कांहीं विचारूंच नये. परंतु माझें लग्न होण्याच्या आधीं मला वहिनी येणें मुळींहि शक्य नव्हतें; कारण बाबांची तशी अट होती. आणि बाबांची अट म्हणजे काय, हें मीं मागें लिहिलेंच आहे. त्या सालचे मुहूर्ताचे दिवस तर गेलेच; तेव्हां चार महिने आतां सर्वच काम मंदावलें.

◆ ◆ ◆

## १९ : त्याला मी जन्मांत तरी विसरेन काय ?

* * * * * * * * * * * * * * * *

आईची प्रकृति दिवसानुदिवस अधिकच बिघडत चालली. ' तिला काय होत आहे ? ' असें जर कोणीं विचारलें तर सांगायला मात्र कांहीं नव्हतें. कोणी म्हणत बारीक ताप येतो, कोणी म्हणत कांहीं; कोणी कांहीं; हें सर्व जर गर्भारपणामुळें असेल तर ती बाळंत झाली म्हणजे लवकर चांगली होईल असेंहि कोणी म्हणत; परंतु आजी व बाबा यांचें बोलणें जें मीं एकदा सहजीं ऐकलें, त्यांत बाबा आजीजवळ स्पष्ट म्हणाले कीं, " बाळंतपणानंतर हिला क्षयरोग लागण्याचा संभव आहे. त्यांतून कशी काय निभावेल ती निभावो ! मला तर कांहीं धडगत दिसत नाहीं. मग काय होईल तें खरें ! " आजीनेंहि त्या वेळीं, " देवाच्या मनांत असेल तें होईल, आपण आपल्याकडून करायची तितकी काळजी करतोंच आहों, " असें म्हटलें.

हें बोलणें ऐकल्या दिवसापासूनच माझ्या मनाला काय बरें वाटलें असेल ? आई म्हणजे काय, आणि आपली आई किती चांगली आहे हें नुकतेंच मला कुठें कळूं लागलें होतें. घरांत कामधंदा करण्याची शक्ति नसल्यामुळें ती आपल्या बसल्या जागींच भाजी निवडणें, डाळ, तांदूळ निवडणें वगैरे बारीक-सारीक कामें कितीतरी करी; आणि मला आपल्याजवळ बसवून सर्व कामांची टापटीप शिकवी. तिच्या शिकवणुकीनेंच आपलें या जगांत कल्याण होणार असें आतां मला कुठें वाटूं लागलें होतें, तोंच वर सांगितलेलीं अशीं कांहीं बोलणीं ऐकलीं म्हणजे माझ्या मनाला काय बरें वाटत असेल ? अहाहा ! ' आई ' हा शब्द उच्चारल्याबरोबर माझ्या मनांत जे कांहीं दुःखाचे उमाळे येताहेत ते जर शब्दांनीं यथास्थित वर्णन करून लिहितां येते, तर वाचणारांचीं मनें खास शोकमय होऊन जातीं ! असो.

वर सांगितलेल्या स्थितींतच ती बाळंत झाली आणि मला भाऊ झाला. भाऊ झाल्याबरोबर मला काय आनंद झाला आहे म्हणतां ! या आनंदाच्या भरांत मी अगदीं नाचूं उडूं लागलें आणि दुर्गीच्याकडे जाऊन ती अत्यंत आनंदाची बातमी सांगावी म्हणून धावलें. पण दुर्गी सासरीं गेलेली ! तिची आई व आजी तर बाळंतिणीच्या खोलींतच होत्या. शेवटीं कोणी सांगायला नाहीं; तेव्हां दुर्गीच्या भावालाच सांगून मी परत आलें. तों बाळंतिणीच्या खोलीशीं एकच गर्दी झालेली ! आणि बाबा घाबऱ्या घाबऱ्या " अरे गणू , जा डॉक्टरला आण–नाहीं तर मीच जातों, " असें दादास म्हणत होते. तें ऐकल्याबरोबर माझा सर्व आनंद लयास गेला, आणि हें आहे तरी काय असें वाटून " दादा, दादा, काय रे ? डॉक्टर रे कशाला ? " असें मी दादास म्हणणार, तों तो टोपी

घालून गेलादेखील; आणि त्याला जाऊन पांचसात मिनिटें झालीं असतील नसतील तोंच पुनः बाबाहि धावत गेले. कांहींतरी फार भयंकर संकट आहे असें तर मला वाटलें, पण विचारतां कोणाला? सारी मंडळी आईच्या खोलींत जमा झालेली! शेवटीं माझ्यानें राहवलें नाहीं! मीहि जाऊन त्या घरांत डोकावलें, त्यासरशीं आजीनें, "यमे, तुला भाऊ झाला, पण आईला घेऊन जातो ग!" असें मोठयानें गळा काढून म्हटलें व मला आपल्याकडे ओढून घट्ट पोटाशीं धरलें; तिचें पुनः तेंच चाललें होतें. दुर्गीची आई, आजी वगैरे मंडळी तिला तीनतीनदा, "हें काय हें? तुम्हीच असें करूं लागलां तर त्या पोरांनीं काय करावं? त्या नुसत्या बेशुद्ध पडल्या आहेत; आतां डॉक्टर उठवतील येऊन" असें तिचें समाधान करीत होत्या. तिचें, "अहो नाही हो! आतां कसची उठते! ती शेवटलीच निजणार. माझ्या पाठीमागें पोरवडा टाकून आपण जाणार!" असें एकसारखें चाललें होतें. इतक्यांत दादा डॉक्टरला घेऊन आला आणि मागोमाग बाबाहि आले. डॉक्टर येण्याबरोबर "घाबरूं नका, घाबरूं नका," असें म्हणत म्हणत आईच्या जवळ जाऊन त्यांनीं तिचा हात धरला. नंतर खिशांतून ती उराला लावायची नळी काढून ती तिच्या काळजाच्या तिथें लावली व किंचित् हसल्यासारखें करून, "यांना मागें कधीं अशी फिट्–घेरी–आली होती काय?" असें विचारलें. त्याबरोबर आजीनें रडत रडत "होय. होय. त्यांतली आहे का खरोखर ही?" असें विचारलें. "हं" असें करून ते डॉक्टरसाहेब मोठयानें खाकरले मात्र, त्यांनीं उत्तर कांहींच दिलें नाहीं. नंतर त्यांनीं काय औषधोपचार केला कोणास ठाऊक? दोन तीन मिनिटांच्या आंत आईला शुद्धीवर आणलें व साऱ्यांना गर्दी मोडण्यास सांगून ते बाबांजवळ कांहीं इंग्रजींत बोलले. बाबांनीं लागलीच दऊत लेखणी आणून त्यांनीं लिहून दिलेला कागद घेतला आणि दादाजवळ देऊन त्यास बाहेर पाठविलें. आई जागी होण्याबरोबर आम्हांला असें वाटलें कीं हा डॉक्टर नव्हे, कोणीतरी देवच असला पाहिजे. आजीनें वगैरे साऱ्यांनीं अगदीं पुरी आशा सोडली होती. आतां ही कांहीं जागी होत नाहीं असें सगळ्यांना वाटून चुकलें होतें, पण देवाच्या दयेनें आमच्या नशिबीं आणखी कांहीं दिवस सुख भोगावयाचें होतें म्हणून म्हणा किंवा तिच्या आयुष्याची दोरी सबळ होती म्हणून म्हणा, पण आमच्या आईच्या जिवावरलें तें संकट त्या वेळीं टळलें.

मला नवा भाऊ झाला, त्याच्याकडे आपलें मला पांचसहा दिवस पाहावेंसेंच वाटत नसे, आणि आजी तर बोलेदेखील, कीं "मला नको तो बघायला. आईच्या जिवावरच आणली होती बाळानं!" पण एकंदरींत आईचे दहा दिवस बऱ्यांतच निभावले उलट तिची प्रकृति आतां बरी होईल असेंदेखील मंडळी बोलूं लागली. पण तें कांहीं फारसें खरें नव्हतें. तिला ताप कांहीं सोडीना. त्या नव्या मुलाला अंगावर पाजूं नका म्हणून डॉक्टरनें निक्षून सांगितलें होतें पण तिकडे कोणींच लक्ष दिलें नाहीं. "या डॉक्टरांचें आपलें कांहीं ना बाहीच! म्हणे तान्ह्या मुलाला आईच्या अंगावर पाजूं नका. मग पाजा कोणाच्या?" असें म्हणून त्याला पाजण्याचा क्रम सुरू केलाच. मुलगा पण मुलगा होता; त्याचे थोडेबहुत

पिण्याच्या वगैरेसंबंधानें हाल होत असत, कारण त्याला पुरें दूध मिळत नसे, पण तो चांगला खुटखुटीत होता. सारे लोक म्हणत कीं, हा अगदीं हुबेहूब यमीसारखा आहे, आणि असें लोकांनीं म्हटलें, म्हणजे मला मोठें समाधान वाटत असे. आतां माझा त्यावरला राग गेला. आतां उठल्यासुटल्या त्याला घेऊन बसण्याखेरीज मला दुसरा उद्योगच नव्हता. दुर्गीकडे खेळायला जाणेंदेखील आतां अगदीं बंद! घरांतलें कामकाज बंद! आईच्या खोलींत जाऊन त्या बग्याला घेऊन बसायचें; यांत आणखी एकदोन फायदे होत असत; एक हा कीं, आईच्या सांज्यांतला सांजा मिळायचा! दादा तर त्यावरून माझी थट्टाहि करी. तो म्हणे, "ही खोलींत जाऊन बसते ती बग्याकरितां नाहीं न् बुग्याकरितांहि नाहीं, तर सांज्याकरितां बसते." असो. पण या फायद्याखेरीज खरा खरा दुसरा फायदा मला झाला, तो असा : आईला स्वतः वाचण्याची कांहीं शक्ति नसे आणि वेळ तर जायला पाहिजे; तेव्हां ती माझ्याकडून भक्तिविजय वाचून घेऊं लागली. रोज फावल्या वेळीं तिनें आपले एकदोन अध्याय माझ्याकडून वाचवावे. त्यांतल्या त्या प्रेमळ कथा वाचून मला रडूंदेखील येत असे. जिथें न समजेल त्या ठिकाणीं तिनें मला समजावून सांगावें. अशा तऱ्हेनें दीडएक महिन्यांत मीं तिच्याजवळ कितीतरी वाचलें! शिवाय वेळोवेळीं ती मला सांगे, शिकवी तें निराळेंच; बग्याला न्हायला वगैरे घालण्याचेंदेखील मी या वेळीं शिकलें; त्या सुइणीनें एकदा दोनदा मला नीट शिकविलें. इकडे आजी एखादे वेळ मला स्वयंपाकांतहि संध्याकाळीं ओढी. एकदा दोनदा तर तिनें निव्वळ दूर बसून माझ्याकडून भात, भाजी व फोडणीचें वरण करवून साऱ्यांना वाढविलें. ते दिवशीं आईनें तर मला "यमे, तूं इतकी शहाणी निघशील असं मला नव्हतं वाटलं," असें म्हणून माझ्या तोंडावरून हात फिरविला व म्हटलें, "पोरी, अशीच सासरीं वागून साऱ्यांना यश दे म्हणजे झालं," इतके म्हणून ती कांहीं वेळ थांबली. तितक्या अवकाशांत माझ्या मनाला किती आनंद झाला म्हणतां! मला असें वाटलें कीं, आपण खरोखर अतिशय शहाण्या आहोंत यांत शंका नाहीं. आईच्या शाबासकीपेक्षां मुलांना आणखी तें काय पाहिजे? ती मिळाल्यावर सर्व कांहीं मिळालें असें होऊन जातें, निदान मलातरी तसें झालें, परंतु हा माझा परमानंद, हा त्या वेळीं वाटलेला अभिमान, क्षणभरदेखील टिकला नाहीं; मनांत अतिशय आनंदून वर जों पाहतें तो आईच्या दोनहि डोळ्यांतून घळघळ अश्रु वाहात होते. मीं वर पाहतांच, ती एकदम, "यमे, माझ्यादेखत तुझं लग्न होऊन जांवई माझ्या दृष्टीस पडेल का ग?" असें म्हणाली. आईच्या तोंडून आजपर्यंत माझ्या लग्नाबद्दल असे उद्गार निघालेले मीं कधीं ऐकले नव्हते. आणि तिनें याच वेळीं असे उद्गार काढलेले ऐकून मी अगदीं चकित झालें व लाजून मान खालीं घालून बसलें. इतक्या सगळ्या गोष्टी लिहिण्याला जितका अवकाश लागला असेल त्याच्या दशांश वेळांत तें सर्व घडलें म्हटल्यास हरकत नाहीं. आईच्या तोंडून वरील उद्गार निघून मी खालीं मान घालतें तोंच "होईल. होईल बरं. तूं धीर सोडूं नको. बरी हो. लग्नाचे दिवस यायचा अवकाश

कीं पहिल्या दुसऱ्या मुहूर्तावर यमीचं लग्न करून टाकतों" असे अगदीं सद्गदित कंठानें बाबांनीं उच्चारलेले शब्द आमच्या कानावर पडले. बाजेजवळ पाट मांडला होता त्यावर आई मान खालीं घालून बसली होती. तिनें ते शब्द ऐकतांच झट्कन् डोळे पुसून ती उठून उभी राहतां राहतां "आडून बोलणं ऐकलं वाटतं ?" असें म्हणाली. तिनें किंचित् हसतमुख केलें. त्या वेळीं मला अगदीं चोरटयासारखे झालें. आपण आतां येथून निसटावें कसें या विचारांत मी गर्क झालें; बाबा दारांतच उभे राहून मोठया गंभीर दृष्टीनें आईच्या त्या हसतमुखाकडे एकसारखे टक लावून पाहात होते. त्यांची ती दाराच्या वरच्या बाजूला हात ठेवून उभी राहिलेली भव्य मूर्ति,—कांहीं प्रेम, कांहीं दुःख, कांहीं अभिमान, कांहीं विचार इतक्यांनीं भरलेली आपली दृष्टि,—आईच्या प्रेमळ व लाजून वळविलेल्या हसतमुखाकडे पाहात आहे, असें या घटकेस माझ्यापुढें चित्र आहे. मला जर चित्रें काढतां येतीं, तर मीं ते वेळीं सर्व कामें एकीकडे टाकून तें काढलें असतें. वरील शब्दाखेरीज ते एक अक्षरदेखील जास्त बोलले नाहींत. वर सांगितल्या-प्रमाणें ते क्षणमात्र उभे राहिले व लागलीच एक लांब सुस्कारा टाकून तेथून चालते झाले. बाबांचें अंतःकरण इतकें प्रेमळ असेल असें मला आजपर्यंत कधीं वाटलें नव्हतें. आजपर्यंतचा आमचा अनुभव अगदीं उलट म्हटलें तरी चालेल त्यांचें आम्हां मुलांशीं वर्तन होतें तें, ते आजीशीं ज्या तऱ्हेनें कधीं कधीं वागतात ती तऱ्हा, आजोबांचें व त्यांचें जें प्रेम असे तें, किंबहुना आईशींदेखील मागे केव्हां केव्हां त्यांची वागणूक दिसून येई ती; या साऱ्या गोष्टींवरून त्यांचा स्वभाव कसा होता हें मीं लिहिलेंच आहे. रागाच्या वेळेखेरीज आईशीं मात्र त्यांचें वर्तन फार चांगलें असे; परंतु आम्हां मुलांच्यादेखत वर सांगितला इतक्या प्रेमाचा प्रकार कधीं झालेला मला आठवत नाहीं आम्ही पुण्यास येऊन राहिल्यापासूनच त्यांची वृत्ति कांहीशी निवळली; आजीशीं निवळली याचें कारण आजीनें ताळतंत्र पाहून बोलण्याचें ठेविलें हें होय. तरी-देखील ते केव्हां केव्हां तिच्या अंगावर येत. पण ती अगदींच गरीब असे. त्यामुळें तें तितकेंच राही. आईशीं मात्र त्यांची वृत्ति अतिशयच निवळली ते आतां आधीं कधीं तिच्यावर रागावत नसत; इतकेंच नव्हे, तर तिच्या औषधपाण्याची एका तऱ्हेनें आपण स्वतः काळजी घेत म्हटलें तरी चालेल, आणि आजतर अगदीं कळस झाला. ते आईचे शब्द तेवढेच त्यांनीं ऐकले, कीं आधींपासून सर्व बोलणें ऐकून काय चाललें होतें तेंहि पाहिलें, कांहींच कळलें नाहीं. आईचा आजारीपणा, बाबांची तामसी वृत्ति निवळण्यास बराच कारण झाला असावा असें मला वाटतें. आतां ही असली सद्गुणी बायको आपणांस लाभत नाहीं, तर तिला जितकें सुख देववेल तितकें द्यावें, ती सांगेल त्याप्रमाणें करावें, तिच्या सर्व इच्छा पुरवाव्या, असे त्यांच्या मनास वाटूं लागलें असावें असें आतां मला वाटतें. नाहींतर त्यांनीं म्हणजे तिचें म्हणणें कधीं मोडलें होतें असें नाहीं; पण त्याचें कारण तिचा शहाणपणा होय, त्यांचा प्रेमळपणा नव्हे, आणि आतां ते अगदीं निव्वळ प्रेमानेंच तसें करूं लागले असावें असें दिसलें. तो दिवस मी कधींहि विसरणार

नाहीं. माझ्या एकंदर आयुष्याच्या जीर्णारण्यांत मनाला आल्हाद देणारीं जीं अत्यंत सुंदर अशीं पांचचार फुलें मला लाभलीं त्यांपैकींच वरील दिवस हें एक फूल होय. त्याला मी जन्मांत तरी विसरेन काय ?

[illegible] दुःख – किंबहुना रतिभर सुख तर खंडीभर दुःख–ही तर जगाचीच रहाटी आहे. आई बाळंत झाल्या दिवशीं तिच्या जिवावरचें संकट गेलें. पुढें कुठें महिना दोन महिने आम्हीं वर सांगितल्या तऱ्हेनें सुखांत–( आई आजारी होतीच, तेव्हां सुखांत कसचे ? पण आपलें म्हणायचें सुखांत म्हणून )-घालविले नाहींत, तोंच आणखी एक अरिष्ट आलें आणि माझ्या बग्याला घेऊन गेलें. तें पोर फारच चांगलें होणार म्हणून ज्याची त्याची अगदीं ही ! दिसण्याबिसण्यांत कसा अगदीं गुटगुटीत असे. मला तर त्याचें अगदीं वेडच लागलें होतें. एक दिवस रात्रीं आपला एकाएकीं त्याला श्वास लागला आणि पोट उडूं लागलें होतें. आजीनें तेवढें रात्रीं धावाधाव करून होते नव्हते तेवढे सारे उपाय केले. येवढ्या रात्रीं कुठल्या कुठें तिच्या ओळखीची एक बाई राहात असे. तिच्याजवळ सशाच्या रक्तांत भिजलेलें फडकें होतें, तें ती आपल्याखेरीज कोणाला देणार नाहीं म्हणून दादाला घेऊन स्वतः जाऊन आणलें. डॉक्टर आले, वैद्य झाले, पण कांहींएक उपयोग झाला नाहीं. शेवटीं दुसरे दिवशीं पोर गेलें. ते दिवशीं आईच्या दुःखाला पारावार नाहींसा झाला; तथापि ती विवेकी, तिनें आकांत वगैरे कांहीं केला नाहीं. जें काय रडणें कढणें तें आंतल्या आंत. त्या पोराला जवळून उचलून नेलें, तेव्हां कायनी ती मोठ्यानें " कुठें हो नेतां माझ्या बाळाला ? " असें म्हणाली; पण पुनः तमलें नांव नाही. परंतु हें दुःख ती आज मुकाट्यानें सहन करते आहे, पण शेवटीं त्याचा परिणाम काय होणार हें कोणाच्यातरी ध्यानीं आलें काय ?

◆ ◆ ◆

## २० : दुर्गीचें माहेर व सासर

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

ते दिवशीं दुर्गीच्या जिवाची कोण धांदल ! तिच्या घरी कांहीं कारणानें तिचा नवरा जेवायला यायचा होता. दुर्गीचा नवरा आहे तरी कसा काय हें मलादेखील पाहण्याची इच्छा झाली होती. कारण ती आपल्या नवऱ्याच्या व सासरच्या कितीतरी गोष्टी मला सांगे. तिचा नवरा पुष्कळ वेळां तिच्या घरीं आला होता असें तिचें म्हणणें, पण मीं सारा एकदाच ओझरता पाहिला. तो आज जेवायला येणार यामुळें दुर्गीच्या घरांत अगदीं तयारी चालली होती. दुर्गीचे तर आमच्या घरांतून आपल्या घरीं व आपल्या घरांतून आमच्या घरीं असे हेलपाटे कितीक झाले असतील याचा कांहीं नेमच नाहीं ! आणि ते दिवशीं तर तिनें आपल्या नवऱ्याबद्दल इतक्या कांहीं गोष्टी सांगितल्या कीं कांहीं पुसूंच

नये. जशी कांहीं तिची आणि त्याची ओळख होऊन दहाबारा वर्षे झालीं आहेत आणि खरें म्हटलें तर दहाबारा महिने तर काय, परंतु पांचसहा महिनेदेखील पुरते झाले नव्हते. तिनें काय गोष्टी सांगितल्या त्या जर मी येथें सांगत बसलें, तर तें बरें दिसायचें नाहीं म्हणून आणि पुढें दुर्गीचा अनेक ठिकाणीं संबंध येणार आहे, त्या वेळीं तिच्या अनेक गोष्टी येणारच आहेत म्हणून, मी आज त्या गोष्टी येथेंच सांगत नाहीं. तथापि लहानपणापासून आम्हां पोरींचीं मनें कोणत्या विचारांत दंग असत, ह्याचें थोडेंसें दिग्दर्शन व्हावें म्हणून थोडया एकदोन गोष्टीच येथें सांगून देतें. त्या उगीच मासल्याच्या म्हणून समजावें. ती म्हणाली : " यमे, गंमत काय आहे ठाऊक आहे का? परसाकडून आल्यावर पाणी द्यायला मी जवळ कुठें आहें कीं नाहीं, याच्यासाठीं टेहळणी चाललेली असते. परवांच्या दिवशीं तर मी पाठमोरी होतें तांब्या भरीत. पाठीमागून आलेले मला कांहीं ठाऊक नाहीं. तर बाई बारीकसा खडा घेऊन माझ्या मानेवर मारला! मीं म्हटलं ' खडा कुणीं मारला? वर आहे का काय कुणी?' असें म्हणून मान जों वळवतें, तों आपली स्वारी उभी! अन् बाई माझे हात लागले लट्लट् कांपायला! नळावर धरलेला तांब्या अगदीं भरत आला होता; पण हातात राहतो कुठला? धाड्कन् खालच्या डोणींत पडला. माझ्या अंगावर सारं पाणी उडालं, साडी भिजून चिंब झाली अन् मी जी सूं पळालें ती कांहीं विचारूंच नको!" आपला नवरा आपल्याकडे चोरून कितीकदा व कसा पाहतो आणि आपणहि, त्याचें आपणाकडे लक्ष नसलें म्हणजे चोरदृष्टीनें कसें पाहतों, नजरानजर झाली म्हणजे कशी लाज वाटते इ० इ० गोष्टी त्या दुर्गीनें मला त्या वयांत सांगितल्या. तिचें लग्न होऊन अजून पुरे पांचसहा महिनेदेखील झाले नव्हते! इतक्या थोडया अवकाशांत हे असले विचार तिच्या मनांत घोळत असत आणि तिनें अशा गोष्टी सांगितल्या म्हणजे माझें लग्न झालें नव्हतें तरी तसल्या घाणेरडया मनोराज्यांत थोडासा वेळ घालवून मीं आपलें मन रिझवीत असें! असो.

दुर्गी याप्रमाणें आपल्या नवऱ्याबद्दलच्या गोष्टी सांगे, आणि तो तिचा नवरा आज तिच्या घरीं जेवायला येणार होता, तेव्हां तो नवरा आहे तरी कसा, हे पाहण्याची मला खूपच उत्कंठा लागली होती. दहा-साडेदहा वाजण्याच्या सुमारास दुर्गी पुढील दाराकडे हेलपाटे घालण्यासाठीं निमित्त शोधून काढूं लागली. एकदा दोनदा तिनें मलाच पाठविलें, आणि मी दारांत जातें न जातें तों आपणहि माझ्या मागोमाग धावत आली. असें चाललें होतें. इतक्यांत तिच्या आईनें तिला घरांत कामाला बोलाविलें, तिकडे ती गेली; पण पुनः आनंदानें परत येऊन मला म्हणते, " आज मी कोशिंबिरी वाढणार आहे हो! तुझी माझी पंगत एक नाहीं व्हायची!" सकाळपासून तिच्या मनांत तें होतें. " आई, मी घेऊं का ग वाढायला आज?" असें तिनें एकदा भीडमर्यादा एकीकडे ठेवून विचारलेंदेखील! परंतु त्या वेळीं तिला कोणीं कांहीं उत्तरच दिलें नाहीं; पण शेवटीं तिचा हेतु पूर्ण होणार असें दिसलें. त्यामुळें तिला जो आनंद झाला तो विचारूंच नये. आपल्याला वाढायला सांगितलें तर आपण कितीकदा तरी आतां पुढें जाऊं असें वाटूनच

तिला तो अत्यानंद झाला, याच्यापलीकडे कांहीं नाहीं. शेवटीं एकदाचा तो नवरा आला ! त्या वेळीं मी जवळ नव्हतें, म्हणून दुर्गीनें अगदीं धावत धावत येऊन मला घाईघाईनें नेलें. त्या वेळीं सरासरी तीन कीं चार मंडळी होती. एक दुर्गीचा मामेसासरा अगदीं वृद्ध होता; दुसरा दुर्गीचा नवरा; तिसरा एक त्याचा कोणी स्नेही होता वाटतें, आणि चवथा तिचा धाकटा दीर होता. दुर्गीचा नवरा असेल सुमारें चवदा किंवा पंधरा वर्षांचा. अंगानें अगदीं हाडकुडा आणि काळा होता. पहिल्यानें तो तिचा नवरा असेल असें वाटलेंच नाहीं. तो त्याचा सोबती होता तोच तिचा नवरा होता असें मला वाटलें; पण दुर्गीनें स्वतः मला आपला नवरा अमका म्हणून सांगितलें. 'हें किचकट पोर का दुर्गीचा नवरा ! ' असें एकदम त्या वेळीं माझ्या मनांत आलें असें वाटतें. इश्श ! कसला मेला तो नवरा ! अन् दुर्गी कसली पोरगी ! पण असो. ते दिवशीं मला, दादाला आणि सुंदरीला, आम्हांला तिघांनाच दुर्गीच्या घरीं जेवायला बोलाविले होतें. दादा शाळेला उशीर होईल म्हणूनच जाऊं न जाऊं करीत होता, व शेवटीं गेला नाहींच. मी व सुंदरी मात्र गेलों.

या प्रसंगीं जर दुर्गीच्या माहेरची व सासरची थोडीशी हकीकत सांगितली तर वावगें होणार नाहीं, सबब ती हकीकत थोडक्यांत येथेंच सांगून देतें. आम्ही पुण्यास आल्यावर ज्या वाड्यांत राहायला आलों, त्याच वाड्यांत दुर्गीचा बाप राहात असे. त्याला एका कचेरींत चाकरी होती; त्याला एक मुलगी दुर्गी आणि एक पांचसहा वर्षांचा मुलगा एवढींच काय ती मुलें होतीं; त्याच्या घरांत त्याची आई व त्याची बायको, यांखेरीज दुसरे कोणी माणूस नव्हतें, वगैरे हकीकत मागें एक वेळ लिहिलीच आहे. दुर्गीचा बाप एकंदरींत चांगला गृहस्थ होता. त्याला पगार कांहीं फार नव्हता. तीस कीं पसतीस इतकाच होता; परंतु तो आपला संसार तेवढ्यांतल्या तेवढ्यांत टापटिपीनें करी, त्याच्या घरांत कारभारीण काय ती आईच होती. दुसरें कोण असणार ! आणखी ती आई तसल्याच उरकाची असे. वेळ पडली तर ती बाजारांतदेखील जाऊन धान्यधुन्य आणी. मुलगाहि तिच्या अगदीं अर्ध्या वचनांत असे. त्यानें कधीं तिला दुखविलें नाहीं. एकदा त्या बहिणाकाकू ( आम्ही सारीं त्यांस या नांवानें हांक मारीत असूं ) आजीच्याजवळ आपली हकीकत सांगत होत्या, ती मीं ऐकली होती. त्यांचा मुलगा सरासरी दहा वर्षांचा होता, तेव्हां त्याचा बाप वारला, आणखी तेव्हांपासून त्या आपल्या दिराजवळ राहून त्या दिराचे काबाडकष्ट करून आपल्या लेकाकडून त्यांनीं अभ्यास करविला. मुलगाहि आपला चांगला अभ्यास करी; आईला कधीं दुःख देत नसे; एक चुलती अतिशय कजाग होती. तरी तिचें कधीं त्यानें फारसें बोलून घेतलें नाहीं. जें कांहीं काम सांगेल तें त्यानें मुका-ट्यानें करावें, कोणी कांहीं बोललें तें मुकाट्यानें सोसून घ्यावें. आपला अभ्यास बरा कीं आपण बरा ! परंतु त्याचे नशीब तितकें जोरावर नसल्यामुळें त्याची पहिली परीक्षा लवकर उतरली नाहीं. पुष्कळदा गोते खावे लागले. शेवटीं चौथ्यानें कीं पांचव्यानें कायशी परीक्षा उतरली. मग पुढें दुसरा कसला अभ्यास करण्याच्या नादीं न लागतां

त्यानें चाकरीचा नाद धरिला. त्यास तावडतोब बाराची नोकरी लागली. चुलत्यानें लग्न वगैरे करून दिलें होतें. आईचे थोडेबहुत दागिने होते, तेच तिच्या सुनेच्या अंगावर घातले. होतां होतां बाराचौदा वर्षांत त्याला पसतीस रुपये झाले. एकंदरींत संसार मोठा सुखाचा झाला. मुलगी लग्नाची झाली, तेव्हां त्यांनीं आपल्याकडून गरिबीच्या मानानें करायचें तेवढें करून दुर्गीचें लग्नहि केलें. शंभर कीं सव्वाशें रुपये हुंडा दिला. त्यानें आपल्या बेतानें खरोखर फारच चांगल्या रीतीनें केलें आणि एकंदर संसारहि मोठ्या सुखानें चालला होता. दुर्गीचा बाप कांहीं फार वयाचा नव्हता; परंतु आपलें ऑफिस बरें कीं आपलें घर बरें. तो कधी बाहेर जाऊन बसलेला मला ठाऊक नाहीं. आम्ही आणि तीं कांहीं वर्षें एकाच वाडयांत होतों असें नाहो; पण तो गृहस्थ बाबांकडे गप्पाटप्पा मारण्यास फार क्वचित् येत असे. त्याच्या स्वभावालाच फार बोलायला नको असें दिसतें. त्याला वाचनाचा नाद किंवा दुसरा कसलाहि नाद असे, असेंहि नाहीं. सांपडल्या वेळांत त्यानें स्वस्थ बसावें, अगर आईशीं बोलत बसावें. त्याची बायको बरीक जरा ताठ्याची न् कुऱ्र्याची असे. तिचे बरेच गुण दुर्गीच्या अंगांत उतरले असावे असें दिसतें. ती आपल्या सासूला गप्प म्हणण्याइतकी जरी नाहीं, तरीपण गोष्टी सांगून उगीच बसविणाऱ्यांपैकींच होती. तिला थोडेंसें नटणें मुरडणेंहि आवडत असे. हाहि गुण दुर्गीनें आपल्या आईपासून उचलला होता. शिवाय, तिला भीडमर्यादाहि अंमळ कमी म्हटलं तर कांहीं वावगें होणार नाहीं. कोणत्याहि गोष्टींत प्रसंग पडला तर आपण कोणाशीं बोलावें आणि कोणाशीं नाहीं, याचा विचार न करतां ती साफ बोले. आमच्या बाबांशीं म्हटलें म्हणजे घरांतलीं माणसेंदेखील सहसा बोलण्यास धजायचीं नाहींत: परंतु एक दिवस बाबा व आजो माझ्या लग्नासंबंधानें कांहीं बोलत असतांना ही कांहीं कामासाठीं आमच्या घरांत आली होती; त्या वेळीं हिनें बाबांच्या तोंडचे कांहीं शब्द ऐकल्यावरून लागलीच पुढें सरसावून, "इकडे पाहा, यमीला नवरा छानदार बघा. पोरगी आहे चिमखडा; उगीच एखाद्या भिकाऱ्याटाकाऱ्याच्या गळ्यांत बांधूं नका. दोनचारशें रुपये हुंडा द्यायला तुम्हांला कांहीं हरकत नाहीं. चांगलं स्थळ बघा." असें म्हटलें. तें ऐकून बाबा आपले गप्पच बसले तिला त्याचें कांहींच वाटलें नाहींसें दिसलें. तीं आपलें काम काय होतें तें करून चालती झाली. मागून बाबांनीं तिच्या निर्भीडपणाबद्दल फार टीका केली आणि साऱ्यांनाच तें थोडेंसें गैर दिसलें. वास्तविक विचार केला, तर त्यांत गैर काय आहे कांहीं समजत नाहीं; तथापि आम्हां बायकांना अशा तऱ्हेनें वागण्याची ओळ लाविलेली असते, आणि जी ओळ चांगली आहे, म्हणून आज वर्षानुवर्षें वाखाणली जाते, तिला सोडून तें थोडेंसें होतें एवढेंच काय तें. इतकें कशाला ? दुर्गीच्या आईच्या त्या करण्यांत खरोखर गैर कांहीं नव्हतें; बायकांनीं स्पष्टपणें आपल्याला वाटेल तें दुसऱ्याजवळ बोलण्यास हरकत नसावी. आज जो त्यांचा अगदीं कोंडमारा झाला आहे, तसा असणें कांहीं बरें नव्हे असें मला अगदीं पक्कें वाटतें. तथापि मला स्वतःला चारचौघांत बोलण्यास भीड वाटेल आणि वाटतेहि. दादाकडे जर कोणी गृहस्थ आले असले, आणि मला त्याला कांहीं

जरुरीनें विचारण्याची पाळी आली, तर मी दुसऱ्या कोणाकडून विचारवितें. स्वत: कधीं पुढें जात नाहीं. गेलेंच तर त्याचे अगदीं घरोब्याचे स्नेही असतील त्यांच्यादेखत जातें. याचें कारण दुसरें कांही नाहीं. लहानपणापासून मनावर बसविलेले ग्रह, परक्या मनुष्यांशीं बायकांनीं बोलतां कामा नये हें आपलें पहिल्यापासून मनांत ठसविलेलें, जणूं काय साऱ्यांनींच पाराांनीं पाय धुतले आहेत. हीच दुर्गीची आई वयानें असेल मारी सव्वीससत्तावीस वर्षांची; इतरांच्या मतानें थोडीशी निर्भीड होती, म्हणून कांहीं दुसऱ्यातिसऱ्या गोष्टींत कोणी नांवें ठेवील कीं काय ? बायको अशी चोख होती कीं वाहवा ! आणि दुर्गी अगदीं तश्शी पुढें होणार असें दिसत होतें. मीं एकदा वर सांगितलेंच आहे, कीं 'काम करण्याचा आळस' या गुणाखेरीज बाकी सारे गुण दुर्गीच्या अंगीं आईपासून आले होते. दुर्गी कामांत अगदीं आळशी असे. तिची आई मात्र त्याच्या अगदीं उलट. कामाला नुसती वाघीण असे. सासूला म्हणून घरांतल्या कामाला हात लावायला नको असें करी. ती म्हणेच मुळीं कीं, " मी बाजाराचें सामानसुमानदेखील आणीन. सासूबाईंनीं पाट मांडून बसून चुकलंमाकलं सांगावं, अन् तिकडे चाकरी करून महिन्याचा पगार घरांत आणून टाकावा. मी सगळ्या गोष्टी सांभाळीन. संसार संसार तो काय असा आहे ? " हिच्या अंगीं कर्तृत्व काय होतें, हें पुढे आतां दुर्गीच्या चरित्रावरून कळेलच. सध्यां दुर्गीच्या सासरची हकीकत थोडीबहुत देतें.

दुर्गीच्या सासरचें कुटुंब मोठें होतें म्हटलें तर तसेंहि नव्हतें; लहान होतें म्हटलें तर लहानहि नाहीं. तिचा एक आजेसासरा, सासरा, एक चुलतसासरा, नवरा, एक दीर सुमारें दहाअकरा वर्षांचा, एक नणंद चारपांच वर्षांची आणि एक चुलतनणंद सातआठ वर्षांची; बायका म्हटल्या तर तिघीजणी. एक सासू ( आजेसासू होती परंतु ती दुर्गीचें लग्न झाल्यावर आठपंधरा दिवसांत वारली. ) एक चुलतसासू आणखी एक घरी आलेली आतेसासू, इतकें थोरलें कुटुंब असून मोठें म्हणावें तर मोठेंहि नाही, असें मीं म्हटलें याचें कोणास आश्चर्य वाटेल; परंतु तसें वाटण्याचे कारण नाहीं, कारण हें सर्व कुटुंब अगदीं त्यांच्या गोताचेंच होतें. त्यांत अजून दूरचा संबंध फारसा आलेला नव्हता. मीं तशीहि कुटुंबें व त्यांची मजा पाहिली आहे, यामुळें मला या कुटुंबाचें तादृश कांहीं वाटत नाहीं. असो. दुर्गीचा आजेसासरा अगदीं वृद्ध म्हणजे साठी उलटून गेलेला होता. तथापि म्हातारा असा खडखडीत असे, कीं कांहीं पुसूं नये. इतकें वय झालें तरी अजून तो वकिली करून कुटुंबाचें पोषण करीत असे. बाकी मंडळी सांबाच्या पुढेंच शोभणारी होती. दुर्गीचा सासरा यत्किंचित्‌देखील उपयोगाचा माणूस नसे. त्याला अक्कल म्हणजे काय पदार्थ हें मुळींच ठाऊक नव्हतें. बापानें मिळवून आणावें आणि आपण खावें, याबद्दल त्याला शरम कशी ती नव्हती म्हटलें तरी चालेल. त्याचें वय चांगलें चाळिशीच्या वर होतें, तथापि दमडीची भाजी आणायची तर हिशेब समजण्याची मारामार. अशांतली स्थिति ! तथापि त्याच्या बापाकडे कुळें वगैरे येत त्यांचीं कांहीं

पत्रें, कांहीं अर्ज वगैरे लिहून तो दमडी अधेला मिळवूं लागला होता. त्याचा भाऊ दुर्गीचा चुलतसासरा नाटकाचा शोकी. घरीं खावें आणि नाटकें करावीं. त्याखेरीज त्याला दुसरा उद्योगच नव्हता. बरें, नाटकें करून कांहीं प्राप्ति होत असेल असें म्हणाल तर रामाचें नांव ! दुर्गीचा सासरा दमडी अधेला तरी मिळवी, पण हा गृहस्थ घरांतला केव्हां केव्हां घालवी ! दुर्गीचा नवरा शरीरानें वगैरे कसा होता हें मागें सांगितलेंच आहे. विद्येनें तो इंग्रजी चौथ्या इयत्तेंत होता. आजाची सारी भिस्त काय ती याच पोरावर होती, आणि तो तसा हुशार होता असें म्हणतातहि. ही पुरुषमंडळीची हकीकत झाली.

बायकामंडळींत दुर्गीची सासू म्हणजे एक साधु स्त्री होती म्हटलें तरी चालेल ! आणि अशी हुशार पण पुनः गरीब बायको मीं कधीं पाहिलीच नाहीं. घरांतला वर सांगितल्या तऱ्हेचा तो संसाराचा गाडा ती कोण्या रीतीनें ओढीत असे, हें तिचें तिलाच ठाऊक ! ती माहेरची श्रीमंतीण, पण कधीं माहेरच्या पडपानें गेली नाहीं. तिला माहेराहून तिच्या भावांनीं थोडेंसें उत्पन्न करून दिलें होतें, तेवढें आणण्यासाठीं सालांतून आठचार दिवस जायची आणि पुनः आपल्या घरीं परत यायची. तिच्या सासऱ्याचा तिजवर असा लोभ असे, कीं कांहीं विचारूं नये. आणि तसा लोभ राहण्याजोगीच ती बाई होती. मीं एकदा सहज तिची हकीकत–पुढें पुष्कळ दिवसांनीं–दुर्गीच्या तोंडून ऐकली; तेव्हां तिला थट्टेनें म्हटलें, ‘ तुझा सासरा सासू व्हायला पाहिजे होता आणि सासू सासरा व्हायला पाहिजे होती, म्हणजे सर्व यथास्थित जरी नाहीं, तरी बरें झालें असतें. ’ एक पुरुषाच्या राकटपणाखेरीज सर्व कांहीं गुण त्या बाईच्या अंगीं होते. पुनः बाहेरून पाहणाराला ही बाई म्हणजे अशी कांहीं विलक्षण असेल, किंवा घरांतला अर्धा अधिक संसार ही ओढत असेल असें वाटायचेंदेखील नाहीं. असो. दुर्गीची चुलतसासू व आतेसासू यांची तऱ्हाच कांहीं निराळी होती. तेव्हां ही हकीकत एवढीच सोडून मी आतां दुसऱ्या कांहीं हकीकतीकडे वळतें.

◆ ◆ ◆

## २१ : दोन महिन्यांनंतर !

मागल्या प्रकरणांत जी दुर्गीच्या घरची जेवणाची हकीकत सांगितली ती घडून सुमारें दोन महिने झाले. इतक्या अवकाशांत बाबांनीं मजकरितां अनेक स्थळें पाहिलीं. त्यांना आतां रात्रंदिवस दुसरें कांहींच सुचत नव्हतें असें दिसलें. एखाद्याला सांगितलें तर खोटें वाटेल, पण ते गेल्या दोन महिन्यांत खरोखर वाळले. त्यांच्या वाळण्याला माझ्या लग्नाबद्दल काळजी, हेंच मोठेंसें कारण होतें असें नाहीं; तर माझा

असा समज आहे कीं, आई आतां फार दिवस जगत नाहीं, ती दिवसानुदिवस अधिकाधिक क्षीण होत चालली, असें पक्कें वाटून आपण तिला माझ्या लग्नाविषयीं दिलेलें अभिवचन कसें काय पार पडतें याचीच त्यांना विशेष चिंता लागली असावी. कांहीं असो, ते आतां स्थळावर स्थळें पाहूं लागले; तथापि त्यांच्या मनाजोगतें स्थळ एकहि दिसेना. ते रोज आजीच्याजवळ बसून काय काय केलें, कोठें कोठें स्थळें पाहिलीं याची सर्व हकीकत तिला सांगत असत, त्या वेळीं मला ऐकायला सांपडत असे. कोठें सावत्रसासू आहे, कोठें सासरा नाहीं कोठें, सासूसासरा आहेत, परंतु कुटुंब फारच मोठें आणि नवरा मुलगा विद्येंत फार कमी; कोठें सर्व जुळलें तर टिपण मुळींच जमायचें नाहीं; कुठें टिपण वगैरे जुळलें तर त्यांनीं हुंडाच भयंकर मागावा अशा एक ना अनेक अडचणी येत. कमींत कमी सुमारें पन्नास पाऊणशें स्थळें त्यांनीं पाहिलीं असतील; पण एकदेखील त्यांच्या बेतास जुळेना. "पोरीचं बाशिंगबळच खडतर. एकेकाचं तें हेंच असतं, चट्कन् म्हणून जुळून यायचं नाहीं. सतरा हजार खेंगटीं निघायचीं. असलं नशिबीं आईच्यादेखत लग्न व्हायचं तर होईल!" असे उद्गार आजीच्या तोंडून निघण्याला सुरुवात झाली. पण ते आपले हलके हलके आईच्या कानावर न जाईलसे निघत म्हणूनच बरें. बाकी आतां आई अगदींच आपल्या खोलीच्या बाहेर येईनाशी झाली. त्या पोराच्या मरणानें तिला अगदीं अंथरुणावर निजविलेंच म्हटलें तरी चालेल. क्षयाच्या माणसाच्या प्रकृतीचें मान कितीतरी विलक्षण असतें! मला तर त्या वेळीं कांहीं विशेष कळत नव्हतें, पण एवढें सहज समजे, कीं हिच्या प्रकृतीची चलबिचल कांहीं चमत्कारिक होई. आज दुपारीं असें वाटावें कीं, आतां ही आठचार दिवसांत बरी होणार, परंतु त्याच रात्रीं तिचा जीव इतका घाबरा होई कीं, आतां दोनचार दिवस तरी ती जगते कीं नाहीं अशी शंका यावी; यामुळें मंडळी फारच घाबरे. एक दिवस मला असें पक्कें आठवत आहे, कीं ती आपल्या पायांनीं दुर्गीच्या घरीं गेली आणि चन्द्रिणाकाकूंशीं नानातऱ्हेच्या गोष्टी सांगत सरासरी दोनअडीच तास बसली आणि त्याच रात्रीं मग तिला अंथरुणावरचें उठवेनासें झालें. ताप भरला तेव्हां आमची आजी आणि बाबा आपली आतां स्पष्ट म्हणतच, कीं कोण्या वेळीं काय होईल, याचा कांहीं नेम सांगवत नाहीं. हा सर्व प्रकार–म्हणजे आतां आपण फार दिवस वांचत नाहीं असें तिचें तिलादेखील चांगलें कळून चुकलें असावें, असें आतां आम्हांला स्पष्ट दिसलें. मागें एकदा तिनें मला आपल्याजवळ घेऊन दोन प्रहराच्या वेळीं जो उपदेश केला व जें काय सांगितलें त्या वेळचे ते तिचे उद्गार ऐकून तिला आपण लवकरच मरणार असें वाटून चुकलें होतें, अशाबद्दल कोणा घरांतल्या माणसास जर शंका राहिली असली, तर ती आतां मी सांगणार आहें या गोष्टीनें पार निघून गेली; येऊन जाऊन आपली आई इतक्यांत कसली मरते असें वाटणार मला, कारण मी लहान होतें (सुंदरीला तर कांहीं समजतच नव्हतें); पण घरांत जीं अनेक बोलणीं होत व उद्गार निघत, त्यांवरून आणि आईच्या स्वतःच्या बोलण्यावरून माझीदेखील खात्री झाली. तिला काय वाटलें असेल ते

असो; ती आतां आपली माझ्याशीं एखाद्या पोक्त्या – निदान चांगलें समजूं लागलेल्या मुलीपाशीं बोलावें किंवा तिला शिकवावें तसें शिकवूं लागली.

मी तिच्याजवळच नेहमीं निजत असे. तेव्हां रोजच्याप्रमाणें जेवण झाल्यावर आईची पासोडी पांघरून अंथरुणावर जाऊन पडलें. आजी आमच्या तिथेंच निजत असे पलीकडे. पण ते दिवशीं कुठल्याशा देवळांत कोण्या बोवाची फार चांगली कथा होती म्हणून जाणार होती. माझ्या मनांतून अर्थातच तिच्याबरोबर जायचें होतें; पण आईनें मला हलकेंच बोलावून ' आज कथेला जाऊं नकोस, मुकाट्यानें येऊन नीज, सासूबाईंना जाऊं दे ' असें मुद्दाम सांगितलें. असें आईनें सांगितल्यावर मग मी कशी जाणार? त्यांतून आतां माझें मला चांगलेंच समजूं लागलें होतें म्हटल्यास हरकत नाहीं. आजी गेली व तिच्याबरोबर आपणहि गेलों तर बरें होणार नाहीं, आईला कोणीतरी सोबत पाहिजे असें माझ्यादेखील मनाला वाटलें आणि मी तेथें जाऊन तरी कदाचित् निजणारच, असें म्हणून आजीनेंहि मला चलण्याविषयीं आग्रह केला नाहीं. तिला तरी आतां कोठें दगदग होई? याप्रमाणें आजीच्या बरोबर जाण्याचा नाद ते दिवशीं नसल्यामुळें मी आपली आतां सांगितल्याप्रमाणें अंथरुणावर येऊन पडलें. सुंदरी आधीच निजली होती. थोड्या वेळानें मलाहि झोप लागली. दादा आपल्या अंथरुणावर केव्हां येऊन निजला कांहीं मला ठाऊक नाहीं. तोहि बाबांच्या माडींत रात्रीचा अभ्यास करी आणि दहा–सव्वादहा वाजले कीं आईच्या माडींत येऊन निजे. सुमारें बारा वाजण्याचा सुमार असेल नसेल, आईनें मला एकदम हाका मारून उठविलें. " यमे, पोरी ऊठ; निजतेस काय? आतां कांहीं मी फार दिवस नाहीं जगत बरं ! " असे शब्द आईच्या तोंडावाटे स्पष्ट निघालेले माझ्या कानीं पडले. माझ्या जिवाचे त्या वेळीं काय झालें असेल आणि काय नाहीं हें माझें मलाच ठाऊक! मी आपली चट्कन् उठून आईच्या गळ्याला मिठी मारली. मला रडूं आलें आणि आतां मोठ्यानें हुंदका येणार इतक्यांत पट्कन् माझ्या तोंडावर हात ठेवून तिनें म्हटलें : " पोरी, तुला रडण्यासाठीं का जागें केलें? चिप् चिप्! मी आज तुम्हांला दोघांनाहि कांहीं सांगणार आहें. गणू शहाणा आहे, तो कांहीं असा रडायबिडायचा नाहीं. तूं मात्र आतां मोठ्यानें रडून तिकडे जागं करूं नकोस. " हे सर्व शब्द तिनें अशा कांहीं चमत्कारिक रीतीनें उच्चारलेले माझ्या कानीं पडले व त्याचा परिणाम त्या वेळीं इतका विलक्षण झाला, कीं ताबडतोब माझा हुंदका जिथल्या तिथें जिरला, आणि मी चित्राप्रमाणें तटस्थ होऊन तिच्याकडे टक लावून पाहूं लागलें. हें आहे तरी काय? पुढें आतां होणार काय? आतां आपल्याला ही सांगणार काय? कोणत्याहि गोष्टीचा मला उमज पडेना. एखादा मंत्र म्हटल्याबरोबर जसा तत्काळ परिणाम व्हावा, तसा त्या वेळीं तिच्या बोलण्यानें माझ्या रडण्यावर झाला. मी गप्प बसलेली पाहून तिनेंहि आपले डोळे पुसले, आणखी क्षणभर माझ्या तोंडाकडे निरखून पाहिल्यावर एक सुस्कारा टाकून ती मला म्हणाली : " यमे, आतां तुला सांगायचं मिळून एवढंच, कीं तूं आपल्या सासरीं

चांगली वाग. मी मेलें म्हणजे तुला माहेर नाहींसं झालं म्हणून समज; माझ्यादेखत तुझं लग्न झालं, तर सासरचीं माणसं कशीं आहेत, काय आहेत, तें मला कळेलच; नाहीं झालं, तरी कोणाशीं तुसडयासारखी वागूं नको. कोणाला टाकून बोलत जाऊं नको. कोणीं काम सांगितलेलं ऐकल्याशिवाय राहूं नये, मग तें कोणींहि सांगितलेलं असो—लहान दिरानं का सांगितलेलं असेना—करून सोडावं. बरं, कोणीं कांहीं बोललं तर उलट उत्तर मुळींच करूं नये, समजलीस ? बाई ग, बायकांना कोणाच्या ना कोणाच्या तरी मनधरण्या करून राहिल्याखेरीज गत्यंतर नाहीं तुझ्या नशिबानं तुला नवरा चांगला मिळाला, सासरचीं माणसं चांगलीं असलीं तर फारच चांगलं. बरं, नसलीं तरी आपण चांगल्या तऱ्हेनं राह्यलं तर कोणाचं भय बाळगायला नको. कोणाची गोष्ट ऐकली तर ती दुसऱ्या कोणाजवळ सांगूं नये. इकडचं तिकडे, तिकडचं इकडे, असं केलं, तर त्यांत फजिती आपलीच होते. आपल्यादेखत कोणी कांहीं बोललं, नाहीं तर आपल्या मनांतून नसतांना आपल्या कानीं पडलं, तर त्याचा उच्चार कुठेंदिखील करूं नये हाच शहाणपणा. कामाकडे नेहमीं चित्त ठेवावं. कुठें सांडलं, कुठें लवंडलं—सगळ्या गोष्टी दुसऱ्यानं सांगितल्या म्हणजेच करायच्या असं तर मुळींदेखील ठेवूं नये. जे सुचेल काम, तें होईल तितकं नीटनेटकं करून टाकावं; कोणाची वाट म्हणून पाहूं नये. कामाच्या वेळीं अंगाखांद्याकडे पाहणाऱ्या माणसासारखी फजिती दुसऱ्या कोणाची नाहीं, समजलीस ? मी जर जगलें असतें तर नीट शिकवलंच असतं—पण—"

हे शेवटले शब्द तिच्या तोंडांतून पुरते बाहेर पडले असतील नसतील इतकेंच काय तें; दादा चट्कन् आपल्या अंथरुणावरून उठून आईच्याजवळ आला आणि एकदम "आई, आई, असं कां तूं म्हणतेस ? तूं गेल्यावर आम्हांला को–" असे शब्द कंठ दाटून येऊन अर्धवट उच्चारीत त्यानें तिच्या मांडीवर डोकें टेकलें. तें पाहिल्याबरोबर आम्हां दोघांची काय बरें स्थिति झाली असेल ? मीं त्याच्या गळ्याला एकदम मिठी मारली आणि आम्ही दोघेंहि स्फुंद–स्फुंदून रडूं लागलों. आईनें कांहींएक न बोलतां आम्हांला दोघांनाहि पोटाशीं धरलें. तिच्या मनांत काय चाललें होतें तें कांहीं मला सांगतां येत नाहीं; परंतु पांचचार मिनिटेंपर्यंत आमच्या अंगावर एकसारखे अश्रु पडत होते. ते अश्रु अंगावर पडतांच माझी काय अवस्था झाली त्याचें स्मरण झालें, कीं मला त्या सर्व गोष्टी माझ्या डोळ्यांपुढें दिसूं लागतात, आणि अंतःकरणाची स्थिति इतकी कांहीं चमत्कारिक होते, कीं तिचें वर्णनच करतां येत नाहीं. ते ऊन ऊन अश्रु माझ्या अंगावर या घटकेस पडताहेत असें या वेळीं मला वाटून अंगावर शहारे उभे राहिले आहेत. आतां क्षणभर मी आपली लेखणी पलीकडेच ठेवतें; कारण माझ्या मनाची स्थिति फार विलक्षण झाली आहे. 'अहाहा ! आई, आई, आतां पुनः तुझें दर्शन कधींतरी होईल काय ? आतां पुनः मला तूं किंवा तुला मी कधींतरी दिसेन काय ? पण छे ! मी आतां तुला दिसत नाहीं, हेंच चांगलें आहे. मला या अशा स्थितींत पाहिल्यावर तुझी काय अवस्था होईल बरं ! '

वर सांगितलेला प्रकार सुमारें एकदोन मिनिटें चालला असेल. लागलीच तिनें आम्हांला दूर केलें, आपले डोळे पुसले, ती एकदम किंचित् मोठ्यानें हसली आणि दादाकडे पाहून म्हणाली : " गणू, मला नाहीं वाटलं तूं इतका वेडा असशील असं. वेड्या, आतां महिन्या-दोन महिन्यांत मी तुम्हांला नाहींशी होणार हें तुला कळत का नाहीं ? तुझ्यावर तर माझी सारी भिस्त ! यमीला काय सांगायचं तें सांगितल्यावर मी तुला जागा करून ' या पोरांचा तूं पुढें संभाळ करणारा बरं ' असें सांगणार होतें. अरे वेड्या, मी गेल्यावर, पुढें काय होईल, काय नाहीं याचा नेम आहे का ? तूं जर धीर धरला नाहींस, यमीची आणखी सुंदरीची काळजी आपल्याला, असं जर तुला वाटलं नाहीं तर वाटणार कोणाला ? " असें एकसारखे ती बोलत होती. दादा आपला निव्वळ खालीं मान घालून ऐकत होता. शेवटीं तिनें त्याचें डोकें वर करून ती त्याला म्हणाली : " मी आतां सांगितलं तें ध्यानांत ठेवून त्याप्रमाणं वागशील ना ? " दादानें रडत " होय " असें उत्तर दिलें. तेव्हां ती पुनः चमत्कारिक तऱ्हेनें हसली आणि पुनः त्याला जवळ घेऊन मला अगदीं पलीकडे जा म्हणून सांगून त्याच्या कानांत बराच वेळ कांहीं पुटपुटली. मला न कळवतां दादाला ही येवढें काय सांगते आहे, असें मला वाटलें, पण तिला विचारण्याचा धीर होईना. तिचे बोलणें संपल्यानंतर दादाचा चेहरा इतका कांहीं वाईट झालेला दिसला, कीं कांहीं पुसूं नये. त्याचें तिचें बोलणें संपल्यावर तिने त्याला " जा आतां मुकाट्यानें नीज " असें सांगितलें. तोहि अंथरुणावर जाऊन पडला. आईनें पुनः मला जवळ बोलावलें. आपण पडली व मला पुढें घेऊन तिनें पूर्वींप्रमाणें उपदेश चालविला; परंतु आतां माझें लक्ष तिच्या बोलण्याकडे नसून तिनें दादाला काय सांगितलें असावें याकडे होतें.

दुसरे दिवशीं सकाळीं मीं दादाला " आईनं तुला काल रात्रीं काय रे सांगितलं ? मला सांग " असें विनवून विनवून म्हटलें असेल कीं नसेल, याची शंका कोणाला येणार नाहीं; कारण आतांपर्यंत लिहिलें आहे इतकें चरित्र जर कोणीं वाचलें, तर माझ्या एकंदर हकीकतीवरून त्याला अगदीं सहज अनुमान करायला येईल. पण तो कसला छट, त्यानें मुळींदेखील दाद लागूं दिली नाहीं. त्याच्या स्वभावांत दिवसानुदिवस किती फरक पडत चालला होता, हें मीं पुष्कळदा सांगितलेंच आहे. त्याचा तो मनाचा मोकळेपणा दिवसानुदिवस कमी कमी होत चालला होता. एका आईखेरीज तो दुसऱ्या कोणाशीं फारसें बोलत नसे म्हटलें तरी चालेल. आपला अभ्यास बरा कीं आपण बरा, ही स्थिति त्याची होती; आणि दिवसानुदिवस ती वाढत चालली होती, तथापि तो मनांतल्या मनांत फार कुरठत असे, यांत बिलकूल शंका नाहीं. माझ्याशीं तर तो आतांशा आपला अगदीं बेताबातानें बोले. मात्र वाचण्यालिहिण्यासंबंधानें कांहीं त्याला विचारायला गेलें, तर काय विचारीन तें स्पष्ट समजून सांगितल्याखेरीज तो कधीं राहिला नाहीं. शिवाय आतांशा आतांशा तो मला कुठून सोबत्यांकडून पोथ्या पुस्तकें आणून देऊन, आईच्याजवळ बसून वाच म्हणून मला सागत असे; पण सारें जितक्यास तितकें असे. मागल्यासारखा आतां

कधीं आमच्याशीं खेळायला कीं गप्पा सांगायला आला आहे, असें कधींच नाहीं. तो आधीं आतांशा रिकामा सांपडतच नसे. असलाच एखादा वेळ रिकामा तर आईच्या जवळ येऊन बसे. तरी पण एक गोष्ट आतां माझ्या विशेष नजरेस येऊं लागली; ती ही कीं, तो मजवर व सुंदरीवर विशेष प्रेम करूं लागला. तो आतां केवढा आणि मी ती केवढी ? दोघांत कांहीं फारसें अंतर नव्हतें. तेव्हां त्याची माझ्यावर माया आहे कीं नाहीं किंवा दिवसानुदिवस जास्त होत चालली होती, हें समजायचें कसें, असें सहज कोणाला वाटणार आहे; परंतु बहीणभावंडें कितीहि लहान असोत, त्यांची एकमेकांवर माया आहे कीं नाहीं, असली तर ती कितपत आहे, हें समजण्यास फारसें कठीण जात नाहीं. बारीकसारीक अशा अनेक गोष्टींनीं तें तेव्हांच कळून येतें. बहीणभावंडें एकमेकांवर रुसलीं, एकमेकांशीं भांडलीं, एकमेकांला डसलीं, त्यांनीं एकमेकांला मारलें, तरी पण त्यांचें खरोखर प्रेम नसतें असें नाहीं; आणि आहे, तें कितपत आहे हें समजण्यांतहि तेव्हांच येतें. हजार गोष्टी ! एकमेकांवाचून कांहीं सुचायचें नाहीं. एकाच्या हातावर कांहीं ठेवलें, कीं दुसऱ्याला त्याचा हिस्सा दिल्याखेरीज आपण खायचें नाहीं. खायाजेवायच्या वेळीं एकमेकांची चौकशी केल्याखेरीज बसायचें नाहीं. अशा एक ना दोन, शेंकडों गोष्टींवरून एकमेकांच्या एकमेकांवरील प्रेमाची परीक्षा होते; त्या सगळ्या येथें सांगत बसण्यांत तात्पर्य नाहीं. ज्यांना बहीणभावंडांच्या सहवासाचा अनुभव असेल किंवा निदान अशा प्रेमळ बहीणभावंडांचें वर्तन पाहण्याचा सुप्रसंग आला असेल, त्यांनाच तो कळेल. आपली मुलें एकमेकांवर फार माया करितात, हें पाहून आईबापांना किती आनंद होत असेल त्याचें तर वर्णन करणें शक्यच नाहीं. अनुभवाखेरीज तें व्यर्थच, असे माझें अनुमान आहे. एका मुलाला मारलें अगर रागें भरलें असतां दुसरें मूल त्याच्यासाठीं रडूं लागलें म्हणजे त्या मुलाच्या आईस किती बरें कौतुक वाटतें!तें तर पुष्कळांना ठाऊक असेल. कारण एक वेळां असें झालें म्हणजे त्या रडणाऱ्या मुलाच्यादेखत कोणाला तरी – विशेषतः त्याच्या वडील भावंडाला - लटकेंच मारून तें मूल रडतें कीं नाहीं, हें आपण कित्येकदा तरी पाहतों. असो. इतका पाल्हाळ करून हे सारें लिहिलें याचें कारण इतकेंच, कीं दादाची मजवर व सुंदरीवर अधिक अधिक माया बसत चालली–किंवा दिसून येऊं लागली–असें जें वर लिहिलें आहे, तें लिहिण्यास मला कारण काय असें म्हटलें तर बरोबर देतां यायचें नाहीं. तसें मला वाटूं लागलें याला बारीकसारीक अनेक कारणें होतीं. तीं सगळीं मिळून मला वाटलेलें अगदीं बरोबर वाटलें; परंतु दुसऱ्यानें कोणीं कारण विचारलें तर तें सांगतां येणें फार कठीण. एवढ्याकरितां मीं आपल्या सर्वांच्या साधारण अनुभवावर हवाला दिला आहे. आतांशा दादा आमची खाण्यापिण्याची चौकशी करीत असे; मी कुठें घटकाभर दिसली नाहीं, तर माझा शोध करीत असे, वगैरे वगैरे अनेक गोष्टी. शिवाय बाबांनीं आजीच्याजवळ माझ्या लग्नाच्या गोष्टी काढल्या, आणि एखाद्या स्थळाची हकीकत सांगितली, तर आपण आपलें काम टाकून चोरून येऊन ऐके. एक वेळां बाबा त्याला याबद्दल रागें भरले; परंतु त्यानें तें ऐकलें न ऐकलेंसें करून पुनः

आपला क्रम सुरू ठेविलाच. बाकी त्यांच्या दुसऱ्या कसल्याहि गोष्टी चालल्या तर तो तेथें उभा राहावयाचा नाहीं, की कांहीं ऐकावयाचा नाहीं, पण हें असें कांहीं निघालें, कीं त्यानें येऊन कानोसा घेतलाच म्हणून समजावें. असें तो काय हेतूनें करीत असे, हें मला पुढें कळलें व त्यामुळेंच मला त्याच्या एकंदर मायाळू स्वभावाबद्दल, विशेषतः आईच्या ठिकाणीं जी त्याची भक्ति होती, तिच्याबद्दल आश्चर्य वाटूं लागलें. एक वेळां तर त्यानें एका स्थळाविषयीं कांहीं वाईट माहिती आजीजवळ येऊन मुद्दाम सांगितली. तें स्थळ बाबांच्या मनांत फार भरलें होतें असें दिसलें. बाबांच्या पसंतीस मुलगा आला होता, मलाहि त्यांच्याकडील मंडळींनीं येऊन पाहिलें होतें व पसंतहि केलें होतें; परंतु दादानें चौकशी करून–दादा आणि तो मुलगा एकाच शाळेंत होते तो मुलगा–सरासरी अठरा वर्षांचा–दादाच्या वरच्याच वर्गांत होता. मुलगा अगदीं लठ्ठ आणि वर्तणुकीनें वाईट. आतांच विडया ओढतो वगैरे गोष्टी दादाला माहीत होत्या; शिवाय क्लासांत अगदींच नादान; तेव्हां त्यानें चापून आजीला सुचविलें, की त्या पोराला कांहीं यमी देऊं नका; पुढें बाबांनीं चौकशी करतां त्यांचेंहि मन उडालेंच; तेव्हां तो नाद सुटला. बिजवराला न देण्याविषयीं तर त्याचा कोण आग्रह ! पण हें सारें व्हावयाचें आजीजवळ; नाहीतर आईजवळ. बाबांच्यापुढें एक शब्ददेखील काढण्याची प्राज्ञा नव्हती. बाकी ते आतांशा तितका कठोरपणा दाखवीत नसत, हें मीं मागें सांगितलेंच आहे. पण ते जरी कसेहि असले तरी तथापि आम्हांला लहानपणापासून जी गोष्ट अंगवळणीं पडली ती कांहीं जाते थोडीच ! आम्हांला आपला त्यांचा पक्का धाक बसलेला. त्यांचा कठोरपणा त्यांच्या अंगांतून जरी किती कमी झालेला दिसला तरी आमच्या मनांत तो अगदीं पक्का बिंबलेला, तो कसचा दूर होतो ? अर्थात् आमच्यापेक्षां सुंदरी त्यांना फार कमी भीत असे. कारण ती एक तर लहान होती, आणि तिच्याशीं ते कठोरपणा दाखवीत नसत. असो.

स्थळें पाहण्याचें काम झपाटयानें चालूंच होतें. अनेक स्थळें आतांपर्यंत पाहिलीं; मनाजोगें एकहि वाटेना. होतां होतां आजीनें पुनः एका जुन्या स्थळाची गोष्ट काढली. मला, एक वृद्ध स्त्री, तिच्याबरोबर एक सोळासतरा वर्षांची मुलगी आणि तिघे गृहस्थ पाहण्यासाठीं आले होते. त्यांच्याकडून पुनः शोध चालला होता. त्यांतल्या त्यांत आजीची कांहीं जुनी ओळख का थोडेंसें नातेंच निघालें, ती वृद्ध बाई आजीच्या मावस· नणंदेची चुलतजाऊ कीं असेंच कांहीं जवळचें नातें निघालें. दोन म्हाताऱ्या बायका एके ठिकाणीं भेटल्या आणि त्यांची कांहीं ना कांहीं फार जुनी ओळख निघाली नाहीं किंवा कांहीं नातें निघालें नाहीं, असें मुळींच कधीं व्हावयाचें नाहीं म्हटलें तरी चालेल. कांहीं ना कांहींतरी त्यांचा बादरायण संबंध जुळायचाच जुळायचा. त्यांतून आमची आजी तर नातें व ओळखी काढणारी अशी जबर होती कीं कांहीं पुसूं नये. एकदां तिची व तिच्या बरोबरीच्या वयाच्या माणसाची गांठ पडली कीं पुरे, त्याच बैठकीस निदान दुसऱ्या भेटीला जुनी ओळख आणि नात्याचें शेंपूट निघायचें. मला पक्कें आठवतें आहे,

कीं आम्हीं एकदोनदा याबद्दल तिची थट्टादेखील केली आहे. तेव्हां या तिच्या क्रमाला अनुसरून तिचें तें आपलें नातें निघालें. असो.

असें नातें निघाल्यानंतर त्या वृद्ध बाईच्या नातवास आपली नात देणें हें अगदीं फार चांगलें; त्याबद्दल मुळींच कांकू नको असें मनांत ठरून तिनें अगदीं मनापासून खटपट चालविली.

त्या बाईचा नातू (मुलीचा मुलगा) नवरा मुलगा होता त्याच्यासाठीं मला पाहायला ती आली होती; आणि ती दुसरी मुलगी खरोखरीच बनीची थोरली बहीण होय. म्हणजे ती मुलगी आपल्या आतेभावासाठीं मला पाहायला आली होती. ती वृद्ध बाई त्या मुलीची अर्थात् बनीची सख्खी आजी (बापाची आई) होती. मुलाचा बाप लहानपणींच वारल्यामुळें तो आपल्या मामाजवळ म्हणजे बनीच्या बापाजवळच वाढला होता. बनीची आत—त्या मुलाची आई—नवरा मेल्यानंतर काय होतें नव्हतें तें घेऊन आपल्या माहेरीं येऊन राहिली. तिचा एक सख्खा दीर होता, परंतु त्या दिराजवळ राहणें हें तिला बरें वाटलें नाहीं. आपलें होतें नव्हतें तें घेऊन येण्याविषयीं भावानें व आईनेंहि फार आग्रह केला, तेव्हां तेंच जरा बरें वाटून ती तेथें येऊन राहिली. मुलगा सारा पांच की सहा वर्षांचा होता. मुलाच्या आईचे दागदागिने चांगले होते परंतु ते सर्व-पण ही सारी हकीकत मला जेव्हां कळली, तेव्हांच्या काळची हकीकत सांगतांनाच सांगितली असतां बरें होईल; सबब आतां येवढेच ठेवून पुढें हकीकत लिहूं लागतें. वर सांगितलेली हकीकत बाबांना कळली, तेव्हां बाबा अगदीं नाक मुरडून म्हणूं लागले, " छे बोवा ! अशा अडीअडचणींत पोरीला देणं कांहीं वाजवी नाहीं. मुलाला बापचीप असता, निदान तो मुलगा आपल्या चुलत्याच्या जवळ जरी असता, तरी हरकत नव्हती. आजीला व आईलाहि तसेंच वाटें; पण आजीला एकदा असें होऊन गेलें होतें कीं, पोरीचें लग्न होईल केव्हां; त्यामुळें ती आपली जरा मुळमुळीत असे. आई तर एकदा दोनदा म्हणालीच मुळीं कीं, एवढया थोरल्या खेळखसाल्यांत कांहीं पोरीला देऊं नये; पण चमत्कार काय पाहा, या ठिकाणीं माझें टिपण अगदीं फारच सोळा आणे उतरलें. मुलाच्या हुषारीविषयीं जो तो तारीफ करीत असे. दादाच्या वर तीन वर्गांत असून त्याच सालीं एक यत्ता टाकून पहिल्या परीक्षेला जायचें चाललें होतें. वर्गाचे मास्तर वगैरे अगदीं अतिशय हुशार म्हणून तारीफ सांगत; तेव्हां या सर्व बाहेरल्या गोष्टी पाहून बाबा एखाद वेळ म्हणत, " कांहीं हरकत नाहीं, यावी तिथेंच; बाप नसला म्हणून काय झालें ? मामांच्या घरीं असेंच काय जन्मभर राहायचें आहे ? आतां दोनचार वर्षांत मुलाच्या चार परीक्षा झाल्या, कीं तो आपल्या उद्योगधंद्याला लागेल आणखी वेगळा होईल." असें ते म्हणाले, कीं आजी अगदीं खुष होई आणि म्हणे, " हो तर काय ? खेळखसाला खेळखसाला तो किती दिवसांचा ? फार झालं तर चारपांच वर्षें आणखी. तोंपर्यंत यमीला तरी काय समजणार आहे ! तिला समजूं लागतं आहे, संसार करण्याजोगी ती होते आहे, तो खेळखसाल्यांतून बाहेर निघतेच आहे."

अशा तऱ्हेचे उद्‌गार निघूं लागले आणि त्यांत दादाहि अनुकूल असेंच बोलूं लागला. तो तिकडच्या हुषारीचेंच फार वर्णन करून आजीला व आईलादेखील म्हणे, "तुम्ही आतां उगीच हे करूं नका, मुकाट्यानें यमीला तिथें द्या. असं स्थळ पाहूं गेल्यास कुठें मिळणार नाहीं."

नेमानेम असतो तो कांहीं विलक्षणच असतो. पुण्यांत आल्यावर जी मंडळी मला पहिल्यानें पाहण्यास आली, त्यांच्या घरीं मला पडायचें होतें परंतु पुढें आणखी पांच-पन्नास स्थळें पाहून नंतर तेंच शेवटीं ठरायचें होतें. त्या स्थळाविषयीं प्रथमतः साऱ्यांनीं नाकें मुरडलीं; किंबहुना त्याचा विचारदेखील केला नाही. बाबांनीं तर त्या वेळीं त्या स्थळाची, कीं नवऱ्या मुलाची चौकशीदेखील करण्याचें मनावर घेतलें नाहीं. जर तो कोणीं काहीं विचार केला असेल तर तो मींच आणि तो बनीच्या भयाबद्दल ! परंतु आतां त्या स्थळाचा फक्त चांगलेंपणा मात्र साऱ्यांस दिसूं लागला. मला स्वतःलादेखील बनीचें भय वाटेनासें झालें आणि सर्वांप्रमाणें मलाहि आपल्याला तेथेंच द्यावें असें वाटूं लागलें.

वस्तु असते जवळ पण आपण शोधीत असतों भलतीकडेच ! आणि मग ती एकदम अचानक सांपडली, कीं आपलें आपल्यालाच आश्चर्य वाटूं लागतें कीं, इतक्या जवळ असून आपण विनाकारण सारा गांव पालथा घातला ! तशासारखीच कांहीं अंशीं आमची साऱ्यांची स्थिति झाली. वर आतां मीं सांगितलेंच आहे, कीं माझ्या लग्नासाठीं बाबांनीं एक नाहीं—दोन नाहीं—शें पन्नास स्थळें पाहिलीं असतील; परंतु सरतेशेवटीं जेथे नेमानेम होता तेंच ठरलें. आतां पोरीचें लग्न करायचें असें मनांत येण्याबरोबर पुण्यांत जें स्थळ मला प्रथम पाहायला आलें, तेंच अखेरीस कायम झालें. आम्ही जरी इतर स्थळें पाहात होतों, तरी त्या घरची मंडळी आज ही बाई, उद्यां ती बाई; आज हा गृहस्थ, उद्यां तो गृहस्थ; अशी मंडळी येऊन मला पाहून जातच असत. आणि त्यांचा दुरून दुरून नाद चालूच होता. तेव्हां तेंच ठरल्यामुळें मधील खटपट आणि दिवस मात्र व्यर्थ गेले. परंतु त्याच स्थळीं मीं पडावें हा जसा नेमानेम होता, तसाच कांहीं अधिक खटपट होण्याचा व दिवस व्यर्थ जाण्याचाहि नेमानेमच होता असें म्हणून स्वस्थ बसावें. असो.

टिपण वगैरे जुळतें आणि बाबांचा मला त्या ठिकाणीं देण्याचा निश्चय आहे हें पाहून त्या मंडळींनीं हुंडयापांडयाबद्दल घासाघीस करण्याचा बेत केला असें दिसतें. कारण पहिल्याप्रथम आमच्या इकडे कांहीं निश्चय होईपर्यंत त्यांच्याकडून "तुम्ही आम्हांला काय वाटेल तें द्या, सोयऱ्याधायऱ्यांकडून घेतलेलं असं काय जन्माला जायचं आहे ? दिलंत तरी वाहवा, न दिलंत तरी आमचं कांहीं म्हणणं नाहीं. दिलंत कांहीं तर तुमच्याच लेकीला एखादा दागिना घालूं. नाहीं दिलंत तरी आम्हांला काय ! चालीचे चार दागिने–कंगण्या पाटल्या–घालायचे ते घालूंच." अशा तऱ्हेचीं बोलणीं होत. 'परंतु आतां जरा ती मंडळी बरीच ओढून आणूं लागली. पहिल्या खेपेस जो वृद्ध गृहस्थ मला

पाहण्याला आला होता, त्यानें तर स्पष्ट असें सांगितलें कीं, " मुलगा कांहीं असा तसा नाहीं, त्याला हजारहजार बाराबाराशें रुपयांच्या मुली आज सांगून येत आहेत, पण त्या टाकून तुमचीच करूं म्हणतों; कां? तर आपली बरोबरीच्याशीं गांठ घालावी; पण तुम्हीं आपले अगदींच हें करायला लागलां तर तें कसं चालेल? कांहीं तुमचं होऊं द्या–कांहीं आमचं ऐका. मी आतां तुम्हांला सांगतों, ऐका. तुम्ही आपले फार कांहीं करूं नका. तीनशें रुपये द्या हुंडा. वरदक्षिणाच ती. ती कांहीं तुम्ही नाहीं म्हणूं नये–अन् म्हणणार नाहीं अशी माझी खात्री आहे अगदीं. शंभर रुपये धरा मानपानाचे. अहो; मुलाची थोरली मामी म्हणजे त्याला आईसारखीच आहे. तिनंच तर त्याचं सारं केलं, तेव्हां विहिणीचे बहुतेक मान तिला दिले पाहिजेत. धाकटी मामी आहे दुसरी अन् तिच्या नवऱ्याच्या जिवावर तर सगळया गोष्टी! तेव्हां तिचा मानपान ठीकठीक करायला तुम्हांला कांहीं सांगायला पाहिजे असं नाहीं. बाकीच्यांचं आपलं तुमचं तुमच्यावरच सोंपवतों; पण एवढंच कीं, एक रासनहाणी आणखी तोंड धुण्याचं सामान एवढं बरीक निराळं धरायचं आणखी." अशा तऱ्हेनें त्या वृद्ध गृहस्थानें नानातऱ्हेनें तेंच तेंच बोलून आपला मुद्दा मात्र सोडला नाहीं. हा वृद्ध गृहस्थ त्यांच्या घरांतला अगदी कर्ताच म्हटलें तरी चालेल. माझ्या सासूचा चुलत चुलता, पण पुतण्यांनीं आपल्याजवळ बाळगून त्यांना अगदी वडिलांप्रमाणें मानलें होतें. काका करतील ती पूर्वदिशा! असो.

वर सांगितल्याप्रमाणें वाटाघाट चालू होती. आतां एक काय तो अखेरचा निश्चय केला पाहिजे असें बाबांचें म्हणणें होतें. तिकडील मंडळी तर अगदीं ऐकेनात. ते आपले तीनशें रुपये हुंडा आणखी ते मानपान, अन् करणी हेंच घेऊन बसले. बाबा तर कांकूं करूं लागले, आणि इतक्या सगळ्यांत मजा ही कीं, बाबांनीं आजोबांना पत्र लिहिण्याचें अगर त्यांचा विचार घेण्याचें नांवदेखील काढलें नाहीं. सरतेशेवटीं एक दिवस आईनें बाबांस बोलावून आणून निक्षून सांगितलें की, " मामंजींना बोलावून आणवा आणखी त्यांच्याकडून काय तें करवा. त्यांना पत्रदेखील गेलें नाहीं. ते म्हणतील तरी काय? अन् लोकं नाहीं का हसायचीं?" हें बाबांना सांगतांना आई जितकी ठासून बोलली तितकी कधींच बोलली नसेल. आतांशा आताशा ती केव्हां एखाद वेळ बोलेच असे, आणि बाबांनाहि तें चमत्कारिक वाटत नसे; पण आज हा आत्तांचा प्रकार अगदींच निराळा दिसला. आज आपल्या म्हणण्याप्रमाणें करायला लावायचेंच असा अगदीं दृढ निश्चय करून जसें बोलावें तसें ती बोलली. हा जो दिवसानुदिवस तिच्या वर्तनांत व बोलण्याचालण्यांत निर्भीडपणा येत चालला त्याचप्रमाणें बाबांच्याहि स्वभावांत फरक पडत चालला. त्याला कारण तिच्या प्रकृतीचें मान होय, हें उघडच आहे. आईच्या-समोर बाबा हल्लीं अगदीं दीनवाणे दिसत. आतांचीच गोष्ट घ्याना! आईनें वर सांगितल्या-प्रमाणें आजोबांना बोलावण्याचें नांव मात्र काढलें, त्याबरोबर ते ताबडतोब " होय, तसंच करतों आं," असें म्हणून त्यांनीं खरोखरीच आजोबांना एक लांबलचक पत्र लिहिलें. आजोबांचा विचार घेण्याबद्दल आजीनें आधीं तीनच दिवस त्यांच्याजवळ गोष्ट

काढली होती. पण त्यांनीं तिला म्हटलें, " त्यांनीं आज तीन महिन्यांत जर मला पत्र लिहिलं नाही, त्यांना जर माझा एवढा हा वाटतो, तर मी काय म्हणून लिहीन ! त्यांना गरज नाही तर मलाहि गरज नाहीं, " असेंहि स्पष्ट सांगितलें होतें. आजी बिचारी पडली गरीब. तिचे काय चालणार ? ती स्वस्थ बसली. पण तिला खरोखर किती वाईट वाटलें असेल बरें ? ते तिला वाईट वाटलें असें जाणूनच—कारण आजीनें आईजवळ उचारून दाखविलेंच मुळीं—आईनें स्वतः वर सांगितल्याप्रमाणें बाबांना म्हटलें. तिच्या तोंडून तें ऐकण्यावरोबर ते एक अक्षरदेखील उलट बोलले नाहीत. जणू काय त्यांनीं ही बोलेल तें करायचे असा निश्चयच केला असावा असें दिसलें. आजोबांचे व त्यांचें विळ्याभोंपळ्याइतकें उजूं ! काय हा चमत्कार असेल तो असो ! पण बाबांच्या मनांत आजोबांना पत्र ल्याहायचें नव्हतें; इतकेंच नव्हे, तर लग्न होईपर्यंत कळूंदेखील द्यायचें नव्हतें ! प्रत्यक्ष बाप पण आपलें इतकें तेढें ! पण असो. आईच्या सांगण्यानें का होईना, त्यांनीं त्यांना तावडतोब येण्याविषयीं पत्र लिहिलें. शिवाय आईनें दादाकडून आपल्या नांवानेहि एक पत्र लिहविलें. तिला आजोबांचा स्वभाव पक्का ठाऊकच. बाबांचें पत्र गेलें, पण येतील की नाहीं याची शंका, तेव्हां आपण एक चांगलें गौरवाचें पत्र लिहावें असे मनांत येऊन तिनें अधिकउणा विचार न करितां दादाकडून चांगलें लांबलचक पत्र लिहविलेंच दोनहि पत्रें त्यांस पोचल्यावर कोणत्या पत्रामुळें त्यांना यावेंसे वाटलें हे पक्कें सांगतां येत नाहीं; परंतु पुढें एक दिवस त्यांचे व बाबांचें भांडण झालें असतां त्यांनीं स्पष्ट असें बोलून दाखविलें कीं, " एवढ्याकरितां मी येणारच नव्हतों तुझ्या पत्रावर, पण मुलीनं जेव्हां पत्र लिहिलंन् तेव्हां म्हटलं जावंच. " काय चमत्कार असेल तो असो, हे त्यांनीं म्हटल्यावरोबर भांडणच मिटल्यासारखें झालें. असो. पण ही मी पुढे गेलें.

पत्र जाण्यावरोबर आजोबा तावडतोब आले खरे. ते आल्यानंतर त्यांची व त्या काकांची जोडी जमून त्यांनीं आपापसांत सर्व गोष्टी ठरवून टाकल्या. त्यांत असें ठरविलें कीं, अडीचशें रुपये हुंडा द्यावा; पाऊणशें रुपये विहिणीच्या मानपानाबद्दल धरावे, तोंड धुण्याच्या मानाबद्दल वगैरे निराळेंच; आणि शिवाय खणलुगडीं, पागोटीं असें कांहीं कांहीं ठरलें. तें आतां मला पक्कें आठवत नाहीं आणि यदाकदाचित् आठवलें, तरी तें सगळें सांगत बसण्याची जरुरीहि वाटत नाहीं. आतां इथे त्यासंबंधानें येवढीच मजा सांगायची कीं, त्यांनीं केलेली व्यवस्था बाबांच्या मनास मुळींच आली नाहीं. त्यांनीं म्हटलें कीं, " इतकादेखील खर्च करण्याची आपली ऐपत नाहीं. आणि तुम्हीं आधीं मला विचारल्या-खेरीज हें असं ठरवलंत काय म्हणून ? " असें बाबांनी म्हटल्यावर मग काय विचारतां ? झाली मारामारीला सुरुवात ! आजोबांनीं आपल्याला शिव्या घेऊन आरडाओरडा सुरू केला. बाबा म्हणजे कांहीं त्यांना तसल्या गोष्टींत हार जाणारे होते असें नाहीं, त्यांचा तो मूळ स्वभाव तेव्हांच उसळून वर आला. आजी घरांत आपली चुलीजवळ होती. तिच्या अंगाचा थरकांप झाला आणि आईला रडतांना भुई थोडी झाली. तिला तसें होणें

अगदीं साहजिकच होतें; कारण तिनेंच बाबांना पत्र लिहिण्यास सांगितलें होतें, आणि आपणहि पत्र लिहिलें होतें; तेव्हां या सर्व भांडणास कारण आपण असें तिला वाटलें असेल यांत नवल नाहीं. आम्ही मुलें आपलीं सारीं भेदरून इथेंशीं तिथेंशीं उभीं होतों. सुंदरी तर आजोच्या पाठीशीं जाऊन उभी राहिली होती. इकडे वाद मोठ्या कडाक्कडीनें चालला होता, इतक्यांत आजोबा संतापानें ओरडून म्हणाले, " चल, तुझी प्रतिष्ठा नको. मीं ठराव केले आहेत ते तुझ्या बापालादेखील मोडूं देणार नाहीं. मी आलों आहें मुलीसाठीं. मी आपला जीव गहाण ठेवीन, पण आतां मागे घेणार नाहीं ! " बाबांच्या मनांत म्हणजे मागें घ्यावे, किंवा खर्च कमी करावा असें होतें असें नाहीं; पण त्या दोघांचा आपला ऋणानुबंधच असा, एकानें केलेलें दुसऱ्यास खपायचें नाहीं. आणि माझी अगदीं खात्री आहे की, आजोबा जर न येते तर बाबांनीं असेच कांहीं ठराव केले असते, यांत कांहीं शंका नाहीं. तरी पण ' तूं कोण नाहीं म्हणणार ? मी म्हणेन ' असा भाग असल्यामुळेंच केवळ भांडण झालें. असो. वर सांगितल्याप्रमाणें आजोबांनीं बोलण्याला आणि इकडे आई एकाएकीं घेरी येऊन धाडकन् पडण्याला एकच गांठ पडली. ती दिवसानुदिवस क्षीण होत चालल्यामुळें तिला आतां कोणत्याहि कारणानें मनाला अस्वस्थता उत्पन्न करणारा प्रकार झाला कीं, फार त्रास होत असे व त्याचा परिणाम घेरीबिरी यावी असा होई. तिला तशी घेरी आली हे मीं प्रथम पाहिलें व त्याबरोबर ओरडलें. भांडणबिंडण मिटून एकदम मंडळी तिकडे धावली. आजोबांनीं तिला सांवरून धरलें. बाबांनीं डोळ्यांला पाणी लावलें. आजी सोवळ्याची ओवळी होऊन धावत आली. सुंदरी ओरडूं लागली. " हे सारे तुझे प्रताप ! समजलास ?" असें आजोबा बाबांस म्हणत होते, इतक्यांत ते काका—माझे चुलत चुलत आजे सासरे आजोबांशीं कांहीं बोलण्यासाठीं कीं तीथ ठरविण्यासाठीं एक दोघे गृहस्थ—उपाध्या आणि जोशी—यांस घेऊन आले. त्यांच्याबरोबर बनी आली होती. ती मंडळी बाहेरच उभी राहिली होती आणि बनी मात्र आंत आली, तो हा सर्व प्रकार ! मग तितक्यांत दादानें त्या मंडळीस आंत बोलावून बसवून-बिसवून तो आजोबांस सांगण्यास आंत आला. इतक्यांत आईहि शुद्धीवर आली. नंतर तिला निजवून सर्व मंडळी बाहेरच्या बाजूस गेली. बिचाऱ्या त्या बनीकडे कोणी पाहिलेंहि नाहीं. ती आली होती नवऱ्यामुलीची चोळी नेण्यासाठीं. इकडे ही गर्दी ! तेव्हां तिला कोण विचारतो ? तेव्हां ती पाय आपटीत आपली .... जाणार होती. मी बसलें होतें आईचें डोकें चेपीत. मीं तिला हाक मारायची; पण आतां हाक मारावी कशी, याचीच मला मोठी पंचाईत पडली. आजपर्यंत तिला मी " बने, बने, बनिटले, " असेंदेखील म्हणत असें, पण आतां ती होणार माझी नणंद. तेव्हां " बनूवन्सं " असें म्हटलें पाहिजे. तसं म्हणायचं तर एक आधीं अजून लग्न झालं नाहीं, शिवाय माझ्याजवळ कुर्रा काय थोडा होता ? ज्या पोरीला आपण हवें तसें बोललों, जिच्याशीं भांडलों, तिलाच आतां ' अहो जाहो ' म्हणायचें म्हणजे मोठें जिवावर आलें यांत नवल नाहीं. सुंभ जळला तरी पीळ जळत नाहीं म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आईच्या वेळोवेळच्या उपदेशानें, आणि

प्रत्यक्ष उदाहरणानें मी कितीहि नम्रता शिकलें, तरी मूळचा ताठा कधीं ना कधीं उपसून निघेच. बरें इतका ताठा होता तर साफ, " काय ग बने ? कां आली होतीस ? " असें तरी विचारावें कीं नाहीं ? पण तें तरी कोठें विचारलें ? कां ? तर तिला राग येईल ! आणि तो राग मनांत धरून ती पुढेंमागें त्याचें उट्टें काढील. असे आपले माझ्या मनांत नानातऱ्हेनें विचार येऊन शेवटीं पर्यवसान इथें झालें कीं, मी मुळींच तिला विचारलें नाहीं की पुसलें नाही. शेवटीं ती उभी राहिली राहिली, अन् फुणफुणत आजीजवळ जाऊन म्हणते, " मी यमीच्या चोळीकरितां आलें आहें, तुम्हांला द्यायची आहे कीं नाहीं ? " आजीनें तें तिचें उरीदुरी बोलणें ऐकून म्हटलें, " बने, तूं आलीस केव्हां हें मला समजलेंच नाहीं. आम्ही आपल्या घोरांत होतों, बैस अंमळ. मी—"

" मी कांहीं बसायला आलें नाहीं. मी केव्हांची आलें आहें, पण एक माणूस माझ्याकडे पाहील विचारील तर शपथ ! कांहीं तुमच्या इथें भीक मागायला आलों आहोंत की काय ? द्यायची असली चोळी तर द्या, नाहीं तर नका देऊं ! एवढें हें नको ! "

असल्या या बोलण्यापुढे आजी बिचारी काय बोलते ? तिनें आपल्याकडून काय सांगावयाचें तें सांगितलें पण त्याचा काय उपयोग ? शेवटीं तिनें मला हाका मारल्या आणि ' एक आपली चोळी आणून दे इला ' म्हणून सांगितलें. मीं त्याप्रमाणें काय ती चोळी घेऊन येऊन तिच्यापुढे टाकली. चूक एवढीच कीं हातांत दिली नाहीं. त्याबरोबर ती तट्कन् उठून म्हणते, " काय भिकारणीबिकारणीला देतात तशी टाकतेस काय ? अगदीं हें झालं आहे तुला ! तरी बरं—" इतके बोलून ती तितकीच थांबली व आजीकडे पाहून म्हणते, " जातें आनां. मोठे उपकार झाले दिलीत चोळी ! " आणि आजी मला कुंकवाचा करंडा आणायला सांगते आहे तों ती गेली पुटपुटत बाहेर. बाहेर मंडळी बसली होती तिथें जाऊन तिनें " जातें हो काका ! " असें म्हटलेलें मात्र मला ऐकूं आलें व मी करंडा घेऊन तिच्या पाठोपाठ जातें तों ती पार गेलीदेखील ! तिनें धाड्कन् वाजविलेलें दारच सांगत होतें ती कशी काय गेली तें !

या तिच्या वर्तनाचा परिणाम माझ्या मनावर त्या वेळी काय झाला याची कल्पना करावी.

ती वृद्ध मंडळी आली होती त्यांनीं थोड्याच वेळांत मुहूर्त ठरविला. तो आठ दिवसांच्या आंतलाच होता

आतां माझें लग्न खास होणार असें झाल्यावर मला किती आनंद झाला आणि किती नाहीं, याचें वर्णन करतांच येत नाहीं. आपल्या बरोबरीच्या मुलींचीं लग्नें झालीं, त्या नटून थटून इकडून तिकडे करूं लागल्या, आपणाला असें कधीं करायला सांपडेल ? त्यांतून श्रावण महिन्यांत दुर्गीच्या मंगळागौरीची गर्दी जेव्हां उडाली, आणि ती मारे टणटणा उड्या मारूं लागली, तेव्हां तर जें कांहीं वाईट वाटलें तें विचारूंच नका. एक ना दोन; वटपुनवेला ती वडावर गेली; सोमवारीं शिवामुठीला जाई; या साऱ्या गोष्टी

पाहिल्या तेव्हां तेव्हां असा प्रसंग केव्हां येईल, मी अशीच इच्छाप्रमाणें तातूकरितां हिकडून तिकडे गडबड करीत केव्हां हिंडेन, हातांत परडया घेऊन आम्ही दोघीचौघीजणी पत्रीकरितां या बागेंतून त्या बागेंत केव्हां जाऊं ? असे विचार येऊन त्या त्या वेळीं मला वाईट वाटें तें आतां गेलें आतां आपल्याला तीं सर्व सुखें मिळणार असें वाटून मला आनंद झाला यांत आश्चर्य काय ?

जे दिवशीं तिथिनिश्चय झाला ते दिवशीं दुर्दैवानें दुर्गी सासरीं गेली होती; ती जवळ नसल्यामुळें माझ्या आनंदाला उकळ्या फुटत होत्या त्या दुसऱ्या कोणाला सांगण्याला जागाच नव्हती. शेवटीं कोणी नाहीं तर संध्याकाळीं चार वाजतां आमची मोलकरीण आली तिला अजून बातमी लागली नव्हती; तिच्याजवळ जाऊन तिला मीं कळविलें ! आणि त्या म्हातारीनें तें पुनः घरांत सांगितलें तेव्हां दादानें आणि आजीनें माझी थट्टा करून मला अगदी पुरेंपुरेंसें केलें. पोरगी सुंदरीदेखील माझी थट्टा करून हसूं लागली. शेवटीं संध्याकाळीं आजीनें, आजोबा व बाबा जेवायला बसले असतां त्यांच्या-जवळ जेव्हां 'आज किनई एका माणसाला काय पण आनंद झाला आहे ! तो आनंद रखमाई मोलकरणीपर्यंतदिखील गेला !' असें म्हटलें तेव्हां मला इतकें लाजल्यासारखें झालें कीं कांहीं पुसूं नये. मी कुठून त्या रखमाईजवळ तें जाऊन बोललें असें मला होऊन माझ्या डोळ्याला पाणीदेखील आलें, व मीं जेवतांजेवतांच उठून आईच्या डोक्याशीं जाऊन बसलें. लहानपणीं आपल्या स्वतःपलीकडे आपणांस कोणी दिसत नाही असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आईची ते दिवशीं त्रेधा कोण, पण मी जाऊन बसलें घुंघट घालून सूंसूं करीत तिच्या उशाशीं. शेवटीं आजोबांनीं जेव्हां दरडावून हाक मारली तेव्हां आंचवून मुकाटयानें निजले आनंदाचा उतावीळपणा कांही विलक्षण असतो ! सकाळ झाल्याबरोबर आधीं दुर्गीची चौकशी करण्यास मी धावत गेलें. ती सकाळीं कसची येते ? तरी पण मीं तिच्या आईजवळ व आजीजवळ लाडीगोडी लावून तिला बोलावणें धाडविलें. बोलावणें जायलादेखील कोणी नव्हतें तर आजीकडून आमच्या रखमाईला धाडलें. परंतु दुर्दैवाची गोष्ट पाहा ! दुर्गीच्या सासूनें 'दुर्गीला आणखी तीन दिवस धाडायची नाहीं, नेहमीं नेहमीं कसलीं आलीं आहेत बोलावणीं ?' असे म्हणून तिला तसेंच परत लाविलें. मग मात्र मला अतिशय वाईट वाटलें; कारण या वेळीं दुर्गी नाहीं म्हणजे मला कोणी नाहीं असेंच झालें. पण करतां काय ? परस्वाधीन जिणें आणि पुस्तकी विद्या अशीच स्थिति ! दुर्गी पडली सासुरवाशीण ! तिला आपण होऊन येतां येत नाहीं; बरें, मला ती जितकी हवीशी वाटत होती, तितकी साऱ्या माणसांना कुठें वाटत होती ? बरें तर, येईल ती दोन दिवसांनीं असें म्हणून सर्व मंडळी स्वस्थ बसली. परंतु मला त्यामुळें फार उदासपणा आला, असें पाहून माझी कींव आली. दुर्गीच्या आईनें मात्र संध्याकाळीं दुर्गीच्या सासरीं स्वतः जाऊन दुर्गीस दहापंधरा दिवस राहायला म्हणूनच आणलें. वास्तविक म्हटलें तर लग्न आमच्या घरीं; तिनें आपण होऊन आपल्या मुलीला आणण्याचें काय कारण ? पण ती बाईच भलत्यासलत्या मानापमानाची नव्हती.

आमचा त्यांचा अगदीं घरोब्राच झाल्यामुळे तिला आपलेपणाच वाटला असावा. तें कांहीं असो. दुर्गी आल्यावर मग काय विचारतां ? आम्हीं एकमेकींशीं कुजबुजून आणखी गुलगुल गोष्टी सागून बेजार ! मग येवढ्या काय गोष्टी चालल्या होत्या त्या आमच्या आम्हांलाच ठाऊक ! ते दिवशीं रात्रीं दुर्गी निजायलादेखील माझ्याच अंथरुणांत. आम्हीं नानातऱ्हेच्या गोष्टी सांगितल्या. या नाना तऱ्हा काय असतील याची कल्पना लहान लहान मुलींनाच होईल. इतरांना कितीहि वर्णन करून सांगितलें तरी समजणार नाहीं. अहाहा ! तो आनंद आतां पुनः कधींतरी आम्हांला अनुभवावयाला सांपडणार आहे काय ? हे लग्न सुखाचें, मजेचे, चार दिवस गमतीचे असें दिसतें, परंतु या लग्नानें आपण कोणत्या जबाबदारीच्या स्थितींत पडतों आहोंत, याची अणुमात्र तरी कल्पना आम्हांला असते काय ? आम्ही आपल्या बाहुलीचे लग्न लावतों त्याचप्रमाणें आमचे लग्न आमची वडील मंडळी लावतात. आम्ही आपल्या बाहुल्यांस इकडून तिकडे उचलून नेतों. आमच्या अंगी चालण्याबोलण्याची शक्ति असल्यामुळें आमच्या वडील मंडळींनीं आम्हांला उचलून इकडचे तिकडे ठेवावें लागत नाहीं, नुसता हुकूम केला कीं पुरे, कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें आम्ही ते सांगतील तें सर्व करतों. बाकी आम्ही करतों काय आणि त्याचे महत्त्व काय या गोष्टी आमच्या बाहुल्यांना जितक्या कळतात, तितक्याच आम्हाला कळतात. यांची व आमची स्थिति अगदीं एक ' किंबहुना बाहुल्यांच्यापेक्षां आमची स्थिति फार वाईट; कारण आम्ही जे करू त्याचें त्या बाहुल्यांस सुखदुःख कांहींच नाहीं. आमच्या करण्याचे बरेवाईट परिणाम त्यांस भोगावे लागत नाहींत' आमच्या वडील माणसांचे करण्याचे परिणाम आम्हांला आमच्या परिपक्व वयांत भोगावे लागतात; तेव्हां आम्हां या चालत्याबोलत्या बाहुल्यांची स्थिति किती वाईट बरें! आम्ही डोळे असून अंधळ्या, कान असून बहिऱ्या, जीभ असून मुक्या, हात असून थोट्या आणि पाय असून लंगड्या नवऱ्या मुलाची म्हणजे आमच्याहून कांहीं भिन्न स्थिति असते असें नाहीं. एक तर आम्ही अज्ञ बालकें. आम्हाला बरेंवाईट काय कळतें ? आम्हांला लग्न म्हटलें कीं दोनचार दिवसांची चंगळ दिसते; पण पुढें संसारयात्रेंत उडणारी टंगळ कोठे दिसते ? आज एकमेकांच्या पुढे बसून लाजत मुरकत एकमेकांस दिलेले सुग्रास अन्नाचे घास दिसतात. परंतु पुढें घासभर अन्न मिळण्यास किती त्रास पडतो, याची कल्पना तरी मनांत येते काय ! आज चांगला, ठेंगणा, ठुसका, गोरागोमटा नवरा-मुलगा दिसतो; पण पुढे हा कसा काय निघेल, आणि आपल्या बायकोला घेऊन कसा काय संसार करील याचा कांहीं विचार कधीं मनांत येतो काय ? आज आम्हांला आमची न्हाणींधुणीं दिसतात, घटकोघटकीं होणारे मंगलाचार दिसतात, नांव घेण्याची हौस वाटते, आजपर्यंत आपल्याला 'नांव घ्या' असें कोणीं म्हटलें तर वाईट वाटत होतें, तसें आतां उरलें नाहीं. याचा आम्हांला मोठा आनंद होतो. रासनहाणीं दिसतात, पायघड्या दिसतात, सुनमुखाच्या वेळची साखर आणि हऱ्याडेऱ्याच्या वेळचें एकमेकांनीं घ्यावयाचें दूध दिसतें; तांब्यावर तांब्या ठेवून त्यांत आपल्या

नवऱ्याला 'यांत काय आहे' असें विचारल्यावर त्यानें 'नवरत्नांचा हार' असें सांगितलें म्हणजे पोटांतून गुदगुल्या होऊन आनंदी-आनंदच होतो; पण हा सर्व आनंद कोणत्या संकटाचा प्रारंभ आहे याची कांहींतरी कल्पना ! पुढल्या संसाराच्या अगर सुख-दुःखाच्या कल्पना तर लांबच ! पण लग्न होऊन सासरीं जाण्याबरोबर आपली स्थिति कशी काय होणार ? सासरची मंडळी आहेत कशी काय ? आपल्याला त्यांच्या घरीं त्रास होईल कीं सुख होईल ? याचा कांहींतरी विचार ? सर्व अंधार असतो. तात्पुरत्या आनंदापलीकडे कांहीं दिसत नाहीं. मी आतां एवढें स्पष्ट लिहितें आहें; याबद्दलचा अनुभव माझ्या एकूणएक भगिनींना आला आहे आणि त्या जर थोडासा विचार करतील तर माझ्या म्हणण्यांत एक रतिभरहि चूक नाहीं असें त्यांचें त्यांस समजेल. कित्येकांस कदाचित् मीं निर्भीडपणानें लिहिलें याचें वाईट वाटेल, पण मुळीं निर्भीडपणें मला वाटेल तें लिहून सर्वांच्या पुढें खरी स्थिति मांडावी, यासाठीच मीं हें आत्मचरित्र लिहिण्यास आरंभ केला; आणि जगदंबेच्या कृपेनें माझें हे चरित्र पुरें होण्याइतके दिवस जर मी जगलें तर क्रमाक्रमानें कितीतरी गोष्टी ज्या आपल्या संसारांत हमेशा घडतात त्या, व त्यांच्यासंबंधानें स्वानुभवावरून व मैत्रिणींनीं सांगितलेल्या आपल्या अनुभवावरून, मला जे विचार सुचतील ते मी स्पष्टपणें आणि निर्भीडपणें लिहिण्यास कधींहि मागेंपुढें पाहणार नाहीं. परमेश्वराच्या दयेनें माझ्या हातून माझें चरित्र संपावें मात्र ! भीति जी आहे ती तेवढीच ! असो.

पण मी आतां हे आपल्या मनांत आलेले विचार आणखी पुढें न सांगतां पुढील हकीकतीला लागतें; कारण माझ्या लग्नाची हकीकत आज मनांत येऊन त्याविषयीं माझ्या मनांत जे साधारण विचार येताहेत, ते इतके कीं ते सगळे इथें लिहिले तर थोडासा व्यर्थ पाल्हाळ होईल; पण एक गोष्ट मात्र सगळ्यांनीं—विशेषतः माझ्या भगिनींनीं—लक्षांत घ्यावी, ती ही कीं, माझे विचार वाचून आपण आपले त्याचसंबंधाचे विचार पाहावे म्हणजे माझी अगदीं खात्री आहे कीं, सर्वांना माझ्याप्रमाणेंच वाटेल आणि आपलें बाळपणचें चरित्र लिहीत असतांना आपले प्रौढपणांतले विचार मीं मध्येंच घालून दिले याबद्दल दोष न देतां, मीं लिहिलें हें अगदीं थोडें; याच्यापेक्षां कितीतरी चमत्कारिक विचार मनांत येतात ! व त्यांपैकीं पुष्कळ येथें सांगितले पाहिजे होते, असें सर्वांस वाटेल. जिच्या लग्नांत चारपांच हजार रुपयांचा खर्च झाला, जिच्या अंगावर सोन्याचे लंगर होते अशी एक माझी मैत्रीण आज लोकांच्या घरीं दळणकांडण करून आपले पोट भरीत आहे. लग्नांत तिचा नवरा बरोबर बारा कीं तेरा वर्षांचा होता. दिसायला मोठा गोरागोमटा पण पुढें असा कपाळकरंटा निघाला कीं लाख रुपयांची मालमत्ता पांच वर्षांत उधळून टाकून अन्नान्नदशेला लागून दारोदार हिंडूं लागला; आणि बायको इतकी चांगली, कीं दळणकांडण करून नवऱ्याच्या पोटाला घालते. आईबापांच्या इच्छेप्रमाणें कुकुलेपणाच्या लग्नाचे परिणाम माझ्या मनांत आल्यावरून ती आतां माझ्या नजरेसमोर

आली म्हणून मीं हें लिहिलें. आणखी अशा कितीतरी गोष्टी मला आठवताहेत ! पण आतां जाऊं द्याच.

लग्नाचें कायमचें ठरल्यानंतर लागलीच दुसरे दिवशीं आईनें आपल्या दोघी बहिणींस लग्नाला आमंत्रण करण्याविषयीं आजोबांना पत्र लिहिण्यास सुचविलें. चालीप्रमाणें आजोबांनीं पत्र लिहिलें, इतकेंच नव्हे, तर त्या म्हाताऱ्याची माझ्या आईवर इतकी भक्ति, कीं त्यानें आमच्या एका मावशीस आणण्यासाठीं मुद्दाम माणूस पाठवला आणि मागून तें तिला सांगितलें. दुसरी मावशी तिकडे मिरज सांगलीकडे होती थोडीशी लांबच. परंतु तिला इतके अगत्याचे बोलावणें केलें, कीं ती लग्नाच्या आदले दिवशीं आली. दुसऱ्या मावशीला माणूसच पाठविला होता तेव्हां तींहि आली. माझ्या दोघी मावश्यांना मिळून सहा मुलें होतीं. मिरज सांगलीकडच्या मावशीला तिघी मुलीच होत्या. आणखी दुसऱ्या मावशीला दोघे मुलगे आणि एक मुलगी. आजीचें फारसें गोतावळें नव्हतें. एक तिचा चुलतभाऊ होता तो कांहीं येण्याजोगा नव्हता. कोणीकडे औरंगाबादेस होता. जिला मुलीच होत्या ती माझी थोरली मावशी. आई सगळ्यांत वडील, तिच्या पाठची गोदुमावशी आणि तिच्या पाठची सखुमावशी. गोदुमावशीची एक मुलगी माझ्याहून दोन वर्षांनीं कीं तीन वर्षांनीं वडील होती, आणखी सखुमावशीची मुलगी अगदीं माझ्या वयाचीच होती. तिचे दोन मुलगे, एक आमच्या सुंदरीच्या वयाचा आणखी एक सहा कीं आठ महिन्यांचा होता. गोदुमावशीच्या दुसऱ्या दोन मुली अशाच-एक पांच वर्षांची आणखी एक आठ वर्षांची होती. आणखी बाहेरगांवाहून कांहीं कोणी मंडळी आली नाहींत. आमचा एक मामा-सख्खा नव्हेच, चुलतमामा वाटतें होता, त्याला आईनें पत्रच पाठविलें नाहीं. कां तें तिचें तिलाच ठाऊक ! बाकी तिच्या माहेरचें आतां कोणी राहिलेंच नाहीं. असो. पण एकंदरींत लगीनघर गर्जायला लागून जिकडे तिकडे अगदीं एकच गर्दी उडून गेली. आम्ही मुलीमुलीच आधीं सातआठजणी झालों. शिवाय बाबांचे दोघेतिघे स्नेही अगदीं घरीं येऊन राहिल्याप्रमाणें झाले. मारे तळणाविळणाचा रगाडा सुरू झाला. आमच्या आजीनें सतराजणी बायका गोळा करून आणून रुखवताची तयारी चालविली. एकंदरींत त्या सर्व प्रसंगाची आठवण होऊन आज जरी माझ्या मनांत कांहीं उदास विचार आले, तरी ते एकीकडे सारून माझ्या लग्नाची एकंदर हकीकत देऊन माझ्या भगिनींस आपापल्या लग्नाच्या वेळची आठवण करून देऊन चार घटका आनंद द्यावा हेंच बरें.

◆ ◆ ◆

# २२ : माझें लग्न

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

गेल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें घरांत तर जिकडे तिकडे गर्दी उडून गेली. आधीं आम्ही राहात होतों तें घर कांहीं मोठेंसें नव्हतें आणि त्यांत दोन बिऱ्हाडें ! पण तीं आपली एकमेकांची सोय पाहणारीं असल्यामुळें एखाद्याच्या घरीं कांहीं झाल्यास दुसऱ्याची जागा वापरण्याची मुभा असे. त्यांत मजा ही कीं, जागेच्यासंबंधानें भांडणें वगैरे व्हावयाचीं तीं बायकांकडून ! तेव्हां त्याला या ठिकाणीं जागाच नव्हती. आमची आजी बिचारी अगदी भोळी, तशाच बहिणाकाकूहि होत्या म्हटलें तरी चालेल. ती म्हातारी मोठी उरकाची होती खरी, पण भांडणातंडणांत पडणारी नव्हे. तिची सून मात्र जरा तल्लख होती. पण ती आमच्या माणसांशीं एक दिवसदेखील वर्दळीवर आली नाहीं. आधीं येते कोणाबरोबर ? आजी ती तशी; आई ती दुखणेकरीणच. आणि दुखणेकरीण नाहीं, चांगली असती तरी त्या माउलीचें ब्रीदच भांडणाचें नव्हे. तिचा जन्म भांडणें मिटविण्यासाठीं होय ! असो. तेव्हां अशी स्थिति असल्यामुळें ती मंडळी आमच्या घरांतल्या मंडळीप्रमाणेंच वागूं लागली माझ्या आईच्या चतुरतेची एक गोष्ट या वेळीं घडलेली मला आठवते आहे, ती मी सांगून ठेवतें. माझ्या मावश्या जे दिवशीं आल्या त्याच्या दुसरे कीं तिसरे दिवशीं आम्ही साऱ्याजणी वेणीफणी करायला बसलों होतों. आईची खोली म्हणजे एक आमचें साऱ्यांचें अधिष्ठानच झालें होतें. ज्यानें यावें त्यानें तिच्याजवळ बसावें; कोणाला जें कांहीं ठेवायचें असेल तें सारें आईच्या खोलींत टाकावें आणि मोठ्यानें तिला, " हे मीं आणून टाकलें आहे हो, " म्हणून सांगावें. यामुळें तिची खोली म्हणजे रुप्याचीं भांडीं, तबकें, साडयाचोळ्या, शेलेपागोटीं यांची कोठीच होऊन गेली होती, आणि आमचा साऱ्यांचा खेळण्याबसण्याचा आखाडा तेथेंच होता. ज्यानें उठावें त्यानें त्या खोलींत डोकें खुपसावें. असो.

वर सांगितल्याप्रमाणें मी, माझ्या मावसबहिणी, मावश्या वगैरे वेण्या घालीत बसलों होतों, इतक्यांत दुर्गीची आई तेथें आली. तिलाहि वेणी घालायची होतीच, यामुळें आईनें तिला " बसा इथेंच, घाला वेणी – रोज आहेच हातची. आज माझ्या हातची घालून पाहा बरें कशी काय येते ती ! " असें म्हटलें. आमच्या आईनें कांहीं म्हटलें आणि तें कोणीं मोडलें असें कधींच मला आठवत नाहीं. दुर्गीची आई चट्कन् बसली व बसतां बसतां उलट असें म्हणाली, " मला किनई यशदाकाकू, कोणाच्या हातची वेणी आवडत नाहीं म्हणून मी आपल्या हातांनींच आपली वेणी घालतें. एक फक्त आवडते तुमच्या हातची; पण रोजरोज काय यावें तुम्हांला त्रास द्यायला ! " आई कांहीं बोलणार तोंच माझी थोरली मावसबहीण कायसें बोलली आणि तें तितकेंच राहिलें. दुर्गीच्या आईची वेणी आईनें घातली त्या वेळीं बाकी सगळ्याजणींच्या वेण्या होऊन त्या

खालीं अंग धुवायला गेल्या होत्या. राहतां राहतां त्या व माझी आई अशा दोघी एकट्याच राहिल्या. मीहि खालींच गेलें होतें परंतु तितक्यांत परकर नेसण्यासाठीं म्हणून वर आलें तों पुढील संभाषण ऐकलें :

“ मी आहें एकटीच अन् अशी दुखणेकरीण, तेव्हां ह्या कार्यांत आतां तुम्ही माझ्या जागीं व्हा. जशी कांहीं मी नाहींच घरांत अन् तुमच्यावर सारं पडलं आहे. ”

“ हें काय हें तुम्हो म्हणतां ? तुमच्या बहिणी आल्या आहेत, अन् सासूबाई आहेत; आमच्या सासूबाई आहेत, आणखी कोण पाहिजेत ? ”

“ तुम्ही म्हणतां तें सगळं खरं ! पण व्याह्यांच्याकडे जाणं, येणं, बोलणं आमच्या सासूबाईंना काय उरकणार ? बहिणी म्हणाल तर त्या आहेत इथे नवख्या; त्यांना या पुण्यांतल्या चालीरीतींची काडीइतकी नाहीं ओळख. तेव्हां तुमच्याखेरीज तें कांहीं व्हायचं नाहीं. माझो मी जर वापरती असतें तर मग कांहीं— ”

इतके शब्द उच्चारतांच तिच्या डोळ्यांत टच्कन् पाणी आलें, परंतु तिनें तें पाणी फार वेळ राहूं न देतां चट्कन् डोळे पुसून मोठ्या केविलवाणीनें त्या बाईकडे पाहिलें, त्याबरोबर दुर्गीच्या आईच्याहि डोळ्यांस पाणी आलें व ती एकदम म्हणाली, “ यश्वदा-बाई, तुम्ही अगदीं कष्टी होऊं नका. तुमचं कांहीं कमी पडायचं नाही. हें काय हें ? मी आपली चार दिवस तुमच्या घरीं तुमच्या बहिणीसारखी येऊन राहतें, मग तर झालं ना ? ”

हें तिचें वोलणें ऐकून आई म्हणते, “ हें तुम्ही म्हणतां खरं. पण पुढाकार घेईल त्याला काय करावं लागतं हें ठाऊक आहे ना पण ? कोणी कांहीं बोललं तरी मूग गिळावे लागतात ! तेवढं तुम्ही करा, म्हणजे अगदीं–नाहीं तर आमची गोदी आहे थोडीशी ही; तेव्हां–पण मी कशाला तुम्हांला सांगायला पाहिजे ? माझं उणं पडेल तें तुमचं उणं असं समजून तुम्ही सगळं कराल अशी माझी अगदीं खात्री आहे. ” इतके बोलणें मीं ऐकलें आणि तेथून खालीं गेलें. पुढचें आणखी काय बोलणें झालें तें कांहीं मला ठाऊक नाहीं. पण मजा ही, कीं दुर्गीची आई तेव्हांपासून खरोखरी माझ्या आईप्रमाणें घरांत वागूं लागली. आणखी एकंदर लग्नांत तिनें अगदीं वाघासारखें काम केलें. कितीक भांडणेंकांडणें झालीं, पण तीं त्या वेळेपुरतीं करून पुनः त्यांचें स्मरणदेखील नाहीं; विहिणीचें कामच तिनें केलें म्हणा ना ?

आतां लग्नाची एकंदर हकीकत द्यायची म्हणजे काय काय सांगायचें आणि काय काय नाहीं हें मला तर कांहीं सुचत नाहीं. जर सगळी हकीकत द्यायची असा मीं बेत केला तर बऱ्याचशा भांडणांची हकीकत एके ठिकाणीं केल्यासारखेंच होणार आहे; कारण माझ्या लग्नांत इतकीं भांडणें झालीं कीं तीं सारीं जर कोर्टापर्यंत जातीं, तर एका कोर्टास एक वर्षभर पुरून उरेल इतकें काम झालें असतें. असा भांडणांचा अनर्थ झाला, कीं साऱ्या मंडळीस अगदीं सळो का पळोसें झालें. आमचे आजोबा म्हणजे कसले भांडणारे

वस्ताद ! पण त्यांनींदेखील अगदीं हात टेकले व ते म्हणाले, " इतक्या भांडखोर बायका जगांत असतील असें मला यत्किंचित्‌देखील ठाऊक नव्हतें ! "

छे, छे, पण बाई अनर्थच कांहीं भांडणांचा ! मला आज आतां आठवण झाली कीं कसेंसेंच होतें. त्या माझ्या मामेसास्वांनीं आणखी त्या वारीनं, तिच्या बहिणीनं, आणखी कांहीं जमलेले गोत होतं त्यांतल्या बायकांनीं भांडणाचं पण अगदीं हें उडवून दिलं. अमुक गोष्टीवरून म्हणजे त्यांनीं भांडण उपसून काढलं नाहीं, असं कांहीं नाहीं. ज्यासंबंधानें भांडण त्या अमक्या मानकरणीच्या ओटीला नारळच नाहीं, लागल्या कचा कचा भांडायला. लग्नांतल्या ओटया भरायच्या खोबऱ्याच्या वाटया त्या .केवढया असायच्या ? मेल्या वाण्याच्याच इथून मोडून आणतात; तर त्या म्हणे लहानच केल्या मुद्दाम ! " मेलीं भिकारडीं खेडयातली तीं. त्यांना ठाऊक काय शहरातलं ? " ह्या शब्दांचा उच्चार तर कितीकदा तिकडच्या साऱ्या माणसांच्या तोंडून झाला असेल त्याला पारावारच नाहीं. " भिकारडीं मेलीं ! " " भिकारडीं मेलीं ! " या शब्दांचा एकसारखा जप त्यांच्या तोंडांतून चालला होता म्हटलें तरी चालेल. अमुक एक गोष्ट म्हणजे आमच्या इकडली बरी आहे असें त्यांच्या तोंडून निघेल तर शपथ ! वारी, तिच्या त्या दोघी बहिणी, तो धोडया,–पण मी हे काय लिहितें ? आतां ते माझे धोंडूभावजी झाले ! – आणखी कुशी अन् आणखी कांही साळकायामाळकाया जमल्या होत्या त्या झाडून चट् साऱ्यांना अगदीं ऊत आल्यासारखें झालें होतें. जी येई ती अगदीं नागिणीसारखी फूं फूं सूं सूं करीतच येई. असा कांही माझ्या लग्नांत भांडणाचा कहर झाला होता ! त्या भांडणामुळें लग्नांत आमच्या घरीं तरी कोणास सुख झालें नाहीं. आम्ही चार पोरी काय आनंदानें खिदळलो असूं तेवढेंच. बाकी आजी, मावश्या, ती बिचारी दुर्गीची आई आणि आजी, साऱ्या त्रासून गेल्या. लग्न होणार त्यामुळें आईची प्रकृति दुप्पट सुधारली होती, ती आतां अगदीं चौपट बिघडली. ती तर कांहीं बाहेरदेखील गेली नाहीं. पण त्या बायकांनीं घरीं आल्यावर तिच्याशींदेखील एकदोनदा सडकून भांडण केलें. पण तें भांडण फक्त एका बाजूनें होतें. आईच्या तोंडून मुळी शब्ददेखील निघाला नाहीं. दुसऱ्यांदा भांडण झालें त्या वेळीं इतके झालें कीं, शेवटी ती दुर्गीची आई संतापून त्या बायकांना असेदेखील म्हणाली, " त्या आपल्या दुखण्यानं अगदीं बेजार अन् त्यांच्याशीं भांडतां तें तुम्हांला कांहींच वाटत नाहीं का ? " असें ती म्हणाली मात्र ! अन् मग काय विचारतां ? माझ्या धाकटे मामेसासूच्या तर अंगाला आगच लागली. ती तशी ओटीबिटी न घेतां तरातरा चालती झाली आणि तिनें जो आकांत केला तो कांहीं पुसूं नका. आम्हांला कांहीं मानच नाहीं. ज्यानं यावं त्यानं आम्हांला बोलावं. आमची लाज आजपर्यंत कोणी काढली नव्हती. आतां आम्हीं यांची मुलगी केली तेव्हां चांगला उद्धार झाला. आमच्या लाजा गेल्या, आमच्या अकला गेल्या, आमच्या तोंडांत मारायला कोणी नाहीं. खेटरं तरी मारा आम्हांला येऊन. आतां एवढया थोरल्या गाढवी झाल्या, यांना लाजदेखील

नाहीं वाटत आमची लाज काढायला ! " असें एक ना दोन ! एकसारखें तोंड चाललें होतें आणखी हें कधीं ! वरातींच्या दुसऱ्या दिवशीं मी सासरीं असतांनामा इत्यादेखतच. ते दिवशीं माझ्याशीं कोणी बोलेना. वारूवन्सं, बनूवन्सं, कोंडूवन्सं, धोंडूवन्सं यांनीं मला आणखी माझ्या पाठराखणीस आलेल्या दुर्गीला अगदीं बोचून बोचून खाल्लें; यामुळें, व " आपण आपल्या घरास आतां मुकलों ना ! " असें वाटून मला अतिशय रडायला आलें. तेव्हां मी आपली एकीकडे जाऊन रडत बसलें. तितक्यांत तें कुसावन्संनीं पाहिलें आणि वारूवन्संकडे त्याचा रपोट केला. वारूवन्संनीं येऊन पाहिलें आणि बनूवन्संना सांगितलें. त्याहि मला पाहण्यासाठी आल्या आणि आपलें–आहे कीं नाहीं असें–तें नाक वाकडेतिकडें मुरडून व माझ्यापुढें वांकडें तोंड करून त्या म्हणतात, " अग्गबाई ! वहिनीबाई ! रडायला का लागला ? आपलं कांहीं कमी पडलं वाटतं ! आमचं घर विखासारखं का वाटतं ? पण आतां जन्म काढायचा आहे याच घरीं ! "

तें ऐकल्याबरोबर वारूबाई पुढें सरसावल्या, आणखी म्हणाल्या :

" कनी बनूताई, वहिनीसाहेब मोठ्या नाजूक नार आहेत हो; त्यांना एवढंदेखील बोललेलं खपत नाहीं. तूं उगीच तिला बोलूं नको ! "

बनूताई : माझा अडला आहे खेटर बोलायला ?—अन् बोललें तरी मी आहे माहेरवाशीण—करवलीच आहे !

वारूबाई : तूंच एक असशील मोठी मानाची करवली, मी नाहीं की काय ?

अन् मग काय विचारतां ? माझें रडणें एकीकडेच राहून त्या दोघींचें तंडणें सुरू झालें. वाद वाढतां वाढतां इतका वाढला कीं, एकमेकींच्या उखाळ्यापाखाळ्या निघून शेवटीं बनी आपल्या वडील बहिणीला कांहीं वाईट बोलली–तें येथें लिहिणेंदेखील अगदीं अप्रशस्त. तें ऐकल्याबरोबर वारूवन्संनीं जी एक बनूवन्संच्या तोंडांत दिली ती कांहीं पुसूं नका. त्यांची बुगडी कानाला चिकटून राहिली आणि कान व गाल हीं इतकीं तांबडीं लाल झालीं कीं बोलायची सोय नाहीं ! आणि दोघीहि रडूं लागल्या.

हा माझा माझ्या सासरचा पहिल्या दिवसाचा अनुभव ! यावरून माझ्या पुढच्या आयुष्यक्रमाच्या सुखाची कल्पना करावयाची ! तो कितपत सुखदायक झाला असेल हें आतां मी वाचणारांवरच सोपवितें.

लग्नांत जो काय मला आनंदाचा वेळ गेला, तो मात्र वरील एकंदर गोष्टींप्रमाणेंच मी विसरणार नाहीं. वास्तविक पाहतां त्याचें वर्णन आधीं यायला पाहिजे होतें, परंतु जी गोष्ट विशेष झाली ती आधीं माझ्या मनांत आली व आधीं लिहिली गेली; शिवाय आधीं कडू मग गोड, हा न्याय आहेच !

आतांपर्यंत माझ्या लग्नांत एकंदर माणसांस–निदान माझ्या माहेरच्या तरी–किती त्रास झाला हें सांगितलें. त्या भांडणापासून म्हणजे मला त्रास झाला नाहीं असें

नाहीं; परंतु असल्या त्रासाचें पोरपणामध्यें जितकें कांहीं वाटावयाचें तितकेंच मला वाटलें. जास्त कांहीं वाटलें नाहीं. वारूवन्सं, बनूवन्सं, कोंडूवन्सं, धोंडूवन्सं वगैरे जमलेल्या झाडून साऱ्या वन्सं आणि सास्वा, त्यांचें एकमेकींशीं चाललेलें वर्तन व यांची एकमेकींना उठल्यासुटल्या उणींदुरीं बोलणीं हीं पाहिलीं, व ऐकिलीं म्हणजे आतां आपलें या घरांत कसें काय होणार, असें वाटून क्वचित् मन उद्विग्न होत असे; त्याच-प्रमाणें एखाद्या गोष्टीवरून भांडण झालेलें ऐकून माझी आजी व इतर घरांतल्या बायका " यमे, तुझं आतां होणार तरी कसं बाई या घरांत ? " असें सहज म्हणाल्या असतां मला वाईट वाटलें असेल ! पण एकंदरींत लग्नांत पोरींना जो काय आनंद व्हायचा तो मला यथास्थित झाला नाहीं असें नाहीं. तो जो कांहीं आनंद व्हायचा तो अगदीं यथास्थित झाला म्हटलें तरी चालेल.

अगदीं घाणा भरायला बाबा, आई आणखी मी बसल्यापासून तो तहत मांडव-परतण्यापर्यंतच्या दिवशीं एकमेकांची कंकणें एकमेकांनीं सोडीपर्यंत जितके म्हणून विधि आणखी आचार आहेत, तेवढया सगळ्यांपासून पोरीच्या नात्यानें मला जो कांहीं आनंद व्हायचा तो झाला. तो आतां प्रत्येक वेळचा वर्णन करण्याची कांहीं आवश्यकता आहे असें नाहीं; तथापि कांहीं विशेष प्रसंगीं मला काय काय वाटलें त्याचें थोडेंसें वर्णन दिलें तर वावगें होणार नाहीं. उष्टया हळदीच्या वेळेपासून माझ्या मनांत लग्नाचे विचार विशेष येऊं लागले. लग्नाचे म्हणजे ज्यांच्याशीं आपलें लग्न लागायचें त्यांच्याविषयींचें असें म्हटलें तरी चालेल. किंबहुना असें म्हटलें तरच शोभेल. आतां हीच हळद तिकडे नेऊन लावणार ? आणि मग नहाणे झाल्यानंतर तो जो एक वेष देतात—तें पातळ काय ! आणि ती चोळी कशी घालायची ! आणखी तें गौरीहराजवळ काय बसायचें ! एकेक गोष्टी मनांत आल्या म्हणजे चित्त इतकें उद्विग्न होतें, कीं कांहीं पुसूं नये ! परंतु आज जरी तें कितीहि उद्विग्न झालें, तरी वर्णन करायचें आहे तें माझ्या त्या वेळच्या विचारांचें; तेव्हां ही उद्विग्नता अगदीं एकीकडे ठेवून त्या वेळीं आपल्या मनांत काय काय आनंदाचे विचार येत होते, हें सांगणेंच रास्त आहे. ज्या वेळीं मी गौरीहराजवळ बसलें, त्या वेळीं मजवर पुढें असा दुर्धर प्रसंग येणार आहे, आणि माझ्या सर्व जन्माचें बहुतेक वाटोळें होणार आहे, असें स्वप्नीं तरी आलें काय ? मुळींच नाहीं. त्या वेळीं मला लग्नांतले सुखसोहाळे मात्र दिसत होते. त्या विचित्र वेषांत—ती अष्टपुत्री, आणखी ती चोळी, तो मळवट, त्या हिरव्या बांगडया, तो नुकताच वेडावाकडा गुंडाळलेला अंबाडा, तें नाकांतलें सुंकलें, पायांतलीं वेढी—असा तो एकंदर थाटाचा मंगल वेष—त्या वेषांत ऐश्वर्य वाटून--आणि खरोखर लग्न होणाऱ्या मुलीचें ऐश्वर्य काय तें तेवढेंच; बाकी किती ऐश्वर्य असलें अगर बापानें दिलें असलें तरी तिचें ऐश्वर्य शेवटपर्यंत तेवढेंच—इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फलकावे मारण्यांत जी मौज वाटे ती कांहीं सांगतां यायची नाहीं, ती अनुभवानेंच समजणारी आहे.

थट्टा करणारी मंडळी आपणांस तीनतीनदा "जा गौरीहराजवळ बसून नीट गौरीची पूजा कर; म्हणावं मला चांगला नवरा मिळूं दे; जा. गौरीहर चांगला पुजला नाहीं, तर नवरा चांगला मिळायचा नाहीं हो !" अशा तऱ्हेची बोलणीं बोलत असतात. आपणहि तीन–तीनदा तो अष्टपुत्रीचा सोगा हातांत धरून ती वेडीवांकडी चोळी पुनः पुनः सांवरीत, व नाकांतलें मुंकलें वर खालीं सारीत, "इश्श मेलं ! हें ग काय अशा पाठीस लागतां त्या ?" असें म्हणून वरून वरून निषेध करीतच असतों; मनांतून तर त्यांची ती थट्टा आवडत असते; पुढें तेलफळाच्या वेळची मजा आणि मग ऐन लग्नाच्या वेळची मौज तर कांहीं विचारूंच नये. तिकडे घोड्यावरून उतरून आंत यायचें झालें. नंतर कन्यादानाच्या जागीं येऊन पीतांबर नेसून बसावयाचें वगैरे साऱ्या गोष्टी मनांत येऊन पाहण्यासाठी मन किती आतुर होतें म्हणतां ? कांहीं विचारूं नये. निदान मला तर सतरा वेळां हलकेंच उठून जाऊन दारांतून डोकवावें असें वाटलें, पण तसें करतां येतें थोडेंच ? मुकाट्यानें जिथल्या तिथेंच कोणीं येऊन नेईपर्यंत बसावें लागलें आणि शेवटीं नेलें तेव्हां अंतरपाट धरून ब्राह्मण मोठमोठ्यानें किती वेळ तरीं मंगलाष्टकें म्हणत बसले. ज्याचें मन एखाद्या गोष्टीविषयीं अत्यंत आतुर झालेलें असतें, त्यास यत्किंचित् वेळदेखील युगाप्रमाणें वाटूं लागतो तशीच माझी स्थिति झाली होती या ब्राह्मणांची ही मंगलाष्टकें संपणार तरी केव्हां आणि आपल्याला तिकडे पाहायला सांपडेल केव्हां असें मला होऊन गेलें होतें. हें सर्व मी स्पष्ट लिहितें; हें पाहून माझ्या कित्येक भगिनी मजवर निलाजरेपणाचा आरोप आणतील; पण माझी खात्री आहे, कीं त्या जर आपला त्या वेळचा अनुभव चाळून पाहतील, तर त्यांस खास असें आठवेल, कीं आपणहि या यमुनेप्रमाणेंच आपल्या वराच्या दर्शनासाठी आतुर झालों होतों ! असो.

अंतरपाटाचा शेला मध्यें आहे तो दूर झाल्याबरोबर मी एकदा चांगली नजर लावून पाहीन असा निश्चय केला होता; परंतु काय मजा आहे पाहा ! अंतरपाट असतांना जी मी समोर पाहून अंतरपाटांतून कांहीं दिसल्यास पाहण्यासाठी डोळे ताणीत होतें, इतर सर्व मंडळी अक्षता घेऊन आमच्या अंगावर एकसारखा भडिमार करीत असतां ज्या माझें चित्त एकाग्र होऊन गेलें होतें, तीच मी अंतरपाट निघून एकीकडे होण्याबरोबर आपला सर्व निश्चय पार विसरून जाऊन पटकन् खालीं पाहूं लागलें. पुढें मग मी समोरासमोर पाटावर बसलें असतांना खाली मान घालून चोरून वाकड्या नजरेनें पाहिलेंच; पण अंतरपाट दूर होतांच पाहण्याचा जो बेत, तो पार गडबडून डोळे एकदम पायांतल्या विरवल्यांवेढ्यांकडे गेले. आतां लग्न लागल्यानंतरचे जे काय विधि झाले, ते सर्व मला मुळींच आठवत नाहींत; परंतु ज्या कित्येकांबद्दल मला फार मजा वाटली, ते माझ्या लक्षांत आहेत. त्या एकमेकांच्या ओंजळींत एकमेकांनीं आपल्या हातांनीं दूध लावून लाह्या घालणें, ते उपाध्येबोवा तीन–तीनदा मंत्र सांगतात ते म्हटलेले ऐकणें व आपणहि मनांतल्या मनांत म्हणणें. सगळ्यांत मला विशेष मजा वाटली ती कंकणाचें सूत दोघांच्या सभोंवतालीं गुंडाळतात तेव्हां. अग बाई ! काय तरी मौज ती ! जसें कांहीं

त्या सुतानें त्या दोघांचे जीवच एक करीत असतात! मला पक्कें आठवतें कीं, मी थोडीशी मागें बसलें होतें, तेव्हां मला आमचे उपाध्येबुवा हसत हसत म्हणाले, "हं यमे, जरा पुढेंच हो, तुला आतां या सूत्रानं अगदीं जखडून यांच्याशीं बांधायची आहे बरं का!" तें ऐकल्याबरोबर मी तर खुदकन् हसलेंच; परंतु तिकडेदेखील गालांतल्या गालांत हसून चोरून मजकडे पाहायचें! आणि पुढें मंगळसूत्र बांधायच्या वेळीं गळ्यांत हात घालावा लागतो, तेव्हां तर त्या चावट दुर्गीनें जी नक्कल केली ती कांहीं विचारूं नये. आपली माझ्याजवळ आली आणखी कांहीं भीडमर्यादा न धरतां साफ मोठ्यानें मला म्हणते, "यमे, इश्श! हें ग काय? कोणाचा हा हात तुझ्या गळ्यांत?—अन् इतक्या लोकांच्या देखत! अगदींच बाई तूं लाज सोडलीस!" ती बोलणार आणखी साऱ्याजणी हसणार! मग काय विचारतां! एकच धुमाकूळ केला त्यांनीं. मला पण असें झालें, की कांहीं पुसूं नये; मला मोठा राग आला आणि असें वाटलें, कीं एक तोंडांत द्यावी चहाटळीच्या. पण तिनें केलेली थट्टा आवडली नाहीं असें कोणीं समजूं नये हो! ती मला आवडलीहि! तेव्हां हा विरोध कसा असेल तो पाहा. ती तिची थट्टा मला आवडली आणि तिचा रागहि आला! त्यांतून तिचे शब्द ते ऐकण्याबरोबर ही एवढी धीट मुलगी आहे तरी कोण? हें पाहण्यासाठींच कीं काय तिकडून जेव्हां वळून वाकड्या नजरेनें हसत हसत पाहणें झालें, तेव्हां तर मला फारच आनंद झाला म्हटलें असतां हरकत नाहीं. ते तिचे शब्द आम्हीं कितीदा तरी आठवले आणि दुर्गीच्या स्थितीबद्दल बोलणें निघालें असतां मला कितीदा तरीं म्हणायचं—"मोठी बुवा धीट आणि हुशार ती! तिला जर चांगला नवरा मिळता तर तिनं संसार पण संसार केला असता!" असो.

लाजाहोमाच्या वेळीं सहाणेवरून जावें लागतें—तिला सप्तपदी कीं कायसें म्हणतात, तें चाललें असतांना माझा हात धरला, त्या वेळीं तर पोरींनीं माझी किती तरी थट्टा केली! आणि तिकडल्या मित्रमंडळींनीं तिकडली थट्टा कांहीं कमी केली असें नाहीं. "हं हळूंच अं, महाराज पाडाल बिडाल एखाद दुसऱ्याच्या मुलीला!" दुसरा म्हणतो "अरे वारे वा! लग्न लावून घटका गेली नाही तों बायकोच्या हातांत हात घालून हिंडायला निघालास का? सारी मंडळी पाहाताहेतना?" त्यावर तिसरा म्हणतो "अहो, ते मोठे सुधारक आहेत!" असे मंडळींचे त्या वेळचे विनोद—विशेषतः त्या शेवटल्या गृहस्थाचे ते उद्गार—ऐकून जिकडे तिकडे हशाच हशा उडाला! आणि तिकडे तर हसतां हसतां मुरकुंडी वळली. मला त्यांतली काय खुबी होती ती कांहीं कळली नाहीं. कारण त्या वेळीं मला 'सुधारकबिधारक' काय तें कांही कळत नसे. नंतर नक्षत्रदर्शनादि विधि होऊन जेवणाचे वेळीं घासाचा वगैरे यथास्थित थाट उडाला. स्नेह्यांखेरीज तिकडली मंडळी फारशी कोणी नव्हती. दुसरे दिवशीं नहाण्याच्या आधीं विड्या तोडणें वगैरे यथासांग झालें. कोणत्याहि गोष्टीस तिकडून नाहीं होय नसे. हा विडा कोणाचा?—तो विडा कोणाचा?—इत्यादि पोरकट प्रश्नदेखील कोणाचें मन दुखूं नये म्हणून विचारले, सुपारी लपविली ती मला तर पट्कन् सांपडली आणि मुठींत सुपारी धरली होती, ती तर

मीं हात लावला नाहीं तोंच सोडून दिली. नंतर न्हातांना कळसवणी वगैरे घातलें, त्या वेळीं एकमेकांवर ओणवणें—मला त्या वेळीं तिथं हसूं येऊं लागलें आणि तितक्यांत ती चहाटळ दुर्गी मला आग्रह करूं लागली, " बनूवन्संच्या अंगावर चूळ टाक " म्हणून. बरें मीं तरी शहाणपणा करावा कीं नाहीं ' बरें मीं नाहीं केला तर नाहीं, पण दुसऱ्या कोणीं खाणाखुणा करून, नको म्हणून सुचविलें असतां तरी समजावें—नव्हे ऐकावें कीं नाहीं ! पण छे ! माझ्या डोक्यांत त्या वेळीं काय भरलें कोणास कळे; मीं स्वतः विचार केला नाहीं, तिकडून कपाळाला आठ्या घालून मला डोळ्याच्या खुणेनें ' तूं त्या भानगडींत पडूं नकोस ' म्हणून सुचविलें, तथापि मी त्या नकट्या वन्संच्या अंगावर जोरानें चूळ जी टाकली ती समोर तिच्या डोळ्यावर ! मग काय विचारतां ? जो कांहीं थय्थयाट झाला आहे, त्याला कांहीं पारावार नाहीं. शिव्यान् गाळीन् कांहीं विचारूं नका. मला नको म्हणून जी खूण केली होती, ती तर तिकडे उलटीच गळयांत आली. कारण बनूवन्सं स्पष्ट असें म्हणूं लागल्या, कीं नवऱ्यानेंहि खूण करून मुद्दाम माझ्या अंगावर चूळ टाकायला लावली ! त्या तिच्या म्हणण्याकडे अर्थात्‌च कोणीं लक्ष दिलें नाही. परंतु तिच्या थयथयाटाचा परिणाम आणि त्यांत दुसऱ्या अनेक गोष्टींचा परिणाम होऊन एकंदरींत जेवण चाराच्या पलीकडे गेलें. त्यानंतर सुनमुखाची मजा झाली, जिच्या तिच्या मांडीवर बसून साखर खायची, अन् कितीजणी तरी मानाच्या होत्या ! एक शेरभर साखर खावी लागली की काय आम्हांला कोणास ठाऊक ! मला दागिने घातले होते ते कांही फार नव्हते. फार येणार कुठून ! कंगणी पाटली वगैरे चालीपुरते दागिने घातले. दागिने नसल्यामुळें त्या वेळीं मला वाईट वाटलें, नाहीं असें नाहीं. पुष्कळ वाईट वाटलें; आणि विशेषतः जेव्हां साऱ्या बायका ' एवढा थोरला हुंडा देऊन हेच का दागिने ?" असें म्हणूं लागल्या तेव्हां तर भारीच वाईट वाटलें. आमच्या आजीला तर किती वाईट वाटलें तें पुसूंच नका. ती खरोखर रडली. शेवटीं सगळ्यांनीं तिला समजावली, " तूं असं काय करतेस ? कारण आपण दागिन्याला पाहून का मुलगी दिली ? मुलगा पाहा कसा आहे तो ! अग आणखी पांचसात वर्षांनीं दागिनेच दागिने करील, तूं असं काय करतेस ? " पण ती पडली बायको, तिची काय अशानें समजूत होणार होती ? पाटीभर दागिने असते—मग ते चार घटका उसने आणलेले का असेनात, तें कोण पाहायला जातं आहे ? —तर तिला समाधान झालें असतें. " पुढें मुलगा मिळवील न् असं होईल न् तसं होईल हें कोणीं पाहिलं आहे ! " अशा तऱ्हेचे तिचे विचार ! आणि आपल्या पोरीला दागिने मात्र खूप असावे, असे किती बायकांचे तरी विचार असतात ! दागिन्यांपुढें त्यांना कांहीं दिसत नाहीं. परंतु असे विचार असले तर त्यांचा तरी काय दोष ? त्यांची समजूत, त्यांचें शिक्षण, त्यांचा कोंडमारा इत्यादि गोष्टीस अनुरूप असेच त्यांचे हे विचार आहेत. ज्याप्रमाणें पेटयांतून, कपाटांतून चांगले चांगले पदार्थ व चांगले चांगले कपडे ठेवायचे, त्याप्रमाणेंच बायका म्हणजे आपल्या संपत्तीचें प्रदर्शन करण्यास एक साधन आहे. आपल्या बायकोच्या अंगावर चार दागिने घालून चारचौघांच्या घरीं लग्नकार्यांत

पाठविली आणि त्या ठिकाणीं लोकांनीं " काय हो ! ही अमक्या अमक्याची बायको, वा! वा! बरेच दागिने आहेत तिच्या अंगावर !" असें म्हटलें म्हणजे कृतकृत्यता झाली असें वाटतें. मग त्या दागिन्यांवर कवडीची सत्ता नसेना तिची, कांहीं हरकत नाहीं. त्यांतलें एक गुंजभर सोनें इकडचें तिकडे करीन म्हणून जर ती म्हणेल, तर तिला काडीइतका तरी अधिकार ? तें मीं म्हटलें तेंच ! बायका म्हणजे घरांत काम करणाऱ्या मोलकरणी, आणि बाहेर आपली संपत्ति दाखविणाऱ्या चालत्याबोलत्या तावदानी पेट्या ! माझें हें लिहिणें सर्वथा सत्य असल्यामुळें पुष्कळ लोकांस कडू कडू विख लागेल हें मी जाणून आहेंच. दागदागिन्यांच्या—नांवाच्या कां होईना ! पण धनिणी आम्ही; असें आम्हां बायकांच्या मनांत अगदीं चांगलें बिंबून गेल्यामुळें आजीला वर सांगितल्याप्रमाणें वाईट वाटलें यांत नवल नाहीं. तिच्या समजुतीप्रमाणें तिला वाटलें. असो.

सुनमुखादि सर्व विधि झाले. दुसरे दिवशीं पुनः आमच्या घरींच जेवणावळ झाली व तेच दिवशीं रात्रीं सुमुहूर्त असल्यामुळें वरात निघाली. वरातीच्या वेळीं मात्र मला जें रडूं आलें तें कांहीं पुसूं नये. पालखींत एकसारखी मान खालीं घालून बसून मुं मुं करीत होतें. कांहीं केल्या रडूं आवरेना. आतां आपल्यास परत माहेरीं केव्हां नेतील असेंच मनांत येऊं लागलें. समोर पालखींत बसायचें असूनदेखील मला रडें आवरेना. पालखींत आपण बसलों आहोत याबद्दल आनंद व्हायचा तो एकीकडेच राहिला. दादाचें माझ्या या स्थितीकडेच लक्ष गेलें असावें असें दिसलें; कारण तो तितक्यांत मजजवळ आला आणि म्हणतो, " यमे, तुला वेड तर नाहीं ना लागलं ? पालखींत बसली आहेस कोणा-समोर, कांहीं आहे का आठवण ? " असें म्हटल्याबरोबर तिकडून दादाला हलकेंच म्हणायचें, ' वा ! गणपतराव, अशा वेळीं असा का धाक दाखवायचा ? कोणी परकं नाहीं कांहीं पालखींत !" ते शब्द ऐकल्याबरोबर माझ्या मनाला काय बरें वाटलें असेल ? जें काय मला वाटलें तें कांहीं सांगतां येत नाहीं. माझें रडूं मात्र थांबलें, एवढेंच.

वरात सासरीं पोंचल्यानंतर पुढें जे सर्व पुरुषांबायकांचे विधि, आचारविचार व्हायचे ते ठीक झाले. नांव ठेवणें झालें, आणि माझें नांव 'सीता' ठेविलें, यावरून तिकडचें नांव काय असेल हें साऱ्यांना कळेलच. आपली जुनी रीत सोडून मी निर्भीडपणें लिहिण्याची जरुरी नाहीं. दारांत अघोली ठेवून ती सुनेनें लाथेनें पाडायची व नंतर सुनेनें उपसून सासूनें भरायची. कोण दमते तें पाहायचें. हें पाहण्याच्या वेळीं मीं आपलें काय होतें तें शौर्य दाखविलें, सोडलें नाहीं. नंतर नवरीनें प्यायलेलें उष्टें दूध नवऱ्यानें पिण्याच्या वेळीं मात्र खूप मजा उडाली. तें दूध पितांना तिकडील स्नेहीमंडळी एकदम म्हणतात, " हं ! हं ! महाराज, कोणाच्या पोरीचं उष्टं न् माष्टं दूध एवढ्या जिभल्या चाटून पितां ! " त्याबरोबर तिकडूनहि हलकेच शेजारच्यास उत्तर देणें झालें, "जिची माझी जन्माची गांठ बांधली तिचं ! " तें ऐकलं बनूवन्संनीं आणि त्या आपल्या होत्या

त्याचा धिंगाणा करण्याच्या बेतांत पण तिकडून जरा गोडीगुलाबीनें दाबल्यामुळें जितक्यास तितकेंच राहिलें.

असें सर्व झाल्यानंतर आतां तिकडे जाणें होणार, तोंच वाल्वन्संनीं पदराची गांठ धरून नांवें घेण्याचा आग्रह केला त्याबरोबर तिकडली स्नेहीमंडळीहि पाठीस लागली. नाहीं होय म्हणतां म्हणतां तिकडून नांव घेतलें, नंतर मींहि घेतलें. इतक्यांत घरची मंडळी-बायकाच काय त्या आतां राहिल्या होत्या–जाण्यास निघाल्या. त्यादेखील अर्ध्याअधिक गेल्याच. माझी एक मावशी आणखी आई ( आज इकडे आली होती ) राहिल्या होत्या; त्या पोरींना घेऊन जाण्यास निघाल्या आणि मग मात्र माझें रडें मला मुळींच आवरेना. आईनें मला पुष्कळ उगी केलें, 'आतां आज नेतां यायचें नाहीं, उद्यां नेईन,' वगैरे पुष्कळ सांगितलें, परंतु इथें कुठला भरंवसा ? आतां आपण आजन्म आपल्या माहेरास मुकलों असेंच मला वेडीला वाटूं लागलें. शेवटीं थोरल्या मामेसासूबाई रागावून 'हो चालती, जा.' असें जेव्हां म्हणाल्या, तेव्हां मी उगीच बसलें, आणि आईनें मला जवळ घेऊन कुरवाळून 'दुर्गीला तुझ्या पाठराखणीस ठेवतें. अमकीला पाहिजे तर तिला ठेवतें' असें करून ती गेली; त्या वेळीं तिच्या डोळ्यांत पाणी कसें उभें राहिलें होतें आणि तिनें तें कसें आवरलें, तें तिचें तिलाच ठाऊक !

सरतेशेवटीं निराश होऊन–इतका वेळ रडण्याबद्दल सासरच्या मंडळींची टीका ( एवढी थोरली घोडी-लाडूबाई डोक्यावर बसवून ठेवली आहे. घरींच राहायचें होतें, मग लग्न कशाला केलें ? वगैरे वगैरे ) निमूटपणें ऐकत जागा दाखविली तेथें दुर्गीच्या गळ्याला मिठी मारून आंतल्या आंत रडत झोंपीं गेले. ती ते दिवशींची झोप म्हणजे एखादें स्वप्न पडून मनुष्यानें जागें व्हावें आणि पुनः त्यास दुसरें स्वप्न पडण्यासाठीं झोंप लागावी, त्या झोपेसारखी होती. लहानपणापासून तों लग्न होईपर्यंतचे माझें आयुष्य म्हणजे एक स्वप्नच झालें आणि ते दिवसापासून दुसऱ्या स्वप्नास प्रारंभ झाला असें आज मला वाटतें. असो.

एकंदरींत या ठिकाणीं माझ्या चरित्राचा पहिला भाग संपून दुसऱ्या भागास प्रारंभ झाला, एवढें खरें !

मुलीचें लग्न झालें म्हणजे तिच्या आईबापांचे व माहेरच्या इतर माणसांचे जे उद्गार निघतात ते आजपर्यंत कोणीं ऐकले नसतील असें नाहीं. मुलगी होणें हें पापाचें फळ असा आमच्यांत समज आहे कीं नाही, असा प्रश्न करून जर कोणी वादाला उठेल तर आज किती लोक, "तसं नाहीं, आमच्यांत मुलीला आणि त्यांतून कन्यादानाला— फार महत्त्व दिलं आहे;कन्यादानासारखं दुसरं पुण्य कोणतंहि नाहीं,"असा वितंडवाद घालीत सुटतील; परंतु मुलगी जन्मल्या दिवसापासून तों ती मरेपर्यंत कां म्हणाना—निरनिराळ्या प्रसंगीं जे सर्वांचे उद्गार निघतात, ते सारे जर एका ठिकाणीं केले, आणि एकदम वाचले तर मुलगी हें पापाचें फळ मानलें आहे, कीं पुण्याचें मानलें आहे, याचा तेव्हांच निकाल

होईल. माझ्या जन्माच्या वेळीं मजविषयीं कोणाकोणाचे काय काय उद्गार निघाले असतील, ते मला कांहीं सांगतां येत नाहींत, पण साधारणतः मी आठ वर्षांची झालें तेव्हांपासून " अहो, या पोरी नव्हेत, या कट्यारी आहेत; " " नीटपणीं एकदा घरांतून जातील तेव्हां खऱ्या; " " या देण्या आहेत; " " कर्जदारिणी आहेत; " " जेव्हां एकदा शें-दोनशें-चारशें रुपये घरांतून काढतील, तेव्हां निघतील; " " या झारेकरणी घर धुऊन न्यायच्या ! " असे अनेक तऱ्हेचे उद्गार कांहीं रागाच्या वेळीं, कांहीं लोभाच्या वेळीं—निघत असतात, परंतु त्यांत अर्थ एकच असतो. तो हा कीं ' पोरी पदरीं असणें म्हणजे महत्पाप पदरीं आहे म्हणून समजावें. ' एखादी दुसरी पोरगी जास्त झाली कीं, तिला ' कारटी ' हें शोभिवंत नांव मिळाल्याखेरीज कधींच राहात नाहीं. बरें, लग्नासाठीं खटपट सुरू झाल्यावर अंमळ कोठें जुळण्यास आयास पडले कीं " कारटीचें बाशिंग-बळच खडतर " या उद्गारास सुरुवात झालीच म्हणून समजावें. लग्न होऊन ती सासरीं गेली म्हणजे माहेरच्या माणसांचे उद्गार अर्थातच कमी होतात, परंतु आम्हां मुलींना जे उद्गार ऐकावे लागतात ते कांहीं विचारूं नका, पण मी हें भलत्याच वेळीं भलतेंच काय करतें आहें ? माझें तरी असेंच आहे, मनांत विचार आले—ते कारणानेंच येतात—कीं ते ओकून टाकायचे, पण पुरें आतां. ही माझ्यासारख्या इतरांची उठाठेव करण्यापेक्षां मी आपली स्वतःची उठाठेव करणें हें बरें ! त्यांतच साऱ्याचें येईल.

माझें लग्न तर एकदाचें उरकलें. बाबा, आजोबा, आजी, आईसुद्धां म्हणूं लागली, कीं आमचें एकदाचे ओझें उतरलें. माझें लग्न झाल्यामुळें साऱ्यांना आनंद झाला. आतां तो निरनिराळ्या माणसांस अर्थातच निरनिराळ्या कारणानें झाला. आजोबांना आजीला झाला तो एकदाचें आपल्या नातीचें, आपल्यादेखत यथास्थित, आपल्या मनाजोगे लवकर लग्न झालें, हे पाहून झाला, त्यांतून आजीला तर विशेष; कारण तिला असें वाटलें कीं आतां आपण देवळांतल्या बायकांच्या कचाट्यांतून सुटलों. " आतां नातीचं लगीन कधीं करून टाकतां ? बरीच मोठी दिसूं लागली नाहीं का ? " असे प्रश्न जे आजपर्यंत तिला ऐकावे लागत असत, ते आतां ऐकूं येईनासे होतील. माझें लग्न झाल्यावर दोन चार दिवसांनींच ती मला दागदागिने घालून तुळशीबागेंत घेऊन गेली. तेथें ज्या त्या बाईला नमस्कार करतां करतां माझी कंबर दुखूं लागली, आणखी " झालं बाई एकदां आमच्या यमीचं लग्न हो ! आम्ही सुटलों एकदा. ओझं उतरलं म्हणायचं. दागिने कांहीं फार नाहींत – पण बरेच आहेत म्हणायचे – साऱ्यांनाच कुठून येतात दागिने ? " असे उद्गार ऐकतां ऐकतां कान किटले. जी बाई नवी येईल तितक्यागणिक मला उठून नमस्कार करायला सांगायचा, आणखी तितक्यागणिक सगळ्या लग्नाच्या हकीकतीचा पाढा वाचावयाचा. आणखी शेवटीं दागिने नाहींत, आणखी माणसें जरा खाष्ट म्हणून खेद दाखवायचा. त्यांत माणसापेक्षां दागिन्यांबद्दलच काय तें विशेष त्यांत मग ऐकणारी, बाई जशी असेल, त्या मानानें पुढल्या टीका व्हायच्या. कोणी म्हणायची, " अगबाई ! इतका हुंडा

देऊन अन् इतकं सारं करून दागिने कांहींच नाहींत, छे बाई. असं कसं पाहिलंत ? " असें म्हटलें म्हणजे आजीला विशेषच वाईट वाटावें आणि तिनें तोंड अगदीं वाईट करून मजकडे पाहावें आणि म्हणावें, " अहो, आपण कोण पाहणार अन् कोण सवरणार? जें ज्या वेळीं व्हायचं तें कांहीं चुकायचं नाहीं. आम्हीं आपल्याकडून कांहीं वाईट का पाहिलं ? ' दुसरी एखादी समाधानी बाई असली, तर ती आपली बिचारी म्हणे, " ठीक झालं हो, बरं झालं आजीबाई, एकदा तुम्ही त्रासांतून सुटलांत; अहो दागिने दागिने ते काय ? उद्यां त्या मुलाची विद्या होऊन तो पगार मिळवूं लागला, कीं पैसेच पैसे मिळवील आणखी दागिनेच दागिने करील. आहे कोण हिला वाटेकरीण ? तुम्ही का उगीच खेद करतां ! " तिसरी एखादी निराळ्याच तऱ्हेनें बोले. असो; पण एकंदरींत आजीला माझें लग्न झाल्यामुळें मोकळें झाल्यासारखे झालें खरे ! त्याचप्रमाणें आईलाहि समाधान झालें असें दिसलें. आपल्या डोळ्यांदेखत या पोरीचें लग्न झालें तर फार चांगलें होईल असें तिला फार वाटत होतें; आणि बाबांनीं ते दिवशीं रात्रीं अभिवचन दिल्याप्रमाणें सर्व यथास्थित झालें, हें पाहून खरोखरच तिला अतिशय आनंद झाला. ती मनाची मोठी खोल असल्यामुळें आजीप्रमाणें तिला काय वाटलें, काय नाहीं, हें स्पष्ट बाहेरदिसलें नाहीं इतकेंच, परंतु तिला इतका आनंद झाला यांत नवल काय ? आपण आतां दोनचार महिन्यांची सोबतीण असें तिला पक्कें वाटत होतें; तेव्हां अगदीं हातातोंडाशीं आलेल्या पोरीचें लग्न तरी आपल्यादेखत होईल तर बरें, असें तिला वाटणें अगदीं साहजिकच आणि तें झालें हें पाहून समाधान वाटलें, इतकेंच नव्हे तर तिनें स्पष्ट, " आतां मी केव्हां मेलें तरी हरकत नाहीं, " असे उद्गारदेखील काढले. तिला अशा तऱ्हेचें समाधान झालेलें पाहून बाबांनाहि समाधान वाटलें; कारण, मीं मागें सांगितलेंच आहे, कीं ते मागें कितीं जरी खाष्टपणानें वागले असले तरी आतांशा ते आईशीं अतिशय चांगल्या तऱ्हेनें वागूं लागले होते. तिच्या मनांतून अमुक गोष्ट व्हावी असें आहे असें त्यांच्या कानांवर गेले कीं पुरे, त्यांनी ती गोष्ट केलीच म्हणून समजावें. आश्चर्याची गोष्ट ही, कीं ते आतांशा दादाशीं किंवा माझ्याशींदेखील पहिल्यापेक्षां कमी निष्ठुरपणा दाखवीत आम्ही आतां मोठीं झालों म्हणून म्हणा, किंवा त्यांच्यातच कांहीं बदल झाला म्हणून म्हणा, पण आम्हांला आतां त्यांची पहिल्याइतकी भीति वाटत नसे. पहिल्यानें म्हणजे काय ? ते ज्या जागीं बसले असतील तेथून नुसतें पलीकडे कोठें जायचें म्हणजे मोठी जिवावरची गोष्ट ! त्यांच्याजवळून एखादा जिन्नस आणायचा म्हणजे अगदीं मारामारीचा प्रसंग ! उरावर एखादी धोंड ठेविली म्हणजे जशी त्रेधा उडायची, तशी त्रेधा बाबांच्याजवळ जाण्याच्या वेळीं व्हायची. पण तें आतां सारेंच फिरलें. आतां आम्हांला पुष्कळच कमी भय वाटूं लागलें. सुंदरी तर खुशाल त्यांच्या अंगावर लोळण्यापर्यंत आली. मध्यें एखाद्या दिवशीं जमदग्नीचा अवतार आला म्हणजे जरा साऱ्यांचीच त्रेधा उडे, पण तो फार वेळ टिकत नसे; त्यांतून आई कांहीं बोलली, तर फारच लवकर निवत असे. मला वाटतें, बाबांचा मूळचा स्वभाव फार प्रेमळ व कोमल असावा किंवा आईच्या चातुर्यामुळें तो पुढें तसा बनला तरी असावा; कारण

दिवसानुदिवस त्यांच्यांत फार फरक पडत चालला. आईच्या प्रकृतीच्याबरोबर त्यांचें मन अधिक अधिक नाजूक व कोमल होत चाललें. मग आपण आपल्या अमदानींत या साध्वीला उगीच छळलें, असें मनांत येऊन पश्चात्ताप वाटूं लागला कीं—नाहीं पण असेंच असलें पाहिजे, त्याखेरीज इतकें अंतर पडण्याचें कारण नाही. आणि पुढें ज्या कांहीं गोष्टी घडलेल्या प्रत्यक्ष मीं पाहिल्या व त्यांच्या तोंडांतून निघालेले उद्गार ऐकिले, त्यावरून तर माझी शंका सर्वच गेली.

असो. लग्न झाल्यानंतर आठचार दिवसांतच सर्व वऱ्हाडी मंडळी आपापल्या गांवी निघून गेली. माझ्या मावश्यांपैकीं एका मावशीस राहण्याविषयीं आईनें अतिशय आग्रह केला; शेवटीं, " गोदे, आतां पुनः तुझी माझी गांठ पडण्याची आशा दिसत नाहीं ग ? " असे चमत्कारिक उद्गार काढून तिनें डोळयाला चटकन् पाणीदेखील आणिलें. परंतु चमत्कार असा, कीं, ती माझी मावशी कांहीं राहण्यास कबूल झाली नाहीं. म्हटलें तर तिनें राहण्यास कांहीं हरकत नव्हती. ती घरची थोडीबहुत स्वतंत्रच होती म्हटलें तरी चालेल. जर मी अशा कारणानें राहतें असें तिनें लिहून धाडलें असतें, तर तिच्या नवऱ्यानें कांहीं हरकत घेतली नसती; पण ती आपली ' माझं इथं जुळतच नाहीं ' असें उत्तर देऊन तश्शी गेलीच. पुढें कळले, कीं एवढया साऱ्या लग्नांत आपल्याला कोणीं कांहीं विचारायचं तसं विचारलं नाहीं; आपला मान राहायचा तसा राहिला नाहीं, म्हणून रागावून ती गेली. हे जेव्हां कळलें, तेव्हां तिच्या " माझं इथं जुळायचं नाहीं " या उत्तरांतली खुबी आमच्या लक्षांत आली. अशीं कांहीं कांहीं माणसें असतात. आतां तिचा मान तो काय राखायचा ? सगळया कांहीं ज्या गोष्टी करायसवरायच्या त्या आजी तिला विचारीत असे; पण दुर्गीची आई परकी माणूस असून तिला जो मान आहे, तो कांहीं आपल्याला मिळाला नाहीं, हें काय तें तिला वैषम्य वाटलें; तेव्हां चमत्कार म्हणायचा कीं नाहीं ! ती आपली जातांना अगदीं असंतुष्ट होऊन गेली. आजीनें आईच्या आणखी दुर्गीच्या आईच्या विचारानें तिला चांगलें लुगडें, तिच्या मुलीना मोठमोठाले खण जातां येतांचें भाडें इतकें सगळें दिलें तरी ती आंबट तोंड करून फुरंगुटल्यासारखीच गेली. दादा तिला स्टेशनावर पोंचवायला गेला होता, त्याच्याजवळ आपला सर्व राग ओकली. तिचा सर्व राग काय तो दुर्गीच्या आईवर होता. तिला जो आमच्या घरांत अधिकार आणखी मान आहे, तो कांहीं मला नाहीं, मग मी राहूं तरी कशाला ? आपलें दूर आहे तेंच बरें आहे. असलीं आणखीं नानाप्रकारचीं उणींदुरीं बोलणीं दादाजवळ तिनें उद्गारून दाखविलीं. मनाला कांहीं जरी वाटलें होतें तरी न उच्चारतांच गेली असती तर ! पण नाहीं, तो सगळा पाढा दादाजवळ वाचून दाखविला. दादानें अर्थात् आईजवळ सांगितलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, लग्नांत गोदूमावशीइतकी सौम्य, समाधानी बायको कोणी नसेल असें ज्याला त्याला वाटण्याजोगें, तिचें वर्तन असे. कोणाच्या अध्यांत नाहीं, मध्यांत नाहीं; होय नाहीं, नाहीं नाहीं. " गोदूमावशी असं करूं का ? " " हं ! " " तसं नको का करूं ? " तरी " हं ! " च. आणखी शेवटीं जातांना हा असा प्रकार !

तेव्हां मनुष्यस्वभाव म्हणजे काय असतो हें जाणणें किती अवघड आहे ? तीच दुसरी मावशी–सखूमावशी-थोडीशी जहांबाज वाटली. लग्नांत अंमळ भांडण्याबिंडण्याच्या कामांत पुढें सरसावे, ती अतिशय समाधानानें गेली. इतकेंच नव्हे, तर जातांना, " आतां तुझी भेट कधीं होईल ? " असें माझ्या आईला म्हणून तिच्या गळ्यांत गळा घालून रडूं लागली. आईनें तिचें कसेंबसें समाधान करून तिला लावून दिलें. तिच्या मनांतून आईजवळ कांहीं दिवस तरी राहावे असें फार होतें. परंतु ती परस्वाधीन– तिची सासू नवरा यांच्या अगदीं ताब्यांत-यामुळें तिला ठेवून घेतां येईना. बाकी तूं पत्र पाठवून पाहा म्हणून सखूमावशी लागली होती पाठीमागें. " तूं आतां जा. तुला अगदीं ताबडतोब परत पाठविण्याच्या बोलीनें त्यांनीं पाठविलें आहे, मग पुनः थोडे दिवसांनीं पत्र पाठवून त्यांनीं धाडतों म्हटलें तर आणीन " असें सांगून आईनें समाधान करून तिला पाठविलें. ही गोष्ट एवढी विस्तारानें सांगण्याचें कारण मनुष्यस्वभावाचा एक मासला, एवढेंच होय. गोदूमावशी ही माझ्या आईची सख्खी बहीण पण अशा निष्ठुरपणानें बोलून निघून गेली; तीच दुर्गीची आई मोठी जहांबाज परंतु माझ्या आईला आपल्या बहिणीच्या जागीं मानून तिच्या अगदीं भजनीं असे ! माझें लग्न झाल्या वेळेपासून—नव्हे मागल्या एका प्रकरणांत वेणीफणी करण्याच्या वेळीं घडलेली एक गोष्ट सांगितली, त्या वेळीं माझ्या आईचे व तिचें जें बोलणें झालें, तें झाल्या दिवसापासून—ती माझ्या आईवर इतकी कांहीं प्रेम करूं लागली, कीं कांही पुसूं नये ! माझ्या आईचें अंमळ कपाळ दुखतें आहे असें कळलें, कीं ती आलीच धावत काय झालें काय नाहीं विचारायला. मग आपल्या घरांत कसल्या पाहिजे तसल्या कामांत गुंतलेली असेना, तस्सें टाकून ती यायची. शेजारचीपाजारची मंडळी म्हणतदेखील, कीं " ही बाई तुम्हांला बरी धार्जिणी झाली आहे यश्वदाकाकू ! नाहीं तर ह्या आणखी कोणाच्या उपयोगी पडायच्या ! "

पण माझ्या आईच्या गोड स्वभावाला कोण मोहित होणार नाही ? गोदूमावशी-सारख्या एखाद्या निष्ठुर माणसाची गोष्ट सोडून द्या; पण ज्याला कांहीं अंतःकरण म्हणून आहे, त्याला माझी आई म्हणजे एक देवमाणूस वाटणारच वाटणार याबद्दल शंका नको. असो. एकंदरींत सर्व वऱ्हाडी मंडळी बऱ्यावाईट तऱ्हेनें पण आपल्या घरोघर गेली.

◆ ◆ ◆

## २३ : आईचा मृत्यु

* * * * * * * * * * * * * * *

मंडळी घरोघर गेल्यानंतर सुमारें आठ दहा दिवस आईची प्रकृति बरी होती. बरी म्हणजे इतकी, कीं आम्हांला तिच्या बरे होण्याबद्दल आशा वाटूं लागली म्हटलें तरी चालेल. पण क्षयाच्या माणमाला कांहीं बरें वाटूं लागलें, कीं त्याचें उट्टें थोडेच दिवसांत निघणार म्हणून समजावें. पावसाळ्यांत एखादे दिवशीं उन्हाची चांगली तिरीप पडली म्हणजे आतां चांगलें ऊन पडणार अशी आशा करणें आणि क्षयाच्या माणसास एखादे दिवशीं थोडेंसें बरें वाटलें, की त्याची प्रकृति सुधारणार अशी आशा करणें दोन्हीहि निष्फळच. थोडीशी प्रकृति सुधारते आहे असें दिसलें, कीं चिन्ह ठीक नाहीं असें समजून विशेष काळजी घेणेंच वाजवी; परंतु माझ्या आईची गोष्ट अगदीं निराळी झाली. आपल्या पोरीचें लग्न एकदाचें आपल्यादेखत होणार असें पाहून तिला जी हुशारी व जो दम आला तो त्या वेळीं ठीक दिसला; आम्हां सान्यांना त्या वेळीं ती दुखणेकरीण आहे असें फारसें मनांतदेखील आलें नाहीं; पण त्याचें सगळें उट्टें पंधरा दिवसांनीं म्हणजे पंधराच दिवसांनीं म्हणा, कारण, दुसरे दिवशीं सोळनहाण होतें आणि आदलेच दिवशीं आईला सडकून ताप भरला. तो इतका, कीं अंगाला हात लावला म्हणजे हात भाजे.

आज किती दिवस तरी आई आजारी होती ! तिला ताप आजपर्यंत कितीकदा तरी आला असेल ! परंतु या खेपेचा हा ताप कांहीं विलक्षण असे. ताप अंगांतून अजिबात निघालासा वाटे आणि तास–अर्धातास झाला नाहीं तोंच पुनः सडकून भरे; आणि तो इतका भरे, कीं कांहीं बोलायची सोय नाहीं. बाबांचे स्नेही एक डॉक्टर असत. ते अगदीं दिवसांतून चारपांच वेळ घरी येऊन तिची प्रकृति पाहून जात. त्यांनीं किती नानातऱ्हेचीं औषधें दिलीं. यानें ताप हटत नाहीं, तें; त्यानें हटत नाहीं, हें; एकसारखीं दादा औषधें आणीत असे आणि आजी व आई नको नको म्हणत असतां तो तिला पाजीत असे. ही स्थिति सात दिवस चालली. डॉक्टरसाहेबांना विचारतां ते सांगत, हें कांही दूषित तापाचें प्रकरण नव्हे, ताप साधाच आहे, असें असून औषधांनीं कांहीदेखील गुण येईना. असें चाललें असतां सातवे दिवशीं रात्री सुमारें अकरा वाजतां आम्ही सगळीं तिच्या सभोंवार निजलों होतों. बाबा ते दिवशीं असेच खोलीच्या बाहेर पडले होते; आईचा अंमळ डोळा लागलासा वाटत होता; इतक्यांत ती एकदम अंथरुणावरून उठली आणि मोठ्या थोरल्यानें म्हणते, " अहो, अहो, आतां एकदा शेवटचे माझ्याजवळ येतां का ? मी किनई परवांच्या दिवशीं खचित जाणार आहें ! " तें ऐकून बाबा धडपडूनच उठले. तिच्या त्या हांकेसरशी मीहि जागी झालें. दादा मला वाटतें जागाच होता. बाबा एकदम तिच्याजवळ गेले, आणखी तिच्या डोक्याला हात लावून एकदम म्हणाले, " कशाला मला हांक

मारलीस ?" परंतु त्यानंतर एक नाहीं, दोन नाहीं. एकदम तिनें बाबांचा हात एकीकडे केला आणि ती खालीं अंथरुणावर पडली !

पडली ती बेशुद्धच पडली म्हणायची, कारण बाबांनीं मग तिला पुष्कळ हालविलें परंतु कांहीं नाहीं. दुर्गीची आई व आजी यांनीं विशेष गडबड ऐकून त्याहि धावत आल्या. त्यांनीं तिला पुष्कळ हांका मारल्या, परंतु एक नाहीं, दोन नाहीं. आजी मोठमोठयानें रडूं लागली. मी रडूं लागलें आणि सुंदरी मजजवळ निजली होती, ती दचकून उठली, आणि माझ्याच गळ्याला मिठी मारून रडू लागली. हें आहे काय आणि चाललें आहे काय ? कांहीं तिला समजलें नाहीं. दादा आपला आईच्या जवळ "आई आई" असें करीत होता. त्याचा कंठ इतका सद्गदित झाला होता, कीं तो मी कधींहि विसरणार नाहीं. बाबा तर अगदीं वेडयासारखेच झाले. त्या दुर्गीच्या आजीनें मात्र सगळ्यांना धीर दिला आणि दुर्गीच्या आईनें सुंठ उगाळून तिचा वळसा आईच्या डोळयांत फिरविला, त्याबरोबर ती जागी झाली आणि तिनें मोठा सुस्कारा टाकला व इकडची तिकडे वळली व पाहते तों आम्ही सारीं तिच्या सभोंवार जमलेलीं ! बाबा अगदीं तिच्या शेजारीं. आजी तिथेंच, आणखी आजोबाहि तिथेंच; बाबा तर अगदींच तिच्याजवळ बसले होते. ती शुद्धीवर येण्याबरोबर तिनें इकडे तिकडे पाहिलें आणि बाबांच्याकडे नजर जाण्याबरोबर ती एकदम म्हणते, "हें काय ? इतक्या वडील माणसांच्यादेखत इथें कां बसायचं इतकं मला खेटून ?" ते शब्द तिच्या तोंडून निघण्याचा अवकाश ! बाबांच्या डोळयांतून जें एकदम पाणी आलें त्यासरसें ते अगदीं रडूं लागले, आणि तशाच सद्गदित कंठानें म्हणतात,

"अग, तूं मला मुद्दाम बोलावलंस ना मघांशीं ?"

"कोणी मीं ?"

"हो ?"

"हो ! मी नाहीं ग बाई कोणाला बोलावलंबिलवलं ! वाहवा ! उगीच एखाद्याच्या अंगी लावायचं. ते मामंजी काय म्हणतील ? सासूबाई काय म्हणतील ? आपण अगदीं लाजा सोडल्या असं नाहीं का म्हणणार ?"

ते शब्द ऐकून आजोबा एकदम म्हणाले : "नाहीं बरं, यशोदा, मी तुला कांहीं म्हणणार नाहीं; कोणी तुला कांहीं म्हणणार नाहीं."

"तें कांहीं असो, पण हें असं बसणं कांहीं बरं दिसत नाहीं. बहिणाकाकू, तुम्ही सांगा बरं मी म्हणतें तें खरं का खोटं ? उठायचं तर मग इथून, आणखी बाहेर जाऊन बसायचं."

तें ऐकण्याबरोबर बाबा तेथून मुकाटयानें उठले आणि डोळे पुशीत पुशीत पलीकडे माझें अंथरूण होतें तिथें येऊन बसले. पण तेवढ्यानेंदेखील आईला बरें वाटलें नाहीं

असें दिसलें. कारण ती एकदम म्हणाली, " इथं तरी कशाला इतक्या जवळ ? चांगलं बाहेर जाऊन बसावं ! "

हें बोलणें बोलली तेव्हां बरीक ही कांहीं नेहमींच्या स्थितींत नाहीं, कांहीं ना कांहींतरी लहरींत आहे, त्याखेरीज कांहीं असें बोलत नाहीं; जी कधीं दुसऱ्यांच्या देखत मोठ्यानें शब्द उच्चारायची नाहीं, ती आज प्रत्यक्ष बाबांना साऱ्यांच्या देखत एवढें बोलतें, तेव्हां प्रकृतींत कांहींतरी चलबिचल आहे खास, असें आजोबांच्या लक्षांत येऊन त्यांनीं तें बाबांना बोलून दाखविलें. बाबांनीं दादाकडे पाहिलें तों त्यानें, " मी जाऊन येऊं का माधवराव डॉक्टरांकडे ? त्यांना घेऊन येऊं ? असें झट्‌कन् विचारलें व बाबांनीं ' हं ' करतांच तो तीरासारखा चालता झाला.

इकडे आईचें पुटपुटणें आणि आम्हां साऱ्यांचें रडणें सुरूच होतें. इतक्यांत पुनः पहिल्याप्रमाणें गुंगी येऊन ती अगदीं निपचित पडली व तिचा श्वास बंद झाल्यासारखें झालें. पुनः सगळी मंडळी तिच्याभोंवतीं जमून तिला हांका मारूं लागलीं. मी तर आतां सुंदरीला सोडून अगदीं तिच्याजवळ गेलें व पाहतें तों आई अगदीं निश्चेष्ट पडलेली. मी रडत स्फुंदत " आईग, आईग " म्हणून कितीतरी हांका मारल्या म्हणतां ? पण काय उपयोग ? माणसागणिक हांका मारल्या परंतु हां नाहीं–हूं नाहीं. ती आपली निश्चेष्ट पडलेली, आणखी ताठ तरी किती झाली म्हणतां ! शेवटीं एकदाचे डॉक्टर आले व आम्हांला साऱ्यांना ' भिऊं नका ' ' भिऊं नका ' म्हणत त्यांनीं तिची नाडी वगैरे पाहिली. आमचें साऱ्यांचें लक्ष त्यांच्या बोलण्याकडे व पाहण्याकडे होतें, पण किती वेळ त्यांचें पाहणेंच सरेना. त्यांनीं नाडी पाहिली, ऊर पाहिला, डोक्याला हात लावून पाहिला आणि शेवटीं " कांहीं हरकत नाहीं, आतां जाग्या होतील अं त्या ! तुम्ही सगळी मंडळी अंमळ बाहेर जा. " असें म्हटलें.

हें त्यांचें बोलणें ऐकल्याबरोबर माझ्या पोटांत एकदम धस्स् झालें, आणि वाटलें, कीं कांहीं केलं तरी येथून हलूं नये. पण उपयोग काय ? आजीला देखील त्यांनीं ' येथून आतां जरा बाहेर जा ' म्हणून सांगितलें.

" नकाहो आतां मला अन् तिला तिच्याजवळूच दूर व्हायला सांगूं ? काय होणार आहे तें दिसतंच आहे. मला नुसती बसूं द्या तरी तिच्यापाशीं, " असें म्हणून आजी अगदीं गयावया करूं लागली. मग मलाहि जोर येऊन मी मोठ्यानें रडायला लागलें.

तेव्हां डॉक्टरसाहेब आजीकडे वळून म्हणतात, " पाहिलंत, एवढ्याकरितां मी तुम्हांला बाहेर जा म्हणून म्हणतों. तुम्ही अगदीं घाबरूं नका. मी सांगतों तें ऐका. "

ती काय करते बिचारी ! त्या दुर्गीच्या आईनें तिला बाहेर नेलें. शेवटीं मलाहि तिजबरोबर जावें लागलें. सुंदरी रडत रडत पुनः झोपी गेली होती.

खोलींत दादा, बाबा, आजोबा, दुर्गीची आजी आणि डॉक्टर यांखेरीज कोणी नव्हतें. आई पडली होती तशीच होती. हूं नाहीं कीं चूं नाहीं. तेव्हां आतां ही जागी होणार कीं नाहीं इकडे साऱ्यांचें लक्ष होतें. मला वाटलें, ती खास जागी होणार–शुद्धीवर येणार–पण दुसऱ्या मंडळींच्या मनांत काय वाटत असेल तें असो, त्यांच्या चेहऱ्यावर निराशेखेरीज दुसरें कांहीं दिसत नव्हतें. मला मात्र वाटे कीं, ती जागी होणार; पण मला राहवतें कोठें ? मी बाहेर आलें तेव्हांपासून चार वेळां दाराशी जाऊन डोकावलें व कानोसा घेतला, तेव्हां माझ्या कानीं पुढले शब्द पडले : " इकडे पाहा, आतां आशा नाहीं हें तर उघडच दिसतें आहे; पण आपला उपाय आहे तो करून पाहावा. तुम्ही असा धीर सोडूं नका. " हे शब्द डॉक्टरांच्या तोंडचेच होते; परंतु त्यांतदेखील कांहीं अर्थ नव्हता असें दिसले. त्यांनीं काय उपाय योजिला मला कांहीं कळला नाहीं; तथापि कांहीं जरी उपाय असला तरी त्याचा थोडासा बरा उपयोग झाला, तिला अर्घ्यापाऊण घटकेंतच त्यांनीं शुद्धीवर आणलें. शुद्धीवर आणलें याचा अर्थ इतकाच, कीं ती पुनः बोलूं लागली, परंतु तिचें बोलणें वगैरे आतां मघांप्रमाणेंच विशेष जोरदार येऊं लागलें; आणि मध्येंच कांहीं शब्द अगदीं विचूक येऊं लागले. तिला वायूची लहर आली याबद्दल तर आतां कोणास शंका नव्हती; पण ती बोले त्यांतला बहुतेक भाग स्पष्ट आणि चांगला बोले. कांहीं तोंडांतल्या तोंडात बोले. डॉक्टरांनीं औषध दिलें तें, " आतां नाहीं मला डॉक्टरांचं औषध घ्यायचं असें म्हणून तिनें ताडकन् फेकून दिलें; तेव्हां दुर्गीची आई तिला " हें काय यशोदाबाई, औषध घेतल्याखेरीज बऱ्या कशा होणार ? " असें म्हणाली, तेव्हां ती म्हणते, ' अहो, मला झालं काय औषध घ्यायला ? "

" म्हणजे आतां तुम्ही बेशुद्ध नव्हता का पडलां ? "

" छे हो ! माझा जीवच गेला होता. माझा क्रिनई तो माहेरचा जीव गेला होता, पण अजून सासरचा जात नाहीं म्हणून मी पुनः जिवंत झालें. या पोरांच्यासाठीं– अन् क्रिनई – "

इतकें कांही बोलली, आणि पुनः विचूक शब्द भलतेंच बोलूं लागली तेव्हां सगळ्यांनाच आतां समजून आलें कीं, ही वायूच्या लहरींत आहे. ती मध्येंच उठून बसे, मध्येंच पडे आणि पुनः उठे. याप्रमाणें सुमारें बारा एक वाजेपर्यंत चाललें होतें. नंतर तिची तीच थकून कीं काय कोण जाणे, निश्चेष्ट पडली व तिला झोप लागली. ती मग सकाळपर्यंत पुनः उठली नाहीं. सर्व मंडळी अंथरुणापाशीं एकसारखी बसून होती. मीदेखील तीनचार वाजेपर्यंत जागी होतें. नंतर मला झोप लागली. सकाळीं सहा वाजतां आई जागी झाली. आदले दिवसाची वायूची लहरबिहर सर्व गेली. आतां ती चांगली शुद्धीवर आली. विचूक बोलेनाशी झाली. कोणीं कांहीं विचारलें तर अगदीं समजून उत्तर देई. अंगांत आतां ताप बिलकूल नव्हता. साऱ्या दिवसभर प्रकृति अशी होती, कीं आतां आज हिला उतार पडला, आतां कांहीं भीति नाहीं, असें साऱ्यांस वाटलें.

परंतु संध्याकाळच्या सुमारास तापाला सुरुवात होऊन जेव्हां का तो भरत चालला, तेव्हां मग अगदीं उलट झालें. आतां ही फार वेळ जगत नाहीं, असें ज्याला त्याला वाटलें. साऱ्यांच्या तोंडचें पाणी पळालें. संध्याकाळीं सुमारें सहा वाजतां ताप भरला. तो चढत चढत दहा वाजण्याच्या वेळेस अगदीं शिखरास पोंचला. त्या तापानें तिला इतकी ग्लानि आली, कीं बोलण्याची अगर इकडचा हात तिकडे ठेवण्याची कांहीं शक्ति तिच्या अंगांत नव्हती. बाबा आंतबाहेर खेपा घालीत होते. आजोबा आणि आजी तिच्या उशाशीं बसलीं होतीं. दादा उगीच तिच्या पायथ्याशीं बसला होता. सुंदरी निजली होती आणि मी आईच्या पाठीशीं बसलें होतें. आम्ही कोण कोण, काय काय करतों आहोत, किंवा कुठें कुठें बसलों आहोंत हें आईला कांहींदेखील ठाऊक नव्हतें. तिला डोळे उघडण्याचीदेखील शक्ति नव्हती. इतक्यांत कांहीं औषध उगाळून द्यावें असें वाटून कीं काय, आजीनें मला घरांतून थोडासा मध आणि सहाण घेऊन येण्यास सांगितलें, म्हणून मी बाहेर गेलें आणि पाहतें तों बाबा आपले भिंतीकडे तोंड करून हळूच पण स्फुंदून स्फुंदून रडत आहेत. त्यांचा त्या वेळचा तो चेहरा माझ्या लक्षांतून कधींहि जाणार नाहीं. एवढया थोरल्या पुरुषाच्या गालांवरून अश्रूंचे ओघळ चाललेले पाहून कोणाचें मन दुःखित होणार नाहीं बरें ! मी तर काय पोरच होतें. तें पाहून मी आपली वेडया-सारखी जागच्या जागींच थांबलें. बाबा आणि रडणें या दोन गोष्टी मला किती विसंगत दिसल्या ! मी ज्या कामाकरितां आलें होतें तें काम अगदींच विसरून गेलें व गोंधळून जाऊन स्वस्थ त्यांजकडे पाहात उभी राहिलें. आपण अशा तऱ्हेनें उभ्या राहिलों तर ते रागावतील हा विचार त्या वेळीं माझ्या मनाला शिवलादेखील नसावा. मी अशी उभी असतां त्यांची दृष्टि मजकडे गेली. मला पाहतांच त्यांनीं आपले डोळे पुसले आणि लागलीच मला म्हणाले :

"यमे, कां ग आलीस इकडे ? अशी कां उभी ?"

"कांहीं नाहीं; मी मध आणखी सहाण न्यायला आलें होतें." मीं चट्कन् उत्तर दिलें.

"मध आणखी सहाण ! ती कशाला !"

"आजी कांहीं औषध उगाळून देणार आहे आईला."

हे माझें उत्तर ऐकून ते गप्प बसले. मी जाऊं लागलें, इतक्यांत त्यांनीं दीर्घ सुस्कारा टाकला व तोंडानें "आतां कुठली ती मला दुर्भाग्याला लाभायला !" असें ते पुटपुटले, तें मला स्पष्ट ऐकूं आलें. ते त्यांचे उद्गार किती दुःखानें निघाले असतील, याची कल्पना मला त्या वेळीं यथायोग्य झाली नाहीं, परंतु पुढें झाली. असो.

मीं आजीला सहाण नेऊन दिली आणि पुनः आईच्या पाठीशीं जाऊन बसलें. आई आपली होती तशीच होती. इतक्यांत दुर्गीची आई आली आणि तिच्यामागून तिची आजीहि आली. आजीनें कांहीं उगाळून आईला चाटवलें. मग तें काय होतें

कोणास ठाऊक ! मध्यरात्रीच्या सुमारास मी तेथें लुटकलें आणि निजलें. नंतर सुमारें अर्धापाऊण तास काय झालें तें मला कांहीं ठाऊक नाहीं. मी झोपेच्या अगदीं भरांत होतें, इतक्यांत मला दादानें “ यमे, यमे, ऊठ, आई हांका मारते आहे, ” असें म्हणून उठविलें.

ताप उतरल्यामुळें ग्लानि कमी होऊन आई खरोखरच मला आणि दादाला हांका मारीत होती. मी जागी होण्याबरोबर तिनें मला पुनः एकदा हांक मारली, तिला आतां हांक मारण्यासदेखील शक्ति नव्हती. मी उठून तिच्या अगदी जवळ गेलें. तिनें आपल्या दोनहि हातांनीं अगदीं घट्ट मिठी मारली आणि ती मला म्हणाली: “ पोरी, आतां तुला आई नाहीं बरं. मी आतां जाणार. गणू, तूं हिला आणखी सुंदरीला चांगलं कर अं ! हिला अंतर देऊं नकोस. आणखी तूं चांगला वाग. एवढंच माझ तुला शेवटचं सांगणं आहे. ” इतकें ती बोलली तोंच तिला अतिशय दम लागला. ती कांहीं वेळ स्वस्थ पडली. तिच्या डोळ्यांतून एकसारखीं आंसवें गळत होती. मला व दादाला तर रडतां भुई थोडी झाली. आजीं वेड्यासारखी करूं लागली. इतक्यांत आई एकदम उठून बसूं लागली आणखी तोंडानें “ सासूबाई, हीं मुलं आतां नीट संभाळा अं, ” असें म्हणून ओक्साबोक्शीं रडूं लागली; तेव्हां आजीनें तर आकांत उडविला. आजोबा सगळ्यांचें शांतवन करीत आपले डोळे पुशीत होते. बाबा मुळीं आंत आलेच नाहींत. ते रात्रीपासून आंत म्हणून आले नाहींत. मग काय त्यांच्या जिवाला खेद झाला असेल तो त्यांचा त्यांना ठाऊक ! शेवटीं बहिणाकाकूंनीं आजीला हात धरून बाहेर नेलें इतक्यांत आईनें दादाला जवळ बोलावून “ बोलावून आण ” म्हणून सांगितलें. दादानें बाबांना बोलाविलें. ते मोठ्या कष्टानें आंत आले. आजोबा मुकाट्यानें उठून बाहेर गेले. बाबा जवळ येण्याबरोबर त्यांनीं आईला हांक मारली. तिनें डोळे उघडून त्यांचा हात धरला आणि ती एकदम म्हणाली, “ मी आतां जाणार. पुढें काय व्हायचें तें होईलच. पण सासूबाईंना आणखी मामंजींना बरीक अंतर देऊं नका. त्यांना बोललांत म्हणजे अतिशय वाईट वाटतं; हीं पोरं लहान आहेत. या यमीचं लग्न झालं पण मला—काय असेल तें असो—तिचं नशीब कांहीं चांगलं दिसत नाहीं तिला कांहींतरी—गणू तिला सर्वस्वीं तूं—बरं कारे—अगाई ! मी किनई चुकलें असेन—अपराध केले असतील—ते आतां विसरा आणखी मला मांडी द्या म्हणजे सुखाची मरेन—आतां माझा कांहा हेतु...” पुढें ती कांहीं बोलणार होती तें बोलवेना म्हणून कीं काय—किंवा बाबांच्यानें पुढे ऐकवेना म्हणून असेल—त्यांनीं मागेपुढें न पाहतां तिला घट्ट मिठी मारली आणि तो गंभीर पुरुष, “ नको, नको आतां पुढें बोलूं. मीं तुझा छळ केला. मला तुझी योग्यता समजली नाहीं, आतां मी म्हणूं काय तुला ? ” असें कांहीं म्हणत ढळढळा रडूं लागले व आईच्या म्हणण्याप्रमाणें तिचें डोकें मांडीवर घेऊन तिला, “ आतां नाहीं ना मला तूं लाभत ? कुठली लाभायला ? ” असें ते म्हणत होते, इतक्यांत आईनें “ यमे, थोडें पाणी आण ग ” असें खोल आवाजानें शब्द उच्चारले. मीं झट्कन् तांब्यांतलें पाणी ओतून तिच्याजवळ नेलें, तों बाबांनी तें

माझ्या हातून घेऊन तिच्या तोंडाशीं नेलें आणि तिनें एक घुटका घेतला असेल नसेल, तोंच तिची मान वांकडी होऊन, ती माझी आई, आम्हां साऱ्यांना तेथल्या तेथें सोडून गेली. बाबा मोठ्यानें रडूं लागले, मीं तर 'आई, आई' म्हणून किंचाळीच फोडली व बाहेरून आजीची, "बाई गेली काग मला टाकून ? मला कां नाहीं टवळीला मरण आलं ?" अशी आरोळी आल्याबरोबर एकच आकांत उडाला. आतां या वेळीं माझे डोळे पाण्यानें इतके भरून आले आहेत व मन त्या वेळच्या आठवणीनं इतकें उदास झालें आहे, कीं पुढें एक अक्षरहि लिहवत नाहीं.

◆ ◆ ◆

## २४ : स्वप्न

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

होय. ती माझी आई ! जिच्याविषयीं आम्हां साऱ्यांना इतका अभिमान–इतकें प्रेम वाटत असे, मला कळूं लागल्यापासून जिची आज्ञा मीं प्रत्यक्ष तर काय, परंतु नुसती मनांनदेखील उल्लंघिली नाहीं, जिनें मला आपल्या उपदेशानें आणि आचरणानें चांगल्या मार्गास लावून आईचें खरें कर्तव्य तें बजावलें, तिनें कधीं कोणाच्या तोंडून यत्किंचित् वाईट म्हणून घेतलें नाहीं, जी कोणाला कधींहि नकोशी वाटली नाहीं; ती आज आम्हां साऱ्यांना रडत ठेवून चालती झाली ! आतां ती आम्हांला पुनः कशानें लाभणार ? आतां तिचा तो उपदेश ऐकण्याचा सुप्रसंग आम्हांला कुठला येणार ? आतां तिच्या प्रेमानें सांगितलेल्या शिकवणीच्या गोष्टी कुठल्या ऐकायला सांपडणार ! मनुष्य गांवाला गेलें, तर तें परत येईल ही आशा; परंतु एकदा या शेवटल्या गांवाला गेलें, म्हणजे पुनः त्याचें दर्शन तरी होतें काय ? आम्ही सारी त्या दिवशीं कितीतरी रडलों, कितीतरी ओरडलो, किती शोक केला, पण काय उपयोग ! थोडयाच वेळांत आमचा शोक आम्हांस आंवरून पुढल्या तयारीस लागावें लागलें. मेलें मनुष्य कितीहि आवडतें असो, तें कितीहि हवेंसें वाटो, परंतु एकदा त्याच्यांतला प्राण निघून जाऊन माती जड झाली, म्हणजे मग क्षणभरदेखील दृष्टीसमोर ठेववत नाहीं. मग त्याचा सर्व लोभ सोडावा लागतो, आणि सुटतोहि. आम्ही म्हणजे जगाच्या बाहेरलीं नव्हतों, तेव्हां आई वारल्याबरोबर जे दुःखाचे उमाळे साऱ्यांस आले ते कमी कमी होऊन जनरीतीप्रमाणें पुढील विधीस मंडळी लागली. बाबांची अवस्था मात्र फारच कठीण झाली. त्यांच्यानें बोलवेना. पुरुषमाणूस होऊन पण त्यांच्या डोळ्याचें पाणी थांबेना. पण काय करतात ? ते जे एका जागीं बसले होते, ते मुळीं हललेच नाहींत. आजोबांनीं धीर धरून आलेल्या मंडळींच्या मदतीनें सर्व तयारी चालविली. आजीच्या रडण्याला तर अगदीं पारावार नाहींसा झाला "अरे, मला कां नाहीं नेलेंस चांडाळा काळा ? तुला तीच कां आवडली ?" इ० इ० उद्गार एकसारखे

तिच्या तोंडून निघून सगळ्यांच्या हृदयास द्रव आणीत होते, तिरडी उचलण्याच्या वेळेस तर तिला वायूच होण्याची वेळ आली. हातपाय वेडेवाकडे होऊन ती बेशुद्ध पडण्याच्या बेतांत आली होती; इतक्यांत तिला दुर्गीच्या आईनें व आजीनें ओढून तिरडीपासून दूर नेलं तरी ती धाव घेतच होती. असो.

एतावता सांगावयाचें एवढेंच कीं, लहान वयांत असतांनाच माझी आई वारल्यामुळें माझी फार मोठी हानि झाली. बाकी कोणाचें कांहीं वावगें झालें नाहीं. परंतु आम्हां मुलांना मात्र फारच पोरकेपणा झाला. दादा आतां थोडासा जाणता झाला होता. माझें लग्न होऊन चुकलें होतें. फार वाईट झालें तें सुंदरीचे. त्या पोरीची फारच वाईट स्थिति झाली; कारण तिला आईचा लळा अतिशय असे. आजीजवळ ती फारशी राहात नसे. सारा दिवस आईच्या उशापायथ्याशीं घुंगट घालून असायची आतां कोणाजवळ जाते ? आयत्या वेळीं तिला दुर्गीनें फसवून दुसरीकडे नेलें, त्यामुळें तिला आई कोठें गेली वगैरे कांहीं कळलें नाहीं; परंतु ती अगदीं अजाण होती असें नव्हतें कारण तिला जरी मरण म्हणजे काय एवढें कळत नव्हतें तरी आई आपणां साऱ्यांस टाकून एकटीच कुठें गेली ? असें विचारून, कोणी 'गेली गांवाला' असें उत्तर दिलें असतां खोटें वाटून रडण्याइतकें कळूं लागलें होतें. हो, दुसरे कोणी घरांतून हललें नाही, आणि एकाएकीं एकटी आईच तेवढी नाहींशी झाली, ती गेली तरी कुठें ? असें मनांत येऊन तिनें प्रश्न विचारला असतां तिला कोणी कांहीं कोणी कांहीं अशीं उत्तरें देऊन उगी करूं पाहणें म्हणजे किती दुरापास्त काम होतें बरें ! आईला नेल्याबिल्यावर तिला दुर्गी जेव्हां घरांत घेऊन आली, तेव्हां सर्व माणसांना इथेंशी तिथेंशीं रडत बसलेलीं पाहून अगदीं घाबरून जाऊन ती तडक आई निजत असे त्या खोलींत गेली व पाहते तों आईचें अंथरूण नाहीं, कांहींएक नाहीं. त्या जागीं सारवून त्यावर दिवा ठेवलेला ! आई कोठेंच दिसेना. ती सगळीकडे आई आई करीत हिंडूं लागली. तें तिचें दीनवाणें हिंडणें पाहून आमच्या साऱ्यांच्या पोटांत तर अतिशय भडभडून आलें. आजी आपली दगडासारखी जमिनीवर अंग टाकून रडत पडली होती. मी तेथेंच पलीकडे रडत बसलें होतें. बाबा आपल्या खोलीत गुडघ्यांत मान घालून बसले होते. त्यांच्याच्यानें जाववेना म्हणून ते स्मशानांत गेले नाहींत. आजोबा दादाच्या बरोबर गेले होते. दुर्गीची आई व आजी आजीचें सांत्वन करीत होत्या, इतक्यांत आई आई करून, आई कोठूनच ओ देईना व दिसेनाहि, असे पाहून रडत रडत सुंदरी मजकडे आली व माझ्या गळ्याला मिठी मारून रडत रडत, "ताई अ; आई कुठें आहे ?" म्हणून मोठ्यानें रडूं लागली; तर तिला उगी करतां करतां माझी त्रेधा उडाली. माझें रडणें मला कोणीकडच्या कोणीकडेच विसरावें लागलें; परंतु ती कुठली उगी व्हायला ? ती कांहीं केल्या ऐकेना; इतक्यांत तिचें रडणें कानीं पडून विशेष दुःख झाल्यानेंच कीं काय, बाबा फार मोठ्यानें रडूं लागले. त्यांचा आवाज ऐकून सुंदरी त्यांच्याजवळ गेली व "आई कुठें आहे हो ?" म्हणून त्यांस विचारूं लागली. तो तिचा प्रश्न ऐकून बाबांची जी अवस्था झाली, तीं कांहीं विचारूं नये. आईच्या मरणानें

माझ्या बाबांना इतकें दुःख होईल, असें कधीं कोणास वाटलें नव्हतें; परंतु त्यांची फारच दुर्दशा झाली. त्यांनीं सुंदरीला पट्कन् जवळ घेतलें; आणि " सुंदरे पोरी, आतां कुठली तुला आई ? " असें म्हणून ते बायकांप्रमाणें रडूं लागले. थोडासा वेळ गेला नाहीं तोंच त्यांनीं तिला पलीकडे लोटलें व " एकदा मी तिला शेवटची तरी पाहीन, " असें कांहीं पुटपुटत तडक घरांतून बाहेर गेले. इकडे सुंदरीचें रडणें सुरू होतेंच. तिला मी उगी करीतच होतें, असा प्रकार चालला होता.

शेवटीं दुर्गीच्या आईनें आम्हां दोघींना उठवून एकदा अंग धुण्यास घातलें व सर्व व्यवस्था करून पहिला दिवस पार पडला. दुर्गीच्या आईला माझ्या आईच्या मरणानें किती दुःख झालें हें कांहीं मला सांगतां येत नाहीं; पण मी एवढें खास सांगतें, कीं आमच्या घरांत मी व दादा, यांखेरीज सार्‍या मंडळींना विसर पडला, परंतु दुर्गीच्या आईला, यशोदाबाईची आठवण झाली नाहीं असा दिवस गेला नसेल ! अजूनदेखील माझी व त्यांची जेव्हां जेव्हां म्हणून गांठ पडते तेव्हां तेव्हां त्या माझ्या आईची आठवण काढून डोळयास पाणी आणतात.

आई वारली त्याच्या तिसरे दिवशीं मी आपली मध्यरात्रीच्या सुमारास सहज जागी झालें. दादा माझ्या शेजारींच पलीकडे निजलेला होता. निजलेला कसला ? — जागाच होता, कारण मी जागी होऊन चळवळ करतें तों त्यानें मी जागी आहें असें ताडलें व तो मला म्हणतो, " यमे, कां ग झोप नाहीं का येत तुला ? " हा त्याचा प्रश्न ऐकून मला तितक्या स्थितींत खरोखर हसूं आलें. हसूं येण्याचें कारण इतकेंच कीं, जसा एखादा वृद्ध व पोक्त बुवा असावा आणि त्यानें आपल्या लहानशा मुलास कांहीं विचारावें तशासारखें त्याचें विचारणें मला वाटलें, आणि खरोखर त्या दिवसापासून तो विशेषच पोक्त माणसाप्रमाणें वागूं लागला. असो.

मला हसूं आलें तथापि मी त्याला तें कळूं दिलें नाहीं. " कांहीं नाहीं, मी आत्तांच जागी झालें, " असें मीं म्हटलें आणि उगीच राहिलें. नंतर तोहि कांहीं बोलला नाहीं. कितीतरी वेळ झाला ! कांहीं केल्या मला झोप येईना. या कुशीची त्या कुशीवर, त्या कुशीची या कुशीवर, असें एकसारखें चाललें होतें. बराच वेळ झाला. आतां माझा डोळा लागणार, इतक्यांत मला कोणीतरी मोठयानें स्फुंदल्याचा भास झाला. नीट कान देतां तें स्फुंदणें दादाचें असें मला तेव्हांच कळलें आणि मी एकदम त्यास, " दादा, दादा, हें काय हें ? " असें म्हटलें. वाचकहो, मी त्याला प्रश्न करण्याचा अवकाश ! तो एकदम मला म्हणतो, " यमे, आतां आपलें काय बरें होणार ! आतां आपल्याला घरांत कोण विचारणार आहे ? त्या पोरीचें–सुंदरीचें कसें व्हावें ! " ते त्याचे चमत्कारिक प्रश्न ऐकून व त्याचें रडणें ऐकून मलादेखील एकदम रडूं कोसळलें, आणि मी मोठा गळा काढण्याच्या बेतांत आलें होतें, परंतु तितक्यांत आपलें रडें आंवरून धरून दादानें मला चिप् चिप् केलें व दाबलें आणि हलकेंच म्हटलें, " यमे,

मी तुला कांहींतरी उद्यां सांगणार आहे बरं का! आतां उगीच बस तर सांगेन, नाहीं तर—"

इतकें तो बोलतो आहे तोच आजी पलीकडे निजली होती ती जागी झाली आणि म्हणते, "कायरे? तुम्हांला झोपा नाहीं का येत? निजा उगीच." तिला बिचारीला दोन दिवसांत मुळींच झोप नव्हती. ती जागी झाल्यावर तिनें थोडयाच वेळांत आपली पहांटेच्या वेळचीं गाणीं वगैरे म्हणण्यास सुरुवात केली, आणि मला पुनः झोप लागली. ही वरील हकीकत देण्याचें कारण इतकेंच, कीं त्यानंतर मला झोप लागली व मी पहांटे पांच-साडेपांच वाजतां जागी होण्यापूर्वी मला स्वप्न पडलें तें असें : मी जशी कांहीं आईच्या उशाशीं बसलें आहें, आणि आई कांहीं सांगत आहे तें मोठया उत्सुकतेनें कान देऊन ऐकतें आहें. इतक्यांत आईचे बोलणें म्हणून जें वाटत होतें, तें ऐकूं येईनासें होऊन मला असें दिसलें कीं आई एकदम उठून बसली आणि मला तिनें पट्कन् ओढून घेऊन घट्ट पोटाशीं धरलें व ती म्हणते, "यमे, तुझं एकदाचं लग्न तर बाई झालं; पण तुझं नशीब कांहीं धड दिसत नाहीं, समजलीस! मीं सांगून ठेवलं आहे गणूला. तो कांहीं तुला अंतर देणार नाहीं असं वाटतं. त्याला विचार." असे शब्द तिच्या तोंडून स्पष्ट तऱ्हेनें पण अश्रु गाळीत उच्चारलेले असे माझ्या कानीं पडले—व ते दिवसापासून आजपर्यंत माझ्या कानांत ते एकसारखे घुमताहेत. त्या शब्दांची मला अमुक दिवशीं म्हणजे आठवण झाली नाहीं असें नाहीं. त्या शब्दांच्या खरेखोटेपणाचा अनुभव मला कितपत आला, कितपत नाहीं हें माझ्या चरित्रांत स्पष्ट कळून येणार आहे. सध्यां मला इथें एवढेंच सांगायचें, कीं ते शब्द ऐकून मी दचकून जागी झालें आणि तेव्हांपासून माझ्या पोटांत त्या शब्दांचा धसकाच बसला. मी कांहीं मोठी नव्हतें. यामुळें असल्या शब्दांनीं एखाद्या जाणत्या मुलीच्या मनांत जे विचार यायचे, ते कांहीं माझ्या मनांत आले नसतील; पण चमत्कारिक विचार आले खरे!

आपणांस आज असें असें स्वप्न पडलें म्हणून आजीजवळ सांगावें असें माझ्या मनांत आलें व मी तसें करणारहि होतें; परंतु आजी आधींच अंथरुणावरून उठून सुंदरीला घेऊन गेली होती. शेवटीं त्या वेळीं तें तसेंच राहिलें, परंतु दादा मला दुपारीं एकटा भेटेल केव्हां आणि त्याला मी तें सांगेन केव्हां, असें मला होऊन गेलें होतें. नशिबानें तसा प्रसंग लवकरच आला आणि दादाला एकटें गांठून मीं त्याला म्हटलें, "दादा, दादा, तूं काल रात्रीं म्हणालासना, तुला कांहीं सांगायचं आहे म्हणून? सांग तर मग आतां काय तें!"

दादा : कांहीं नाहीं. यमे, मी सांगणार होतों, पण आतां कांहीं सांगत नाहीं; अजून तूं लहानच—

मी : हें काय बरं असं? तूंच मला रात्रीं म्हणालासना सांगेन म्हणून, आणखी आतां तूं सांगत नाहींस. काल रात्रीं मी मोठी होतें वाटतं? सांग रे, मग मीदेखील

तुला माझं स्वप्न सांगणार आहें. आज पहाटे कीं नाहीं मला आई स्वप्नांत दिसली, आणखी—

दादा : आई दिसली ? तुझ्या स्वप्नांत आज आई आली होती ? आश्चर्यच आहे बुवा !

मी : कां बरं ! आश्चर्य काय ? पण किनई दादा, तूं सांगच मला काय सांगणार होतास तें.

मी हें बोलत असतांना दादाचें लक्षच मजकडे नव्हतें, तो वेड्यासारखा कोणाकडे तरी पाहात होता. त्याच्या डोळ्यांत अश्रु दिसूं लागले होते. अशा तऱ्हेनें थोडासा वेळ गेल्यावर तो एकदम मजकडे वळला आणखी एकदम मला म्हणतो, " यमे, खरंच का आई तुझ्या आज स्वप्नांत आली होती ? का उगीच कांहींतरी मला सांगते आहेस ? यमे, मी आतां कांहीं तो मागला तुझा दादा नाहीं बरं का ? मला सांग काय असेल तें. मी—"

मी : हें रे काय दादा ! मी उगीच कांहींतरी खोटं सांगेन वाटतं तुला ? चांगलं ! आपण न सांगतां माझ्याकडून मात्र काय तें काढून घेण्याची ही युक्ति दिसते आहे.

पुनः दादा सुमारें पाव घटका मजजवळ कांहींएक बोलला नाहीं; आणि पहिल्याप्रमाणेंच वेड्यासारखा इकडे तिकडे पाहूं लागला. नंतर पुनः एकदम मला म्हणतो :

" यमे, काय म्हणतेस ? आज पहाटे तुला स्वप्न पडून आई दिसली, आजच पहाटे ? "

" होय, आजच पहाटे. तुझं माझं रात्रीं बोलणं झाल्यावर मला झोप लागली त्या झोपेंत. "

तें माझें बोलणें ऐकून त्यानें फक्त एक सुस्कारा टाकला आणि " असेल असेल ! " एवढेंच म्हटलें.

नंतर तो पुनः उगीच स्तब्ध राहिला. तेव्हां मींच त्याला म्हटलें, " दादा, तुला माझ्या सांगण्याचं एवढं आश्चर्य कां वाटतं ? "

" कांहीं नाहीं. मलादेखील त्याच झोपेंत स्वप्न पडून आई दिसली. " हे त्याचे शब्द ऐकण्याबरोबर मी त्याच्याप्रमाणेंच क्षणमात्र स्तब्ध राहिलें; आणि त्याला आई काय म्हणाली असेल हें जाणण्याच्या आतुरतेनें एकदम म्हणालें :

" तुझ्याशीं बोलली ? "

" होय. "

" काय म्हणाली ? "

" तुला काय म्हणाली ? "

" तूं आपलं सांग, म्हणजे मग सांगेन मी खचित. "

" नाहीं, यमे, तूंच सांग आधीं. मी एकदा सांगेन म्हटलं आहे. तें सांगेनच. "

" काल असंच म्हटलं होतंस. तसंच कीं नाहीं मग सांगणार ? "

" नाहीं, खात्रीनंच सांगेन. "

" बरं तर सांगतें. "

असें म्हणून मीं त्यास आपल्याला आई दिसली, कशी दिसली, कुठें दिसली, काय म्हणाली, वगैरे सर्व कांहीं सांगितलें. ती हकीकत मी सांगत असतां त्याचें चित्त सर्वथा माझ्याकडे होतें. विशेषतः आईचे शब्द काय होते, ते जेव्हां मीं सांगितले, तेव्हां तर त्याचें मन इतकें मजकडे गुंतलें होतें, कीं मीं सांगितलेले शब्द एक एक निरनिराळे त्यानें घोकल्यासारखेच केले. माझें सांगणें संपल्यावर किती वेळ तरी तो तेच शब्द आपल्याशीं पुटपुटत होता. नंतर एकदम मजकडे वळून म्हणतो :—" यमे, मला आज आई स्वप्नांत दिसून हेंच तिनं मला सांगितलं, ' मीं गणूला सांगून ठेवलं आहे, ' असें जें ती म्हणाली तेंच तिनं मला सांगितलं आहे. समजलीस ? "

मी तेवढ्या बोलण्यानें कुठली संतुष्ट राहते ! मीं लागलींच आणखी पुनः म्हटलें, " दादा, पण तें काय तुला सांगितलें आहे म्हणून तिनं म्हटलंन् तेंच, पण तें काय सांगेनास का ? सांगेन-म्हणून कबूल केलंसना मघाशीं ? "

पुनः तो बोलेनासा होऊन थोडा वेळ उगीच बसला. मीं त्याला पुनः विचारलें, तेव्हां तो " यमे, अग दुसरं कांहीं नाही. मला असं स्वप्न पडलं, कीं मी जसा कांहीं स्वस्थ झोंप घेत-पडलों आहें. इतक्यांत आई बाहेरून कुठूनशी आली, आणखी मला म्हणते, ' गणपू, मीं सांगितलेलं तुझ्या लक्षांत आहे ना ? तुझ्यावरच सगळं आहे बरं. यमीचं पोरीचं नशीब कांहीं ठीक नाहीं, तिचं देखील तूं–' इतकं ती बोलते तो मी ' हो, हो, आई ' असे शब्द उच्चारीत जागा झालों आणि तेव्हांपासून विचार करतों आहें, कीं हें आहे तरी काय ? तितक्यांत तुलाहि स्वप्न पडलेलं ऐकून मला अतिशयच आश्चर्य वाटलें, आणि तें स्वप्नांत काय तें ऐकून आतां तर मला फारच आश्चर्य वाटतं आहे. यमे, तुला आणखी मला दोघांना एकदम एकाच वेळीं एकाच अर्थाचीं स्वप्नें पडताहेत, तेव्हां कांहींतरी त्यांत– " पण तुला पोरीला काय गोष्टी कळणार ? " हे दादाचे शेवटले शब्द ऐकून मला फार वाईट वाटलें आणि मीं एकदम त्याला म्हटलें, " दादा, मला तूं अगदी कांहींच कळत नाहीं असं का समजतोस ? मला सारं कांहीं– "

इतकें मी बोलतें तों मला कांहीं स्मरण होऊन मीं त्याला एकदम म्हटलें: "दादा, तुझ्या या स्वप्नावरून मला आतां आठवण झाली. ते दिवशीं रात्रीं एकाएकीं आईनं तुला हांक मारून तुझ्या कानांत कायरे सांगितलं ? "

तो प्रश्न ऐकल्याबरोबर त्यानें टाळाटाळ करण्याचा प्रयत्न चालविला; परंतु मी जेव्हां अगदींच ऐकेना, तेव्हां निरुपाय झाल्यामुळेंच कीं काय, तो अगदीं सांगण्याच्या बेतांत आला व " यमे, कांहीं नाहीं. ती म्हणाली–"

पण काय माझें दुर्दैव; इतक्यांत बाबा त्या ठिकाणीं आले !

बाबांनीं आमचें बोलणें ऐकिलें कीं काय कोण जाणें; ते केव्हां आमच्याजवळ आले हें आम्हांला तरी निदान कांहीं कळलें नाही. पण ते जवळ आले हें कळल्याबरोबर आमच्या मनाची काय स्थिति झाली ती आमची आम्हांला ठाऊक ! दुसऱ्या कोणाला सांगून कळायची नाहीं; आणि कळण्याजोगी असली तरी ती मला सांगतां येणार नाहीं. एका क्षणांत मनामध्यें नानातऱ्हेचे विचार आले. आमचें बोलणें बाबांनीं ऐकलें, असें तर खास वाटलें; आतां त्यांनीं आपणांस विचारल्यास आपण बोलावें काय आणि सांगावें काय ? माझी एक गोष्ट असो. मला त्यांनीं तितकें विचारलेंच असतें तर मला पडलेलें स्वप्न मीं तत्काळ सांगितलें असतें; कारण त्यांत लपवून ठेवण्याजोगें कांहीं नव्हतेंच; परंतु दादानें जें मला सांगण्याला आढेवेढे घेतले, तें तो बाबांजवळ सांगणार तरी कसा ? त्यांत कांहींतरी गुप्त—लपविण्याजोगें असें असलें पाहिजे हें उघड आहे, कारण तें आईनें त्यास रात्रीं किती वाजतां मध्येंच उठून सांगितलें होतें ! तें सांगण्याची पंचाईत पडेल आणि आपलें बोलणें बाबांनीं ऐकलें असल्यास ते त्यासंबंधानें सर्व कांहीं विचारल्याखेरीज राहणार नाहींत, असें मनाला पक्कें वाटूनच कीं काय तो एकेक पाऊल, एकेक पाऊल करतां करतां त्या ठिकाणाहून नाहींसा झाला. मी मात्र मेली वेडी ! बाबांना पाहण्याबरोबर भेदरून जाऊन त्याच ठिकाणीं त्यांच्याकडे पाहात उभी राहिलें. परंतु बाबांचा तो उदास चेहरा पाहून ते कांहीं प्रश्न करतीलसें मला दिसलें नाहीं. यामुळें थोडासा धीर येऊन माझी भीति कमी झाली, व मी हलकेंच जाण्याच्या विचारास लागलें. इतक्यांत बाबांच्या डोळ्यांतून एक पाण्याचा थेंब पट्कन् त्यांच्या गालावर पडलेला मीं पाहिला; परंतु चट्कन् त्यांनीं आपलें उपरणें डोळ्यांशीं नेऊन जणू काय सहजच असें मला म्हटलें, " यमे, काय चाललं होतं बहीणभावंडांचं हितगुज ? " हा प्रश्न बाबांनीं इतक्या सौम्य शब्दांनीं व प्रेमानें विचारला कीं, त्याच्यापूर्वी ते अशा प्रेमानें माझ्याशी असें बोलतांना मीं कधींच ऐकलें नाहीं. मनुष्याच्या अंतःकरणावर दुःखाचे घाव बसले म्हणजे त्याचें अंतःकरण फारच मृदु होतें असें म्हणतात, त्याचा अनुभव मला त्या दिवशीं फारच चांगला आला. खरोखर त्या दिवसापर्यंत त्यांनीं इतक्या प्रेमानें, सद्गदित तऱ्हेनें व सौम्यपणानें आम्हांस असा कधींच प्रश्न केला नव्हता. कधींहि नाहीं. मागें मीं एकदा सांगितलेंच आहे कीं, अलीकडे अलीकडे त्यांचा कठोरपणा अगदीं कमी होत चालला होता; परंतु कठोरपणा कमी होत जाणें आणि वास्तविक मार्दव येणें यांत महदंतर आहे. एखाद्याला रागानें बोलायचें आणि त्याच्याशीं फारसें बोलायचेंच नाहीं, त्या दोहोंत कठोरपणाचा कमी अधिक असा भाग असतो; परंतु प्रेमानें व सौम्य शब्दांनीं बोलायचें

म्हणजे अगदीं कठोरपणा नसून मार्दव असतें. तशी स्थिति बाबांची झाली. पहिल्या-प्रथम त्यांच्या अंगीं कठोरपणा होता; पुढें आई आजारी पडली असतां त्या कठोरपणा-बद्दल वाईट वाटून त्यांचा तो कठोरपणा अगदीं कमी कमी होत चालला आणि शेवटीं जणू काय तिच्या प्राणांबरोबर तो अजिबात नाहींसा झाला. असो.

त्यांनीं तो प्रश्न विचारल्याबरोबर मी अगदीं भांबावून जाऊन, " कांहीं नाही, उगीच आपलीं कांहींतरी बोलत होतें," असे म्हणून पळ काढण्याच्या तयारीत होतें; पण तितक्यांत " पोरी, अशी पळतेस का ? मी कांहीं राग नाहीं भरत ! ये इकडे " असें म्हणाले आणि मला खरोखरच त्यांनीं पकडून माझी हनुवटी कुरवाळीत मला ते म्हणतात, " यमे, तुझ्यावर तिचा जीव फार होता नाहींग ? तुला ती स्वप्नांत दिसली का कधी एक दोन दिवसांत ? " वाचकहो ! तो प्रसंग मला या वेळी इतका कांहीं स्पष्ट आठवतो आहे कीं त्या वेळचें सर्व वर्णन जर देईन म्हटलें तर दहावीस कागददेखील पुरतील कीं नाहीं कोण जाणे ! तोच प्रसंग इतका ध्यानांत राहण्याचें कारण तो माझ्या आयुष्यांतला पहिलाच आणि-शेवटलाहि म्हणा-प्रसंग होता. त्यानंतर माझ्या नशिबीं तसला प्रसंग-म्हणजे बाबांनी इतक्या प्रेमानें बोलण्याचा व कुरवाळण्याचा-कधींच आला नाहीं. तेव्हां तशा त्या अद्वितीय प्रसंगाचें स्मरण फार चांगल्या तऱ्हेनें मला राहावें यांत नवल नाही. बाबांनीं तो प्रश्न केल्यावर आतां उत्तर काय द्यावें, याचीच मला पंचाईत पडली. नाहीं म्हणावें, तर बाबांनीं आपलें बोलणें ऐकिलें असल्यास पंचाईत ! होय म्हणावें, तर सांगण्याची पंचाईत ! असें माझ्या मनांत मोठे काहूर चालले होतें; पण तितक्यांत माझ्या आईच्या खरे बोलण्याविषयीं ताकिदीची आठवण होऊनच कीं काय, मीं एकदम " होय, मला आजच ती दिसली " असें म्हटलें.

" हं ! मग काय म्हणाली ? "

" कांहीं नाहीं " ती म्हणाली, " यमे, तुझंच कसं होईल याची मला मोठी काळजी आहे. "

" आणखी काहीं ? "

" आणखी कांहीं नाहीं, हें असंच कांहीं बोलली. "

पण त्यांचा तो दुसरा प्रश्न त्यांनीं आपला कसातरी केला असावा असें दिसतें. आपण काय विचारतों आहोंत आणि ही काय उत्तर देते आहे, इकडे कांहीं त्यांचें लक्षच होतेंसें दिसलें नाहीं. मी बोलेन तें ऐकून ते आपलें हूं हूं करीत होते इतकेंच. त्यांच्या मनांत काय चाललें होतें कोणास ठाऊक ? परंतु तितक्यांत त्यांनीं, ' बरं तर जा आतां तिकडे,' असें म्हणून मला दूर लोटलें. मग कसची मी उभी राहतें तिथें ? ताबडतोब पळून गेलें. मी दादाकडे गेलें आणि त्याला काय झालें तें सांगितलें. तो मला कांहींच बोलला नाहीं. त्यानें मीं सांगितलेलें ऐकून मात्र घेतलें. इतक्यांत मला तो जें सांगणार होता आणि प्रारंभ करतो तोंच बाबा आले, त्याची एकदम आठवण होऊन मीं त्यांस विचारलें, " दादा, तूं मला काय सांगत होतास तें सांगतोसना ? " पण तो आतां

सांगेना. उलट तो म्हणतो कसा, " यमे, तें मीं तुला सांगू नये असं देवाच्या मनांत दिसतं, अन् म्हणूनच मी अगदीं सांगण्याच्या बेतांत आलों असतांना बाबा तिथें आले." असें तो बोलल्यावर मी काय बोलणार ? आपली त्याच्या पाठीस लागलें इतकेंच. शेवटीं त्याला लबाड, आपमतलबी, माझं तेवढं ऐकून घेऊन आपलं सांगत नाहीं, दम धर; बघ आतां तुला पुनः कांहीं सांगतें का ? आतां मी मुळीं तुझ्याशीं कधीं बोलायचीच नाहीं. तूं इतका लबाडपणा करतोस तर मी तरी कशाला तुझ्याशीं मोकळ्या मनानें वागूं ? " असें नानातऱ्हेनें बोललें; पण तो एक शब्ददेखील बोलला नाहीं. उलट शेवटीं मला इतकेंच म्हणाला, " यमे, तूं थोडीशी मोठी झालीस म्हणजे मग मी तुला सांगेन. मग तूंच म्हणशील, कीं बरं झालं आपल्याला तेव्हांच नाहीं सांगितलं. " पण माझें कुठलें असें समाधान व्हायला ! असो शेवटीं त्या दिवशीं तें मला कळलें नाहींच. मी तशीच चुरमुरे खात बसलें.

आईचे दहा दिवस होऊन गेले. वर सांगितल्या गोष्टीखेरीज दुसरी विशेष कांहीं गोष्ट त्या दिवसांत घडली नाहीं. दहावे दिवशीं कावळा कमा काय शिवतो, याच्याबद्दल मात्र आमच्या घरांत बोलणें झालें व आजी, दुर्गीची आई वगैरे मंडळी " कावळा लवकर शिवायचा कठीण " म्हणून आधींपासून म्हणत होतो; परंतु पिंड ठेवी ठेवी तों अवकाश— तोंच कावळा शिवला. कांहींदेखील पंचाईत पडली नाहीं. मग मंडळी म्हणूं लागली कीं, " नाहीं, तिचा हेतु उरलाच नव्हता, मग कशाला कावळा शिवायची अडचण पडेल ? तिनं आपलं जिंकलन् ; बरी बिचारी सवाष्ण मेली ! " हा कावळा शिवण्याचें काय आहे कांहीं समजतच नाहीं. मला तर त्यांत कांहींदेखील तथ्यांश वाटत नाहीं; कारण खरें म्हटलें, तर दादा, मी आणखी सुंदरी इतक्यांच्याबद्दल आईला अतिशय काळजी होती. त्यांतून माझ्याविषयीं होती कीं नाहीं याबद्दल शंकाच नव्हती. असें असतांना कावळा शिवला, कांहींदेखील वेळ लागला नाहीं. मला तर तें सारें थोतांड वाटतें. असा कावळा पिंडाला शिवायला उशीर लागला म्हणून जर मेल्या माणसांचे हेतु कळते, तर आणखी काय पाहिजे होतें ? त्याचप्रमाणें ज्या ठिकाणीं प्रेत ठेवलें असेल, त्या जागेंतून तें नेल्यावर ती जागा सारवून त्यावर तांदूळ घालून पणती ठेवतात आणि दुसरे दिवशीं त्याजवर कोणाचीं पावलें उमटलीं तीं पाहतात. कां तर ज्या प्राण्याच्या जन्माला तें माणूस जाईल त्याची पावलें त्या तांदळावर उठतात ! काय हा वेडेपणा ! हा वेडेपणा असें मला आतां वाटतें हो; त्या वेळीं नाहीं वाटलें. मला पक्कें आठवतें आहे कीं, आईच्या मरणाच्या दुसरे दिवशीं आम्हीं पावलें पाहिलीं, तीं आम्हांला लोकांनीं म्हटल्या-वरून गाईच्या पावलासारखीं दिसली; आणि आई गाईच्या जन्माला गेली, ती त्याच जन्माला योग्य असें आम्ही म्हणत सुटलों होतों. असो. पण आतां हें सर्व सोडून देऊन व एकदर चवदा दिवसांत जीं काय क्रियाकर्मांतरें व्हायचीं, तीं सर्व झालीं असें सांगून मी आतां पुढील गोष्टीकडे वळतें.

◆ ◆ ◆

## २५ : जगाची रीत

* * * * * * * * * * * * * * *

आतां जी गोष्ट मी सांगणार आहें ती वाचकांनीं वाचली म्हणजे त्यांस अचंबा वाटणार आहे; परंतु त्यांस अचंबा वाटो कीं न वाटो, मी जें जें कांहीं घडलें, तें तें अगदीं स्पष्टपणें सांगणार आहें. मी सांगणार ही गोष्ट माझ्या घरींच घडली असें नाहीं, तर जगांत अनेकवार–किंबहुना दररोज–घडतात अशाचपैकीं ती एक आहे.

माझ्या आईस मरून पुरते पंधरा दिवस झाले नाहीत, तिच्या बाराव्या-तेराव्याला ब्राह्मण जेवून गेले त्यांचीं उष्टीदेखील वाळलीं नाहींत, तों माझ्या बाबांना दुसरें लग्न करण्याविषयीं लोक—विशेषतः आजी आणि आश्चर्याची गोष्ट ही, कीं कांहीं अंशीं आजोबाहि हलके हलके गोष्टी काढूं लागले. आईच्या सुतकांतच याविषयी गोष्ट निघाली होती असें मला वाटतें; परंतु पक्कें स्मरण नाहीं. तें कांहीं असो. परंतु चवदावा दिवस उलटतांच दुसरे लग्न करण्याविषयीं लोक त्यांस उघडपणें आग्रह करूं लागले खरे. पहिल्या प्रथम त्यांच्याजवळ गोष्ट काढली. त्या वेळीं त्यांनीं अर्थानच झिडकारून टाकलें एकदम. परंतु प्रत्यक्ष आजी, " बाबारे, झाली गोष्ट आतां कांहीं परत येत नाहीं. ती असती तर कांहीं आम्हांला नकोशी होतीं असं नाहीं. पण आतां नाहीं तिच्या नशिबीं भोगायचं त्याला काय उपाय ? आतां आपला तूं कर मुकाटयानं " असें म्हणतांना माझ्या कानीं पडलें. पुढें ती बोललीच नाहीं; कारण बाबा तिच्यावर संतापून चडफडत तेथून उठून गेले. पहिल्याप्रथम आठदहा वेळां हा रागावण्याचा प्रकार झाला; परंतु पुढे बाबा रागावणें टाकून, लग्नाची गोष्ट काढील त्याच्याशीं तसें करण्याच्या बरेवाईटपणाबद्दल वादविवाद करूं लागले व कोणी काय म्हणेल, ते नाहीं होय म्हणत शांतपणानें ऐकून घेऊं लागले. इतक्या स्थितीला त्यांचें मन येऊन पोंचण्यास सुमारें दहाबारा दिवस लागले. पुढे काय झालें तें मला कळलें नाहीं; कारण मला लागलीच सासरचे बोलावणें येऊन आठ दिवस सासरीं राहावं लागलें. वाचकहो, नव्या नवरीला लग्न झाल्याबरोबर एकदम आठ दिवस सासरीं ठेवून घेतलेली तुम्हीं कधीं ऐकिली किंवा पाहिली आहे ? किती दिवसपर्यंत तरी नवी नवरी मुलगी गांवांतल्या गांवांत सासर असल्यास सकाळीं जाऊन संध्याकाळीं परत माहेरीं येते; परंतु माझें सासर आणि सासरचीं माणसें अगदीं मुलखानिराळींच होतीं. असो. मी सासरीं असल्यामुळें मधल्या आठ दिवसांत काय झालें, मला कांहींच कळलें नाहीं; मात्र मी नववे दिवशीं घरीं येतें, तो दादा मला म्हणतो, " यमे, आपल्याला नवी आई होणार बरंका ? " हे शब्द उच्चारतांच त्याचा चेहरा कसा झाला होता हें मनांत आणलें म्हणजे मला अजून कसेंसेंच होऊन जातें. तो सांगतो आहे ती गोष्ट आनंद वाटून सांगतो आहे, कीं खेद वाटून सांगतो आहे, त्याचा आवाज कुचेष्टेचा आहे कीं अगदीं साधेभोळेपणानें तो बोलतो आहे, मला कांहींच उमगेना. इतकेंच नव्हे, तर ती

बातमी ऐकून मला त्या वेळीं आनंद झाला कीं खेद झाला, बरें वाटलें कीं अतिशय वाईट वाटलें, मला कांहींच सांगतां येईना. बरे वाटलें म्हणावें तर मला माझ्या आईची आठवण होऊन रडूं आलें. आणि तें कांहीं केल्या आवरेना, हें मला स्पष्ट आठवतें आहे. मला वाईट वाटलें म्हणावें तर आज या असल्या दुसऱ्या लग्नाबद्दल जें काय माझ्या मनाला वाटतें, तसले विचार त्या वेळीं माझ्या मनांत आले नाहींत आणि येण्याचा संभवहि नव्हता. पुढें दादाचें व माझें बोलणें झालें त्या वेळीं दादाला काय वाटलें हें मला कळून आलें. त्याला मात्र बरें वाटलें नाहीं हें खास; आणि मी सासरहून घरीं आलें नाहीं तोंच मला गांठून त्यानें सांगितलें तें निव्वळ कुचेष्टेनें होतें. असो. परंतु मध्यंतरीच्या आठ दिवसांत कांहींतरी होऊन आम्हांला नवी आई येण्याचें ठरलें खरें. आमची नवी आई पाहून मुहूर्त वगैरेदेखील ठरला !

आई वारल्याबरोबर बाबांना जें दुःख झालें, त्यांचा एकंदर आविर्भाव कसा होता हें मनांत आले, म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें, कीं बाबा लग्न करण्यास तयार झाले कसे ? परंतु आज आमच्या या अशाश्वत जगांत जे जे प्रकार घडत आहेत, ते ते पाहिले म्हणजे तें आश्चर्य वाटावें कां, याबद्दलच मला आश्चर्य वाटूं लागतें. दृष्टीच्या आड झालें, कीं मग गेलेंच म्हणून समजावें. शाश्वती हा शब्द या आपल्या विश्वांत नाहीच असें म्हणावें लागतें, आणि तें खरेंहि आहे. प्रेमाची शाश्वती तरी धरणार कशी ? वाचकहो, माझी आई किती दूरदर्शी होती, याचा या वेळीं मला फार चांगला अनुभव आला. कसा तो पाहा.

मी सासरहून माहेरीं आलें त्या वेळीं दादा मला भेटल्याबरोबर काय बोलला, हे मीं आतां तुम्हांला सांगितलेंच. तेच दिवशी त्याच्या मनांत काय वाटलें असेल ते असो. त्यानें मला गांठून एकीकडे नेलें आणि तो कसेंसेंच तोंड करून सद्गदित कंठानें म्हणाला, "यमे, हें असं होणार हें आईनं मला ते दिवशी रात्रींच सांगितलं होतं बरं ! ती जें मला म्हणाली तें हें : ' गणू , मी आतां थोडेच दिवसांत तुम्हांला सोडून जाणार. तुम्ही अजून लहान आहां. यमीचं लग्न माझ्यादेखत झालं तर ठीकच आहे; नाहीं झालं तरी तें लवकरच होईल, तें कांहो राहात नाहीं; पण इकडे बघ, मी मेलें म्हणजे पुढें काय होणार हें दिसतंच आहे. तिकडचा स्वभाव कसा आहे हें तुला आतां कळतंच आहे. माझ्या जागीं तुम्हांला दुसरं कोणीतरी—' यमे, इतकें बोलून ती थोडीशी घुटमळली. तिच्यानें पुढें बोलवेना. तेव्हां कांहीं वेळ थांबून व डोळे पुसून ती मला पुन्हां म्हणाली, ' आतां तूं मात्र त्या पोरांना नीट कर. तूं मोठा झालास म्हणजे त्यांचा अव्हेर करूं नको. देवाच्या कृपेनें दोघींना सासरं चांगलीं मिळालीं तर चांगलंच होईल— पण—पण—पण यमीचं कांहीं ठीक होईलसं वाटत नाहीं. सासूबाईचं कांहीं कुठं चालायचं नाहीं. त्या कांहीं—' इतकें बोलून पुनः ती थांबली व लागलीच ' कांहीं नाहीं आतां जा, जाऊन नीज जा. सांगितलेलं बरीक ध्यानांत धर म्हणजे झालं, ' असें बोलून

बोलेनाशी झाली. यमे, तिच्या बोलण्याचा अर्थ काय होता समजलीसना? त्याचा आतां प्रत्यक्ष अनुभव येतो आहे." दादाचें हें बोलणें ऐकल्याबरोबर माझ्या अंतःकरणांत एकदम उजेड पडल्यासारखें झालें. कारण दादाला ज्या रात्रीं आईनें वरील गोष्ट सांगितली, त्याच रात्रीं तिनें मलाहि उपदेश केला, त्या वेळीं मलाहि "यमे, मी मेलें म्हणजे तुला माहेर नाहींसं झालं म्हणून समज" असें म्हणाली होती. त्याचप्रमाणें दादास ' अरे वेड्या, मी मेल्यावर पुढें काय होईल आणि काय नाहीं, याचा कांहीं नेम आहे का ?" असें म्हणाली, आणि मरतांना बाबांशीं बोलतांना "मी तर आतां जाणार. पुढें काय व्हायचं तें होईलच !" असे उद्गार काढले व आणखीहि पूर्वी एकदोन वेळां "पुढें काय होणार तें आपलं आपल्याला दिसतंच आहे" असे उद्गार तिनें काढले होते. त्या सर्व उद्गारांचा अर्थ काय हा मला आतां कळून आला. होय; आपण मेल्यानंतर दुसरें लग्न होणार, आणि नंतर सासूबाईचें कांहीं न चालून, शेवटीं आपल्या पोरीची व पोराची कांहीं ठीक व्यवस्था राहणार नाहीं. त्याचप्रमाणें सासूबाईची दशा फार वाईट होईल, असें आपले तिला स्पष्ट तऱ्हेनें वाटलें होतें, हें त्या तिच्या उद्गारावरून अगदीं उघड दिसलें. त्यांतूनहि माझी काळजी तिला फार दिसली. ती कां कांहीं कळेना. असो.

वर सांगितल्याप्रमाणें दादानें मोठ्या दुःखानें रडत रडत मला ते आईचे उद्गार सांगितले, तेव्हां मलादेखील फार वाईट वाटलें. तथापि खरं पुसाल तर बाबा लग्न करणार यांत खरोखर इतकें वाईट वाटण्याजोगें काय आहे, हें मात्र मला मुळींच कळेना. आपलें दादा वाईट म्हणतो म्हणून मीहि म्हणावें अशासारखे मला झालें. चाळीसबेचाळीस वर्षांच्या गृहस्थानें बारातेरा वर्षांच्या पोरीशीं लग्न आणि तेंहि पहिल्या बायकोचीं एकदोन जाणतीं मुलें असतांना करावें, हें आज मला अत्यंत निंद्य वाटतें, तसें त्या वेळीं मुळींच वाटलें नाहीं; कारण समजूतच तितकी; परंतु आज?--पण तें असो. एकंदरीत दादानें तें मला सांगितलें, आणि तेथून सहा कीं सात दिवसांनींच आमची तेरा वर्षांची आई आमच्या घरांत आली. लग्न कसें झालें, कोठें झालें, याबद्दल आतां मी कांहींच लिहीत नाहीं; कारण त्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. लग्न झालें एवढें सांगितलें कीं पुरें. ती आमची तेरा वर्षांची आई अगदीं गरिबाची होती. तिला बाप नव्हता. आई आपल्या मोलमजुऱ्या करून पोट भरीत असे. मुलगी मोठी असल्यामुळें पाहिल्याबरोबर पसंत होऊन लग्न ठरलें आणि उरकलें व आमची नवी आई आमच्याबरोबर खेळायला आली !

बिजवराच्या लग्नाच्या वेळीं मुलीच्या मोठेपणाखेरीज कांहीं पाहिलें जात नाहीं, असें म्हटलें तर फारसा प्रत्यवाय येईल असें मला वाटत नाहीं. निदान मला आज दुसरीं लग्नें केलेले जितके ठाऊक आहेत, तितक्या सर्व ठिकाणीं तरी अशीच स्थिति होती. मुलीचें कुलशील, चालचलणूक न पाहिल्याकारणानें आणि प्रथमपासून तिला

'बिजवराची' 'बिजवराची' म्हणून तिच्या मनावर कांहीं निराळेच ग्रह उत्पन्न केल्यामुळें जे परिणाम व्हावयाचे, ते सर्व परिणाम आमच्या घरीं झालेच. कारण— पण नको. मी या पुढल्या गोष्टी आधींच सांगण्यापेक्षां ओघाओघानें जसजसे प्रसंग आले, तसतशा सांगत जाव्या हें बरें.

तेव्हां सध्यां येथें एवढेंच सांगितलें म्हणजे पुरें कीं बाबांचें लग्न होऊन मला नवी आई आली. नवी आई आल्यानंतर थोडेच दिवसांत आजोबा आपल्या गांवीं गेले. आजी मात्र सुनेला वागविण्यासाठीं पुण्यासच राहिली. अशी सर्व स्थिरस्थावरता झाल्यानंतर मी बरेच दिवस सासरीं होतें.

या वेळीं सर्व गोष्टीं मनांत आल्यामुळें आतां माझें मन अतिशय उद्विग्न झालें आहे, तेव्हां पुढील हकीकत लिहिण्याचें ठेवून क्षणभर स्वस्थ बसतें.

◆ ◆ ◆

## २६ : माझ्या सासरची मंडळी

* * * * * * * * * * * * * * *

माझ्या सासऱ्यां—म्हणजे खरोखर मामेसासऱ्यां—ची एकंदर तऱ्हा होती, ती कांहीं विलक्षण होती. तिचें आज वर्णन करावें असें माझ्या मनांत आहे.

माझ्या मामेसासऱ्यांचें कुटुंब पुष्कळच मोठें होतें; आणि त्याप्रमाणें एकंदरीत थाटानें चाललेंहि होतें; माझे मामेसासरे दोघे. दोघांसहि चांगल्या नोकऱ्या होत्या. धाकट्या सासऱ्यास दीडशे रुपये पगार होता आणि वडिलांस साठ की पाऊणशें होता. आजेमामंजी वारून बरेच दिवस झाले होते, तेव्हां आण–ने करणें, इतर सर्व व्यवस्था ठेवणें हें सर्व प्रकारांनीं काकांकडे असे–हेच ते वृद्ध गृहस्थ–जे मला पाहायला आले होते ते.—हे आमचे चुलत आजेसासरे. यांचा स्वभाव असा कांहीं तडफड्या आणखी त्रासिक असे, कीं कांहीं पुसूं नये. म्हातारा जेवायला बसला म्हणजे कधीं संतापल्याखेरीज राहायचा नाहीं. जो काय राग, जो काय संताप, तो त्या वेळीं यायचा; आणि जेवण्याविषयीं भारी कुरकूर. ती आज अमुक चटणीच वाटली नाहीं; अमक्या भाजीला मीठच फार लावलें; तमकी भाजी इतकी पातळ करावयाची नव्हती; अमक्यांत अमुकच झालें, तमुकच नाहीं अशी त्यांची एकसारखी कटकट! मला असा एक दिवस खरें पुसाल तर आठवत नाहीं, कीं आज म्हणजे साऱ्या दिवसांत मामंजी अगदीं कांही बोलले नाहींत. कशाना कशाबद्दल तरी त्यांची कुरकूर असायचीच. त्याच्या अगदीं उलट स्वभाव होता त्यांच्या भावजयीचा, म्हणजे माझ्या सख्ख्या आजेसासूचा. त्या त्रास म्हणून कधीं कुणाला द्यायच्या नाहींत, पण अमुक एक गोष्ट करायची असें म्हटलें,

म्हणजे मग आपला हेका कधीं सोडायच्या नाहींत. जें आपण म्हणतील तें स्थापन करतील. एकदा कोणाचें नांव घ्यावयाचें नाहीं असें म्हणाल्या, की मग ते वज्रलेप झालेंच असें समजावें. त्याशिवाय आणखी एक चमत्कारिक खोड त्यांना असे, ती ही, कीं लहान पोर असो, थोर असो, कोणी कुठें काय जें करीत बोलत असेल, तें आडून ऐकायचें आणखी आडून पाहायचें आणखी मग तें ध्यानांत धरून केव्हांना केव्हां असा त्या माणसाला टोला द्यायचा, कीं कांहीं पुसूं नये; त्यानें अगदीं जीवच द्यावा जाऊन ! या कुचकें बोलून माणसाला दुखवण्याच्या त्यांच्या गुणामुळें जितका माणसांना त्रास होत असे, तितका आजेमामंजीच्या कुरकुरीनें आणखी कटकटीनें होत नसे म्हटल्यास चालेल; परंतु या अवगुणाखेरीज दुसरा कोणताहि अवगुण त्यांच्या अंगीं नसे. त्यांचें अंतःकरण अतिशय मायाळू; माणूस एखाद्या दुखण्याबिखण्यानें पडलें, तर त्यांच्या जिवाचा अगदीं थरकांप होऊन त्या अगदीं प्राण टाकायच्या. कोणाला अधिक, कोणाला उणें हें त्यांच्याजवळ कधीं नसायचें.

आमचे थोरले मामेसासरे-ज्यांना पगार थोडा होता ते-कोणत्या तऱ्हेचे माणूस होते हें मला अजून कांहीं कळलें नाहीं. त्यांच्याइतका खोल, कुरठा, कुचका, लहरी असा मनुष्य यावज्जन्मांत मीं कधीं पाहिला नाहीं. त्याचप्रमाणें आपमतलब म्हणजे त्यांच्या ठिकाणीं नंबर एकचा, त्यांचें गूढ आहे काय आणि नाहीं काय, हें कळणें मोठें दुरापास्त ! ते इतके लहरी होते, कीं आतां जें त्यांच्या मनांत येईल, तें घटकेनें मुळींच नाहीं, त्या वेळीं दुसरेंच ! आणि बोलण्यांत बोल इतका नाहीं कीं कांहीं पुसूं नये. आतां जें बोलतील त्याच्याशीं पुढच्या बोलण्याचा मेळ कधींच बसायचा नाहीं. द्रव्यलोभ आणखी चिकूपणा तर इतका, कीं त्याला पारावार नाहीं. आपला पगार येईल तो आणि सटरफटर प्राप्ति होईल ती, – ही असली प्राप्ति त्यांना फार असे – सारी झाडून बँकेंत टाकलेली, नाहींतर व्याजीं लावलेली, घरांत खर्चण्याला कधीं कवडी देतील तर शपथ ! आपलें, आपल्या बायकोचें जितकें म्हणून निघेल तितकें घरांतून काढायचें. बायकोचे दागिने, पोरांचे दागिने, सगळे आपल्या निजायच्या खोलींत पेटींत घालून ठेवायचे; दुसऱ्या कोणावर यत्किंचित् विश्वास असेल तर शपथ ! तीच त्यांची बायको म्हणजे अगदीं त्यांच्या उलट ! त्या गृहस्थाच्या अंगांत जितके अवगुण तितके सारे तिच्यांत गुण; तिच्याइतकी गरीब व सालस बायको दुसऱ्या कोठेंहि असेल असें मला तर कांहीं वाटत नाहीं. नाहीच. त्या माउलीच्या तोंडून कधीं कोणाला उणा शब्द म्हणून निघाला नाहीं. आतां माणूस आहे, कधीं एखादे वेळ राग येत नसेल का ? पण तो गिळून जाऊन मूग खाण्याची तिची हातोटी जबर ! एक दिवसदेखील मीं तिला कधीं कोणावर तोंड टाकतांना पाहिलें नाहीं. घरांत साऱ्याजणी, आमच्या सासूबाईसुद्धां म्हणत कीं, ती फार कुरठी आणि खोल मनाची आहे. पण मला तसें वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे तर तशी ती नाहीं, अशाबद्दल माझ्या मनाची पक्की खात्री आहे. तिचा हा अतिशय गरीब स्वभाव आणि नवऱ्याचा तो तसला स्वभाव यांचें कसें

जुळत असे याचें कोणास आश्चर्य वाटत असेल; पण तें कसें काय जुळत असे याबद्दल माझ्या पुढल्या चरित्रांत कळेल तिच्या गरीब स्वभावामुळेंच–आणि ती थोडीशी कुरूप होती यामुळें-तिला जे हाल सोसावे लागले, ते कांहीं अनन्वित होते. असो.

धाकटे मामेसासरे–ज्यांना पुष्कळ पगार होता ते आमच्या थोरल्या मामेसासूबाईची हुबेहुब प्रतिमा. बिचारी बहीणभावंडें असतीं तर अगदीं शोभतीं ! दोघांचा स्वभाव अगदीं एक. बिचाऱ्याला इतका पगार होता, परंतु अमुक हें असें कां केलें, आणखी अमुक कां केलें नाहीं, असा चकारशब्द कांहीं तोंडांतून निघाला नाहीं. तुम्ही घरांत कांहीं करा, नका करूं, महिन्याच्या महिन्याला चुलत्यांच्याजवळ शंभर रुपये आणून द्यायचे, आणखी पांच रुपये आईला देवाधर्माला कशाला वाटेल त्याला द्यायचे. बाकी रुपये कांहीं कांहीं कारणांना त्यांना लागत, ते ते आपल्याजवळ सांगून सवरून ठेवीत त्यांची त्यांच्या भावजयीवर आणखी बहिणीवर म्हणजे माझ्या सासूवर फार भक्ति असे त्या दोघींनाहि ते दोन दोन रुपये दरमहा देत. थोडया थोडक्यांत जें आपल्या हातून होईल तें करून सगळ्यांना संतोष द्यावा आणि साऱ्यांनीं आनंदानें राहावें हा त्यांचा मोठा हेतु ! आणि हा हेतु साधण्यासाठीं ते सर्व प्रकारांनीं झटत. आई बोलूं लागली, आईला, बायको बोलूं लागली, बायकोला, वडील भाऊ बोलूं लागला, त्याला, जो कोणी भांडण उपस्थित करूं लागेल त्याला स्थिरस्थावर करून ते सुखानें दिवस जावे म्हणून खटपट करीत; परंतु घरांतील स्थिति अशी होती कीं, त्यांना कांहीं कधीं खरें सुख झालें नाहीं; तथापि तो गृहस्थ कधीं दुर्मुखलेला नसे; पण त्यांची बायको–माझी धाकटी मामेसासू–अग बाई ग ! तिच्यासारखी आकस्ताळी बायको जगांत कोठें सांपडेल कीं नाहीं. कोणास कळे. नवऱ्याला मोठा पगार, याबद्दल तिला असा डौल होता, कीं कांहीं सुमार नाहीं. श्रीमंतीचा ताठा ताठा म्हणून जो म्हणतात, तो मूर्तिमंत तिच्या अंगीं झुलत होता. त्या नटायच्या काय, मुरडायच्या काय, माणसाला टाकून किती बोलायच्या, नवऱ्याबद्दल काय वेडें वेडें बोलायच्या, कधीं कधीं तर त्याच्या तोंडावर तुम्हांला कांहीं समजत नाहीं. असें त्यांनीं म्हणावें. नवऱ्याच्या पगारामुळें तिला अगदीं अस्मान ठेंगणें झालें होतें. ती हवें त्याला हवें तसें टाकून बोले. केव्हां केव्हां सासूलासुद्धां. थोरल्या दिराबद्दल तर काय बोले आणि काय नाहीं याचा नेमच नाहीं. तिचा स्वभाव इतका विलक्षण असे, तरी पण मामंजींचा स्वभाव असा होता कीं, ते आपलें सारें हसण्यावारी घालवीत, कधीं तिला बोलत नसत. पण तिच्या बोलण्यानें आपला मार्गहि सोडीत नसत. माझें लग्न होण्यापूर्वी वेगळें निघण्यासाठीं तिनें नानातऱ्हेच्या खटपटी केल्या, परंतु तिची डाळ कांहीं त्यांनीं शिजूं दिली नाही. आमच्या सासूबाईंना त्यांनीं नानातऱ्हेनें बोलावें, त्यांचा हवा तसा पाणउतारा करावा, परंतु मामंजींनीं येऊन त्यांचें समाधान करावें व 'तुला मीं आणलं, तूं आपली मजकडे पाहून दिवस काढ; दुसऱ्या कोणीं कांहीं जरी म्हटलं, तरी यत्किंचित् देखील मनावर घेऊं नकोस, असें सांगावें.

परमेश्वराचा नेमानेम तरी कसा असतो तो पाहा ! गोपाळमामंजी (धाकटे मामंजी) स्वभावानें अतिशय चांगले, तर त्यांच्या गळयांत राधासासूबाईसारखी आकस्ताळी बायको पडली; आणि शंकरमामंजी तसल्या वाईट स्वभावाचे तर त्यांच्या नशिबीं आमच्या उमासासूबाईसारखी सत्त्वशील बायको होती. देव कधीं योग्य जोडे जमवीत नाहीं असें म्हणतात, तें अगदीं अक्षरशः खरें आहे. आम्ही नेहमीं म्हणत असूं, कीं गोपाळमामंजींना उमासासूबाई आणखी शंकरमामंजींना राधासासूबाई पाहिजे होत्या. पण तसें कसे व्हावें ? तसें झालें असतां सर्व गोष्टी ठीक झाल्या असत्या; आणि तशा तर जगांत व्हायला नको आहेत. असो.

आतां आमच्या खुद्द सासूबाईंच्या स्वभावाचें वर्णन करावयाचें आहे. त्यांचा स्वभाव इतका साधाभोळा होता कीं कांहीं पुसूं नये. सगळ्या घरांत जें काय काम पडेल तें यांनी, आणखी यांच्या उमावहिनींनीं करून टाकण्याचा विडाच उचलला होता. करूं का नको हें मुळीं नाहींच. बरें, अमका हा श्रीमंत त्याचें काम आधीं आणि काळजीपूर्वक करावें, तो गरीब त्याचें करूं नये, हा प्रकार कांहीं नाहीं; इथून तिथून एक मार्ग. कोणी कांहीं म्हणो, बोलो, आली वेळ पार पाडून न्यायची. पहाटे चार वाजल्यापासून उठून ज्या त्या कामाला लागत, त्या संध्याकाळीं आठ वाजतां पाठ टेकीत, आणि यांत मदत त्यांच्या उमावहिनींची. त्या दोघींची मोठी गट्टी असे. त्यांना आंत एक आणि बाहेर एक असा प्रकारच नव्हता. कोणाचें कांहीं वावगे दिसलें की त्या त्याला स्पष्ट बोलल्याच म्हणून समजावें. मग तो कोण, काय, याचा मुळींच विचार नाहीं. याच त्यांच्या स्वभावामुळें त्यांस पुष्कळदां त्रास होत असे. इतकी एकंदरीत वडील मंडळी झाली.

आतां छोटेखानी मंडळींत वारूवन्सं, बनूवन्सं, धोंडूभावजी वगैरे मंडळींच्या स्वभावाचें वर्णन याच्यापूर्वी मीं दिलेंच आहे, तेव्हां तें अधिक देण्याची कांहीं जरूर नाहीं.

वर सर्वच मंडळींच्या स्वभावाचें वर्णन दिलें आहे, तें अर्थातच अगदीं सविस्तर नाहीं. प्रत्येकाच्या स्वभावाचें दिग्दर्शन केलें आहे. याहून विशेष माहिती आतां पुढें वेळोवेळीं ज्या गोष्टी मी सांगेन, त्यांत ही सर्व मंडळी येणारच असल्यामुळें, त्या त्या वेळच्या यांच्या वर्तनादिकांवरून होणारी आहे. राहतांपैकीं तिकडचा स्वभाव कसा होता हें सांगण्याचें राहिलें; पण त्याच्याकरितां ही जागा योग्य नव्हे आणि ही वेळहि योग्य नव्हे. आतां तें सर्व माझ्या डोळ्यांसमोर दिसत असल्यामुळें मी येथेंच संपतें घ्यावें हें बरें.

◆ ◆ ◆

## २७ : तीर्थरूपांची पढवणी

* * * * * * * * * * * * * * *

'जिला नाहीं सासू, तिला बारा सास्वा' अशी एक आम्हां बायकांत म्हण आहे. ही मला स्वतःला फारच चांगली लागू होती. कारण मला सख्खी सासू जरी होती तरी ती असून नसून सारखीच होती. कारण ती स्वतः जरी अत्यंत सौम्य होती, तरी तिचें घरांत यत्किंचितहि चालत नसल्यामुळें ती असून नसून सारखीच, असें होतें. मला कोणीं बोललें तर त्याबद्दल त्यांच्या मनाला वाईट वाटलें तरी बोलण्याची चोरी! बोलणार कोणाला? आणि बोलणार काय? धाकट्या मामेसासूबाई त्या प्रकारच्या; आजेसासूबाई या प्रकारच्या; गरीब काय त्या माझ्या सासूबाई आणखी थोरल्या मामेसासूबाई, पण त्या दोघींचेंहि घरांत कधीं कांहीं चालत नसे; आणि एवढें एक बरें होतें, कीं कोणत्याहि गोष्टींत दोघीहि कधीं कांहीं बोलत नसत, कोणी तिकडे कांहींहि करो आपण बऱ्या की आपलें काम बरें. आमच्या सासूबाई बोलत नसत, त्यांत कांहीं नवल नव्हतें; कारण त्या बोलून चालून दुसऱ्याच्या घरीं होत्या. तेव्हां त्यांना सत्तेनें बोलतां यावें कसें? त्यांतून सर्व मंडळी जर चांगली–गोपाळमामंजींसारखी किंवा उमासासूबाईसारखी असती, तर मग हरकत नव्हती, परंतु मंडळी पडली तऱ्हेवाईक, तेव्हां त्या बोलत नव्हत्या हेंच फार चांगलें आणि साहजिकच होतें. उमासासूबाईंची मात्र अवस्था विशेष कठीण; कारण त्यांना सत्ता करण्याजोगें असून त्यांची कोणावरहि सत्ता चालत नसे. त्यांच्या पोटचीं मुलें – बनूवन्सं, वारूवन्सं, आणखी धोंडूभावजी – एकदेखील त्यांच्या मनाप्रमाणें वागत नसे. सगळीं बापाच्या वळणावर गेलेलीं. शंकरमामंजी लाडानें, कधीं लहर लागल्यास आपल्या बायकोस आवडत्या नांवानें हाका मारीत. तें आवडतें नांव काय तर 'वेडी.' सर्व पोराबाळांच्या देखत तिला 'ए वेडे' म्हणून हाका मारायच्या, आणि धोंडूभावजी अगदीं लहान होते तेव्हांपासून त्यांनीं त्याला आपल्या आईला 'वेले' असें म्हणण्यास शिकविलें होतें; यामुळें तें कारटें अजूनहि त्यांना 'वेडे' म्हणून हाका मारीत असे; परंतु त्या माउलीला त्याला रागें भरण्याचीदेखील चोरी. एक दिवस त्याला त्यांनीं (उमासासूबाईंनीं) कायसें काम सांगितलें आणि तो 'माझा अडला आहे खेटर काम करायला वेडीचं!' असें म्हणून पळून गेला; त्याबरोबर त्यांना संताप येऊन त्यांनीं त्याला धरून आणून त्याचा सडकून कान पिळून दोन तोंडांत दिल्या. त्यानें मोठ्यानें भोकाड पसरून त्यांस "वेडी, मारकी, आईटली" असा शिव्यांचा वर्षाव चालवून हातपाय व डोकें आपटण्याचा एकसारखा सपाटा चालविला. तितक्यांत तिकडून तीर्थरूप आले आणि त्यांनीं आपल्या बचड्याचें काय गाऱ्हाणें होतें तें ऐकून, त्याच्या देखत बायकोला नाहीं नाहीं त्या शिव्या देण्यास आरंभ केला. त्या शिव्या ऐकूं नयेत म्हणून कदाचित् ती दूर कोठेंतरी जाईल, एवढ्याकरितां

तिला आणून समोर उभें केलें. सर्व प्राण्यांत अत्यंत सहनशील अशा ज्या आम्ही स्त्रिया, त्या जरी झालो, तरी आमच्या सहनशीलतेला तर काय परंतु उमासासूबाईसारख्या सहनशीलतेच्या मूर्तींच्या सहनशीलतेलादेखील कांहीं मर्यादा आहेच. फार फार अति झालं, तेव्हां उमासासूबाई अगदी रडायला लागून "पोरानंदेखील का मला असं बोलायचं ?" असें त्या म्हणाल्या.

"अलबत ! तू आहेसच तसली. पोर म्हणेल नाही तर सोडील का ? एकदा नाही हज्जारदा म्हणाव त्यानं." हें त्यावर शंकरमामंजींचें उत्तर ! बरें एवढें उत्तरच देऊन स्वारी थांबली असें नाहीं हो ! आपल्या चिरंजीवाकडे लागलीच वळून म्हणतात, "धोंड्या, तूं असंच बोलत जा रे. इचा एवढा दिमाख कशाला पाहिजे ?"

आतां काय म्हणतां ? बोला, अशा तऱ्हेचें सुशिक्षण मुलांना मिळूं लागल्यावर मुलांच्या वर्तणुकीबद्दल वाईट कां वाटावें ? त्यांच्या मनांत आईबद्दल अनादरबुद्धि होऊन त्यांची त्यांनीं क्षणोक्षणीं अवमानना कां करूं नये ? बरें, आतां सांगितलेल्या हकीकती-नंतर चवथेच दिवशीं काय चमत्कार झाला तो पाहा. ते दिवशीं सकाळीं असा प्रकार झाल्यावर उमासासूबाई अर्थातच कोणाशीं फारशा बोलेनातशा झाल्या. चार दिवसांत त्या नवऱ्याशीं एक अक्षरदेखील बोलल्या नाहींत, असें दिसतें. दिसतें म्हटलें याचें कारण असें आहे. मला आजेसासूबाईंनीं पिठी चाळण्यासाठीं कोठीच्या खोलींत बसायला सांगितलें होतें, म्हणून मी तेथें जाऊन व तिकडची अभ्यासाची जागा पलीकडच्या खोलींत असल्यामुळें जातां येतां दिसेल म्हणून आपली दार लोटून पिठी चाळीत बसलें होतें. इतक्यांत बाहेरच्या खोलींत, केव्हां कोणास न कळे, उमासासूबाई येऊन निजल्या. त्यांचें सकाळपासून कपाळ दुखत होतें. थोड्याच वेळांत वाटतें शंकरमामंजीहि आले. मी आपली पिठी चाळण्याच्या नादांत होतें. दार लोटलेलें असल्यामुळें मी आंत आहे हें त्यांना कळलें नसावें असें दिसतें. इतक्यांत पुढील शब्द माझ्या कानीं पडले.

"कां ? आज चार दिवस अबोला झाला वाटतं ? बोला, बोला आमच्याशीं ?"

सासूबाईंच्या तोंडून एक नाहीं आणि दोन नाहीं. तेव्हां पुनः शंकरमामंजी म्हणतात :

"असं काय आम्हीं आपलं घोडं मारलं ? परवां बोललों तेंच ना ! त्यांत काय आहे ? रागाच्या सपाट्यांत माणूस आहे, बोलतंच आहे. तें एवढं मनांत धरून अगदीं अबोला धरायचा हा कुठला न्याय बोआ ! बोला, बोला !" इतकें बोलून मामंजी अगदींच सासूबाईंच्या जवळ गेले. दार पक्कें लोटलें नसल्यामुळें मला हें दिसत होतें. वरील बोलणें कानीं पडेपर्यंत आपण येथें बसूं नये असें माझ्या मनांतदेखील आलें नाहीं. परंतु ते त्यांच्याजवळ गेल्याबरोबर मला असें झालें कीं आतां करावें तरी काय ? उठून चालतें व्हावें तर त्यांच्या अंगावरूनच गेलें पाहिजे. नुसतें दार घट्ट लावावें, तरी त्यांना कळणारच.

आणि त्यांना कळलें, तर मग तें त्यांचें तोंड ! काय बोलतील आणि काय नाहीं ! हेंच जर धाकटे मामंजी असते, तर मी ताबडतोब तेथून निघून गेलें असतें; परंतु आतां मी निघून गेलें तरी ' आतांपर्यंत होतीस का ? ' असेंच कांहींतरी काढून ते हवें तें बोलतील अशी भीति वाटून मी जेथल्या तेथेंच गप्प बसलें. माझें मनच गोंधळून गेलें. याप्रमाणें माझ्या मनांत यत्किंचितहि नसतां मला त्यांचें बोलणें ऐकावें लागलें. परंतु मला त्याबद्दल पुढें फार पश्चात्ताप झाला. ते बोलतील तें बोलणें टाळण्यासाठीं म्हणून मी जेथल्या तेथें बसलें; परंतु हें आपण फारच अनुचित केलें, असें मला त्या वेळीं वाटलें आणि अजूनहि वाटतें आहे. असो.

तिकडे मामंजी सासूबाईंच्या उशाशीं जाऊन बसून " तुला काय होतं आहे ? कपाळ का दुखतं आहे ? मी चेपूं का ? मेंथॉल आणूं का गोपाळापासून ? " इत्यादि प्रश्न विचारून खरोखरीच त्यांचें कपाळ चेपूं लागले. चार दिवसांपूर्वी धोंडूभावजींचा कैवार घेऊन बायकोला अद्वातद्वा बोलत सुटलेले मामंजी हेच का ? असा माझ्या मनाला संशय येऊं लागला. ते दिवसाची ती मुद्रा कोणीकडे ? आणि आज हा प्रकार कोणीकडे ? कशास कांहीं मेळच नव्हता. इतक्या विनवण्या चालल्या असतांना सासूबाई एक शब्द-देखील बोलेनात. ते कपाळ चेपूं लागले, तेव्हां त्यांनीं त्यांचा हातमात्र एकीकडे केला; पण ते कसचे ऐकतात ? ते बळेंच कपाळ चेपून म्हणतात, " आम्ही आपल्या पायां पडतों, क्षमा मागतों, मग तर झालंना ? पुनः आम्ही एक शब्ददेखील बोलणार नाहीं. आतां काय तुमचं बोलणं राहिलं ? त्या धोंड्याला शिक्षा करतों, मग तर झालंना ? अग ! पोर बोललं म्हणून झालं काय ? मी जरा त्रासलों होतों. पोराचं रडणं ऐकून थोडं डोकं फिरलं. त्याच्यावर रागवायचं तें तुझ्यावर रागावलों, बाकी त्या रागांत अर्थ नाहीं कांहींच. उठा, उठा, आतां आम्ही आतां अगदींदेखील तुम्हांला बोलणार नाहीं. " इतकें ते बोलले व अगदीं गयावया करूं लागले, परंतु त्या चकार शब्ददेखील बोलेनात. उलट त्यांनीं आपलें तोंड मात्र दुसरीकडे वळविलें. यांनीं आपला – आतां मी त्याला नांव तरी काय देऊं ? – वडील पडले, नाहीं तर ' लघळपणा ' म्हटलें असतें – चालविलाच होता. मला त्या वेळीं खरोखर त्यांची कींव येऊन सासूबाईंनीं इतका निष्ठुरपणा करायचा नव्हता असें वाटलें. असो. शेवटीं ते कंटाळले आणि म्हणतात, " मी इतका वेळ तुझ्या विनवण्या करीत असतांना तूं कांहींच बोलत नाहींस, तुला काय म्हणावं ? लोक चांगली चांगली म्हणून तुझी स्तुति करतात तें अगदीं उगीच. हें बघ, ए, मी तुझ्या खरोखर पायां पडतों आतां. मग तरी द्रव येईल ? " असें म्हणून ते खरोखरीच उठले आणखी त्यांच्या पायांजवळ गेले, त्याबरोबर त्या उठल्या आणखी ' हें काय हें ? " असें म्हणून उभ्या राहिल्या, तेव्हां– " मग कां बोलेनास तर मग ? हजारदा क्षमा मागतों म्हटलें तरी बोलेनास, तेव्हां पायां पडून पाहावं म्हटलं. "

" हो; आधीं खेटरं मारीत जावीं आणखी मग पायां पडावं. त्यापेक्षां दोन्ही नाहीं केलीं तर ? "

" वेळेवेळेप्रमाणें दोनहि करावी लागतात. बरें पण, खेटरे मारणारा मी आणखी पायां पडणारा मीच ना ? "

सासूबाई कांहींच बोलल्या नाहीत. तेव्हां मामंजी पुनः " बरं, पण आतां झालंना त्याचं सगळं प्रायश्चित्त ? तुझ्यापुढें त्या धोंडयाला आणून झोडून काढूं का ? मग तर कांहीं नाहींना तुझं म्हणणं राहणार ! " असें म्हणाले.

पुनः सासूबाई मुकाट्यानेंच बसल्या. इतक्यांत बाहेरून कोणीं दार उघडलें, त्यासरसे ते दूर होऊन व पुनः कोणी नाहीं असे पाहून सासूबाईस म्हणतात, " बरं, काय ग ? तुझ्या भावाकडून ते परवां कसले रुपये आले आहेत पंधरा, ते मजजवळ नाहीं कुठें आणून दिलेस ? अशी आतांशा प्रतारणा करायला लागलीस का माझ्याशीं ? कसले रुपये पाठवले आहेत अन् ते आहेत कुठें मला कळलंच नव्हतं. काल बनीनं सांगितलंन्, कुठें आहेत ते रुपये ? " हा प्रश्न ऐकून इतक्या वेळच्या त्यांच्या वर्तनाबद्दलचा चांगलाच खुलासा होण्याजोगा होता आणि सासूबाईंच्या व त्यांच्या पुढल्या बोलण्यावरून तो झालाच. त्यांचा तो प्रश्न ऐकतांच त्यांनीं नुसतें " ते सासूबाईंच्याजवळ आणून दिले ते तसेच त्यांच्याजवळ आहेत " एवढेच म्हटलें.

" तें कां ? त्यांच्याजवळ काय म्हणून ? मी कांहीं मेलों होतों की काय ? बरं, तिच्याजवळ कोणीं मूर्खानें ते आणून दिले ! दिले तर दिले; पण तूं मग मागून घेऊन माझ्याजवळ आणून द्यावेस कीं नाहीं ? तूं आतांशा भारीच – तें कांहीं असो. ते आतां तिच्यापासून मागून घेऊन माझ्याजवळ आणून दिले पाहिजेत. "

" म्हणजे. आतां कशी त्यांच्याजवळ मागूं ? त्यांना म्हणूं तरी काय ? "

" काय पाहिजे तें म्हण. रुपये आपले माझे मजजवळ आले पाहिजेत. ती कांहीं भानगड मला उपयोगाची नाहीं ! "

" पण, आतां मी मागूं तरी कशी ? त्या मला म्हणतील काय ? याचा कांहीं विचार ? "

" त्याचा विचार तुझा तूं काय पाहिजे तसा कर. रुपये माझ्या हातीं आले म्हणजे माझं कांहीं म्हणणं नाहीं. "

" मी कांहीं ते रुपये मागायची नाहीं. मग काय जें म्हणायचं असेल तें म्हणावं. "

" मी तुझ्याकडून ते रुपये मागवीनच बघ. वेळ आली, कीं मी तुझ्या पायां देखील पडेन, अन् काय पाहिजे तें करीन, पण—"

" पण काय ? काय जें बोलायचं असेल तेवढं बोलून घ्या. एक जन्म......"

इतकें बोलतें आहे तोंच त्या माउलीच्या डोळ्यांवाटे घळघळां पाणी आलें आणि ती बिचारी मान खालीं घालून बसली.

" मला हे असले कांगावे सर्व कळतात, समजलं? ते रुपये मजजवळ आले पाहिजेत उद्यांच्या आंत; नाहीं तर मी पाहा कशी आग लावून देईन ती ? " इतके बोलून स्वारी तेथून चालती झाली. तेथून गेल्याबरोबर मला ओझें उतरल्यासारखें झालें; परंतु थोडयाच वेळांत आतां आपण बाहेर जावें कसें याची मला मोठी पंचाईत पडली; कारण सासूबाई बाहेर न जातां तशाच तेथें पडून राहिल्या होत्या. आतां करणार काय? बाहेर जावें, तर आतां आपलें व आपल्या नवऱ्याचें जे संभाषण झालें तें सर्व या पोरीनें ऐकलें असें वाटून सासूबाई रागावणारच. बरें न जावें तर तिकडे मुलगी कोठें गेली अशाबद्दल लवकरच हाकाटी होईल आणि हाकाटी झाल्याबरोबर तरी मी आंत पिठी चाळीत बसलें होतें हें त्यांना कळून येणारच. असें वाटून मग मी एका क्षणाचा-देखील विलंब न करतां त्यांच्याजवळ गेलें आणि रडत रडत " मी आंत होतें " एवढेंच म्हटलें. तें ऐकल्याबरोबर त्यांचा चेहरा चमत्कारिक होऊन " आंत होतीस ? कुठें ? केव्हां ? " असें त्या मला विचारूं लागल्या. मी कांहींएक चोरून न ठेवतां कशी बसलें, कां बसलें वगैरे त्यांस सांगितलें, आणि रडूं लागलें. क्षणमात्र त्या कांहींच बोलल्या नाहींत, परंतु लागलीच म्हणाल्या, " तूं तेव्हांच तेथून जायचंस. बरें पण आतां कुणा-जवळ कांहीं बोलूं नको म्हणजे झालं. " इतकें म्हणून त्या मला ' जा, ' असें जों म्हणतात तोंच धाकटया सासूबाई तेथें येऊन " पिठी नवी का करते आहेस ? आहे तरी काय ? " असें म्हणून मला खूप रागें भरल्या, पण तितक्यांत " नाहीं हो, तिनं पिठी मघांच चाळली. मीं तिला पायावर पाय द्यायला थांबवून घेतलं " असें म्हणून उमा-सासूबाईनीं माझी बाजू संभाळली; परंतु त्यांनीं अशी बाजू संभाळून विचारतो कोण ? त्यांचें घरांत चालेल तर कीं नाहीं ? धाकटया सासूबाईंना मला वाटतें त्यांनीं माझा कड घेतला एवढयाच कारणानें जास्त चेव येऊन त्या बोलूं लागल्या. तें कांहीं असो; परंतु थोरल्या सासूबाईनीं माझी त्या दिवशीं बाजू राखली खरी, कारण तसें जर झालें नसतें, तर फारच विलक्षण झालें असतें. एक तर मी त्या खोलींत पिठी चाळीत बसलें होतें, हें मामंजींना आणि सासूबाईंना समजल्यामुळें आपलें बोलणें हिनें ऐकलें असावें असें मनांत येऊन माझ्याविषयीं वाईट ग्रह होऊन मामंजींनीं तर माझ्यावर हत्यारच धरलें असतें. तें टळलें एवढयानें बरें झालें; नाहीं तर त्यांची कुचकीं बोलणीं ऐकून ऐकून माझें मन विटलें असतें.

वर सांगितलेले रुपयांविषयींचें झालेलें बोलणें मीं दिलें आहे, हें वाचून त्यासंबंधानें पुढें काय झालें तें समजण्याची पुष्कळांस उत्कंठा झाली असेल; तेव्हां ती कायम ठेवण्यापेक्षां तृप्त करणेंच वाजवी असें मला वाटतें, आणि त्या रुपयांची पुढील हकीकत मोठी चमत्कारिकहि आहे, तेव्हां ती वाचून मनाला मजाहि वाटणार आहे. तीन दिवस

होऊन गेले. सासूबाईंनीं अर्थातच रुपये मागून घेतले नाहींत. ते रुपये उमासासूबाईंच्या भावानें त्यांना कांही कार्याबद्दल लुगडें घेण्यासाठी म्हणून पाठविले. त्यांच्या भाचाची मुंज झाली, तेव्हां शंकरमामंजींनीं त्यांना धाडलें नाही. धाकटया मामंजींनीं, सासूबाईंनीं सगळयांनीं आपल्याकडून पराकाष्ठा केली, पण यांनीं त्यांना जाऊं दिलें नाहीं. हेतु काय असेल तो असो. सासूबाईंचा भाऊ खेडयांत असल्यामुळें तेथून लुगडें घेऊन पाठवितां येईना, तेव्हां कोणा गृहस्थाबरोबर त्यानें रुपये पाठवून ' तुला जसें आवडेल तसें लुगडें घे ' म्हणून निरोप पाठविला. त्यांचा निरोप मुळी असाच होता, कीं कसलें लुगडें पाहिजे तें त्या गृहस्थास सांग म्हणजे ते आणून देतील. उमासासूबाईंनीं अर्थातच त्या गृहस्थाला " तुम्ही रुपये सासूबाईंच्याजवळ द्या, लुगडं कांही आणूं नका, " असे सांगितलें; परंतु मूळ निरोप होता कसा वगैरे सर्व कांहीं बनूवन्संच्या चोंबडेपणामुळें बाहेर पडून उमा-सासूबाईंची व त्यांच्या भावाची उगीच निर्भर्त्सना झाली. " आम्ही काय रुपये खाऊन बसत होतों की काय ? आणून द्या असं कशाला त्यानं सांगावन् ? एवढा बहिणीच्या मायेचा होता, आमचा गैरविश्वास होता, तर परस्पर लुगडं आणूनच द्यायचं होतं. अन् इतकंय् करून तिचं आलेलं लुगडं, पण नसतं आम्हीं तिला नेसायला दिलं तर तो आमचं काय करणार होता ? " एक ना दोन ! आजेसासूबाई, आणखी मधून मधून धाकटया सासूबाई यांचीं बोलणीं चाललीं होतीं; असा त्या रुपयांचा पूर्वीचा इतिहास होता. अशा स्थितींत मामंजींनीं ते रुपये परत मागून घेण्यास सांगितलें. आधीं उमासासूबाईंसारखी सत्त्वशील बायको, त्यांत त्या रुपयांचा इतका अटाटा झालेला आणि त्या कशा ते मागतील ? पण पुढे त्यांची कशी विनाकारण नाचक्की झाली पाहा. वर म्हटल्याप्रमाणें त्या रुपयांचें नांव न निघतां तीन दिवस झाले, अजून रुपये आपल्या हातीं येत नाहींत असं पाहून त्रासूनच कीं काय, चवथे दिवशीं सकाळीं निजून उठल्याबरोबर तंबाखू चघळीत चघळीत मामजी आपल्या आईजवळ आले आणि कपाळाला आंठयाथिठ्या घालून म्हणतात, " आईअं, हा काय त्रास तूं माझ्याभोंवतीं लावला आहेस ? कसले आले आहेत ते रुपये तुझ्याजवळ ? आज चारपांच दिवस झाले माझ्या डोक्याशी कटकट चालली आहे, हे रुपये आले आहेत ते मागून तरी घ्या म्हणून; तुला ते ठेवून काय करायचे आहेत असल्या अधीर माणसाचे रुपये ? तुला पाहिजे आहेत का कशाला रुपये ? मी देईन तुला. पण ते देऊन टाक कसले रुपये आले आहेत ते. आणखी माझ्या-पाठीमागला त्रास जाऊं दे एकदाचा हा ! कसले आहेत तरी कसले ते रुपये एवढे ?"

हें विलक्षण बोलणें ऐकून मी तर चकितच झालें. आजेसासूबाई संतापानें लाल होऊन गेल्या; त्या नुकत्याच अंग धुऊन सोंवळें नेसून जपाला बसण्याच्या बेतांत होत्या, पण तश्शया उठल्या, आणि आपल्या फडताळाजवळ जाऊन तें उघडून त्यांनीं ते रुपये मामंजींच्या पुढें आणून फेकून दिले आणि तोंडानें जें काय चाललें होतें तें चाललें होतें. मधून मधून मामंजी त्यांना चिडवण्यासारखीं बोलणीं बोलतच होते. " अग पण आई, ज्याचे रुपये त्यानं मागितले तर त्यांत तुला का राग येतो ? तुला का हवे आहेत कशाला ?

सांग मला, मी देतों. त्यांत काय मोठंसं ? मीं त्या रुपयांचं नांवदेखील काढलं नसतं; पण आज तीनचार दिवस झाले, एकसारखी माझ्या डोक्याशीं किटकिट जेव्हां चालली, तेव्हां म्हटलं, नको हा त्रास ! मी एकदा असंदेखील म्हटलं कीं तुझे तूं आपले घेईनास मागून ? मला कशाला मधल्यामध्यें त्रास ! तर वाटतं दोनतीनदा तुझ्याजवळ मागितले असून तूं कायसा कानाडोळा केलास असं ऐकतों," हे व अशा तऱ्हेचे आणखी कित्येक उद्गार काढून मामंजींनीं नुसती आग पेटवून दिली. खरा प्रकार काय तो कोणाला कळणार ? सासूबाईंना बोलायला येईना. मी कोणाजवळ बोलेन तर भलतेंच व्हायचें ! परंतु ते रुपये हातीं येण्याकरितांच मामंजींनीं ही नीचपणाची युक्ति योजलेली पाहून सासूबाईंच्या जिवास काय वाटलें असेल बरें ? बायकांचा जन्म म्हणजे 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' असें म्हणतात तें अक्षरशः खरे आहे असें कोण म्हणणार नाहीं.

◆ ◆ ◆

## २८ : माहेरची हालहवाल

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

मागील प्रकरणांत सांगितलेली गोष्ट घडल्यापासून आमच्या उमासासूबाईवर सर्व मंडळींचा कसा काय कटाक्ष झाला असेल हें सांगावयास नकोच. आजेसासूबाईनीं तर जे काय अकांडतांडव आरंभलें तें कांहीं पुसूंच नये. "मला भीक लागली होती काय ? हिच्याच रुपयांनीं माझं काय होणार होतं ? अन् मी काय खाऊन बसलें होतें ? तिचं तिलाच लुगडं घेतलं असतं—" एक ना दोन अनर्थपात बडबड चालविली होती. धाकट्या सासूबाईनीं थोडाबहुत हातभार लावलाच; पण जरा हलके एवढेंच. उमा-सासूबाई बिचाऱ्या एक शब्ददेखील बोलल्या नाहींत. बोलतात काय तसल्या तोफांपुढें ! आणि त्यांतल्या त्यांत शंकरमामंजींनीं आगींत तेल ओतण्याचा तडाखा चालविलाच होता. अहो, मी अगदीं लहान पण मलादेखील असा संताप आला, कीं कांहीं सुमार नाहीं; पण उपयोग काय ? 'दुबळ्याचा राग त्याच्याच अंगाला' अशी अवस्था. मी किती रागावलें, खरी हकीकत काय आहे ती बाहेर सांगावी असें मला कितीहि वाटलें, तरी उपयोग काय होता ? मला कोणाजवळ बोलायला थोडेंच येत होतें ! आणि यदा-कदाचित् बोललें असतें म्हणून तरी काय ? खरें मानणार कोण ? उलट चोमडी म्हणून माझीच फजिती झाली असती. पण उमासासूबाईना ते दिवशीं व पुढें दोनतीन दिवस एकसारख्या रडतांना पाहून मला इतकें कांहीं वाईट वाटलें कीं पुसूं नये. शंकरमामंजी म्हणजे माणूस आहेत कीं राक्षस आहेत हेंच मला समजेना. आणि अजूनहि समजत नाहीं.

## १७० : पण लक्षांत कोण घेतो !

वर सांगितलेली गोष्ट घडून दोनचार दिवस झाल्यावर मला माहेरचें बोलावणें आलें, आणि मला मोठ्या माराकुटीनें धाडलें. माझ्या माहेरीं जाण्याची एक परवडच होत असे. माहेरचें बोलावणें आलें कीं आधीं अर्थातच आजेसासूबाईकडे जात असे. त्या जर खुषींत असल्या तर ठीक; नाहीं तर त्यांनीं म्हणावे, " पाहाहो, आधीं तिच्या सासूला पुसा जाऊन धाडीत असली तर. माझं काय म्हातारीचं आतां ? यांतथ् नाहीं अन् त्यांतय् नाहीं, कशांतच जमा नाहीं. " असें त्यांनीं म्हटलें म्हणजे बोलवायला आलें असेल त्या माणसाची त्रेधा ! कारण त्याला ' होय ' नाहीं आणि ' नाहीं ' हि नाहीं. त्यानें समजावें काय ? मग फार झालें तर त्यानें सासूबाईकडे जावे आणि सासूबाईनीं त्याला, " तुम्ही आतां जा. मग मी पाहतें; धाडली तर धाडीन, नाहीं तर नाहीं. " असें म्हणून लावून द्यावें. हो, आजेसासूबाईच असें करू लागल्या, म्हणजे त्यांच्या मनात धाडायचें असलें तरी त्यांनीं करावें काय ! एकदा नाहीं–दोनदा नाहीं–असा प्रकार हज्जारदा झाला.

आई जिवत असतांना मला घरीं जो आनंद होत असे तो आनंद आतां माहेरीं आल्यावर होत नसे, हे आतां मीं सांगितले पाहिजे असें नाहीं. त्यांतून विशेष वाईट वाटण्याला कारणें होती. ती अशीं कीं आजी अगदीं दुःखीकष्टी व दुर्मुखलेली असे हे एक आणि दुसरे, आमच्या दुसऱ्या आईचा हेकेखोर स्वभाव. आजीचं आणि तिचे पटेनासें होऊन आजीस लवकरच तेथून निघून आमच्या गांवीं जावे लागण्याचा सुमार दिसूं लागला होता; माझ्या सावत्र आईची आई फारच विलक्षण तऱ्हेनें वागे आणि आजीला तें कांहीं खपेना. मूळ माझ्या आजी–आजोबांचें आणि बाबांचें किती सूत होतें हें वाचकांना ठाऊक आहेच. तेव्हां या नवीन बायकोच्या संबंधाने कांहीं वाद झाल्यास आपल्यालाच गाशा गुंडाळावा लागेल हें ती पक्केपणी जाणून होती असें दिसलें; कारण ती गम खाई. कांहीं झालें तरी बोलत नसे. आपलें चालणार नाहींसें पाहिलें की, सुंदरीला घेऊन ती दूर जाऊन बसे, कटकट नको आणखी तंटा नको. अशी एकंदरींत माहेरची स्थिति असल्याकारणानें माहेरीं जाण्याची अगदीं अतिशय उत्कंठा होत असे, असें नाहीं; तरी पण कितीहि झालें तरी तें माहेर. आमची एक म्हण आहेना की, माहेरचें कुत्रें जरी पाहिलें तरी समाधान वाटतें. मग प्रत्यक्ष माहेरीं जावेंसें कसे वाटणार नाहीं ? त्यांतून मला तर अशाहि स्थितींत माहेरीं ओढा लागायला एक जबरदस्त कारण होतें. तें कोणतें म्हणाल तर माझा दादा. त्याचें मजवर व माझें त्याजवर अतोनात प्रेम होतें. आम्ही कितीहि भांडलों, कितीहि बोललों, कांहीं जरी झालें, तरी आमचें एकमेकांवरलें प्रेम अणुभरदेखील कमी झालें नाहीं. आई वारल्यापासून तर उलट तें प्रेम दसपट वाढलें. आतां माहेरासंबंधानें पाहतां, मला तो कीं त्याला मी असें आम्हां दोघांना पक्कें वाटूं लागलें आणि पुढें तर ते अक्षरशः खरें झालें असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

मी माहेरीं गेलें म्हणजे त्याच्याजवळ चारचार घटका गोष्टी सांगत असें, तेव्हां तो मला माझ्या पश्चात् घडलेल्या सर्व हकीकती सांगे. केव्हां केव्हां तर मला त्याच्या सांगण्याचें हसूंदेखील येई. कारण आम्हां बायकांनादेखील ज्या गोष्टी ध्यानांत यायला पंचाईत पडेल, असल्या घरांतल्या गोष्टी, विशेषतः आमच्या सावत्र आजीच्या कृति जो सांगे, त्या कशा बाई त्याच्या लक्षांत येत, कांहीं मला समजत नाहीं ! एक दिवस तो मला म्हणाला, "यमे, आपली आई आपल्याला कधीं कोणाला चोरून तूपखारीक देत असे का ग ?"

मीं हसून म्हटलें : "हें रे काय विचारतोस ? मला नाहीं ठाऊक !"

तो पुढें म्हणतो : "बरं, तुझ्या नाहीं तर सुंदरीच्या भातांत कधीं शिजतांनाच लोणकढया तुपाचा गोळा घालीत असे ? कधीं भाकरीच्या पापोद्र्याच्या खालीं तूप घालून ठेवीत असे ?"

मी आपली हसलें, आणखी म्हटलें, "चालू दे तुझे प्रश्न, जितके विचारायचे असतील तितके !" तो आपला गंभीरपणानें तसाच न हालतां पुढे म्हणतो, "बरं तुला एकीकडे नेऊन कधीं नवऱ्याच्या पुढे पुढे करायला शिकवीत असे ?"

हा त्याचा प्रश्न ऐकण्याबरोबर मला कसेंसेंच वाटलें. तो आणखी कांहीं पुढे बोलणार तोंच मी त्याला म्हटलें, "पुरे झालं बाबा तुझं. मला नको .कांही विचारूं, मी आपली जातें कशी ? हें रे काय मग मला विचारतोस ' तुझं आपलं आतांशा नाहीं तेंच असतं !" हे शब्द मीं थोडयाशा लबाडीनें उच्चारले होते हे सांगायला पाहिजे असें नाहीं. मला त्याचा अर्थ समजला होताच. इतकें जेव्हां मीं म्हटलें, तेव्हां मात्र तो खुदकन् हसून मला आणखी म्हणतो, "तर मग काय मग ? आपल्या आईची आपल्यावर माया होती म्हणून मला वाटत होतं तें सारं उगीचच. आतांशा आपल्या आईच्या आईची जी तिच्यावरची माया पाहतो ती कांहीं निराळीच. त्या सुंदरीला बिचारीला खायलादेखील मिळायची मारामार ! मग साजूक तूप कुठलं आणखी तूपखारीक कुठली !" दादा म्हणजे असें कुचकें बोलेल किंवा आपल्या एवढ्यातेवढ्या गोष्टींत मन घालील असें मला कधीं वाटलें नव्हतें; परंतु मनुष्य निरनिराळ्या अवस्थांनीं वेढला गेला म्हणजे त्याच्या चालचलणुकीत, आचारविचारांत किती फरक पडतो याला कांहीं सुमारच नाहीं ! तेव्हां आई वारल्यानंतर घरांत एकंदर चर्या बदलली. त्याबरोबर त्याच्या मनाची स्थितीहि बदलली. यांत नवल वाटण्याजोगे कांहीं नव्हतें.

असो. दादाच्या स्वभावाचा तो मूळचा उघडपणा कमी झालेला जरी माझ्या नजरेस आला नाहीं, तरी पण त्यांत हा कुचकेपणा आला एवढी गोष्ट खरी. तसें होण्याला अर्थातच कारणें होतीं. त्यानें लाक्षणिक रीतीनें जितक्या गोष्टी मला सुचविल्या, तितक्या साऱ्या त्याच्यादेखत खरोखरी घडत असत. माझ्या दादाला किंवा सुंदरीला खाण्याला मिळण्याची मारामार पडूं लागून, आमच्या नव्या आईला दुधातुपाच्या

खुराकाची नुसती चैन होत असे. शिवाय दादानें तसें सांगितलें तेव्हां मीं झिडकारलें खरें, परंतु बाबांच्या पुढें पुढें करण्याचा उपदेश माझ्या आईला होत असे यांतहि कांही खोटें नव्हतें. शिवाय मीं चमत्कार असा पाहिला, कीं लग्न झाल्याबरोबर आमची आई माझ्याशीं जितक्या मोकळ्या मनानें खेळे, बोले, तितक्या मोकळ्या मनानें पुढें दुसऱ्या खेपेस मी सासरहून जाऊन येतें तों ती बोलेनाशी झाली. असें होतां होतां सहा महिने होतात तों पहिलें सगळें मान नाहींसें होऊन आतां ती फारच ताठ्यानें वागूं लागली. आम्ही तिला 'नवी आई' म्हणूं लागलों होतों, तें तिला खपेनासें झालें—किंवा खपेनासें होण्याची तजवीज केली गेली. सुंदरीनें तिला "नवी आई" अशी हांक मारल्यावरून आमच्या दोघी आजींचें भांडण झालें. भांडणाला कारण यःकश्चित् म्हटलें तरी चालेल. सुंदरीनें 'नवी आई' म्हणून हांक मारल्यावरून माईसाहेबांना राग आला. त्यांनीं तिला तसें म्हणूं नको, नुसतें 'आई' म्हणत जा, म्हणून ताकीद केली. ती पोरगी थोडीशी हट्टीच. 'म्हणणार नाहीं जा!' म्हणून तिनें उत्तर दिलें. त्याबरोबर संतापून माईसाहेबांनीं एक बुकुंदा मारला. त्या पोरीनें रडण्यास सुरुवात केली, आजी धावत आली; तिला ती हकीकत कळतांच तिला संताप आला आणि पोरीला मारल्याबद्दल ती सडकून नव्या आईला बोलली. एकदा बोलण्याला सुरुवात झाल्यावर मग काय विचारतां ? जें कांहीं खळमळ होतें तें सारें बाहेर पडलें. चोरून खायला देणें, नाहीं नाहीं तें शिकविणें, पोरांच्या खाण्याची आबाळ करणें, मग एक ना दोन खूपच झालें. किती केलें तरी घरांतील मालकीणच ती ! ती का बोलायला सोडते ? पण त्याचा परिणाम काय झाला ? बाबांच्या कानांवर जाऊन त्यांनीं हां हां करून दोघींनाहि स्वस्थ केलें. त्यांना कोणालाच बोलतां येईना, इकडे बायकोला बोलायचें नाहीं. बायको दुसरी. अर्थात् तिच्या आईला बोलतां उपयोग नाहीं. आजीलाहि बोलायची सोयच नाहीं. मग पोरीला मारण्याचें कांहीं काम नाहीं. फार झालें तर तोंडानें बोलायचें असें तसें गुळमुळीत बोलून त्यांनीं जेमतेम वेळ सावरून नेली.

हे भांडण जे दिवशीं झालें तो दिवस माझ्या माहेरच्या सुखाचा अगदीं शेवटचा असें मला वाटलें. दादानें तर मला आपलें काय मत होतें तें सांगितलेंच. त्यालाहि वाटलें कीं, आपल्याला आतां घरांतलें सुख म्हणून यत्किंचितहि लागणार नाहीं आणि पुढें तें सर्व खरें झालें.

वर सांगितलेलेलें भांडण होऊन सुमारें महिना दोन महिने होऊन गेले तोंच आई वयांत येऊन फलशोभनादि संस्कार झाले. तेथून चार सहा महिन्यांतच तिचें वर्चस्व—अर्थात् तिच्या आईचेंहि–घरांत अधिकाधिक वाढत जाऊन आजीची हेळसांड होऊं लागली. ती एकदादोनदा गांवीं जायला निघाली तेव्हा बाबांनी तें बरें नाहीं असें वाटूनच कीं काय तिला आग्रह करून ठेवून घेतलें; परंतु घरांत होत असलेला भेडवडा तिच्यानें मुकाट्यानें पाहावत नसे आणि बोलली म्हणजे तंट्याबखेड्याशीं गांठ पडे. असें रोज

उठून होऊं लागलें तेव्हां एक दिवस दादानें तिला एकीकडे गांठून ' तूं आपली सुंदरीला घेऊन गांवीं जा असें सुचविलें; तिच्याहि मनांत तेंच आलें होतें, परंतु ती आपली आम्हां दोघांसाठीं कसेंतरी करून राही. दादानें तिला शेवटीं सांगितलें, "आजी, तुला आतां इथं राहणं कांहीं नीट नाहीं. तूं आपली जा. आमचं होईल तसं होईल. मी कांहीं आतां लहान नाहीं. यमी कांहीं लहान नाहीं. शिवाय ती इथं येते कुठं फारशी ? " ते त्याचे ममतेचे बोल ऐकूनच कीं काय, आजीला एकदम गहिंवर आला आणि ती ढळढळां रडूं लागली. हे सर्व झालेलें त्या आमच्या सावत्र आजीरूप अवदसेनें पाहिलें असें दिसतें; कारण आमच्या आईच्यामार्फत बाबांपर्यंत त्याचा रिपोर्ट तर खास गेला. बाबा दुसरे दिवशीं अगदीं नाखूष होते. आजीनें जाण्याची गोष्ट काढतांच ते म्हणाले : "हो, नाहींच तुला इथें सुख वाटत तर खुशाल जिथें सुख वाटेल तिथें जा. माझी मुळींच तक्रार नाही. त्या पोरीला म्हणावें, शाळाबिळा सोडून तूंहि जा तुला इथें नसलें पटत तर ! " या बोलण्यावरूनच सगळी बित्तंबातमी पोहोंचली असावी, असें वाटण्याला कारण झालें. इतक्या थराला गोष्ट आल्यावर मग कशाला आजी राहते आहे ? ती आपली दादाला पोंचवायला बरोबर घेऊन सुंदरीसुद्धां गांवीं निघून गेली. अशा तऱ्हेनें आई वारल्यापासून आठदहा महिन्यांच्या आंत मला माहेर नाहीसें झालें म्हणण्यास मोठासा प्रत्यवाय नाहीं.

एक आई नाहींशी झाल्यानें केवढा अनर्थ झाला पाहा. तीच जेव्हां होती तेव्हां घराला किती आळा होता ! आतां त्यांतलें कांहीं म्हणता कांहीं तरी ? माझी ती सद्‌गुणी आई जाऊन ही दरिद्री–अर्थातच एकदम राज्यपदावर बसल्यामुळें चढून गेलेली—व त्या भिकारड्या आईच्या दुष्ट शिकवणुकीनें दुष्ट झालेली—आई आमच्यावर सत्ता गाजवायला आली. मला काय किंवा दादाला काय, ती मोठमोठ्या गोष्टी सांगूं लागली. आणखी खरोखरीच पोक्त्यापुरवत्या बाईप्रमाणें एकदादोनदा मला तिनें तिकडचं मन कसं संभाळावं, याविषयीं उपदेश केला. आतां काय करतां ? दादा बिचारा तिच्या थाऱ्यासहि उभा राहात नसे. तिनें कांहीं सांगितलें तर ऐकलें न ऐकलेंसेंच करी. ती त्याला दादा वगैरे टोपण नांवानेंच हाक न मारतां, "अरे गणपतिअ, तुला शाळेला नाहीं का जायचं ? अजून काय बसलाहेस तो ? अकरा वाजूनदिखील गेले ! " अशा तऱ्हेनें बोलत असे. बाबांच्यादेखत त्याच्या खाण्यापिण्याची काळजी अतिशय दाखवी. बाबा आसपास कुठें जवळ असलें कीं हिनें ' गणपती, अरे आज तूं जेवला कां नाहींस नीट ? तुझें कपाळबिपाळ का दुखतें आहे ? सुंठ जायफळ आणूं का कांहीं उगाळून ? " असें विचारावें. तें ऐकून बाबांना काय वाटत असेल तें असो; पण ही एवढीशी असा पोक्तपणाचा आव घालून कमरेला खोचलेला किल्ल्यांचा जुडगा वाजवीत व दुसऱ्या बाजूला कमरेला खोंचलेला तो पांढरा स्वच्छ रुमाल, तो बहुतकरून नुसताच उलटा घातलेला अंबाडा आणि अशा थाटानें कपाळाला आठ्या चढवून घरांतून इकडून तिकडे वावरतांना तिला पाहिलें म्हणजे आम्हांला तर अगदीं हसूं येई. आमच्या सख्ख्या आईनें असें कधींच केलें नाहीं. त्यामुळें हें विशेषच

वाईट दिसे. बरें हें नेहमींचें झालें, पण एखादे दिवशीं कुठें हळदीकुंकवाला वगैरे बाहेर जायचें झालें, म्हणजे जो थाट करायचा तो कांहीं पुसूंच नये. त्याचे मीं आतां वर्णन करूं नये हेंच चांगलें. किती झालें तरी ती आमची आई. तिच्यासंबंधानें इतकें लिहिलें हेंच गैर झालेंसें मला वाटतें. पण काय करूं ? पहिल्या आईचें आणि इचें अशीं दोनहि वर्तनें लक्षांत आलीं म्हणजे मन चमत्कारिक होऊन त्या दोन्हीहि वर्तनांचा विरोध मनांत आल्याखेरीज राहातच नाहीं. आणि असा विरोध मनांत आला म्हणजे तो लिहिल्याखेरीज संतोषच होत नाही. या स्थितीचा ज्यांना पक्का अनुभव असेल, त्यांनाच माझ्या म्हणण्याचा खरेपणा कळून येणार आहे. इतरांना काय कळणार ?

तेव्हां, माझें लग्न होऊन सुमारें वर्ष दीडवर्ष उलटलें असेल नसेल तों माहेरची ही अशी व सासरची सांगितल्या प्रकारची स्थिति असून पुढे आपलें काय होणार वगैरे-विषयीं अगदीं अजाण अशी मी होतें.

बरोबर दोन वर्षें होऊन गेलीं. माहेरची स्थिति दिवसानुदिवस अधिकाधिक वाईट होत चालली. मला माहेराहून बोलावणें क्वचितच येईसें झालें. घरीं गेलें म्हणजे माईसाहेब नेहमीं कपाळाला आठ्या घालून मजकडे पाहायच्या. बाबांच्या देखत मात्र जें आमच्यावर प्रेम दिसावयाचें तें कांहीं पुसूंच नये. असो. इकडे दुर्गीच्या आईचे व माईसाहेबांचें नित्य नित्य भांडण होऊं लागलें व सावत्र आजीबाई तर पदरांत विस्तव घेऊन भांडायच्या. त्या बहिणाकाकूंशी हूं म्हटल्या भांडत सुटायच्या. या दोघींच्या भांडणामुळें त्या बिचाऱ्या गरीब कुटुंबास फार फार त्रास पोंचूं लागला. शेवटीं दुर्गीच्या बापानें त्रासून तें बिऱ्हाड सोडून दिलें आणि तो दुसरीकडे जाऊन राहिला. इतक्या दरम्यान बाबांस कुठेंशी चाकरीहि लागली. तेव्हां त्या जागेंत त्यांनीं दुसरे बिऱ्हाड न ठेवतां आपणच सर्व जागा घेऊन टाकली. आजपर्यंत मीं माहेरीं आलें, तर चार सुख-दुःखाच्या गोष्टी सांगण्याला दुर्गी तरी असे; परंतु आतां तीहि नाहींशी झाली. हो, आतां तिची गांठ पडण्याचा संभव काय ? आम्हां पोरींचीं एकदां लग्नें झालीं म्हणजे मग आपल्या बहिणींची गांठ घेऊं म्हटलें तरीदेखील अशक्य ! सगळें दुसऱ्याच्या मर्जीवर राहणार. त्यांनीं ' जा ' म्हणून जाण्याची तजवीज करून दिली तर आम्हीं पाऊल उचलायचें; नाहींतर जेथल्या तेथेंच बसायचें. काय करणार ? आम्हीं आपलें कुशल एकमेकींस कळवूं म्हटलें तरीदेखील पंचाईत. आधीं लिहितां वाचतां येण्याच्या नांवानें आंवळयायेवढें आणि त्यांत आलेंच, तरी एकमेकींना पत्र लिहिणें म्हणजे केवढें पाप ! ब्रह्महत्येचें पापदेखील त्या मानानें कांहीं नाहीं. खरंच, ज्या आम्ही लहानपणापासून एके ठिकाणी वाढलों--खेळलों, एका आईचीं मुलें, पण भेटीची सुराणी होते; कांहीं देऊं घेऊं म्हटलें तरी चोरी. असा कांहीं आम्हां बायकांचा जन्म मोठा विलक्षण ! -पण जाऊं द्या. यासंबंधानें लिहिण्याचा पुनः अनेक वेळां प्रसंग येणार आहे, करितां आतांच कांहीं लिहीत नाही.

दुर्गीची व माझी भेट जवळ जवळ सहा महिन्यांत झाली नाहीं. मी एकच वेळां चैत्रांत हळदीकुंकवाला जात असतांना तिला उगीच ओझरती भेटलें. त्या वेळीं तिची सासू जवळ असल्यामुळें तिला कांहीं बोलतां आलें नाहीं; तरी पण तितक्यांत ती माझ्याजवळ आली. अगबाई ग! काय तिची अवस्था झाली होती! डोळे अगदीं खोल गेलेले, गाल असे अगदीं चापटून गेलेले आणखी अगदीं वाळून गेलेली. मी तिला ' हें काय? तुझं असं कशानं झालं?' म्हणून विचारणार तों तीच मला म्हणते, " यमे, तुझी मला एकदा भेट घ्यायची आहे. पण ती आतां कशी आणखी कुठें पडणार? मला तुला कितीतरी गोष्टी सांगायच्या आहेत!" ती इतकें बोलते तों तिच्या सासूनें तिला हांक मारली. त्यासरशी ती जाऊ लागली; परंतु तिचे डोळे पाण्यानें भरले असून आतां अश्रु खालीं पडतात कीं काय, असें मला दिसलें. अशा त्या डोळ्यांनीं तिनें मजकडे पाहिलें, त्याबरोबर माझ्याहि पोटांत भडभडून आलें आणि माझ्याहि डोळ्यांत पाणी आलें; परंतु माझीहि धाकटी मामेसासू मजबरोबर असल्यामुळें डोळ्यांतून पाणी गाळण्याची चोरी. मी अंमळ जास्त वेळ राहिलें, तर लागलीच त्यांनीं मला " हं, एवढें हितगुज काय चाललें आहे? चला, व्हा पुढें! काय बाई एवढाल्या पोरी, अन् त्यांनादेखील एकीकडे बोलायला पाहिजे," असें म्हटलें. दुर्गीची सासू तिला घेऊन गेली व मीहि माझ्या मामेसासूबरोबर चाललें; परंतु माझें सर्व चित्त दुर्गीकडे होतें. तिची स्थिति इतकी वाईट कशानें झाली? तिच्या मनांतून आपल्याला सांगायचें आहे तें आहे तरी काय? तिला सासुरवास अतिशय होतो कीं काय! तिचे अतोनात हाल होतातसे दिसतात, वगैरे नाना तऱ्हेचे विचार माझ्या मनांत येऊं लागले, आणि मला वाटेनें नीट चालणेंदेखील सुचेना. दुर्गीची ती अवस्था, तिची ती सरतेशेवटची दृष्टि माझ्या हृदयांत अगदीं खोंचून गेल्यासारखी झाली. तिची काय अवस्था आहे ती ऐकण्याविषयीं मी तर अतिशय उत्सुक झालें. पण आतां तिची गांठ घेणार कशी? तिच्या बिऱ्हाडीं जाऊन चार घटका बोलूं-बसूं म्हटलें तर किती अडचणी! मला माहेरीं गेलं पाहिजे. माहेराहून माईसाहेबांची आज्ञा घेऊन दुर्गीच्या घरीं गेलें पाहिजे. बरें, तेवढें जुळलें, तरी दुर्गीच्या सासूनें दुर्गीला माहेरीं धाडलें पाहिजे; इतक्या सगळ्या गोष्टी जुळून याव्या कशा? माझें मन दुर्गीची गांठ घेण्यासाठीं कांहींतरी युक्ति काढण्यांत अगदीं गढून गेलें होतें. एकदा एक युक्ति सुचे, एकदा एक सुचे, पण उपयोगी पडेल अशी एकहि दिसेना आणि दुर्गीबद्दल मनाला वाईट तर फार वाटे. शेवटीं मला ते दिवशीं रात्रीं एक युक्ति सुचली, ती अशी : माझ्या माहेरचें हळदीकुंकूं अजून होणार होतें. तें दिवशीं कसें झालें तरी मला राहायला बोलावणें येईलच. असें बोलावणें आलें म्हणजे आपण माईसाहेबांना विचारून दुर्गीलाहि त्या दिवशीं राहायला बोलवावें आणि ती राहायला आली— (तिची आई आपण बोलावलें असतां खास धाडील असें वाटत होतें,) म्हणजे सर्व गोष्टींचा खुलासा होईल. ती युक्ति मला मोठी सोपी आणि आपल्या हातची दिसली आणि ही युक्ति सुचली त्यामुळें त्या आनंदाच्या भरांत मला झोप लागली. दुसरे दिवशीं

सकाळीं मी जागी होतें, तों मला माहेरचें बोलावणें आलें आणि मग मला जो काय आनंद झाला आहे तो कांहीं पुसूं नये. आपल्याला युक्ति सुचली नाहीं तोंच दुसरे दिवशी माहेरचे हळदीकुंकूं असून आपल्याला बोलावणें आलेलें पाहून मला पक्कें वाटलें कीं आतां आपली इच्छा तृप्त होणार, आज दुर्गी आपल्याला भेटणार. तिला आपण घरीं राहून घेऊं आणखी काय हकीकत आहे, काय नाहीं, सारें काढून घेऊं. मला तर आनंद झालाच; परंतु आपण आदले दिवशीं बोललों नाहीं तोंच हा यमीला भेटण्याचा प्रसंग येऊन आपलें मन मोकळें करण्याला सांपडून इतके दिवस मनांत सांठवून ठेविलेल्या गोष्टी बोलून टाकायला सांपडल्यामुळें दुर्गीला कितीतरी आनंद होईल, असें मनांत येऊन त्यांतच मी अगदी गर्क होऊन गेलें. माहेरी हळदीकुंकूंच असल्यामुळें ते दिवशीं कोणीं जाण्याच्यासंबंधानें अधिकउणे अडथळे आणले नाहींत. काय काय दागिने द्यावयाचे ते देऊन आणि नेसायला चांगली साडी देऊन बोलावूं आलेल्या मोलकरणीबरोबर ताबडतोब मला जाऊं दिलें.

वाटेनें जातांना एकदम माहेरीं न जातां परस्परच दुर्गीच्या आईकडे जाऊन दुर्गीला बोलावणें पाठवावें अगर माहेरींच असली, तर तिला ताबडतोब घेऊन जावें असें माझ्या मनांत आलें व त्याप्रमाणें मी त्या मोलकरणीला म्हटलेंदेखील; पण ती ऐकेना. ती आमची जुनी मोलकरीण नव्हे, नव्या मन्वंतरांत सारीं माणसें बदललेलीं. आतांची ही मोलकरीण नुसती पोषाखी; नेमकंच काम करायची; आणि आमचें मुळींच काम करायची नाहीं अशी होती. मीं तिला दुर्गीच्या आईकडे जाण्याविषयीं म्हटलें मात्र, तिनें लागलीच "त्ये काय नाय, तुम्ही आपल्या घरीं चला. अन् मंग बाईसाहेबांसनीं इचारून खुट पाहिजे तिथं जा" असें रोकडें उत्तर दिलें. काय करतां ! मी आपली मुकाट्यानें घरीं गेलें. बेहेत्तर आहे नाहीं दुर्गी भेटली तर ? आतां आपण तिला बोलवायला जायचं नाहीं असा निश्चय केला. पण हा असला निश्चय किती वेळ टिकणार ? घरीं जाऊन चार क्षण लोटले नाहींत, तोंच माईसाहेबांना जाऊन विचारावें असें मनांत आलें. वास्तविक म्हटलें, तर मीं आतांशा माईसाहेबांना अशा गोष्टींत–किंबहुना कोणत्याहि गोष्टीत–विचारायला जात नसे. कारण आम्हीं विचारलें, कीं त्याला नकाराचें उत्तर यायचें असा ठरावच. एखादी गोष्ट विचारण्याची वेळ आलीच, तर ती बाबा आसपास कोठें आहेत असें पाहून मोठ्यानें विचारायची, म्हणजे नाहीं असें उत्तर येण्याचा संभव बराच कमी असे. तेव्हां दुर्गीला बोलावण्याबद्दल विचारायचें तें कसें काय करावें, या विचारांत मी माईसाहेबांपुढें जों जातें तों काय आनंदाची गोष्ट ! माईसाहेब स्वतःच मोठ्या आढ्यतेनें म्हणतात, "यमे, अग तुझ्या दुर्गीला बोलवायची का आहे तुला ? ती जानकी म्हणत होती, कीं परस्पर तिच्या घरीं चला म्हणून म्हणत होतीस ! जा, तुला तिला बोलवायची असली तर बोलाव जाऊन." इतक्यांत त्यांच्या आईसाहेब त्यांना म्हणतात, "च्‌ ! एक एक चिन्हंन् थेरच. तिला काय करायचं आहे बोलावून ? कांहीं समाराधना का आहे इथें ? नाहीं तेंच तुझं करणं असतं, चिंगे " त्याबरोबर माईसाहेब

मानेल। हिसका देऊन म्हणतात, " बरं बरं, तुला काय करायचं आहे ? पोरीची जात आहे, वाटतं आपली मैत्रीण यावीशी. अन् ती आलीच तर त्यांत कांहीं खर्च आहे का वेंच आहे, का आहे तरी काय ? जा ग तूं आपली यमे ! जानकी इच्याबरोबर जाऊन त्या दुर्गीला घेऊन येग " हे माईसाहेबांचें वर्तन पाहून मला अतिशय आश्चर्य वाटलें व दुर्गीला बोलवायला सांपडलें आहे याबद्दल आनंद व्हायचा तो एकीकडेच राहून मी त्या आश्चर्यांतच गर्क होऊन गेलें. वाटलें, कीं हें आहे तरी काय ? आज माईसाहेबांनीं एवढा मनाचा उदारपणा कुठला धरला ? त्याचें कारण कांहीं दिसेना. बाबा आसपास कोठें नव्हते. पण आश्चर्य करीत बसण्यास फारसा अवकाश नव्हता. मी ' पडत्या फळाची आज्ञा ' असें मनांत म्हणून लागलीच त्या जानकीला घेऊन बाहेर पडलें आणि ताबडतोब दुर्गीच्या आईच्या घरीं गेलें. दुर्गी माहेरींच होती ! मग आतां आनंदाला पारावारच राहिला नाहीं. दुर्गीच्या आईला व आजीला विचारतां त्यांनीं " तुझी आई काय म्हणेल ? तिला कशाला नेतेस ? " वगैरे म्हणून पहिल्याप्रथम नन्नाचा पाढाच वाचला. पण मी जेव्हां फारच आग्रह धरून बसलें, तेव्हां त्यांनीं एकदा रुकार दिला. मी बोलवायला गेलें, यामुळें दुर्गीला जो आनंद झाला तो विलक्षणच ! तिचें तोंड एकदम प्रफुल्लित झालें. तिचें अजून अंगधुणें वगैरे व्हायचे होतें. तें तिला लवकर आटपण्यास सांगितलें. ती अंग धुवायला खालीं गेली म्हणून मी अंमळ बहिणाकाकूंशीं बोलत उभी राहिलें. त्यांनीं मला थोडक्यांत सारी हकीकत विचारली. मीहि ती सांगितली. दुर्गी अशी वाळली कां ? म्हणून मीहि त्यांस विचारलें. ती आजारी होती असें त्यांनीं मला सांगितलें. इतक्यांत दुर्गी अंग धुऊन वर आली. झटकन् साडी नेसून आम्ही आतां निघणार तों बहिणाकाकूंनीं ' थोडेंसें थाली-पीठ खाऊन जा दोघीजणी ' असें म्हटलें. बाहेर जायच्या वेळीं खायचें नांव घेतलें, तेव्हां तसें जाऊं नये असें त्यांनींच आणखी म्हणून आमच्या हातावर एकएक वडी दिली. ती खाऊन आतां आम्ही खास निघणार, तोंच काय नशिबाचा चमत्कार आहे तो पाहा ! बिचाऱ्या दुर्गीच्या सासरहून तिला ताबडतोबीचें बोलावणें आलें. कां ? तर म्हणे तिच्या सासूच्या मामेनणंदेच्या भाचेसुनेच्या सावत्र लेकीचें डोहाळेजेवण आहे. आणि तेथें गेलेंच पाहिजे. बरें, बोलावणें तें देखील असें कीं किती सांगितलें तरी तो बोलवायला आलेला तिचा दीर कांहीं केल्या जाईना. तो म्हणे ' आईनं तिला घेऊन ये म्हणूनच सांगितलें आहे, मी तिला घेऊनच जाईन.' मला तर तें पाहून फारच वाईट वाटलें. दुर्गी रडूंच लागली. बहिणाकाकूंनादेखील वाईट वाटलें आणखी त्यांनीं त्याला " जा तुम्ही तसेंच, सांगा कांहींतरी सबब " असें तसें पुष्कळ सांगितलें; पण तो शंभू ऐकेना. शेवटीं दुर्गीची आई होती अंमळशी रागीटच, ती आली पुढें आणखी म्हणते, " नाहींतर व्हा चालते, येत नाहीं दुर्गी, काय म्हणतां " एवढें म्हटल्याबरोबर तो जो उसळला, तो शिव्या देत तडक चालता झाला. पण दुर्गीनं आपलें रडणें आंवरून त्याला थांबवलें आणि उलट ती आपल्या आईवरच रागावून तिला म्हणते, " नको. मला आपली जाऊं दे. यमी पुन्हा केव्हां तरी भेटेल. " पण आतां तिच्यानं अधिक धीर धरवेना असें दिसलें. ती

पण...१२

एकदम रडूं लागली. तो तिचा दीर, कसला निर्दय म्हणावयाचा ? तो म्हणतो, " वहिनी-बाई, यायचं असलं तर चला, नाहीं तर आम्ही जातों, मग खुशाल रडत बसा. " काय करते बिचारी ! तशी उठली. मला खूण करून तिनें एकीकडे नेलें आणि ती म्हणाली, " यमे, मी आज फार आशेनें होतें, कीं तुझी माझी आज एकान्तांत गांठ पडेल आणखी मी सारं तुझ्याजवळ सांगेन. पण कुठलं एवढं नशीब ? बरं, नाही तर नाहीं. पडली पुनः तशीच गांठ, तर सांगेन, नाहीं तर नाहींच. पण यमे तूं–" इतके ती बोलली. पुढें तिच्यानें बोलवेना. तिचा कंठ दाटून आला. माझ्या खांद्यावर तिनें मान टाकली आणि स्फुंदस्फुंदून रडूं लागली. इतक्यांत तिच्या त्या कठोरहृदयी दिरानें तिला पुनः दरडावून हाक मारली. तो दीर बडबड करीतच होता. शेवटीं तिनें आपल्या खाकोटीस साडीचोळी मारली आणि मी व ती दोघीहि वाईट तोंडे करून दुर्गीच्या घराच्या बाहेर पडलों. आम्ही बाहेर पडून कोपऱ्यावर वळतों, तोंच दुर्गीचा नवरा तेथें उभा राहिलेला पाहिल्याबरोबर मला एकदम कसेंसेंच होऊन मी एकदम दुर्गीला म्हटलें, " दुर्गे, हें ग काय ? " त्यावर तिनें आपल्या नाकावर बोट ठेवून मला दटावलें, व " असेंच आहे बाई. काय करूं आतां ? " असें ती फार हलके म्हणाली. इतक्यांत तिची व माझी वाट निराळी फुटली; अर्थातच मी आपल्या वाटेला लागलें आणि ती आपल्या वाटेला लागली. तरी मी क्षणभर उभी राहून दुर्गी जात होती तिकडे पाहिलें; तो ती पुढें व तिचा नवरा आणि धाकटा दीर मागें अशीं चाललीं होतीं. हें आहे तरी काय ? दुर्गी इतकी वाळली कशानें ? तिचा नवरा तिला माहेराहून बोलावून नेतो याचा अर्थ काय ? हें घरच्या माणसांस कळतें कीं नाहीं ? नसेल कळत तर छपतें कसें ? कळत असेल तर खपतें कसें इत्यादि गोष्टींचा अचंबा करीत व दुर्गीवर कांहींतरी दुःखप्रसंग असावा असें वाटून खिन्न झालेली अशी मी आलें तशीच घरीं गेलें.

◆ ◆ ◆

## २९ : असेंच आहे हो बाई !

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

आशा आणि निराशा या दोन गोष्टींनीं जग कसें भरलें आहे याचा अनुभव मनुष्याला पदोपदीं येत असतो. आजपर्यंत माझ्या आयुष्यक्रमांत मला कितीतरी गोष्टींचा अनुभव आला. अमुक एक गोष्ट खास होणार आणि ती झाली म्हणजे सर्व कांहीं आपल्या मनाजोगें होईल अशी आशा उत्पन्न होते. केव्हां केव्हां तर असें होतें, इच्छित गोष्ट सिद्ध होण्यास जीं काय साधनें असतात तीं सर्व जुळून येतात. आतां आपल्याला हवें तें झालेंच म्हणून समजून आपण अगदीं निःशंक असतों. आतां म्हणजे कांहीं विघ्न येईल असें मुळींच वाटत नसतें. अर्थात् आपण बेसावध असतों; आणि

एकाएकीं असें कांहीं विघ्न येतें कीं, त्यानें आधीं झालेल्या जुळवाजुळवीचा पार निकाल लागतो. असें प्रसंग माझ्या या आयुष्यक्रमांत कितीतरी आले. अनेक प्रसंग आले यामुळें मला कित्येक दिवसपर्यंत " कोणत्याहि कामांत का होईना, माझी आपली शेवटीं निराशा व्हायचीच, असा माझ्या जन्मकाळचा गुण आहे " असें वाटत असे, आणि अजूनहि कधीं कधीं वाटतेंच. जेवढ्या निराशेच्या गोष्टी तेवढ्याच माझ्या लक्षांत राहिल्या आणि बाकीच्या लक्षांत राहिल्या नाहींत, यामुळें कदाचित् मला तसें वाटत असेल, पण वाटतें खरें. दुर्गीची गांठ केव्हां पडेल असें मला झालें होतें. त्याकरितां ज्या ज्या अडचणी येतील असें मला वाटलें होतें त्या त्या आल्या नाहींत. आदले दिवशीं सासूबरोबर हळदकुंकवाला हिंडत होती, ती माहेरीं आली असेल असें स्वप्नांतदेखील मानायला जागा नव्हती; परंतु माझी आशा सफळ होते असें वाटून एकदम निराशा व्हावी असा नेमानेम असल्यामुळेंच कीं काय दुर्गीच्या आईची व तिच्या सासूची वाटेंत गांठ पडून तेथल्या तेथें तिनें तिला आईबरोबर पाठविलें; आमच्या नव्या आईसाहेब आमच्यावर इतक्या प्रसन्न होऊन, आपण होऊन ' दुर्गीला बोलवायला जा हवी तर ' असें म्हणतील असें कधींच वाटलें नव्हतें, पण तेंहि झालें. आतां दुर्गी एक दिवस राहायला येण्याला अडचण ती काय राहिली होती ? पण नाहीं. आशा ती ! सफळ व्हायचीच नव्हती. असो. आतां त्याची व्यर्थ वाटाघाट काय उपयोगी ? एक पदोपदीं येणारा अनुभव आपला सांगितला. मला एकदा एका पुस्तकांतून कांहीं वाचून दाखवीत असतांना एक वाक्य सांगितलेलें आठवतें. तें पुस्तक काय, कसलें, मला कांहीं आतां आठवत नाहीं, परंतु तें वाक्य बरीक चांगलें आठवतें. " मनुष्यजन्म म्हणजे आशा आणि निराशा यांची झटापट " असा त्याचा अर्थ होता. हें वाक्य मला चांगलें आठवायला कारण, ज्या ज्या वेळेला कांहीं कांहीं कारणांनीं निराशेचे उद्गार माझ्या तोंडून निघत त्या त्या वेळेला मला, " अग, मनुष्यजन्म म्हणजे आशा आणखी निराशा यांची झटापट हें तुला ठाऊक आहेना ? " असें मोठ्या प्रेमानें म्हणायचें होत असे. तें वाक्य इतक्या वेळां माझ्या कानीं पडलें आहे कीं त्याची गणतीच नाहीं. माझे चार दिवस जे सुखांत गेले ते त्या वाक्यामुळेंच असेंदेखील मी म्हणेन; व आज कोणत्याहि स्थितींत समाधान राहण्यालाहि कारण तेंच वाक्य !

आतां सांगितल्याप्रमाणें निराश होऊन मी घरीं आलें. घरीं आल्यानंतर दुर्गी येत नाही वगैरे सांगून आम्ही आपल्या मांडामांडीच्या कामाला लागलों. त्या गर्दींत असतांना मला अर्थातच दुर्गीच्या स्थितीबद्दल थोडेंसें विस्मरण पडलें; परंतु पुढें संध्याकाळीं बायका येऊं लागल्या तेव्हां दुर्गीच्या सासरीं बोलावणें गेलें असेल का ? ती आपल्या सासूबरोबर येईल का ? आली तर तिला राहून घेण्याची खटपट करावी का ? करायची तर कशी करावी ? आपण होऊन तिच्या सासूला विचारावें, कीं माईसाहेबां-कडून विचारावें ? असे नानातऱ्हेचे विचार माझ्या मनांत येत होते, व त्याबरोबर ' हे

सर्व विचार व्यर्थ आहेत; तिची सासू कांहीं तिला ठेवणार नाहीं, आणि सकाळीं झाली तशीच आतांहि आपली निराशा होईल ' असेंहि वाटत होतें.

दुर्गीच्या सासरीं बोलावणें होतें, आणि त्याप्रमाणें तिच्या येथल्या बायकांमध्यें तीहि आली. तिनें मला पाहिल्याबरोबर तिचें तोंड जें झालें आहे, तें या वेळीं माझ्या डोळ्यांपुढें स्पष्ट दिसतें आहे. छे ! छे ! जिवावरलें कांहींतरी संकट असावें आणि त्या वेळीं मनुष्याच्या चेहऱ्याची जी स्थिति होते, ती त्या वेळीं तिच्या चेहऱ्यावर दिसत होती. ती आल्याबरोबर मीं तिच्या सासूला वगैरे हळदीकुंकू दिलें व दुर्गीला कलिंगड देण्यास म्हणून जरा आंत नेलें व म्हटले, " दुर्गे, तुला ठेवून जातां का आजच्या रात्र असें विचारूं का तुझ्या सासूला ? " असें तिला हलकेंच विचारलें. त्याबरोबर ती इतकी कांहीं कावरीबावरी झाली कीं कांही पुसूं नये. आणखी ती एकदम मला म्हणते, " नको ग बाई, नको ! माझा जीव राहावा असं जर तुला वाटत असेल तर मला ठेवून घेण्याचं नांवदिखील काढूं नकोस. यमे, काय आतां सांगूं तुला—" असें म्हणून ती एकदम तेथून पळालीच. पण जातां जातां तिच्या त्या खोल गेलेल्या डोळ्यांतून पांढऱ्याफटक गालांवर दोन आंसवें पडतांना माझ्या दृष्टीस पडली. मीं तो सर्व प्रकार पाहून अगदीं चपापून गेलें. हें आहे तरी काय ? सासूचा जाच म्हणावा तर सासू चांगली म्हणून तिची ख्याति होती. काय होईल तें होवो; तिला सासूनें ठेविली तर पाहावेंच असें मनांत येऊन मीहि ताबडतोब बाहेर गेलें; तो दुर्गीची सासू वगैरे मंडळी अगदीं जिना उतरण्याच्या बेतांत होती. मग मी मागें पुढें न पाहतां एकदम, " दुर्गीला ठेवतां का आजची रात्र ! फराळचिराळ करील, सकाळीं मग येईल " असें म्हटलेंच.

त्याबरोबर "विचार तिला, तिची ती मुखत्यार आहे. राह्यचं असलं तर राहील. " असें ती म्हणाली. तें ऐकून मी आपली चिप बसलें. दुर्गीची सासू जिना उतरूं लागली, परंतु तिचें तिलाच राहवेना कीं काय कोण जाणें लागलीच मागें वळून आमच्या माई-साहेबांना ( त्या जिन्यापर्यंत पोंचवायला आल्या होत्या ) म्हणते, " तुम्हांला सांगतें यशोदाबाई, या आतांच्या पोरी अवढंगीच फार ! त्यांना वाटतं कीं आम्ही जशा नाचूं तसं आम्हांला नाचूं द्यावं. या पोरीला काल मी तिच्या आईनं म्हटलं म्हणून तश्शी माहेरीं पाठविली अन् ही आज सकाळींच आपणच उठून घरीं आली. कां ? तर म्हणे ' आलें आपली उगीच ! ' आतां इथं काय करावं ! सांगा तुम्हीच. खरंच आम्हांला कांहीं बाई असलीं चिन्हें ठाऊक नव्हतीं. हें व अशा तऱ्हेचें तिचें बोलणें चाललें असतांना दुर्गी आपली मुकाट्यानें खालीं मान घालून उभी होती. काय करणार बिचारी ! तिला तोंड बांधून बुक्क्यांचा मार झाला. नवऱ्यानें चोरून पाठवलेलें बोलावणें सासूला सांगावें कसें ? बरें तें सांगायचें जर नाहीं, तर बोलावणें न जातां येण्याचें कारण विचारल्यावर आयत्या वेळीं " आलें आपली उगीच ! " याखेरीज दुसरें सांगावें काय ?

तिच्या सासूचें तें बोलणें ऐकून मला असें झालें कीं, कोठून तिच्या राहण्याची गोष्ट काढली; तरी दुर्गीनें मला बजावलें होतें, तूं विचारूं नकोस म्हणून. दुर्गीची गांठ घेऊन एकदा तिला काय ती हकीकत विचारून घ्यावी असें माझ्या मनांत फार होतें; तेव्हां त्या इच्छेपायीं बाकी शहाणपण अगदीं व्यर्थ होऊन गेलें होतें. दुर्गीची सासू अशा तऱ्हेनें बोलत आहे; आमच्या माईसाहेब पन्नास वर्षांच्या पोक्त बाईप्रमाणें आमच्या कालच्या पोरींविषयीं आपलें मत मधून मधून देत असून मजकडे वांकडया नजरेनें कपाळाला आठ्या चढवून टवकारून पाहात आहेत; इतकें सगळें चाललें असतां मी आपली वेडी पुनः म्हणालें, " पण आज तिला राहूं द्या, सकाळीं माई पाठवून देईल. " तें ऐकण्याबरोबर आमच्या माईसाहेब विशेष क्रुद्ध दृष्टि करून मजकडे पाहतात व म्हणतात : ठेवानात का, फराळ झाला म्हणजे मी पाठवून देईन, मग तर कांहीं हरकत नाहीं ? नाहीं होय होतां होतां शेवटीं दुर्गी राहिली खरी; पण तिच्या त्या राहण्यापासून मला कांहींच बरें वाटलें नाहीं. फराळ झाला कीं ती परत जायची होती. तथापि मुळींच नाहीं त्याच्यापेक्षां कांहींतरी झालें. घटकाभर मी आणखी दुर्गी एकान्तांत जरी नाहीं, तरी पण एका ठिकाणीं बसून बोलूं एवढेंच मला समाधान वाटलें. आणखी पुष्कळ बायका येऊन गेल्या. अगदीं संध्याकाळ झाली तशी बायकांची गर्दी अगदीं कमी कमी होत चालली. होतां होतां चांगला काळोख झाला तेव्हां बायका येईनाशा झाल्या; इतक्यांत माईसाहेब कांहीं कामासाठी आंत गेल्या; बाहेर कोणी नव्हतें. कोणी नाहींसें पाहून मी दुर्गीला कांहीं बोलणार तों तीच मला म्हणते, "यमे, मी तुला नको म्हटलं होतं पण तूं ऐकलं नाहींस. आतां तरी तुझ्या पायां पडतें. मला रात्रीं राहण्याचा आग्रह करूं नकोस. मला मार खावा लागेल. यांत काय तें समज. याच्यापेक्षां काय उघड सांगूं तुला ? "

तें ऐकून मीं आश्चर्यानें व खेदानें तिच्याकडे पाहून म्हटलें, " काय ? मार खावा लागेल ? "

" हो " गळा दाटून येऊन हीं अक्षरें दुर्गीच्या तोंडून बाहेर पडलीं.

" कोणाच्या हातचा ? "

दुर्गी कांहींच बोलेना. तेव्हां मीं पुनः तिला म्हटलें, " सांगच तूं मला, " तथापि ती कांहीं बोलेना; पुनः मीं तिला विचारलें, तेव्हां मोठया कष्टानें ती म्हणते :

" दुसऱ्या कोणाच्या ? "

तें ऐकल्याबरोबर मी अगदीं चपापून गेलें. हें आहे तरी काय ? असें वाटून मी पुढें कांहीं बोलणार तोंच माईसाहेब तेथें येऊन आमचें पुढचें बोलणें बंद झालें.

◆ ◆ ◆

## ३० : " यमे ! आतां काय सांगूं बाई तुला ? "

* * * * * * * * * * * * * * *

तें दुर्गीचें उत्तर ऐकून पुरी हकीकत विचारण्याविषयीं मला किती उत्कंठा झाली असेल याची कोणासहि कल्पना करणें शक्य नाहीं. एवढासा नवरा, एवढीशी बायको. घरांत खंडीभर वडील माणसें, आणखी तो म्हणे तिला मारतो ! हें आहे तरी काय ! असें मनांत येऊन मी आपली अचंबा करीतच बसलें. इतकेंच नव्हे तर " देवा, आपल्यावर देखील असाच प्रसंग येणार काय ? असें मनांत येऊन माझें धाबें दणाणलें; व हें सारें आहे काय हें विचारून घेण्याची उत्कंठा विशेषच बळावली; परंतु ती आतां तृप्त व्हावी कशी ? दुर्गीला राहून घेऊन आणि न घेऊन सारखेंच झालें. शेवटीं आतां कांहींतरी युक्ति केल्याखेरीज गत्यंतर नाही असें मनांत येऊन मी दुर्गीला घेऊन दादाच्या खोलींत गेलें. दादा अजून बाहेरून आला नव्हता. आज हळदीकुंकू आहे तेव्हां उशीर होणार, असें जाणूनच तो इतका वेळ बाहेर राहिला असावा. माईसाहेबांना न कळत भलत्या वेळीं मी दुर्गीला घेऊन वर एकीकडे बसलें हा अगदीं वेडगळपणा केला, परंतु काय आहे तें जाणण्याच्या उत्कंठेपलीकडे मला दुसरें कांहीं सुचेल, तेव्हां बाकी सारे विचार !

दुर्गीला वर नेण्याबरोबर अंधारांतच मीं तिला म्हटलें, " दुर्गे, आतां मन मोकळें करून काय हकीकत आहे ती सांग; अगदीं कांहीं चोरून ठेवूं नकोस. आज सकाळपासून आपण एकमेकींची गांठ पडावी म्हणून कितीतरी खटपटी केल्या; पण शेवटीं कांहीं नाहीं. आतां खरं म्हटलं तर आपण या वेळीं खालीं फराळाची गर्दी चालली असतांना इथं यायचंच नाहीं पण माझ्याच्यानें राहवेना. तर बोल काय असेल तें. हं. अग, आज तुझ्यावर जो प्रसंग तो उद्यां माझ्यावर येणारच. "

" यमे ! आतां काय सांगूं तुला ? आज दोनतीन महिने झाले. एकसारखं माझ्या हात धुऊन पाठीस लागायचं. मी एकटीशीं दिसलें कीं पुरें. . . . ." पुढें तिच्या तोंडांतून शब्द बाहेरच पडेना, इतका तिचा गळा दाटून आला आणि ती एकदम ओक्साबोक्शीं रडूं लागली. " उगी चिप, खालीं कोणींतरी ऐकेल; हें काय तूं मांडलं आहेस ? " वगैरे म्हणून मीं तिला पुष्कळ तऱ्हेनें सांगितलें, पण तिचें रडें कांहीं केल्या आंवरेना. शेवटीं आतां काय करावें असें वाटून ' मी या वेळीं तिला कांहीं बोललें नसतें तरी बरें झालें असतें, कोठून बोललें कोण जाणें ! ' असें मला होऊन गेलें. इतक्यांत अर्धवट रडें आंवरून तिची तीच मला म्हणते, " यमे, आतांशी शाळाबिळादेखील सोडली आहे बरं का ! परवां बाबा सहज शाळेंत चौकशी करायला गेले होते तर कळलं कीं, आज १॥ महिन्यांत

चार का पांच दिवस काय तें शाळेंत जायचं. अन् घरून अकरा वाजतां तर अगदीं घाईनं जेवून जायच. तें बाबांना कळल्यावर त्यांना किती वाईट वाटलं म्हणतेस ! पण काय करणार ? त्यांनीं तिकडे मामंजींकडे कळवायचा विचार केला. अन् कुठें अर्धवट बोलले वाटतं त्यांच्याजवळ. ते घरीं आले तेव्हां त्यांनीं केली चौकशी. मग कांहींतरी खोटेनाटे बहाणे करायचे. अन् शेवटीं मार खाण्यापर्यंत पाळी आली. पुढें माझ्या बाबांनीं मामंजींना सांगितलं असं कळलं तेव्हांपासून तर जिथें सांपडेन तिथें आपली एखादी चपराक बसायचीच." येथें पुनः दुर्गीचा गळा दाटून येऊन ती रडण्याच्या बेतांत आली, परंतु तितक्यांत मीं तिला दाबल्यामुळें ती दबली व म्हणते "यमे, काय करूं ग ! रडूं आल्याखेरीज राहातच नाहीं. कुठवर बाई छळ सोसावा, आणखी त्यांत आजेसासूबाईंची करणी ! त्यांनीं मला एकदा वळंच वन्संकडून रात्रीं तिकडे पाठवल्या दिवसा . ..."

इतकें ती बोलत आहे तोंच, "यमे, इथं ग काय करते आहेस अंधारांत ? अग, खालीं कोण बोभाटा चालला आहे तुझ्या नांवाचा ! वा ! पोरी कुठं गेल्या म्हणून एकसारखी ओरड चालली आहे. जा जा ऊठ. आतां बसूं नकोस. चालती हो." असे शब्द आमच्या कानीं पडले. ते ऐकण्याबरोबर मी फारच घाबरलें. मी त्या बोलण्याच्या भरांत आहे कोठे आणि वेळ कोणता, हें अगदीं पार विसरून गेलें होतें. किती वेळ गेला याचें भानच राहिलें नाहीं. दुर्गी काय बोलते इकडे माझें सारें लक्ष वेधून गेलें होतें. आतां देखील दादा तितक्यांत आला त्याबद्दल मला किती वाईट वाटलें म्हणून सांगूं ? क्षणमात्र असें वाटलें, कीं काय पाहिजे तें जरी खाली चालले असलें, तरी दुर्गीचें बोलणें सारें ऐकल्याखेरीज उठूंच नये इथून, पण काय उपयोग ? दादा तेथें आल्यावर आतां कसलें आलें आहे बोलणें ? मी आपली चुंबित तेथून उठून दुर्गीला घेऊन खालीं चालती झालें. खालीं गेल्यावर मग काय विचारतां ! माईसाहेबांनीं माझी पण खात्रीच उडविली, "होतां कुठें यमूताई ? रांडेच्यांनो, हाका मारतां मारतां माझ्या दांतांच्या कण्या झाल्या. कुठेंग होतीस ? आतां एवढया रात्रीं अंधारांत वर जाऊन बसण्याचं कांहींतरी कारण ? खालीं इथें गर्दी कोण ! आणखी तुम्ही दोघीजणी आपल्या वर जाऊन बसलांत का ? कायगं तुमचं एवढं चाललं होतं हितगूज ? या हितगुजाकरितां दुर्गीला सकाळपासून बोलवायची ही खटपट चालली होती नाहीं का ? अं ! दम धर आतां ! फराळ झाला नाहीं तोंच तिला लावून देतें. अन् पुनः बोलावतें का पाहा बरं ! खालीं फराळाचीं पानं मांडायचीं तीं कोण मांडील ? कांहीं आम्हांला चाकर ठेवल्या आहेत का काय ? दम धर, आतां बाहेरून यायचं झालं, कीं सारं सांगून देतें अन् असं सांगितलं संवरलं म्हणजे मग ' ती सावत्र आई ! ती अशीं गाऱ्हाणीं सांगेल यांत नवल काय ! तिला तीं मुलं दृष्टीसमोर नकोत असं म्हणायचं !... ..." असा मारे पट्टा चालला होता व मधून मधून त्यांच्या मातोश्रीहि सडकून बोलत होत्या. इतक्यांत बाबा आलेसें

कळलें, त्याबरोबर काय चमत्कार पाहा ? एक तोंड अजिबात बंद झालें आणि दुसरें बंद जरी झालें नाहीं तरी पण त्याच्या बोलण्यांत एकदम कोमलपणा येऊन, "अग यमे, अंधारांत बसलांत म्हणून म्हटल. दुसरं कांहीं नाहीं हो; विंचूकाटा असतो, दिवा लावून बसायला कोणी नको का म्हणतं आहे तुला ? अन् त्य ंतून वेळ पाहून बसावं, दुसरं काय ?" अशा तऱ्हेवर बोलणें गेलें. इतक्यांत बाबा अंगरख्याची गुंडी काढीत "काय आहे ? काय झालं काय ?" असें विचारूं लागले. तों "कांहीं नाहीं. हें आपलं घरांतलं आहे. त्यांत तें काय विचारायचं ? होतेच आहे चूक पोरीच्या हातून !" असें म्हणून माई-साहेब मला म्हणतात," चला आतां, भुका नाहीं का लागल्या तुम्हांला ? करा पाटपाणी, मांडा संध्येचं. आणखी मग उशीर नको. दुर्गीला पोंचवून यायची आहे ना ? आई, झालं ना ग तुझं ?" असें म्हणून त्या आंत गेल्या. दादा तितक्यांत तेथें होता, त्याच्याकडे मीं सहज पाहिलें तों तो असा चमत्कारिक रीतीनें गालांतल्या गालांत हसला कीं कांहीं पुसूं नये.

नंतर लवकरच आमचे फराळ वगैरे होऊन दुर्गीला बरोबर गडी देऊन पाठवून दिलें. तिला मीं पुष्कळ आग्रह केला असता परंतु तिनें सांगितल्या हकीकतीवरून मी आपली तितकीच राहलें. ती अगदीं जायच्या वेळीं मला 'येतें अं' म्हणाली, परंतु तीं अक्षरें तिच्या तोंडून पुरतीं निघालीदेखील नसतील ! इतका तिचा गळा दाटून आला होता. इतक्यांत आमच्या आजीबाई मोठ्या थाटानें म्हणतात, "काय झालं असतं राहली असती रातच्यारात ? सकाळीं उठून जायचं होतं, पण नाहीं." त्यावर माईसाहेब तितक्याच थाटानें म्हणतात, "चहाटळ पोरी ! झालं, एव्हांपासून त्यांना नव.. " पण नको. पुढचे शब्द मी लिहूं नयेत हेंच बरें.

दुर्गी तर गेली, परंतु तिच्या अर्धवट हकीकतीनें माझ्या मनावर जो परिणाम झाला तो कांहीं विलक्षण होता. तिचें तें पूर्वीचें गुटगुटीत शरीर ! ती पूर्वींची तरतरी ! तो पूर्वींचा ठसकेदारपणा ! त्याचप्रमाणें थट्टामस्करीची हौस ! हीं सर्व कांहीं आतां नाहींशीं झालीं. एवढीशी पोरगी माझ्याच बरोबरीची, पण तिच्या गालांची हाडें दिसूं लागून ती निव्वळ हडकुळी दिसूं लागली. काय करील बिचारी ? नवऱ्याच्या शिकण्याबद्दल हें असे असे तारे आणखी इकडे हा असा छळ ! बाहेर तोंड बांधून बुक्क्यांचा मार ! मनुष्य कितीहि दुसऱ्याच्यासंबंधानें विचार करीत असला तरी आपल्या स्थितीचा त्यांतल्या त्यांत विचार करायचाच. त्यांतून समान स्थितींत असल्यावर मग तर विचारायलाच नको. दुर्गीच्या स्थितीविषयीं ते दिवशीं रात्रीं मी असा विचार करीत असतां साहजिकच माझे विचार माझ्या स्वतःच्या स्थितीकडे वळले. आपलीहि स्थिति अशीच कांहीं होणार कीं काय ? असा विचार क्षणमात्र माझ्या मनांत आला; परंतु सध्यां तरी तसें कांहीं होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत, असें पाहून चांगलेंच समाधान वाटण्याजोगी स्थिति होती; कारण माझ्याकडे रागाच्या दृष्टीनें पाहिलेलें कधींहि मला आठवलें नाहीं. मला

काम पडूं नये अशाविषयीं उलटी काळजी आहेसें दिसत असे. आतां हें कशावरून, असें जर कोणी विचारील तर मात्र कांहीं मला सांगतां येणार नाहीं. आपली व आपल्या पतीची ओळखहि नाहीं अशा वेळीं त्याचें आपल्यावर प्रेम आहे कीं नाहीं, कोणत्या वेळीं मर्जी सुप्रसन्न आहे आणि कोणत्या वेळीं खप्पा झालेली आहे, इत्यादि गोष्टीं आम्हांला कळतात यांत तर कांहीं शंका नाहीं, परंतु त्या कशा कळतात असें कोणी विचारल्यास कधींहि सांगतां येणार नाहीं. त्याला आमच्या जन्मास येऊन आमच्या स्थितींतच असलें पाहिजे. पाळीव जनावराला आपल्या धन्याच्या मर्जीच्या निरनिराळया अवस्था जशा उपजतबुद्धीनेंच समजतात, त्याचप्रमाणें आमची स्थिति आहे, असें म्हटलें तरी चालेल. घरांतील पाळीव जनावरांची व आमची स्थिति सारखी असें वर ध्वनित केलें आहे, हें पाहून माझ्या कित्येक भगिनींस फार वाईट वाटेल. आपल्याच तोंडानें आपल्याच जातीला उणेपणा लावल्याचा दोष मजवर देऊन कित्येक माझी निंदाहि करतील. परतु त्यांनीं आपल्या मनाशीं खरा विचार केला तर त्यांना माझ्या या म्हणण्यांत चांगलाच खरेपणा आहे असे दिसून येईल, अशी माझी खात्री आहे; मात्र त्यांच्या अंगीं दुराग्रह टाकून विचार करण्याची योग्यता असली पाहिजे, दुसरे कांहीं नाहीं. अहो, सध्याची आमची पाळीव जनावरांसारखी स्थिति नाहीं असें कोण म्हणेल ! जसें एखाद्यास कुत्रें बाळगायचें असलें म्हणजे तो लहानपणींच पिलूं घरांत आणून त्याला दूधभात खाऊं घालतो, तशी हुबेहूब आमची स्थिति आहे. ज्याला सासर म्हणून म्हणायचें तेथें आम्हांला आमच्या आईबापांपासून आमची ताडातोड करून नेऊन ठेवतात. कुत्र्याला मायेनें तरी वागवितात; तेथें तेवढयावाचून सारें ठीक असतें. अमुक आपला धनी म्हणून त्याच्या पुढें पुढें करण्यास व त्याची मर्जी संभाळण्यास शिकविलें जातें. पण जाऊं द्या. हीच उपमा मी जरी शेवटपर्यंत लावून दाखविली तरी साजणार आहे हें प्रत्येक चाणाक्ष वाचकास समजण्याजोगें आहे ज्यांना यांतली खुबी कळणार नाहीं, त्यांना व्यर्थ राग मात्र येणार, म्हणून ती उपमा येथेंच सोडून देऊन मी आपल्या पुढील हकीकतीला लागतें. वर सांगितलेंच आहे, कीं ते दिवशीं रात्रीं मी आपली वरील गोष्टीवर विचार करीत होतें विचार करतां करतां मला एकदम दादाला दुर्गीच्या नवऱ्याबद्दल विचारावें असें वाटलें आणि मीं दादाला उठवून विचारलें, दादा, दुर्गीचा नवरा आहे ना रे तुला ठाऊक ? तो काय शिकतो ? "

" कां एवढया रात्रींची तुला आठवण झाली ? अगदीं मला झोपेंतून उठवून विचारते आहेस ती ? तुझी तरी कमाल आहे यमे ! "

" नाहीं रे दादा. दुर्गी न् मी आज बोलत होतों. मी आपली म्हटलं तुलाच् विचारूं, तुमच्याच शाळेंत आहे ना तो ? "

" अग, त्याचं कसलं आलं आहे आतां शिकणं ? तो विड्या ओढीत हिंडत असतो

कुठेंतरी झालं ! अन् मला वाटतं तो तंबाखूदेखील खायला लागला आहे. बोलूं नको हो दुर्गीजवळ; नाहीं तर तिला वाईट वाटायचं..."

तें त्याचें बोलणें ऐकून मी आपली अगदीं स्तब्ध बसलें, मला पुढें बोलतांच येईना. हो, एवढासा मुलगा विड्या ओढूं लागला, तंबाखू खाऊं लागला, आतां त्याच्या शिकण्याचें काय होणार हें दिसलेंच. थोडया वेळानें मीं दादाला म्हटलें,

"दादा, एकूण दुर्गीचं नशीब धड नाहीं म्हणायचं ! तिला तो भारी छळतो."

"तसंच तें ! पण यमे, तुला नाहीं ना कांहीं सासरीं त्रास ?"

"कांहींदेखील नाहीं. आपल्या मामेसासूबाई आजेसासूबाई बोलतात, पण—"

"त्या बोलूं देत ग. उद्यां तुझ्या नवऱ्याच्या परीक्षा झाल्या, कीं तो तुला मुंबईला घेऊन जाणार. मग काहीं तिथे त्या येत नाहींत ना ? अन् त्यांच्या परीक्षा उतरायची कांहीं काळजी नको. तूंच बरीक जरा ल्याहय्‌वाचायला येतंय् तें वाढीव, आणखी त्यांना तें फार पाहिजे हो. त्याचं न् माझं परवांच बोलणं झालं नुकतं. ते स्वतःच एकदा तुला सांगणार आहेत."

तें ऐकून माझ्या मनाला बरें वाटलें हे म्हणजे सांगायला पाहिजे असे नाहीं. तथापि मीं दादाला म्हटलें, "हे रे काय दादा ! मी आपली तुला भोळ्या भावानें सांगतें आणखी तूं अशी माझी थट्टा करतोस का ?" परंतु माझ्या बोलण्याचा स्वरच असा होता की त्यावरून ती थट्टा मला आवडते आहे असें ऐकणारास वाटावें, तेव्हा तो पुढे मला म्हणतो –

"मी सांगतों तें कांहीं खोटें नाहीं. त्यांनीं मला खरोखरीच तुला सांगायला सांगितलें आहे अन् ते स्वतः तुला सांगणार आहेत. यमे, तूंच पाहा तिकडची हुशारी किती, आणखी तुला नुसतें नीट वाचायलादेखील येऊं नये, हे आवडेल का ? तुला इंग्रजी शिकवायचेंदेखील त्यांच्या मनांत आहे" इतकें म्हणून त्यानें ज्या कांहीं तिकडच्या हुशारीच्या आणखी बेताच्या गोष्टी सांगितल्या त्या कांही पुसूंच नयेत. त्या गोष्टी ऐकून मधून मधून 'पुरे मेलं तुझं !' "हें रे काय हे ?" काय तरी थट्टा !" असें जरी मी म्हणत होतें, तरी अंतर्यामीं मला खूप गुदगुल्या होत होत्या, आणि त्या भरांतच दुर्गीचें दुःख विसरून मी आपल्या भावी सुखाच्या विचारात गर्क होऊन झोंपीं गेलें.

◆ ◆ ◆

## ३१ : एका विशेष दिवसाची हकीकत

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी झाल्यापासून सुमारे वर्ष सव्वा वर्षांत विशेष सांगण्याजोग्या कांहीं गोष्टी झाल्या नाहींत. झाल्या गोष्टी पुष्कळ, परंतु त्या सविस्तरपणें वर्णन करण्याजोग्या अशा कांहीं झाल्या नाहींत. ज्या झाल्या त्या सर्व एका प्रकरणांत थोडक्यांत सांगतें, म्हणजे पुढल्या सर्व गोष्टी सविस्तरपणें लिहिण्यास ठीक पडेल. एक-दोन गोष्टी ज्या विशेष घडल्या त्यांचें वर्णन सविस्तरपणें देईनच.

प्रथमतः माझ्या स्वतःच्यासंबंधानें झालेली गोष्ट सांगतें; कारण त्या गोष्टीवरून 'शितावरून भात' याप्रमाणें माझ्या पुढील सुखाची परीक्षा होऊन मला अतिशय आनंद झाला. आपल्या नशिबीं अतोनात सुख आहे अशी माझी पक्की खात्री झाली. तेव्हां त्याच गोष्टीपासून सुरुवात करावी, असें मला वाटतें.

माझी धाकटी मामेसासू आणि थोरल्या सासूबाईच्या मुली, माझ्या मामेवन्सं किती सरळ सूत होत्या, आणि माझ्याविषयीं त्यांची किती सद्‌बुद्धि होती, हें आज-पर्यंतची एकंदर हकीकत दिली आहे, तीवरून साऱ्यांच्या ध्यानांत आलें असेलच.

पोरीची जात, चुकी होणें हें किती साहजिकच असतें ! परंतु काडीभर चुकलें कीं गेलेंच, साऱ्यांनीं अगदीं बोचून घेतलेंच म्हणून समजावें. त्यांतून कित्येक गोष्टी चुकल्या, तर त्या मोठया माणसांच्या कानावर जायलादेखील नकोत अशा असत; पण मामेनणंदांचें अगदीं इतके असे कीं इकडे हूं झालें पुरें कीं तिकडे जाऊन त्यांनीं टूं केलेंच ! यामुळें फार त्रास होत असे. थोरली नणंद कांहीं नेहमीं घरीं नसे; पण त्या धाकटया बाया आणखी ते धोंडूभावजी यांचा त्रास नेहमीं असे. चारहि मुलें पण कशीं बापाला शोभण्याजोगी होतीं ! तीं आईचे पण वाभाडे काढीत. धाकटया सासूबाईच्या जवळ मात्र त्यांचें कधीं कांहीं चालत नसे. त्या धोंडूभावजींना तर सारा दिवस झोडपीत असत, पण ते असे कोडगे कीं कांही पुसूंच नये !

एक दिवस सकाळच्या प्रहरीं-आदितवारच होता—मी पाणी तापविण्याच्या चुली-पाशीं बसून पाणी तापवीत होतें. सगळयांच्या आंघोळी व्हायच्या होत्या तेव्हां पाणी जितक्या लवकर तापायला पाहिजे, तितक्या लवकर तापवावें म्हणून मी आपली थोडीशी गर्दीच करीत होतें. अंमळ जाळ होऊन पाणी तापण्याच्या बेतांत येतें आहे, इतक्यांत धोंडूभावजी हातांत चार कांदे घेऊन भराभरा आले, आणखी कांहीं न बोलतां न सवरतां त्यांनीं चुलींतला विस्तव खराखरा बाहेर ओढला अन् आपले कांदे त्यांत खुपसले. मीं इतका वेळ खटपट करून पेटविलेला विस्तव सगळा विझून गेला ! आणखी

गोवऱ्या मेल्या अशा दमट होत्या, कीं त्या पेटता पेटत नसत; तेव्हां मला थोडासा रागच आला. त्या सपाट्यांत मीं त्यांना एवढेंच म्हटलें, "काय हा दांडगेपणा ? हा सारा विस्तव विझला. पाणी कोण तापवील ? नसते आतां कांदे भाजले तर ? टाकतें मीं आतां ते कांदे काढून–' हे शब्द माझ्या तोंडून पुरते निघताहेत न निघताहेत तोंच "आजी अ" करून त्यांनीं सूर काढला. वर सांगितलेलें माझें बोलणें ऐकण्याला आणखी कोणी होतें असें मला वाटलें नाहीं; परंतु बनूवन्स तितक्यांत कुठूनशा आल्या वाटतें. त्यांचा फेरा तिकडे आला. माझ्या तोंडून ते शब्द निघायला आणि त्यांनीं ऐकायला एकच गांठ पडली. मग काय विचारतां आधींच तारें आणि त्यांत शिरलें वारें. त्यांनीं आणि धोंडूभावजींनीं नुसत्या थयथयाट केला "काय हा दांडगेपणा ? हा सारा विस्तव विझला. पाणी कोण तापवील ? नसते आतां कांदे भाजले तर ? टाकतें मी ते कांदे काढून " हे जे माझे शब्द होते त्या शब्दांवर केवढी थोरली तरी इमारत रचली गेली ! "काय हा दांडगेपणा" चा "काय हा गाढवपणा झाला"; "हा सारा विस्तव विझला; आतां पाणी कोण तापवील तुमचा काका का ?" असें झालें "अगदीं प्राण चालले कीं काय कांद्यावांचून" असेंहि शब्द माझ्या तोंडीं आले ! आणि शेवटी कांदे काढून विहिरींत टाकले असेंहि बालंट मजवर आलें प्रत्यक्ष दिराचा काका काढला यापरतें पाप तें या जगांत पोरीच्या हातून कोणतें होणार ? मी खरोखर तसें कांहीं बोललें कीं नाहीं याबद्दल चौकशी करतें कोण ? आणि जरूर कोणाला ! बरें, मी जर कांहीं "मी असें कांहीं बोललें नाहीं, मी असें म्हणेन कसें ?" असें बोलायला जाईन तर एक तर कोणी ऐकणार नाहीं आणि उलट "हं, आता ती उत्तरं द्यायला लागली. चांगली चांगली सून डोक्यावर मिरी वाटणारी झाली अं !" असें म्हणून आणखी त्रास मात्र व्हायचा. तोंड बांधून बुक्क्यांचा मार म्हणतात तो हाच. न बोलतां न सवरतां भलतेंच बोलल्याचा आरोप येऊन त्याबद्दल जितकीं म्हणून बोलणीं खावीं लागायचीं तितकी अगदीं निमूटपणें खावीं लागली. करणार काय ? पण छे ! ते दिवशींचीं बोलणीं कांही अनन्वितच होतीं. आमच्या आजेसासूबाईचें तोंड तें एकदा सुरू झालें म्हणजे मग त्याला कांहीं सुमारच नसायचा ! आणि मग काय बोलतील आणि काय नाहीं याचा नेमच नाहीं. "गाढवीला लाज नाहीं वाटत त्याचा काका काढायला ? हो ! हो ! येईल त्याचा काका पाणी तापवायला आणखी तूं येऊन बैस इथें पाटावर, नाहीं तर कचेरींत जा. छे छे बाई, आतांच्या या कारट्याच द्वाड ! त्यांना कांहीं लाज भीड कशी ती ठाऊकच नाहीं, खरंच मला राहून राहून आच्चीर वाटतं, कीं एवढ्याशा मिरकुटल्या या, यांना कोणाचा बाप, कोणाचा काका काढायचा तरी सुचतो कसा ? त्यांना वडील नाहीं धारं नाहीं, दीर नाहीं नणंद नाही; जें तोंडाला येईल तें बोलायचं. खबरदार म्हणावं माझ्या घरांतल्या कामाला हात लावशील तर. चालती हो आपल्या माहेरीं, लागेल नवऱ्याला जेव्हां चाकरी तेव्हां मग आणील तो. आमच्या घरांत कांहीं हें असलं बोलायला तूं राहूं नकोस. आमच्या इथले पुरुष पाणी तापवायला येतील

आणखी तुझा बाप काय करतो ? तुरुंगांत जाऊन भाकऱ्या भाजतो ? लाजा नाहीं वाटत ?......"

हीं शेवटलीं अक्षरें सासूबाईंच्या तोंडून निघतात तोंच धाकटे मामंजी तेथें आले आणि " आई आई, हें काय ! अंमळ तोंडाला कांहींतरी..."

कसचें काय आणि कमचें काय ! त्या ज्या त्यांच्यावर उसळल्या आणखी म्हणूं लागल्या, " आमच्या पोराचा काका का ही कारटी काढणार ? आणखी हिचा बाप तुरुंगांत होता, तो कोणी काढावा ! आम्हीं केली म्हणून; नाहीं तर असल्या तुरुंगांत पडलेल्या गृहस्थाची कारटी करीत होतं कोण ?..."

कोणत्याहि गोष्टीला काय, कांहींतरी सुमार असावा लागतो. बेसुमार झालें म्हणजे मग काय होतें आणि काय नाही याचा नेम नसतो, वर सांगितलेलें सारें बोलणें होऊन शेवटीं माझ्या बापावर जेव्हां आलें, तेव्हां तें ऐकून मी एकदम रडूं लागलें—माझ्यानें अगदीं सहन होईना. त्यातून बाबांच्याविषयीं नाही नाहीं तें बोललेलें ऐकलें तेव्हां तर कळसच झाला. कोठीच्या खोलींत जाऊन मुकाटयानें ओक्साबोक्शी रडत बसलें. आमचें बायकांचें दुसरें काय हत्यार असणार ! आपला अपराध काडीचाहि नसून इतका आपल्यावर गहजब झाला, तो आंतल्या आंत कसा दबावा ? कोणत्या ना कोणत्या तरी वाटेनें बाहेर पडलाच पाहिजे. स्पष्ट तऱ्हेनें बोलतां तर येईना; तेव्हां एकीकडे जाऊन रडणें बरें असें वाटतें. पहिल्या प्रथम माझा विचार असा होता, कीं कोणी कितीहि बोलो आपण मुकाटयानें आपलें काम करीत राहावें; परंतु बोलणें जेव्हां मर्यादेच्या पलीकडे गेलें आणि तेंहि विनाकारण तेव्हां मग दुसरें गत्यंतर नाहींसें जाणून मी वर सांगितल्या ठिकाणीं तडक जाऊन बसलें.

अशा तऱ्हेनें मी बसलें असतां सुमारें पंधरावीस मिनिटें झालीं असतील नसतील तोंच कोठीचें दार कोणीं लोटलें असा मला भास झाला. असेल कोणीतरी असें समजून मी वळून न पाहतां तिथल्यातिथेंच कोपऱ्यांत घुसून रडूं लागलें. इतक्यांत माझ्या पाठीवर कोणाचासा हात फिरला, आणि मी वळून पाहतें तों—तिकडची स्वारी ! तें पाहण्याबरोबर माझी जी तिरपीट उडाली ती कांहीं सांगतां येत नाहीं. आपल्याला आतां खास मार बसणार; आतां आपली धडगत नाहीं; दुर्गीच्यासारखी आपली अवस्था होणार असें पक्कें मनांत वाटून मी एकसारखी खालीं मान घालून रडतच सुटलें. आतां तर रडण्याचीदेखील चोरी; माझ्या साऱ्या अंगाला दरदरून घाम सुटला. इतक्यांत " काय हें ? इतकं रडण्याला काय झालं ? " असे शब्द माझ्या कानीं पडले. हे शब्द कानीं पडतांच ते रागाचे कीं लोभाचे हें कांहींएक न कळतां व आपलें बोलणें बाहेर कोणाला ऐकूं जाईल कीं काय याचाहि विचार मनांत न येतां " नाहीं नाहीं; मी खरोखर कांहीं बोललें नाहीं. सारं माझ्यावर बालंट आहे, मला नका मारूं. " असे शब्द केविलवाणीनें काढून मी झटकन् खालीं बसलें. माझी मान खालींच होती. आपण कितीहि गयावया

केल्या, तरी आपलें बोलणें खरें वाटायचें नाहीं. आणि मार कांहीं चुकत नाहीं, आतां चापटी आलीच असें क्षणोक्षणीं मला वाटत होतें व त्या भयानें सर्वांग थरथर कांपत होतें. इतक्यांत "हा वेडे, तुला मारायला आलों असं का तुला वाटलं ? तुझ्याकडे कांहीं अपराध नाहीं; तूं कांहींदेखील बोलली नाहींस हें मला सांगायला का पाहिजे ! मी वरच्या मागल्या माडीत उभा राहून पाहातच होतों मुळीं सारा चमत्कार अन् नसतों जरी उभा, तरी मला कधींच हें खरं वाटलं नसतं, समजलीस ! तुला मी मारायला आलों असं वाटलं ? हीच का तूं माझी परीक्षा केलीस ? उगी, अगदीं रडूं नको कशी ! चिप् चिप् ! अगदीं नको. आतां आणखी सातआठ महिन्यांवर आलें आहे. मग मुंबईत तुला कोणीदेखील कांहीं बोलायला येणार नाहीं. उगी, अगदीं रडूं नको कशी ? हे काय हें वेड्यासारख ?" हे अमृतासारखे शब्द माझ्या कानीं पडले.

आज किती दिवसांत तरी असें मायेनें मला कोणी बोललें नव्हतें. ते एकदम ज्या वेळीं अवश्य पाहिजे होतें त्या वेळीं आणि जिकडून येतील असें माझ्या स्वप्नीं देखील मला वाटलें नव्हतें तिकडून. मग काय विचारतां ? माझें रडणें एकदम बंद झालें. माझ्या आश्चर्याला पारावार नाहींसा झाला; आणि आजेसासूबाईच्या विनाकारण बोलण्याचें दुःख या अचानक आलेल्या सुखांत मी केव्हांच विसरून गेल्यासारखी झालें. मीं अगदीं मुकाट्यानें उभी राहिलें काय बोलावें हें मला मुळीच सुचेना. इतक्यांत बाहेर कोणी आलें कीं काय तें दाराबाहेर डोकावून पाहून पुन्हा माझ्याजवळ येऊन तोंडावरून हात फिरविला आणि विचारलें, "आतां नाहींना कांहीं माराची भीति ? काय तरी वेड्या बायका असतात ? मारण्याखेरीज आम्हांला दुसरा कांहीं उद्योगच नाहीं वाटतं अं !" असें म्हणून खालीं वाकून असें माझ्या तोंडाकडे हसत पाहिलें. मी आपली मान पटकन् वळविली. हसूं येत होतें. तें दाबण्यासाठीं कितीतरी यत्न केला, पण शेवटीं मेलें खुदकन् आलेंच. तेव्हां "कां ? मान कां वळविली ? बोलायचं नाहीं वाटतं आमच्याशीं ?" असें म्हणून पुनः माझ्या हनुवटीला हात लावणार तोंच दार वाजलेंसें वाटलें आणि मग काय विचारतां ? कोण आहे तें पाहण्यासाठीं स्वारी दाराजवळ गेली; पाहतात तो वनूवन्सं तिकडच्याच नांवानें एकसारख्या हांका मारीत वर जाताहेत. जातां जातां उगीच दाराशीं डोकावून गेल्या. ओ कांहीं दिली नाहीं पण त्यांचें पाऊल जिन्यावर पडतांच माझ्याकडे येऊन "पुनः केव्हां तरी अशीच गांठ पडली पाहिजे अं !" असें लगबगीनें म्हणून आणि हलकेंच पुनः हसून पाहून त्या दारानें पार सूं ! क्षणभर मागेंदेखील पाहण्याची सोय नाहीं. "कां ? बोलायचं नाहीं वाटतं आमच्याशीं !" हे शब्द येण्याच्या पूर्वीपासून मला किती किती तरी बोलावेंसें वाटलें; पण एक शब्द निघेल तोंडावाटें तर शपथ ! जितकें मनांत आलें तितकें जर बोललें असतें तर दोनचार दिवसदेखील पुरते कीं नाहीं कोणास कळे ?

पण मीं काय लिहिलें हें ? कोणी एखादें म्हणेल, "एवढीशी पोरटी ही ! कधीं बोलायचा याच्यापूर्वी प्रसंगदेखील नाहीं, आणखी चार दिवसदेखील पुरले नसते, इतकें

बोलायचें तरी काय होतें ?'' पण तें काय होतें आणि काय नाहीं, हें कांहीं सांगतां येत नाहीं. होतें ही गोष्ट निर्विवाद ! ती आपल्या अनुभवानेंच जाणावी.

खरें पुसाल, तर ते दिवशीं घडलेला सर्व प्रकार एकंदर माझ्या हितावरच मला वाटला. दुर्गीनं आपली हकीकत सांगितल्या दिवसापासून राहून राहून माझ्या मनांत " आपलीहि अशीच गत नाहीना होणार ? " असें वाटे आणि एखादे वेळ तिकडली मुद्रा पाहिली म्हणजे धडकीच भरे. एक दिवस मी अशी चाललें होतें, आणखी तिकडून यायचें. बनूवन्सं जवळच होत्या, त्यांनीं पटकन् आम्हां दोघांना हात लावून, 'काशीयात्रा काशीयात्रा ' असें चालविलें. अन् बाई जो का एवढाला डोळा केला आहे त्यांच्यावर तो अज्जून मी विसरलें नाही. असें कांहीं एखादे झालें म्हणजे मग दुर्गीची हकीकत मनांत येऊन आपलें असेंच होणार असें वाटे. बनूवन्संनीं थट्टा केली ते दिवशींची ती रागीट मुद्रा पाहून तर खात्रीच झाली, कीं आपली धडगत नाही.

वास्तविक पाहतां असें वाटण्याला तिकडल्या वागणुकींत कांहीं कठोरपणा होता असें नाहीं. कधीं माझ्याकडे रागानें किंवा कपाळाला आंठ्या घालून पाहणें वगैरे मला ठाऊक नाहीं. पण किती केलें तरी तें नवऱ्याचें नातें ! नवरा हा शब्द उच्चारण्याबरोबर लहानपणीं तरी निदान भयाखेरीज दुसरें कांहीं वाटत नाहीं. मारणें, रागावणें या दोन्ही गोष्टी त्या एका शब्दांत भरलेल्या आहेत; ही अगदीं पक्की कल्पना, मग पुढें ओळखदेख झाल्यानंतर काय अनुभव येईल त्याप्रमाणें मत व्हायचें; परंतु मोठेपणीं आमच्या तोंडून निघणाऱ्या कित्येक म्हणी जर ऐकल्या तर पुढें तरी आमचा अनुभव काय असतो तो दिसून येतोच. " कोणाची होऊं नये बायको, कोणाचं होऊं नये चाकर " " सार म्हणूं नये बापडा; नवरा म्हणूं नये आपला ! "

पण ज्या दिवशीं समाधानाच्या शब्दांची अतिशय जरूर, त्या दिवशीं जिकडून कधींहि येतील असें वाटलें नव्हतें अशा ठिकाणाहून ते आल्यानंतर मग आनंदाला पारावार नाहींसा झाला. मी आपलें सर्व दुःख विसरून गेलें. आतां कोणी कितीहि बोललें तरी कोणाला भ्यायला नको, असें वाटून माझ्या अंगांत दुप्पट तरतरी आली. जन्माच्या कर्मीं नवरा कधीं बोलला नव्हता, तो सहज अंधारांत बायको उभी असतां " कोण आहे ? " असें म्हणाला. त्याबरोबर तिनें " मी आहे " म्हणून उत्तर दिलें. आणि तोच तिला हर्ष होऊन " त्यांनीं म्हटलं कोण आहे ? मी म्हटलं मी आहें. " या षोडशाक्षरी मंत्राचा जप करीत सर्व भान विसरून गेलेल्या एका बाईची गोष्ट सांगतात त्यांतलीच माझी गत झाली. मात्र मी आपलें भान सर्वथा विसरून गेलें नाहीं. आजेसासूबाईच्या तोंडावर अक्षता पडून पट्टा सुरू झाला, तेव्हां माझ्या बाबांविषयीं जी कांहीं भलतीच सलतीच गोष्ट त्या बोलल्या, ती मात्र माझ्या मनांत शल्याप्रमाणें बोचून राहिली. हें आहे तरी काय ? या बोलतात त्याचा अर्थ काय ? माझे बाबा तुरुंगांत होते ? आणखी ते कधीं ? मला कसें ठाऊक नाहीं ? माझ्या जन्माच्या आधीं तर नसतील ना ? आणखी कां म्हणून

पडले ? असें काय त्यांच्या हातून घडलें ? असे एकना दोन–लाखों प्रश्न माझ्या मनांत उभे राहून मन अगदीं गोंधळून गेलें. आतां याचा उलगडा व्हावा कसा ? विचारावें कोणाला ? आजपर्यंत ही गोष्ट माझ्या कानावर आल्याखेरीज राहिली कशी ? त्यांतून मी मोठी चौकस. कोणत्याहि गोष्टीत, ' हें कां ? ' तें कसे ? ' हें समजून घेण्याची माझी मोठी हौस. केव्हां केव्हां तीहि फाजील आणि त्या मला या गोष्टीचें नांवसुद्धां ठाऊक नाहीं तेव्हां काय म्हणावें ? त्यांतून आणखी दुःखावर डागणी दिल्याप्रमाणें वर बनूबन्संनीं–त्या मुळीं माझें उणें सांपडेल तेवढें पाहण्यासाठीं टपलेल्याच–दुपारीं येऊन " वहिनी, तुझा बाप तुरुंगांत का होता ? इश्शबाई, हें नव्हतें मला ठाऊक ! " असें मला म्हटलें.

या बोलण्यानें मला काय झालें असेल आणि काय नाहीं, याची कल्पना ज्याची त्यानेंच करावी. मी आपली मूग गिळून या गोष्टीचा खुलासा व्हावयाचा तो दादाखेरीज होणें नाहीं असे पक्कें समजून दादाची गांठ पडेल तेव्हां खरें असें म्हणून समाधान मानलें.

पण त्या वन्संच्या डागणीमुळें ते दिवशीं माझ्या हर्षाला अतिशय मोठें कारण झालें असतांहि, माझ्या मनाची उदासीनता पुनः परत येऊन डोळ्यांचें पाणी खळलें नाहीं.

◆ ◆ ◆

## ३२ : संशय फिटला

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

" तुला कोणीं सांगितलं ? वेडी कुठली ! भलतंसलतंच् येऊन विचारतेस ? "

" अरे, प्रत्यक्ष आजेसासूबाई बोलल्या म्हणून विचारतें. असं रे काय दादा ? "

" छः, बोलली असेल कांहीतरी, वेडंन् वांकडं बोलायचं म्हणून; तूं किनी यमे, एवढी थोरली झालीस, पण तुला कांहीं कळत नाहीं. या असल्या गोष्टी–भलत्यान् सलत्या कांहींतरी ती थेरडी बोलली, तिला लागला आहे म्हातारचळ–अन् तूं मला येऊन विचारतेस का ? काय आतां तुला म्हणावं ? "

हें दादा बोलत होता खरा, परंतु त्याच्या बोलण्याच्या एकंदर झोकावरून मला तर स्पष्ट असें दिसलें, कीं तो जें बोलत आहे, तें केवळ वरवर असून कांहींतरी खरी गोष्ट माझ्यापासून लपवितो आहे. मनुष्य विलक्षणच लफंगा असला तर गोष्ट निराळी; परंतु दादासारखा साधा मनुष्य एखादी महत्त्वाची गोष्ट लपवायला लागला, तर शब्दांनीं तो कितीहि लपवो, त्याची चर्या या गोष्टीतलें इंगित निराळें आहे, हें दाखविल्याखेरीज राहायचीच नाहीं. त्यांतून आम्हां बायकांच्या अंगीं जो नैसर्गिक चाणाक्षपणा असतो, त्यानें आम्ही सुतानें तेव्हांच स्वर्गास चढतों. साध्याभोळ्या माणसांची आमच्यापुढें

मात्रा चालायची नाहीं ? वरील वाक्यें बोलतांना दादाच्या चर्येत होणारे फरक, निर-निराळीं वाक्यें उच्चारतांना होत असलेली धडपड आणि मीं त्याला एकदम विचारल्या वेळेपासूनची त्याची एकंदर चलबिचल, या गोष्टी माझ्या तीक्ष्ण दृष्टींतून गेल्या नाहींत. यावरून कांहींतरी पाणी मुरतें आहे, असें तर मीं तेव्हांच ताडलें. आजेसासूबाई रागाच्या आवेशांत माझ्या बाबांविषयीं जें बोलल्या तें सर्व खरें, हें तर मला कळून चुकलेंच. आतां त्याविषयीं तर मला शंका नाहींच उरली; परंतु हें सारें खरें असावें, असें मला तेव्हांच कळून आलें होतें; कारण कोणीहि माणूस एखाद्याविषयीं इतक्या स्पष्टपणानें असें भलतेंसलतें उगीच बोलणार नाहीं. पिसाचा कावळा करील; पण मूळ पीस तरी असलं पाहिजे. तर हें पीस काय होतें ? बाबांनीं परजांत पडण्याजोगें, असें काय केलें होतें ? वगैरे गोष्टींचा साद्यन्त इतिहास कळावा असें मला फार फार वाटत होतें. घरांत दुसऱ्या कोणास या गोष्टी विचाराव्या ? सावत्र आईला तर कांहीं विचारतां येत नाहीं; येऊन जाऊन दादा काय तो. त्याला विचारायला गेलें तर ही दशा ! बाकी त्याच्या आतांपर्यंतच्या वागणुकीवरून तो थांगपत्ता लागूं देईल असें मला वाटलें नव्हतेंच; पण म्हटलें आपला धोंडा टाकून पाहावा. त्याप्रमाणें टाकला, तेव्हां मात्र माझा संशय फिटला. पण त्याच्याबद्दल किती वाईट वाटलें म्हणतां ! आपला बाप आणि त्याबजर असला वाईट प्रसंग यावा हें किती निंद्य ! परंतु न जाणों, त्यांना खरो तर कांहीं दोष नसतां त्यांजवर हा प्रसंग आला असेल, तर ती हकीकत कळून आपलें समाधान तरी करण्यास सांपडावें असें मनांत वाटून मी त्याला मला सर्व हकीकत सांगण्याविषयीं आग्रह करीत होतें.

पाहा, मनुष्याचें मन किती चमत्कारिक असतें ! आपलें माणूस आणि त्याच्या-विषयीं कांहीं वाईट ऐकलें तर आधीं तें खरेंदेखील वाटत नाहीं; बरें, पुढें तें खरें आहे अशाबद्दल खात्री झाली, तर त्याच्या हातून ती वाईट गोष्ट घडण्यास तशींच कांहीं नाइलाजाचीं कारणें झालीं असतील, असें म्हणून आपलें मन सबबी शोधूं लागतें. त्या सबबी खऱ्या असल्या तर मग कांहीं विचारायलाच नको; त्या पुढें करून जिथें तिथें आपण त्याची तरफदारी करतों. सबबी खऱ्या नसल्या तरी, "त्या खऱ्याच, लोकांना आंतलीं इंगितें ठाऊक नाहींत, त्यांना आपली निंदा करण्याची संवयच," असें म्हणून आपण आपल्या मनाविरुद्ध पण त्याच्या कृत्यांवर पांघरूण घालीत सुटतों. एवढें सारें कशामुळें ! तर "मी–आणि–माझें !" या मनुष्यस्वभावाला अनुसरूनच दादाचेंहि करणें होतें. तो आपला होतां होईल तों मला ती हकीकत कळूंच देऊं नये म्हणून खटपट करीत होता. शेवटीं मीं डोळ्यांत पाणी आणून त्याला म्हटलें, "दादा, जी गोष्ट सगळ्या जगाला ठाऊक आहे, आमच्यादेखत जरी नाहीं, तरी पाठीमागें कितीकदा तरी जीबद्दल लोक बोलत असतील, ती खरोखर आहे काय ? आणखी त्यांत खऱ्याचा अंश आहे किती? हें मला कळूं नये ना ? दादा मी आतां एवढी झालें म्हणतोस आणखी या असल्या गोष्टी आपल्याबद्दल लोक कां बोलतात, एवढें ठाऊकदिखील असूं नये ना रे ? तुझ्याखेरीज मला कोणी नाहीं, मला तूं कीं तुला मी. म्हणून ना मी जी ती गोष्ट तुला सांगायला येतें !

कांहीं एवढंसं झालं, कीं दादाला सांगायचं; कांहीं करायचं झालं कीं दादाला विचारायचं; तें कां बरं ? आणखी तूं हें असं करतोस ? आई असती तर...''

हे शब्द माझ्या तोंडून निघतात न निघतात तोंच त्याचें डोळे भरून आले आणि तो एकदम माझा हात धरून मला म्हणतो, ''पुरे, पुरे, यमे, मला तूं आणखी तुला मी, हीच गोष्ट खरी. आणखी ही मी जाणून नाहीं असें का तूं समजतेस ? सुंदरी तुझ्याहून किती तरी लहान; पण तिच्याबद्दल मला एवढें कांहीं वाटत नाहीं. मला तिची फारशी आठवणदेखील होत नाहीं. ती तरी माझी बहीणच ना ?—पण यमे, तुझ्याबद्दल खरें पुसशील तर माझ्यां मनांत जें प्रेम आहे, तें कांहीं विचारूं नकोस. त्यांत आणखी तूं असं बोललीस, आईची आठवण केलीस, म्हणजे तर माझ्या मनाची कांहीं विलक्षण स्थिति होते. तुला मी या अशा गोष्टी सांगत नाहीं, त्या कांहीं तुझ्यापासून लपवाव्या, तूं तीनतीनदा विचाराव्यास, मीं तीनदा तीनदा नाहीं नाहीं म्हणावें, अशाकरितां का ? हा वेडे ! अग, मला असं वाटतं, कीं मला ठाऊक आहेत तेवढया पुरेत, यमीला सांगून आणखी तिच्या जिवाला कशाला वाईट वाटवावं ? त्यांतून असल्या गोष्टी ऐकून घेण्याजोगी कांहीं तूं मोठी झाली नाहींस. अन् तुला कळून करायचं आहे काय ? नाहीं कळलं तर नाहीं का व्हायचं ? माझं जर ऐकशील तर आणखी वर्ष दोन वर्ष कांहीं तूं मला हें विचारूं नकोस.'' इतकें बोलून तो किती वेळ तरी स्वस्थ बसला, नंतर मनांत कांहीं विचार येऊनच कीं काय चट्कन् चेहऱ्यावर हसूं आणून माझ्याकडे वळून म्हणतो, ''किनई यमे, इकडे बघ, रागावूं नकोस. तूं आतां मुंबईस गेलीस म्हणजे मग मी होऊनच तुला सागेन. खरं यमे, तूं मुंबईला जाणार म्हणून ऐकलं, कधीं जायचं ?''

''इश्शं मेलं ! हें रे काय विचारतोस ? तुला किनई थट्टा करण्याची सवयच ! तुला कोणीं सांगितलं, आम्हांला लवकर मुंबईला जायचं म्हणून ?''

''कोणीं सांगितलं ? वा तुला नेणार आहेत त्यांनींच सागितलं; इतकंच नाहीं पण तुझी आजेसासू तुला बोलली तेव्हां तूं कुठें जाऊन रडत बसलीस आणखी मग तुझ्या मागोमाग कोणसं आलं आणखी त्यांनीं तुला...''

''पुरे मेलं; दादा, हें देखील का रे तुझ्याजवळ सांगायचं ? मला नाहीं बाबा असलं हें ठाऊक. पुरुषांचं किनई काय सांगावं न् काय नाहीं, कांहीं हेंच नसतं.''

''यमे'' दादा मला खोचून म्हणतो, ''कांहीं एवढंसं झालं, कीं तें तुला सांगायचं म्हणतेस मग हें कसं नाहीं बरं सांगितलंस ? बरं, तूं नाहीं सांगितलंस तर नाहीं, मला कळलंच. मला हें सांगितल्याबरोबर मीं काय म्हटलं ठाऊक आहे का पण ? मीं म्हटलं, 'अहो, ती शेंबडी बायको ती काय आणखी तिचं तुम्हीं समाधान तें काय केलंत ! तिच्याजवळ बोललांत काय ! छे. छे. छे. बोवा. तुम्ही तरी मला आपले बाईलवेडेच दिसतां !' इकडे बघ यमे, मीं जेव्हां असं म्हटलं, तेव्हां माझ्यावर एवढाले डोळे केले. मला वाटलं आतां आपलं न् यांचं वांकडं पडतं. पण तितक्यांत काय म्हणतात,

'तुम्हांला काय ठाऊक गणपतराव तिची योग्यता ! उगीच तुमची बहीण झाली एवढंच !' "

हें त्याचें सारें बोलणें ऐकून मनांतून मला काय पण आनंद झाला आहे म्हणतां ? मी जें काय विचारीत होतें तें सारें विसरूनच गेलें आणि त्यानें तिकडचें बोलणेंच पुढें सांगावें म्हणून मीं म्हटलें, " हो असं म्हटलं ? आणखी काय म्हटलं ? आणखी नाहीं का पुढें कांहीं म्हटलं ? सांग सांग कांहींतरी बनवून ! " यावर तो पुढें कांहीं बोलणार तोंच " काय एवढं बहिणभावंडांचं हितगुज चाललं आहे ? आम्ही येऊं का मधें ? " असें म्हणून आमच्या आईसाहेब मोठ्या थाटानें हसत हसत वर आल्या. त्या वेळीं त्यांचीं पावलें तर कोठें वाजलेलीं मीं ऐकलीं नाहींत आणि दादानेंहि ऐकलीं नाहींत; नाहीं तर तो केव्हांच बोलणें फिरविता अगर उगीच बसता. एकाएकीं आईसाहेब आल्याकारणानें आमचें बोलणे राहिलें; एवढेंच नव्हे तर आम्हांला एक नवीनच भीति उत्पन्न झाली. जिन्यांत चोरून येऊन उभें राहून त्यांनीं आमचीं सारीं बोलणीं ऐकलीं कीं काय ? ऐकलीं असावींत असें मला तर पक्कें वाटलें; कारण पूर्वी एकदोनदा आम्हांला त्यांच्या अशा आडून ऐकण्याच्या संवईचा अनुभव आला होता. शिवाय जीं माणसें मनानें कुत्सित, ज्यांचीं मनें वाईट, त्यांना दुसरें आपल्याविषयीं कांहींतरी वाईट बोलत असेल असा नेहमीं संशय; आणि असा संशय असल्यामुळें तें काय असेल, काय नाहीं, हें जाणण्याची उत्कट इच्छा. कोठें दुसरीं माणसें बोलत असतां आडून ऐकणें, कोठें हेर ठेवून चौकशी करणें, हे ती इच्छा तृप्त करण्याचे मार्गच !

आईसाहेबांनीं कांहीं ऐकलें असलें तरी तें आम्हांला दिसूं दिलें नाहीं. आम्ही मात्र आपल्या मनांत चरकून गेलों. झालें. आईसाहेब याप्रमाणें आल्या. नंतर आमचें बोलणें तितकेंच राहिलें. आम्हीं आपल्याकडून चांगली निवांत वेळ दुपारची; शनिवारमुळें दादाला दुपारची सुट्टी; बाबा घरीं नाहींत; आईसाहेब स्वस्थ झोप घेत आहेत, अशी वेळ शोधून बसलों होतों. आधीं मला दहाबारा दिवस इकडे माहेरीं मुळीं पाठविलेंच नाहीं; त्यांनून ते दिवशीं पाठविलें तेंदेखील, 'संध्याकाळीं परत ये' म्हणून सासूबाईंनीं सांगितलेले; कारण पाठविली होती त्यांनीं आपल्याच परवानगीनें. त्यांतल्या त्यांत मीं आपली येऊन दादाला तें बिचारलें, तर वर सांगितल्याप्रमाणें सारें झालें. त्यांतच मग दादानें मला आवडत्या अशाच गोष्टी काढून फसविलें; आणि त्या गोष्टी संपल्यावर मी पुनः विचारणार, तर वेळ नाहीं. सासरीं जायचें. तेव्हां अर्थातच विचारण्याचें पुढें ढकललें आणि पुढें ढकलतां ढकलतां विसर पडण्याच्या मजलेपर्यंतच जाऊन त्याची इतिश्री झाली. माझ्या स्वतःच्यासंबंधानें विशेष सांगायची गोष्ट झाली ती ही होय. आतां दादाच्याहि संबंधानें एक महत्त्वाची गोष्ट झाली, ती त्याचें लग्न झालें ही होय.

◆ ◆ ◆

## ३३ : दादाचें लग्न

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

होय याच मध्यंतरींच्या वेळांत दादाचं लग्न झालं. वर सांगितलेली गोष्ट घडून दोनतीन महिने होतात तोंच दादाचें लग्न झालें. त्याच्या लग्नाची हकीकत लिहिण्याजोगीच आहे. लग्न होण्यापूर्वी सुमारें पांचसहा महिने बाबा एक दिवस जेवायला बसले होते. दादा शेजारीं बसला होता, समोर माईसाहेब आणि त्यांच्या शेजारीं मी, अशीं आम्ही जेवायला बसलों होतों. जेवतां जेवतां सहज माईसाहेब म्हणाल्या, " आतां गणपतरावाचं लग्न करायचे दिवस आले बरं का ? त्याला आज एक मुलगी सांगून आली आहे. "

खरोखर माईसाहेब एवढ्याशा, दादाहून लहान आणि त्यांनीं मोठ्या पोक्तपणानें वरील शब्द म्हटलेले पाहून कोणालाहि हसूं येण्यासारखें होतें. बाकी त्या आमच्यादेखत खुशाल बोलत आणि बाबाहि बोलत त्यांच्याशीं; तें आज कधींपासून सुरू झालें होतें. त्या बोलत, हसत, त्यांची थट्टासुद्धां करीत; आणि हें आम्हीं पाहिलें म्हणजे आम्हाला इतकें आश्चर्य वाटे, कीं कांहीं पुसूंच नये. मागली आठवण होई; आईशीं बाबाचें वर्तन कसें असे तें मनांत येई, आणि आई कशी वागे हें आठवें; आणि हें पाहिलें म्हणजे मग काय जें वाटे तें वाटे बाबांना हें खपतें तरी कसें ? असें वाटे. आमचीं आई बाबांच्या समोर बसायची तर कुठली, पण डोळ्यांशीं डोळा लावून उभीदेखील राहायची नाहीं. उभी राहायची ती अशी बाजूला तोंड करून. आणि माईसाहेब कमरेचा किल्ल्यांचा जुडगा खळखळ वाजवीत बाबांच्याकडे कोणी आलें असलें तरीदेखील त्यांच्या माडीत जायच्या, एक ना दोन ! आईची आणखी माईसाहेबांची वागणूक ताडून पाहावयाची म्हटलें तर कितीतरी लिहायला आहे ! एक भारूडच होईल. एक, एक तरी दोघींमध्यें सारखेपणा ! रामाचें नांव ! आमची आई ती आईच. तिची गोष्ट कशाला ? बाबांचे स्नेही इतके बाबांच्याकडे येत, पण ती एकदोघांशीच आपली तुरळक बोले. बाकीच्यांच्या दृष्टीसदेखील पडली नाहीं. आणखी माईसाहेबांचा पंथच निराळा ! त्या म्हणजे कोणाशीं बोलत नसत, असें मुळीं नाहींच. अंमळ पांचचारदा गृहस्थ आला, कीं त्याच्याशीं बोलायला यांना कांहीं हरकत नाहीं, आणि कोणाला काय काम सांगावें आणि काय नाही याचा तर सुमारच नसे. एकंदरींत तीसपस्तीस वर्षांच्या बाईला जें वर्तन कदाचित् शोभलें असतें, तें सोळा वर्षांच्या आंत त्यांनीं उचललें होतें. आणखी चमत्कार हा, कीं बाबा तिला कधीं चकार शब्दहि बोलत नसत ! ज्यांनीं त्यांचें पूर्वीचें आमच्या आईशीं वर्तन पाहिलें असेल, त्यांस या गोष्टीचा चमत्कार वाटल्याखेरीज राहणार नाहीं. असो.

वर सांगितल्याप्रमाणें आम्ही जेवावयास बसलों होतों. आमची आजी—माई-साहेबांची आई—काशीयात्रेला गेली होती. हल्लीं एक बाई ठेविली होती ती वाढीत होती. जेवतां जेवतां वर सांगितलेला प्रश्न माईसाहेबांनीं बाबांस केला. बाबा कांहीं बोलले नाहींत. पुनः—

" कां, बोलायचं नाहीं वाटतं ? गणपतरावाचं आतां लग्न करायचं नाहीं का ! " माईसाहेबांनीं विचारलें. " पाहूं आतां. आतांच काय आलं आहे त्याचं एवढं ? " बाबांनीं उत्तर केलें. हीच काय ती सुरुवात आणि ते दिवसापासून मला दादानें सांगितलें, कीं तिनें बाबांच्या पाठीमागें एकसारखी भुणभुण लाविली होती. रोज उठल्याबसल्या दादाच्या लग्नाची गोष्ट तिनें बाबांजवळ काढावी. " लोक आतां हसतात. मुली सांगून येतात, त्यांना सांगायचं तरी काय ? हें नाहीं कांहीं चांगलं, झाला आतां तो मोठा. " आमच्या आजीचें आणखी बाबांचें चांगलें असतें तर तिनें जसें गाणें लावलें असतें तसें तिनें लावलें. पुढें आपली रोज मुलींच्या गोष्टी सांगूं लागली. ' ती अमक्याची मुलगी बरी आहे, पण हुंडा कांहीं फारसा नाहीं; शिवाय माणसें आपलीं अशींच आहेत. तमक्याची मुलगी चांगली आहे, हुंडा बराच देतील; पण एकदां हुंडा दिला, कीं मग एक चिंधुकदिखील मिळायचें नाहीं. तमक्याची मुलगी अंमळ लहान आहे, आणखी तिरळी आहे; पण आहे सुरेख. बाप मुन्सफ आहे; हुंडा रगड; मुलीची आजी करण्या-संवरण्याविषयीं प्रख्यात. ती मुलगी एकदा पाहावी तर खरी. ' अशी सारखी भुणभुण चाललेली असे. एक दिवस तर ती मला म्हणाली, " यमे, दादाचं आतां लग्न नको का ग करायला ? त्याच्या बरोबरीच्या मुलांचीं लग्नं होऊन बायकांना नाहणंदिखील यायला झालीं. तूं तरी आतां लहान का ? एव्हांना एक मूलदिखील व्हायचं, पण अजून नहाणालादेखील......" पुढें ती काय बोलणार तें जाणून लाजून मीं तिला म्हटलं, " खरंच माई, दादाचं लगीन यंदा केलंच पाहिजे, बाबा आपले कांहीं बोलत नाहींत. आजोबांनीं एकदा नांव काढलं तर दादानंच त्यांना दाबलन्..." हे माझ्या तोंडून शब्द निघतात न निघतात तों ती मला मोठ्या आतुरतेनें म्हणते, " काय ? काय ? दादानं त्यांना दाबलं ? तें कसं काय ? "

तो तिच्या तोंडचा प्रश्न ऐकल्याबरोबर मीं आपली जीभ चावली. एक वेळां आजोबांनीं दादाच्या लग्नाबद्दल बाबांना पत्र लिहिलें होतें, त्या वेळीं बाबांनीं त्यांना " मला त्याचें लग्न एव्हां कर्तव्य नाहीं " असा जबाब पाठविला होता. परंतु त्यांनीं त्या जबाबाला न जुमानतां आणखी एक पत्र पाठविलें, बाबांनीं तें वाचून केराच्या टोपलींत टाकून दिलें, तेव्हां दादानें स्वतः मुखत्यारानें आजोबांना पत्र लिहिलें. त्यांत लिहिलें कीं, " पुनः आपण या बाबतींत पत्र लिहूं नये. येथें उगीच त्याबद्दल टीका होऊन बाबा रागावतात......इत्यादि. " त्यानंतर एका सुट्टींत मी आणि दादा आजोळीं गेलों असतां आजोबांनीं आणखी आजीनें " त्याची एवढी प्रतिष्ठा कशाला पाहिजे ! तूं आहेस

तर आम्ही इकडच्या इकडेच तुझं लग्न करून टाकूं, त्याला आयत्या वेळीं पत्र टाकूं· आला तर वाहवा, नाहीं तर आम्हीच ठेवूं देवक आणखी टाकूं बार उडवून! बैस म्हणावं नाहीं नाहीं म्हणत " असें म्हटलें. असें नुसतें म्हणून राहिली नाहीं, तर मुली वगैरे पाहण्याच्या खटपटीस लागली. तेव्हां एक दिवस दादानें आपले आजोबांस स्पष्ट सांगितलें कीं, " माझ्या परीक्षा उतरल्याखेरीज मुळीं मला लग्नच करायचं नाहीं. तुम्ही कांहीं या खटाटोपांत पडूं नका. " आजोबा रागावले. हा तिथून उठून गेला. आजीनें तर जें तोंड सोडलें तें कांहीं पुसूंच नका– " घ्या आतां, गणप्या ना? आमचा गणप्या फार चांगला, ठेवा गणप्याला डोक्यावर चढवून! आतां लागला कीं नाहीं डोक्यावर मिरीं वांटायला! अहो, तो तरी मुलगा कोणाचा? अन् नातू तरी कोणाचा? " हें शेवटचे वाक्य थोडेंसें कुचेष्टेनें बोलली. आजोबा संतापून तिच्या पुढें कांपत कांपत आपले हात ओवाळून म्हणतात—" आपलाच! आपलाच! " मग काय विचारतां! एकच गोंधळ! दादाला तर असें झालें, कीं आतां काय करावें? पण दादाची सुटी लवकरच संपून आम्ही परतच आलो. परत निघण्याच्या दिवशीं आजी मला पोटाशीं धरून इतकी कांही रडली की काहीं विचारूं नये. दादाला ती कितीतरी बोलली. " तो मेला निर्दयच आहे, त्याच्या हृदयाला कधीं द्रव यायचाच नाहीं. त्याला आपल्या आजी· बद्दल काय वाटायचं आहे? त्याला आपल्या आईची आठवणदेखील होत नसेल. काय मेला मुडदा माकोजी आम्हांला गोष्टी सांगतो आहे! म्हणे माझ्या परीक्षा झाल्याखेरीज माझं लग्नच करायचं नाहीं. जा नको करूं. इथें आम्ही तरी आतां कशाला त्या नादांत पडतों आहोंत? बरं झालं कळून आलं एकदां. आतां कमला म्हणून पाश राहिला नाहीं. "

ही सर्व हकीकत इकडे बाबांच्याकडे कोणाला ठाऊक नव्हती. आणि ' दादानंच त्यांना दाबलंन् ' हे उद्गार माझ्या तोंडांतून निघतात न निघतात तोंच माईसाहेबांनीं काय काय म्हणून विचारलें तें त्यामुळेंच. असो. एकदा तोंडांतून गोष्ट निघून गेली आणि मग मी लागलें कांहीं नाहीं करायला; तें का साधतें? सगळी इत्थंभूत हकीकत जरी नाहीं, तरी पण तिनें मुख्य गोष्ट माझ्याकडून काढून घेतलीच आणि मग दादाला गांठून ती म्हणते, " कां गणपतराव, परीक्षा झाल्याखेरीज लगीन करायचं नाहीं, मग आपलं आपण फटाकडी बायको पाहून करायचं असा का बेत आहे? हें नव्हतं मला ठाऊक! मला काय वेडीला? आपली लागलें तिकडच्या पाठीस. " अशा तऱ्हेनें एकदोनदा झालें, तेव्हां दादा एकदा त्रासून म्हणाला, " हो माई, माझा असाव निश्चय आहे. माझ्या परीक्षा उतरून मी बी. ए. होईपर्यंत कांहीं लग्न करायचं नाहीं." असें दादानें उत्तर देण्या-बरोबर, " ठीक, ठीक, निश्चय कांहीं वावगा नाहीं; पण चालणार कसा एवढंच पाहायचं?" असें हसत हसत ती म्हणाली आणि कांहीं चमत्कारिक दृष्टीनें त्याच्याकडे पाहात तेथून चालती झाली. वरील गोष्ट घडून पांचसहा दिवस कांहीं झाले नसतील तों दादाच्या लग्ना· विषयीं बाबा मनापासून बोलूं लागलेसें दादाच्या नजरेस आलें. मंडळी बसली म्हणजे

मंडळींत मुलींच्या गोष्टी; एकदोघे स्नेहीसोबती घेऊन मुली बघायला जाऊं लागले. कधीं कधीं मुली घरीं येऊं लागल्या. दादाच्या अंगाचा तिळपापड उडूं लागला. लग्न करणार आपलें, आणि आपल्याला न विचारतां न सांगतां खुशाल मुली पाहायला लागले, तेव्हां आपल्या मनाचे जे बेत होते, ते सर्व व्यर्थ होऊन एखाद्या बाहुल्याप्रमाणें आपल्याला वागविणार असें वाटून त्याचे मन फार अस्वस्थ झालें. शेवटीं एक दिवस तो मजजवळ रडलादेखील. त्या वेळीं त्याच्याशीं समदुःखी होण्याइतके माझे विचार प्रौढ झाले नव्हते. मीं उलट त्याला म्हटलें, "दादा, हें रे काय, वेळीं अवेळी रडतोस? आतां तुझं लग्न व्हायचं. मला वहिनी—" पण तो आपला तें ऐकून तेथून उठूनच गेला. पुढें वाटतें कोणाच्याकरवीं त्यानें बाबांना निरोप सांगितलान् कीं माझ्या मनांतून एव्हांशीं लग्न करायचें नाहीं. माझ्या परीक्षा झाल्यावर मग त्या नादाला लागावें. बाबांनी त्याला त्याच माणसाच्या हातीं परत सांगून पाठविलें कीं, "त्याला म्हणावं, तुझ्या मनांत काय आहे काय नाहीं हें आम्ही तुला विचारायला आलों म्हणजे मग आम्हांला सांग." आणि हे उत्तर आल्यानंतर तर लग्नाची उचल फारच जारीनें चालली. शेवटीं दादानें वाटतें एक पत्र लिहून बाबांच्या टेबलावर ठेविलें. त्यांत मजकूर निरोपांतलाच होता; तेव्हां बाबांनीं त्याला बोलावून खूप कानउघाडणी केली आणि शेवटीं सांगितलें, "आपणाला आतां कान फुटले, ठीक आहे. आपल्याला आपल्या मताप्रमाणें वागायचं असल्यास घरांत चालायचें नाहीं. आपली सोय बाहेर पाहावी. या घरांत वागायचं माझ्या मनाप्रमाणें." मग काय करतो बिचारा? धडपड केली आणि उगीच बसला. मुलगी पाहिली माईसाहेबांच्या पसंतीनें; हुंडा घेतला साडेसातशें रुपये; आणखी शिवाय विहिणीचा मान निराळाच. त्याबद्दल कायसे सवाशें रुपये ठरले होते. तोंडधुणी, रास-नहाणीं, दगडन् धोंडें! माईसाहेबांनीं आपले मानपान यथास्थित करून घेतले. आतां त्या लग्नाची हकीकत अथपासून इतिपर्यंत मी कांहीं देत नाहीं. एक मात्र विशेष गोष्ट सांगतें, कीं सगळें ठरविल्यावर आजोबांना आणखी आजीला बोलावणें गेलें. आजोबा नाहींच आले; आजी बिचारी आली; तिला मी कुठून आलें असें होऊन गेलें. कारण तिला कोणीं पुसलें नाहीं. सारा टेंभा माईसाहेबांचा आणखी त्यांनीं जमविलेल्या साळकाया-माळकायांचा. मला आपलें विचारलें म्हणजे काय, जितक्यास तितकेंच! सुंदरी तर कुठलीन् काय? मी आपली तिला सोडीत नसें एवढेंच! दादाचें मन कसें काय होतें हें सुनमुखाच्या वेळीं झालेली एक गोष्ट सांगितली म्हणजे त्यावरून समजेल. सुनमुखाच्या वेळीं नवरानवरी मांडीवर बसवून दोघांच्या तोंडांत साखर घालतात, त्या वेळी आजीनें साखर घातल्यावर (आजीनें या वेळी आईची आठवण होऊन मुकाट्यानें डोळ्यांवाटे कितीतरी पाणी काढलें,) नवरा, नवरी माईसाहेबांच्या जवळ आली, तेव्हां दादाच्या तोंडांत साखर घालतांना त्या कशा म्हणतात—"परीक्षा उतरल्याबद्दल ही साखर बरं का! तोंड गोड होऊं द्या!" त्या वेळीं बिचाऱ्या दादाचें तोंड किती कडू झालें होतें तें, मीं त्याच्याकडे पाहिलें त्या मला, त्याचें त्याला, किंवा योग्य वेळीं

कसा पण टोमणा दिला, असें वाटून दिमाखानें हसत त्याच्याकडे पाहणाऱ्या माई-साहेबांनाच काय तें ठाऊक!

एकंदरींत अशा हकीकती होऊन दादाचें लग्न झालें आणि मला वहिनी आली.

◆ ◆ ◆

## ३४ : मागल्या पुढल्या हकीकती

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

याच काळांत घडलेली आणखी तिसरी गोष्ट, दुर्गीचें न्हाण आणि पुढें थोडेंच दिवसांत झालेलें गर्भारपण. माझ्या माहेरीं हळदीकुंकवाच्या निमित्तानें येऊन तिनें ज्या कांहीं गोष्टी सांगितल्या त्या व त्या वेळची तिची एकंदर शारीरिक व मानसिक स्थिति मीं वर्णन करून सांगितलीच आहे. त्यानंतर थोडेच दिवसांनीं तिला ऋतु प्राप्त झाला आणि पुढें व्हावयाचा तो संस्कारहि झाला. तेथून पुढें तिची व माझी कधीं फारशी गांठ पडली नाहीं; परंतु दिवसानुदिवस ती किती खराब होत चालली आहे हें मला ती कधींमधीं भेटे त्यावरून स्पष्ट दिसे. मला तिच्याबद्दल इतकें वाईट वाटे, कीं कांहीं पुसूं नये. तिच्या आजेसासऱ्याचें म्हातारपण अतिशय झाल्यामुळें आतां त्याला पैसे मिळविण्याची तितकी ताकद राहिली नाहीं. मागें काय थोडेबहुत मिळविलें होतें, तेवढ्यावर उदरनिर्वाह करण्याचा प्रसंग येऊन ठेपला. तथापि तो होता तोंपर्यंत कसेंबसें तरी त्यानें चालविलें होतें. 'तो होता तोंपर्यंत' म्हणायचें कारण एवढेंच, कीं दुर्गीला ऋतु प्राप्त झाला त्या सुमारासच तिच्या आजेसासऱ्यास अर्धांगवायूचा झटका होऊन तो पुढें थोडे दिवसांनीं वारला, यामुळें दुर्गीवर सर्व मंडळीची मोठी इतराजी झाली. तिच्या ऋतुप्राप्तीचाच हा दुष्ट पायगुण, कीं आजेसासरा वारला, असें म्हणून तिच्या नांवानें सगळीं खडे फोडूं लागलीं आणि असें म्हणण्याला, विशेष कारण हें, कीं आजेसासरा वारल्यामुळें घरांत पैसा येण्याचें जें काय द्वार तें अजिबात बंद झालें. तेव्हां म्हाताऱ्याचें मरण त्यांच्या घराला चांगलेंच जाणवून आतां वेळेची भ्रांति पडते कीं काय असें वाटूं लागलें. दुर्गीचा सासरा कोण्या तऱ्हेचा माणूस होता हें वाचकांस सांगितलेंच आहे. त्याचा बाप वारल्याबरोबर त्याच्यादेखील धंद्याला धक्का बसला. त्याचें चाललें होतें तें मुळी त्याच्या बापामुळेंच. बाप कोर्टांत वकिली करी. हा तेथेंच कोणाचीं पत्रें, कोणाचे दस्तऐवज लिहून देई आणि चारदोन आणे मिळवी. बाप वारल्याबरोबर अर्थातच तें अगदीं जरी नाहीं तरी थोडेंसें बंद पडलें. चुलतसासरे कोण्या तऱ्हेचे गृहस्थ होते, हेंहि वाचकांस ठाऊक आहेच. त्यानें थोडेच दिवसांत भांडाभांडी करून काय चार दागिने, भांडींकुंडीं होतीं, त्यांची वाटणी करून पुष्कळसा भाग उपटण्याच्या खटपटींत थोडेंसें यश मिळवून वेगळें निघण्याचा बहाणा केला व पुढें थोडेच दिवसांनीं आपलें कुटुंब घेऊन

दुसऱ्या कोठल्याशा गांवीं चाकरी धरून तो निघून गेला. दुर्गीचा नवरा होता तसाच शुंभ! तो कांहींएक न करतां घरीं आईला त्रास देऊन जेवी मात्र; त्याला कांहीं दुसरा आतां उद्योग नव्हता. आतां त्यानें शाळा अगदीं उघडपणें सोडली. घरीं कोणी आई वगैरे बोलली तर तिला अगदीं हवें तसें टाकून बोले. कोणाची पर्वा नाहीं. बायकोला तर अतिशय छळी. अशा स्थितींत दुर्गीला कांहीं दिवस गेले. पोरीचें वय काय, तिची शरीरप्रकृति काय आणि तिला हें गर्भारपण आलें! मग काय विचारतां? त्यांत आणखी सासरचें दारिद्र्य, घरांत अतोनात काम पडे. बरें, तितकेंहि काम करून सुखाचा शब्द मिळेल तर शपथ! तिची सासू फारशी बोलत नसे. वास्तविक पाहतां ती मुळींच बोलायची नव्हे. खरोखर तिचा स्वभाव फार चांगला; परंतु एकामागून एक संकटें येऊन ती अगदीं त्रासून कावून गेली होती. सासरा वारला, नवरा असा अजागळ, दीर भांडून वाटणी घेऊन थोडेंबहुत अधिक आगळें लुबाडून चालता झाला. पोरगा हा असला विजुटा, त्याची आशा धरायलाच नको. धाकटा पोरगा विडयाबिड्या ओढायला लागलाच होता मिळून तिला बिचारीला आशेला कांहीं जागाच राहिली नव्हती. करते काय? घरांतल्या गोष्टी काय असतात आणि काय नाहीं या तिच्या तिलाच ठाऊक! आतां दोन प्रहरीं काय करणार? असा प्रश्न रोज तिच्या मनांत येई, त्यामुळें बिचारी कावून गेलेली! कोठें राग काढायला जागा नाहीं. बोले एखादे वेळीं सुनेला, झालें. करते काय? त्यांतून आणखी ही गोष्ट होती, कीं हिच्या ऋतुप्राप्तीला वाईट वेळ लागल्यामुळेंच हा सर्व गहजब आपणावर गुदरला असें तिला पक्कें वाटून चुकलें होतें. बायकांच्या आपल्या समजुती! त्यामुळें तिचा दुर्गीवर थोडासा रोषच झाला होता. असो.

वर सांगितल्याप्रमाणें बिचाऱ्या दुर्गीची सध्यांची स्थिति होती. तिला आतां सहावा किंवा सातवा महिना होता. ती पहिल्या बाळंतपणासाठीं माहेरी जाणार होती तिच्या माहेरच्या मंडळीची स्थिति होती तीच होती. तिच्या बापास थोडासा पगार जास्त झाला होता, एवढेंच काय तें विशेष!

आमच्या शंकरमामंजींनीं दोनहि मुलींचीं लग्नें केलीं होतीं हें मागें एकदा दर्शविलेंच आहे. थोरली मुलगी—वारूवन्सं-नानासाहेब दिवटे नांवाच्या एका गृहस्थाच्या मुलास दिली होती. आणि धाकटी—बनूवन्सं—यांचा नवरा सुमारें सदतीस अडतीस वर्षांचा असेल. तो दूर एका गांवीं मोठ्या पगारावर होता, परंतु त्याचे घरांत कोणीच वडील माणूस नसल्याकारणानें त्यानें तिला कांहीं दिवस माहेरींच ठेवण्याचा विचार केला होता. शंकरमामंजोचा एकंदर स्वभाव कसा काय असे याचें थोडेंसें दिग्दर्शन केलेलें वाचकांनीं वाचलेंच आहे. तेव्हां आपल्या दोनहि पोरी पैसेवाल्या नवऱ्या मुलांस त्यांनीं द्याव्या हें अगदीं साहजिक आहे; असें कोणासहि वाटेल. त्या दोघींचीं लग्नें झालीं तेव्हां माझें लग्न झालें नव्हतेंच, यामुळें मला त्याबद्दल हकीकत प्रत्यक्ष अशी ठाऊक नव्हतीच. जी काय ठाऊक होती ती ऐकून. शंकरमामंजींचा चिक्कूपणा जेथें तेथें कसा पुढें येई त्याबद्दलचीं

उत्कृष्ट उदाहरणें म्हणजे या दोन मुलींच्या लग्नाच्या हकीकती. वास्तविक ही हकीकत यापूर्वी यायला पाहिजे होती. असो. थोरली मुलगी सरासरी दहा वर्षांची झाली, तेव्हांपासून तिच्या लग्नाची गोष्ट तिचा चुलता, आमचे गोपाळमामंजी, आणखी आजेसासूबाई यांनीं चालविली. शंकरमामंजींनीं तिकडे कांहो केल्या लक्षच दिलें नाहीं. त्यांच्या मनांतला बेत हा होता, कीं आपल्याला एक कपर्दिकदेखील खर्चायला न पडतां लग्न झालें पाहिजे. गोपाळमामंजींचा विचार हा, कीं चांगलें स्थळ पाहून दोघांनीं मिळून हजार एक रुपये खर्च करून पोरीचें लग्न करावें. आपली मुलगी काय अन् आपल्या भावाची काय, एकच ! त्यांत कांहीं दुजाभाव नाहीं, असें गोपाळमामंजींचें मत. शंकरमामंजीचा तर मनांतला विचार हा, कीं आपल्या भावानें अगदीं सगळा खर्च करावा; आपल्यावर एक कवडीचाहि बोजा पडूं नये. मग कांहीं हरकत नाहीं. परंतु उघडपणें तसें बोलून तर दाखवितां येत नाहीं. आपल्या पदराला खार न लागतां साधेल तें साधावयाचें हें तर त्यांच्या सर्व कृत्याचें इंगित ! तें साधण्यासाठीं त्यांनीं यत्न केला. "आपल्याजवळ पैसे नाहींत, चांगलें स्थळ कसें मिळावें ? आपलें एखादे गरिबाचें नाहींतर बिजवराचें स्थळ पाहून, द्यावी," अशी कुरकूर त्यांनीं प्रथमपासून चालविली. या बोलण्यांतलं वर्म बिचाऱ्या भोळ्या गोपाळमामंजींच्या लक्षांत कोठलें यायला ? त्यांनीं त्यांना धीर देऊन, "आपण तें करून टाकूं. स्थळ चांगलं, मुलगा चांगलासा पाहून देऊं. काय येऊनजाऊन हजार बाराशें खर्च होईल एवढंच कीं नाहीं ? कांहीं हरकत नाहीं; कांहीं रुपये आहेतच. पांचचारशें लागले तर काढून आणूं." असें म्हणून त्यांनीं स्थळ पाहून लग्न करून टाकलें. स्थळ कसें मिळालें, काय मिळालें, याची हकीकत देण्याची कांहीं आवश्यकता नाहीं, कारण त्यांत कांहीं विशेष नव्हतें. लग्नांत चांगला बाराशें तेराशें रुपये खर्च झाला. बिचाऱ्या गोपाळमामंजींनीं स्वतःची थोडीशी पुंजी होती ती देऊन चारपांचशें रुपये कर्ज काढले. लग्न-बिघ्न झाल्यानंतर शंकरमामंजींनीं त्या कर्जाबद्दल एकसारखें रडगाणें लाविलें. आतां हें कर्ज फिटणार कसें ? उगीच भरीस भरल्याप्रमाणें लग्नांत खर्च केला. आपल्या तर दांतांवर मांस नाहीं. कुटुंब एवढें थोरलें. असं रडगाणं गाऊन पण एका कवडीची जर भावाला हातसोडवणूक केली असेल तर शपथ ! उलट कर्ज केल्याबद्दल त्याच्या डोक्यावर टेपर ठेवून कुरकूर चालविली होती. होतां होतां गोपाळमामंजींनीं कर्ज तर फेडलें. परंतु इतक्या अवकाशांत त्यांच्या बायकोच्या सांगण्यानें म्हणा कीं शंकरमामंजींचा कावा लक्षांत आल्यामुळें म्हणा, पण त्यांनीं दुसऱ्या लग्नाच्या भानगडींत पडायचें नाहीं, असा निश्चय केलेला दिसला. मनुष्य कितीहि भोळा असला, तरी घरांत अगदीं उघडउघड होणाऱ्या गोष्टी लक्षांत आल्याखेरीज कशा राहतात ? या गृहस्थानें घरांत कधीं एक कवडी द्यायची नाहीं, कोणत्याहि तऱ्हेचा खर्च करायचा नाहीं; पैसे येतील ते बँकेंत टाकायचे. असा कांही अधिक आगळा प्रसंग आला तर भाऊ करतोच आहे. या दुसऱ्या मुलीच्या लग्नाच्या वेळीं भाऊ कांही बोलत नाहीं असें जेव्हां शंकरमामंजींनीं पाहिलें, तेव्हां त्यांनीं आपली एकंदर शैलीच बदलली. मुलगी चांगली मोठी झाल्याखेरीज तिचें लग्न करणें चांगलें

नाहीं व ती बारा वर्षांची होईपर्यंत तिचें लग्न करायचें नाहीं, असा आपला अगदीं कृतनिश्चय आहे असें ते बोलून दाखवूं लागले. घरांतली मंडळी कुरकूर करूं लागली तरी हे तिकडे लक्षच देईनासे झाले. पुढें बनूवन्सं बारा वर्षांच्या झाल्या तेव्हां "प्रथम-वरापेक्षां बिजवरच चांगला, त्याला बायकोची विशेष आवड असते" असें म्हणून व सगळी मंडळी नको नको म्हणत असतां कोणाचें न ऐकतां भावाजवळून चार दिवसांसाठीं म्हणून दोनतीनशें रुपये घेऊन आपण आपल्या बायकोला घेऊन एका खेडयाला जाऊन पोरीचें लग्न करून आले! साऱ्या मंडळींना व त्यांच्या बायकोला अतिशय वाईट वाटलें. आपण गप्प बसल्यामुळें या पोरीचें नुकसान झालें असें गोपाळमामंजींस वाटूं लागलें. नवरा किती वयाचा होता हें वर सांगितलेंच आहे. लग्न झालें त्या वेळीं व पुढें थोडे दिवस बनूवन्संचा नवरा पुण्यांतच होता. पुढें त्याची दुसऱ्या गांवीं बदली झाली, त्या वेळीं बनूवन्संना त्यानें नेलें नाहीं, कारण असें सांगितलें कीं, आपल्या घरांत कोणी मोठें माणूस नाहीं, मुलगी चांगली मोठी होईपर्यंत माहेरींच ठेवावी. मुलगी मोठी झाली तरी गृहस्थाचें पत्र येईना. यांनीं दहा पत्रें पाठवावीं तेव्हां एखाद्या पत्राचें उत्तर पाठवावें आणि त्यांत 'आणूं आतां, इतक्यांत काय आहे गर्दी!' असें लिहावें. पुढें अशी बातमी लागली, कीं त्यांना बाहेरचा नाद लागला असून त्याच्या पायीं दुसरें कांहींच सुचत नाहीं. ही बातमी आल्या दिवसापासून बनूवन्संची वृत्ति पार बदलली. आपल्या नवऱ्यास आपली गरज नाहीं असें त्यांस वाटूं लागलें आणि असें वाटूं लागल्यावर अर्थातच त्यांचा पहिला ताठा कमी होऊं लागला. आतां ती बिचारी एकीकडे जाऊन बसे, फारसें कोणाशीं बोलत नसे, त्यांत आणखी थोरल्या बहिणीची स्थिति आपल्यापेक्षां बरी आहे असें पाहून तर तिला फारच वाईट वाटे.

एकदोनदा बनूवन्सं आणि थोरल्या वन्सं यांनीं माझी भलतीच् सलतीच थट्टा करण्याचें मनांत आणून एके दिवशीं रात्रीं घाट घातला. परंतु असल्या गोष्टींचा तिकडे अगदीं तिटकारा असल्यामुळें तिकडून जेव्हां चांगली थप्पड बसली तेव्हां पुनः त्यांनीं त्या बाबतींत नांव काढलें नाहीं.

अशी माझी व एकंदर इतर मंडळींची सध्यां स्थिति होती. यानंतर थोडेच दिवसांत माझ्या स्थितींत फरक झाला, तो काय वगैरे पुढील प्रकरणीं देईन.

◆ ◆ ◆

## ३५ : आशा आणि निराशा

* * * * * * * * * * * * * * *

मला आतां खरोखर असें झालें होतें, कीं केव्हां एकदा पुण्याहून सुटका होईल. तिकडच्या पुण्यांतल्या कॉलेजाच्या शेवटल्या परीक्षेची वेळ अगदीं जवळ येत चालली होती, यामुळें आतांशा कॉलेजांतून घरीं येणें फार कमी होत होतें व त्यामुळें ( ती पहिली भेट सांगितली आहे त्यानंतर माझी भीति जरा बरीच कमी होऊन एखादवेळ आमची चोरूनमारून गांठ पडे ) एकमेकांची गांठ पडणेंहि दुरापास्त झालें होतें. कारण सगळा चोरटा कारभार. त्यांत घरीं येणेंच कमी झाल्यावर मग काय ? मोठया कुटुंबांत आधीं अडचणी अनेक, त्यांत कांहीं कांहीं कारणें विशेषच प्रतिकूल झाल्यावर मग काय विचारतां ? बनूवन्सं नेहमीं आमच्याजवळ असायच्या. त्या आम्हांला आधीं प्रतिकूलः आणि त्यांत त्यांनीं एके शनिवारीं मला तिकडे पाठविण्याचा घाट घातला असतां त्यांस तिकडून " हा असला चहाटळपणा मला खपायचा नाहीं," असें म्हणून खरोखरीची थप्पड मिळाली. मग काय विचारतां ? आधींच तारें आणि त्यांत शिरलें वारें. त्या फुरंगटून त्यांनीं आम्हां दोघांशीं अगदीं अबोला धरला. आणि तिकडे कांहींच करतां येईना तेव्हां मजवर विशेष दांत धरला. माझें उणें पडेल कुठें ? आणि तेवढेंच काढून माझा छळ होईलसें करीन केव्हां ? असें त्यांस होई. वर सांगितल्याप्रमाणें खाल्लेल्या थपडीमुळें तर त्यांनीं जें आकाशपाताळ एक केलें आणि त्यामुळें आजेसासूबाईंनीं जो आम्हां दोघांवर वर्षाव चालविला तो कांहीं पुसूंच नये. त्यात आणखी काय झालें, कीं ती गोष्ट घडल्यावर पुढच्याच रविवारीं बनूवन्संनीं आम्हां दोघांस जिन्यामध्यें एकमेकांशीं कांहीं बोलतांना पाहिलें. सगळी मंडळी जेवणाच्या गर्दींत खालीं होती आणि मला काकवी आणण्यासाठीं म्हणून माडीवर चढण्यास सांगितलें. मी माडीवर चढायला आणि तिकडून खालीं यायला एकच गांठ पडली. मी आपली तशीच पळून जाणार होतें. परंतु अडवून बोलल्यावर इलाज काय ? " तूं कांहीं वाचीत नाहींस हें अगदीं चांगलं नाहीं. तुझ्याकरितां मीं आज दोन चांगलीं बुकें आणलीं आहेत. तीं वाच—" असें तिकडून बोलणें होऊन " आतां ही वेळ नव्हे बोलत उभें राहायची " असें मी बोलायला आणि बनूवन्संनीं जिन्याच्या तोंडाशीं येऊन " वहिनी, बोलणें झाल्यावर का काकवी आणणार ? " असें मोठयानें विचारायला एकच गांठ पडली. असें त्यांनीं म्हटलेलें ऐकल्याबरोबर मला किती मेल्यापलीकडे मेलें झालें असेल, याची कल्पना माझ्या स्थितींत असणाऱ्या माझ्या भगिनींनाच करतां येईल. बनूवन्संचें बोलणें आंत साऱ्या मंडळीनें ऐकलें असेलच आणि नसले ऐकलें, तरी त्या आतां जाऊन घंटा वाजविणारच ही माझी खात्री होती. यामुळें मला आतां खालीं जाऊंच नये असें वाटूं लागलें. त्यांत, तेथें सगळे पुरुष जेवायला बसलेले. बरें, पुरुषांच्यादेखत असल्या गोष्टी बोलूं नयेत हा

कांहीं विचार थोडाच. परंतु कितीहि लाज वाटली म्हणून काय होणार? मला खालीं गेलेंच पाहिजे होतें आणि मी गेलेंहि. परंतु मनांत जें वाटत होतें तें होतें. मीं खालीं गेलें तो बनूवन्संची वटवट चाललीच होती. परंतु आमच्या धाकट्या मामंजींनीं तिला दाबलें तेव्हां ती गप्प बसली. जेवणेंबिवणें झाल्यानंतर मग तिचें चाललेंच होतें. छे, छे, छे! तिनें मग जो चव्हाटळपणा केलान् तो केलान्, पाचकळपणाची अगदीं शिकस्त झाली.

या अशा गोष्टी झाल्यामुळें अर्थातच आतां गांठ घेणें अगदी कठीण झाले. अर्थात् जी काय थोडीशी समाधानाला जागा होती तीहि नाहींशी झाली. चोरून गांठ पडली असतांना म्हणजे आम्हांला प्रहरन् प्रहर बोलायला सांपडेल असा प्रकार थोडाच होता! पांचसहा मिनिटेंच परंतु तेवढ्यांत एखादा गोड, समाधानाचा व धीराचा शब्द मिळाला म्हणजे आठचार दिवस तरी निदान मनाला मोठा उल्हास असे. बोलूनचालून आम्ही मामेसासऱ्यांच्या जिवावर राहात होतों. तेव्हां किती केलें तरी ओशाळगतच. त्यांतून मला आणखी त्रास होई, तो त्रास पांचचार तऱ्हेचा होता. एक बनूबाईंचा, तो वर सांगितलाच; एक, कामामध्यें कांहीं चुका वगैरे झाल्या किंवा झालेल्या चुका माझ्याच हातून झाल्या असें समजून बोलण्याचालण्याचा छळ होत असे तो; एक, धोंडूभाउजी वगैरे चुगल्या सांगून करवीत तो आणि शेवटला आतां आतां होऊं लागला होता तो. "एवढी थोरली घोडी झाली. अजून न्हाणदेखील येईना; लोकांच्या पोरींना मुलेंदेखील झालीं!" हीं अक्षरें दिवसांतून कमींत कमी दहा वेळां उच्चारलेलीं ऐकण्याचा दुर्धर प्रसंग येई. शिवाय जी कोणी ओळखीची बाई येईल, तिच्याजवळ ही अजून वयांत आली नाहीं याबद्दल गाऱ्हाणीं आहेतच! तेव्हां इतक्या तऱ्हेचा एकंदर त्रास असल्यामुळे व मुंबईस जाण्याची आणि तेथें गेल्यावर या सर्व त्रासांतून मोकळें होण्याची चांगलीच आशा असल्यामुळें मी मुंबईला केव्हां जाइन असें मला होऊन गेलें होतें. सर्व आशेचा खेळ असतो. हीच जर मला कांहीं आशा नसती, तर भावी सुखाचें मांडे मनांत खातां आले नसते. आणि त्या योगानें सध्यांची स्थिति दुःखद असूनहि त्याबद्दल मी विशेष फिकीर करीत नसें, तसें झालें नसतें. आशे! तुझे या जगावर अनंत उपकार आहेत यांत तिळमात्र शंका नाहीं. कोणी कांहींहि म्हणो! बिचारी दुर्गी आणि मी दोघींमध्यें केवढें बरें अंतर? आज नाहीं उद्यां, आपलीं दुःखे नाहींशीं होऊन आपल्याला चांगला काळ येईल आणि आपण व आपला नवरा सुखानें नांदूं अशी तिला यत्किंचित् तरी आशा आहे काय' अशी आशा नसल्यामुळें तिचें जिणें तिला किती दुःसह झालें होतें बरें? एक वेळ तर ती स्पष्ट मजजवळ असें म्हणाली, कीं मी जर या बाळंतपणांत मेलें तर फार चांगलें होईल. माझी मी सुटेन आणखी बाबांच्या, आईच्या, अन् आजीच्या जिवाचा काच नाहींसा होईल. बिचारीला पुढें सुख मिळेल अशी आशा नाहीं तर नाहीं, परंतु उद्यां आपलें कसें होईल, याची तिला काळजी. नवरा आतां तर कांहीं करीत नसे; इतकेंच नव्हे, पण दुवक्ता जेवणाच्या वेळीं येऊन, वरणच नाहीं, भाजीच नाहीं, म्हणून संतापून हातपाय आपटून नानातऱ्हेनें बोलत सुटायचा. संध्याकाळच्या प्रहरीं त्याची

आई देवाला वगैरे जायची, तेव्हां येऊन बायकोच्या भोंवतीं मला हें दे ग, तें दे, भजींच करून दे, कोठें मोरावळा ठेवला असेल तोच दे असें म्हणून पाठीस लागायचा; तिनें टाळाटाळी केली तर शिव्या द्यायचा, वेळीं अंगावर हातहि टाकायचा. एक वेळां तिच्या-कडे येऊन तिला म्हणाला, " मला पांच रुपये देणें झालें आहे. तर तूं आपल्या माहेराहून कसें तरी करून दोन चार रुपये घेऊन ये. " आतां तिनें माहेराहून पैसे आणावे कसे ? आणि कोणत्या तोंडानें ? कशाकरितां म्हणून मागावे ? पहिल्या खेपेस त्यानें पैसे मागितल्यानंतर दोन दिवसांनीं पुनः बायकोला गांठून 'पैसे आणलेस का ' म्हणून विचारलें. तिनें नाहीं म्हणून म्हणतांच त्राग्याच्या बेतांत आला. पुनः दोन दिवसांनी येऊन पुनः पैसे आणलेस का म्हणून विचारलें. तेव्हां तिचें नाहीं, हें उत्तर ऐकून त्या मांगानें तिच्या फाडकन् तोंडांत मारून, परवांच्या दिवशीं पैसे आणले तर बरें आहे, नाहीतर संभाळून ऐस, अशी धमकी घालून तो चालता झाला. त्या बिचाऱ्या दुर्गीवर हा केवढा प्रसंग ! काय करते बिचारी ! मुकाटयानें दुसरे दिवशीं घरीं जाऊन ती आईजवळ सर्व हकीकत सांगून ढळढळां रडूं लागली. आईनें आतां करावें काय ? एक वेळां पांच रुपये देणें मोठेंसें नाहीं; परंतु एक वेळां पैसे दिले म्हणजे सवकून तो असा नेहमींच त्रास देणार. दर खेपेस पैसे ती तरी कोठून आणणार ? तीहि मंडळी गरीबच होती ? त्यांनीं असे पैसे आणावे कोठून ? पण पोटचा गोळा दिलेला, त्याच्यासाठीं जे जे हाल सोसावे लागणार ते ते सोसणें अगदीं प्राप्त ! तिनें मुकाटयानें पांच रुपये काढून पोरीच्या हातावर ठेविले आणि तिला लावून दिलें. दुर्गीची आई मोठी शहाणी व धूर्त होती. हें एक वेळचें लचांड आतां नेहमीं बिलगेल, हें जाणून तिनें युक्तीच केली. ती दुसरे दिवशीं दुर्गीच्या सासूकडे जाऊन तिला म्हणाली, " परवांच्या दिवशीं दिवस चांगला आहे, तर दुर्गीला आम्ही घेऊन जाणार आहोंत. पहिलीच खेप आहे, तेव्हां—त्यांतून पुढें मार्गेसरांत कांहीं दिवस चांगले नाहींत, काय अस्त का काय आहे म्हणतात—झालें, आतां तिला सहा महिने आलेच होत, " असें कांहीं बोलून आणि नानातऱ्हेच्या सबबी सांगून दुर्गीला ती मुळीं माहेरीं घेऊनच गेली. मनांतला निश्चय हा, कीं आतां सात आठ महिने मुळी सासरीं पाठवायची नाहीं. मग नवरा काय करील ते करो ! अशी एकंदर दुर्गीची अवस्था होती.

तिच्या आणि माझ्यामध्यें किती बरें अंतर होतें ! तिच्यापेक्षां मी कितीतरी सुखी होतें ! तिला सासूकडून मुळींच त्रास होत नसे म्हटलें तरी चालेल. मला तो आजेसासूकडून व बनूवन्सं इत्यादि मंडळीकडून थोडाबहुत होत असे. परंतु त्याचें मला इतकें वाटत नसे. याला कारण, मुख्य सुखाचें स्थान आपल्या हातचें आहे अशी मनाची पक्की खात्री आणि त्यामुळें आतां आपल्याला थोडेच दिवसांत सुखाची लयलूट होणार ही आशा ! मग काय विचारतां ! ह्या भावी सुखाच्या विचारांत मी अगदीं चूर असें. परंतु मुंबईस जाणें म्हणजे काय आणि तेथें जाणार कसें ? किंवा मुंबईस गेल्याबरोबर सुख मिळणार तें कसें ? इत्यादि गोष्टींचा विचार माझ्या मनांत कधींच आला नाहीं. मुंबई म्हणजे एक

मोठें शहर. चांगलें पुण्याच्या दुप्पट आहे. तेथें परीक्षा झाल्याबरोबर तिकडे चाकरी मिळणार, अर्थातच रगड पगार मिळणार! कशाची ददात असणार नाहीं. इत्यादि गोष्टींवरून आणि मुंबईहून येणाऱ्या लोकांनीं सांगितलेल्या गोष्टी ऐकून जी काय माझ्या मनाची कल्पना झाली होती, तीवरून माझ्या मनानें तेथील सुखसोईसंबंधानें केलेल्या कल्पना तर माझ्या डोक्यांत घोळत होत्याच; परंतु मुख्य काय मोठी सुखाची गोष्ट मला वाटली, ती ही कीं, तेथें आपल्याला छळायला आजेसासूबाई किंवा ननूवन्सं असणार नाहींत, तेथें आपणच काय त्या मुखत्यार! सासूबाई येतील. परंतु त्या कांहीं आपल्याला कधीं छळायच्या नाहींत. आणि तिकडून तर किती सुख देणें होईल, आणि किती नाहीं याचा नेमच नाहीं. या माझ्या सुखकल्पना कितपत खऱ्या झाल्या आणि मला किती दिवस सुख मिळालें इत्यादि गोष्टी आतां वाचकांस कळतील. माझी स्वतंत्रतेची व सुखाची कल्पना हल्लीं आमच्या माईसाहेबांच्या स्थितीवरून झालेली होती. त्यांना जें सुख आहे तेंच काय तें संसारांतलें सुख! तें ज्यांना आहे त्यांच्या अगर तिच्या म्हणा—सारखा सुखी प्राणी दुसरा कोणताहि नसेल. मी नेहमीं म्हणें कीं, माईसाहेबांसारखी स्थिति आणि माझ्या आईसारखी—म्हणजे कोणतीहि स्त्री आपलें घर स्वर्गाप्रमाणें करील. खरोखर आमच्या आईच्या हयातींत बाबा जर तिच्याशीं अशा मोकळेपणानें वागते तर त्यांना दुःखाचें वारेंदेखील लागलें नसतें. आपल्याला जर अशी स्थिति प्राप्त झाली तर आपण आपल्या आईप्रमाणें वागून सगळ्यांना सुखांत ठेवूं, कोणालादेखील दुखविणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर सर्वांच्याकडून वाहवा करून घेऊं, असें माझ्या मनाला नेहमीं वाटे. तिकडची मर्जी तर अशी राखूं कीं, आपल्याखेरीज कोणतीहि गोष्ट त्यांनीं करूं नये. इकडची काडी तिकडे करूं नये. इकडची काडी तिकडे करायची तरीदेखील आपल्याला विचारतील अशी छाप बसवून देऊं. शिकण्यावाचण्यासंबंधानें तिकडची हौस फार! ती मी पुरविणें सध्यांच्या स्थितींत बहुतेक—किंबहुना अगदींच—अशक्यच, परंतु मुंबईस गेल्यानंतर त्यासंबंधानें तिकडची कुरकुर म्हणून राहूं द्यायची नाहीं असे नित्य नित्य मी जे बेत करीत असें ते कांहीं विचारूंच नयेत. हे माझे बेत आणि ह्या माझ्या कल्पना ऐकायला कोणी नव्हते, हीच काय ती उणीव होती. येऊन जाऊन दुर्गी काय ती हित-गुजाची मैत्रीण; तिनें मला आणि मी तिला आपल्या गोष्टी सांगायच्या; परंतु तिच्या-गोष्टी कधीं आनंदाच्या नसायच्या, यामुळें मी आपल्या दुःखाच्या गोष्टी तेवढ्याच तिच्या जवळ बोलें. आपल्या सुखाच्या गोष्टी तिला सांगण्यापासून सुख न होतां उगीच वाईट मात्र वाटणार, असें मनांत येऊन मी त्या तिच्याजवळ बोलत नसे. खरोखर मी आणि ती अगदीं बरोबरीच्या आणि माझी स्थिति बरी; पुढें मला सुखाच्या राशीच्या राशी प्राप्त होणार असें तिला कळलें, तर तिच्या मनांत नसतांहि तिच्याकडून आम्हां दोघींच्या स्थितीची तुलना होणार हें साहजिकच आहे. दोन माणसें अगदीं बरोबरीचीं परंतु एकाच्या सुखाशेला पारावार नाहीं आणि दुसऱ्याच्या निराशेला अंत नाही, अशी स्थिति दृष्टीस पडली म्हणजे तुलना मनांत न येणें हें अशक्यच आहे. तेव्हां तशी तुलना तिच्या मनांत येऊन तिचें मन

दुःखित होऊं नये अशा बुद्धीनेंच मी तिच्यापाशीं माझ्या पुढल्या सुखासंबंधानें बोलत नसें. असें करण्यांत माझा आपमतलबी हेतु मुळींच नव्हता. माझ्या या विचाराचा सत्यपणाहि एकदोनदा माझ्या अनुभवाला आला. मी एकदा तिला मुंबईच्या सुखाच्या कल्पनांविषयीं सांगूं लागलें. कॉलेजांत दाखविलेल्या तिकडच्या हुशारीविषयीं सांगून त्यामुळें चाकरी लवकर व एकदमच मोठी मिळण्याचा संभव आहे. एकंदरीत आपले नष्टचर्याचे दिवस हल्लीं फार थोडे उरले आहेत असें मी बोललें तेव्हां एकदम तिच्या डोळ्यांला टचकन् पाणी आलें आणि ती मला म्हणाली, "यमे, बरं बाई, तुला तरी सुख मिळूं दे ! आमचं तर आटपलेंच सारं. आम्हांला आतां कसं सुख आणि कसलं काय ? अंगभर लुगडं आणि पोटभर जाडंभरडं अन्न मिळण्याचीच भ्रांत !" वाचकहो, हे माझ्या त्या जिवलग मैत्रिणीचे अत्यंत निराशेचे उद्गार ऐकण्याबरोबर माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल बरें ? एकदम पोटांत भडभडून आलें आणि मीं तिला आपल्या पोटाशीं घट्ट धरून म्हटलें, "दुर्गे, असं कां बोलतेस ? तुलाहि देव चांगले दिवस दाखवील." ते शब्द ऐकून ती एकदम हसली. तें हंसणें त्या वेळीं इतकें भयंकर वाटलें, कीं काहीं पुसूं नये. तिच्या मनांत कांहींतरी भयंकर विचार येऊनच ती हंसली असावी. कारण ती लागलीच म्हणाली, "होय, यमे. देवानंच आतां मला चांगले दिवस दाखविले पाहिजेत. बाकी कोणाच्यानं तें होणार नाहीं; अन् तो दाखवीलहि, नाही बरं ?" हें बोलणें नुसतें वाचलें तर कोणाला त्यांत कांहींच विशेष वाटणार नाहीं; परंतु मीं तें ऐकलें त्या वेळीं तिची मुद्रा, तिचा आविर्भाव, ही मीं पाहिली असल्यामुळें मला स्पष्ट असें दिसलें, कीं वरवर त्यांत जो अर्थ दिसतो, त्यापेक्षां त्यांत पुष्कळ अधिक आणि फार विलक्षण अर्थ असावा ! मी तिला खोदून खोदून विचारूं लागलें, पण ती उघडून सांगेना.

ही गोष्ट घडली ते दिवसापासून मी आपल्या भावी सुखाच्या गोष्टी तिजजवळ बोलेनाशी झालें. असो.

वर सांगितल्याप्रमाणें अनेक कल्पना व विचार यांनीं दाखविलेलें मनोराज्य उपभोगीत असतां कसेंबसें दिवस जाऊन कार्तिकमार्गशीर्षाचे म्हणजे मुंबईच्या परीक्षांचे दिवस आले व परीक्षेसाठीं मुंबईस जाणें झालें; आणि याच वेळीं ज्या गोष्टींकरितां (ती गोष्ट माझ्या हातची नसून किंबहुना ती गोष्ट होण्याला लागलेला विलंब सर्वथा इष्ट असून ) मला वडील माणसांचीं बोलणीं विनाकारण ऐकून घ्यावीं लागत, ती, त्यांना—आणि मलाहि—आनंदाची गोष्ट घडून आली आणि आजेसासूबाईंनीं लेकीकडून पणतू झाला म्हणून पेढे वाटले.

◆ ◆ ◆

## ३६ : माझी परीक्षा

* * * * * * * * * * * * * * *

आतां पुढची हकीकत यथास्थित रीतीनें लिहिणें हें माझ्या हातून तर होणार नाहीं, आणि यदाकदाचित् माझ्या मनांत आलें, तरी ती हकीकत देणें अगदीं वाजवी नाहीं. म्हणून मी आपलें एवढेंच सांगतें, कीं चालीरीतीप्रमाणें सर्व कांहीं प्रकार झाले. मुंबईला परीक्षेला जायचें झालें होतें. ती संपल्याबरोबर परत येणें झालें. परीक्षेंत उत्कर्ष होईल अशी कांहीं आशा नव्हती. निदान, गोपाळमामंजींनीं विचारलें त्या वेळीं असें सांगायचें कीं, "पास होईन, पण पहिल्या क्लासांत येण्याचीं कांहीं चिन्हं दिसत नाहींत. इंग्रजीचा कागद थोडा कठीण होता." हे शब्द मीं दाराआडून ऐकले, तेव्हां माझ्या पोटांत धस्स झालें. कारण, परीक्षा चांगली पास झाली, कीं ताबडतोब मुंबईस आपलें जाणें होईल—कारण चाकरी ताबडतोब लागेल, असा माझा पक्का ग्रह झालेला होता. चाकरी म्हणजे काय ? आणि ती मिळविण्यास हल्लींच्या काळीं किती त्रास सोसावा लागतो, याची यत्किंचित्देखील मला कल्पना नव्हती. आतां परीक्षा उत्कृष्ट पास होत नाहीं असें पाहून अर्थातच मला असें वाटलें, कीं आतां ताबडतोब चाकरी लागण्याची वानवा ! आणि चाकरी लागण्याची वानवा म्हणजे आपल्या मुंबईला जाण्याचीहि वानवाच. मुंबईला जाण्याची वानवा म्हणजे आपल्या स्वतंत्र-पणाच्या मनोराज्याची वानवा ! अशी एकंदर परंपरा मनांत येऊन मला वाईट वाटलें. मनुष्य किती आपस्वार्थी असतो याचा हा मासलाच आहे. आणि साऱ्या गोष्टींची उतावळी मी, मला कुठला धीर निघायला ? मी भीडमर्यादा एकीकडे ठेवून एक दिवस मुळीं विचारलेंच, कीं ' परीक्षा पहिल्या क्लासांत उतरायची नाहीं, मग मुंबई कुठली न् चाकरी कुठली ?"

पण, हा प्रश्न विचारतांना काय जें माझ्या जिवाचें झालें असेल तें माझें मलाच ठाऊक ! ओळख होण्यापूर्वीं, अमुक बोलायचें, तमुक बोलायचें, हें विचारायचें, तें विचारायचें हे जे काय बेत चालत ते सर्व कोणीकडच्या कोणीकडे गेले. शोधल्यानेंदेखील सांपडेना ? गांठ पडली कीं जीभ बंदच होई. विचारल्या प्रश्नांचीं उत्तरें द्यायचीं तो देखील मारामार. तोंडांतल्या तोंडांत कांहींतरी गुटमळून बोलायचें. त्यांतून मी आपल्याला मोठी धीट समजत असें; आणि कांहीं अंशीं बोलण्यासंवरण्याच्या कामांत तशी होतेंहि, यामुळें थोडासा धीर येऊन व दोन चारदा " अग, तूं अशी भीतेस कां ? कांहीं तुला खातों का आहें मी ? वेडी कुठली ! साफ चांगलं बोलावं, " असें म्हणून उत्तेजन दिलें; तेव्हां धन्यानें लाडावलेल्या मांजराप्रमाणें मीहि चांगली धीट झालें. म्हणजे काय तर विचारल्या प्रश्नांचीं स्पष्ट उत्तरें देऊं लागलें, आणि पुढें पुढें धीटपणाची कमाल झाली. कारण, कांहीं गोष्टींत मी आपणहोऊन प्रश्न करूं लागलें.

वरील प्रश्न जे दिवशीं केला, ते दिवशीं तर हसून मला म्हणायचे, " अरे वा ! इसापनीतींतल्या त्या सिंहाला भिणाऱ्या कोल्ह्याचीच अवस्था झाली ! " हे बोलणें ऐकल्याबरोबर मला जे म्हणता हसूं आलें तें कांहीं विचारूच नका. कारण आमची सर्वानुमतें ओळख झाल्यावर तिसऱ्या कीं चवथ्या रात्रीं मला वाचायला कितपत येतें याची परीक्षा घेतली. आजपर्यंत मला ल्याहायलावाचायला येतें, एवढे तिकडे ऐकून ठाऊक होतें; परंतु प्रत्यक्ष पाहण्याचा कधींच प्रसंग नाहीं. तेव्हां ' बरं, आतां इतके दिवस व्यर्थ गेले ते गेले; आतां तुला ल्याहायलावाचायला कितपत येतें आहे तें मला पाहूं दे. तसं मग पुढे शिकवायला ठीक पडेल. आतां ती लटपट बरीक चालायची नाहीं बरं का ! चांगलं शिकलं पाहिजे. मुंबईस गेल्यावर एकदां चांगला जम बसला, कीं मी मुळीं मास्तरीणच ठेवणार आहें—काढ काय पुस्तक तुझ्याजवळ असेल तें ! " म्हणून वाचून घेण्यासाठीं पिच्छा पुरवला. मला अर्थातच वाचावेंसें वाटेना. एक तर लाज आणि दुसरें आपल्याला कांहींच येत नाहीं असें कळून आपली फजिती होईल अशी भीति. प्रथमतः आधीं मजजवळ मुळींच बुक नाहीं, आणखी मला वाचायला येत नाहीं, हा पाढा वाचला. " मीं तुझ्या दादाबरोबर दिलेलीं बुकं कुठें आहेत ? " असें विचारतां ' माहेरीं ' हे उत्तर ठेवलेलेंच. पण तिकडे मुळी पाठच पुरवायची माझी. चटकन् म्हटलें कीं, " त्या धोंडूचीं बुकें असतील त्या फडाळांत ( आम्हीं निजत असूं तेथेंच त्याचें फडताळ असे ) त्यातून घेऊन ये एखादं. " " मी नाहीं; मला वाचायला येत नाहीं " वगैरे म्हटलें, जागची हललेंच नाहीं. तेव्हां आपण उठून जाऊन त्या फडताळांतलें एक बुक घेऊन यायचें. तें बुक इसापनीतीचें होतें. तें आणून उघडून माझ्यापुढे ठेवून, ' हं. एकदा कराच आमच्यावर मेहेरबानी, पडूं या कानांवर दोन शब्द, " असें म्हणून हसत पाहिलें. आणि तिकडून जों जों असा आग्रह होऊं लागला, तों तों मला मेलीला कसेंसेंच वाटून जास्तीच लाज वाटूं लागली; मला वाचायला येतच नाहीं, हें गाणें कांहीं सोडावेंसें वाटेना. शेवटीं दिवा पुढे करून हनुवटी धरून मान वर करून माझ्या हातीं पुस्तक दिलें, आणखी म्हटलें, " दगडाच्या पुढें जर इतक्या विनवण्या केल्या असत्या, तर त्यालादेखील वाचा फुटली असती. वाचाच आतां एकदा ! ते अमृताचे शब्द आमच्या कानीं पडूं द्या ! " आतां काय बोलणार पुढें ? शेवटी " मला चांगलं वाचायला येत नाहीं. येतंय् तसं वाचलं, तर उगीच—"

इतके शब्द माझ्या तोंडून बाहेर पडतात न पडतात तोंच " पुरे पुरे. जसं येईल तसं वाचा. आम्ही कांहीं म्हणणार नाहीं, " असें म्हटलें; तेव्हां मी भीतभीत वाचूं लागलें. परीक्षा देणें म्हणजे काय असतें याचा अनुभव मला तेव्हां चांगला आला. अंग, ओठ थरथर कापूं लागले; हातांतलें पुस्तक पडेल कीं काय असे वाटलें. तें माझें आधींचें धैर्य कोठें गेलें मला कांहींच समजेना. शेवटीं जेव्हां मीं एक गोष्ट वाचली आणि त्याबरोबर माझ्या पाठीवरून हात फिरवून व मला जवळ घेऊन, " अरे वा ! तूं मोठी पंडिता आहेस हें मला नव्हतं ठाऊक. तुला इतकं चांगलं वाचायला येतं तें, " असें

म्हटलें. तेव्हां मला धीर येऊन मग पुनः वाचायला सांगितल्यावर आणखी दोनदोन गोष्टी वाचून दाखविल्या. त्यांत ती सिंहापुढें जाणाऱ्या कोल्ह्याची गोष्ट मीं वाचली होती. परीक्षेचा व मुंबईच्यासंबंधानें वरील प्रश्न केला, त्या वेळीं त्या गोष्टीची आठवण देण्याबरोबर मला फारच हसूं आलें, तें यामुळेंच. खरोखरीच त्या कोल्ह्याप्रमाणें माझी स्थिति झाली. जी मी नुसती तोंडाकडे पाहण्यास—बोलणें तर लांबच—देखील घाबरत असें, ती मी आतां हा असला प्रश्न आणि आपणहोऊन करूं लागलें, तेव्हां त्या कोल्ह्याच्या वर्तनांत आणि माझ्या वर्तनांत फरक काय ? ते दिवसापासून रोज रात्रीं मजकडून दहापंधरा गोष्टी वाचून घेण्याचा निश्चय करून सगळी इसापनीति वाचून घेतली आणि खरोखर मला इतकें चांगलें वाचायला येतें व त्या पुस्तकांतला तरी निदान अर्थ वगैरेहि चांगला सांगता आला आणि पांच सात अवघड गोष्टींचे तात्पर्य विचारलें त्यांतहि माझी परीक्षा " अगदीं पहिल्या क्लासांत पास " असें मला हसत हसत सांगितलें. तेव्हां, " एखादं हरभऱ्याचं झाड तरी लावायचं म्हणजे मी शिडी लावून चढेन " असें बाहेरून म्हटलें, पण मनामध्यें अगदीं खूष होऊन किंचित् आढ्यताहि वाटली. तेव्हांपासून रोज रात्रीं आपलें कांहींतरी पुस्तक वाचून घेतलेंच. त्या वेळीं थोडीशी तिकडे फुरसत होती, त्यामुळें मला शिकविण्यावर व वाचून घेण्यावरच विशेष भर असे. एकंदर महिना दीड महिन्यांत दोन तीन पुस्तकें वाचून घेतलीं. एक इसापनीति, दुसरी स्त्रीधर्मनीति,—पण मी वेड्यासारखी पुस्तकांचीं नांवेंच देत बसलें ! सांगायचे तें एवढेंच कीं, माझ्या अभ्यासालाच सुरुवात झाली म्हणायची. असो

वर सांगितलेला प्रश्न मोठ्या आतुरतेनें मीं केला होता. त्यावरून हसून त्या कोल्ह्याच्या गोष्टीचा दाखला दिला, आणि माझी आतुरता विशेष पाहून मला चिडविण्याकरितां कीं काय, हसत हसत पुनः म्हणायचें, " आतां कसची आली आहे तुम्हांला मुंबई ? आतां आपला मी एकटाच जाणार. आणखी थोडेसे पैसे मिळवून पुढें एल्‌एल्. बी. चा अभ्यास करणार. दोनतीन वर्षांनंतर परीक्षा झाल्यावर मग बिऱ्हाड करायचं. मधून मधून मी सुटीबिटीच्या दिवसांत इथं येईन, तेव्हां काय गांठ पडेल ती खरी. परीक्षा चांगली पहिल्या क्लासात झाली असती, तर मुंबईस राहायला सांपडलं असतं. आतां तुमचं नशीब म्हणायचं ! नाही तुमच्या नशिबीं इतक्यांत मुंबईला यायचं ! "

हे निराशेचे शब्द ऐकण्याबरोबर प्रथमतः माझी काय स्थिति झाली ती माझी मलाच ठाऊक ! सर्व मनोरथ वाळूच्या बांधासारखे एकदम ढासळले. आणखी दोनतीन वर्षें आपल्याला याच स्थितींत कंठावीं लागणार, मग पुढलें कोणीं पाहिलें आहे ? असें मनांत येऊन माझें तोंड अगदीं गोरंमोरें झालें. न जाणो, कदाचित् डोळ्यांनीं आणखीहि कांहीं दाखविलें असेल ! तें पाहण्याबरोबर ताबडतोब मला कुरवाळून म्हणायचें, " अरे बापरे ! इतकं का अगदीं मीं म्हटलं तें खरं वाटलं ? परीक्षा पास होऊन मुंबईस गेल्यावर थोडेसे पैसे मिळूं लागले तरी मी तुला दूर ठेवीन असं खरंच का तुला वाटलं ? वेडी

कुठली ! अगदीं वेडी ! ये इकडे. ते डोळे पुसूं दे. " हे शब्द उच्चारतांच डोळ्यांत तुसतें दिसत होतें तें पाणी बाहेर आलें आणि माझ्यानें बोलवेनासें झालें. लागलीच तिकडून आणखी म्हणायचें, " माझ्या जिवांत जीव आहे, तोंपर्यंत मी तुला आतां सोडून चार दिवसदेखील राहणार नाहीं, समजलीस ? मोठी चाकरी लागो न लागो, मिळेल तेवढ्यांत संसार करायचा. आईला तरी आतां किती कष्ट द्यायचे ? अन् दुसऱ्याच्या जिवावर तरी किती दिवस बसायचं ! माझ्या मनांतून तुला सागतों, आपल्या थोरल्या मामीलादिखील न्यायचं आहे. तिच्याकडे पाहिलं कीं मनाला मोठं वाईट वाटतं. काय त्या बिचारीनं करावं ? कारट्यान् कारटी हीं अशीं, अन् शंकरमामा ते तसले ! मिळून तिला कांहींतरी सुख ? छे ! असा नवरा मी कुठें पाहिला नाहीं अन् त्याला ही असली बायको ? "

" खरंच गडे, त्यांना किनई चार दिवस आपल्याबरोबर न्यावंच. माहेरींदिखील जाणं नाहीं त्यांना कीं कुठें–काय तें कांहीं सांगतांच येत नाहीं. खरं गडे, मला आतां आठवलंय् तें सांगतें बरं का—तो मधें त्यांच्या माहेरच्या पंधरा रुपयांचा बोभाटा झाला तो आठवतो का ? शंकरमामंजींनीं आजेसासूबाईंना सांगितलं, कीं ते रुपये कसले तुझ्या-जवळ आले आहेत कोणाच्या माहेरचे, ते कशाला तूं आपल्याजवळ ठेवले आहेस ? अन् .." " बरं बरं हं. ती ऐकली खरी ते दिवशी भानगड. आई म्हणत होती, की ती सारी शंकरमामांची लबाडी म्हणून ! मला वाटतं तिच्याजवळ मामीनं सांगितलं असावं काय खरं होतं तें. "

तें ऐकण्याबरोबर, एखादी गोष्ट आपल्याला माहीत आहे व सांगणें अगर न सांगणें आपल्या मर्जीचें काम आहे असें वाटून आढ्यतेचें हसूं येतें, तसें हसून मीं म्हटलें, " मला त्यांतला सारा खरा प्रकार ठाऊक आहे, पण काय करायचं ? बोलायचं कोणा-जवळ ? त्या दिवसापासून आजच आतां हें तोंडावाटें काढणार. दुसरं सांगायला होतं कोण ? " अशी प्रस्तावना करून मी खोलींत कशासाठीं गेलें होतें वगैरेपासून जो प्रारंभ केला, तो इत्थंभूत ऐकलेल्या हकीकतीचें पुराण वाचून शेवटीं त्याजवर भली लांबलचक टीकाहि केली. वाचनाबिचनाच्या कामांत आमची जीभ जरी चालली नाहीं, त्या वेळीं जरी मागें मागें घेऊन लाजून न् मुरके मारून पुरेपुरेसे केले; तरी घरांतल्या कागाळ्या, संसारांतल्या उलाढाली, सगुणाबाईच्या खोप्याचा आंकडा केवढा असतो, आणि वारूबाई आपला भांग फार फाटला आहे तो लपविण्यासाठीं त्यावर काजळ चोळून बारीक कसा दाखविते, गोपकाबाईच्या माहेरच्यांनीं तिच्या फळशोभनाचे वेळीं काय दिलें आणि घसबसाबाई आपणच नटून मुनांना बुच्च्या नाकानें, कांहीं पांघरूण न देतां बाहेर धाडते, अमकीची सून चोरून भजी करून खाते आणखी तमकीची सासू आपण चोरून खाते न् सुनांवर आळ घालते, इत्यादि अनेक उठाठेवींविषयीं गोष्टी निघाल्या, म्हणजे मग आम्ही मोठ्या पटाईत ! मोठ्या वाघिणीच. मग तेथें आम्हांला कोणी विनवण्या करून विचारायला नको. एकदा पहिली माझी ओवी सुरू झाली, कीं

मग त्याला खळ नाहींच. आपण काय बोलतों आहोंत आणि कोणाजवळ बोलतों आहोंत याचेंदेखील भान नाहीं. हो, आतां या असल्या गोष्टींत आम्हांला आपली मौज वाटते म्हणून पुरुषांनादेखील कां वाटावी ! पण हा सुमार राहतो कुठें ? दुसऱ्या कांहीं गोष्टी कधीं बोलायला येत नाहींत अन् कांहीतरी बोलायला तर पाहिजे; मग आमच्या पंक्तांतल्या गोष्टी आम्ही काढणार. दुसऱ्याला त्यांत आपल्यासारखीच मौज वाटते कीं नाहीं, हा विचार कुठचा ? वाटलीच पाहिजे असें मला पहिल्या पहिल्यानें वाटे आणि मी आपली घरच्या, माहेरच्या, अशाच कांहींतरी गोष्टी सांगायची. आणि खरें म्हटलें तर आमच्याकडे काय दोष ? नानातऱ्हेच्या गोष्टी बोलायला नानातऱ्हा पाहिल्या पाहिजेत, ऐकल्या पाहिजेत, वाचल्या पाहिजेत, त्याखेरीज आपोआप तर येत नाहींतना ? वर्तमानपत्र म्हणजे पुड्या करायला अगर त्याच्यापेक्षां कांहीं कामाला उपयोगी पडणारा कागद हा जर समज, तर त्यांत काय लिहिलें आहे आणखी हल्लीं कशाबद्दल वाटाघाट चालली आहे हें आम्हांला कळावें कसें ? आम्हांला शिक्षण यावें असें लोक म्हणतात, कीं देऊं नये असें म्हणतात हें कळणार कोणाला ? अशा आमच्या हिताहिताच्या गोष्टीदेखील जर आम्हांला काय चालल्या आहेत हें समजत नाहीं, तर दुसऱ्या कायद्याच्या वगैरे समजणार कशा आणि या गोष्टी नुसत्या कानावरदेखील जर येत नाहींत, तर तसल्या गोष्टी आपण होऊन काढून, अगर दुसऱ्या कोणीं काढल्या तर त्यांत बोलून वाटाघाट करायची कसली ? जोंपर्यंत आम्हांला ल्याहायलावाचायला येत नाहीं, आणि तेंदेखील वर्तमानपत्रं वाचून समजण्याइतकें, तोपर्यंत पुरुषांस आमच्या या हिनें असें केले, तिनें तसें केलें असल्याच रडकथा ऐकल्या पाहिजेत. नुसतें कुरकुरून कांहीं उपयोग नाहीं. आम्हांला दुसऱ्या कांहीं गोष्टी बोलून मन रंजवितां यावें कसें ? परंतु याहि प्रकरणीं मला आणखी कांहीं प्रसंग येणार आहेत, तेव्हां आतां हें इतकेंच ठेवतें.

मुंबईस जाण्याच्या संबंधानें बोलणें होऊन दोनतीन दिवस झाल्यावर मी माहेरीं गेलें असतां, दादाचें व माझें बोलणें झालें. " कसं काय यमुबाई, परीक्षेचं कसं काय तुमच्या ? पहिला क्लास ना ? " असें त्यानें मला विचारलें. त्याबरोबर मी भारी लाजलें. कारण माझी परीक्षा घेतली हेंदेखील याला सांगितलें कीं काय असें मनांत आलें आणि मीं त्याला हळूच म्हटलें, " हो, कायरे ही थट्टा ? चार ओळी वाचून घेतल्या नाहींत तों आमची परीक्षा, आणखी पहिला क्लास ? वहिनीची घेतलीस का परीक्षा, तिचा आला का पहिला क्लास ? " हें माझें बोलणें ऐकण्याबरोबर तो आपला खो खो हसून म्हणतो, " म्हणजे ? तुझ्याकडून चार ओळी वाचून घेतल्याचं कोण काय म्हणतो आहे ? मी आपला ( तिकडचं नांव घेऊन ) च्या परीक्षेबद्दल बोललों. बरं चला, हें नवीनच आम्हांला कळलं. एकूण मुंबईहून परीक्षा देऊन येऊन इकडे आपली परीक्षा घेतली काय ? "

हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकण्याबरोबर मी जी खजील झालें, ती कांहीं सांगायची सोय नाहीं. चोराच्या मनांत चांदणें तशीच माझी स्थिति झाली. त्याचा तो दोन अर्थ

संभवणारा प्रश्न अन् त्यातून " पहिला क्लास ना ? " हे शब्द, यांनीं मला चांगलें चकविलें. आधीं तो माझा दादा, अन् त्यांत ही गोष्ट त्याच्या हातांत सांपडली, मग काय ? त्यानें मला अधिकच खिजविण्याला आरंभ केला. पण शेवटीं पुनः तिकडच्या परीक्षेसंबंधानें गोष्ट निघाल्यावर जेव्हां सगळ्यांत वर येण्याचा संभव नाहीं, असें म्हटलेलें मीं त्यास सांगितलें, तेव्हां तो आपला हसत हसत बेलाशक म्हणतो :—

"–राव आहेत लबाड ! त्यांना अशीच रडायची संवय आहे. माऱ्या कॉलेजांत म्हणताहेत कीं ते पहिल्या क्लासांत येणार म्हणून, आणखी ते असं सांगतात का तुला ? अगदीं लबाड ! " तें ऐकून मला थोडासा राग आलासें दाखवून मीं म्हटले " हे रे काय हें ? असं काय बोलतो आहेस ? मी सांगेन दादा असं म्हणत होता म्हणून. "

दादा हसून म्हणतो, " खुशाल सांग जा. मी त्यांच्या तोंडावरदेखील म्हणेन असेंच. अग यमे, त्यांना असं रडत बसायची संवयच. त्यांच्या वर्गांतले त्यांचे स्नेही सांगतात कीं नाहीं मला ! प्रत्येक परीक्षेंत असंच–यायचा नंबर पहिला. मार्क मिळायचे खूप, पण रिझल्टच्या आधीं ' या परीक्षेंत कांहीं ठीक नाहीं म्हणून भुणभुण ! '

◆ ◆ ◆

## ३७ : वहिनीची परीक्षा

* * * * * * * * * * * * * * *

दादा माझ्या लिहिण्यावाचण्याबद्दल जशी काळजी वाहात असे तशी आपल्या बायकोबद्दल कां वाहात नाहीं ? तो मला पुस्तकें आणून देई, नेहमीं गांठ पडली कीं कांहीतरी विचारी, एखादे वेळीं त्याला तसा वेळ असला तर आपण वाचलेल्या पुस्तकां-पैकीं एखादी गोष्ट सांगे. त्याच्या ऐकिवांत असलेल्या विद्वान् बायकांची माहिती सांगे, व ' तसं तुला झालं पाहिजे बरं यमे, ' असें अंतःकरणापासून म्हणे. इतक्या सगळ्या गोष्टी होत, परंतु आपल्या स्वतःच्या बायकोला कांहीं ल्याहायवाचायला येतें की नाहीं, याबद्दल त्यानें एक दिवसदेखील कधीं विचारलें नाहीं. ही चौकशी तो करणार कोणा-कडून ? माझ्याकडूनच कीं नाहीं ? तो स्वतः तर कांहीं एव्हांच बोलत नाहीं. मजजवळ तर त्यानें कधींच गोष्ट काढली नाहीं. एकदोनदा मीं आपलें सहज त्याला विचारलें, पण त्यानें तिकडे यत्किंचितहि लक्ष न देतां, दुसरेंच कांहीं काढून टाळाटाळी केली. एकदादोनदा असें झालें, त्या वेळीं कांहीं हा मुद्दाम टाळाटाळी करतो आहे असें मला वाटलें नाहीं; परंतु एक दिवस रात्रीं सहज गोष्टी बोलतां बोलतां मला विचारायचें, " काय हो अहो, आपण तर मोठ्या विद्वान्. पण आपली वहिनी कशी काय आहे ? तिला लिहितांवाचतां येतंय् कीं नाहीं ? गणपतरावांना मी विचारलं तर उडवाउडवीच करतात म्हणून विचारतों. " हें ऐकण्याबरोबर मला एकदम आठवल्यासारखें झालें

आणि आपण विचारलें असतांहि तो अशीच उडवाडवी करतो हें माझ्या लक्षांत आलें व मीं लागलीच म्हटलें, " खरंच गडे ! तो असं कां करतो कोणास कळे ? मीदिखील त्याला एकदोनदा विचारलं; तर दुसरंच काहीं काढून त्यानं वेळ मारून नेली. वहिनीचं नांव काढलं कीं तो तोंड कसंसंच करून उगाच बसतो. "

" अहाहा ! मग हे नुसतं माझ्याजवळ सांगून काय उपयोग ? आपण पाहावं किनई काय आहे तें विचारून ! काय पण बहीण ! "

" इश्श मेलं, मी तें काय त्याला विचारूं ? तो माझ्याहून वडील आहे. त्याला का मी विचारूं, तूं आपल्या बायकोचं नांव काढलं कीं असं कां करतोस म्हणून ? "

" त्यांत काय झालं विचारलं म्हणून ? ते नाहीं का तुला विचारीत माझ्याविषयीं ? —बरं, पण तें जाऊं दे. तूं खरोखरीच त्यांना विचार. अन् त्यांच्या बायकोला ल्याहाय-वाचायला येतंय कितपत हें तुझं तुला नाहीं का पाहतां येत ? "

" मीं विचारलं तिला, पण ती कांहो बोलेल तर कीं नाहीं ? अहो वन्सं, आम्हांला कसलं आलं आहे लिहिणन् पुसणं ! ' असं तिनं मला उत्तर दिलंन् अन् ती कांहीं भड बोलतहि नाहीं. स्वभाव कांहीं मोठा मनमिळाऊ असा नाहीं. तिचं जेव्हा तसं तेव्ह पाह्यलं तेव्हां—"

" ह्यः वेडी कुठली ! पोरगी ती केवढी; तिचा कसला आला आहे स्वभावबिभाव ? जा एकदा गणपतरावांना स्पष्ट विचार. अग, आज चार अक्षरं आली तर पुढें पंचाईत नाहीं पडायची ! गणपतरावांची बायको म्हणजे कशी फटाकडी पाहिजे. हे असं काय उपयोगी ? "

आणखी यासंबंधानें थोडा वेळ बोलणें झालें. हें बोलणें झाल्यानंतर दोनतीन दिवसांनीं मी बाहेरची होऊन माहेरीं राहण्यासाठीं गेलें. आतां माहेरीं म्हणजे अशी अडीअडचणीला जायची, त्यांतून माझी दुसरीच पाळी. असो.

तेथे असतांना सांगितल्याप्रमाणें वेळ पाहून मीं दादाला म्हटलें, " दादा, फार दिवस माझ्या मनांतून तुला कांहीं विचारायचं आहे. तूं सांगशील मन मोकळं करून, रागावणार नाहींस तर विचारतें. विचारूं का ? बोल "

हा माझा प्रश्न ऐकण्याबरोबर दादा किंचित् हसला, पण काय मनांत येऊन तो हसला हें कळणें फार कठीण होतें. निराशा, किंचित् तिरस्कार, कांहीं विनोद इतक्या गोष्टी मनांत असतांना बाहेरून मनुष्य हसला तर जसें एक प्रकारचें खिन्न हास्य दिसतें तसेंच त्याचें हसणें होतें. मीं काय विचारणार हें बहुतकरून त्यास समजलें असावें; आणि ही कसला वेडगळ प्रश्न करणार आहे असेंहि मनांत येऊन त्याच्या त्या चमत्कारिक हसण्यांत भर पडली असावी. तसें हसून बराच वेळ तो खिन्न होऊन व कपाळाला आंठ्या घालून मजकडे पाहात राहिला. जणू काय हिला प्रश्न करूं द्यावा कीं नाहीं,

आणि प्रश्न करूं दिला तरी त्याचें उत्तर आपण द्यावें कीं नाहीं, याचाच तो विचार करीत होता. नंतर पुनः हसून म्हणतो—

" विचार, विचार काय विचारायचं आहे तुझ्या मनांतून तें. तुझ्यापासून कशाला आतां लपवून ठेवूं ? "

" विचारूं ना ? विचारतेंच तर ! दादा, तूं माझ्या लिहिण्यापुसण्याची इतकी काळजी वाहतोस, पण वहिनीला कांहीं लिहितांवाचतां येतंय् कीं नाहीं, याची कधीं नाहींरे चौकशी केलीस ? मला इतकीं बुकं आणून देतोस, पण एखाद दिवशीं हें एक बुक तिला दे अन् वाचायला सांग, असं नाहीं मला म्हणालास—बरं, मीं होऊन दोनतीनदा गोष्ट काढली, अन् तिकडूनहि कायसं विचारलं होतंना तुला ? तेव्हां तूं उडवाउडवीच केलीस. असं कां बरं ? "

हें मी बोलत होतें, परंतु दादाचें लक्ष मजकडे होतें असें मला वाटलें नाहीं. तो कोणीकडे तरी पाहात होता. माझें बोलणें थांबल्यावर, " असं का ? काय म्हटलेंस ? " असे शब्द पुटमळला, आणखी पुनः कोणीकडच्या कोणीकडे पाहात राहिला. मग त्याच वेळानें झोपेंतून जागें झाल्याप्रमाणें एक उसासा टाकून व हसून मला म्हणतो, " काय म्हणणं आहे तुझं ? बोल, मी आतां तुला सारं सांगतो. "

" अन् मग इतका वेळ जें बोललें तें व्यर्थच वाटतं ? " असें म्हणून मीं पुनः याला पूर्वींचे प्रश्न केले, तेव्हां तो म्हणतो, " यमे, तूं म्हणतेस त्या गोष्टी सगळ्या ख-या, पण दगडाला एक नाहीं, एक लाख बुकं वाहिलीं म्हणून त्याला वाचायला येईल का ? सांग मला. "

" हो, हें काय असलं बोलावं ! दगड कारे आहे ती ? तिला शिकवलं म्हणजे येईल, शिकवायचं नाही, संवरायचं नाहीं मग यावं कसं ? कांहीं आपोआप का येत असतं ? आपलं उगींच दगडन् बिगडं म्हणावं ? "

" हं ! असं का तुला वाटतं ? दगड नाहीं तर, फत्तर. बरं मी म्हणतों बुद्धि असली तरी मेहनतीनं येईल. पण इच्छा तरी पाहिजेना ? आज तुला मी सांगतों, मला नाहीं या बायकोपासून सुखाची आशा नाहीं. ती अतिशय हट्टी आहे, मठ्ठ आहे. स्वतःची अक्कल नाहीं. सांगून कधीं समजायचं नाहीं. मला याचा चांगला अनुभव आलेला आहे. गेल्या महिन्या दीड महिन्यांत मी तिला तीन वेळां एकीकडे गांठून ' तुला काहीं ल्याहायला येतं का ? वाचायला येतं का ? ' म्हणून विचारलं. आधीं ती पुढें उभीच राहात नाहीं, मला टाळते; त्यांतून नाइलाज झाला तर उभी राहते; पण तोंडांतून शब्द काढील तर शपथ ! परवांच्या दिवशीं तर तिनं स्पष्ट मला असं उत्तर दिलं कीं, मला कांहीं येत नाहीं. अन् मला कांहीं शिकायचं नाहीं. ' झालं. घरांतल्या कामकाजांत काय पटाईतपणा आहे, तो मला रोज दिसतोच आहे. आतां आणखी

कळायचं तें काय राहिलं ? " इतकें बोलून तो पुनः एक उसासा टाकून स्वस्थ बसला. वरील शब्द बोलतांना त्याची एकंदर चर्या आणि आवाज दोनहि मोठी अगदीं विलक्षण झालीं होतीं. पुष्कळसा खेद, त्यांत त्वेष आणि एकंदर निराशा इतके विकार दोनहीमध्यें दिसत होते. शब्द येत होते तें अगदीं अंतःकरणापासून आणि मजवर तर त्या शब्दांचा व त्याच्या आविर्भावांचा असा कांही परिणाम झाला, कीं आतां याला काय उत्तर द्यावें हेंच मला समजेना. तो बराच वेळ स्वस्थ बसला. नंतर फारच खिन्न अशा आवाजानें मला म्हणतो, " यमे, माझे सारे बेत, साऱ्या कल्पना, सारे हेतु आतां जिथल्या तिथेंच राहिले. आतां तूं तरी चांगली हो. नशिबानं तुला फार चांगला नवरा मिळाला आहे. तूं धरशील तो हेतु सफल होईल. शिवाय माझ्या हातून होईल तें मी करीनच तुझ्या-साठीं. माझी सारी भिस्त तुझ्यावर आहे. "

हें त्याचें बोलणें मात्र माझ्या लक्षांत आलें नाही. याच्या कल्पना कसल्या! हेतु कसले ? बेत कसले ? आणि ते आतांच जिथल्या तिथें राहिले असें म्हणतो काय ? कांहींच समजेना. हा इतका निराश होऊन बोलतो त्याला कारण तरी काय ? असें मनांत येऊन मी अगदीं बुचकळ्यांत पडलें. शेवटीं मीं " दादा, हें आहे तरी काय ? तुझे बेत कसले ? अन् ते गेले कुठें ? तुझी इतकी निराशा कशानं झाली ? " असें कांहीं विचारलें, तेव्हां तो मजकडे निरखून पाहूं लागला. तें पाहून मला कसेंसेंच झालें. तो नंतर एकदम म्हणतो—" माझे बेत ? माझे बेत तुला कळवून करायचं काय आतां अन् मी विनाकारण त्याचा उच्चार तरी कशाला करूं ? वेळ आली तितकी, तर सांगेन तुला आणखी तुझ्या नवऱ्याला. बाकी त्यांच्याहि मनांत असतील ते.––पण जाऊं दे. या कर्मकटकटीवांचून आतां काय अडलं आहे तुझं आधीं मला सांग, तूं नेमानं वाचतेसना आतांशा कांहीं ना कांहीं ? " असें म्हणून त्यानें उडवाउडवी आरंभिली. पण माझा आजचा पक्का निश्चय असा होता कीं, त्याला टाळाटाळी करूं द्यायची नाहीं म्हणून. मीं त्याला लागलीच म्हटलें, " तें कांहीं नाहीं. तूं म्हणतोस तें कांहीं मला खरं वाटत नाहीं. मी विचारतें आतां एकदा वहिनीला, तूं असं कां करतेस म्हणून ? " हे शब्द मी बोलत होतें खरी, पण माझें आंतलें मन मला असें सांगत होतें कीं, दादा म्हणतो तें अगदीं सर्वथा खोटें आहे असें कांहीं नाहीं. तरी पण तो जितके त्याबद्दल बोलला, आणखी त्याला जितकें वाटत होतें असें दिसलें, तितके कांहीं मला वाटलें नाहीं आणि त्याच्या वाटण्याला कारण होतें असेंहि मला वाटलें नाहीं. तें माझें बोलणें ऐकून तो मला म्हणाला, " खुशाल विचार. जर तुला माझ्यासारखं उत्तर पाहिजे असेल तर विचार. नको कुणाची आहे ? माझा समज चुकला तर मला पाहिजेच आहे. पण निदान तुझा तुला तरी अनुभव येईल, आणखी तुझी खात्री होईल. मी तुला खचित सांगतों, यमे, त्यांत कांहींदेखील अर्थ नाहीं. मी तर आतां त्या भानगडींत कधीं पडायचा नाहीं. " हे शेवटले शब्द फारच ठासून त्यानें उच्चारले. तेव्हां मी कांहीं बोललें नाहीं, पण मनांत असा बेत केला, कीं वहिनीला एकदा गांठून काय तें विचारायचें. एकदा मीं विचारलेंच होतें; व

त्या वेळीं मला तिचें उत्तर मिळालेंच होतें; तरी पण आतां आणखी एकदा विचारून पाहावें, असा बेत करून मीं तिला दुसरे दिवशीं एकीकडे गांठलें, आणखी म्हटलें, " वहिनी, तूं असं कां करतेस ? दादाच्या मनांत तूं ल्याहायलावाचायला शिकावसं भारी आहे. त्यानं तुला विचारलंन्‌ना परवां ? त्याला असं कां उत्तर द्यायचं ? अग, आपल्याला येत नाहीं तर शिकावं; पण कांहींतरी त्याच्या मर्जीप्रमाणं वागावं की नाहीं ? मी तुला आतां उद्यां एक बूक देईन बरं का आणून. तुला ट फ करतां येतंय्‌ना ? " हे माझे शब्द ऐकून ती एकदम कपाळाला आंठ्या चढवून मला म्हणते, " इश्श मेलं ! हेंच का सांगायला मला एकीकडे आणलीत ती ? मला नको बाई बूक न्‌ बिक. आमचं कुठें एवढं शहाणपण वायां चाललं आहे बुकं न्‌ बिकं वाचायला ? "

" हें काय बोलतेस तूं ? बुकं वाचायला शहाणपण का लागत असतं ? अन्‌ आधीं दादाला जर वाटतं आहे तूं ल्याहावंस वाचावंस म्हणून, तर मग तुझा तरी हट्ट कां, नाही वाचायचं म्हणून ! वाचायला जाशीलना आतां ? देऊंना आणून तुला मी तें बूक ? "

या माझ्या बोलण्यावर एक नाहीं दोन नाहीं. " तुम्ही म्हणतां तसंच. झालंना तुमचं, जाऊंना मीं खालीं ? आणखी सासूबाई उगीच हाका मारतील, " असें म्हणून ती जाऊं लागली; तेव्हां मीं तिला शपथा आणा घालून मागें परतविलें, आणखी म्हटलें, " वहिनी, तूं असं वेडयासारखं करूं नको, माझं ऐक. तुला चांगलं येत नसलं तर मी इथें येतें चार आठ दिवसांनीं तेव्हां सांगत जाईन. तूं शिकतें म्हण म्हणजे झालं. त्यांत तुझं जातं काय ? दम धर, आतां दुपारची वेळ आहे. माईचं कांहीं काम नाहीं. बैस इथें. तें बुक घे अन्‌ वाच पाहूं; तुला काय येतं तें मला पाहूं दे ! "

" अहो, मला कांही येत नाहीं बर्सं, उगीच का माझ्यापाठीमागें लागतां ? "

" असं काय करतेस ग वहिनी ? तीनतीनदां तुला सांगतें तर ऐकतच नाहींस. घे तें बुक अन्‌ दाखव मला वाचून काय तुला येत असेल तें ! अक्षरं ओळखतात कीं नाहीं हें तर समजेल. "

" मला कांहीं येत नाहीं कांहीं येत नाहीं, कांहीं येत नाहीं, अन्‌ मी आतां बसतस्‌ नाहीं."

इतकें जेव्हां झालें तेव्हां मला रागच आला. पण मी आपला तो गिळून तिला म्हटलें, " बरं, पण पुस्तक उघडशील तर खरी ? मी वाचून तुला गोष्ट सांगतें. मग तू वाचून दाखव. असं करूं नको वेडयासारखं. माझं ऐक. अग, बायकांनीं शिकावं अशी दादाला भारी हौस अन्‌ तूं असं कां करतेस ? हं, घे घे तें बुक; आणखी उघडून वाच."

इतक्यांत " यमुताई, आपण आपल्या घरीं काय पाहिजे तें करा. पण हे असले ढंग माझ्या घरांत नाहीं हो मला खपायचे. तुझी तू आपली मुखत्यारीण आहेस. हवं तें करा पण हिला हे असले चाळे शिकवूं नका. तुम्हांला येतंय्‌ना वाचायला ? पुष्कळ झालं,

साऱ्यांनाच कशाला पाहिजे यायला ? गणपतरावांना आतां काय बायकोला ल्याहायला वाचायला आलं पाहिजे का ? अगबाई ! त्यांचं स्वतःचं संपलं वाटतं सारं ? झाल्या वाटतं साऱ्या परीक्षा ! छे. छे छे. आतांचा हा चावटपणाच कांहीं निराळा हं ? "

हे शब्द कोणाचे असतील हें कांहीं मी सांगितलें पाहिजे असें नाहीं. आमचें सारें-निदान शेवटचा भाग तरी-माईसाहेबांनीं ऐकून वर येऊन हा झणकारा मारला. त्या वेळची त्यांची ती मुद्रा पाहण्याजोगी होती. तो चेहऱ्यावर दिसणारा तिरस्कार, ती " काय पण सोळा आणे पकडली आहे तुला ? आतां चांगलं नाकच टेंचेल ! " असें पक्कें मनांत वाटत आहे असें दर्शविणारी व उपहासाच्या हसण्यानें आणि किंचित् रागानें खुलणारी दृष्टि, बोलतांना चाललेले सर्व आविर्भाव वगैरे पाहून मी तर फारच दचकलें, भ्यालेंहि. एक तर माईसाहेब इतका वेळ जिन्यांत उभ्या राहून बोलणें ऐकतील अशी प्रथम मला शंकाच आली नाहीं. मला वाटतें, मनुष्याचें चित्त एका कामांत गुंतून गेलें असलें म्हणजे त्यास मागलेंपुढलें भान राहात नाहीं; त्याचप्रमाणें माझी स्थिति झाली होती. आजपर्यंत माईसाहेबांचा स्वभाव ठाऊक असून मला ती शंका आली नाहीं हेंच आश्चर्य; पण होणाऱ्या गोष्टींपुढें उपाय नसतो. असो. माईसाहेबांचें तें मनाला भेदून जाणारें भाषण ऐकून माझ्या मनाला काय वाटलें असेल तें माझें मलाच ठाऊक ! विशेष वाईट वाटण्याचें कारण हें की, सर्व भाषण वहिनीच्यादेखत उघड उघड झालें, मग काय विचारतां ? आधींच तारें अन् त्यांत शिरलें वारें ! माझ्याच्यानें पुढें मुळींच बोलवेना. जीभ बांधल्यासारखी झाली. माईसाहेबांच्या तोंडाचा पट्टा पुढें चाललाच होता.

" एकुण आतां बायकोला मोठी शिकणारी करायची का ? आणखी काय काय करायचं ? तिला झगा नेसवून मडबीण नाहीं का बनवायची ? चांगलं, चांगलं ! मग आपण साहेब आणखी ती मड्डम. चालले हातांत हात घालून. अन् मग इंग्रजी बोलायचंना एकमेकांत ? आम्हांला याच्या आपल्या शिव्या, कांहीं समजायला नको आम्हांला, कांहीं नको. चांगलं ! चांगलं ! हायस्कुलांत कधींपासून जायचं ! आज घरीं यायचं झालं कीं नाहीं संध्याकाळीं, म्हणजे सांगतें हो, उद्यां एक बूट न् छत्री आणायला. अन् मी आपली येत जाईन बुकं दप्तर पोंचवायला ? ती दप्तरदारांची मुलगी जाते की नाहीं रोज आपल्या दारावरून ! तशीच तूंय् जात जा. बसा तिथें आतां टेबलापाशीं आं ? खालीं कशाला येतां ? ताटं वाढून आणून ठेवीन मी दोघांचीं वर." एक ना दोन ! अद्वातद्वा एकसारखें तोंड चाललें होतें. मला असें वाटलें, कीं आतां आपलें उठावें अन् चालतें व्हावें. नको तें ऐकायला ! आमच्या माईसाहेबांच्या थाटाला आणखी वयाला कांहीं हें असलें बोलणें शोभणारें नव्हतें. हो, तो उलटा अंबाडा, त्यावर तें गुलाबाचं फूल, त्या चिटाच्या चोळया, तो कमरेचा हातरुमाल आणखी त्यावर किल्लया; इतक्या सगळ्या नव्या थाटाला हा शिकण्याचा तिट्कारा, आणखी असला हा उपहास अगदीं चमत्कारिक वाटला. पण करायचं काय ? उलटून बोलायची कांहीं सोय नव्हती. आणखी त्यांतून मी शेवटीं बोलणार तों ती ताबडतोब गेलीच तिथून. अर्थात् तिच्या मागोमाग वहिनीहि गेली आणि मी

झाल्या हकीकतीवर स्वस्थ विचार करीत बसलें. दुसरें काय करणार ! संध्याकाळीं दादा येईल तेव्हां आणि त्याला सर्व हकीकत सांगेन केव्हां असें मला झालें होतें.

सरतेशेवटीं दादा एकदाचा साडेपांच वाजतां आला. तो वर आपल्या माडींत येतांच मी त्याला कांहीं म्हणणार तों तोंच मला हसत हसत म्हणतो, " का यमुताई, झाली का चौकशी ? "

तो त्याचा प्रश्न ऐकल्याबरोबर आतां बोलावें तरी काय, असें मला झालें; झालेली हकीकत सांगावी कशी, हेंच समजेना. शेवटीं कांहींबाहीं करून त्याच्या कानावर एकदा इत्थंभूत हकीकत घातली.

त्या वेळीं त्याच्या मनाला काय वाटलें असेल, तें त्याचें त्याला ठाऊक ! तो क्षणमात्र उगीच बसला. नंतर जणू काय आपल्या मनांत काय चाललें आहे तें हिला कळूं नये असें मनांत येऊनच कीं काय, ते विचार झांकण्याच्या हेतूनें हसून म्हणतो, " एकूण आज असं झालं काय ? यमुबाई, आम्ही आधींच तुम्हांला सांगत होतों, कीं या असल्या भानगडींत पडूं नका म्हणून. पण तुम्ही कुठल्या ऐकायला ? " हें सारें तो हळूंच बोलला; पण पुढचे शब्द त्याच्याहिपेक्षां हलके बोलला; ते माझ्याखेरीज दुसऱ्या कोणाला —कोणी आडून उभें राहून ऐकूं म्हटलें तरी ऐकूं गेले नसते. ते शब्द असे— " यमे, मीं केव्हांच परीक्षा केली, म्हणून तुला सांगितलं नाहीं बरं ? अग, ता म्हणता ताकभात ओळखावा लागतो तो असाच. पण तूं नाहींतरी थोडीशी घाईच केलीस, नाहीं बरं ?, चला जाऊं द्या, आतां एकदा बरं कळलं आपल्या नशिबीं कितपत सुख आहे तें ! "

इतकें तो बोलतो तों माईसाहेबांनीं खालून " यमुबाई, आज आपल्याला तिसरा दिवस आहे, म्हटलं दिवसाउजेडीं फराळाला आलात तर पाहा " असें मोठ्या तोऱ्यानें सांगितलें. मला पोरीला हे असले नेमधर्म कुठले ठाऊक ? पण बोलायचेंच म्हटलें म्हणजे मग काय ? त्याला कांहीं कारण लागत नसतें. मी मुकाट्यानें उठलें आणि खालीं गेलें. आमच्या माईसाहेबांची मोठी शिताफी काय तीं ही होती, कीं उरीदुरी, लागून खोंचून बोलायचें; तसेंच, बाबा असले म्हणजे तर आमची अशी काळजी दाखवावयाची कीं कांहीं पुसूं नये. एखादे वेळीं जेवतांना—येऊन जाऊन दादा आणखी बाबा एकदम एका जागीं यायचे जेवायच्याच वेळीं बाकी कधीं एकमेकांचें दर्शन नाहीं, मग बोलणें संवरणें कुठलें ? काय असेल तें असो, दादा होतां होईल तों बाबांच्या दृष्टीसदेखील पडूं नये यासाठीं झटे. त्यांच्याशीं बोलणें म्हणजे मोठी जिवावरली गोष्ट. त्यांच्या पंक्तीला असतांना त्यास जेवणदेखील जात नसे. पण हीच स्थिति माझी स्वतःचीदेखील असे. दादाची तशी असावी याबद्दल मात्र मला फार आश्चर्य वाटे. कारण तो मजपेक्षां कितीतरी धीट होता; पण धीटपणापेक्षां दुसरी कांहीं गोष्ट बापलेकांत मनाचा मोकळेपणा राहण्यास अवश्य असते हें माझ्या लक्षांतच आलें नव्हतें. असो.

एखादे वेळीं जेवतांना आमच्या माईसाहेब म्हणायच्या, " आतांशा हा गणपतराव अगदीं वाळला कां ? त्याला एकदा विचारावं तरी काय होतं तें, नाहीं तर डॉक्टरला तरी दाखवावं." एखादे वेळीं म्हणावें, " अरे गणपतराव, संध्याकाळीं आल्यावर खात कां नाहींस अगदीं ? मग किती वेळ जेवणासाठीं तिष्ठत बसावं लागतं तें. नाहीं तर आपण तरी लवकर यायचं रोज !" एखादे वेळीं म्हणावें, " गणपतरावाला किनई आतांशा परीक्षेची काळजी लागलीशी दिसते. सारा दिवस आपण बरा कीं आपलं बूक बरं ! माडीच्या खालींदेखील उतरत नाहीं." अशा एक कीं दोन गोष्टी सांगूं ? सगळ्या गोष्टी सांगेन तर एक रामायणच होईल. नवलाची गोष्ट ही, कीं वयानें ती अगदीं लहान असतां तिला ह्या सगळ्या गोष्टी साधत कशा ? बरें, ज्या गोष्टी ती दादाच्या अगर माझ्यादेखत आमच्यासारख्या म्हणून बोले, त्या गोष्टी एकीकडे बाबांजवळ तशाच बोले असें मुळींच नाहीं, हें मुद्दाम सांगावयास पाहिजे असें नाहीं. दादाच्या आणखी केव्हां केव्हां माझ्याहि चुगल्या ती बाबांस सांगे. मला पक्कें आठवतें आहे कीं, हळदीकुंकवाच्या दिवशीं दुर्गा व मी वर जाऊन बसलों होतों तें सर्व तिनें बाबांच्याजवळ सांगितलें. कारण पुढें दुर्गाला डोहाळतुली म्हणून जेवायला बोलावलें, तेव्हां आम्ही दोघी बोलत असतांना बाबांच्या देखत माईसाहेब कशा म्हणतात : " दादाची माडी मोकळी आहे, आंतून कडी लावून खुशाल बोलत बसा जा, मदतीला हवी तर वहिनीला न्या."

तेव्हां बाबा हसत हसत म्हणतात : पुरे बोवा, तूं तरी एकदा एखाद्याच्या पाठीमागं लागलीस कीं फारच करतेस, बसल्या असतील एखादे वेळ जाऊन वर, त्याचं काय ?"

आधीं बाबा कधीं बोलायचे नाहींत, आणखी त्यांत हें असें बोलले, मग काय विचारतां ! माईसाहेबांना जो काय फणकारा आला आहे ! " मग मी काय म्हणतें आहें ? कांहीं त्यांना दुसरंतिसरं कां म्हटलं ? त्यांत तो एवढा कैवार कशाला घ्यायला पाहिजे होता ? तें म्हणताना, दुसऱ्यांनीं किती जरी केलं तरी जिकडचं तिकडंच जायचं. वळणाचं पाणी वळणालाच ! जा मेलं जाईना का. इथं माझं तरी काय एवढं ! पुनः तोंडावाटे मी शब्द काढीन तर शपथ ! आम्ही किती जरी केलं–अन् उगीच कुठें एवढं बिघडलं तर झालं. बोलून चालून सावत्र आईच ती !......"

हें माईसाहेबांचें बोलणें चाललें असतांना बाबांचा चेहरा पाहण्याजोगा होता. आपली नेहमीची गंभीरता टाकून आपण कशाला हें बोलायला गेलों, असें त्यांच्या मनांत येऊनच की काय, ते अगदीं खजील झाल्यासारखे दिसले. मला त्या वेळीं माझ्या सख्ख्या आईची आठवण होऊन ती असतांना बाबांचा चेहरा कधीं असा झाला होता काय, असा प्रश्न उद्भवला व त्याचें उत्तर काय आलें असेल हें मुळींच सांगावयास नको. त्यावेळची ती जाज्वल्यता आणि आजची ही सौम्यता–सौम्यताच म्हणावी कीं आणखी पलीकडचे कांहीं नांव यावें ?—यांचा विरोध फारच विलक्षण दिसला. त्या वेळीं माझ्या

मनाला काय वाटलें तें निराळेंच परंतु आज त्या दोनहि वेळा डोळ्यांसमोर आणून मी लिहीत आहें, तर मला तो विरोध फारच चमत्कारिक वाटत आहे. खरेंच काय असेल, तें असो, दुसऱ्या बायकोशीं पुरुष जितके सौम्यपणानें वागतात, किंबहुना तिच्या मुठींत असतात, तितक्या कठोरपणानें—सर्वजण जरी नाहीं तरी बरेचसे-पहिल्या बायकोशीं वागतात, असा साधारणतः पुष्कळांचा अनुभव आहे. ज्या गोष्टी पहिल्या बायकोनें केल्या तर यत्किंचित् खपत नाहींत, त्या गोष्टी दुसरीनें केल्या तर चट खपतात; इतकेंच नव्हे, तर त्या तिनें खुशाल कराव्या अशी तिला मुभा मिळते. हें असें कां होतें ? हें मला मोठें गूढ आहे, पण तें उकलण्याच्या भानगडीत व्यर्थ काळ घालविण्यापेक्षां येथेंच संपवून माझ्या पुढल्या हकीकतीकडे वळतें.

मला असें वाटलें होतें, कीं आज जेवणाच्या वेळीं, दुपारी झालेला सर्व वृत्तान्त काढून माईसाहेब बाबांजवळ त्याचा पाढा वाचतील; आणखी पाढा वाचूनच राहिल्या तर मोठें भाग्य ! त्यावर अकांडतांडवहि करतील. परंतु तो माझा समज चुकीचा झाला. स्पष्टपणें बाबांच्यादेखत बोलणें हें माईसाहेबांच्या एकंदर वहिवाटीला अनुसरून नव्हतें. एखादवेळीं चुकून ती नेहमींची वहिवाट विसरली जाई; आणि अशी गेलीच तर त्याबद्दल वर एक उदाहरण दिल्याप्रमाणें बोलून बोलून व आपल्यालाच शिव्या घेऊन आकाशपाताळ एक केलें असतां बाबांना उगीच बसण्याखेरीज दुसरा मार्ग नसे. तथापि ते दिवशीं तिनें हळूहळू उपरोधिक बोलणी चालविलीच होतीं. मधेंच म्हणावें, " गणपत-राव, मलादिखील आतां उद्यां एक बूक आणून दे बरं का. घरांतलं काम असलं तरी मीं वाचीन. यमुताई, तूं इथं कधींमधीं येतेस तेव्हां शिकवीत जाशील ना ? " हें व अशाच अर्थाचें कांहींतरी ते दिवशीं रात्रीं दोनदा कीं तीनदा म्हणाली ती; पण दादानें मान वर म्हणून केली नाही. मला वाटतं तिच्या मनांतला हेतु हा कीं, बाबांनीं " हे आजच काय निघालं आहे ? ' असें विचारावें आणखी, मग आपण " कांहीं नाहीं. " असें म्हणून त्यांची उत्सुकता वाढवावी; पण बाबांनीं मुळींच विचारलें नाहीं. पुढें एकीकडे ती सारी हकीकत त्यांच्या कानावर गेली असावी, त्याबद्दल शंका नको. असा एकंदर वहिनीच्या लिहिण्यावाचण्याचा इतिहास झाला. दादानें तें दिवशी रात्रीं मग मला स्पष्ट सांगितलें कीं, आपण त्या भानगडींत पडायचें नाहीं असा निश्चय केला आहे. जिची तिलाच जर इच्छा नाहीं, तर आपण तरी कां उगीच संताप करून घ्या ? हें सांगतांना त्याच्या अंतःकरणांत काय चाललें असेल तें त्याचें त्यालाच ठाऊक ! पण त्याला फार वाईट वाटलें असावें असें दिसलें. तो थोडा वेळ स्तब्ध राहून म्हणतो, " यमे, तिच्या माहेरीं इंग्रजीचा कीं नवीन कसला गंधदेखील नाहीं. बायकांनीं शिकणं म्हटलं कीं, कपाळाला पित्त चढायचं ! असलीं खोडंखुडकं घरांत, तिला इच्छा कशी व्हावी ? आणखी इकडच्या घरांत कितीसा उल्लास आहे तो दिसलाच आज आपल्याला. आतां तुला बरीक कुणाचीहि अडचण नाहीं; तर असं कांहींतरी करशील, कीं लोकांनीं तोंडांत बोटच घालावं. " हें दादाचें बोलणें ऐकून मी हसलें मात्र. कारण माझ्या हातून

लोकांनीं तोंडांत बोट घालण्याजोगं काय होणार होतं ? बोलून चालून मी बायको, मला कांहीं येत नाहीं, आणखी मी लोकांना अचंबा वाटण्याजोगें करणार काय ? हें खरोखरीच मला कांहीं समजत नव्हतें; तेव्हां दादा आपला कांहींतरी बरळतो आहे असेंच मला वाटलें आणि मी त्याला वेडा ठरवून हसलें. त्यानंतर तिकडची गोष्ट निघाली. परवांचे दिवशीं परीक्षेचा निकाल लागायचा होता, तो कसा काय लागतो, याची मला मोठी काळजी आहे असें मीं म्हटलें. दादानें, "अग, तूं काय काळजी करतेस ! ते अगदीं पहिले येणार. मुंबईस त्यांना चाकरी लागणार. तूं तेथें जाणार अन् यमे, मी जर येत्या सालीं पहिल्या सपाटयास पास झालों तर कांहींतरी तजवीज करून मुंबईसच राहायला येईन असें म्हणतों. बाबांच्या मनांत आलं, तर धाडतील; माईसाहेबांनीं मात्र खो घालं नये म्हणजे झालं !" दादा मुंबईस आल्यास त्यानें आपल्याच घरीं राहावें अशाबद्दल मी त्यास आग्रह करूं लागलें. तो म्हणे, कॉलेजांतच राहणें चांगलें, त्यापासून अभ्यासाला फायदा चांगला होतो. मीं म्हटलं तें कांहीं नाहीं. गांवांतल्या गांवांत माझें घर असतांना मी तुला दुसरीकडे राहूं द्यायची नाहीं. याप्रमाणें 'बाजारांत तुरी आणि भट भटणीला मारी' या म्हणीप्रमाणें आमचा वितंडवाद झाला.

◆ ◆ ◆

## ३८ : दुर्गीच्या नवऱ्याची परीक्षा

* * * * * * * * * * * * * * *

दुसरे दिवशीं सकाळीं मी अंगबिंग धुण्यासाठीं दाराबाहेर बसलें होतें, वहिनी घरांतून ऊन पाणी आणायला गेली होती. इतक्यांत दुर्गी, दुर्गीची आई आणखी तिचा बाप अगदीं घाबऱ्या घाबऱ्या आमच्या घरावरून चाललीं होतीं. त्या तिघांपैकीं कोणीं एकानेंहि मजकडे पाहिलें नाहीं, परंतु मीं त्यास पाहिलें. ही मंडळी अशी काय चालली आहेत, आणि कोणीकडे चालली आहेत हें माझ्या लक्षांत येईना. काय तें जाणण्याची इच्छा होऊन पटकन् त्यांच्या थोडीशी मागोमाग जाऊन मीं दुर्गीला हांक मारली. तिची आई आणि बाप पुढें चाललीं होती. तिला बिचारीला धड चालवत नव्हतें. अगदीं टेकलेली गर्भारशी ती; पण अशा स्थितींत चालली होती कशाला ? कोणीकडे ? तिला हांक मारतांच ती थबकली व मीं विचारलें, "अग, अशी चाललीस कुठें आईबापांना घेऊन ?" हे शब्द कानीं पडतांच "माझं नशीब फुटलंय तिकडे" असें म्हणून ती पुढेंच चालती झाली. ती तिची त्या वेळची मुद्रा इतकी केविलवाणी झाली होती, कीं कांहीं सांगवत नाहीं आणि ते भयंकर शब्द निघतांच तोंड जें दिसत होतें तें मनांत आलें, तर आज या वेळीं माझ्या डोळ्यांना पाणी येतें आहे. त्या भयंकर शब्दांचा अर्थ तरी काय ? तिच्या नवऱ्याला तर कांहीं झालं नाहीं ना ? असा भयंकर विचार मनांत येऊन मी अगदीं घाबरून गेलें. तिला कांहीं पुढें विचारणार, तों ती डोळयापुढून पार गेलीदेखील !

क्षणमात्र उभी राहून मी विचार करीत करीत परत आलें, तों " वन्सं, इश्श मेलं ! अशाच कुठें धावत गेलां होतां ? मी केवढा वेळची पाणी घेऊन उभी आहें. " या वहिनीसाहेबांच्या कर्कश व त्रासून उच्चारलेल्या शब्दांच्या धक्क्यानें जागी झालें, पण मनांत जें काय होत होतें तें माझें मलाच ठाऊक ! आतां विचारावें तरी कोणाला ? आणि ठाऊक कोणाला ? असें झालें. घरांत तर कांहीं तोंडांतून शब्द काढायची सोय नाहीं. स्वतः दुर्गीच्या घरीं जाऊन शोध करावा, तर घराच्या बाहेर जायचें कसें ? अन् माईसाहेबांना विचारून त्या परवानगी देतील कीं नाहीं याची वानवा !

मुकाट्यानें आपली अंग धुतलें आणि घरांत गेलें; पण जिवाची तळमळ कांहीं कमी होईना. राहून राहून सगळ्यांत वाईट असा जो आम्हां बायकांचा विचार तो मनांत येई. दुर्गीच्या नवऱ्याचें कांहीं बरेंवाईट तर नाहींना झालें ? पण असें कांहीं असेल तर तिला अशी बरोबर कशी नेतील ? का तीच न ऐकतांना जाते आहे ! अगबाई ! असें जर कांहीं झालें असेल, तर देवा नारायणा ! कायरे हा तिच्यावर गहजब ? असा काय तिचा अपराध, कीं तिला आयुष्य दुःखांतच काढावें लागणार ? तिची स्थिति आतां काय बरें होईल ? त्यांतून ती गर्भारशी. छे छे ! असला प्रसंग आणखी दुर्गीसारख्या गरीब गाईवर ! असे नाना तऱ्हेचे विचार मनांत येऊन मनाला अधिकाधिक उद्वेग मात्र होऊं लागला. काय आहे तें कळण्याला मार्ग सुचेना. शेवटीं मी आपले केसबीस पुसून कुंकूं लावून ती मंडळी कदाचित् इकडून पुनः परततील, तेव्हां आपणांस काय तें कळेल, अशा आशेनें दारांत जाऊन उभी राहिलें. पण काय ? कोणी येतांना दिसेना; माझा उद्वेग तर क्षणोक्षणीं अधिकाधिक वाढला. घटका प्रहराप्रमाणें खरोखरीच भासूं लागल्या; पण कोणीतरी येईल अशा आशेनें मी आपली तशीच तिथें उभी राहिलें. घरांत माईसाहेब काय म्हणतील, काय संवरतील, याचा विचार मनांत क्षणमात्रदेखील आला नाहीं. सरतेशेवटीं मी अगदीं निराश झालें व इतक्यांत माई-साहेबांनीं मोठ्यानें पाचारण केलें; तेव्हां निरुपायास्तव घरांत जावें लागलें. मी घरांत गेलें, पण माझें मन दुर्गीकडे होतें, तें कसें परत येतें ? मीं कशीबशी जेवून दोन प्रहरपर्यंत वेळ काढला; पण मग अगदीं राहवेनाच ! तेव्हां काय होईल तें होवो, माईसाहेब बोलोत, रागावोत, आपण दुर्गीच्या घरीं जाण्याविषयीं विचारायचें, असें मनांत आणून मीं विचारलेंच. त्यांनींहि मला कां, कशाला, म्हणून विचारलें. तेव्हां सकाळची हकीकत सांगितली, त्यासरशीं कपाळाला आंठ्या घालून " हं, जा. तुमच्या तुम्ही आतां मुखत्यारच आहां," असें म्हणून त्यांनीं परवानगी दिली. ही वेळ मागेंपुढें पाहण्याची नव्हती. पडत्या फळाची आज्ञा, मग तें फळ कसें का पडेना ? असा विचार करून मी डोक्यावर पदर घेऊन आपली बाहेर पडलें. आतां मी कांहीं लहान नव्हतें. माईसाहेबांच्या बरोबरीचीच मी, पण त्या वडीलपणाचा आव आणीत तोच काय तो अधिक. असें त्यांच्यांत माझ्यांत अंतर तें किती ? आणखी रोज मरे त्याला कोण रडे म्हणतात ना ? तशांतली गत. नेहमीं तसलींच बोलणीं. या कानानें ऐकावीं आणखी या

कानानें सोडून द्यावीं. असे कांहीं विचार मनांत येऊन व विशेषतः दुर्गीकडे लक्ष गुंतल्यामुळें मी आपली चालती झालें. वाटेनें जातांना काय विचार माझ्या मनांत येत होते आणखी काय नाहीं, हें कांहीं सांगतां येत नाहीं. ' मन चिंती, तसें वैरी न चिंती ' या म्हणीचा मला पक्का अनुभव आला.

मी झपाझपा चालून दुर्गीच्या घरीं गेलें, तों पुढलें दार लावलेलें असून जिकडे तिकडे शुक झालें आहेसें मला वाटलें, आणखी पोटांत एवढा थोरला धोंडाच उभा राहिला. " हे आहे तरी काय ? मंडळी तिकडे कुठें गेली ती परत आलीच नाहींत की काय ? दुर्गीच्या सासरींच गेली असावी; तिच्या नवऱ्याचेंच कांहींतरी बरंवाईट झालें असावें ! " अशी मनाची खात्री झाली; व मनाची स्थिति इतकी विलक्षण झाली, कीं दारावर हात देऊन मी बराच वेळ उभी राहिलें. मला त्या वेळीं, बाहेर चांगलें ऊन आणखी माझा वेष तो तसा. पदर सगळा गळलेला. केसबीस कसे तरी सांवरून गुंडाळलेले, अशी कोणीं पाहिली असेल, त्यानें खरोखरच मला वेडी म्हणून म्हटलें असेल ! पण मी तरी करूं काय ? माझें मन खरोखरीच वेडावल्यासारखें झालें होतें. कांहीं सुचेनाच. हांक मारावी कशी ? घरांत जर गोंधळ झाला असला, तर हांक देणार कोण ? आणि मारावी कोणाला ? शेवटीं दाराची कडी ठोठावून मीं मोठ्यानें ' बहिणाकाकू ! बहिणाकाकू ! ' करून हांक मारिली, तेव्हां लागलीच दुर्गीच्या धाकट्या भावानें येऊन कडी काढली. त्याला पाहण्याबरोबर मी त्याला घाबऱ्या घाबऱ्या ' दुर्गी कुठें आहे ? ' असें विचारलें. तो " आहे आंत. कां ? " असें म्हणाला. त्याबरोबर आणखी ' तुझे बाबा कुठें आहेत ? ' म्हणून मीं त्यास विचारले; तेव्हां तो चमत्कारिक तऱ्हेनें मजकडे पाहून म्हणतो, " कां बरं ? ते आत्तांच गेले. " ' आत्तांच ' असा शब्द ऐकण्याबरोबर, माझ्या पोटांत पुन्हा धस्स होऊन मी आंत धावलें ! आंत जातें तों माझ्या दृष्टीस जो प्रकार पडला तो पाहण्याबरोबर जें काय माझ्या जिवाचें झालें तें झालें. दुर्गी केश अस्ताव्यस्त टाकून जमिनीवरच पडली होती व एकसारखी ओक्साबोक्शीं रडत होती. तिची आजी " अग, ऊठ, झालं तें झालं," असं म्हणून आपणहि रडकुंडें तोंड करून पण तिचें समाधान करीत होती. तिची आई कोठें दिसली नाहीं. तें पाहण्याबरोबर आधीं ज्या कांहीं भयंकर गोष्टी मनांत येत होत्या, त्या सर्व खऱ्या असें मनांत येऊन मला एकदम गहिंवर आला, आणि मी रडत रडत कांहीं बोलणार तोंच तो दुर्गीचा भाऊ मोठ्यानें म्हणतो, " आजी आजी, ही पाहा यमूताई आली आहे." त्याबरोबर त्या म्हातारीनें वर पाहिलें आणि एकदम रडत रडत, " यमू , आज देवानं मोठी खैर केली. तुझ्या दुर्गीचं सौभाग्य..." पुढें त्या म्हातारीच्यानें कांहीं बोलवेनाच. पण तितक्याच शब्दांनीं माझा जीव किती खालीं पडला म्हणून सांगूं ? एकदम मोठं थोरलें ओझें उचलून टाकल्यासारखें होऊन मी दुर्गीच्या जवळ गेलें, आणखी तिला उचलून मिठी मारून रडत रडत म्हटलें, " दुर्गे, काय झालं, काय झालं मला नाहीं का सांगत ? हें बघ, सकाळपासून माझ्या तोंडचं अगदीं पाणी पळालं आहे. सांग काय झालं तें, असं काय करतेस ! " त्याबरोबर ती

तशीच रडत रडत म्हणते, " यमे, आज मी तुझ्या दृष्टीस अशी पडतें आहे हें दैव समज. माझं कपाळ आज फुटत होतं ग. पण वांचलं..." हे शब्द तिच्या तोंडून इतक्या कांहीं विलक्षण तऱ्हेनें निघत होते, कीं ते ऐकण्याबरोबर प्रत्यक्ष काळाला करुणा आली असती; मग माझ्यासारख्या तिच्या जिव्हाळ्याच्या मैत्रिणीच्या जिवाचें काय झालें असेल हें कसें सांगावें !

मी तिला उगी करून तिच्या तोंडून कांहीं कळल्यास पाहात होतें. ती तिची म्हातारी आजी मला सांगत होती, इतक्यांत दुर्गीची आई हातांत पूजेचें सामान घेऊन बाहेरून आली. इतक्या उशीरां—चांगले दोन वाजले होते म्हणाना !—ती कुठें देवाला गेलेली पाहून मला आश्चर्य वाटलेंच; पण जेव्हां कळलें कीं सकाळच्या संकटाबद्दल केलेला कांहीं नवस फेडण्यासाठीं जोगेश्वरीला गेली होती, तेव्हां तें ठीक वाटलें. अजूनपर्यंत जेवणें कोणाचींच झालीं नव्हतीं. दुर्गीचा बाप तसाच कायसा हापिसांत गेला होता. दुर्गीची आई आल्यावर तिनें, मी व आजीनें दुर्गीला उठवून बाबापुता करून अंग धुवायला घातलें; आणखी जेवायला बसवलें. सगळी मंडळी जेवायला बसेपर्यंत मला एकंदर सकाळीं काय झालें काय नाहीं हें सर्व समजलेंच, आणि इतरांप्रमाणें मीहि " दुर्गीचे चुडे बळकट म्हणूनच आज तिच्यावरला प्रसंग टळला ! " असें म्हणूं लागलें.

खरोखरी जर मेला जीव देता तर घ्या काय त्याचें ? पोरगी मात्र सर्वस्वी नाडली असती ! तिच्या जन्माचें आधींच सारें मातेरें झालें होतें; त्यांत उगीच सौभाग्याचें भूषण तेंहि गेलें असतें, म्हणजे काय उरलें होतें ? पण देवाच्या मनांत तितक्या थराला गोष्टी न्यावयाच्या नव्हत्या एवढेंच म्हणायचें !

दुर्गीच्या नवऱ्यासारख्यांच्या हातून दुसरें तिसरें काय व्हायचें आहे ? मेल्यानें कुठें कोणाच्या घरीं जाऊन चाळीस कीं पन्नास रुपयांची चोरी केली आणखी ती अंगावर आली. ज्याची चोरी केली तो पोलिसांत नेऊं लागला, तेव्हां ते रुपये भरण्यासाठीं आईच्या पाठीस लागला. तिला पाहिल्यानें तें सारं थोतांड वाटलं म्हणून तिनें नाहीं म्हटलें; रागावली, जाजावली, शिव्या दिल्या, तेव्हां तावातावानें जाऊन त्यानें विहिरींत उडी टाकली. सकाळी सात वाजण्याची गोष्ट. असली बातमी काय क्षणभर तरी गुप्त राहते ! लागलीच कोणीशी जाऊन दुर्गीच्या घरीं कळवली. ती सगळ्यांच्या देखत. तेव्हां तिचा बाप, तिची आई आणखी नको नको म्हटलें तरी न ऐकतां दुर्गी अशी सगळीं मंडळी तिकडे गेली. पण नशिबाची ही गोष्ट कीं दुर्गीच्या नवऱ्याला चांगलें पोहावयास येत होतें, त्यामुळें तो न बुडतां पोहून वरच राहिला. आईबापांच्या व शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या तोंडचें पाणी मात्र अगदीं पळालें. जिकडे तिकडे मंडळी धावाधाव करूं लागली. सासू, बायको आली. त्यांनीं कहरच केला. दोर टाकला वर यायला, पण तो वरच येईना. शेवटीं कांहीं धाकदपटशा दाखवून कांहीं बाबापुता करून त्याला वर काढलें. चोरीची काय भानगड ती आहे मिटवितों असें त्याला त्यांनीं सांगितलें आणि मंडळी घरीं आली.

तितक्या त्या अवकाशांत घरीं राहिलेल्या म्हातारीने आणि रस्त्यानें चालत असतांना त्या आईनें किती नवस केले असतील ? काय करतील ? पोटचा गोळा देऊन त्यांनीं तिच्या व आपल्या गळ्याला हा नेहमींचा फास लावून घेतला होता; पण त्यांच्याकडे तरी या गोष्टीचा काय बोल ? कसायाच्या हातीं बकरी सांपडल्यावर त्यानें नेहमीं तिच्या मानेवर सुरी धरलेली असावी यांत नवल काय ? बिचारी दुर्गी म्हणजे खरोखर त्या मांगाच्या तावडींत सांपडलेल्या हरिणीसारखी होती. मेल्यानें—काय करूं ? या शिव्या लेखणीवाटे येतातच, त्याला माझा उपाय नाहीं, आणि त्या लिहिल्यावांचून खरें म्हणाल तर मनाला समाधानहि वाटत नाहीं, तेव्हां तशाच राहूं देतें. त्या मेल्यानें—त्या चांडाळानें—तिच्या साऱ्या जन्माचा सत्यानाश कीं हो केला !

ते दिवशीं मी आपली नाइलाजास्तव घरीं आलें. पण खरोखर माझें चित्त त्या दुर्गीकडे लागलेलें होतें. आपल्या बरोबरीची, आपली जिवाची मैत्रीण आणि तिच्या एकंदर जन्माचें असें मातेरें झालेलें पाहून कोणाच्या अंतःकरणास दुःख होणार नाहीं बरें ? मी तिला सोडून जेव्हां घरीं येऊं लागलें, तेव्हां राहण्याविषयीं तिनें मला कितीतरी आग्रह केला ! ती म्हणाली, " यमे, आतां मी तुझ्या नजरेस फार दिवस पडेन असं नाहीं. तूं आतां लवकरच मुंबईला जाशील आणखी मग इकडे माझं कांहीं बरंवाईट झालं, तर तुझी भेट कशानं होणार ? राहा आजचा दिवस इथेंच; रात्रीं आपण गोष्टी सांगूं. मला किनई यमे, तुला किती किती तरी गोष्टी सांगायच्या आहेत !..." असें ती किती तऱ्हेनें तरी बोलली असेल ! तिचे ते केविलवाणे शब्द ऐकून मलादेखील किती वेळां तरी " राहावें आजची रात्र " असें वाटलें, पण काय उपयोग ? परस्वाधीन जिणें आणि पुस्तकी विद्या ! राहीन म्हटलें आजची रात्र तर होतें का हातचें ? आणखी कोणत्याहि गोष्टींत केव्हांहि असतें का ? मीं दुपारपासून आलें याबद्दल माईसाहेब काय अकांडतांडव करतील आणखी काय नाहीं, हीच मला मोठी भीति पडली होती. ते दिवशीं दुर्गीची समजूत घालणें मोठे कठीण काम होतें. मीं तिला नाना तऱ्हांनीं सांगितलें, कीं मला गेलें पाहिजे, पण तिची समजूत पडेना. ती म्हणे, " यमे, आतां ग तुला कशाची आली आहे भीति ? आतां तूं झालीस स्वतःसिद्ध म्हणायची. अग आतां किती, तूं कांहीं केलंस तरी तुला कोणी कांहीं फारसं बोलायचं नाहीं. यमे, कसंहि करून राहा. काय असेल तें असो ' मला बाई आपलं असं वाटतं आहे कीं, तुझी माझी आतां पुनः कांहीं गांठ पडायची नाहीं. " ती एकदा, दोनदा, तीनदा जेव्हां असें म्हणाली तेव्हां माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल, ती माझी मलाच ठाऊक ! पण इतकें सगळें एकीकडे ठेवून आणखी मन कठोर करून मी तेथून निघून आलें. अर्थातच माझें मन सगळें दुर्गीच्या स्थितीबद्दलच्या विचारांनीं भरून गेलें होतें. या पोरीचा सारा जन्म आतां जाणार तरी कसा ? हिची पुढें अवस्था होणार काय ? हिला माहेरीं कीं सासरीं कशाचा तरी आधार आहे का ? एक नवरा धड नसला, म्हणजे सगळें व्यर्थ असें म्हणत असतों आम्ही, तें यत्किंचित् तरी खोटें आहे का ? असे अनेक प्रश्न डोळ्यांसमोर उभे राहून माझें मन

अतिशय उद्विग्न झालें होतें. या विचारांच्या भरांत मला रस्तादेखील धड दिसला नाहीं. मी आपली कशीबशी घरीं आलें. माझ्या मनांतून तेच दिवशीं सासरीं जायचें होतें; कारण, गेल्या दोनतीन दिवसांत मला मोठा त्रास झाला. वहिनीबाईचें आणखी आमचें कांहीं मोठेंसें जुळण्याजोगें नव्हतें; माईसाहेब तर कांहीं विचारूंच नका ! येऊन जाऊन दादाशीं काय तें बोलायचें, पण तो आपल्या उद्योगांत मग्न, आणखी मी आपली चवथे दिवशीं येईनच असें कबूल केलें होतें; पण आतां उशीर झाला; याउपर माईसाहेबांची परवानगी घेऊन जायचें म्हणजे दुरापास्त ! सासरची मंडळी तरी काय म्हणतील ? अशा नाना गोष्टी मनांत येऊन मी मग गेलें नाहीं व माझें मनहि दुर्गीच्या स्थितीबद्दल विचारांनीं अतिशय व्याकुळ झालें होतें, यामुळें मला तितकी उत्कंठाहि वाटली नाहीं.

मनाचा धर्म असा आहे, कीं त्यांत येणारे विचार—मग ते दुःखाचे असोत कीं सुखाचे असोत—फार झाले, म्हणजे दुसऱ्या कोणाच्या तरी मनांत ओतावे आणि त्यापासून समाधान पावावें. विचार सुखाचे असल्यास जिव्हाळ्याच्या माणसाला सांगितल्यानें तें सुख दुणावतें आणि दुःखाचे असल्यास दुःख कमी होतें, हा अनुभव प्रत्येकास असेलच ! कोणाना कोणा माणसाजवळ आपले विचार सांगितल्याखेरीज राहावतच नाहीं. आपलें मन उघडें करण्यास अतिशय जिव्हाळ्याचें माणूस नसलें, तर थोडयाबहुत स्नेह्यांजवळदेखील तें उघडावें आणि आपलें दुःख हलकें करून घ्यावें असें वाटतें. मग माझ्या दादासारखा जिव्हाळयाचा जवळ असल्यावर त्याला मी आपले सर्व विचार सांगितल्याखेरीज राहीन काय ? माझ्यासारखीच्यानें राहवेल तरी काय ? आम्ही निजण्यापूर्वी मीं त्याला दिवसा सकाळपासून घडलेली सारी हकीकत सांगितली. ती सांगत असतांना त्यानें कितीकदा तरी उसासे टाकले असतील ! शेवटीं मीं त्याला सहज म्हटले, " दादा, हीच दुर्गी आपण नुकतें त्यांच्या शेजारीं राहावयाला गेलों तेव्हां कशी दिसत असे आठवण आहेना ? आतां त्यांपैकीं कांहींतरी उरलें आहे का ! " मीं हे प्रश्न विचारले, तेव्हां तो कांहींच बोलेनासा झाला. परंतु बऱ्याच वेळानें मला म्हणतो, " यमे, कोंबडयाच्या गळ्यांत रत्नांच्या माळा पडायच्या असंच आहे जगांत, समजलीस ? ही पोरगी दुर्गी जर चांगल्या कुणाच्या..." इतकेंच बोलून तो थांबला, आणि मधेंच मला म्हणतो, " यमे, तीनतीनदा ती जी तुला म्हणाली, कीं आतां तुझी माझी गांठ पडेलसं वाटत नाहीं, तें तिच्या मनांत कांहीं वेडावांकडा भयंकर विचार नाहींना ? "

" वेडावांकडा म्हणजे ! " मी एकदम चपापून त्याला विचारलें.

" वेडावांकडा म्हणजे जीवबीव यावयाचा. अशा त्रासाला कंटाळलेल्या बायका केव्हां काय करतील याचा कांहीं नेम नाहीं, म्हणून म्हणतों. "

" छे ! दादा, भलतंच एखादं ! जीवबीव ती देईल असं नाहीं मला वाटत. "

" नाहीं म्हटलं तीनतीनदा तुला ती ' तुझी माझी आतां कसची गांठ ? आतां तुला मी पुनः भेटेनसं मला कांहीं वाटत नाहीं,' असं म्हणाली म्हणतेस म्हणून म्हटलं. "

मीं त्या वेळीं दादाला मोडून काढलें, तसा कांहीं तिचा अर्थ नाहीं. ती आपली बाळंतपणावरून म्हणाली. हें बाळंतपण म्हणजे एक मोठं जिवावरचंच असतं, त्यांतून तिची ही अशी अवस्था. हें लहान वय, हें सारं दुःख, आणखी ही असली निराशा; यामुळें आपलें तिला वाटलें झालें कांहीं. इतकें सारें मीं म्हटलें, पण माझें मन मला कांही तसें होणार नाहींच अशी साक्ष देईना. प्रथमतः मला ती शंका आलीच नव्हती. दादानें जेव्हां काढली तेव्हां ती माझ्या मनांत आली आणि मग मात्र कांहीं केल्या जाईना, ते अगदीं निराशेचे शब्द उच्चारतांना तिचा चेहरा कसा झाला होता तो माझ्या डोळ्यांपुढें दिसूं लागला आणि त्या चेहेऱ्यांत कांहींतरी असल्या भयंकर विचाराची झांक आहे असें मला वाटूं लागलें. मी जों जों त्याबद्दल जास्त विचार करूं लागलें, तों तों मला तें अधिक अधिकच संभवनीय वाटूं लागलें. नवऱ्यानें आज सकाळीं विहिरींत उडी टाकली, त्यासरसा जर तो मरता, तर आपलें तोंड काळें होऊन आपल्याला काळोखांत बसावें लागलें असतेंना ? आपले हाल मग कुत्रादेखील खाता ना ! आपली स्थिति काय झाली असती ? कोणाच्या पुढें तरी जाण्याला मग तोंड आहे का ? सासरच्या माणसांनीं क्षणभर तरी थारा दिला असता का ? सारा जन्म मग अंधारांत तोंड घालून कंठायचाना ? आज नवरा कसा जरी असला, तरी उजळ माथ्यानें पाहिजे तेथें जातां येतें; सौभाग्य गेलें असें होत नाहीं. आज नवऱ्याचें जर कांहीं बरें वाईट झालें असतें, तर मग कोठला उजळ माथा आणि कोठलें काय ! त्याच्यापेक्षां आपणच आधीं प्राण दिला तर काय वाईट ? आपण आपल्या आजच्या दुःखांतून मोकळ्या होऊं आणखी न जाणो, पुनः असाच कांहीं प्रसंग येणार नाहीं म्हणून कशावरून ? जें एकदा तेंच दहादा ! पुनः तुरुंगांत जाण्याचीच पाळी येणार नाहीं म्हणून कशावरून ? एकदा जी चटक लागली ती सुटणार कुठली ? आतां पुढें तरी आपल्याला सुखाची आशा कुठली ? आहे त्याच्यापेक्षां आतां आणखी कांहीं बरेंवाईट होऊं नये एवढेंच पाहायचें ! असे विचार मनांत येऊन तिनें खरोखरीच असा भयंकर विचार आपल्या मनांत आणला नसेलना ? हें मनांत येण्याबरोबर तर मला दादाचें म्हणणें फारच संभवनीय—नव्हे तें खरोखरी तसेंच असेल—असें वाटलें. "तुझी माझी आतां गांठ कसची पडणार ?" अशा अर्थाचे शब्द तिनें दोनतीनदा उच्चारले व तितक्या वेळां ते उच्चारण्यापूर्वीं कोणी ऐकत तर नाहींना ? असें मनांत येऊन तिनें साशंक मुद्रेनें इकडे तिकडे पाहिलें असा आतां मला भास झाला. ते शब्द तिनें म्हटले, तेव्हां खरोखर पाहिलें कीं नाहीं हे कांहीं मला आतां खात्रीनें सांगवेना. माझी मलादेखील आज खात्री वाटत नाहीं; पण तें दिवशीं दादाचें व माझें बोलणें झाल्यानंतर मी वरील विचार करीत असतांना तिनें तसें पाहिलें असावें; आपण बोलतों आहोंत तें दुसऱ्या कोणीं ऐकूं नये अशाबद्दलची आतुरता तिच्या चेहऱ्यावरून चांगली दिसत असावी, असें मला वाटलें, असा मला भास झाला. विचारावरून विचार कसेतरी सुचत असतात ! दुर्गीच्या स्थितीविषयीं, दुर्गीच्या मनांत आपण आपल्या जिवाचें कांहींतरी करावें; असें

येण्यास तिला काय काय वाटलें असावें इत्यादि गोष्टींविषयीं, विचार करतां करतां मला आमच्या एकंदर स्थितीविषयीं, कितीतरी विचार सुचले. लहानपणापासून, पुढें लग्न वगैरे होऊन संसार करायला लागून, मरेपर्यंत आम्हां बायकांची स्थिति किती विलक्षण, किती परस्वाधीन, किती दुःखकष्टमय असते ! असेच विचार त्या रात्रीं माझ्या मनांत आले--आमच्याहि स्थितींत तशा गोष्टी जुळून आल्यास सुख असतें, नाहीं असें नाहीं, परंतु एकंदर सर्व बाजूंनीं जर आमच्या स्थितीचें मनन केलें, तर सुखापेक्षां—दुःखाकष्टाचें पारडें जास्त खालीं बसतें असा माझा दृढ ग्रह आणि अनुभवहि आहे. आमच्या अज्ञानामुळें किंवा लहानपणापासून आमच्या मनावर कांहीं ग्रहांचीं आईबापांनीं शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं, सासूसासऱ्यांनीं, प्रत्यक्ष नवऱ्यांनींहि पुटेंचीं पुटें दिल्याकारणानें, आमची ही स्थितीच सुखस्थिति; परतंत्रतेंत, कष्टांत, अज्ञानांतच आमचें खरें सुख असें मनावर पक्कें बिंबविल्याकारणानें, दुसरे तिसरे श्रेष्ठ विचार सुचून स्वतंत्रतेचें खरें सुख, ज्ञानाचें खरें मोल कळणार कशानें ? सारांश, आम्हां स्त्रियांची एकंदर स्थिति अगदीं बरी असें मला त्या रात्रीं तरी वाटलें. मनाची स्थिति ज्या वेळीं ज्या तऱ्हेची असेल, त्या वेळीं त्या त्या तऱ्हेचे विचार येतात, या कारणानें कदाचित् तसें झालें असेल, पण झालें खरें.

त्या विचारांवरून माझ्या स्वतःच्या, दादाच्या, वहिनीच्या, सगळ्यांच्या पुढल्या स्थितीबद्दल विचार आले. दादाचें आणि वहिनीचें जुळावें कसें ? आणि तें जर जुळलें नाहीं तर त्याची स्थिति व्हावी कशी ? तो तर हा अशा स्वभावाचा पडला. वहिनीबाईचा प्रकारच निराळा दिसला. लागलीच असेंहि मनांत आलें की, उगीच ती आज असें करीत असेल, पुढें करणार नाहीं. त्यावरून कांहीं कारणानें मला एका इंग्रजी बुकांतली कांहीं गोष्ट नुकतीच सांगितली होती, त्यांतल्या एका बाईचीच आठवण झाली. त्या बाईला कायसें नको त्याच्याशीं लग्न करावें लागलें होतें. तें आठवून पुनः " कोठेंहि जा, पळसाला पानें तीनच " असेंहि मनांत आलें.

अशा नाना प्रकारच्या विचारांत असतां असतांच मला झोप लागली.

दुसरे दिवशीं सकाळीं नहाणें वगैरे होऊन मी आपल्या सासरीं गेलें, तरी आदले दिवशींच्या दुःखद विचारांनीं मला सोडलें नव्हतेंच. दुर्गीच्या मनांत जीव द्यायचा तर नाहींना ? ही जी दादाची शंका ती आपली कांहीं केल्या मनांतून जाईना. वाटे कीं, आतां घटका दोन घटकांनीं कोणीतरी सांगायला येईल कीं दुर्गी मेली. तिनं अफू खाल्ली; नाहीं तर विहिरींत जीव दिला म्हणून. मला राहून घेण्याचा ती आग्रह करीत होती, तें एकदा शेवटचें बोलून घ्यावें एवढ्याचकरितां तर नव्हेना ? असेंहि मनांत आलें. अशी कांहीं मनाची चमत्कारिक स्थिति झाली होती; परंतु आज आदले दिवसांप्रमाणें तेवढेच विचार मनांत चालले होते असें नाहीं.

◆ ◆ ◆

## ३९ : तिकडची परीक्षा

* * * * * * * * * * * * * * *

आज मुंबईस परीक्षेचा निकाल लागायचा होता, त्याचीहि धाकधूक मनांत होतीच. आणखी मी सासरीं आल्यावर त्याच्या संबंधानें मंडळींना बोलतांना ऐकलें, तेव्हां तर माझे पहिले विचार जाऊन परीक्षेचें कसें काय होतें याचाच मला धाक वाटूं लागला. दादानें आपलें मला खात्रीपूर्वक सांगितलेंच होतें. बहुतकरून पहिल्या वर्गांत नांव ठेविलेलें म्हणून—पण न जाणों काय होतें आणखी काय नाहीं ! — सुखाच्या गोष्टीबद्दल किती जरी खात्री असली तरी मन स्वस्थ राहातच नाहीं; त्याला आपल्या शंका चिकटायच्याच, आणखी त्यांतून त्या परीक्षेच्या निकालावर मुंबईला जाणें अवलंबून ! मग त्याबद्दल इतकी धाकधूक वाटून मन अस्वस्थ होईल यांत नवल काय ?

सुख आणि दुःख हीं नेहमीं कशीं आळीपाळीनें येत असतात. दुर्गीच्या त्या हकीकतीनें माझें मन विव्हळ होऊन गेलें असतांहि मनुष्याच्या अप्पलपोटेपणाला अनुसरून माझ्या स्थितीबद्दल—परीक्षेच्या निकालाबद्दल—मला हुरहूर लागली हें मीं आतां सांगिलेंच आहे. ते दिवशीं संध्याकाळीं निकाल खास लागणार होता, यामुळें संध्याकाळ होईल केव्हां आणि 'पहिल्या वर्गांत पास' अशीं अक्षरें आपल्याला ऐकायला सांपडतील केव्हां असें मला होऊन गेलें होतें. वास्तविक पहिला वर्ग म्हणजे काय आणि नुसतें पास म्हणजे काय याचा अर्थ जर मला कोणी विचारला असता, तर पहिला वर्ग म्हणजे मुंबईला चाकरी मिळून आम्ही स्वतःसिद्ध संसार करूं लागणें आणि पास म्हणजे तसें कांहीं न होणें, इतकेंच मला सांगतां आलें असतें, याच्या पलीकडे कांहीं नाहीं. परीक्षा म्हणजेच नोकरीचें चांगलें साधन ही माझी कल्पना. त्यांत विद्वत्तेचा, ज्ञानाचा कांहीं संबंध असतो असें लक्षांत येतें आहे कशाला ? आणि माझीच गोष्ट अशी आहे असें म्हणायला नको. आजच्या काळीं बहुतेक पुरुषांचादेखील असाच समज आहे असें म्हटल्यास फारसा प्रत्यवाय येणार नाहीं. परीक्षा देणें, विद्या करणें, म्हणजे चाकरी मिळविणें; मोठी परीक्षा देणें, म्हणजे एकदम चाकरी मिळविणें—हाच अर्थ ज्याच्या त्याच्या बोलण्यांत असतो. हा अर्थ खरा काय, बरा काय, याविषयीं वाटाघाट करणें माझ्या अधिकाराबाहेरचें समजून मीं आपली उगीच बसतें.

आजेसासूबाई आणखी धाकट्या मामेसासूबाई, या दोघींनीं तिकडची आणखी सासूबाईंची एकसारखी थट्टा आरंभली होती. "आतां काय मुंबईला जायचंना ? मग आम्हांला बोलावशील का रे तिथें ? येत्या ग्रहणाला समुद्रस्नानाला जायचं भारी माझ्या मनांत आहे." असें एकीनें म्हणावें; तों दुसरीनें लागलीच म्हणावें, "कराचंय् काय आपल्याला यांच्या इथें जाऊन ? उगीच लेकीच्या इथें जाऊं नये." गोपाळमामंजींनीं मधेंच म्हणावें, "आपल्याला कांहीं बोवा असं वाटत नाहीं. आपण आपले मग मुंबईस

दोनदाचारदा जाणार, आणखी त्याच्याच घरीं उतरणार." शंकरमामंजींनीं म्हणावें. "त्याच्या काय बापाची आम्हांला भीति आहे मग जायला ? मी तर नेहमीं जाईन." असें निरनिराळ्या मंडळींनीं आपापल्या परीनें बोलून आमची थट्टा चालविली होती. एक बोलल्या नाहीं उमासासूबाई; त्या आधीं कधीं बोलतच नसत, काय बोलतील बिचाऱ्या ! कामाखालीं त्यांचा पिट्टा पडत असे. आणखी एक गोपाळमामंजी नि आणखी आम्ही यांच्याखेरीज त्यांना बरें पाहणारें कोणीच नसे. ज्यानें त्यानें, प्रत्यक्ष त्यांच्या पोरट्यांनींसुद्धां त्यांना पाहिजे तसें बोलावें अशी असे स्थिति ! थट्टा, विनोद, या सगळ्या गोष्टी मनाच्या सुखावस्थेंत असतात. मन ठीक नसलें म्हणजे मग थट्टा नाहीं आणि विनोद नाहीं. वनुवन्सं, आणि इतर धाकट्या मंडळींची थट्टा म्हणजे शंकरमामंजींच्याच तोडीची; कांहींतरी कुचकट बोलावें. मध्येंच "आमचा अडलाय् खेटर तुमच्या घरीं यायला ! एवढी तुमची प्रतिष्ठा नको," असें म्हणून पाय उडवावा, "वहिनीबाई, तुमचा एवढा दिमाख नको कांहीं; आम्ही येणार नाहीं हो तुमच्या घरीं; आतांपासून तुम्हांला एवढा धाक नको." असें तोंडाला जे येईल तें बकावें, असे चाललें होतें. काय बोलावें, केव्हां बोलावें आणि कसें बोलावें, याचा सुमार त्यांना कधीं नसेच !

याप्रमाणें निरनिराळ्या मंडळीच्या प्रकृतिस्वभावाला अनुसरून एकंदर थट्टाविनोद चालला असतां संध्याकाळ झाली. माझी हुरहूर अधिकाधिक होऊं लागली. आतां थोड्याच वेळांत काय तो निकाल लागणार असें वाटून तो आपल्याला हवा तसा व्हावा म्हणून मीं नवस केला, कीं मी मुंबईस जाऊन स्थिरस्थावर झालें म्हणजे एकदा सत्यनारायण करीन. या नवसांत सर्व कांहीं आलें हें उघडच झालें. माझा कोणत्याहि कामास हात लागेना. तिकडे मी चोरून चोरून मधून मधून पाहिलें, तर चेहऱ्यावर आतुरता दिसत होती. मला जर इतकी होती, तर तिकडे असेल यांत नवल काय ? दुपारपर्यंत खेपादेखील कितीतरी झाल्या मुंबईहून एका स्नेह्याची तार यावयाची होती. आतां येईल मग येईल असें तिकडे जरी नसलें तरी मला खास झालें होतें. माझें चित्त खरोखरीच एकसारखें दाराकडे लागलें होतें. एखाद्याला माझ्या लिहिण्याचें हसूंदेखील येईल, पण खरोखर कोणीतरी तिकडचें सगळें नांव घेऊन मोठ्यानें हांक मारतो आहे असा मला दोनदातीनदा भास झाला. तारवाला कशा हांका मारीत येतो हें मला एकदादोनदा प्रत्यक्ष ऐकून व पाहून ठाऊक होतें, तेव्हां मला भास झाला यांत नवल नाहीं. नऊ वाजले तरी तारेला ठिकाण नाहीं. तेव्हां माझी तर अगदीं निराशा झाली. दहा वाजले तरी कांहीं नाहीं. शेवटीं तिकडेदेखील मनाची फार चलबिचल झाली. सगळ्याच मंडळींना चमत्कारिक वाटलें. आतां कांहीं तार येत नाहीं असें वाटून सारीच मंडळी आपली हात जोडून बसली होती. मला, खोलींत जाऊन "हें काय ?" म्हणून विचारावें अशी फार इच्छा झाली. शेवटीं साडेदहा वाजले. इतक्यांत तिकडच्या वर्गांतलाच परीक्षेला गेलेला दुसरा एक सोबती तार आली का म्हणून शोध करण्यासाठीं आला. त्याचीहि अशीच

तार यायची होती; परंतु तो कायसा आपला मध्यमपैकीं होता. आमच्याकडे अगदीं खात्री, तेव्हां इथें तरी तार आली असली तर शोध खास लागणार म्हणून इथें आला. त्याचें व तिकडचें बोलणें होतें, तों तिसरा एक तसाच आला आणि अमुक एका ठिकाणीं चला जाऊं, तिथें खात्रीनें शोध लागेल असें म्हणून त्यानें साऱ्यांना आग्रह केला. माझें सारें चित्त तिकडे होतें. " मी अंगरखा घालून येतों, " असें म्हणून तिकडून खोलींत येणें झालें, त्याबरोबर मला धीर कुठला ? " हें काय ? कांहीं नाहीं का ' " असें मीं वेडया-सारखें विचारलें, पण तिकडचे तितकें लक्ष मजकडे नसल्यामुळें " तूं नीज, मी थोडासा बाहेरून जाऊन येतों काय तो शोध करून " असें म्हणून मी कांहीं बोलण्याच्या आधींच निघून जायचें.

या वेळीं आतां माझ्या मनाची स्थिति काय झाली असेल, याची ज्याची त्यानें कल्पनाच करावी. आधीं माझें मन मोठें शंकेखोर ! आणखी त्यांत असें कांहीं कारण झाल्यावर मग काय विचारतां ? माझ्या जिवाची नुसती तळमळ उडाली. मी आपली अंथरुणावर पडलें होतें, परंतु मन सारें तिकडे, आणखी दादाकडे होतें. मधेंच तिकडून येणें झाल्याचा भास होई, मधेंच तारवाल्यानें हांक मारल्याचा भास होई. तो कशी हांक मारतो हे मला चांगलें ठाऊक होतें, यामुळें ती आपली हांक ऐकूं येई. एकदोनदा मी उठून खरोखरी दाराशीं जाऊन कानोसा घेतला. आणि मग माझें मलाच हसूं आले, कीं हें आहे तरी काय ? तार जर खरोखर आली तर पुढल्या रस्त्यावरल्या माडींत मामंजी नाहींत कीं काय ? अन् नसले तरी मला तर जाऊन ती घेतां येत नाहींना ? तें सगळें खरें, पण मनाचा धर्म मन केल्याखेरीज राहील ? कधीं राहायचेंच नाहीं. जसजसा उशीर झाला तसतशी हुरहूर वाटून माझी अगदीं तिरपीट उडाली. मला वाटतें अधीर माणसाचें कपाळच तें. कोणत्या गोष्टींत चांगली बाजू म्हणून दिसायचीच नाहीं. माझी आपली अगदीं आतां खात्री झाली, कीं पहिला वर्ग अन् दुसरा वर्ग तर लांबच, पण नुसती परीक्षा पासदेखील झाली नाहीं. बाराचे ठोके ऐकले, तरी तारवाला नाहीं आणखी तिकडूनहि येणें नाहीं, तेव्हां असें मनांत आलें कीं, " परीक्षा पास झाली नाहीं, आतां लवकर घरीं जाऊन काय करायचें आहे ? " असा विचार होऊन बाहेरच कुठें तरी बसायचें असेल. परीक्षा पास नाहीं, हीं अक्षरें माझ्या कानाशीं घुमूं लागलीं; व त्याबरोबर मुंबईस गेल्यावर काय काय करावयाचें, कसें कसें वागावयाचें, अशाबद्दलचे जे काय बेत, त्या बेतांच्या भल्या थोरल्या उंच उंच इमारती, धडाधड ढासळून खालीं येऊं लागल्या; व प्रत्येक मजल्याच्या ढांसळण्याबरोबर मनाला जबरदस्त धक्का बसूं लागला. मी आपली नाना तऱ्हेनें कुतर्क करून आपल्या मनाला दुःख देत होतें. " "आतां आपल्याला मुंबई नाहीं ना ? आणखी एक वर्ष असेंच दुसऱ्याच्या जिवावर त्यांचे कुचकट नासकट टोसरे सोशीत बसायचं ? आणि आतां परीक्षा नापास झाल्यावर तर कांहीं मंडळी फारच टोमणे यायला लागणार ! " मुंबईला जायला जशी कांहीं हुराळली होती; घे आतां मुंबई ! तिला असें झालें होतें कीं, आतां अगदीं मी स्वतःसिद्ध ! ' आणखी

अशा प्रकारचे किंवा त्याच्याहीपेक्षां मनाला विशेष लागणारे ठोसरे माझ्या कानाशीं ऐकूं येऊं लागले. तिकडे काय वाटेल ? आणखी एक वर्षभर दुसऱ्याच्या जिवावर खर्च खात कॉलेजांत रखडावें लागणार, इत्यादि गोष्टी मनांत येऊन किती वाईट वाटेल; वगैरे विचार माझ्या मनांतदेखील आले कीं नाहीं कोण जाणे ! पण माझे माझ्याबद्दल बरीक एकसारखे विचार चालले होते; इतकेंच नव्हे तर थोड्याच वेळांत डोळ्यांवाटें पाण्याच्या धारा लागून मी सूं सूं करीत पडलें. त्यानंतर सुमारें अर्ध्या तासानें माझा डोळा लागत होता, तों कोणी येऊन अंगावर हात टाकल्याचा व " कां ? अगदीं गाढ झोंप ना ? आहे कांहीं काळजी परीक्षेबिरीक्षेची ? " असे शब्द कोणीं कानाशीं उच्चारले, असा भास झाला. त्याबरोबर धडपडून उठलें, इकडे तिकडे पाहिलें तों दुसरें कोण असणार ? लागलीच " काय झालं ? काय झालं ? " म्हणून मी घाबऱ्या घाबऱ्या विचारलें, तों " काय व्हायचंय् ? तार आली नाहीं यावरूनच नाहीं का काय झालं तें समजलं ? " असें हसत हसत म्हणायचें; पण मी वेडी अशी, मला दुसरें तिसरें कशाला कांहीं दिसतें आहे ? तें हसणें माझ्या मुळींच लक्षांत आलें नाहीं. शब्द मात्र ऐकले आणि एकदम " हं " करून आपली अंथरुणावर पडलें. तेव्हां " अरे वा ! इतकी का अगदीं निराशा झाली ? ' छ्यः ! वेडी कुठली ! ऊठ, मी तुला विचारतों तें सांग आधीं. तुला मुंबईला यायचंना आतां माझ्याबरोबर ? ऊठ. ऊठ. उद्यां जायचं आपल्याला सकाळीं चला. " ते शब्द ऐकण्याबरोबर माझ्या मनाची काय बरें स्थिति झाली असेल ? मला धड कांहींच समजेना. तेव्हां ही निव्वळ माझी थट्टा चालली आहे, असे समजून मी आपली कांहींच बोललें नाहीं. तेव्हां, " बरं बोआ, तुम्हांला नसलंच यायचं तर आम्ही आपले एकटेच जाऊं; कुणावर जुलूम थोडाच आहे ! " असें म्हणून मोठ्यानें हसायचें, तेव्हां मला धीर येऊन काय खरें होतें तें माझ्या ध्यानांत आलें आणि इतकी अधीर मीं, पण जशाचें तसें करावें असें मनांत येऊनच काय, मी अधिकाधिकच घोंगट घालून बसलें. पण उसना धीर कुठवर टिकणार ? चार मिनिटें झालीं नाहीं तोंच मी लागलीच उठून बसून म्हणालें, " ही असली कांहीं गडे थट्टा नको. खरंच आली का तार ? काय झालं ? "

" अग, तार आली असती तर तुला एवढा वेळ सांगितल्याखेरीज राहलों असतों का ? तार नाहीं, यांत काय झालं तें दिसतंच आहे. आतां आपलं कसं तरी करून मुंबईला जायचं. पांच दहा रुपयांची शिकवणी धरून आपलं तुला मीं म्हटलंच होतं, कस्सं जरी झालं तरी तुला मुंबईला नेईन म्हणून, तेव्हां आपलं म्हणतों आहें तुला; बाकी खरं म्हटलं तर कांहीं तुला न्यायची सोय नाहीं, समजलीस ? "

" हो, सारं खोटंच तें; तसल्या बोलण्याचं लक्षणच निराळं दिसतं ! मला आहे ठाऊक काय झालं तें. तार आली—"

" हो का ? मग चांगलंच झालं बोआ ! आण पाहूं कुठें आहे ती. आली ती आपल्याच नांवावर आली वाटतं ? का आमच्या नांवावर आली ती आपण हक्कानें म्हणून फोडली ? आणा, आणा पाहूं कुठें आहे ती ? "

" हें काय गडे हें असलं बोलणं ? इतकी कसली ती थट्टा करायची ? भलत्याच वेळीं करूं नये थट्टा !"

" खरं कीं काय ? मग थट्टा केव्हां केव्हां करायची त्याचं एक टिपण तरी करून द्या आम्हांला."

" देईन ! मुंबईस गेल्यावर चांगली विद्वान् झालें किनई म्हणजे मग ? सध्यां मला आधीं तारेंत काय आहे तें सांगायचं !"

" आम्ही कांही वाचायचें नाहीं. हवं असलं, तर यांत जें काय असेल तें घेऊन वाचावं." असें म्हणून माझ्या अंगावर एक तारेचें तांबडें पाकीट टाकलें. त्याबरोबर माझ्या अंतःकरणाला कितीतरी आनंद झाला ? आतां आंत तारेंत काय आहे आणि काय नाहीं हें समजून घेण्याची कांहींतरी आवश्यकता होती ? मुळींच नाहीं. कारण आंत दुसरें कांहीं नसायचेंच ! पण छे ? मन कुठलें स्वस्थ बसायला ? आंत एकदा काय अक्षरें होतीं तीं जेव्हां वाचवून त्यांचा अर्थ विचारून घेईन तेव्हां खरं समाधान होईल, नाहीं तर कांहीं नाहीं असें मला झालें. छे. छे. मन मोठें विलक्षण असतें. तार माझ्या अंगावर टाकली. सगळें झालें. मी ती प्रत्यक्ष डोळ्यानें पाहतें. त्या तांबडया पाकिटांतून तो पांढरा कागद काढून मीं हातीं धरला, आणखी तिकडच्या तोंडापुढें धरून ' एकदा मला वाचून दाखवायचें ' म्हणून पाठीस लागलें. तेव्हां " ज्याला गरज असेल तें वाचील" असें म्हणून माझा हात दूर केला, तेव्हां मीं थोडेंसें रुसल्यासारखें करून म्हटलें, " बरं बरं ! एवढं कांहीं हिणवून नको दाखवायला. मी उद्यां मुंबईस गेल्यावर अशी वाचणारीण होईन कीं यंव् ! सारीं बुकं पालथीं घालीन !"

" हात्तेच्या ! बुकं पालथीं घालायला मुंबईसच कशाला जायला पाहिजे ? तीं आतां नाही का घालायला येणार ? अन् रोज अंथरूण घालायच्या वेळीं उचलून ठेवतांना उलथींचीं पालथीं होतच असतील !"

" पुरे मेली थट्टा आतां. तें काय त्यांत लिहिलं असेल तें एकदा इकडून वाचून दाखवल्याखेरीज माझं कांहीं समाधान व्हायचं नाहीं. हं, वाचायचंच एकदा" असें म्हणून मीं पुनः एकदा कागद पुढें केला. तेव्हां एकदा तो माझ्या हातून घेऊन त्यांत काय होतें तें मला सांगावयाचें. त्यांत इंग्रजी वाचतांनाच "फर्स्ट क्लास" हीं अक्षरें ऐकून माझ्या अंगावर आनंदानें शहारे उभे राहून क्षणमात्र " मी स्वप्नांत तर नाहीं ना ?" असें माझ्या मनांत आलें.

परंतु तितक्यांत माझ्या हनुवटीला हात लावून "झालं का एकदा मनाचं समाधान ?" असें विचारलें व हें स्वप्न नसून "ती तार खरी; मी जागीच, माझ्यासमोर बसायचं खरंच, आणखी आतां आपण मुंबईला जाणार हेंहि खरंच !" असें पक्कें वाटून त्या ब्रह्मानंदांत मी तल्लीन झालें !

◆ ◆ ◆

## ४० : बनूवन्संचा तडफडाट

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

इतका आनंद झाला, तेव्हां मग ती रात्र कशा तऱ्हेनें गेली असेल? भलतीच उपमा दिल्याचा दोष येईल हें मी जाणून आहें, पण खरोखरीच मला उत्तररामचरित्रांतल्या त्या कवितेची या वेळीं आठवण झाली आहे—

*काढताहि गोष्टिच्या प्रसंगा ।*
*मनीं नाहीं आणिलें क्रमभंगा ।।*
*असें होतां आनंद उभयतांतें, ।*
*रात्र सरली बोलतां बोलता तें, ।।*
*नाहीं झालें ठावकें आपणातें ।।*

अहाहा! "प्रहर गेले कसे हें न समजतां रात्र मात्र गेली!" हें वर्णन कितीतरी मजेचें आहे! आणि किती खरें आहे! ती रात्र म्हणजे आमच्या सुखाच्या प्रारंभाची पहिली होय. त्या रात्रीं मला कितीतरी गोष्टी सांगायच्या? कितीतरी आमचे बेत झाले! मुंबईस गेल्यानंतर अमुक करायचें, अमुक वाचायचें, ज्या ज्या म्हणून गोष्टी अगदीं मनांत योजून ठेवल्या होत्या त्या साऱ्यांची मजजवळ झाडून उजळणीच झाली. आणखी खरोखर सांगतें, इतक्या गोष्टी करायच्या असें तिकडच्या मनांत असेल असें मला कधींहि वाटलें नव्हतें. माझें लग्न झाल्यापासून आजतारीखपर्यंत कधीं या बायकांच्या शिकण्याबद्दल कीं सुधारणेबद्दल एक अवाक्षरदेखील तोंडांतून निघालेलें मीं ऐकलें नव्हतें. तिकडे काय गोष्टी आवडतात आणि काय नाहीं, हें दादा मला सांगे त्यावरून किंवा पुढें माझ्याशीं बोलतांना तर पुष्कळच गोष्टी सांगायच्या त्यावरून माहीत. त्यांत कित्येक गोष्टी तर मला अशा सांगायच्या, कीं त्या आपल्या हातून होतील कशा असेंच मला वाटूं लागलें आणि आज रात्रीं तर मला ज्या कित्येक गोष्टी सांगितल्या पुढें करायच्या म्हणून, त्या आजपर्यंतहि सांगितल्या नव्हत्या. मला म्हणायचें कीं "तूं माझ्याइतकी परीक्षा दिलेली हो!" हें ऐकून मला जे हसूं आलें तें कांहीं विचारूंच नका. मी आपली भीडमर्यादा सोडून खुशाल खो खो करून हसलें, आणि म्हटलें, "मग आतां उद्यापासून जाऊं कॉलेजांत!" मला खरोखर ती केवळ थट्टा वाटली. परंतु पुढें मला समजावून सांगितल्यानंतर देखील मला चमत्कारिक वाटलें, पण मीं न हसतां ऐकून घेतलें; इतकेंच नव्हे, तर कांहीं वेळानें जेव्हां मला एकदोन मोठ्या शहाण्या व विद्वान् स्त्रियांच्या गोष्टी सांगितल्या, तेव्हां मलादेखील आपल्याला इंग्रजी येईल तर कितीतरी चांगलें होईल असें वाटूं लागलें. मी कुठें गोष्टींची अगर दुसरीं कांहीं पुस्तकें वाचीत असलें म्हणजे मला नेहमीं म्हणायचें, "पुस्तकें आहेत कुठें? तूं इंग्रजी शीक लवकर, म्हणजे सारा

जन्मदेखील पुरायचा नाहीं अहोरात्र वाचीत बसलीस तर, इतकीं पुस्तकें देतों तुला ! " त्याचा आतां पुनः उच्चार झाल्यावर मलाहि थोडेंसें स्फुरण येऊन खरेंखरेंच इंग्रजी शिकावें असें माझ्या मनांत वाटूं लागलें. असो. याप्रमाणें नाना तऱ्हेच्या गोष्टी बोलतां बोलतां व अनेक प्रकारचें मनोराज्य करतां करतां ती रात्र सरून पहाट झाली, उजाडण्याच्या बेतांतच आलें म्हणाना ?—तेव्हां " आतां स्वस्थ घटकाभर निजायचं होतं " असें म्हणून मी जाऊं लागलें; परंतु जाऊं देणार कोण ? शेवटीं अगदीं फटफटीत उजाडलें तेव्हां मोठ्या मिनतवारीनें उठून बाहेर पडलें, त्या वेळीं मला आत्मसंयमन किती करावें लागलें असेल, याची कल्पना कोणास वर्णन करून देतां येईल काय ?

मी आपल्या आनंदांतच गर्क होतें असें नाहीं. रात्रीच्या जागरणामुळें डोळ्यांची स्थितीहि नीट नव्हती, त्यामुळें जातांना वाटेत अजाणपणें माझ्या हातून एक आगळीक घडली; ती एवढीच कीं, बनूवन्सं निजल्या होत्या, त्यांच्या अंथरुणावर पाय पडला. त्याबरोबर त्या उठून एकदम उसळल्या आणि मला म्हणतात, " तुझ्या नवऱ्याच्या परीक्षा उतरल्या, नाहीं आणखी मोठी बहादुरीण झालीस, म्हणून कांहीं लोकांच्या अंथरुणावर पाय देऊन लोकांना तुडवून जाशील का काय ? मोठी आली तीन परीक्षांच्या नवऱ्याची शेखी मिरवायला ! पण झाल्या परीक्षा आमच्याचमुळेंना ? " त्या वेळचें त्यांचें बोलणें मला किती लागलें असेल, याचा कांहीं सुमार नाहीं. परीक्षांचा आणखी माझा पाय त्यांच्या अंथरुणावर पडण्याचा अर्थाअर्थी कांहींतरी संबंध ! पण त्यांनीं त्याच्यावर आणखी चार कुभांडें रचून तोंडाचा पट्टा चालविला. तें सारं आजेसासूबाईंच्या कानीं जाईपर्यंत त्यांत अशी भर पडली, कीं मीं अंथरुणावर पाय दिला; इतकेंच नव्हे, तर धोंडूभाऊजींच्या दंडावर पाय दिला, आणखी ते ओरडले. तेव्हां " मग झालं काय पडला म्हणून ? चुकून पडतोच आहे ! " असें म्हटलें. मग काय विचारतां ?–आमच्या आजेसासूबाई त्या ! झाली त्यांच्या बोलण्याला सुरुवात. तितक्यांत धाकट्या मामेसासूबाईनीं मला, " धाकटं फुलपात्र कुठं आहे तूं खोलींत नेलं होतंस तें ? " असें विचारलें; तें मीं सकाळीं येण्याच्या गडबडींत विसरून आलें होतें, मग तर काय विचारतां ? " कांहीं चाकरमाणसं का आहेत तुमच्या पाठीमागें तुमचीं भांडीं उचलून आणायला ? तरी बरं, आतां कुठें परीक्षा उतरली आहे. अजून चाकरी लागायची आहे तोंच तूं इतकी उन्मत्त झालीस–माजलीस, तुला आतां अगदी अगदीं असं वाटायला लागलं आहे, कीं आतां आपले हात पोंचले. अग पण हो ! मोठी आली दिमाख दाखवायला !–" एक ना दोन ! काय जें त्यांच्या तोंडाला येईल तें त्यांनीं बोलण्याची सुरुवात केली. मागेंपुढें कांहीं पाहिलें नाहीं. मला खरोखर असें वाटायला लागलें कीं, आमचें बरें झालेलें त्यांना कांहीं पाहवत नाहीं. जेव्हां भारीच बोलण्याला सुरुवात झाली, तेव्हां माझ्या डोळ्यांतून पाणी येण्यालाहि सुरुवात झाली. मन कोंवळें, आणखी त्यांत यत्किंचित् अपराध नसतांना विनाकारण कोणी अद्वातद्वा बोललें, म्हणजे आम्हां बायकांना रडण्याखेरीज दुसरें गत्यंतर आहे काय ? जीं जीं बालंटें मजवर घालून बोलणें चाललें

होतें, तीं सारीं खोटीं असें पक्कें मला ठाऊक! पण खरा प्रकार सांगण्यासाठीं तरी बोलण्याची प्राज्ञा होती काय? जें काय बोलतील तें मुकाटयानें रडत रडत ऐकून घेण्याशिवाय कांहीं उपायच नव्हता. मी तर लहान, परंतु उमासासूबाईची गोष्ट मागें सांगितली आहेना? त्यांची तरी काय गत होती? त्यांच्या नवऱ्यानेंअगदीं धडधडीत त्यांजवर खोटे बालंट घेतलें असतां खरी गोष्ट सांगण्याची कांहीं त्यांचीं प्राज्ञा होती का? ही तर आमची इथून तिथून साऱ्यांची स्थिति! मरेपर्यंत आचरटपणाच्या भीडमर्यादेला धरून गुलामगिरी करण्याखेरीज दुसरा मार्ग कुठला? आदल्या रात्रीच्या--किंबहुना तास दोन तासांपूर्वीच्या-त्या स्वतंत्रतेच्या, शिक्षणाच्या, मोठमोठया शिकलेल्या बायकांच्या कल्पनासृष्टींतल्या गोष्टी कोणीकडे? आणखी या सत्य सृष्टींतल्या कठोर, अंगाला झोंबणाऱ्या गोष्टी कोणीकडे? तें कल्पनासुख कोणीकडे, आणि हें प्रत्यक्ष दुःख कोणीकडे, कशास कांहीं ठिकाण तरी? पण दोन मण दुधांत एक मिठाची चिमूट पडल्याबरोबर जशी त्या दुधाची स्थिति होते, तशीच माझ्या आनंदमय अंतःकरणाची झाली. तो सर्व आनंद मावळून गेला. आणखी केव्हां एकदां त्यांच्या तडाख्यांतून सुटेन असें झालें. वास्तविक माझा कांहीं एक अपराध नव्हता हें उमासासूबाईंना ठाऊक होतें. त्या वेळीं त्या तेथें होत्याच, आणखी मजवर एवढा गहजब चाललेला पाहून त्यांना वाईट वाटलें व माझ्या सासूबाईंना त्यांनीं तसें सांगितलेंहि पण त्या तरी काय करणार? त्यांना कांहीं बोलतां येतें? भाचीला खोटें करून आपल्या सुनेचा कैवार घेते म्हणून त्यांच्यावरच आणखी भडिमार सुरू व्हायचा! त्या कांहीं बोलल्याच नाहींत. उमासासूबाईंनीं मात्र मला एकीकडे रडतांना पाहून म्हटलें, "उगी! वेडे, रडतेस काय अशी एवढ्यातेवढ्याकरितां? नेहमीचंच आहे तें. त्याची क्षिति काय बाळगायची आहे! उगी. बोलूं दे त्यांना आपल्या." पण म्हणतातना "भिईल त्याला खाईल?" त्या बिचाऱ्या नेहमीं भिऊन वागायच्या, कधीं उणें अधिक बोलायच्या नाहीत, पण आजच काय त्यांना वाटलें तें त्यांच्याच लेकीनें ऐकायला गांठ पडली! अर्थात् तिनें तें आजेसासूबाईंना सांगितलें. आमच्या वनूवन्संना तर आडून ऐकून चहाड्या करण्याची अशी खोड असे, कीं कांहीं पुसूं नये. त्यांना दुसरें कांही कामच नव्हतें. इकडचें तिकडे आणखी तिकडचें इकडे. आणखी आपल्या आईबद्दल तर त्यांना इतकी इतकी कशी ती माया नसे. नेहमीं तिच्याबद्दल देखील चहाडया सांगायच्या, अशी मुलगी त्रिभुवनांत नसेल! ते उमासासूबाईंचे शब्द तिकडे हुजूर सरकारांत कळल्यावर मग आग लागण्यास राहिलें काय? नुसता भडकाच उडून राहिला. माझा बिचारीचा अपराध कोणींकडच्या कोणीकडेच गेला. त्यांच्यावरच सरबत्ती सुरू झाली. "ती तसलीच आहे. तिनंच साऱ्या घराचं मातेरं केलंन्. या सीतेला तिचीच फूस! सारा दिवस हिच्याशीं तिचं हितगुज! 'रोज मरे त्याला कोण रडे' का? माझ्या मरणाचीच आतां वाट पाहतां आहां! तरी बरं! नवरा असा आहे, पावलोपावलीं नाक ठेंचतो, खेटरावारीदेखील मोजीत नाहीं. हाच नवरा जर का बाईलबुद्धया असता तर हिनं काय थेरं केलीं असतीं अन् काय नाहीं! देव

ज्याला त्याला पायरीनंच ठेवतो. तो कांहीं वेडा नाहीं. ‘रोज मरे त्याला कोण रडे’ का? अग नको रडूं!” वगैरे वगैरे.

हा भडिमार चालला असतांना माझें दुःख एकीकडे जाऊन मला त्यांच्याबद्दलच फार वाईट वाटलें. बिचारीची मजवर आणखी तिकडे फारच भक्ति असल्यामुळें साहजिक उगी करण्यासाठीं म्हणून त्या “ अग, तें रोजचंच आहे, त्यांत मनाला काय आणायचं आहे?” असें म्हणायला गेल्या, त्याचें “ रोज मरे त्याला कोण रडे?” असें होऊन अखेर झाली. सारा दिवस मग तेंच चाललें होतें. आजेसासूबाई रुसल्या, कोणाशीं बोलेनात. शंकरमामंजी रागावले, आणखी, “ आईला असं बोललीस? पड तिच्या पायां?” असें म्हणून दोनतीन चापटया मारून त्यांना—एवढ्या थोरल्या त्या पोक्त त्यांना—लहान लहान कारटयांच्यादेखत खरोखरी आणून पायां पडण्यास लाविलें, व तोंडानें एकसारखें “ दुसऱ्या सगळ्या गोष्टी मला चालतील, पण आईची अमर्यादा, आणखी खोटं बोलणं अगदीं खपत नाहीं. बोलून संवरून आणखी नाहीं म्हणतेस? एकदा नाहीं सातदा पायां पडलं पाहिजे! पड! पड! पड!” अग बाईग, तो प्रसंग नुसता आठवून मी आतां लिहितें आहें, तर माझ्या अंगावर नुसता कांटा उभा राहिला आहे. आणखी काय हा बायकांचा जन्म असें वाटून मी क्षणभर लेखणी दूर ठेवून स्वस्थ बसलें आहें. अशा साध्वीला अशा तऱ्हेचा विनाकारण छळ सोसावा लागे, हें आठवून कां बरें वाईट वाटणार नाहीं? असो. त्या तसल्या गोंधळांत सारा दिवस गेल्यावर रात्रीं पुनः आमची गांठ पडल्यावर जेव्हां बोलणीं निघालीं, तेव्हां मला स्पष्ट” असें म्हणायचें कीं, “ त्या बिचाऱ्या उमामामीला पाहून, खरोखर जाऊन शंकरमामांच्या दोन तोंडांत भडकवाव्या इतका मला संताप आला होता. खरोखर त्या माणसाचा स्वभाव आहे कसा, हेंच कळत नाहीं. एखाद वेळ अगदीं अगदीं बायकोबद्दल जें कांहीं प्रेम येतं तें कांहीं विचारूं नये. आज मी कांहीं नाहीं तरी पंधरावीस वर्षे इथें आहें, पण यांचा स्वभाव कांहीं समजत नाहीं. इतका निर्दय, इतका खुनशी, इतका आचरट माणूस मीं कधींच पाहिला नाहीं. आणखी......” जों जों शंकरमामंजींचें वर्णन करायचें, तों तों आवेश येऊन मोठमोठयानें बोलण्यापर्यंत मजल येतेसें वाटून मीं शेवटीं दाबलें. हो, मला खरोखर असें वाटलें, कीं आम्ही रात्रीं काय बोलतों हें देखील ऐकण्यासाठीं बनूवन्सं दारांशीं कान देऊन ऐकायला यायच्या! मीं जेव्हां दाबलें आणखी बनूवन्संच्याविषयीं आपला वरील संशय सांगितला तेव्हां तें तसेंच राहून बनूवन्संवरच बोलणें निघालें. बनूवन्स प्रथम मला कशा कुठें भेटल्या, त्यांची व आपली भेट झाली तेव्हां पहिले दिवशीं कशी मजा झाली, वगैरे मीं सांगितलें. तेव्हां “ ती पहिल्यापासून तर दुष्ट वाईट मनाची आहेच. पण आतां अधिक झाली असेल आणखी आपलं हें सुख पाहून तिला थोडासा हेवा झाला असेल यांत नवल नाहीं. काय करील बिचारी? तिला कांहीं हें सुख आहे का?” असें म्हटलें. मलाहि तें सर्वथा खरें वाटलें. कारण तिला बिचारीला नवऱ्यानें टाकल्यासारखेंच होतें. बरें, कांहीं पुस्तकें वाचून वगैरे आपलें मन रिझवील, तर तें साधन नाहीं. आणखी लहानपणापासून

तसा मोकाच नसल्यामुळें तशी कधीं इच्छाहि नाहीं. बनूवन्संवरून आमच्या गोष्टी दुर्गीवर गेल्या. आदल्या दिवशींची सारी हकीकत सांगायची राहिलीच होती. परीक्षेच्या निकालाच्या धांदलींत मी तें सारें विसरूनच गेलें होतें. दुर्गीची एकंदर हकीकत सांगितली, तेव्हां तर फारच वाईट वाटून " अरेरे! काय बिचारीनं आतां करावं! हंः! पण अशा कितीक गाई असल्या खाटकांच्या हातांत सांपडलेल्या आहेत!" असें म्हणून सुस्कारा टाकला. त्यानंतर अर्थातच एकंदर स्त्रियांच्या स्थितीवर, लहानपणींच लग्न करण्याच्या या मूर्ख चालीवर, वगैरे बोलणें निघालें. त्यांत सहज मीं म्हटलें "काल आपण कशावर बोलत होतों ? आणखी आज दुपारीं काय होऊन आतां आपण काय बोलतों आहोंत ?" आणखी मला खरोखरीच तें चटकन् मनांत येऊन असें वाटलें, कीं काल रात्रीं आम्ही आनंदांत होतों काय आणखी सकाळीं नुसता अंथरुणावर पाय पडल्यावरून एकंदर दिवस घरांतल्या प्रत्येक माणसास, विशेषतः उमासासूबाईंना कसा गेला! वास्तविक जिकडे तिकडे आनंदच असायचा; पण नाहीं! अशा अर्थाचे शब्द मी सहज बोललें असतां मला एकदम म्हणायचें, " तें बुक घे इकडे, त्यांत एक मजेचे वाक्य आहे तें मी तुला वाचून अर्थ सांगतों." हल्लीं हल्लीं वाचायचें म्हटलें म्हणजे मला मोठी हौस वाटे, त्यांत आणखी वाचून अर्थ सांगतों असें म्हटलें म्हणजे तर अशी हौस वाटे, कीं कांहीं पुसूं नये. मीं ताबडतोब तें पुस्तक आणलें, आणखी हातीं दिलें, त्याबरोबर त्यांतलें कुठलेंसें पान काढून आपल्याशींच वाचलें, आणि अर्थ करून मला सांगितला. आतां त्या पुस्तकाचें नांव मला आठवत नाहीं, पण अर्थ असा होता : " मनुष्य म्हटला म्हणजे भवितव्यतादेवीच्या हातचें एक खेळणें आहे. तिला वाटेल तेव्हां ती त्याला सुख देते, वाटेल तेव्हां दुःख देते. आतां अगदीं सुखसागरांत गढून गेला असला, तर क्षणार्धांत तापलेल्या तेलाच्या कढईंत टाकल्या-प्रमाणें त्यास वेदना लागते." ते दिवशीं दुपारींच तें पुस्तक वाचतांना त्यावर कायशी खूण करून ठेविली होती. त्यानंतर पुष्कळदा तें वाक्य मला म्हणून दाखविल्यामुळे माझ्या बरेंच ध्यानांत राहिलें आहे, आणि मला त्या वेळीं तें फारच बाणलें; खरोखर ते दिवसाची, त्याच्या आदले दिवसाची आणखी त्या दुर्गीच्या हकीकतीच्या दिवसाची, अशा तीनहि दिवसांच्या गोष्टी मनांत येऊन मला मोठें चमत्कारिक वाटलें. असो.

तीहि रात्र गेली. आणखी सुमारें पंधरा दिवस गेले, आणि एक दिवस कॉलेजां-तल्या साहेबाची गांठ घेतली होती त्यावरून त्याची चिठी आली, तेव्हां तिकडे जायचें होतें. आतां कॉलेजांत शिकवून पुढल्या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठीं काय फेलो करितात, ती जागा मिळण्याबद्दल कांहीं शंका नव्हती; पण म्हणतात ना " पक्वान्नांचा घांस तोंडी पडायला विघ्नांची रास " तशी स्थिति होती. जागा मिळते ती मिळते कोठली ? याबद्दल संशय. आतांपर्यंत मनांत पक्कें वाटत होतें, कीं मुंबईची मिळेल; पण मध्यें घोंटाळा होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मुंबईच्या जागेवर दोघांतिघांचा डोळा. त्यांच्या खटपटी चाललेल्या. इकडे खटपटीचा अगदीं तिटकारा. तेव्हां दुसऱ्या कोठें

जाण्याची पाळी येईल किंवा पुण्यांतल्या पुण्यांतच राहण्याची पाळी येईल असें दिसत होतें. इथल्या साहेबाचा कायसा आग्रह इथेंच राहावें असा होता, आणखी मनांतून तर मुंबईस जायचें. तेव्हां " पेला भरला आहे, पण तोंडीं लावून घुटका घेईपर्यंत काय अडचणी येतील आणि काय नाहीं, " असें म्हणून पुढें " शेवटीं पुण्यासच राहायची पाळी येणारसं दिसतं," असें जेव्हां म्हणायचें, तेव्हां तर माझ्या पोटांत धस्सच झालें. " काय होईल तें होईल ! मुंबई नाहीं तर दुसऱ्या कुठें चलावें, पण हें पुणं कांहीं नको " असें मीं म्हटलेंच.

" सगळ्या कांहीं गोष्टी खऱ्या; पण जुळलं पाहिजे ना ? कांहीं आपल्या हातची गोष्ट आहे ? " हे निराशेचे शब्द ऐकल्यावर मला काय वाटलें असेल ? दुधानें पेला अगदीं भरून आणावा, तोंडापाशीं नेऊन ओंठाला लावतां तों कोणीं थापड मारून उडवून द्यावा, तसेंच झालें कीं नाहीं ? असें वाटून मला अगदीं अतिशय वाईट वाटलें. क्षणोक्षणीं मला, ' पक्वान्नांचा घांस तोंडीं पडायला विघ्नांची रास ' ही म्हण आठवून कसेंसें होऊन गेलें.

आतां मीं वर सांगितल्याप्रमाणें एकंदर हकीकत होती. पांचचार दिवस आमचे मोठे विवंचनेंत गेले. विवंचना मिळून एवढीच कीं, पुण्यांत राहावें लागतें कीं काय ? पुण्यांतच राहायचें म्हणजे आहे त्याच स्थितींत राहायला पाहिजे; वेगळें राहतां येत नाहीं. अर्थात् मजबद्दलचे, आणखी एकंदर जे कांहीं विचार होते ते अमलांत आणणें दूरच राहिलें, पण दिवसां जर एक क्षणभर बोलत बसेन म्हटलें, तर कांहीं शक्य नव्हतें. नुसतें एकमेकांकडे पाहण्याची मारामार, मग बोलण्यासंवरण्याची गोष्ट पाहिजे कशाला ? आणि अशा स्थितींत पडलें म्हणजे मग काय ? सर्वच यथास्थित ! आमची आम्हांला निराळी बसायला जागादेखील मिळायची पंचाईत ! वेगळें होतां यायचें नाहीं ही तर गोष्ट खरीच. मीं म्हटलें, यदाकदाचित् वेगळें राहण्याची तजवीज करतां आली असती, तर काय ? स्वतंत्रपणें वागण्याची सोय होती का ? मुळींच नाहीं. सर्वांना भिऊन भिऊन वागावें लागलें असतें. आणखी बिऱ्हाड तेथेंच कोठेंतरी जवळ पाहावें लागलें असतें. आमच्या कुटुंबांतील मर्यादा आणखी दहावीस माणसांनीं मिळून एकाच ठिकाणीं डोकें खुपसून राहायचें यापासून काय फायदे असतील ते मला कांहीं ठाऊक नाहींत, पण तोटे किती असतात याविषयीं जर मला कोणीं विचारलें तर मी हवे तितके सांगेन. कारण मला स्वतःचा अनुभव,आणखी माझ्या कित्येक मैत्रिणींनीं आपला अनुभव जो मला सांगितला तो या दोहोंवरून माझी तर अशी पक्की खात्री झाली आहे, कीं या फाजील भीडमर्यादेमुळें आणखी एके ठिकाणीं सगळ्यांनीं डोकें खुपसून राहायचें, यापासून फार नुकसान आहे. फायदा असला तर तो या नुकसानीच्या मानानें फार थोडा. आज या फाजील भीडमर्यादेनें एका तऱ्हेचें नव्हे, पण कितीतरी तऱ्हेचें नुकसान होत आहे ! नवराबायकोची प्रीति जितकी वाढत जावी तितकी वाढत नाहीं. बायको आपलें मन आपल्या नवऱ्याजवळ कधींहि अगदीं उघड करून बोलत नाहीं, इतकेंच नव्हे, तर या लाजेभिडेमुळें कित्येक बायका आपली

दुखणीं सर्वांपासून चोरून ठेवतात. माझ्या तिघी मैत्रिणींनीं आपल्याला येत असलेला बारीक ताप मजजवळ सांगितला, परंतु आपल्या घरांत कोणाला सांगण्याची अमर्यादा त्यांनीं केली नाहीं. त्यांच्या नवऱ्यांना त्यांना ताप येतो हें माहीत, परंतु आपल्या बायकोच्या दुखण्याबद्दल आपण कसें बोलावें ? अशा बाबतींत बोलून मर्यादा सोडून आपल्या पदरीं निलाजरेपणा कसा घ्यावा ? या विचाराखालीं त्यांनीं आपल्या बायकांना खुशाल मृत्यूच्या मुखीं जाऊं दिलें असें मी म्हणतें. कारण या तिघींपैकीं खरोखरीच दोघी वारल्या. एक क्षयानें आणखी एक बाळंतपणांत. नवराबायकोच्या साधारण सुखांत व्यत्यय येतो, त्याबद्दल कांहीं विशेष विचार केला नाहीं, तरी पण त्यापासून प्राणहानि होते अशा वेळी तरी ती मर्यादा गुंडाळून ठेविली पाहिजेना ? या मर्यादेच्या फाजील थोतांडा-पासून किती नुकसान होतें आहे, बायकांच्या प्राणांची हानि किती होते आहे, हें तर लक्षांत घेतलें पाहिजेना ? पण लक्षांत घेतो कोण ? मी म्हणतें हें खरें कीं खोटें, हें ज्याचें त्यानें आपलें अंतर्यामीं जाणावें. अगदीं नाइलाज, आतां हातपाय उचलायची ताकद अंगांत नाहीं इतकी स्थिति—फार तर याच्या किंचित् अलीकडे स्थिति—येईपर्यंत सासुरवाशिणी आपलें दुखणें घरांत कळवितात काय ? मला वाटतें हा प्रश्न वाचून माझ्या भगिनींपैकीं शेंकडा नव्याण्णव तरी ( खरें बोलल्या तर — कारण अशा प्रश्नाचेंदेखील स्पष्ट व खरें उत्तर देण्यास मर्यादा आड येणारच.— ) " मुळींच नाहीं, " असें उत्तर देतील. माझी पक्की खात्री आहे, की या उत्तराशिवाय दुसरें उत्तर येणें शक्यच नाहीं. मी आपल्या जातीच्या कैवारानें कांहींतरी लिहितें असा माझ्यावर बहुतकरून दोषहि येईल. पण जी मी स्पष्ट बोलण्यासाठीं म्हणूनच आपलें चरित्र लिहितें आहें ती असल्या दोषांना काय म्हणून भिऊं ? दुसरी गोष्ट, पुष्कळ माणसांनीं एकाच ठिकाणीं डोकें खुपसून राहणें अथवा एकत्र कुटुंब करून राहणें ही सोय होय. हिचा देशाच्या हिताहिताशीं काय संबंध आहे, काय नाहीं, हें पाहण्याची माझी इच्छा नाहीं ! आणि तितका व्यापक विचार करण्याची माझ्या अंगांत शक्ति आहे असें मला वाटत नाहीं. तेव्हां त्यासंबंधानें तसें लिहिण्यापेक्षां मी आपली एवढेंच म्हणतें, कीं कुटुंबांत पुष्कळ माणसें एकत्र असलीं म्हणजे त्यांत अधिक मिळविणारा, कमी मिळविणारा, मुळींच न मिळविणारा असे भेद व्हायचेच. त्या भेदाबरोबर अधिक मिळविणाराची बायको, कमी मिळविणाराची बायको, मुळींच न मिळविणाराची बायको, हा भेदाभेदहि आलाच. आतां हा असा भेदाभेद झाला म्हणजे त्याच्या पाठीमागून हेवादावा आलाच. अधिक मिळविणाराच्या बायकोस डौल येऊन काम न पडतां सेवा करून घेण्याची इच्छा झालीच म्हणून समजावी. कमी मिळविणाराची, किंवा मुळींच न मिळविणाराची बायको, आपल्या स्थितीबद्दल ओशाळी होऊन, पण जास्त मिळविणाराच्या बायकोचा डौल न खपून तिचा हेवा करायला लागणें अगदीं साहजिकच आहे. मी जें लिहीत आहें, तें कांहींतरी कल्पनेनें लिहीत आहें असें नसून केवळ स्वानुभवानें व ज्यांचा अनुभव माझ्याच अनुभवासारखा आहे, अशा माझ्या मैत्रिणींच्या अनुभवाच्या गोष्टी त्यांच्याकडून कळवून घेऊन लिहीत आहें; याला आतां

दुसऱ्या साक्षी न देतां वाचणारे व वाचणारणी यांचीं मनें याच साक्षी देतें. असे हेवेदावे वाढून किती भांडणें होतात, घरांत कुजबूज किती चाललेली असते? एका घरांत, एका कुटुंबांत वर्षानुवर्षे मंडळी असली तरी बहुतेकांचीं मनें एकमेकांशीं उघडीं नसतात; इतकेंच नव्हे, तर एकमेकांसंबंधानें एकमेकांशीं साफ नसतात. बहुतकरून पुरुष काय किंवा स्त्री काय, आपल्या घरच्या कागाळ्या, .आपल्या घरांत असलेली अनिष्ट स्थिति, आपल्या मित्रांजवळ सांगतात. मला वाटतें, अशी एकहि स्त्री नसेल, कीं जी मोठया थोरल्या कुटुंबांत पडली असून आपल्या मैत्रिणींजवळ तिनें आपल्या घरांतल्या कुरकुरी सांगितल्या नसतील. घरांत कोणाचें मन कोणाविषयीं साफ नसायचें, यांत लहानमोठें ही जबरदस्त मर्यादा, मग अर्थातच बाहेर कोणी मैत्रीण गांठून तिच्याजवळ आपलें अंतःकरण उघडें करून सांगायचें. मीं मागें सांगितलेंच आहे, कीं होत असलेलें सुख किंवा दुःख कोणाजवळ ओतल्याखेरीज मनांची शांतता होत नाहीं. घरांत तर कोणाजवळ तोंड उघडायची सोय नाहीं. शिवाय सांगायचें काय तें घरांतलेंच !

◆ ◆ ◆

## ४१ : गोविंदविडा

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

'पक्वान्नाचा घांस तोंडीं पडायला विघ्नांची रास' ही म्हण अक्षरशः खरी आहे म्हणण्यास यत्किंचित्‌देखील हरकत नाहीं. मुंबईची जागा मिळण्यास खरोखरी अडचणी पडल्या, पण नशीब म्हणायचें, कीं ती एकदाची मिळाली; आणखी ताबडतोब तेथें जाण्याचा हुकूमहि आला. ती जागा मिळण्याला काय काय अडचणी आल्या तें मी सांगत नाहीं. एक तर, त्या साऱ्या मला माहीत नाहींत; आणखी दुसरें, कीं ज्या कांहीं थोडयाशा माहीत आहेत त्या सांगत बसण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. जाण्याचा हुकूम येईपर्यंत मला तळमळ लागली होती, नव्हे मी अगदीं अधीर झालें होतें ही तर गोष्ट खरीच. मी तर बोलून चालून बायकोमाणूस, पण तिकडेदेखील फारच उतावळी झाली होती. पुरुषांच्या नेहमींच्या चालीप्रमाणें माझी मात्र थट्टा होत असे मी फार उतावळी म्हणून; पण तिकडे कांहीं कमी अधीरपणा नव्हता. मीं ते दिवशीं तर स्पष्ट म्हटलेंदेखील, कीं "माझीच कशाला थट्टा करायला पाहिजे! इथें काय उतावळी कमी झाली आहे !"

"तुझ्याइतकी कांहीं झालो नाहीं, समजलीस?"

"माझ्यापेक्षां दुप्पट! त्या कशाला इव्यात गोष्टी! आपलं आतां बोलूं नये झालं! दादा सांगतो तें कांहीं खोटं नाहीं. नेहमीं कसलीशी संवय म्हणाला......" हें शेवटलें वाक्य मी हसत हसत बोललें खरी, पण मग माझें मलाच कांहीं चमत्कारिक वाटलें. तिकडच्या तें गांवींहि नाहीं. तिकडे नुसतें एवढेंच म्हणायचें, "तुला काय ठाऊक आहे वेडीला? तुम्ही आपल्या आयत्या पिठावर रेघा ओढणाऱ्या !"

साऱ्या जगांत जाऊन पाहावं खरं खरं पीठ करतात कोण? आणखी रेघा ओढतात कोण? मेलं पीठ दळतां दळतां आमच्या हाताला पडले घट्टे, अन् पुनः आम्हीच आयत्या पिठावर रेघा ओढणार का?" हें वाक्य ऐकून जें कांहीं हसूं आलें आहे तें कांहीं आवरेनाच. माझी हनुवटी धरून व हलवून मग म्हणायचें " वा! एकूण आतां शब्दांवर कोटयादिखील व्हायला लागल्या अं? बरीच हुशारी वाढत चालली!" हीं बोलणीं झालीं त्याच्या दुसरे दिवशीं हुकूम खरोखर हातीं पडला.

तो ऐकण्याबरोबर आमच्या आनंदाला अगदीं पारावार नाहींसा झाला. मला वाटतें एखाद्याला जिवंतपणीं स्वर्ग दिसला, तर त्यालादेखील इतका आनंद व्हायचा नाहीं! आणखी मुंबई म्हणजे मला तर एक स्वर्गच वाटत असे. जें काय आनंदाचें, स्वतंत्रतेचें असेल, तें सारें तेथें असेल, ही पक्की कल्पना. आणि तो हुकूम म्हणजे त्या स्वर्गांत जाण्याचा परवानाच मिळाला! हुकमांत तीनचार दिवसांचे आंत हजर होण्याविषयीं लिहिलें होतें. माझ्या उतावळींत मला असें वाटलें, कीं आतां फक्त आपलें लुगडेंचोळी बांधून घेण्याचेच काय तें राहिलें, बाकी कांहीं अडचण नाहीं. सासूबाईचें गांठोडें आणखी तिकडले कपडे त्यांतच आपली लुगडेंचोळी आणखी किडुकमिडूक इतके झालें म्हणजे झालीच तयारी! दुसऱ्या कांहीं गोष्टी अजून झाल्या पाहिजेत, मुंबईस तिकडून पुढें जाऊन जागाजुगा, सोयगैरसोय पाहून मग पुनः आम्हांला घेऊन जायचें. हें प्रथम मनांत येतें कशाला? बोलतांना तें जेव्हां निघालें, तेव्हां एक क्षणभर चमत्कारिक वाटलें, पण क्षणानें माझा मलाच वेडगळपणा दिसून आला. आणखी माझ्या वेडगळ उतावळीबद्दल बरेंच आश्चर्य वाटलें. असो. तिसरे दिवशीं रात्रीं जावें असा विचार झाला. तेथें जाऊन आठपंधरा दिवसांत जागा बघावयाची, आणखी मग आम्हांला नेण्याचा विचार करावयाचा. मला त्याबद्दल वाईट वाटलें पण कांहीं उपाय होता? स्वप्नसृष्टि आणखी सत्यसृष्टि यांच्यांत अंतर नसतें तर झोपडयांचे राजवाडे, आणखी चिंध्यांचे मंदील बनले असते! दोन दिवस आम्हांला मग यत्किंचित्‌देखील झोप नाहीं. गोष्टी, गोष्टी एकसारख्या गोष्टी चालल्या होत्या. काय एवढे आम्ही बोललों तें सारें जर आठवून लिहूं लागलें तर एक वेडेंवांकडें भारूडच होईल; पण आम्हांला त्यांतच किती गोडी वाटली! उजाडलें केव्हां तें समजलेंदेखील नाहीं. तिसरे दिवशीं म्हणजे जायच्या दिवशीं सकाळीं तर, खोलींतून सोडून जातां जाववेना आणि कोणी लवकर सोडीना. कारण, जाण्याच्या पूर्वीची आमची भेट म्हणजे हीच. रात्रीं साडेदहा वाजतां जायचें, तेव्हां आम्हांला, बोलणें तर लांबच, पण नुसतें पुढें येऊन, जातांना पाहण्याचीदेखील सुराणी! कारण, ती आचरट मर्यादा! वडील माणसांच्या देखत गांवाला जाणाऱ्या नवऱ्याकडे पाहणें म्हणजे मग झालें! आठचार दिवस तरी कांहीं निदान डोकें वर करायला नको. क्षणोक्षणीं हाणलेंच म्हणून समजावें. मग अश्रूंनी भरलेल्या नेत्रांनीं त्यांच्याकडे पाहून " प्रकृतीला सैभाळून असायचं बरं का!" असे हजारदा ओठांशीं येणारे शब्द त्या दाटलेल्या कंठांतून कसेबसे काढून निरोप घेण्याचें कुठलें नशिबी!

नुसतें घरांतल्या घरांत बसून फार तर माजघराच्या दारांत उभे राहून गाडी गेली म्हणजे तिची चाकें वाजल्यावरून अगर दारापर्यंत पोंचवायला गेलेली मंडळी परत आली म्हणजे 'गेले' असें समजायचें. अशी स्थिति असल्यामुळे आमचा निरोप घेण्याची वेळ ते दिवशीं सकाळच. पुनः आतां साऱ्या दिवसांत दृष्टादृष्ट व्हायचीदेखील मारामार! तेव्हां अगदीं उशिराचा कडेलोट होईपर्यंत म्हणजे फटफटीत उजाडेपर्यंत मीं मनांत नसतांहि केवळ घरांतल्या मंडळींच्या धाकानें आणि फार उशीर झाल्यास बनूवन्संना हवें तसें आचरटपणीं बोलायला फावेल या भयानें, "जातें जातें," म्हणून उठावें, आणखी तिकडून "कांहीं नको, अजून कोणीदेखील घरांत उठलं नसेल. बैस, मी आतां रात्रीं गेल्यावर मग हवी तेवढ्या पहाटे ऊठ" असें म्हणत हात धरून बसवावें, असें चाललें होतें. "ताबडतोब पत्र पाठवावें, प्रकृतीला जपत जावें, दादाला पत्र पाठविलें म्हणजे तो मला पत्र देईल. बहुतकरून मी आतां चार दिवस माहेरींच जाऊन राहणार आहें, मी तिथून पत्र पाठवीन," इत्यादि इत्यादि गोष्टी सांगावयाच्या तितक्या सांगितल्या. पण त्या कितीकदा सांगितल्या याची गणतीच नाहीं. त्याचप्रमाणें मीं पत्र ल्याहावें म्हणून सांगून माझ्याजवळ आपणच नांव, पत्ता लिहून दिलेलीं चार पांच पाकिटे देऊन "दर चार दिवसांनीं पत्र आलं पाहिजे, नाहीं आलं तर आपला विचार पाहा. मी मुळीं तिथें नेणारच नाहीं. आमची तिथें कॉलेजांत जेवणाखाणाची खुशाल चैन असते." असा धाक घातला. मी "माहेरीं गेलें तर खास लिहीन. इथेंच असलें, तर कसं ल्याहावं?" इत्यादि बोलून पुष्कळ हें केलें, पण "इथं यावं खोलींत न् चोरून ल्याहावं" असें म्हणून आपलेंच म्हणणें खरें केलें. मींहि हो हो केलें, शेवटीं अगदीं आतां परमावधि झाली तेव्हां शेवटला निरोप घेऊन व प्रकृतीला जपून कागद धाडण्याविषयीं पुनः पुनः सांगून मोठ्या कष्टानें सुस्कारे टाकीत डोळे भरून येऊन कशीबशी बाहेर पडलें. नुसतें आतां गांवाला जायचें, पुनः आठ-पंधरा दिवसांनीं आम्हांला नेण्यासाठीं यायचें होतें, पण मला किती अवघड झालें तें कांहीं विचारूं नये. वाटलें कीं आतां पंधरावीस दिवस तरी निदान आपलें असें आपल्याजवळ कोणी नाहीं; न जाणो, पंधरावीस दिवसच म्हणून तरी कशा-वरून? अधिक दिवसहि लागतील, नाहीं म्हणावें कसें? इतके दिवसांत आपण माहेरीं गेलों तर कदाचित् मोकळेपणा मिळेल, पण सासरीं काय मिळणार? सासरीं माझ्याशीं चांगल्या काय त्या उमासासूबाई. पण कितीहि केलें तरी त्या मजपेक्षां वडील, आणि जात्याच थोडयाशा गंभीर, तेव्हां त्यांच्याजवळ मोकळ्या मनानें गोष्टी बोलणें अगदीं शक्य नाहीं. असो. असे अनेक विचार मनांत येऊन मी आपली कष्टी होतें. तरी पण आशा सर्वांत बलवत्तर असल्यामुळें, ती ते सर्व विचार दूर सारून शेवटीं, "अशी स्थिति आतां किती दिवस चालणार आहे? आणखी फार तर पंधरावीस दिवस, फार तर महिना, म्हणजे झालें. एकदा इथून सुटका झाली म्हणजे मग कांहीं पुनः या ब्रह्मघोटाळ्यांत तूं सांपडत नाहींसना?" असें म्हणे व समाधान करी आणि तिच्या त्या म्हणण्यानें माझें समाधान झालेंहि.

तथापि तो दिवस मला फारच कष्टांत गेला. पाहा, मुंबईस जाणें होत होतें तें

आनंदाचेंच. तें व्हावें ही माझी पहिल्यापासून कितीतरी इच्छा ! जितकें लवकर होईल तितकें मला हवें, पण आज जायला निघायचें तर माझ्या मनाची काय चमत्कारिक स्थिति झाली ! असें वाटलें, कीं आजपर्यंत एकटे एकटे राहण्याचा कधीं प्रसंग नाहीं, आतां कसें होईल ? माझ्यावांचून मुंबईस आणखी कोणी नाहीं. माझें मन असें अगदीं अस्वस्थ झालें होतें, तसेंच तिकडलेंहि झालें असावें असें दिसलें. आपल्याबरोबर काय घ्यायचें, काय नाहीं, याची तजवीज चालली असतांना दुपारीं उगीच घरांत निदान दहा वेळां तरी खेपा झाल्या असतील, आणि मीहि कांहीं कारण नसतां कुठें तांब्याच घेऊन, कुठें कांहीच घेऊन, पण लाज–भीड–मर्यादा थोडीशी गुंडाळून ठेवून पांचसहादा तरी खोलींत गेलें असेन. पण या चोरट्या जाण्यांत कांहींतरी समाधान ? एखादा थट्टेचा शब्द बोलला न बोलला तों पटकन् कोणी आलें कीं काय, या धाकानें पळून जायचें.

होतां होतां संध्याकाळ झाली, आणि माझा जीव विशेषच धाकधूक करूं लागला. सात वाजले, आठ वाजले, जेवणें झालीं. मीं संध्याकाळपासून एक गोविंदविडा करून ठेवला होता, तो देण्यासाठीं अगदीं उतावीळ झालें होतें. अगदीं ओच्यांत घालून ठेवला होता. पटकन् वर जाऊन केव्हांतरी देईन असा पक्का बेत; परंतु तो सिद्धीस जावा कसा ? हजारदा वर जायला निघालें, पण तितक्यांदा निराश होऊन यावें लागलें; कारण आजेसासूबाई, सासूबाई, बनूवन्सं कोणी ना कोणीतरी आपलें जवळ आहेच. माझा जीव तर असा थोडथोडा होत चालला होता कीं कांही पुसूं नये. एकदा मी जिना चढत असायला आणखी धाकट्या मामेसासूबाईंनीं खालीं उतरायला एकच गांठ पडली. त्या वेळीं माझें मन किती खजील झालें असेल याची कल्पनाच करावी. मी त्या पावलीं मागें झालें, त्याबरोबर त्या म्हणाल्या, " वाढलीं का पानं ? चल, आलेंच मी. " मी त्यांना जेवायला बोलवायला आलें असेंच वाटलें. आणखी माझ्या तें पथ्यावरच पडलें मी आपल्या मनांत म्हणत होतें, आतां काय बोलताहेत आणखी काय नाहीं ? पण बऱ्यावरच निभावलें.

आमचीं साऱ्यांचीं जेवणें झालीं. दहा वाजले. इकडे जाण्याची तयारी झाली. मी उष्टयाखरकट्यांकडे होतें. उमासासूबाई चुलीशीं निरवानिरव करून पोतेऱ्याच्या बेतांत होत्या. इतक्यांत त्यांना विचारण्यासाठीं यायचें तों पाठीमागें आजेसासूबाई होत्या. त्यांनीं " अरे, खरंच ! आधीं देवाच्यापुढें पैसा–सुपारी ठेव, " असें म्हटलें. माझा विडा जेथल्या तेथेंच राहिला. तो मीं देवापुढें ठेविला असता तरी बरें झालें असतें; हा आपल्याचसाठीं म्हणून समजून घेतला असता कदाचित्, पण आतां काय उपयोग ? मी अगदीं हिरमुसली झालें. डोळ्याला पाणी आलें. तें दंडावरच्या चोळीला पुसून मुकाट्यानें उष्टीं काढीत होतें. पण सारें लक्ष तिकडे. जातांना माझ्याकडे एकदा पाहून लागलीच जायचें. सगळी मंडळी दारापर्यंत पोंचवायला गेली मी मात्र माजघराच्या दारांतून उगीच रस्त्याच्या दाराकडे पाहात उभी राहिलें. डोळ्यांतून एकसारखें पाणी चाललें होतें, कंठ दाटून आला. टांग्याचीं चाकें वाजलीं, टांगा गेला, आणि माझा एवढ्या आशेनें आणि उत्सुकतेनें केलेला विडा जशाच्या तसाच ओच्यांत राहिला !

## ४२ : परस्परांचीं पत्रें

* * * * * * * * * * * * * * *

आतां मला सासरीं एक दोन दिवस राहावेंसें वाटेना. माहेरीं जावेंसें वाटे. माहेरीं काय स्थिति होती ती उघडच होती. तेथें आमचें व आमच्या माईसाहेबांचें, त्याचप्रमाणें आमच्या वहिनीबाईचें कसें काय होतें हें कांहीं सांगायला पाहिजे असें नाहीं. तरी पण तें माहेर ! कसें जरी असलें, तरी सासऱ्यापेक्षां तिथें मोकळीक जास्त, आणखी त्यांत दादा होता ना ? दादा जोंपर्यंत होता तोंपर्यंत मला कसलेंदेखील कांहीं वाईट वाटत नसे, त्याच्याशीं घटकाभर बोलत बसलें, कीं अगदीं कसलेंहि वाईट वाटत असो, तें पार जायचें आणि विरंगुळा व्हायचा. तो अतिशयच प्रेमळ. आणखी माझ्यावर तर त्याचें विशेष प्रेम ! हीं सगळीं तर कारणें खरींच, पण त्यांच्याहिपेक्षां जबरदस्त कारण म्हटलें म्हणजे त्याच्या नांवावर माझें मुंबईचें पत्र येणार होतें हें ! पत्र येईल केव्हां, मीं वाचीन केव्हां, आणखी दिलेल्या पाकिटांत त्याचें उत्तर पाठवीन केव्हां, असें मला झालें होतें.

पण काय उपयोग ? माहेरीं जाण्यास कारण काय सांपडावें ? एक तर माई-साहेबांकडून बोलावणें आलें पाहिजे, किंवा आजेसासूबाईंनीं आपण होऊन पाठविलें पाहिजे; दुसरा मार्ग नाही. या दोहोंपैकीं कांहींतरी घडेपर्यंत कांहीं आशा नव्हती, आणि दोहोंपैकीं कांही घडेल अशीहि पण आशा नव्हती.

पण माझी केवळच निराशा व्हायची नव्हती इतकेंच; नव्हे, तर अचानक एक कारण होऊन मला चांगलें पंधरा दिवस सुखानें माहेरीं राहण्यास सांपडेल असा सुप्रसंग जवळच आला. मुंबईस गेल्यावर तिसरे दिवशींच दादा अगदीं सकाळीं आला. मला वाटलें, की तो कांहींतरी कारण काढून माझी गांठ घेण्यास व मला माझें पत्र देण्यास आला, परंतु नाही. तो आला, तो मला बोलावण्यासाठीं आला होता. तेंहि कां ? तर आजी आणखी सुंदरी आदले दिवशीं रात्रीं आल्या होत्या. तें ऐकल्याबरोबर मला किती आनंद झाला म्हणतां ? आज किती दिवसांत तरी आजीची आणखी आमची गांठ नव्हती. आणखी ती पोरगी सुंदरीदेखील मला दादाच्या लग्नापासून भेटलीच नव्हती. तीं दोघेंहि आलीं आहेत हें ऐकून मला फार आनंद झाला. कारण, आतां त्या माहेरीं राहण्यांत खरें खरें सुख होतें; इतकेंच नव्हे, तर त्या माहेरीं राहण्यांत आपला हक्क आहे असें वाटूं लागलें. आजी आल्यानें विशेष काय होणार होतें ? वास्तविक म्हटलें तर आजीचें कांहीं चालतहि नसे; पण तितकेंच बरें वाटलें. तें म्हणतात ना ‘ आईपोरका त्याला बाप पारखा ! ’ आई गेली कीं, बाप पाहुण्यासारखा होतो. असो.

याप्रमाणें आजी आल्यामुळें जेव्हां बोलावणें आलें तेव्हां मग काय आजे-सासूबाईंना नाहीं-होयदेखील म्हणतां आलें नाहीं. लागलीच “ देतें पाठवून ” असें म्हटलें

आणि संध्याकाळीं पाठविलेंहि. घरीं जाऊन आजीला नमस्कार करण्याबरोबर तिला जो गहिंवर आला म्हणतां तो कांहीं पुसूं नये. तिनें मला जवळ घेऊन पाठीवर हात फिरवून म्हटलें,, " यमे, तुझं चांगलं झालं बरं. आतां आपल्या आईसारखी वागून सगळ्यांना सुख दे म्हणजे झालं–" पुढें तिच्यानें बोलवेना. तिचे डोळे पाण्यानें भरून आले. जवळच पलीकडे माई उभी आहे हें तिच्या लक्षांतदेखील राहिलें नाहीं आणि ती एकदम म्हणाली, " हें तुझं कौतुक पाह्यला तेवढी जगती तर कितीतरी चांगलं झालं असतं ! तिच्या वांटचं मला आलं असतं मरण तर ! पण असं कुठलं व्हायला ! "

हे शब्द तिच्या तोंडांतून ऐकल्याबरोबर मलादेखील रडूं आलें, पण मी तें तसेंच गिळून म्हटलें, " आजी, हें काय हें म्हणते आहेस तूं ? झाल्यागेल्याचं आतां काय ?" यावर ती, " ती आठवण होऊन उमाळा आल्याखेरीज राहात नाहीं ग, काय करूं ? " असें म्हणाली. इतक्यांत सुंदरी कोठें खेळायला गेली होती ती आली. ती तर आतां केवढी थोरली झाली होती ! मला तिला पाहिल्याला कांहीं फार दिवस नव्हते झाले, पण ती इतक्या थोडया अवकाशांत कितीतरी मोठी दिसूं लागली. चांगली लग्नाला झाली. यंदा नाहीं, पुढल्या सालीं तिच्या लग्नाचें पाहिलेंच पाहिजे होतें. निदान पाहण्याला सुरुवात तरी करायला हवीच होती. पहिले उमाळे गेल्यानंतर मग आजोबांच्या इत्यादि गोष्टी निघाल्या. त्यांची प्रकृति अगदीं आतां अशक्त होत चालली होती. पुण्यास येऊन कांहीं औषधपाणी करावें असें त्यांना पुष्कळ सांगितलें; एकदां कायसें बाबांनींहि त्यांना पत्र लिहिलें होतें, पण ते कांहीं केल्या ऐकेनात. आतां अंमळ प्रकृति बरी असल्यामुळें चार दिवस आजी आम्हांला भेटायला म्हणून आपणच आली. तिचा सारा जीव काय तो आमच्यावर. त्यांतून परीक्षा पास झाल्याचें दादानें कायसें तिला लिहून कळविलें होतें, त्यांत आतां एकदम चांगली चाकरीहि लागणार म्हणून लिहिलें होतें; तेव्हां तिला विशेष समाधान वाटून, तसेंच पहिल्यापासून माझ्यावर तिचा जीव, आणखी त्यांत अशा चांगल्या गोष्टी झालेल्या, तेव्हां तिला जरा विशेषच समाधान होऊन ती आली. मला तर ती आल्यामुळें फारच चांगलें वाटलें; कारण मी एकदा मुंबईस गेल्यावर तिची गांठ केव्हां पडते आणखी केव्हां नाहीं, याचा कांहीं नेम होता ?

दुसरे दिवशीं सकाळीं पत्र आलें, त्यांत 'मुंबईस जाऊन सुखरूप पोंचलों, चिंता करूं नये, बिऱ्हाडाची सोय पाहतों, उतावळी करूं नये' इत्यादि इत्यादि मजकूर होता. परंतु तें पत्र मीं कमींत कमी पंधरा वेळां वाचलें असेल. असें पत्र मला तिकडून पहिल्यानेंच आलें, आणि तें असें कांहीं प्रेममय होतें, कीं मला कितीदा वाचूं आणखी कितीदा नको असें झालें. दादानें माझी शेवटीं थट्टादेखील केली, " पत्र तें काय अन् तें वाचतेस कितीदा ?" पण मीं म्हटलें, " कुठं रे ? पहिल्यांदा नीट लागलं नाहीं म्हणून मी हें सारं दुसऱ्यांदाच वाचतें आहें."

मीं असें म्हटलें, तेव्हां तो हसून म्हणतो, " बरंच पहिल्यांदा अन् दुसऱ्यांदा

आहे तुझं ? मला वाटतें हें शंभराव्यांदा आहे वाचणं चाललेलं " यावर मी आपली हसलें; त्याला अधिक कांहीं बोललें नाहीं.

आतां त्या पत्राचें उत्तर कसें लिहावें ? हा विचार माझ्या मनात घोळत होता. किती कितीतरी गोष्टी लिहिण्याच्या माझ्या मनांत आल्या ! त्या वायां गेलेल्या विडयाची गोष्ट, आपण आतां माहेरीं कसें जावें याविषयीं कशी काळजी पडली होती तें; नंतर अचानक आजी आल्यामुळें आपल्याला आयतेंच कसें माहेरीं यायला सांपडलें; माहेरीं आल्यावर आपलें व आजीचें काय बोलणें झालें, आजी काय म्हणाली, आपण काय बोललों, दादा काय म्हणाला, सुंदरी कशी आहे, ती आतां लग्नाला मोठी दिसूं लागली, जाण्याच्या दिवशीं रात्रीं आपल्याला झोप आली नाहीं, स्वप्नें किती पडलीं इत्यादि सगळया गोष्टी माझ्या मनांत आल्या; आणखी इतक्या सगळया अगदीं इत्थंभूत लिहून धाडायच्या, काय होईल तें होवो, असा मीं आपल्या मनांत पक्का निश्चय केला. दुपारीं जेवणेंखाणें होतांच दादा शाळेंत जाण्याच्या अगोदर त्याच्याकडून चांगले चार-पांच ताव मागून घेतले. मला असा हुरूप आला कीं कांहीं विचारूं नये. झालें. फुरसत मिळतांच, माईसाहेब काय म्हणतील काय नाहीं याचा यत्किंचित् विचार न करतां मी तडक दादाच्या माडींत गेलें आणि दऊत-लेखणी घेऊन मोठया थाटानें ल्याहायला बसलें. ल्याहायला बसलें याचा अर्थ लिहिण्याचें सर्व सामान पुढें मांडून बसलें, कारण कागद घेऊन आतां लिहिणार तों आधीं मायना कसा ल्याहायचा आणखी प्रारंभ कुठून करायचा, येथेंच पंचाईत पडली. मनांत किती गोष्टी घोळत होत्या हें वर सांगितलेंच आहे. खरोखर कागद, दऊत, लेखणी पुढें घेऊन बसलें, तों अर्ध्या अधिक तर त्यांतल्या शोधतां सांपडेनातशा झाल्या. उरलेल्या अर्ध्यांचीहि वाट तशीच होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. शेवटीं मायना वगैरे ल्याहायचा तो दादा आल्यावर लिहूं, असा बेत करून तें तर तसेंच ठेविलें. कारण चारपांच तावांपैकीं दोनतीन ताव तर मायना लिहिण्यांत आणि आरंभ जुळविण्यांत गेले. शेवटीं झालीं नाहींत दोन्हींहि आणि वेळ गेला दोन तास. मग एकदा कांहींतरी वेडेवांकडें लिहून कागदाचा एक चतकोर भरला. त्यांत शाईचे ठिपके किती, वांकडया ओळी किती, आणखी लिहिलें काय ? माझ्या मनांत तें पत्र या ठिकाणीं द्यावें असें फार होतें; पण त्यापासून फायदा मुळींच नसून आपली फजिती जगापुढें मांडून जगाचें हसूं मात्र करून घेतल्याचें श्रेय येईल; बाकी कांहीं नाहीं. हा सर्व मजकूर लिहीत असतांना तें पत्र माझ्यापुढें आहे. तें मी आतांच दोन वेळां वाचलें. त्यांतील अशुद्धें व वेडींवांकडीं वाक्यें, वाक्यांचा एकमेकांशीं संबंध नाहीं, एक वाक्य आजीच्या येण्याचें, तर दुसरें विडा द्यायच्या हेतूनें वर येत असतांना मामेसासू-बाई जिन्यांत आल्या हें; एक, आलेल्या पत्राबद्दल आनंद झाल्याचें, आणखी दुसरें सुंदरी लहानपणीं मोठी रडवी होती पण आतां ती मोठी चांगली झाली आहे हें ! आणखी एकंदर वाक्यें आहेत दहा कीं बारा. त्यांत सतरा हजार गोष्टी ! एकीचा संबंध दुसरीशीं नाहीं; सतरा डाग आणखी पंचवीसतीस अशुद्धें. सतरांदा मीं पत्र लिहून फाडलें असेल—

शेवटीं कांहींतरी लिहिलेंच पाहिजे म्हणून वरच्या वर्णनाचें तें पत्र लिहिलें तों चार वाजले. मग तें तसेंच दादाच्या पेटीवर ठेवून माईसाहेबांनी खालीं बालावल्यावरून गेलें संध्याकाळीं दादा येतांच त्याला तें दाखवून मग पाठवावें हा बेत; पण तो थट्टा करील ही भीति ! शेवटीं त्याला दाखवायचेंच असें ठरवून मी तो येण्याची वाट पाहात राहिलें. तो आल्याबरोबर त्याला वर घेऊन जाऊन तें त्याच्या हातीं देण्यापूर्वी " थट्टा करणार नाहीं, अगदीं हसणार नाही, " अशा कबुलायती करून घेऊन मग त्याच्या हातीं दिलें, पण हातीं देण्याच्या आधीं थट्टा न करण्याविषयीं पुनः बजावलें व " पण आधीं मला आरंभ कसा करायचा सांग पाहूं ? " असें म्हणून त्याजकडे पाहूं लागलें, तेव्हां "वा ! प्रारंभ जर केला नाहीं तर पत्र लिहिलं कसं बोवा ?" असें म्हणून त्यानें माझ्या हातून तें पत्र ओढून घेतलें, मन लावून वाचलें व म्हणतो, " वा ! छान लिहिलं आहे ! ' या मधये जया चूका असा तिल ची क्षमा करावी रागाऊ नवे. ' हें वाक्य तर किती फक्कड आहे ! ", असें म्हणून त्यानें माझी टर.उडविण्यास आरंभ केला; पण मी रागावून तें फाडण्याच्याच बेतांत आलें. तशी त्यानें माझी समजावणी केली. तेव्हां तें पत्र पाठवून देण्यास मी कबूल झालें आणि शेवटीं होय-नाहीं करतां करतां तें पाठविलें. दादानें थट्टा आरंभल्याबरोबर मला राग येण्याचें कारण असें, कीं आज जरी तें पत्र मला अगदीं गचाळ, टाकाऊ, हसूं करून घेण्याजोगें असें वाटत आहे, तरी त्या वेळीं तें तसें वाटलें नाही; इतकेंच नव्हे, तर तें आपण चांगलें लिहिलें आहे, इतका वेळ घालविला तो व्यर्थ नव्हे असें वाटत होतें. हें वाटत होतें मनांत, बाहेरून मात्र मी असें दाखवीत होतें, कीं अतिशय वाईट आहे, अशी आपली खात्री आहे. मला जितकें लिहायचें होतें, त्याच्या दशांशदेखील उतरलें नव्हतें, किंवा जसे लिहीनसें वाटलें होतें तसेंहि मुळींच लिहिलें नाहीं. पण लिहिलें आहे तें कांहीं इतकें वावगें नाहीं, अशी आपली मनाची समजूत. शेवटीं माराकूट करून तें पत्र एकदा गेलें आणि आतां तें तिकडे कसें काय रुचतें, त्याबद्दल काय लिहून येतें, काय नाहीं, याबद्दल मोठी हुरहूर लागली होती. इथून डाक जाते केव्हां, पत्रें मुंबईस पोंचतात केव्हां, माझें पत्र हातीं जाईल केव्हां, इत्यादि प्रश्न विचारून मी दादाला ते दिवशीं कितीकदा तरी त्रास दिला दुसरे दिवशीं " आतां पत्र पोहोंचलें असेल नाहीं बरें ? " " त्याच उत्तर आजच टाकलं तर उद्यां इथें येऊन पोंचेल सकाळीं, नाहीं का ? " असें एक लाख प्रश्न विचारले असतील. त्यानें कधीं मला त्रासून उत्तर दिलें नाहीं; पण थट्टा करण्यासाठीं एकदोनदा " काय तूंच जगांत पत्र लिहिलं आहेस का, आणखी कोणाला लिहितां येत नाहीं ?" असें म्हटलें. तेव्हां मीहि त्याला लागण्याकरितां म्हटलें, " हो. हो मी एकटी असो, कीं दुकटी असो, पण वहिनीला तर कांहीं येत नाहीं ना ? " हे शब्द माझ्या तोंडांतून निघून गेले, आणखी मग मीं जीभ चावली. कारण, मी हें उगीच बोललें असें माझें मलाच वाटलें आणि हेंहि योग्यच झालें; कारण मला वाटल्याप्रमाणें दादाच्या अंतःकरणाला तें लागलें कीं नाहीं कोण जाणे; तें बाहेर न दिसतां तो मला म्हणतो, " तुला येतंय ना ? त्यांतच माझा संतोष आहे. तुला

असंच पुष्कळ येऊं दे म्हणजे झालं. " या त्याच्या शांत व सुशील उत्तरानें मला जितकें वाईट वाटलें तितकें त्यानें जर दोन तोंडांत दिल्या असल्या तर वाटलें नसतें. आपण फार मूर्खासारखें बोललों असें माझें मन मला एकसारखें खाऊं लागलें. शेवटीं मीं त्याला म्हटलेंदेखील, कीं " दादा, तुला वाईट नको हो वाटायला, मी आपली उगीच थट्टेनें बोललें. " असो.

दुसरे दिवशीं त्या माझ्या पत्राचें उत्तर येणार म्हणून मी किती उत्सुकतेनें वाट पाहात होतें! परंतु उत्सुकता व्यर्थच होणार होती. तिसरे दिवशीं, त्याचप्रमाणें चौथें दिवशीं, तसेंच पांचवे दिवशीं तीच अवस्था; शेवटीं मी रागावून एक पत्र लिहिण्याचा बेत केला, पुनः पत्र ल्याहायचेंच नाहीं असाहि बेत केला आणि आपल्याशींच मनांतल्या मनांत फुरंगटलें.

पण शेवटीं आज इतके दिवस ज्या पत्राची वाट पाहात होतें तें पत्र आलें व माझ्या हातीं पडलें, तेंहि पत्र आज आतां माझ्यापुढें आहे. आतांच तें मीं पुनः वाचलें. तें वाचून ज्या आठवणी मला आतां होत आहेत, त्यांनीं माझें चित्त उद्विग्न झालें आहे, डोळ्यांपुढें कांही दिसत नाहीं, कंठ दाटून आला आहे. एवढ्याकरितां क्षणमात्र लेखणी दूर सारून स्वस्थ बसतें.

◆ ◆ ◆

## ४३ : माझ्या पत्राचें उत्तर

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

मला चांगल्या तऱ्हेनें वाचायला यावें, असलें पत्र वाचून घेण्याला दुसऱ्या कोणाची मुळींच गरज लागूं नये म्हणून फार काळजीपूर्वक सुवाच्य अक्षरांनीं लिहिलेलें, पत्र पाठविण्यास लागलेल्या उशिराचा वचपा काढण्यासाठींच कीं काय अगदीं सविस्तर हकीकत दिलेलें, माझें पत्र खरोखर इतकें गचाळ असतांना निंदापर एक शब्दहि न काढतां केवळ स्तुतीनें भरलेलें, मी अशींच पत्रें लिहीत गेलें तर दोनतीन पत्रें लिहून गेलीं नाहींत तोंच छानदार पत्रें लिहिण्यास लागेन अशा रीतीनें उत्तेजन दिलेलें, गेल्या-पासून जागेपणीं ज्या ज्या गोष्टी झाल्या त्या त्या लिहिल्या तरी पत्र लिहिण्या-बद्दलची तृप्ति झाली नाहीं म्हणूनच कीं काय, चार दिवसांत आपण स्वप्नें काय काय पाहिलीं तींदेखील ज्यांत दिलीं आहेत व विडा करून ठेवलेला देतां आला नाहीं म्हणून मीं मजकूर लिहिला होता याबद्दल कांहीं विनोद, आपल्याला मिळाला नाहीं म्हणून कांहीं खेद, इतक्या चमत्कारिक इतिहासाचा तो विडा जपून ठेवून पुनः गांठ पडली म्हणजे मला दिला पाहिजे, करितां तो तसाच राखून ठेवावा असा मजकूरहि ज्यांत लिहिला आहे, असें हें त्या सुंदर हातांनीं व शुद्ध आणि प्रेमळ मनानें

लिहिलेलें पत्र आज पुन: एकदा, दोनदा, तीनदा वाचून माझें मन उद्विग्न झालें यांत नवल तें काय ?

नवऱ्यानें बायकोस पत्र पाठविलें असतां त्यांत असणाऱ्या विविध प्रेमकथा, स्वप्नामध्येंहि एकदोनदा मी दिसल्यामुळें त्यावर केलेला विनोद, मुंबईला लवकर आणण्याच्या काय काय तजविजी झाल्या व काय काय व्हायच्या राहिल्या आहेत त्या सर्व सांगून, त्यांतहि माझ्या उतावळीबद्दल थोडीशी थट्टा, घटकोघटकीं माझें स्मरण किती होतें, कापडमार्किटाकडे गेलें म्हणजे तेथें चीट वगैरे पाहिलें कीं, माझी आठवण कितीदा झाली, इत्यादि गोष्टी लिहिल्या आहेत; तसेंच सासरच्या माणसांबद्दल, आजीबद्दल, दादाबद्दल, माईसाहेबांबद्दल वगैरे विचारपूस केली आहे, माझी मैत्रीण दुर्गी हिच्याबद्दल हकीकत विचारली आहे; इत्यादि गोष्टींबद्दल नवल वाटण्याचें कांहीं विशेष कारण नाहीं. मला पत्र पाठविलें आणि तें सविस्तर ल्याहायचें म्हटलें म्हणजे अशाच कांहींतरी गोष्टी ल्याहायच्या, दुसऱ्या काय ? पण नाहीं, या माझ्या पत्रांत कॉलेजांतल्यादेखील कांहीं गोष्टी व नवीन झालेल्या ओळखींपैकींदेखील कांहीं गृहस्थांच्या हकीकती दिल्या आहेत ! शेवटीं माझ्या स्तुतीचा जो कांहीं भाग आहे, तो वाचून तर मला जें कांही होतें आहे तें होतें आहे ! मी ती काय, माझें पत्र तें काय आणि माझा गौरव कितीतरी केला आहे, त्याचप्रमाणें पत्र पाठविण्यास चार दिवस उशीर झाला याबद्दल मला राग आला असेल असें पक्कें जाणून त्याबद्दल कसें पण लिहिलें आहे ! " पत्र पाठवून चार दिवस झाले; अजून माझें उत्तर नाहीं याबद्दल भारी भारी राग आला असेल, नाहीं ? रोज टपालाच्या शिपायाची कशी पण वाट पाहिली असेल ! आणखी तो एकदा पत्र दिल्यावांचून गेला म्हणजे कितीतरी निराशा झाली असेल ! आणि त्या निराशेच्या भरांत मला काय काय तरी म्हटलें असेल ! ' आळशी, निष्काळजी,' अशीं विशेषणें तर मला वाटतें कितीक तरी मिळालीं असतील ! आणि राग तर असा आला असेल, कीं कांहीं पुसूं नये; पण इतक्या दूर पडलेला मी, तो राग घालवून पुन: मर्जी सुप्रसन्न करून घेण्याला काय बरे उपाय योजणार ? वेळ झाला नाहीं, काम होतें, या सबबी सांगून समाधान होणार नाहीं हें उघड उघड मला दिसतेंच आहे, तेव्हां ' कृपा करून क्षमा करावी, पुन: असें कधीं करणार नाहीं, ' हें मी अगदीं मनापासून लिहितों— "

पण हें मी काय करतें आहें ? माझें पत्र मीं ज्या कारणांनी दिलें नाहीं त्याच कारणाकरितां हेंहि पत्र मी देत नाहीं. कारण, एक तर तें पत्र केवळ माझ्यासाठीं लिहिलें होतें, त्यामुळें त्यांत कित्येक गोष्टी मुळीं कोणाच्याहि दृष्टीस पडतां कामा नयेत; दुसरें असें कीं, त्या पत्रांत माझी व माझ्या पत्राची अतिशयच स्तुति केली आहे. माझें तर इतकें गौरव केलें आहे कीं कांहीं विचारूं नये ! तेव्हां तें जर लोकांच्या दृष्टीपुढें आलें तर हसूं होण्यापलीकडे कांहीं होणार नाहीं. " बायको ती काय, तिचें पत्र तें काय, आणखी या गृहस्थानें एवढें पाल्हाळानें लिहिलें आहे तें काय ? साराच आचरटपणा ! "

असें कितीतरी लोक म्हणतील! तेव्हां आतां त्या पत्रासंबंधानें आणखी कांहीं न लिहितां मी आपली पुढें जातें.

तें पत्र आल्यापासून पांच सहा दिवस तर माझे मोठ्या आनंदांत गेले. आजी आल्यापासून घरांतले माईसाहेबांचे ठोसरे जरासे कमी झाले. आजीला म्हणजे ती कांहीं वचकन होती असें नाहीं; पण किती झालें तरी सासू पडली, तेव्हां अंमळ तरी हें होतेंच. असो

आजी व मी एकदादोनदा दुर्गीच्या घरीं गेलों. दुर्गीचे दिवस आतां अगदीं भरत आले होते. काय असेल तें असो, दुर्गी फारच फिकटलेली आणखी क्षीण अशी दिसूं लागली होती. तिच्या तोंडावर कांहीं चमत्कारिक छाया दिसूं लागली होती. काय करील बिचारी! मनांतल्या मनांत झुरत असे. आपलें पुढें होणार तरी कसें! नवरा तर हा असला, दुसऱ्यानें कोणीं जेवायला घातलें, कांही करूं नको म्हटलें, तरीदेखील स्वस्थ बसायचा नाहीं, पैसा मिळविण्याची तर अक्कल नाहीं; इत्यादि विचार रात्रंदिवस तिच्या मनांत घोळत. मीं आणखी ती दोनदातीनदा याविषयीं बोललों, तर कितीदा ती मला म्हणाली, "यमे, तुझ्यासारखे शेंदोनशें नकोत ग; पण एक दहा रुपये जरी मिळवले कीं नाहीं, तरी मी अशा थाटानं टुमटुमीत संसार करीन कीं वा! पण कुठलं आमच्या नशिबीं?" आणि असें ती म्हणाली की, माझ्या पोटांत असें भडभडून येई, कीं कांहीं पुसूं नये. खरोखरच ती मोठी हुशार होती हो, आणि तिला जर चांगला नवरा मिळता, तर ती किती हुशार झाली असती याचा कांहीं नेमच नाहीं. केवळ त्या कावळ्याच्या गळ्यांत पडल्याकारणानें तिच्या साऱ्या गुणांचें, साऱ्या हुशारीचें, तरतरीचें आणखी अभिमानाचें अगदीं मातेरें झालें. आणखी मेला निर्लज्ज तर इतका होता कीं, चोरीबिरीचें इतके सारें झालें तरी एखाद्या दिवशीं घरीं आईवर रुसून सासुरवाडीसच जेवायला, खायला आणखी निजायला येई. झालें. एकदोन दिवस राहावें आणखी निघून जावें. कोणाची कांहीं बोलण्याची प्राज्ञा नाही, कांहीं नाहीं. जेवाखायची, निजण्याबसण्याची थोडीशी सोय बिघडली, कीं बायकोला, सासूसासऱ्याला शिव्या! अशी स्थिति असल्यावर दुर्गीची अवस्था अशी होईल.यांत नवल काय? व तिची आई, आजी आणखी बापदेखील या पोरीच्या काळजीनें अगदीं अशीं कृश झालीं होतीं. काय करतील बिचारीं! दुर्गीची आजी तर माझ्या आजीजवळ एकदा बोलतां बोलतां म्हणालीसुद्धां, कीं "अहो, ही आमच्या काळजाला एक बरची आहे बरं का? काय होणार पुढं अन् काय नाहीं? पाह्यलीतना पोरीची अवस्था काय झाली आहे? ती कशी एकदा हातींपायीं सुटेल याचीच काळजी" हे शेवटले शब्द उच्चारतांना म्हातारीचा चेहरा असा झाला होता, कीं त्यावरून तिला दुर्गी हातींपायीं सुटण्याची फारशी आशा नव्हती असें वाटत होतेंसे दिसलें. ही खरोखरच त्यांच्या काळजांत कट्यार नव्हे तर काय? दुर्गीला तरी बिचारीला काय बरें वाटत असेल! नवरा घरीं राहायला आला, म्हणजे तिला किती संकोच, किती ओशाळगत वाटत असेल? शिवाय आपण या बाळंतपणांतून कांहीं वांचत नाही, असें

तिचें तिलादेखील वाटतच होतें. तिनें माझ्याजवळ बोलून दाखविलेंच होतें दोनचार वेळां. जिवासारखें माणसाला कांहीं प्यारें नाहीं म्हणतात तें खरेंच; पण सुखाची आशा नसली, इतकेंच नव्हे, तर पुढें कशा प्रकारचें दुःख येऊन आपल्यावर कोसळेल, आणि कशा प्रकारचें नाहीं अशी भीति क्षणोक्षणीं वाटत असली म्हणजे त्या दुःखांतून सुटण्याच्या आशेनें मनुष्याला मरण येईल तर बरे असें होऊन जातें. दुर्गीला तसें झालें होतें. मीं जितक्यांदा तिला भेटायला गेलें तितक्यांदा तिनें म्हटलें, " यमूताई, मी मरेन तर फार चांगलं होईल बरं का ! माझी मी सुटेन आणखी बाबांच्या, आईच्या जिवाचाहि कांच सुटेल. " व ती असें म्हणाली म्हणजे मला किती वाईट वाटत असे ! पण मी आपली तिला समाधान होण्यासाठीं म्हणे, " दुर्गे, हें काय हें नेहमीं ! असं कां तूं बोलतेस अभंगळ ? गर्भारशी बायको तूं, असं नको बाई बोलत जाऊं. तुला पाहिली म्हणजे आम्हांला साऱ्यांना नाहीं का वाईट वाटत ? पण तूं हें असं बोललीस म्हणजे बहिणाकाकूंना, तुझ्या बाबांना, आईला काय बरं वाटेल ? अग; आज नाहीं उद्यां, येतील चांगले दिवस, कांहीं सारा जन्म अशीच स्थिति राहील ? "

या माझ्या म्हणण्यानें तिचें किती समाधान होत असेल हें उघड दिसतेंच आहे. मी आपली कांहींतरी बोलायचें म्हणून बोलतें आहें हें ती समजून असे. एक दिवस मी असेंच कांहीं तिला समाधान व्हावें म्हणून बोलत होतें. आदले दिवशीं वाटतं तिचा नवरा कायसा येऊन भांडण करून गेला होता, आणखी दुसरे दिवशीं मी तेथें जाण्यापूर्वी कायसा असाच येऊन तिला " तू घरी चल या वेळेस, नाहीं राह्यचं माहेरीं, घरी हो बाळंत, या माणसांचं तोंड पाहील तो चार बापांचा, मोठा दिमाख लावतात आपल्या श्रीमंतीचा ! चल, तूं चल." असें म्हणून मोठमोठ्यानें ओरडून तिला ओढण्याच्या बेतांत आला होता. तें पाहून त्याची सासू कुठें " अहो, हें काय हे ? तिला नववा महिना लागला, ती अगदीं बाळंत व्हायला टेकली, आणखी तुम्हीं काय हें आरंभलं आहे " असं म्हणाली मात्र ! त्यानें जें मग तोंड सोडलें आहे !—" रस्त्यांत झाली बाळंतीण तरी पत्करली ! पण मी तर तिला आज आत्तां नेणार. चल, तूं चल, नाहीं तर पाहा आपला विचार. लाथ मारीन, सोडणार नाहीं. यांचा कशाला एवढा डौल ! चल, चल. " असें म्हणून त्या पशूनें त्या गरीब गाईला खरोखर कीं हो ओढली ! तिला रडण्याचीदेखील चोरी. काय करते बिचारी ! मुकाट्यानें आपलें एक जुनेर घेऊन उठली. तिचा बाप बाहेर गेला होता. " ते येईपर्यंत थांबा " म्हणून बहिणाकाकू म्हणत होत्या ! पण तो नराधम कुठला ऐकायला ! बायकोचा दंड धरून त्यानें तिला पुढें खेचलीच ! तिनें आईच्याकडे पाहून " आई " असें म्हटलें, त्याबरोबर तिची आई, मूळची मोठी जहांबाज, इतका वेळ अगदां स्वस्थ होती, पण पोरीचे हाल होणार आणि प्रत्यक्ष होताहेत हें पाहून तिला अतिशय त्वेष आला. ती पुढें झाली आणि पोरीचा हात धरून तिनें तिला मागें ओढलें, आपण पुढें झाली आणखी संतापून मोठ्यानें म्हणाली, " धाडीत नाहीं तिला, न्या कशी नेतां ती ! घरीं कोणी नाहीं म्हणून हवं तसं हें करतां

का ? " तिनें असा खाकरवास घातला आणि दुर्गीला पाठीशीं घातलें, तेव्हां भागूबाईनीं एक एक पाऊल मागें टाकीत तोंडानें शिव्यांचा व धमक्यांचा नुसता वर्षाव चालविला. दारांत जातो तों सासरा भेटला, त्याबरोबर मग त्यानें यःपलायन केलें !

ही हकीकत घडली त्यानंतर थोडयाच वेळानें मी गेलें होतें. मीं गेलें तों मंडळी संतापांतच होती. दुर्गी आपली एकीकडे बसून एकसारखी रडत होती. करते काय ? मी ते दिवशीं सारा दिवसभर तेथें त्यांच्या घरींच राहिलें होतें. माझ्याकडून मी आपली कांहीतरी बोलून तिचें समाधान करायला पाहात होतें. खरें म्हटलें तर तिचें समाधान कोण काय बोलून करणार होतें ? पण कांहीं समाधानाचे बोलायला तर पाहिजे ! म्हणून मीं तिला वर सांगितलें आहे तसें कांहीं बोलत होतें. " अग, असं नको करूं तूं गर्भारशी बायको; आणखी एखादं कांहीं भलतंच व्हायचं. आज नाहीं उद्यां त्यांचा स्वभाव पालटून ते शुद्धीवर येतील. " हें शेवटलें वाक्य माझ्या तोंडून निघतें तों ती कांहीं चमत्कारिक तऱ्हेनें हसली. तें तिचें हसणें इतकें कांहीं भयंकर होतें की मला कसेंसेंच वाटलें. आधींच तिचें तें पांढरें फिक्कट झालेलें तोंड, आणखी त्यांत तें भेसूर हसणें. माझ्याकडे आपल्या विलक्षण पाणीदार डोळ्यांनीं एकसारखें टक लावून पाहात ती म्हणाली, " यमे, तुला सांगूं का आतां केव्हां सुख मिळणार आहे तें ? " मी आपली कांहींच बोललें नाहीं. कारण, तिच्या त्या चमत्कारिक हसण्यानें व विशेषतः त्या विलक्षण पाहण्याने मीं घाबरल्या-सारखीच झालें होतें, तिच्याकडे फक्त टक लावून पाहात राहिलें. तेव्हां ती आणखी म्हणाली, " हें बघ यमे, एक मी तरी मेलें पाहिजे,—" एवढेंच ऐकून मी आतां ही पुढे काय बोलते आणि काय नाहीं असें होऊन तोंडानें " हें काय बो...... " असें म्हणतें, तों ती " नाहीं तर तिकडे तरी कांहीं बरंवाईट झालं पाहिजे. त्याच्याखेरीज कांहीं आतां या हालांतून सुटका नाहीं, समजलीस ? "

हे भयंकर शब्द माझ्या कानीं पडतांच माझ्या अंगावर शहारे आले. हें काय हें, ही बोलते आहे तरी काय ? असें मनांत येऊन मीं एकदम तिचा हात धरून तिला म्हटलें, " दुर्गे, दुर्गे, काय ? हें आहे तरी काय ? हें तूं काय बडबडते आहेस हें ? कांहींतरी ! ... "

पण ती मला पुढें एक अक्षरहि न बोलूं देतां डोळे वटारून व जोरानें ओठ चावून म्हणते, " मी या बाळंतपणांत मेलें तर बरी, नाहीं तर कांहीं ना कांहींतरी आपल्या जिवाला करून घेईन; नाहीं तर... " पुढें कांहींतरी भयंकर बोलणार असें मला वाटलेंच. तिचा चेहरा रागानें अतिशय लाल झाला होता. मनांत येणारे कांहीं विचार आतां छाती फोडून बाहेर येतात कीं काय असें मला वाटलें आणि तिच्या तोंडावर हात ठेवून मी तिला गप्प करणार, तों ती डोळे कसेसेच करून माझ्या अंगावर पडली, ती बेशुद्धच ! मी घाबरून गेलें. तिची आई धावून आली. तिच्या हातांची अगदीं लाकडें वळलेलीं. तोंडावर पाणीबिणी शिंपडून इकडे तिकडे करून कितीतरी वेळानें ती शुद्धीवर आली. मला असें झालें कीं आतां काय करूं ? ती शुद्धीवर आल्यावर

तिला निजवून बिजवून तेथून एकदाची मी घरीं आलें. कांहीं केल्यानें मनांतलें तें जाईना. ते दुर्गीचे भयंकर शब्द माझ्या कानांत एकसारखे घुमत होते. अति झालें म्हणजे मनुष्य किती संतापेल आणि काय बोलेल याचा नेम नाहीं. सध्यांच्या यातनांपेक्षां वैधव्याच्या नरकयातनादेखील तिला बऱ्या वाटल्या काय ? वाटल्या असतील यांत नवल नाहीं. दोनप्रहरची हकीकत, मनुष्य कितीहि शांत असला तरी त्याला संताप व खेद उत्पन्न करणारी होती; मग आजपर्यंतच्या छळानें अगदीं त्रासलेली, जाचानें गांजलेली, दुःखानें भाजलेली, शिव्यांनीं डागलेली अशी ती अल्लड दुर्गी संतापाच्या भरांत वर लिहिल्याप्रमाणें बोलली यांत नवल काय ?

◆ ◆ ◆

## ४४ : ही मावशी कोण ?

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

तो सर्व प्रकार पाहून आल्यावर माझ्या मनाला काय बरें वाटलें असेल ? माझी लहानपणची मैत्रीण, माझ्या जिवाची जिवलग ती दुर्गी, तिची अशी स्थिति व्हावी ना ? आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां, केव्हांतरी आपणांस सुख होईल अशा आशेचा गंध-देखील तिला असूं नये; उलट बाळंतपणांत आपल्याला मरण येईल तर फार बरें होईल, असें वाटून अगदीं मनापासून आपल्या मरणाची तिनें वाट पाहात बसावें; तें न येईल तर आपल्या जिवाला आपण कांहींतरी करून घ्यावें असें तिला वाटावें, तेंहि न झालें तर ? शेवटीं त्या तसल्या दळभंजन्या दुष्ट दुर्योधन नवऱ्याचेंदेखील कांहींतरी बरेंवाईट व्हावें असें तिच्या मनांत येऊन तिनें मला स्पष्ट बोलून दाखवावें, व आपण बोलतों हें आहे तरी काय, असें मनांत येण्याचें एकीकडेच राहून—जें पाहिल्याबरोबर व ऐकल्याबरोबर भय वाटावें व अंगावर शहारे यावे अशा तऱ्हेनें भयंकर हसावें म्हणजे आहे तरी काय असें मला होऊन जावें, यावरून तिच्या मनाची खरोखरी काय स्थिति झाली असेल ! ज्याच्याविषयीं आम्हां बायकांच्या मनांत अत्यंत पूज्यबुद्धि असते, गांवानें कांहींहि नांवें ठेविलीं तरी आम्ही मनोभावानें देव मानून ज्याची सेवा करतों, तो जिवंत असला तरच आम्ही जिवंत असें समजतों, तो हसला तरच आम्ही हसतों, इतकेंच पाणी पी म्हटलें तर तितकेंच पितों, अमुक कर म्हटलें तर करतों, नको म्हटलें तर तितकेंच थांबतों, बस म्हटलें तर बसतों, ऊठ म्हटलें तर उठतों, एक तोंडांत मारली तर दुसरा गाल पुढें करतों, लाथ मारली तर पाय दुखावला असेल म्हणून चेपायलादेखील तयार व्हावें लागतें, इतकी ज्याच्याविषयीं सप्रेम सन्मानबुद्धि—निदान नुसती सन्मानबुद्धि आमच्या चित्तांत बहुशः असते, निदान दाखवावी लागते—ज्याची प्रकृति सांभाळण्या-करितां आम्हांला आमच्या जिवाकडे कधींच पाहावेंसें वाटत नाहीं, कारण त्यांच्या

बऱ्यावाइटावर आमचें सर्वथा जीवन अवलंबून, त्या पतिदेवाच्या मरणाची इच्छा उत्पन्न होईपर्यंत जिची स्थिति गेली; त्याच्या मरणानंतर वैधव्य येऊन होणाऱ्या यमयातना, अतिशय क्रूर अशा विटंबनादेखील जेव्हां तिला अधिक बऱ्या वाटूं लागल्या, तेव्हां तिला त्या चांडाळाचा किती तिटकारा आला असेल ? त्याचा आणि आपला संबंध तुटेल तो दिवस सुदिन, त्या दिवशीं आपण यमयातनांतून सुटलों, मग तें आपल्या मरणानें होवो किंवा त्याच्या मरणानें होवो, असें वाटण्याला गांजणूक कोणत्या थराला पोंचली असावी इत्यादि गोष्टींचें वर्णन मी आतां देऊं तरी काय ? तिच्या तोंडून ऐकलेल्या व कांहीं प्रत्यक्ष पाहिलेल्याहि अनेक—लाखों—गोष्टी आज मला आठवत आहेत, परंतु त्या तिच्या मनाला गांजून, भाजून, होरपळून टाकणाऱ्या अशा असल्यामुळें, त्या ऐकतांना किंवा पाहतांना माझ्या अंगावर शहारे आले व अशा चांडाळाला काय करावें आणखी काय नाहीं असें होऊन गेलें. तरी त्याचें वर्णन देत बसल्यास त्याच्या एकसारखेपणामुळें वाचकांस कंटाळा मात्र येईल, म्हणून येथेंच पुरें करून आपल्या पुढल्या हकीकतीकडे वळतें.

आतांशा आतांशा माईसाहेबांचें आमच्यावरचें प्रेम मोठें चमत्कारिक झालें होतें. ‘चमत्कारिक’ याचा अर्थ मोठा चमत्कारिक आहे. तो वाटेल तसा लावतां येतो; एवढ्याकरितां माझा मीच अर्थ स्पष्ट करून सांगणें फार चांगलें. आजपर्यंत ज्या हकीकती मीं दिल्या आहेत, त्या साऱ्यांवरून वाचकांस एवढें तर स्पष्ट कळून चुकलेंच असेल, कीं त्यांचें आम्हां मुलांविषयीं मोठें दुटप्पी वर्तन असे. बाबांच्या देखतचें त्यांचें आमच्याशीं किंवा आमच्याविषयीं बोलणें, आणि त्यांच्या पश्चात् आमच्याशीं किंबहुना आमच्या पश्चात् त्यांच्याशीं आमच्या संबंधानें बोलणें, ह्यांत जमीनअस्मानाचें अंतर असे. बाबा समक्ष असतांना आमचा केवढाहि अपराध असला तरी त्यावर पांघरूण घालण्याचा यत्न करीत आहोंत असें दाखविणें; इतकेंच नव्हे, परंतु आपण आपल्याकडून ती मुलांची आगळीक कानावर जाऊं नये, म्हणून कितीतरी यत्न . करतों आहोंत असें दाखविणें; त्याचप्रमाणें, आतां कानावर जातेंच आहे, तर तिला अत्यंत सौम्य रूप देण्याची आपली खटपट आम्हांला दिसेल असें करणें इत्यादि गोष्टी आठवल्या म्हणजे मनाला मोठा चमत्कार वाटतो; आणि अशाच तऱ्हेचें आमच्यावरील! त्यांचें प्रेम आतांशा विशेष प्रकट होऊं लागलें; म्हणूनच मी वर जें त्या प्रेमास ‘ चमत्कारिक ’ असें विशेषण दिलें आहे तें ! आजी आल्या दिवसापासून तर हें प्रेम फारच दुणावलें. आजीचा तर मान माईसाहेब इतका ठेवूं लागल्या कीं, कांहीं पुसूं नये. आजीलादेखील त्याचें आश्चर्य वाटून तिनें त्याप्रमाणें एके दिवशीं रात्रीं माझ्याजवळ बोलूनहि दाखविलें. “ यमे, आतांशा सूनबाई फारच चांगल्या निवळल्या. हें कसं काय झालं ! आतांशा त्यांच्या मातुःश्री नाहींत म्हणून वाटतं ! आतां यायच्या असतील ना इतक्यांत ? मग पुनः येईल सारं तंत्र ताळ्यावर मला वाटतं ? ”

मी जर माईसाहेबांच्या अढ्या, आणखी आम्ही कोणी जवळ नाहींसें पाहून चाललेलें पुटपुटणें " कशाला आल्या आहेत कुणाला ठाऊक ? काय ? अगदीं पोरीच्या लग्नावांचून अडलं आहे ? " इ. इ. इ. पुटपुटतें ऐकलें नसतें, किंवा आजी येण्याच्या आधींपर्यंतचा एकंदर अनुभव जर माझ्या ध्यानांत नसता तर मींसुद्धां आजीप्रमाणेंच म्हटलें असतें; परंतु त्या साऱ्या गोष्टी ध्यानांत असल्यामुळें आणि तसलीं पुटपुटणीं अगदीं सहजीं माझ्या कानावर आल्यामुळें मला आपलें आजीचें तें बोलणें ऐकून मनांतल्या मनांत हसूं आलें. तरी पण तें मीं आजीच्या लक्षांत येऊं दिलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर उलट मीं तिला म्हटलें, " आतांशा तसलं कांहींएक नाहीं. आम्ही दोघं म्हणजे तिचीं सावत्र मुलं, असं कोणाला समजायचं देखील नाहीं, इतकं आतांशा आमच्यावर मन आहे. तूं अगदीं काळजी करूं नकोस बरं का. " तेव्हां तिला मोठा संतोष झालासा दिसला. ती मला म्हणाली, " अग असंच असलं म्हणजे बरं. नाहीं तर तुमचं तोंड पूर्वेस, तर तिचं पश्चिमेस, असं काय उपयोगी ? तुझं कांहीं नाहीं एवढं म्हणा, पण माझ्या गणूचंच मला हें वाटतं; तुझी तूं आपली आपल्या घरीं जाशील, संसार करशील; असली हो बरी तुझ्याशीं, बोलावलंन् चार दिवस राहायला, तर येशील सवड झाली म्हणजे. नाहीं तर तुझं तुला घर कांहीं कुठें गेलं नाहीं. गणूचं बरीक कसं होईल तें होवो. तो पडला भिडस्त. अरे म्हटलं तर कारेदेखील म्हणायचा नाहीं कीं पानावर बसला तर जिन्नसदेखील मागायचा नाहीं. त्याची बायको मोठी होईल, व्यवस्था पाहील तें अजून लांबच आहे, म्हणून आपलं मला वाटतं, कीं त्याची व्यवस्था कशी लागेल ती खरी. पण सध्यावरून तर ठीक दिसतं आहे सारं ! " तें आजीचें म्हणणें ऐकून मीं आपलें होस हो म्हटलें. अधिकउणें कांहींच बोललें नाहीं. काय बोलायचें होतें ? सगळी हकीकत सांगण्यांत तर कांहीं तात्पर्य नव्हतें. ती उगीच बिचारी चार दिवस येथें राहणार, तों तिला हें सांगून तिच्या जिवाला हृद्रोग लावून देण्यापासून काय उपयोग ? असा विचार करून मी आपली कांहीं बोललें नाहीं हेंच बरें केलें. असो.

परंतु एक गोष्ट आतांशा माझ्या विशेष लक्षांत येऊं लागली. ती ही कीं, माईसाहेब थोड्याशा उदास दिसत असत. पहिली जी त्यांची तरतरी, जो उल्लास, तो आतांशा दिसत नसे. आतांशा त्यांचें नटणेंथटणें हा कांहीं विशेष नसे; तो उलटा अंबाडा, इत्यादि आपला नेहमींचा असेंच म्हणा, पण आतां चिटाचीं पातळें जाऊन त्याच्याऐवजीं साधीं मलमलीचीं आलीं होतीं. चोळ्या तशाच साध्या, दागदागिने कांहीं विशेष अंगावर नसत. प्रथम प्रथम कांहीं हें माझ्या लक्षांत आलें नाहीं, पण पुढें एकदोन सणावारालादेखील जेव्हां हीच अवस्था दृष्टीस पडली, तेव्हां मला ' हें काय बरें ? ' असें वाटून विशेष चमत्कार वाटला. मनुष्याला नटण्यामुरडण्याची स्वाभाविकच इच्छा असली, म्हणजे पुढें तें मुद्दाम दाबण्यासाठीं यत्न करूं लागल्यास इतरांच्या नजरेच आल्याखेरीज कसें राहावें ? त्यांतून मी तिच्याकडे विशेषच पाहात असल्यामुळें मला तें सहजींच दिसून आलें; परंतु तें सारें मुद्दाम चाललें आहे, असेंहि वाटूं लागलें. असें कां होतें आहे, याचें

इंगित मात्र मला समजेना. इतक्यांत दोन मोठया विलक्षण गोष्टी घडल्या, त्यांनीं तर मी फारच बुचकळयांत पडलें.

वर सांगितलेली दुर्गीची हकीकत घडल्यानंतर सुमारें दोन दिवसांनीं दोनप्रहरीं दिडाच्या सुमाराला घरांत जिकडे तिकडे सामसूम होतें. आजी सैंपाकघरांत निजली होती. सुंदरीहि तिच्याजवळ पडली असून तिला झोप लागली होती. माईसाहेब कोठें बाहेर कीं माडीवर होत्या. मी आपली आजीशीं बोलत बसलें होतें, परंतु तितक्यांत तिचा डोळा लागला म्हणून उगीच तेथेंच पडलें होतें; वहिनी ते दिवशीं सकाळींच माहेरच्या बोलावण्यावरून माहेरीं गेली होती. माझ्या मनांत काय विचार चालले होते ते कांहीं मला आठवत नाहीं; पण तितक्यांत माझ्या मनांत कांहीं विचार येऊन मी हलकेच उठून दादाच्या माडींत जावें म्हणून निघालें. जातांना बाबांच्या दिवाणखान्यांत कांहीं वर्तमानपत्र पडलें होतें, तिकडे माझें लक्ष जाऊन तें काय आहे, वाचावें असें आपलें मनांत आलें, म्हणून मी आपली सहज आंत गेलें; पलीकडल्या बाजूलाच बाबांची निजावयाची खोली होती. तिचें दार अर्धें किलकिलें होतें. प्रथमतः कांहीं माझें तिकडे लक्ष गेलें नाहीं. मी आपली तडक त्या वर्तमानपत्राकडे गेलें, तें असें उलटून पाहिलें, त्यांत 'स्त्रीशिक्षणाची आवश्यकता' असें एक सदर पाहिलें; तेव्हां काय लिहिलें आहे तें पाहावें, या इच्छेनें सहज मी तेथेंच बसून मनांतल्या मनांत पुटपुटूं लागलें. इतक्यांत 'हवं असलं तर मी आपलं सांगेन, पण इतक्या रुपयांखेरीज व्हायचं नाहीं अन् दहा रुपये म्हणजे तुम्हांला जड जाताहेत असं कांहीं नाहीं,' असे अगदीं कोणा नव्याच माणसाच्या तोंडचे शब्द माझ्या कानीं पडले. मला वाटतें, या शब्दांच्या पूर्वी तें माणूस कांहींतरी बोललें असावें; कारण मीं जे शब्द ऐकले ते कांहीं संभाषणाच्या प्रारंभींचे खास नव्हत. हें आहे तरी काय ? अन् दहा रुपये कसले ? कोण कोणाला बोलतें आहे ? माझ्या लक्षांत कांहींच येईना. मी अगदीं गोंधळांत पडलें. कोणी कांहीं गुपित बोलत असलें तर आपण तें ऐकूं नये, उठून चालतें व्हावें, हा उत्तम मार्ग, पण तो मला सुचलादेखील नाहीं. मी गोंधळून जाऊन तशीच तेथें बसलें होतें, तों वरच्या प्रश्नाला उत्तरादाखल "अहो मावशीबाई, सगळ्या गोष्टी खऱ्या, पण नसले दहा रुपये तर द्या कुठले ? कांहीं आपला जीव..." पुढील शब्द माझ्या कांहीं कानीं पडले नाहींत. हे शब्द कोणाचे होते, तें मीं ताबडतोब ओळखलें आणि मग तर फारच बुचकळयांत पडलें ! ही मावशी कोण ? माईसाहेबांची एखादी मावशी असलेली, मला तर मुळींच ठाऊक नव्हती. ती दहा रुपये मागते कसले ? आणखी आहे काय ? असेल कांहीं गुपित ! आपण कशाला ऐका ! असें माझ्या मनांत येऊन मीं उठून जावें असा विचार केला तों आंतून पुनः कांहीं शब्द माझ्या कानीं आले. "पाहा बाई, तुझ्या आईनं मला काशीला जातांना सांगितलंन्, तूंध् त्याच्यावर दोनदातीनदा म्हणालीस, म्हणून मी या भानगडींत पडलें, अन् आतां तूंच असं म्हणायला लागलीस तर त्या गृहस्थाला मी सांगूं काय ? मी तोंडघशीं..." पुनः पुढें मला कांहीं ऐकूं आलें नाहीं;

परंतु हे वरील शब्द ऐकून माझें काळीज धडधड उडूं लागलें आणि उठून जाण्याचा विचार एकीकडेच राहून पुढें काय संभाषण होतें हें ऐकण्याचीच इच्छा होऊं लागली. मी उगीच खोटें कशाला लिहूं ? लहानपणापासून कोठेंहि कोणी कांहीं बोलत असलें, करीत असलें, कीं तें काय असावें असें वाटून कळून घ्यावें अशी मला इच्छा फार असे, हें मीं वाचकांस यापूर्वी कितीकदा सांगितलें आहे आणि माझ्या एकंदर हकीकतीवरून तें वाचकांच्या ध्यानांतहि आलें असेल. तेव्हां माझ्या मनांत नसतांहि अशा या प्रसंगीं त्या माझ्या उपजत स्वभावानें थोडेंसें बळ करावें याबद्दल आश्चर्य वाटण्याची कांहीं जरूर नाहीं. मी आपली उघड सांगतें. मला आपलें हें आहे तरी काय, असें वाटून पुढें कोण काय बोलतें, तें ऐकण्याची इच्छा झाली, व ही इच्छा वाईट, ती दाबली पाहिजे, असें हजारदा माझ्या मनानें सांगितलें, तरी त्याला गप्प बसण्यासाठीं काय, "आतां उठणें वाजवी नाहीं, आतां जर आपण उठलों तर आंत तें माईसाहेबांना कळेल, आणखी कदाचित् आपण त्यांचें सारें बोलणें ऐकलें असें त्यांस वाटून त्या संतापतील, तेव्हां शहाणपणाचा मार्ग म्हटला म्हणजे आपण मुकाटयानें जागच्या जागीं बसावें हेंच बरें," असेहि कांहीं शब्द मनांतल्या मनांत निघूं लागले. जो जास्त बोलेल त्याचेंच बहुशः खरें वाटत असतें, या न्यायाप्रमाणें पाठीमागल्या या शब्दांनींच मला आपल्याकडे ओढून आपल्या सांगण्याप्रमाणें करायला लावलें आणि बरें म्हणा कीं वाईट म्हणा, खरें बोलायचें, तर मीं त्याप्रमाणें केलेंहि. तेथून कांहीं उठलें नाहीं. वर्तमानपत्राकडे पाहात होतें, पण मन आणि कान होते खोलींतल्या बोलणारांकडे. आतां पुढें कोण काय बोलतें ? पण काय सांगावें, माझ्या कानावर पडण्यासारखें मोठयानें त्यांचें बोलणें किती वेळ तरी झालेंच नाहीं. कांहींतरी पुटपुट चालली होती, यांत शंका नाहीं. कारण तसा कांहीं प्रकार माझ्या कानावर येत होता. पण तें काय हें मात्र मला मुळीं समजेना. मीं आपले कान कितीतरी तिकडे लावले होते म्हणतां ? ऐकूं येण्याजोगा एक शब्द जरी माझ्या कानीं आला असता तरी तो मीं जाऊं दिला नसता. पण कुजबूज कुजबूज याखेरीज कांहीं ऐकूं येईल तर शपथ ! एकदा तर माझ्या मनांत दाराजवळ जाऊन ऐकण्याची-दिखील इच्छा झाली, परंतु ती माझ्या चांगल्या मनानें ताबडतोब दाबली. "छे छे छे ! अशा तऱ्हेनें चोरून ऐकणें अतिशय वाईट ! तूं इतका वेळ केलेंस हेंच अनुचित केलेंस, आणखीं याच्या पलीकडे जाणार काय !" असें कोणीतरी रागावून मला सांगत आहे असें स्पष्ट वाटलें व मी जेथल्या तेथेंच बसलें, तों म्हणतात नाहीं, 'चोरून ऐकण्याचा धंदा कानीं पडे आपलीच निंदा,' या म्हणीचा मला चांगला अनुभव आला. माई-साहेबांच्या तोंडचे पुढील शब्द माझ्या कानीं पडले, "दम धरा, मी पाहून येतें ती चोमडी कारटी कुठें आहे ती. सासूबाई निजल्या आहेत, पण ती असेल कुठेंतरी अशीच घिरटया घालीत. पाहिलंन् तुम्हांला म्हणजे उगीच ! माझं करते काय म्हणा, पण जिकडे तिकडे......अहो असली मिस्कील आहे कीं कांहीं पुसूं नये ! मला अस्सा संताप येतो, पण करायचं काय ? हं, ते रुपये आणखी तीं जोडवीं ओच्यांत......कळलंच

तरी मी कोणाच्या बापाला भितें म्हणा ? पण......'' इतके शब्द कानावर आले, आणि दारालाच माईसाहेबांनीं हात घातलासा दिसला, पण तो दार उघडण्याला नसून लोटण्याला असावा ! मग मला त्यांनीं पाहिलें म्हणून तर नसेल ना ? असें माझ्या मनांत येऊन मन मोठें चमत्कारिक झालें. आपण येथें होतों आणि तिचें सारें बोलणें ऐकलें असें तिला समजलें असेल काय ? आतां ती काय म्हणेल ? आधींच जी इतका माझा तिटकारा करते आहे, ती आतां किती करायला लागेल ? आतां दार लावलें आहे, तर आपण बसावें कीं उठून जावें ? उठून गेलें तर ती काय म्हणेल ? असे कितीतरी विचार माझ्या मनांत आले. आणखी इतके सगळे विचार यायला वेळ तरी किती लागला म्हणतां ? मला वाटतें एक पळदेखील लागलें असेल नसेल ! पण तितक्यांतल्या तितक्यांत कांहीं घाबरून म्हणा, कांहीं विचारामुळें म्हणा, पण मी उठून चालती झालें. त्या दोघी बाहेर येईपर्यंत कांहीं मी तेथें बसलें नाहीं. तडक जी निघालें ती दादाच्या माडींत जाऊन बसलें. पण पाहा मनाचा धर्म काय असतो तो ! माईसाहेब पुढें काय करतात, आणि ती बाई आहे तरी कोण हें जाणण्याची मला इतकी इच्छा झाली, कीं मी बरेंवाईट याचा विचार न करतां जिन्याच्या तोंडाशींच उभी राहिलें.

इतक्यांत माईसाहेब बाहेर येऊन इकडे तिकडे पाहात पाहात पलीकडल्या बाजूस सैंपाकघरांत गेल्या व लागलीच परत येऊन त्यांनीं त्या बाईला बाहेर आणलें. त्या बाईची पाठ मजकडे वळलेली असल्याकारणानें तिचा चेहरा कांहीं मला दिसला नाहीं; परंतु ती भली लठ्ठ, बुटगीशी व किंचित् लंगडत आहेसें दिसलें. इतक्यांत ती, "मग हें त्यांना देऊन यांत काय होईल तें करा आणखी लवकर..." असें कांहीं बोलत असतां, "हं. हं. बोलूं नका. मुकाट्यानें जा एकदा, अन् पुनः पंधरा दिवस येऊं नका. त्याच... मीं बोलावीन......" माईसाहेबांनीं असें बोलून तिला दाबलें. पुढें मला कांहींच ऐकूं न येतां दोघीहि खालीं गेल्या. मी आपली जेथल्या तेथेंच आश्चर्यचकित होऊन बसलें. माईसाहेब त्या बाईस घालवून वर येण्याच्या सुमारास मी खालीं गेलें, तों माईसाहेब वरच येत होत्या. त्यांनीं मला पाहतांच त्यांच्या चेहऱ्यावर मजविषयीं तिटकारा आला आहे असें चिन्ह दिसतें आहेसें मला वाटलें. खाई त्याला खवखवे म्हणतात नाहीं, तशांतीलच गत. मला वाटत होतें, कीं माईसाहेबांनीं मला तेथें बसलेली पाहिलें असावें. जर पाहिलें असेल तर तिटकारा दिसणें हें साहजिकच आहे. त्यांत आणखी जेव्हां त्यांनीं "का यमूबाई, काय वाचीत होतां वर बसून ?". असें विचारलें तेव्हां तर खात्रीच झाली; परंतु तो माझा निव्वळ भ्रम होता. मी बहुतकरून फावल्या वेळीं कांहींना कांहींतरी वाचीत असायची, आणखी तीहि दादाच्या माडींत; तेव्हां मी इकडे तिकडे कुठें नव्हतें, तर बहुतकरून दादाच्या माडींत वाचीत बसलें असेन असें पक्कें समजून व तिच्या मनांत कांहीं चाललें असेल तें दूर सारण्यासाठीच कीं काय ती साहजिकपणें मला तसें म्हणाली हें माझ्या लक्षांत आलें तेव्हां माझें मन स्वस्थ झालें.

आमच्या हितगुजाचें आद्य ठिकाण कोणी कांहीं झालें, तें कितीहि यत्किंचित् असलें, तरी मी कोणाला सांगितल्याखेरीज राहायची नाहीं, इत्यादि प्रश्न काढून आतां त्यांचीं उत्तरें देत बसण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं; इतकेंच नव्हे तर, अमुक एक घरांत झालेली गोष्ट मीं दादाला सांगितली नाहीं असें जर मीं आतां म्हटलें तर तें कोणाला खरेंदेखील वाटायचें नाहीं. नुसतें अमुक गोष्ट घडली आणि ती दादाला सांगावी कीं नाहीं याचा फार विचार केला, किंवा शंका घेतली असें जरी मीं म्हटलें, तरीदेखील कोणाला खरें वाटायचें नाहीं. कोणत्याहि गोष्टीचें गूढ पडलें, तर मी आपली त्याच्याजवळ सांगायचीच! त्याचप्रमाणें आज जो चमत्कार मीं पाहिला आणि जे शब्द ऐकले, त्यांवरून ज्या कांहीं चमत्कारिक शंका, माझ्या मनांत येऊं लागल्या, त्या सर्व शंका, ते सर्व विचार, ती सर्व हकीकत दादाजवळ सांगून त्याला कांहीं माहिती असल्यास विचारावी असें अर्थातच तत्काळ माझ्या मनांत आलें. आजीला सांगण्याचा विचारदेखील आला नाहीं, आणखी यदाकदाचित् क्षणमात्र आला असता तरी मीं त्याचा क्षणार्धांत निषेध केला असता. कारण तिला बिचारीला या भानगडींत काय कळणार होतें? उगीच तिच्या कानीं गोष्ट जाऊन तो बोललीबिलली तर भांडणाला मात्र काळ व्हायचा. ती आपली जुन्या काळच्या भोळ्या माणसांपैकीं एक. आलें कानावर कीं सरळ विचारून बोलून सोडायचें! आंत नाहीं बाहेर नाहीं. मागें नाहीं पुढें नाहीं. शिवाय लहानपणीं मला जसें कोठें खुट् झालें, कीं जाऊन आजीजवळ बोलल्याखेरीज राहवत नसे, तसा आतां प्रकार राहिला नाहीं. कोणत्या गोष्टी आपण आजीजवळ सांगाव्या आणखी कोणत्या नाहीं याचें तारतम्य मला आतां कळूं लागलें होतें. त्याचप्रमाणें प्रस्तुत गोष्ट आपल्याला ठाऊक आहे, आपण त्या बाईला पाहिलें, वगैरे गोष्टी माईसाहेबांना कळूं नयेत; आणि त्यांना न कळतां, आपल्याला त्यांचा खुलासा काढतां यावा. ती बाई कोण? ती आली होती कशाला? रुपये काय म्हणून मागत होती? माईसाहेबांनीं नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां ते दिले कां व किती? आणखी काय दिलें? इत्यादि इत्यादि सर्व हकीकती आपल्याला समजाव्या अशी इच्छा! ती इच्छा तृप्त व्हावी हा काय तो मोठा उद्देश आणि त्या उद्देशाची सिद्धि आजीला सांगितल्यानें कधीं होणार नाहीं, उलट कांहींतरी भलतेंच होईल अशी भीति. या सर्व कारणांमुळें आजीला ती हकीकत सांगण्याचें माझ्या मनांत आलें नाहीं हें फार श्रेयस्कर झालें असें मला वाटतें.

इतकी प्रस्तावना झाल्यानंतर संध्याकाळीं दादा आल्यावर संधि साधून मीं त्याला दुपारची इत्थंभूत हकीकत सांगितली, हें स्पष्ट सांगावयास पाहिजेच असें नाहीं. ती ऐकून तो किती वेळ तरी स्वस्थ बसला होता! शेवटीं मीं त्याला म्हटलें, 'दादा, कां रे, असा मुकाटयानं कां बसलास!" तरी तो कांहीं बोलला नाहीं. शेवटीं हलकेंच मला म्हणतो, "यमे, ती बाई अशी ठेंगणी, लठ्ठ अशी होती म्हणालीस का?"

"हो, कां बरं?"

" कांहीं नाहीं. माईसाहेबांच्या आईसाहेब काशीला जाण्यापूर्वी त्यांच्याकडे या बाईला दोनदातीनदा आलेली मीं पाहिली होती असं मला वाटतं. असं नाक बसकं होतं का ? बसकं ? अन् डोळे बटबटीत ? "

" तिचं तोंड नाहीं रे मला पाहायला सांपडलं ? ती पाठमोरी होती. मी जिन्यांत अशी उभी होतें. दिवाणखान्यांतून ती अशी इकडे गेली खालच्या जिन्याकडे. पोटऱ्या अशा लठ्ठ होत्या. मला वाटतं, ती माईसाहेबांच्या आईची कोणीतरी मैत्रीण असावी. दुसरं कांहीं दिसत नाहीं. त्या गेल्या तेव्हां सांगून गेल्या असतील कांहीं लागलं सवरलं तर......"

' मला नाहीं असं वाटतं ' दादा एकदम मध्येंच म्हणाला, " किती ? दहा रुपये मागत होती का ? दहा रुपये ? अन् काय म्हणाली ? त्यांना मी काय सांगूं ? वे कोण ? रुपये कसले ? जोडवीं......"

हीं शेवटलीं वाक्यें बोलतांना तर आपला मोठमोठ्यानेंच बोलायला लागला, तेव्हां मीं त्याच्या तोंडावर हात ठेवून म्हटलें, " अरे दादा, आहे तरी काय ? तूं आहेस कुठें, कांहीं आहे का तुझ्या ध्यानांत ? खालीं ऐकलं म्हणजे......"

" खरंच यमे, माझं भानच गेल्यासारखं झालं होतं " तो अगदीं हळूंच मला म्हणतो. " माझ्या मनांत कीं नाहीं कांहीं......" इतकेंच बोलून त्यानें जीभ चावली व लागलीच उघड उघड गोष्ट फिरविण्याच्या उद्देशानें मला म्हणतो, " असेल त्याचं कांहींतरी, आपल्याला काय करायचं आहे ? खरं, काय ग यमे, तुझ्या दुर्गीचं काय झालं ? ती अगदीं टेकली आहे ना आतां ? त्या बिचारीचं मला फार वाईट वाटतं ? "

तें दादाचें उडवाउडवीचें बोलणें पाहून मला मोठें चमत्कारिक वाटलें. तरी मी त्याला तसा थोडाच जाऊं देणार होतें ? मीं तावडतोब त्याला म्हटलें, " दादा, तूं काय म्हणत होतास तें आधीं मला सांग; दुर्गीला बाळंत व्हायला अजून अवकाश आहे."

" कांहीं नाहीं ग " तो तावडतोब म्हणाला, " मला आपलं कांहीं वाटलं पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. तसं कांहीं तुला सांगण्याजोगं असतं तर सांगितलं नसतं काय ? "

" असंच तूं करतोस. मला जर कांहीं इतकंइतकं कळलं नवं तर मी तुला नेहमीं सांगतें; मला मेलं असं होतं, कीं केव्हां एकदा याच्याजवळ सांगेन ! अन् तूं मात्र अगदीं कसं बोलत नाहींस. मला कितीकदा तरी अनुभव आला आहे ! अन् माझ्यापासून काढून घ्यायला कसं अगदीं करतो पण— "

" यमे, आतां हें असलं लहान पोरीसारखं बोलणं शोभत नाहीं तुला. आतां तूं मोठी झालीस, आतां तूं पंडिताची बायको, स्वतः मोठी पंडिता, भराभर..."

" पुरे रे तुझं, आपल्या मनांतून कांहीं गोष्टी सांगायच्या नसल्या, म्हणजे अशीच कांहींतरी थट्टा करून वेळ मारून नेतोस. मला का समजत नाहीं समजतोस तूं ? मला सारं समजतं. सांग तुझ्या मनांत काय आलं होतं तें ? ऐकूं दे मला ? मग मीदेखील माझ्या मनांतलं काय तें सांगेन. "

" माझ्या मनांत जें काय आलंय् तें तुला सांगण्याजोगं नाहीं. अन् तूं विचारूंय् नयेस. तुझ्या मनांत काय आलं आहे तें बरीक सांगून दे मला. " तें त्याचें बोलणें ऐकून मला खरें पुसाल तर किंचित् राग आला आणि मी आपला सारा मोठेपणा विसरून त्याचप्रमाणें ज्या गोष्टीविषयीं आम्ही बोलत होतों त्या गोष्टीचें महत्त्व विसरून परत आपल्या बाळपणाच्या स्वभावाकडेच वळलें म्हणायची. कारण तोंड वेडेंवांकडें करून मीं अगदीं हुबेहूब त्याचें वाक्य म्हणून त्यास वेडावून दाखविलें.

" माझ्या मनांत जें काय आलंय् तें तुला सांगण्याजोगं नाहीं. अन् तूं विचारूंय् नयेस. तुझ्या मनांत काय आलं आहे तें बरीक सांगून दे मला. " खरोखर त्या वेळीं मला ते शब्द उच्चारतांना जर कोणीं पाहता तर त्यानें मला काय म्हटलें असतें ? एवढी थोरली बाई ही, अन् आपली आपल्या भावाला वेडावून दाखविते आहे !

तें तसें मीं वेडावून दाखविलें तेव्हां दादा नुसता मोठ्यानें हंसला व म्हणतो, " वा ! वा ! काय पण पंडितगिरी आहे ? हेंच आतां मुंबईस जाऊन शिकायचं वाटतं ! " हें असें बोलणें म्हणजे आगींत तेल नव्हे काय ? मग आमच्या अंगाची आग भडकली, तर त्यांत नवल काय झालें ?

गोष्टी निकरावर आल्याखेरीज केव्हां केव्हां गत्यंतर नसतें. मी जेव्हां फार संतापलें तेव्हां तो माझ्याकडे पाहून म्हणतो, " बरं तर मग. सांगूं आतां काय माझ्या मनांत आलं तें ? "

" हो. हो. सांग. " मीं आपला सारा राग विसरून मोठ्या उत्सुकतेनें त्याला म्हटलें, तेव्हां तो अगदीं माझ्या कानाशीं येऊन म्हणतो, " माईसाहेबांच्या आईसाहेबांचं कांहीं कुणाचं कर्ज फेडायचं राह्यलं असेल, तें त्या बाईच्यामार्फत काढलेलं असेल. ती आली मागायला तेव्हां तें माईसाहेबांनीं देण्याचं कबूल केलं असेल. आई काशीला जायला निघाली तेव्हां चोरून कर्ज फेडायचं, तें कोणाला कळवायचं नाहीं म्हणून तें असं लपवून छपवून केलं असेल. "

हें दादाचें बोलणें त्या वेळीं मला पुष्कळ संभवनीय वाटलें; तरी पण त्याच्या चेहऱ्याकडे पाहतां मला एक वेळ किंचित् असा संशय आला, कीं वास्तविक जें त्याला वाटलें होतें, तें कांहीं त्यानें आपल्याला सांगितलें नसावें. हा विचार त्या वेळीं उगीच एक क्षणभर आला, लागलीच गेला. त्याचें म्हणणेंच खरें वाटलें. परंतु रात्रीं स्वस्थपणें विचार करीत असतां जेव्हां त्या नवख्या बाईचें व माईसाहेबांचें सर्व संभाषण आपल्या आठवणींत आणलें तेव्हां मला स्पष्ट असें दिसलें, कीं दादानें तर्क म्हणून सांगितलें तें सर्वथैव खोटें असून बहुशः त्यानें जाणूनबुजूनच तसें सांगितलें, खरें काय असेल हें मला गूढच राहिलें.

◆ ◆ ◆

## ४५ : आजीचा उपदेश—
## मुंबईस जाण्याची तयारी

* * * * * * * * * * * * * * *

कोणतीहि गोष्ट थोडीशी नेहमींच्या बाहेर झाली म्हणजे तिच्या संबंधानें अतिशय विचार करीत बसण्याची मला किती संवय होती, हें आतां सगळ्यांना ठाऊक आहेच. परंतु त्यांत एक गोष्ट बरी होती कीं, त्या एकाच गोष्टीवर मी पुष्कळ वेळ विचार करीत बसे खरी, परंतु कोठवर ? एखादी दुसरी कांहीं गोष्ट घडून तिकडे चित्त वेधेपर्यंत. तिकडे एकदा चित्त वेधलें म्हणजे मग या पूर्वीच्या गोष्टीचें स्मरणदेखील राहात नसे. अशी स्थिति असल्यामुळें ते दिवशीं घडलेली ती गोष्ट साऱ्या दिवसभर माझ्या मनांत घोळत होती, तरी संध्याकाळीं मुंबईचें पत्र आल्याकारणानें अर्थातच त्याचा विसर पडला; आणि त्यांतहि विसर पडण्याचें विशेष कारण, त्या पत्रांत " बिऱ्हाडाची सोय छानदार झाली आहे. आणखी आठएक दिवसांनीं मी स्वतःच आपल्याला नेण्यासाठीं येईन " हा मजकूर होता. मग काय विचारतां ! माझें सारें तनमनधन त्या न पाहिलेल्या मुंबईकडे लागलें. तें न पाहिलेलें बिऱ्हाड माझ्या डोळ्यांसमोर दिसूं लागलें. आतां अगदीं खास आपण मुंबईस जाऊन स्वतंत्र रीतीनें राहणार असें वाटून सगळें ध्यान तेथें लागलें. ते दिवशीं रात्रीं आजीनें आपल्या जाण्याबद्दल गोष्ट काढली तेव्हां तर मीं तिला ' मी गेल्यानंतर मग तूं जा, मी आतां लवकरच जाईन " असें म्हणून आग्रह केला. एकदम मला मुंबईचें पत्र आलें आहे, त्यांत अमुक लिहिलें आहे, असें आपल्या तोंडानेंच कसें सांगूं ! परंतु मला पत्र आलेलें तिला ठाऊक होतेंच, तेव्हां ती मला म्हणते, "तुझं काय? तुझा नवरा नेईल, तुझी आजेसासू, मामेसासू, या धाडतील तेव्हां तूं जाणार. मला आज इतके दिवस झाले इथें येऊन, पण एक चिठोरं तरी पाठवलं आहे का ? मीं आधीं तशी टाकून आलें हा वेडेपणाच केला; पण म्हटलं, पोरं किती दिवसांत भेटलीं नव्हतीं. त्यांना भेटेन आणखी पोरीच्या लग्नाची कांहीं गोष्ट काढून पाहीन. पण इथें काय थंड कारभारच चालला आहे सारा. छे, छे ! हा म्हणजे दुसऱ्या बायकोमुळें इतका गरीब आणखी होईल, असं मला कांहीं कधीं वाटलं नाहीं, आतांशा अगदीं पाहतें तों आपलं..."

" असंच आहे तें " मीं मोठ्या पोक्तपणाच्या आढ्यतेनें म्हटलें, " आई होती तेव्हां बाबा म्हणजे जमदग्नीचा अवतार, पण आतां नुसते गोगलगाय ! बरं पण आजी, तूं मी जाईपर्यंत राहतेस ना ! मला कांहीं आतां फार दिवस नाहीं राहिले जायला, आठ दिवसांनीं आम्हांला न्यायला यायचं......"

" हो का ? आजच्या पत्रांत लिहिलं आहे वाटतं तुझ्या ? इश्श बाई ! या अली-कडल्या पोरांनीं अगदीं ताळच सोडला. बायकोला पत्र काय पाठवतात, आणखी वेडेवेडे

चार काय करतात. आम्हांला बाई हें असलं..." पण ती हें सारं निव्वळ कौतुकानें बोलत होती; तिकडून मला पत्रें इत्यादि येत हें पाहून तिला खरेंखरें समाधान वाटत होतें, अशी माझी पक्की खात्री होती; यामुळें मला तिच्या बोलण्याचें नुसतें हसूं येऊन मीं म्हटलें, "त्यांत ग काय झालं आजो! एकमेकांचा समाचार नको वाटतं कळायला?" त्यावर तीहि कौतुकानें हसत हसत म्हणते, "अहाहा! कांहीं आम्हांला कधीं कळत होता का समाचार? घरांतल्या माणसांना पत्रं आलीं म्हणजे नाहीं वाटतं समाचार कळत! चिन्हन् थेरंच एक एक!" यावर मी आपली नुसती हसलें. बोलायचें काय? थोड्या वेळानें तीच माझ्या पाठीवरून व तोंडावरून हात फिरवून म्हणते, "यमे, तुझं हें सुख पाहायला तेवढी जगती म्हणजे कितीतरी चांगलं झालं असतं! पण नाहीं तिच्या नशिबीं! ती मेली, ती मीच जर—" तिला मीं पुढें बोलूं दिलें नाहीं, पण काय असेल तें असो, आमच्या या अशा सुखाच्या गोष्टी पाहिल्या म्हणजे तिला आईची हटकून आठवण होई व "तिच्याऐवजीं मीच मेलें असतें तर फार चांगलं झालं असतं" असे उद्गार तिच्या तोंडून नेहमीं निघत. आतां सांगितलें अशा तऱ्हेनें तिनें मला कितीदा तरी उचारून दाखविलें म्हणता? परंतु मी तिला आपली तितक्यास तितकी गप्प करी.

वर सांगितल्याप्रमाणें पत्र आलें, त्यांतला मजकूर—अर्थातच मुद्द्याचा तेवढा मजकूर—मीं हलके हलके लाजत लाजत तिला सांगितला, तिला त्याचें मोठें कौतुक वाटलें व तिनें मला त्या रात्रीं, परक्या ठिकाणीं गेल्यावर कशा तऱ्हेनें वागावें, सासूशीं कसें वागावें, इत्यादि कितीक गोष्टींबद्दल तरी उपदेश केला. त्या सर्व तिच्या उपदेशाचें सार सरतेशेवटीं एका वाक्यांत होतें. सगळें काय तिचें सांगायचें तें सांगून ती मला अगदीं कंठ दाटून येऊन म्हणाली, "यमे, यमे, तूं आपल्या आईसारखी वाग म्हणजे..." पुढें तिच्यानें बोलवेनाच. ती आपली रडूं लागली. मला वाटतें, ती जो उपदेश म्हणून मला करीत होती, तो सारा माझ्या आईचें वर्तन आठवून त्यावरूनच करीत होती, आणि ते माझ्या आईचे गुण आठवीत आठवीत तिला शेवटीं अनिशय भरतें आलें; तेव्हां तीं एकदम "तूं आपल्या आईसारखी वाग म्हणजे..." असे शब्द बोलून रडायलाच लागली. आजीच्या मनांत आईविषयीं इतकी प्रेमबुद्धि असे असें आम्हांला कांहीं वर्षांपूर्वी कधीं वाटलें नाहीं; पण आतांशा तिला आईची आठवण झाल्यावांचून एक दिवसहि जात नसे हें पाहून तिच्या मनांत माझ्या आईची मूर्ति व तिच्या सगळ्या कृति किती भिनून गेल्या होत्या हें स्पष्ट दिसे. तिनें अशा तऱ्हेनें आठवण दिल्याकारणानें माझ्या मनावर तर केवढा परिणाम झाला! मी आपल्या आईचें वर्तन नित्य नित्य ध्यानांत आणून त्याप्रमाणें वागून सर्वांना संतुष्ट ठेवीन, असा निश्चय कितीदा तरी केला असेल, आणि आज मीं आपला अल्प चरित्रक्रम जर उजळणी करून पाहिला, तर मीं त्याप्रमाणें करण्याचा चांगला यत्न केला, असें वाटून संतोष होण्याजोगा आहे. आजी त्याप्रमाणें कंठ दाटून येऊन रडली, पण थोड्याच वेळानें मला म्हणते, "यमे, तिच्या शहाणपणाच्या गोष्टी मनांत आल्या की नाहीं, म्हणजे तिच्या शहाणपणाचं आश्चर्य वाटतं. अग, लहान-

पणापासून कधीं म्हणजे तिनं कोणत्या गोष्टीचा ह्व्यास, कीं कांहीं कीं कांहीं ! नांवदेखील नाहीं. लग्न झालं अन् आठ दिवसांनीं तिला न्यायची गांवीं म्हणून ठरवायचं तिकडे, अन् तिकडून एकदा ठरलं म्हणजे मग नुसतं ब्रह्मलिखितच ! तें कधीं टळायचं आहे ! जी तिला गांवीं नेली, ती सहा महिने ठेविली. आणखी पाठराखणीदेखील कोणी जरूर नाहीं म्हणून हट्ट ! शेवटीं पोरीला एकटीला नेली. सहा महिने धाडलं नाहीं, अन् तिच्या माहेरची शिक्षाच तशी बरं ! तुमच्या आजानं पंधरा दिवसांनीं पत्र पाठवावं, समाचार विचारावा, पण मुलीला पाठवा असं कांहीं कधीं लिहिलं नाहीं. शेवटीं आमच्या घरींच कांहीं वाटलं, अन् मी मग भारी पाठीस लागलें, तेव्हां एकदा तिला पाठवायचा बेत केला. तिसरे दिवशीं आपण होऊन पाठवून द्यायची, घरचा माणूस बरोबर देऊन, असं ठरलं. पण त्याच दिवशीं रात्रीं ताप आला, दुसरे दिवशीं तसाच आला. तरी बोलला बोल कधीं टळायचा नाहीं. म्हणायचे कीं 'मला जरी ताप आला तरी त्या पोरीला आतां पाठवायची'; मीं तिची सारी तयारी केली, पण ती आपली माझ्याजवळ आली, आणखी हलकेंच, तिकडचं सुनेनं नांव घ्यायचं तें, नांव घेऊन म्हणाली, 'ताप येतो आहे तर मी कांहीं जात नाहीं, मला आई काय म्हणेल, कीं त्यांना ताप येतो आहे आणखी तूं आलीस कां?' यमे, ते शब्द ऐकून मला फारच विलक्षण वाटलं. पहिल्याच खेपेला पाठराखणीवांचून आणलेलो पोरगी सहा महिने राहून पुनः 'जात नाहीं. तिकडे ताप येतो आहे तो बरा झाल्यावर जाईन,' म्हणून म्हणते. मी तें तिकडे सांगितलं जाऊन, तेव्हां आपल्यासमक्ष बोलावून नेऊन सांगायचं, कीं 'जा तूं. तुला सहा महिने झाले इथं येऊन. माझा ताप काय चार दिवसांनीं जाईल. उद्यां मुहूर्त चांगला आहे. तूं जा.' तरी तिनं 'मी आपली बरं झाल्यावरच जाईन' असं म्हटलं. पोरीची परीक्षा पुरतीच व्हायची होती. जे दिवशीं हें बोलणं झालं, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं तुझ्या आजाचं—तिच्या बापाचं—पत्र आलं; त्यांत 'घरांत प्रसूत होण्याचे दिवस आले आहेत. पोरीला जाऊन सहा महिने झाले आहेत. पाठविण्याचा विचार असल्यास माणूस पाठवितों, असं लिहिलेलं. तेव्हां तिला अगदीं जाच म्हणून आग्रह केला. पण तेवढ्या वयाच्या त्या पोरीनं 'नाहीं. आपल्याला बरं वाटलं, म्हणजे मग मला धाडायची' असं म्हटलं. त्याप्रमाणें शेवटीं पत्र लिहिलं. पुढें दोन महिने एकसारखा ताप येत होता. अंथरुणावरून उठण्याची शक्ति अंगांत नाहीं, अशी अवस्था झालेली. तर तिनं पोरीनं न कटाळतां चाकरी केली; तर रोज रोज त्या दुखण्यांत तिची स्तुति करायची बरं. एक दिवस तर असं म्हणायचं, कीं 'ही सून नव्हे, एक रत्न आपल्याला मिळालं आहे.' पुढें तिकडची प्रकृति अगदीं चांगली बरी झाली, तेव्हां मग ती माहेरीं गेली. पण काय, तेव्हांपासून सुनेनं म्हटलं अन् त्याला त्यांनीं नाहीं म्हटलं असं कधीं झालंच नाहीं. इतकी तापट प्रकृति, इतका जमदग्नीचा अवतार, पण तिला अगदीं कधीं बोलणं नाहीं. तिच्यावर जीव की प्राण ! ज्यांत त्यांत आधीं ती. इथून गेल्यापासून हजारदा म्हटलं असेल, कीं आमच्या घराची शोभा गेली. अन् या मूर्खानं हयगय करून तिला मारलीन्..." अशा तऱ्हेनें तिनें एक

पन्नास गोष्टी मला माझ्या आईच्या चांगुलपणाबद्दल सांगितल्या असतील ! " तिनं कधीं कुणाला दुःख दिलं नाहीं; कधीं कुणाला ती उलटून बोलली नाहीं; कधीं काम करायला मागं घेतलं नाहीं; कधीं कुणाचा कंटाळा केला नाहीं. " असें किती तऱ्हेनें मला सांगितलें आणि तितक्यागणिक तिच्या डोळयांत पाणी आल्याखेरीज राहिलें नाहीं. माझ्या मनाला त्या वेळीं त्या तिच्या बोलण्याचें काय बरें वाटलें असेल ! आश्चर्यांत आश्चर्य हें, कीं तिनें स्वतः प्रथमतः कांहीं दिवस आईला जाच केला होता, त्याबद्दल तिला वाईट वाटून विशेष रडूं येत असे. ती तसें स्पष्ट बोलून दाखवीत नसे एवढेंच.

दुसरे दिवशीं मला सासरचें बोलावणें येऊन मी तिकडे गेलें. मला ज्या मजकुराचें पत्र आलें होतें, त्या मजकुराचें तिकडे आलेंच होतें. त्यांत अर्थातच ' बिऱ्हाड करावयाचें असल्यास जागा आणखी सोबत फार चांगली आहे. बिऱ्हाड केल्यानें जेवण्याची व्यवस्था बरी राहील. कॉलेजांतलीं जेवणें जेवून जेवून मला कंटाळा आला आहे, ' असें नाना तऱ्हांनीं लिहून आपली बिऱ्हाड करण्याची इच्छा दाखविली होती. तें पत्र वाचल्यावेळेपासून घरांत बिऱ्हाड एव्हां करून द्यावें कीं नाहीं, याबद्दल वाटाघाटी चालल्याच होत्या. धाकटे मामंजी म्हणत होते, कीं " कॉलेजांतल्या जेवणाचा कंटाळा आलाच असेल. बिऱ्हाड केलं तर फारच चांगलं. घरच्या माणसांकडून जशी व्यवस्था होईल, तशी कॉलेजांत तरी कशी राहते ? " पण शंकरमामंजी अगदीं त्यांच्या उलट. त्यांचें एकसारखें हें चाललें होतें, " कांहीं नाहीं. त्याला पुढें अजून अभ्यास करावयाचा आहे. या बिऱ्हाडाबिऱ्हाडाच्या नादीं लागून उगीच वेळ जाईल, त्रास होईल. तें कांहीं उपयोगी नाहीं. अन् मुंबईस बिऱ्हाड म्हटलं, म्हणजे खर्च कांहीं थोडका लागणार आहे ? तें कांहीं नाहीं, त्यानें आपल्याला खर्चाला लागतील काय दहाबारा रुपये ते ठेवून घ्यावे अन् बाकी काय असतील ते द्यावे इकडे लावून. इतक्या लहान वयांत पैसे त्याजजवळ राहूंच देऊं नयेत. तिथें काय ? मुंबई ती, चटोरपणा कोण, अन् हा......" मी नाहीं आतां त्यांचं सारं बोलणं लिहीत बसत. आतां सांगितलं आहे, अशाच तऱ्हेची चर्पटपंजरी एकसारखी चालली होती. मला तर त्यांचा असा राग आला, कीं कांहीं सुमार नाहीं. पण करायचं काय ? त्यांची अशी टकळी चालली होती. यांत विशेष गोष्ट ही कीं, आजेसासूबाईंचा कल त्यांच्याच बाजूला पडण्याचा रंग दिसूं लागला. अन् मग मात्र मला भारी धाक पडला. उरल्यासुरल्या धाकट्या मामेसासूबाई आणखी बनूवन्सं त्यांतच भर घालूं लागल्या. अन् सासूबाई मुळींच कांहीं बोलेनात. पण शेवटीं धाकटे मामंजी रात्रीं जेवतांना सासूबाईंनाच म्हणाले, " वारूताई, तूं आपली जायचं असलं तर जा. आईच्या बोलण्यांत कांहीं हें नाहीं. तूं जवळ असलीस म्हणजे तें बरं. त्याला त्या जेवणाचा खरोखरीच कंटाळा आला असेल. अन् आतां तो मोठा झाला, त्याचा त्याला संसार करायला लागूं दे एकदा ! किती दिवस..."

" त्याचं काय आलं आहेरे ! " सासूबाई एकदम म्हणाल्या, संसाराचं काय ? पण या जेवण्याखाण्याबद्दल तो जातांनाच म्हणत होता. अन् आतां आम्ही तरी किती

दिवस तुमच्या..." पुढें त्यांच्यानें बोलवलं नाहीं. परंतु तेवढ्यांतच त्यांच्या बोलण्याचा आशय समजून धाकटया मामंजींनीं आम्हांला पाठविण्याचा हट्ट धरला. शंकरमामंजींनीं मात्र टवाळी, थट्टा करण्यास सुरुवात केली. "आतां तिला इथें राहणं कसल आवडतं आहे ? आतां तिच्या मुलाला पगार झाला, आतां कधीं जाईनसं झालं आहेना ताई ! बरं मग आम्ही येऊं का चार दिवस राहायला तुमच्या इथें ? पाहूं बरं कसा काय संसार थाटतो आहे तो ? तो मुलगा, ती सुनन् आपणन्..." आमच्या सासूबाई बिचाऱ्या भोळ्या, त्यांना त्यांचें तें टवाळीचें बोलणें मुळींच समजलें नाहीं. त्या आपल्या भोळ्या भावानें म्हणाल्या, "तूं कसचा येतोस ? पण उमावहिनींना धाडीत असलास तर पाहा." हे त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडल्यावर मग काय विचारतां ? भुताच्या हातांत कोलीतच झालें. त्यांनीं आपली एकसारखी थट्टा आरंभली. "हं ! हं ! एकूण बिऱ्हाड करायचं झालंच कायम म्हणायचं ! करूं का त्याला तार ताबडतोब आईला व बायकोला न्यायला ये म्हणून ? तुमच्या टुमटुमीत संसारांत उगीच आणखी दुसरींतिसरीं माणसं कशाला पाहिजेत ? आतां एकदा होऊं द्या स्वतंत्रपणा..." तें काय ? एकना दोन ? एखादी मूर्ख, कुरठी, मत्सरी अशी स्त्रीजात ज्या तऱ्हेनें बोलते, त्या तऱ्हेनें त्यांची टकळी चालली होती. बाहेरून ते थट्टेचा आविर्भाव दाखवीत होते, पण माझी अगदीं पक्की खात्री आहे, कीं मनांतून त्यांना फार वाईट वाटत असावें, त्यांना मोठा मत्सर वाटत असावा. वास्तविक आजेसासूबाईंची मला भीति होती; पण त्यांनीं तेव्हांच आपलें म्हणणें सोडून दिलें. लेकीचा मुलगा मोठा होऊन चांगले पैसे मिळवूं लागला, इतके दिवस आपण केल्यासंवरल्याचें चांगलें चीज झालें असें वाटून त्यांना समाधान वाटलें व प्रथम घाई करूं नये म्हणून त्या म्हणत होत्या; तरी पुढें त्यांचें मन बदललें. त्या किती जरी निष्ठुर झाल्या, किती जरी बोलल्या, तरी आपल्या लेकीचा संसार चांगला रंगारूपाला आला असें पाहून त्यांना आनंद व्हावा; इतकेंच नव्हे, तर तिचा संसार थाटून देऊन आपण पाहावा आणि कृतार्थ व्हावें, असेंहि त्यांस वाटलें असावें. प्रथम उगीच शंकर-मामंजींच्या बोलण्यानें त्यांना घाई करूं नयेसें वाटलें, पण गोपाळमामंजींनीं त्यांना जेव्हां थोडेंसें समजावून सांगितलें, तेव्हां तें पारडे फिरून आमचें मुंबईस जाण्याचें ठरलें व आमच्या जाण्याच्या तयारीला मंडळी लागली. तयारी म्हणजे भांडयांकुंडयापासून. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी, तशी आमच्या संसाराला भांडयापासून सुरुवात. सासूबाई यांच्या घरीं आल्या तेव्हां त्यांनीं आपलीं संसाराचीं भांडींकुंडीं कांहीं गोळा करून आणलीं होतीं, परंतु तीं आतां घरांत किती वर्षें वापरण्याला लागलीं तीं कशीं न्यायचीं ?

वर सांगितल्याप्रमाणें तयारीला लागून पिशव्या वगैरे शिवण्यांत आणि सटरफटर सामान तयार करून ठेवण्यांत दोनचार दिवस केव्हांच निघून गेले. जसजसे दिवस निघून गेले तसतशी माझी भेटण्याबद्दल उत्कंठा फार वाढत चालली, आणि आठदहा दिवसांनीं मी तुम्हांला नेण्यासाठीं येतों असें लिहिलें होतें, यामुळें आतां तो दिवस कधीं येतो आणि एकदा गांठ पडून सगळ्या हकीकती विचारून मी केव्हां एकदा सुखी होतें

असें मला होऊन गेलें होतें. ती मूर्ति ध्यानींमनीं खेळूं लागली, मुंबईला जाण्याचे विचार घोळूं लागले आणि दुसरें कांहींच सुचेनासें झालें. मामंजींनीं येण्याविषयीं पत्र पाठविलें होतें यामुळें तर अगदीं येणें होईलच अशी खात्री झाली होती. शेवटीं एकदाचा तो दिवस उगवला. सकाळीं ७–७॥ वाजतात तों दाराशीं एक टांगा येऊन उभा राहिला; आणि स्वारी घरांत शिरली. मी सर्व कांहीं पाहात होतें, परंतु मजकडे मुळींच लक्ष गेलें नाहीं. त्यामुळें मला किती हिरमुसल्यासारखें झालें पण! आतां गांठ पडल्याबरोबर आपल्याकडे पाहिलें नाहीं याबद्दल खोटेनाटें रुसायचें असा निश्चय केला; परंतु कसला बेटा तो निश्चय? ब्याग ठेवून घरांत आजेसासूबाईंना नमस्कार करण्यासाठीं येतांना, 'मुद्दाम सहज' वाटेवर कांहीं कामांत गुंतलें असतां ते माझे लबाड हट्टी डोळे नको नको म्हणत असतां तिकडे पाहूं लागले; इतकेंच नव्हे, तर त्या डोळ्यांना भेटले आणि तिकडून गालांतल्या गालांत हसणें झाल्याबरोबर त्या बिचाऱ्या निर्बल निश्चयाचें कांहीं न चालतां मलाहि खुदकन् हसूं आलें.

◆ ◆ ◆

## ४६ : मुंबईला चाललों

* * * * * * * * * * * * * * *

तिसरे दिवशीं रात्रौ ९।–९॥ वाजतां एका घरांत माणसांची मोठी गर्दी उडून गेली होती. तीन माणसें गांवाला जाणार होतीं. एक तरुण गृहस्थ, एक तरुण स्त्री व एक पोक्त वयाची स्त्री. बांधाबांधी करण्याची गर्दी. 'हें घेतलं का? तें घेतलं का?' अशा प्रश्नांची रगाडी; इकडून तिकडे, तिकडून इकडे धावण्याची घाई; त्यांतल्या त्यांत घरांतील वडील माणसांचा व मायेच्या धाकट्या माणसांचाहि 'मुंबईस गेलां म्हणजे असं करा तसं करा'; इ यादिसंबंधानें उपदेश करण्याचा सपाटा चालला होता.त्या तरुण गृहस्थाला व विशेषतः त्या तरुण स्त्रीला जो कांहीं आनंद झाला आहेसें दिसत होतें, तो कांहीं विचारूंच नका. तिची तर कोण गर्दी! तिच्या माहेरचीं दोन माणसें आलेलीं होतीं त्यांनीं तिला 'असें वाग, अमुक कर,' असें मधून मधून सांगणें चालविलेंच होतें. माहेराहून दोन माणसें आलेलीं होतीं, त्यांच्याबरोबर एक मुलगी आलेली होती तिला त्या तरुण स्त्रीनें जवळ घेऊन म्हटलें, "सुंदरे, आजीला त्रास देत जाऊं नको. सांगितलेलं ऐकत जा. आणखी हा तुला खाऊ घे. मग मी तुला मुंबईहून बाहुल्या पाठवीन अं? ती फाटकांच्या मुलीची पाहिलीस कीं नाहीं, तशी केसाची बाहुली!" असें म्हणून तिनें तिच्या हातीं एक रुपया ठेविला. हा रुपया त्या तरुण स्त्रीच्या हातीं कुठला बरें असावा? आपल्या तरुण स्त्रीच्या हातीं रुपया येणें म्हणजे एक अजब गोष्टच! असो.

होतां होतां दहा सव्वादहा वाजले. गाडी आणावयास गेलेला माणूस गाडी घेऊ

आला. निघण्याची धांदल उडाली. त्या तरुण स्त्रीची ओटी भरली. देवाला सर्वांनीं नमस्कार केला. बायकांच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रु येत होते. एक वृद्ध बाई सर्वांस " नीट जप. रात्रीं जपून झोंपाबिपा घ्या, गाडींत गर्दी असेल, संभाळून जा " असें सांगत होती. दुसऱ्या दोघी, " वन्सं, जपून जा; सीता, सासूची चांगली काळजी घे. १५।१६ वर्षांत त्या आज जाताहेत बाहेर " असें म्हणत होत्या. गांवीं जाणाऱ्या माणसांपैकीं पोक्त बाई गाडींत बसली. तरुण स्त्री गाडींत बसली व तो तरुण गृहस्थ व आणखी एक तरुण गाडींत बसले. गाडी निघतांना त्या पोक्त बाईच्या तोंडून " आई येतें ग " व त्या तरुण स्त्रीच्या तोंडून " आजी जातें ग, सुंदरे...... " असे शब्द निघताहेत तों गाडीवानानें गाडी हांकली. स्टेशनावर गेल्याबरोबर तिकिटें वगैरे काढून ओझ्यापाझ्याची व्यवस्था लावून सर्व मंडळी गाडीजवळ गेली. परंतु गाडींत चांगली कोपऱ्याची जागा पाहून तीनच माणसें बसलीं. एक तरुण गृहस्थ व त्या दोन स्त्रिया. दुसरा तरुण गृहस्थ बाहेरच धक्क्यावर उभा राहून बोलत होता. बरोबरच्या त्या पोक्त बाईस लाजून कीं काय, ती तरुण स्त्री त्या बाहेर उभ्या राहून बोलणाऱ्या तरुणाशीं फार हलकें बोलत होती.

" झालं एकदाचं आतां ! चाललांत मुंबईला ! किती दिवस चाललं होतं अजून पत्र येईना. अजून जागा मिळेना. कारभारच आळसाचा. "

" हो. हें रे काय ? असं कधीं एकदा तरी माझ्या तोंडांतून निघालं कारे ? तुला आपली थट्टा करायची संवयच. मी असं म्हणेन तरी का ? "

" मुळींच नाहीं बरं का, गणपतराव " गाडींत बसलेला गृहस्थ बाहेरच्यास फार हलकें म्हणतो, " परवां मी आल्यापासून बरीक माझ्या पाठीमागें एकसारखी भुणभुण लावली आहे आणि एकसारखं चाललं होतं कीं... "

गणपतराव :—घ्या, आतां मी म्हणतों त्याला आणखी काय पाहिजे पुरावा ?

" अरे हळू. सासूबाई ऐकतील तिकडे. तुला आपलं हेंच नाहीं कांहीं. कुठं थट्टा करावी ! कुठं नाहीं. सारा... "

इतक्यांत घंटा वाजली, आणि गाडी निघण्याची वेळ झाली. गाडी सुरू झाली. शेवटीं " येतों अं ? पत्र पाठवीत जा. " " तूं पाठवीत जा नेमानं. आणखी टांगा करून जा. पायीं जाऊं नकोस. " असें दोघांच्या तोंडून शब्द निघाले. शेवटले शब्द त्या तरुण स्त्रीच्या तोंडचे होते; परंतु ते इतके कंठ दाटून उच्चारलेले होते, कीं कांहीं पुसूं नये. तिच्या डोळ्यांतून घळकन् पाणी आलें व धक्क्यावरून गाडी दूर जाईपर्यंत ती त्या तेथें उभ्या राहिलेल्या गृहस्थाकडे पाहात होती. शेवटीं खालीं बसून तिनें आपले डोळे पुसले. तो तरुण गृहस्थ हलकेंच खिडकींतून बाहेर पाहण्याच्या निमित्तानें जवळ येऊन म्हणतो, " कां ? डोळे कां पुसायला लागलां ? इतका वेळ... " परंतु त्या तरुण स्त्रीनें डोळ्याची खूण करून त्यास दाबलें. " त्या ऐकतील ! " अशा अर्थाची ती खूण होती हें उघडच आहे.

वाचकहो, ही स्त्री कोण हें आतां मीं सांगितलेंच पाहिजे काय ? ती स्त्री मी यमुना, ती पोक्त स्त्री माझी सासू, आणखी...

इतके दिवसांची आमची आशा आतां सफल झाली. आम्ही आतां स्वतंत्रपणाच्या सुखानुभवासाठी मुंबईस चाललों. आदितवारीं आल्यापासून आमची गांठ पडली, कीं या गोष्टी; दुसरें तिसरें कांहीं नाहीं. बिऱ्हाडाची जागा कुठें घेतली आहे, चाळींत घेतली आहे कीं काय ? असे अनेक प्रश्न मीं विचारले. चाळी म्हटल्या म्हणजे त्या चांगल्या नाहींत; त्यांत भाराभर दोनदोनशें बिऱ्हाडें असतात, चटोरपणा फार चालतो, वगैरे गोष्टी मीं ऐकल्या होत्या अशाच कोणाकोणाच्या तोंडून; तेव्हां चाळीची वस्ती बरी नव्हे; निदान माझी चाळीविषयीं जी कल्पना होती, ती तरी कांहीं चांगली नव्हती. यामुळें मीं चाळींत घेतली आहे कीं काय जागा ? असें विचारलें आणि नाहीं असें उत्तर आलें. त्याबरोबर मला कितीतरी आनंद झाला ! काय चमत्कार आहे पाहा ! वास्तविक पाहिलें, तर चाळ कशी असते ती मीं पाहिली नव्हती. तिची खरी कल्पना मला मुळींच नव्हती. काय जी माहिती असेल, ती मला तिकडच्याच बोलण्या-सांगण्यावरून; पण तेवढयानेंच माझा आपला त्या चाळीविषयीं फार वाईट ग्रह झाला होता; आणि पुढें प्रत्यक्ष अनुभवानें तो दुरुस्त झाला नाहीं, किंबहुना अधिक वाईट झाला कीं काय न कळे ! असो.

पण आमच्यासाठीं जें बिऱ्हाड पाहिलें होतें तें चाळीत नव्हतें. गिरगांवांत एका वाडींत दोन बंगले होते, त्यांत एका बंगल्यांतल्या एका मजल्यावर होतें. हा बंगला तिमजली होता. त्यांत बाकी राहिलेल्या दोन मजल्यांवर निरनिराळीं बिऱ्हाडें आहेत, त्यांचा आपला संबंध नाहीं. तिसऱ्या मजल्यावर बिऱ्हाड आहे तें ब्राह्मणाचेंच आहे. दुसऱ्या मजल्यावर आपलें, आणखी तळमजल्यावर आणखी एक हुबेहूब आपल्यासारखेंच कुटुंब आहे. अशी सोबत आपल्याला कधीं मिळायची नाहीं. दोन रुपये भाडें जास्त, पण मीं तें त्या सोबतीसाठीं कबूल केलें. वरच्या मजल्यावरची मंडळी फक्त नवराबायकोच आहेत. तळमजल्यावर जीं आहेत तीं एक नवरा, एक बायको आणखी एक आई अशींच आपल्यासारखीं आहेत. माझी व त्या गृहस्थाची ओळख पहिल्यानें थोडी तुरळक होती. मुंबईस गेल्यावर आतां विशेषच झाली. तो आमच्या कॉलेजांत होता. त्याला आतां चाकरी आहे. त्याची आणखी माझी स्थिति किती एकसारखी आहे पण ! मला राहून राहून आश्चर्य वाटतें, कीं असें आपलेंन् याचें जुळून यावें हा ईश्वरी संकेतच असला पाहिजे. अशा कितीक तरी मला त्या बिऱ्हाडासंबंधानें गोष्टी सांगितल्या. आणि तें सगळें ऐकून मला अतिशय आनंद झाला. दोन रात्रीं साऱ्या गोष्टी ह्या. मुंबईस गेल्यानंतर शेजाऱ्यांची जी मला माहिती व्हायची ती आजच आधीं झाली. आणि त्यांत त्या दोनहि. बिऱ्हाडांतल्या गृहस्थांच्या बायकांची जी स्तुति केली, तो कांहीं विचारूं नका. त्या स्तुतीप्रमाणें त्या जर खरोखर असतील, तर आपण म्हणजे त्यांच्यापुढें अगदीं कुचकामाच्या. आपण त्यांच्याशीं काय बोलावें ? काय करावें ? असें मला वाटून माझें मन एकदोनदा फार

उद्विग्न झालें. परंतु मला खिजविण्याकरितां कांहींतरी मुद्दाम अतिशयोक्ति करून बोलायचें, असें वाटून मीं त्यांतच समाधान मानून घेतलें.

जाण्याच्या दिवशीं मी आजेसासूबाईंना विचारून माहेरीं गेलें. तेथें आजीचें व माझें काय बोलणें झालें, बाबांनीं मला काय सांगितलें, दादानें कशी थट्टा केली, वहिनीला काय पाठवीन म्हणून मीं म्हटलें, इत्यादि गोष्टी कशाला सांगत बसूं ? त्या कोणासहि कल्पनेनें जाणतां येतील. आजीनें मला नानातऱ्हांनीं उपदेश केला. कोणाची मर्जी कशी सांभाळावी; कोणी कांहीं बोललें तरी त्याला उलट उत्तर करूं नये; गव्यामाणसाशीं अगदीं उत्तम तऱ्हेनें वागावें, इ. इ. अनेक रीतींचा उपदेश तिनें मला केला. आणखी त्याला दाखले दिले ते सारे माझ्या आईच्या चरित्रांतले. ती असें करी, तिचें असें होतें; तिनें अमुक प्रसंगीं अमुक केलें, त्याच्यामुळें पुढें असें झालें, असें एकसारखें तिचें चाललें होतें, आणि तितक्यागणिक तिच्या डोळ्यांतून अश्रूहि येत होते. दादाचा साराच प्रकार थट्टेचा; परंतु त्यांतल्या त्यांत त्याचें मन मी जाणार म्हणून किती उद्विग्न झालें असावें हें सहज दिसत होतें. तो वरून वरून थट्टा करी, परंतु आंतून खरोखर त्याला वाईट वाटलें होतें. माईसाहेबहि ते दिवशीं फारशा कुऱ्यांत नव्हत्या. माझ्याशीं नीट बोलल्या. वहिनीबाई कांहीं बोलल्या, कांहीं नाहीं. बोलतां बोलतां तिचें एक वाक्य माझ्या किती पण ध्यानांत राहिलें आहे ! " वन्सं, तुम्ही आतां आपल्या स्वतंत्र झालांत ना ! आम्ही अशाच..." पुढें ती कांहींच बोलली नाहीं. तरी पण तिचा आशय काय, तो तेव्हांच समजला. दुपारीं जेवणखाण झाल्यावर मी दुर्गीकडे गेलें हें सांगायला नकोच. दुर्गी आज बाळंत होईल, उद्यां होईल असें त्यांच्या घरांत चाललें होतें. पण तसें कांहींच होईना. तिचा नववा महिना सरून तिला दहाव्याचेहि कांहीं दिवस लोटले. हें आहे तरी काय ? ही एकदा आपल्या हातींपायीं सुटते कशी असें साऱ्यांना झालें होतें. मी गेलें ती दोन घटका तिच्याजवळ जाऊन बसलें होतें. तिच्या तोंडावर जी कळा आली होती ती फारच विलक्षण दिसे. तोंडावर फुगवटी दिसत असे आणखी हातापायांचीहि तीच स्थिति होती. बसल्या जागचें उठण्याला कांहीं अंगांत बळ नाहीं. सारा वेळ अंग मोडल्यासारखें होतें. ही आज तिची किती दिवस कुरकुर चालली होती, पण कोणी मनावर घेत नसे. होत असेल, गरोदरपणीं बायकांना असेंच होतें. अशावारीच झाल्या गोष्टी गेल्या. मीं तेथें गेल्यावर तिनें माझ्याजवळ पुनः आपल्या साऱ्या गोष्टी सांगितल्याच. शेवटीं पुष्कळ वेळ बोललो तरी कधीं आमच्या गोष्टी संपायच्या नाहींत असें म्हणून मी जायला उठलें, तेव्हां डोळ्यांत अश्रु आणून दुर्गीनें मला घट्ट मिठी मारली आणि स्फुंदत स्फुंदत मला म्हणते, " यमे, आतां कुठली तुझी गांठ पडायला ! हीच शेवटली ना ? बरं ! " ते तिचे केविलवाणे शब्द ऐकून माझें काळीज चरं झालें. माझ्यानें कांहीं बोलवेना. अशा वेळीं बोलणार काय ? मी आपली क्षणमात्र स्तब्ध बसलें. परंतु पुढें लागलीच तिला म्हटलें, "दुर्गे, भरल्यासरल्या घरांत गर्भारशी बायको तूं, असले शब्द नेहमीं नेहमीं उच्चारून आपल्याला आणखी साऱ्या

घरांतल्या माणसांना कां उगीच दुःख देतेस ? उगी. उद्यां बाळंतीण उठलीस......" पण माझ्यानें पुढें बोलवेचना. माझ्या डोळ्यांतून घळघळां पाणी येऊं लागलें. शेवटीं आतां अगदीं बसण्याला वेळ नाहीं असें जाणून कसेंतरी करून उठलेंच, दुर्गीच्या आईला·आणखी आजीला विचारलें. त्यांनीं खणानारळानें ओटी भरली, ती घेतली आणि पुनः माहेरीं आलें. दादा आला कीं त्याला विचारून मला परत जायचें होतें. इतक्यांत दादाहि आला. मी आतां जायला निघालेंच, तेव्हां बरीक दादानें थट्टा न करतां मनोभावानें मला म्हटलें, " यमे, जाणार ना आतां तूं ! आतां मला चार-आठ दिवसांनींदेखील घटकाभर सुखाच्या गोष्टी सांगायला घरांत कोणी नाहीं ! बरं, पण पत्र पाठवीत जाशील ना ? दर आठ दिवसांनीं एक पत्र लिहीत जा. तुला वेडंवांकडं पण लिहितां येतं आहे. शिवाय ज्या ठिकाणीं तुम्ही राहणार तिथल्या बायका साऱ्या विद्वान् आहेत बरं ? त्यांच्यापासून फायदा करून घे. एकीला तर इंग्रजी चांगलं येतं आहे. पाहा, मला सगळी त्यांनीं हकीकत सांगितली आहे..." मीं आपलें हो हो म्हटलें, पण माझें मन सगळें त्या दुर्गीच्या स्थितीनें व्यग्र झालें होतें. तेव्हां मीं दादाला म्हटलें, "दादा, मी पत्र पाठवीन. पण तूं मला साऱ्या हकीकतीचें पत्र पाठवीत जाशील ना ? तुझ्या पत्रांवरूनच काय ती आतां मला हकीकत कळायची. अन् दादा, कसंय करून पत्र ल्याह्यच्या पूर्वी त्या दुर्गीच्याकडे जाऊन तिची हकीकत मला कळीव. तिची स्थिति अतिशय वाईट आहे बरं. ती बाळंतीण झाली, कीं मला ताबडतोब पत्र घाल. मला तिच भारी भय वाटतं. तिचं कांहीं ठीक नाहीं. तूं कसंहि कर पण तिच्याकडे जाऊन सारी हकीकत मला कळवीत जा." दादाच्या मनांतहि दुर्गीच्यासंबंधाने कांहीं एक प्रकारचें प्रेम होतेंच. त्यानें तत्काळ, "यमे, हें तूं सांगायला का पाहिजे ? अग, मी आठां दिवसांतून एकदा सोडून दोनदा जाऊन तिचा समाचार कळवीन." तें दादाचें आश्वासन ऐकून मला मोठा संतोष झाला. नंतर अशाच इकडच्या तिकडच्या गोष्टी होऊन आतां अगदी तिन्हीसांजा झाल्या, बसण्याची सोय नाहीं, लवकर यायला सांगितलं त्याला आपण इतका वेळ केला, आतां सडकून बोलतील असें जाणून मी दादालाच बरोबर घेऊन सासरीं आलें. वाटेनें आमच्या गोष्टी तसल्याच चाळल्या होत्या हें सांगण्यास नकोच. वाटेंतच त्यानें मला मी तुला स्टेशनवर पोंचवायला येईन म्हणून सांगितलें होतें. इतकेंच नव्हे, तर आजीला—अर्थात् तिच्याबरोबर सुंदरी आलीच—देखील घेऊन तो रात्रीं आला. पुढील हकीकत वर सांगितलीच आहे.

◆ ◆ ◆

## ४७ : आली एकदाची मुंबई !

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

दुसरे दिवशीं सकाळीं सात वाजतां गाडी मुंबईस जाऊन पोहोंचली आणि तें प्रचंड स्टेशन पाहिल्याबरोबर माझी छातीच दडपली. आधीं दहा पंधरा स्टेशनांपासून ती अगदीं निराळ्या तऱ्हेचीं घरें, कांहीं स्टेशनांवरून दिसणारीं गिरण्यांचीं घरें, त्या आकाशाला लागलेल्या चिमण्या, हें पाहून मी गोंधळून गेलेंच होतें; पण त्यांत आणखी हें जेव्हां प्रचंड स्टेशन पाहिलें तेव्हां काय वाटलें आणि काय नाहीं याची कल्पना अनुभव असेल त्यालाच होईल. इतरांना कसली होते ! मुंबईबद्दल माझी कल्पना इतकीच होती कीं, पुण्यापेक्षां फार मोठें शहर. पुण्यास मोठे म्हणजे तीन मजली वाडे, तर मुंबईस तसेच सात मजली. पण इथें पाहिलें तर विलक्षणच. त्या गाडया काय ! आणखी ती ट्रामवे काय ! छे. छे. सारेंच कांहीं विलक्षण ? त्यांत कांहीं पुण्यातल्या गोष्टींचें साम्यच नाहीं. आमचें पुणें आम्ही मोठें शहर समजत होतों, पण पुणें ज्याच्या पासंगाला लागणार नाहीं असें हें प्रचंड शहर—शहर कसचें, हा लहानसा देशच—पाहून मन थक्क व्हावें, गोंधळून जावें यांत कांहीं नवल नाहीं. पुण्यांतल्या आणि इथल्या एका गोष्टींतदेखील साम्य नाहीं. असो. वर सांगितल्याप्रमाणें अगदीं गोंधळून जाऊन मी आपली कांहींएक न बोलतां त्या बोरीबंदरच्या स्टेशनावर उतरलें व वेडयासारखी इकडे तिकडे पाहूं लागलें. माझ्याहीपेक्षां सासूबाईंची स्थिति फारच चमत्कारिक झाली असावी. गाडींतबिडींत बसलों. इतक्यांत त्या तिकडे म्हणतात :—
" काय रे बाबा, ही गर्दीन् गाडयान् घोडीन् हें आहे तरी काय ? कुठं आम्हांला आणून टाकलंस ! हे लोक का काय आहे तरी काय ? " तें ऐकल्याबरोबर जें तिकडे हसूं आलें तें कांहीं विचारूंच नये, आणखी मलादेखील हसूं आवरेना. मी आपली एकीकडे तोंड करून हसत होतें.

तो सर्व चमत्कार पाहात पाहात, आम्ही सर्व एकदाचे गिरगांवांत जाऊन आमच्या जागीं पोंचलों. गाडी अगदीं वाडीच्या आंत नेली. तेथें पुढचा बंगला टाकून मागल्या बाजूला बंगल्यांत आमची जागा होती. आम्ही तेथं जातों व गाडींतून उतरतों तों दोघी तरुण, माझ्याहून किंचित् अधिक वयाच्या, रूपानें चांगल्या आणि पाहिल्याबरोबर अंतःकरण जसें असेलसें वाटतें तें जर खरे धरलें, तर अतिशय सुशील व सुस्वभावाच्या अशा स्त्रिया पुढें आल्या व एकदम " या काकू, या सीताबाई, तुमची आम्ही वाटच पाहात होतों, " असें म्हणून जशी कांहीं त्यांची व माझी कितीतरी दिवसांची ओळख अशा रीतीनें बोलूं लागल्या. एकीनें आपल्या गडयास सांगून आमचें सामान वर नेवविलें. तिकडच्या देखत त्या दोघी इतक्या मनमोकळेपणीं बोलूं लागल्या, हसल्या हें पाहून माझ्या मनास किंचित् चमत्कारिक वाटलें, परंतु तें क्षणार्धापुरतेंच होतें. आम्ही वर जातों तों एक पोक्त विधवा स्त्रीहि वर येऊन सासूबाईंशीं बोलूं लागली. इतक्यांत तिकडून त्या पोक्त बाईला

उद्देशून म्हणायचें, "गोपकाकाकू, आम्ही आतां तुमच्या शेजारास आलों आहोंत. यांना कांहीं ठाऊक नाहीं बरं का? तुमचे नाना तसाच मी. तेव्हां... "

ती सुशीलाबाई लागलीच म्हणाली, "तुम्ही अगदीं काळजी करूं नका बरं का? मीन् त्या कांहीं आतां परकी नाहींत.. ..." हें आम्ही बोलतों आहोंत तों दोन तरुण गृहस्थ तिकडच्यापेक्षां किंचित् जास्त वयाचे तेथें आले आणखी "कां रघुनाथराव, आलांत एकदा सहकुटुंब सहपरिवार?" असें म्हणाले. ते येण्याबरोबर मी आपली पटकन् पलीकडच्या खोलींत गेलें, आणखी सासूबाई तशाच निघाल्या, पण तितक्यांत त्या गोपकाबाई सासूबाईंस म्हणाल्या—"तुम्ही नको कांहीं जायला हो; जशी मी तशाच तुम्ही त्यांना." आणि त्या दोघांपैकीं किंचित् मोठा गृहस्थ होता तोहि, "काकू, तुमचे रघुनाथराव तसेच आम्ही. आम्ही आलों म्हणून तुम्ही उठून कां आंत जावें?" असें म्हणाला. मी आंत जाण्याबरोबर त्या दोघी तरुण स्त्रियाहि माझ्याबरोबर आंत आल्या. त्यांनीं दोघींनीं माझा हात धरून मला आमच्या साऱ्या जागेंत नेऊन दाखविलें. पाहतें तों जिकडे तिकडे अगदीं लख्ख तयारी; लाकडें आणून ठेवलेलीं, पाणी भरून ठेवलेलें, धान्य आणून ठेवलेलें; अमुक म्हणजे नाहीं असें कांहीं नाहीं. जसें कांहीं आम्ही आज कितीक दिवस तिथें संसार करीतच होतो, आणखी मध्यें मात्र चार दिवस कुलूप लावून गांवांला गेलों होतों, तशापैकीं झालें. अगदीं सगळी व्यवस्था टापटिपीनें केलेली. कसली म्हणून अडचण आम्हांला येईल असें ठेवलेलेंच नव्हतें. इतका दक्षपणा कोणाचा असावा बरें? आम्हांला आणायला यायच्यापूर्वीच सारी तजवीज करून ठेवली असेल म्हणावें, तर तें अगदीं असंभाव्य; कारण, एक तर तिकडे इतक्या गोष्टी सुचायचाच संभव नव्हता, शिवाय ती व्यवस्था, ती टापटीप या साऱ्या गोष्टी अगदीं बायकांच्या हातांवांचून निदान सांगणीशिकवणीवांचून झाल्याच नाहींत, हें खास होतें. असो. ती व्यवस्था ज्याअर्थी त्याच वेळीं कोणीं केली हें कळलें नाहीं त्याअर्थी मीहि आधीं सांगत नाहीं. इतकी सगळी तयारी असूनहि त्या मंडळींनीं आम्हांला ते दिवशीं सकाळीं आपल्या घरीं जेवणाचा आग्रह केला. संध्याकाळीं मग आपल्या जागेंत करा, आतां नाहीं करायचें, असा फार आग्रह धरला. तळमजल्यावर जें बिऱ्हाड होतें, तेथेंच साऱ्यांचीं म्हणजे तिसऱ्या मजल्यावरच्या मंडळींचींहि जेवणें होणार होतीं. ते दिवशीं आम्ही जेवायला बसलों, तेव्हां बाहेर बाजूस बसलेल्या त्या तीन मूर्तींस पाहून व आंत माझ्यासमोर बसलेल्या त्या दोघींस पाहून माझ्या मनाला काय बरें वाटलें असेल? आम्ही तिघी आणखी बाहेर बसलेले ते तिघे, अगदीं यथायोग्य जोडपीं होतीं असें माझ्या मनांत आलें असें सांगितलें तर त्याबद्दल मला कोणीं हसूं नये. कारण त्या वेळीं माझ्या मनांत तसा विचार आला खरा. आमच्या सासूबाई आणखी त्या गोपकाकाकू कांहीं जेवायला बसल्या नाहींत. त्यांनीं दोघींनीं आम्हांलाच आग्रह करून आधीं जेवायला बसवलें. आम्ही आपल्याकडून भारी आग्रह केला, कीं आम्ही मागून बसूं; पण, नाहीं. "मागून काय आहे? एकदमच होऊं द्या," असा त्यांचा दोघींचा आग्रह पडला. आम्हांला येऊन प्रहर झाला नाहीं तों

आमच्या सासूबाईंचें आणखी त्या गोपकाकाकूंचें चांगलें जमलें; आणखी माझें व त्या दोन तरुण स्त्रियांचेंहि ठीक जुळलें. आतां तरुण स्त्रिया तरुण स्त्रिया, असें किती वेळ म्हणायचें? एकीचें नांव लक्ष्मीबाई व दुसरीचें नांव यशोदाबाई होतें. एकदा सांगून टाकतें म्हणजे झालें. लक्ष्मीबाई यशोदाबाईपेक्षां वयानें थोडी मोठी होती. स्वरूपानें फार नीटस; वर्णानें काळीसांवळी अशी होती. आणखी हुशारहि फारच. बाहेर बसलेल्या दोन गृहस्थांपैकीं ज्यांचें नांव विष्णुपंत होतें ते या बाईचे यजमान. हा या दोघांचा जोडा किती तरी चांगला आणखी... काय! आतां या जोड्याचें वर्णन मला कांहीं यथास्थित करतां येत नाहीं. मी मनांत म्हणत असें, कीं आमचाच दोघांचा जोडा मोठा सुखी; पण या जोडयाला पाहिल्या दिवसापासून–किंबहुना त्या दुसऱ्या जोडयालाहि पाहिल्या दिवसापासूनहि मला कळून आलें कीं आपल्यासारखी सुखी जोडपीं या जगांत आणखी कांहीं आहेत; इतकेंच नव्हे, तर आपल्याहूनहि हीं दोन जोडपीं सुखी आहेत असें मला वाटूं लागलें. कारण विष्णुपंतांची बायको नवऱ्याच्या अगदीं बरोबरीनेंच जरी नाहीं, तरी चांगली शिकलेली होती. इंग्रजी पुस्तकें वाचून तिला चुकतमाकत समजत असत. आणखी तिचा अभ्यास पुढें चाललाच होता. दुसऱ्या यशोदाबाईहि स्वरूपानें सुंदर व विद्येनेंहि तशाच सुंदर होत्या. ह्यांच्या यजमानांस नाना म्हणत. या दोन कुटुंबांच्या सहवासांत आमचीं दोन अडीच वर्षें फारच सुखांत गेलीं. कशीं तीं आतां माझ्या पुढच्या इतिहासांत कळतीलच. तेव्हां माझ्या मुंबईच्या वासांत ज्यांच्या सहवासामुळें माझें मन अत्यंत विकसित झालें, त्यांचें थोडेसें वर्णन देणें या ठिकाणीं अगदीं अवश्य आहे असें जाणून पुढील हकीकत सांगूं लागण्यापूर्वी मी यांचें थोडेंसें वर्णन देतें. आणि प्रथमतः नानासाहेब व त्यांचें कुटुंब यांच्याविषयींची माहिती देण्यास सुरुवात करतें. कारण त्यांच्या आणखी तिकडच्या चरित्रक्रमांत फारच साम्य होतें, हें वर दोनदा तीनदा आलेंच आहे. आमच्या इकडे जसें मामाच्या घरीं राहून वाढणें झालें, तसें नानासाहेब आपल्या चुलत्याच्या घरीं वाढले. आमच्या इकडे पुण्याच्या कॉलेजांतला अभ्यास पुरा होऊन मुंबईस जायचें, तसेच तेहि आले होते. परंतु चुलत्याचें व त्यांचें कांहीं कारणास्तव बिनसून ते आले असावे असें पुढें मला कळलें. त्यांचे अन् आमच्या इकडचे विचार अगदीं सारखे. बायकांना शिकविण्यासंबंधानें, लहानपणीं लग्न करण्यासंबंधानें, विभक्त राहण्यासंबंधानें हरएक गोष्टींत जुळत असे. त्यांचें कुटुंब म्हणजे ते, आई आणखी त्यांची बायको. आणखी त्यांना एक बहीण होती, परंतु ती आपल्या सासरीं असे. कधी यांच्या घरीं असे. सध्यां इथें नव्हती. इतकी माहिती सध्यां पुरे आहे.

दुसरे विष्णुपंत आणि लक्ष्मीबाई यांचें. मी सांगितलेंच आहे कीं, हें कुटुंब जितकें सुखी होतें तितकें दुनियेंत सांपडणें कठीण. छे! काय त्यांचें एकमेकांविषयींचें प्रेम. एकाला ठेंच लागली, कीं दुसऱ्याला कळ निघायची म्हणतात तें अक्षरशः त्यांच्या ठिकाणीं खरें होतें आणि तसें असण्याला कारणेंहि तशींच होतीं. त्यांचा इतिहास विशेषच चमत्कारिक आहे, तेव्हां मी तो येथें देतें. हीं दोघें लहानपणापासून एके ठिकाणीं वाढलीं;

एके ठिकाणीं खेळलीं; एके ठिकाणीं त्यांनीं अभ्यास केला असेंहि म्हटलें तरी चालेल. कारण, विष्णुपंत शाळेंतून आले म्हणजे त्यांनीं आपल्या भावी बायकोला कांहीं ना कांहीं तरी वाचावयास शिकवावें, सुटीच्या दिवशीं कांहीं पुस्तक तिच्याकडून वाचून घ्यावें, कांहीं जरी करावयाचे झालें तरी दोघांनीं एका ठिकाणीं एका विचारानें करावयाचें. त्यांस लहानपणापासून कधीं एकमेकांशीं भांडलेलें आठवतच नव्हतें. विष्णुपंतांचे वडील लहानपणीं वारले व मातुःश्री कायशा आधींच वारल्या होत्या. तेव्हां त्यांच्या वडिलांनीं आपली काय इस्टेट होती तीसकट त्यांना लक्ष्मीबाईंच्या वडिलांच्या पदरांत घातलें. असा एकंदर त्यांचा पूर्वीचा इतिहास असल्यामुळें लक्ष्मीबाईंचे आईबाप तेच विष्णुपंतांचे आईबाप असें होऊन त्यांचा सर्व काळ एकमेकाच्या सहवासांत गेला आणि ईश्वरी संकेतानें असेंच ठरलें होतें, कीं त्यांचा आजन्म एकमेकांच्या सहवासांतच जायचा होता. त्यांचे आईबाप—यमुनाबाईंचे आईबाप म्हणायचें–त्यांचेंहि माहेरचें नांव माझें तेंच होतें–काशीयात्रेला गेले होते. विष्णुपंतांचे व त्यांच्या बायकोचेहि म्हणावयास हरकत नाहीं—विचार अगदीं आमच्या इकडल्यासारखेच होते. लक्ष्मीबाईंना अमुक गोष्टींत म्हणजे समजत नव्हतें असें नाहीं. ज्या त्या गोष्टींतली माहिती त्यांच्यापासून आम्हांला मिळायची. यशोदाबाईहि तशाच, पण एक कांकणभर कमी इतकेंच. दोघी बरोबरीच्या म्हटलें तरी चालेल. मी मात्र मेली वेडीबोंगाडी त्यांच्यांत येऊन पडलें असें मला आतां वाटायला लागून लाज वाटूं लागली. आदितवारीं पुण्यास आल्यापासून मला जें इतकें त्या दोघींचें वर्णन करून सांगायचें, तें जेव्हां आतां प्रत्यक्ष खरें आहे असें पाहिलें, तेव्हां माझ्या मनाला काय बरें वाटलें असेल ? अशा बायका असल्या तरच खरें असें वाटून मला कितीतरी लाज वाटली ! एकदा दोनदा खरोखर अंतःकरणास असें वाटलें, कीं आपण कांहीं तिकडच्या योग्य नाहीं. आपलें आवडवून घेणें आहे इतकेंच. माझ्या मनाला वाटलें, इतकेंच नव्हे, तर मीं एक दिवस—मुंबईस गेल्यावर पांचसहा दिवसांनींच—बोलूनहि दाखविलें. सहज संध्याकाळीं बायकांच्या शिक्षणावर पुरुषापुरुषांत गोष्टी निघाल्या होत्या जेवतांना. आमच्या घरीं जेवण चाललें असतांना विष्णुपंत आणखी नाना सहज आले आणखी बसले. तेव्हां कशावरूनशा गोष्टी निघाल्या, कुठल्या मुलींच्या शाळेची हकीकत वाचल्या-वरून कीं काय कोणास ठाऊक !—आतां माझ्या लक्षांत नाहीं. त्या गोष्टी अर्थातच मी वाढीत होतें तेव्हां ऐकल्या. आणखी रात्रीं आतांशा माझ्याकडून रोज एक तासभर वाचून घ्यायचेंच असें, तेव्हां गोष्टी निघाल्याहि. मी कांहीं वाचतांना चुकलें, तेव्हां मला म्हणायचें :—

"छे, अगदींच तूं मंद ! तें पाहा शेजारीं खालीं वर काय आहे तें !" तें उदाहरण देण्याबरोबर मला खरोखरीच आपण अतोनात मंद असें वाटून फार वाईट वाटलें, आणखी वाईट तोंड करून मीं म्हटलें, "मी किनई झटून अभ्यास करतें आतांशा बरं का ! मला नाहीं का कळत कीं मी इकडच्या योग्यतेची नाहीं ती ? पण काय करूं ?" हे शब्द उच्चारतांना माझें अंतःकरण इतकें पिळवटलें, कीं त्याची छाया तोंडावरदेखील

स्पष्ट दिसली असावी. असावी कां ?—दिसलीच. कारण मला झट्कन् जवळ ओढून घेऊन व माझ्या तोंडावर हात फिरवून म्हणायचं, "छे. छे. भलतंच एखादं ! असं नाहीं हो तें ! वेडी कुठली ! असा का त्याचा अर्थ करायचा ? छः ! अगदीं माझ्या योग्यतेची, मला जशी हवी तशीच आहेस ! "

" उगीच आवडून घ्यायचं ! पण मी आतां होईन बरं का आपल्याजोगी. त्या लक्ष्मीबाई मला कितीतरी मदत करतात आणखी मला शिकवीत असतात. मी आपली वेळ सांपडला, कीं त्यांच्याकडे जातें, नाहीं तर या दोघी आपल्या माडींत येतात. इतक्या या दोघी विद्वान् आहेत, पण इतका कसा तो गर्व नाहीं त्यांना ! मला कांहीं कांहीं म्हटल्या कांहीं येत नाहीं म्हटलं तरी चालेल, पण लक्ष्मीबाई कीं यशोदाबाई इतकीदेखील थट्टा करीत नाहींत कधीं; उलट पहिले दिवशीं मला अतिशय आग्रह करून वाचून घेतलं, तशी म्हणतात — अरे वा, सासरींमाहेरीं अशी स्थिति असून बरंच येतंय् तुम्हांला ! "

" हं ! मग आपण अगदीं फुगून गेलां असाल ! "

" इश्श मेलं, हें कसलं बोलणं ! फुगून जायला मी मोठी विद्वान् किनई ! "

" बरं. चला. एकंदरीत जसं हवं होतं, तसं झालं ना बिऱ्हाड ! पाहूं आतां कसा काय आपला अभ्यास होतो तो ! बरं पण, त्या दोघांच्या बायका आणखी ते दोघे एका ठिकाणीं बसतात गप्पा सांगायला, तिथें येशील का बसायला ? आज चार पांच दिवसांत ते आपले आमच्यासाठीं बसले नाहींत, आईला काय वाटेल कळलें तर म्हणून; पण मीं त्यांना सांगितलं तुम्ही खुशाल बसत जा—आम्हीदेखील येत जाऊं दोघ म्हणून. "

" काय ? एका ठिकाणीं बसतात गोष्टी सांगायला ? नाहीं तेंच एखादं ! बायकान् पुरुष एका ठिकाणीं ? "

" कां, 'भलतंच एखादं' काय झालं करायला ! मला तर हें भारी आवडतं बोआ. अग, बरोबरचे आम्ही स्नेही ! आम्हीन् आमच्या बायका रात्रीं चार घटका एका ठिकाणीं गोष्टी सांगत अगर कांहीं वाचीत बसलों म्हणून काय झालं ? असं एका ठिकाणीं बसलोंबिसलों तरच कांहीं एकमेकांचे विचारबिचार समजतील कीं नाहीं ? आतां आज तर कांहीं नाहीं, पण उद्यां आपण जाऊं दोघं. तुला पाहिजे तर तूं त्या यशोदा-वहिनीच्या बरोबर जा. मी. मी... "

" छे ! सासूबाई काय म्हणतील, म्हणतील यांनीं ताळच सोडला. काय, बायकांना घेऊन एका ठिकाणीं काय बसतात ! "

" कांहीं म्हणत नाहीं आई ! ती नानांची नाहीं का आई ? ती कांहीं तरी बोलतें? तशीच आमची आई आहे ! आज पांचसहा दिवसांत ऐकलंस कांहीं तूं सास्वासुनांचें भांडणबिंडण ? ती सासू बोलायला कारण होईल तर ना ? सून कशी आहे पाहा; तशीच

तूं वाग म्हणजे कांहीं नाहीं. आईला ठाऊक आहे कीं मी जें करीन तें कांहीं कधीं वावगं करायचा नाहीं. मग कसं काय ? जायचं आं उद्यां ! ”

“ पाहा बाई, मला कांहीं आपल्याबाहेर जायचं नाहीं, पण सासूबाई--”

“ त्याचं तुला काय ? तें माझ्याकडे लागलं, त्यांतून तिला नाहींच आवडलं तर आपण मग जाऊं नये. उद्यां तर जाऊं. ”

“ उद्यां नको आणखी कधींतरी.”

“ कां ? आणखी कधींतरी काय आहे ? कांहीं मुहूर्त पाहायचा आहे ? ”

“ मुहूर्त कसला, पण उगीच...”

“ उगीच नाहींन् कांहीं नाहीं. मी आतां त्या विष्णुपंतांच्या बायकोकडूनच तुला बोलवून नेईन मग तर......बस्स तसंच ! ”

त्या रात्रीं माझ्या मनांत दुसरें कांहीं घोळत नव्हतें. कसें जावें ? कसें बसावें ? काय बोलावें ! सासूबाई काय म्हणतील ?

◆ ◆ ◆

## ४८ : मोठी काळजी पडली !

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

सकाळीं उठल्यावर तरी मला दुसरें कांहीं सुचतें आहे कशाला ? इतक्या सगळ्या मंडळींत आपण बसावें कसें ? बोलावें कसें ? आपल्याला लोक काय म्हणतील ? सासूबाई काय म्हणतील ? पुण्यास आजेसासूबाईंना बातमी कळली, तर त्या तरी काय म्हणतील? मामेसासूबाई काय म्हणतील ? प्रत्येक माणूस काय म्हणेल ? असें मनांत येऊन मी आपली तसल्या विचारांत घोटाळत होतें. एकदा असें वाटें, कीं आपण कांहीं जाऊ नये, पुनः वाटे कीं जावें, तिकडची मर्जी मोडूं नये. मीं आपली घरांत काम करीत होतें खरी; पण लक्ष सगळें या विचारांत गुतलेलें. जी गोष्ट कधीं ठाऊक नाहीं ती करण्याचा प्रसंग आला म्हणजे असेंच व्हायचें. तीनतीनदा मनांत येई, कीं या दोघी कशा बसत असतील? कशा बोलत असतील ? विष्णुपंतांची बायको नानांशीं व त्यांची बायको विष्णुपंतांशी बोलतां–हसतांना मीं दोनतीन वेळां पाहिलें होतें. नानांची आई जवळ असतांना लक्ष्मी-बाईंनीं नानांस कांहीं विनोदानें म्हटलेलें मीं आदलेच दिवशीं ऐकलें होतें. त्या वेळीं मला तें किती चमत्कारिक वाटलें म्हणतां ! पण नानांच्या आईस त्याचें कांहींच वाटलें नाहीं असें दिसलें; आणि नाना तर हसून उलट लक्ष्मीबाईंची व विष्णुपंतांची थट्टा करूं लागले. हें मीं लिहिलें आहे त्यावरून कदाचित् कोणास असें वाटेल, कीं नानांच्या वृद्ध आईची मर्यादा कोणी ठेवीत नसत, तर तसें यत्किंचितहि मानण्यास कारण नाहीं; कारण गोपिकाकाकूंचा मान, ती सर्व मंडळी इतका ठेवीत, कीं अतिशय मर्यादेचीं मुलें व मुली

आपल्या आईचा इतका मान ठेवीत नसतील. तिच्या देखत–पण किंचित् मर्यादेनें—सून व लेक एकमेकांशीं खुशाल बोलत, परंतु तिला त्याचें कधीं वैषम्य वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे; तर अतोनात समाधान होई. ती एखादे वेळ थट्टेनें सगळ्यांच्या देखत म्हणे, "अरे, तुम्ही आपलीं माझ्या देखत उघडपणें बोलतां, आतां तुम्हांला म्हणावं तरी काय ? अली-कडल्या पोरांनीं अगदीं ताळच सोडला, नाहीं विष्णुपंत ? काय हो, रघुनाथराव ? तुम्ही बोलतां का असं आपल्या आईच्या देखत ! " असें त्यांनीं म्हटलें म्हणजे सर्वांनीं हसावें आणखी नानांनीं म्हणावें, " वाहवा, आपणच आम्हांला सांगितलं ना खुशाल बोलत जा म्हणून, आणखी मंडळींत अशी आमची फजिती कां ? "

एका गोष्टीविषयीं त्या मायलेकरांचा आणखी सास्वासुनांचा नेहमीं वाद ! कशा-बद्दल ? तर सुनेनें केलेलें सासूनें जेवणें याबद्दल नानांचा आणखी त्यांच्या बायकोचा गोपिकाकाकूंना नेहमीं आग्रह कीं, तुम्ही आपल्या सुनेच्या हातचें जेवावें. बाकी कधीं यांचा वाद झालेला, मला तर उभ्या दोन अडीच वर्षांत ठाऊक नाहीं, कीं सासूनें सुनेला कधीं राग भरलेलेंदेखील ठाऊक नाहीं. असो; परंतु मी पुढें सांगायच्या कित्येक गोष्टी आधींच कशाला सांगतें आहें ?

वर सांगितल्याप्रमाणें ते दिवशीं माझें मन त्या चमत्कारिक विचारांनीं गोंधळून गेलें असतां जेवणींखाणीं वगैरे झाल्यावर मी व यशोदाबाई नित्याप्रमाणें वर लक्ष्मीबाई-कडे गेलों. सासूबाई आपल्या खालीं निजल्या होत्या. लक्ष्मीबाईची जागा इतकी टापटिपीची आणि इतकी व्यवस्थित असे, कीं मला तर तेथें गेलें म्हणजे कसें बसावें, कोठें बसावें, तिकडे बसलों तर व्यवस्था बिघडेल काय, इकडे आलों तर काय होईल असें वाटे. सर्व वस्तु जेथल्या तेथे अगदीं नीटनेटक्या ठेवलेल्या. निरनिराळ्या तऱ्हेच्या चमत्कारिक चमत्कारिक चिजा ठिकठिकाणीं मांडून ठेवलेल्या, त्यांत लक्ष्मीबाईनीं स्वतः कांही रेशमाचें, कांहीं लोकरीचें, कांहीं मेंडाचें, अशीं कलाकुशलतेची केलेली कामें ठिकठिकाणीं ठेवलेलीं होतीं. तीं पाहून त्यांच्या चतुरतेचें, त्यांच्या हुशारीचें, त्यांच्या कुशलतेचें आश्चर्य वाटल्याखेरीज राहातच नसे. त्यांतहि त्यांचा सहवास झाला म्हणजे त्यांची लीनता, त्यांचा सुस्वभाव, त्यांचा प्रेमळपणा व कोणासहि मदत करण्यांत त्यांची तत्परता, त्यांच्या मनाची निर्मलता, इत्यादि गोष्टी पाहिल्या म्हणजे मनाला असा चमत्कार वाटे, कीं पृथ्वीवर देव येऊन केव्हां केव्हां राहतात असें जे म्हणतात तें खोटें असें म्हणावें तरी कसें ? तिला स्वतःला सासू कशी ती ठाऊकच नसे. परंतु आमच्या सासूबाईंना आणखी नानांच्या आईला ती सासूपेक्षां जास्त भिई. यामुळें लक्ष्मीबाई जें करील तें आम्हांला करण्यास सासूबाईंना विचारण्याची फारशी जरूरदेखील नाहीं, असें झालें होतें.

आम्ही दोघी वर गेलों तेव्हां नित्याप्रमाणें आमच्या कांहीं गोष्टी, कांहीं शिकणें चालू झालें; परंतु माझें मन त्या आदले दिवशीं सांगितलेल्या गोष्टीकडे गुंतलें असल्यामुळें व रात्रीं तुम्ही एके ठिकाणीं बसून काय बोलतां, कशा बोलतां वगैरे गोष्टी यशोदाबाईस

व लक्ष्मीबाईस विचाराव्या असें मनांत तीनदा तीनदा येत असल्यामुळें माझें कामाकडे अगर गोष्टींकडे पुरतें लक्ष नव्हतें, हें यशोदाबाईनीं ताडून मध्यें मला प्रश्न केला :—
" कां सीताबाई ? आज मन नाहीं दिसत तुमचं ठीक. कुठं गुंतलं आहे वाटतं ? बाहेर गेले आहेत तिकडे तर नाहीं ना ? आमच्या लक्ष्मीबाईंचं नेहमीं असतं तसं म्हणून म्हणतें. "

लक्ष्मीबाई : अस्सं अस्सं ! आपल्यावरून जग ओळखायला जातां वाटतं ? एकूण आज आपलंच कांहींतरी !

यशोदाबाई : माझं तर कांही नाहीं पण सीताबाईंच खास आज मन ठीक दिसत नाहीं. मग तें कुठंहि गुंतलेलं असो !

मी : कांहीं नाहीं हो, उगीच कां माझी थट्टा करतां ? मला आपलं वाटलं कीं तुम्ही दोघी इतक्या विद्वान् आणखी मला कांहीं येत नाही, तेव्हां आतां आपल्याला यावं कसं ? अन् केव्हां ? मला नेहमीं हिणवायचं असतं म्हणून आपलं.

लक्ष्मीबाई : अस्सं ! अस्सं ! एकूण आतांशा तुमच्या पाठीमागें मोठी जांचणी आहे म्हणायचा ! बरं, तुम्ही भितां काय अशा ? एका वर्षाच्या आंत म्हणावं तुमच्या बरोबरीनें वाचायला ल्याहायला लागेन. तुम्ही अशा भितां काय ? आतांशा तुम्ही करतां किनई अभ्यास, असा करीत जा रोज; कीं दोन अडीच वर्षांत तयारी. आणखी किनई थोडासा धीटपणा धरा अहो . ...

यशोदाबाई : खरंच लक्ष्मूबाई, विचारानात हो यांना ? झाले आतां पांच सहा दिवस नाहीं का ? मला तर कालच सांगायचं कीं......

यशोदाबाई अर्धवट बोलतात तों मला उतावळी होऊन मीं एकदम म्हटलें, " काय, काय तुम्हांला सांगायचं ? " मला असें वाटलें, कीं बहुतकरून मला जी गोष्ट विचारली तीच गोष्ट मला विचारावी म्हणून यशोदाबाईंना त्यांच्या यजमानांनी सांगितलें असावें आणि तेंच शेवटीं खरें ठरलें माझा तो उतावळीचा प्रश्न ऐकून लक्ष्मीबाई मध्येंच म्हणतात, " यांत काय हो ! यांना विचारायचं काय त्यांत ? जशा आपण तशाच या ! पण त्यांच्या सासूबाईंचं जरा भय वाटतं; उगीच त्यांना कळलं, आणखी नाहीं आवडलं म्हणजे यांना त्रास व्हायचा, आणखी आपल्याविषयीं त्यांच्या मनांत कांहीं यायचं. बाकी स्वभाव दिसतो आहे गोपिकाबाईसारखाच. तेव्हां कांहीं मोठंसं भय नको वाटायला. " ( माझ्याकडे वळून ) " काय हो, तुमच्या सासूबाई म्हणतील कांहीं ? "

त्यांचा प्रश्न कशासंबंधानें होता हें मीं आतां पक्कें जाणलेंच; तेव्हां लागलीच म्हटलें, " काय सांगावं बाई ! आजपर्यंत त्यांच्या स्वाधीन असं कांहीं नव्हतं; तेव्हां त्यांना काय आवडेल, काय नाहीं, याचा कांहीं नेम नाहीं. पण कांहीं आवडो, न आवडो, त्या कांहीं कधीं बोलणार नाहींत असं वाटतं. मग आतां प्रत्यक्ष अनुभव काय येईल तो खरा ! " हें माझें उत्तर ऐकण्याबरोबर आपण कशाविषयीं बोलतों आहोंत हें मला ठाऊक आहे असें जाणून यशोदाबाई म्हणतात :—

" एकूण रघुनाथरावांनीं तुमच्याजवळ गोष्ट काढली अं ? तुम्हांला विचारलं ? "

" तेंच तर माझ्या मनांत घोळत होतं म्हणून माझं मन चमत्कारिक झालं होतं. अन् मघापासून तुम्हांला विचारीन म्हणतें आहें. पण कसं विचारावं तेंच सुचेना. "

" वाः ! त्यांत काय हो विचारायचं ! " लक्ष्मीबाई म्हणाल्या, " मी आपली तुमच्या सासूबाईंना भीत होतें, नाहीं तर दुसरेच दिवशीं मीं तुम्हांला विचारलं असतं. अहो, हें असं एकमेकांनीं एकमेकांशीं बोललं, हसलं, एके ठिकाणीं कांहीं वाचलं म्हणून झालं काय ? ही कसली भिकारी मर्यादा ! आम्ही तर पुण्यास असतांनाच नाना आमच्याकडे येत तेव्हां एकमेकांशीं बोलत असूं, वादविवाद करीत असूं, आई कीं बाबा कधीं कांहीं बोलले नाहींत. अन् काकांनीं तर कधींच कांहीं म्हटलं नाहीं, उलट त्यांना त्याचें कौतुक वाटे. अन् मी तुम्हांला सांगतें, असं पुरुषाबायकांनीं एके ठिकाणीं बोललं, बसलं तरच चांगलं होईल. या वयांत आपण एका ठिकाणीं आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर बसूनबोलून वादविवाद केला तरच त्यांत फायदा आहे. नाहीं तर काय हो ? आम्ही तर आज किती दिवस एका ठिकाणीं बसून रोज रात्रीं कांहीं ना कांहींतरी वाचतों. वर्तमानपत्रं वाचण्याची वेळ तीच ! "

हें त्यांचें बोलणें चाललें असतां मला तें सर्व स्वप्नवत् व खरें असल्यास कसेंसेंच वाटून मी आपल्याशीं आश्चर्य करीत बसलें. इतक्यांत यशोदाबाई हसून माझ्याकडे पाहून म्हणतात, " कां ? इतक्या स्तब्ध कां बसलांत ? तुम्हांला मोठं अगदीं विलक्षण वाटत असेल नाहीं ! अहो, आम्ही नुसतं सांगतों हें जर तुम्हांला इतकं विलक्षण वाटतं, तर मग प्रत्यक्ष पाहिलंत संध्याकाळीं म्हणजे काय वाटेल ? मग आम्हांला अगदीं निर्भीड म्हणाल नाहीं ? "

" हें हो काय यशोदाबाई, मी कशी तुम्हांला निर्भीड म्हणेन ? अहो, मला कांहीं ठाऊक नाहीं म्हणून आपलं कसंसंच वाटतं झालं. एकदा त्यांत रुळलं म्हणजे...बरं पण मला असं सांगा आधीं; कीं तुम्ही बोलतां तरी कशा एकमेकांशीं साऱ्यांच्या देखत ? "

हा माझा प्रश्न ऐकून यशोदाबाई मोठ्यानें हसल्या व थट्टेनें म्हणतातः--" अहो अशाच, जशा तुमच्याशीं बोलतों तशाच त्यांच्याशीं. "

लक्ष्मीबाई : हें काय हो उगीच त्यांची थट्टा करतां ? त्या आपल्या बिचाऱ्या भोळ्या भावानें विचारतात. कांहीं नाहीं हो सीताबाई, तुम्ही आपल्या या आज रात्रीं जेवणंखाणं झालीं कीं, म्हणजे मग तुम्हांला सगळं कांहीं समजेल, त्यांत काय आहे असं मोठं ?

याप्रमाणे बोलणें झालें. नित्याप्रमाणें मला त्यांनीं सांगायसंवरायचं तें सांगितलं आणि तीन चार वाजल्याबरोबर मी पुनः खालीं जाऊन स्वयंपाकाच्या तयारीला लागलें. कारण आमच्या इथें काय आणखी नानांच्या व विष्णुपंतांच्या इथें काय, संध्याकाळचें जेवण, बरोबर सातच्या आंत होत असे. कॉलेजांतून येणें झालें, कीं जेवणाची तयारी. नाना व विष्णुपंतहि आपल्या कामावरून सहासाडेसहा वाजतां यायचे, आणखी घरीं

आल्यावर पहिलें काम जेवणाचें. जेवण होऊन मग त्यांनीं आठ नऊ वाजेपर्यंत इकडे तिकडे करायचें आणि नऊ वाजले म्हणजे सर्वांनीं एका ठिकाणीं जमून मग गप्पागोष्टी चालायच्या. असा त्यांचा क्रम, आम्ही त्यांचे तेथें जाऊन राहण्याच्या आधींपासून असे आणि आमच्या इकडे तो क्रम फार आवडे हें मीं सांगितलेंच आहे. असो.

संध्याकाळीं मी सैंपाक करी; कारण सासूबाईंना कांहीं खायचें नसे. तेव्हां मी लक्ष्मीबाईंच्या माडीवरून खालीं येऊन आपल्या कामास लागलें. आमच्या बंगल्यापासून जवळच एक देऊळ असे तेथें गोपिकाकाकू आणखी आमच्या सासूबाई संध्याकाळीं पुराण ऐकायला जात असत. गोपिकाकाकू आमच्या सासूबाईंना तिसऱ्या कीं चवथ्या दिवशीं म्हणाल्या, " काकू, तुम्ही आपल्या आतां होईल तितकें करून सुनेच्या अंगावर टाकीत जा, आणखी माझ्याबरोबर कथा-पुराणांना येत जा. सकाळचं आहेच आपल्याकडे. त्यांना बायका चांगल्या मिळाल्या आहेत; आतां त्यांचीं तीं आपलीं कांहीं करोत; अन् नारायणाच्या कृपेनें आपलीं मुलंहि चांगलीं आहेत. आतां आपलं त्यांनीं सुखानं नांदावं अन् आपण समाधानानं पाहावं. चला. ' आमच्या सासूबाई त्याच स्वभावाच्या, आणखी अगदीं गरीब; त्यांना जसें कोणी सांगेल तसें ऐकणाऱ्या त्यांना आपलें गोपिकाबाईंचें बोलणें अगदीं बरोबर वाटून त्यांनीं त्यांचा क्रम सुरू केला. अन् देऊळ कांहीं लांब नसल्यामुळें तिकडूनदेखील नकोबिको म्हणायचें झालें नाहीं. उलट तिकडून म्हणायचें कीं, " आई, मामांच्या इथें तूं पुष्कळ कष्ट केलेस, आतां देवाच्या दयेनें आपल्याला थोडासा पैसा मिळतो आहे; तूं आपली स्वस्थ बसत जा. सकाळीं-देखील कांहीं तूं चुलीजवळ जाऊं नकोस. अगदीं सुखानं राहा. पाहिजे तर सैंपाकाला एक बाई ठेवूं. येऊन जाऊन पैसे शिलकींत पडायचे नाहींत इतकंच ना ! नाहीं तर नाहीं. "

" नको रे बाबा, बाईबिई कांहीं नको ! तीन माणसांचा सैंपाक तो किती, आणखी...... "

" तशाकरितां नाहीं ग, पण आतां आज इतकीं वर्षे तुला थोडे का कष्ट झाले ? म्हणून म्हणतों अन् नाहीं बाई ठेवली तरी तूं आपली बसत जा स्वस्थ. "

" वाहवा रे वाहवा ! अन् त्या पोरीला कामाला लावूं का ? मोठा..."

" त्यांत तें कसलं आहे काम ? मी तेव्हांच करीन. " मीं म्हटलें.

" एवढं तुम्ही म्हटलंत एवढयानंच मला मूठभर मांस आलं बरं. मी आपली सकाळचा सैंपाक सोडायची नाहीं, संध्याकाळची कांहीं करायची नाहीं. त्या गोपिका-काकूंचें व्रत धरणार आहे मी. त्यांनीं मला गुरूपदेश केला आहे ! " अशा तऱ्हेनें सासूबाईंची वागणूक सुरू झाली.

ते दिवशीं वर सांगितल्याप्रमाणें जेवणींखाणीं चाललीं असतां मला हलकेंच म्हणायचें, " कसं काय ? आज आतां जायचं बरं का वर; त्या यशोदाबाई येतीलच जातांना हांका मारायला. त्यांना ठेवलं आहे सांगून."

"इश्श मेलं ! त्यांच्या यजमानांकडून त्यांना तें कशाला सांगून ठेवायचं ? नाहीं तेंच एक !"

"वा ! मग त्यांत एवढं काय झालं ? कांहीं..."

"व्हायचंय् काय म्हणा, पण एवढं त्यांच्याकडे...कांहीं मी नाहीं म्हणत होतें आपल्या म्हणण्याला ? आपलं सासूबाई काय म्हणतील असं मनांत आलं म्हणून जरासं..."

"समज्या ! आईचा स्वभाव तुला अजून कळला नाही म्हणून तें तुला तसं वाटलं, दुसरं कांहीं नाहीं. अग, ती मला इतकंदिखील कांहीं बोलायची नाहीं."

"नाहीं बोलल्या तर चांगलंच; पण म्हटलं त्यांच्या जिवाला जें बरं वाटायचं नाहीं तें करूं नये. त्यांना कोणीकडून दुःख होऊं नये. आजपर्यंत त्यांनीं असे दिवस काढले, आणखी आतां आपण अशा रीतीनें..."

"अरे वा रे वा ! सासूबाईंची अगदीं फारच काळजी दिसते आहे आज !"

"काळजी कसली, बरं पण बाई, मी तिथें नाहीं आलें तर नाही का चालणार ? तिथें आल्यावर मला होईल अगदीं वेडयासारखं, अन् मग असली कसली बोवा यांची ही वेडी बायको म्हणून होईल फजिती बरं ! पाहा आपला विचार !"

"अस्सं अस्सं ! अन् आम्ही करीत आलों आजपर्यंत आपल्या धीटपणाचीन् शहाण-पणाची मोठी स्तुति त्या दोघांजवळ, ती तर मग व्यर्थच होणार सारी !"

"करावी कशाला अशी रिकामी स्तुति अन् आणखी यशोदाबाईच्या अन् लक्ष्मीबाईच्या नवऱ्याजवळ ! चांगलं ! मग त्यांनीं आपली परीक्षाच केली असेल मला पाहून !"

"म्हणूनच म्हणतों, आतां आमची अब्रू बचावा. लाजूं नका, धीटपणा दाखवा. वेळेस मीं वाचायला सांगितलं तर वाचायलादिखील मागें घेऊं नका."

"नको नको. एवढा बरीक प्रसंग आणूं नये, म्हणजे मग त्या माझ्या फजितीला पारावारच नाहींसा होईल."

"बरं चला, नाहीं. पण नुसतं येऊन बसायला, आम्ही बोलूं तें ऐकायला तर कांहीं हरकत नाहीं ना ?"

"तेंच कसं काय होणार आहे तें आतां पाहायचं !"

◆ ◆ ◆

## ४९ : माझा सभाधीटपणा

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

जों जों नऊ वाजण्याची वेळ जवळ जवळ येऊं लागली तों तों माझ्या पोटांत कसेंसेंच होऊं लागलें. काय चमत्कार आहे पाहा ! बरोबरीच्या स्नेह्यासोबत्यांनीं आपल्या बायका वगैरेंना घेऊन एके ठिकाणीं बसावें बोलावें यांत यत्किंचित् तरी वावगें आहे काय ? त्यापासून यत्किंचित् तरी नुकसान आहे काय ? परंतु नाहीं. आमच्या विलक्षण डोळ्यांस त्यांत देखील अत्यंत वाईट गोष्टी दिसूं लागल्या आहेत. एक स्त्री व एक पुरुष परस्परांशीं बोलत बसलेलीं पाहिलीं कीं आमच्या घाणेरड्या मनांत कुशंकेखेरीज दुसरे विचार कधीं म्हणून यायचेच नाहींत. मन " तें चांगलं नाहीं," असं शिकवून शिकवून अगदीं नादान करून टाकलेलें. त्यांत आम्हांला शुद्धपणा, चांगलेपणा कसा तो दिसेनासाच झाला आहे. अशी स्थिति झाली असल्यामुळें वस्तुतः जी गोष्ट सर्वथैव चांगली, सर्वथैव इष्ट, त्या गोष्टीबद्दल देखील मला मोठें भय वाटूं लागलें होतें. आतां यशोदाबाई आपल्याला चला म्हणून म्हणायला येतील तेव्हां आपण कसें काय करावें ? जावें न जावे असेंच माझ्या मनांत येऊं लागलें. होतां होतां यशोदाबाई आल्या आणखी त्यांनीं मला " चला आपण थोडयाशा वर जाऊं लक्ष्मीबाईकडे " असें सासूबाईच्या देखत म्हटलें. काम आटोपलेंच होतें, तेव्हां सासूबाईंहि कांहीं 'ना हो' म्हणाल्या नाहींत; परंतु मला आपलें असें वाटलें कीं मीं जावें असें त्यांच्या मनांत नव्हतें, परंतु ही माझी कल्पनाच ! कारण त्या उलट मला म्हणतात, " जा. बसानात जाऊन अंमळ; मीदिखील आतां घटकाभर गोपिकाबाईकडे जाऊन बसणार आहे. मेलं लवकर अंथरुणावर जाऊन पडलं, तर आतां झोंप लागते. अन् मग मधेंच जागं होऊन झोंप येईनाशी होते." 'पडत्या फळाची आज्ञा' म्हणतात ना, तशी यशोदाबाईची अवस्था झाली. त्यांनीं मग माझ्या पाठीमागें गर्दीच लावली. शेवटीं 'नाहीं होय' करीत मी त्यांच्याबरोबर गेलें तर खरी. यशोदाबाई आणखी मी वर जातों तों लक्ष्मीबाई आपलें काम आटोपून मला न्यायला म्हणून खालींच येण्याच्या बेतांत होत्या.

गच्चीवर एक राउंड टेबल ठेवलेलें असून त्यावर एक इंग्रजी तऱ्हेचा दिवा खूप उजेडाचा ठेवलेला होता. त्यासभोंवार पांचसहा खुर्च्या व पलीकडे एक कोंच मांडलेलें होतें. या वेळीं त्याच्या सभोंवार तिघेहि बसले होते. आम्ही दोघी वर जाण्याबरोबर लक्ष्मीबाईनीं माझा हात एकदम धरून मला गच्चीकडे नेलें. मी लाजून लाजून त्यांना अगदीं गयावया करून 'नको नको' म्हणत होतें; पण यशोदाबाई आणखी त्या, त्या काय मला सोडतात ? गच्चीच्या दारापाशीं जातें तों मला तर अगदीं फारच लाजल्या-सारखें झालें; पण आतां गत्यंतर नाहीं असें वाटून मनाचा अगदीं पक्का धीर केला व त्यांनीं मला ओढण्याच्या अगोदरच मी त्यांच्या मागोमाग गच्चीवर गेलें. यशोदाबाई

व त्या नीट गेल्या त्या कोचावर जाऊन बसल्या. माझ्यानें इतक्या पुरुषांच्या देखत अर्थातच बसवेना; आणि पळून केव्हां जाईन असें झालें. ज्या बाजूला मंडळी होती त्या बाजूला अर्धवट पाठ करून मी आपली उभी राहिलें; आणखी त्या दोघीजणी मला " बसा " म्हणून आग्रह करूं लागल्या. तेव्हां विष्णुपंत एकदम यशोदाबाईस म्हणाले, " वा ! यशोदावहिनी, ही खाशी तोड बोवा. आपण आधीं बसायचं, अन् मग दुसऱ्याला ' बसा बसा ' म्हणून आग्रह करायचा ! "

" मग ? उदाहरण घालून दिलं म्हणजे त्याचा उपयोग उपदेशापेक्षां जास्ती असं कालच कुठें वाचून दाखवायचं ना ? " लक्ष्मीबाई एकदम म्हणाल्या ! " झालं तर मग ! आम्ही आधीं बसलों त्या त्यांना दाखवायसाठीं, एवढी कसली लाज धरतां हो, सीताबाई ! बसा. "

यशोदाबाई : आमच्या सांगण्यानें कुठल्या त्या बसायला ? त्यांना...

त्या पुढें काय बोलणार तें माझ्या चटकन् ध्यानांत येऊन मी " पुरे हो. थट्टा करूं नका माझी " असें म्हणत पटकन् खाली बसलें. तेव्हां तिकडून आपण होऊन म्हणायचें : " अस्सं ! आतां कसं झालं छान ! पण तोंड चांगलं समोर केलं तर ! असं तिरकस कशाला बसायला पाहिजे ? "

हें बोलणें ऐकल्याबरोबर मला किती खजील झाल्यासारखें झालें ! मीं चांगल्या रागानें कपाळाला आंठ्या घालून तिकडे पाहिलेंदेखील; पण मी दिव्यापासून लांब आणखी वांकडी बसलेली त्यामुळें तो राग दिसलादेखील नाहीं. असो. याप्रमाणें आमचें एकंदर आवाहन व प्रतिष्ठापन झाल्यानंतर मंडळी आपापसांत बोलूं लागली, आणि मी मात्र निव्वळ मुक्याचें व्रत धरून बसलें होतें आतांपर्यंत माझा थोडाबहुत अभिमान जो कांहीं उरला होता तो सर्व बिचारा कोणीकडच्या कोणीकडे नाहींसा झाला असेल ! आधीं मीं एकदा सांगितलेंच आहे, कीं आमचेंच दोघांचें काय तें प्रेम आणखी आम्हीच दोघें काय तीं खरी नवराबायको असें मला जर कधी वाटलें असेल तर तें बनूवन्सं आणि उमासासूबाई यांची स्थिति पाहून ! सुखाचें जोडपें म्हणजे काय, हें मला आम्हां स्वतः-खेरीज कोणी दिसलेंच नव्हतें, धाकट्या मामेसासूबाईंचा स्वभाव कसा काय हें वाचकांना, मीं आतांपर्यंत हकीकती सांगितल्या त्यावरून कळलेंच आहे; तेव्हां त्यांचेंहि जोडपें सुखी असें मला वाटण्याचा संभव नव्हता हें उघडच झालें. माझ्या आईबापांची व आजी-आजोबांची कशी काय स्थिति होती हेंहि ध्यानांत आणल्यास मला गर्व वाटण्यासच जागा होती. अशी स्थिति असल्यामुळें आम्हां दोघांच्या सुखित्वाबद्दल थोडासा अभिमान वाटणें साहजिक असें कोण म्हणणार नाहीं ? हें एक सुखाबद्दल झालें. दुसरें माझ्या लिहायवाचायला येण्याबद्दलहि मला थोडाबहुत अभिमान वाटत होता असें म्हणावयास हरकत नाहीं. मीं आपलें लिहिलेलें पत्र दादास दाखविलें असतां त्यानें माझी त्याबद्दल मधलेंच एक वाक्य वाचून जी टर उडविली, त्याबद्दल मला राग कसा आला वगैरे गोष्टी सांगितल्या, त्यांवरून जाणूनबुजून असो कीं नकळत असो, पण मला आपल्या ज्ञाना-

बद्दल अभिमान वाटत होता हें दिसून येतें. परंतु मुंबईस येण्याबरोबर जेव्हां या दोन दिव्य स्त्रिया दृष्टीस पडल्या, तेव्हां तो दोनहि गोष्टींबद्दलचा अभिमान सर्वथा नाहींसा झाला आणि आज रात्रीं आम्ही सारी एका ठिकाणीं बसून गोष्टी चालल्या असतां लक्ष्मीबाईंचीं तीं बोलणीं जेव्हां ऐकलीं, तेव्हां उरलासुरला शेष जाऊन सर्व प्रकारानें माझी मलाच लाज वाटूं लागली. असें वाटूं लागलें, कीं काय आपला जन्म ? व्यर्थ, दुसरें काय ! माझें नशीब येवढें बरें होतें कीं " बायकांचा जन्म फक्त चुलीपुरताच; त्याच्या पलीकडे त्यांनीं दृष्टीदेखील देऊं नये; त्यांच्या शहाणपणाची मर्यादा चुलीच्या आसपास दोन खण, फार तर माजघर; संपलें. याच्या पलीकडे त्यांनीं नुसतें पाहिलें, तर निर्लज्जपणा ! " असल्या वेडगळ रानटी ग्रहांनीं माझें मन व्यापलें नव्हतें. त्यांनीं एकदा ग्रासून टाकलें असतें, कीं मग खग्रासच तें ! त्याच्यावर कांहीं ओढलें म्हणून उठतें आहे कशाला काय ? अशा ग्रहांनीं पूर्ण ग्रासलेल्या मनाच्या माझ्या बहिणी आजमितीला काय थोड्या आहेत ? मी एवढ्यांतच त्या वेळीं सुख मानलें आणि अजूनहि मानलें असतें, कीं माझ्या सुदैवामुळें मीहि त्यांच्यापैकींच एक झालें नाहीं. मला लहानपणापासून कांहीं कारणांनीं पण वाचनाचा नाद लागला. पुढें ज्यांच्या पदरीं पडलें त्यांना तर त्या गोष्टीची अतोनात हौस; आणि येथें येण्याबरोबर अशा रत्नांचा सहवास घडल्यावर मग आणखी काय पाहिजे ? सर्वच उत्तम झालें. असो.

ते दिवशीं काय वाचलें, बोलणीं काय निघालीं, हीं आतां मला अगदीं बरोबर आठवत नाहींत; आणि मला केव्हां एकदा उठून जाईनसें झालें होतें, हे मीं वर सांगितलेंच आहे. अशा मनाच्या स्थितींत लक्षांत काय राहणार ? तथापि लक्ष्मीबाई व यशोदाबाई मधून मधून मला प्रश्न विचारून कांहींतरी बोलविण्याचा यत्न करीत. मी आपली हूं हूं करी. त्यांचीं कांहीं विनोदपर, कांहीं मोठ्या गंभीर विचारांचीं अशीं बोलणीं ऐकून मधून मधून माझें चित्त तिकडे लागे व मनाला मोठें कौतुक वाटे; आणि एकदोनदा मला वाटतें, असेंहि मनांत आलें कीं आपल्याला कधीं असें बोलायला येईल काय ? एकदा मी अगदीं बराच वेळ मुकाट्यानें बसलें होतें; यशोदाबाईंनीं व लक्ष्मीबाईंनीं दोनतीनदा मला प्रश्न विचारला, तेव्हां नुसतें ' हूं हूं ' च केलें, त्यावरून तिकडून म्हणायचें देखील कीं " वा ! आज इथें एक आम्हीं पुतळी आणून बसविली आहे बरं का नानासाहेब ? ", परंतु नाना " तुम्ही तरी आमच्या गणपतरावजींचेच बंधु दिसतां बरं का, रघुनाथराव ? धीर कसा तो ठाऊकच नाहीं असं दिसतं. अहो आज पहिलाच दिवस. आजपर्यंत जी गोष्ट कधीं ठाऊकदेखील नाहीं, ती एकदम व्हावी कशी ! " असें म्हणून व आणखी कांहीं बोलून माझी बरीच बाजू सांवरून धरली, त्यामुळें मला मोठें समाधान झालें. ते दिवशीं एका वर्तमानपत्रांतून कीं मासिक पुस्तकांतून कायसें वाचल्याचें मला स्मरतें; पण तें आतां काय वगैरे कांहींच आठवत नाहीं. वर सांगितल्या तऱ्हेनें चांगले दोन तास— जवळजवळ ती शिक्षा होय,—त्या दिवशीं मला ती शिक्षाच वाटली— भोगल्यानंतर मी व यशोदाबाई खालीं आलों आणखी माझ्या मागोमाग तिकडूनहि येणें झालें. अर्थातच

मग वरच्या माझ्या लाजाळू वर्तनाबद्दल तिकडून टीका झाली व आपली बायको— जिला कधीं असा प्रसंग नाहीं याबद्दल तिची बाजू राखायची ती न राखतां उलटी थट्टा करायची म्हणून मी कांहीं कमी बोललें असें नाहीं. आणखी शेवटीं तर असा कांहीं धाक घातला, कीं त्या धाकानें भय वाटायचं तें मेलं एकीकडेच राहून " वाहवा ! आम्हांला तेंच पाहिजे " असें म्हणून माझी हनुवटी कुरवाळून पोट धरधरून हसायचें. असा हा अगदींच निरुपाय झाल्यावर मग मी तरी काय करणार? कपाळाला आंठयाबिठया चढवून खूप रागावलें आणि भर मंडळींत माझी थट्टा करण्याच्या अनन्वित अपराधाबद्दल कांहीं काळपर्यंत बोलायचें नाहीं असा निश्चय केला, आणि त्याप्रमाणें तिकडे सांगितलेंहि व आश्चर्याची गोष्ट ही, कीं तो निश्चय मीं मोठया निर्धारानें थोडाथोडका वेळ नव्हे, तर चांगला चार मिनिटें चालविला. ही बढाई मारते याचें कदाचित् कोणाला नवल वाटेल; परंतु तसें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं; कारण मीं चार मिनिटें निश्चयच चालविला, पण त्यांत तो चालूं नये म्हणून तिकडून काय काय यत्न करण्यांत आले, याचा विचार केला, आणि माझा निश्चयहि लटपट निश्चयच होता हें ध्यानांतून जाऊं दिलें नाहीं, म्हणजे मग मीं बढाई मारली आहे यास तसेंच कारण आहे, असें सहज दिसणार आहे. असो. येणेंप्रमाणें माझ्या भीष्मप्रतिज्ञेचा भंग झाल्यावर किती वेळ तरी आम्ही ते दिवशींच्या त्या अपूर्व गोष्टीविषयींच बोलत बसलों होतों. बोलतां बोलतां तेथें काय काय ऐकलें, काय काय नाहीं, याबद्दल मला विचारलें. मीं कांहींतरी बोलावें म्हणून त्या यशोदाबाई व लक्ष्मीबाई मला तीनतीनदा विचारीत असतां मी कांहीं बोललें नाहीं, नुसते हूं हूं केलें. " असें कां ? " म्हणून मला विचारतांच मी " त्या नानांनींच त्याचं उत्तर देऊन समाधान केलं, तें नाहीं वाटत पटलं ? " असें म्हणून लबाडीनें पाहूं लागलें व तितक्यांत मला त्या वेळीं नानांनीं कोणाचें नांव घेतल्याचें स्मरण होऊन विचारलें, " खरं, त्यांनीं तें एक नांव घेतलं कायसंसं गणपतराव म्हणून, ते कोण ? यशोदाबाईच्या आणखी लक्ष्मीबाईच्या तोंडून देखील परवां असंच एकदा त्यांचं नांव निघालं होतं. अन् मी त्यांना विचारणार तों दुसरंच कायसंसं निघून तें विचारायचं राह्यलं. "

" विचारावंसं वाटून अन् आपण विचारायच्या राह्यलां ? वा ! मग मोठंच आश्चर्य समजायचं ! "

" कां बरं ? आश्चर्य काय त्यांत ? मला कांहीं फाजील चौकस म्हणून काढली आहे वाटतं निवडून ? "

" म्हणेल कोण नाहीं म्हणून "

" बरं, आहें मी, पण त्या वेळीं तर कांहीं विचारलं नाहीं ना ? आतां सांगायचं मला. ते दिसताहेत या मंडळींतलेच म्हणून म्हणतें. यशोदाबाई त्यांना भावोजी म्हणाल्या आणखी लक्ष्मीबाई पण तसेंच बोलल्या, तेव्हां... "

" ते गृहस्थ असेच आमचे स्नेही आहेत नानांचा आणखी त्यांचा अगदीं लहानपणापासूनचा ऋणानुबंध; विष्णुपंतांचा आणखी त्यांचा तसाच पण कांहीं कमी. माझी त्यांची आपली तोंडओळख आहे इतकंच. माणूस पण माणूस आहे म्हणतात ! "

" तेहि कायसे इथें येणार आहेत म्हणून ऐकलं. "

" हो, येणार आहेत खरें ! मींदेखील ऐकलं. "

अशा तऱ्हेनें गोष्टी बोलतां बोलतां तिकडे झोप लागली. मला मात्र केवढा वेळ झोपच येईना; गच्चीवर गेलेल्या दोन तासांची तीनतीनदा आठवण होई. तेथें काय काय बोलणें झालें त्याची मी आपली आठवण करूं लागलें. आठवतां आठवतां एका गोष्टीवरून मला दुर्गीची आठवण झाली; अर्थातच 'ती बाळंत झाली असेल काय ? तिचं आतां पुढें काय होईल ? तिची अवस्था फार कठीण; ती बाळंतपणांत आपल्या जिवाला कांहीं भलतेंसलतें नाहीं ना करून घेणार ? तिला आपल्या येथें आणायला सांपडेल काय ? तिचे आईबाप चार दिवस आपल्या घरीं तिला पाठवतील काय ? यदाकदाचित् त्यांनीं पाठवावयाचें मनांत आणलें, तरी तो मेला चांडाळ तिचा नवरा तिच्या हात धुऊन पाठीस लागला आहे तो येऊं देईल काय ?' असे नाना तऱ्हेचे प्रश्न माझ्या मनांत आले व त्यांनीं माझें मन उद्विग्न करून माझी झोप आणखी उडवून टाकल्यासारखें केलें. तथापि असें किती वेळ चालणार ? थोड्याच वेळांत मला झोप लागली. मात्र ती फार अस्वस्थ अशी लागली.

◆ ◆ ◆

## ५० : माझें दादाला पत्र

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

कित्येक वेळां असें होतें कीं, पुढें होणाऱ्या गोष्टींबद्दल आधींपासूनच चुटपुट लागते. त्यांतलीच ते दिवशीं—रात्रीं म्हणावयाचें—गोष्ट झाली. दुर्गीची आठवण होऊन तिच्या भावी स्थितीविषयीं, तिच्या बाळंतपणाविषयीं इत्यादि माझ्या मनांत उद्वेगकारक विचार येऊन मला लवकर झोप आली नाहीं; व उशिरा आली ती फारच अस्वस्थ, हें मीं आतां वर सांगितलेंच आहे. दुसरे दिवशींदेखील त्यामुळें माझ्या मनावर फारच चमत्कारिक परिणाम झाला होता. मी आपली अगदीं उदास होतें. दादाचें पत्र कां नाहीं ? ती जर बाळंत झाली असली तर तो मला कळविल्यावांचून राहणार नाहीं हें अगदीं उघड आहे, असें मला वाटत होतें. तथापि तो तिच्या घरीं जाईल काय ? तिचा नीट शोध करील काय ? असे प्रश्न माझ्या मनांत एकदोन वेळां येऊन आपणच त्याला एक सविस्तर पत्र ल्याहावें असें आलें. त्याप्रमाणें पत्र लिहिण्याचा पक्का निश्चय करून जेवणखाण झाल्यावर

विडा देण्यासाठीं खोलींत गेलें, त्या वेळीं आपला बेत कळविला. तेव्हां मला उत्तेजन देऊन " हो. हो. जरूर लिही. आणखी मी संध्याकाळीं परत आलों म्हणजे मला दाखव " असें म्हटलें. मग मी, " कागद, दऊत, लेखणी इत्यादि सर्व लिहिण्याचं सामान नीट बाहेर काढून ठेवाव " असें म्हणून आतां जाणार तों माझी हनुवटी धरून " जी हुकूम, राणी सरकार ! " असें म्हणून माझी थट्टा करायची आणि मोठयानें हसायचें. तेव्हां " पुरें मेलं, एवढी नको कांहीं मला पदवी द्यायला " असें म्हणून मी जाऊं लागलें, तों " द्यायची काय आतां ? आतां राज्यच तें आहे, नाहीं का ? " असें म्हणून हसत हसत मजकडे पाहून, आपल्याला नको का विडा ! " असें विचारलें. मी " हें काय हें ! " असें म्हणत आपली पळालेंच.

सर्व कामकाज आटोपल्यानंतर दुपारीं यशोदाबाईकडे किंवा लक्ष्मीबाईकडे न जातां खोलींत जाऊन पत्र लिहावयास बसलें. पत्र लिहिण्याचें कसें काय झालें असेल, आणखी तें कितपत शुद्ध आलें असेल याचा अजमास वाचकांना आहेच; तेव्हां मी तें पत्र साद्यन्त येथें न देतां त्यांतल्या मजकुराचा सारांश मात्र सांगतें. आम्हीं स्टेशनावरून निघाल्यापासून तो आजतागाइत सारी—म्हणजे अगदीं सारी हकीकत त्याला मीं लिहिली. चुकतमाकत पण अगदीं दर दिवशीं जी काय हकीकत घडली ती यथास्थित सविस्तर-पणें लिहिली. त्या एका पत्रानें माझी सारी दुपार घेतली. एकदोनदा माझ्या असें मनांत आलें, कीं लक्ष्मीबाईकडे जाऊन त्यांनीं कोणाला लिहिलेलीं पत्रें पाहावीं; परंतु पुनः वाटलें, कीं त्यांचीं पत्रें आपण त्यांच्याजवळ मागावीं कशीं ? बाकी, आपण लिहिलेलें सारे पत्र दाखवावें कीं नाहीं, त्या हसतील कीं काय, असें मनांत आलें हें उघडच आहे; पण शेवटीं त्याची तोड मीं अशी काढली, कीं संध्याकाळीं आल्यावर तिकडे तें पत्र दाखवावें, आणि मग जर दुसऱ्या कोणाला दाखवायला हरकत नाहीं असें म्हटलें तर मग दाखवावें.

त्याप्रमाणें घरीं येणें होतांच मला जेव्हां " पत्र लिहिलं का ? " म्हणून विचारलें तेव्हां चटकन् " हो " म्हणून उत्तर देऊन टेबलावर टिपकागदाच्या घडींत चार पांच कागद आहेत म्हणून सांगितलें. सासूबाई देवळांत गेल्या होत्या, आणखी मी सोवळ्यानें सैंपाक करीत होतें. तेव्हां तें पत्र वाचायचें तें माझ्या देखत, म्हणून ते सारे कागद घेऊन माझ्या येथें चुलीजवळ येऊन बसायचें; तेव्हां मला कसेंसेंच वाटून मीं म्हटलें-देखील, कीं " हें काय हें ? कोणी हसेलदेखील, अगदीं चुलीजवळ येऊन बसायचं तें ! चांगलं आपल्या खोलींत बसायचं तें ! "

" रिकामटेकडे लोक ? त्यांना काय हसायला होतं आहे ? घरीं आल्यावर आपल्या बायकोजवळ येऊन बसायचं नाहीं गोष्टी सांगायला तर कोणाजवळ बसायचं ? बरं आहे, आम्ही इथं नको बसायला, तर तुम्ही चला आमच्या तिथं बसायला, आमचं काय ? "

" हं ! अन् सैंपाक कोणीं करायचा मग ? "

" झालं तर मग. आम्ही येथें बसलों तर तें खपत नाहीं, आपण तिकडे यायचं नाहीं. बाई ठेवूं सैंपाकाला म्हटलं तर तें नको. मोठा जांचच आहे म्हणायचा आम्हांला ! "

" इश्शं मेलं ! जांच कसला ? आपल्या त्या लक्ष्मीबाई नाहीं तर यशोदाबाई आल्या अन् त्यांनीं पाहिलं तर काय म्हणतील, असं मनांत आलं म्हणून म्हटलं. बाकी मला नको का आहे इथं बसायला ? मला तर वाटतं नेहमीं बरोबरच असावं, निराळं होऊंच नये. "

" अस्सं ! अस्सं ! मग आतां काढूं कांहींतरी युक्ति ? "

" हं. " मी हसत हसत म्हटलें.

" पाहा हो, मागें घेशील मग ? "

" नाहीं घ्यायची ! "

" पाहा ! "

" पाह्यलं ? "

" काय पाह्यलं ! काय पाह्यलं ? काय उगीच कुठें आम्ही बसतों तिथं नेलं तर तुझ्या बरोबरीच्या बायका असतांना भेदरून गेलीस, आणखी म्हणे नेहमीं बरोबर असावंसं वाटतं. तोंडाच्या गप्पा ऐकून घ्या तेवढ्या ! "

" काय ? गप्पा काय ? काल आपला अगदीं पहिलाच प्रसंग होता म्हणून. आणखी चार दिवसांनीं पाहा. दुसऱ्या कुणाला बोलूंच द्यायची नाहीं इतकं मी बोलेन एकटी. समजलं ' "

" हो, हो. समजलं म्हणजे कसं पण ! अगदीं लख्ख ! एकटी असतांना बोलणार ना ? मग आम्ही कुठले बोलणार ! "

" पुरें मेलं ! जें बोलावं त्यावर कांहींतरी आहेच आपलं. बरं तें पत्र वाचून पाहायचं ना आतां ? "

" आतांच कशाला ? आतां रात्रीं मंडळींतच वाचूं म्हणजे झालं ! "

हे शब्द ऐकण्याबरोबर मी जी कावरीबावरी झालें ती कांहीं पुसूंच नका. माझ्या पोटांत धस्स झालें. आपलें तें वेडेंवांकडें पत्र नानासाहेब आणखी विष्णुपंत अन् त्यांच्या त्या दोघी बायका, यांच्या साऱ्यांच्या देखत वाचणार म्हणजे काय आहे तरी काय ? असें मला होऊन मी तटकन् उठून जवळ गेलें आणखी " नको नको " म्हणूं लागलें. ते माझे अर्धवट रागाचे, अर्धवट केविलवाणे असे शब्द ऐकून व तो कावराबावरा चेहरा पाहून एकदम हसून मला म्हणायचें, " का कुठें गेला आतां तो धीर ? संपला का ? नुसतं लिहिलेलं पत्र दुसऱ्यांच्या देखत वाचतों म्हटलं, तर इतकी त्रेधा, मग प्रत्यक्ष बोलण्याबिलण्याच्या त्या साऱ्या बढायांचं कसं काय ? "

हे शब्द ऐकल्याबरोबर मंडळींत वाचून दाखवितों म्हटलें तें निव्वळ थट्टेनें असें समजतांच माझ्या मनावरचें एक ओझें उचलल्यासारखें झालें व मीं " हो म्हटल्याबरोबर लागलीच धीटपणा येतो कीं काय ? येतां येतां येईल. बरं पण आतां आधीं तें पत्र वाचून पाहायचंच; सासूबाई यायची झाली आहे वेळ, मग जेवायला बसायचं होईल " असें म्हटलें, तेव्हां तें पत्र एकदाचें वाचण्यास आरंभ केला.

माझें वेडेंवांकडें पत्र, पण तें किती आवडवून घेतलें ! नेहमींचेंच तसें होतें,—कांहीं केलें तरी—एखादे वेळीं थट्टेची गोष्ट निराळी, पण—नेहमीं त्याचें गौरव करून स्तुति करून उत्तेजन द्यावयाचें ही नेहमींची रीत असे, त्याप्रमाणें याहि प्रसंगीं झालें. पुण्याहून तिकडच्या नांवचें पत्र पाठविलें त्याला असें किती दिवस झाले ? मुंबईस येऊन राहिल्यावर तर आठ दिवस पुरे झाले असतील नसतील, तर तितक्यानें सुधारणा ती काय होणार ? पण पुष्कळ सुधारणा झाली आहे, असें मला सांगून, सर्व गोष्टींबद्दल माझी स्तुति करायची. माझ्या दृष्टीनें त्यांत काय ती एकच सुधारणा झाली होती ती स्वच्छतेची होय. बाकी व्याकरणाच्या चुका, अक्षरें खाणें इत्यादि जसेंच्या तसेंच होतें म्हटलें तरी चालेल. कोठेंहि डाग नाहीं, कागद पेन्सिलीनें आंखून मग लिहिल्याकारणानें ओळी वांकड्यातिकड्या गेल्या नाहींत, अक्षरें मोकळीं काढण्याचा यत्न केल्यानें गिचमिडपणा फार कमी झाला होता; या सुधारणा मात्र अगदीं स्पष्ट दिसण्याजोग्या होत्या. आणखी या साऱ्यांचें श्रेय लक्ष्मीबाईच्या चार दिवसांच्या शिकविण्याकडे होतें.

त्या पत्राची याप्रमाणें स्तुति झाल्यामुळें मला मोठा आनंद झाला हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. दुसरे दिवशीं तें पत्र लक्ष्मीबाईस दाखवावें व नंतर टाकावें असें मला सांगितलें; पण त्यांत त्यांच्याबद्दल देखील मीं हकीकत लिहिली होती व तीहि त्यांची अनन्वित स्तुति करून. तेव्हां त्यांस कदाचित् आवडणार नाहीं व त्या असें लिहूं नका, असें म्हणतील म्हणून रात्रींच्या रात्रीं तिकडून शुद्ध करून पुनः दुसरे दिवशीं त्याची नक्कल करून पाठवूनहि द्यावें असें माझ्या मनांत होतें; पण त्या पत्रांत मीं लक्ष्मीबाईची व यशोदाबाईची फारच स्तुति केली होती. एका ठिकाणीं तर लक्ष्मीबाई म्हणजे प्रत्यक्ष महालक्ष्मीसारख्या दिसतात असें म्हटलें होतें. तेवढें मंडळींत रात्रीं काढून माझ्या पत्रांतला सारा मजकूर सांगून मला लाजवून लाजवून पुरेंपुरेंसें केल्यामुळें लक्ष्मीबाईनींच तें पत्र माझ्याजवळ मागितलें. आतां त्यांनींच मागितल्यावर मी नाहीं कसें म्हणणार ! पण त्यांत खोडाखोडी कांहीं करणार नाहीं, माझें मला जें वाटलें तें लिहिलें आहे, त्याबद्दल कांहीं बोलणार नाहीं, अशी मान्यता करून घेऊन तें त्यांच्या हातीं दिलें, त्यांनीं तें वाचून मला त्यांतल्या चुका सांगितल्या व " मान्य केलें आहे म्हणून मी आतां आग्रह धरीत नाहीं, नाहीं तर कांहीं कांहीं काढून टाकायला लावलं असतं ! " असें म्हणून त्यांनीं दुसरे दिवशीं दुपारीं आंखलेल्या कागदावर तें पत्र मजकडून लिहवून घेऊन मग पोस्टांत टाकविलें. असो. याप्रमाणें जे दिवशीं मीं पत्र टाकलें त्याच दिवशीं संध्याकाळीं माझ्या नांवचें एक पत्र कॉलेजांतून आल्याबरोबर मला दिलें. तें पत्र

दादाच्या हातचें तर खास होतें. कारण त्याचें अक्षर मीं तेव्हांच ओळखलें. पत्र हातांत घेतल्याबरोबर मला वाटलें, कीं त्यानें भलें लांबलचक पत्र लिहिलें होतें.

आतां मला तिकडची सविस्तर हकीकत कळायची ती, अशी दादाचीं लांबलचक पत्रें आलीं तरच, नाहीं तर कुठली? तेव्हां दादाचें लांबलचक पत्र पाहण्याबरोबर ताबडतोब तें फोडून वाचावें असें मनांत येऊन मीं वाचण्यास सांगितलें.

◆ ◆ ◆

## ५१ : दादाचें पत्र

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

" अनेक आशीर्वाद विशेष. वचन दिल्याप्रमाणें मी परवांच्या दिवशीं दुर्गीच्या घरीं गेलों होतों. ती सकाळींच बाळंत झाली. परंतु तिचे फारच हाल झाले असावे असा माझा समज आहे. कारण तिच्या भावाजवळ विचारून खुलासा काढतां असें कळलें, कीं तिचें तीन चार दिवस पोट दुखत असून डॉक्टरबिक्टर आणण्यापर्यंत मजल आली होती. मी तिच्या आईला भेटलों परंतु मला जास्तीकमी विचारपूस करतां येईना. तथापि जितकी चौकशी करणें शक्य तितकी मीं केली. तेवढ्या चौकशीवरून माझी अशी खात्री झाली, कीं तिचे अतोनात हाल झाले असावे. किती वेळ तरी आपलें पोट दुखूं लागलें हें तिनें कळूं दिलें नाहीं, असें तिच्या आजीच्या बोलण्यांत आलें. असो. पण ती बाळंत होऊन तिला मुलगा झाला आहे, एवढीच काय ती संतोषाची बातमी तुला ल्याहावयाची आहे. आतां बाळंतपणांत तिचें कसें काय होतें आणि काय नाहीं याची माहिती मला जशी जशी कळेल तशी तशी तुला कळवीन. मला बायकां-प्रमाणें यथास्थित बातमी लागण्याचा संभव नाहीं हें तर उघडच आहे, पण जसें तुझें दुर्गीवर प्रेम आहे, तसें—किंबहुना त्याच्याहीपेक्षां थोडेंसें जास्त, म्हटलेंस तरी चालेल—माझें प्रेम आहे. मला तिची बिचारीची इतकी कींव येतें कीं कांहीं पुसूं नये. तूं इथें असतीस म्हणजे तिच्याकडे जातीस, घटका घटका बसतीस, बोलतीस म्हणजे तिला बरें वाटलें असतें. माझें कांहीं तसें आहे ? मी बाहेरून बाहेरून काय चौकशी करीन ती, किंवा फार झालें तर 'कसं काय दुर्गाबाई ? यमुताईला—( मी दुसऱ्या-जवळ तुझ्याविषयीं बोलत असलों म्हणजे आतांशा आपल्याला हें नांव देतों. आणखी आतां पत्रांतदेखील तसेंच ल्याहायला पाहिजे असें वाटूं लागलें आहे. ) कांहीं ल्याहायचं आहे का अधिकऊणं ?' एवढें दूर उभें राहून विचारीन तेवढेंच—काय बिचारीच्या नशिबीं असेल तें खरें ! तिचा नवरा हल्लीं कायसा इथें नाहीं. चाकरी मिळवायला म्हणून कोठें गेला आहे. कसली आतां चाकरी मिळविणार आणखी काय करणार कुणास

ठाऊक ? पण मी म्हणतों गेला आहे तें एका अर्थी बरेंच आहे. बिचाऱ्या दुर्गीला बाळंतपणात त्रास तरी नको. गेला आहे तो चांगला चार सहा महिने परत येऊं नये म्हणजे बरें.

" माईसाहेबांची चित्तवृत्ति कांहीं आतांशा ठीक नाहीं. तूं ते दिवशीं ती कोण बाई आली होती म्हणालीस ती मीं पुनः दोनदा पाहिली. पण ती कां आली होती कां नाहीं कांहींच कळलें नाहीं. आजी काल रोजीं गांवीं गेली. तिनें जातांना तुला नीट असत जा, सासूची, रघुनाथरावांची मर्जी मोडूं नकोस, हट्ट करूं नकोस, असें तीनतीनदा लिहिण्यास सांगितलें आहे. मला तिनें तोच उपदेश केला. मला आतांशा कितीतरी कंटाळवाणें झालें आहे ! तूं होतीस तेव्हां आठ पंधरा दिवसांनीं तरी येऊन आपण इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगत असूं; परंतु गेल्या आठ दिवसांत मला अगदींच करमेनासें झालें आहे. दिवसांतून कितीदा तरी तुझी आठवण होते ! बरें, पण यमे,—नाहीं चुकलों—अहो यमुताई, आपण गेल्याबरोबर अगदीं इत्थंभूत हकीकतीचें पत्र लिहिणार होतां त्याचें काय झालें ? विसर पडला मला वाटतें ! आपला स्वभाव आधीं अगदींच चौकस नाहीं, आणखी त्यांत मुंबईस सारेंच नवें म्हणून म्हणतों. राहण्याची सोयबीय कशी काय आहे आज आठा दिवसांत केलें काय काय ? शेजारपाजार कोणाचा आहे तो मला कळला आहे तेव्हां आपल्या पत्रानें एकदा त्या शेजारच्या मंडळींचें वर्णन काय तें कळावें अशी इच्छा. अगदीं एक मासल्याचीच सारी मंडळी आहेत, असें रघुनाथराव मला सांगत होते ते दिवशीं. मग काय आतां आपली अगदीं चैन असेला नव्हे ? एकदा येऊन पाहिलें पाहिजे काय आहे काय नाही तें !

" बरें पण आतां आपल्या शिकण्याचें कसें काय ? मुंबईस गेल्यावर मी असें करीन, तसें करीन, अशा बढाया मारल्या त्याप्रमाणें कांहींतरी झालें पाहिजे हो. आतां पाहतों दर आठवड्याला पत्रे येतील, त्यांत काय काय फरक पडत जातो तो ! मुंबईस आतां जें जे कांहीं पाहशील, जें जें कांहीं वाचशील, तें तें सारें मला लिहून धाडलें पाहिजे. मी तर इकडल्या हकीकतीचें अगदीं सविस्तर पत्र दर आठवड्यास धाडीनच; त्याबद्दल शंका नको.

" झालें, आतां आणखी काय लिहूं ? महत्त्वाचें असें कांहीं आणखी घडलेंच नाहीं. घडलें तर ताबडतोब कळवीन. तुझ्या मामेसासरीं मी कांहीं गेलों नव्हतों. त्या तुझ्या शंकरमामंजींना पाहिलं, कीं माझ्या पायाची आग मस्तकाला जाते. परवां तो रस्त्यांत भेटला होता; मी नाहीं त्याच्याशीं बोललों पण तोच मुद्दाम आडवा येऊन मला म्हणतो, ' कां गणपतराव, आमच्यावर एवढी इतराजीशी ? ' मी आपला विशेष कांहींच न बोलतां त्या गृहस्थाच्या लघळपणाविषयीं विचार करीत चालता झालों. मला कधीं कोणत्याहि माणसाविषयीं इतका तिटकारा वाटलेला आठवत नाहीं. आपणहोऊन त्याच्याशीं बोलायला जा, तो हटकून तिकडे दुर्लक्ष करून दुसरीकडे पाहात जाणार; बरें आपण दुर्लक्ष करून न बोलतां जायला लागा, तो आडवा येऊन आपल्याशीं बोललाच म्हणून समजा. अशी कांहीं विलक्षण व्यक्ति आहे ! त्याची ती टिळाटोपी, तो भस्माचा पट्टा,

त्यावर तें आडवें गंध, अन् लोकांत बातम्या...पण मी हें करतों तरी काय ? त्या माणसाचें नांव निघालें अन् तो डोळ्यांपुढें दिसूं लागला म्हणजे कांहीं सुमार राहातच नाहीं. तुला तें ठाऊकच आहे. तेव्हां मी आणखी त्याहायला कशाला पाहिजे ? त्यांतून तो तुझा मामेसासरा, तेव्हां त्याच्याबद्दल कांहीं अधिकउणें लिहिलें तर तुला उगीच रागबिग यायचा. पण मी आतां हें लांबच लांब पत्र पुरेंच करतों. रात्र झाली आहे फार. उगीच जाग्रण कशाला करूं ! वरचेवर पत्र पाठवून सर्व हकीकत कळवीत जा. तुझीं लांबलचक पत्रें येतील तरच माझ्या मनाला कांहीं बरें वाटणार आहे. नाहीं तर इथें जिकडे तिकडे काय आहे हे तुला ठाऊक आहेच. कळावें हे आशीर्वाद."

हें पत्र आपल्याशींच एकदा वाचल्यावर आंत काय लिहिलें आहे म्हणून मला विचारलें, मी आतां मोठी धीट होत चाललें म्हणायची; कारण, मीं तें पत्र पुढें करून 'वाचून पाहायचं' असें हसत हसत म्हणालें. त्याबरोबर "तें कांहीं नाहीं, आपणच वाचून दाखवलं पाहिजे," असा आग्रह धरला. नाहीं होय म्हणतां म्हणतां मीं तें रात्रीं वाचून दाखविण्याचे कबूल केलें आणि रात्रीं खरोखरीच वाचूनहि घेतलें. मनुष्य वाचण्याच्या भरांत असलें म्हणजे कांहीं अमुक आपण वाचायचें नव्हे, तमुक वाचायचें नव्हे, असें त्याच्या ध्यानांत थोडेंच राहतें ! मीं वाचतां वाचतां पहिल्या प्रथमच आजीच्या निरोपांत तिकडचें नांव आलें होतें तें भरकन् उच्चारून गेलें आणखी मग जी माझी थट्टा केली आहे ती कांहीं पुसूंच नये. मलादेखील 'असें कसें आपल्याला भान राहिलें नाहीं ?' असें मनांत येऊन फारच आश्चर्य वाटलें आणि हसूंहि आलें.

"छे, छे, बोवा, आतांशा बायका फार सुधारल्या ! खुशाल नवऱ्यांचीं नांवं घेऊं लागल्या; उद्यां हांकादेखील मारूं लागतील नांव घेऊन. आम्ही पुरुष अजून नांव घेऊन हांका मारीत नाहीं, तोंच तुम्ही इतक्या..."

"पुरें मेलं ! अम्मळ कुठें तोंडांतून चुकून गेलं असेल नसेल तर त्याची किती थट्टा करायची ? मी अशानं पुढें वाचायचीच नाहीं. मग काय करणार ?"

"अबबब ! एवढी जबर शिक्षा नको बुवा आम्हांला. आम्ही आपली सारी थट्टा माघारीं घेतों, क्षमा मागतों त्याबद्दल .."

"हें बोलणं तरी थट्टेचंच नव्हे का ? म्हणे क्षमा मागतों ?"

"बरं पण, आम्ही कांहींच बोलत नाहीं मग तर झालं, पण पुढें वाचा एकदा म्हणजे झालं."

तेव्हां मीं पुढें तें पत्र वाचून संपवलें; व आम्ही त्यावरच बोलत होतों. पत्रांत ज्या ज्या काय गोष्टी होत्या त्या त्या साऱ्यांविषयीं आम्ही कांहीं कांहीं बोलत होतों, इतक्यांत नानासाहेब नित्याप्रमाणें वर गच्चीवर जाण्यास निघाले. ते जातांना तिकडे हांका मारून "चला, येतां ना वर ?" असें म्हणाले; तेव्हां "आलों हो" असें करीत वर जायचें. माझ्या मनांतून आज वर जावेंसें नव्हतें. कारण तें दादाचें पत्र आणखी

एकदोनदा वाचून पाहावें असें वाटत होतें. तरी तिकडे तसें सांगितलें नव्हतें तेव्हां, जावेंच असें मनांत येऊन यशोदाबाईचीहि वाट न पाहतां मी आपली तडक वर गेलें. वर आतां जातांच आज आतां अगदीं लाजायचें नाहीं असा निश्चय करून कांहींतरी बोलेनहि, असें मनांत म्हटलें. मी वर जातें तों लक्ष्मीबाई मला म्हणतात, "कसं काय सीताबाई, आज अगदीं एकट्याच वर आलांत? आणखी त्याहि हांक मारल्याशिवाय? आजची तयारी कांहीं निराळीच दिसते आहे!' त्या असें बोलताहेत तोंच यशोदाबाई आल्या. त्या म्हणतात, "तयारी तरी खरीच निराळी दिसते आहे बाई; आज माझीदेखील वाट पाहिली नाहीं म्हणून म्हणतें. बरं पण बाई उद्यांचं कसं काय? यांना न्यायचंच बरोबर!"

लक्ष्मीबाई : काढलंत का इतक्यांत? तरी दुपारपासून मी आपली विचारांत होतें कसं काढावं काय काढावं तें! अहो, यांना न्यायचं कायन् आणायचं काय? ह्यांच्याकडून का काहीं अडचण आहे? आतां मी मंडळींत काढणार होतें, कीं आपोआप झालं असतं.

यशोदाबाई : वा! मग अजून काय झालं? तिथंच काढावं म्हणजे त्यांना कांहीं नाहीं म्हणतां यायचं नाहीं. कांहीं नाहीं.

लक्ष्मीबाई : पण आधीं त्या नाहीं म्हणतीलच कां?

हें त्यांचें असें बोलणें चाललें असतां मला अगदींच भांबावल्यासारखें झालें. ह्या बोलताहेत हें आहे काय? नाहीं म्हणणार नाहींत काय? आणखी हो म्हणतील काय, मला कांहींच कळेना. आपलें वेडयासारखें होऊन मी त्यांचेकडे पाहूं लागलें व "तुम्ही म्हणतां काय? मला कांहींच कळत नाहीं," असें म्हणून त्यांना विचारूं लागलें. तों यशोदाबाई हसून म्हणतात, "चला आतां वर, एकदमच सांगतें." त्या दोघीहि वर जाण्यास निघाल्या. मीं आज अगदीं भ्यायचें नाहीं असा निश्चय केला होता; पण काय मेला तो निश्चय! गच्चीच्या दाराशीं मंडळी दृष्टीस पडल्याबरोबर पाय आपोआप मागें होऊन मान खालीं झाली. इतका संवयीचा विलक्षण जोर! तथापि तशीच लाजत पण पुढें जाऊन मी आज कोणाच्या आग्रहाची वाट न पाहतां कोचावर बसलें; पण मन अजून स्थिर नव्हतें. इतक्यांत यशोदाबाई नानासाहेबांकडे पाहून त्यांना म्हणतात, "उद्यां सीताबाईंना आम्ही आपल्याबरोबर नेऊं का?"

नानासाहेब : आम्हांला काय विचारतां बोवा? त्या आहेत, त्यांचे यजमान आहेत. आपणय् इथेंच आहां. मधल्या मधें आम्हांला कां हें? का हो विष्णुपंत?

विष्णुपंत : उघडच आहे. आतां रघुनाथराव प्रत्यक्ष इथें आहेत, खुशाल त्यांना विचारावं.

लक्ष्मीबाई : मग त्यांनाच विचारलं आहे. दुसऱ्या कोणाला विचारायचं असतं, तर इथं कशाला विचारलं असतं?

नानासाहेब : ठीक, ठीक. आमच्याकडे पाह्यचं अन् दुसऱ्याशीं बोलायचं ही नवीनच खुबी कळली आम्हांला आतां; तरी हरकत नाहीं. रघुनाथराव, द्या बोवा उत्तर.

रघुनाथराव : उत्तर काय द्यायचं बोवा ? पुण्याहून आणून आपल्या स्वाधीन केल्या आहेत. जिथं वाटेल तिथं जावं, काय पाहिजे तें करावं, आमची परवानगी विचारण्याची जरूरच नाहीं. जाणारांची मर्जी असली तर......

लक्ष्मीबाई : हें असं नाहीं उपयोगी ? मर्जी काय, त्यांना आम्हीं म्हटलं तर त्या येणारच पण सासूबाईंचं कसं काय ?

रघुनाथराव : तें आपलं तुमचं तुम्हीं पाहून घ्यावं. गोपिकाकाकूंच्याकडून गोष्ट काढावी म्हणजे झालं.

नानासाहेब : बस बस; तिकडून अगदीं काम बेमालूम होणार.

यशोदाबाई : ( रघुनाथरावांकडे पाहून ) तें खरं, पण आपल्याकडून तर कांहीं हरकत नाहीं ना ? सासूबाईंचं माझ्याकडे लागलं.

रघुनाथराव : मग आमच्याकडून कसली हरकत आली आहे ? अन् आम्ही हरकत करून आत्तांच्या बायका ऐकणार ? त्या आतां खुशाल आम्हांला नांवानं हांका मारूं लागल्या ! विचारा खोटं असेल तर ?

हा आरोप मजवर करतांच मीं ताबडतोब म्हटलें, " नाहीं हो, माझ्या लक्षांत राहिलं नाहीं; आणखी दादाच्या पत्रांत नांव लिहिलं होतं तें चुकून वाचलं. " हे शब्द माझ्या तोंडांतून निघतात तोच तिकडून मोठ्यानें हसायचं, त्याबरोबर सर्व मंडळीहि हसली; पण अर्थातच त्यांनीं आपलें हसें दाबून धरलें; तितक्यांत लाजेनें माझी फारच तारांबळ उडाली, असें पाहून माझी बाजू सावरण्यासाठीं लक्ष्मीबाई म्हणतात, " सीताबाई, तुम्ही काय असं हें करतां हो ? बरं, घेतलं तर घेतलं नांव; यांचंच घेतलं ना ? कांहीं दुसऱ्या कोणाचं तर नाहीं ?

रघुनाथराव : वाहवा ! दुसऱ्या कोणाचं घेतलं तर काय हरकत होती ? नवऱ्याचं नांव घेण्यांत, नवऱ्याशीं बोलण्यांतच काय ती लाज ? दुसऱ्या कुणाशीं बोललं तर कांहीं नाहीं; पण मर्यादा काय जी भरली आहे ती सारी नवऱ्यानं बायकोशीं आणखी बायकोनं नवऱ्याशीं बोलण्यांत अगर एकमेकांचीं नांवं घेण्यांतच आहे ! तेवढं केलं, कीं गेली मर्यादा ! झाला साऱ्यांचा अपमान ! काय भिकार चाली आहेत ! म्हणे आम्ही आपल्या बायकोशीं लोकांच्या देखत बोलूं नये अन् तिनं तर आमच्याकडे पाहूंदेखील नये !

नानासाहेब : खरंच बोवा, मूर्खपणाच्या या गोष्टी; अगदीं यःकश्चित्; पण केव्हां जातील तेव्हां खऱ्या ! आम्हांला कांहीं त्याचा फारसा अनुभव नाहीं म्हणा.

विष्णुपंत : अन् आम्हांला तर मुळींच नाहीं म्हणा. आमच्या काकांनीं तर लग्न लावलं तेव्हां मजाच केली.

लक्ष्मीबाई : बरं पुरे. सगळ्या गोष्टी...

विष्णुपंत : बरं का रघुनाथराव, आम्ही तो लाजाहोम करायला लागलों तेव्हां तीनतीनदा उपाध्येबोवा हाताला हात लावायला सांगत, आणखी एक माणूस कांहीं लावीना. लाजूं लागलं. तेव्हां काका जवळच होते. ते म्हणतातः--" अरे, काल परवां एकमेकांशीं बोलत होतां आमच्या देखत, झोपाळ्यावर बसून गुलगुल गोष्टी सांगत होतां अन् आतां लाजायला लागलां का बेट्यांनो ? " अन् जी म्हणतां सगळी मंडळी हसली ! आणखी एक माणूस तर असं कांहीं खजील झालं, कीं कांहीं विचारूंच नका. अन् दुसरे दिवशीं तर काकांनीं आम्हांला दोघांना एकीकडे नेऊन स्पष्ट सांगितलं, कीं " तुमचं जें लग्न करून दिलं तें कांहीं लाजाय्‌बिजायला करून दिलं नाहीं. आजपर्यंत जसं तुमचं चाललं आहे असंच पुढें चालूं द्या. " मी बोवा तेव्हांपासून अगदीं खुशाल पहिल्याप्रमाणें वागायला लागलों. हीच मात्र लाजूंबिजूं लागली. अन् राधाकाकूंची थोडीशी तिला फूस. पण आमचे ते दाजिबा असत ते व मी मिळून तें सारं पुढं नाहींसंच केलं.

नानासाहेब : आम्हांला विशेषशी अडचण पडली नाहीं. आमच्या इकडे आमच्याय् पलीकडे तयारी म्हटली तरी चालेल.

यशोदाबाई : कांहींतरी आपलं सांगायचं झालं. म्हणे आमच्याकडे आमच्याय् पुढें तयारी !

रघुनाथराव : आणखी आमच्याकडे कशी काय तयारी आहे तें आपल्याला दिसतंच आहे.

याप्रमाणें सारें बोलणें झालें. थोडया वेळानें आम्ही आपल्या जागीं गेलों, पण आम्हांला उद्यां जायचें तें कुठें ? आणखी त्याला परवानगी कसली ? मला कांहींच कळलें नाहीं. तेव्हां अर्थातच खालीं आल्यावर मीं विचारलें. पण मला किती वेळ नुसतें, " मला कांहीं ठाऊक नाहीं; त्या लक्ष्मीबाई म्हणत होत्या, म्हणून मीं आपलं हो म्हटलं. त्या दोघी जिथें जातील तिथें आपल्याला जायला यत्किंचित्‌देखील हरकत नाहीं, " असें चाललें होतें. परंतु हसण्यामुळें मी समजलें, कीं तिकडे कुठें ? काय ? तें पक्कें ठाऊक असून सांगत नाहींत. तेव्हां मीं हट्टच घेतला, तेव्हां मग सांगायचें, कीं " कुठें बायकांची सभा आहे का कायसंसं आहे जवळच तिथं जायचं झालं, आणखी काय ? "

" सभेला ! " मीं अगदीं चकित होऊन विचारलें. " त्या दोघी सभेला जाणार आहेत ? अगबाई !...... "

" अगबाई ! काय ग बाई झालं ! " मला हसून वेडावून दाखवून म्हणायचं. " सगळं गांठोडं बुडालं वाटतं अगदीं ! सभा म्हटलं कीं झालं अगदीं ना ? "

मी आश्चर्यानें गोंधळून जाऊन अगदीं स्तब्धच बसलें होतें. मला काय बोलावें तेंच सुचेना. एवढें बरीक वाटलें, कीं आपण जाण्याचें कबूल करूं नये. बायकांनीं

आणखी सभेला जायचें म्हणजे आहे तरी काय ? सासूबाईंना हें आवडणार कसें ? पुण्यास कळलें तर काय म्हणतील ! शंकरमामंजी तर आकाशपाताळ एक करून टाकतील; कारण त्यांना काय, कोणाचें इतकेंसें उणें सांपडलें कीं पुरें, त्यांनीं मग त्याची पाठ पुरवलीच म्हणून समजावें. आणि आधीं त्यांचें, आमच्या बिऱ्हाड करण्याविषयीं वगैरे काय बोलणें संवरणें होतें हें मागें लिहिलेंच आहे. असो.

माझें आश्चर्य थोडेंसें कमी झाल्याबरोबर मीं लागलीच म्हटलें, " मला कांहीं बाई उद्यां जावंसं वाटत नाहीं. एक तर सासूबाईंना तें खपायचं नाहीं. दुसरं, पुण्यास घरीं कळलं तर काय म्हणतील, कांहीं येतं का ध्यानांत ? "

" काय म्हणणार आहे कोण पुण्यांत ? अन् म्हटलं म्हणून एवढं कशाला आपल्याला त्याचं पाहिजे भय ? अन् त्यांना कोण जातंय् सांगायला ? गोपाळमामा एक अक्षरसुद्धां उच्चारणार नाहींत. मला ठाऊक आहे त्यांना हें सारं हवंसं वाटतं, अन् ते कांहीं त्याच्या विरुद्ध नाहींत. आतां धाकटी मामीच जरा ही पडली त्यामुळें ते......"

" त्यांचं एक असूं द्या, पण शंकरमामंजी आहेत ते, त्यांची काय ?..."

मला पुरतें बोलूंसुद्धां दिलें नाहीं. मध्येंच " पुरें झालं, त्यांचं नांवदेखील काढूं नकोस माझ्याजवळ; त्यांना मुळींच विचारीत नाहीं. त्यांचीं ढोंगसोंगन् टिळाटोपी सारीं मला ठाऊक आहेत. स्वतःचं आचरण हवं तसं वेडंवाकडं अन् आव घालतात जुन्या लोकांचा ! अशा माणसाला का मी भिणार आहें ? आहेत मामा तेव्हां आपलं..."

असें निकराचें बोलणें झाल्यावर मग मी काय बोलणार ? एकट्या सासूबाईंचीच काय ती सबब पुढें करून बोलूं लागलें; पण ती सबब तेव्हांच दूर होणार हें माझें मलाच वाटत होतें. कारण यशोदाबाईंची सासू यशोदाबाईंना जाऊं देते, तर आमच्या सासूबाई मला त्यांच्याबरोबर जाऊं देण्याला मुळींच आड येणार नाहींत असें वाटलें. त्यांतून त्या गोपिकाकाकूंच्या धोरणानें चालून त्या दोघींचें हल्लीं मोठें चांगलें जमलें होतें. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्या आपल्या दोघी बहुतकरून देवधर्मांत असत. गोपिकाकाकूंच्या तोंडून मी तीनचारदा पुढील उद्गार ऐकले : " काकू, तुम्ही आतां आपलं माझं व्रत धरा. अहो, मुलगे आपले वेडे नाहींत; सुना चांगल्या कर्त्या आहेत; आपण म्हणूं तें कधीं मोडायच्या नाहींत. मग त्यांचीं तीं आपलीं कांहीं करीनात ! वावगं वर्तन कांहीं त्यांच्या हातून व्हायचं नाहीं याबद्दल माझी खात्री आहे, तुमची असेलच. " नानासाहेबांच्या आईचा हा एक विलक्षण स्वभाव, व त्यांचा आपल्या मुलावरचा व सुनेवरचा विलक्षण भरंवसा, हा आमच्या फार पथ्यावर पडला. त्यांच्या संगतीनें माझ्या सासूबाई इतक्या कांहीं त्यांच्यासारख्या वागूं लागल्या, कीं कांहीं पुसूं नये. कोणी म्हणेल दोघी निरनिराळ्या नाहींतच. आणखी बरोबरच आहे. दोघीहि अगदीं बहुतेक सारख्या स्थितींतून निघाल्या होत्या. दोघींचीहि सारी भिस्त काय ती आपआपल्या मुलांवर—दोघींचेहि मुलगे अगदीं नांवारूपाला येऊन त्यांच्या सेवेंत तत्पर. त्यांना काडीइतकेंहि दुःख न देणारे. दोघींच्याहि

सुना—आतां येथें कोणी कदाचित् मजवर आत्मस्तुतीचा दोष घालतील, पण खरें तें बोलण्यांत त्या दोषाची भीति बाळगण्याचें कारण नाहीं—त्यांच्या मर्जीबाहेर मुळींसुद्धां न जाणाऱ्या, त्यांना आपल्या लेकीपेक्षां अधिक वाटाव्या अशा होत्या. मग काय ? त्यांतून पहिल्या पहिल्यानें एकदोनदा गोपिकाकाकू नानांना कांहीं गोष्टींवरून थोडेंसें बोलल्या, तेव्हां त्या वेळेपुरती ती गोष्ट सोडून देऊन, पण त्यांनीं आपल्या आईचें समाधान करून पुढें तिचें मन वळवून आज या स्थितीला गोष्टी आल्या होत्या. त्या नानासाहेबांच्या कृतीचा आज आम्हांला कितीतरी फायदा झाला.

◆ ◆ ◆

## ५२ सभेला गेलें !

* * * * * * * * * * * * * * *

आजपर्यंत सभा हा शब्द कानांनीं ऐकण्यापलीकडे मला त्याची यत्किंचित्‌देखील माहिती नव्हती. सभा म्हणजे चार पुरुष एका ठिकाणीं जमून कांहीं बोलणें, असा अर्थ आपला मला ऐकून माहीत. तोदेखील दादामुळें. तो पुण्यांत केव्हां केव्हां हिराबागेंत सभेला जात असे, तेव्हां तो घरीं आल्यावर त्याला मीं माझ्या स्वभावाला अनुसरून सगळी इत्थंभूत हकीकत विचारायची, आणि त्यानें ती मला सांगायची. परंतु पुष्कळ काळपर्यंत पुढें सभा या शब्दाचा अर्थ पुरुषमंडळींनीं एका ठिकाणीं जमून कांहींतरी बोलणें असाच मी समजत असें. बायका आणि सभा हे शब्द एका ठिकाणीं माझ्या स्वप्न-स्वप्नांतरींदेखील मला माहीत नव्हते. ते आज ऐकण्याबरोबर माझ्या मनाची काय अवस्था झाली आणि त्यानें मी सारा दिवस किती अस्वस्थ झालें याची कल्पना अनुभविकाखेरीज कोणालाहि येणें शक्य नाहीं. आपल्यावर तेथें न जाण्याचा प्रसंग येईल तर बरा—निदान या खेपेला तरी बरा—असें किती वेळां तरी माझ्या मनांत आलें ! एकदादोनदा मीं त्याप्रमाणें जवळ बोलूनहि दाखविलें; " परंतु तें कांहीं नाहीं, लक्ष्मीबाई आणि यशोदाबाई सांगतील त्याप्रमाणं करावें, " असें उत्तर मिळालें. पण त्यांतल्या त्यांत थोडेंसें असें म्हटलें तरी चालेल, कीं मला मधून उगीच एखादे वेळ असेंहि वाटे, जाऊन पाहावें तर खरें, काय आहे काय नाहीं तें ! अशी कांहीं मनाची लटपट चालतां चालतां दुपार झाली. खालचें कामबीम आटपून मी झटकन् लक्ष्मीबाईकडे गेलें व त्यांना सर्व हकीकत विचारूं लागलें. त्यांनींहि हसत हसत मला सर्व सांगितलें. इतक्यांत यशोदाबाईहि वर आल्या. त्या एकदम मला म्हणतात, " सीताबाई, तुमच्या सासूबाई कांहीं तुम्हांस पाठवीत नाहींत, मग कसं काय ? "

आतांपर्यंत माझा समज होता, कीं आपल्याला जायला नको आहे; परंतु आतां जी माझ्या मनाची स्थिति झाली तीवरून असें स्पष्ट दिसलें, कीं खरोखर मला

जावेंसें वाटत आहे. कारण यशोदाबाईंचे ते शब्द ऐकून माझ्या मनाला थोडेंसें निरासल्यासारखें झालें. असें वाटलें कीं, या दोघी जर जाताहेत तर आपल्या सासूनें आपल्यालाच कां बरें जाऊं देऊं नये ? पण हा विचार किती—एक क्षणभरच मनांत आला असेल. लागलीच वाटलें, कीं त्यांनीं केलें तेंच बरें; व लागलींच मीं यशोदाबाईंना म्हटलेंसुद्धां, कीं "अहो, बरोबरच आहे. तुमची गोष्ट निराळी आहे, अन् आमची निराळी आहे. अजून आम्हांस बिऱ्हाड करायला लागून चार दिवस झाले नाहींत, तों इतक्या स्वतंत्रपणानं वागून कसं चालेल बरं ? आमच्या घरीं जर पुण्यास कळलं तर आमच्या आजेसासूबाई पुनः घरांत पाय घालूं देणार नाहींत अशा कर्दनकाळ आहेत !"

"तुमच्या आजेसासूबाई काय असतील त्या असूं द्यात आपल्या ! पण सासूबाई तर कांहीं तशा दिसत नाहींत. त्यांच्याजवळ मीं नुसती गोष्ट बरीक काढली, कीं 'आज आम्ही दोघी बाहेर जाणार आहोंत, सीताबाईंना नेऊं का ?' तर त्यांनीं लागलीच सांगितलं, 'हं घेऊन जा.' मला वाटतं, आधींच तुमच्या यजमानांनीं कांहीं सांगून ठेवलं होतं. कारण, इतके इतके कसे ते त्यांनीं आढेवेढे घेतले नाहींत, यामुळें वाटतं, दुसरं कांहीं नाहीं."

"अहो, सासूबाईंचच एक काय घेऊन बसलांत ! पण दुसरी किती मंडळी आहेत घरीं आम्हांला बोलायला ! आम्ही इथें आलों म्हणून काय झालं ! बरं पण, खरंच का त्यांनीं तुम्हांला सांगितलं न्या म्हणून ? तुम्हीं काय म्हणालांत त्यांना ?"

"मीं हे सांगितलं हें, हेंच म्हटलें. आणखी कांहीं नाहीं."

"मग काय उपयोग ? अहो, सभेला म्हणून सांगितलंत का ? तसं सांगून जर त्यांनीं कबूल केलं तर खरं !"

"तसं कसं सांगावं बाई ? पण माझं ऐका. त्यांनीं कांहीं विचारलं नाहीं, तर कांहीं सांगूं नये. विचारलं म्हणजे मग सांगूं. तुम्ही अगदीं भिऊं नका. आमच्या सासूबाई त्यांचं सारं ठीक करतील."

त्यांनीं असें सांगितल्यावर माझें मन जरा कचरलें, आणि हें असें कांहीं उपयोगी नाहीं असें वाटून मीं त्यांना म्हटलें, "तसं कांहीं उपयोगी नाहीं. यांना कळवून परवानगी मिळाली तरच ठीक. नाहीं तर......"

इतक्यांत लक्ष्मीबाई मध्येंच म्हणाल्या, "दम धरा, मी जाऊन एकदा विचारून येतें त्यांना. पाहूं बरं त्या काय म्हणतात तें. त्यांना युक्तीनें सांगतें." असें म्हणून त्या गेल्या. मीहि आडून ऐकण्यासाठीं त्यांच्या पाठोपाठ जाऊन आड उभी राहिलें. माझ्या मागोमाग यशोदाबाई आल्या. त्या पुढेंच गेल्या.

लक्ष्मीबाईनीं गेल्याबरोबर इकडे तिकडे थोडेंसें बोलून, "आज आम्ही संध्याकाळीं बाहेर जाणार आहोंत, सीताबाईंना धाडतां का ?" म्हणून म्हटलें. तेव्हां, "हं, खुशाल

जा घेऊन. तुमच्याबरोबर न जायला काय झालं ? मघाशींच मीं यशोदाबाईना नाहीं का सांगितलं ? असं कुठं जायचं आहे ? पाहायलाबिहायला जायचं आहे कीं काय ? मीदेखील आलें... ”

“ आतां ह्यापुढें काय बोलणार अशी भीति वाटून मला काय झालें आणखी काय नाही, त्याची कल्पनाच करावी. मला वाटलें कीं, ह्या आपण येतों असें म्हणतात; पण तितक्यांत लक्ष्मीबाईनीं म्हटलें, “ छे, पाह्यला नाहीं कांहीं; आमच्या बरोबरीच्या कांहीं बायका आहेत. त्या इथें जवळच जमणार आहेत, तिथं जायचं आहे झालं. लांब नाहीं कांहीं ! ”

“ जा. जा. पण लवकर आपल्या दिवसा उजेडीं परत या हो ? ”

हें त्यांचे उद्गार ऐकून मला काय आनंद झाला पण ! प्रथम जावें कीं न जावें असें वाटत होतें, तें सारें विसरलें. आतां जायचें न जायचें हा प्रश्नच उरला नाहीं. जाण्याची वेळ होते केव्हां आणि मी जातें केव्हां असें मला झालें.

चार वाजण्याची वेळ झाली. वेणीफणी नीट करून मी तयार झालें. दागदागिन्यांची व्यवस्था ठीकच होती, त्यामुळें ते घालण्यासंवरण्यास फारसा वेळ लागला नाहीं ! चांगलें लुगडें नेसून चोळी घालून--मुंबईस कुठें जायला यायला लागेल म्हणून आजेसासूबाईनीं एक जुनी शालजोडी दिली होती, ती घेऊन मी तयार झालें. इतक्यांत लक्ष्मीबाईहि आल्या. त्यांनी पाहिलें तों कांहींच थाट केला नव्हता. त्या आपल्या नेहमीं जशा असत तशाच--फक्त एक लुगडें मात्र बदललेलें. आणखी पायांत जोडा, अंगावर शालजोडी हा काय तो त्यांचा थाट. त्याचप्रमाणें यशोदाबाईचा. माझ्या पायांत जोडाबिडा कांहीं नव्हता, पण त्याचें मोठेंसें कांहीं न वाटतां आम्ही तिघीहि निघालों. बरोबर लक्ष्मीबाईचा गडी होता.

सभेची जागा आमचे बंगल्यापासून जवळच होती. तेथें आम्ही जातों तो आणखी सात आठ स्त्रिया आल्या होत्या; त्यापैकीं दोघींनीं “ लक्ष्मीबाई, उशीरसा केलांत ? ” असें म्हटलें व त्या मजकडे मोठया चमत्कारिक रीतीनें पाहूं लागल्या. मला फारच विलक्षण वाटून मी वेडयासारखी इकडे तिकडे पाहूं लागलें. मला असें वाटलें, कीं ‘ हें आहे तरी काय ? आपण आलों आहोंत कुठें ? या बायका कुठल्या ? यांची सभा ती कसली ? ’ असे अनेक प्रश्न मनांत येऊन माझें मन जरा गोंधळलें व मला फारच लाज वाटूं लागली. दुसरें असें झालें, कीं या साऱ्याच बायका लक्ष्मीबाई व यशोदाबाईसारख्या हुशार व विद्वान् असून मी मात्र वेडयासारखी यांच्यांत येऊन पडलें. असें माझ्या मनांत आलें आणि त्यामुळें माझा कमीपणा मला फारच वाटूं लागला. असो.

ते दिवशीं एक बाई ‘ लहानपणीं लग्नें करणें ’ यावर निबंध वाचणार होती असें मला तेथें गेल्यावर कळलें. तोंपर्यंत आज येथें काय आहे, आणखी काय नाहीं हें मला ठाऊकच नव्हतें. सभा आहे, तेव्हां असें कांहींतरी असेल ही कल्पनाहि आली नाहीं.

किती वेळ झाला तरी आणखी कांहीं बायका येतील म्हणून वाट पाहून शेवटीं होत्या तेवढयांतल्या तेवढयांतच एकीस अध्यक्ष करून सभेच्या कामास सुरुवात झाली. आजपर्यंत मीं सभा म्हणजे काय असते हें पाहिलेंच नव्हतें; तेव्हां मला तें सारेंच नवें. साऱ्यांचीच मला मौज वाटली. अध्यक्ष काय, आणखी निबंध वाचायचा काय, हें आहे तरी काय ? आणखी हें सारें करणार कोण ? तर केवळ बायका ! असा सारा प्रकार असल्यावर मला कौतुक वाटलें यांत नवल काय ? ज्या बाई निबंध वाचणार होत्या, त्यांचें नांवगांव मी आतां येथें सांगत नाहीं. त्यांची माझी पुढें चांगली ओळख पडली आणि अजूनहि त्यांचीं मला पत्रे येतात—म्हणूनच मी त्यांचें नांव येथें सांगत नाहीं. असो. त्यांनीं जो निबंध लिहिला होता तो कांहीं विलक्षण, असें आजमितीला जरी मला वाटत नाहीं तरी पण त्या दिवशीं मला असे वाटलें, कीं ही विद्वत्ता या बायकांना आली तरी कुठली ? माझ्या जन्मांत कधीं मीं अशा बायका पाहिल्या नव्हत्या, आणखी त्या या अशा शिकलेल्या, हुषार ! तेव्हां मुंबईतल्या साऱ्याच बायका विद्वान् असें मला वाटलें यांत नवल नाहीं. ते दिवशीं मी अगदीं चकित झालें. त्या निबंध वाचणारणीनें जे काय मुद्दे लिहिले होते, व लहानपणीं लग्न झाल्यावर कित्येक वेळां नवरा पुढें मूर्ख निघून व ज्या गोष्टींचीं पांच सात वर्षे ओळखदेखील होऊं नये, अशा अनन्वित गोष्टी घडून सर्वथा हानि कशी होते याचें वर्णन जें दिलें होतें तें ऐकून माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला; इतकेच नव्हे, तर निबंध वाचणारणीचें निबंध वाचणें झाल्याबरोबर आणखी एक दोघी स्त्रिया असेंच कांहींबाहीं बोलल्या. आमच्या लक्ष्मीबाईहि थोडेंसें बोलल्या; तेव्हां मलाहि आपण बोलावें व त्यांत बिचाऱ्या दुर्गीच्या चरित्राची सर्व कहाणी सांगून द्यावी असें वाटूं लागलें. आधींच आदले दिवशीं तें पत्र आलेलें होतें, तें मनांत घोळत होतें, आणखी त्यांत त्या दोघीतिघींनीं निरनिराळया गोष्टी सांगून त्यांचीं चित्रें मांडलीं, तेव्हां मला तिची बिचारीची सर्व हकीकत आठवावी यांत नवल काय ? मला खरोखरीच असें वाटलें, कीं आपण कांहींतरी बोलावें; पण असली स्फूर्ति क्षणमात्र टिकून लागलीच नाहींशी कशी होते याचा अनुभव—मला वाटतें, आम्हा बायकांची गोष्ट कशाला—पण पुरुषांनाहि पुष्कळ असेल. बोलावें असें मनांत येण्याबरोबर लागलीच उरांत धडकी बसली. आणखी वाटलें, कीं कोणीतरी आंतून धाडधाड धडके देत आहे. शेवटीं फार उशीर झाला, तेव्हां सभा संपून आम्ही लवकर घरीं आलों. घरीं येतों तों स्वाऱ्या घरीं आल्या होत्या, आणखी माझी वाटच पाहायची होती. आम्हांला येतांना पाहिल्याबरोबर आंत जाऊन मी जों वर जातें तों " यावं बाईसाहेब, आतां काय सभा करायला लागलां काय ? आतां बघा काय होणार आहे तें. सारं वर्तमानपत्रांत छापून येईल, तुझं नांव त्यांत छापतील, आणखी तें पुण्यास कळेल, अन् मग..." हीं अक्षरें तोंडावाटें निघाल्याबरोबर माझ्या पोटांत कसें धस्स झालें म्हणतां ! मी अतिशय घाबरलें. आतांपर्यंत सभा वगैरे पाहून जो काय आनंद झाला होता, जो काय हुरूप आला होता तो सर्व जेथल्या तेथें विरला.

तिकडचें म्हणणें अगदीं खरें वाटलें. आतां आपली ही सभा खरोखरीच पुण्यापर्यंत जाणार आणखी आपल्या नांवाचा भंडवडा होणार, अशी माझ्या मनाची समजूत झाली. " खरं कीं काय? खरं कीं काय!" करून मीं घाबरून दोनदां विचारलें. पण सरळ उत्तर न मिळतां ' शंका कशाला " असें म्हणून नुसतेंच हसायचें, तेव्हां शेवटीं मीं अगदीं रड-कुंडीला येऊन म्हटलें, " इतकं सगळं ठाऊक होतं तर मला जा जा म्हणून पाठीस काय म्हणून लागायचं? बरं आहे. एकएकदा माणसाला ठेंच लागते. पुनः कानाला खडा!" असें म्हणत असतां माझ्या डोळ्याला खरोखर पाणी आलें. तें पाहण्याबरोबर, अरेरे! अगदीं इथपर्यंत का मजल आली? वेडी कुठली? तुमची चार बायकांची सभा ती काय? आणखी तिचं कोण काय छापायला बसलं आहे? अन् त्यांतून छापलं तर छापलं. त्याच्याबद्दल एवढं भ्यायला कशाला पाहिजे? बरं पण, कसं काय झालं सभेंत, सांगा पाहूं आम्हांला आधीं!"

" कांहीं झालं नाहीं सभेंत! सभा नव्हतीच मुळीं! पण आधीं मला खरंच सांगायचं, खचितच कां नांवें छापून येतील?"

" त्याच्याशीं तुला काय करायचंय्? आपली सभेची हकीकत सांग मला काय झाली ती. अध्यक्ष..."

" मला पक्कं काय तें सांगितल्याखेरीज मी कांहीं सांगायची नाहीं."

" पक्कं पक्कं तें काय सांगायचं? एकदा सांगितलं ना कोणी कांहीं छापीत नाहीं अन् छापलं यदाकदाचित् तरी आपल्याला त्याची पर्वा करायची जरूर नाहीं म्हणून."

" हो, पर्वा करायची नाहीं तर काय करायचं? हें असं कांहीं छापून येऊं द्या, कीं शंकरमामंजींनीं आजेसासूबाईंना वाचून दाखवून जर आग लावली नाहीं, तर काय म्हणाल तें ऐकेन!"

" विचारतो कोण त्यांच्या त्या आग लावण्याला? मोठें मिरवताहेत जुनेपणाचा टेंभा! फुकट कांहीं सांपडलं कीं मग हवं तें चालतं. पदराला खार बरीक लागतां कामा नये!"

" त्यांचं तें काय हवं तें असो. पण—"

" पण नाहीं अन् बीण नाहीं. मला आधीं काय काय झालं तें सांगा."

" आतां आधीं दम धरायचा. सासूबाई यायच्या आधीं मला सोंवळें नेसून सैंपाकाला लागूं द्यावें, मग तिथं बसून काय काय झालं तें सारं सांगेन." असें म्हणून मी आपल्या उद्योगाला लागलें. व एकीकडे झालेली हकीकत सारी सांगत होतें. सांगतां सांगतां, हेंदेखील सांगितल्यावांचून ठेवलें नाहीं, कीं मला बोलावेंसें वाटलें, आणखी दुर्गीची हकीकत जशी मीं पाहिली होती तशी सांगावी. तें ऐकण्याबरोबर ' मग कां नाहीं बोललीस!' असा प्रश्न येईल असें मला वाटलेंच होतें. आणखी त्याचप्रमाणें तो आलाच.

इतकेंच नव्हे, तर " असं नाहीं उपयोगी. तूं ती हकीकत सारी लिहून काढून पुढें एखाद्या प्रसंगीं अशीच सभेंत जाऊन वाच, " असा आग्रह चालविला. पण इतक्यांत सासूबाई आल्या, त्यामुळें तें तितकेंच राहिलें. तथापि रात्रीं ती गोष्ट निघालीच. आणखी तीहि कुठें ? तर रात्रीं सगळी मंडळी एकत्र बसली असतांना तिथें ! आमच्या इकडे आपलं आंत-बाहेर कांहींच नाहीं. भर मंडळींत आपलें सांगायचें कीं, " बोवा, आपल्या बायकोची एक मैत्रीण आहे अगदीं लहानपणची. तिची हकीकत मोठी चमत्कारिक व हृदयद्रावक आहे. तेवढी लिहून वाचावी एकदा सभेंत, असं मी हिला सांगतों आहें. यांत काय बोवा वावगं आहे ? आजच आपण उठून उभं राहून सांगावी असं तिला वाटलं होतं, पण..."

" वा ! हें नव्हतं मला ठाऊक ! मीं सांगितलं असतं तिथं तेव्हांच, आमच्या सीताबाईंनीं स्वतः पाहिलेली एक गोष्ट त्या सांगतील म्हणून, " यशोदाबाई एकदम म्हणाल्या !

" मींदेखील विचारलं असतं मला हें ठाऊक असतं तर ! " लक्ष्मीबाई म्हणाल्या.

" बरं, आतां तिथं नाहीं तर नाहीं, पण इथं तर कांहीं सांगायला हरकत नाहीं ? इथंच सांगावी एकंदर दुर्गीची लहानपणापासूनची हकीकत. जें तिथं बोलायचं होतं तेंच इथं बोलावं."

हे तिकडचे शब्द ऐकून मला असा कांहीं राग आला कीं कांहीं पुसूं नये; पण काय करायचें ? मी आपली मुकाटयानें बसलें. माझी खरी स्थिति लक्ष्मीबाईंनीं ओळखून त्या एकदम म्हणाल्या, " त्यांना असं हिणवावं काय म्हणून ? त्या कांहीं बोलणार नाहींत का काय सभांमधून ? तुमचं इतकं म्हणणंच असलं तर पाहा बरं त्या सगळी हकीकत लिहितात कीं नाहीं ? "

तें त्यांचें बोलणें ऐकून मलाहि थोडीशी हिंमत येऊन मीं म्हटलें, " खरोखरच तर मग, मला जशी वेडीवांकडी येईल तशी लिहून काढीन. त्यांत काय मोठंसं आहे ? "

यशोदाबाई : अश्शी ! अशी हिम्मत धरा हो तुम्ही सीताबाई. पुरुषांना किनई वाटत असतं, कीं सगळा धीटपणा, सगळी विद्वत्ता, आपल्याकडे आहे. कालच दुपारी आपण त्या बाईचं चरित्र वाचलं नाहीं लक्ष्मीबाई ! तसं एक तरी उदाहरण आहे आमच्याकडे— बायकांत राहूं द्या, पण पुरुषांत तरी !

विष्णुपंत : नानासाहेब, रघुनाथराव, आतां नाहीं हो आपली बोलायची सोय ! आतां हें सगळं पारडं आपल्यावर फिरलं !

रघुनाथराव : फिरूं द्या कीं हो ! त्याचं काय मोठंसं ? आपण असं चिथवावं तेव्हांच कांहीं झालं तर व्हायचं ! मीं असं जर चिथवलं नसतं तर इथल्या इथं ही बोलायला लागली आहे, तीदेखील अजून बोलतीना ?

◆ ◆ ◆

## ५३ : शंकरमामंजींचें पत्र

* * * * * * * * * * * * * * *

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी घडून सुमारें दोन महिने होत आले. मध्यंतरीं मोठी सांगण्याजोगी अशी कांहींच गोष्ट झाली नाहीं. 'माझ्या अभ्यासांत मला नकळत परंतु इतका फरक झाला कीं, कांहीं पुसूं नये. पहिल्याप्रमाणें वेडीवांकडीं वाक्यें अगर फारच विलक्षण अशुद्धें हीं फारशीं होईनात. वाचण्याचा सराव बराच पडून चांगलें घडघड व समजून वाचल्यासारखें वाचतां येऊं लागलें. आतां कोणासहि थट्टा करण्यास विशेषशी जागा राहिली नाहीं. ही सर्व सुधारणा होण्याचें कारण माझ्या शेजारणी–नव्हे बहिणी–छे, माझ्या जिवलग मैत्रिणी लक्ष्मीबाई व यशोदाबाई यांची मदत हें होय. मला नुसतें वाचतां येऊं लागलें एवढ्यानेंच मी फार चांगली झालें, माझी सुधारणा झाली असें मी म्हणत नाहीं, तर लिहिण्यावाचण्याबरोबर आणखी किती किती गोष्टींची तरी मला माहिती झाली. ज्या मला स्वभावतः कामाचा थोडाबहुत कंटाळाच असे ती मी त्या दोघींच्या समागमानें इतकी उद्योगी झालें, कीं माझें मलाच थोडेंसें आश्चर्य वाटूं लागलें. तिकडे कांहीं या गोष्टीबद्दल मोठेंसें आश्चर्य वाटलें नाहीं. कारण तिकडचा समज असा होता कीं, मी मूळची फारच उद्योगी; परंतु प्रसंग न सांपडल्यामुळें माझी कर्तृत्वशक्ति झांकली होती इतकेंच. या दोघींचा समागम घडतांच ती शक्ति बाहेर आली. असें तिकडे वाटण्याचें कारण मजवरील अत्यंत प्रेम, यापलीकडे कांहीं नाहीं. ‘आवड गोड’ म्हणतात तसाच केवळ प्रकार होता. मी म्हणजे तिकडे काय काय वाटत असें याचा कांहीं सुमारच नाहीं. मला तिकडच्याविषयीं तसें वाटत असे त्यांत कांहीं नवल नाहीं. तिकडच्या अंगीं इतर कोणांतहि सांपडणार नाहींत असे गुण होतेच मुळीं. परंतु माझ्या अंगीं खरोखर तशी योग्यता, तसे गुण, मुळींच नसून जेव्हां एवढें वाटे, तेव्हां ‘आवड गोड’ यापलीकडे कांहीं नाहीं हें उघडच आहे. मी जर एवढेंसें कांहीं केलें, तर नांवाजून नांवाजून पुरेंपुरेंसें होई. एवढासा पदार्थ जर माझ्या हातून चांगला झाला तर तो दोनहि घरीं पाठवून द्यायचा अशा तऱ्हेनें मला निव्वळ उत्तेजन मिळत असे आणि तिकडच्या तोंडून वाईट अशीं अक्षरें आजपर्यंत जशीं घेतलीं नाहींत तशीं केव्हांहि येऊं नयेत अशी फार इच्छा असल्यामुळें त्याचप्रमाणें ज्ञानाची गोडी, टापटीप, सुव्यवस्थितपणा, इत्यादि गोष्टींची किंमत वगैरे माझी मलाच अतिशय कळूं लागल्यामुळें, मी दिवसानुदिवस माझ्या त्या दोघी मैत्रिणींच्या साहाय्यानें चांगलीच हुशार होत चाललें. वेळच्या वेळीं जेथल्या तेथें नीटनेटकें काम करणें आतां माझ्या अगदीं अंगवळणीं पडलें. विशेष गोष्ट ही असे कीं, लिहिण्यावाचण्याकडे, सभा वगैरेकडे व लोकरीचें काम करणें, कपडे शिवणें वगैरे गोष्टींत अहोरात्र मन गुंतल्यामुळें आम्हांला थोडीशी फुरसत मिळाली कीं पुरे, आम्ही तसल्या कांहींतरी कामांत आपला वेळ घालवीत असूं. इतर बायकांप्रमाणें

दोघीतिघी एका ठिकाणीं जमल्या, कीं दुसऱ्या ओळखीच्या बायकांवर कुत्सितपणाच्या टीका करण्यांत, अगर रिकामटेकड्या दागदागिन्यांच्या गोष्टी काढून त्यांवर चरबटपणें बोलण्यांत किंवा अमकीनें आपल्या सुनेला असें केलें आणि सुनेनें तिला तसें उत्तर दिलें, अशा तऱ्हेच्या आचरट गप्पांत आमचा काळ कधींहि गेला नाहीं. मला वाटतें ज्यांना असें म्हणतां येईल अशी बायको आज हजार दोन हजारांत एक तरी सांपडेल कीं नाहीं कोणास कळे ? न सांपडल्या अशा बायका म्हणून मी त्यांना दोष देत नाहीं. त्या बिचाऱ्यांकडे काय दोष आहे ? त्यांचें मन चांगल्या कामाकडे गुंतण्याला मार्गच नाहीं, तर त्यांनीं काय करावें ? असो.

वर सांगितल्याप्रमाणें सुखस्थितींत सुमारें दोन अडीच महिने गेले. मध्यंतरीं आमच्या मुंबईच्या स्थितींत विशेष सांगण्याजोगें कांहीं झालें नाहीं. दादाचीं पत्रें वेळो वेळीं येऊन मला घरचा व केव्हां केव्हां दुर्गीचाहि समाचार कळत असे. दुर्गीला दहा दिवसांपासूनच अतिशय खोकला झाला आहे आणि बारीक ताप येतो, असें त्यानें आपल्या एका पत्रांत लिहिलें होतें; तेव्हांपासून मला तिची अतिशय काळजी वाटे. पुढें एका पत्रांत दादानें तिच्या मुलाचें जें वर्णन दिलें होतें, तें वाचून वाईट वाटून त्यांतल्या त्यांत हसूंदेखील आलें. जरत्कारूचें केवळ चित्र ! हातापायांच्या काड्या, पोटाचें थोरलें डेरकें, आणखी जन्मापासून आईला दूध मुळीच नाहीं, असा एकंदर प्रकार होता. त्याला बाळसें यावें कसें ? अजून दुःखांत सुख एवढेंच होतें कीं, चाकरी मिळविण्याच्या मिषानें नवरा जो गेला होता, तो येऊन त्रास देऊं लागला नव्हता. जो काय त्रास असेल तो तिच्या दुखण्याचा, आणि काळजीचा, आणखी पोराकडे पाहून होणाऱ्या उद्वेगाचाच होता. शिवाय तिचे पायहि फार अधू झाल्यासारखे झाले होते, असें त्यानें लिहिलें होतें. दादाचीं दोनचार पत्रें आलीं तेव्हां मला एकदादोनदा असें वाटलें, कीं आपण एकदा जाऊन तिला भेटून यावें. तिची इत्थंभूत हकीकत ऐकून माझ्या त्या दोघी मैत्रिणींना व नानासाहेबांना विचारतांना इतकें वाईट वाटलें, कीं कांहीं पुसूं नका तें दादाचें पत्र जे दिवशीं आलें, ते दिवशीं आम्ही त्यासंबंधानें व त्यावरूनच निघणाऱ्या गोष्टीसंबंधानेंच बोलत होतों; बोलतां बोलतां यशोदाबाईनीं आपल्या नणदेसंबंधानें तशीच हकीकत मला सांगितली. ती पुष्कळ अंशांनीं दुर्गीच्या हकीकतीसारखीच असल्यामुळें ती मी येथें देत नाहीं. गोष्टी निघतां निघतां अर्थात् या असल्या गोष्टी होण्याला मूळ कारण काय असावें याविषयीं वाटाघाट सुरू झाली. असें अर्थातच अनेक वेळां होई. एखादी विशेष घडलेली गोष्ट ऐकून साधारण विषयावर आमचें बोलणें निघे आणि मग वादविवादास सुरुवात होई. मी आतां चांगली इतरांप्रमाणें धीट झालें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. मला जें काय वाटेल तें मी निर्भीडपणानें बोलूं लागलें; आणि एखादे दिवशीं असें मी कांहीं चांगलें बोललें म्हणजे मला इतकें उत्तेजन मिळे, कीं कांहीं पुसूं नये.

सुमारें अडीच महिने झाले. आतां लवकरच सुट्टीचे दिवस येतील आणि आपल्याला पुण्यास जावें लागेल हा धसका माझ्या पोटांत उठला. पुण्यास गेल्यानंतर

ही स्वतंत्रता कोठली ? तेथें आपलें पूर्वीप्रमाणें खालीं मान घालून नेहमीं पुटपुटल्यासारखें बोलण्यांत अगर मुळींच न बोलण्यांत व बोललें तर कोणाची तरी कुचेष्टा, कोणाची तरी निंदा, कोणाच्या दागिन्यांच्या व लुगड्यांच्या गोष्टी याखेरीज दुसरें काय बोलणार ? त्याचप्रमाणें इथले ते मनाला उदात्तपणा आणणारे सुखसंवाद कोणीकडे ? आणखी तिथें नेहमींची चडफड अन् धडाड कोणीकडे ? असे नानाप्रकारचे विचार मनांत येऊन मला फार वाईट वाटूं लागलें. शिवाय पुण्यास गेल्यावर—आमच्या इथल्या वागणुकीबद्दल माहिती तिकडे लागली असल्यास—आणखी काय काय त्रास होणार असतील ते निराळेच, असेंहि एकदा दोनदा मनांत आलें. अजूनपर्यंत पत्रद्वारानें कांहीं आम्हांला तिकडून बातमी लागली नव्हती. तेव्हां मी असेंच समजत होतें, कीं आमच्या इकडल्या बातम्या तिकडे अजून पोंचल्या नाहींत. जर पोंचल्या, तर इतरांचें राहो, पण शंकरमामंजी कांहीं कधींहि पत्र लिहिल्याखेरीज राहते ना. त्यांचीं नाहीं नाहीं म्हणतां चारपांच पत्रें आलीं, परंतु त्यांत "दोन आलवणाचीं ठाणें," "मुलांजोगें उत्तम चीट," "अंगरखे करण्याजोगें उत्तम हरकचें कापड पांच अंगरख्यांपुरतें" पाठवून द्यावें, पैसे लवकर पाठवून देतों, यापलीकडे कांहीं नव्हतें. बाकी गोपाळमामंजींचींहि दोनतीन पत्रें आलीं, परंतु त्यांत खुशालीपलीकडे कांहीं नव्हतें. शंकरमामंजींनीं अशीं पत्रें लिहिलीं आणि कांहीं मागितलें नाहीं, असें कधीं होणेंच नाहीं. पैशाचें आश्वासन प्रत्येक पत्रीं असावयाचेंच. मात्र शेवटल्या शेवटल्या एक दोन पत्रांत "मागल्या जिनसांची आणि या नवीन जिनसांची व कापडाची मिळून किंमत लवकरच पाठवून देईन," असा मजकूर होता. दुसरी एक गोष्ट विशेष ध्यानांत घेण्याजोगी ही होती, कीं असें कांहीं ज्या पत्रांत पाठवून देण्याविषयीं लिहिलें असेल, त्यांत "आपल्या प्रकृतीला जपत जा, मुंबईची हवा फार वाईट," "कॉलेजांत कसें काय ठीक चाललें आहेना ?" वगैरे सामोपचार हटकून असावयाचाच. त्यांचीं पत्रें आलीं की, आपला पांचचार रुपयांचा खर्च आहे म्हणून समजावेंच. आणखी त्यांत असें असे, कीं लिहितील तें पाठविल्याखेरीज गत्यंतर नाही ! न पाठवून कसें चालेल ? मग आपला आम्हीं बेत केला होता, काय जें होईल तें होवो, त्यांचें पत्र आलें म्हणजे नाहीं म्हणायचें नाहीं. लिहितील तें पाठवून द्यायचें. जरा जर आमच्याकडून चुकलें तर त्याच्यावर किती टीका होणार आहे हें आम्हांला पक्कें ठाऊक; तेव्हां आपलें मुकाट्यानें सोसावें तेंच चांगलें. हो, आम्हीं त्यांच्या घरीं वाढलों, आणखी त्यांनीं लिहिलेल्या जिनसादेखील पाठवीत नाहीं असें होऊं नये. वास्तविक म्हटलें म्हणजे ज्यांनीं आम्हांला वाढविलें त्यांनीं कधीं एका पैचादेखील जिन्नस पाठविण्यास लिहिलें नाहीं; परंतु शंकरमामंजींना दुसरें कांहीं सुचत नसे. बरें, एखादे वेळ जर नाहीं म्हटलें, तर ते आमच्या नांवानें खडे फोडून किती डांगोरा पिटतील याचा कांहीं नेम होता ? तेव्हां मुकाट्यानें जिन्नस पाठविण्यापलीकडे कांहीं गतीच नव्हती. लक्ष्मीबाई व यशोदाबाई कधीं अशा गोष्टींत मन घालायच्या नाहींत, पण एक दिवस कोणी पुण्याला जाणार होते त्याबरोबर कांहीं असेंच पाठवायचें होतें म्हणून

मी बांधीत असतां हसून त्यांस म्हटलें, " ही नेहमीं कांहींना कांहींतरी पुण्यास काय पाठवते, असं तुम्हांला आश्चर्य वाटत असेल नाहीं ? " तेव्हां लक्ष्मीबाई, " हो, वाटतं खरंच" असें म्हणाल्या; पण यशोदाबाई म्हणाल्या, " मला नाहीं इतकं वाटत, मला त्याचा पुष्कळ अनुभव आहे. या लक्ष्मीबाई तेव्हां इथें नव्हत्या, आतांशाच थोडंसं कमी आहे. " तेव्हां मग मीं त्यांना आमच्या मामंजींची हकीकत सांगितली आणि आम्ही पोट धरधरून हसलों. त्याहि आपली हकीकत सांगणार, तों दुसरेंच कांहीं निघून तें तितकेंच राहिलें. येथें आणखी एक गोष्ट सांगून ठेवण्याची ती एवढीच कीं, मामंजींनीं आपल्या-साठीं म्हणून कांहीं जिन्नस मागितले म्हणजे आम्ही धाकटया मामेसासूबाईंना, बनूवन्संना व उमासासूबाईंनाहि कांहीं पाठवीत असूं. एकदा मी आपल्यासाठीं चोळीचे कांठ घेतले होते. तेव्हांच त्या तिघींसाठीं चांगले उंची कांठ व धाकटया मामेसासूबाईंना चिटाचें पातळ नेसण्याची फार आवड असे; म्हणून तसलींच दोन, एक त्यांच्यासाठी आणखी एक उमासासूबाईसाठीं म्हणून पाठवून दिलीं. ही गोष्ट येथे सांगून ठेविली आहे ती कांहीं कारणामुळें होय.

अशा तऱ्हेनें एकंदर स्थिति असतां मार्च महिन्यांत एकदा असें झालें, कीं एका मुलींच्या शाळेचा बक्षीससमारंभ झाला, तेथें आम्हांला साऱ्यांना आमंत्रण आलें. अर्थातच आतां जावयाचें कीं नाहीं, हा प्रश्न फारसा राहिला नाहीं. जाण्याचें ठरलें, आणि तेंहि आज सर्वांनीं मिळून. कारण आमंत्रण पुरुषांबायकांना मिळून होतें. त्याप्रमाणें आम्ही सर्वजण गाडींतून गेलों. बक्षीससमारंभाचा थाट जसा व्हायचा तसा झाला. दिवसानुदिवस स्त्रीशिक्षणाचा प्रसार होत चालला आहे, ही शाळा त्या गोष्टीची साक्ष देत आहे, वगैरे अनेक गोष्टींचा उल्लेख होऊन बऱ्याच चांगल्या गोष्टी सांगण्यांत आल्या. संध्याकाळीं आम्ही परत आल्यावर त्याबद्दल बोलून मोठा आनंद केला. परंतु दुसरे दिवशीं...नांवाच्या वर्तमानपत्रांत त्या समारंभाची हकीकत आली, तींत तेथे हजर असणाऱ्या मंडळींचीं नांवें आलीं होतीं. आमची हिंदु मंडळी सहकुटुंब जाणारी फार नसावयाची, तेव्हां अर्थातच आमचीं साऱ्यांचीं नांवें आलीं होतीं. तीं पाहण्याबरोबर मला घाबरविण्यासाठीं म्हणून मुद्दाम आणून दाखविलीं. नांवें इंग्रजींत होतीं. मला आधीं खरें वाटेना, म्हणून मीं लक्ष्मी-बाईंना नेऊन दाखवून विचारलें. आणखी त्यांनीं जेव्हां " होय " म्हणून सांगितलें, तेव्हां मात्र माझें धाबें दणाणलें. इतकी दोनअडीच महिन्यांची धिटाई सर्व लयास जाऊन आतां असें वाटलें कीं, आपल्याला पुण्यास तोंड दाखविण्याची कांहीं सोय नाहीं. आतां आपल्या नांवाचे चांगले धिंडवडे होऊन आजेसासूबाई व मामेसासूबाई तर बोलूं देणार नाहींत. शंकरमामंजी तर काय करतील आणि काय नाहीं याचा सुमारच नाहीं. आतां करणार काय, या विवंचनेंत चांगले दोन दिवस गेले. तिकडे त्या गोष्टीचें कांहींच वाटलें नाहीं. उलट, मंडळींत काय आणि इकडे काय, माझी थट्टाच करावयाची. पण तर्क केल्याप्रमाणें खरोखरीच भलें थोरलें लांबलचक पत्र शंकरमामंजींकडून आम्हांला आलें. तें साद्यंत मी येथें देतें.

श्री

अनेक आशीर्वाद विशेष. अलीकडल्या मुलांना इंग्रजी शिकविलें म्हणजे त्यांना ताळतंत्र कांहींच राहात नाहीं. तीं अगदीं व्यवहारशून्य निपजतात, असें मला दुसऱ्यांच्या मुलांच्या उदाहरणांवरून नेहमीं वाटे. आणखी त्यांना मी हसत असें आपणहि त्याच मार्गाला लागलां आहां, असें मला आजपर्यंत वीस जणांनीं सांगितलें असेल; पण माझा त्यांच्यावर भरंवसा बसेना. मी उलट त्यांनाच मोडून काढी. नारोपंतांच्या जांवयाचा आपल्याला शेजार आहे हें जेव्हां ऐकलें, तेव्हां मात्र मला थोडीशी शंका आली आपण बिघडाल अशी; कारण ते नारोपंत म्हणजे कांहींतरी असून त्यांचा जांवई तर अगदींच पाजी अशी माझी पक्की खात्री होती. आणखी 'त्यांचा शेजार तावडतोब सोडावा,' असें मी तेव्हांच लिहिणार होतों, पण तितक्यांत असा विचार आला कीं, इतके दिवस आपल्या शिकवणींत असलेला मुलगा कोणाच्या संगतीनें बिघडणार नाहीं. पण वा! भरंवशाच्या म्हशीला टोणगा अशी स्थिति होऊन आमच्या शिकवणुकीचें आणि आपल्याला आजपर्यंत वाढविलें, वर्तविलें त्याचें फारच चांगलें चीज केलें! जी गोष्ट आमच्या कुळाच्या स्वप्नींदेखील कधीं आम्हीं पाहिली नाहीं, ती आपण करून आमच्या घराचें फार चांगलें नांव केलें! आम्हांला आतां येथें बाहेर तोंड काढण्यासदेखील जागा राहिली नाहीं. संध्याकाळीं बुधवारांत गेलों असतां त्या गोविंदराव गंध्यांच्या दुकानीं ऑफिसांतून येतांना, तर मला दहापंधराजणांनीं विचारलें असेल, "का शंकरराव, आपले भाचे बडे सुधारक झाले! परवां कुठें सभेंत गेले होते बायकोला घेऊन! तुम्ही म्हणत होतां ना आमचा रघू कांहीं कधीं अशा भानगडीत पडायचा नाहीं म्हणून! दुसऱ्यांना हसायाला मात्र तयार!" एकानें तर मला येऊन सांगितलें, कीं सीता तेथें सभेंत उभी राहून बोलली; आणि वास्तविक ती कांहींतरी बोलून तिची फें फें उडाली असतांहि कोणी साहेबानें तिची स्तुति करून आपण तिच्या गळ्यांत माळ घातली. हा सर्व प्रकार आपल्याला कसा काय आवडत असेल तो आवडो! परंतु मला बिलकुल आवडत नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याबद्दल मला मोठा संताप आला आहे. आजपर्यंत मीं एक सापाचें पिलूंच घरांत वाढविलें असें मला खास वाटूं लागलें आहे. आपल्या शिकण्यासंवरण्याकडे जो माझा पैसा खर्च झाला, आणखी आपल्याला चांगलें वळण लागून आमचें नांव राहावें म्हणून जी आटोकाट मेहनत मीं केली ती व्यर्थ--आनाठायीं गेली. यापेक्षां एखाद्या माधुकऱ्या...पण आतां आणखी लिहून तरी काय उपयोग? आमची, आमच्या कुळाची, आमच्या घराची जी आपण अब्रु घालविली, ती आतां भरून थोडीच येणार आहे! घराच्या बाहेर पाऊल टाकलें, कीं जो तो आमच्या तोंडावर थुंकूं लागला आहे. "कां! तुमची सून मोठी विद्वान् झाली!" "कां? तिचें आतां येत्या मे महिन्यांत मोठें थोरलें व्याख्यान होणार आहे हिराबागेंत, तेव्हां अध्यक्ष तुम्ही होणार असाल बहुतकरून?" अशा एक कीं दोन, शेंकडोंशें गोष्टी कालपरवांपासून लोकांनीं येऊन मला विचारल्या असतील! आईचें मस्तक तर इतकें बिघडलें आहे कीं, कांहीं बोलायची

सोय नाहीं. पण मीं हें तुम्हांला लिहून उपयोग काय ? तुम्हांला याबद्दल थोडेंच कांहीं वाटणार आहे ? जर तुम्हांला आमच्या घरादाराची, अब्रूची चाड असती, तर आपल्या हातून हा असला बाटेपणा, आचरटपणा झाला असता कशाला ? फार चांगलें केलेंत ! आमच्या पैशाचें, शिकवणीचें फार उत्तम चीज केलेंत. आमचा उद्धार केलात. आज नुसती सभेंत बोलून साहेबानें माळच गळयांत घातली, उद्यां आतां काय होणार आहे आणखी काय नाहीं ! आतां कांहीं जरी आम्हांला कोणीं येऊन सांगितलें, तरी खोटें म्हणून वाटायला नको. आमचा सूनपणा फार चांगला गाजवला ! आजपर्यंत, आमचें आम्हांला नांव होतें. आतां आम्हांला तिच्या नांवावरून लोक ओळखणार. हे कोण ? तर परवां साहेबानें माळ घातली त्या बाईचे मामेसासरे ! वा ! काय पण आमचा लौकिक ! पण मीं आतां हें लिहून व्यर्थ आपला संताप कशाला करून घेऊं ? आपल्याला त्याची थोडीच चाड आहे ! आतां सांगणें एवढेंच आहे, कीं पुन्हा आमच्या येथें येण्याच्या भानगडींत आपण पडूं नये. वारूताईला आपण कितपत पुसत असाल आणखी तिचा कितपत मान ठेवीत असाल हें अगदीं उघड दिसतेंच आहे. तेव्हां तिनें तसल्या अनाचारांत आणखी हालअपेष्टांत राहावें असें मला कांहीं वाटत नाहीं; इतकेंच नव्हे, तर मेहेरबानी करून आपण तिचे सुपुत्र खरे, पण तिला इकडे लावून द्यावी. आतां तिनें तिथें राहणें, आणखी आम्हीं तिला राहूं देणें म्हणजे निव्वळ तिचे हाल करणें आहे. आजपर्यंत जसें आम्हीं तिचें मन राखून उत्तम प्रकारांनीं पोषण केलें तसेंच पुढें करूं. तिचा नवरा वारला तेव्हां जशी ती अनाथ होती, तशीच आजहि झाली आहे असें समजूं. तेव्हां पोरगा मोठा होऊन पांग फेडील अशी आशा होती; आतां काय तेवढेंहि राहिलें नाहीं एवढाच काय तो फरक ! दुसऱ्यांच्या कारटयांचें वर्तन पाहून जे आम्ही हसत होतों, त्या आम्हांलाच आज मान खालीं घालण्याचा प्रसंग आला. असो. आतां आणखी कांहीं लिहून, आपला सीतारामाचा जोडा कुठें सभेला जायचा असेल तेव्हां व्यर्थ वेळ घेत नाहीं. चमत्कार एवढाच वाटतो, कीं ज्या आपल्याला तोंडावरची माशी हांकतां येत नव्हती इतका आपला गरीबपणा वाटत होता, ते आपण इतके दीडशहाणे कसे झालां ! याला कारण आपली शहाणी बायको हें आम्ही जाणून नाहीं असें नाहीं. ती व्हावी कोठून चांगली ! सख्ख्या आईची कीर्ति कांहीं थोडी ऐकली असें नाहीं. आतांच्या आईची ऐकतोंच. बापाच्या कृति कशा आहेत त्या दिसल्याच आहेत, त्यावरून पुढच्या दिसतातच. खाण तशी माती ! बाप तुरुंगांत पडले होते तिकडून त्यांनीं ध्वज लाविले; आतां या सुधारल्या, यांनीं इकडून पताका लावायच्या आणि मधें तिच्या नादानें, आणखी त्या नारोपंतांच्या जांवयाच्या आणखी ते कोण दुसरे नाना कीं फाना आहेत त्यांच्या संगतीनें आपण पणत्या लावा. त्यांची काय हकीकत आहे तें मला ठाऊक नाहीं असें नाहीं. पण त्यांच्या आईला कोठें जाण्याला मार्ग नाहीं. आपल्या आईचें तसें नाहीं. तिचे भाऊ तिला पोसायला—तिच्या केसालादेखील धक्का न लागतां तिला फुलाप्रमाणें ठेवायला तयार आहेत ! निदान मी तर तिला जिवांत जीव आहे तों

आजपर्यंतच्याप्रमाणेंच ठेवीन. इतकेंदेखील अंतर देणार नाहीं. मीच तिला न्यायला आलों असतों, पण तिथें येऊन आपल्या सुखांत उगीच विघ्न कशाला! शिवाय तो आपला अनाचार मला तर दृष्टीनें कधींच पाहवणार नाहीं. तेव्हां दूर आहें तेंच बरें आहे, एक वेळ लिहून पाहिलें आहे; असली कांहीं अक्कल तर उमजाल, नाहीं तर दिसतेंच आहे काय होणार तें. आपण पैसे मिळवूं लागलां एवढ्यानें सर्व कांहीं पावलें असें आपल्याला वाटत असेल ...पण मी आपल्या जिवाचा विनाकारण संताप काय म्हणून करून घेऊं? तेव्हां आतां पुरेंच करतों. आपल्या मनाप्रमाणें वागून तरी सुखी असा आणखी असेच कुलांगार बनून बायकोच्या नादानें अधिक अधिक सुधारणा करा; आणि मोठे सुधारक म्हणून नांव घेऊन एकदा दिग्विजय लावा."

असें हें अद्वातद्वा लिहिलेलें पत्र तिकडे वाचलें तेव्हां इतका कांहीं संताप झाला की कांहीं पुसूं नये. मीं आजपर्यंत इतकें रागावलेलें कधींच पाहिलें नव्हतें. तें पत्र आलेलें मला कितीतरी वेळ सांगि लेंच नाहीं. परंतु कोणतीहि गोष्ट होवो, बरी असो वाईट असो, ती मला सांगितल्याखेरीज दोन घटकादेखील राहण्याची मारामार, त्याला इलाज नाहीं. यामुळें मी " असा राग काय म्हणून ? कुणाचं पत्र ! " वगैरे विचारलं, तेव्हां पुष्कळ ' नाहीं होय ' करून शेवटीं मला सांगितलें आणि तें पत्र वाचायला दिलें. तें पत्र मीं वाचावें याच उद्देशानें बहुशः मामंजींनीं मुद्दाम बाळबोधींत लिहिलें होतें असें दिसलें. कारण आजपर्यंत त्यांचीं पत्रें कधींहि बाळबोधींत आलीं नाहींत, सारीं मोडींत; पण त्यांच्या अंगीं इतका कुत्सितपणा खास होता, कीं मला तिकडून मजकूर सांगून कळण्यापेक्षां मीं प्रत्यक्ष वाचला तर बरा, असें वाटून त्यांनीं मुद्दाम बाळबोधींत लिहिलेलं असावें. कदाचित् तें पत्र दुसऱ्या बायकांनाहि दिसावें व त्यांनीं वाचावें असा त्यांचा मनोदय असेल, नाहीं म्हणवत नाहीं. त्यांचें मन म्हणजे जितकें म्हणून कुचकें, नासकें, वाईट, घाणेरडें तितक्याचें आगर असे. तेव्हां त्यांत सर्व कांहीं असण्याचा संभव! असो.

आज जरी मी त्यासंबंधानें पाहिजे तसें लिहितें आहे, तरी पण त्या दिवशीं तें पत्र वाचून मी इतकी संतापलें व रडलें, कीं कांहीं सांगतां येत नाहीं. मला ते दिवशीं अन्न गेलें नाहीं. मी कोणाशीं बोललें नाहीं. सारा दिवस खोलींत बसून एकसारखी रडत होतें. नाना रीतींनीं माझी समजूत करण्याचा यत्न केला; परंतु मी तिकडेदेखील बोललें नाहीं. माझ्या बाबांच्या संबंधानें जो उल्लेख केला होता तो यापूर्वी माझ्या कानावर आला होता, यामुळें मला त्याचें कांहीं वाटलें नाहीं; परंतु जिच्या नखाची सर कोणाला यायची नाहीं, जिचें स्मरण झालें, की मन शुद्ध होऊन मला गहिंवर वाटे, जिला केवळ भूलोकची देवता असें मी समजत असें, त्या माझ्या आईबद्दलदेखील जेव्हां त्या पत्रांत कुत्सितपणानें लिहिलेलें मीं वाचलें तेव्हां माझ्या मनाला काय बरें वाटलें असेल? मला किती संताप आला असेल, किती रडूं आलें असेल, याची कांहींतरी कल्पना कोणास अनुभवावांचून करतां येईल काय? माझ्या आईबद्दल आजपर्यंत कोणाच्या तोंडून एक

चकारशब्ददेखील गैरवाजवी ऐकला नसतां, त्या माउलीसंबंधानें ती मेल्यावर " सख्ख्या आईची कीर्ति कांहीं थोडी ऐकली असं नाहीं," असे शब्द कोणीं लिहिलेले वाचण्याचें माझ्या नशिबीं यावें आणि ते कोणीं लिहिलेले ? तर शंकरमामंजींसारख्या माणसानें. मग संताप येणार नाहीं तर काय होईल ? खरोखर ते दिवशीं मला रडतां भुई थोडी झाली; परंतु प्रत्येक गोष्टीला शेवट हा असायवाच त्याप्रमाणें माझ्याहि वाईट वाटण्याचा व खेदाचा अंत होऊन मी संथपणें विचार करूं लागलें. माझ्यामुळें इकडे सर्व दोष लागला आहे, आणखी आमच्यामुळें आमच्या शेजाऱ्यांवर अशा तऱ्हेचे दोष; इतकेंच नव्हे, तर एक वेळ मला असेंदेखील वाटलें कीं, माझ्या परमपूज्य आईबद्दल जो मजकूर लिहिला, तो केवळ आपल्यावर आग पाखडण्याकरितांच मामंजींनीं आपल्या मनचा लिहिला असावा. कोण्या माणसाबद्दल काय बोलावें आणखी कोणाबद्दल काय लिहावें हा विचार कुत्सित माणसाला कोठला आला आहे ? त्याचा विचार एवढाच, कीं आपण कोणत्या तऱ्हेनें कसें बोललों अगर लिहिलें म्हणजे आपण जास्त टोंचल्यासारखें होईल. लागून, टोंचून, कुजकेंनासकें बोलणें म्हणजे शंकरमामंजींचा हातखंडा असे हें वाचकांस मीं यापूर्वी सांगितलेंच आहे. तेव्हा वाचकांस याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. काळ लोटला म्हणजे सर्वच गोष्टी विसरल्या जातात त्याप्रमाणें सात आठ दिवसांत त्या पत्राबद्दल आम्हांला कांहीं फारसें वाटेनासें झालें. उलट माझें मलाच हसूं येऊं लागलें, कीं असल्या लिहिण्यानें आपण इतक्या रडलोंकडलों कां ? या आठ दिवसांत मला ज्या समाधानाच्या गोष्टी सांगितल्या आहेत, जी माझी समजूत घालण्यासाठीं खटपट केली आहे ती कांहीं अनिवारच. सांगणीशिकवणीच्या गोष्टी तर कांहीं अतोनात सांगितल्या. लक्ष्मीबाई व यशोदाबाई यांनीं मला कितीदा आतांशा अशा कां दिसतां म्हणून विचारलें, पण त्यांना कसें सांगूं? एकदोनदा माझ्या मनांत आलें त्यांना पत्र दाखवावें म्हणून, पण पुनः वाटलें, कीं तें कांहीं उपयोगी नाहीं. जसें मला वाईट वाटत आहे, त्याप्रमाणें त्यांनाहि वाटेल आणि उगीच त्यांच्या मुखांत माती कालविल्याप्रमाणें होईल; परंतु आठएक दिवस झाल्यावर अर्थातच त्याचें महत्त्व कमी झालें आणि एक दिवस नित्याप्रमाणें रात्रीं गोष्टी निघतां निघतां आमच्या तिकडे गेले बोलून, " अहो, मी दाखविणार नव्हतों तुम्हांला, पण पुण्यास आमच्यावर काय झालं आहे काहूर आणखी त्याचा शिंतोडा तुमच्यावर कसा काय आला आहे हें तुम्हांला दाखविल्याखेरीज कांहीं राहवत नाहीं. मात्र तुम्हांला वाईट वाटूं देऊं नका हो ! " असें बोलून लागलीच " तें पत्र आणतों " असें बोलून उठायचेंच. मीं खांकरून डोळे वटारून नको नको म्हणून खुणा केल्या; पण उलट " अं ? त्यांत काय आहे मोठंसं ! त्यांना तरी समजायला पाहिजे कीं नाहीं, कसे जगांत लोक आहेत ते ! " असें बोलून माझी फजितीच केली. माझ्या आईबापांविषयीं वेडेंवांकडें लिहिलें आहे हें त्या वेळीं ध्यानांत राहिलें नाहीं.

थोड्या वेळानें पत्र आणून खुशाल वाचून दाखविलें. मी अशी भीत होतें कीं अनर्थ ! यशोदाबाईंच्या आणखी लक्ष्मीबाईंच्या तोंडाकडे एकसारखी लक्ष लावून पाहात

होतें, कीं त्यांना काय वाटतें! पण पाहतें तों त्यांना कांहीं विशेष वाटलें नाहीं. उलट यशोदाबाई म्हणाल्या, " हात्त्याच्या! आमच्या इकडे विचारा बरं किती अशीं काकांचीं पत्रं आलीं आहेत तीं! हें तुमचं पत्र कांहींच नाहीं त्या मानानं. बरं, पण हे तुमचे मामंजी अगदीं जुन्या चालीचे स्नानसंध्याशील तरी आहेत ? "

रघुनाथराव : अतिशय! त्यांची टिळाटोपी नुसती पाहून घ्यावी. भस्माचा पट्टा तर कांहीं विचारूंच नका; आणखी तिकडे कुठें जर मिळाली तर घ्यायला...

हें प्रकरण आतां फार बहकत चाललें असें पाहण्याबरोबर मीं मध्येंच दाबण्यासाठीं म्हटलें, " बरं पुरें आतां, आपले मामा ते, कांहींतरी त्यांचा बोज—"

रघुनाथराव : अरे बापरे! आतां सुनेनेंच बाजू उचलली बोआ; तरी बरं आपल्या-वरच सारा दोष दिला आहे. नाहीं तरी पुरुष बिघडतात ते बायकांच्याच नादानं, नाहीं हो नानासाहेब? तुमचं कसं काय मत आहे?

नानासाहेब : अहो, इथं मताचा काय भाग आहे? वास्तविक स्थितीच तशी आहे आमची चुलती आणखी तुमचे मामा ज्या माणसांना आम्हांला बिघडल्याबद्दल दोष देतात तीं माणसंच तसलीं आहेत. आमच्या माणसानं तर आम्हांला लग्न लावण्या-पूर्वीं बिघडवलंन्! आमचंन् आमच्या चुलत्यांचं वितुष्ट पाडायला पाहा कोण कारण झालं तें! माहेरीं जाऊन पहिल्या दिवसापासून...

यशोदाबाई : आम्हीं पुष्कळ बिघडवलं पण बिघडणारीं माणसं......

नानासाहेब : तुम्ही? तुम्ही कोण? आणखी कुणाला बिघडविणार बोवा? तुम्हांला कोणीं काय म्हटलं? उगीच आपल्या अंगीं लावून घ्यायचं बरं का लक्ष्मीवहिनी?

अशा तऱ्हेनें विनोदाचीं बोलणीं निघून मामंजींच्या त्या पत्राची ते दिवशीं केवळ थट्टाच झाली.

◆ ◆ ◆

## ५४ : दादाचें दुसरें पत्र

तथापि त्या पत्रांतील कांहीं वाक्यें मला इतकीं विषाप्रमाणें झोंबलीं, कीं तीं कांहीं केल्या मनांतून जाईनात. माझे बाबा तुरुंगांत होते असें मीं हें दुसऱ्यांदा ऐकलें. मागें एकदा दादाला विचारलें असतां त्यानें मला यत्किंचित्‌देखील दाद दिली नाहीं. तेव्हां पुनः आतां त्याला पत्र पाठवून विचारावें कीं नाहीं, असें वाटूं लागलें आपण विचारलें आणि न जाणों त्यानें पुनः पहिल्यासारखी उडवाउडवी केली, तर? असें मनांत येऊन आपला मान आपण राखून घ्यावा असें वाटलें. ' परंतु जो गुण बाळा तोच जन्म-

काळा ' या म्हणीला अनुसरून माझ्या अनर्थापात चौकस स्वभावानें उचल घेऊन मन अगदीं अस्वस्थ करून सोडलें व मी तिकडे विचारूं लागलें काय आहे काय नाहीं तें. परंतु तिकडूनदेखील " ह्यः ! त्यांच्या पत्रांतल्या गोष्टी कसच्या खऱ्या मानते आहेस ? जें येईल मनांत तें भकले आहेत ते. त्यांना कांहीं काळीज का आहे ? त्यांना जितकं म्हणून कांहीं वाईट लिहितां येईल, तितकं टाकलं आहे त्यांनीं लिहून ! दुसरं काय ? तूं त्या पत्राबद्दल हसतेसबिसतेस, पण तुझ्या मनांतून कांहीं अजून जात नाहीं तें, अन् तुला करायचं आहे काय सगळ्या त्या गोष्टी विचारून ? "

मी : करायचं काय म्हणा ? पण यासकट हें तिसऱ्या चवथ्यांदा ऐकलं अन् मला त्यांतलं ठाऊक नाहीं कांहींच म्हणून म्हणतें; पण मला सांगायचं काय आहे तें.

रघुनाथराव : पण नयेच विचारूं काय आहे तें. मोठंसं कांहीं अडलं आहे असं नाहीं मला वाटत.

आतां अशा बोलण्यापुढें काय करणार कोण ! पण मीं लागलींच म्हटलें--

" बरं आहे. मी आतां दादाला पत्र लिहून सारं कांहीं विचारतें. त्यानं मला वचन दिलं आहे मुंबईस गेल्यावर मी तुला सारं कांहीं सांगेन म्हणून, मग काय ? "

" कांहीं नको पंत्र ल्याहायला, आणखी त्यांना त्रास द्यायला. कांहीं हें..."

" हें काय बाई ? आई खाऊं देईना अन् बाप भीक मागूं देईना, तशांतलीच नाहीं का गत झाली म्हणायची ?--पण मी आतां त्याला पत्र लिहीन, आणखी सारं कांहीं विचारीन. किती दिवस असंच मेल हें करीत बसायचं ? कितीकदा मीं दादाला विचारलं असेल ? पण त्यानं अशीच उडवाउडवी करून मला वाटेला लावावं आणखी इकडे पाहावं तों तेंच. जसं कांहीं मला अजून कांहीं समजतच नाही कांहीं ? "

" अरे बाप रे ! आपल्याला जितकं समजतं तितकं आम्हांलादेखील समजत नाहीं. "

" तें काय हवं तें जरी म्हटलं तरी मी आतां दादाला लिहून काय आहे काय नाहीं विचारणार. "

" बरं तर, आतां असं कांहीं नको. मीच तुला सांगेन काय आहे तें मग तर झालं ? भावाला लिहून आणखी सगळी हकीकत सांगून इतकं करायची कांहीं जरूर दिसत नाहीं. "

" अस्सं ! आतां कसं सांगायचं तर मग. खरोखरीच का होते बाबा..." हा माझा प्रश्न ऐकून किती वेळ तरी स्तब्ध बसायचें व नंतर हलकेंच ' हो, एक महिनाभर.' अशीं अक्षरं उच्चारायचीं व पुनः बराच वेळ अगदीं स्तब्ध बसून म्हणायचं " आपल्याच माणसाबद्दल असे प्रश्न विचारून आपल्याच माणसाच्या तोंडून हकीकत ऐकायची कां एवढी हौस ? "

मी कांहींच बोललें नाहीं. उलट पुढें प्रश्न करण्याबद्दलची आपली उत्कंठा दाबून ठेवावी असें मला वाटलें आणि त्याचप्रमाणें आश्चर्यांत आश्चर्य हें कीं मीं ते दिवशीं मोठें थोरलें आत्मसंयमन करून पुढें विचारण्याचें टाकलें. आजपर्यंत दादा मला सांगेचना, यामुळें मी गप्प बसलें; परंतु आज निव्वळ तिकडची मर्जी मोडायची नाहीं एवढयाच-साठीं मी उगीच बसलें; माझी पक्की खात्री होती कीं, मीं किंचित् प्रश्न केला तरीदेखील माझी मर्जी संभाळण्याकरितांच मला इत्थंभूत सांगणें होईल. पण खरोखर जर तें सांगणें बरें वाटत नाहीं तर आपण आग्रह धरूं नये, असा विचार करून मीं आपले प्रश्न मागें ठेविले; तथापि पुनः केव्हांतरी प्रश्न काढून मी विचारून घेईन असा माझा बेत होताच.

दुसरे दिवशीं सकाळींच दादाचें एक पत्र आलें. पत्र एवढेंसें, परंतु विलक्षण विनोदानें भरलेलें होतें तें असें:—

" आपल्यासंबंधानें येथें काय चाललें आहे कांहीं ठाऊक आहे ? आपण दोघेंहि बाटलां. साहेबानें आपल्या गळयांत माळ घातली. आपण व आपल्या मैत्रिणी पाहिजे तेव्हां उठून गाडयांत बसून हिंडायला जातां. आपला सारा वेळ सभांना जाण्यांत जातो. आपल्या तिघींमुळें तुमचे यजमानहि बिघडले परवां तुम्ही कुठल्या साहेबाच्या बंगल्या-वर मेजवानीला गेलां होतां, आणखी......आणखी......एकना दोन ! कितीतरी गोष्टी आपल्यासंबंधानें येथें उठल्या आहेत. या गोष्टींनीं आपल्या उपाध्येबोआंना ' बाबांच्या-जवळ सांगतांना ऐकलें. मी मग उपाध्येबोआंना ' तुम्ही कोणापासून ऐकलंत ' म्हणून विचारलें तेव्हां :—

' अरे साऱ्या गांवभर झालं आहे बाबा ' असें त्यांनीं मला सांगितलें. ' तरी पण तुम्हांला कोणीं सांगितलं ' असें विचारल्यावर ते म्हणाले, ' मला बाबदेवभट मटंग्यांनीं सांगितलं. ' मीं आणखी खोदून विचारलें तेव्हां असें कळलें, कीं ' बाबदेवभटांना गटार-यंत्रावर तुमच्या मामेसासऱ्याच्या उपाध्यांनीं सांगितलं; त्यांना अर्थातच आपले मामेसासरे वे० ( वेदशून्य ) शा० ( शास्त्रशून्य ) संपन्न शंकरमामंजी यांनीं सांगितलं ! वा ! एकूण मुंबईस जाऊन दोनअडीच महिने झाले नाहींत तों बरीच कीर्ति पसरविली म्हणायची ! अजून माईसाहेबांना त्यासंबंधानें कांहीं बोलतांना कुठें ऐकलें नाहीं.

" हो खरेंच ! माईसाहेबांची आई परवांच्या दिवशींच परत आली. आतां ठीक जुळलें. काल मायलेकींचें कांहीं भांडण झालें असावें असें दिसतें. शनिवार असल्यामुळें मी होतों घरींच. कांहींतरी पैशासंबंधाची धुसफूस असावी. ती तुझी बाईहि आली होती. मधून मधून ' सरी, जोडवीं, माळ ' ' आणखी कांहीं नको. ' ' गोट असले तर ' ' महालक्ष्मी ' असे तुटक तुटक शब्द माझ्या कानीं पडले. मला पुरतें ऐकण्याची इच्छा नसल्यामुळें मी उठून जिन्याशीं गेलों नाहीं; नाहींतर सारें ऐकायला आलें असतें. तसें मोठयानेंच चाललें होतें. काय असेल तें असो पण मला कांहींतरी विशेष असावें असें वाटूं लागलें आहे. मी वर नाहीं असा त्या तिघींचा समज असावा असें मला वाटलें. नाही तर

एवढ्या मोठ्यानें बोलणें, आणखी अगदीं जिन्यापाशींच झालें नसतें. काय असेल तें असो, सध्यां आणखी लिहिण्याजोगें कांहीं नाहीं, आणखी मला वेळहि नाहीं. एवढें खरडायला त्यांतल्या त्यांत कसातरी वेळ काढला. सर्वत्र मंडळी कुशल आहेत. आपलें पत्र बरेंच दिवसांत आलें नाहीं. आतां येणार केव्हां? सभा वगैरेंना जाण्यामुळें फुरसत होत नाहींसें दिसतें. थांबा आतां, इथें पुण्यांत या, म्हणजे मग सांगताहेत शंकरमामंजी कसें काय आहे तें ! अं ? ''

एकाच वेळीं दोन निरनिराळ्या तऱ्हेचे मजकूर आणि तेहि मनावर महत्त्वाचा परिणाम करणारे कानावर आले म्हणजे मनाची स्थिति कशी होते, याचा अनुभव मला या वेळीं चांगला आला.

नुसतें पत्र पाठवूनच केवळ आमची नालस्ती करून आम्हांला शिव्या देऊन कांहीं तृप्ति झाली नाहीं, तर आमच्या नांवानें गांवभर डिंडोरा पिटून ज्याच्या त्याच्या मुखानें आमची निंदा करण्याचें एक व्रतच शंकरमामंजींनीं घेतलें असावें असें दिसलें. " व्रतें-वैकल्यें करणें हें त्यांच्यासारख्या धर्माभिमान्यांस फारच उचित, तेव्हां इतर नित्यव्रतें करून त्यांचें उद्यापनहि झाल्यामुळें हें आम्हा गरिबांचें निंदाछलनारूप नवीन व्रत त्यांनीं घेतलें, '' असें सहज थट्टेथट्टेत लक्ष्मीबाईंनीं म्हटलेलें मला आठवतें. आजपर्यंत कोणाची निंदा केलेली वगैरे मीं ऐकिली म्हणजे मला त्यांतल्या पुष्कळशा गोष्टी खऱ्या असाव्या, तेव्हां लोक असें बोलतात, पिकल्याखेरीज विकत नाहीं, असें वाटत असे; परंतु डोळ्यांवरलें भुरळ जाण्यास प्रत्यक्ष अनुभवासारखी दुसरी जालीम मात्रा नाहीं, असें म्हणतात तें खोटें नव्हे ! मला स्वतःसंबंधानें हा असा अनुभव येतांच माझ्या मनाचा पक्का निश्चय झाला, कीं लोकनिंदा म्हणजे पिसाचा कावळा तर काय, पण पिसाच्या एका पराचा गरुडपक्षी होय ! आम्ही बक्षीससमारंभाला गेलों तें काय, आणि त्यावर हा प्रचंड व्यूह रचला कसा; कांहीं तरी सुमार ! पण जेथें वाईट बातम्या पसरवून दुसऱ्याची नाचक्की करण्याची हौसच, तेथें काय ? जें सांपडेल तें पाहिजेच. या वेळीं माझ्या सासरीं काय काय चाललें आहे; जेवतांना, खातांना, हिंडतांना, फिरतांना, बोलतांना, चालतांना, निजतांना, बसतांना, शंकरमामंजींचें आतां दुसरें कांहींदेखील चाललें नसेल, हें तर माझें मला दिसतच होतें; परंतु तेथली वास्तविक माहिती आपल्याला लिहून कळवील असें तेथें कोणीच नाहीं, याबद्दल मला थोडेंसें वाईट वाटलें. दादाच्या पत्रावरून मला कल्पना चांगलीच करतां आली म्हणा; पण त्यांतल्या त्यांत हें सारें होतें आहे, तें कसकसें एवढें कळतें तर बरें होतें. इतकेंच कळलें तरी त्याचा उपयोग काय होता ? पण कळावें ही इच्छा खरी. आपल्याविषयीं अमुक माणूस अमक्या तऱ्हेनें बोललें असें ऐकलें, कीं तें कसें बोललें, काय बोललें, त्याच्या आधीं काय झालें, कोणाजवळ बोललें, मग काय झालें, इत्यादि गोष्टी जाणण्याची किती उत्कट इच्छा होते याचा अनुभव बहुतेकांस असेल; तेव्हां मलाहि तसें वाटल्याबद्दल मी दोषास पात्र होईन असें मला वाटत नाहीं. काय चमत्कार ! मला आतां असें वाटायला लागलें, कीं कंसमामाला जळीं

स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, जसा भाचा कृष्ण दिसूं लागला होता, तशीच इकडे शंकरमामांची स्थिति झाली असावी. तिकडे श्रीकृष्ण आणि मी माया. दादाचें हें पत्र तिकडून वाचून पाहिल्यावर तिकडे पाहिलें तों त्याचें कांहींच वाटलें नाहीं. इसून शंकरमामंजींची टर मात्र उडवायची अन् मला असें झालें होतें कीं, कांहीं पुसूं नये. तिकडचा असा रंग पाहिल्याबरोबर मला फारच चमत्कारिक वाटून मीं म्हटलें, " हें काय हें ? गळ्याशीं आलं तरी थट्टेवारीच घालवायचं. आपण आतां पुण्यांत जातों तों जिकडे तिकडे या असल्या बातम्या पसरून टाकलेल्या असतील; आणखी मग ज्यानं त्यानं विचारावं, असं होणार आहे. त्याची आधींच नको कांहीं तजवीज करायला ? "

" त्याची तजवीज काय करायची बोवा, कांहीं लोकांच्या तोंडाला हात लावायचा आहे ? "

" लोकांच्या कशाला ? आधीं जे बातम्या पसरवताहेत त्यांना कांहीं..." " त्यांना काय करायचं ? "

" काय करायचं म्हणजे ? चांगलं चरचरीत पत्र लिहून विचारायचं, कीं हें तुम्हीं आरंभलं आहे काय ? कुणीं तुम्हांला सांगितलं हें, आणखी कुठल्या वर्तमानपत्रांत छापलं आहे ?—उगीच आपलं एखाद्याच्या नांवानं गांवभर हें करावं म्हणजे काय ? "

" बरं. असं लिहिलं; पुढें ? " मला शांतपणानें विचारलें.

आपण मोठया आवेशांत एखादी गोष्ट सांगावी आणखी ज्याला सांगावी त्यानें नुसता शांतपणा, थंडपणा दाखवावा म्हणजे मनाची कशी काय स्थिति होते याचा अनुभव कोणाला नाहीं ? मला खरोखर असा राग आला तिकडल्या त्या शांतपणानें उच्चारलेल्या प्रश्नाचा, कीं कांहीं बोलायची सोय नाहीं. आतां कांहीं पहिल्याप्रमाणें भिण्याचा वगैरे संबंध नव्हता, तेव्हां त्या माझ्या आवेशाच्या भरांत मीं म्हटलें, " हेंच तें. सगळा आपला भोळा कारभार ! म्हणे ( किंचित् वेडावल्यासारखें करून ) बरं असं लिहिलं, पुढें ! हें कसलं मेलं असलं ! चांगलं चरचरीत लिहून विचारायचं एकदा कीं उगीच खोटया-नाटया बातम्या जिकडे तिकडे पसरवून आमची नालस्ती काय म्हणून करतां ? "

" भलतंच एखादं ! तुला असं का वाटतं, कीं शंकरमामा आपल्या लिहिण्यानं उगीच बसतील म्हणून ! उलट त्यांनीं जर त्या पत्राचा वेडावांकडा अर्थ करून जास्त हें केलं नाहीं तर काय म्हणशील तें ऐकेन ! तें कांहीं नाहीं ! आपलं मुकाटयानं आपल्याला काय करायचं तें करावं, व सोडून द्यावं. काय पाहिजे ती बातमी का पसरविनात ते ! आपल्याला......"

" आपल्याला तें सारं ठीक, पण आमची उद्यां पुण्याला गेल्यावर काय अवस्था होणार आहे ठाऊक आहे का ? घरीं दारीं, जिथें तिथें, उठल्या सुटल्या सभा निघणार ! "

" बरं, निघाली तर निघाली. आपल्याला जर जायला पाहिजे, तर मग लोकं बोललीं म्हणजे कां नको सोसायला ? "

" बरं आहे. मी आतां पुनः जाईन तर......"

" ह्यः वेडी कुठली, सभेनं काय केलं आहे ? तुला कांहीं त्यांत वावगं वाटतं आहे का ? "

" मला नाहीं वाटलं म्हणून काय झालं ? हें लोकांत--"

" अग, आपण कांहीं नवीन काढलं, कीं त्याच्याबद्दल लोकांचा त्रास हा व्हायचाच ! तो तेवढा जर मग आपण सोसला नाहीं तर या चाली याव्या तरी कशा ? "

" तें सगळं खरं; पण..."

" पण नाहींन् बीण नाहीं. लोकं अशींच बोलायचीं. आपण पत्रं ल्याहा कीं आणखी कांहीं करा. आपण पत्र लिहिलं म्हणजे शंकरमामा उगीच का बसणार ? त्यांनीं तें पत्र साऱ्या गांवभर फिरवलं नाहीं तर माझं नांव दुसरं ! ज्याला पाहायचंच नाहीं, त्याच्या-सारखा अंधळा, आणखी ऐकायचंच नाहीं त्याच्यासारखा बहिरा कोणी नाहीं. शंकर-मामासारखे लोक म्हणजे काय, त्यांना कांहींतरी असंच लागतं, कोणी कांहीं चांगली, पण थोडी जुन्या रीतीला सोडून अशी गोष्ट करायला गेलं, कीं त्याची टर उडवावी, त्याचा छळ करावा, याच्यासाठीं यांचा जन्म. यांना कांही जुन्या चालीरीतींचा खरा खरा अभिमान का असतो म्हणतेस ? स्वतः यांचें वर्तन काय असतं पाहाना—हेच शंकर-मामा—तें काय आतां बोलतां येत नाहीं. जाऊं दे कीं ! मी आतां तुला इंग्लंडांतल्या एका बाईची गोष्ट सांगतों; ती ऐक. " ' या शंकरमामासारख्या शेंकडों लोकांनीं तिचा छळ किती आणखी कसा केला ! तिच्या नवऱ्यानं तिचा छळ केला, कोर्टापर्यंत मजल गेली, तिची आणखी तिच्या पोरीची ताटातूट केली, तिच्यासंबंधानें पाहिजे तें लिहिलं, वर्तमानपत्रांतून तर शिव्यांचा नुसता वर्षाव ! पण तिनें आपला मार्ग यत्किंचित्‌देखील सोडला नाहीं. ' असें म्हणून त्या बाईचें इत्थंभूत चरित्र मला सांगितलें. तें ऐकून माझ्या मनाला किती उदात्तपणा आला ! शंकरमामंजींसारख्या लोकांच्या निंदेला यत्किंचितहि न जुमानतां आपलें मन कसें निष्कलंक ठेवावें, विचार करून स्वीकारलेल्या शुद्ध मार्गापासून यत्किंचितहि आपलें मन न चळूं देण्याविषयीं किती खबरदारी ठेवावी वगैरे गोष्टींबद्दल माझ्या मनावर त्या चरित्रापासून कितीतरी उत्तम ठसा उमटला. दुसरे दिवशीं दोन प्रहरीं लक्ष्मीबाईंना मीं ती चरित्राची गोष्ट सांगितली. त्यांनीं ती यापूर्वी ऐकली नव्हती असें दिसतें. मजपासून ती गोष्ट ऐकून त्यांना तें चरित्र वाचण्याची इच्छा झाली. रात्रीं त्यांनीं आम्हीं सर्व जमल्यावर ती गोष्ट पुनः काढली व अशा बाईचें चरित्र कोठें आहे म्हणून तिकडे विचारलें, तेव्हां एका पुस्तकाचें नांव सांगितलें. तितक्यांत नानासाहेबांनीं म्हटलें, " अहो, गणपत-राव आज येथें असता, तर तुम्हांला त्या बाईच्या चरित्रांतल्या कितीतरी गोष्टी सांगता ! तो तिला केवळ देवताच समजतो. आणखी तिचं एकंदर चरित्र वाचलं म्हणजे तसं वाटतंच वाटतं. मला त्यानंच एकदा सर्व हकीकत सांगितली होती. " असें म्हणून त्यांनींहि तिच्या हालअपेष्टांबद्दल कांहीं दुसऱ्या गोष्टी सांगितल्या. अशा तऱ्हेनें तें उदात्त

चरित्र ते दिवशीं ऐकल्यानें माझ्या मनांतले आधींचे ते सारे खेदाचे विचार जाऊन मन मोठें झालेंसें वाटलें व शंकरमामंजींचें पत्र व त्यांच्या कृति यांचा सर्वथा तर नाहींच म्हणा, पण थोडाबहुत विसर पडला खरा

इतक्या सगळ्या उलाढाली झाल्या, शंकरमामंजींचें तें भयंकर पत्र आलें, पण त्यांतलें एक अक्षरसुद्धां आम्हीं मासूबाईंच्या कानावर जाऊं दिलें नाही. तें जर त्यांना कळतें तर विनाकारण त्यांच्या जिवाला खेद झाला असता. प्रथम प्रथम मी पाठीस लागलें होतें, कीं त्यांच्या कानावर साऱ्या गोष्टी घालाव्या, म्हणजे पुण्यास गेल्यावर जो गिल्ला होईल त्याचें एकदम कांहीं वाटणार नाहीं. परंतु माझी अशी समजूत केली कीं, तिथें गेल्यानंतर जें काय होणार तें होणारच. आज तिला सांगितलें तरी तिथल्या गिल्ल्यानें तिला कांहीं कमी त्रास होईल असें नाहीं. मलाहि तें खरें वाटलें. मला शंकर-मामंजींचा स्वभाव ठाऊक. ते एकदा त्रास देऊं लागले म्हणजे असा त्रास देऊं लागायचे कीं कांहीं पुसूं नये. बरें एखादे वेळ स्तुति करूं लागले की तीहि अशी करायची, कीं तिलाहि पारावार नाहीं. पण ते दुसऱ्याच्या खोड्यानाटया निंदा करण्यांत जितके चतुर होते, व त्या कामाला लागण्याच्या वेळीं जें त्यांना स्फुरण येत असें तें कांहीं अनिवार! तेव्हां सासूबाईंना आधीं सांगितलें काय अन् नाहीं काय, तिथला त्रास कांहीं त्यामुळें कमीअधिक होणार होता असें नाहीं. असो.

◆ ◆ ◆

## ५५ : आमची मर्यादा

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

मागील प्रकरणांतलीं पत्रें येऊन आठदहा दिवस झाले. आम्हांला त्यांचा चांगला विसर पडत चालला. त्या पत्रांमुळें अतिशय वाईट वाटून कोठें जायचें नाहीं, यायचें नाहीं, फारसें शिकायचें नाहीं, संवरायचें नाहीं, असें जें थोडेंसें वैराग्य प्राप्त झालें होतें तें तिकडच्या टोंचण्यानें व यशोदाबाई आणि लक्ष्मीबाई यांच्या गोड उपदेशानें निर्बल होऊन आतां तर अगदींच नाहींसें झालें. आमचा क्रम पूर्वीप्रमाणें सुरू झाला. जणू काय तसलें कांहीं पत्र आम्हांला कधी आलेंच नव्हतें; मग उगाच कांहींबाहीं केव्हां स्मरण तरी होई; पण तिकडे तर त्याचें नांवदेखील नको. या आठ दिवसांत आम्ही कोठें बाहेर गेलोंच नाहीं; कारण कोठें जाण्याचा प्रसंगच आला नाहीं; माझा अभ्यास नीट चाललाच होता. मराठी थोडेंबहुत येऊं लागलेंसें वाटल्याबरोबर इंग्रजी यावें अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. तथापि काय असेल तें असो, इंग्रजी शिकवा असें लक्ष्मीबाईंजवळ म्हणावें कसें याचें मला मोठें कोडें पडलें. पण एक दिवस मीं म्हटलेंच. शिवाय तिकडेहि गोष्ट काढली, तेव्हां हसून म्हणायचें, " हं ! हं ? मराठीच्या अभ्यासाची इतिश्री झाली वाटतं ?

तें धड वाचायला येईना तों म्हणे इंग्रजी शिकणार. आम्हांला जी भाषा शिकायला हाडांचीं काडं करून दहा–दहा पंधरा–पंधरा वर्षें घालावीं लागलीं, ती तुम्हांला मराठी ट फ करायला यायला लागलं नाहीं तों शिकायला पाहिजे का ?" हें सारें थट्टेचें होतें; इतकेंच नव्हे, तर मनांतून मीं इंग्रजी शिकावें असें फार होतें व त्याप्रमाणें एकदादोनदा बोलूनहि दाखविलें होतें, यामुळें मला त्या बोलण्याचें कांहींच वाटलें नाहीं. माझी इंग्रजी शिकण्याची इच्छा प्रबल होत चालली; मराठी थोडेसे कच्चें पडलें तरी हरकत नाहीं, पण इंग्रजी यावें असें वाटूं लागलें. त्यांत लक्ष्मीबाईचें उत्तेजन, मग काय विचारतां ? तरी पण मे महिन्यांत पुण्यास जायचें होतें. तेथून परत आल्यानंतर मग सुरुवात करावी, असा विचार करून सध्यांचा अभ्यास चालला होता तसाच चालू ठेविला. होतां होतां आणखी पंधरा दिवस गेले. आतां पुण्यास जाण्याचे दिवस जवळ आले. कसें काय करावें याचा विचार पडत चालला, गोपाळमामंजींचें मुळींच पत्र आलें नव्हतें. शंकरमामंजींचें देखील तें जें विलक्षण पत्र आलें, त्यानंतर कांहींच पत्र नाहीं, यामुळें आमचे पुण्याला जाण्याचे दिवस जसजसे जवळ येत चालले, तसतशी मला धाकधूक वाटूं लागली. आतां पुण्याला गेल्यावर काय होतें आणि काय नाहीं ! नाहीं तर आम्ही जाऊन उतरावें आणि शंकरमामंजीनीं 'चला, व्हा चालते. आमच्या कुळाला आणखी आमच्या घराला बट्टा लावलांत त्या तुमची आम्हांला जरूर नाहीं ' असें म्हटलें, तर आमची काय शोभा राहली ? असे विचार माझ्या मनांत येऊन मीं तिकडे बोलून दाखविलें; पण चमत्कार काय पाहा, मला ते जितके महत्त्वाचे, अगदीं विचार घेण्याजोगे वाटले, तितके तिकडे मुळीच वाटलें नाहींत. उलट मला म्हणायचें, " वेडी तर नाहींस तूं ? तुला शंकरमामा कसे आहेत हें कळून आलें म्हणतेस, पण मुळींच कळलें नाहीं. आम्ही घरांत जाऊन उतरल्यावर ब्र देखील काढण्याची त्यांची छाती नाहीं. याचा अनुभव येईल आतां तुला ! " मला तेवढ्यानें अर्थातच समाधान वाटलें नाही. पुण्यास गेल्यावर आपल्याला कांहींतरी त्रास होणार ही जी धास्ती मनांत उद्भवली होती ती कांही केल्या जाईना. तो त्रास कोण्या कोण्या तऱ्हेचा होणार हें अद्यापि मला पक्कें कळलें नव्हतें, तरी पण अतोनात त्रास होणार असें माझ्या मनास पक्कें वाटून चुकलें होतें. माझ्या दोघी मैत्रिणी यशोदाबाई व लक्ष्मीबाई यांना तसल्या प्रकारचा फारसा अनुभव नव्हताच, यामुळें त्यांनीं मला काय सांगावें ? यशोदाबाईना थोडासा त्रास होता व तो त्यांनीं मला सांगितला; पण माझ्या कल्पनेशीं तो कांहीं जुळेना. माझा पूर्वींचा जो त्रास होता तो व आतांच्या या आमच्या नवीन कृतीमुळे त्याच्या भरीला येणारा, या दोहोंची बेरीज करून पाहतां फारच होऊं लागला. तथापि मीं आजपर्यंत पुष्कळदा असें सांगितलेलें वाचकांस आठवत असेल, कीं माझा स्वभाव जात्याच थोडासा विसराळू असल्यामुळें त्या वेळेपुरतें एकदोन दिवस अलीकडे-पलीकडे काय वाटे तेवढेंच. त्याचें पुढें कांहीं विशेष राहात नसे. त्याप्रमाणें याहि गोष्टीचें होईल असा भरंवसा होता.

कॉलेजांतील सुटीच्या पूर्वी परीक्षा वगैरे काय व्हायच्या त्या झाल्या म्हणजे आपल्याला जायचें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें परीक्षा सुरू होण्याची तर वेळ झालीच. आणखी आठ दिवसांच्या आंतच आपल्याला गेलें पाहिजे, असें मनांत येऊन मन जास्त जास्त उदास होऊं लागलें. कांहीं वाचण्यासंवरण्याकडे मन लागेना. कांहींतरी युक्ति काढून न जाण्याचें करावें असें मनांत येऊं लागलें. आमची शेजारची मंडळी कांहीं इतक्यांत जाणार नव्हती. त्यांना जाण्याला अवकाश होता. शिवाय पुण्यास येणारे काय ते विष्णुपंतच ! ते कदाचित् येतील कदाचित् नाहीं, अशी त्यांची वानवा होती. नाना आपल्या गांवीं म्हणजे जेथें त्यांचे गणपतराव होते, तेथें कायसे जाऊं म्हणत होते; त्यामुळें मुंबईस तरी कसें राहावें ? आणि आम्ही नुसते येऊन राहिलों नाहीं, तोंच असें न जाणें बरेंहि दिसलें नसतें. शिवाय सासूबाईचें मत कांहीं कळेना. त्या आपल्या तिकडे म्हणत, " मला इथें काय आणखी तिथें काय एकच ! जिथें तूं असशील तिथें राहायचं. पण सुटी जर आहे तर जावं तेंच चांगलं बाकी तुला कांहीं कामं असलीं इथें तर नको जाऊं. " त्या देवमाणूस होत्या, यांत तिळप्राय संशय नाहीं. पुढें कांहीं गोष्टी घडल्या, त्यांवरून तर माझी खात्री झाली, कीं आम्ही बाहेर जातों, सभांना जातों यांत म्हणजे कांहीं वावगें आहे असें त्यांना मुळींच वाटत नसावें. हो. जर तसें वाटतें, तर एक दिवस तरी म्हणत्या कीं नाहीं ? मग तिकडून कांहींतरी बोलून समाधान केलें असतें, वगैरे गोष्ट लांबच; पण त्यांनीं एक दिवस तरी उद्गार काढायचे कीं नाहीं ? पण मुळींच नाहीं. एकदा कुठें त्यांनीं विचारलें, " काय रे, या दर शनिवारीं जाऊन कुठें काय करितात ? " तेव्हां तिकडून चटकन् सांगायचें, " कांहीं नाहीं. कुठें शिवणकाम, कुठें कशिदा, लोकरीचें काम शिकत असतात." बस, तेवढयानें त्यांचें पुरें समाधान झालें आणि तें सर्व खरें वाटण्याला कारण असें झालें होतें, कीं आम्ही यांना नि गोपिकाकाकूंना पांढऱ्या लोकरीचीं दोन आसनें देवळांत बसण्यासाठीं दिलीं होतीं व तसलें एक आईला करून ठेव असें त्यांनीं मला सांगितलें होतें. त्यांनीं मग पुनः इतकें कसें तें कांही विचारलें नाहीं. आम्ही रात्रीं वर एका ठिकाणीं बसून गप्पा सांगत बसूं, तें त्यांना कळलें होतें कीं नाहीं, याची मला शंका होती. कारण त्या मुळीं गोपिकाकाकूंच्या तिकडे जाऊन रात्रीं निजत. आणखी त्यांत अशी मजा असे, कीं आमचें त्यांच्याशीं वर्तन अतोनात मर्यादेचें असें. त्यांच्यादेखत आम्ही कधीं एकमेकांशीं बोललोंदेखील नाहीं. त्याचप्रमाणें सकाळच्या सैंपाकाचा नाइलाज होता. त्या ऐकेनात. किती म्हटलें तरी म्हणून गोष्ट निराळी; पण इतर कोणतेंहि काम मीं कधीं त्यांना करूं दिलें नाहीं. त्या खालीं निजत तर त्यांच्या अंथरुणा-पांघरुणाची तजवीज, यशोदाबाई आपल्या सासूच्या बरोबरीनें करून ठेवीत. त्याप्रमाणेंच लक्ष्मीबाई. आम्ही तिघीजणी त्यांना यत्किंचित्देखील अधिक आगळें काम पडूं देत नव्हतों, कीं कधीं त्यांच्यादेखत त्यांच्या मनाला अमर्यादेचें वाटेल असें वर्तन घडूं देत नव्हतों; आमचें दोघांचें तर राहोच, पण नानासाहेब व यशोदाबाई किंवा विष्णुपंत आणखी लक्ष्मीबाईदेखील त्यांच्यादेखत आपसांत कधीं

बोलली नाहींत. एक दिवस सहज गोष्टींवरून गोष्टी निघतां निघतां या मर्यादे-अमर्यादे· वर बोलणें निघालें. तेव्हां नानासाहेबच मला वाटतं म्हणाले, " अहो, हें पाहा, या म्हाताऱ्या माणसांची मर्जी संभाळायला कीं नाहीं फारसं कांहीं लागत नाहीं; लहानसहान, बारीकसारीक गोष्टी असतात कीं नाहीं, त्या अगदीं त्यांच्या मनाप्रमाणें पाळाव्या, म्हणजे मग एखाददुसरी मोठी गोष्ट केली तरी, या गोष्टींच्या जोरावर तिला कोणी विचारीत नाहीं. त्यांच्यादेखत बोलणं त्यांना अमर्यादेचं वाटतं, नाहीं बोललं; कांहीं तेवढीच वेळ असते बोलायला ? चार गोष्टी करायच्या असल्या कीं तिघींबद्दल परवानगी मागावी म्हणजे चवथीबद्दल नाहीं मागितली तरी चालतं. जें पाळलं पाहिजे तें हेंच ! लहानसहान गोष्टी, पण या जर का पाळल्या नाहींत, आणखी सगळ्या बाकी गोष्टी केल्या तर त्यांचें चीज कधींच होत नाहीं. "

हें त्यांचें बोलणें मला मोठें पटलें; इतकेंच नव्हे, तर थोडे दिवसांनीं आपल्याला याचा अनुभव घेऊन पाहण्याची वेळ येईल, तेव्हां तें लक्षांत ठेवून वागायचें असा मीं मनांत निश्चय केला. ते दिवशीं गोष्टी निघतां निघतां फाजील मर्यादेची गोष्ट निघाली आणि तिकडून आपला एका ठिकाणचा अनुभव सांगितला. " बरं, हें वडील माणसांचं ठीक आहे. त्यादेखत दुसऱ्याशीं बोलूं नये; मोठ्यानं फारसं बोलूं नये; फार वर पाहूं नये; तुम्हीं म्हणतां मी म्हणतों त्यांच्या मर्जीकरितां वागावं तसं. पण समजा, कीं आम्ही घरीं नाही आणखी आमच्याकडे दुसरा कोणी गृहस्थ आला, तर त्याला आम्ही घरांत नाहीं हें सांगावं कोणीं ? अहो, तो नाशिकचा कृष्णराव आहे ना ठाऊक–नसेल. तो नुकता पुण्यास येऊन राहिला होता बिऱ्हाड करून मी एक दिवस त्याच्या घरीं गेलों, त्याची बायको दारांत उभी होती. ' कृष्णराव आहेत का ? ' म्हणून मीं विचारलें एक नाहीं दोन नाहीं. ती बाई आपली दाराच्या आड झाली. मी आपला बुचकळ्यांत पडलों. धड आहेत कळेना, नाहींत कळेना ! शेवटीं पुनः एकदा विचारलें तेव्हां ती आपली झटकन् आंत जाऊन दुसऱ्या कोणाला, ' बाहेर कोण आलं आहे तिकडे विचारायला, त्यांना म्हणावं घरीं कोणी नाहीं. जा, सांग जा. ' असें म्हणतांना ऐकलें, आणखी मी आपला मुकाट्यानें घरीं आलों; पण ते दिवसापासून मनांतला बेत हा, कीं आपल्या बायकोला ही असली फाजील मर्यादा टाकून दे म्हणून शिकवायचं. अहो, अशा वेळीं अगदीं वेड्यासारखं होतं. बाहेर मनुष्य येतो त्याला आपला नवरा घरांत आहे कीं नाहीं हें सांगण्यांत अमर्यादा ती काय ? सारा आचरटपणा ! अन् त्यांत मजा ही कीं, ज्यांत त्यांत धर्माचंच घोडं. त्याच्यामुळें या असल्या वेडगळ समजुती निघून जायलादेखील अडचण ! "

नानासाहेब : जातील जातां जातां. जें या काळाला अयोग्य तें कांहीं फार वेळ टिकायचं नाहीं; जायचंच तें. एवढी खबरदारी घेतली पाहिजे, कीं आपल्या पुढच्या पिढीच्या डोक्यांत हीं आचरट वेडं शिरूं देतां उपयोगी नाहींत.

लक्ष्मीबाई : उघडच आहे. मागल्या म्हाताऱ्या माणसांना आम्ही काय आतां करणार ? त्यांच्या मनांत अगदीं लहानपणापासून अगदीं पक्क्या भिनलेल्या गोष्टी. त्या कशा जाव्या ?

विष्णुपंत : जाव्या कशा हें एक; आणखी घालवायचा यत्न केला तरी त्यांत यश न येतां भलत्यान् सलत्याच परिणामाला कारण होतात.

रघुनाथराव : आणखी एक गोष्ट असते ती कशी तुम्ही विसरतां ? आमच्या शंकरमामांच्या वर्गांतली मंडळी जाणूनबुजून आडमार्गानं जातात, त्यांच्या कृति कशा विसरतां ? तसल्या लोकांचं स्वतःचं वर्तन पाहिलं तर धर्मदृष्टीनं अशुद्धांतलं अशुद्ध ! पण तोंडपाटिलक्या करायच्या त्या सगळ्या धर्माभिमानाच्या; तुमच्याआमच्यासारख्यांना शिव्या देऊन, सुधारक म्हणून, सगळ्या लोकांत दुष्टाचार्यपणा मिळवायचा !

नानासाहेब : अहो, हें असल्या लोकांचं कुठपर्यंत चालायचं ? जोंपर्यंत लुच्चेगिरी बाहेर पडली नाहीं तोंपर्यंत. एकदा का ती बाहेर पडली म्हणजे मग त्यांच्या छीःथूःला कांहीं पारावार नाहींसा झाला म्हणून समजावं. लोकांना एकदा...

रघुनाथराव : छे हो, तुम्हांला ही उगीच भ्रांति आहे. साधारण लोकांना अक्कल नाहीं यांचा कावा समजण्याची; ते यांच्या भूलथापांवर जातात; आणखी एकदा समजलं म्हणजे ते यांना भुलणार नाहींत, असं जें तुमचं म्हणणं आहे कीं नाहीं तें अगदीं चुकीचं आहे. लोकांना यांच्या वागणुकी अगदीं ठाऊकच नसतात असा का तुमचा समज आहे ? अहो, सगळं ठाऊक असतं, पण साधारण लोकांच्या बऱ्यावाईट गोष्टींबद्दल समजुती भारी वाईट झाल्या आहेत. तो अमुक ना असं करतो, मग करीना ? तें केलं म्हणून काय झालं ? त्याची स्नानसंध्या कशी आहे कडकडीत ! दर चतुर्थीला अमक्या देवळांत ब्राह्मण घालतो, अन् धर्माची श्रद्धा तर काय आहे म्हणतां ? बाकी तो आपल्या घरींदारीं कांहीं का करीना ? तेव्हां अशा जिथें समजुती तिथें...

विष्णुपंत : तें कांहीं खोटं नाहीं. माझा समज असा आहे बुआ, कीं ज्याला कांहीं गोष्ट आपल्यांत नवीन यावी असं वाटत असेल, त्यानं बेधडक मागेंपुढें न बघतां आपल्या शक्तीच्या मानानं ती करायला लागावं. प्रथम प्रथम त्रास सोसावा लागेल. सोसवेल तितका सोसावा नाहीं तर सोडून द्यावा.

यशोदाबाई : सोडून द्यावा म्हणजे ? मग त्याच्यासारखी फजिती कोणाचीच नाहीं.

विष्णुपंत : त्यांत कसली आहे फजिती ? होईल तेवढं केलं...

लक्ष्मीबाई : म्हणूनच लोकं जास्ती पाठीस लागून दुसरें कोणी तेंच करायला जातील, तर त्यांना पहिल्याचं उदाहरण देतील. त्यांतून मला वाटतं बायकांचं तर मोठं या काळांत पाप आहे !

रघुनाथराव : तें काय ? बायकांचं पाप काय ?

मी : बायकांचं पाप म्हणजे असं, त्यांना घटकोघटकी दुटप्पी वागणूक ठेवायला पाहिजे. पुरुषांजवळ त्यांच्या मनासारखें, घरांत म्हाताऱ्या माणसांजवळ त्यांच्या मनासारखें. तेव्हां दोन्हीहि जिला साधतील तीच खरी म्हणावयाची कीं नाहीं ?

विष्णुपंत : का, रघुनाथराव ? पकडलं तुम्हांला म्हणायचं.

मी : पकडलं कसलं ? पण तुम्हीच सांगा; मी म्हणतें हें खरं का खोटं तें. म्हणजे पाहा, तुम्ही आम्हांला अमुक करायचं म्हटलं म्हणजे आम्हांला करणं भाग आहे. बरं घरांत तसं केलेलं ऐकलं म्हणजे आमची जी काय पूजा होईल तीहि मुकाट्यानं सोसून राहणं भाग आहे. आहे कीं नाहीं मी म्हणतें तें खरं खरं पाहा ?

रघुनाथराव : हो हो. खरं खरं आहे यांत शंका कोणाला आहे ? आपण शहाण्या म्हणून तर त्यांतून निभावणार आणखी आम्हांला निभावून नेणार ! आम्ही आपले...

मी : ही असली थट्टा काय उपयोगी ? मी म्हणतें त्यांत दाखवावं कुठं खोटं आहे तें. आतां हेंच पाहा ना ! पुण्यास गेल्यावर आपल्याला जो त्रास होईल त्याच्यापेक्षां मला घरांत शतपट जास्त होणार ! घटकोघटकीं जर आमचं शिकणंन् सभेला जाणं न निघालं तर काय म्हणाल तें ऐकेन !

रघुनाथराव : पण तुम्ही पुढच्या पिढीच्या आया; तुम्ही जर तें सोसलं नाहीं आणखी धीर धरला नाहीं, तर मग व्हावं कसं पुढें ? त्रास हा होणारच. टाळवेल तितका आपण टाळूंच. पण भोगावा लागलाच तर भोगायलाहि पाहिजे. त्याच्याखेरीज काय होणार ? तुम्हांला त्रास होणार तो आम्हांला झाल्यासारखाच नाहीं का ? आम्ही त्याला वांटेकरी आहोंतच. काय हो नानासाहेब, तुमचं काय म्हणणं आहे ? तुम्हांला नाहीं वाटत माझ्यासारखंच ?

नानासाहेब : अहो, हें काय, कोणीहि सांगेल.

◆ ◆ ◆

## ५६ : शंकरमामंजींचें आणखी एक पत्र

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

वरील उपदेश कसाला लागण्याचे दिवस अगदीं नजीक आले. पुण्याला जाण्याला दोन कीं तीनच दिवस उरले. आधीं दोन दिवस गोपाळमामंजींना, आम्ही सारीं आणखी चारपांच दिवसांनीं येतों, कांहीं आणायुसंवरायचें असल्यास ल्याहावें, असें पत्र लिहिलें होतें. त्याचें त्यांचेकडून उत्तर कांहीं आलें नाहीं; परंतु शंकरमामंजींचें–(त्यांना पत्र मुळींच लिहिलें नव्हतें, त्यांच्या पत्राचा उल्लेख नव्हता, त्यांचें नांवहि घेतलें नव्हतें तरी त्यांचें) –पत्र आलें. तें असें :—

॥ श्री ॥

आशीर्वाद विशेष. आपल्याला इतकें कडक लिहिलें तेवढयानें उमजलां हें पाहून थोडासा संतोष वाटला. किती झालें तरी आमच्या शिकवणीचे, आमच्या नजरेखालचे, तेव्हां उमजाल यांत नवल काय ? थोडेंसें कडक लिहिलें तेव्हांच वाईट वाटलें; पण मनुष्य लवकर शुद्धीवर यावासा वाटून अंजनाचें बोट डोळयांत फिरवितात, त्या वेळीं वेडी माया करून ओरडेल आरडेल याचा विचार करीत नाहींत, तसाच माझा प्रकार होता. आपलें बरेच दिवसांत पत्र नाहीं, तेव्हांच वाटलें कीं हें पश्चात्तापाचें लक्षण आहे. कालचें पत्र वाचून संतोषच झाला. घरांत आईला सांगून राग घालवितों. आमच्या सर्वांच्या प्रकृति बऱ्या आहेत, येतांना पुढील जिन्नस घेऊन यावे :—१. जरीच्या टोप्या दोन, प्रत्येकीं किंमत फार नसावी. फार झालें तर पंधरा रुपयाला जोडी. चि० धोंडूच्या डोक्याची एक, आणखी दुसरी त्याच्यापेक्षां गहूंभर मोठी. त्याचप्रमाणें चि० सौ. वारी आठपंधरा दिवसांत येथें येणार आहे, तिच्या मुलीला एक झबलें रेशमी कापडाचें उंची घेऊन यावें..........." अशा तऱ्हेनें एक पांचसात जिन्नस मागितले असून शेवटीं येथें आल्यावर पैसे देईन असें आश्वासन आणि पुनः पुनः "आपल्याला पश्चात्ताप झाला; आपण तो सुधारकांचा मार्ग थोडक्याच लिहिण्यानें उमजून सोडला, फार चांगलें झालें," असें निरनिराळया तऱ्हांनीं लिहिलें होतें. तें पत्र वाचून बरीक माझें हसूं आवरेना. इतक्यांत मला म्हणायचें, "का, झाली का खात्री शंकरमामा कसे काय आहेत त्याची ! पण एवढयावरच जाऊं नको हो. पुण्यास गेल्यावर आम्हांला जो त्रास व्हायचा तो कांहीं कमी होईल किंवा आमच्या नावानं जिथें तिथे त्यांनीं जें काय केलं असेल तें कमी झालं असेल असं मुळींच नाही. त्या टोप्या आणायला ल्याहायचं होतं म्हणून, आणखी आपली प्रौढी थोडीशी मारायला सांपडेल ती मारावी – हो एवींतेवीं हा येणारच, तेव्हां अशा तऱ्हेनें जरा लिहून आपलीच प्रौढी कां मिरविली नाहीं ? अग, ते आतां जिथें तिथें सांगत फिरत असतील 'पाहा, माझ्या एवढयाशा पत्रानं हा किती निवळला. किती गरिबीचं पत्र लिहिलं आहेन्, किती त्याला वाईट वाटलं आहे, शेवटीं मला कींव येऊन मींच त्याला लिहिलं, आतां पुण्यास ये, पुनः मात्र अशा भानगडींत पडूं नकोस.' गंध्यांच्या दुकानांत, भटांच्या त्या गटारयंत्रावर, जिथें म्हणून कोणी भेटेल तिथें तिथें त्यांनीं असं सांगितलं असेल हें आतां." मला तें पत्र वाचल्यापासून तें तसें अक्षरशः होत असेल असें खात्रीनेंच वाटलें. रात्रीं मंडळींत तें पत्र सांगितल्यावर तर जी त्या पत्राची थट्टा झाली ती कांहीं विचारूंच नका. त्याच्यावर नाना तऱ्हेच्या कोटया होऊन आम्ही सर्वजण पोट धरधरून हसत होतों. आणखी अनेक गोष्टी निघून विष्णुपंतांनीं एका इंग्रजी कादंबरीकाराच्या ग्रंथांतल्या नाना तऱ्हेच्या स्वभावाच्या पात्रांबद्दल गोष्टी सांगितल्या. नानासाहेब तर म्हणाले, "वा ! एकदा तुमचे शंकरमामंजी पाहिलेच पाहिजेत बोआ. त्यांचं एखाद्या कादंबरींत जर कोणी वर्णन देईल, तर फारच चांगलं होईल. आमचा गणपतराव असता ही मजा ऐकायला म्हणजे मोठी मौज झाली असती.

आमचे काका मोठे मजेदार आहेत, पण ही तऱ्हाच कांहीं निराळी. आमचे काका आपल्या काकूंच्या हातांत असतात. त्या जसं सांगतील तसं यांचं चालायचं. एक घोटभर पाणी प्या म्हटलं तर घोटभरच ! त्यांत एक रतिभर जास्ती नाहीं कीं कमी नाहीं. तुमचे मामा म्हणजे काय अद्वितीय व्यक्ति ! कधीं कोणाला कळायचीच नाहीं ! ”

रघुनाथराव : पाहा कसे आहेत ते ! पण एकदा हे जिन्नसबिन्नस नेऊन ते पाहून खूष होऊन दोनएक दिवस झाले, कीं ‘ येरे माझ्या मागल्या ’ आहेच म्हणून समजा. मलादेखील पहिल्या पहिल्यानं त्यांची खुबी कळली नव्हती हो. पण पुढें जेव्हां त्यांचा एकंदर झोंक पाहिला, तेव्हां वाटलं, कीं अरे, हें असं आहे बरं, मोठं जपून वागलं पाहिजे.

मी : अन् लहरी म्हणजे इतके आहेत की आमची तर गोष्ट लांबच, पण प्रत्यक्ष बायको इतकी चांगली, गरीब, सालस, कोणाच्या अध्यांत नाहीं, मध्यांत नाही, तिला छळायला लागले, कीं असे छळायचे कीं कांहीं पुसूं नये. ती जेवीत असेल तर समईच उचलून न्यायचे. म्हणे जेवीना का अंधारांत ! अन् नाहीं तेव्हां मेणबत्तीचा दिवा तिच्यापुढें आणून ठेवायचे ! तिचे कपाळ चेपायला, पाय रगडायला तयार व्हायचे ! बरं एकदा अबोला धरला, कीं आठ आठ दिवस अबोलाच ! मग घरींदेखील असायचे नाहींत. नाहीं तर, वडील नाहीं, धारं नाही, लहान नाहीं, धाकटं नाहीं, कोणी का असेना जवळ, त्यांच्यादेखत थट्टा करायची, बोलायचं ‘ का ग, आमच्यावर रागावलीस होय ? आम्ही तुझ्या पायां पडूं ? नाक घासूं तुझ्यापुढं ? असं कां करतेस ? ’ आणखी घटका जाऊं द्या अन् एखादी गोष्ट त्यांच्या मनावेगळी होऊं द्या कीं पोराला सांगायचं, ‘ धोंड्या, मार एक तोंडांत ! ’

विष्णुपंत : हं ! मोठी विलक्षणच व्यक्ति आहे म्हणायची ! अशा नवऱ्यांशीं गांठ पडली म्हणजे बायकोनं करावं काय, बोला ? अन् अगदीं हा नेम पाहून ठेवा. नवरा खाष्ट असला – असा मूर्ख असला, कीं त्याला आपली चांगली बायको मिळायचीच मिळायची ! किती पण उदाहरणं आहेत माझ्या पाहण्यांत ? नवरा विक्षिप्त, तर बायको अगदीं उत्तम स्वभावाची. बायको विक्षिप्त कीं नवरा आपला गरीब. दोन्हीं चांगली असं फार क्वचित्. हजारा दोन हजारांत एखादं असलं तर कोणास ठाऊक !

रघुनाथराव : कां बरं ? मी हजार दोन हजार कांहीं जोडपीं पाहिलीं नाहींत; सर्व तऱ्हेनें उत्तम अशीं दोन माझ्या डोळ्यांसमोर अगदीं पाहतों आहें.

नानासाहेब : तुम्हीच का ? आपल्या तिघांपैकीं प्रत्येकजण या वेळीं आपल्या डोळ्यासमोर तसलीं दोन जोडपीं पाहतो आहे म्हणा ना.

तें नानासाहेबांचें मोठें मार्मिक बोलणें ऐकून आम्हां तिघांपैकीं प्रत्येकजण विनयानें “ कसचें ? कसचें ? तुमची गोष्ट निराळी ! ” असें आपापल्या परीनें म्हणत, परंतु मनांत अगदीं आनंदित होऊन उशीर झाला म्हणून आपापल्या घरीं गेलों. आम्ही खालीं आल्यावर आमचें बोलणें त्याचसंबंधानें चाललें होतें. “ त्या साऱ्या जिनसा आणल्या

पाहिजेत. टोप्यांत आपल्याला कांहीं समजत नाहीं; त्या विष्णुपंतांना नाहीं तर नानासाहेबांना सांगून कोणाकडून तरी आणवल्या पाहिजेत " असें म्हटलें, तों मीं सहज विचारलें, " एक टोपी धोंडूभावजींना, पण दुसरी कोणासाठीं लिहिली ? " तेव्हां हंसून " कोणाला ठाऊक त्यांचं काय आहेन् काय नाहीं ! लिहिली आहे, त्याप्रमाणें आपण न्यावी न् त्यांच्या स्वाधीन करावी, " असें म्हणायचें.

मी : असं म्हणायचं म्हणजे काय ? सात आठ रुपयांची टोपी आपली त्यांनीं लिहिली आणखी आपण न्यायच'. मला वाटतं, एक न्यावी अन् दुसरी कांहीं सोईवार मिळाली नाहीं म्हणावं झालं. इथें आल्यापासून कांहीं नाहीं तरी तीस एक रुपयांच्या जिनसा, कपडे, आजपर्यंत खचित त्यांच्याकरितां पाठविल्या असतील !

रघुनाथराव : जाऊं दे कीं ! त्याचा विचार करून उपयोग नाहीं. अन् या खेपेला तर मुळींच उपयोग नाहीं. बरं, तुला त्या तुझ्या दुर्गीला, तिच्या मुलाला कांहीं न्यायचंय् का ? मग तिथें गेल्यावर म्हणशील तें हें नाहीं आणलं, आणखी तें आणलं असतं तर बरं होतं.

मी : खरं खरं. दुर्गीच्या मुलाला तर एक झबलं नेलंच पाहिजे, अन् तें मी सांगणार होतें आणायला. आणखी काय आतां एखादी लहानशी टोपी आणायची होती त्याच्याजोगी. चांगला बाळंतविडा नेला पाहिजे; कसं काय आहे तिच कोणास कळे !

रघुनाथराव : बरं, आपल्या माहेरीं वहिनीला, माईसाहेबांना कांहीं ?

मी : वहिनीला का ? कुठें चोळीला चीट, जरीचे कांठ, रेशमी कांठ, ते मीं मागेंच तिच्यासाठीं न् दुर्गीसाठीं घेऊन ठेवले आहेत. माईसाहेबांच्या काय मनास येणार आहे ? त्यांना आवडले, तर मीं आपल्यासाठीं घेतलेले आहेत ते त्यांना देईन. नाहींतर माझे मला होतील अशा दुवाजवी विचारानें घेतले आहेत ते.

रघुनाथराव : हं ? हं ? मोठा शहाणपणाचा विचार आहे बोआ ! पण आतां पुण्यास गेल्यावर होणार कसं काय ? त्या बनूवन्सं न् धाकटया मामेसासूबाई न् आजेसासूबाई न् शंकरमामंजी न् जेव्हां का गिल्ला होईल तेव्हां मग ?

मी : मग काय ? मग मी साफ सांगेन कीं " माझ्याकडे काय आहे ! जसं सांगितलं तस ऐकायचं ! सासूबाईनीं न् इकडे दोघांनीं सांगितलं ' अमुक कर ' केलं ! "

रघुनाथराव : एकूण बरंच धैर्य येणार आहे पुण्यास गेल्यावर ' साफ सांगायला ' अं ! साफ सांगणार काय ? आमच्यामुळें असं सारं केलं म्हणून ?

खरोखर प्रसंग आल्यावर आपलें हें मुखशौर्य कितपत टिकणार आणि यदाकदाचित् अनेक सायासांनीं टिकल्यास त्याचा कितपत उपयोग होणार, किंवा उपयोगहि झालाच, तर तो आपल्या वाइटासच होणार ह्या गोष्टी माझ्या लक्षांत नव्हत्या असें नाहीं; पण सध्यां रिकाम्या फुशारक्या मारायला काय हरकत होती ! मारे मीं तोंडाच्या बढाया सुरू केल्या. " आम्हांला काय बायकांना, पदरीं पडूं ते सांगतील त्यासारखं वागायचं,

असं मला बोलायला यायचं नाहीं कीं काय ? आम्हांला जर सांगितलं असं करा तर तसं केलं; नको म्हटलं, नाहीं केलं. आमचा त्यांत इतका तरी दोष ? मी अस्सं साफ सांगेन तितकी वेळ आली तर. मला कांहीं वेडी का समजायचं इकडून ? मी वेडी नाहीं हो ! वेळ आली नाहीं तिथपर्यंतच तें. वेळ आली कीं मी नाहीं भ्यायची." तेव्हां मोठयानें हसून म्हणावयाचें, "आतां पुण्यास गेल्यावर काय भ्यायचं, काय नाहीं भ्यायचं, तें समजेल म्हणा, पण सध्यां आम्हांला तरी निदान आतांशा कांहीं भीत नाहींस एवढं खास ! आतां आम्हांला तर मग मोठं जपून राह्यलं पाहिजे पुण्यास ! पण इकडे पाहा, पुण्यास गेल्यावर, हें इथे जसं चालतं हवं तसं बोलणं, हवं तेव्हां खोलीत येणं, तसं नाहीं हो चालायचं. नाहीं तर मध्येंच आपलं वाटलं, कीं येशील उठून खालून कांहींतरी विचारायला म्हणून !"

"माझी तर कांहीं भीति नको. मी डोळा वर करून पाह्यचीदिखील नाहीं. पण आपलं बरीक संभाळावं. सैंपाक करतांनादिखील जवळ येऊन गोष्टी बोलत बसायची सवय. आपलं येणं होईल चुकून ' काय ग ? ' करीत !"

हें माझें बोलणें ऐकून जें काहीं हसूं आलें आहे म्हणतां तें कांहीं विचारूंच नये !

• • •

## ५७ : पुण्यास गेल्यावर

* * * * * * * * * * * * * * *

तिसरा दिवस उजाडला व आम्ही पुण्यास जाण्याच्या जय्यत तयारीला लागलों. सामानसुमान काय आणायचें तें बहुतेक आणलेंच होतें. अशा प्रसंगीं कांहीं केलें तरी आमची जी धांदल उडायची ती उडून अर्थातच कांहीं आणायचें राहिलेंच. असो. साऱ्याचा निरोप घेऊन, व सुटी संपतांक्षणींच पुनः परत येऊं तेव्हां अमुक करूं, तमुक करूं, अशाबद्दल अभिवचनें देऊन व घेऊन, त्याचप्रमाणें एकमेकींस पत्रें पाठविण्याबद्दल दोनतीनदा बजावून आम्ही मुंबईहून पुण्यास जाण्यास निघालों. सुमारें तीन महिन्यांपूर्वी प्रथम पुणें सोडून मुंबईला यायला निघालों असतां माझ्या मनाची जी स्थिति होती, ती आजच्या माझ्या मनाच्या स्थितीपेक्षां किती तरी भिन्न होती ? त्या वेळची ती आनंद-कारक उत्कंठा कोणीकडे आणि आजचें भयकारक औत्सुक्य कोणीकडे ! त्या वेळीं काय होईल, कसें होईल असें वाटत असलें, तरी मनाची पक्की खात्री कीं सर्व आनंदमय होणार. आजहि कसें होईल काय होईल, असेंच वाटत होतें, परंतु मनाची पक्की खात्री, कीं कांहीं तरी फार भयकारक होणार. तेव्हां, आपणांस आतां मुंबईस मंडळी भेटतील ती सर्व आपल्यासारखीच असून त्यांच्या समागमांत आपल्याला सुखावेगळें दुसरें कांहींहि नाहीं असा मनाचा पक्का भरंवसा. आतां, ज्या मंडळींत पुनः जाणार त्यांच्या समागमांत दुःख

व त्रास यांखेरीज दुसरें कांहीं असण्याचा संभव नाहीं. ज्या वेळीं मी पुण्याहून गेलें, त्या वेळचा त्रास मला इतका दुःसह वाटत नव्हता. परंतु आतांचा त्रास फार दुःसह होणार असें आतांपासून वाटूं लागलें. त्या वेळीं स्वतंत्रता व सत्समागम या दोन सुखांचा अनुभव फारसा–किंबहुना मुळींच–नव्हता म्हटलें तरी चालेल. या वेळीं मी स्वतंत्रतेचा बराच अनुभव घेऊन व त्या देवतांप्रमाणें वाटणाऱ्या दोघींच्या समागमाचें अत्यंत सुख उपभोगून पुनः त्या ब्रह्मघोटाळ्यांत जात होतें. मग मनाची अशी विलक्षण स्थिति होईल यांत नवल काय! सासूबाईंना अंमळ डुकली लागलीसें पाहून मीं हलकेंच तिकडे म्हटलें, "माझं मन असं कांहीं या वेळीं चमत्कारिक झालं आहे कीं कांहीं विचारूं नये अन् बाई काय होईल, काय बोलतील याचं तर मला भारी भय वाटतं."

"इतकं काय वाटायचंय् बोआ! मला नाहीं कांहीं वाटत. काय दोन दिवस बोलतील बोलतील उगीच बसतील! आपण तिकडे लक्षच देऊं नये."

"तें ठीक आहे आपलं सांगणं! पण आमचा बायकांचा स्वभाव ठाऊक नाहीं अजून. दोन तीन दिवसांत का आटपायचं आहे तें गाणं एकदा सुरू झालं म्हणजे? नेहमीं टोंचणी चालायची—तिला आतां हेंच नाहीं, तिला तेंच नाहीं, तिचं आतां कामांत लक्षच नाहीं, तिला कुठें सभेला जायचं असेल!—"

"बरं बोलले. एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, अगदीं रोज झालं म्हणून त्याचं एवढं मनावर घ्यावं कशाला! आपले कान बहिरे करावे."

"तें कांहीं नाहीं. तुमचं पुरुषांचं ठीक असतं. आपलं जेवून हातावर पाणी पडलं कीं मारली उडी, तें पुनः जेवायच्या वेळो यायचं, मग कशाला काय वाटणार आहे? अन् आम्हांला म्हटलं म्हणजे सारा दिवसभर प्रसंग घरांतच. मला आपला मागला थोडासा अनुभव आहे त्याच्यावरून मी तरी सांगतें. पण मी म्हणतें याचा लवकरच अनुभव येईल. आतां जें रोज होईल त्याचा पाढा वाचीनच रात्रीं गांठ पडली म्हणजे, तेव्हां....."

"अस्सं! अस्सं! तर मग आतां तिथें गेल्यावर आमच्या कानींकपाळीं या गोष्टी रोज रात्रीं येणार. कांहीं वाचण्याखिचण्याचा संबंधच नाहीं म्हणतां? माझ्या तर मनांतून एक दहावीस मराठी बुकं वाचून घ्यायचीं होतीं आपल्याकडून. मीं निवडूनदेखील ठेवलीं आहेत......"

"मग वाचायला मीं नाहीं का म्हणतें आहें? पण......"

परंतु इतक्यांत सासूबाई चळवळल्यामुळें आमचें बोलणें तिसकेंच राहून आम्ही आपापल्या मनांत विचार करीत बसलों. तिकडचे विचार काय असतील ते कांहीं मला सांगतां येत नाहींत, पण माझे विचार आपले त्याच त्याच गोष्टीवर चालले होते. होतां होतां आम्हीं एकदांचें पुणें गांठलें. दादा आम्हांला भेटण्यासाठीं स्टेशनवर आला होता. त्याला पाहण्याबरोबर मला कितीतरी आनंद झाला म्हणतां! आगगाडींतून उतरून घोड्याच्या

गाडींत बसलों आणि निघालों. पण मनांत काय होत होतें म्हणतां एकसारखें? सासूबाई असल्यामुळें दादाला माझ्याशीं व मला दादाशीं विशेषसें बोलतां येईना. मी त्याच्याकडे व तो माझ्याकडे अशीं एकसारखीं पाहात होतों. तो हल्लीं अगदीं वाळल्यासारखा दिसला; तथापि त्याची चर्या या वेळीं आनंदी दिसत असल्यामुळें व त्यांतहि माझी कांहीं तरी थट्टा करायची मनांत होती, तिच्यामुळें दिसणारा विनोदीपणा असून, ती करतां येत नाहीं म्हणून किंचित् खेद, इत्यादि गोष्टींची झांक त्यांत असल्याकारणानें मला त्या वेळीं तो इतका वाळलेला दिसला नाहीं असो. होतां होतां आम्ही आपल्या घराकडे वळलों. दादा मधेंच उतरून गेला. त्याच्या मनांतून घरीं यावेंसें नव्हतें आणखी मग तिकडूनहि आग्रह केला नाहीं.

घरीं जाऊन पोंचलों आणखी गाडींतून उतरलों तों छातींत जी धडकी भरली म्हणतां! वाटलें, कीं आतां आपण घरांत पाऊल टाकतों तों कोणी कांहींतरी बोलेल. दाराशीं कोणी नव्हतेंच; धोंडूभावजी उभे होते त्यांनी " वहिनी, माझी टोपी आणली का ? " हा पहिला प्रश्न केला. मी " हो " म्हणून आंत शिरतें तों बनूवन्सं कपाळ वर चढवून डोळे ताठून म्हणतात, "एकटयाच का आलांत, वहिनीसाहेब? मीं म्हटलं, हातांत हात घालून याल वाटलं दोघं साहेबांसारखं, " असें म्हणून आपणच हसल्या. मी तिकडे लक्ष न देतां आपली पुढें गेलें. माझी अगदीं पक्की खात्री, कीं मी आल्याबरोबर असे कांहींतरी बोलायचें असा पक्का निश्चयच करून त्या बसल्या होत्या; इतकेंच नव्हे, पण आधीं दोन दिवस त्यांनीं तें वाक्य पाठ करून ठेविलें असेल. जसे शंकरमामंजी तशाच त्या होत्या हें आतां पुनः येथें सांगायला कशास पाहिजे ? आजपर्यंतच्या गोष्टींवरून तें सर्वांच्या ध्यानांत आलें आहेच, यदाकदाचित् नसलेंच आलें अजून, तर आतां पुढे थोडयाच काळांत येईल. तेवढीं तीं अक्षरें बोलून मग त्यांनीं जो अबोला धरला तो सारा दिवस! मी आपली घरांत जाऊन साऱ्या वडील माणसांना नमस्कार करून उभी राहिलें, गांठोडीं आलीं कीं त्यांतली भिजवायचीं चिरगुटें काढून घेण्यासाठीं. नमस्कार केला तीं माणसें एका उमासासूबाईखेरीजकरून कोणीं बोललींच नाहींत. कोणी तीं कोण? एक आजेसासूबाई आणखी एक धाकटया मामेसासूबाई. धाकटया मामेसासूबाई नुसतें "हूं" म्हणाल्या. आजेसासूबाई मुळींच कांहीं बोलल्या नाहींत म्हटलें तरी चालेल. कायशा पुटपुटल्या मग काय 'अष्टपुत्रा सौभाग्यवती' म्हणाल्या, कीं "कशाला आतां नमस्कार?" असें म्हणाल्या कोणाला ठाऊक! मी तरी काय करणार? आपली मुकाटयानें गांठोडीं सोडलीं. त्यांतलीं लुगडीं, चौघडया काढल्या आणखी " हीं भिजवायचीं आहेत. तेवढ पाणी घालतां का ? " म्हणून बनूवन्संना म्हटलें; तर त्या केव्हांच्या फुरंगटलेल्या! त्या मला काय दाद देतात! तेव्हां पहिल्यापासून ही सलामी पाहण्याबरोबर मग काय विचारतां? माझ्या मनाला जें काय झालें तें झालें! मी आपली तशीच उभी राहिलें. कोणी कांहीं हूं कीं चूं करीना. तेव्हां शेवटीं उमासासूबाईंनीं खालीं येऊन मला पाणीबिणी घालून एकदाची आम्ही घरांत आलों. सासूबाईंशींदेखील कोणी धड बोलेना. प्रत्यक्ष

त्यांची आई पण आपली जितक्यास तितकें, तुटक तुटक त्याच्याशीं बोलूं लागली. हें काय आहेन् काय नाहीं याची त्यांना आतांपर्यंत वार्तासुद्धां नव्हती. शंकरमामंजींचें पत्र आलेलें त्यांना मुळींच कळवलें नव्हतें. आमची शेजारची मंडळी करताहेत असें वाटून त्यांतच त्यांना कांहीं विशेष वाटलं नाहीं. मग त्यांच्या मनांत काय येणार आहे ? बरें आम्ही सभेला गेलों, बक्षीससमारंभाला गेलों हें त्यांना मुळींचदेखील ठाऊक नाहीं. कुठें गेलों, अन् काय गेलों, आम्ही जाऊं तीं कांहीं वावग्या ठिकाणीं वावग्या कामाला जाणार नाहीं, एवढी त्यांची आपली खात्री होती म्हणून म्हणा, किंवा त्या सभेच्यान् शाळेच्या गोष्टी त्यांना मुळींच ठाऊक नसल्यामुळें म्हणा पण त्यांनीं कधीं तसल्यासंबंधानें प्रश्नच केला नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें आमच्या तेथल्या वर्तनाबद्दल काय इथें बातम्या पसरल्या आहेत, आणखी काय झालें आहे याची माहिती त्यांना मुळींदेखील नव्हती, आणि त्यामुळें कोणी मन मोकळें करून बोलेना, यांतलें इंगितच त्यांच्या ध्यानांत येईना. त्या आपल्या वेड्यासारख्या "आई, कां ग बोलत नाहींस !" असें विचारीत आणखी त्या कांहीं बोलेनात व तें त्यांचें करणें पाहून त्यांनीं धाकट्या मामेसासूबाईना विचारलें तर त्या "मला काय ठाऊक ?" एवढेंच तुटक बोलून आपल्या कामाला निघून गेल्या. मग मात्र मला वाटलं, कीं यांच्या कानावर सगळी हकीकत जर घातली असती तर बरें झालें असतें; आतां जसें त्यांना झालें आहे तसें तरी झालें नसतें; पण म्हणतात ना, 'आधीं जाते बुद्धि अन् मग जातें भांडवल.' त्यापैकींच आमचें झालें. पहिल्यानें तें सुचलें नाहीं किंवा सुचून आम्ही त्याप्रमाणें वागलों नाहीं म्हटलें तरी चालेल...

आतां त्याच्याबद्दल वाईट वाटून काय उपयोग ?

शेवटीं आमच्या सासूबाईनीं उमासासूबाईना विचारलें, पण त्यांनीं काय सांगितलें तें मला कांहीं समजलें नाहीं. कारण, मी तेथें उभीच राहिलें नाहीं. पण काय सांगितलें असावें याचा मीं आपल्या मनाशीं तर्क केला, आणखी तो माझा तर्क खरा असावा, असेंहि दिसलें. कारण त्यानंतर थोड्याच वेळांत सासूबाईंची चर्या किंचित् बदललीशी दिसली. त्या रागावल्या होत्या असें कांहीं नाहीं, पण त्यांना वाईट वाटून कांहीं गोष्टींविषयीं खेद झाला असावा असें दिसलें. तरी बरें झालें, कीं अजून शंकरमामंजी बाहेरून आले नव्हते. ते सात वाजण्याच्या पूर्वीच कायसे बाहेर गेले होते, कीं रात्रीं घरीं नव्हते कांहीं मला पक्कें आठवत नाहीं; पण नऊ साडेनऊ वाजेपर्यंत बाहेरून घरीं आले नव्हते खरें. ते आले म्हणजे काय होणार, काय नाहीं याचीच मला मोठी भीति होती. शेवटीं ते एकदा आले. आल्याबरोबर त्यांचें तोंड बांधण्यासाठींच कीं काय अगदीं पाळत राखून बसलेलें असायचें. लागलीच टोप्या दाखवून, "ह्या पाहा बोवा टोप्या !" असें म्हणायचें व अमुक आणलें, तमुक आणलें म्हणून सांगायचें. हेतु हा कीं, शंकरमामा खूष होऊन जावे. मीं तें तेव्हांच ताडलें व रात्रीं त्याबद्दल थट्टादिखील केली. तेव्हां मला उत्तर दिलें तें मीं विसरलें नाहीं. "काय करावं ! आपल्या जिवासाठीं जपावं लागतं.

नाहीं तर मी का शंकरमामांच्या अशा खुशामती करणार ? पण आपण अगदी घाबरून गेलां होतां, तेव्हां दोन दिवस तरी उगीच एकदम त्रास होऊं नये म्हणून केलं तसं. नाहीं तर मला काय करायचं आहे ! मला गोपाळमामा एक शब्ददिखील बोलले नाहींत त्यासंबंधानं. चांगले माझ्याशी बोलले, इकडच्या तिकडच्या गोष्टी विचारल्या, आपल्या नानासाहेबांची, विष्णुपंतांची माहिती विचारली. वा ! चांगली मंडळी आहेत म्हणालेत ! पुढले आतां दिवस भरायला लागलास का म्हणून विचारलं."

मी : वा ! मग काय एकूण आपलं ठीकच झालं म्हणायचं. पण आमच्याशीं कोणी घरांत बोलत नाहीं त्याचं कसं काय अन् त्यांतूनय् माझं मेलीचं असो. मी तर म्हणतें, कीं वांकडंतिकडं बोलतील याच्यापेक्षां अबोलाच बरा.. पण सासूबाईंना बिचाऱ्यांना आपल्यासाठीं उगीच...मीं म्हटलं नाहीं त्यांच्या कानावर घालून ठेवायचं असतं म्हणून ?

रघुनाथराव : बरं, त्यांत काय मोठंसं बिघडलं ? तूं म्हणतेसना उमामामीनं त्यांना सांगितलं म्हणून ?

मी : काय सांगितलं कांहीं ठाऊक नाहीं पक्कसं मला. सांगितलं खरं अन् हें असं किती दिवस चालणार आहे म्हणा ! उद्यां जर सगळ्यांचा उच्चार नाहीं झाला तर मी कशाला बोलतें आहें ? हें का असं भारी दिवस का राह्यचं आहे पोटांत ?

रघुनाथराव : आपण अगदीं अधीर झालां आहां शिव्या खायला असं दिसतं.

मी : तर ! तर ! मला अगदीं खंतच झाली आहे कीं नाहीं शिव्या खाण्याची न् रागावून घेण्याची ! काय तरी बाई बोलणं ! म्हणे आपण अगदीं अधीर झालां आहांत असं दिसतं, अन् नाहीं तर आतां त्या चुकणारच असतील अगदीं !

◆ ◆ ◆

## ५८ आमच्यावरील वादळ

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

दिवसां अतिशय उकडलें, संध्याकाळीं एकाएकीं पण फारसें न गरजतां खूप ढग आकाशांत येऊन विजा लवूं लागल्या व उगीच हळूच मधेच गडगडलें, कीं गमजावें फार प्रचंड पावसाची सर येणार, मुसळधार लागणारच, वादळच होणार म्हणून ! आमच्या घरांत या वेळीं अगदीं हुबेहूब तशीच स्थिति झाली होती. आमच्या मुंबईतील कृतीच्या तापानें पुण्याच्या मंडळीस फारच त्रास झाला. शंकरमामंजीरूप वाऱ्यानें आपलें होतें नव्हतें तें बळ एकत्र करून कितीतरी ढग एके ठिकाणीं करून ठेवले होते. आजेसासूबाई किती तरी दाबीत, पण मधून मधून त्यांचें बडबडणेंरूपी गडगडणें एखाद वेळ तरी ऐकूं येईच. धाकट्या मामेसासूबाईंची जिव्हाविद्युल्लता मधून मधून चमकूं लागलीच. आमच्या बनू-

वन्सं टिटवीप्रमाणें ' टयांव् टयांव् ' करून लवकरच वृष्टि होणार, तुम्हांस सळो कीं पळो करणार असें सुचवीत होत्या. असें असतांना आम्ही घाबरून गेलों तर त्यांत नवल काय? तथापि ही गोष्ट विशेष लक्षांत धरावी, कीं स्वतंत्रतेचें वारें फारच निराळें आहे. एकदा ज्यानें स्वतंत्रतेचा अनुभव घेतला, त्याला तो निपचित पडेल असें घाबरविणें महाकर्म कठीण आहे. ह्याच प्रसंग मजवर येणार असें मुंबईस जाण्याच्या आधीं जर मला कळतें, तर माझी स्थिति फार निराळी झाली असती. आतां मला जितकें भय वाटत होतें त्याच्यापेक्षां शतपट, सहस्रपट मी घाबरलें असतें. त्या वेळीं मला पाठबळ कोणाचें मिळेल हें मुळींच ठाऊक नाहीं आणि स्वतंत्रता हा शब्द तर स्वप्नांतरींदेखील ऐकला नव्हता! परंतु आतांची स्थिति किती भिन्न!" " अग, तूं कां घाबरतेस? आपण कांहीं चोऱ्या केल्या नाहींत, कांहीं खून केले नाहींत, बोलतील बोलतील उगीच बसतील. नाहींच आपल्याला सहन झालं तर आपण आपले दूरच राहूं. आपल्याकडून आपण अगदीं निर्मळ अंतःकरणानं असलं म्हणजे कोणाचीदेखील भीति धरायला नको." असें तिकडून म्हटलें तेव्हां एकदा अगदीं साहजिकपणें माझ्या तोंडून असे शब्द निघाले, " ठीक, ठीक! मी तरी तेंच म्हणतें. सभेला गेलं म्हणजे कांहीं बाटलं नाहीं, कांहीं शिंदळकी केली नाहीं. मग एवढं यांचं तरी हें कशाला पाहिजे? यंदां पाहावं, थोडक्यांत सरलं तर ठीकच; नाही तर आपलं पुनः इथें येणंच नको कसं!" हे शब्द माझ्या तोंडांतून निघाले याचें थोड्या वेळानें माझें मलाच आश्चर्य वाटलें. पण निघाले खरे, आणखी याचें कारण मला केवळ त्या स्वतंत्रतादेवीच्या प्रसादाचा अंश क्षणभर मिळाला हेच होय, यांत मला तर तिळप्रायहि शंका नाहीं. तो प्रसाद ज्यांस सर्वथा मिळाला असेल त्यांची धन्य खरी, असेंहि या ठिकाणीं म्हटल्यावांचून माझ्यानें राहावत नाहीं. असो.

आपण टोप्या आणल्यामुळें शंकरमामा एक दोन दिवस तरी फारसे बोलणार नाहींत असें तिकडे वाटत होतें तें अगदीं खरें झालें. परंतु शंकरमामंजींचा कांहींतरी कावा असून ते आतां लवकरच आपला पूर्वक्रम सुरू करतील असेंहि दिसलें.

आतां वर सांगितल्याप्रमाणें शिव्या वगैरेच्या वृष्टीची आम्ही वाट पाहात होतों. आम्हांला आमच्या दोघांबद्दल जें काय भय वाटलें, त्यापेक्षां बिचाऱ्या सासूबाईबद्दलच फार भय पडलें. एक सबंध दिवस गेला; आई धड बोलेना, तेव्हां त्यांना सहजच फार वाईट वाटलें. उमामासूबाईनीं त्यांना कांहीं अर्धवट सांगितलें होतें, परंतु त्यांना पुरतें कांहीं उमगलें नाहीं. तेव्हां त्यांनी तिकडे एकान्तीं गांठून काय झालं काय नाहीं विचारलें. तेव्हां तिकडून इत्थंभूत हकीकत सांगून म्हटलें, " हें सारं शंकरमामांचं कृत्य आहे, समजलीस? आज दोन दिवसांत ते बोलले नाहींत, यांचं कारण निराळं आहे." असें तसें सांगून पण त्यांना एकदा सर्व कच्ची हकीकत कळविली. आम्ही आल्याच्या चवथे दिवशीं सकाळीं दादा मला घरीं येण्यासाठीं बोलवायला आला. तो आधींच दोन दिवस यायचा; परंतु मींच त्याला इतक्यांत बोलवायला येऊं नको म्हणून सांगितलें होतें. त्याचें

येणें जो वर्षाव आतां होईल मग होईल म्हणून आम्हांला वाटत होतें, त्या वर्षावाला कारण झालें.

तो आला तो साहजिकच आजेसासूबाईकडे गेला व त्यांच्याजवळ त्यानें बोलावणें केलें त्याबरोबर त्यांनीं म्हटलें, " आमच्याकडे कांहीं नाहीं हो आतां तिचं. पुन्हा आमच्याकडे तिच्या बाबतींत तुम्ही मुळींच येऊं नका. आतां तिची सासू, ती आणखी तिचा नवरा. त्यांचीं तीं आपलीं काय पाहिजे तें करोत ! आमचा काय आतां संबंध उरला आहे ? आम्ही कोण त्यांच्या ? आम्हांला कोण विचारतो आहे ? जा. त्यांच्याकडे जा. अन् आधीं विचारायला कशाला आलांत मला ? कुणालाच विचारायला नको आतां, तिची ती मुखत्यार आहे ! "

शंकरमामंजी जवळच नाक धरून बसले होते, ते हलकेच मोठ्या गंभीरपणानें म्हणतात, " आई, हें काय आरंभलं आहेस तूं ? अग पोराचं करणं तें काय ? अन् त्यांत एवढं मनावर तें काय घ्यायचं ? झालं गेलं. आतां त्याच काय ? अग, किती केलं तरी आपल्या घरांतली शिक्षा ती वायां जाणार आहे ? झाली असेल एखाद वेळीं चूक ! एवढं त्याचं..."

आजेसासूबाई : बरं आहे. तुमच्या मनास येतं आहेना, सगळीं लोकं तोंडावर थुंकतात तीं ? माझं कांहीं...

शंकरमामंजी : अग, आमच्या मनास आलं न् नाहीं आलं ? पोर अन् मांडीवर त्यानं कांहीं केलंन् म्हणून कांहीं मांडी कापून टाकायची आहे ? मला काय लोकं थोडीं का विचारतात, " काय हो, तुमचा भाचा असा कसा अगदीं अवकळला ? कुठें गेली तुमची शिक्षा ? " म्हणून करायचंय् काय ? तो आपला रामा तांबोळी नाहीं का ? त्यानं मला भररस्त्यांत विचारलंन्......असा मला संताप आला, पण करायचं काय ? आपलंच लंगडं पडलं...हीच जर यानं सभेला नेली नसती अन् तें कशाला ? तो दामू आचारी काय म्हणाला ऐकलंसना, आई ?...

आजेसासूबाई : सगळं कांहीं ऐकलं. पण करायचं काय ? आम्ही लोकांना हसत होतों, आतां आम्हांला लोक हसतील, पण मी म्हणतें या गाढवाला एवढी कशी ती अक्कल नाहो......

शंकरमामंजी : हं, हं. आई, हें काय हें ? अंग त्याच्या मेव्हण्याच्या देखत... आणखी आतां तो मोठा झाला, पगार मिळवूं लागला शंभर सवाशें रुपये, अन् हें काय तूं बोलतेस हें ? आमची गोष्ट असो. आम्हांला काय पन्नास साठ रुपड्या—

आजेसासूबाई : मला नको एवढं कुणाच्या पगाराबिगाराचं पडप. मी असल्या चहाटळपणाच्या पडपानं मुळींच जायची नाहीं. शंभर सवाशें नाहीं पांचशें पगार झाला म्हणून मला काय त्याच्या पगाराशीं करायचं आहे ? देवाच्या दयेनं माझं मला हवं तेवढं आहे. त्याला म्हणावं खुशाल आतां तूं न् तुझी बायको, अन् आईलाय् तसले ढंग आवडत

असले तर ती, आपली खुशाल स्वतंत्रपणानें राहा, अन् जें वाटेल तें करा. साहेबाच्या घरीं जा, सभेला जा अन् आईला घरांत बटकीसारखे राबवा !

शंकरमामंजी : तसंच होत असेल नाहीं तर काय आतां मुंबईस ! पण खरंच–मी–आपलं आतां जाऊं द्या. आपण कशाला बोलावं ? वगैरे म्हणतों; पण खरं पुसाल कीं नाहीं, तर मलादेखील राहून राहून आश्चर्य वाटतं, कीं हा पोरगा इतका कसा बिघडला ! यानं अगदीं आपलं पूर्वीचं–खरंच, आतांशा संध्येब्रिंध्येची पाहिली का तऱ्हा ? परवां ते बचंभट आले होते ना दर्शनाला, ते मला म्हणूं लागले कीं...बोलूं नये म्हणतों पण राहवत नाहीं.

हें यांचें बोलणें चाललें असतांना तिथें बसलेल्या दादाची, बिचाऱ्याची मला कींव आली. तो अगदीं शेवटीं कंटाळला व म्हणाला, " मग धाडतां ना यमूताईला ? "

ह्या त्याच्या प्रश्नानें आणखी एक उसळी उठली. अन् मग काय विचारतां ? चांगलीच कडाकडी सुरू झाली. इतका वेळ हळूहळू बोलूं लागलेले शंकरमामंजी मंत्र म्हणूं लागले. बनूवन्सं फुंकर घालूं लागल्या. धाकट्या सासूबाईंनीं तूप ओतलें व अशा तऱ्हेनें आजेसासूबाईच्या भडकून गेलेल्या होमानें आमच्या दोघांच्या आहुतीच घेतल्या. शंकरमामंजी एकदा मध्येंच, " जाऊं दे. जाऊं दे. पोर आहे, " म्हणत, आणि थोड्याच वेळांत " आश्चर्याची गोष्ट तर खरीच ! मूर्खपणा तर खराच ! लोक आतां बाहेर तोंड काढूं देईनात ! " असेंहि म्हणत. तितक्यांत आमच्या सासूबाई मध्येंच कोठें म्हणाल्या, " बरं, आतां होऊं नये त्याच्या हातून चूक, पण झाली, पण त्याचं किती वेळ हें करायचं ? कांहीं मोठा गुन्हा नाहीं त्यानं केला. शेजारची मंडळी गेली, तोहि गेला. " एवढेंच त्या म्हणाल्या; पण मला आणखी तिकडेहि त्या इतकें बोलल्या याचेंच फार आश्चर्य वाटलें. त्या कधीं असें बोलायच्या नाहींत. आणखी आज जेव्हां असें बोलल्या तेव्हां मग काय विचारतां ?

" तुझं तुला आवडतं ना ? फार चांगलं ? अग, तूं मला पहिल्यापासून ठाऊकच, वारे, समजलीस ? तूं कांहीं कमी नाहींस, समजलीस. हेंच जर दुसऱ्याच्या पोरांनीं केलं असतं तर हसून हसून पुरेसं केलं असतंस. मोठ्या दिमाखानं मला म्हणते आतां ( थोडें वेडावून ) ' होऊं नये त्याची चूक झाली. आतां किती त्याचं हें करायचं ? ' किती करायचं का ? काय असं मीं केलं ? का त्यांना भाजलीं, का गांजलीं, का काय झालं काय ? पुनः आतां मी बोलेन तर शपथ ! "

धाकट्या मामेसासूबाई : हो तर काय ? आपण आतां कांहीं बोलूं नये तेंच चांगलं. त्याचं त्यांना जर आवडतं तर......खरंच, वन्संना असलं करणं आवडेल असं नव्हतं वाटलं.

शंकरमामंजी : चट् आवडतं. लेकानंच केलं मग काय करते ! आम्हांला उगीच काळजी वाटली, कीं हा आपले फाजील ढंग करायला लागला अन् हिला तर हें कांहीं

आवडणार नाहीं. तेव्हां व्हावं कसं हें ? बरं झालं; चला. तिचं तिला आवडतं ना, ठीक आहे. चालू द्या. आमच्या घरांत राहून बरीक हें नसावं झालं, इतकंच !

बिचाऱ्या दादाला धड उठूनहि जातां येईना, बसावंसंहि वाटेना; शेवटीं बिचारा कंटाळून चालता झाला.

याप्रमाणें आमच्यावरील वादळाला सुरुवात झाली, आणि मग राहून राहून सरी येतच होत्या. इतके दोन दिवस दाबून ठेवल्यामुळेंच कीं काय, त्यांना आतां विशेष जोर आला. वनूवन्संचा जोर तर आतां तिप्पट झाला. त्या मला आतां ' पाण्याउदकाला शिवूं नको ' असें म्हणण्याच्या बेतांत आल्या. आणि त्यांना रागें भरणारें कोणी नसल्या-कारणानें दिवसानुदिवस त्यांचें अधिकाधिक प्रस्थ माजत चाललें. उठल्या सुटल्या त्यांना दुसरा उद्योगच नाहींसा झाला. जेव्हां तेव्हां, " का ! वहिनीबाई, आज हिराबागेंत सभा आहे, तिथं जायचं असेल तुम्हांला ? हो ! तुमच्यावांचून व्हायचं कसं तिथं ? तुम्ही तर तिथल्या अगदीं अग्रगण्य. " केव्हां " खरं काय हो, वहिनीबाई, तुम्हांला तो साहेब काय हो म्हणाला माळ घालतांना ? " एक ना दोन ! आतां मी सगळ्या गोष्टी सांगत बसलें तर अगदीं ओकारी येईल. पण मला त्यांच्या बोलण्याचं कांहीं एवढं वाटत नसे; उलट त्यांची कींवच येई. कारण असें वाटे, कीं त्यांना यांतच आनंद वाटावा यांत नवल नाहीं त्यांनीं दुसरें करावें काय ? नवऱ्याचे सुख कसें तें ठाऊक नाहीं. तो नांवदेखील घेईना. बरं, इकडे कांहीं वाचण्याविचण्याचा नाद लावून पोथ्यापुस्तकांची गोडी लागावी, तर तोहि प्रकार नाहीं. मूळचा स्वभाव वाईट, त्यांत सगळीकडून स्थिति वाईट, त्यांत तिनें असें व्हावें यांत आश्चर्य कसलें ? वाईट वाटे, तें धाकट्या मामेसासू-बाईच्या आणखी आजेसासूबाईंच्या बोलण्याचें. त्यांतूनहि आम्हांला बोलण्याचें कांहींच वाटत नसे म्हणा. आम्ही आपलें मन चांगलें घट्ट केलें होतें. पण सासूबाई बिचाऱ्या गरीब ! त्यांना टोंचून खोंचून बोलत त्याचें बरीक भारी वाईट वाटे. त्या अगदीं गरीब, भोळ्या अन् त्यांना या दोघी-एक तर प्रत्यक्ष त्यांची आई—पण हवें तसें बोलत आणखी शंकरमामंजी आतां आपलें टोंचून खोंचून हसत हसत बोलायला लागलेच.

एक दिवस त्यांनीं जो कावा केला तो विलक्षणच ! तिकडच्या नांवचें एक सकाळीं आलें पत्र. त्या पत्रावरचा पत्ता बाळबोध होता. पत्र आलें, तें त्यांच्या हातीं आलें, त्यावरून तें पत्र कोणाचें असावें वगैरे त्यांनीं ताडलें यांत तर शंकाच नाहीं. पत्रावर स्पष्टपणानें तिकडलें नांव होतें. परंतु तें पत्र फोडून त्यांनीं वाचलें आणि तिकडची अंघोळ होऊन माजघरांत नेसणें चाललें असतांना जवळ येऊन साऱ्यांना ऐकूं जाईसें मोठ्यानें म्हणतात, " अरे, हें सीतेच्या मैत्रिणीचं पत्र आलं आहे वाटतं तुझ्या नांवावर. मला वाटलं माझंच आहे म्हणून मीं फोडलं कांहीं सभेबिभेची हकीकत दिली असेल बहुतकरून. पाहूं ! " आणखी आतां, ते माझे सासरे पडले तेव्हां कांहीं म्हणतां येत नाहीं--ते तें पत्र तिथें फोडणार, तों संतागानें लाल होऊन झटकन् हातांतून ओढून घेतलें. पण काय ? पत्र फोडलेलेंच होतें. हा सर्व प्रकार मीं पाहिलाच. संतापानें माझ्या अंगाची लाही लाही

झाली. भयानें उरांत धाड धाड उडूं लागलें. तें पत्र माझ्या परम मैत्रिणी यशोदाबाई व लक्ष्मीबाई यांचें असावें, हें तर खास वाटलें. पत्र फोडण्याचा असभ्यपणा मामंजींनीं केला याबद्दल जितका संताप आला, तितकेंच आंत लिहिलेलें यांनीं वाचलें असल्यास आज काय होणार आणि काय नाहीं असें मनांत येऊन भय वाटूं लागलें. पण करतां काय? तो सारा दिवस कशा तऱ्हेनें गेला याची कल्पना मनांत आणणेंदेखील आज मला असह्य आहे. त्या दिवशीं क्षणोक्षणीं त्या पत्राबद्दल मला टोचणारे असे शब्द कितीतरी ऐकून घ्यावे लागले. " आतां तिला तिच्या मैत्रिणींचीं पत्रं येऊं लागलीं; " " आतां उद्यां साहेबमडमा तिला भेटायला येऊन आमच्यादेखत तिला हातांत हात घालून नेतील; " " आतां तिला एक टेबलखुर्ची दिली पाहिजे. " एक नी दोन! हजार गाडे बोलणीं ऐकावीं लागून शेवटीं कळस होऊन इतका वेळ धीर धरून असलेल्या माझ्या मनाला तें सर्व अगदीं दुःसह होऊन रात्रीं एकान्तांत गांठ पडल्याबरोबर, गळ्याला मिठी मारून " आतां किती हें सोसायचं? " असें रडत रडत मीं विचारलेंच. आणि किती वेळ तरी रडतच होतें. त्या पत्राची मला अगदीं आठवणच नाहींशी झाली. शेवटीं कशीतरी समजूत करून मला तें पत्र वाचण्यास सांगितलें. निकडची वृत्तिदेखील आज फारच खिन्न, उदासीन व संतप्त झाली होती. " तूं आतां अगदीं हें करूं नकोस. एवढी सुटी होऊन आपण परत गेलों म्हणजे पुनः इथें यायचंच नाहीं. मग तर झालं? अन् आतां चारआठ दिवस तूं आपली माहेरींच जा. हा त्रास कशाला माझ्यादेखत बोलूं दे शंकरमामांना म्हणजे मग..."

" पण ते कुठें बोलतात आपल्यादेखत? आपण असलां न् आजेसासूबाई बोलत असल्या म्हणजे ते कशी साखर पेरतात, पाहिली ना? तशाच धाकट्या मामेसासूबाई; आपल्यादेखत बोलायचं म्हणजे हसत हसत जशी कांहीं आपली उगीच थट्टा! आणखी आपल्या पाठीमागं......"

" आजी झाली, मामी झाली, यांचं नाहीं मला कांहीं वाटत ग. त्यांच्या त्यांच्या-प्रमाणें तें ठीकच आहे, पण शंकरमामंजी..." आज हें पत्र त्यांनीं फोडलं--माझी खात्री कीं, त्यांनीं वाचलंदेखील आहे-त्यामुळें मला असा संताप आला कीं सुमार नाहीं. पण करायचं काय? म्हणतात ना, चोरून ऐकेल त्याला स्वतःच्या निंदेखेरीज कांही ऐकूंच येत नाहीं, तसंच चोरून पत्र फाडून वाचणारांचंदेखील आहे. हें पत्र त्यांनीं वाचलं असलं तर काय त्यांना जें वाटलं असेल तें असेल. आतां कांहीं तें कळायचं नाहीं, पण दोन दिवसांनीं खास कळेल. पाहा त्यांत काय लिहिलं आहे तें." तेव्हां "माझ्यानं वाचवत नाहीं, आपणच वाचायचं" असा आग्रह धरल्यावरून तें वाचलं. पत्र कांहीं फार मोठं नव्हतं, पण आंत सर्व कांहीं गोष्टी होत्या. खालीं सह्या दोघींच्याहि होत्या व आणखी कित्येक मैत्रिणींचे नमस्कार होते. पत्रांत प्रथमतः त्यांची स्वतःची हकीकत असून पुढें आमच्या घरीं आमची काय स्थिति झाली; धर्माभिमानी शंकरमामंजींनीं आपणांस घरांत घेतलें कीं वेगळें ठेवलें; आपण टोप्या, खाऊ, झबलें, वगैरे नेलें आहे तेव्हां आतां फारसा त्रास

नसेलच होत ! आपल्याबरोबर आमचाहि आपल्या मामंजींच्या मुखानें उद्धार होत असेल ना ? कांहीं असो, आपण या सर्व गोष्टी निमूटपणीं सहन करून या वेळीं विलक्षण धीर धरा. आपलें सहनशीलपणाचें वर्तन पाहिलें म्हणजे आपोआप त्यांचें त्यांसच वाईट वाटून पश्चात्ताप होईल. गणपतरावभावजीच येथें लवकर येणार असल्यामुळें आमचा सान्यांचा कोठें जाण्याचा बेत रहित झाला आहे. ते आल्यानंतर कदाचित् कोठें जाऊं. आपल्याला कळवूं. आपलें वाचन कसें काय चाललें आहे ? आम्हांला हल्लीं आपली आठवण दिवसांतून कितीकदा तरी होते. " इत्यादि इत्यादि.

हें पत्र जर शंकरमामंजींनीं पाहिलें असेल तर त्यांना काय वाटलें असेल ? असा विचार मनांत येऊन माझें धाबें अगदीं दणाणलें. त्यांनीं पत्र वाचलें असेल याबद्दल तर बहुतेक खात्रीच होती. तेव्हां आतां काय होणार आणि काय नाहीं, असें विलक्षण भय पडून माहेरीं जाऊन राहायला जर चार दिवस सांपडेल तर फार चांगलें होईल. पण तें व्हावें कसें, असें मला होऊन गेलें.

अशा तऱ्हेच्या त्रासांत आणखी एक दोन दिवस गेले. माहेरीं जाण्यास मिळण्याचा कांहींच संभव दिसेना. आतां दादा पुनः बोलवायला येण्याचा संभव नव्हताच, आणि खरोखर त्यानें यावें तरी काय म्हणून ? आला ते दिवशीं त्याचा पाणउतारा काय थोडा झाला ? तेव्हां त्यानें आतां मुळीं येऊं नये, आणि तो येणार नाहींहि असें मला पक्कें वाटत होतें. पण माहेरीं जाण्याला युक्ति काय ? विचारायला जाण्याची सोय मुळींच नाहीं. अशा विवंचनेंत मी असतां बाबा तिकडे जेवायला बोलवायला म्हणून आले. मे महिन्याच्या सुट्टींत एकदा तरी जेवायला बोलवायला नको जांवयाला व घरांतील सर्व मंडळींना ? ते स्वतः आल्यावर मग त्यांच्याजवळ अधिक आगळें कोण काय बोलेल ? ते आले ते अर्थात् , शंकरमामंजी, वडीलभाऊ, घरांतले वडील पुरुष, म्हणून त्यांच्याकडे गेले. आणखी शंकरमामंजींच्या स्वभावाप्रमाणें अर्थातच त्यांनीं हां हां करून मोठ्या सभ्यपणानें त्यांचें आगतस्वागत केलें; परंतु स्वभावाला औषध नाहीं म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. बाबांनीं उठतां उठतां सहजच, " यमीला जरा लवकरच पाठवून द्या आज" असें म्हटलें, त्याबरोबर शंकरमामंजी हसत हसत व " हें: हें: " करीत पण म्हणतात, " पाहतों आतां. आईला विचारलं पाहिजे. ती जरा त्यांच्या या मुंबईच्या कृत्यानं फार रागावली आहे. मी पुष्कळ तिला सांगतों, ' पोरांची जात आहे, झाली असेल चूक, ' पण ती कुठें ऐकते आहे ? अन् त्यांचं ठीक आहे म्हाताऱ्या माणसांचं. त्यांना हें सभेला जाणं न्—होः होः होः होः ! आपल्या वेळीं तर आपल्याला काय वाटलं असतं ! होः होः होः होः !" हें त्यांचें बोलणें, गोपाळमामंजी जवळ बसलेच होते, त्यांना बिलकुल आवडलें नाहींसें दिसलें.

बाबा आपले कांहींच बोलले नाहींत, उगाच मधें हूं करीत. शंकरमामंजी आपले स्वतः बोलत, आणखी स्वतःच हसत, झालें; व जातां जातां आपण परान्न वर्ज्य केलें आहे असेंहि त्यांनीं सुचविलें.

आपल्याला माहेरीं जायला मिळतें आहे कीं नाहीं हें जाणण्याच्या उत्सुकतेनें मी आपली कोण काय म्हणेल इकडे मुळींच लक्ष न देतां आडून सर्व बोलणीं ऐकत होतें. शेवटलें हें शंकरमामंजींचें बोलणें ऐकून मला काय वाटलें असेल तें कल्पनेनेंच सर्वांनीं समजावें.

बाबा गेल्यानंतर शंकरमामंजींनीं घरांत येऊन सविस्तर हकीकत सांगितली. बाबांनीं सर्वांना जेवायला येण्याचें आमंत्रण दिलें होतें तें घरांत कळल्यावर अर्थातच कोण कोण जाणार, अशाबद्दल प्रश्न निघाला. शंकरमामंजींनीं तर आपल्याला परान्न घ्यावयाचें नाहीं, असा आपला नेम कळविला होता. तरी पण गोपाळमामंजी म्हणाले, "आपण बोवा जाणार; तो गृहस्थ स्वतः एवढा येथें आला होता, उद्यां आम्हांला कांहीं गर्दी नाहीं, तेव्हां मी तर जाणारच!" असें गोपाळमामंजीचें बोलणें ऐकल्याबरोबर मग काय? सर्वच कारभार मिटल्यासारखा झाला. आजेसासूबाई कांहीं फारशा बोलल्या नाहींत; पण धाकटया सासूबाईनीं, "कशाला हवं आहे जायला! इकडे मानपान कांहीं समजतच नाहीं." अमुकच नाहीं, तमुकच नाहीं, अशा तऱ्हेची फुणफुण चालविलीच होती. असो. दुपारीं माईसाहेब बायकांचें बोलावणें करण्यास आल्या, तेव्हां त्यांच्याजवळ एकंदर पाढा वाचला गेला, हें आतां येथें सांगायला पाहिजे असें नाहीं. जशा कांहीं त्या म्हणजे केवढ्या पोक्त! अन् होत्या—नव्हे, तसा आविर्भाव त्यांना आणतां येत होता--हें खरेंच. आणखी आतांशा त्या फारच साधेपणानें वागत असल्यामुळें व अंगांत स्थूलता बरीच शिरत चालल्यामुळें त्या दिसतहि असत तशा. त्यांच्याजवळ माझ्या एकंदर निंद्य कृत्यांचा पाढा वाचल्यानंतर व त्यांनींहि होस हो करून झाल्यावर आमंत्रण दिलें. तेव्हां अर्थातच "कोणी येण्याजोगतें नाहीं. बनीला पाठवून ......" पण बनूवन्सं पुरतें वाक्य होऊं देतील तर कीं नाहीं? चटकन् मधेंच त्या म्हणतात, "मी नाहीं ग बाई जायची, माझं आज दोन दिवस झाले कपाळच दुखतं आहे." तेव्हां लागलीच आजेसासूबाई मोठ्या कौतुकानें म्हणतात, "आधींच हौस किनई जेवायला जाण्याची? हिला आपलं घर सोडून कुठें जायला नको अन् उद्यां नवऱ्याच्या बरोबर सभेला नाहींतर कोणाच्या घरीं जेवायला जायची पाळी आली तर?" हें बोलणें ऐकून 'वा! कसा पण या वेळीं वहिनीला टोला मिळाला आहे.' असें वाटूनच कीं काय सर्व मंडळी हसूं लागली आणि बनूवन्संचा आनंद तर गगनांत माईना. येथें माणसाच्या स्वभावाची—माझ्या अनुभवाची गोष्ट सांगितल्याखेरीज मला राहवत नाहीं. दुसऱ्यानें आपलें वाईट चिंतलें, आपली फजिती केली, तरी आपण त्याचें वाईट चिंतूं नये, वगैरे सर्व गोष्टी खऱ्या; पण 'अन् उद्यां नवऱ्याबरोबर कुठें सभेला--' हे वाक्य ऐकून बनूवन्सं खिः खिः करून हसूं लागल्याबरोबर 'नवरा खेटरानं विचारील तर ना, मग पुढें सभेला बिभेला नेणार' असें स्पष्ट बोलावेंसें माझ्या मनांत आलें; इतकेंच नव्हे तर वन्सं एकटयादुकटया असत्या तर मी मूर्खपणानें बोललेंदेखील असतें.

असें बोलणें वाईट ! असें दुरुत्तर कोणीं कधींहि कोणाला बोलूं नये, वगैरे सारें मला ठाऊक होतें, पण मनुष्यस्वभावाचें एक उदाहरण सांगितलें.

पण आतां जास्ती पाल्हाळ न लावतां मी इतकेंच सांगतें, कीं कांहींबाहीं होऊन पण मला दुसरे दिवशीं सकाळींच पाठवून देण्याचें कबूल केलें. रात्रीं मी तिकडे सर्व हकीकत सांगून " आपण तरी येणार कीं नाहीं ? ' म्हणून थट्टा केली, तेव्हां म्हटलें, " आपण नाहीं बोवा असल्या बाटलेल्या सुधारलेल्या बायकोच्या माहेरीं जेवायला येत. जिच्या गळ्यांत साहेबानं माळ घातली......"

" बरं पुरे, उगीच नको थट्टा —"

" थट्टा कसली आली आहे ? अग, आज शंकरमामंजीच्या हपिसांतल्या गृहस्थानं रस्त्यांत उभ राहून मला शंकरमामांच्या देखत स्पष्ट विचारलंन् ! "

" अगबाई ! रस्त्यांत ? "

" हो. हो. रस्त्यांत ! ' ह्यः ह्यः ह्यः ' करीत दांताड विचकून तो म्हणतो, ' काय हो, आम्ही ऐकतों हें खरं का हो ? खरंच तुमच्या मडमसाहेबांच्या गळ्यांत माळ घातलीन् साहेबानं ? ' मला इतका संताप आला होता, कीं जोडाच...पण करतां काय? शंकरमामा बरोबर ! "

" कोण मेला हा तरी एवढा ? "

" अग, तो नाहीं का कानांत रुद्राक्ष घालून नेहमीं इथं येतो शंकरमामांकडे ? वेदान्तीबोवा म्हणतात त्याला. मागें बंद झाला होता यायचा याचीन् त्यांची जोडाजोडी झाली म्हणून. पण आतां पुनः जुळलं वाटतं. "

" अन् बाई शंकरमामंजी कांहीं बोलले नाहींत त्याला ? "

" हो ! ते बोलताहेत ! माझा तर असा पक्का समज आहे, कीं त्यांनीच त्याला दिला असेल चढवून असं विचार म्हणून. तुमचे शंकरमामंजी काय करतील आणखी काय नाहीं ! "

" आमचे शंकरमामंजी आणखी आपले कोण ? आपल्यामुळें तर आमचे मामंजी ते ! "

पण मी बोललें तिकडे आतां लक्ष नव्हतें. अंगाचा संताप झाला होता. त्या भरांत बराच वेळ गेला. नंतर मीं " आतां माहेरीं किती दिवस राहूं," वगैरे विचारलें. तेव्हां " तूं आतां येऊंच नकोस नको शिंचा हा त्रास उठल्यासुटल्या ! पुनः त्या गाढवाला असे शब्द माझ्याजवळ काढूं तर दे, कीं अगदीं... भिकार माणूस कुठला ! अन् यांचा त्यांचा अगदीं जीवश्चकंठश्च स्नेह ! भांग पितो, गांजा ओढतो, आणखी हवा तिथें पडलेला असतो. यांनींच आपल्या खटपटींनीं त्याला दहा का बाराची असामी आपल्या हपिसांत लावून दिली. अन् त्याला ' बोवा बोवा,' म्हणून कोण त्याची प्रतिष्ठा ! मोठे वेदान्ती ते ! "

" बरं, त्यांच्याशीं आतां करायचं आहे काय आपल्याला ! उगीच रिकाम्यापणीं संताप ! "

"संताप म्हणजे ? या पाजी लोकांचं नांव निघालं, कीं माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाते. त्याला काय करावं ? नाहीं हे मोठे..."

" बरं, आतां रात्र किती झाली, याचा कांहीं सुमार ! मग मी किती दिवस राहूं तें नाहीं मला सांगितलं ? "

" सांगितलं ना, आतां मुलीं परत जाईपर्यंत येऊंच नको म्हणून ? नाहीं तर आपली असं कर. काहीतरी युक्ति करून आजीकडे जा कशी ? म्हणजे ठीक पडेल. "

नंतर थोडा वेळ त्याचसंबंधानें बोलतां बोलतां रात्र फार होऊन आम्हांला झोप लागली.

दुसरे दिवशीं जेमतेम माराकूट करून मला जाण्याला तर परवानगी मिळाली व मी लागलीच चालती झालें. आजीच्याकडे जाण्याविषयीं बूट निघाल्यापासून माझें मन थोडेंसें चलबिचल करूं लागलें. आजीला भेटावेंसें वाटूं लागलें; पण युक्ति काय करावी, असें मनांत येऊन मन अगदीं गोंधळून गेलें. जेवणींखाणीं व्हायचीं तीं झालीं. पुरुषांपैकीं यायची ती मंडळी आली, बायकांपैकीं मात्र उमासासूबाईखेरीज कोणी आलें नाहीं. येणार नव्हतें हें मला ठाऊकच होतें. असो. ते दिवशीं मीं एक गोष्ट विशेष ध्यानांत घेण्याजोगी अशी पाहिली ती ही कीं, माईसाहेबांच्या अंगावर नेहमींच्या पलीकडे दागिने नव्हते. असें कां हें मला कांहीं समजेना. दादाला विचारीन तेव्हां सारें कळेल, असा विचार करून मीं तो दिवस घालविला. संध्याकाळींदेखील कांहीं दादाची एकीकडे गांठ घेण्यास सांपडलें नाहीं. शिवाय मला त्याला हेंहि विचारायचें होतें कीं, माईसाहेब आतांशा अ ा अगदीं उदासीन कां ? त्याचप्रमाणें त्यांचें व त्यांच्या आईचें कांहींतरी बिनसलें असावें. दोघी एकमेकींशीं कांहीं बऱ्या भावानें नव्हत्या असें स्पष्ट दिसत होतें. मग कारण काय असेल तें असो. माईसाहेबांच्या एकदर वृत्तीवरून असें स्पष्ट दिसलें, कीं त्यांना कोणत्यातरी गोष्टीचा खेद झाला असाव.. तो कसला ? काय ? हें कांहींच उमगेना. त्या आमच्याशीं आतां तितक्या कुऱ्यानें वागत नव्हत्या.

आमच्या वहिनीबाई काय ? जशा पूर्वी होत्या, तशाच अजूनहि होत्या. त्यांच्या वृत्तींत अधिक माणूसघाणेपणा आला यापेक्षां कांहीं फरक झाला नव्हता. धड बोलायचें नाहीं. तोंडाचा चंबू करून व तें असें वांकडें करून "आमचं काय बाई ? कशांत कायन् फाटक्यांत पाय ! अस्साच जन्म जायचा ! " असें म्हणण्यापलीकडे त्यांच्या तोंडून शब्द निघालेला कांहीं मीं पहिले दिवशीं ऐकला नाहीं. आणि तेव्हां बरीक मला वाईट वाटलें कीं माझ्या दादासारख्याला अशी बायको मिळाली ! पण कांहीं हरकत नाहीं, अजून ती सुधारेल, असें वाटून मी आपली उगीच बसलें.

ते दिवशीं मी अर्थातच सासरीं गेलें नाहीं. माझ्या मनांतून दुर्गीकडे जायचें होतें. सासरहून माहेरीं येण्याची मारामार, तर दुर्गीकडे कुठून जायला मिळणार ? तेव्हां

माहेरीं आल्याखेरीज दुर्गीकडे जाणें अशक्यच होतें.—आम्ही दोघी अगदीं बहिणीसारख्या लहानपणापासून अगदीं एका ठिकाणीं खेळलों संवरलों; पण तिच्याकडेदेखील जाण्याची प्राज्ञा नाहीं. ही आमची स्वतंत्रता ! हें आमचें जिणें ! प्रत्यक्ष बापाच्या घरीं जायचें तर त्याला सतरा हजार परवानग्यान् रसवानग्या ? यापेक्षां गुलामगिरी गुलामगिरी ती काय असेल ! असो.

दुसरे दिवशीं सकाळीं माईसाहेबांना सांगून मी बाळंतविडयाचें सामान कांहीं नव्हतें तें आणून ठेवून दुपारीं दुर्गीकडे गेलें.

◆ ◆ ◆

## ५९ : दुर्गीची स्थिति

* * * * * * * * * * * * * *

मला पाहिल्याबरोबर दुर्गीला काय पण प्रेमाचें भरतें आलें ! तिला धड उठवत नव्हतें—मी नको नको म्हणतें तरी झटकन् उठून तिनें आपल्या मुलाला घेतलें व मला म्हणते, " इतके दिवस इथें येऊन आज आलीस ना इकडे आपल्या भाच्याला पाहायला? तो बघ. तो बघ. कसा मुठी हें करून तुझ्याकडे पाहतो आहे तो ! "

त्या मुलाला पाहण्याबरोबर माझ्या अंगावर शहारे आले. त्याच्या अंगाला इतक्या कांहीं सुरकुत्या होत्या, आणखीं रडे तें इतकें अगदीं हलकें कीं कांहीं अगदीं पुसूं नये. त्याच्या अंगांत यत्किंचित्‌देखील शक्ति नव्हती. वाटे, कीं जरा जर त्याला धक्का लागला तर त्याचा प्राण कासावीस होईल. तें पाहून मी आपली एकसारखी त्याच्याकडे स्वस्थपणें पाहात होतें. इतक्यांत दुर्गी पुन्हा मला म्हणते, " घे ग ! पाहते आहेस काय नुसती त्याच्याकडे ? बघ, बघ कशी चळवळ करतो आहे तो ! माझं छकुलं तें ! जा. जा आपल्या मावशीकडे, अयाई ! काय ग झालं बाळाला ? "

तें तिचें आपल्या मुलावरील विलक्षण प्रेम पाहून माझ्या मनाला विलक्षण आश्चर्य वाटलें. मीं भीत भीत त्या मुलाला मांडीवर घेतलें आणि डोलवूं लागलें. इतक्यांत दुर्गीची आजी म्हणते, " वाः फार चांगलं शोभतं आहे ! आतां आपल्याला होऊं द्या एकदा लवकर अं, आमच्या बाळ्याला मावसभाऊ. " हें त्यांचें बोलणें चाललें असतां माझें लक्ष दुर्गीकडे होतें. तिची एकंदर अवस्था किती वाईट झाली होती हें पाहून मला फारच वाईट वाटलें; लहानपणची तीच ही दुर्गी असें मला वाटलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर आपण मुंबईला जाण्यापूर्वीची दुर्गीदेखील ही नव्हे असें वाटलें. तथापि एक विशेष गोष्ट माझ्या लक्षांत आली ती ही, कीं ती आपल्या मुलाच्या आनंदांत अगदीं गर्क असे. मी त्या मुलाला घेऊन डोलवूं लागल्याबरोबर तिला फार समाधान झालें. तिचें सारें लक्ष माझ्या मांडीवर असलेल्या मुलाकडे होतें. एकदोनदा सहज कोठें त्याच्या मानेला

धक्का बसल्यासारखें झालें, तर लागलीच तिनें, " हं, हं, यमे, त्याला नीट धर ग, किती लहान आहे तें. असं काय करतेस ? " असें म्हणून तिनें आपले हात त्याला मजजवळून घेण्यासाठींच कीं काय पुढें देखील केले.

बाळंतपणापूर्वी जी जीव द्यायला तयार झाली होती, आपल्या जिवाचें मी कांहीं तरी करून घेणार असें स्पष्टपणें मजजवळ जिनें बोलून दाखविलें, आणि ती तसें कांहीं तरी खास करणार असें मला अगदीं पक्कें वाटून भयहि पडलें होतें, तीच दुर्गी आज आपल्या जिवाकडे न पाहतां त्या मूठभर मांसाच्या पिंडावर इतकें प्रेम करूं लागली व अगदीं तन्मय झाली, दुसरें कांहीं तिला दिसतच नाहीं, असें दिसलें. हें पाहून मला आश्चर्य वाटलें व एकपरीनें आनंदहि झाला. या पोराकरितां ती हवे ते त्रास सोशील, ती आतां त्या पोराच्या हुरूपानें लवकर बरीदेखील होईल, अशी माझ्या मनाची खात्री झाली. आपल्या जिवाबद्दल जी अगदीं निराश झाली होती, तिला आतां जगण्याला कांहींतरी—कांहींतरी कां ?—फारच प्रबल असा हेतु झाला. जोंपर्यंत हें पोर जिवंत आहे तोंपर्यंत आतां ही इकडे तिकडे न पाहतां हजारों संकटें सोसून पण जगेल, आपल्या जिवाचा कंटाळा करणार नाहीं, असें मला आतां खात्रीनें वाटूं लागलें आणि त्यामुळें मला खरा खरा आनंदहि झाला; तथापि खेदाची गोष्ट एवढीच होती कीं, तें पोर फार दिवस जगेल असें वाटत नव्हतें. आणि हें पोर जगलें नाहीं तर मात्र दुर्गी आपल्या जिवाला काय करील आणि काय नाहीं याचा खात्रीनें नेम नव्हता. दुर्गीचें मीं एकंदर हें पाहून ठेविलें होतें, कीं ती एकमार्गी असून तिचे मनोविकार फार जाज्वल्य असत. एकदा एखाद्या गोष्टीविषयीं तिट्कारा म्हटला, कीं मग त्याचें नांव घ्यायचीच नाहीं ! एकदा एखाद्या गोष्टीवर प्रेम म्हटलें, कीं तें अतोनात ! त्यालाहि पारावार नाहीं. असें असल्यामुळें तिचें आपल्या पोरावरील प्रेम सध्यां तरी निदान तिच्या बऱ्याचें होतें, आणि तें पाहून मला आनंद झाला. मी बराच वेळ बसलें. इकडच्या तिकडच्या गोष्टी बोललें, तिच्या प्रकृतीविषयीं पुष्कळ चौकशी केली. पहिल्यापेक्षां आतां पुष्कळच तिची प्रकृति बरी आहे, असें तिच्या आईनें व आजीनेंहि सांगितलें, तेव्हां बाळंत होण्याबरोबर तिची प्रकृति कशी होती याची मला तर कल्पनासुद्धां होईना. हल्लीं ती मला किती खराब झालेली दिसत होती, हें मीं वर लिहिलेंच आहे. तेव्हां ही जर पुष्कळ बरी तर त्याच्या-पेक्षां वाईट ती प्रकृति कशी, हेंच माझ्या ध्यानांत येईना. तथापि मी आपली अधिकउणें कांहीं न बोलतां ' माहेरीं असलें तर रोज, निदान एक दिवसाआड येत जाईन " असें म्हणून तेथून उठलेंच. वाटेनें येतांना माझ्या मनांत किती तऱ्हेचे विचार आले म्हणतां ! कांहीं खेद, कांहीं आश्चर्य, कांहीं काळजी, थोडासा आनंद, अशा नाना तऱ्हेच्या विचारांनीं माझें मन अगदीं भरून गेलें. दुर्गीच्या त्या एकंदर स्थितीवरून माझ्या मनांत असे विलक्षण व परस्परविरुद्ध विकार उद्भवले याचें कारण आतां येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्या माझ्या मैत्रिणीची सध्यांची स्थितीच अशी कांहीं चमत्कारिक होती, कीं तिच्याविषयीं विचार करणाराच्या मनांत तसे नाना विकार उद्भवायचेच ! तरी मीं

भिऊन तिच्या नवऱ्याबद्दल आपण होऊन चौकशी केली नाहीं. मला आधीं थोडेंसें ठाऊकच होतें, कीं तो कोठें चाकरी मिळवायला म्हणून गेला आहे, पण त्याचें पत्र मुळींच आलें नाहीं. तेव्हां मी तिला किंवा तिच्यादेखत तिच्या आजीला वगैरे तरी कशाला नको ती आठवण करून देऊं ?

असें माझें मन विलक्षण होऊन गेलें असतांच मी माहेरीं आलें. दादा अजून आला नव्हताच. त्याची गांठ पडून आम्हांला दोघांना स्वस्थपणानें बोलायुबसायला केव्हां सांपडेल असें मला झालें होतें. त्यात दुर्गीकडे जाऊन आल्यामुळें माझ्या उद्विग्न झालेल्या मनास फारच उतावळी झाली होती. चार वाजले, साडेचार वाजले, पांच वाजले, आतां तो येईल असें म्हणत मी आपली रस्त्याकडे पाहात होतें, इतक्यांत तो आपल्या वेळेवर आला आणि माझे मनोरथ पूर्ण झाल्यासारखे वाटलें.

पण मजा कशी असते पाहा ! कोणाचीहि गांठ पडेपर्यंत आपण त्याला असें सांगूं, तसें सांगूं, त्याला हें विचारूं तें विचारूं, असें होत असतें; पण गांठ पडल्यावर क्षणांत सारें कुठल्या कुठें नाहींसें होतें, याचा अनुभव मला तर फार वेळां आलेला आहे, यांतलीच आतांची वेळ होती.

परंतु थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी, विचारपूस, थट्टाविनोद झाल्यावर सगळें पूर्वीप्रमाणें आठवून आम्ही अगदीं लहानपणीं बोलत असूं तशा तऱ्हेनें बोलूं लागलों. मुंबईच्या हकीकती त्यानें मला विचारल्या, त्या मीं सांगितल्या. लक्ष्मीबाई, यशोदाबाई, नानासाहेब, विष्णुपंत वगैरे मंडळींच्या गोष्टी त्यानें मला पुनः विचाराव्या, मीं पुनः त्याला सांगाव्या, आणि पहिल्या दोघींच्या गोष्टी सांगतांना तर मला कधीं कंटाळा येऊंच नये. तितक्यांत तो मला म्हणतो, " यमे, मी, मी सांगूं का तुला माझ्या मनांत काय आहे यंदा तें ? पण बोलूं नकोस अं कुठें. नाहीं तर मग पाहा ! " मी " नाहीं " असें म्हटल्याबरोबर त्यानें माझ्या कानांत सांगितलें. त्याबरोबर " वा ! मग किती तरी छान होईल ! " असे उद्गार एकदम माझ्या तोंडून निघाले. पण थोडासा विचार करून मग मीं त्याला म्हटलें, " पण दादा, बाबांनीं हो म्हटलं पाहिजे ना ? "

" अग इकडे बघ, रघुनाथरावांनीं विचारलं कीं नाहीं पत्र लिहून, म्हणजे ते कांहीं नाहीं म्हणायचे नाहींत, अशी माझी अगदीं पक्की खात्री आहे. त्यांना सांगूं आपण विचारायला. पण एव्हांच नको हो. एव्हां अगदीं याबद्दल चकार शब्द काढून उपयोगी नाहीं. "

तो दादानें सांगितलेला विचार मला फार पसंत पडला, त्यामुळें दुसरें कांहीं बोलणें त्या वेळीं झालेंच नाहीं. कांहीं वेळानें मी कांहीं त्याला विचारणार, तों माई-साहेबांनीं हांका मारल्याकारणानें जावें लागलें. तथापि त्या दिवशीं रात्रीं जेवल्यावर मी त्याच्या माडींत जाऊन बसून किती रात्र होईपर्यंत तरी आम्ही बोलत बसलोंच. मला जें मुख्य विचारायचें होतें तें माईसाहेबांविषयीं, परंतु तें सगळ्यांची निजानीज झाल्याखेरीज

कसें विचारतां येतें ? तरी एवढें बरें होतें कीं दादाच्या माडींत कांहीं कोणी निजत नसे. तो आपला एकटाच असे. त्यामुळें रात्रीं तरी बिनहरकत बोलायला सांपडे. असो. इकडच्या तिकडच्या, दुर्गीच्यासुद्धां गोष्टी बोलणें झाल्यानंतर मी हळूंच दादाला म्हटलें, " दादा, मी तुला कालपासून विचारणार आहें; पण आतां मागल्यासारखं नको हो करूं. मला आपलं सांग तुला काय ठाऊक असेल तें. नाहीं तर ...हो, आतां मी कांहीं लहान—"

" नाहीं, नाहीं बरं ! यमुताईसाहेब, आतां आपण केवढ्या मोठ्या ! आकाशाला लागलां वाटतं ! अबब ! बरं पण काय विचारतेस तें विचार. "

" आतांशा माईसाहेबांची वृत्ति अशी बावरलेली कां ? कोणाशीं फारशा बोलत नाहींत. त्यांच्या आईचंन् त्यांचंदेखील नीट नाहीं वाटतं ? मायलेकींचं रहस्य तितपतच आहे, म्हणून विचारतें अन् हो, काय रे दादा, आतांशा दागिने अगदीं नाहींत. काल इतकी मंडळी जेवायला आली होती, पण माईसाहेबांनीं सरी घातली नाहीं. थोरली नथ घातली नाहीं, पायांतल्या सांख..."

" अरे वा ! तूं तरी एकूण बरीच बारीक पहाणारी झालीस ! यमे ! इकडे बघ, मला तर अगदीं—( माझ्या कानाजवळ येऊन फार हलके ) खात्रीनं वाटतं, कीं ते दागिने घरांत नाहींत. "

" म्हणजे ? " मीं आश्चर्यानें एकदम ओरडून म्हटलें.

' अग, ओरडूं नको. ऐकेल ना कोणी ! म्हणजे काय ? मी उगीच नाहीं कांहीं हें म्हणत. माझी अगदीं पक्की खात्री आहे. त्यांत शंका नाहीं. ते दागिने मग कुठें गेले असतील आणखी त्यांचं काय झालं असेल तें कांहीं मला कळत नाहीं. पण त्यांत कांहीं तरी भानगड आहे. माईसाहेबांच्या आईसाहेबांचा ते दागिने जाण्यांत कांहीं संबंध असावा, अन् त्यामुळें मला वाटतं त्यांचंन् त्यांचं आतांशा बिनसलं असावं. "

" म्हणजे ? दादा, तूं म्हणतो आहेस तरी काय ? दागिने गेले म्हणतोस ? "

" असं माझं मन तर मला खात्रीनं सांगतं. अग यमे, असं कांहींतरी असल्याखेरीज तुला वाटतं का माईसाहेब इतक्या अगदीं उदासीन होऊन, पांढरीं पातळं, पांढऱ्याच चोळ्या, असला साधेपणा करूं लागतील म्हणून ? तें कांहीं नाहीं महाराज, ते दागिने घरांत नाहींत. तेव्हां कांहींतरी बहाणा करून आतां ते मला घालायचेच नाहींत, अमुकच नाहीं, तमुकच नाहीं, असं चाललं आहे, समजलीस ? "

" दादा, तूं कांहीं म्हण पण मला तर कांहीं हें खरं वाटत नाहीं. अरे, घरांतले दागिने नाहींसे होतील कसे ? "

" तें जर मला ठाऊक असतं तर तुला सांगून नसतं का टाकलं ? "

" पण कांहींतरी त्याच्याबद्दल......"

"माझा आपला असा समज आहे, कीं ती तूं पाहिलीस बाई ती ? मागें एकदा आली होती न् मीं पुनः पाहिली म्हणून तुला लिहिलं होतं, तिचा कांहींतरी हात त्यांत असावा. आणखी कोणीतरी......"

खरं म्हणाल तर त्याचें म्हणणें मला मुळींच खरें वाटेना. तरी पण माझें मन मात्र चमत्कारिक झालें. तेव्हां आणखी कांहीं त्याच प्रकरणीं बोलून मी निजावयास गेलें.

◆ ◆ ◆

## ६० : कांहीं गूढ गोष्टी

दादानें मला जें सांगितलें, तें मला इतकें कांहीं चमत्कारिक वाटलें, कीं कांहीं पुसूं नये. दागिने घरांतून गेले असावेत म्हणजे आहे तरी काय ? आम्ही कांहीं फार श्रीमंत नव्हतों, परंतु बाबांनीं कलेक्टर कचेरींत असतांना जें काय मिळविलें, तें सर्व दागदागिन्यांतच घातलें होतें. आमच्या आईला त्यांनीं चालीपुरते सर्व दागिने केले होते, ते चांगले ठळकच होते. आणखी माईसाहेबांच्या लग्नाच्या वेळीं व नंतरहि त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांत भर पडत चाललीच. शिवाय वहिनीच्याहि अंगावर चालीपुरते—पण चांगले ठसठशीत—दागिने घातले होते. आमच्या आजोबांचें शेतवाडीचें भाताचें उत्पन्न होतेंच, त्यामुळें बाबांना घरीं कांहीं पाठविण्याविषयीं कधीं तसदी नसे; उलट कार्य निघालें असतां आजोबांनींच हातभार लावावा, असा प्रकार होता. असें असल्यामुळें दागदागिन्यांची स्थिति बरी होती, आणि दादाच्या म्हणण्याप्रमाणें जर ते खरोखरच एकदम नाहींसे झाले असले,—मग कारण त्याला कांहीं असो,— तर म्हणायचें तरी काय ? असा विचार मनांत येऊन कांहीं काळजी, कांहीं खेद, कांहीं आश्चर्य वाटणें साहजिकच आहे. मी आपली किती वेळ तरी त्यासंबंधानें वेड्यासारखी विचार करीत होतें, कीं हें आहे तरी काय ? माईसाहेबांचा दागदागिने घालून नटण्याचा सोस एकदम आपला नाहींसा झाला कसा ? आतां त्या नटत नसत असा भाग नव्हताच. आतां त्यांचा पोशाख तरी नटण्याचाच होता, परंतु मोठाल्या कांठांचीं लुगडीं नेसून, दागदागिने चढवून, गुलाबाचें फूल खोंवून असा जो प्रकार होता तो जाऊन आतां त्याच्याऐवजी निराळी तऱ्हा—साधेपणा दाखविणारें, फार श्रीमंत न दिसतां जें नटणें त्याची तऱ्हा—आली होती. त्याचप्रमाणें आतां पाहिलें तों पूर्वीचें तें एकदम तुटून बोलणें जाऊन, एखाद वेळीं पण विचार करून निवडून काढून खोंचून बोलण्याची एक नवीनच संवय त्यांना जडलेली दिसली.

हा इतका विलक्षण फरक त्यांच्या ठिकाणीं कां झाला ? प्रत्यक्ष आपल्या आईशीं देखील त्या धड बोलेनातशा होण्याचें कारण काय ? वगैरे अनेक गोष्टींचा मी आपली विचार करूं लागलें. पण मला नवीन कारण कांहीं न सांपडतां हळूहळू दागिन्यांच्या

संबंधानें दादाचाच तर्क खरा असावा, असें वाटूं लागलें. कारण दागिने असून आणखी माईसाहेब ते अंगावर घालणार नाहींत, हें मला कांहीं केल्या सुसंभाव्य वाटेना. शिवाय विचार करतां करतां मला असेंहि एकदम आठवलें, कीं वहिनीची माळ आणखी नगगोंडे कुठें दिसले नाहींत ? माईसाहेबांच्या दागिन्यांबरोबरच तेहि दागिने गेले काय ? असें मला एक क्षणमात्र वाटलें; व तो विचार मीं लागलीच मनांतून घालविण्याचा यत्न केला; पण तो कसला सिद्धीस जातो ? आधींच मला चौकसपणा कमी आणि त्यांत असली ही काळजी लागण्याजोगी गोष्ट, मग काय विचारतां ? कांहीं केल्या ती दागिन्यांची गोष्ट माझ्या मनांतून जाईना. हें गूढ आपल्याला कसें उकलेल ? त्यांतलें तथ्य आपल्याला कधीं कळेल ? त्यांतलें तथ्य आहे काय ? कोण्या मार्गानें चौकशी केली असता तें आपल्याला समजेल ? असें एकसारखें माझ्या मनांत येत असून मी या नादांत असतांच मला झोप लागली. सकाळीं उठल्यावर तरी विचार तोच. एक वेळां वाटलें, कीं वहिनीला आपण विचारावें, तिला आपल्या विश्वासांत घ्यावी, पण पुनः वाटलें, तिच्या स्वभावाची एक तऱ्हा निराळीच. आलें मर्जीला तर ती सांगेल, नाहीं तर, " हें हो काय मला माहीत ? तुम्ही आपल्या सासूबाईंना नाहीं तर मामंजींना विचारा ", हें उत्तर तिनें दिलें असतें– तें कांहीं सासूबाईंच्याविषयीं प्रेमबुद्धि किंवा आपण दुसऱ्यापाशीं त्यांच्याविषयीं असें कसें सांगावें अशी शंका येऊन, म्हणून नव्हेच, तर निव्वळ लहर ! जें मनांत येईल तें करायचें. बस इतकेंच. तेव्हां तिला विचारायला मी आपली भीतच असें.

तथापि मनांत आलेला विचार दादाला तर कळवावा असें मनांत येऊन मीं संधि साधून त्याला विचारलें. प्रथमतः त्यानें ऐकलें न ऐकलेंसेंच केलें. पुनः मीं विचारलें तरी प्रकार तोच. शेवटीं मीं पुनः एकदा विचारलें तेव्हां तो मला म्हणतो, " वेडी तर नाहींस ना तूं, यमूताई ? अग, तिला कांहीं सांगाय् विचारायला जाणें, आणखी हडळीच्या..."

" दादा, दादा, हें काय बोलतो आहेस तरी काय ? कांहीं तुझ्या जिभेला हाड तरी ? "

" माझ्या जिभेला हाड ! मी तर माणूस आहें, तेव्हां माझ्या जिभेला कुठलं आलं आहे हाड ? "

" पुरें रे तुझं. कधीं म्हणजे थट्टेवांचून तुझं बोलणं झालं आहे, असं मला तर कांहीं आठवत नाहीं--नाहीं, खरंच तुला विचारतें, विचारूं का वहिनीला काय आहे, काय नाहीं ? "

तुला एकदा सांगितलं ना यमे, तिच्यांत कांहीं अर्थ नाहीं म्हणून. अग हें असंच ! तुला आजपर्यंत थोडा का अनुभव आला आहे, सांग मला ? कधीं कोणाशीं नीट बोललेलं तरी आठवतं आहे का तुला ? अग ती म्हणजे...जाऊं दे कीं. मी कालपरवां-पासून तुझ्याजवळ नांव तरी काढलं तिच्याविषयीं ? का कधीं पत्रांत कीं कशांत ? "

"मोठं चांगलंच कीं नाहीं करतां आपण ? अन् आम्हांला सांगतोस मोठमोठ्या शहाणपणाच्या गोष्टी ! असं करावंन् असं—लोकां सांगे ब्रह्मज्ञान अन् आपण कोरडा पाषाण ना ?"

"कां होईना ?" तो मोठ्या शांतपणानें मला उत्तर करतो. "पण आम्हीं ब्रह्मज्ञान आपल्याला सांगितलं, तेव्हांच आपण मिळवायला लागलां ना ?"

"हो. हो. नाहीं कोण म्हणतं ? अन् म्हणून तर म्हणतें, कीं आम्हांला जसं शिकवलं ब्रह्मज्ञान, तसं वहिनीलाहि शिकवून एकदा......"

"अरे वा ! आपण बऱ्याच आतां बोलायला शिकलां म्हणायच्या यमूबाई;—पण आतां असं करा—आपणच आलां आहांत मोठ्या शहाण्या वन्सं, त्या आपण आपली पुण्याई खर्चून काय होतं काय नाहीं तें पाहा बरं म्हणजे जरा ठीक पडेल. आम्हांला कांहीं त्यांत पडायला येत नाहीं अजून उघड उघड. तेव्हां एकदा होऊनच जाऊं द्या आपले काय यत्न व्हायचे ते. मग..... अग यमे: तुला इतकी माणसाची परीक्षा होऊ नये, कीं कोण माणून कशा तऱ्हेचं आहेन् कशा तऱ्हेचं नाहीं ! तिच्यासारखी आचरट तरी आपण काहीं कुठें पाहिली नाहीं. मग..."

इतक्यांत पावलें वाजल्याचा भास झाला म्हणून मी पाहूं लागलें तो कोणी दिसेना; तरी पण पावलांवरून मला वहिनीचा संशय आला. आम्ही काय बोलतों तें ऐकण्यासाठीं ती जिन्यांत उभी राहिली असावी. दादालाहि तोच संशय आला, परंतु दादाच्या संशयाची कांहीं कमालच होती. त्याला असा संशय आला कीं ती माईसाहेबांच्या सांगण्यावरून तिथें येऊन उभी राहिली असावी. मला प्रथमतः तसें वाटेना, पण शेवटीं शेवटीं मलादेखील असेंच वाटलें, न जाणों, आम्ही दोघेजण नेहमीं काय एवढें बोलत असतों, असें मनांत येऊन वहिनीस माईसाहेबांनींच कानोसा घेण्यास पाठविलें असावें. हें असें असेल काय ? असा विचार मनांत येऊन खरें काय आहे तें कसें काढावे या विचारास मी लागले. मला खरोखर फार आश्चर्य वाटलें, कीं हें आहे तरी काय ? आमच्या वहिनींचा स्वभाव आम्हांला कळणार तरी केव्हां ? खरोखरीच ती आपल्या नवऱ्याचें व नणंदेचें आपल्या सासूविषयीं काय बोलणें आहे तें ऐकून तिला सांगावें अशा हेतूनें--तिच्या सांगण्यावरून का होईना ?—पण ती जवळ येऊन उभी राहिली असेल काय ?

असा विचार करून मीं दादाला तसेंच म्हटलें. त्याबरोबर तो हसून मला म्हणतो, "त्यांतलं खरं काय आहे तें कळायला पंचाईत पडेल असं का तुला वाटलं होतं ? अग, असं बेमालूम जर ठेवतां आलं, तर तें बरं असो वाईट असो, आचरट कोण म्हणेल अशा माणसाला ? तिच्या कानीं काय पडलं, काय नाहीं, सारं तेव्हांच कळेल अंमळशानं. अशा माणसांच्या मनांत काय राहायचंय् !"

" तें खरं रे; पण तिनं आपलं हें दागिन्याबद्दलचं बोलणं जर माईसाहेबांना जाऊन सांगितलंन तर कसं काय? त्याचं मी विचारतें!"

"त्याचं काय विचारायचं आहे? जें होईल तें होईल. तिथं कांहीं कुणाचा उपाय चालायचा आहे का तुझ्या मतं? छे; ती जर माईसाहेबांच्या सांगण्यावरून इथें येऊन उभी राहिली असली तर ती जाऊन सांगणारच. तूं जर तिला जास्तीकमती बोलशील तर उगीच आणखी आचरटपणा बरीक होईल, याच्यापलीकडे मला कांहीं त्यांत अर्थ दिसत नाहीं."

"तू फारच हें करतोस." मीं एकदम मधेंच त्याला म्हटलें. "मला नाहीं वाटत ती इतकी आचरट असेलशी, अन् त्यांतून सख्खी सासू असती तर असो तरी."

"बरं आहे, येईल अनुभव. आतांच कशाला बोलूं? तुला जर तसं वाटत नाहीं, तर आतां सुट्टींत तूं इथं आहेस, तीहि आहे. अनुभव घेऊन पाहा. इतका जर तिचा आचरटपणा गेला तर काय म्हणशील तें ऐकेन, समजलीस? अग, तुला त्यांतलं कांहीं ठा......"

"अहाहा! अन् तुला रे काय ठाऊक आहे? ती लहान आहे. अजून तिला समजत नसेल, तेवढयावरून अगदीं कधींच ती सुधारायची नाहीं, अन् सुधारली तर काय म्हणशील तें ऐकेन, इतकं म्हणण्याजोगं तुला तरी काय तिचा स्वभाव समजून आला आहे?"

"पण आतां त्याच्याबद्दल वाद कशाला पाहिजे? अनुभव घे, मग बोल म्हणून सांगतों ना तुला?" इतकें बोलून तो थाबला व लागलीच मला म्हणतो, "यमे, पण मला तूं दुर्गीच्या घरची काय हकीकत आहे, काय नाहीं सगळी नीट सांगितली नाहींस? तूं आल्यावर मला सगळं कांहीं कळेल अशी मला मोठी आशा होती."

हें विचारीत असताना त्याची ती आतुरता पाहून व क्षणापूर्वी वहिनीविषयीं बोलत असतां त्याची उदासीनता पाहून मला किंचित् विलक्षण वाटलें; मी त्याला कांहीं बोलणारहि होतें, परंतु तितक्यांत मीं त्याला एवढेंच म्हटलें, "सांगितलं नाहीं तर काय झालं? – आणखी तिचं तें काय बिचारीचं सांगायचं आहे? आहे तशीच आहे."

"असं नव्हे ग; तूं म्हणत होतीस तिचं त्या मुलावर कायस......"

"झालं तर; मग सगळं तुला कळलं तर आहे. आणखी काय सांगायचं?"

अशी आपली उडवाउडवीच केली. तें पाहून त्याला वाईट वाटलेंसें दिसलें परंतु इतक्यांत मी तेथून उठूनच गेलें.

अशा एकंदर दोन चार दिवसांत मोठ्या मजेदार गोष्टी होऊन कित्येक तर चमत्कारिक—मनाला गूढांत पाडण्याजोग्या—होऊन आम्ही बुचकळ्यांत पडलों होतों. मला तर दुसरें कांहीं सुचेनासें झालें, सासरचें बोलावणें मुळींच नाहीं. मीहि आपण जावें

कीं नाहीं याच्या विचारांतच होतें. आजीला भेटायला जाण्याची काय युक्ति करावी तीहि सुचेना. मला तर एकदा केव्हां तिला भेटेन असें झाल्यासारखें झालें होतें. तेव्हां एकंदर मन मोठ्या गोंधळांत होतें, तरी पण असेंहि वाटे कीं, यांना येथें शंकर-मामंजींच्या व आजेसासूबाईंच्या तोफखान्याच्या माऱ्यांत टाकून देऊन आपण जाणें बरें नव्हे. दुसरें मन असें सांगे, कीं आपल्याला उठल्यासुटल्या जसा त्रास होतो, तसा कांहीं तिकडे होणार नाहीं. अशा नाना तऱ्हा होऊन पण आजीकडे जाण्याची इच्छा कांहीं कमी होईना. पण होणार कसें ? बाबा आतांशा अगदीं मौनव्रत धरलेले. बोललेच तर फक्त बोलायचे माईसाहेबांपाशीं. मी एवढी किती दिवसांनीं आलें, पण पहिले दिवशीं " कसं काय यमूताई, बरं चाललं आहे ना ? " एवढें बोलले; त्यावर एक अवाक्षरदेखील नाहीं. आम्ही एवढ्या झालों, पण अजून आपण होऊन त्यांच्याजवळ गोष्ट काढायची प्राज्ञा नव्हती. मी आल्याबरोबर ती बातमी दादानें आजीला कळविली होती पत्र लिहून, तेवढ्यावरून तिनें बोलावलें पत्रबित्र लिहून तर; बाकी कांहीं लक्षण दिसत नव्हतें. इथल्या इथेंच माहेरीं राहून उगीच दूर राहण्यांत कांहींच तात्पर्य नव्हतें. कारण एक तर मला राहवलें नसतें, आणखी दुसरें, तिकडून जरी मला राहा आपली माहेरीं—राहा आपली माहेरीं असें सांगणें झालें होतें, तरी खरोखर मी गांवांत असून कांहीं एकटे राहवलें नसतें. मला दोन चार दिवसांतच मुकाट्यानें दादाबरोबर नाहीं तर दुसऱ्या कोणाबरोबर, चिठ्ठी किंवा निरोप आला असता, हें मला पक्कें ठाऊक; तेव्हां दोन चार दिवस आणखी राहून मग आपलें सासरीं जावें या विचारांतच मी होतें. आजी स्वतः इथें येण्याचा संभव नव्हताच. कारण आजोबांची प्रकृति दिवसानुदिवस क्षीण होत चाललेली होती. दुखणें कांहीं विशेष होतें असें नाहीं. म्हातारपणाचेंच दुखणें; तरी पण अशा वेळीं हातापायाला कोणीतरी मायेचें माणूस असल्याखेरीज कसें व्हावें ? आणि आमच्याहि मनांत ती येथें यावी असें नव्हतें, तेव्हां आलें तर आम्हांला तिकडे पाठवून देण्याबद्दल तिचेंच पत्र यायचें, नाहीं तर कांहीं संभव नव्हता. दादा कांहीं आपण होऊन कधीं बाबांना विचारायचा नाहीं, मीहि नाहीं. मग काय ? माईसाहेबांकडून विचारायचें, तर त्यांचें आमचें फारच सूत !

◆ ◆ ◆

## ६१ : आजोळीं जाण्याचा बेत

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

परंतु आमच्या मनांत असणाऱ्या साऱ्या गोष्टी कधीं घडत नाहींत हें जसें खरें आहे, तसेंच हेंहि पण खरें आहे, कीं घडाव्याशा वाटणाऱ्या पुष्कळ गोष्टी योग्य वेळीं घडतातहि. निदान माझ्या मनांत जी गोष्ट घडावी असें फार फार होतें, म्हणजे आजीचें बाबांना पत्र येऊन म्हणा अगर दुसरें कांहींतरी घडून म्हणा, पण

आपल्याला तिच्याकडे जायला सांपडावें. ती एकदाची घडली; इतकेंच नव्हे, तर स्वतः आजोबांचें असें पत्र आलें, कीं चिरंजीव गणूला हल्लीं सुटी आहे त्याला व चि० सौ० यमूहि तेथें आहे तर तिच्या सासऱ्याला विचारून तिला आणि नातसुनेलाहि चार दिवस इकडे पाठवून द्यावें. माझी प्रकृति कांहीं बरी आहे. चार दिवस मुलें येथें आल्यानें त्यांनाहि बरें वाटेल, आणखी मलाहि बरें होईल. अशा अर्थाचें पत्र आल्यावर बाबांनीं तें दादाकडे पाठविलें व त्याजबरोबर एक चिठ्ठी--कीं तुझ्या व यमूच्या मनांतून जायचें असेल, तर तिच्या सासरीं जाऊन पाठवितात काय म्हणून शोध करावा. घरांतल्या घरांत बापलेकांचा पत्रव्यवहार झालेला मीं पहिल्यानेंच पाहिला आणि तो पाहून मला भारी हसूं आलें. दादालादेखील हा पहिलाच प्रसंग घरांतल्या घरांत बाबांची चिठ्ठी आल्याचा; परंतु त्याला हसूं आलें नाहीं. उलट, प्रत्यक्ष बोलण्यापेक्षां हेंच बरें असें त्यास वाटलें. अस्तु. पत्र आल्यानंतर दुपारीं जाण्याचा त्यानें बेत केला. परंतु जावें कसें आणखी कोणीकडे, याचें त्याला व मलाहि मोठें गूढ पडलें. आम्ही त्याबद्दलच विचार करीत होतों, इतक्यांत तो मला म्हणतो, " यमे, मी रघुनाथरावांना म्हणूं का ग? तुम्हीदेखील चला चार दिवस आमच्या गांवीं म्हणून? येतील का ग ते? आले तर छान होईल बोआ. तूं, मी, आणखी ते बसत जाऊं आपले गप्पा सांगत, नाहींतर सकाळीं हिंडायला जात जाऊं अं! आजी कांहीं बोलायची नाहीं. उलट तिला कौतुकच वाटेल."

" तिघंच कां म्हणतोस! चौघे म्हण; वहिनीदिखील येणार आहे बरं का दादा. तिलादिखील बोलावलं आहे आजोबांनीं." मी केवळ त्याला लागेल अशा आवाजानें बोललें व तें त्याला फार लागलेसें दिसलें. तो लागलीच म्हणाला, " यमे, मी अगदीं इतकादिखील वाईट हेतु नसतांना बोललों आणखी तूं कां बरं असं बोलतेस, तूंच सांग. ते जर आले, तर मजा नाहीं बरं होणार?"

तो बोलला तें अंतःकरणापासून, असें समजल्याबरोबर मला माझ्या बोलण्याचें फार वाईट वाटलें. पण मनुष्यस्वभावाला आपली चुकी कबूल करणें किती अवघड जातें याचा अनुभव ज्याला असेल, तो कांहीं मीं आपली चुकी लवकर कबूल केली नाहीं, असें सांगितलें तर मला दोष देणार नाहीं.

बराच वेळ त्याबद्दल विचार झाल्यानंतर असें ठरलें कीं मीं ते दिवशीं सायंकाळीं सासरीं जावें आणि दुसरे दिवशीं सकाळीं दादानें मुकाट्यानें तें आजोबांचें पत्र घेऊन दुसऱ्या कोणाकडे न जातां गोपाळमामंजींकडे जावें. प्रथमच इतर कोणाकडे गेल्यास मला धाडणेंसंवरणें लांबच राहून आधीं कांहींनाबाहींच निघून टीका व्हायच्या ही भीति. तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें युक्ति करून आपलें काम साधावें. पत्राची एकंदर बातमी मीं तिकडच्या कानांवर आधींच घालून ठेवावी असें ठरलें व त्याप्रमाणें सर्व घडून आलें. मी संध्याकाळीं माईसाहेबांना विचारून सासरीं गेलें. रात्रीं गांठ पडल्याबरोबर सर्व हकीकत सांगितली. तेव्हां ती ऐकून घेऊन " अरे वा! आतां चारपांच दिवसांत बरीच कार-

स्थानं करून आपल्या इच्छेप्रमाणें घडवून आणलं आं? पण आपण कांहीं जाऊं देत नाहीं. आपल्याला एक घटकाभरदेखील करमायचं नाहीं आपल्यावांचून. चारसहा दिवसांतच चांगला अनुभव आला."

"हो! खोटंच सारं. असं जर होतं, तर एकदा तरी तिकडे यायचं होतं बरं दादाकडे म्हणून? कांहीं कोणीं नांवं नसतीं ठेवलीं!"

"खरोखर, माझ्या मनांत चारपांच वेळां आलं यावं आपल्या दर्शनाला म्हणून; पण करतां काय? इथं घरांत कळलं, कीं तोडतोडूनच खायची मंडळी! तूं गेल्यापासून इथें काय झालें, काय नाहीं, तुला ठाऊक कुठें आहे? सगळीं शंकरमामंजींचीं..."

"काय? काय? झालं काय?"

"अग, दुसरं काय! त्या बायकोवर संताप. तिला बिचारीला परवां रात्रीं वाटतं कुठें ताप आला, आणखी ती सकाळीं उठली नाही लवकर यांचं पूजेचं करायला. झाली यांची तब्येत गरम! मग काय विचारतां? लागले तिला शिव्या द्यायला. 'लाथ मारीन. ठाऊक नाहीं अजून? पूजेचं अजून केलं नाहीं म्हणजे काय? आतां कोण बाप येईल का करायला?'..."

"आणखी? आणखी मारलं कीं काय त्यांना जाऊन?..."

"गेले होते अंगावर धावून. एक चापट देऊन हात धरून ओढीत होते, इतक्यांत गोपाळमामा न् मी दोघेयू गेलों म्हणून बरं झालं. गोपाळमामा खूप बोलले त्यांना; तेव्हां त्यांना काय म्हणतात! पण आमच्यावर केलं त्यांनीं एकमारखं तोंड सुरू! 'खबरदार रे! तूं पुनः माझ्यापुढें आलास तर. निर्लज्ज कुठला! लाज नाहीं वाटत? मी केवढा तूं केवढा, मोठा आला बायकांचा कैवारी! मी तिला खेटराखालीं बडवीन. तूं कोण? पायांतली वहाण पायांतच पाहिजे. उद्यां जर माझं पूजेचं...ताप आला आहे! कसला आला आहे ताप पण तूं मधें कां आलास? का मी तुझ्या बरोबरीचा? का...काय शिंचीं कारटीं! अरे बाबा, तूं आपल्या बायकोचं काय पाहिजे तें कर. या राज्यांत कोणाचाच पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. मग आम्ही मोठे तुझे मामा झालों. लहानपणापासून तुला वाढवलं; पण तूं जर असे ढंग करायला लागलास तर आम्ही काय करणार? स्वस्थच बसणार कीं नाहीं? हीच पेशवाई असती...पण उपयोग काय? तूं आतां आपली बायको साहेबाकडे जरी पाठव..."

"दादा, हें काय बोलता तरी काय?" असें गोपाळमामा मध्येंच बोलले. माझ्या अंगाचा तर नुसता तिळपापड उडून गेला होता. आणखी ती वेळ अशीच होती, कीं हवें तें शंकरमामाला बोलून घराच्या बाहेर पडलों असतों; पण गोपाळमामाकडे पाहलं आणखी तितक्यांत आईनें हांक मारली. बरं तर बरं आजी नव्हती. ती कुठें तुळशीबागेंत गेली होती वाटतं. पण जर जुंपली असती, तर काय—आजला आपण मुंबईस!"

"काय ग बाई तरी चमत्कार!" एवढंच मी मधें उद्गारलें.

"हं! चमत्कार तो पुढेंच आहे. त्या वेळीं तितकी बडबड झाली, आणखी संध्याकाळीं कसला काढा टिपून आणून तो तिला करून द्या म्हणून पाठीस लागले होते, गोपाळमामांनीं कुइनीनच्या गोळया दिल्या, पण त्या डाक्टराचं औषध नको म्हणून फेंकून दिल्या, अन् स्वतः जाऊन काढा शिजवीत बसले! व तो घेऊन येऊन घेण्याविषयीं उमामामीच्या पाठीस लागले होते म्हणून ऐकलें! मला नाहीं अजून कांहीं म्हणायला आले; पण एक दोन दिवसांत 'उगीच मीं तुला सुधरावं म्हणून तें बोललों. तुला त्याचं कांहीं वाटूं देऊं नकोस,' असं ते बोलायला येतील असं वाटलं. काय त्यांत कांहीं अर्थच नाहीं, झालं!"

ही हकीकत ऐकून मला काय वाटलें तें लांबच! पण मी आतां अगदीं समग्र आठवून लिहितें आहें, पण ती वाचणाराला काय वाटेल हें मनांत येऊनच मला मोठें आश्चर्य वाटतें आहे! शंकरमामंजी म्हणजे एक व्यक्ति होती तरी काय? हें पुष्कळांना गूढ पडलें असेल नव्हे?

असलें बोलणें निघाल्यावर आमच्या जाण्याचें अर्थातच कोणीकडच्या कोणीकडे गेलें आणि आम्ही शंकरमामंजींच्या गुणानुवादाचें वर्णन करीत अत्यंत आश्चर्यांत बुडूनच गेलों व आतां एकदा येथून निघून गेलों म्हणजे पुनः या कचाटयांत यायलाच नको, असें मनाला पक्कें वाटून त्याविषयीं वाटाघाट करीत राहिलों. त्याचप्रमाणें पाहिलें तों खरोखरीच तिकडच्या मनांतून आमच्याबरोबर यावेंसें वाटत होतें, पण यावें कसें? कांहीं युक्ति काढून जरी यदाकदाचित् गेलें तरी पुनः आईला नेण्यासाठीं परत आलें पाहिजे.—आणखी तें कांहीं नाहींच. सध्यांच्या स्थितींत तें कांहीं शक्य नव्हतें. बाकी मी अगदीं हुरावलें होतें, यावें म्हणजे ठीक पडेल म्हणून. असो.

दुसरे दिवशीं आमचें ठरल्याप्रमाणें दादा गोपाळमामंजींकडे येऊन त्यानें त्यांना पत्र दाखविलें. त्यांनीं तें वाचून "ठीक आहे. मी आईला विचारून करतों तजवीज. तुम्ही स्वतः जातां आहां ना? जा चार दिवस. तिच्या मनांतून यायचं आहे ना?" असें लागलीच विचारलें.

दादानेंहि "हो. पण आपण धाडीत असलांत तर!"

असें तो म्हणतो तों तेच एकदम म्हणाले, "न धाडायला काय झालं आहे? आहेत दोघं तोंपर्यंत तर काय तें—बरं, जा तुम्ही. मी करतों सारी तजवीज!"

असें त्यांचें आश्वासन मिळाल्यावर मग काय? दादा तिकडे भेटून घरींच गेला. गोपाळमामंजींनीं आतां तें पत्र घरांत आजेमासूबाईंना, मासूबाईंना, शंकरमामजींना वाचून दाखविलें, तेव्हां एकंदर काय काय प्रकार झाला? "तिला पाठवण्याचं आतां आमच्याकडे काय आहे? तिचा नवरा, तिची सासू, काय पाहिजे तें करोत!" अशा तऱ्हेचे ठराविक उद्गार कितीदा निघाले. मला माहेरीं धाडण्याविषयीं विनवण्या करायला आपण स्वतः न येतां एवढयाशा पोराला पाठविलें, यावरून बाबांच्या उद्दामपणाबद्दल

व आमच्या घराविषयीं त्यांच्या मनांत अगदीं तुच्छपणाच वाटतो, असें म्हणून त्याबद्दल काय काय टीका झाल्या, शेवटीं आमची बाजू गोपाळमामंजींनीं घेऊन, "सगळं जरी खरं असलं, तरी त्या पोरीकडे काय आहे त्याचं ? तिच्या जाण्याच्या कां आड यावे बोआ ? तें कांहीं नाहीं. तिची तयारी ग्रा करून" असें कसें म्हटलें व त्यामुळें त्यांच्यावरहि थोडासा आजेसासूबाईचा ताशेरा, शकरमामंजींचें कुचकट बोलणें वगैरे कसें झालें, पण इतकें सगळें होऊन शेवटीं माझें जाण्याचें कसें ठरलें, इत्यादि गोष्टी आतां मी सविस्तरपणें सांगत बसत नाहीं. त्याचप्रमाणें हेंहि पण मीं सांगत बसत नाहीं, कीं जे दिवशीं आमच्या जाण्याचे ठरलें होतें, त्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं आमचीं काय बोलणीं झालीं; मी जाणार म्हणून तिकडे व मलाहि किती वाईट वाटलें. 'मे महिन्याच्या सव्वीस तारखेच्या पलीकडे एक क्षणभरदेखील राहूं नकोस. आणखी नेहमीं पत्र पाठवीत जा, आतां तुला चांगलं लिहितां येतं आहे,' असें तीनतीनदा सांगून मला कितीदा बजावलें, जणू काय मी अशा कांहीं अवघड लांबच्या प्रवासाला जातें आहें, कीं काय होईल तिकडे आणखी काय नाहीं ! मला वाटतें आपण पुनः केव्हां भेटूं आणखी केव्हां नाहीं याचा नेम नसून कमींत कमी पांच सात हजार कोसांवर जाणाऱ्या बायकोलादेखील इतक्या प्रेमानें व काळजीनें कोणी तीनतीनदा आपल्या प्रकृतीला जपण्याविषयीं व पत्रें पाठविण्याविषयीं बजावून सांगितलें नसेल ! मी स्वतः तसेंच सांगितलें व माझ्या डोळ्यांतून पाणीहि आलें यांत कांहीं नवल नाहीं; कारण माझें ब्रीदच तसें; पण तिकडचा प्रेमळपणा तसाच कांहीं विशेष होता. एकंदरीत हां हां म्हणतां मी आजीकडे जाण्यासाठीं सासऱ्यांहून तर माराकुटी करून म्हणा पण कशी तरी निघालें. इकडे दादाचीहि तयारी होती व वहिनीचीहि तयारी चालली होती; परंतु दादा तिच्या येण्याविषयीं अगदीं उदासीन दिसत होता; किंबहुना ती नसली आपल्याबरोबर येत तर फार बरें होईल असें त्याला वाटत असावें, असें त्याच्या उद्गारांवरून मला दिसलें. परंतु माझ्या मनांत तर तिनें यावें असेंच होतें. कारण मला वहिनीची परीक्षाच करून पाहायची होती, ती खरोखरी कशी आहे म्हणून ?

दादाच्या मनात एव्हांपासून तिच्याविषयीं जर वाईट ग्रह झाला तर पुढें तिचे आणखी त्याचें पटावें कसें ! असें जर पटलें नाहीं तर दोघांनाहि सुख काय ? घरांत माईसाहेबांचें व दादाचें पुढें कितपत पटणार तें दिसतच होतें. तेव्हां शेवटीं त्याला सुख पाहिजे, तर कोठेंतरी चाकरीचुकरी धरून बाहेरगांवीं जाऊन स्वतंत्रपणें राहील तेव्हांच !

अशी स्थिति असतांना, त्याचें आणखी त्याच्या बायकोचें एव्हांपासूनच—अजून त्याचा कांहीं संबंधदेखील आला नसतां—जर पटत नाहीं, तर त्याला कांहींतरी युक्ति करून पटेलसें केलें पाहिजे. अशा कांहीं युक्त्या करायला किंवा खरोखर तिच्या स्वभावांत काय गोम आहे तें समजून यायला पुण्यांतल्या घरापेक्षां आमच्या गांवींच आम्हांला जास्ती सोईचें पडलें असतें हें उघड आहे; तेव्हां तिनें आमच्याबरोबर यावें असें मला

कां वाटत होतें हें उघडच आहे. तरी पण माईसाहेब मध्यंतरीं कांहीं विघ्न आणतात कीं काय याचें मला भय पडलें होतें. पण ज्या कारणानें त्यांच्यावर इतर सर्व गोष्टींत उदासीनता आली होती, त्याच कारणानें यांतहि विशेषसें मन घालावेंसें त्यांस वाटलें नाहीं म्हणून म्हणा, किंवा त्याचें त्यांनाच ठाऊक अशा कांहीं कारणानें म्हणा, पण त्यांनी आमच्या कोणाच्याहि जाण्यामध्यें खो घालण्याचा यत्न केला नाहीं, आणि बाबांनीं आम्हांबरोबर एक गडी दिला आणि आम्ही तिघेंहि एकदाचीं आमच्या गांवीं जाण्यास निघालों.

◆ ◆ ◆

## ६२ : आमचें आजोळीं जाणें

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

लहानपणीं ज्या ठिकाणीं आपण खेळ खेळलों, किंवा पुढें कितीहि काळ लोटला तरी ध्यानांत राहतील अशा कांहीं गोष्टी ज्या ठिकाणीं घडल्या असतील, अशा जागा फार वर्षांनीं पुनः पाहिल्या म्हणजे मनाला काय वाटतें आणि काय नाहीं याचा अनुभव ज्याला असेल, त्यालाच त्याची कल्पना करतां येईल, किंवा दुसऱ्या कोणीं वर्णन करून सांगितलें तर त्याचें मर्म जाणून मान डोलविली जाईल. सगळ्या देशभर जरी किती सुधारणा होऊन आगगाड्या वगैरे झाल्या, तरी आमच्या गांवचा रस्ता जशाचा तसाच अनादिसिद्ध होता! त्यांत म्हणून कांहीं फरक झाला नाहीं. यामुळें मागें एकदा वर्णन केलेल्या आमच्या प्रवासांतील सर्व कांहीं गोष्टी आम्हांला आठवून मी व दादा एकमेकांना त्या सांगून आणि हसत हसत व त्याच वेळीं आईची आठवण झाल्यामुळें दुःखाचे उद्गार काढीत आम्हीं प्रवास केला. मध्यें एकदा दादाच्या चुकण्याची वगैरे गोष्टी सांगून मीं वहिनीला सहज म्हटलें, " असा आहे बरं का वहिनी, तुझा नवरा गुणी ! " तेव्हां ती तिथल्या तिथेंच चांगली धिटाईनें दादाकडे पाहून कशी म्हणते, " मला आचरटाला कशाला सांगतां हें वन्सं ? मी तर साऱ्या मुलखांतली आचरट ! " हें ती कोणत्या गोष्टीला उद्देशून बोलली हें मीं तेव्हांच तरकलें; पण लागलीच दाखवतें आहें कशाला ? मी आपली जणू काय न समजूनच म्हटलें, " का, तूं आचरट असायला काय झालं ? चांगली आमच्यासारखीच तर आहेस. आणखी आचरट कशानं झालीस ? "

" आचरट व्हायला कांहीं व्हावं का लागतं ? मुळींच नाहीं. मूळचंच असतं तें बरं का अन् मी किनई वन्सं, कधींदिखील चांगली व्हायची नाहीं हो ! " दादा धडधडीत तेथें आमच्याजवळच गाडींत असतांना तिनें एवढ्या धिटाईनें बोलणें चालविलें आणखी तेंदेखील त्याला न् मला अगदीं खोचून, तेव्हां तिच्या स्वभावाची माहिती करून घेणारी मी तर अगदींच बुचकळ्यांत पडलें. चार दिवसांपूर्वी आम्ही दोघें एका ठिकाणीं

बसून जें बोललों तें हिनें ऐकिलें व पक्कें मनांत ठेवून योग्य संधि पाहून भीड न धरतां स्पष्टपणें बोलून दाखविलें; तेव्हां हें आचरटपणाचें लक्षण कीं दुसरं कांहीं आहे ? असा प्रश्न मनांत उभा राहणें साहजिकच होतें कीं नाहीं ? मला तर आतांच्या तिच्या वर्तनावरून ती फार खोल मनाची, आंतल्या गांठीची असून कांहीं ना कांहींतरी निरनिराळ्याच गोष्टी तिच्या मनांत असाव्या असें दिसलें. इतक्या सगळ्या आमच्या बोलण्यांत दादानें मुळींच मन घातलें नाहीं. उलट तें तिचें शेवटलें बोलणें ऐकून त्यानें गाडीखालीं उडी टाकून पायानें चालण्याचा क्रम चालविला. मीं त्याला नको नको म्हणून पुष्कळ सांगितलें, पण तो कुठला ऐकायला ? तो उतरल्यावर आम्ही दोघीच गाडींत होतों. गडी पायानें चालत होता.

ही संधि बरी आहे असें समजून मीं वहिनीला म्हटलें, " वहिनी, आतां कांहीं तूं लहान नाहींस, तुला एवढं कळूं नये, कीं दादाला तूं आणखी तुला दादा, आणि दुसरं कांहीं कोणी एकमेकांला नाहीं म्हणून ! "

" अहो, मला आचरटाला काय समजणार, वन्सं ! हें काय तुम्ही असं विचारतां हें ! " ती खोंचून पुनः म्हणाली.

मीं तिच्या त्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. आपलें पुढे म्हटलें, " अग, त्याचं मन कसं आहे तुला ठाऊक नाहीं. अन् माईच्या सांगण्यावरून तूं आमचं दोघांचं बोलणं आडून ऐकायला उभं राहावंस ? "

तें ऐकण्याबरोबर भिवया वगैरे चढवून व डोळे वटारून ती म्हणते, " काय ? कोणाच्या सांगण्यावरून मी उभी होतें ? आणखी कुठें ? "

" ते दिवशीं नव्हतीस उभी जिन्यांत आम्ही दादाच्या माडीत कांहींबाहीं बोलत होतों तेव्हां ! कुणीं सांगितलं होतं उभं राहायला ! माईसाहेबांनीं ना ? "

" ज्या कुणीं सांगितलंसं तुम्हांला वाटेल त्याच्या सांगण्यावरून उभी होतें; मग तर झालं ? "

" मग तें चांगलं का ? काय काय ऐकलंस तूं ते दिवशीं ? "

" जे ऐकलं तेंच ! "

" सारं जाऊन सांगितलंस माईपाशी ? "

" हो; त्यांनीं जर मला तिथें उभीच केली होती तेवढं ऐकण्यासाठीं म्हणतां, तर मग सांगितल्यावांचून कशी राहीलें असेन ! "

हीं उत्तरें कांहीं आचरट माणसाचीं खास नव्हेत, हें तर मला कळून चुकल्यासारखेंच झालें परंतु कळून आल्यावर अर्थातच—तर मग हें आहे तरी काय ? असें वाटणें साहजिकच होतें आणि त्याचप्रमाणें मला वाटलेंहि. त्याचप्रमाणें ही ते दिवशीं आमचीं बोलणीं ऐकण्याला उभी राहिली होती, ती कांहीं माईसाहेबांच्या सांगण्यावरून नसावी असेंहि मला वाटलें व त्या विचारांत मी होतें; इतक्यांत दादा पुढें चालला

होता तो मोठयानें मला म्हणतो, " यमे, ही झाडी पाहिलीस का ? आठवतंय् का इथें काय झालं तें ? आतांदेखील तसा बुआ येणार आहे बरं का ' " असें म्हणून तो मोठयानें हसला, आणखी मीहि त्याबरोबर हसलें व त्याच्याशीं बोलूं लागलें. मला सगळी आपली त्या दिवसाची हकीकत आठवली आणि आतांदिखील किंचित् भय वाटूं लागलें. असो.

असें करतां करतां आम्ही आपल्या गांवीं जाऊन तर पोंचलों. पहिले दिवशीं अगदीं संध्याकाळींच जाऊन पोंचल्यामुळें आजीच्या व आमच्या भेटीपलीकडे कांहींएक झालें नाहीं. आजोबांना मीं पाहिलें तेव्हां मला कसेंसेंच वाटलें. ते अगदींच खंगल्यासारखे दिसले; तरी पण बोलण्याचा खणखणीतपणा वगैरे कांहीं कोठें गेला नव्हता. आजीहि त्यांच्या काळजीमुळें म्हणा किंवा इतर कांहीं काळज्या तिच्या मनांत असल्या तर त्यामुळें म्हणा, पण तीहि अगदीं वाळल्यासारखी दिसत होती. आम्ही तिघेंहि तेथें जाण्याबरोबर तिला मोठा आनंद झाला, हें सांगायला कशाला पाहिजे ?

वहिनी तेथें आतां पहिल्यानेंच आली होती. तेव्हां तिला काय वाटलें असेल तें असो, पण आम्हांला फार आनंद झाला. कमीपणा काय तो एकच दिसला. तो एवढाच, कीं तिकडून बरोबर येणें व्हायला पाहिजे होतें. तें झालें असतें म्हणजे मग आमच्या सुखाला कशाची वाण नव्हती !

लहानपणाच्या कितीतरी गोष्टी आतां आम्हांला आठवल्या म्हणतां ? ती कुशी, आता कुठें आहे ? तर तिचें लग्न होऊन कुठं हैदराबादेच्या पलीकडे तिच्या नवऱ्याला चाकरी होती तिकडे गेली आहे. तिला चार मुलें झालीं आहेत. पहिलें मूल तेरावे वर्षीच झालें. ती अमकी कुठें आहे ? तर तिला बाळंतपणांत वायु होऊन वारल्याला चार वर्षें झालीं. ती तमकी ! तिचा नवरा मरून ती आतां आपल्या दिराजवळ स्वयंपाक करून असते. अशा अनेक लहानपणच्या त्या गांवांतल्या ओळखीच्या मुलींची चौकशी करतां मला वर सांगितल्या तऱ्हेच्या बातम्या लागल्या. तेव्हां त्यापासून निरनिराळ्या तऱ्हांनीं माझ्या मनावर काय परिणाम झाले व प्रत्येकीची हकीकत ऐकून माझ्या मनांत काय काय विचार आले, इत्यादि सर्व सांगत बसलें तर हें प्रकरण किती वाढेल आणि किती नाहीं याचा नेम नाहीं. शिवाय त्यांत कांहीं सर्वांना कळल्यापासून फायदा होण्याजोगें असें असेलसेंहि मला वाटत नाहीं. तेव्हां माझें मन त्या मुंबईतील मैत्रिणींच्या, तिकडच्या व अंशतः दादाच्याहि वेळोवेळींच्या उपदेशांनीं जसें नवीन तऱ्हेचें झालें होतें, त्याला अनुसरूनच त्याचे विचारहि होते, एवढेंच सांगितले म्हणजे चतुर वाचक तेव्हांच समजतील. एखादी बाळपणींच विधवा झाली तर तिच्यावर...पण नकोच तें. माझ्यानें पुरें लिहवेलसेंहि वाटत नाहीं. तेव्हां एव्हांशींच त्या भानगडींत मी पडत नाहीं. हें चरित्र माझ्या हातून पुरें झाल्यास सर्व प्रकार येतीलच. कर्मकथा जर पुरी सांगायची तर मग तें कां टाळूं ? पण आतां पुढें लिहवत नाही; तेव्हां हें प्रकरण असेंच वेडेंवाकडें पुरें करतें......

◆ ◆ ◆

## ६३ : वहिनीचें आणि दादाचें पटावें कसें ?

* * * * * * * * * * * * * * * * * * *

वहिनीचें आणि दादाचें पटावें कसें ? हें मला पडलेलें गूढ आतां उकलण्याला काय काय युक्त्या कराव्या या विचारांत मी होतेंच. ती आचरट असावी ही आपली केवळ भ्रांति असा माझा पक्का ग्रह होत चालला. जर ती आपली भ्रांति, तर मग तिचा स्वभाव खरोखर कसा असेल, हा प्रश्न आलाच ! ती आतां कांहीं लहान नव्हती. निदान आपल्या हिंदु कल्पनेप्रमाणें तरी लहान नव्हती. आणि कळण्यासंवरण्याच्या कामांत तरी निदान ती आतां लहान नव्हतीच असें मला वाटलें. दादाला आपण व आपल्याला दादा याखेरीज आपल्या मायेचें असें आपणांस कोणी नाहीं, हें तिनें जाणून असूं नये, ही मोठी आश्चर्याची गोष्ट असें मला वाटत असे. आजीकडे आम्हीं तिघांनींच येण्यांत फायद्याची गोष्ट आहे अशी जी मला वाटली ती, तिला समजुतीच्या दोन गोष्टी सांगण्याची संधि मला मिळावी ही होय, हें मीं वर सांगितलेंच आहे; पण आतां त्याला सुरुवात कशी करावी हेंच मला समजेना.

तिला कांहीं बोललें संवरलें, कीं तिनें कधीं सरळ उत्तर म्हणून देऊंच नये असें थोडे माझ्या अनुभवास येऊं लागलें. तिला कांहीं विचारायला जा, तिनें कपाळाला आंठ्या घालून तोंड अगदीं आंबट करून " मला काय ठाऊक ! " असें उत्तर दिलें म्हणून समजावेंच. आनंदाची कळा तिच्या तोंडावर कधीं दिसली नाहीं; संतोष तिच्या गांवींहि नाहीं. या गोष्टी मला माहेरीं असतांना कधीं फारशा दिसल्या नाहींत. कारण एक तर मीं माहेरीं फार थोडे दिवस असायची, आणि त्यांत मी तेथें असलें म्हणजे प्रथम प्रथम ती नवी नवरी म्हणून दिवस नेले. पुढें सासू सावत्र, फार छळते, अशामुळें तसे असेल, अशा समजुतीवर गेलें; पण आतां तशांतला कांहीं प्रकार नसून जेव्हां बागणूक तीच, तेव्हां काय ? मूळ स्वभावांतच कांहींतरी गोम असली पाहिजे हें उघड आहे, असें झालेंच.

आजीच्यादेखील ही गोष्ट लक्षांत आली असावी असें दिसलें. कारण तिनें एक दिवस बोलतां बोलतां दादाला म्हटलें, " गणू, बायको नाहीं बाबा तुला चांगली मिळाली, कसं होईल तुझं तें होवो ! " पण वहिनी जवळच भिंतीपलीकडे उभी होती, हें मी जाणून होतें, तेव्हां उगीच तिनें ऐकून तिला बरें वाटावें म्हणून म्हटलें, " चांगली नाहीं तर काय झालं ग, आजी ? चांगली आहे. कामबीम करण्यांत कशांत तरी कमी आहे वं ती ? " असें म्हणून मीं तो शब्दच फिरवला व दुसरें कांहीं तरी काढलें.

मला येथें येऊन सुमारें आठ दिवस झाले. पुण्याचें पत्र आलें, त्यांत विशेष असें कांहीं नव्हतें. नेहमींची रडकथा चालू होती. उमामामीची प्रकृति बरी आहे वगैरे

लिहिलें होतें. दुर्गीची हकीकत कळविणारे आतां दुसरें कोणी नव्हतेंच, तेव्हां तिची हकीकत मला कशानें कळणार ? तिच्या नांवाचें पत्र लिहून कांहीं विचारावें तर तें कसें काय दिसेल याची शंका. मुंबईच्या मैत्रिणींपैकीं कोणाचें कांहीं पत्र नाहीं. असो.

मीं मागें सांगितलेंच आहे, कीं आजोबांची प्रकृति बरीच क्षीण होत चालली होती, यामुळें आजीचा बहुतेक वेळ त्यांच्या शुश्रूषेकडेच लागे. घरांतलें इकडे तिकडे करणें तें आम्हीच दोघी करूं. त्यामुळें आणखी प्रसंग येऊन पावलोपावलीं मला वहिनीच्या स्वभावाची माहिती होऊं लागली. तिचा तिरसटपणा, कुरठेपणा विशेष दिसून येऊं लागला. जितका दादा आनंदी, तितकी ही खिन्न; तो जितका मनमिळाऊ, तितकी ही त्रासिक; त्याला माझ्याशीं बोलण्यासंवरण्याची जितकी आवड तितका तिला तिरस्कार; या गोष्टी तर आतां मला अगदीं उघडच झाल्या. असें कां, याचें कारण मात्र माझ्या लक्षांत येईना. आम्हां दोघांना कांहीं वाचतांना अगर आनंदानें हसत खेळत असतांना तिनें पाहिलें, कीं तिच्या कपाळाला आंठ्या चढल्याच म्हणून समजावें. माझी मोठी हौस, कीं तिनें, मीं आणखी दादानें खुशाल एका ठिकाणीं बसून एकमेकांचा विनोद करीत, हसत खेळत वेळ घालवावा. त्यासाठीं मीं एकदोनदा तिला आम्हीं बसलों होतों तेथें बोलावलेंहि; पण ती मुळींच येईना. एकदोनदां ओढून आणण्याचा यत्न केला, पण तिनें डोळेबिळे फिरवून अगदीं "मला नाहीं हो असलं आवडत! हें हो काय वन्सं! तें तुमचं तुम्हांलाच शोभतं. आम्हांला कशाला गरिबाला ?" असें म्हटलें. एकदा, "वहिनी, अग, असं काय करतेस ? दादाच्या मनांत जर तूं ल्याहायवाचायला शिकावंस असं आहे, तर तूं कां शिकत नाहींस हळूहळू ? कांहीं—"

पण ती मला मधेंच म्हणते, "हो; मी आतां पुण्यास गेलें कीं नाहीं, म्हणजे काय तें म्हणतात नाहीं हैस्कूल कीं फैस्कूल, त्यांत जाणार आहें. म्हणजे बरी आपली एव्हां-पासूनच संवय होईल, साहेबमडमांत बसायबोलायची !" अशीं उत्तरें देणें हें कांहीं अज्ञानाचें लक्षण खास नव्हे. बरें, तिला सर्व गोष्टी कळून ती अशी वागते म्हटलें, तर तितकें तिचें वय नव्हतें. तेव्हां हें आमच्या वन्संच्या वळणावरचें खटलें दिसतें असें मला वाटूं लागलें. परंतु खात्रीलायक असें समजून कांहीं म्हणतां येईना.

वरील बोलणें जे दिवशीं झालें ते दिवशीं तर मीं दादाजवळ तें सांगितलें नाहींच पण चारसहा दिवसांनीं सहज सांगितलं, तर त्या वेळीं त्याला अतोनात राग आला. "तुला मीं कितीदा सांगितलं यमे, पण तूं कांहीं ऐकत नाहींस तें नाहीं. मीं तुला सांगितलं ना ? काय तुझं ह्या भानगडीवांचून अडलं आहे बरं ? अग, शितावरून भाताची परीक्षा ! असा तुझा पाणउतारा झाला, आतां तरी दे नाद सोडून ! असल्या माणसाचं... मीं तर पाहीन पाहीन आणि शपथच वाहीन पुनः नांव घ्यायचं नाहीं म्हणून. तुला असं म्हणावं ?" त्याचा हा अतिशय राग पाहून मला मात्र अगदीं चोरट्याप्रमाणें झालें. मी बोललें कुठची ? असें होऊन पुनः वहिनी असें कांहीं बोलल्यास आपण दादाला

यत्किंचित्‌हि सांगायचें नाहीं, असा पक्का निश्चय केला. चांगलाच कानाला खडा लावून घेतला म्हणा ना ? बरें तर बरें, नाहींतर एखादे दिवशीं त्यानें रागाच्या भरांत भलतीन् सलतीच शपथ वाहून घेतली, तर काय करतां ?

याप्रमाणें वहिनीबाईचा एकंदर तालामाला पाहिल्यावर अर्थातच मला तिच्याशीं जितक्यास तितकेंच वागणें प्राप्त झालें. येथें येण्यापूर्वी तिच्यापासून तिच्या मनांत काय आहे तें काढून घेऊन तिचा स्वभाव सुधारण्याचा विचार अर्थातच आतां थोडा थोडा दूर होत चालला; तरी पण मी अगदींच निराश झालें असें नाहीं. मधून मधून यत्न चालवावा, एखादे दिवशीं एखादी गोष्ट ऐकण्यासाठीं म्हणून तिला आणून बसवावें, पण तें कांहीं नाहीं, तिचें आपलें तेंच खरें. शेवटीं आपल्या मनाचा एक दिवस पुरा निश्चय करून मीं तिला एकीकडे नेलें आणखी म्हणलें, " वहिनी, तूं अशी मनांतल्या मनांत कुरटून त्रासिकपणा कां करतेस ? अग, तुझ्या नणंदा आम्ही दोघीच. सुंदरी न् मी. दादासारखा नवरा; आणखी तूं असं वागावंस ? कां असं करतेस ? तूं जर असं वागूं लागलीस, त्याच्या मनाप्रमाणें कांहींच करीनास, तर मग पुढें व्हावं कसं ? एवढं तुझं तुला समजूं नये बरं ? अग, नवराबायकोमधे जर एकाचं तोंड इकडे व दुसऱ्याचं तोंड भलतीचकडे असलं तर व्हावं कसं ? विचार कर बरं. आज पटत नाहीं, उद्यां जुळत नाहीं, असं जर नेहमीं होत गेलं तर मग काय ? कांहींच कधीं नीट व्हायचं नाहीं. वहिनी ! उद्यां तुं संसार—"

" अहो वन्सं, आमचा कसला आला आहे संसार ?—"

" हें ग काय वेड्यासारखं बोलतेस ? झाले गेले का अगदीं तुमच्या संसाराचे दिवस ? "

यावर कांहींच न बोलतां तिनें फक्त तोंड वांकडें करून मान हालविली. मग थोड्या वेळानें कपाळाला आंट्या घालून म्हणते—

" बरें पण, त्याच्याबद्दल वाद कां ? मी वाईट आहें ना ? एकदा कळलं, आतां काय त्याचं ? "

" कोणीं तुला वाईट म्हटलं ? "

" म्हणायला कोण पाहिजे ? जें आहे, त्याला कोणीं म्हणायलाच पाहिजे असें नाहीं ! "

" भलतंच एखादं; असं कां तूं बोलतेस ? "

" आहेंच जर मी वाईट, मी आचरट, मी......"

" पुरे, पुरे. अशानंच तर सारं बिघडतं. "

" त्यांत काय बिघडायचं आहे ? अहो वन्सं, कुत्र्याचं शेपूट बारा वर्सं जरी नळींत घालून ठेवलं तरी सरळ व्हायचंय् का कधीं ? "

" वहिनी, असं खोचून बोलण्यांत काय बरं आहे ? अग, अजून तू दादाचं मन ओळखलं नाहींस. त्याच्याइतका मायाळू......"

" पण मी नाहीं का म्हणतें आहें, वन्सं ? तुम्ही तरी कां उगीच हें करतां ? मी म्हणतें कीं सारीं चांगलीं आहेत; मीच बरीक वाईट ! "

" अग, आतां उद्यां त्याला चाकरी लागून तो कुठें......"

मी पुढें कांहीं बोलणार तोंच ती चमत्कारिक तऱ्हेनें, मनाला लागण्याजोगें हसली आणखी म्हणते, " या जन्मीं तर कांहीं दिसत नाहीं. " ते शब्द ऐकण्याबरोबर मी अगदीं थक्क झालें. वहिनी लहान, तिला समजत नसल्यामुळें ती असें सारें करते, निवळेल पुढें, ही जी काय भ्रांति होती, ती त्या शब्दांच्या झटक्यानें अगदींच पार निघून गेली. तिची मूर्ति लहान असली, तरी तिचें मन कांहीं सामान्य नाहीं, अशी पक्की खात्री झाली. वरील बोलणें कांहीं पोरपणाचें नव्हे, पोक्तपणाचें आहे; हें पक्कें लक्षांत येऊन मी क्षणमात्र स्तब्ध होऊन बसलें. तथापि खरें खरें आहे काय, हें पाहण्याच्या उद्देशानें मीं आणखी पुढें म्हटलें— ' कां ? इतक्यांत जन्माचं तें काय तुला कळलं ? इतकी अगदीं... . "

" अहो, कळायच कळायचं तें काय ? अजून परीक्षेला तरी..."

आतां ती पुढें काय बोलणार तें ऐकण्यासाठीं मीं अतिशय उत्सुकतेनें आपले कान पुढे केले होते. पण तितक्यांत दादानें " यमे यमे " म्हणून मला हांक मारली. त्यामरशीं ती गप्प राहिली. दादानें आणखी हांका मारल्याबरोबर मी गेलेंच. पण आतांच्यासारखी अद्वितीय संधि पुनः मिळणार नाहीं, असें पक्कें वाटून मला फार वाईट वाटलें. कारण, कांहीं कारणानें म्हणा, पण आज तिचें मन थोडेंसें खुलें होतेंसें वाटलें, तोंच मध्यें हें विघ्न येऊन तें तितकेंच राहिलें.

तथापि ती जेवढें बोलली, तेवढें विचार करून पाहण्याजोगें होतें व त्यापासून तिच्या मनांत काय आहे, तिचा हेतु काय वगैरेहि समजण्यासारखें होतें; आणि त्याप्रमाणें मीं आपल्या मनांत ते दिवसापासून तिच्या स्वभावाविषयीं खरें खरें अनुमान करून ठेवलेंच व दिवसानुदिवस तेंच पुढें दृढ होत जाऊन माझ्या सुदैवानें खरेंहि ठरलें. पुनः कांहीं वहिनीशीं तसें बोलून तिचें मन काढून घेण्याची मला संधि मिळाली नाहीं. आणि खरें म्हणाल, तर मीं ती मिळविण्याबद्दल खटपटहि केली नाहीं. कारण मला त्यांतलें ईंगित काय होतें तें समजून आल्यासारखें झालें. असो.

◆ ◆ ◆

## ६४ : दादाचा पुढील बेत

* * * * * * * * * * * * * * *

एक दिवस संध्याकाळीं मी आणखी दादा घराच्या बाहेर चांदण्यांत गप्पा मारीत बसलों होतों. आमच्या गप्पा अमुकच विषयावर चालल्या होत्या असें नाहीं. कांहीतरी चालल्या होत्या. कुठें मुंबईतल्या आमच्या राहण्याच्या, कुठं तिथल्या मंडळींच्या, कुठं दुर्गीच्या, कुठं माईसाहेबांच्या, आमच्या शंकरमामंजींच्या, वगैरे वगैरे. शंकरमामंजींची निंदा करून हसावें, दुर्गीच्या वाईट स्थितीबद्दल बोलून खिन्न व्हावें, मुंबईतील गोष्टी काढून आनंदावें, असें चाललें असतां दादा मला एकदम म्हणाला, " यमे, तुला ठाऊक आहे का माझा काय बेत आहे तो ? आणखी माझी परीक्षा उतरली तर मी कांहीं कॉलेजबिलेजांत नाहीं जाणार ! "

" म्हणजे ? दादा, मग परीक्षा झाल्यावर काय करणार ? " वहिनीचे ते शब्द आठवून मीं एकदम त्यास म्हटलें.

" काय करणार ? " तो गंभीरपणानें मजकडे पाहात एवढेंच म्हणाला व अगदीं स्तब्ध बसला.

मला कांहींच उमज पडेना. हा म्हणतो आहे काय ? याचा हेतु काय कांहीं ध्यानांत येईना. तो वरील शब्द बोलला त्यापुढें कांहीं न बोलतां गंभीरपणानें फक्त मजकडे पाहात बसला. मीहि त्याच्याकडे पाहात विचार करीत बसलें होतें, कीं हें आहे तरी काय ? आपली पहिली परीक्षा झाली म्हणजे पुढें कॉलेजबिलेजांत जायचें नाहीं असें हा म्हणतो, याचा अर्थ तरी काय ? असें मला वाटूं लागलें. या परीक्षा चांगल्या झाल्या नाहींत, यानें शिकणें तेव्हांपासूनच सोडून दिलें, तर याचें पुढें कसें व्हावें ? याला चांगली चाकरी कशी लागावी ? बरें कॉलेजांत वगैरे जायचें नाहीं, तर हा काय करणार ? हा काय चाकरी धरणार आतांपासून ? तसें केलें तर आतां याला दहाबारांच्या पलीकडे कोण चाकरी द्यायला बसलें आहे ? असे विचार माझ्या मनांत आल्याकारणानें मीहि बराच वेळ स्तब्ध बसलें, परंतु असें किती वेळ चालणार ? थोड्याच वेळांत मी कांहीं बोलणार तों तोच मला म्हणतो, " यमे, तूंच पाहा. अग, माझ्या मनांत ज्या तऱ्हेनें वागायचं आहे, त्या तऱ्हेनें वागायला मला घरांत कधींतरी सांपडणार आहे का ? मी म्हणतों, वागायचं एक असो, पण मला बोवा आतांशा घरांत एक क्षणभरदेखील कांहीं करमत नाहीं. घरांत आलों, कीं बंदिखान्यांतच आल्यासारखं होतं. तेव्हां माझा आपला असा पक्का निश्चय झाला आहे, कीं जितकं करून लवकरच स्वतंत्र होतां येईल तितकं करायचं. बाबा आतांशा कांहीं बोलत नाहींत, पण माईसाहेब सहा कीं सात महिन्यांच्या पूर्वीच त्यांच्याजवळ म्हणत होत्या ' हा एवढा थोरला झाला, अजून परीक्षेलादिखील जात

नाहीं, यामुळें विहिणी ठोंसरे देतात.' बाबा त्याच्यावर कांहीं फारसे बोलले नाहींत, पण एकच शब्द थोडया वेळानें बोलले. तो माझ्या मनांत अगदीं भिनून राहिला आहे." इतकें म्हणून तो स्तब्ध बसला.

परंतु अतिशय उत्कंठेनें मी त्याला म्हणालें, "काय ? काय म्हणाले ?"

"नाहीं विशेष नाहीं; ते म्हणाले, तें साहजिकच आहे."

"नाहीं पण काय म्हणाले ?"

"म्हणायचं काय?" ते म्हणाले "झाली, त्याची एखाददुसरी परीक्षा, तर देईन कुठेंतरी लावून असामी झालें. आणखी काय म्हणतात ?"

"तुला लागलीच चाकरी लावून देणार ते ?"

"हो !"

"आणखी इतक्यांतच ?"

"असें ते म्हणाले."

"पण इतक्यांत चाकरी म्हणजे लागेल दहाबारांची."

"ती तरी मिळूं दे म्हणजे..."

"पण दादा, असं कसं बरं बाबांनीं करावं ?"

"त्यांचं त्यांना ठाऊक ! पण यमे, माईसाहेबांचीन् त्यांचीं माझ्याबद्दल बोलणीं व्हायचीं ती कांहीं पहिलीच खेप नव्हे खास. पुष्कळदा झालं असावं बोलणं त्यांचंन् तिचं माझ्यावरून." वरील सर्व बोलणें होऊन तो पुनः थोडासा स्तब्ध बसला. मीहि स्तब्ध बसलें. माझ्या मनांत वहिनीनें अर्धवट उच्चारलेले शब्द येऊं लागले व या किंवा असल्या कांहीं माईसाहेब आणखी बाबा यांच्यामध्यें झालेल्या बोलण्याचा व तिच्या बोलण्याचा संबंध असावा, असें एकदम माझ्या मनांत आलें. तिनें अशीं बोलणीं ऐकल्यामुळें तिला वाईट वाटून तर नसेल ना ती असें करीत ? शिवाय तिच्या माहेरचीं माणसेंहि आपल्या घरीं नसतील ना कांहीं त्याच्याबद्दल बोलत ? याच्या परीक्षा अजून झाल्या नाहींत याबद्दल क्वचित् बोलणें निघालें असलें, आणखी सासरीं दोनचारदा सासूसासऱ्यांचें तसलेंच बोलणें झालेलें ऐकलें असलें तर तिला वाईट वाटून ती सहज असें करील, असें माझ्या मनाला वाटूं लागलें. तथापि मी त्याच्यासंबंधानें दादाच्याजवळ एक शब्दहि उच्चारायचा नाहीं, असा निश्चय करून तोच काय बोलेल तें ऐकण्यासाठीं स्तब्ध बसलें. हो, आधींच तिचा स्वभाव असा खुनशी व आंतल्या गांठीचा कुरठा, आणखी—आणखी –आतां वेळ आलीच आहे तर बोलतें झालें—मत्सरी असा पडला; आणि त्यांत जर का मी तिच्या चहाडया तिच्या नवऱ्याजवळ सांगतें असें झालें, तर मग सीमाच राहणार नाहीं. या बायकोपासून दादाला सुख होणार नाहीं असें माझ्या मनांत चांगलें वाटूं लागलेंच होतें गेल्या पांच सात दिवसांत; पण तसें होण्याला थोडेंबहुत आपण तर कारण नाहीं ना ? आपलें व दादाचें इतकें अकृत्रिम प्रेम आहे हें तिला पाहवत नाहीं, त्याप्रमाणें आपली स्थिति बरी आहे,

तीहि तिला पाहवत नाहीं, असें तर नसेल ना! असे विचार माझ्या मनांत उभे राहूं लागले. कांहीं केल्या टळेनात व एकदा ते विचार मनांत आल्यावर मागल्या पुढल्या कित्येक गोष्टींचा झोंक मनांत येऊन माझ्या विचारांस बळकटी आणूं लागले. असे असल्यामुळें नवराबायकोच्या बिनुष्टाला आपण आणखी कारण होऊं नये, असें मला वाटूं लागलें. असो.

बराच वेळ बोलण्यावांचून गेल्यावर दादा पुनः मला म्हणतो, " यमे, असं जर त्यांच्या मनांत असलं, तर तुला वाटतं आपण कॉलेजात जाण्याचं ओझं त्यांच्या अंगावर घालावं म्हणून ? सुंदरीचं लग्नच आतां व्हायचं आहे;.तर तिला कसं काय स्थळ मिळणार याची पंचाईत आहे. फार पैसे खर्चूं नयेत म्हणून माईसाहेबांचा लकडा,— अग, आतांशा चाललंच आहे तें हळूहळू. ' आतां कांहीं पेणशील व्हायचं नाहीं कांहीं नाहीं. चार पैसे उरले तर ते आपल्याच हातापायाला पाहिजेत ना ! पोरीच्या पायीं घालून बसायचं आहे ? ' हें पुटपुटणं केव्हां चाललं होतं ठाऊक आहे का ? तूं इथून मुंबईला गेल्यावर आजी एक दिवस तुला बुगड्या देण्याविषयीं कांहीं कुठें बोलली वाटतं — यावरून आजी गेल्यावर निघालं होतं हो हें ! अशी जर स्थिति आहे, अन् त्यांत माझ्या तर्काप्रमाणें खरोखरीच जर का हे दागिने गेले असले, तर मग काय ? सारं चक्कच झालं ! "

इतकें बोलून तो पुनः थांबला. मी आपली बुचकळ्यांत पडलें होतें. माझ्या मनांत नाना तऱ्हेचे विचार येत होते. पण इतक्यांत तोच मला पुढें म्हणतो, " यमे, मी म्हणतों तसंच नाहीं का तुला वाटत ? "

" हो, वाटतं तर काय झालं ? " मी काय बोलतें, आणखी काय उत्तर देतें हें माझें मलाच कळून आलें नाहीं.

तें जाणून तो मला म्हणतो, " तुझं लक्ष आहे कुठें ? खरंच सांग, तुला नाहीं खरं वाटत मी काय म्हणतों तें ? तूंच सांग बरं, अशी स्थिति असून आपण त्यांच्यावर आपलं ओझं लादावं का ? शिवाय किनई यमे, तूं कांहीं आतां इतरांच्या बहिणीसारखी नाहींस. तुला साऱ्या गोष्टी समजतात संवरतात, म्हणून तुला सांगतों. हें बघ, आतां या परीक्षाबिरीक्षांत माझ्यासारख्याला कांहीं अर्थ नाहीं. तुझ्या नवऱ्यासारखा विलक्षण हुशारच माणूस असला तर गोष्ट निराळी. पण आमच्यासारख्याला एक तर टक्केटोणपे खाल्ल्याशिवाय परीक्षा होत नाहींत; तेवढें करून चार पांच वर्षांनीं एकदा झालों बी. ए तरी त्याच्यापासून फायदा काय ? तीसचाळिसांची कुठें जागा मिळाली तर, नाहीं तर पुढें आणखी कांहींतरी... तें नव्हेच म्हणून मीं आपला वेगळाच विचार केला आहे. "

" तो काय ? " हा प्रश्न मीं केला खरा, पण कांहीं फार आतुरतेनें केला नाहीं, कारण येऊन जाऊन दहापंधरांची चाकरी धरणार असेंच सांगणार कीं नाहीं तो ? असे माझ्या मनांत आलें आणि तसें त्याचें करणें मला तर यत्किंचित्‌देखील मानवेना. निदान

शें-पाऊणशें रुपये दरमहा तरी त्यानें मिळवावे तर कांहीं बरें होईल, असें मला वाटत होतें. त्यामुळें मीं आपला तो कसा तरी प्रश्न विचारला. पण त्यानें मला ताबडतोब उत्तर दिलें : " तो एवढाच, कीं परीक्षा होण्याबरोबर वकिलीच्या परीक्षेचा अभ्यास करायचा. ती दोन वर्षांनीं झाली तर चांगलं होईल. कुठेंतरी वकिली करावी, आपला स्वतंत्र धंदा, पुनः थोडेबहुत पैसे मिळतील."

तें ऐकण्याबरोबर माझें मन थोडेंसें हुशार झालें; पण जास्त कांहीं न बोलतां तो पुढें काय म्हणतो तेवढें मीं ऐकण्यासाठींच म्हटलें " हं ! "

तो मग पुढें म्हणतो, " माझ्या मनांत आहे तें एवढंच, कीं मुंबईस तुमच्याजवळ येऊन राहून, रघुनाथरावांच्या हाताखालीं अभ्यास करावा. त्यांचा तोच अभ्यास व्हायचा आहे. त्यांच्याबरोबर त्यांनीं मलाहि समजून सांगितलं, तर त्यांचं चांगलं होईल, माझा अभ्यास उत्तम होईल. परीक्षा पहिल्या सपाटयास पास होऊन... शिवाय..."

इतकेंच बोलून तो हसला. तेव्हां मीं त्याला " कां काय ? " वगैरे विचारलें पण त्यानें " कांहीं नाहीं, आपलं म्हटलं या तुमच्या मंडळींची ओळख होऊन दिवस मोठे छानदार रीतीनें जातील, " इतकेंच तो बोलला; पण त्याच्या मनांत आणखी कांहींतरी हेतु असावा असें दिसलें. तरी पण माझें मन त्याच्या त्या विचारांत गर्क असल्यामुळें मीं त्यास अधिक कांहीं विचारलें नाहीं. आम्ही त्यानंतर बराच वेळ तसल्याच गोष्टी सांगत व त्याच्या बेताच्या बऱ्यावाईटपणाबद्दल विचार करीत बसलों. होतां होतां रात्र किती झाली हें लक्षांतदेखील आलें नाहीं चांदणें स्वच्छ पडलें होतें. वारा मजेदार सुटला होता. गोष्टी फार महत्त्वाच्या, मग बिचाऱ्या वेळाचें स्मरण कोणाला होणार ? पण शेवटीं आजीनें हांक मारून, " अरे, आहे काय आज ? बारा वाजून गेले तरी तुम्ही करतां आहां काय ? " असें ती म्हणाली, तेव्हां आम्ही उठलों व आंत जाण्यास निघालों. दादा पुढें गेला. मी त्याच्या थोडीशी पाठीमागून गेलें, तों डाव्या बाजूला वळचणीजवळ कांहीं खजबजलेंसें मला वाटलें; मी आतां 'कोण आहे' म्हणून मोठयानें ओरडणार तोंच बांगडया वाजल्याचा मला आवाज ऐकूं आला. मी तेव्हांच तरकलें व पुढेंच झालें. इतक्यांत मागून कोणी येऊन माझ्यापुढें गेलेंहि. मी जाऊन अंथरुणावर पडलें, पण बराच वेळ झोंप आली नाहीं.

◆ ◆ ◆

## ६५ : आजोबांचा मृत्यु

* * * * * * * * * * * * * * *

आणखी सुमारें पांचचार दिवस गेले. आमचा एकंदर क्रम ठीक चालला होता; परंतु आजोबांची प्रकृति जास्ती जास्ती क्षीण होत चालल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. त्यांना तापजाळ कांहीं नव्हता, पण अन्न सुटलें आणि थोडासा खोकला लागलासेंहि झालें

होतें. पण ते अजून आपली स्नानसंध्या कीं एखादे वेळ आसपासच्या गांवीं जाणें कांहीं सोडीनात. पण आतां एकदोन दिवसांत त्यांना विशेषच खोकल्याच्या उमळी येतात असें आम्हांला दिसून आलें.

बाकी ते म्हणून कधीं आपणहोऊन 'मला अमुक होतं' असें म्हणायचेच नाहींत. उलट कोणी त्यांना म्हणायला गेलें. 'तुम्हांला असं होतं आहे तर तुम्ही अमुक करा' म्हणून तर त्यांनीं 'छट्! मला नाहीं कांहीं होत, अंमळ कुठें खोकायला होतंय्, तें ताक प्यालों कीं पार निघून जाईल' असें म्हणायचे; आणखी खरोखरीच ताक शेर दोन दोन शेर प्यायचे! त्याला कसं करणार? म्हातारा विलक्षण हट्टी होता वगैरे मीं मागें सांगितलेंच आहे, तेव्हां त्याला अनुसरूनच त्यांचें वर्तन होतें. खोकल्या-साठीं म्हणून आजीनें कांहीं कुटूनसंवरून काढा करून औषधें द्यावी तीं त्यांनीं 'ह्ये' करून फेंकून द्यावीं; इतकेंच नव्हे तर 'काय चमत्कार आहे पाहा, हिला वाटतं आहे कीं आत्तांच मी मरायला टेकलों आहें. स्वतःसिद्ध व्हायला पाहिजे आहे वाटतं तुला एकदा!" असें म्हणावें आणि हसावें. पण आजी कांहीं कमी बोलणारी होती असें नाहीं. तिनेंहि त्यांना "आतां माझ्या गोंवऱ्या नदीवर चालल्या, आतां मला स्वतः-सिद्धपणा यायचा आहे अन् तेवढ्यासाठीं आपल्याला औषधंबिवषधं देऊन वाटतं... काय तरी बाई! म्हातारपण झालं आतां तरी..."

"कशानं झालं म्हातारपण? आणखी दहा वर्षं तर कांहीं मी मरत नाहीं, समजलीस? येऊं दे मला खोकला काय करतो तें करायला. मी त्याच्या बापाला भीत नाहीं. तुला म्हातारीला जेव्हां वाटे लावीन तेव्हां मग मरेन; मधें मरायचाच नाहीं. मी मरून तुला कांही स्वतःसिद्ध होऊं द्यायचा नाहीं."

"पण हवी आहे कुणाला? तुमच्या डोळ्यांदेखत एकदा होऊं द्या माझा शेवट बरं; दुसरी कांहीं माझी इच्छा नाहीं, समजलांत?"

"मर तर मग लवकर, म्हणजे होईल तसें."

"दहा वर्षं अवकाश आहे ना पण अजून, मग कां आतां घाई?"

"मर लवकर म्हणजे माझ्या पाठीमागें काळजी नको. खरं कीं नाहीं रे पोरांनो?"

अशा तऱ्हेचा त्या वृद्ध दांपत्याचा विनोद केव्हां केव्हां आमच्या दृष्टीस पडे आणखी एकाद वेळ कडाकडीचें भांडणहि पाहायला सांपडे. मग त्या भांडणांत आजोब' काय बोलतील आणि काय नाहीं याचा नेमच नव्हता त्याचे मासले मागें आलेच आहेत. असो. अशा तऱ्हेनें दिवस चालले होते. परंतु रोज थोडें थोडें होतां होतां दुखणें पांचसहा दिवसांत बरेंच वाढून एक दिवस त्यांना अंथरुणांतून उठवेनासें झालें. तेव्हां मात्र आजी घाबरली आणि तिनें बाबांस पत्र लिहिण्यास सांगितलें. दादानें त्याप्रमाणें लिहिलेंहि. दुसरे दिवशीं खोकल्यानें फारच उचल घेतली आणि त्यांस अंथरुणावरून

पलीकडे होण्याची पंचाईत पडूं लागली. पण तितक्यांत म्हातारा आंघोळ करण्यासाठीं अगदीं कासावीस झाला. मधेंच खोकल्याची उमळ यावी, उठून बसून टेकायला ठेवलेल्या वळकटीवर डोकें टेकावें; पुनः थोडेंसें वर डोकें करून पण आम्हांला शिव्या देत " आंघोळ घाला, मला संध्या–पूजा करूं द्या, नाहीं तर तुमच्या टाळक्यांत घालतों. ही थेरडी त्यांतच आज मिसळली आहे आणखी. मला उठवत नाहीं म्हणून तुमच्या गमजा, नाहीं का ? " असें संतापून म्हणत. आम्ही दोघांनीं आज तुम्ही आंघोळ करूं नका म्हणून त्यांच्याभोंवती एकसारखा त्रास लाविला होता. त्यांची एकसारखी बडबड चाललीच होती. आम्ही आपल्याकडून त्यांना समजुतीच्या म्हणून गोष्टी सांगतच होतों; पण ते कसले ऐकतात ? आजीला शिव्या द्यायला लागले. शेवटीं तिनेंहि आग्रह धरून एकीकडे रडतबिडत पण त्यांच्या अंगावर पाणी घातलें आम्हीं दोघांतिघांनीं धरून. पण काय ? पाणी घातल्यापासून पाव तासदेखील पुरता गेला असेल नसेल ! जी म्हणतां त्यांना थंडी वाजून आली, ती कांहीं विलक्षणच ! सारें अंग थाड थाड उडूं लागलें. किती पांघरुणें घातलीं, किती अंग दाबलें, तरी त्यांची थंडी म्हणून कांहीं राहीना ! शेवटीं होतां होतां ताप भरला आणि अंगाची काहिली होऊं लागली. संध्याकाळीं ताप अतिशय झाला आणि त्यानें म्हाताऱ्याला अगदीं निपचित पाडलें.

दोनतीन दिवस झाले तरी बाबा येईनात. " तो यायचाच नाहीं. त्याला दया-माया कांहीं नाहीं. मरेनात का माणसें इकडे, त्याला काय ? " अशा तऱ्हेचे उद्गार अश्रुपूर्ण नेत्रांनीं सद्गदित झालेल्या आजीच्या तोंडांतून निघूं लागले. दादानें तिला धीर देऊन पुनः एक पत्र लिहिलें. रात्रीं आजोबांचा ताप नाहींसा व्हावा, पण खोकल्याचा जोर अधिक व्हावा. दिवसां खोकला कमी व्हावा आणि ताप वाढावा; असा प्रकार एक-सारखा चालला होता. दोन दिवस आणखी झाले. आम्ही सारी अगदीं घाबरलों, आजीच्या डोळ्यांचं पाणी खळेना. तिला आतां आजोबांच्या प्रकृतीचा भरंवसा येईना. भरंवसा येईना कसला ? तिची खात्रीच झाली, कीं आतां कांहीं ते जगत नाहींत. एक दिवस रात्रीं ती मोठ्यानें रडूं लागली. मी उठतें तों ही आपली रडते आहे. आजोबा अजून बोलतबिलत साफ. ते वाटतें तिला कुठें म्हणाले, " मी कांहीं या दुखण्यांतून बरा होत नाहीं. " मग काय ! ती रडूं लागल्याबरोबर मलाहि रडूं येऊं लागलें. इतक्यांत, " अग, अशी रडतेस का ? तुझं माझं वय नाहीं का आतां झालं ? मी आधीं कायन् तूं काय ? केव्हांतरी लागोपाठ जायचं. वाईट वाटतं तें एवढंच, कीं पुढें तुझं कसं होईल ? गणू, हिला अंतर देऊं नको बरं का रे माझ्या पाठीमागं." असें कांहीं कांहीं ते बोलतच होते. एकच गोंधळ चालला होता. आणखी असेच दोन दिवस गेले, तरी बाबा आले नाहींत. तेव्हां आम्ही-देखील बाबांना नांवें ठेवूं लागलों. आजोबा फारच घाबरे झाले. एकदा त्यांनीं " आला का ? आला का ? " असा प्रश्नहि विचारला. त्यावर आम्ही काय उत्तर देणार ? शेवटीं, तेच " नाहींच यायचा तो. बरं; नाहीं तर नाहीं, माझा गणू तर आहे ना ? " असें म्हणाले. एक खोकल्याची उमळ आली ती गेली. आणखी पुनः म्हणतात, येऊन जाऊन मला

काळजी काय ती हिची; आतां म्हातारपणीं तिला त्रास...त्रास होऊं...नये झालं... ” होतां होतां त्यांचा शब्द खोल जाऊन पुढें पुढें त्यांच्यानें कांहींच बोलवेनासें झालें. रात्रीं अधिकाधिकच क्षीणपणा येत चालला. हातापायांची आग होते म्हणून खुणेनेंच सांगूं लागले. आजी डोक्याला तूप चोळूं लागली. मी त्यांच्यापाशीं बसलें. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांची फार गडबड उडाली. इतक्यांत बाबा दाराशीं घोड्यावरून उतरले. आंत येऊन पाहतात, तों हा प्रकार. ताबडतोब येऊन उशाशीं बसले. आजीच्यानें राहवेना. ती लागलीच “ दोन दिवस आधीं कांहीं तुझ्याच्यानं येववलं नाहीं ना ? ” असें म्हणाली आणि रडूं लागली. “ रजा मिळेना ” एवढेंच त्रोटक उत्तर देऊन बाबा आजोबांकडे पाहूं लागले. आजोबांनीं डोळे उघडून त्यांचेकडे पाहिलें. “ आलास ?...” असे कांही शब्द उच्चारले आणि तितक्यांत बाबांच्याकडे पाठ करून दुसऱ्या कुशीवर वळले. मरणोन्मुख झाले तरी–देखील त्यांचा पीळ गेला नाहीं. जास्ती जास्ती क्षीणता येऊं लागली. थोडया वेळानें त्यांनीं पुनः बाबांकडे पाहिलें आणि जरा जवळ तोंड करण्यास खुणेनें सांगितलें; नंतर “ गणू , गणू ” असें म्हणाले; त्यालाहि जवळ बोलावलें. नंतर आजीकडे बोट करून अगदीं क्षीण अशा आवाजानें म्हणाले, “ मीं तिला सुख.. नाहीं. तूं कसचा...” असेच कांहीं शब्द बोलले. पुढें त्यांच्यानें बोलवेना. हातखुणा करून सांगायचें, तर तीहि शक्ति उरली नाहीं. “ तुम्हांला कांहीं दूधबीध देऊं का ? ” असें म्हणून मी जरा पुढें झालें, तों नको म्हणून त्यांनीं माझा हात पलीकडे केला, आणखी जे त्यांनीं डोळे मिटले ते शेवटलेच मिटले ! पुनः कांहीं उघडले नाहीत. आम्ही सारीं रडूं लागलों. आजीच्या रडण्याला पारावारच नव्हता !

आतां पुढची कथा मी येथें सांगत बसत नाहीं. पहिल्या दिवसापासून तेरा दिवसांपर्यंत ज्या कांहीं क्रिया आपल्या पद्धतीप्रमाणें व्हायच्या त्या कशाबशा झाल्या. माईसाहेब व त्यांची आई यासाठीं येथें आल्या होत्या. सर्व क्रियाकर्मांतर झाल्यानंतर अर्थातच आम्ही सारीं--आजीसुद्धां पुण्यास आलों. आतां तेथे कोण राहतो ? बाबांनीं तिथली काय व्यवस्था लावायची ती थोडक्यांत लावून पुनः येऊन सर्व नीट व्यवस्था करूं असें म्हणून वारासार केली.

अशा तऱ्हेनें आमच्या पुनः गांवीं जाण्याची हकीकत झाली. आम्ही गेलों कोणत्या हुरूपानें आणि परत आलों कोणत्या स्थितींत ? याचा विचार मनांत येऊन मन किती दुःखित झालें होतें याचा कांहीं सुमारच नव्हता. आजोबांचे आतां दिवसच झाले होते, तेव्हां त्यांचें कांहीं वावगें झालें नाहीं म्हणा; पण तेंच आजी त्यांच्या आधीं डोळे मिटती तर बरें झालें असतें. बाबांच्याजवळ राहण्यापासून तिला सुख होणार नाहीं हें आजोबांच्या मनांत आलेंच होतें. आजीला स्वतःला तर राहून राहून वाटतच होतें, आणखी आम्हांलाहि त्याच्याबद्दल शंका होती असें नाहीं. हें त्या दृष्टीनें फारच वाईट झालें हें उघडच आहे. कसें जरी झालें, त्यांचें आणि तिचें किती जरी भांडण झालें तरी तीं दोघें एकमेकांपासून वेगळीं राहण्याला कधींच खुषी नसत. नेहमीं एकमेकांच्या जवळ पाहिजे,

आणखी आतां हा असा एकदम प्रसंग आला, तेव्हां काय राहिलें ? आजोबा एक दिवस विनोदानें म्हणाले होते तिला, ' तूं स्वतःसिद्ध होण्यासाठीं माझ्या मरणाची वाट पाहाते आहेस ' म्हणून; पण खरोखर ती त्यांच्या राजवटींत जितकी स्वतःसिद्ध होती, त्यांच्या जिवावर त्यांच्याशीं भांडून बोलून तिनें जितका आपला हेका चालविला असेल, त्याच्या शतांशदेखील आतां तिचें कांहीं चालायचें नाहीं. तिला कोणी धड आतां विचारणार नाहीं अशी आम्हांला भीति पडली; आणखी ती अगदीं साधार होती, याबद्दल कांहीं संशय कोणासच यायला नको. माझें व दादाचें यासंबधानें बोलणें झालेंच. पुण्यास आल्यावर आतां आजी म्हणजे काय अगदींच दीन झाली आणि हें नवीन झालेलें कारण दादाच्या बेताला विशेष दृढ करण्याला कारण झालें. तो मला तेव्हां म्हणालाच, " यमे, आजीला अशा स्थितींत किती दिवस राहूं द्यायचं ? मीं तुला परवा मुकाट्यानं कानांत सांगितल्याप्रमाणें यंदां परीक्षेला बसणार. झालों पास तर वकिलीच्या परीक्षेचा अभ्यास. आतां दुसरं कांहीं उपयोगी नाहीं. अग मी मिळवताच झालों लवकर म्हणजे मग कांहीं तिला त्रास पोंचणार नाहीं. कारण मग जरा वचक बसेल. अन् तेंच नाही तर मग, आपण कांहीं केलं तरी हा जाणार कुठें ? असं होऊन जास्तीच वळ सांपडतं. दोन तीन वर्षंच काय थोडासा त्रास होईल, त्याला इलाज नाहीं."

मला त्याचें बोलणें आतां अधिक सयुक्तिक वाटलें. तरी पण त्यानें परीक्षा देऊं नये हें कांहीं बरें नाहीं. तो तिकडच्यासारखाच चांगला चार पांच परीक्षा पास व्हावा, असें मनांत वाटत होतें, यामुळें " हो, अजून लांबची गोष्ट आहे, " असें म्हणून मीं तें बोलणें तितकेंच ठेवलें.

याप्रमाणें माझें सुटींत गांवीं जाणें म्हणजे पुनः कधीं तिकडे जाण्याचा प्रसंग येऊं नये अशासाठीं झालें, असो. दुःखांत सुख एवढेंच मी मानतें, कीं आजोबांच्या मरणाच्या वेळीं व त्यामुळें आजीवर आलेल्या दुर्धर प्रसंगीं मी जवळ होतें. सुटी होऊन पुण्यास येऊन मुंबईस गेल्यानंतर जर हें सारें झालें असतें, तर नुसतें कानानें ऐकलें असतें एवढेंच कीं नाहीं ?

◆ ◆ ◆

## ६६ : मुंबईस परत जाणें

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

आतां आपलेपणा कांहीं उरला नाहीं, आतां आपलें जिणें म्हणजे दुसऱ्याच्या मर्जीवर, असें एकदा मनुष्याच्या मनाला वाटूं लागलें म्हणजे मग त्याचें मन किती अधु होत जातें याचा अनुभव मला जरी त्या वेळीं नव्हता, तरी पण आजीची स्थिति काय होणार, तिच्या मनाला काय वाटत असेल वगैरे विचार मनांत येऊन व बाबांचें आज-

पर्यंतचें तिच्याशीं वर्तन, आतां ती घरांत आली आणि कायमची राहायला, तेव्हां माईसाहेबांचें आणि त्यांच्या मातुःश्रीचेंहि तिच्याशीं वर्तन वगैरे गोष्टी मनांत येऊन माझें मन तिच्यासंबंधानें कसें तिळतिळ तुटूं लागलें, यांचें सविस्तर वर्णन देण्याची कांहीं जरूर नाहीं. नुसतें तिळतिळ तुटून कांहीं उपयोग थोडाच व्हायचा होता ? तिच्या स्थितींत माझ्या हातून कांहीं फरक थोडाच होण्याजोगा होता ? दादालाहि माझ्यासारखेंच वाईट वाटलें व त्यानें आपला पूर्वींचा म्यॅट्रिक्युलेशन झाल्याबरोबर वकिलीच्या अभ्यासाला लागण्याचा निश्चय कायम केला वगैरे गोष्टी मीं सांगितल्याच आहेत. परंतु या सर्व गोष्टी अर्थातच लांबच्या होत्या. सध्यां त्यांचा तादृश उपयोग नव्हता. सध्यां आजीला सुख-स्थितींत ठेवण्याची कांहीं कोणाच्या अंगांत धमक नव्हती. तेव्हां उगीच आपल्या मनांत चुळबुळ करीत बसण्यापलीकडे आमच्या हातीं काय होतें ? असो.

आम्ही परत आल्यावर सासरची मंडळी समाचाराला म्हणून आली, तें सर्व ठीक झालें, व पांच चार दिवस राहून मीहि सासरीं गेलें.

भेट झाल्याबरोबर आजोबांची व गांवची एकंदर आठवण होऊन मला रडें कसें कोसळलें ! आजीच्या भावी स्थितीबद्दल मला वाटत होतें तें मीं सांगितल्याबरोबर "चला त्यांना म्हणावं आमच्याबरोबर मुंबईला ?" असें एकदम म्हटलें; परंतु तें किती अशक्य हें दिसून येण्याबरोबर आम्हांला किती वाईट वाटलें; त्याचप्रमाणें मुंबईची गोष्ट निघाल्याबरोबर इतर सर्व गोष्टी अंमळ एकीकडे सारून, मुंबईच्या मंडळींचीं दोन पत्रें आलीं होतीं, तीं मला दाखविलीं. तीं वाचून मला काय वाटलें, वगैरे गोष्टींची हकीकत आतां सविस्तरपणें देत बसत नाहीं. आमच्या भाषणांत ज्या दोन घरांतल्या गोष्टी निघाल्या, आणि त्यांच्यामुळें माझें मन विशेषच अस्वस्थ झालें तेवढ्या येथें सांगतें.

मुंबईच्या मंडळींचें आलेलें पत्र वाचून अर्थातच मी मुंबईविषयीं बोलूं लागलें तेव्हां मला मध्येंच गंभीर चेहरा करून म्हणायचें, "पण आतां तुम्ही मुंबईस येतां आहां कीं नाहीं याचीच मला शंका आहे."

"म्हणजे" मीं अतिशय आश्चर्यचकित व भयभीत होऊन विचारलें.

"म्हणजे काय ? घरांत चालली आहे वाटाघाट, आतां आईलान् तुला कांहीं पाठवूं नये म्हणून. शंकरमामांचं रोज बोलणं चाललं आहे. आजी त्यांच्यासारखं बोलते आहे."

"पण तें काय म्हणून ? आपल्यामध्यें ताडातोड करून त्यांना काय मिळणार ?"

"त्यांना काय मिळणार म्हणजे ? आपल्या शंकरमामांच्या घराण्याला बट्टा लागतो ना ? तो लागूं नये, घर अगदीं शुद्ध सोंवळं असावं. मग त्यांनीं जरी चार बाळग—"

"त्यांच्याशीं आपल्याला काय करायचं आहे ?" मीं मधेंच म्हटलें, "मग आपल्या मनांतून काय आहे पण ? एकटंच जायचं ?"

" हो, आतां वडील मंडळी सांगतील तसं नको करायला ? नाहीं जर त्यांनीं तुला घाडलं तर करायचं काय ? "

हे असे निराशेचे शब्द ऐकल्याबरोबर माझ्या मनाला काय वाटलें असेल बरें ! बोलणें चाललें आहे, तें थट्टेचें कीं खरें हें कांहींच समजेना. थट्टेचें असेल अशी शंकादेखील माझ्या मनांत आली नाहीं. आधींच माझें मन अधु झालेलें, आणि त्यांत हा असा प्रसंग, मग काय विचारतां ? असें कांहीं रडूं कोसळलें, कीं बेसुमार ! मला टाकून मुंबईस गेल्यानंतर आपली स्थिति होणार काय ? याचें इतकें भयंकर चित्र माझ्या डोळ्यांपुढें दिसूं लागलें, कीं यापुढें उमासासूबाईंची स्थितिदेखील फार बरी असें मला वाटूं लागलें. मीं एकदा मागें सांगितलेंच आहे, कीं स्वातंत्र्यसुखाचा जोंपर्यंत अनुभव घेतलेला नसेल तोंपर्यंत पारतंत्र्याचें दुःख इतकें जालीम तऱ्हेनें भासत नाहीं; परंतु एकदा स्वातंत्र्याचा सुखदायक वारा अनुभविला आणि मग जर का पारतंत्र्यरूप नरकांत पडण्याची पाळी आली तर त्याच्यासारखी दुःस्थिति कोणतीच नव्हे. अधोगति, अधःपात वगैरे जें काय म्हणतात तें तेंच असावें असें मला पक्केपणीं वाटलें. माझी स्थिति तशी असल्यामुळें मी मुंबईस तिकडच्या व त्या दोन भूदेवतांच्या समागमांत स्वतंत्रपणें थोडेसे दिवस घालविले व तेथून येथें येण्याबरोबर तेथल्या स्थितीचाहि चांगला अनुभव घेतल्याकारणानें माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना अनुभविकांवांचून कोणास होणार आहे ? बिचाऱ्या आजींची काय स्थिति होणार हें मी आतां पाहात होतें; उमासासूबाईंची काय अवस्था आहे हेंहि मला दिसत होतें, तेव्हां आपलीहि स्थिति तशीच जरी नाहीं, तरी पण त्याच मासल्याची होणार असें मला वाटून किंवा पक्कें कळून रडूं कोसळावें यांत नवल नाहीं. मला तितक्यांतल्या तितक्यांत खरें म्हणाल तर ' काय करायचं ! वडील माणसं सांगतील तसं ऐकायला नको ! ' या बोलण्याचा संतापहि आला व त्या तडक्यासरशीं मी रडत रडत दुसरीकडे तोंड करून आपल्या मनाशीं चडफडत पडलें.

तो सर्व प्रकार पाहून तिकडे मनाला किती वाईट वाटलें म्हणतां ! माझी मनधरणी करण्याकरतां किती विनवण्या झाल्या ! " मीं तुला एकदा वचन दिलं आहे, तें विसरलीस का ? जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत कांहीं जरी झालं तरी तुला मी आपल्यापासून दूर करणार नाहीं असं मीं तुला वचन दिलं होतं, तें तूं विसरलीस का ? तुला असं वाटतं का, कीं अशा तऱ्हेनं एकदा स्वतंत्रपणानं वागल्यावर इथल्या हाल-अपेष्टांत मी तुला टाकीन म्हणून ? कशी अशी तूं वेडी ? तूं जरा दुःखांत होतीस, म्हणून थोडीशी थट्टा करून तुझ्या मनाला कांहीं तरतरी आणण्यासाठीं बोललों, तें तुला कसं समजलं नाहीं ? माझ्या लक्षांत राहलं नाहीं, मी चुकलों ! " वगैरे वगैरे विनवण्याचे कितीतरी शब्द त्या वेळीं उच्चारले असतील; परंतु आपण इथें राहिल्यास आपल्याला सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांचें काळेंभोर चित्र डोळ्यांसमोर दिसूं लागल्याकारणानें व मग त्या स्थितींत नेहमीं कानीं पडणारे आजेसासूबाईंचे, धाकट्या मामेसासूबाईंचे व शंकरमामंजींचे शब्द आतांच माझ्या कानांत दुमदुमूं लागल्याकारणानें मला दुसरें कांहीं

दिसलें नाहीं आणि ऐकूंहि आलें नाहीं. इतकी मी ते दिवशीं वेडी झालें. तरी पण ' मी चुकलों, क्षमा करा ' असें त्या मुखांतून निघालेले शब्द ऐकल्याबरोबर कोणत्या सत्पत्नीचा राग पार विरून जाऊन आपण इतक्या थराला गोष्ट नेऊन पोंचविली हा केवढा मूर्खपणा, केवढा कृतघ्नपणा केला, असें वाटणार नाहीं ? मी लागलीच " हें काय हें ? इतकं कशाला बोलावं ? क्षमा कसची आणखी चूक कसची ! मला किनई तें ऐकण्याबरोबर कसंसंच झालं. काय करूं " असें म्हटलें. जास्त बोलवेचना; तेव्हां खांद्यावर मान टाकून स्वस्थ रडत बसलें.

हें विलक्षण कृत्य वाचून कित्येकांस कदाचित् आश्चर्य वाटेल; परंतु ज्यांना म्हणून माझ्यासारखा अनुभव असेल किंवा माझ्या अनुभवाच्या बायकांची ज्यांना ओळख असेल त्यांना त्यांत कांहीं आश्चर्य वाटणार नाहीं. ' जळ तुंबतां तडागीं। फोडावा लागतो जसा पाट ॥ ' या न्यायाप्रमाणें शोकक्षोभाचा जोर कमी करण्यासाठीं नेत्रांवाटें वाट देऊन त्याला घालवून देण्याबरोबर थोडेंसें हलकें वाटलें आणि इतर गोष्टी अंत शिरण्यास थोडीबहुत जागा झाली. ती झाल्याबरोबर तिकडून बोललेल्या सर्व गोष्टी मनांत शिरून अर्थातच मन स्वस्थ झालें व शंकरमामंजींशीं, आजेसासूबाईशीं वगैरे फारसें न बिघडतां आपल्या मनोदयाप्रमाणें कसें काय करावें याची युक्ति शोधण्यांत आमचीं मनें गढून गेली. शंकरमामंजींनीं खरोखरच नाना तऱ्हांचीं बालंटें आणखी बयादी काढून मला व सासूबाईंना मुंबईस पुनः न पाठविण्याविषयीं खटपट चालविली होती. " काय करायचं आहे निराळं बिऱ्हाड करून ? उगाच रिकामा खर्च ! सुटींत इथेंच यावं, रिकामे चोचले हवेत कशाला ! संगत अतिशय वाईट..... " एक ना दोन ! नाना तऱ्हेचीं बोलणीं बोलून, पण आम्हांला न पाठविण्याविषयीं खटपटी चालविल्या होत्या. शेवटीं एक दिवस तिकडे फारच संताप येऊन सासूबाईंच्याजवळ म्हणायचें, " आई, मीं कांहीं तुम्हांस इथं ठेवायचा नाहीं. कॉलेजांतील जेवण जेवून मला अगदीं वीट आला आहे. शिवाय जागा घेतली आहे ती वर्षाच्या बोलीनं; धान्यधुन्य घेतलं आहे तें.. ...तें कांहीं असो. शंकरमामांचं कांहीं जरी म्हणणं असलं, तरी मी कांहीं एकटा जायचा नाहीं. तुम्हांला नेईन."

" अरे, सगळं खरं पण आईन् तो जर म्हणताहेत तर आपलाच हेका... " त्या पुढें कांहीं म्हणणार तों मध्येंच आणखी म्हणायचें, " आजीचं कांहीं नाहीं ग. हे सगळे शंकरमामांचे खेळ आहेत. तें कांहीं नाहीं. तूं आपली सांग आजीला कीं मला गेलंच पाहिजे. तो कांहीं एकटा जात नाहीं म्हणून—तसं कशाला ? मला तिनं विचारलं तर मीच सांगेन स्पष्ट म्हणजे झालं ! " हे बोलणें चाललें असतां तिकडचा अगदीं इतका निश्चय झालेला दिसला, कीं कांहीं पुसूं नये. सासूबाई बिचाऱ्या काय करतात ? पण माय-लेकरांचें बोलणें वनूवन्संनीं ऐकून तिखटमीठ लावून रपोट केल्यावर मग काय विचारतां ? जिकडे तिकडे आगच आग झाली ! पण झालें हें एका अर्थी बरेंच झालें. कारण आजे-

सासूबाईंच्या कानावर तिकडचा निश्चय जाण्याची मोठी पंचाईत होती. हो, आपण होऊन बोलण्याची सोय नाही, सासूबाई कांहीं कधीं बोलायच्या नाहींत. मग तें जावें कसें ? ही होती पंचाईतच. ती आयतीच दूर झाली म्हटलें याचें कारण इतकेंच कीं, त्या योगानें सगळ्या घरांत थयथयाट होऊन शेवटीं आमच्या नेहमीं उपयोगी पडणारे गोपाळमामंजीच आमच्या सुटकेला कारण झाले. घरांत भांडण सुरू झालें, कीं त्यांनीं संथपणानें तोंड काढून त्याची वाट लावायची, त्याप्रमाणें असें तमें बोलून आमचें त्यांनीं जाण्याचेंच ठरविलें. आजेसासूबाईंनीं त्यांना प्रथम पुष्कळ बोलबोरून घेतलें, पण हळूहळू " जाईनात का, माझं तरी काय जातं ? ज्याचं त्याला आवडतं, आपलं कशाला पोट दुखतं ? " असें तसें म्हणून एकदाची आमची जाण्याची तयारी झाली. आम्ही आपलीं निगर्गट्टच ! कशाहि तऱ्हेनें का होईना, पण आमचें जाण्याचें ठरलें, आपण इथल्या त्रासांतून सुटलों, याच आनंदांत आम्ही होतों. शंकरमामंजींनीं आमच्यावर व आमच्यापेक्षां सासूबाईंवर कुचकट बोलण्याचा नुसता भडिमार चालविला होता. मला त्यांच्या तसल्या बोलण्याचा असा कांहीं संताप येई, कीं कांहीं पुसूं नये, पण काय करूं ? कांहीं इलाज होता ?

मुंबईस परत जाण्याच्या आदले दिवशीं मी सकाळींच माहेरीं गेलें. मी आतां जाणार यामुळें आजीला अतोनात वाईट वाटलें. तिला आतां अगदीं निराश्रितासारखें वाटत होतें आणि मी असतें येथें म्हणून तरी काय झालें असतें ? पण ज्याला कांहींच आधार नाहींसा--आणि तोहि आधाराला जागा असून—वाटतो, त्याला काय थोडया थोडक्यानेंहि वाईट वाटायचेंच. असो. तिला जसें वाईट वाटलें, तसेंच तिला टाकून आपण जाणार म्हणून मला अतोनात वाईट वाटलें, हें येथें सांगायला पाहिजे असें नाहीं. मला अतिशय रडूं आलें. मी येथें असतें, तरी म्हणजे कांहीं तिला फार सुख झालें असतें असें थोडेंच आहे ! माझ्याकडून जितकें तिचें समाधान करायचें तितकें मीं केलें; तिनें मला सांगायचें तें सांगितलें. दादाचें व माझें तिच्याविषयीं व एकंदर आपल्या भावी स्थितीविषयीं बोलणें बराच वेळ झालें; त्यांत आम्ही काय काय बोललों, काय काय नाहीं, हें प्रत्यक्ष सांगायला पाहिजे असें नाहीं. त्याच्याशीं बोलतां बोलतां माझ्या मनांत एक विचार आला. तो विचार आल्याबरोबर, त्यांत कांहीं तात्पर्य नाही हें पक्केपणीं जाणून मी तो मनांतल्या मनांत दाबूं लागलें; पण कांहीं असो, मनांत आलें आहे, तर त्याप्रमाणें केल्याखेरीज राहूं नये. आणखी एकदा शेवटली परीक्षा होईल, असेंहि माझें मन मला सांगूं लागलें. मनांत " नाहीं, होय, " करतां करतां, पाहावेंच एकदा करून असें वाटून दादालाहि न कळवितां तो बाहेर गेला असतां मी उठलें व माईसाहेब कामांत आहेत अशी संधि साधून वहिनीला एकीकडे वर बोलावलें ती नित्याप्रमाणें कपाळाला आंठ्या घालून " काय ? कशाला ? माझ्याशीं काय एवढं हितगुज ? " असें म्हणत पण आली. मीं तिला " बस बस " म्हणून पुष्कळ आग्रह केला; पण ती मुळींच तिकडे लक्ष न देतां " बोला काय तें ! सासूबाई हांक मारतील नाहींतर " एवढेंच म्हणाली. असा उपोद्घात झाल्यानंतर माझ्या हेतूस कितपत यश येणार होतें तें दिसतच होतें; पण

आपण आतां मागें घेऊं नये असें वाटून मी तिच्यासमोर उभी राहून म्हटलें, " वहिनी! तूं असं कां करतेस ? अग, तूं जर अशी नेहमीं वागत गेलीस तर पुढें कसं व्हावं ? आतां आजीची काय स्थिति होणार तुला कळतं आहे ना ? तूं जर तिची काळजी घेतली नाहींस, आमच्याशीं जशी तुसड्यासारखी वागतेस, तशीच जर तिच्याशीं वागूं लागलीस तर तिला सुख कसं लागावं ! "

" मी तसलीच आहें तुसडी ! " एवढेंच तिनें कुर्‍यानें उत्तर दिलें. पण मी तिकडे यत्किंचितहि लक्ष न देतां पुढें म्हटलें, " अग, खरी खरी कळकळीची सून तूंच ना तिची ?...... "

" कां बरं ? सासूबाई नाहींत का ? मी कसली मेली आचरट ! " ती खोंचून म्हणते.

तरी मीं कांहीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. तें ऐकलें नाहींच असें दाखवून आणखी म्हटलें, " दादाच्या मनांत तिच्याविषयीं किती प्रेम आहे, कांहीं तुला कल्पना तरी आहे ? पाहा. विचार कर. तूं असं नको करूं. एखाद वेळ दादा कांहीं बोलला असेल चुकून, पण...... "

" झालं का तुमचं ? मला आचरटाला कांहीं समजत नाहीं त्यांतलं म्हणून विचारतें, मला कशाला सांगतां तें ? " हें ती मधेंच म्हणाली. तें ऐकण्याबरोबर माझ्या मनाला किती खेद झाला असेल बरें ? इतका खेद झाला, कीं थोडासा संतापहि आला व मीं त्याच्या भरांत " झालं. जा हो ! " असें म्हटलें आणि स्वस्थ बसलें.

इतकें झाल्यावर आतां वहिनीच्या स्वभावाविषयीं कांहीं शंका घेण्यास मुळीं तरी जागा होती काय ? दादाला तिच्यापासून–दादालाच का, कोणालाहि–सुख मिळायचें नाहीं, असा माझ्या मनाचा पक्का ग्रह होऊन मी आपली खिन्न होऊन बसलें. वर लिहिलेली गोष्ट मीं दादाला सांगितली नाहींच; कारण त्यांच्या दोघांमधील वैषम्य वाढण्यापलीकडे त्या सांगण्याचा कांहींहि उपयोग झाला नसता.

वरील प्रकार झाला तेच दिवशीं दुपारीं मी सासरीं गेलें. रात्रीं आम्हांला मुंबईला जायचें होतें.

ऐन निघण्याच्या वेळीं रीतीप्रमाणें देवापुढें पैसासुपारी ठेवण्याचा विसर पडला. त्याबरोबर " त्यांना काय सुधारकांना ! " असा टोला शंकरमामंजींनीं लगावलाच. इतक्यांत मीं नमस्कार केला, त्याबरोबर " सुधारक सौभाग्यवती भव, सुधारणा विजयी भव, " असें मोठ्यानें म्हणून ' ह्येः ह्येः ह्येः ' करून आपण हसूं लागले. माझ्या अंगाचा अगदीं तिळपापड उडाला. तिकडे तर संतापानें लाल होऊन जायचें. पण करतां काय ? मुकाट्यानें गाडींत बसून चालतीं झालों.

◆ ◆ ◆

## ६७ : मुंबईस आल्यानंतर

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

नुकत्या नुकत्याच झालेल्या त्या अनेक गोष्टी आठवून येणारी खिन्नता, आपल्या म्हणण्याप्रमाणें न झाल्याकारणानें मनांतल्या मनांत दंश धरून यांचें आतां काय करूं आणि काय नाहीं असें होऊन आपला सूड उगविण्यासाठींच कीं काय, शंकरमामजींनीं जातां जातां ' ह्यः ह्यः ' करून हसून दिलेल्या टोल्यामुळें झालेला सखेद संताप, त्याचप्रमाचें त्यांतल्या-त्यांत, ' सुटलों एकदा कांहीं दिवस तरी त्या कचाटयांतून आणखी त्रासांतून ! ' असें मनाला वाटून येणारा हलकेपणा, इत्यादि अनेक विकारांनीं मन व्याप्त असल्यामुळें आमच्या दोघांपैकीं एकाच्याहि तोंडून शब्द निघाला नाहीं. सरतेशेवटीं कोणत्या विकाराचें प्राबल्य होतें, याबद्दल माझ्या मनांत तर काहूरच चाललें होतें. मग तिकडे काय वाटत असेल आणि काय नाहीं ? त्याचप्रमाणें सासूबाईंच्याहि मनांत काय चाललें असावें, याचें आम्हांला अनुमान होईना.

थोडया वेळानें तिकडून सासूबाईंना म्हणायचें, " तूं काय करतेस याची मला मोठी भीति होती. ते शंकरमामा बोलायला लागले, कीं तुला वाईट वाटायचं अन् तूं आपली म्हणायचीस ' बरं तर, मी नाहीं जात त्याच्याबरोबर ' असं आपलं मला वाटे, अन् माझा तर कृतनिश्चय, कीं तुझ्याशिवाय कुठें जायचं नाहीं."

" मी तरी कशी बरं राहीन तुला सोडून ? आतां तूं काय पाहिजे ते जरी केलंस, तरी तुला सोडून मी कांहीं दूर राहायची नाहीं. तूंच आपला विचारानं वाग म्हणजे झालं. नाही त्यांना आवडत तर आपण नाहीं केलं कांहीं, त्यांत काय खरचतं आपलं ? "

" आई, पण तूंच पाहात होतीस ना आम्ही काय करीत होतों आणि काय नाही तें ? एक दिवस तरी तुला कांहीं वावगं दिसलं का कांहींतरी ? बरं, मंडळी तरी कोणी वावगी तिथें ? तूं पाहात होतीस प्रत्यक्ष म्हणून बरं आहे. जर नुसतं कर्णोपकर्णी तुला कळलं असतं, अन् तें देखील शंकरमामांच्या तिखटमिठासुद्धां, तर मला वाटतं तुझंदेखील मन त्यांच्यासारखं झालं असतं, नाहीं ? "

" माझं मन कांहीं झालं नसतं आणि व्हायचय् नाहीं. तूं चांगला खुशाल असलास म्हणजे झालं. लहानपणापासून..."

परंतु तितक्यांत गाडींत दुसऱ्या कांहीं लोकांची बाचाबाची होऊन यांचें हें बोलणें तितकेंच राहिलें. तें बोलणें आणखी सासूबाईंचीं तसलींच कित्येक बोलणीं माझ्या मनांत आलीं आहेत, आणि त्यामुळें त्यांच्या त्या निरिच्छ पुत्रप्रेमाची व शुद्ध आणि सत्त्वशील वृत्तीची मूर्ति डोळ्यांपुढें येऊन मला असें वाटतें, कीं माझं कपाळकरंटीचं असो, पण त्या

सत्त्वशील माणसावर अशा तऱ्हेचा प्रसंग यावा म्हणजे त्या परमन्यायी म्हटल्या जाणाऱ्या परमेश्वराविषयींची आमची कल्पनाच चुकली म्हणायची ! अहो, जिनें कधीं स्वप्नांतसुद्धां कल्पनेनें कोणाचें वाईट चिंतिलें नाहीं, मग करण्याची गोष्ट कशाला – त्या माउलीवर अशा तऱ्हेचे दुर्धर प्रसंग येऊन आणखी तिचा जन्म संकटांत, दुसऱ्यावर अवलंबून राहण्यांत जावा काय ? पण ज्या गोष्टी कां होतात हें आपणांस समजत नाहीं, त्याबद्दल व्यर्थ कुतर्क करून त्या नारायणाला काय म्हणून दोष द्यावा ? कोणत्या गोष्टी तो कशासाठीं आणि कशा करतो हें त्याचें त्यालाच माहीत, असें म्हणून मुकाट्यानें बसण्यापलीकडे आपल्या हातून काय होणार आहे ? असो.

वर सांगितल्याप्रमाणें झालेल्या बोलण्याखेरीज दुसरें कांहींहि न घडतां आम्ही सुखरूपपणें मुंबईस पोंचलों. मुंबईस आम्ही गेलों तों आमची मित्रमंडळी आमची वाटच पाहात होती. ती मंडळी यंदां कोठेंच गेली नव्हती. ‘ गणपतराव ’ ‘ गणपतराव ’ म्हणून ज्यांचें नांव निघाल्याखेरीज आमचा दिवसदेखील जात नसे, ते अजूनहि आले नव्हते. रोज त्यांच्यासंबंधानें बोलणें निघे. त्यांच्या घरच्या मंडळींच्या गोष्टी निघत आणि त्यांच्याविषयीं त्या चार मंडळींच्या मनांत अतोनात प्रेमबुद्धि वास करीत असे, ती मला क्षणोक्षणीं दिसे. यामुळें ते येथें येतील कधीं, आणखी मी त्यांना पाहीन कधीं, असें मला आधींपासून वाटत होतें; आणि आतां आपण परत मुंबईस गेलों म्हणजे ते आपल्याला दिसतील, अशी मोठी आशा होती; परंतु ती येथें आल्यावर व्यर्थ गेली.

मुंबईस आल्यानंतर पांचसहा दिवसांनींच आमचा पूर्वक्रम सुरू झाला. गेले पांच-सहा दिवस आम्ही आमच्या पुण्याच्या कुळकथा सांगण्यांत व त्या पडल्या त्या वेळीं झालेला खेद, त्या शंकरमामंजींच्या गोष्टी, त्यांचा तो आशीर्वाद, त्यांचीं एकंदर कारस्थानें वगैरे काढून, त्यावर टीका करून हसण्यानें घालविले म्हणण्यास हरकत नाहीं. पूर्वक्रम सुरू झाल्यानंतर अर्थातच माझा अभ्यासक्रम सुरू झाला. लक्ष्मीबाई व यशोदाबाई या दोघी शिक्षकिणींनीं मला कितीतरी कामांत शिक्षण दिलें. त्याचप्रमाणें दर शनिवारीं मागे सांगितल्या ठिकाणीं जमणाऱ्या आमच्या सभेंत कांहीं ना कांहींतरी नवीन निबंध-वाचन अगर कशिदा काढणें, शिवणें, टिपणें वगैरे सर्व नियमितपणानें चालून दिवसानु-दिवस माझ्या मनाची उन्नति होत चालली. सासूबाईंचा व गोपिकाकाकूंचा स्वभाव एक जुळून त्यांनीं संसाराचा सर्व भार आमच्यावर सोंपवून आपण खरोखरच हरि हरि म्हणत राहिल्या, दोनप्रहरचा सैंपाक मात्र त्यांनीं कधींहि मला करूं दिला नाहीं, कीं माझ्या हातचें न जेवण्याचा आपला नेम गोपिकाकाकूंप्रमाणें त्यांनीं ढळूं दिला नाहीं. तिकडून नानासाहेबांप्रमाणेंच कितीतरी आग्रह करून सांगायचें, पण नाहीं, दोघींचें म्हणणें एक– “ आमचे अगदीं हातपाय थकले, म्हणजे मग त्या आहेतच. मग नाहीं आम्ही दुसऱ्या कुठें जात ! पण तंवर नये जेवूं, म्हणून देवानें लावून दिलं आहे, तर उगीच कां आम्हीं मोडावं तें ! अन् दिवसां आम्हीं करावं तेंच शोभतं. सुनेला राबवून आपण आपल्या म्हाताऱ्या जेवतात असं नको लोकांनीं म्हणायला ! ” अशा तऱ्हेनेंच आणखीहि कांहीं

बोलून, पण त्यांनीं आपलें नेहमीं तेवढया कामांत आपलें म्हणणें कायम ठेवायचें. पुष्कळ तऱ्हांनीं सांगितलें, पण दोघी ऐकत नाहींतसें पाहिलें; तेव्हां मग आपला नादच सोडून दिला साऱ्यांनीं. बाकी कोणत्याहि गोष्टींत त्या आमच्या आड आल्या नाहींत. उलट आमच्या सासूबाई तर नेहमीं सांगत, "त्या अमक्याला एक लोंकरीची टोपी करून पाठव बरं का, आपल्या बालकृष्णाला एक चांगला अंगरखा कर बरं का" वगैरे.

याप्रमाणें सर्व क्रम पद्धतवार चालला होता मला आतां मराठी चांगलेंच येऊं लागलें. इंग्रजी ट फ ला सुरुवात झाली; परंतु इंग्रजीला आतां सुरुवात होऊन मी मोठी फरडी वाचणारी होऊन शहाणी होणार होतें असें मला वाटलें नाहीं, आणि माझ्या दुर्दैवानें लवकरच मला रसातळाच्या अंधारकोठऱ्यांत नेऊन पोंचविल्यामुळें तें घडूनहि आलें नाहीं. जर माझें मन कांहीं सुशिक्षित झालें असेल, ज्याला शहाणे लोक सुशीलता म्हणतात ती जर माझ्या अंगीं अधिक आली असेल, तर ती माझ्या र ट फ च्या इंग्रजी अभ्यासानें, किंबहुना मराठी ज्ञानानेंहि नाहीं; तें सर्व सुज्ञ जनांच्या संगतीमुळें, त्यांच्या सहवासामुळें, त्यांच्या सांगणीशिकवणीमुळें व त्यांच्या कित्त्यामुळें होय. त्यांच्यापुढें थोडेंसें इंग्रजीच काय, पण आणखी ढीग भाषा शिकलें असतें आणखी ज्यांच्याशीं माझ्या सुदैवामुळें माझा जन्मसंबंध जुळला त्यांच्याशीं झाला नसता; लक्ष्मीबाई, यशोदाबाई, यांचा अत्यंत स्नेहलाभ मला झाला नसता; या दोघी, नानासाहेब, विष्णुपंत, गणपतराव, यांच्यासह बसून अनेक विषयांविषयीं निघालेलीं संभाषणें माझ्या कानी पडलीं नसतीं; शनिवारीं दुपारीं आमची सभा भरे, त्या ठिकाणीं जमणाऱ्या स्त्रियांशीं होणारीं बोलणींचालणीं व परस्परांची मतें परस्परांना सांगणें, इत्यादि गोष्टी झाल्या नसत्या; मुंबईसारख्या शहरांत नित्य घडणाऱ्या चांगल्या गोष्टी कानीं येऊन बक्षीससमारंभासारख्या गोष्टी प्रत्यक्ष नजरेस पडून जे उत्तम परिणाम मनावर घडतात ते जर झाले नसते, तर कांहींतरी उपयोग झाला असता काय? माझ्या दुर्दैवामुळें आणि तेंहि एका विशेष मनुष्याच्या रूपानें हात धुऊन पाठीस लागल्यामुळें, वर सांगितलेल्या गोष्टींचा मला झालेला उपयोग दुसऱ्यास उपयोगी करण्याचें शक्य नाहीं तें निराळें; परंतु माझ्या चरित्रापासून असल्या गोष्टींची आवश्यकता आणि रूढिराक्षसी व तिचे भक्त म्हणून ढोंग करणारे कित्येक लोक यांनीं चालविलेली नासाडी या दोन गोष्टी स्पष्ट नजरेसमोर आल्या म्हणजे पुरे! परंतु ही मी कोणीकडे चाललें! मला भ्रांतिष्टासारखें काय हें होऊं लागलें! कदाचित्—कदाचित्—माझ्या दुर्दैवाच्या कर्मकथेचा कळस जवळ जवळ......

◆ ◆ ◆

## ६८ : दादाचीं दोन पत्रें

* * * * * * * * * * * * * * *

वर जो मजकूर मीं लिहिला तो माझ्यानें पुरा लिहवेना, तें वाक्यहि पुरें होईना, म्हणून मी तें पुनः वाचूनहि न पाहतां आपली एकदम पुढच्या हकीकतीकडेच वळतें. न जाणों तें जर मीं पुनः पाहिलें, तर त्या सर्व गोष्टी पुनः आठवून कालच्याप्रमाणें माझी अवस्था करून सोडतील आणि मग पुढची हकीकत लिहिण्याचें काम तसेंच थबकेल. नुकतेंच मला वाटतें, मीं लिहिलें आहे, कीं आमचा नेहमींचा क्रम सुरू होऊन आम्ही नेहमींप्रमाणें गोष्टी सांगण्यासाठीं वगैरे एके ठिकाणीं रात्रीं बसूं लागलों. आतां येवढेंच पुनः एकदा सांगतें, कीं-( या गोष्टी पुनः पुनः सांगण्यांत मला सांगणारणीला जर कंटाळा येत नाहीं, तर माझी अशी खात्री आहे, कीं माझें चरित्र वाचणाऱ्यांनाहि—वाचणारणी-विषयीं बोलायलाच नको-कंटाळा येऊं नये, व त्यांनी मला चर्वितचर्वणाचा दोष देऊं नये )—वर सांगितल्याप्रमाणें रोज कांहीं ना कांहीं तरी नवीन—निदान मला तरी अगदीं नवीन—अशा गोष्टी निघून त्यापासून आनंद करून घेण्यांत आमचे दिवस चालले. त्या दोन प्रत्यक्ष देवतांच्या सहवासानें माझ्या बुद्धीचा व मनाचा किती विकास झाला; विद्येवांचून सर्व व्यर्थ आहे असें खरें खरें मनापासून वाटून मी किती मनापासून झटून अभ्यास करूं लागलें! थोडेच दिवसांत लहानपणापासून मनावर ठसविलेला तो फाजील लाजाळूपणा हलके हलके निघून जाऊन, योग्य तितकीच मर्यादा माझ्या अंगीं कशी राहिली, इत्यादि इत्यादि गोष्टी; त्याचप्रमाणें आम्ही सहासातजण रोज रात्रीं एका ठिकाणीं बसून किती प्रकारच्या गोष्टी सांगत होतों; आमच्या संभाषणांत कोणकोणते विषय निघत, त्यांवर कशी कशी चर्चा होई; पुरुष आपला व आम्ही बायकाहि आपापला अनुभव सांगून आपापल्याला जें बरें वाटत असेल तें अगदीं निर्भीडपणानें कशा बोलूं लागलों; कोठें सभेला, कोठें बक्षीससमारंभाला वगैरे जाऊन आलों म्हणजे त्यावरून कधीं बालविवाह, कधीं स्त्रीशिक्षण, कधीं वर्तमानपत्रें, कधीं कादंबऱ्या वगैरेंविषयीं बोलून किती सुखांत दिवस गेले; त्याचप्रमाणें एखादें नवीन मराठी पुस्तक वाचण्याजोगें निघालें म्हणजे पांच चार रात्रीं तें आमच्यापैकीं कोणींतरी वाचावें आणि बाकीच्यांनीं ऐकावें, मधून मधून त्याच्या गुणांवर टीका करावी, त्यांत सांगितलेल्या गोष्टींच्या सत्यासत्याविषयीं चर्चा करावी; केव्हां एखादें पुस्तक विशेष चांगलें किंवा विशेष वाईट असलें, तर आमच्यापैकीं कोणास तरी आम्हीं त्यासंबंधानें लिहिण्यास सांगावें; आणि त्यानें तें लिहून पुनः मंडळींत वाचलें म्हणजे कोठेंतरी वर्तमानपत्रांत पाठवावें इत्यादि इत्यादि अनेक तऱ्हेच्या मार्गांनीं आमचे मुंबईचे दिवस इतके कांहीं सुखांत गेले, कीं त्याचें यथास्थित वर्णन करणें एक तर शक्य नाहीं; आणि दुसरें, यदाकदाचित् करूं म्हटलें तरी मला असें वाटतें, कीं त्या गोष्टी आम्हां स्वतःला जितक्या सुखकर व आनंददायक वाटल्या, तितक्या इतरांना

वाटणार नाहींत. तेव्हां त्यांपैकीं फक्त कांहीं कांहीं प्रसंग कीं जे प्रसंग माझे मलाच फार महत्त्वाचे वाटतात—तेवढे येथें सांगण्याचा माझा बेत आहे. म्हणजे थोडक्यांत गोष्टी हें ध्यानांत ठेवल्यासारखेंहि होईल.

दादाचीं पत्रें येऊन सर्व समाचार कळे. त्याच्या अभ्यासाची हल्लीं गर्दी चालली होती, यामुळें त्यास फार सविस्तरपणें सर्व गोष्टी लिहिण्यास वेळ सांपडत नसे हें उघडच आहे. मीहि त्यास अशा तऱ्हेचा आग्रह करीत नसें. मी मात्र त्यास आपल्या येथील सर्व कच्ची हकीकत वेळोवेळीं लिहून पाठवीत असें. याप्रमाणें सुमारें तीन महिने गेले. या तीन महिन्यांत शंकरमामंजींचीं लांबच लांब उपदेशपर पत्रें येत आणि तींहि आपल्या प्रौढीनीं बरींच भरलेलीं; त्यांत केव्हां आमची कमालीची निंदा, केव्हां आमच्या चांगुलपणा-बद्दल अतोनात स्तुति असा त्यांच्या स्वभावानुसार व पत्र लिहिण्याच्या वेळच्या लहरी-मुळें अगर गरजांमुळें भेद असायचा तो होताच. याखेरीज दुसरें कांहींहि मोठें सविस्तर-पणें सांगण्याजोगें घडलें नाहीं. दुर्गीच्या स्थितींतहि कांहीं विशेष सांगण्याजोगा असा फरक घडून आल्याचें दादाच्या लिहिण्यांत आलें नाहीं व अजून तिच्या नवऱ्याचा ठिकाणा नव्हता आणि त्या मुलाच्या ठिकाणीं तिचें मन विलक्षण तऱ्हेनें गढून गेलें असल्या-कारणानें तिची प्रकृति हलके हलके सुधारत मात्र चालली होती, असें त्याच्या एका पत्रीं लिहिलें होतें. दादाला आतां, "आपली परीक्षा होऊन आपणहि एकदा यांच्या या मंडळांत केव्हां मिसळून जाऊं" असें झालें होतें, असेंहि त्याच्या दोनतीन पत्रांवरून दिसून आलें. तें होईल तर फार चांगलें, असें मला आणि त्यालाहि वाटत होतें व त्या-संबंधानें आमचें दोघांचें बऱ्याच वेळां बोलणेंहि झालें होतें. असो.

असें होतां होतां एके दिवशीं संध्याकाळीं दादाचें एक छोटेंसें पत्र आलें, त्यांतला मजकूर फार चमत्कारिक होता :—

दागिन्यांसंबंधानें मी जो मजकूर म्हणत होतों, तोच खरा होणार असें म्हणण्यास हरकत नाहीं. परवांच्या दिवशीं आजीच्या एका जुन्या ओळखीच्या बाईनें तुझ्या आवडत्या वहिनीला जेवायला बोलावलें असतां, आजीनें माईसाहेबांस तिचे दागिने देण्यास सांगितलें. त्या वेळीं नागगोंड्याच्याबद्दल वाद झाला व आजीनें माईसाहेबांच्या दागिन्यांबद्दलहि विचारपूस केली. तेव्हां माईसाहेबांनीं फारच टाळाटाळी केली आणि आजीला, 'तुम्हांला त्याची पचाईत कशाला पाहिजे ?' अशा अर्थाचे शब्ददेखील त्या बोलल्या !

काल मायलेकींचें भांडण झालें. त्याचे दोन ओझरते शब्द माझ्या सहज कानीं पडले; त्यानें मला तर आतां शंकाच राहिली नाहीं. 'तूं पाहिजे तें कर. पण त्या अवदसेपासून......घेऊन ये. तुझीच ना ती मोठी विश्वासाची ? तूंच ना मला सांगितलंस तिच्याकडे......मी ऐकायची नाहीं !'

"मी आपली उगीच आलें काशी सोडून ! पुनः जातें तरी..."

' कुठं पाहिजे तिथं मष्णांत जा, पण ते आणून देऊन मग जा...'

पुढें मला कांहीं ऐकू आलें नाहीं. परंतु एवढ्यावरून मायलेकींच्या भांडणाचें कारण आणखी दागिन्यांचें ठिकाण हीं जर समजलीं नाहींत तर मग काय म्हणावें ?

" ही हकीकत तुला लिहिली आहे, आतां तरी तुला वाटतें का माझाच तर्क खरा असें ? का अजूनय् माझें आपलें कांहीतरीच म्हणणें ? "

एवढेंच त्या पत्रांत होतें आणखी कांही नाहीं. पत्र अतिशय घाईनें लिहिलेलें होतें.

असें हें विलक्षण पत्र आल्यावर माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल ! माईसाहेबांचें व त्यांच्या आईचें जें बोलणें दादानें ऐकलें तें मला त्या पत्रांत लिहून कळविलें होतें, त्याचा माझ्या मनावर काय परिणाम झाला असावा याची कल्पना कोणाला होईल काय ? प्रत्यक्ष लेकीनें आपल्या आईला ' मष्णांत का जाईनास ! ' असें म्हणावें, यापरतें द्रव्याच्या अचाट शक्तीचें उदाहरण तें काय कोणास सांपडणार आहे ? त्या बोलण्यासंबंधानें मी जों जों अधिकाधिक विचार करूं लागलें, तों तों मला हें तर स्पष्ट दिसलें, कीं आपल्या आईची फार जिवलग मैत्रीण म्हणून माईसाहेबांनीं कांहीं कारणानें त्या–मीं एकदा पाहिली होती त्या–बाईच्या स्वाधीन ते दागिने गिळंकृत करण्याच्या हेतूनें म्हणा, अगर दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा, दिले, पण ती बाई दागिन्यांचा पत्ता लागूं देत नसावी.

हा सगळा तर्क मीं केला खरा, पण अजून त्या बाईला माईसाहेबांनीं दिले कसे ? आणखी कां ? ' याचा मात्र चांगलासा उमज पडेना. माईसाहेब कांहीं सामान्य बायको नव्हती; ती अशातशा भुलथापींवर भुलणारी नव्हे, असा निदान त्या वेळीं आमचा समज होता. मग काय असेल तें असो ! पत्र वाचल्यानंतर मीं तें तिकडे दाखविलें तर तिकडेहि कांहीं त्याबद्दल विशेषसा तर्क झाला नाहीं. आपलेच दांत आणखी आपलेच ओंठ, असा विचार करून मीं ह्या पत्रांतला मजकूर अर्थातच दुसऱ्या कोणास सांगितला नाहीं; माझ्या मनांतच ठेवला.

आणखी सुमारें एक महिना गेला. मध्यंतरीं दादाकडून फारशीं पत्रें आलीं नाहींत. महिन्याच्या अखेरीस आणखी एक पत्र आलें त्यांत या दागिन्यांसंबंधानें जास्त कांहींच नव्हतें, फक्त, " सुंदरीच्या लग्नाबद्दल विचार सुरू झाले आहेत. आजीचा फार नाद चालला आहे. तिला मीं ' तूं आतां या कामांत फारशी बोलूं नको ' म्हणून सांगतों, पण तिचा स्वभाव पडला, त्याला काय करायचं ? ती आपली रोज तिच्या लग्नाबद्दल गोष्ट काढीत असते आणखी बाबांच्याहि मनांत तिचें लग्न करून टाकावें असें आहे असें दिसतें. आणि यमूताई, खरें पुसशील तर मलादेखील असेंच वाटूं लागलें आहे, की तिचें लग्न होऊन जाईल तर बरें. सध्यां तिची घरांत जी स्थिति आहे, त्याच्यापेक्षां सासऱ्यां अधिक वाईट होऊं शकेल असें मला वाटत नाहीं. तिचा स्वभाव आजीच्या

लाडानें झाला आहे चमत्कारिक. आजीचा तिच्यावर जीव कीं प्राण; तिला उगीच कोणी हूं करतां उपयोगी नाहीं; आजीच्या हातांत कांहीं अधिकार नाहीं, पण ती जाते बोलायला. त्यामुळें तिचा पाणउतारा होतो आणखी सुंदरीची जास्तीच आबाळ होते. मी घरांत असून नसून सारखाच, असें झालें आहे. पण मला मोठें आश्चर्य वाटतें, कीं बाबांचा तो पूर्वीचा करडेपणा गेला तरी कोठें ! आतांशा ते इतके कांहीं मऊ मऊ होत चालले आहेत, कीं कांहीं पुसूं नये. त्यांना ती दागिन्यांची गोष्ट अजून कळली नसेल काय ? कळली असेल म्हणावें, तर इतके दिवसांत तसलें रागाचें यत्किंचित् देखील चिन्ह नाहीं. बरें नाहीं कळली म्हणावें तर इतके दिवस कळल्याखेरीज राहिली कशी ?" वगैरे मजकूर होता.

अशीं त्याचीं पत्रें आलीं म्हणजे माझें मन फार उद्विग्न होई. आजीबद्दल फार वाईट वाटे सुंदरीचें काय होणार पुढें, असेंहि मनांत येई. आजीचा स्वभाव कांहीं चमत्कारिक, पण तिला सुंदरीचें एकदा लग्न होऊन जाईल तर बरें असें वाटूं लागलें होतें, तें अगदीं साहजिकच होतें. आणि दादाच्या लिहिण्यावरून मलाहि पण तिचें आतां लग्न होऊन जाईल तर बरें असें वाटलें. ती लग्नाजोगी-( किंबहुना आमच्या जुन्या मताप्रमाणें थोडी मोठीच ) झाली होती असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. असें मला वाटल्यावरून " एखादा चांगला मुलगा असला तर पाहाचा कॉलेजाबिलेजांत, नाहीं तर कुठें दुसरीकडे शाळेंत " असें सुचविलें. त्यावरून माझी प्रथम थोडीशी थट्टा केली; पण सर्व गोष्टी सांगून दिल्या तेव्हां तें खरें वाटून, पाहतों म्हणून मला आश्वासन दिलें. काय चमत्कार पाहा, दुसरे दिवशीं दादाचेंहि तिकडच्या नांवावर पत्र आलें, त्यांत मीं केलेलीच सूचना होती. फक्त बाबांनीं मुद्दाम सांगितल्यावरून हें लिहिलें आहे, असें होतें.

◆ ◆ ◆

## ६९ : घराच्या बाहेर जाणें

* * * * * * * * * * * * * * *

एके दिवशीं संध्याकाळीं जेवणेंखाणें झाल्यानंतर फार उकाडा होऊं लागला म्हणून विष्णुपंतांनीं " आपण सारीचजण आज समुद्रावर जाऊं चला " असें म्हटलें. ज्या दिवसाची मी हकीकत लिहितें आहें, त्या दिवसांत मुंबईस उकडण्याची म्हणजे शिकस्त असते. उन्हाळा बरा म्हणवतो, असें म्हणतात. मला कांहीं त्याचा अनुभव नव्हता. आम्ही उन्हाळ्यांत तेथें नव्हतोंच. परंतु सप्टेंबर अखेरपासून पुढें खरोखरीच उकडून असा त्रास झाला कीं कांहीं बोलण्याची सोय नाहीं. आणि ज्या विशेष दिवसांची मी हकीकत लिहितें आहें, त्या दिवशीं तर उकडून उकडून अगदीं प्राण जाण्याची वेळ.

आली होती. तेव्हां अशा वेळीं वरच्यासारखी सूचना झाल्यावर ती कोणाला मान्य होणार नाहीं ? नानासाहेबांनीं आपल्या आईला व आमच्या सासूबाईंना विचारण्याचा पत्कर घेतला व त्याप्रमाणें विचारून परवानगीहि आणली. आमच्या घरापासून समुद्रकांठ फारसा लांब नव्हता. अगदीं जवळच होता म्हटलें तरी चालेल; त्यामुळें आम्ही सर्वजण चालतच तेथपर्यंत गेलों.

समुद्र अतिशय शांत होता, वारा अगदीं मंद वाहात होता, यामुळें तेथें थोडा वेळ इकडे तिकडे हिंडण्याची फारच मौज वाटली. मी आजपर्यंत निव्वळ हिंडायला, आणखी तीहि अशी बरोबर, कधींच आलें नव्हतें. यामुळें मला तितकी जरी नाहीं तरी बरीच लाज वाटली. परंतु तेथे आमच्यासारखी पांचसात मंडळी पाहिली, तेव्हां आधींच तयार होत चाललेल्या माझ्या मनाला त्याचें कांहींच वाटलें नाही, उलट जी मंडळी अशा गोष्टीला नाकें मुरडतात, हसतात, टवाळ्या करितात, त्या लोकांच्या मूर्खपणाबद्दल हसूं आलें व केवळ रूढीच्या गुलामगिरीनें जखडलें जाऊन या लोकांनीं कित्येक आनंद आपल्या हातचे घालविले, असें वाटून त्यांजबद्दल खेद मात्र झाला. ' बरोबरीच्या स्त्री-पुरुषांनीं, बहीणभावंडांनीं, मायलेकरांनीं हिंडायला जाऊन चार घटका सुखांत घालविल्या असतां ज्यांना बरें वाटत नाहीं, आपण ह्याप्रमाणें करणें तर लांबच, परंतु दुसऱ्यांनीं केलेलें पाहून ज्यांना वाईट वाटतें, त्यांच्याइतके गुलामाच्या स्थितीला योग्य असे लोक दुसरे कोणते असूं शकतील ? ' असें एकदा आमच्या मंडळींतच म्हटलेलें मला आठवतें. आणखी तें अगदीं सर्वथा खरें असें मला वाटतेंहि. असें काय आम्हीं पाप केलें आहे, कीं आम्हांला मोकळी हवा घेण्याचीदेखील सवड मिळूं नये ? आपल्या घराच्या बाहेर पाऊल टाकणें म्हणजे आपण नागाच्या फडीवर पाऊल टाकतों असें बायकांनीं समजावें, असें कोणा एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे. तें प्राचीन काळीं कितपत उपयोगाचें असेल तें असेलच; परंतु आजदेखील मी तेंच त्या कवीचें म्हणणें नीट ध्यानांत धरा, असें आपल्या भगिनींस सांगेन; नंतर एवढेंच कीं त्या कवीनें जें लिहिलें आहे तें बायकांनीं कधींहि घराच्या बाहेर जाऊं नये असें सुचविण्यासाठीं लिहिलें आहे. मी आपल्या भगिनींना उपदेश करणार तो असा कीं, " बायांनो, घराच्या बाहेर आपण पाऊल टाकणें म्हणजे नागिणीच्या फडेवर पाय ठेवण्यासारखें समजा, परंतु तसें करण्यास भिऊं मात्र नका. आपल्या दाराशीं जी ही दुष्ट रूढिरूप नागीण आज किती दिवस पसरली आहे, तिला कोणीहि—त्यांतून आपणां बायकांची तर गोष्टच विचारूं नका—ओलांडून जायची तयारी करूं लागलां कीं तिनें आपली प्रचंड फडा एकदम वर करून आपल्या लाखों तोंडांनीं त्याला दंश केलाच म्हणून समजा. अशी स्थिति आहे, तर आतां घरांत तरी किती दिवस बसायचें ? आपले जन्माचे सोबती आणखी आपण, दोघांनीं मिळून एकदम जर तिच्या फडेवर जोरानें पाय दिला, तर तिचीं कांहीं तोंडें चेपलीं जातील ना ? तिच्या अंगावर पाय पडला, तर ती आपल्याला चावेल, अशी भीति धरून मरण येईपर्यंत घरांतच चुळबूळ करण्यापेक्षां, आपण आपल्या पतींच्या साह्यानें त्या दुष्ट सर्पिणीच्या नरडीवर

एकदम पाय दिला, तर किती सुख होणार आहे ? याचा आधीं कोणीं विचार केला आहे काय ? आणि त्यांतून आपणां बायकांवर, जो आपण मागें राहून दुसऱ्यालाहि मागें ओढूं पाहण्याचा मोठा आरोप आहे, तो घालविण्यासाठीं चांगलाच नेट धरला पाहिजे ना ? नवऱ्याच्याबरोबर संध्याकाळीं बोलत अगर वाचीत बसण्यानें, अथवा दोन घटका सहल करायला जाण्यासाठी अंमळ पलीकडे पाऊल टाकल्यानेंदेखील जिला आपल्याला ओलांडल्याबद्दल राग येऊन, जी आपल्या लाखों तोंडांनीं सों सों करून अंगावर धावायला पाहते, तिच्या नरडीवर पाय ठेवून तिला ठेंचायची, हे आपण आपल्या पतीला आणि त्याने आपल्याला हात दिल्याखेरीज कधींहि होणार नाहीं, ही गोष्ट तुम्ही कशी विसरतां ? आपल्या एकट्यानें तर होत नाहीं हे उघडच आहे; परंतु त्याच्यानें एकट्याच्यानें तरी कसें होणार ? या सर्व गोष्टी ध्यानांत धरा, आणखी त्या संस्कृत कवीनें सुचविल्याप्रमाणें मागें न घेतां आपण आपल्या दाराशी निजलेल्या रूढिनागिणीच्या नरडीवर पाय देण्यासाठीं एकमेकांचे हात बळकट धरून पुढें सरसावा. ”

हा उपदेश मी ‘ करणार ’ म्हटलें आहे तेथे ‘ केला ’ म्हटलें तर बरें. कारण वरील सर्व लेख पुढे पुष्कळ दिवसांनी बरेच दिवस श्रम करून लिहिलेला, मी आमच्या शनिवारच्या सभेंत एक दिवस एक निबंध वाचला, त्यांतला आहे. ‘ घराच्या बाहेर जाणें ’ हाच तो विषय होता. अजूनदेखील तीं पानें माझ्याजवळ पडलीं आहेत. असो. पण हें बरेंच आडमार्गाला गेल्यासारखे झालें. तेव्हां आपल्या हकीकतीकडे वळावें तें बरें.

आम्ही तेथे हिंडतां हिंडतां सहजच तेथल्या बांकावर बसलो व मग नानातऱ्हेच्या गोष्टी निघाल्या. एकदम गोष्टी निघण्याला कारणहि मोठें चमत्कारिक झालें. आम्ही सर्व मंडळी बोलत बसलो असतांना विष्णुपंतांच्या व नानांच्या ओळखीचा एक गृहस्थ त्यांस भेटला; त्याच्याशीं बोलणें चालणें वगैरे झाल्यानंतर तो निघून गेला, तेव्हां विष्णुपंतांनीं आम्हांला त्या माणसाची हकीकत सांगितली. ती थोडीशी चमत्कारिक होती. त्या गृहस्थाची बहीण सहा वर्षांची असतांना तिचें लग्न झालें, पुढें दहावें वर्ष लागतें न लागतें तोंच नवरा मरून तिच्या जन्माचें मातेरें झालें ! भाऊ चांगला व चांगल्या मताचा असल्यामुळें त्यानें त्या पोरीचें कल्याण तरी व्हावें, तिला आतां संसारसुख नाहीं पण कांहीं चार अक्षरं शिकवून तिची व्यवस्था नीट लागावी, अशा हेतूनें कोकणांतून मुंबईस आणून ठेवलें ! तिला शाळेंत पाठविण्याची तजवीज केली. आईबापांनीं अनर्थापात त्रास दिला, परंतु त्यानें कांहीं ऐकलें नाहीं. आपला योग्य क्रम जशाचा तशाच कायम ठेवला होता. त्याला स्वतःला पगार कांहीं फार नव्हता, यामुळें चाळीतच राहावें लागत असे; तरी पण तो आपला निमूटपणें आपला धंदा बरा कीं आपण बरें अशा रीतीनें वागत व राहात असे. परंतु चाळींतल्या नीच मंडळींनीं त्याला छळून पुरेंसें केलें. त्या पोरीला नाहीं नाहीं तसलीं पत्रें तर लिहिलीं. तिच्यादेखत हजारों तऱ्हेचे नीच शब्द उच्चारले. जितकी म्हणून पाजीपणाची कमाल, तितकी सारी केली. तिच्या बापाला, ‘ तुमची पोरगी उठून गेली. तिला तिच्या भावानें साहेबाकडे पोंचविलें, तिचा परवां पुनर्विवाह

झाला, ती बाटली, ' अशा नाना तऱ्हेच्या मजकुराचीं पत्रें आणि एक वेळ एक जरुरीची म्हणून तारहि पाठविली; भावाला व तिला कितीतरी अचकट विचकट पत्रें आलीं ! तिच्यासंबंधानें जितक्या म्हणून नीच, पाजी अशा कंड्या, तितक्या उठविल्या, आणखी इतक्या सगळ्याला कारण काय ? तर तिनें अजून केस काढले नव्हते आणि ती शाळेंत जात होती. जो काय महदपराध, जें काय अघोरी पाप, तिच्या हातून व तिच्या भावाच्या हातून होत होतें तें हेंच. या पापाबद्दल धर्माभिमानी म्हणविणाऱ्या, उटेचीं उंटे गट्ट करून चिलटासाठीं ' हूं: हूं: ' करून नाकें मुरडणाऱ्या चांडाळांनीं तिचा छळ चालविला. परंतु भावाच्या जिवावर तितक्या सगळ्याना न जुमानतां तिनें दिवस काढले. तिचें शिकणें दिवसानुदिवस चांगलें होत चाललें. ही आतां मोठी कर्ती स्त्री होईल असें वाटूं लागलें. आई वारलीच होती; पण बाप आतां थोडासा मऊ येऊन अगदी बोलेनासा झाला. त्याची महत्त्वाकांक्षाहि वाढत चालली, परंतु दुष्ट काळाच्या मनांत त्याला सुख लाभूं द्यावयाचें नव्हतें; त्यानें तिला एकदम कांहींतरी निमित्तानें हिरावून नेले. तेव्हांपासून तो गृहस्थ अगदीं वेडावल्यासारखा झाला. त्याला या जन्मांत कांही आपलेपणाच वाटेनासा झाला आहे. कोठेंतरी असतो, कांहींतरी करतो. ही हकीकत मीं अगदी थोडक्यांत सांगितली, परंतु विष्णुपंतांनीं ज्या वेळी ती आम्हांला सांगितली, त्या वेळीं आमच्या अंगावर शहारे उभे राहिले. कांहीं कांहीं गोष्टींच्या संबंधानें लोकांनी जो त्या बहीणभावंडांचा छळ केला आहे, तो जर मी सर्व सविस्तरपणानें सांगेन म्हटले, तर एक लहानसें पुस्तकच होईल. असो.

येथें एवढेंच सांगायचें, कीं ती त्या गृहस्थाची विलक्षण व हृदयाला पाझर फोडणारी हकीकत ऐकून आम्ही किती वेळ तरी स्वस्थ एकमेकांकडे पाहात, अगर उदासपणें समुद्राकडे बघत व उगीच मधून मधून ' काय हें ! छे छे ! अनर्थ आहे नुसता ! ' असें म्हणत कांही वेळ घालविल्यानंतर मन थोडेंसें शांत झाल्यावर त्या संबंधानेंच बोलत होतों. आमच्या तिकडे तर म्हणायचें——

" लोक, लोक, म्हणून जर कोणी एकच व्यक्ति असती, तर आपण त्याचा या असल्या नीच कृत्याबद्दल प्राणच घेतला असतां. धर्माभिमानाचें थोतांड करून काय शिंचे विनाकारण लोकांचा छळ करतात. नीच ! नीच ! अरेरे, अशा पोरीचा असा अंत व्हावा का ? "

" वा ! रघुनाथराव, " नानासाहेब म्हणाले, " तुम्ही असे बोलायला लागलां म्हणजे आम्हांला गणपतरावाची आठवण होते. तो असं कांहीं ऐकलं कीं असा संतापायचा की काही पुसायला नको. या गृहस्थांची मूळ ओळख त्याचीच. त्याच्यावरून आम्हांला मग हे ठाऊक झाले. तो यांच्या त्या बहिणीच्या छळाची गोष्ट निघाली कीं संतापून नेहमीं म्हणायचा, ' अहो, असले नीच तऱ्हेचे छळ आणखी जुलूम ज्या देशांत होतात त्याच डोकं वर निघतं आहे कशाला ? दिवसानुदिवस खालींच जायचं अन् तेंच आम्हांला योग्य, दुसरं कांहीं नाहीं ! ' "

" खोटं नाहीं तें ! " लक्ष्मीबाई एकदम म्हणाल्या, " भावजी म्हणतात तें यत्किंचित्‌देखील खोटं नाहीं असंच व्हायचं. गरीब गाईचा जिथें छळ तिथें हेंच. कसायाचं डोकं वर झालेलं पाहिलं आहे कोणीं ? आपल्या त्या हिची गोष्ट ठाऊक आहे ना ? नुसतं वपन केलं नाहीं एक वर्षभर, तर काय काय तिच्या बापावर आणखी आईवर गहजब गुदरला गांवांत तो ! "

" हीः ! त्याला करणार काय पण ? कांहीं इलाज आहे का ? जुलूम होतात, नेहमीं कानावर येतात, पण त्याचा उपयोग काय ? आपल्या आपल्याच ठिकाणीं शिव्या-शाप देत बसायचं ना ? " मी यशोदाबाईकडे पाहून म्हणालें.

" त्याला उपाय काय ? ज्यानं त्यानं आपल्या घरांत केली खटपट तर...... " नानासाहेब हे शब्द पुरते उच्चारतात न उच्चारतात तों--

" तें कांहीं नाहीं. तसं कधींच जुळत नाहीं, अहो, घरांत नव्या विचारांचा माणूस असणार एक नाहीं तर दोन, आणखी बाकी असणार भाराभर, तेव्हां तें कसलं प्रत्येकाला जुळणार ? नुसता रुढीच्या विरुद्ध शब्द काढायचा अवकाश, कीं आलींच सारीं काव काव करून चोचींनी टक्के काढायला ! " तिकडून मोठया आवेशानें म्हटलें.

" मग तुमचं म्हणणं काय ? " नानासाहेबांनीं विचारलें.

" आमचं म्हणणं काय ? चांगला सरकारचा कोरडा पाहिजे. तरच.. ..." परंतु पुढें तें बोलणें तितकेंच राहिलें. कारण एक गृहस्थ दुरूनच 'कसं काय ?' असें म्हणत जवळ आला.

तो गृहस्थ मध्येंच आल्यानें आमच्या बोलण्याचा रसभंग झाला आणि तितक्यांत वेळ किती झाला, इकडे लक्ष जाऊन आम्ही घरीं जाण्यास निघालोंच. त्या रात्रीं माझें मन त्या पोरीची हकीकत ऐकून किती अस्वस्थ झाले होतें याचें वर्णन करून सांगणें शक्य नाही. आज ती सर्व हकीकत दुप्पट जोरानें माझ्या नजरेसमोर उभी राहिली आहे आणि त्यामुळें या वेळीं तर माझें मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें आहे. देवा ! काय आम्हीं असे पाप केलें आहे, कीं आमचा सारा जन्म त्रासांत आणखी छळांतच जायचा !

◆ ◆ ◆

## ७० : दिवाळींतील हकीकत

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

दिवाळी जवळ आली. पुण्याला जायचें नाहीं हा आमचा पक्का निश्चय. यामुळें सुट्टी होती तरी पुण्याला जाण्याचें आतां आमच्या स्वप्नांतदेखील आलें नाहीं. तरी पण मुंबईची दिवाळी पाहण्यासाठीं येण्याविषयीं सर्वांस पत्र लिहिले पाहिजे होतें आणि त्याप्रमाणें सासूबाईंच्या संमतीनें पत्र लिहिलेंहि. कोणी येईल असें मला तर कांहीं वाटलें

नाहीं. आजेसासूबाई आणि धाकटया मामेसासूबाई पिळाच्या. लेकीच्या इथें काय म्हणून जायचें ? म्हणून आजेसासूबाई यायच्या नाहींत. धाकटया मामेसासूबाई पडल्या थोडयाशा मानी, तेव्हां त्याहि यायच्या नाहीत. येण्याजोग्या काय त्या उमासासूबाई, परंतु त्या आतांशा आजारी आजारीच असून आपल्या यजमानांच्या हातीं ! यजमान त्यांना कुठलें येऊं यायला ? अशी एकंदर व्यवस्था ! बनूवन्सं आल्या तर यायच्या, पण त्यांचें लहरीवर. थोडुभावजींना शंकरमामंजी आमच्या सुधारकांच्या घरीं पाठवितात कसले ! तेव्हां आपले आम्हीं पाठवायचें म्हणून पत्र पाठविलें इतकेंच. मीं दादालाहि " परीक्षेला येणार तो चार दिवस आधींच यायचें जमलें तर पाहा " म्हणून लिहिलें होतें. त्याचेंहि ' बहुशः येईन ' म्हणून पत्र आलें होतें. तो आल्यास वहिनीलाहि आणावें अशी माझी इच्छा, पण तो कसली सफल होते ? आधीं बाबा धाडणार, त्यांत दादासाहेब आणणार— आणखी सगळ्यांत शेवटची व अत्यंत महत्त्वाची गोष्ट ही, कीं ती स्वतः यायला कबूल होणार ! कांहींच शक्य असेलसें मला वाटलें नाहीं. मीं आपल्याकडून दिवाळीसाठीं दादाला व वहिनीला पाठवावे म्हणून बाबांना तिकडच्या हातून पत्र लिहविलें होतें. त्याचा उपयोग एवढाच झाला, कीं दादा येणार असे नक्की ठरले, इतकेच ! सासरीं पाठविलेल्या पत्राचें जें व्हावयाचेसें वाटलें होतें तसेच झालें. आमचें पत्र गेल्याबरोबर गोपाळमामंजींचें नीट लिहिलेलें पत्र आलें. त्यांत " कोणाला यायला होईलसें वाटत नाहीं; तुम्हांलाच यायला होईल तर यावें, " वगैरे लिहिलें होतें. परंतु दुसरें पत्र जें लांबलचक होतें, तें कांहीं विचारूंच नका. त्यांत आम्हांला यथास्थित पुष्पांजळी असून शेवटीं, ' अशा तऱ्हेनें कुळाला कलंक लावणारें आपलें वर्तन असून पुनः आणखी लोंचटाप्रमाणें तुम्ही आम्हांला वारंवार पत्रें ल्याहावीं, आणखी आम्हाला चिडवायला पाहावें, यांत तात्पर्य काय ? आमचें कोणाचें—मी जोंपर्यंत जिवंत आहें तोंपर्यंत— नखदेखील तुमच्या घरांत दृष्टीस पडायचें नाहीं. " इत्यादि इत्यादि मजकूर यथास्थित होता. हें पत्र कोणाचे होतें हें कांहीं आतां मी सांगायला पाहिजे असें नाही. परंतु सांगायला पाहिजे तें एवढेंच कीं, दिवाळीच्या आदल्या दिवशीं सकाळीं सात वाजण्याच्या सुमारास वरील पत्र लिहिणाराचें--नखचसें काय ? पण सबंध शरीर व त्या शरीराबरोबर एक लहानसा मुलगा आणखी एक तरुणशी मुलगी इतके सर्व आमच्या घरांत येऊन दाखल झाले. अत्यंत अत्यंत आश्चर्याच्या गोष्टी घडल्या असल्या, तरीदेखील आम्हांला जितकें आश्चर्य वाटलें नसतें तितकें त्या वेळीं वाटलें. कारण शंकरमामंजींची चमत्कारिक वृत्ति जरी आम्हांला पुरी कळली होतीसें वाटत होतें, तरी पण आपल्या स्वदस्तुरच्या पत्रामागोमाग, ' म्हटलं; लोक सांगतात, बोलतात त्यांत कांहीं तथ्यांश आहे, कीं आपलं उगीच आमच्या मनांत कांहींतरी लोकांनीं विनाकारण भरवून दिलं आहे ? एकदा प्रत्यक्ष जाऊन पाहावें ' चक्षुर्वै सत्यं ' असें म्हणत शंकरमामंजी येते असें आमच्या स्वप्नींदेखील आलें नाहीं. त्यांचें पत्र आलें तें वाचून आम्हीं कितीतरी त्यांच्या पत्राची थट्टा केली; कारण, एक तर त्यांना मुळींच पत्र लिहिलेलें नव्हतें. पत्र लिहिलें होतें

गोपाळमामंजींना. त्यांचे रीतीप्रमाणें काय पत्र यायचें तें आलेंसुद्धां. परंतु त्यांनीं तें पत्र आपल्यालाच म्हणून चिकटवून घेऊन सव्वाहात लांब असें एक आमच्या व एकंदर सुधारकांच्या निंदेचें पत्र लिहिलें. तितक्यांतच सरलें एवढें पाहून आम्ही आपलीं मजेंत होतों. आतां दादा आला म्हणजे बरें होईल. त्याला मी असें सांगेन, तसें सांगेन, हें विचारीन, तें विचारीन या विचारांत मी आपली होतें तों दादाच्या आधींच या त्रिमूर्ति दत्त म्हणून उभ्या राहिल्या !

कोणीं जर आमच्या अंगावर एखादी धोंड आणून टाकली असती तरीदेखील जितकें भय वाटलें नसतें, इतकें भय मला तरी निदान त्या दिवशीं वाटलें. आतां ही स्वारी काय करणार आणि काय नाहीं याची कांहीं कल्पनाच होईना. तथापि, मीं आपल्या मनांत तर असा पक्का निश्चय केला कीं काय होईल तें होवो, आपला सुधारलेपणा यांना उच्चारण्याला यत्किंचित्‌देखील जागा द्यायची नाही; परंतु शेवटीं कडू कारल्याच्या म्हणीचा खरेपणा त्यांनीं आमच्या अनुभवास कसा आणून दिला हें आतां मी थोडक्यांत त्या प्रसंगाची हकीकत देतें आहे त्यावरून समजेल.

आमची सर्वच मंडळी, त्यांच्या भयानें आतां विशेष सावधगिरीनें वागूं लागलों. विष्णुपंतांनीं सोंवळ्याओंवळ्याचा विचार थोडाबहुत कमी केला होता, तो त्यांनीं आमच्यासाठीं पुनः कद वगैरे काढून वाढविला. नानांची तर आपली पहिल्यापासून आमच्याप्रमाणेंच पद्धति असे. कारण त्यांचा आणि आमचा एक विचार, कीं त्या गोष्टीं-वर आपला भरंवसा नाहीं, तरी वडील मंडळींच्या मर्जीसाठीं त्या यःकश्चित् गोष्टी करण्यास काय हरकत आहे? त्यांत कोणत्याहि गोष्टीचें नुकसान नाहीं. कांहीं नाहीं. विष्णुपंतांना सध्यां तसें कोणी नसल्यामुळें त्यांनीं थोडीशी ढिलाई केली, यांतहि कांहीं विशेष नव्हतें. अशी ढिलाई होईल, त्यानें केल्याखेरीज, हीं आचरट सोंवळ्याओंवळ्याचीं वेडें जावीं तरी कशीं! कोणीं जरी यत्किंचित् विचार केला, तरी त्याला सोंवळें आणि स्वच्छपणा या दोहोंतला अगदीं मूळचा एकपणा जाऊन, त्या दोहोंचें पुष्कळ अंशांनीं अतिशय वांकडें आलें आहे, हें सहज दिसणार आहे. पुरुषांचा मुकटा बिचारा सोंवळें या नांवाला किती योग्य असतो? त्याला वर्षावर्षांत पाणी मिळालें नाहीं म्हणजे त्याची स्वच्छता किती असते, या गोष्टी डोळ्यांपुढें न आणणें हेच चांगलें. लोंकरीचें कापड, धाबळ्या वगैरे, त्याचप्रमाणें रेशमी कपडे, पीतांबर वगैरे हीं पडलीं मोलवान्, तीं धुऊन धुऊन खराब झालीं तर पुनः पुनः थोडींच सांपडणार आहेत! तेव्हां पशूंच्या अंगावरील कातरून काढलेली लव जरी ती असली तरी, आणि किड्यांच्या पोटांतून निघालेले तंतु जरी असले तरी त्यांचा सोंवळेंपणा आटोकाट; मग त्याला वर्षावर्षांत—किंवा दहा, वीस, पन्नास, साठ वर्षांत पाणी मिळालें नसलें तरी हरकत नाहीं. तेंच जर कापसाचें असलें, व जरी इतक्यांत धुऊन वाळत घातलें असलें, तरी त्याला कोणाचा खांदा किंवा बोट लागलें कीं गेला त्याचा सोंवळेपणा, काढा त्याला तेथून आणखी आणा बुचकळून पाण्यांत. 'ऋषीचें कूळ, नदीचें मूळ' आणखी आतां तिसरें मी त्यांत घालतें, 'सोंवळ्याचें खूळ!' तिहींचा

विचार न करावा तितका चांगला. मात्र हें खूळ जाईल तितकें घालवून लावावें. पण मी हें काय करतें हें ! शंकरमामंजी आल्याबरोबर त्या वेळीं जशी मी भांबावलें, तशीच मला वाटतें मी आजहि नुसत्या त्यांच्या आठवणीनें भांबावून अप्रासंगिक लिहितें आहें. असो. शंकरमामंजी आले तो दिवस संध्याकाळपर्यंत तर बरा गेला. मला काळजी पडली होती आतां दादाचीच. तो येतो आहे कीं नाहीं? तो केव्हां येईल आणि आम्ही मोठ्या आनंदानें केव्हां एकदा बसूं असे मला होऊन गेले होतें. दुसरे दिवशीं सकाळीं तोहि आला, मला मोठा आनंद झाला; परंतु शंकरमामंजी आलेले त्यानें पाहिल्याबरोबर त्यांच्याकडे पाहून जो त्यानें चेहरा केला आहे तो कांहीं विलक्षणच ! त्याचे आणखी त्यांचें मोठें सूत, हे सार्‍यांना कळलेंच आहे. त्यांना तो फारच शिव्या देई, आणखी मध्यंतरी ज्या मजविषयीच्या कंड्या त्यांनीं उठविल्या होत्या त्या कंड्या बुधवारांत ज्याच्या त्याच्या तोंडी व्हाव्या म्हणून ज्या कांहीं खटपटी त्यांनी केल्या होत्या, त्या सर्व त्याला आठवून त्याचा संताप दुणावला. तो मला एकीकडे म्हणाला, "यमूताई, याला लाज नाहीं का वाटली यायला ? तुमच्याविषयीं पाहिजे तसं बोलतो, हवी ती निंदा करतो, आणखी पुनः तुमच्या इथे तयारच ! आतां याला काय म्हणावें ?" असें बोलायला लागला म्हणजे त्याला मोठें स्फुरण चढे. त्याप्रमाणें याहि वेळीं चढून तें आवाजाच्या मोठेपणानें बाहेर दिसून येऊं लागलें. मीं त्याला "अरे बाबा माझ्या, उगीच बैस. चार दिवस आतां अगदी बोलू नकोस कसा !" म्हणून निक्षून सांगितलें. कारण, ते जरी त्या वेळीं जवळ नव्हते, तरी बनूवन्सं होत्या; त्या केव्हां कुठून आणखी काय ऐकतील त्याचा मुळींच नेम नव्हता. बरें, कांही ऐकून त्याच्यावर खोटयानाटया गोष्टीचें किती वेष्टण देतील याबद्दल तर त्याच्याहिपेक्षां नेम नव्हता.

दादा आल्यानंतर जी काय मजा होणारसें मला वाटलें होतें, तें कांहीं झालें नाहीं किंवा दिवाळीत सर्वांना सुटी, तेव्हां एकदर जो काय आनंदीआनंद करायला सांपडेलसें आम्हांला वाटलें होतें, तेंहि खरें झालें नाहीं, हें आतां निराळें सांगायला पाहिजे असें नाहीं. कारण म्हण आहे कीं मणभर दुधांत एक बारीक जरी मिठाचा खडा टाकला, तरी त्या सर्व दुधाची माती होते. त्यांत खरेपणा किती आहे, याचा अनुभव मीं कांहीं कधीं घेऊन पाहिलेला नाहीं, पण आमच्या सुखदुःखांत ही एवढी थोरली मिठाची गोणी येऊन पडली—मिठागरच येऊन पडलें म्हणा ना !—तेव्हां त्याची कशी काय घाण झाली असेल, याची कल्पना करून पाहावी. शंकरमामंजींच्या भयामुळें, आम्हांला मनसोक्त बोलायबसायलाहि सांपडलें नाहीं. बनूवन्संच्या नेहमीं कुरठलेपणानें घरांत कांहीं करायला सुचेना. त्यांची मनधरणी करण्यासाठीं यशोदाबाईंनीं आणखी लक्ष्मीबाईंनीं किती तऱ्हा केल्या म्हणतां माझ्यासाठीं, पण त्यांचें वांकडें बोलणें आणि तिकडें तोंड काडीभरदेखील सरळ झालें नाहीं. माझ्याशीं बोलायचें म्हणजे कपाळाला आंठ्या आल्याच !

लक्ष्मीबाईंनीं त्यांस "कशिदा काढायला शिकवितें, या" असें एकदा म्हटलें, तेव्हां "आम्हांला नको तो तुमचा मडमीचा कशिदा. आम्हांला गरिबाला तो काय करायचा

आहे ? " हें आपल्या नेहमींच्या रीतीप्रमाणें तोंडाचा चंबू करून त्यांनीं उत्तर दिलें. पण त्या फार सहनशील, त्यांनी त्याचें यत्किंचित्‌देखील कांहीं वाटूं न देतां "अहो, मडमीचा कसला न् आपला कसला ? कशिदा एकच. पाहा तर खरी मी दाखवतें तो ! " असें म्हणून त्यांनीं फारच आग्रह केला. पण वन्सं कांहींच केल्या ऐकेनात. यशोदाबाईनीं सहज त्यांना कुठें " कांहीं ल्याहावाचायला येतं का ? " म्हणून विचारलें, त्याबरोबर " ल्याहायला येतं, वाचायला येतं, लेक्चर का फेक्चर म्हणतात तें येतं, झालं म्हटलं तर हातांत हात घालून हिंडायला येतं " असें आचरट उत्तर दिलें. मी तेथें जवळच होतें. माझ्या अंगाचा इतका अगदीं संताप झाला, की ज्यांची आणखी त्यांची मुळीं ओळखच नव्हती. त्यांच्याजवळ अशा तऱ्हेचें बोलणें म्हणजे आहे तरी काय ? या स्वभावाला म्हणावें तरी काय ? आणखी शेवटीं जेव्हां ' झालं म्हटलं तर हातांत हात घालून हिंडायला येतं, ' असें जेव्हां त्यांनीं म्हटलें, तेव्हां माझ्या अगदीं जिभेवर शब्द आले होते बोलायचे, पण मूग गिळले. अगदी म्हणणार होतें, ' खेटरधऱ्या हातांत हात घालून न्यायला असेल तर की नाही कोणी ? नवरा तर खेटरावारीदेखील विचारीना ! ' असें मीं म्हटलें असतें तर ' अग बाई ग ! काय त्यांनीं केलं असतं, आणखी काय नाहीं ! आणखी मी बोललें नाहीं, विवेक केला, इतकेच नव्हे तर पाठीमागून विचार करतां तिच्या त्या बोलण्याचा राग येण्याऐवजीं तिचें बिचारीचे मन असें कुचकट नासकट होऊं नये, तर तिने काय करावें ? तिच्याकडे काय त्याचा दोष ? असेंच वाटलें. मीं मात्र त्यांच्याजवळ लिहिण्यावाचण्याची कीं शिवण्याटिपण्याची गोष्ट काढलीच नाही. आपण-होऊन त्यांच्याशीं बोललेच नाहीं म्हणा ना ? त्या बोलल्या म्हणजे त्यांच्याशीं नीट बोलायचं, त्याचें कांहींसुद्धां कमी पडूं द्यायचें नाहीं, त्यांचें लुगडें चुणण्यापर्यंत सगळें यथास्थित करायचें असा क्रम चालविला होता अशीच एक दिवस मी त्यांचे लुगडें चुणीत होतें. त्या पलीकडे अंग धूत होत्या. तिकडून दादा आला; त्याला तें कांहीं ठाऊक नाही तो आपला मला हसत हसत म्हणतो, " ओ हो, नकटुवन्संचं लुगडं चुणून ठेवावं का लागतं ? " अन् तें बाई त्यांनीं ऐकलें, आणि मग काय विचारायचें आहे ! तावातावानें येऊन झटकन् माझ्या हातचे लुगडें ओढून घेऊन त्या म्हणतात, "खबरदार माझ्या लुगडयाला हात लावीत जाशील तर ! माझा गळा कापशील तर लावशील हात ! आम्हांला घरदार नव्हतं म्हणून आलो कीं नाहीं असलीं बोलणीं ऐकून घ्यायला ! मोठी अगदी रंभापुतळी पडलीस ती ठाऊक आहे ! मी कशी असलें तरी तुला नाहीं ना त्याचं कांहीं ? " आणखी जी रडायला सुरुवात झाली ! त्या दिवशीं त्या जेवल्या नाहीत. " तुमच्यावांचून मी जेवणार नाहीं, " असें म्हणून मीं ऐन नरकचतुर्दशीच्या दिवशीं उपास काढला. त्यांच्या पायां पडलें, नाक घासलें, त्यांच्या नाना तऱ्हेनें विनवण्या केल्या, पण मुळीं रामाचें नांव ! दुःखांत सुख एवढेंच कीं त्यांच्या त्या रागाच्या सपाटयांत त्यांना मामंजींनीं काय झालें, काय नाहीं, विचारलें असतांनादेखील त्याचें स्पष्ट कारण त्यांनीं सांगितलें नाहीं. तें त्यांनीं कसें तसेंच ठेवलें याचें मला मोठें आश्चर्य

वाटलें. " कांही नाहीं " हे शब्द आणि रडणें यापलीकडे कांहींदेखील त्यांनीं केलें नाहीं. पुण्यास गेल्यानंतर, त्यांनीं जे कांहीं त्या गोष्टीवर अकांडतांडव केलें, तें कांहीं पुसूंच नये. एक तर आधीं तें सारें मीं म्हटलें, इतकेंच नव्हे तर त्याच्या मागें व पुढें पुष्कळ विशेषणें लावून त्याचे एक पुराणच त्यांनीं बनविलें. असो. ते दिवशी त्या संध्याकाळीं जेवल्या. तोंपर्यंत अर्थातच मलाहि त्यांच्याबरोबर उपास करावा लागला. हे उगीच एक दोन मासले सांगितले. आमच्या एकंदर सुखांत माती कालविण्याजोगे असे किती प्रकार झाले असतील ते कांहीं सांगतांच येत नाहींत.

वडिलांची हकीकत तीच होती. आणि धोंडूभावजी आतां एवढे थोरले झाले, पण त्यांचा आचरटपणा काडीइतकादेखील कमी झाला नव्हता. आत्याबाईजवळ खायला मागणें, आणखी तिकडे फटाकडे मागणें यांखेरीज दुसरें कांहींच त्यांना सुचेनासें झालें होतें. पाडव्याच्या दिवशीं तर त्यांनी आमच्या तोंडचें पाणीच पळविलें. केव्हां खालीं जे डोळा चुकवून रात्रीं गेले, ते आपले बाहेर गेले, आदल्या दोन दिवशी आम्ही गाडया करून दिवे पाहण्यासाठी हिंडलो, तेवढ्यानें तृप्ति न होऊन त्यांनी आपली अंगरखा टोपी चढवून बाहेरचा रस्ता धरला! कोणाला कळवलें नाहीं, कांही नाहीं, आम्ही समजत होतों खालीं कुठें फटाकडे उडवीत असतील. बराच वेळ झाला, तरी जेव्हां येईनात, तेव्हां शोध केला, तर आहेत कुठें धोंडूभावजी? आसपास सगळीकडे शोध करून करून दमायचें. कुठें ठाकूरद्वारच्या रस्त्याला, कुठे मार्किटाकडे, चारी दिशेला माणसे गेलीं. बिचारे नानासाहेब, विष्णुपंत व दादादेखील त्यांना शोधण्यासाठी गेले. वनूवन्संनीं रडण्याला सुरुवात केली. मामजींनीं "त्याला जाऊं कसं दिलं? एवढीदेखील त्याच्यावर नजर कशी ठेवली नाही? " हेंच चालविलें.

मुलगा कांहीं लहान कुकुलें बाळ होता तर त्याला नजरेच्या बाहेर जाऊं द्यायचें नाहीं? शेवटीं रात्रीं दोन वाजण्याच्या सुमाराला स्वारी आली. ते आले कसे न चुकतां, याचें मोठें आम्हांला आश्चर्य वाटलें. कारण त्यांना माहिती नाहीं अन् रात्रीची वेळ. पण पुढें लागलीच त्या शंकेचें निराकरण झालें. आमच्या पलीकडच्याच वाडींत एक सोनाराचा का परभाचा मुलगा होता, आणखी त्याचा यांचा दोन तीन दिवसांत स्नेह जमून त्याचें आणखी यांचें आज रात्रीं अमुक वाजतां जायचें असें ठरलें होतें त्याप्रमाणें स्वारी गेली. आमच्या मनांत काय विचार आले, आणखी काय नाहीं? पण एकदाचे सुखरूप आले एवढ्यानें पुढें कांहीं वाटलें नाहीं. ते आलेबिले व आमची सगळी काळजी दूर झाली; अन् मग वडिलांना जो राग आला! त्यांनीं एवढ्या थोरल्या त्या मुलाला नाहीं नाही त्या शिव्या देत मारण्याला सुरुवात केली. ताडताड लगावीत होते आणि तोंडानें "मुंबईस आल्याबरोबर कारटीं कशीं स्वतंत्र होतात पाहा!" हें एकसारखें चाललें होतें. दोनचार सपाटे खाण्याबरोबर धोंडूभावजींनीं पटकन् एकदम, "खबरदार जर मला माराल तर! मी कांहीं आतां लहान नाहीं. कांहीं कुठें रांडांच्या घरीं गेलों नव्हतों कीं दारू प्यायला गेलों नव्हतों," असें म्हटलें, आणि कांहीं विलक्षण रीतीनें ते

बापाकडे पाहायला लागले. आम्ही दोघीतिघी थक्क झालों. बाकी मंडळी अजून शोधासाठीं बाहेरच गेली होती. शंकरमामंजी अगदीं लाल झाले, आणखी "नीघ माझ्या दृष्टीसमोरून नाहीं तर ठार करीन!" असें म्हणून अंगावर धावले. धोंडूभावजी "मारा पाहूं?" असें म्हणून पुढेंच छाती करून उभे राहिले. माझ्या अंगाचा थरकांप होऊन मी लटलट कांपायला लागलें. पण तितक्यांत तिकडून यायचे होऊन धोंडूभावजींना मागें ओढून पलीकडे नेलें. त्यांचे "मारताहेत! अगदीं वाटेवरच असेल ठार मारणें!" असे शब्द एकसारखे चाललेच होते. शंकरमामंजी इतके संतापले होते, कीं त्यांचे ओंठ थरथर कापून तोंडांतून शब्द निघेनासा झाला. शेवटीं त्यांनाहि शांत करून एकीकडे नेऊन निजविलें; तथापि त्यांचेहि "आतां कारट्याचें पुनः तोंड पाहीन तर शपथ! कारट्यानं माझ्या तोंडाला काजळ फासलन्" असे शब्द चाललेच होते व सगळया आश्चर्यांत आश्चर्य हें कीं हा सर्व मुलाचा प्रकार त्यांनीं मुंबईस येण्यामुळें झाला असे ठरविलें! अशा मौजा ज्या दिवाळींत झाल्या, ती दिवाळी कशा सौख्यांत गेली, त्याबद्दल आम्हांला किती आनंद झाला, इत्यादि गोष्टी आतां वर्णन केल्याखेरीज सहज समजणार आहेत की नाही? तथापि आणखी एक गोष्ट विशेषतः सांगितली पाहिजे. ती सांगितली नाहीं तर वाचणारांना आमच्या दिवाळीची पुरी माहिती होणार नाहीं. दिवाळी तर आतां संपली. दोनचार दिवसांत मंडळी जाणार होती. शंकरमामंजींची रजा संपत आलीच, तेव्हां आतां जाण्याची तयारी करायची. शंकरमामंजींनीं एक लांबलचक यादी काढली घेऊन जाण्याच्या जिनसांची. त्याची प्रस्तावना कशी केली ती पाहा! "काय शिंच्या या लोकांना म्हणावं? जिनसा आणायला सांगतात पण आधीं पैसे देतील तर शपथ! एक म्हणतो आमचं तें हें घेऊन या. एक म्हणतो तें घेऊन या. इथें आल्याबरोबर पैसे देऊं. अरे! पैसे आधीं कां नाहीं देत? कांहीं आधीं द्यायला आम्ही नको म्हणतों आहोंत? पण नाहीं. जशी कांही आमच्याजवळ पैशाची खाण लागली आहे! गाढव लोक! यांना कांहीं समजत नाही. एकदोघांना—आपले जरा असेच होते— मीं स्पष्ट सांगितलं, कीं बोआ पैसे आणून द्याल तर मी आणतों तुमच्या जिनसा, नाहीं तर कांही व्हायचं नाहीं—हो असल्या कामात अगदीं चोख असलेलंच बरं! काय हो नानासाहेब, मी म्हणतों असंच कीं नाहीं' पण त्यांत लचांड आणखी असं असतं. कांहीं मंडळींना असं सांगण्याची सोय नसते. हो, त्यांचा आपला जरा कांहीं निराळा संबंध असतो, तेव्हां हो म्हणावं लागतं. करता काय! अन् हो म्हणावं लागतं, इतकंच नव्हे, पण आपला जीव गहाण ठेवून तं जिन्नस न्यावे लागतात. बरं, मी यायला निघालों, तेव्हां जवळ रुपये सारे दहा. पगार यायला अजून अवकाश होता; म्हटलं, आहे रघु, त्याच्यापासून घ्यावे तिथें अन् मग ताबडतोब ज्याचे त्याला जिन्नस पावते करून रुपये गोळा करावेन् पाठवून द्यावे. कांहीं जिनसा फार नाहींत. कुठें दोनचार विलायती शालींनाच काय पडेल तेवढें; बाकी सटरफटरच जिनसा आहेत. कुठें वेणीफणीच्या पेटया, मुलांच्या बाहुल्या, अमुकतमुक हेंच. दुसरें काय? टाक आणून एकदा केव्हां एकदोन दिवसांत म्हणजे झालं!" अशी

प्रस्तावना झाल्यानंतर आतां आम्ही काय करणार ? ” बोला, चुंबित कांहींतरी आलाच कीं नाही पदराला खार लावण्याचा प्रसंग ? हे जिन्नस दुसऱ्यासाठीं जरी असले तरी आम्हांला त्यांच्या किमतीवर उदक सोडण्याचीच पाळी होती ना ? त्यांत तर कांही शंका नव्हती. गेल्या जिनसांबद्दल पैसे येतील कीं नाहीं याबद्दल आम्हांला मुळींच शंका नव्हती. कित्येक जिनसांवर कदाचित् चार चार आणे जास्तीच किंमत येईल असेंहि आम्हांला वाटत होतें; परंतु शंका एवढीच होती कीं ते पैसे आमच्याकडे येतील कीं नाहीं ? शंका कशाला ? येणार नाहींत अशी खात्रीच होती, परंतु दुसरी वाट काय ? आलीया भोगासी असावें सादर ॥ ' या म्हणीचा उच्चार करून घरांतून पैसे काढावे लागले. तेच दिवशीं वन्सं आपल्या वडिलांजवळ एक छिटाचें पातळ घेऊन देण्यासाठीं पाठीस लागल्या. आमच्या मनांतून त्यांना दिवाळीबद्दल एक चांगली अमदाबादी जरीकाठी चोळी शिवायची होती, त्याप्रमाणें एक खण आणवून मी शिवण्याला लागलेंहि होतें. आमच्याजवळ तर त्यांना कांहींएक मागायचें नाहीं. वडील किती देणार तें ठाऊकच होतें, तरी पण त्यांच्याजवळ त्यानीं मागून घेऊन देण्याविषयीं हट्ट धरला. “ आपल्या गृहस्थाच्या घरात हे असले छिटाच्या पातळाबितळाचे चाळे उपयोगाचे नाहींत; मी घेऊन द्यायचा नाही, अन् माझ्याजवळ पैसे नाहींत, ” असें त्यांनीं निक्षून सांगितलें, तेव्हां पाय आपटीत आपटीत आंत आल्या मी बसलें होतें तिथे आणखी तोंडानें म्हणतात, “ त्या बसंतीच्या रांडेच्या उरावर घालायला हवं तेवढं...” पुढे आणखी त्या काय पुटपुटल्या तें मला ऐकूं आलं नाहीं; पण तितक्यांत त्यांचे बंधु त्यांना म्हणतात, “ अग ताई, बसंतीच्या मुलांना टोप्या दिल्या त्या नाहीं का तुला ठाऊक ? ती तुझी आई हो अन् तिला असं म्हणतेस का ? ” अन् मग जेव्हा का दोघांचें बोलणे सुरू झालें आहे ! मी त्या बोलण्याचा इत्यर्थ समजून जास्त ऐकण्याची इच्छा असतांहि तेथून उठून चालती झालें. त्याचें तें तसले बोलणें मला ऐकूं नयेसेंच वाटलें. त्यांनी ज्या नावाचा उच्चार केला व त्यांच्या त्या उच्चारण्यांत जो अर्थ होता तो मला आजपर्यंत ठाऊक नव्हता, किंवा माझ्या कानावर नव्हता असें नाहीं; परंतु तसल्या गोष्टीचा उल्लेख माझ्या हातून होऊं नये असें मला वाटत असल्या मुळेंच मी आजपर्यंत तें कांहीं काढलें नाहीं. शंकरमामंजी एवढे धर्माभिमानी म्हणवितात, परंतु त्यांच्या खाण्यापिण्यांत व इतर कित्येक गोष्टींत कितपत धरबंद होता, हें मला तिकडून व दादाकडून पुष्कळ दिवसापूर्वीं कळून आलें होतें, तें सर्व या दोघां मुलांना ठाऊक असेल, असें मला वाटलें नव्हतें; परंतु आज तें सर्व बाहेर पडून त्यांचें आपल्या बापाविषयींचें मत काय होतें व त्यांच्या वर्तनाची माहिती कुठवर असून त्यांच्याविषयीं त्यांची प्रेमबुद्धि व आदरबुद्धि कितपत होती हें जेव्हां माझ्या नजरेस आलें, तेव्हांची सर्व आठवण होऊन, हें सर्व लिहावेंच असें माझ्या मनांत आलें आहे. असली गोष्ट लिहून काय करायचें आहे असेंहि वाटत आहे. परंतु प्रत्यक्ष मुलें आपल्या तसल्या बापाविषयीं काय बोललीं हें सांगितल्यानें कदाचित् पुष्कळ लोकांच्या डोळ्यांवरलें भुरळ

नाहीसें होईल, असें वाटून मीं हें लिहिलें आहे. प्रत्यक्ष आपल्या पोरांनी आपल्याविषयीं असें बोलावें, टीका करावी हें वाईट; परंतु जेथें जागा आहे, तेथें तसें झालें, तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें तरी कारण काय ?

दुसरे दिवशीं मी तिकडे मांगून वन्संना पातळ कसलें पाहिजे, काय पाहिजे तें विचारलें आणि आणूनहि देवविलें; परंतु त्या कांही केल्या तें घेईनात. निदान पहिल्यानें तरी त्यांनीं तमा फार आव आणला. बापलेकीचें व बापलेकाचेंहि मुळींच आपण नाहीं, यामुळें जाण्याची गोष्ट कोणीच काढीना, तथापि शकरमामंजींची रजाच संपत आल्याकारणानें त्यांना जाणें भाग होतें; तेव्हां दुसरे दिवशीं जायचें तर आज त्यांनीं " मी आपला एकटाच जाणार ' मला हीं कारटीं नकोत. धोंड्याला तर मी घरांत पाऊलहि घालूं देणार नाहीं माधुकरी मागायला लावतों आतां कारट्याला ! मला उत्तर करतो. हा एखादे दिवशीं माझा खून करायला कमी करायचा नाहीं. ही कारटी त्यांतलीच ! " असें एकसारखे अकांडतांडव चालविलें होतें. आम्हांला मोठें भय पडलें होतें, की हे खरोखरीच आपल्या म्हणण्याप्रमाणें दोघां बहीणभावंडांना येथें ठेवून जातात कीं काय ! पण तसे कांहीं झालें नाहीं. वन्नूवन्संनीं मी इथें राहायची नाही म्हणून हट्ट धरला आणि धोंडूभावजी तर प्राण गेल्यानेंहि येथे राहिले नसते. कारण त्यांना पक्कें ठाऊक, कीं येथें पुण्याच्या इतकी स्वतंत्रता मिळाली नसती. तें कांहीं जरी असलें, तरी पण आम्हांला चांगला ५०–७५ रुपयांचा अधिकच–चट्टा लावून त्या मूर्ति चालत्या झाल्या.

आम्हांला पूर्णपणें वाटल्याप्रमाणें तेथून एक टोंचून लिहिलेल्या मजकुराचें परिपूर्ण असे सव्वाहात पत्र आलेंच; परंतु अशा पत्राची किंमत आतां आमचेजवळ यत्किंचित्‌हि न राहिल्याकारणानें तें आम्हांस घटकाभर करमणुकीच्या कामीं पडले, यापलीकडे त्याचा उपयोग कांही झाला नाही या पत्रांत एक मात्र विशेष गोष्ट ती ही कीं, सासूबाईंची निंदा अतोनात केली होती आणि त्यांच्याबरोबर त्या बिचाऱ्या गोपिकाकाकूंचीहि; याला कारण काय ? तर ते जाण्याच्या दोनतीन दिवस आधीं म्हणजे मला वाटतें, धोंडूभावजींनी खरपूस उत्तर दिलें त्याच्या दुसरे दिवशीं सकाळींच, ते नाक धरून बसले असतांना कुठें सासूबाईनीं, " पाहिलंस ना हें ? कांहीं तरी आहे का इथें वावगं ? अन् उगीच कां बरं त्यांच्या नांवानं हें करतोस ? " असें त्यांस विचारलें. हें त्यांनीं विचारलें त्या वेळीं तिरसट मुद्रेनें माझ्याकडे व त्यांच्याकडे पाहून, " छे ! छे ! कांहींदेखील नाहीं, तुझा मुलगा किती शुचिर्भूत ! अन् सून तर कांहीं विचारूंच नको— अन् तूं तर वा ! आम्ही आपले वेडे, उगीच कांहींतरी बोलतों ! " असे ते बोलले, व मर्म भेदून जाईल अशा तऱ्हेनें हसून पुनः आपलें, " ओं पृथ्वी त्वया–अं अं अं अं......" करूं लागले आमच्या सासूबाईना आंतबाहेर तें कांहीं नाहींच त्या आपल्या सहज " आपली उगीच नांवं ठेवायची तुला संवयच ! " असें म्हणाल्या आणि तेथून गेल्याहि. आमच्याहि कोणाच्या तें कांहीं लक्षांत राहिलें नाहीं. परंतु मामंजींच्या

लक्षांतून तें जावें कसें ? त्यांनीं तेवढेंच काढून आपल्या प्रत्यक्ष बहिणीसंबंधानेंच, तीहि आतां सुधारक झाली, उद्यां ती देखील हिंडायला जाईल आणि म्हणेल ' यांत कांहीं वावगें आहे रे बाबा ! " एक नी दोन लक्ष तऱ्हेनें त्यांनीं लिहिलें होतें. तें सारें येथें सांगत बसत नाहीं; शिवाय त्यांत इतर सर्व मंडळींवर हवी तशी चर्पटपंजरी होतीच. तरी बरें, सारी मंडळी त्यांना भिऊन वागत होती; तसें नसतें तर मला वाटतें त्यांनीं एक रीमभर कागदांचें पत्र लिहिलें असतें. असो.

◆ ◆ ◆

## ७१ : दादाची पहिली परीक्षा पास झाली

* * * * * * * * * * * * * * * * * * *

ही त्या त्रिमूर्तीची जबरदस्त वादटळ व त्यानंतर ही पत्राची जबरदस्त सर एकदाची निघून गेल्यानंतर, कित्येक दिवसपर्यंत आमचीं मनें व आम्ही सुखासमाधानांत होतो. दादा आपल्या अभ्यासांत गर्क होता. तो आमच्यांत येऊन बसतदेखील नसे. त्याचा अभ्यासावर भारीच जोर होता आणि आजोबा वारल्यापासून त्याला अभ्यासाची फारच आंच लागल्यासारखी झाली होती; त्याला असें वाटे कीं बाबांचें आणि आपलें पुढें पाटीमागें पटायचें नाहीं. त्यांचा तो लहानपणाचा जाज्वल्यपणा जरी असता, तरी तो पटता; परंतु हल्लींचा त्यांचा स्वभाव कांहीं अगदीं विलक्षण होऊन गेला होता. एकाएकीं चारपांच वर्षांत इतका फरक पडला कसा ? आणि त्याला कारणें झालीं तरी काय ? याचें आम्हांला मोठे गूढ पडलें व अजूनहि तें आहेच असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ज्यांना हीं गूढें उकलवतील त्यांनीं तीं उकलून जगाला दाखविल्यास फार उपयोग होणार आहे.

तिकडेहि " आतां जरा, आपल्यालाय् जोर मारला पाहिजे बरं अभ्यासावर; अन् आतां खर्च कमी केला पाहिजे. कारण ही फेलोशिप काय आणखी एक वर्षभर राहील, पण पुढें थोडे दिवस कांहीं न करतां अभ्यास केला पाहिजे, तर कांहीं ताबडतोब पास होण्याची आशा," असें म्हणायचें व त्याप्रमाणें थोडे थोडे वागणेंहि सुरू झालें. मीं आपलाहि अभ्यास चांगल्या तऱ्हेनें सुरू केला आणि सर्व प्रकार यथास्थित रीतीनें चालू होता. पुण्याहून आतां बातम्या येण्याला मार्गच नाहींसा झाला. आजीचा समाचार काय आहे ? दुर्गीची अवस्था काय आहे ? तिचा नवरा कोणीकडे आहे ? वगैरे कांहींहि हकीकत कळली नाहीं. त्याबद्दलचें मधून मधून काय थोडें मनाला वाईट वाटे तेवढेंच. बाकी कांहीं न होतां सर्व प्रकार उत्तम तऱ्हेनें सुयंत्रित चालला होता.

सुखांत गेलेला वेळ किती लवकर जातोसा वाटतो, याचा अनुभव कोणाला नाहीं ? मला वाटते मोठमोठाले साधु पुरुष " सुख पाहतां जवापाडे । दुःख पर्वता-

एवढें ॥ " असा उपदेश करितात तो या सुखकालाच्या त्वरित जाण्यानेंच असेल. आम्ही सर्वजणांनीं कशापासून त्रास न होतां ते दोन महिने किती सुखांत घालविले, याचें वर्णन करणें शक्यच नाही. तो आपल्या उद्योगांत अगदीं मग्न व सर्वजण हसून खेळून थट्टा विनोद करून स्वस्थ होवों. योग्य वेळीं दादाच्या परीक्षेस सुरुवात होऊन पांच दिवसांत ती आटोपली. त्याचा अभ्यास चांगला चालल्यामुळें तो पास होईल अशी त्याला उमेद होती. निकाल समजायला बराच अवधि असतो. तो अवधि तर त्यानें, मी, यशोदाबाई व लक्ष्मीबाई यांनीं फारच आनंदांत घालविला. त्याला उद्योग नव्हता, आम्हांलाहि उद्योग नाहीं; यामुळें दोनप्रहरीं एक उत्तम पुस्तक वाचून आम्ही आपले दिवस कंठले. तो वाची, केव्हां आमचेकडून वाचवी; अडले व त्याला समजले तर तो सांगे, नाहीं तर रात्रीं त्याच्याबद्दल मंडळीत गोष्ट काढून निकाल लावून घेत असू—अशा तऱ्हेनें केवळ कल्पनासृष्टींत—आणि आज तर तें सर्व कल्पनासृष्टीपेक्षांहि कल्पनामय भासत आहे—ते दिवस काढले. निकालाचा दिवस जों जो जवळ येऊं लागला तों तों माझा जीव धागधूग करू लागला. मग त्याच्या मनांत काय होत असेल ? त्याला वाटे आपण खास पास होऊं म्हणून, पण त्यांतल्या त्यांत न जाणों काय होईल काय नाहीं असेहि उद्गार निघत. तेव्हां मला फारच भय वाटे. दुसरे दिवशीं निकाल लागायचा तेव्हां आदले दिवशीं तर आम्ही फारच उतावळी झालो. परंतु पुढें फारच भयंकर प्रसंग येणार म्हणूनच काय, देवानें आम्हांला आधीं किती दिवस तरी पूर्ण सुखांत ठेवलें असें दिसतें. दादाची परीक्षा पहिल्या सपाट्यास पास झाली, यामुळे मला किती आनंद झाला म्हणतां कांहीं पुसूं नये. दादानें लागलीच पुण्यास बाबांना पत्र पाठविलें. तेथें आजीखेरीज कोणालाहि इतका आनंद झाला नसेल. परीक्षा पास होऊन आनंदाचे दिवस गेल्यावर अर्थातच 'पुढचें कसें ?' हा प्रश्न आमच्यापुढें आला. दादाच्या मनांत येथे राहून तिकडच्या नजरेखालीं वकिलीचा अभ्यास करावा, म्हणजे अगदीं पहिल्या खेपेला तरी परीक्षा पास होईल असें होतें. माझ्या मनांतून त्यानें कॉलेजांत राहून बी. ए. वगैरे व्हावें असें होतें, तरी पण त्यानें मला एक दिवस स्पष्टपणें आपण कॉलेजच्या नादीं न लागतां वकिलीलाच कां जाणार म्हणतों याचीं कारणें सांगितलीं. तो म्हणाला, "यमूताई, कॉलेजांत राहून तीन वर्षांत मी पास होईन अशी कांही खात्री नाहीं. कितीक माझ्यासारखे आज धडपडताहेत ! आणखी इतकंहि करून आपण समजूं, कीं मी पास झालों, तरी उपयोग काय ? नोकरी तीसपस्तिसाची मिळण्याची सोय झाली, एवढंच की नाहीं ? त्याच्यापेक्षां मला हें वकिलीचं शतपटीनं बरं वाटतं. हें जरा घोट्या मारण्याचं काम असतं, आणखी रघुनाथरावांसारख्यांच्या बरोबर झालं, तर समजण्याची पंचाईत मुळींच पडायची नाहीं. पहिल्या सपाट्यास कोणी बहुतकरून पास होत नाहीं; पण मी जर इथं राहून यांच्या नजरेखालीं माझ्या मनांत आहे तशी मेहनत करीन, तर माझी अगदीं पक्की खात्री आहे, कीं मीं पहिल्या सपाट्यास पास होईन. माझी बुद्धि तितकी तीक्ष्ण नाहीं, तरी पास झालों तर चारसहा महिने पुण्यांत राहून

पुढें इथें कांहीं ठीक जुळत नाहीं, दुसऱ्या कोठेंतरी गेलं पाहिजे असं म्हणून, मुकाटयानं बाहेरगांवीं जाऊन राहीन, म्हणजे झालं कीं नाहीं ?" तो त्या वेळीं ह्या सर्व गोष्टी इतक्या आतुरतेनें व उल्लासानें बोलला, कीं माझें मन केव्हांच वळलें आणि तिकडेहि त्याचे म्हणणें चांगलें वाटलें. बी. ए. होण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं, असेंच तिकडचेंहि म्हणणें–मत पडलें व दादानें आपल्या मताप्रमाणेंच करावें असें ठरलें. परंतु आतां बाबांना ही गोष्ट लिहून त्यांचे अनुमोदन मिळवायचें कसे ? हे मोठें गूढ आम्हांला येऊन पडलें, परंतु सर्व गोष्टी यथासांग व्हायच्या असल्या म्हणजे आपल्या शत्रूच्या आपल्या अहितासाठीं चाललेल्या कृतीदेखील आपल्या पथ्यावर पडत असतात. महिना दोन महिने दादा नसल्यामुळें कांहीं फायदा झाला असे तिच्या नजरेस आलें यामुळें म्हणा; किंवा पुढें तो असाच दूर राहिल्यास फार चांगलें होईल असें पक्कें वाटल्यामुळें म्हणा; किंवा कॉलेजचा विनाकारण पंधरा वीस रुपये दरमहाचा खर्च ठेवूं नये, तेवढयानें आपल्या पुंजींत उगीच कमी होईल असे तिला पक्कें वाटल्यामुळें म्हणा; पण माझ्या व दादाच्या आग्रहावरून तिकडच्या हातचें दादाच्या हेतूविषयीं जेव्हां बाबांना सविस्तर पत्र गेलें, तेव्हां माईसाहेबांनीं बाबांच्या पाठीमागें एकसारखी " तेंच ठीक, त्यात लिहिलें आहे तेंच बरें दिसतें. आपले तरी हातपाय आतां थकत चालले. तो जर आतां वर्षा दोन वर्षात वकिलीची परीक्षा पास होऊन वकील झाला, तर तेवढं ओझं तरी हलकं होईल. उगीच तो कॉलेजचा खर्च हवा कशाला ? " वगैरे वगैरे बोलून पिरपिर लाविली होती. बाबांच्या मनांतून प्रथमतः त्यानें कॉलेजांत जावें असें होतें. पास झाल्याचें पत्र जाण्याबरोबर त्यांचें जें पत्र आलें, त्यांत स्पष्ट त्यांनीं म्हटलेंच होतें. मला वाटतें तेव्हां त्यांचें व माईसाहेबांचें बोलणें झालें नव्हतें. कारण पुढें आमचें पत्र जाईपर्यंत "आतां हा एक आला खर्च कॉलेजचा. आतां व्हावं कसं ?" वगैरे कुरकूर सुरू झाली होती, असें आजीच्या सांगण्यांत पुढें आलें. असो. परंतु 'अंतीं गोड तें सारें गोड' या न्यायानें माईसाहेबांच्या कुरकुरी आमच्या पथ्यावरच पडून आमच्या मनाप्रमाणें झालें व दादा एकदाचा आमच्याजवळ कायमचा राहिला. आतां काळजी काय ती आमच्या आजीचीच. वहिनीबाईचें तर नांवच सोडून दिल्यासारखें झालें होतें. लक्ष्मीबाईनीं व यशोदाबाईनीं पांचसातदा दादाची त्यासंबंधानें थट्टा केली; परंतु चमत्कार असा, कीं इतर सर्व प्रसंगीं हसूनखेळून बोलणारा दादा, तेवढी गोष्ट निघाली, कीं कपाळाला आंठ्या घाली व कांहीं खिन्नता, कांहीं गंभीरपणा, कांहीं त्रास इत्यादि त्याच्या चेहऱ्यावर दिसूं लागून तो विषय बदलून दुसरा निघेपर्यंत तो बोलेनासा होई. पांचचार वेळां जेव्हां त्या दोघींनीं हे पाहिलें तेव्हां त्यांनींहि त्याच्याजवळ ती गोष्ट काढण्याचें सोडलें; परंतु मला एक दिवस एकीकडे त्यांनीं काय आहे काय नाहीं तें विचारलें. मीं त्यांना सर्व गोष्टी सांगितल्या, तथापि तेवढया गोष्टींवरून त्यांचें समाधान झालें नाहीं. आणि खरें पुसाल तर वहिनीचा स्वभाव चांगला नाहीं, ती चमत्कारिक आहे, असें मला वाटत असतांहि दादानें इतका तिच्याविषयीं तिरस्कार करण्याला कांहीं कारण नाहीं असें वाटे. आम्ही

तिघींनीं तर, तिला एकदा इथें आणून दोघांचा बेबनाव नाहींसा करण्याचा यत्न करावयाचा असा निश्चयहि केला. पण दादाला तो कळूं दिला नाहीं.

याप्रमाणें सर्व गोष्टी होऊन आमचे कित्येक दिवस सुखांत गेले.

* * *

## ७२ : तुमचे दादासाहेब फारच निवळले बाई !

* * * * * * * * * * * * * * *

"सुखाचा काळ किती लवकर जातो!" असें जें मीं वर लिहिलें आहे, तितकेंच हेहि खरें आहे, कीं सुखाच्या काळांत घडलेल्या गोष्टी फार पाल्हाळ लावून सांगितल्या असतां ज्यांच्यापासून इतरांना तितकेंच सुख होईल, अशा गोष्टीहि फार थोड्या होतात. तेव्हां आमच्या सुखाचें केवळ वर्णन करून आपल्याला आनंद करून घेण्याच्या नादी लागण्यापेक्षां तो सुखाचा काळ जितक्या लवकर गेला व त्यांतच घडलेल्या सर्व सुखकर गोष्टी— ( आणि त्या सुखाची किंमत विरोधानें आम्हांस समजून यावी म्हणून कांहीं अल्पस्वल्प दुःखकर गोष्टीहि )-जितक्या लवकर गेल्या तितक्याच लवकर मीं त्यांचें वर्णन करून टाकावें हें बरें, असें मला वाटतें. कां कीं, मी पाल्हाळानें सर्व सांगत बसलें, तर मला त्यांच्या आठवणींनीं कांहींबाही बरेंच वाटत असल्यामुळें कोणीकडे वाहवेन आणि कोणीकडे नाही, याचा नेम नाही. यांतच गुंतून मध्येंच माझा अंत झाला, तर ज्या हेतूनें मी हें लिहितें आहें, तो हेतु तसाच अपूर्ण राहील.

प्रथमतः तर मग आनंदाच्या गोष्टींत सांगायची गोष्ट ती ही, कीं सुंदरीचें लग्न होऊन आमच्या व आजीच्या मनांतली काळजी दूर झाली. या सुंदरीच्या लग्नासाठीं आम्ही सर्व मंडळी पुण्यास गेलों होतों. कोणताहि आनंद म्हटला म्हणजे तो कांहीं अगदीं पूर्ण असा नसायचाच; त्यांत कांहीं ना कांहींतरी दुःख, निदान त्रास उत्पन्न होण्याजोगे अंग असायचेंच. त्याचप्रमाणें याहि आमच्या आनंदांत झालेंच. सुंदरीला नवरा मिळाला तो चांगला जाणता, प्रथम वर पण चांगल्या मतांचा, मुंबईसच कॉलेजांत असलेला, तिकडून आणखी नानासाहेब, विष्णुपंत वगैरे मंडळींनी पसंत केलेला असा मिळाला; पण माईसाहेबांनीं आपल्याकडून हुंड्यापांड्याच्या कामांत जितका त्रास द्यायचा तितका दिला. स्थळ चांगलें पाहिजे तर हुंडापांडा चांगला दिल्याखेरीज मिळावें कसें ? नाहीं होय, नाहीं होय, करतां करतां जेमतेम ठरून एकदाचें लग्न ठरलें. मुलगा घरचा गरीब, त्याला आई नाही आणखी बापहि नाहीं; वडील भाऊ तिघे, पण आपले खुटुरुटु पैसे मिळवून संसार करणारे. त्यांतल्या त्यांत कांहींबाही करून याचा त्यांनीं विद्याभ्यास करून द्यायचा, असें तिघांनीं चालविलें होतें आणि मुलगाहि तसा यश

देण्याजोगा होता. तिकडच्या नेहमीं पाहण्यांतला. त्या तिघी भावजया त्यांच्या त्यांना माईसाहेब सत्रादा टाकून बोलल्या असतील, आणखी वहिनीबाईंनींहि कांहीं कमी आचरटपणा केला असें नाही. ती आतां चांगली मोठी झाली होती; पण अजून तिचा जसा स्वभाव होता, तसाच होता ( तें तिच्याविषयीं सारें सांगितलेंच पाहिजे आहे, तेव्हां येथें सध्यां एवढेंच लिहून सोडतें ). नि आतां चांगली मोठी असल्याकारणानें जेथल्या तेथे तें सारें मिटवून कसेंतरी लग्न पार पडलें. वरात पोचवून आलें आणखी गंगेंत घोडें एकदा न्हालें असें वाटून मी व आजी सुखाच्या गोष्टी सांगत बसलों. जिकडे तिकडे निजानीज झाली, आणखी मला एकाएकीं कांहीं गोष्टीचे स्मरण होऊन त्या स्मरणाविषयीं दुसरे दिवशीं दादाला विचारायचेंच असें पक्कें मनांत धरून मीं त्याला दुसरे दिवशीं एकीकडे गांठलें व म्हटलें, " दादा, तूं म्हणत होतास ना ? दागिने गेले म्हणून ? मग माईसाहेब आतांशा अगावर घालतात हे कुठले ? " दादा किंचित् चमत्कारिक तऱ्हेनें हसला. आणखी इकडे तिकडे बघून हळूच मला म्हणतो, " यमूताई, दागिने दिसताहेत खरे, पण ते इतके कोरे कसे ? याच्यावरून मला कांहीं भलताच संशय येतो त्यांत कांहीं समजत नाही तर परीक्षाच करून पाहिलं असतं. अग, इकडे पाहा, आज इतके वर्षांचे दागिने इतके कोरे कसे दिसतात ? एक मला वाटतं लोकांचे तरी असावेत, नाहीं तर..." इतकेंच म्हणून त्यानें जीभ चावली, पण तितक्यांत " काय काय ? नाहीं तर.. काय ? " असें मीं विचारलें. तो बराच वेळ कांही बोलला नाही. नंतर हळूच म्हणतो, " आपण परत जाण्याच्यापूर्वी एक दिवस ती नथ आणखी ती सरी कशीतरी इकडे घेऊन ये, मग आपण पाहूं. " " घेऊन ये " असें त्यानें म्हणण्याबरोबर मला एकाएकीं चार दिवसांत पाहिलेल्या एका गोष्टीची चटकन् आठवण झाली; ती गोष्ट काय, तर माईसाहेब ते दागिने दुसऱ्यांच्या जवळ क्षणभरदेखील देत नाहींत ही व त्यांच्या बुगड्या त्यांच्या पहिल्या बुगड्यांपेक्षां फारच ठसठशीत दिसत होत्या, त्याचप्रमाणे तोडेहि जास्त मोठे दिसत होते, ही होय. चार दिवसांत या गोष्टी माझ्या लक्षांत कशा आल्या नाहींत याचेंच मला आश्चर्य वाटलें. दागिने आमच्या हाती देण्याविषयीं त्यांची इतकी दक्षता पाहिली, कीं रात्रीं त्या आपण केव्हांच दागिने काढून पेटींत घालून कुलूप लावून किल्ली कमरेला खोंचून मग निजायच्या. एकदा दोनदा मी स्वतः " आपले व तुझे दागिने ठेवतें, दे काढून असें म्हटलें. पण त्यांनीं मुळींच, " छे ! तुला काय वेंधळीला ? इकडे तिकडे टाकशील, " असें इतर बायकांकडे हसून पाहात म्हणून त्या आपणच उठल्या. या सर्व गोष्टींत कांहीं तरी हेतु असावा, असें मला आतां वाटूं लागलें आणि पुढें दोनचार दिवसांतच तें माझें मत कायम झालें. कारण वरातीच्या चवथे दिवसापासून त्या पुनः आपल्या--दागिने न घालण्याच्या क्रमाला लागल्या. कांहीं होवो, मी एकदा आपला संशय फेडून घेईनच, असा दादानें अगदीं पक्का निश्चय केला, आणि आमचें बोलणें झालें तेच दिवशीं, कधीं तो असल्या भानगडींत पडायचा नाहीं, कधीं माईसाहेबांच्या जवळहि

जायचा नाहीं, पण त्या आपली पेटी उघडून कांहीं खटपटींत असतांना जवळ गेला आणखी कांहींना कांहीं बोलत त्यानें पटकन् सरी उचलून " वा! काय पण झिलई दिली आहे ! अगदीं जशी कांहीं कोरीच घडविली आहे असं वाटतं " असें म्हणाला. मला त्याचें तें कृत्य पाहून खरोखर आश्चर्य वाटलें. मी अगदीं थक्क झालें. तो असा उथळपणा करायचा नाहीं; आणखी हें यानें आज आरंभिलें आहे काय ? असें वाटून मी आपली त्या दोघांकडे पाहात होतें. त्याच्या हातांत असलेल्या त्या सरीकडे व दादाकडेहि माईसाहेबांचे वटारलेले डोळे किती विलक्षण तऱ्हेनें लागले होते, त्यांच्या चेहऱ्यावर संताप दिसत होता, कपाळाला सतरा हजार आठया पडल्या होत्या. हा वैरी आतां सरी ठेवतो तरी केव्हां असें मनांत येऊन जी कांहीं विषादयुक्त व संतापयुक्त आतुरता येते ती त्यांच्या तोंडावर कितीतरी दिसत होती ! दादाच्या मनांतून आहे तरी काय ? मला कांहींच कळेना. मला त्या वेळीं दादाचें करणें अगदीं आवडलें नाहीं. तो आतां उठेल, मग उठेल असें मला एकसारखें वाटत होतें; परंतु त्याचा आजचा कांहीं हेतूच समजेना. इतका फाजील उथळपणा त्याला आला कुठला ? तो इतका त्या सरीकडे तीनतीनदा निरखून पाहतो आहे काय ? कांहीं मला कळेना, आणि मला वेडयासारखे बरीक झालें. कदाचित् असें असेल, कीं तो खरोखर फार वेळ बसला नसेल, पण माझें मन फार उतावीळ व चमत्कारिक झालें असल्याकारणानें मला मात्र तो फारच वेळ बसला आहे असें वाटलें असेल. काय असेल तें असो, परंतु दादानें सरी टाकून पुनः कायसेंसें उचललें. मला वाटतें नथच. आणि ती घेऊन फारच निरखून पाहूं लागला. माईसाहेबांच्या अंगाचा कसा तिळपापड झाला आहे, हें काय त्याच्या लक्षांत आलें नसेल ? छे ! तसें कुठलें व्हायला ? पण तो आपला शांतपणानें खुशाल जसें कांहीं सर्व चाललें आहे तें सहजच, अशा तऱ्हेनें त्या हातांतल्या नथेकडे पाहात व कांहींतरी बोलत होता. माईसाहेब संतापानें तांबड्या लाल झाल्या. त्यांचे डोळे फारच उग्र दिसूं लागले, त्यांनीं आपला ओंठ सडकून चावला; परंतु मुद्दाम हसतमुख करून म्हणाल्या, " वा ! आज फारसा माईशीं बोलत बसायचा पुळका आला आहे ? आणा इकडे ती नथ, पाडशीलबिडशील. नुकतीच उजाळा देऊन नव्यानं गुंफून आणली आहे. चला, उठूं द्या मला" इतकें बोलून त्यांनीं त्याच्या हातून ती ओढूनच घेतली. दादा नंतर तेथून उठलाच; परंतु उठतां उठतां त्याने खिन्नतेनें किंचित् हंसून कांहीं चमत्कारिक तऱ्हेनें मजकडे पाहिलें. मीहि त्याच्याकडे पाहिलें. माईसाहेबांची दृष्टि आमच्या दोघांवर आहे हें माझ्या लक्षांत आलें नाहीं. दादा दिसेनासा झाला, आणखी एकदम माझी दृष्टि माईसाहेबांकडे गेली तो त्यांचा चेहरा फारच निष्ठुर, रागावलेला व तिरस्कारानें भरलेला असा दिसला. दादा गेला त्या बाजूला त्यांनीं एकदा पाहिलें, माझ्याकडे पाहिलें व "कसं काय यमूताई ! तुमचे दादासाहेब फारच निवळले बाई ! " असें बोलत त्या तेथून गेल्या.

कालकूट, हालाहल, कालिया सर्पाचें विष, शेषाच्या सहस्र तोंडांतलें विष इत्यादि सर्व विषांचा अगदीं महाकष्टानें अर्क काढून जर एखादें विष बनविलें, तर

कदाचित् त्या माईसाहेबांच्या बोलण्यांत भरलेल्या विषाची बरोबरी होईल, असें मला वाटतें. तें त्यांचें वरपांगी " कसं काय यमूताई ? तुमचे दादासाहेब फार निवळले बाई ! " असे शब्द आणि त्याच्याबरोबर विलक्षण तऱ्हेनें पाहणें या दोहोंनीं माझें अंतःकरण इतकें कांही घाबरून गेलें, कीं कांहीं पुसूं नये. शब्द निघाले ते आतां सांगितलेले, परंतु त्या वेळचे ते ओठ चावून कपाळाला आंठया घालून व डोळयांत अतोनात तिरस्कार व " पाहीन, याचा सूड उगविल्याखेरीज राहतें का मी ! " असे म्हटल्यासारखा हेतु इतका स्पष्ट दिसत होता, कीं आजचें दादाचें करणें लवकरच कांहींतरी अनर्थाला कारण होणार, असें मला वाटूं लागून मी आपली अगदीं खिन्न झालें. काय या दादाला म्हणावें ? हा कधीं असल्या भानगडींत पडायचा नाहीं, आणखी आजच याला ही कुबुद्धि कुठून सुचली ? नसती यानें चौकशी केली तर ? असे कितीतरी विचार माझ्या मनांत येऊं लागले. परंतु त्यांतल्यात्यांत थोडया वेळानें मला असेंहि वाटलें, कीं हा सारा ' मनीं वसे, तें स्वप्नीं दिसे, ' असा तर प्रकार नसेलना ! पण छे ! तसला कुठला आला आहे प्रकार ! असेंहि वाटून मन विलक्षण गोंधळांत गुंतून गेलें.

मीं ताबडतोब दादाशीं हितगुज करून काय आहे काय नाहीं विचारायला गेलें नाहीं; कारण जर दादाविषयी व माझ्याविषयीं कांहीं काळेबेरें खरोखरच माईसाहेबांच्या मनांत आलें असलें तर त्या आमच्यावर नजर राखणार; कदाचित् आम्ही कांहीं बोललोंसंवरलों तर हलकेंच ऐकण्याचीहि तजवीज करणार, ही माझी साधारणतः खात्रीच होती. तेव्हां तें आपलें टाळावें तेंच बरें असें मला वाटलें आणि मीं त्याप्रमाणें केलें. दादाची गांठ घेतली नाहीं. पण मनांत काय होत होतें म्हणतां ! दादाचा राग आला, त्यानें केलें हें बरें केलें नाहीं असें वाटलें; परंतु त्याच्या करण्यापासून निष्पत्ति काय झाली, त्याचा संशय होता काय, आणखी त्या संशयाला आजच्या या त्याच्या कृत्यानें कितपत जागा मिळाली, वगैरे गोष्टी समजावून घेण्याची इच्छा उत्कट होती. त्याचा संशय काय होता, याजबद्दल माझे तर्क मीं केलेच होते, आणखी ते तर्क बहुतकरून खरे असावेत अशी माझी खात्री होती. शेवटीं रात्री एकदाची त्याची व माझी गांठ तर पडली. आणखी ती पडतांक्षणींच मी अगदीं रागावल्यासारखें करून त्याला म्हटलें, " दादा, अरे आज तूं अगदीं शिकस्त केलीस. इतकं तुला कुठून वारं आलं हें ? छे बाबा ! मला जर कोणीं कधीं सांगितलं असतं येऊन, कीं दादानं असं केलं म्हणून, तर मला यत्किंचित्‌दिखील खरं वाटलं नसतं. अन् आज मीं प्रत्यक्ष तुला पाह्यलंच त्याच्यामुळें इलाज नाहीं; पण मला आपलं तें राहून राहून खोटंच वाटतं आहे. अन् आश्चर्य तर किती वाटतं आहे त्याचं कांहीं विचारूंच नकोस. खरंच कायरे दादा, तूं कधीं करायचा नाहींस जी गोष्ट, ती केलीस कशी आज ही ? "

" अग, कशीन् काय ? आजची वेळच तशी होती. तुला सांगितलं असतं, पण तुझ्याच्यानं कांहीं झालं नसतं. आपल्याला आतां पुनः जायचं लवकर, तेव्हां म्हटलं एकदा मनाची खात्री करून घ्यावी ती बरी. उगीच रुखरुख नसावी. साधली पण ! तूं

कांहीं म्हण. अग, तुला आश्चर्य वाटेल यांत काय पण माझं मलादेखील वाटतं आहे, कीं मी अगदीं यत्किंचित्‌देखील कधीं बोलायचा नाहीं तो इतका एकदम धीट आणखी लघाळ—का म्हणेनास—झालों तरी कसा ? पण किनी यमे, मला वाटतं, तेव्हां खरंच मला वेड लागल्यासारखं झालं होतं. अग, मी आणखीदेखील बसलों असतों, पण तितक्यांत असं वाटलं, कीं जाऊं या ! आपल्या मनांत काय जें होतं तें समजलं, झालं ? ”

“ पण झालं काय ? समजलं काय ? कांहीं सांगशील कीं नाहीं मला ” मीं त्याला म्हटलें.

“ कां ? एवढी माझ्यावर रागावलीस, आणखी आतां कां विचारतेस ? ”

“ कां म्हणजे ? तूं आतांशा माझ्या देखरेखीखालीं आहेस. आणखी माझ्यामुळें तूं निवळला आहेस, तेव्हां काय आहे काय नाहीं मला विचारायला नको का सारं ? चल, बोल काय तें ! ” मीं हसत हसत विनोदानें म्हटलें. त्याबरोबर “ ओ हो ! एकूण आपली आमच्यावर हल्लीं नजर असते का ? मला नव्हतं हें ठाऊक ! बरं, मग कसे कसे आम्ही आपल्यामुळें निवळलों ? सांगा पाहूं ! ”

मीं हलकेंच लबाडीने म्हटलें, “ तें माईसाहेबांना जाऊन विचार. मींच कशाला सांगायला पाहिजे ? ”

“ अस्सं, अस्सं ! एकूण माईसाहेबांनीं आपल्याला आम्हांला निवळविल्याबद्दल सर्टिफिकीट दिलं वाटतं ? ठीक ? मग आतां काय राहिलं ? ”

“ बरं तें जाऊं दे. काय तूं एवढं त्या दागिन्यांत पाहिलंत तें सांग आधीं ! ”

“ जें काय मला पाह्यचं होतं तें मीं पाह्यलं अन् मला जें पाहिजे होतं तें सांपडलं. ”

“ अरे, पण तें काय तेंच मी तुला विचारतें आहें. भारी बाबा तूं हा ! अजून तुझं लहानपणचं तें कांहीं गेलं नाहीं, आतां तूं मोठा थोरला वकील होणार, आणखी असं काय करतोस ! ”

“ वा ! वकील होणार म्हणून तर असं करायला पाहिजे. कोणतीहि आपल्याला कळलेली गोष्ट सांगतां कामा नये वकिलांनीं. बरं यमे, मी तुला सांगतों, पण अगदीं चकार शब्ददेखील बोलूं नकोस अं कोणाजवळ ! ” इतकें म्हणून त्यानें फारच गंभीरपणा धरून “ सरी आहे. पण नथ—हं—तरी पण सरीचें काम माझ्या अगदीं तर्काबाहेरलं आहे. कारण सरी तर मुख्यतः गेली असा तर माझा पक्का संशय आहे. ही कोणाची तरी चार दिवस म्हणून मागून आणली असावी.”

“ चल, तुझा आपला कांहींन् बांहींच तर्क, ” मीं असें म्हटलें. कारण ज्या ठिकाणीं त्याच्या वरच्या बोलण्यांत मीं रेघा मारल्या आहेत त्या ठिकाणीं त्यानें शब्द न उच्चारतां जे कांहीं चेहऱ्याचे आविर्भाव केले, ते होत. त्यावरून त्याच्या मनांतला अर्थ समजून मी त्याला खरोखरीच वेडगळ समजलें व “ असं समजण्याला तुला कारण

काय ? तूं समजतोस तें खरं कशावरून ? " असे तसे प्रश्न विचारले; पण त्यानें " तेंच तर, तीं कारणं मला अजून पक्कीं ठाऊक नाहींत म्हणून तर मी त्या भानगडींत पडायला मागें घेतों; नाहीं तर या दागिन्यांचा छडा केव्हांच लावला असता. आपल्या नव्या आजीबाईंनी आणखी लग्नांत ती थेरडी इकडे तिकडे मिरवीत होती त्यांनीं कांहींतरी लटपट केली आहे यांत शंका नाहीं. "

" पाहा बाबा, भलतंन् सलतंच करून विनाकारण बाबांच्या मनांत आपल्याविषयीं नको वांकडंतिकडं यायला, दुसरं काय ? "

" आतां आणखी यायचं तें काय ? तुला असं का वाटतं, कीं बाबांना मी मोठा चांगला आहें असें वाटतं आहे म्हणून ? कांहीं नाहीं; त्यांचा असा पक्का समज आहे, कीं मीं कुरठा, आंतल्या गांठीचा, मठ्ठ असा आपला आहे झालं ! "

" अन् तें कांहीं खोटं नव्हे, " मीं हसत हसत विनोदानं म्हटलें; पण त्याचें तिकडे मुळींच लक्ष नव्हतें. तो जणू काय आपण बोलत होता तेंच लक्ष लावून ऐकत होतासें दिसलें. नंतर थोडा वेळ आमचें बोलणें होऊन आम्हांस झोपाच लागल्या.

◆ ◆ ◆

## ७३ : वहिनीची पुरती परीक्षा

* * * * * * * * * * * * * * *

याच काळांत आणखी एक विशेष गोष्ट झाली, ती अशी, कीं माझे व माझ्या मुंबईच्या मैत्रिणींचे, दादा व वहिनी यांचें सख्य व्हावें म्हणून चाललेले यत्न बहुतेक निष्फळ झाल्यासारखे झाले. दादाची परीक्षा उतरल्यानंतर थोडेच दिवसांत वहिनीला मीं मुंबईस आणलें; तेथें पुष्कळ तऱ्हांनीं तिला सुधारण्याचा यत्न आम्हीं केला, परंतु कुत्र्याच्या शेपटीच्या म्हणीचा खरेपणा मला काय जो अनुभवायला सांपडला तो कांहीं विचारूं नये. आतां ती चांगली मोठी झाली होती. तिला सर्व कांहीं समजूं लागलें होतें; परंतु तिचा आचरटपणा आणि समाधानवृत्ति कांहींहि केल्या कमी होईनात. पुण्यास असतांना जो तिचा मला अनुभव आला होता, तो कांहींच नाहीं असें आतां मला वाटूं लागलें, कारण मुंबईस आल्यावर तिच्या अंगचा एक अलौकिक दुर्गुण माझ्या दृष्टीस पडला. तो कोणता ? तर ' मत्सर ' हा होय. या दुर्गुणानें ती पक्की झपाटली होती. लक्ष्मीबाईजवळ तिनें पांचसातदा उद्गार काढले ते तर इतके कांहीं चमत्कारिक कीं कांहीं पुसूं नये. आम्ही मंडळी तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवर बसलों आणि तिला आग्रह केला, तर ती कधीं यायची नाहीं. एक दिवस तर, " मला असलं खपायचं नाहीं. मला आपली पुण्यास लावून द्या कशी ! " असें तिनें मला साफ उत्तर दिलें. हें आहे तरी काय, ही का वेडगळच आहे, कीं कांहीं हिच्या मनांत खरोखर डाचतें आहे ? अशी शंका येऊन

छडा काढतां तेव्हांच त्याचा निकाल झाला. आमचें सुख तिला पाहवत नसे. तिला असें वाटे, कीं आपण स्वतंत्र राहावें. दुसऱ्याच्या घरीं राहूं नये. आपला नवरा मूर्ख आहे; बापानें आपल्याला विहिरींत लोटायचं तें इथं लोटलं; असे नाना तऱ्हेचे विचार तिच्या मनांत येत असून ती नाइलाज म्हणून बोलून दाखवीत नसे. तरी जळत असलें, कीं प्रथम त्याची घाण सुटून मग धुराचा लोट, आणखी शेवटीं आगीचा लोळ बाहेर पडल्याखेरीज कधींच राहायचा नाहीं, या न्यायाप्रमाणें तें हलकें हलकें सारें बाहेर पडलेंच. वर आतां मीं सांगितलेंच आहे, कीं लक्ष्मीबाई व यशोदाबाई, त्यांच्यापाशीं एकदोनदा बोलतां बोलतां तिनें आचरटपणानें आपल्या मनांतल्या गोष्टींचा तांत्रिक तांत्रिक उच्चार करून दाखविलाच, पण तो स्पष्ट नव्हता. याचें कारण माझ्या व तिच्या नवऱ्याच्या कानांवर तें सारें गेल्याखेरीज राहायचें नाहीं, हें ती जाणून होती हें होय, असें प्रथम मला वाटलें; परंतु पुढें दादाशीं एक दिवस मुद्दाम मीं त्यासंबंधानें बोलत असतां त्याहि शंकेचें निराकरण झालें. कारण " दुसऱ्याच्या घरीं आतां किती दिवस राहायचं ? पुरे झाले हे रिकामवेळचे उद्योग. अभ्यास होत नाहींन् कांहीं नाहीं. आपलं बाहेरगांवी नोकरी धरून चला " असें आचरटपणानें प्रत्यक्ष दादाला ती एकदा नाहीं दोनदा नाहीं, पंचवीसदा म्हणाली. तिला कोणीं, " आतां तुम्ही वकिलीणबाई व्हाल " असें म्हटलें कीं, " या जन्मांत तर कांहीं नाहीं " असें कपाळाला आंठया घालून तिनें उत्तर दिलेंच म्हणून समजावें. शेवटीं आम्हीं साऱ्यांनीं हात टेकले. पहिल्यापासून दादाचें जें म्हणणें होतें तेंच खरें, आपले प्रयत्न व्यर्थ, अशी आतां खात्री झाली. पुनः आतां या भानगडींत पडूं नये, असें आम्हां साऱ्यांना वाटलें. दादानें तर तिचें नांव कधींच सोडलें होतें. तो तिला वाईट तऱ्हेनें वागवीत नसे. मुळींच नाहीं. एवढेंच, कीं जें काय बायकोपासून म्हणून कांहीं सुख व्हायचें तें आपल्या नशिबीं नाहीं, असें पक्कें जाणून तिच्याशीं अधिकउणें न बोलतां, कोणत्याहि प्रकारचा निर्दयपणा न करतां तिला जसें वाटेल तसें तो वागूं देत असे.

एक दिवस त्याला या गोष्टीबद्दल इतकें वाईट वाटलें कीं, मला तो म्हणाला, " यमे, त्या बिचाऱ्या दुर्गीचा प्रकार तसा, आणखी माझा हा असा ! जिथं एक आहे तिथं दुसरं नाहीं, दुसरं आहे तिथं एक नाहीं. तुम्हीं कितीतरी धन्य ! आणखी तुमची ही मंडळीदिखील किती धन्य ! पण तुमच्यासारखी मंडळी फार थोडी बरं का ? आमच्या-सारखीच साऱ्या जगांत भरली आहे. " असे त्याचे निराशेचे शब्द ऐकल्यानंतर आशा उत्पन्न करणारे असे शब्द मी काय बोलणार ? फक्त " असा अगदीं निराश कां होतोस रे दादा ! आज नाहीं उद्यां, ती निवळेल. आज अजून तू स्वतः मिळविता नाहींस, तिला स्वतंत्रता नाहीं, म्हणून तिला वाटत असेल वाईट, अन् त्यामुळें ती करते असं, पण तुम्ही उद्यां स्वतंत्र झालांत, म्हणजे मग ती उत्तम तऱ्हेनें संसार करून मला आपल्या घरीं चार दिवस राहायला बोलावील. तूं अगदीं कांहींदिखील मनांत आणूं नकोस. " असें म्हणून त्याचें समाधान करून पाहिलें; परंतु मनांत त्याच्या अगदीं विरुद्ध

अशी खात्री असतां केवळ शब्द जर उच्चारले, तर त्यांचा काय उपयोग व्हायचा ? दादा खेदपूर्ण असा कांहीं हसला आणखी म्हणतो, " यमे, तूं, लक्ष्मीवहिनी, यशोदावहिनी, यांच्यासारख्यांच्या संगतींत दिवस काढायला सांपडले असतां जिला समाधान होत नाहीं, तिला यावज्जन्मांत कध्धीं कुठें सुख होणार नाहीं, ही गोष्ट मी अगदीं तुला पक्की सांगून ठेवतों. आणखी—आणखी तुला आतां एकदा शेवटचं निक्षून सांगून ठेवतों कीं तूं पुनः या बाबतींत माझ्याजवळ मुळींदिखील बोलूं नको. तुला अगदीं हात जोडून सांगणं आहे. आणखी तूं तिचं पण आतां नांव काढूं नकोस, समजलीस ? "

इतकें तो बोलल्यावर मी काय बोलणार ? तथापि कांहींतरी बोलून मनांतून खरोखरीच त्याच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. तरी पण आपल्या दादाला त्याच्या मनाजोगी बायको नाहीं, इतकेंच नव्हे तर ती अतिशय विक्षिप्त, तेव्हां याचा आतां सारा संसार व्हावा कसा ? हिचें माईसाहेबांपाशीं पटतें कसें ?—नव्हे, इतके दिवसांत जितकीं भांडणें, मारामाऱ्या झाल्या असतील, त्याच्यापेक्षां जास्त कां झाल्या नाहींत, याबद्दलच मला फार आश्चर्य वाटूं लागलें. आजपर्यंतचें सर्व भुरळ नाहींसें झालें आणि कितीदा तरी मला दादाच्या भावी स्थितीविषयीं वाईट वाटूं लागलें व त्यावरून एकंदर अनेक गोष्टींचें स्मरण होऊन त्यावर मी पुष्कळ विचार करीत राहिलें. असो. पुढें शेवटीं खरोखर आम्हांला साऱ्यांना असें वाटूं लागलें, कीं तिची मर्जी असल्यास तिला पुण्यास पोंचवून दिलें, तरच बरें होईल. कारण आमच्या येथें राहून तिची सुधारण्याची कांहीं आशा दिसेना. आम्ही दुपारींबिपारीं एका ठिकाणीं बसलों, तर ही कांहीं तेथें यायची नाहीं. आपली कुठें तरी चवघडी टाकून झोपच घेत पडायची. एखादे दिवशी काम करायचें म्हणून मनांत आणून सारें घर झाडून जिथे तिथें सारवून मोऱ्या धुऊन जें मनाला वाटेल तें काम करीतच सुटायची. एक दिवस सहज ती अशी दुपारची निजली, ती दोनतीन तास उठलीच नाहीं. म्हणून मीं सहज म्हटलें, " हें काय हें वहिनी ? दुपारचं कांहीं काम काढावं, ती आपली झोप काय घेतेस ? " कोणाहि सरळ मनाच्या माणसाला यांत यत्किंचित्‌देखील वांकडे दिसायचें नाहीं. पण वहिनीबाईंना जो कांहीं यांत अर्थ वाटला तो विलक्षणच ! " तुमच्या इथें आम्ही आहोंत म्हणून आम्हीं सोसून घ्यायचीं कीं नाहीं अशीं बोलणीं ? आम्ही बटकीच कीं नाहीं ? अंमळसुद्धां निजतां कामा नये. आमचं नशीबच असलं आहे. आमचा जन्मच असा पोतेऱ्यावरी जायचा. आतां तुमच्या घरचीं कामंच आम्हीं केलीं पाहिजेत. " एवढेंचसें काय लाखों परींनीं तिनें तोंड सोडलें. मीं तिला " माझा अर्थ तसा नाहीं; मी तुला आपली झोपेबद्दल बोललें. माझ्या इथलीं कामं करायला मीं तुला आणलं नाहीं, तूं चांगली राजासारखी राहा, शीक, आमच्याबरोबर सभेला येत जा, फिरायला येत जा, " असें नाना तऱ्हांनीं सांगितलें, पण ती कुठें ऐकते आहे ? तिचें आपलें तें खरें. आमच्या येथें दुसऱ्या मजल्यावर दिवसां पाणी येत नसे, रात्रीं येत असे. तेव्हां आम्ही रात्रीं भरून ठेवीत असूं हिनें आपली घागर घेतली आणखी तळमजल्यावरून लागली पाणी भरून

आणायला. मीं तिच्या हातची घागर घेतली, तर तिनें एक तपेलेंच उचललें. नाना तऱ्हांनीं मीं तिला सांगितलें, " वहिनी, तूं हें असं करूं नको. " ती कुठें ऐकते आहे ? " काम करीत नाहीं म्हणालांत. आतां काम करीन. दुसरं कांहीं नाहीं!" हें पालुपद लावून तिनें ते दिवसापासून सुरुवातच केली. काहीं केल्या ऐकेना. सासूबाईंनीं तिला समजावून सांगितलें, गोपिकाकाकूंनीं सांगितलें, आम्हीं तिघींनीं सांगितलें, तरी तिचें तें आपलें खरें. त्यांत कांहीं कमीपणाच नाहीं. आतां तिच्याशीं कांहीं बोलायची चोरी. कोण्या वेळीं काय तिच्या मनांत येईल, आणखी काय नाहीं, याचा नेमच नव्हता. असल्या गोष्टी मी कधीं दादाच्या कानावर जाऊं देत नसे; कारण असल्या गोष्टी त्याला कळविल्यानें फायदा कवडीचाहि नसून उलट दिवसानुदिवस त्या दोघांचें अधिकाधिकच फाटत जाणार. पण दादा घरांतच असल्यामुळें त्याच्या कानावर या गोष्टी अंशतः तरी गेल्याखेरीज राहात नसत. या प्रकारानें मध्यंतरीचा कितीतरी आमचा काळ गेला. शेवटीं नाइलाजास्तव दादाचा आग्रहहि अतिशय पडला, तेव्हां कांहींतरी युक्ति करून वहिनीची पुण्याला रवानगी करून दिली.

यानंतर आमचा बराच काळ चांगल्या सुखांत गेला. तिकडचा व विष्णुपंतांचा एल्‌एल्. बी. चा अभ्यास, आणखी दादाचा वकिलीचा अभ्यास जारीनें सुरू झाला. आतां पहिल्याप्रमाणें हवा तसा वेळ घालविण्याला सांपडेनासा झाला. माझा व त्या दोघींचा अभ्यासहि चांगल्या रीतीनें चालला होता. आतां माझी इंग्रजींत चांगली गति होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. आमच्या शनिवारच्या सभा आम्हीं कधीं टाळल्या नाहींत. तेथें जाऊन कधीं बोलणें, कधीं शिवणें, कधीं कशिदा व जरीचें काम हीं सर्व ठीकसेठाक चाललीं होतीं. दिवसानुदिवस कितीतरी मंडळी येऊं लागून त्या सभेला उत्तम स्वरूप आलें. मीं स्वतःच तीन वेळां निबंध वाचले. एकदा "आम्हां स्त्रियांची आजची स्थिति" या विषयावर, एकदा " लग्नकार्यें व त्यांत स्त्रियांच्या जबाबदाऱ्या " या विषयावर व एकदा " सासरची वागणूक " यावर असे निबंध वाचले. त्यानंतर एका विषयावर एक निबंध मीं वाचला, त्याबद्दल व आणखी कांही गोष्टींबद्दल थोडेंसें विस्तारपूर्वक ल्याहावेंसें वाटतें आहे.

◆ ◆ ◆

## ७४ : एक हृदयद्रावक गोष्ट

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

एके दिवशीं संध्याकाळीं मी अशी स्वयंपाकाला लागण्याच्या बेतांत होतें. स्वारी कोठें बाहेर गेली होती. दादाहि कोठें बरोबरच गेला होता. इतक्यांत एकाएकीं दादा काय तो एकटाच बाहेरून आला व सांगूं लागला, कीं आज रघुनाथराव कांहीं घरीं यायचे नाहीत. तिकडेच कॉलेजांत राहणार आहेत. आजपर्यंत असें कधींहि झालें नव्हतें,

यामुळें मी अगदीं दचकलें व दादाला " कां ? कां ? " म्हणून विचारून अगदीं पुरेंपुरेंसें केलें. त्याला कांहीं पुरतें काय तें ठाऊक नव्हतें. परंतु इतकेच त्यानें मला सांगितलें, कीं कोणी त्यांच्या बरोबरीचाच तिथला गृहस्थ फार आजारी आहे, त्याच्याजवळ बसण्या-साठीं ते तिथें राहणार आहेत. एवढ्यावरून काय समजणार ? तथापि कांहीं काळजी करण्याजोगी गोष्ट नव्हे असें जाणून मी दादाला वाढून व मी जेवून स्वस्थ बसलें; परंतु मला त्या रात्रीं चैन पडेना. मुंबईतल्या मुंबईत आज दीड पावणेदोन वर्षांत असा प्रसंग कधींच आला नव्हता. दुसरे दिवशीं सकाळीं घरीं यायचें त्या वेळीं तोंड इतकें उदास झालेलें दिसलें, कीं कांहीं पुसायला नको. जो गृहस्थ आजारी होता, तो दुसऱ्या बी. ए. च्या वर्गांतला फार हुशार असा विद्यार्थी होता. इकडचा व त्याचा मोठा लोभ असे. एखादे वेळ आमच्या येथेंहि तो येत असे. परीक्षा जवळ आल्याकारणानें थोडासा अधिक अभ्यास केल्यामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणांमुळें म्हणा, परंतु त्यास पांच दिवसांपूर्वीं एकाएकीं ताप भरून दररोज कमी न होतां आणखी मात्र भरे. अशा स्थितींत त्याच्या घरचें मायेचें कोणीहि नाहीं. पत्रें वगैरे पाठवून घरून कोणी आणवावें तर चार दिवस हयगयीवर जाऊन प्रत्यक्ष डॉक्टरलादेखील हा ताप दोषी आहे कीं कसा आहे, हें ध्यानांत आलें नाहीं. पांचवे दिवशीं त्याचें स्वरूप फार भयंकर आहे असें कळून आलें, तेव्हां तार वगैरे केली. घरीं बाप अतिशय म्हातारा आणि आई त्याच्याच बरोबरीची. घर कोंकणांत रत्नागिरीस. नुकतें आदल्या मे महिन्यांतच लग्न झालेलें, अशा वेळीं मागेंपुढें पाहण्याची वेळ नव्हे; तथापि मला विचारल्याखेरीज कांहीं करायचें नाहीं म्हणून आधीं सकाळीं घरीं येऊन मला विचारा-वयाचें, " कायग, त्याला आपल्या घरीं आणावं असं वाटतं, कसं काय ? "

" हें काय ? हेंहि मला विचारायसाठीं थांबण्याची वेळ का ? " असें मी, त्या गरीब आईबापांचें आणि त्या लहान बायकोचें चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें राहून डोळ्यांला चटकन् पाणी येऊन, म्हटलें. त्याबरोबर "बरं तर" असें म्हणून नानासाहेबांस विचारलें आणि कॉलेजांत जाऊन साहेबांच्या परवानगीनें त्याला संध्याकाळीं घरीं आणलें. आम्ही तिघींनीं जितकी म्हणून कांहीं खटपट करायची तितकी केली. त्याचप्रमाणें डॉक्टर वगैरे आणून जितके म्हणून प्रयत्न करायचे तितके चालविले. चौघां पुरुषांपैकीं एक तरी सदोदित नेहमीं जवळ असे; त्याचप्रमाणें आम्हां तिघींपैकीं एकजण कोणीतरी येथें असूंच. परंतु असल्या प्रसंगीं परमेश्वर कधींच कोणाला यश देणार नाहीं तर आम्हांला तरी कोठून देईल ? जितकें म्हणून उलटें, तेवढें घडायचें हाच त्याचा नेमानेम असला, तर त्याला तरी आम्ही काय बोल लावायचा आहे ? त्या बिचाऱ्याचा ताप घटकोघटकीं वाढत चालला. सातवे दिवशीं आईबाप आले. अरेरे? बिचारीं दोघेंहि किती वृद्ध होतीं म्हणतां ! त्यांच्याबरोबर एक त्यांचाच कोणी दूरचा नातलग होता. तीं दोघें आलीं त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत तो मुलगा चांगला शुद्धीवर होता. बाप व आई दोघें जवळ जातांच रडूं लागलीं, तेव्हां त्यानें आपल्या खोल आवाजानें, " रडूं नका, मी बरा होईन. ( तिकडे

बोट करून ) या मंडळींनीं तुमच्यापेक्षां माझी चांगली काळजी चालविली आहे. " अशा अर्थाचे शब्द उच्चारले. त्यानंतर थोड्याच वेळांत त्याला आणखी तापांत ताप भरला, आणि रात्रीं एकदम वायूचा झटका झाला. त्यांत तो नाना तऱ्हांनीं बडबडूं लागला. त्या म्हाताराम्हातारीला रडण्याखेरीज दुसरें कांहीं सुचेना. आम्ही साऱ्यांनीं मिळून त्यांचें कितीतरी सांत्वन केलें—नव्हे करण्याचा यत्न केला, परंतु अशा कामीं कसल्या सिद्धीची अपेक्षा करणार ? काय बोलून त्यांचें समाधान व्हावें ? बिचाऱ्यांचें एकुलतें एक अपत्य, त्यांत नुकतें लग्न केलेलें, फार हुशार, ऐन हातातोंडाशीं आलेलें आणि तें आतां आपल्याला लाभत नाहीं, असें दिल्यावर अत्यंत शोकाला आणखी तें काय लागतें ? म्हाताराम्हातारी अगदीं वेडावून जाऊन ज्याच्या त्याच्या पायां पडत, आणि " आमचा रामकृष्णा उठेल का हो ?—छे ? तो कसचा उठतो ? " असें म्हणत. कोणीं कांहीं करायला जरी सांगितलें तरी त्यानें आपल्या मुलाला गुण येईल असें वाटून तें त्यांनीं करावें, नाहीं तर करण्यासाठीं आम्हांला सांगावें. आमच्या सासूबाईंनीं व गोपिकाकाकूंनीं त्यांचें समाधान केलें, पण काय उपयोग ? इकडे मुलाचा ताप चढत चालला आणखी बडबडहि वाढत चालली; कांहीं कोणाचा उपाय चालेना; आपण हातीं घेतलेल्या कामांत आपल्याला अपयश येणार असें वाटून तिकडे फार वाईट वाटलें. आपण त्याला एवढा आणल्यासारखा तो बरा झाला असता, तर चांगलें झालें असतें. पण कांहीं नाहीं. रात्रीं—म्हणजे आठव्या रात्री तो फारच बडबड करूं लागला. पहिल्याप्रथम सगळी बडबड अभ्यासाची, परंतु त्याच रात्रीं पहांटे पहांटे तो एकदम कांहीं शुद्धींतल्यासारखी कांहीं वायूच्या लहरीसारखी बडबड करूं लागला. ती बहुतेक बडबड आपल्या बायकोच्या संबंधाची होती, " कां ! मी सांगत होतोंना नको म्हणून ? आतां काय उपयोग ? आतां सांगा तिला मी तुझा नाहीं म्हणून. असंच तें ! आमचं हें असेंच !..." झालें. अशी बडबड करतांच आणखी ताप भरत जाऊन दुसरे दिवशीं बारा एक वाजतां बिचारा वारला. आईबापांची त्या वेळची स्थिति आतां मी वर्णन करायला जाणें म्हणजे एखाद्या अशक्य गोष्टीलाच हात घालण्यासारखे आहे. शिवाय आतां तें आठवूं लागलें तर इतका वेळ मीं आपल्या मनाला दाबून दाबून धरलें आहे, तें एकदम फुटून जाईल. एवढ्या-करितां थोडक्यांत एवढेंच सांगतें, कीं कसें बसें तरी स्थिरस्थावर करून त्यांना त्यांच्या गांवीं एकदाचें लावून दिलें. त्या दिवसापासून सुमारें दोन महिनेपर्यंत आमच्या मंडळींत एकाच्याहि चर्येवरसुद्धां आनंद किंवा हास्य दिसलें नाहीं. त्या दुर्धर प्रसंगाचा तिकडच्या मनावर तर इतका कांहीं चमत्कारिक परिणाम झाला कीं, हा आतां जातो कसा, अशी मला मोठी काळजी पडली. त्यांतून एक महिन्याच्या आंतच शेजारपाजारच्या दुष्ट निर्दय लोकांनीं त्रासवून त्रासवून त्या म्हाताऱ्याम्हातारीच्या हातून—हातून कसचें ! आपणच त्या पोरीच्या—आतां काय मी लिहूं तरी काय ? त्या कठोर मांगहृदयी चांडाळां-च्या कृत्याचें नांव तरी घेऊं कशाला ? —तेव्हांपासून तर आमच्या साऱ्यांचा आनंद कित्येक दिवसपर्यंत सर्वथा मालवला. त्या रामकृष्णाच्या मरणानें झालेल्या एकंदर

अनर्थामुळें आम्हांला कित्येक दिवसपर्यंत कांहीं सुचलें नाहीं. परंतु काळाचा धो धो ओघ सर्व कांहीं वाहून नेतो, त्याप्रमाणें तेंहि आमच्या मनावरलें दुःखपटल त्यानें वाहून नेलें; तथापि त्या योगानें दोन मोठया महत्त्वाच्या गोष्टी झाल्या त्यांपैकीं पहिली ही :—

आतां मीं वर सांगितलेंच आहे, कीं त्या मुलाच्या मरणामुळें सर्वांपेक्षां तिकडच्या मनावर फारच चमत्कारिक परिणाम झाला. एक दिवस—तो वारल्यानंतर सुमारें पंधरा दिवसांनींच—मला मध्यान्ह रात्रीलाच जागें करून व फार खिन्नपणानें हळूच म्हणायचें " त्या रामकृष्णाच्या आणखी आपल्या स्थितींत फारसा फरक नाहीं, नाहींग ? " तो प्रश्न ऐकून मी एकदम दचकलें आणखी एकदम मिठी मारून घाबरत म्हटलें, " हें काय हें असं बोलायचं ? भलतंच कांहींतरी मनांत घेऊन बसायचं. आतांशा हें काय चाललेलं असतं सारा दिवस मनांत ? " परंतु मी काय बोलतें इकडे लक्ष कोणाचें ? आपल्याशींच, " म्हातारा का होईना, पण त्याचा बाप तरी आहे, कांहीं थोडंबहुत असेलय् त्याचं. पण आपलं काय आहे ?..." पुनः मीं घट्ट हात धरून म्हटलें, " हें आहे तरी काय ? नाहीं नाहीं तेंच एक बोलायचं ! " तथापि माझ्याकडे लक्ष नाहीं. बऱ्याच वेळानें " तेंच तें. त्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं. नाहीं तर तो ? "...असे आणखी शब्द आले व " हं ! " असा सुस्कारा आला. आतां मात्र मी फार घाबरलें. आणखी पुनः त्रासून म्हटलें, " हें आहे तरी काय ? " तेव्हां " कुठं काय आहे ? " असें उत्तर आलें. नंतर कांहीं वेळ पुनः कांहीं न बोलतां मला म्हणायचें, " तुला नाहीं वाटत कांहींतरी तजवीज केली पाहिजे म्हणून ? " मला कांहीं समजेना, तरी तें कांहींतरी भयंकर असावें, असें आपलें मला वाटलें आणि मीं म्हटलें, " कसली तजवीज आणि कसलं काय ? " पुनः थोडा वेळ मुळींच बोलणें नाहीं, आणि शेवटीं पुनः मीं जेव्हां " अं ? " असें विचारलें, तेव्हां " माझं असंच कांहीं झालं, तर पाठीमागें तुझी आणखी आईची ? " एवढेच तुटक शब्द उच्चारले.

" हें आज आलं आहे तरी काय मनांत ? " मीं घाबरून विचारलें. ते शब्द ऐकून माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल, याची कल्पना तसा अनुभव आला असेल त्यांनाच होणार आहे. इतरांना तें समजणार नाहीं आणि देवाच्या दयेनें, तें समजण्याचा प्रसंगहि त्यांच्यावर न येवो !

तें माझें अशा तऱ्हेचें विचारणें कानावर पडल्याबरोबर माझ्या अंगावर हात टाकून सद्गदित कंठानें म्हणायचें, " तूं शिकलेली मोठी शहाणी, ती अशीच का ? इतर अडाणी बायकांप्रमाणें तूहि असल्या गोष्टी नुसत्या बोलण्यांत काढल्या, कीं त्यांच्याविषयीं वास्तविक विचार करायला पाहिजे असतांनाहि भिऊन ' हें काय बोलायचं ! तें काय बोलायचं ! ' असें म्हणणार का ? वाहवा ! मी म्हणतों, असे प्रसंग काय थोडयांवर येतात ? त्यांच्यासंबंधानं दोघांनीं मिळून नीट विचार करायला नको का ? " इतकें बोलून माझ्या मनावर काय परिणाम झाला हें पाहण्यासाठींच कीं काय अंमळ थांबायचें. मी

कांहींच बोललें नाहीं. कारण तिकडच्या बोलण्यांतल्या "माझ्या पाठीमागें" या शब्दांनीं माझ्या डोळ्यांपुढें जें भयंकर चित्र उभें केलें, त्यानें मी अगदीं फारच घाबरून गेलें. त्यांतहि त्या चित्रांत जो एक अतिशयच विलक्षण घातकी प्राणी दिसत होता, त्याच्या दर्शनानें तर माझी पांचावर धारण बसली आणि तें भयंकर चित्र डोळ्यांसमोरून जावें, आपल्याला दिसूं नये, याला उत्तम उपाय असें वाटूनच काय, तिकडच्या कुशींत मीं आपलें तोंड घालून घट्ट आवळून धरलें कारण मला असें वाटलें कीं याच वेळी तर कोणी न्यायला आलें नाहींना? न जाणों, त्याचा काय नेम? माझें अशा तऱ्हेचें धैर्य पाहण्याबरोबर "बरं तर मी आतां या वेळीं कांहीं बोलत नाहीं; पण असल्या गोष्टी जर आल्याच तर आपण त्याला तयार असलें पाहिजे हें तुला कळलं पाहिजे" असें म्हटलें, आणि तो विषय सोडून दिला. मी मात्र त्याच्यावर आतां फारच विचार करूं लागलें; किंवा विचार करूं नये म्हणून त्याच्याविषयीं फार खटपट करूं लागलें, असें म्हटलें तर फार चांगलें शोभेल. परंतु जों जों मी ती गोष्ट टाळायला पाहूं लागलें तों तों ती पुनः पुनः माझ्या मनांत येऊं लागली. तें भयंकर चित्र माझ्या डोळ्यांपुढून दूर सारण्यासाठींच मी जों जों अधिक अधिक यत्न करूं लागलें, तों तों तें जास्त जास्त उठून दिसूं लागलें. कांहीं केल्या त्यानंतर मुळींच झोप येईना. अगदीं पहाटे पहाटे झोप लागली परंतु त्यांत अशीं वेडींवांकडीं स्वप्नें पडून शेवटीं मला असें कांहीं भयंकर स्वप्न पडलें कीं, त्या तसल्या अत्यंत दुःखस्थितींत आपण असतांना, कोणी एका दुष्ट प्राण्यानें (त्याचें मी येथें नांव घेऊं इच्छित नाहीं) पाठीमागून येऊन आपला आंबाडा धरला व एका सुऱ्यानें आपली मान कापली! त्या खटक्यासरशीं मी ओरडतच उठलें, परंतु जवळ तिकडल्या-खेरीज कोणी नव्हतें.

ही मधली गोष्ट येथेंच सांगून ठेवण्याचें एवढेंच कारण, कीं या गोष्टीमुळें पुनः पुनः तसलें बोलून व त्या गोष्टीविषयीं माझें मन थोडेंबहुत कठोर करून, निदान करण्याचा बराच यत्न करून आपल्या आयुष्याचा ५००० रुपयांचा विमा उतरून ठेविला. मी यासंबंधानें आणखी कांहीहि लिहीत नाहीं.

'या रामकृष्णाच्या हकीकतीमुळें, व विशेषतः पुढें बापाच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं जें अधमाधम कृत्य केलें, त्यामुळेंहि आमचा उदासपणा अतिशय झाला. परंतु वर सांगितल्याप्रमाणें काळाच्या ओघानें तोहि पार धुऊन जाऊन थोडेच दिवसांत मी त्या व आणखी पांचचारजणींच्या ऐकलेल्या हकीकतीवरून त्या हिंदुधर्माला व लोकांना केवळ काळिमा आणणाऱ्या, धर्म या नांवाखालीं अधमाधम लोकांस लहानसहान पोरींचा व गरीब अनाथ स्त्रियांचा यथास्थित छळ करण्यास अत्यंत उपयोगी अशी जी एक अत्यंत दुष्ट, अत्यंत नीच चाल, त्या चालीसंबंधानें एक निबंध लिहिला व तो आम्हीं आमच्या शनिवारच्या सभेपुढें वाचला. तो निबंध अजून मजजवळ पडला आहे. त्यांत कित्येक ठिकाणी शुद्धाशुद्ध केलेलें तें माझ्या फार प्रिय हाताचें अक्षर दिसतें आहे त्यामुळें त्या वेळच्या सर्व गोष्टी मनांत येऊन केव्हां एकदा मन मोकळें करून खूप रडेन तरी, असें

मला झालें आहे. पण नाहीं. माझी ही कर्मकथा अगदीं पुरी होईपर्यंत मी आतां आपल्या अशक्त मनाच्या ताब्यांत मुळींच न जातां, होतां होईल तों धीटपणानें सर्व गोष्टी शेवटपर्यंत जशा खरोखर घडल्या, तशा नमूद करण्याचा मीं नुकताच निश्चय केला आहे; तेव्हां कांहीं एक न करतां मी चांगल्या धिटाईनें असें सांगतें, कीं वर जें मीं स्वप्न सांगितलें आहे किंवा जें माझ्या डोळ्यांसमोर भयंकर चित्र दिसत होतें, तें पुढें सर्व खरे होणार आहे असें जर मला आधीं समजतें, तर तो माझा निबंध किती कठोर झाला असता याचा नेम नाहीं. जसा तो त्या वेळीं लिहिला गेला तसा कांहीं कमी कठोर होता असें नाहीं; पण अशा विषयाच्यासंबंधानें लिहितांना जितका कोणी कठोरपणा आणील व धर्माचें थोतांड करून जे नराधम कसाईकाम करतात त्यांची निंदा करील, तितकी सारी अपुरीच होणार आहे, असें आज मला वाटतें आहे, पण मी आतां जास्त कांहीं लिहीत नाहीं. मन अतिशय क्षोभलें आहे, अशा स्थितींत स्वस्थ बसणेंच जास्त हितकर आहे, म्हणून मी जरा स्तब्ध बसतें.

◆ ◆ ◆

## ७५ : धोंडूभावजींचें पळून जाणें

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी घडून, त्याप्रमाणें त्यांचा सर्वथा विसर पडून कित्येक दिवस गेले. आतां त्या विचारांची आठवण तसल्या कांहीं दुसऱ्या ठिकाणच्या गोष्टी कानावर आल्या तरच होऊन थोडीबहुत हळहळ वाटे, एवढेंच काय तें ! बाकी कांहीं नाहीं. दादाचा व तिकडचा दोन्हीहि अभ्यास जारीनें सुरू झाले होते. आतां इकडे तिकडे पाहावयाचें नाहीं असा अगदीं निश्चय झालेला होता. अजून परीक्षेला जायला एक वर्षभर अवकाश होता. परंतु त्या परीक्षेचा अभ्यास फार कठीण, नुसतें पास होण्यालाच मार्क अतिशय लागतात, मग पहिल्या क्लासांत येण्यास किती तयारी लागत असेल याचा नेम नाहीं. हल्लींची चाकरी ही काय, दोन वर्षें जेमतेम राहील. तिसरे वर्षीं राहीलच असा कांहीं नेम नव्हता, पण राहिली तरी फार तर पन्नास साठ रुपये मिळणार परंतु दिवसांतून दोनतीन तासांपेक्षां अधिक वेळ न जावा असें काम मिळाल्यास पाहावें, हा मोठा उद्देश होता. आतां असा उद्योग कोणता मिळणार ? पण दादा व इतर मंडळी यांचें तर म्हणणें असें होतें, कीं तुमची फेलोशिप जाणार नाहीं, असें कांहीं चाललें होतें. दादाची परीक्षा लवकर म्हणजे तीन किंवा चार महिन्यांवर आली होती. त्याच्या परीक्षेची तर मोठीच अडचण. दोनदोनशें उमेदवारांपैकीं दहा किंवा बारा उमेदवार पास झाले कीं मिळवली ! तेव्हां त्याला आपण पास होतों कीं नाहीं, याबद्दल जी भीति वाटत होती, ती अगदीं साहजिकच होती. तथापि मंडळी खूप उमेद देत होती आणि त्यानेंहि कंबर बांधून

अभ्यासाचा ताडया चांगला लावला होता. आज चारसहा महिन्यांत तर त्यानें यत्किंचित्‌देखील इकडे तिकडे पाहिलें नाहीं. तेव्हां आपलें मलाहि वाटे, की न जाणों, दोनशें मंडळींपैकीं दहा बाराच मंडळी पास होतात अशी जरी गोष्ट असली, तरी त्या बारांतच येऊन आपला दादा पास होईल. नाहीं कशावरून? अशा तऱ्हेनें दिवस चालले असतां मध्यंतरीं पुण्यास दोन गोष्टी झाल्या. एक आजेसासूबाई काशीस गेल्या व दुसरी एक फार महत्त्वाची गोष्ट झाली ती येथें सांगून ठेवतें. ती गोष्ट धोंडूभावजींचें पळून जाणें ही होय! आम्हांला ती गोष्ट ताबडतोब ठाऊक होण्याला कारण आम्हांला गोपाळमामंजींची आलेली तार व दुसरे दिवशीं शंकरमामंजींचें पत्र हीं होत. बापलेकांची अगदीं खडाजंगी झडून धोंडूभावजी एकाएकी घरांतून चालते झाले. पुण्याच्या मंडळीस अर्थातच असें वाटलें, कीं येऊन जाऊन तो गेला असला पुण्याच्या बाहेर तर मुंबईस आमच्या इथें यायचा. दुसऱ्या कुठें जातों? तेव्हां त्यांनीं तार करून आमच्याकडे चौकशी केली. इकडूनहि ताबडतोब, "नाहीं आला. आल्याबरोबर कळवीन" असें उत्तर गेलें. असें कांहींतरी होणार हें आम्हांला आधींपासून ठाऊकच होतें. त्यांतून मागें एकदा मुंबईच्या दिवाळीची हकीकत दिली आहे, तेव्हांपासून बापलेकांचें फारच विलक्षण जुंपलें होतें. ज्या चिरंजिवांना आईचा अपमान करण्याला व तिला हवें तसें बोलण्याला तीर्थरूपांची पढवणी होत असे, तेच चिरंजीव आतां त्याच पढवणीचा हवा तसा फायदा करून घेऊन त्याच पढविणाऱ्या तीर्थरूपांची यथायोग्य संभावना करूं लागले होते; व त्यायोगानें बहुतकरून, 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' या न्यायानें तीर्थरूपांस बहुतकरून उत्तम प्रकारचा संतोष होत असेल यांत शंका नाहीं. आतां आम्ही प्रत्यक्ष तिथें नव्हतों. परंतु असल्या गोष्टी कानांवर येण्याला कोणत्याहि तऱ्हेची पंचाईत नसते. आला गेला माणूसदेखील जातां येतां सांगतो, कीं अहो, तुमच्या त्या अमक्याच्या अमक्यानें अमुक केलें. असो. धोंडूभावजींना पळून जाण्याला विशेष कारण जें झालें तें पाहिलें, म्हणजे तर कोणालाहि आश्चर्य वाटल्याखेरीज मुळींच राहणार नाहीं. तें कारण आईचा कैवार हें होय. हें ऐकल्यावर आतां कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं? कुलीनाच्या घरांत ज्या बायकांचा कधींहि प्रवेश होऊं नये अशा एका बाईला जेवायला बोलावून तिला वाढण्याला, एकंदर तब्येत राखण्याला त्यांनीं आपल्या बायकोला हुकूम केला. धाकटे मामंजी कुठें गांवीं गेलेले. धाकटया मामेसासूबाई फणफण करूं लागल्या, पण उपयोग काय? बायकांचा फणफणाट चुलीपलीकडे नाहींच. मग त्या आमच्या धाकटया मामेसासूबाईसारख्या असोत कीं आणखी जहांबाज असोत! त्यांनीं आपल्याकडून करायचें तेवढें केलें. तें काय, तर दूर एका माडींत जाऊन चौघडी घालून निजल्या आणखी बसल्या बडबडत, झालें. बनूवन्सं लागल्या छुळुपुतू करायला आणि उमासासूबाई थोडयाशा चडफडल्या. तेव्हां तेवढेंच जाऊन त्यांनीं आपल्या वडिलांपाशीं सांगितलें! मग काय विचारतां? खूप संतापून, चवताळून उमासासूबाईंना शंकरमामंजी सडकून विनाकारण बोलत होते;

बोलतां बोलतां हातघाईवर आले; ही गोष्ट चिरंजिवांनीं पाहिली. आणखी एकदम मोठयानें " लाज नाहीं वाटत माझ्या आईला मारतां ते? " असें ओरडून ते तीर्थरूपांच्या अंगावर धावून गेले! आणि हें सर्व झालें कोणाच्यादेखत?--मग काय विचारतां? एकच हलकल्लोळ झाला. मारामारीपर्यंत वेळ आली. धोंडूभावजी घरांतून चालते झाले. उमासासूबाईंना अतोनात छळ सोसावा लागला. दोन दिवसांनीं धाकटे मामंजी गांवाहून येतांच त्यांच्या कानांवर ही गोष्ट गेली आणखी त्यांनीं ताबडतोब तार केली. ती बातमी शंकरमामंजींच्या कानीं जातांच, " मला त्या कारटयाचं दर्शन नको, तो मेला असंच मी समजतों. असलीं कारटीं जन्मलीं नाहींत, तर काय दुनिया ओस पडली आहे? या इंग्रजी विद्येचा गुणच हा, बापाची अमर्यादा करायची. तो जरी तिथें असला तरी मला कळवूं नको, मला त्याचें मुखावलोकन नको. गोपाळानें तार केली आहे, परंतु ती मुळींच मनावर न घेतां खरोखर तो कारटा तुझ्या घरी असला, तर त्याला लाथ मारून हांकून दे. " अशा अर्थाचे भले लांबलचक पत्र खुद्दांच्या हातचें आलें. तें पत्र वाचून त्या वेळीं आम्हांला तितकी मजा वाटली नाहीं; परंतु पुढें लवकरच वरची ही इत्थंभूत हकीकत जेव्हां समजली, तेव्हां मग त्या पत्राचें खरें स्वारस्य कळलें व हसूंहि आलें. काय करतील बिचारे असा पोरटा निपजला तर? असो.

याप्रमाणें हकीकत झाल्यावर व आम्हांला तार आणि पत्र आल्यावर अर्थातच आपलें कर्तव्यकर्म समजून तिकडून धोंडूभावजींचा शोध चालविला; परंतु महासागरांत सुई शोधणें आणखी मुंबईसारख्या शहरांत अशा पळून आलेल्या माणसाचा शोध लावणें दोन्हीं सारखींच सोपीं. त्यांत आणखी मजा ही होती, कीं धोंडूभावजी मुंबईला आले याबद्दल कांहींच माहिती नव्हती. आपला एकंदर अजमास केला एवढेंच काय तें. जितका म्हणून शक्य तितका शोध तर केला, परंतु कांहीं पत्ता लागेना. लागावा कसा? तेव्हां आतां आशा काय ती एवढीच राहिली, कीं ते आपण होऊनच येतील एक दोन दिवसांत; परंतु त्याचा कांहीं सुमार दिसेना. पंधरा दिवस गेले. तेव्हां एक पत्र आलें; तें कोठून? तर बनूवन्संच्या नवऱ्याकडून? काय तर ' असा असा आपला मुलगा आमच्याकडे पळून आला आहे व नोकरी लावून द्या म्हणून म्हणत आहे. मी त्याच्या पाठीस लागलों आहें, कीं तुम्ही आपले परत जाऊन अभ्यास करा पुढें, परंतु त्याचा पुण्यास परत न जाण्याचा कृत निश्चय दिसतो आहे. इ. इ इ. ' तिकडून तें तसें पत्र आल्यावर आम्हांला फार आश्चर्य वाटलें. कारण कधीं ज्यांचा संबंध नाहीं, ज्यांनीं आपल्या बायकोला टाकली म्हणून आम्ही सारीं नेहमीं शिव्याच देत होतों, त्यांच्या घरीं धोंडूभावजी जाऊन अशा तऱ्हेनें राहिले असतील, असें आमच्या स्वप्नांतरींहि आलें नाहीं. आणि धोंडूभावजी प्रत्यक्ष गेले तर खरे, आतां काय? त्याला आपल्याकडे बोलवावें कांहींतरी मिष काढून चाकरी देतों म्हणून, किंवा हरतऱ्हा करून, पण त्याला तिथून हलवून आणलें पाहिजे. पत्र पाठविलें, आपण स्वतः न्यायला येतों म्हणून लिहिलें; तेव्हां त्यांनी एकदाचें येण्याचें कबूल केलें; इकडून रुपये पाठविले

आणखी स्वारी मुंबईस एकदाची आली. ते आल्यावर कित्येक दिवस आम्हीं अगदीं मौनव्रत धरलें होतें. न जाणो कोणी कांहीं बोललें आणखी पुनः स्वारींनीं माथें फिरवून घेतलें तर काय करतां ? परंतु एक दिवस स्वारी आपणच रंगांत येऊन सगळी इत्थंभूत हकीकत मला सांगूं लागली. मीं आधीं ऐकलेल्या हकीकतींत आणखी त्यांच्या तोंडच्या हकीकतींत बराच फरक होता. त्यांनीं आपल्या आईचा असा कैवार घेतला आणखी वडिलांना अशा तऱ्हेनें टाकटाकून बोलले, कीं कांहीं बोलायची सोय नाहीं. मधून मधून ज्या माणसाच्या घरीं येण्यामुळें एवढा सगळा अनर्थ उसळला, त्याला तर शिव्यांची नुसती लाखोली होती. आणि ते दिवशीं ते रंगांत येऊन त्यांनीं आपल्या बापाच्या इतक्या कांहीं अनन्वित गोष्टी सांगितल्या व आपल्या बापाविषयीं ते इतके कांहीं कठोरपणानें बोलले, कीं माझ्या अंगावर शहारे आले. ज्या शंकरमामंजींनीं सकाळीं चार चार घटका नाक धरून बसावें व दहा दहा घटका गोमुखींत हात घालून बसावें, जुनाट चालीला सोडून कोणाचें इतकें वांकडें (त्यांच्या मतें वांकडें) पाऊल पडलें कीं, ज्यांनीं धर्म बुडाला म्हणून अगदीं आकाशपाताळ एक करून सोडावें व त्या माणसाची हवी तेथें हवी तशी टर करूं लागावें, त्याच गृहस्थाच्या मुलानें त्याच्याविषयीं उघड उघड असें बोलूं लागावें व काळेंबेरें जगापुढें उघडें करण्याची पाळी आणावी यासारखी आणखी लाजिरवाणी ती गोष्ट कोणती ? किंबहुना आणखी पारिपत्य तें कोणतें ? असें म्हटलें तरी देखील हरकत नाहीं. मात्र तें पारिपत्य असें त्याला वाटूं लागलें पाहिजे होतें. मनुष्य-स्वभाव असा असतो, कीं आपले अहित करणाराचें अहित होऊन त्याला पारिपत्य झालें म्हणजे मनाला बरें वाटावें. मनुष्य खरा सुशिक्षित तेव्हांच म्हणावयाचा, कीं जेव्हां आपल्या अहितकर्त्यांचें अहित झालें तरीहि त्याला वाईट वाटावें. मी इतर कांहीं बायकांपेक्षां लिहिण्यावाचण्याच्या संबंधानें जरी किती सुशिक्षित असलें तरी ह्या वर सांगितलेल्या मनुष्यस्वभावाचा अंश माझ्या अंगांतून गेला नव्हता हें मला निर्भीडपणें कबूल केलें पाहिजे. धोंडूभावजींनीं ज्या सर्व हकीकती सांगितल्या त्यांतल्या कांहीं कांहीं याच्यापूर्वींहि माझ्या कानांवर आल्या होत्या; तथापि प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून (त्यांत अर्थातच कांहीं कमी जास्ती होऊन) जेव्हां ऐकल्या, तेव्हां माझ्या मनाला समाधान वाटलें. वाटलें कीं धर्मासंबंधानें नाकानें कांदे सोलणाऱ्या मामंजींना फारच चांगल्या तऱ्हेचें हें प्रायश्चित्त झालें ! त्या समाधानांत गर्क असल्यामुळें मी थोडी आनंदांत होतें; त्यांत मजा ही होई, कीं रात्रीं आम्ही बसलों म्हणजे तेथें धोंडूभावजी आपल्या बापासंबंधानें भर मंडळींत हवं तसें बोलत. पहिले दिवशीं त्याप्रमाणें त्यांनीं कांहीं गोष्टी सांगितल्याबरोबर मीं त्यांना दाबलें, परंतु ते कुठले ऐकायला ? ते अधिकाधिकच जोरानें बोलूं लागले. दुसरे दिवशीं तिकडूनहि दाबलें; परंतु त्यांचें तें खरें. त्यांतहि आपल्या बहिणीचें व आपलें भांडण झालेलें जेव्हां त्यांनीं सांगितलें, तेव्हां तर काय अगदीं त्यांना स्फुरणच चढलेसें दिसलें, आणि आपण आपल्या मेहुण्याच्या येथें असतांना तेथें पाहिलेल्या गोष्टीचें जेव्हां वर्णन दिलें, तेव्हां तर मला बिचाऱ्या बनूवन्संची अतोनात कींव आली.

ती कितीहि माझ्या वाइटाची इच्छा करणारी व मत्सरी असो, पण तेथल्या त्या हकीकती ऐकून तिला आतां संसारसुख म्हणून कधीं नाहींच, असा प्रकार असल्याचें जेव्हां दिसून आलें, तेव्हां मनाला वाईट वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. नवरा खुशाल संसार करीतच होता, आणि ही त्याच्या व त्याच्या त्या–पण मी आतां या साऱ्या वाईट गोष्टीचें वर्णन येथें न देणेंच बरें. तेव्हां तें सोडून देऊन पुढील कथेकडेच वळतें. येथें एवढेंच सांगून ठेवतें, कीं धोंडूभावजींना दादापुता करून येथेंच हायस्कुलांत घातलें.

◆ ◆ ◆

## ७६ : दादाची वकिलीची परीक्षा व उमासासूबाईंचा मृत्यु

* * * * * * * * * * * * * * *

आतां या प्रकरणांत मी कित्येक गोष्टी तरी सांगून देणार आहें. आतांशा काय झालें असेल तें असो, माझें चित्त भ्रमल्यासारखें झालें आहे. त्या काळच्या सुखदुःखाच्या कित्येक गोष्टी तरी माझ्या मनांत उभ्या राहतात! परंतु शेवटीं त्या सर्वांवर काळोख पसरून टाकणारी दुसरी जी भयंकर गोष्ट घडली, ती डोळ्यांपुढें येऊन त्या सर्व गोष्टींबद्दल विस्मरण पडल्यासारखें होतें. त्याचप्रमाणें दिवसानुदिवस अंगांत शक्ति नाहींशी होत जाऊन हें आपलें चरित्र आजतागाईत तरी कसें पुरें होणार, हा विचार पुनः पुनः मनांत येऊन मी गोंधळून जातें. दादाची व माझीहि फार इच्छा, की हें सर्व माझ्या हातून लिहिलें जावें! तो माझ्याबद्दल कितीतरी काळजी वाहतो! परंतु मी आतां लवकरच... अरेरे! पण मी हें काय वेडयासारखें करतें आहें! मी आपला निश्चय—धैर्य धरण्याचा निश्चय—अजिबात विसरलें काय? छे! असें करून कसें होईल? मीं जर धैर्य धरलें नाहीं तर दादाला काय वाटेल! झाडून टाकतें हे असले विचार, आणखी पुढल्या कामाला पुनः मन लावून लागतें. आतांपर्यंत मीं ज्या गोष्टी सांगितल्या, त्यांत कांहीं सुखाच्या कांहीं दुःखाच्या अशा मीं सांगितल्या, त्याचप्रमाणें याहि प्रकरणांत मी एक सुखाची व एक दुःखाची अशा दोन गोष्टी सांगणार आहें, मागल्या प्रकरणांत मीं सांगितलेंच आहे, कीं दादाला परीक्षेला जायला दोन तीन महिने अवकाश होता. त्याप्रमाणें तीन महिन्यांनीं त्याची परीक्षा होऊन, मोठी आश्चर्याची व आनंदाची गोष्ट कीं तो पास झाला. वकिलीच्या परीक्षेला प्रथम जाऊन पास होणें म्हणजे जवळ जवळ अशक्य गोष्ट, परंतु तीहि घडली. आमचा आनंद गगनांत मावेनासा झाला. असें वाटलें कीं, परमेश्वरानें मला यापुढें केवळ आनंदांत ठेवण्याचा निश्चय केला आहे. आतां काय ती काळजी तिकडच्या परीक्षेचीच ठरली; परंतु ती कांहीं काळजी करण्याजोगी गोष्ट नव्हती. तिकडील परीक्षा पास होईल कीं नाहीं, याबद्दल कधीं कोणालाच शंका वाटली नाहीं;

त्यामुळें आम्हांला त्याबद्दल कांहींच वाटत नसे; परंतु दादाची परीक्षा पास झाली, तेव्हां अत्यानंद झाला आणि आजीला तर हर्षवायु होण्याची वेळ आली. दादाला स्वतःला जो आनंद झाला तो तर काय बोलायची सोयच नाहीं! आतां आपण म्हणूं त्या वेळीं स्वतंत्रपणानें राहण्याला आपल्याला हरकत नाहीं; पुण्यांतली सनद न काढतां दुसऱ्या कुठल्या जिल्ह्यांतली काढली कीं संपलें, असें मनांत येऊन व आपण इतके विलक्षण बुद्धिवान् नसतां पहिल्यापासून विचार केल्याप्रमाणें आजीच्या उपयोगी पडण्याजोगे झालों, याबद्दल त्याला फारच धन्यता वाटली. त्यानें आतां परत पुण्यास जाण्याची तयारी केली; आजीच्या मनांतून मींहि चार दिवस येऊन जावें असें होतें. माझ्याहि मनांत एकदा पुण्यास जाऊन दुर्गीची, आजीची, सर्वच मंडळींची काय हालहवाल आहे ती पाहून यावें असें आलें. तेव्हां तिकडच्या व माझ्या विचारानें असें ठरलें, कीं दादाबरोबर जावें, आणखी मे महिना संपत आला म्हणजे आपण चार दिवसांपुरतें तेथें येऊन पुनः मला घेऊन परत यावें. येथें आतां अभ्यासाची थोडीशी अधिक गर्दी होती; पुण्यास गेल्यास धड बसण्यासदेखील जागा नसते, तेव्हां येथेंच राहणें बरें. सासूबाईंनींहि माझ्या जाण्याला रुकार दिला; इतकें सगळें ठरून मी व दादा दोघेंहि पुण्यास आलों. पुण्यास आल्यावर चार दिवस आनंदांत गेले. सुंदरीलाहि पाठविण्यासाठीं तिच्या नवऱ्यास व सासरच्या मंडळींस पत्र लिहिलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं तिला पाठवून दिलें होतें. एक-दोन दिवस गेल्यावर मी दुर्गीच्या घरीं गेलें. तेथें तिची एकंदर हालहवाल विचारली—ती आतां कांहीं सुधारली होती, परंतु पोरगा अगदींच रोडया. घ्यायला गेलें, तर ब्यें करून रडत बसायचा, असला होता. आतां अम्मळ चार शब्द बोलूं बरीक लागला होता. किंबहुना त्याचें सारें बळ, सारी हुशारी तोंडांतच आहे असें स्पष्ट दिसत होतें. दुर्गीचें त्याच्यावर अतोनात प्रेम पहिल्यापासून जसें होतें तसेंच—कां? त्याच्यापेक्षां शक्य असेल तर सहस्रपट अधिक प्रेम—दिसलें. तिला त्याच्या अंगीं अमुक गुण म्हणजे नाहीं असें स्वप्नींहि येत नसे. मी तिला भेटण्याबरोबर तिनें एकदम "ती बघ, ती बघ तुझी यमूमावशी!" असें म्हणून माझ्या पुढें केलें. मीं त्याला घेतलें; परंतु तो आपला रडतच होता. परत तिच्याजवळ गेला, तेव्हां मात्र गुलगुल बोलूं लागला. मुलाला बाळसें जरा असतें तर मुलगा चांगला दिसला असता; हुशार फार, थेट आईची प्रतिमा. सर्वच गोष्टींत आईची प्रतिमा म्हटलें तरी हरकत नाहीं. कारण संतापीपणा म्हणजे त्याच्या अंगीं इतका कांहीं भरला होता कीं कांहीं पुसायला नको. एकदा एखादी गोष्ट हवी, ती दे म्हणून म्हटलें, कीं ती मिळेपर्यंत कपाळदेखील फोडून आपल्या जिवाचें काय पाहिजे तें करील; मग त्याला त्याच्या जिवाची भीति नाहीं, कांहीं नाहीं; इतकें सगळें आमच्या दृष्टीनें जरी वावगें दिसत होतें, तरी दुर्गी त्याच्या गुणांचें वर्णनच करीत होती. तिला तो मुलगा म्हणजे काय वाटे आणि काय नाहीं! तें सर्व पाहून मला चमत्कारिक वाटलें, तरी पण एकंदरींत संतोष झाला. कारण त्या तिच्या अत्यंत वात्सल्यामुळेंच ती जगली. नाहीं तर खास जगतीना. तिच्या नवऱ्याचा मधेंच कुठें थांग लागे, मधेंच तो नाहींसा

होई, पण इतक्या काळांत स्वारी कधीं आली नाहीं. कोणी म्हणत तो कोणा नाटकाच्या कंपनींत शिरला आहे; कोणी म्हणत तसाच उगीच भटकतो आहे; पण घरीं त्याचें स्वतःचें पत्र मुळींच नाहीं. दुर्गीच्या मनाची त्याच्यासंबंधानें काय स्थिति आहे तें समजण्यासाठीं मीं भीत भीत तिच्याजवळ गोष्ट काढली व पाहिलें, तों ती त्याच्यासंबंधानें अगदीं पहिल्याइतकी चमत्कारिकपणानें व तिरस्कारानें बोलली. "येतील आले तर, जातात कुठें ? मला तर माझा गंग्या......" ती पुढें कांहीं बोलणार तोंच पलीकडे गंग्यानें कोनाडयांतली दिवली खालीं पाडली. तेव्हां ती पुरें न बोलतांच त्याच्याकडे जाऊन, "आतां तुझ्या या अचपळपणाला करावं तरी कसं ? ती बघ मावशी तुला वेडा म्हणते वेडा ? वेडाना तूं ? " असें म्हणाली व त्याला आपल्याजवळ गप्प बसण्यासाठीं विनवूं लागली. आपल्या नवऱ्याविषयीं व पोराविषयीं एकाच क्षणीं बोलत असतांना तिचा तो चमत्कारिक आवाज ऐकून मला काय बरें वाटलें असेल ? नवऱ्याविषयीं बोलत असतांना तिचा तो तिरस्कार, द्वेष, राग इत्यादिकांनीं ओतप्रोत भरलेला आवाज आणि मुलाशीं बोलतांना त्यांतलें तें सारें जाऊन त्याच्या ठिकाणीं अगदीं ओतप्रोत दिसून येणारें वात्सल्य ज्यांत भरलें आहे असा दुसरा आवाज, या दोन आवाजांचा विरोध किती विलक्षण होता ! तें कसेंहि असो, तिची एकंदर स्थिति आतां बरी होती हें पाहून मला फार बरें वाटलें. तिच्या माहेरच्या माणसांनाहि आतां एकंदरींत बरे दिवस होते. दुर्गीच्या बापाला थोडाबहुत पगारहि वाढला होता. दुर्गीचा भाऊहि आतां पहिल्या परीक्षेपर्यंत कायसा आला होता. दादाची वकिलीची परीक्षा पास होऊन तो आतां लवकरच वकील होईल, असें ऐकून त्या सर्व मंडळीस बरें वाटलें. आपलाहि जांवई जर नीट सुरळीत असता व अशी कांहीं परीक्षा देता तर आज आमच्या संसाराला नांव ठेवण्याला जागा नव्हती, असें बहिणाकाकूंनीं म्हटलें व त्यांच्या सुनेनें "बरं, त्याचं काय आतां ! हा गंग्या उद्यां चांगला जगून वांचून मोठा झाला, कीं आपलं नांव काढील" असें समाधान केलें. अशी एकंदर हकीकत ऐकून व दुर्गीला एक दिवस जेवायला बोलावून मी परत आलें. आतां मीं सांगितलेंच आहे, कीं दादाची परीक्षा उतरल्यानें आमच्या सुखाला पारावार नाहींसा झाला. आतां वहिनीबाईच्या स्वभावांत खास कांहीं तरी फरक पडेल, असें मला वाटलें व मीं त्याप्रमाणें दादाजवळ बोलूनहि दाखविलें. पण त्याचें तें खरें. त्यानें हसत हसत—आणखी आपल्या बायकोच्या देखत, "फरक आतां एकदाच पडेल" असें उत्तर दिलें. त्या त्याच्या 'एकदाच' चा अर्थच माझ्या लक्षांत आला नाहीं. तेव्हां सहजच मीं "हें रे काय नेहमीं तुझं ? एकदाच म्हणजे केव्हां ? " असें विचारलें. त्याबरोबर वहिनीबाई कपाळाला आंठ्याबिठ्या घालून आणखी माझ्याकडे टवकारून पाहून म्हणतात, "तुम्हांला नाहीं का समजलं, वन्सं ? एकदाच म्हणजे ओंकारेश्वरावर गेल्यावर हो ! "

अशा बोलण्यावर कोण काय बोलणार ? माझ्या तर बाई तिच्या त्या बोलण्यानें अंगावर कांटाच उभा राहिला. दादा कांहीं एक बोलला नाहीं. तो कधीं तिला बोलत

नसे; आणि होतां होईल तों अतिप्रसंग टाळी. दादाची परीक्षा पास झाली, आतां तरी ती कांहीं निवळेल असें जें मला थोडेंसें वाटलें होतें तेंहि थोडेच दिवसांच्या अनुभवानें नाहींसें झालें व कडू कारल्याच्या आणि कुत्र्याच्या शेपटीच्या म्हणीची यथार्थता उत्तम तऱ्हेनें अनुभवास आली. खरोखर तिच्या मनांत काय व्हावें असें होतें तें कांहींच कधीं समजत नसे. एवढें मला पक्कें कळलें होतें, कीं तिच्या मनांतून आपण एकदाचें अगदीं स्वतंत्र व्हावें असें होतें; परंतु स्वतंत्र होण्याला मुख्य साधन जी ही परीक्षा ती निर्विघ्नपणें पार पाडली असतांनाहि तिला बरें वाटलेंसें दिसूं नये, म्हणजे मोठें विलक्षण असें कोणास वाटणार नाहीं? दुसरें असें एक दिसून आलें, कीं माझें व दादाचें इतकें प्रेम होतें तें तिला बरें वाटत नसावें; तरी पण या आमच्या निव्वळ शंका होत्या. त्यांचा खरेखोटेपणा अनुभवाला येण्याला अद्यापि बराच अवकाश होता. यथावकाश तें सारें येईलच.

पुण्यास मी माहेरीं म्हणून जरी आलें, तरी पण चार दिवस सासरीं जाऊन राहणें जरूर होतेंच; त्याप्रमाणें मी तेथें जाऊन राहिलें. या राहण्यांत एक मला दुःखकारक परंतु जिला ती झाली तिला केवळ सुखकारक अशी गोष्ट झाली. ती कोणती तें थोडक्यांत सांगतें. उमासासूबाईंना हल्लीं ताप येत असे आणि तशा त्या तापांत दुसऱ्या कोणाला न सांगतां त्या खुशालगार पाण्यानें अंग धुवीत. घरांत कोणाला त्यांचा ताप कळूनच आला नाहीं. दिवसानुदिवस त्या आपल्या निस्तेजच होत चालल्या होत्या. हा प्रकार आज बरेच दिवस चालला होता आणि त्या याबद्दल यत्किंचित् देखील कांहीं काळजी घेत नसत; मला तर वाटलें, कीं त्या आपल्या जिवाला अतोनात कंटा-ळल्या होत्या व म्हणून कसा तरी तो एकदा जाईल तर फार बरें, असें होऊन नाना तऱ्हांनीं मरणाला बोलावणेंच करीत होत्या. मी आतां मोठी झालेली. त्यांतून त्यांच्यावर माझें प्रेम फार व माझ्यावरहि त्यांचा लोभ फार, यामुळें मीं त्यांना म्हटलें, "तुम्ही आतांशा अगदीं अशा कां दिसतां? तुम्हांला तापबीप येतो वाटतं?" परंतु त्या माउलीनें आपल्याबद्दल एक शब्दहि न उच्चारतां आमच्याबद्दल व सासूबाईंबद्दलच चौकशी केली व पुढें दोन दिवसांनीं मला एकीकडे गांठून म्हटलें, "काय? वन्सं चीन् माझी आतां गांठ नाहीं का पडायची! तुझं पत्र जाईल त्यांत लिही त्यांना, कीं मावंद्याला तुम्ही येणार आहां त्या चार दिवस आधींच या म्हणजे ठीक पडेल." हें त्या बोलल्या, त्या वेळची त्यांची मुद्रा मला अजून माझ्या डोळ्यांपुढें दिसते आहे. मीं त्यांना वचन दिल्याप्रमाणें लिहिलें आणि त्या रोज मला मग, 'उत्तर आलं का?' म्हणून विचारूं लागल्या. पत्र लिहिल्यापासून दोन दिवसांनीं त्यांनीं पुनः मला म्हटलें, "तूं किनी आतां इथून जाऊंच नको अं?" मला खरोखर त्यांच्या त्या बोलण्याचा हेतु कांहीं लक्षांत येईना. उगीच अशी शंका बरीक आली, कीं आपण आतां लवकर मरणार असें त्यांना वाटूं लागले होतें आणि त्या त्यांच्या विचारामुळें त्या असें करूं लागल्या होत्या. तेथून पांच चार दिवसांतच त्यांना खरोखरी सडकून ताप येऊन अगदीं अंथरुणाला खिळविलें. गोपाळमामंजींनीं आपल्याकडून डाक्तर आणला, परंतु त्या कांहीं केल्या औषध

घेईनात. डाक्टर आणल्याबद्दल संतापून जाऊन शंकरमामंजींनीं एक काढ्याची यादी लिहून आणली आणि तो काढा घेण्याविषयीं हुकूम करून पाहिलें; परंतु तोहि त्या घेईनात. माझ्याखेरीज, अगर गोपाळमामंजींच्याखेरीज कोणी जवळ आलें, तर त्यांनीं तावडतोब डोळे मिटून बोलेनासेंच व्हावें, असें चालविलें होतें. आतां अर्थातच मला त्यांच्या शुश्रूषेसाठीं राहावें लागलें; आणि खरोखर मी मनापासून राहिलेंहि. बनूवन्सं त्यांच्या दृष्टीसमोर नको म्हणत. 'वारूवन्संना आणूं का' विचारलें. तर मात्र 'पाहा आली तर' असें त्यांनीं गोपाळमामंजींना सांगितलें. त्यांनीं तिला आणण्याची तजवीज केली. आजेसासूबाई, मामेसासूबाई आतां बऱ्या वागूं लागल्या, परंतु त्यांनीं 'तुझी सासू आली का?' असें एकसारखें चालवलें होतें. धोंडूभावजींवर त्यांचा जीव होताच. किती झालें तरी त्यांचा मुलगा, आणखी तोहि एकुलता एक. होतां होतां मीं दोनतीनदा लिहिलें व गोपाळमामंजींनींहि एकदा लिहिलें व मुंबईहून सासूबाईंना घेऊन यायचें झालें. काय चमत्कार पाहा! उमासासूबाईंनीं जणू काय आमच्या सासूबाईंना भेटण्यासाठींच जीव ठेवेला होता. त्या आल्या आज संध्याकाळीं, आणखी दुसरे दिवशीं पहाटेच्या सुमाराला त्यांचा प्राण गेला. शेवटपर्यंत चांगल्या सावध. मरणापूर्वी सगळ्यांना त्यांनीं नांवें घेऊन हांका मारल्या. आणखी चांगलें "येतें अं आतां! बोलल्या चालल्याचा राग नका मानूं." असें कण्हत कण्हत बोलल्या. गोपाळ-मामंजींना त्यांनीं दोनतीनदा हांका मारल्या; परंतु काय बोलायचें तें बोलल्याच नाहींत. मला वाटतें त्यांना बोलवलेंच नाहीं. सुमारें पाव घटकेनें त्या पुनः बरळूं लागल्या. "एक जन्म होतें तुमच्या पदरीं, सुटलें आता बरं. खुशाल असा. आणखी चार......" पुढचीं अक्षरें तोंडांतल्या तोंडांत घुटमळल्या. हे त्यांचे शब्द कोणाला उद्देशून असावेत हें उलगडून सांगितलें पाहिजे असें नाहीं. या शब्दांनीं कोणाच्या मनाकर काय परिणाम झाला हें मला आतां सांगता येत नाहीं. माझ्या मनाला मात्र त्या शब्दांत किती अर्थ आहे याला कांहीं सुमार नाहीं असें वाटलें. त्या शब्दांत उमासासूबाईंनीं आपल्या सर्व आयुष्याच्या अनुभवाचें, सुखाचें वगैरे सारेंच कोंडून ठेविलें होतें. मला वाटतें, असे शब्द उच्चारले जावोत, अगर न जावोत परंतु असा विचार किती तरी स्त्रियांच्या मनांत येत असेल! त्यांतून उमासासूबाईंच्या स्थितीसारख्या स्थितींत असणाऱ्या स्त्रियांना तर मरणें म्हणजे 'यातनांतून सुटणें' असें वाटत असेल यांत शंकाच नाहीं. असो. त्या शब्दानंतर त्यांनीं मुळींच शब्द उच्चारले नाहींत. थोडया वेळानें घरघर लागून त्यांची इहलोकची वस्ती संपली.

◆ ◆ ◆

## ७७ : शंकरमामंजींच्या नशिबीं काय आलें ?

* * * * * * * * * * * * * * * * * *

उमासासूबाईंच्या मरणानें कोणाला किती दुःख झालें, याचें वर्णन आतां देण्याची जरूरच नाहीं. आजपर्यंतचा त्यांचा इतिहास मनांत आणला म्हणजे सहज सर्वांच्या लक्षांत येणार आहे. मला, सासूबाईंना, तिकडे आणखी गोपाळमामंजींना फारच दुःख झालें. आमच्या रोजगारावर त्यांनीं यावें आणि चार दिवस तरी सुखांत राहावें, असें आमच्या मनांतून फार होतें; परंतु नारायणानें आमच्या हेतूप्रमाणें मुळींच घडविलें नाहीं. त्यांचा गरीबपणा, सहनशीलपणा, आम्हां दोघांवरली–सासूबाईवरली त्यांची ममता, इत्यादि गोष्टी आठवून आम्हांला राहून राहून वाईट वाटे. गोपाळमामंजींवर तर त्यांची फारच माया; आणखी गोपाळमामंजींचीहि त्यांच्या ठिकाणी फार भक्ति. उमासासूबाईंना भावजींचें मोठें भूषण वाटे; गोपाळमामंजींना आपल्या वहिनीला कधींहि कांहीं कमी पडतां कामा नये असें वाटे. आपण तिला जर बरें पाहिलें नाहीं, तिच्याविषयीं काळजी वाहिली नाहीं, तर तिचे फार हाल होतील, ही गोष्ट ते कधींहि विसरले नाहींत. वडील बंधूंच्या पुढें बोलायला येत नाहीं त्याला इलाज नाहीं, परंतु शंकरमामंजींची जी आपल्या बायकोशीं वर्तणूक होती, तिच्यावरून त्यांना त्यांचा फार तिटकारा येत असे, ही गोष्ट अगदीं निःसंशय आहे. आजेसासूबाईंनीं किंवा धाकट्या मामेसासूबाईंनीं, उमासासूबाईंना बोलण्यास सुरुवात केली, आणखी ती त्यांच्या कानावर आली, कीं यांनीं लगेच उठून येऊन तें बोलणें मिटवावें. आतां साऱ्या गोष्टी कांहीं सांगतां येत नाहींत; पण येवढेंच सांगितलें म्हणजे पुरें आहे, कीं उमासासूबाईंना जर कांहीं सुखाचा लवलेश मिळाला असेल तर तो गोपाळमामंजींपासून मिळाला. बाकी त्यांचें जिणें म्हणजे केवळ असह्य होतें, यांत यत्किंचित्‌हि शंका नाहीं. असो. आजेसासूबाईंनाहि पुष्कळ रडूं आलें. परंतु अतिशय विलक्षण गोष्ट झाली ती ही कीं, धाकट्या मामेसासूबाईंच्या डोळ्यांचें पाणी चार दिवसपर्यंत खळलें नाहीं. त्यांना राहून राहून उमाळे येत. ज्या कधीं माझ्याजवळ धड भाषणदेखील करायच्या नाहींत त्या उमासासूबाईंच्या मरणाच्या तिसरे दिवशीं माझ्याजवळ त्यांच्या गरिबीचें, सहनशीलपणाचें वगैरे वर्णन करून ढळढळां रडल्या. त्यांना आपण जो त्रास दिला, जें टाकटाकून बोललों, तें सर्व आठवून त्या गरीब बिचारीचा आपण नाहक छळ केला असें त्यांना वाटलें व त्यांचें मन अतिशय खाऊं लागलें. त्यांत आणखी गोष्टींवरून गोष्ट निघून माझ्या दुःखाच्या भरांत मी जेव्हां त्यांस ती माहेराहून लुगडयासाठीं आलेल्या रुपयांची खरीखरी हकीकत काय होती ती सांगितली, तेव्हां तर त्यांना इतके कांहीं वाईट वाटलें व असा कांहीं उमाळा आला, कीं कांहीं पुसूं नये. इतका पश्चात्ताप त्यांना होईल, असें माझ्या स्वप्नींदेखील आलें नव्हतें; परंतु

मरणकाळ हा कांहीं विलक्षण आहे. त्याच्या दर्शनानें दगडालादेखील पाझर फुटतात; त्यांतून आपण केलेल्या छळाचें कांहीं कारण नव्हतें; उलट मरणानें माणूस आपल्या आदरास व भक्तीस पात्र होतें अशाबद्दल खात्री झाल्यावर मग तर काय ?

आजेसासूबाईंना हि वाईट वाटलें हें सांगावयास नकोच; परंतु त्यांच्या व शंकरमामंजींच्या वाईट वाटण्याला एक दिवसाच्यावर अवधि उरला नाहीं. दुसरे दिवसापासून दोघांनाहि दुसरें महत्त्वाचें काम पुढें आल्याकारणानें तिकडे मन घालावें लागलें. आतां लवकर लग्नाची तजवीज कशी व्हावी, मुलगी झटकन् कशी मिळावी, वैशाखाचा महिना संपलाच म्हणावयाचा; कारण चवदा दिवस झाले पाहिजेत. तेव्हां वैशाखाचे अखेरचे दोन मुहूर्त सांपडणें अगदीं अशक्य होतें. तरी ज्येष्ठांत एकंदर सात मुहूर्त होते, त्यांपैकीं अगदीं आधींचा जो साधेल, तो साधून घेतला पाहिजे हें अगदीं उघड होतें. तेव्हां अशी पुढल्या तरतुदीबद्दलच्या विचारांची गर्दी असल्यामुळें उमासासूबाईबद्दलच्या शोकाला मनांत जागाच राहिली नाहीं. तो सर्व प्रकार पाहून आमचा दोघांचा अगदीं संताप झाला; पण उपयोग काय ? आम्ही आपल्याशींच तडफडण्यापेक्षां आणखी काय करणार होतों ? एकमेकांपाशीं पुष्कळ बोललों, निंदा केली, मनुष्याच्या निर्दयतेबद्दल आश्चर्य केलें आणि स्वस्थ बसलों. शंकरमामंजींच्या जवळ स्पष्टपणानें बोलून त्यांची कानउघाडणी करावी, असें मनांत येऊन स्वारी एक दिवस अगदीं बेतांत आली होती, परंतु मी अतिशय आग्रह करून "त्यापासून कांहीं अर्थ नाहीं. उलट आपल्याला शिव्या मिळतील, आपलं हसूं होईल, आणि तितकं सोसून करायचं म्हटलं, तरी त्याचा उपयोग व्हायचा नाहीं कांहीच. आपल्या बोलण्यानं आणखी निंदेनं ते लग्न करायचे थांबणार होते थोडेच. उलट त्या दुःखस्थितींत अधिकउणी बाचाबाचीच व्हायची." असें तसें बोलून व एकदा "तुम्ही बायका असल्याच ! ज्यांत त्यांत मागें पाय; आपणच् मागें आणि दुसऱ्यालाहि मागें ओढायच्या" असें बोलणेंहि सोसून घेऊन, पण स्थिरस्थावर करून त्या भानगडींत पडूं दिलें नाहीं; तेव्हा अगदीं संतापून जाऊन, 'मी आपला उद्यां मुंबईलाच चालता होणार. मला तें काहीं पाहायला नको,' असें म्हणून डोक्यांत राख घालायला उठायचें. त्याहि वेळीं मीं पुनः स्थिरस्थावर करून 'चवदा दिवस होईपर्यंत कुठें जाऊं नये आणखी येऊं नये' असें सांगितलें. परंतु तितक्यांत माझें मलाच असें वाटलें, कीं इथें राहण्यापासून मुळींच चांगलें व्हायचें नाहीं. यांचे लग्नाचे सुखसोहळे व्हायचे, निदान बोलणीचालणीं तरी व्हायचीं, आणखी तें अगदीं सहन न होऊन एखाद वेळ चकमक झडण्याचा बेत यायचा. तेव्हां 'इथं नसलेलेंच उत्तम' अशा आशयाचे उद्गार माझ्या तोंडून निघतांच "मी तरी तेंच म्हणतों. आपणच् चला माझ्याबरोबर, का आपल्या मनांतून बाराव्या-तेराव्याचं जेवण जेवून लग्नाच्या जेवणावळी झोडायच्या आहेत ?" असा प्रश्न केला. "आपल्याला एक कांहींतरी सबब काढून खुशाल जातां येईल. मला कसं बरं जातां येईल ? मला राहलंच पाहिजे. बाराव्याला राहलं पाहिजे, आणखी लग्नालाहि राहलं पाहिजे. कांहीं युक्ति काढून न्यायचं असलं तर मीहि तयार आहें. मला

कांहीं राहावंसं कीं वाटतं आहे ? मला नाहीं का या गोष्टीचा संताप येत ? एवढं थोरलं यांचं वय झालं, यांना नातवंडं झालीं, आतां घोंडूभावजींचं लग्न करायचं, का आपलं करायचं ? एवढी बरोबरीची बायको मेली, तर डोळ्याला टिपूस नाहीं, कीं दुःखाचा उद्गार नाहीं. जो कोणी गृहस्थ येईल जाईल त्याच्याजवळ ' हूं ! सरला तिचान् आमचा ऋणानुबंध ' या वाक्यापलीकडे त्यांच्या तोंडून अक्षर नाहीं. तर हें पाहून माझ्या जिवाला कांहींच का वाटत नसेल वाईट ? मला नाहीं का आला संताप ? पण करायचं काय ! आपल्या हातच्या गोष्टी नाहींत, त्याच्यासंबंधानं होईल तें पाहावं याच्या पलीकडे काय करायचं ? आपल्या संतापण्याजाजावण्यानं त्यांचं लग्न कांहीं राहात नाहीं. परवांपासून दोन मुली पाहिल्या त्यांनीं. आणखी त्या मेल्या गुंडोपंतानं तीनदा टिपण नेलंन् ! ”

“ खरं का काय ? अन् हुंडयापांडयाचं काय ठरतं आहे ? ”

“ कोणाला ठाऊक ! ठरेल मेलं कांहींतरी ! आपण तिकडे मनच घालूं नये तें चांगलं. आतांशा दुपारचा क्रम धरला आहे तो उत्तम आहे. आपलं जेवल्याबरोबर दादाच्याकडे जायचं. मग घरची आठवण तरी ! बरं, ही घरीं काय करीत... ”

“ घरीं काय करीत असेल म्हणजे ? आतां आम्ही आपला अभ्यास टाकून तुमच्या या असल्या लग्नाच्या वाटाघाटी ऐकायला बसत जाऊं का काय ? वेडी कुठली ! बरं, तें असो. माझं आपलं म्हणणं असं आहे, कीं तूं आपली माझ्याबरोबर चल. मग यांना काय करायचं असेल तें खुशाल करूं दे. ”

“ मी एका पायावर तयार आहें म्हटलंना ? पण तें फार वाईट दिसेल. कांहीं युक्ति सुचत असली तर काढायची होती. ”

“ आम्हांला नाहीं सुचत कांहीं युक्ति ! तूंच तर आम्हांला युक्त्या सुचवतेस जेव्हां तेव्हां. मग आतां काढीनास एखादी ? ”

“ तें कांहीं नाहीं ! आपण जावं आणखी लग्नाला जर उशीर असला तर मी इथून कळवीन आणखी ताबडतोब मला कांहींतरी बहाणा करून बोलवावं. मी दादाला घेऊन येईन, नाहीं तर... ”

“ मग आतांच चलेनास ? ”

“ आतां कसं होईल बरं ? लोक म्हणतील काय ? आणखी आजेसासूबाई किती संतापतील ? तसं कांहीं जुळायचं नाहीं. आपल्याला तें पाहावायचं नाहीं. आपण आपलं जायचं. ”

“ बरं आहे. आम्ही जातों. तुम्ही आतां वऱ्हाडणी होऊन यथास्थित लग्नांतल्या मानापमानाचा... ”

“ हें काय बरं.असं बोलावं ! आपल्याला जायला सबब आहे. मला न्यायला काय बरं सबब काढणार ? ”

असें नाना तऱ्हेचें बोलणें काढून समजूत करून दिली, तेव्हां दुसरे दिवशीं, " आपल्याला गेलेंच पाहिजे, इथें अभ्यासाची फार नड होते, " वगैरे बोलून जाण्याची गोष्ट काढली, तेव्हां आजेसासूबाईंनीं डोळ्यांपाशीं पदर नेऊन " आमच्यावर मोठा गहजब गुदरला. काय आतां एवढ्या गोष्टीवांचून अडलं होतं ? बरं चला; आतां काय करायचं ? जें झालं तें परत थोडंच येतं आहे ? आतां पुढली तजवीज पाहिली पाहिजे. तेव्हां तेवढं झालं म्हणजे मग जा " असें म्हटलें; तेव्हां बाराव्या तेराव्याच्यासंबंधानें आजीचें हें बोलणें असेल असें समजून चटकन् म्हणायचें, " तें खरं, पण आतां काय करायचं आहे राहून ? आम्ही राह्यलों काय, आणखी नाहीं काय ? तिला कांहीं आहे का ? "

" तिला आतां काय आहे असायचं ? पण आतां हें पुढलं ठरतंच आहे, तें पंधराव्या सोळाव्या दिवशींच जुळलं तर... "

इतक्यांत पलीकडेच बसलेले शंकरमामंजी फार दुःखाकष्टानें " हं: ! आलं आहे नशिबीं तें केलंच पाहिजे. तितकाच तिचा आमचा ऋणानुबंध होता, आतां दुसरीचा असला...... " असें म्हणाले. ते त्यांचे शब्द कानीं पडण्याबरोबर तिकडे किती संताप झाल्यासारखा दिसला, कीं कांहीं बोलायची सोय नाहीं. मला वाटलें आतांच कांहींतरी खडाजंगी उडणार; पण नाहीं, थोडक्यावरच गेलें ! ओंठ चावीत तेथून उठूनच जायचें. नंतर गोपाळमामंजींच्या जवळ गोष्ट काढून परवानगी काढली. गोपाळमामंजींच्या लक्षांत त्यांतलें सारें मर्म आलें होतें; त्यांनीं थोडक्यांत पहिल्यानें ' बाराव्यातेराव्याला राहिलास तर पाहा ' असें म्हटलें, परंतु लागलीच, ' पण जा. इथें तरी राहून काय करणार ? ' असें म्हणून जाण्याची परवानगी दिली आणि स्वारींनीं त्याच रात्रीं मला विचारून व " पत्र पाठवीन त्याबरोबर कांहींतरी युक्ति करून निघून ये " वगैरे बजावून मुंबईला निघून जाण्याचें केलें.

◆ ◆ ◆

## ७८ : तें त्यांनीं केलें

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

अकरा दिवस झाले. पुढें दोन दिवस एकंदर क्रियाकर्मांतच गेले. धोंडुभावजींना फारच वाईट वाटलें हें म्हणजे सांगायला पाहिजे असें नाहीं. त्यांतून आतां आपल्याला सावत्र आई होणार हें ऐकल्या वेळेपासून तर त्यांचें डोकें संतापानें भणाणून गेलें होतें. आईचे दागदागिने आतां आपल्याला मिळण्याचा मुळींच संभव नाहीं असें मनांत येऊनच काय, बनूवन्संहि चडफडूं लागल्या होत्या. आईचे दागदागिने आपल्याला मिळतील अशी त्यांस फार आशा होती. हें लिहिणें माझ्या जिवावर येतें, परंतु जी गोष्ट खरी होती

ती गोष्ट लिहिल्याखेरीज माझ्यानं राहवत नाहीं एवढेंच ! आपल्या आईच्या दागिन्यांना दुसरी मालकीण येईल असें बनूवन्संच्या मनांत मुळींच आलें नव्हतें, असें दिसलें. परंतु तें जेव्हां का एकदम दिसलें, तेव्हांचा त्यांचा तो चडफडाट आणखी गडगडाट सांगायची कांहीं सोयच नाहीं. आम्हीं आपल्या ठिकाणींदेखील खेद करीत होतों. त्यांतून मुंबईच्या सुसंगतीनें व कांहीं कारणामुळें त्या रामकृष्णाची गोष्ट व त्याच्या बायकोची स्थिति दोनहि त्या वेळीं माझ्या नजरेसमोर आल्याकारणानें, पुरुष वारला म्हणजे पाठीमागें बायकोची व बायको मेली म्हणजे पुरुषाची स्थिति काय व कशी होते याचा विचार मनांत येऊन प्रत्यक्ष उदाहरणांनीं दोनहि गोष्टी जेव्हां डोळ्यांपुढें दिसूं लागल्या, तेव्हां मग काय विचारतां ? खेद व संताप या दोहोंनीं माझें अंतःकरण अगदीं पूर्णपणें ग्रासून जाऊन मला चैन पडेनासें झालें. वाटे, कीं देवा काय ही आमची स्थिति !

तेराव्या दिवशीं संध्याकाळींच मुली पाहण्याला जारीनें आरंभ झाला. एका भिक्षुकाची एक बारावें सरून तेरावें वर्ष लागलेली मुलगी पसंत झाली व पहिल्या बायकोच्या बाराव्या तेराव्यासाठीं केलेल्या सामानांतच आणखी भर घालून बरोबर सोळावे दिवशीं शंकरमामजींनीं आम्हांस दुसऱ्या उमासासूबाई दिल्या. आतां मी जर त्या लग्नांतलें एकंदर वर्णन देईन, तर मजवर कित्येक लोक कितीतरी तऱ्हेचे आरोप करतील, परंतु माझ्यानें येथें स्पष्ट तऱ्हेनें म्हटल्यावांचून अगदीं राहवत नाहीं, कीं पहिल्या लग्नांतले सर्व सुखसोहाळे शंकरमामंजींनीं या लग्नांत उपभोगण्यास कमी केलें नाहीं. घोडयावर बसून लग्न लावायला तर गेले, विडया तर तोडल्या, एकत्र नहाणें वगैरे संस्कार तर केलेच. त्या गृहस्थानें सुपारी लपविण्याच्यासंबंधानें सुद्धां मागें घेतलें नाहीं. आणखी काय ? जेवतांना घांस घेणें देणें; यांत तर कांहींच अर्थ नाहीं. तें झालेंच. मी आपली तें सारें पाहून चमत्कार करीत इकडून तिकडे करीत असें, दुसरें काय ! त्यांत मजा ही, कीं प्रत्येक वेळीं ते त्यांचे सुखसोहाळे पाहणाऱ्या मंडळीकडे पाहून हसून त्यांनीं म्हणावें, "अहो, आमचं काय, सारं झालं आहे; पण दुसऱ्या पक्षाची ही पहिलीच हौस आहेना ? अं" असें म्हणून त्यांनीं आपणच 'हेः हेः' करून हसत सगळ्यांकडे पाहावें. जणू काय, काय आपला मार्मिक विनोद आहे असें वाटूनच ते हसत असत; त्यांचे ते सुखसोहाळे होत, परंतु मला तें सर्व विषवत् वाटून मी आपली खिन्नपणानें कशीतरी काम करीत असें. केव्हां एकदा या कचाटयांतून सुटेन असें मला होऊन गेलें होतें. लग्न झालें. आतां आपल्याला माहेरीं जायला मिळेल तर फार चांगलें होईल असें वाटून मी अगदीं तडफड करीत होतें. दादाला जातांना सांगून जायचें होतेंच वाटतें, कीं इकडचा हा सगळा बखेडा आटोपला म्हणजे घरीं बोलावून न्यावी. याप्रमाणें तो चवदाव्या दिवशीं सकाळींच मला घेऊन जाण्यासाठीं आला. परंतु "आतां हें पुढलें कृत्य आटोपल्याखेरीज कांहीं तिला पाठवीत नाहीं" असा खडखडीत जबाब आजेसासूबाईनीं दिल्यानंतर मग काय करायचें ? आणि मलाहि तसें जाणें अगदीं गैरशिस्त दिसलें. आपल्याला आवडत नाहीं. सगळीं कांहीं गोष्ट खरी, पण उपयोग काय ?

आपल्या आवडण्यानिवडण्यावर जेथें गोष्टी असतील तेथें त्याचा विचार ! जेथें आपल्या आवडीचें असो वा नसो, व्हायचें तें होणारच अशी आपली पक्की खात्री, तेथें रिकामा संताप काय म्हणून करून घ्यावा ? हा माझ्या मनाचा विचार ! पहिल्यापासून, यामुळें मी आपली मुकाटयानें राहिलें. परंतु लग्न झालेलें ऐकण्याबरोबर ' तूं ताबडतोब मला बोलवायला येऊन घेऊन जा ' असें मीं दादाला सांगितलें होतें. त्याप्रमाणें त्यानें यायचें पण तो दोन दिवस आलाच नाहीं. मी अगदीं चुळचुळ करायला लागलें. मला स्वतःला ताबडतोब विचारायला येईना. पण तिसरे दिवशीं तो आला व त्यानें मला बोलावणें केलें. आजेसासूबाईनींहि मला जाण्याची परवानगी दिली, आणखी मी एकदाची माहेरीं गेलें.

तेथें गेल्यावर दादासाहेबांनीं शंकरमामंजींवरून जी माझी थट्टा आरंभिली, ती कांहीं विचारूंच नये. " वऱ्हाडीण " हें नांव मला दिलें. " शंकरकुकुल्या बाळाचं लग्न झालं का ? " असें तर कितीकदा विचारलें. त्यांना नाहीं नाहीं त्या शिव्या दिल्यान्. " आपल्या पोराच्या लग्नाचे दिवस ! तो आतां आपलं लग्न करतो आहे ना—" मीं तितक्यांत त्याचें तोंड धरून म्हटलें, " पण दादा, तुला त्याची पंचाईत पाहिजे कशाला ? कोणी कांहीं का करीना ? " कारण तितक्यांत खालून बाबा आपल्या माडींत गेले. त्यानंतर त्याचसंबंधानें कितीतरी आमचें बोलणें, विनोद वगैरे झाला. शंकरमामंजींचीं जीं काय काळींबेरीं कृत्यें त्याला ठाऊक होतीं, तेवढीं सगळीं काढून त्यानें त्यांची अगदीं टर, उडविण्याचा तडाखा चालविला होता. पुनः पुनः त्याचा डोळा जो होता, तो त्यांच्या गोमुखींत हात घालून बसण्यावर, भस्माचे पट्टे लावण्यावर व धर्माभिमानाच्या थोतांडावर ! त्यांत आणखी, मी त्यांच्या लग्नांतल्या विनोदांची, विडया तोडण्याची, चुळा टाकण्याची अशा हकीकती जेव्हां सांगितल्या, तेव्हां तर मुळीं त्याच्या संतापाला व त्या संतापाच्या बरळण्याला कांहीं पारावारच नाहींसा झाला. त्यानें एकसारखी बडबड चालविली होती. मला त्याची ती बडबड अगदीं गैरशिस्त वाटत होती किंवा ऐकायला नको होती असें नाहीं; उलट मला वाटतें मधून मधून नवीन नवीन गोष्टी सांगून मी त्याचा राग अधिकाधिक पेटवीतच होतें. तथापि फार झालें म्हणून म्हणजे मधून मधून " जाऊं दे रे, त्यांत काय आहे ? ज्याचं त्याच्याबरोबर ! ते कुठें तुम्हांला सांगायला आले होते अमुक करावं आणखी तमुक करूं नये म्हणून ! मग कां उगीच त्यांना शिव्या देतां ? त्यांचा आपला धर्माभिमान आहे त्याचप्रमाणें त्यांनीं लग्न केलं. त्यांनीं कधीं सुधारणेच्या गोष्टी सांगितल्या नाहींत, कांहीं नाहीं... " असें मी म्हणत असें.

" त्या धर्माभिमानाच्या थोतांडाबद्दल तर असल्या लोकांना खे......"

" थोतांड कशावरून म्हणतोस ! खरोखरीच त्यांना आपलं जुनं तें आवडतं. नाहीं म्हणून कशावरून ? " एवढीं अक्षरें माझ्या तोंडांतून निघालीं असतील नसतील, तों जो काय दादा संतापला आहे म्हणतां ! एकदम मला म्हणतो, " यमे, तूं आतां उगीच मला राग आणूं नको अं ! हा फुकट मिळाली की पितो, हव्या तितक्या रां... "

राजश्रीच्या संतापलेल्या मुखश्रींतून काय वाक्यें निघणार हे मला तेव्हांच समजून चुकलें आणि तो पुढें कांहीं बोलणार तोंच त्याला " अरे बाबा, उगीच बैस. मी चुकलें बोललें ती, मग तर झालं ? " असें म्हणून तें बोलणे तितकेंच थांबविलें.

आठ चार दिवस जातात न जातात तोंच मला एक पत्र आलें, त्यांत " गोपाळमामंजींना मीं एक पत्र पाठविलें आहे, माझी येथें जेवण्याखाण्याची सध्यां तारांबळ आहे; अभ्यासाचे दिवस, अशी तारांबळ होऊन उपयोगी नाहीं. जागेचें भाडें उगीच अंगावर चढतें, तेव्हां आईस पाठवून द्यावें वगैरे मजकूर लिहिला आहे ते समजून आपली ताबडतोब रवानगी करतील. " वगैरे मजकूर त्यांत होता. मी तें सर्व समजून सासरीं गेलें तों त्याची वाटाघाट चाललीच होती. शेवटीं तिसरे दिवशीं आमच्या जाण्याचा बेत मुक्रर झाला, आणि मीं दुर्गीला भेटण्यासाठीं, आजीला विचारण्यासाठीं वगैरे येऊन पुनः माहेरीं एक दिवस राहिलें, दुर्गीला भेटलें. आजीचें माझें काय बोलणेंचालणें व्हायचें तें झालें आणि दादाला नेहमीं पत्र लिहित जाण्याचीं अभिवचनें देऊन व त्याची परवानगी घेऊन सासरीं आलें. जाण्याच्या वेळीं तो मला गाडीवर पोंचवायला यायचा त्याप्रमाणें आला होताच. आम्हांला येथें दुपारच्या गाडीला बसवून दिलें म्हणजे उतरून घ्यायला तिकडून येण्याविषयीं लिहिलेंच होतें. त्याप्रमाणें सर्व व्यवस्था होऊन आम्ही एकदाच्या दोघीहि पुणें सोडून निघालों. ज्या आनंदानें निघालों त्याच्यापेक्षां किती तरी विपरीत अशा स्थितींत......

◆ ◆ ◆

## ७९ : धोंडूभावजींचें आपल्या वडिलांस पत्र

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मुंबईस आल्यानंतर सुयंत्रित गाडें सुरू झालें. पहिल्या प्रथम कांहीं दिवस अर्थातच पुण्याच्या एकंदर हकीगतींविषयीं बोलणींचालणीं व त्यावरून होणारे विनोद वगैरे झाले. त्याविषयीं कांहीं विशेष सांगावयास पाहिजे असें नाहीं.

अशा तऱ्हेनें सुयंत्रितपणें क्रम चालला असतांना सुमारें एक महिना गेला नाहीं तोंच एके दिवशीं धोंडूभावजी आपलें अवचित आमच्या येथें आले. मागें एकदा ते पळून आले असतां त्यांची खाण्यापिण्याची वगैरे सोय केली होती. आतां ते थोडेसे सुधारत चालले होते. त्यांतून आमच्या शेजारच्या त्या दोघींनीं एकदादोनदा त्यांची कानउघाडणी केली व विष्णुपंतांनीं आणि नानांनींहि त्यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, तेव्हांपासून त्यांचें मन शिकण्याकडे लागलें होतें. ते म्हणजे मोठे विलक्षण हुशार होतील अशी कांहीं आशा नव्हती, परंतु पहिल्यापेक्षां, आणखी पुण्याच्यापेक्षां त्यांच्यांत फारच सुधारणा होत चालली होती. संगति व उदाहरण या दोन गोष्टींनीं

मनुष्याच्या वृत्तींत किती फरक पडत जातो याचें उत्तम उदाहरण धोंडूभावजी हे होते. गेल्या वर्षसवावर्षांत बापाचा राग होऊन आणि त्यांनाहि बापाचा संताप येऊन ते आमच्या येथें राहिल्यापासून त्यांच्या एकंदर वृत्तींत चांगलाच फरक पडला. परंतु ते आई वारल्यानंतर पुण्याला जाऊन बापाचें दुसरें लग्न झाल्यावर जेव्हां परत आले, तेव्हांची त्यांची वृत्ति तर फारच विलक्षण झालेली दृष्टीस पडली. बापाचें नांव निघालें, कीं कपाळाला आठया चढवून त्यांनीं तिटकारा दाखविलाच ! आणि आश्चर्यांत आश्चर्य हें, कीं ते आपल्या आईच्या संबंधानें अतोनात भक्ति दाखवूं लागले. ज्या आईचा अनादर त्यांनीं अतोनात केला, त्या आईसाठीं ते आतां कितीदा रडले म्हणतां ? आणि त्या आईला वडिलांनीं विनाकारण छळल्याबद्दल व आतां दुसरें लग्न केल्याबद्दल त्यांच्या अंगाचा अतिशय संताप होऊन गेला होता. त्या आईची गोष्ट निघाली, व लागोपाठ त्यांच्या बापाच्या दुसऱ्या लग्नाची गोष्ट निघाली, कीं ते अगदीं लाल होऊन जात आणि हवें तसें बडबडायला लागत. आम्ही आपलें तें सारें हसवण्यावारी घालवीत असूं, दुसरें करायचें काय ?

एके दिवशीं यशोदाबाईपाशीं बसून त्यांनीं आपली व आपल्या आईची सर्व हकीगत सांगितली आणि आतां बापानें दुसरें लग्न केलें याबद्दल अतिशय संतापून " मी एकदा त्यांना चांगलं टाकून बोलणार आहें, त्यांची माझी गांठ तर पडूं द्या " असें म्हटलें. कधीं " मी त्यांची खूप चांगली फजिती करीन " असेंहि म्हणत; मी त्यांना तसलें बोलण्याबद्दल यत्किंचित्‌देखील उत्तेजन न देतां मोडून काढी. पण आम्हीं कितीहि कांहीं जरी केलें, तरी कांहीं त्यांचा संताप कमी होत नसे. कांहीं मंडळी ज्या बाजूला जातील त्या बाजूची अगदीं कमाल करून सोडणारे असतात; मग कितीहि संकटें आलीं आणि कांहींहि जरी झालें तरी त्यांचा दुराग्रह सुटायचाच नाहीं. धोंडूभावजी त्यांपैकींच आहेत, अशी माझी खात्री झाली. ज्या आपल्या आईला त्यांनीं इतके दिवस अशा तऱ्हेनें छळलें, त्याच आईची आतां अगदीं अशी भक्ति त्यांच्या मनांत उद्भवली, कीं कांहीं पारावार नाहीं. आमच्या दोघांविषयीं पहिल्यापासून जें त्यांचें मत वाईट तें आतां इतकें उत्तम बनलें, कीं ते आमच्या भजनीं लागले. आम्हांला सोडून कुठें जाऊं नये असें त्यांच्या मनानें घेतलें ! असो.

आतां वर सांगितलेंच आहे, कीं पुण्याहून आल्यावर त्यांच्या वृत्तींत झालेला फरक फार विलक्षण तऱ्हेनें दिसून येऊं लागला. आणि ते आल्यापासून पंधराव्या दिवशीं तर तो इतका विलक्षण तऱ्हेनें आमच्या अनुभवाला आला, कीं आम्हांला देमायधरणी ठाय झालें, तें काय आणि कसें, तें आतां सांगितलें म्हणजे पुष्कळांना हसूं येईल. मुंबईस आल्यावर पंधरा दिवस वडिलांच्या लग्नासंबंधानें राग व आईच्या मरणासंबंधानें शोक हीं चाललींच होतीं. मध्यंतरीं एक दिवस कुठें बसून, कोणाच्या इथें आम्हांला कांहीं ठाऊक नाहीं; आणखी त्यांनीं आपलें शंकरमामंजींना एक भलें थोरलें वेड्यावांकड्या व आणखी त्याच मासल्याच्या मजकुराचें पत्र पाठवून दिलें. धोंडूभावजी म्हणजे असें

कांहीं करतील, असें मला कांहीं त्या वेळीं वाटलें नाही; परंतु विक्षिप्ताचा विक्षिप्तपणाच कोणत्याहि मार्गानें जरी राहिला, तरी तो विक्षिप्तपणाच. त्यांत कांहीं बरेपणा सांपडण्याची मारामारच! या न्यायाप्रमाणें हेंहि एक कृत्य केलें. त्यांत आपल्या वडिलांच्या धर्मथोतांडाबद्दल, दुष्ट संवईबद्दल, मत्सरी स्वभावाबद्दल व आपल्या आईला अतोनात छळून छळून तिला ठार मारल्याबद्दल, जें काय मनाला आलें तें लिहिलें होतें; दुसरें लग्न केल्याबद्दल तर काय जी विटंबना केली; ती कांहीं वर्णन करतांच येत नाहीं. बरें शेवटीं सगळ्याचा कळस जो केला होता तो आमच्या दोघांची स्तुति करून! कसलीहि सर आपल्याला नाहीं, सुधारक सुधारक म्हणून विनाकारण छळ करतां. एक ना दोन! जें म्हणून कांहीं मनांत येईल, तें मागें पुढें विचार न करतां खरडून दोन चार ताव मात्र तयार करून, दिले वडिलांच्या नांवावर पाठवून. आम्हांला त्यांतला गंधहि नाहीं. नाहीं तर केव्हांच तें फाडून टाकलें असतें. पत्र तिकडे गेलें, आणखी मग आगीला काय विचारतां? दुसरे दिवशीं आम्हांला एक असें लांबलचक पत्र आलें आणि त्यांत अशी आमची सार्‍यांची निंदा--विटंबना म्हटली तरी चालेल--केली होती, कीं आतां मी चांगली शंकरमामंजींच्या असल्या लिहिण्यासंवरण्याला निरढावलें असतांनाहि त्यांच्या या वेळच्या वेडयावांकडया लिहिण्यानें मन अस्वस्थ होऊन चार घटका माझ्या डोळ्याचें कांहीं पाणी खळलें नाहीं. मला, तिकडे, नानासाहेबांना, विष्णुपंतांना आणखी त्यांच्या त्या दोघी बायकांना--झाडून सार्‍यांना अशा कांहीं शिव्या दिल्या होत्या कीं कांहीं पुसूं नये. एकंदर 'सुधारक' म्हणून जसें वाटेल तसें लिहिलें होतें. आम्हांला आमचीं नांवें घेऊनच नव्हे तर उद्देशून "बाजारबसव्या, वेश्या," इत्यादि नांवें तर दिलींच. तिकडच्या मंडळींना तर काय नांवें दिलीं आणि काय नाहीं ती आतां मनांत येण्याबरोबर माझ्या अंगावर कांटा उभा राहिला आहे. त्यांच्या त्या मुलाला आम्हीं फुसलावलें, पत्र आम्हींच लिहिलें, परंतु सही त्याची केली. लिहविलें त्याच्याकडून. प्रत्यक्ष बापाला असें पत्र लिहावें ही कांहीं त्याची अक्कल नाहीं. त्याला हें असलें सुचायचेंच नाहीं, किती जरी वाईट झाला तरी तो माझा मुलगा! पण तुमच्या शिकवणीनें असा बिघडला. त्याच्याकडून पत्र लिहवून तुम्हीं माझ्या काळजाला डाग देण्याचा घाट घातला. अशा तर्‍हेचा उपोद्घात करून मग आमचें प्रत्यक्ष नांव सोडून एकंदर सुधारक असा शब्द घालून इतकें कांहीं (काय विशेषण लिहिलें म्हणजे त्याचें यथायोग्य वर्णन होईल मला कांहीं समजत नाहीं.) अद्वातद्वा-सभ्य माणसाला अत्यंत अयोग्य अशा शब्दांनीं लिहिलें होतें कीं, तें वाचून तीनचार दिवस मला अभ्यास कसा तो सुचला नाहीं. माझी स्थिति काय झाली ती मीं वर सांगितलीच. तें पत्र मजजवळ पडलें आहे. परंतु माझ्या या चरित्रांत देण्याच्या योग्यतेचें तें आहे असें मला वाटत नाहीं, यामुळें देत नाहीं.

धोंडूभावजींना बोलावून आणून काय लिहिलें होतें, काय नाहीं विचारतां, त्यांनीं सर्व सांगितलें; इतकेंच नव्हे, तर एक पेन्सिलीची नक्कलच त्यांनीं आम्हांला दाखविली.

ती वाचून त्याला पुष्कळ रागें भरायचें, पण उपयोग काय ? त्यांनीं आपलें ' ह्यं ह्यं ' वारीच घालवलें. आणखी तरी काय बोलणार ? दोन-तीन दिवस गेल्यावर एक लहानसें पत्र लिहून शंकरमामंजींस एवढें मात्र कळविलें, कीं " तें पत्र लिहिण्यांत आमचा यत्किंचित्हि संबंध नव्हता; इतकेंच नव्हे, तर आपलें पत्र येईपर्यंत अशा तऱ्हेचें पत्र आपणांस धोंडूनें लिहिलें आहे असें आमच्या स्वप्नींहि नव्हतें. प्रत्यक्ष बापाला त्याच्या मुलाकडून अशा तऱ्हेचें पत्र लिहविण्याइतकें नीच काम करण्याची प्रवृत्ति अजून माझ्यामध्यें झाली नाहीं, आणि पुढेंहि असली नीच प्रवृत्ति कधीं होईल असें वाटत नाहीं. आपल्याला हें लिहिणें खरें वाटावें अशी माझी इच्छा आहे, मग खरोखर काय होईल तें होवो ! "

हे पत्र जाण्याबरोबर तावडतोब त्यांचें एक पत्र आलें. त्यांत स्पष्ट तऱ्हेनें लबाड म्हटलें नव्हतें तरी " आपला हात त्या पत्रांत नाहीं, हें असंभवनीय किंबहुना अशक्य आहे. आपण नाहीं तर आपल्या घरांतली, अगर आसपासची दीडशहाणी सुधारक मंडळी असतील " वगैरे वगैरे मजकूर होताच. तेव्हां तर फारच संताप आला. परंतु " आपल्याला वाटेल तसें वाटो, आमचा कोणाचाहि त्या पत्रांत अर्थाअर्थी संबंध नाहीं. आतां खरें माना अगर नका मानूं ; पुनः मी यासंबंधानें लिहूं इच्छित नाहीं. " असें एक चरचरीत उत्तर लिहून पाठविलें व धोंडूभावजींना पुष्कळ रागें भरणें झालें.

अशा तऱ्हेनें हें फट् म्हणतां ब्रह्महत्येचें मधेंच एक लचांड झालें. आणखी एक आठवडाभर आमचीं दोघांचींहि मनें अगदीं खिन्न होऊन गेलीं होतीं. शंकरमामंजींना आमचेविरुद्ध बोलायसंवरायला आधीं कांहीं नकोच असे आणखी त्यांत असें झालें मग काय विचारतां ? धोंडूभावजींना आतां कांहीं बोलायला जावें तर तें आपलें उठून कोठें तरी चालते व्हायचे. आतां इतकें झाल्यावर पुण्यास जाण्याची कांहीं त्यांना सोय नव्हती. घरांत पाऊलसुद्धां बापानें घालूं दिलें नसतें. आणखी काय ? तेव्हां आम्ही इथें बोललों संवरलों तर स्वारी पहिल्यासारखी कुठेंतरी भटकायची; तेव्हां आपलें सौम्यपणानें जितकें होईल तितकें आम्ही त्यांना बोललों; बापाचें पत्र काय आलें होतें तेंदेखील त्यांना दिसूं दिलें नाहीं. कारण न जाणों, पुनः आणखी त्यांनीं कांहींतरी त्यावर भरकटलें तर काय करतां ? धड समजेना, धड उमजेना, अशा माणसाचें चित्त धरायचें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखेंच आहे. पण तीच बांधायला जाण्याचें आमच्या वांट्याला आलें होतें. असो.

अशा तऱ्हेनें मधें एक आठवडा गेला. मीं तें पत्र कोणाला दिसूं दिलें नाहीं; इतकेंच नाहीं तर त्यांतला मजकूर होतां होईल तों कोणासहि—यशोदाबाई-लक्ष्मीबाई वगैरे मंडळींसहि कळूं दिला नाहीं. परंतु अशा गोष्टी कशा झांकून राहतात ? जेमतेम राहिल्या, झालें.

अति झालें म्हणजे कोठेंतरी ओकावेंच लागतें, या न्यायानें मीं दादाला एक चांगलें सविस्तर पत्र लिहिलें. त्यांत मात्र मीं मला जें काय वाटेल, तें

लिहिलें होतें. बरोबर मामंजींचें व भावजींचें दोन्हींहि पत्रें त्याला पाहण्यासाठीं पाठविलीं होतीं.

त्यानंतर सुमारें महिना गेला. दादाकडून पत्र आलें :—''आपण सध्यां काय करावें या विचारांतच आहों. सनद कोणत्या जिल्ह्यांत काढली असतां आपल्याला फायदेशीर होईल वगैरेविषयीं चौकशी करतों आहोंत; माझ्या तर मनांतून पुण्यासच राहावें असें येतें, परंतु पुण्यांत राहिल्यावर घरांत जुळण्याची मारामार; गांवांतल्या गांवांत दुसरीकडे राहणें अशक्य, निदान फारच वाईट दिसेल आणि तसें करणेंहि गैरशिस्त. बरें न केलें तर घरांत होणाऱ्या गोष्टी दृष्टीनें पाहवत नाहींत, मनाप्रमाणें वागायला सांपडत नाहीं, तेव्हां मी मोठया बुचकळ्यांत पडलों आहें. आपला नुसता कोर्टांत जाऊन खटले चाललेले पाहात असतों. अगदीं संध्याकाळ झाली म्हणजे जेवणापुरता घरीं येतों. आणखी जेवल्यावर आपल्या खोलींत येऊन बसतों. बाबांनीं अजून मला तूं पुढें काय करणार म्हणून विचारलें नाहीं व मींहि त्यांना आपण होऊन काय करायचें, काय नाहीं तें विचारलें नाहीं. ठिकठिकाणीं पत्रें पाठवून पाहतों आहें, कोणत्या जिल्ह्यांत कशी काय हालहवाल आहे तें ! जेथें ठीक दिसेल तेथें जाऊं, नाहीं तर आपलें पुणें आपल्याला आहेच. तें कसेंहि जरी असलें तरी आपलें मला फारच आवडतें, तुमचीदेखील परीक्षा झाल्यानंतर तुम्ही इथेंच वकिली करायला या असें मी म्हणतों. तुम्ही येऊन राह्यलांत तर मग मी भीत नाहीं. माझें घरदार सारें तुमच्या तेथेंच, मग इकडे घरीं कांहीं का होईना ? तुझें काय मत आहे ?" अशा मजकुराचें त्याचें पत्र आलें. तेव्हां आज किती दिवस त्यासंबंधाची वाटाघाट चालली असतांनादेखील पुनः आम्ही त्याचा काथ्याकूट करायला लागलों. बाकी माझी मोठी इच्छा ही खरी कीं, त्यानें आणखी आम्ही कोठेंतरी एकाच गांवांत एकाच ठिकाणीं राहावें. पुणें आम्हांला दोघांनाहि आवडत होतें; परंतु पुण्यांत स्वतंत्रतेनें राहण्याची शक्यता दोघांनाहि नव्हती. त्यांतून इकडच्या मनांतून मुंबईसच हायकोर्टाची सनद एकदम काढावी असें होतें. असा एकंदर प्रकार होता. परीक्षा अजून उतरायची होतीच, परंतु म्हणतात ना, 'बाजार नाहीं भरला तोंच उचल्यांनीं कमरा बांधल्या' त्यांपैकीं आमची स्थिति होती. मला वाटतें, एकमेकांच्या मनांतले विचार एकमेकांना उघड दिसत नाहींत. ही व्यवस्था जर असती तर माझे विचार पाहून सगळ्या आमच्या मंडळींत माझें पुरें हसूं झालें असतें. कारण पुढच्या संबंधानें माझ्या मनांत काय पण विचार येत होते, आणखी कसल्या कसल्या आशा उत्पन्न होत होत्या, की कांहीं हद्द ! मुंबईस येण्याच्या पूर्वीचें मनोराज्य म्हणजे त्याच्यापुढें कांहीच नव्हतें. कारण त्या वेळीं मला तसल्या सुखाची कल्पनाच नव्हती. आज त्या सुखाचा चांगला अनुभव आलेला, तेव्हां त्याच्या पलीकडे आतां कल्पना बसवून मनोराज्य उभारलें जात होतें. मग त्याच्या अद्वितीयत्वाला काय विचारतां ? एकसारखे मजल्यावर मजले चढत होते.

दादाचें पत्र आलें त्याचें उत्तर मीं लागलींच लिहिलें; त्यांत अर्थातच तूं आतां

आमच्या परीक्षेचा निकाल होईपर्यंत कांहीं फारसें करूं नकोस. पण उगीच बसायचें तें पुण्यांतलीच सनद काढून चालूं दे, वगैरे मजकूर होता.

आणखी एक महिना गेला. परीक्षेला आतां बरोबर दोन महिने राहिले. अभ्यास अगदीं मोठ्या कष्टया मेहनतीनें चालला होता. रात्रीं अपरात्रीं जागून वाचण्यापर्यंत मजल आली. मी आपल्याकडून अतोनात काळजी घेत असें. सर्व प्रकार यथास्थित चालला होता. इतक्यांत दादाच्या हातचें एक चमत्कारिक पत्र मला आलें.

◆ ◆ ◆

## ८० : दादाचें चमत्कारिक पत्र

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

"अनेक आशीर्वाद विशेष. आपण गेल्यापासून येथें काय काय उलाढाली झाल्या आणखी काय काय नाहीं याला सुमारच नाहीं. आतां बहुतकरून थोडेच दिवसांत आमचें सोंवळेंगबाळें उचलावें लागणार आहे. माईसाहेबांचा व आमचा आतां पक्का बेबनाव झाला आहे. याचें कारण पुढील हकीगत ! मी तेरवांचे दिवशीं रोजच्या-प्रमाणें वेळेवर कोर्टांत गेलों, परंतु तेथें गेल्यावर कांहीं काम नसल्यामुळें घरीं कांहीं लिहिण्याचें काम होतें तें तरी उरकावें म्हणून तसाच घरीं आलों. मला वाटतें मी आलेला माईसाहेबांस मुळींच ठाऊक नाहीं. मी गेलों तों आपल्या मागल्या खोलींत जाऊन बसलों. दार लावून टाकलें होतें. इतक्यांत पलीकडल्या खोलींत कोणी बोलतें आहेसें वाटलें म्हणून मी कान देऊन ऐकूं लागलों, तों पुढील संवाद तुटक तुटक माझ्या कानीं आला :—

"तें मी कांहीं एक ऐकायची नाहीं. माझें मला बऱ्या बोलानें आणून द्या."

"आतां पण जर नाहींत तर आणून कुठून देऊं ? माझ्याजवळ असते, तर मीं क्षणभर तरी ठेवले असते का ? देवऋषिबोवा म्हणता..." पुढचें कांहीं ऐकूं आलें नाहीं. कांहीं वेळ फार लहान्यानें कुजबूज झाली. पुनः शब्द मोठमोठ्यानें येऊं लागले. शेवटीं स्पष्ट ऐकूं येण्याइतके मोठ्यानें शब्द येऊं लागले तेव्हां—

"अहो, मला मूल नको बाळ नको. माझे दागिने.........कुठून या आईनं तुमची......"

"काय हें ? यशोदा, तुझ्या बोलण्याला कांहींतरी ताळतंत्र ! तिनें तुझ्या बऱ्या-करितांच केलंन् ना ? तूंच मुलांसाठीं......"

"तें कांहीं नाहीं. तूंच अवदसे माझे दागिने..............." त्यानंतर भांडणाला सुरुवात होऊन बरींच बोलणी झालीं असावीं. शेवटीं रडण्याचा व हुंदक्यांचा

आवाज कानीं पडूं लागला, तेव्हां आपण उठून बाहेर जाऊन काय घोंटाळा आहे तो पाहावा, असें माझ्या मनांत येऊन खोलीचें दार उघडावें असें वाटलें. असो. यमूताई, मीं हीं बोलणीं चोरपणानें चोरून ऐकलीं याबद्दल तूं मला दोष देशील व असें कोणाचें चोरून बोलणें ऐकूं नये ही गोष्ट खरी, परंतु ' माझे बऱ्या बोलानें आणून द्या ' हे शब्द ऐकण्याबरोबर, दागिन्यांची गोष्ट माझ्या मनांत एकदम उभी राहून मी बरेंवाईट सर्व कांहीं विसरून गेलों. मला फार दिवस त्या दागिन्यांचें गूढ पडलें होतें. तें आतां या वेळेस कदाचित् कांहीं मजकूर ऐकायला सांपडून बरेंच उकलेल; तेव्हां आपण हीं संधि व्यर्थ जाऊं देऊं नये असें मनांत येऊन मीं मागेंपुढें पाहिलें नाहीं, किंवा मला विचार करण्याला फुरसतच झाली नाहीं म्हटलें तरी चालेल. ' दागिने ' हा शब्द मनांत येण्याबरोबर मी सर्व कांहीं विसरूनच गेलों म्हणेनास! मग त्याबद्दल काय दोष देशील तो दे.

माईसाहेबांचा आवाज मीं तेव्हांच ओळखला, आणखी त्या ज्या बाईशीं बोलत होत्या, ती कोण तेंहि पण मीं तेव्हांच ताडलें. कारण ती बाई तुझ्या माझ्या बोलण्यांत पुष्कळ वेळां आली होती. आणखी मीं तिला पुष्कळदा पाहिलें होतें. शिवाय दागिन्यांचा व त्या बाईचा कांहींतरी संबंध असला पाहिजे असें मला पहिल्यापासून पक्कें वाटत होतें, तो माझा तर्क शेवटीं खरा झाला. जी बाई तूं प्रथम पाहिलीस तेव्हां मला सांगितलंस, तीच ती बाई. आणखी तुला आठवतें कीं नाहीं कोणाला ठाऊक, पण तूं जें बोलणें त्या वेळीं ऐकलेंस, त्यांत या बाईच्या बोलण्यांत " त्यांनीं " " तो " असे कांहीं शब्द आले होते. तो गृहस्थ मीं ऐकलेल्या या भाषणांतला देवऋषि असावा. काय गूढ आहे कांहीं समजत नाहीं अजून पक्कें पण बहुतेक उकलल्यासारखें झालें आहे असो. पण तुला हकीगत सांगायची ती पुढेंच आहे. दार उघडून काय आहे तें पाहावें असें मनांत येऊन मी दाराजवळ गेलों, तों मला हुंदके, रडणें व मधून मधून ' कुठली या अवदसेच्या नादीं लागलें! ' असे व अशा तऱ्हेचे आणखी " अग हो, अवदसाबिवदसा म्हणशील तर खबरदार! लाजा नाहीं वाटत?......" असे दोन आवाजांनीं उच्चारले जाणारे शब्द माझ्या कानीं पडले. त्याबरोबर मला त्वेष आला, परंतु मी तो तसाच गिळून पुनः स्तब्ध असा उभा राहिलों. आणखी कांहींतरी ऐकायला सांपडेल तर पाहावें, असें मनांत वाटलें म्हणून मी तसाच दाराच्याजवळ खुंटीवर हात देऊन उभा राहिलों. इतक्यांत काय चमत्कार पाहा! एकाएकीं माझ्या खुंटीवरल्या छत्रीची दोरी तुटून ती धाडकन् खालीं पडली व दारावरून अशी वांकडी आल्याकारणानें फारच आवाज झाला. मग काय? माईसाहेबांचें रडणें एकदम बंद झालें व त्या तेथून पट्कन् ' कोण आहे? ' असें ओरडल्या. त्यांच्या मनांत काय आलें असेल आणखी काय नाहीं याचा नेमच नाहीं. धडकी भरली असेल खास! मी आंत खोलींत असेन अशी त्यांना प्रथमतः शंकादेखील आली नसेल; परंतु त्यांचें सगळें बोलणें झाल्यानंतर एकदम आंत खोलींत कोणीतरी आहे, असें वाटल्याबरोबर त्यांस काय बरें वाटलें असेल? एकदा ओरडल्यामुळें उत्तर

मिळालें नाहीं, तेव्हां पुनः एकदा त्यांनीं 'कोण आहे?' (तुझ्या वहिनीचें नांव घेऊन) "तूं का ग आहेस आंत? अं?" असें फारच कठोरपणानें ओरडून विचारलें. तेव्हां आतां आपण उत्तर न दिलें तर बरें नव्हे, असें पक्कें जाणून मी "कोणी नाहीं, मी आहें" असें उत्तर दिलें. अरे बाप रे! माझे ते शब्द ऐकल्याबरोबर काय पण झालें असेल त्यांच्या मनांत! पण करतात काय? एक मिनिटभरदेखील तेथें राहिल्या नाहींत; मी 'मी आहें' ही अक्षरें उच्चारून दार उघडतों तों आहे कुठें कोण? पार कोणीकडच्या कोणीकडे नाहींशा झाल्या. माझ्या मनांत आलें होतें आपण पाठोपाठ जाऊन त्या बाईला एकदा नीट निरखून बघावें म्हणून पण मग पुनः विचार केला, 'माईसाहेबांना आतां पक्कें वाटतें आहे आपण सारें ऐकलें आहे म्हणून, तेव्हां आतां आपण मुद्दाम त्यांच्यापुढें जाऊन कशाला त्यांना ओशाळें करण्याच्या भानगडींत पडावें?' इतकें म्हणून मी तितकाच थांबलों. तों तितक्यांत ती बाई गेली आणि थोडयाच वेळानें मी आपल्या जागीं येऊन बसलों. थोडयाच वेळांत माईसाहेब येऊन मला म्हणतात, "कां? आज कोडत नाही तेव्हां झोप घेतां वाटतं! भारी बाबा तुला झोपेचं वेड! पण आमच्या या बाहेरच्या बोलण्यानं झोपमोड नाहीं ना झाली?" प्रत्यक्ष वीज जर माझ्याजवळ कुठेंतरी पडली असती, तरीदेखील मी जितका चकित झालों नसतों तितका या वेळीं मी चकित झालों. कारण माईसाहेब असा धीटपणा करून असला प्रश्न विचारायला येतील, असें मला बिलकुल वाटलें नाहीं; परंतु मनुष्य हताश झाला म्हणजे त्याला काय करावें आणि काय करूं नये, याचा सुमारच राहात नाहीं, त्याप्रमाणेंच मला वाटतें त्यांची स्थिति झाली होती. त्या असें कां विचारायला आल्या तें मी समजलों. त्यांच्या मनांतला हेतु हा, कीं मी जागा असून बाहेर झालेलीं बोलणीं ऐकलीं कीं काय हें काढावें. मला त्यांची त्या वेळीं अगदीं दया आली, पण आपण 'हो' अशा अर्थाचें उत्तर दिल्यानें काय चमत्कार होतो तो पाहावा असा विचार मनांत येऊन मीं 'छे, मी नुकतांच कोर्टांतून येऊन पडलों होतों वाचीत.' त्याबरोबर त्यांचा नूर एकदम बदलला. तोंड अगदीं गोरेंमोरें झालें. कांहीं संताप, कांहीं लज्जा, कांहीं खेद असें मिश्रण दिसूं लागलें. पट्कन् कपाळाला आंठ्या चढल्या, आणखी 'हं?' असें मान हलवून विचारीत त्या तेथून चालत्या झाल्या. मी आपला जेथल्या तेथेंच विचार करीत पडलों होतों. आज चार दिवसांत मला दुसरें कांहीं सुचत नाही. माईसाहेब तर फार कुऱ्यांत असतात. त्यांना स्पष्ट तऱ्हेनें माझ्याशीं भांडतां येत नाहीं. परंतु एकंदरींत मला त्यांचा झोंक असा दिसतो, कीं आतां कांहींतरी घडून लवकरच आपल्याला या आपल्या कृत्यामुळें सोंवळें-गवाळें गुंडाळावें लागणार यांत शंका नाहीं. आतांशा तुझ्या वहिनीला दोन दिवस त्रास होत चालला होता असें दिसलें. परंतु चांभाराच्या देवाची पूजा त्याची त्याला मिळते आहे असें मनांत आणून मीं एक अक्षरदेखील काढिलें नाहीं; पण आज दोन दिवस रंग बदललेला दिसतो. काय असेल तें असो, पण आतां हें पुरें करतों. आणखी कांहीं कमी-अधिक कळल्यास तुला कळवीन. यमूताई, काय मौज असेल ती असो, ही गोष्ट घडल्या

दिवसापासून तुला कळवावी कीं नाहीं, याचा मी आपला विचार करीत होतों, परंतु शेवटीं कळवावी, असेंच ठरवून आज पत्र लिहिण्यास सुरुवात केली. या गोष्टीचा तपास लावून हें दागिन्यांचें गूढ आतां उकलून टाकलेंच पाहिजे म्हणजे एकदा जिवाची रुखरुख निघून जाईल असें वाटून मीं तर त्या भानगडींत शिरून तळीं बुडी मारण्याचा निश्चय केला आहे. तुला काय वाटतें ? एकदा काय आहे, तें उकलवून टाकावें कीं नाहीं ? आतांशा रघुनाथरावांचा अभ्यास जारीनें चालू आहेना ? त्यांच्या अभ्यासाबद्दल कधींहि कोणाला विचारायलाच नको. एकदा ते पास झाले म्हणजे सुटले. मग तुमची अगदीं चैन झाली. नेहमीं मुंबईस राहणार कीं दुसऱ्या कुठें जाणार ? मीं ऐकलं, कीं पुढें तुमचा दोघांचाहि विलायतेस जाण्याचा विचार आहे ! गेलांत तर मला न्याल का बरोबर ? . ... ”

पुढची त्याची थट्टेनें भरलेली चर्पटपंजरी मी येथें देत नाहीं. मुद्द्याचें तेवढें पत्र दिलेंच आहे. या पत्रांतला मजकूर वाचून माझ्या मनांत काय आलें असेल बरें ? हें दागिन्यांचें कोडें आहे तरी काय ? कांहींच पत्ता लागेना. त्या बाईच्यामार्फत कोणाकडे तरी ते दागिने गेले, याच्याबद्दल कांहीं आतां शंका नकोच होती यायला; पण ते गेले कसे, आणखी काय म्हणून ? हा मुद्दा राहिलाच. घरांतले दागिने अशा तऱ्हेनें सर्व बाहेर जावे, आणखी पुनः मिळू नयेत म्हणजे आहे तरी काय ? कांहींतरी काळेंबेरें आहे खास, असे नाना तऱ्हेचे विचार मनांत येऊन माझ्या पोटांत धडकीच भरली. वाटलें, कीं बाबा त्या प्रकारचे, त्यांनीं आपल्या कांहीं कृतीमुळें नांवाला डाग लावून घेतला; इकडे आतां हे दागिने अशा तऱ्हेनें घालवून माईसाहेबांनीं काय आरंभलें आहे कोणास कळे ? ह्या सर्व गोष्टी मनांत येऊन मला माझ्या आईची आठवण झाली आणि एकाएकी रडें आलें. शेवटीं दादाच्या भावी स्थितीविषयींहि मनांत विचार आले आणि एकंदरींत दादाला कोणीकडूनहि सुख नाहीं असें वाटून माझ्या मनाला फार फार वाईट वाटलें. तिकडच्या अभ्यासांत व्यत्यय येऊं नये म्हणून मीं पत्र मुळींच वाचूं दिलें नाहीं. तसेंच दाबून ठेवलें व आपणच एक पत्र लिहिलें, त्यांत, “ तूं या भानगडींत पुढें कांहींएक करूं नकोस. आपलें कांहीं त्यावांचून अडलें नाहीं. गेले दागिने तर गेले, तुझा तूं आतां मिळवून हवे तेवढे करशील. त्या दागिन्यांच्या भानगडींत मुळींसुद्धां पडूं नको, कसं काय होईल तें होऊं दे. ” अशा तऱ्हेचा मजकूर लिहिला होता. तें पत्र टाकल्यापासून पुढें बरेच दिवसांत दादाचें पत्र आलें नाहीं. यामुळें मला मोठी काळजी लागली, म्हणून मीं पुनः त्याच अर्थाचें पत्र त्याला लिहिलें. त्याचें उत्तर आलें, त्यांत “ तुझें पत्र आल्याबरोबर पत्राचें उत्तर पाठविलें असतां ‘ इतके दिवसांत पुनः पत्र कां नाहीं ? ’ असें विचारतेस त्याचा मला अर्थच समजत नाहीं. माझें लांबलचक पत्र गेलें असतां तूं अजूनपावेतों उत्तर पाठविलें नाहींस म्हणून मीं रागावून पत्र लिहिलें नाहीं. पाहतों तों आजच्या पत्रांत असा मजकूर ! य चा अर्थ काय ? तूं खरोखरीच पत्र पाठविलें होतेंस कीं काय ? पाठविलें असलेंच तर तें पत्र माझ्या हातीं कां आलें नाहीं, गेलें कोठें, याचा मला तपास लावला

पाहिजे, त्याखेरीज उपयोग नाहीं." असें लिहिलें होतें. तें पाहून मात्र मला फारच आश्चर्य वाटलें. हें आहे काय ? मीं पत्र लिहून पाठविलें याबद्दल मला तरी कांहीं शंका नव्हती. मग पत्र गेलें कुठें आणखी त्याचें झालें तरी काय ? दुसऱ्या कोणाच्या हातीं तर पडलें नाहीं ना ? हें दुसऱ्याच्या हातीं म्हणजे कोणाच्या हातीं पडणार ? आजपर्यंत तर असें कधीं झालें नव्हतें. मग आजच जर कांहीं कोणी पाळत राखून मधल्यामध्यें दडपलें असलें तर काय सांगावें ? म्हणतात ना मन चिंती तसें वैरी न चिंती. एक ना दोन हजार गोष्टी माझ्या मनांत आल्या, आणखी सत्राशें संशय उभे राहिले, तितके सगळे इथें सांगेन म्हटलें, तर एक भारूडच होईल. मीं तर पत्र पाठविलें होतें खास असें दादाला मीं लागलेंच कळविलें. "मग तें कोणाच्या हातीं गेलें तें मला ठाऊक आहे, मी काढीन त्याचा तपास तेव्हांच राहीन," असें त्याचें उत्तर आलें. आणखी त्यानंतर कांहीं दिवस तरी तें सर्व तसेंच राहिलें. शिवाय माझ्याहि मनाचा ओघ दुसरीकडे जाण्यास कांहीं कारणें झाल्याकारणाने त्या दागिनेप्रकरणाची सध्यापुरती तरी तेथेंच इतिश्री झाली.

◆ ◆ ◆

## ८१ : दुर्गीविषयीं

* * * * * * * * * * * * * * *

आणखी कांहीं दिवस गेले. सर्व गोष्टी एकंदरींत यथास्थित चालल्या होत्या, अभ्यासाची तयारी कडेकोट चालली होती. आतां कांहींएक कमीजास्त नव्हतेसें वाटलें. परंतु तसें कुठलें व्हायला ? माझ्या आपली मनाला कांहींतरी रुखरुख असायलाच पाहिजे. असा जसा कांहीं देवाच्या घरचा नेमानेम म्हणायचा ! पुनः एकदा दादाचें पत्र आलें, त्यांत दागिन्यांच्या वगैरेसंबंधानें कांहीं नव्हतें, परंतु दुर्गीचा नवरा परत आला आहे व तो आतांशा तिचा फार छळ करीत असतो, असें तिच्या बापानें मला सांगितलें. दुर्गी नुकतीच जाऊन कुठें सुखानें राहूं लागली होती, तों एकाएकीं एक दिवस स्वारी आली. तो आला ते दिवशीं वाटतें दुर्गी सासरीं नव्हती. कांहीं नैमित्तिक होतें म्हणून माहेरीं आली होती. संध्याकाळींच परत जायची, ती गेली नाहीं, तेव्हां स्वारी चवताळून आली माहेरीं आणि लागली शिव्या द्यायला. बिचारा दुर्गीचा बाप गरीब, करतो काय ? लागलीचच्या लागलीच त्यानें दुर्गीला सासरीं जाण्याविषयीं सांगितलें; पण तितक्यांत त्या नवऱ्यानें तिला ओढण्यापर्यंत पाळी आणली. करते काय बिचारी ? मुकाटयानें पोराला उचलून चालती झाली. तेव्हांपासून आतांशा कायसा तो रोज त्या सासऱ्याच्या दारांत येऊन त्याला शिव्या देत असतो. सासूला, आजेसासूला आणखी तिच्या भावालासुद्धां. तो भाऊहि मला काल भेटला होता, तो तर सांगत होता, कीं आतांशा रोज आई रडत

असते. आणखी ही पोरगी जर मरेल तर मी या कांचांतून सुटेन असें म्हणत असते, इत्यादि इत्यादि मजकूर वाचून माझें मन कितीतरी उद्विग्न झालें असेल बरें ? त्या बिचाऱ्या दुर्गीला आतां सुख तें काय मिळणार होतें ? परंतु स्वस्थपणें सासरींमाहेरीं मिळेल तो तुकडा तर कांहीं खायला हरकत नसावी ना ? पण नाहीं. तिचा जन्माचा दावा साधणारा तो कपाळकरंटा स्वस्थपणा ठेवील तेव्हां ना ? दुर्गीची आजी नेहमीं म्हणे, "अहो, हे नवरे कसले, हे गेल्या जन्माचे दावेदार !" हें म्हणणें किती जरी कोणाला कडू लागलें, तरी त्यांत खोटेपणा यत्किंचित् देखील नव्हता. मला तर खरोखर अशा त्या गरीब गाईला छळणाऱ्या मेल्याचा संताप येतो, कीं कांहीं पुसूं नये. आणखी दादाचें तें पत्र वाचून तर माझ्या अंगाचा अगदीं तिळपापड उडून जाऊन मीं आपली आपल्याशीं एक लाखोली वाहिली असेल त्याला. दुर्गी बिचारी त्या मुलाच्या जिवावर त्यांतल्या त्यांत सुख मानून राहते आहे, हें माझें मला पक्कें ठाऊक; तें पोर नसतें, तर यापूर्वी तिनें खात्रीनेंच केव्हांतरी जीव दिला असता; परंतु तो होता म्हणून ती कशाकडेदेखील लक्ष देत नसे. तिला आपलें सारें सुख, सारें जग, एकूणएक सगळें त्या पोरांत एकवटून राहिलें आहे असें वाटे. नवरा आला नाहीं, कीं कुठें गेला, आला, ती मनांतदेखील आणीत नसे. पण तो कदाचित् पुनः येऊन आपल्याला छळूं लागेल असें तिच्या मनांत कधींहि आलें नाहीं आणि एकदम हा मेला येऊन अशा रीतीनें छळ करूं लागला असेल, तेव्हां आतां तिला काय वाटत असेल बरें ! ती आतां आपल्या पोराची आशा सोडून एखादे दिवशीं खरोखरीच प्राण तर देणार नाहीं ना ? किंवा आपल्या पाठीमागें आपल्या पोराचे फार हाल होतील, तर त्याला तरी या जगांत कशाला ठेवा असें वाटून ती त्याच्यासकट विहिरीबिहिरींत उडी टाकणार नाहीं ना ? अशा मुलाला कमरेला बांधून विहिरींत उडी टाकणाऱ्या बायकांच्या गोष्टी याच्यापूर्वी मीं पुष्कळदा ऐकल्या होत्या; यामुळें व दुर्गीच्या स्वभावाबद्दल मला जें वाटत होतें, त्यामुळें माझ्या मनाचा असा पक्का ग्रह झाला कीं, असें कांहींतरी खास होणार. मनाला एकदा कोणती गोष्ट पक्की भासली म्हणजे मग दुसरी एखादी त्याच्यापेक्षां भयंकर गोष्ट होईपर्यंत पहिली गोष्ट मनांतून जायची नाहीं. हें माझें नेहमींचेच होतें, यामुळें मला दादाचें तें पत्र आल्यावेळेपासून दुसरें कांहीं सुचेना. दुर्गी, दुर्गीचा मुलगा, तिचा तो दावेदार नवरा आणखी विहीर नाहीं तर अफू, या गोष्टी डोळ्यांपुढें दिसूं लागल्या. अरेरे ! आपली लहानपणची मैत्रीण, जिच्यावर आपला अतोनात लोभ, तिच्यावर असा विलक्षण प्रसंग आला असतां आपल्या हातून तिला कोणत्याहि तऱ्हेची मदत होऊं नये काय ? असें मनांत येऊन मीं तेच दिवशीं तिकडे ती हकीकत सांगितली; तेव्हां "काय आपल्याच्यानं मदत होणार ? तूंच पाहा, तुला वाटत असलं कांहीं करतां येईलसं, तर कर. मी तुझ्या बाहेर का आहे ?" असें उत्तर दिलें. या उत्तरानें माझ्या मनाला केवढें समाधान झालें असेल बरें ! 'मी तुझ्या बाहेर का आहे,' हे शब्द ज्या मुखांतून निघाले तें मुख माझ्या डोळ्यांसमोर दिसत होतें; आणखी ज्या मुखानें दुर्गीची व तिच्या माहेरची उद्धारगत होत असे, तें दुर्गीच्या नवऱ्याचें मुख माझ्या अंतःकरणापुढें

दिसत होतें, अशा स्थितींत माझ्या मनाचें समाधान किती झालें असेल आणि दुर्गीबद्दल वाईट वाटतां वाटतां पण आपल्या स्वतःबद्दल किती धन्यता वाटली असेल, याचा कांहीं अजमास आहे ? 'तुला वाटत असलं कांहीं करतां येईलसं, तर कर. मी तुझ्या बाहेर का आहे ! '

ते शब्द ऐकून मी अत्यंत सद्गदित झालें व बराच वेळ चिंताक्रांत होऊन बसलें. शेवटीं लक्ष्मीबाईकडे जाऊन ही सगळी हकीकत सांगून त्यांच्याशीं व यशोदाबाईशीं चार घटका बोलत बसल्याखेरीज कांहीं मन स्वस्थ व्हायचें नाहीं, असें पक्कें वाटल्यामुळें मीं त्यांच्याकडे जाऊन त्या दोघींना तें पत्र दाखविलें, त्यावरून आम्ही किती वेळ तरी त्यासंबंधानें बोलत बसलों होतों ! अशा प्रसंगांत सांपडलेल्या आपल्या मैत्रिणीला आपल्याला कांहीं करतां येऊं नये ही केवढी दुःखाची गोष्ट आहे ? असें वाटून आम्ही आपल्या एकंदर स्थितीबद्दल खिन्नपणें विचार करीत होतों, इतक्यांत एकदम लक्ष्मीबाई म्हणतात :—

" तुमचा आणि तिच्या बापाचा चांगला घरोबा आहे म्हणतां ना हो ? "

" हो. आहे. "

" मग तुम्हीं नाहीं तर तुमच्या गणपतरावांनीं कांहीं म्हटलं तर नाहीं का ते ऐकायचे ? "

" मला वाटतं बाई ऐकतील म्हणून."

" मग झालं तर. गणपतरावांना ल्याहा तुम्ही, कीं कांहीं युक्ति करून एक दिवस मुकाट्यानं तिला सासऱ्याहून बोलावून माहेरीं आणून तुमच्या इकडे मुंबईस पाठवून द्यावं. मुकाट्यानं केलं म्हणजे कटकट चुकलीन् तंटा मिटला."

पहिल्या सपाट्यास मला युक्ति तर चांगली वाटली; पण ती घडण्याजोगी वाटेना. तिचा बाप पाठवील कीं नाहीं ? दादा जाऊन कसं त्याला सांगेल ? सासऱ्याहून ती कशी येऊं शकेल ? अशा नाना तऱ्हेच्या शंका मनांत आल्या; तरी पण लक्ष्मीबाईनीं त्या शंकांचें निरसन दोन शब्दांत केलें. त्या म्हणाल्या, " अहो, अडचणी या आहेतच. आपल्या मनांत आल्याबरोबर ताबडतोब थोड्याच गोष्टी होत असतात ? आपल्याकडून तिला मदत होण्याचा हा येवढाच मार्ग दिसतो आहे तर करून पाहा. नाहीं यश आलं तर त्याचा दोष कसला ? पण तुम्ही म्हणतां तसा तिनं फार छळ होऊन जर खरोखरीच मुलासकट जीव दिलान् तर मग पश्चात्ताप नको व्हायला, कीं आपल्या मनांत आल्यासारखं तिला आणलं असतं, तर नसता असा अनर्थ झाला. "

या बोलण्यानें मला जास्त धैर्य येऊन मीं दादाला त्याप्रमाणें लिहिण्याचें तर ठरविलें व लागलीच आमचें दोघींतिघींचें काय बोलणें झालें तें सांगून तिकडला विचार विचारला; तेव्हां पुनः " तुला एकदा सांगितलं ना तुला काय सुचेल तें कर म्हणून; मग कां आतां तीनदा तीनदा उगीच विचारतेस, पण इकडे बघ, ए, गणपतरावांना लिही, कीं

नीट जपून काय करायचं तें करा. त्या नवऱ्याला जर का सुगावा लागला एकदा इकडे आली आहे म्हणून, तर तो सासूसासऱ्यांना सोडील आणि तुलान् मला शिव्या देत बसेल इथें येऊन. मग कसं करशील ? "

" खरंच गडे. मग बरीक धर्म करतां कर्म उभं राह्यल्यासारखं व्हायचं ! "

" हा वेडे ! नुसतं असं म्हणून कसं चालतं आहे ! आपल्या मैत्रिणीला जर वांचवायचं आहे, तर घेतल्या पाहिजेत आपल्यालाय् सोसून शिव्या असं म्हणायच टाकून ' खरंच गडे ! मग बरीक धर्म करतां कर्म उभं राह्यल्यासारखं व्हायचं ' असं म्हणतेस का ? हात् तुझी ! भागुबाई दिसतेस मला ! "

" दिसतेच का नुसती ! बरं, मग लिहूं ना तसं दादाला ? "

" हो. हो. लिही. मग जें व्हायचं असेल तें होईल पुढें. "

अशा तऱ्हेनें सर्व तजवीज झाल्यानंतर मग मला पत्र लिहिण्याला किती अवकाश लागतो ? ताबडतोब मीं पत्र लिहिलें. आणखी आम्ही एकपट तर आमचे दादासाहेब दसपट. त्यांनी उलट टपालावर पत्र पाठवलें, कीं " मी तिला हरतऱ्हा करून लावून देतोंच. युक्ति उत्तम काढली. माझा असा समज आहे, कीं तिला अशा तऱ्हेनें मुंबईला नेलें, तर जीवदान दिल्यासारखें होईल यांत बिलकुल संशय नाहीं. मी आज तिच्या बापाकडे जाऊन गोष्ट काढतों. त्यांना बहुतकरून हें पसंत पडेल. कारण ते फार त्रासले आहेत, त्या पाजी माणसाच्या शिव्यांनीं. शिवाय रोज बायकोला मारतो, हाणतो, याबद्दल तर रोज बातम्या यांच्या कानावर येताहेत, यामुळें ते अगदीं कावून गेल्यासारखे मला दिसले. "

दुर्गीच्याविषयीं दादाच्या मनांत पहिल्यापासून अतोनात कळवळा, त्यांत तिची अशी ही स्थिति होत चाललेली पाहून त्याचें अंतःकरण फार दुःखित होई, हें मला पक्कें ठाऊकच होतें, यामुळें तिच्या सुखासाठीं जें म्हणून कांहीं करणें शक्य असेल, तें तो करील कीं नाहीं याविषयीं शंकाच नव्हती; शंका होती ती त्याला यश कितपत येईल, एवढ्याबद्दलच.

ती शंका आमची अगदीं उगीच नव्हती, हें त्याच्या दुसऱ्या पत्रावरून आम्हांला चक्क समजलें. त्यानें जाऊन दुर्गीच्या बापाजवळ माझ्या पत्रांतला मजकूर सांगितला, तेव्हां तो गृहस्थ अंमळ गुळमुळला, आणखी " तसं कसं करतां येईल ? तिला आणावं कसं ? " वगैरे अडचणी दाखवूं लागला. दादानें पुष्कळ सांगितलें, पण त्याच्या मनांत उतरेनासें दिसलें; तरी पण दादानें मला धाडलेल्या पत्रांत शेवटीं असें एक वाक्य आहे. " एवढें झालें तरी मला कांहीं वाटत नाहीं. माझ्याजवळ एक शेवटली रामबाण मात्रा आहे. तिची नीट योजना केली कीं काम फत्ते होणार, त्याच्याबद्दल मला तर कांहीं शंका नाहीं. ती कोणती ती ओळख पाहूं ? "

माझ्या कांहीं त्याचा तो अर्थ नीट लक्षांत येईना. मीं नाना प्रकारांनीं विचार केला. त्याची रामबाण मात्रा कोणती असेल याचा कांहींच उमज पडेना. हें आहे तरी काय ? हा आपला कांहीं वेडीवाकडी युक्ति तर नाहीं ना करीत ! असेंदेखील मनांत यायला चुकलें नाहीं; पण दादा तसें कांहीं करणार नाहीं, अशी पक्की खात्री असल्यामुळें तो विचार उगवतांक्षणींच मावळून गेला. मला फार वेळ गूढांत राहावें लागलें नाहीं. तिसरे दिवशीं दादाचें पुनः पत्र आलें, त्यांत, " मात्रा योजली, खात्रीनें उपयोग होणार. झाला म्हटलेंस तरी हरकत नाहीं. दुर्गीच्या आईच्या मनांत गोष्ट भरवून दिली कीं, आपला हेतु साधला असें मला वाटत होतें त्याप्रमाणें दुर्गीच्या आईला गांठून तिच्या मनांत तर भरवून दिली. आतां कांहीं हरकत नाहीं. तें सारें जुळणार. तिला तें फार पटलें आहे. मी तिला तुझें पत्र वाचून दाखविण्याबरोबर ती ' वा ! जुळलं तर चांगलं; पण तिथें जाऊन मेल्यानं तिच्याभोंवतीं आणखी थैमान केलं नाहीं म्हणजे पुरे, नाहीं तर एक करतां एक व्हायचं ! ' असें म्हणाली. मीं लागलीच तिला ' तो तेथें जाऊन काय करतोय् असं म्हणा ! तिथें इतक्यादेखील गमजा चालायच्या नाहींत ! ' अशा तशा गोष्टी सांगून टाकलें तिचें मन वळवून. आतां अडचण काय ती दुर्गीचा बाप काय शंका काढील पुनः एवढीच आहे. दुर्गीच्या आजीलादेखील बरें वाटलें. कारण ती तर स्पष्टच म्हणाली, ' मला परवांच एकदा वाटलं होतं, की चार दिवस कुठेंतरी तिला लावून यावं म्हणून; पण धाडायची तरी कुठें ! अहो, त्यानं नुसता तिचा आणि आमचा छळ मांडला आहे ! ती सासू स्वतः येऊन काल रडून गेली. तिला तरी काय दोष लावावा ? तिच्याकडे काय आहे ? जन्म देणारी ती कर्म तर नाहींना देत ? ' असें म्हणाली. आतां आणखी काय होतं तें उद्यां सांगनों. "

मी आणखी माझ्यापुढें त्या माझ्या दोघी मैत्रिणी अगदीं चातकासारखी त्याच्या पत्राची वाट पाहात होतों; पण दुसरे दिवशीं नाहीं, तिसरे दिवशीं नाहीं, चवथे दिवशींहि नाहीं. तेव्हां आतां कांहीं तें जमत नाहीं, असें पक्कें वाटून आम्ही अगदीं निराश झालों. तेव्हां आणखी दोन दिवसांनीं त्याचें पत्र आलें, कीं येत्या रविवारीं दुर्गीचा भाऊ तिला घेऊन येईल. तें पत्र वाचल्याबरोबर माझा जीव खालीं पडल्यासारखा झाला. आपली स्थिति बरी असल्यामुळें आपल्याला आपल्या मैत्रिणीला चार दिवस तरी सुखांत ठेवायला सांपडले, याबद्दल मनाला फार आनंद झाला; आणि दुर्गी आल्यानंतर तिला अशा तऱ्हेनें सुख देऊं, तशा तऱ्हेनें सुख देऊं, ती राहील तितकेच दिवसांत तिला वाचनाची गोडी लावूं, अमुक करूं, तमुक करूं असे बेत मी करूं लागलें. दुर्गीच्या येण्याबद्दल एकंदर कशी काय व्यवस्था झाली हें कांहीं मला कळलं नाहीं, तरी पण मी त्यासंबंधानें उगीच तर्कहि करीत बसलें नाहीं. ती आल्यानंतर सर्व कांहीं कळेल; तेव्हां खास येण्याची ठरल्यानंतर मग मीं सासूबाईंच्याजवळ ती येणार आहे वगैरे गोष्ट काढली. त्यांना तिच्याबद्दल आधींची तुरळक माहिती होतीच. यामुळें व त्या मुळीं देवमाणूस, त्यांना हें नाहीं, तें नाहीं, यामुळें त्यांनीं चांगलें म्हणून समाधानच दर्शविलें.

याप्रमाणें सर्व कडेकोट तयारी झाल्यानंतर मग काय विचारतां? दुर्गी येण्याचाच काय तो अवकाश राहिला. ती नेमल्या दिवशीं आपल्या भावाबरोबर आली. तिचा भाऊ लागलीच परतहि गेला. नंतर मीं दुर्गीला सर्व हकीकती विचारल्या, तेव्हां तिनें आपल्या नवऱ्याच्या छळाबद्दल ज्या ज्या कांहीं गोष्टी सांगितल्या, त्या कांहीं विलक्षणच! माझ्या अंगावर तर कांटाच उभा राहिला तें सारें ऐकून. त्यानें वेणीला हिसडे दिल्याकारणानें केस तुटून गेलेली जागा तिनें मला दाखविलीन्, आणखी एक दिवस त्या मुलाला मारल्याबद्दलची जेव्हां का हकीकत तिनें मला सांगितली, तेव्हां तर मला ती केवळ वाघिणीसारखीच दिसली. ती म्हणाली, "यमे, मी ते दिवशीं खरोखर जीव देणार होतें. या माझ्या पोराला मारलं आहे ते हात झडूनच जातील, कधीं राह्यचे नाहींत. मला मारलें तरी मी अक्षर बोलत नसें. आहे एक जन्म तुमच्या पदरीं, घ्या काय करायचें तें करून. पण त्या पोराला—माझ्या पोराला?"—असें म्हणत असतांना तिनें त्या आपल्या मुलाला अगदीं घट्ट पोटाशीं धरिलें आणि ती एकसारखी रडूं लागली. मी तर तिची मैत्रीणच, तेव्हां माझ्या पोटांत तें सर्व ऐकून भडभडून आलें यांत कांहीं नवल नाहीं, परंतु त्या माझ्या दोघी मैत्रिणींना तिची ती दीन अवस्था पाहून काय झालें आणि काय नाहीं, याचें वर्णन करून सांगतां येत नाहीं. दुर्गी आल्यानंतर दोन चार दिवस दुःख ऐकण्यांत वगैरे गेल्यानंतर तिच्या मनाचें शांतवन होऊन, आम्ही आपल्या नित्यक्रमांत पडलों. आतां परीक्षेला फारच थोडे दिवस राहिल्याकारणानें मी अगदीं तिकडे जाऊन बसेनाशी झालें. सारा दिवस दुर्गीला सुख देण्यांत व तिच्या मनाचें शांतवन करण्यांतच गुंतून गेल्यासारखी असे. दुर्गीला आमच्या त्या आठवड्याच्या सभाबिभा पहिल्याप्रथम मोठ्या चमत्कारिक वाटून तिनें आम्हांला नांवें ठेविलीं; परंतु थोडेच दिवसांत तिला वावगें असें कांहीं न वाटून ती आमच्याबरोबर येऊं जाऊं लागली. एक महिन्यांत तिच्या एकंदर चरित्रक्रमांत कितीतरी फरक पडला! तिच्या नवऱ्याच्या वगैरे गोष्टी होतां होईल तों आम्ही काढीतच नसूं, यामुळें तिच्या त्या गोष्टी नजरेसमोर न येतां ती आपल्या मुलाच्या जोपासनेंत, कौतुकांत व आमच्या सुखसहवासांत आनंदानें असे. पुण्यास तिचा नवरा नुसता आतां वेड्यासारखा होऊन सकाळ-संध्याकाळ तिच्या माहेरच्या दाराशीं येऊन शिव्यांची लाखोली देई व आपली बायको पळवून नेल्याबद्दल फिर्याद करितों वगैरे धमक्या घाली. दादाच्याकडे तें सर्व दुर्गीचा बाप घाबरून येऊन सांगे, आणि दादा त्याला पुष्कळ धीराच्या गोष्टी सांगे. असा एकंदर क्रम चालला होता. त्याला अजून दुर्गी कोठें गेली हें कळलें नव्हतें एवढें बरें होतें; नाहीं तर तो हटकून मुंबईस आमच्या येथें येऊन सकाळ-संध्याकाळ डोकें फोडीत बसायचा. परंतु आमच्या म्हणा किंवा दुर्गीच्या म्हणा, नशिबामुळें बरेच दिवस तसें कांहीं झालें नाहीं. आणि जों जों तो अधिक चवताळे, तों तों पुढें दुर्गीच्या माहेरच्य मंडळीस वाटे, कीं आपण आतां तिला आणली तर हा तिचा प्राणदेखील घ्यावयाल कमी करायचा नाहीं. तेव्हां आहे तीच बरी आहे. अशी एकंदर स्थिति होती.

परीक्षेच्या दिवशीं परीक्षेला सुरुवात झाली. रोजच्या रोज घरीं आल्याबरोबर मी "आज कसे काय कागद गेले ?" असा प्रश्न विचारी. जणू काय मला त्यांतलें कांहीं कळतच होतें ! परंतु मनाला वाटे त्याला काय करतां ? तिसरे दिवशींचे कागद देऊन आल्यानंतर मीं जेव्हां आपला रोजचा प्रश्न विचारला, त्याबरोबर माझी खूप थट्टा केली. अंगरखा पागोटें काढून ठेवून तिन्ही दिवसांचे कागद काढले, आणखी "इकडे ये, तुला सांगतों कागद कसें काय गेले आहेत ते ? आतां तूं आमची परीक्षाच घेईनास पुनः एकदां ? म्हणजे कसे काय गेले आहेत तें तुझें तुलाच कळेल" असें म्हटलें. त्याबरोबर "घेईन परीक्षा, त्याचं काय आलं आहे एवढं ? कांहीं बायका परीक्षा घेणारणी व्हायच्या नाहींत का काय कधीं ? एवढं हिणवून कशाला दाखवायला पाहिजे ?"

"अरे बाप रे ! कोण हा कैवार आपल्या जातीचा !"

"कैवार म्हणजे ! पुरुषांना वाटतं, कीं जसं कांहीं सारं आपल्यासाठीं न् आपल्या हातीं आहे, आम्ही करीत नाहीं तंवरच्या साऱ्या गोष्टी !"

"आतां कांहीं बोआ आपली चोलायची सोय नाहीं. एकूण आपण एल्‌एल्. बी. ला जाणार म्हणतां ? तर मग आतांचीं हीं बुकें जिकडचीं तिकडे नाही ठेवीत. आपण बसत जा इथें आजपासून !"

"आतां आजपासून बसायचं म्हणूनच तर आलं. आज महिनाभर मी अगदीं एक अक्षरदेखील बोललें नाहीं. आतां बुकाला म्हणून हात लावूं द्यायची नाहीं अगदीं!"

"अरे बाप रे ! नुसती कैदच आहे म्हणायची तर मग आम्हांला ?"

"आतांचशी काय ? लग्न लावलं ते दिवशींच कैदेंत घातलं आहे."

"वा ! असली कैद जर मिळाली, तर मग या कैदेंतून सुटून जावंसं कुणाला तरी वाटेल का ?"

"पण जन्मपर्यंत अशीच राहील ना कैद ?" काय जाणें मला काय वाटले आणि मीं काय हा प्रश्न केला !

हा प्रश्न मीं विचारून हसत हसत जवळ यायला, आणखी दुर्गीनें मला हांका मारायला एकच गांठ पडली. तिनें जणू काय मला स्वप्नांतून जागीच करून आपली स्थिति माझ्या नजरेसमोर आणली मीं तिला ओ दिली आणि तिकडे जाणार तों तिच्याविषयींचें बोलणें निघून बिचारीच्या दुर्दैवाविषयीं व चांगली हुषार असून काय तिच्या दुर्दैवाचा गहजब आहे पाहा, म्हणून आम्ही खिन्न झालों.

ते दिवसापासून परीक्षेच्या निकालाच्या दिवसापर्यंत नुसत्या गप्पा मारायच्या, गोष्टी वाचायच्या, तिकडे मुळींच कांहीं श्रम करूं द्यायचे नाहींत, अशाबद्दल माझे आधींपासूनचे बेत चालले होते, त्याप्रमाणें मीं जय्यत तजवीज चालविली होती. नाना प्रकार करून आम्ही आपल्या मनाची करमणूक करून घेत असूं. दुर्गीची भीड, लाज

सगळी घालवून तिनेंदेखील आमच्यांत बसावें अशी तिला धीट बनविलें. ती म्हणजे काय, घालावी तिकडे चांगली होणारी होती; पण तिच्या नशिबींच निराळा प्रकार होता, त्याला तिचा काय आणखी कोणाचा काय उपाय? ती आतां रात्रीं कधीं कधीं मंडळींत येऊन बसे, बोले, सर्व कांहीं होई. तिला वाचाय्‌बिचायला शिकण्याचीदेखील गोडी लागली. अशा तऱ्हेनें मोठ्या सुखांत दिवस जात होते. दादाला मीं याच सुमारास पत्र पाठविलें, कीं "कसेंहि करून तूंहि एक चार दिवस ये, कामें हीं नेहमीं आहेतच." परीक्षेबद्दल भीति वाटण्याला कारण नव्हतेंच म्हणा, पण परीक्षा झाल्यापासून निकालाच्या दिवसापर्यंतचा काळ मोठा गमतीचा असतो. यामुळें मला असें वाटलें, कीं दादानें येऊन आमच्या सुखाचा वांटा घ्यावा. त्याला पुण्यास सुख म्हणजे काय तें ठाऊक नसल्यासारखेंच! त्यांतून माझें आणि तिकडचें आग्रहाचें बोलावणें; शिवाय त्याला लिहिलें होतें, कीं नाताळच्या सुट्टींत किंवा मधें केव्हांतरी सर्व मंडळी घारापुरीचीं लेणीं पाहायला जाऊं. इतकें सगळें साहित्य जमल्यावर मग दादा येणार कीं नाहीं याबद्दल शंका कशाला? तो ताबडतोब आलाच आणि मग त्या विनोदाला, सुखाला व आनंदाला पारावार काय? आतां तीनहि त्रिकाळ गप्पा, दुसरें कांहीं नाहीं. सर्वच मंडळी रिकामी, मग काय? कांहीं पुढच्या कांहीं मागच्या गप्पा, कांहीं गोष्टींचीं बुकें वाचणें, कांहीं एकमेकांच्या भावी स्थितीबद्दल थट्टा करणें, असें चाललें होतें.

परीक्षेचा निकाल तीन दिवसांवर आला, तों मधेंच घारापुरीला जाण्याची हूल निघाली. सोमवारीं निकाल व्हायचा होता; पण शनिवारींच चला जाऊं या घारापुरीला म्हणून नानासाहेबांनीं काढलें. तेव्हां "परीक्षेचा निकाल होऊं द्या, मग जाऊं, अशी धागधूग असतांना कसचें जातां?" असें तिकडून म्हटलें. त्याबरोबर दादानें मागील कथा काढून परीक्षेंत पास होईल न होईल याबद्दल यांची नेहमींच रड असते, अन् येतात बरीक पहिले; म्हणून जी थट्टा आरंभली ती कांहीं विचारूंच नये "नाहीं बोआ. आमचं राहिलं परीक्षेचं. चला जाऊं." असें तिकडून म्हटलें तेव्हां त्यानें थट्टा सोडली. घारापुरीला जायचें, आम्ही सगळ्याजणीं फराळाचें काय करायचें काय नाहीं याच्या विचाराला लागून लागलीच पिठें, भाजणी भिजवून रवाबिवा आणवला.

दुसरे दिवशीं जायचें तों, एकाएकीं मला रात्रीं गाढ झोप लागली असतां जागी करून म्हणायचे, "काय ग, हें असं काय होतं आहे मघांपासून मला? झोंप येत नाहीं आणखी या इथें दुखतं आहे."

तें ऐकण्याबरोबर काय असेल तें असो माझ्या पोटांत एकदम धस्स झालें.

◆ ◆ ◆

## ८२ : अखेर

* * * * * * * * * * * * * * *

" काय होतं आहे? कुठं दुखतं आहे? "

मीं घाबरून उठत उठत विचारलें. त्याबरोबर किंचित् हसून, " अरे पण, इतकं घाबरायला काय झालं? एवढंसं दुखतं म्हटलं तर इतको घाबरतेस, अन् मग एखादं मोठं दुखणं झालं तर काय करशील? "

" नको ग बाई तें मोठं दुखणं यायला अन् असलं बोलूंय् पण नये. "

" कां बरं? बोलण्यानं काय केलं आहे? कांहीं बोलण्यानं येतं का काय लागलीच? अन् नाहीं बोललं, म्हणून तरी राहतं का काय आल्यावांचून? "

" पण हें काय हें असलं बोलायचं! " मीं किंचित् त्रासून म्हटलें. " मला आधीं दुखतं कुठें तें सांगायचं पाहूं? "

" या इथें दुखतं आहे, काय उसण भरली आहे कीं काय झालं आहे, कांहीं समजत नाहीं. उसण भरली म्हणावं, तर बरगडींत दुखतंयसं वाटत नाहीं, इथं या..." पुढचा शब्द पुरता निघतो न निघतो तोंच " तेलबिल चोळून रोड्यानं शेकूं का? का फलाणीच्या पिळयानं ऊन पाण्यानं शेकूं? " असें मीं विचारलें.

" वेडी तर नाहींस ना? इतक्या रात्रीं कशाला आतां जायला पाहिजे तिकडे, आणखी साऱ्यांना करून कांहीं बोवा दुखण असं मोठं आहे? तुम्ही बायका की नाहीं अतिशयच घाबऱ्या. एवढंसं कांहीं झालं, की लागलीच त्याचं अगदीं हें करून सोडायचं. उगीच आपली मला झोंप येईना, म्हणून तुला उठवलं......"

" पण त्याचा वेळींच बंदोबस्त केला तर कांहीं वाईट आहे का? "

" वेडगळ कुठली! अग, बंदोबस्त कसला करतेस? आतां घटकाभऱ्यानं कांहीं त्याचं व्हायचं नाहीं. " यावर मी कांहींच बोललें नाहीं. थोडा वेळ तसाच न बोलतां गेला. परंतु तितक्या वेळांत तीन वेळां या कुशीवरून त्या कुशीवर, त्या कुशीवरून या कुशीवर व्हायचें, तें पाहून माझ्यानें राहवेनाच. मी पटकन् उठलें आणखी " हें असं कांहीं उपयोगाचं नाहीं. कुठें दुखतं आहे तें मला सांगायचं. मघांपासून मीं तीनदा पाहिलं कितीदा इकडून तिकडे व्हायचं तें. कुठें दुखतं पाहूं? " असें म्हटलें.

त्याबरोबर किंचित् त्रासल्यासारखें करून म्हणायचें, " काय करूं? कांहीं चैन पडत नाहीं. दुखतंय् तर एवढंसंसं, पण तेवढ्यानंच चैन पडत नाहींसं झालं आहे. "

" उसण जर भरली असली, तर होईल तसं. मी आणतें तेल अं? " इतकें म्हणून मी उठलेंच, आणखी सैंपाकघरांत जाऊन चुलींत विस्तव होता त्यांत लाकडें घालून

थोडीशी फुकूं लागलें. विस्तव पेटतो आहे तों एक विटकरीचा टोला आंत घातला. पाणी थोडेंसें वर ठेवलें, आणखी तेलाची बाटली घेऊन पुनः जों परत जातें तो " मला अतिशय फिरल्यासारखं होतं..." असे कांहीं शब्द उच्चारलेले माझ्या कानीं पडले, आणखी एकदम ओकल्यासारखें केलें, तों ओकारी तांबडी लाल !—आणखी ओकण्या· साटीं उठून बसायचें होतें, तें एकदम खालीं पडायचें !

तें पाहण्याबरोबर माझ्या सर्वांगाचा थरकांप उडाला, आणखी हातपाय लटलटां कांपायला लागून हातांतली दिवली पटकन् खालीं पडून विझली व तोंडानें 'दादा !' अशी एकदम आरोळी गेली. इतक्यांत कांहीं कण्हत उच्चारलेले असे पुढील शब्द माझ्या कानीं पडले : " काय हें असं वेडयासारखं ? " पण कसचें काय आणि कसचें काय ? माझ्या तोंडचें पाणी पळून काळीज चर्र झालें होतें. तथापि पहिला वेग जाण्या- बरोबर मी भानावर आल्यासारखी झालें, आणखी जवळ जाऊन कांपऱ्या आवाजानेंच म्हटलें, " हें काय झालं हें ? दादाला हांका मारूं का ? नानासाहेबांना बोलावूं का ? " परंतु हातानें नको अशी खूण करून " ऊं हूं ! " एवढेंच म्हणायचें. मला कुठला धीर ! अशी रक्ताची गुळणी येऊन कांहींचेबाहींच झालेलें मीं यापूर्वीं दोघांतिघांचें ऐकलें होतें, त्या गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर एकदम उभ्या राहिल्या आणि मला दुसरें तिसरें कांहींच सुचेना. मी एकदम उठलें व तडक जाऊन दादाला बोलावून आणलें. तो गाढ झोपेंत होता. माझें सांगणें ऐकल्याबरोबर त्याच्यादेखील पोटांत धस्स झालें. परंतु मला आपला वरवर म्हणतो, " मग, अशी घाबरतेस काय ग ? असं होतं कोणाकोणाला कधीं कधी. " परंतु मला कसला धीर ? त्यानें येऊन पाहिलें आणि जवळ जाऊन " काय झालं हो एकाएकीं ? " म्हणून विचारलें; परंतु नीटसें उत्तर आलें नाहीं. त्याबरोबर " दम धरा, मी नानासाहेबांना आणखी विष्णुपंतांना बोलावून आणतों " असें म्हणून त्यानें त्या दोघांस उठवून आणलें. त्यांनीं तो प्रकार पाहण्याबरोबर तोंडानें, " अंः, त्यांत घाबरण्या- जोगं असं कांहीं नाहीं, रघुनाथराव, जरासे पलीकडे व्हा पाहूं. तो पलंगपोस टाका वहिनी काढून पाहूं, " असें म्हटलें, परंतु विष्णुपंत आणखी दादा दोघेहि कुजबुजून विष्णुपंत " पण आपल्याकडून आपली सावधगिरी राखावी तें चांगलं, " असें म्हणत बाहेर गेले. मला अगदीं वेड्यासारखें झालें. आणखी मीं आपली इकडे तिकडे हिंडूं लागलें. तिकडे पाहावें, नानासाहेबांकडे पाहावें, " हें काय हो असं एकाएकीं झालं ! " असें म्हणावें. आणखी त्यांनीं " हें काय असें करतां, वहिनी ? " असें म्हटलें म्हणजे " काय करूं हो तर मग ? मला कीं नाहीं कसंसंच झालं आहे, " असें म्हणावें. त्यांना मदत करायची ती एकीकडेच राहिली म्हटलें तरी चालेल. इतक्यांत माझ्या दोघी मैत्रिणीहि उठून आल्या, आणखी त्यांनीहि मला धीराच्या गोष्टी सांगितल्या व त्या पुढें होऊन त्यांनीं दादास व नानासाहेबांस मदत केली. मीं आपली यांच्या तोंडाकडे पाहावें, त्यांच्या तोंडाकडे पाहावें, " आतां आणखी नाहीं ना हो गुळणी यायची ?" असें म्हणावें, त्यांनीं जरा समाधानाचें बोलणें काढलें म्हणजे बरें वाटावें. पुनः पांच मिनिटें झालीं. आणखी

तिकडे इकडचें त्या कुशीवर झालें किंवा सुस्कारा टाकला, म्हणजे पुनः गुळणी आली असें वाटून घाबरून जावें, असें चाललेंच होतें. इतक्यांत दुर्गीहि उठून आली. तिलासुद्धां मीं " कांहीं नाहीं ना ग व्हायचं ? " असा प्रश्न केला. बराच वेळ गेला. आतां जरा तिकडे डोळा लागलासें वाटलें. इतक्यांत पुनः उठायला जायचें आणखी एकदा तोंडांतून एकदम रक्त आलें. आतां माझी स्थिति किती विलक्षण झाली ! मी एकदम रडायला लागलें; आणखी " सासूबाईंना तरी हांका मारा हो " म्हणून गयावया करूं लागलें. त्या म्हातारीला हें पाहिल्याबरोबर काय वाटेल आणखी काय नाहीं, याचा विचारसुद्धां माझ्या मनांत आला नाहीं. कोणीतरी येईल मायेचें आणखी कांहींतरी उपाय करील, असें वाटून मी आपली जें जें माणूस त्या वेळीं नव्हतें, त्या त्या माणसाला बोलावूं लागलें. सासूबाई खालीं गोपिकाकाकूंकडे निजत. त्यांना अजून या गोष्टीची कांहींच माहिती नव्हती. " जा ग सासूबाईंना बोलाव " असें मीं दुर्गीला म्हणाल्याबरोबर तिकडून हात वर करून नको म्हणून खूण करायची. मीं जवळ जाऊन " हें आज असं काय होतं आहे ? " असा रडतरडत प्रश्न केला. त्याबरोबर अतिशय खोल अशा आवाजानें " कांहीं नाहीं. तूं अशी रडूं नको " असें म्हटलें, परंतु मला कुठलें राहवायला ! " अरे दादा, डाक्तरला तरी बोलाव रे. नानासाहेब, स्वस्थ काय बसलांत ?" असें म्हणत मी मोठमोठयानें ओरडूं लागलें; तेव्हां दादा म्हणाला, " यमूताई, अग तूं असं वेडयासारखं काय करते आहेस ! विष्णुपंत केव्हांच डाक्तराकडे गेले आहेत; इतक्यांत येतील त्यांना घेऊन. तूंच जर असं करायला लागलीस तर मग आम्ही बाकीच्यांनीं धीर तरी कसा धरावा ? " इतकें बोलतो आहे तों तिकडून अंगाची आग झाल्यासारखी खूण करून वारा घालायला सांगितलें. मी लागलीच पंखा घेऊन वारा घालूं लागलें. मनांतल्या मनांत हजारों देवांना नवस करीत होतें. जोगेश्वरीला, तुळजापूरच्या भवानीला, कोल्हापूरच्या अंबाबाईला, एका देवीला म्हणजे कांहीं नवस केल्याखेरीज ठेवलं असेल असें नाहीं; परंतु माझें सारें चित्त आतां तिकडे होतें. मघांची ती दुसरी गुळणी आली त्याला बराच वेळ झाला. आतां गुळणी येत नाहीं असें वाटलें, आणखी मी मोठ्या आशेनें ज्याच्या त्याच्याकडे पाहून " आतां नाहीं ना हो यायची गुळणी ? आतां लागेल ना हो झोप ? " असें म्हणत होतें. इतक्यांत डाक्तरला घेऊन विष्णुपंत आले. हे डाक्तर आमच्या मंडळींत नेहमीं येण्यापैकींच होते. त्यांनीं येण्याबरोबर तपासणी केली, आणखी " अंः त्यांत कांहीं नाहीं. आतां येवढें बरीक करा, कीं त्यांच्याभोंवतीं एक दोन माणसांच्यापेक्षां अधिक माणसं बिलकूल ठेवूं नका. यत्किंचित्‌देखील गडबड अशा स्थितींत उपयोगी नाहीं. गणपतराव, अगदीं सगळी मंडळी इथून जाऊं द्या. " त्याबरोबर नानासाहेब आपणच आधीं उठले, विष्णुपंतांनीं आपल्या व नानांच्या बायकोला खूण केली. आणखी मंडळी मलाहि चलण्याविषयीं आग्रह करूं लागली. परंतु मीं तेथून न हलण्याविषयीं हट्ट धरला. माझे पाय तेथून कसें निघावे · " इथें बसून तूं गडबड करतेस, रडतेस. तूं येथें बसूं नकोस. दुर्गाताई, हिला तूं

कसंहि करून बाहेर घेऊन जा. मी एकटा पुरे आहें इथें. आणखी पाहिजे तर विष्णुपंत आणखी यशोदाबाई राहतील, पण ही नको" असें दादानेंहि म्हटलें. परंतु मी कांहीं केल्या इथून हलायची नाहीं असें सांगितलें; पण माझें कोणी चालूं देईना. लक्ष्मीबाईंनीं आणखी दुर्गीनें मला तेथून बळेनें काढली. मी त्यांच्या पायां पडलें व "अग बायांनो, नका आमची ताडातोड करूं! कां असं करतां? अहो, ही काळगुळणी फुटून हो आली?" असें आरडतओरडत बाहेर आलें, तों बाहेर सासूबाई नुकत्याच काय गोंधळ तें पाहण्यासाठीं वर आल्या होत्या. त्यांना पाहण्याबरोबर तर माझ्या दुःखाला पारावार नाहींसा होऊन "आतां तुम्ही तरी आंत जाऊन बसा हो जवळ. काय पाहा आंत झालं आहे तें! एकाएकीं काय हो हें झालं!" असें म्हणून त्याना एकदम घाबरवून टाकलें. त्या वेड्यासारख्या माझ्याकडे पाहूं लागल्या, लक्ष्मीबाईकडे पाहूं लागल्या. दुर्गीला "हें आहे तरी काय? ह्याला का कांहीं झालं?" असें विचारूं लागल्या. त्याबरोबर "अहो, हो. आपलं नशीब–काय ग बाई तरी ती गुळणी! मी इकडे येऊन गेलें एवढीच–दुर्गे, जा ग, तूं तरी जाऊन पुनः गुळणी आली कीं काय, तें पाहून ये. मला नाहीं जाऊं देत तर तुम्ही वरचेवर पाहून येऊन तरी मला सांगा. अग, अशा कशा तुम्ही निर्दय झालां अगदीं?..." असें आणखी अशाच तऱ्हेनें मी काय वेड्यासारखें बोललें असेन आणखी काय नाहीं याचा नेमच नाहीं. एकसारखें माझें बरळणें चाललेलेंच होतें. इतक्यांत सासूबाई तिकडे गेल्या. त्यांना एकदा आंत नेलें, परंतु त्या माझ्यासारखा आक्रोश करूं लागल्या, तशी यशोदाबाईंनीं आणखी गोपिकाकाकूंनींहि अगदीं नाना तऱ्हा करून त्यांना बाहेर आणलें. डाक्तरनें सांगितलें, सगळ्यांनीं सांगितलें कीं, "तुम्ही अशा घाबरूं नका, दुखणं जरा चमत्कारिक आहे खरं; पण इतकं घाबरण्याजोगं नाहीं. मीं आतां औषध दिलं आहे आणखी दोन तीन घटकांत सगळं यथास्थित होईल. त्यांतून मी आतां इथून आज हलत नाहीं पण तुम्ही असा आक्रोश करूं नका. रघुनाथराव जसे तुमचे मुलगे तसे माझे भाऊ मी समजतों. वहिनी, काकू, तुम्ही अगदीं अगदीं काळजी करूं नका. जर आमच्या वैद्यक्रियेंत कांहीं करामत असेल, तर आम्ही त्यांना चार तासांच्या आंत खडखडीत बरा करतों बघा." हें डाक्तराचें अतिशय धीर देणारें बोलणें ऐकून क्षणमात्र मला कितीतरी धीर आला; परंतु असा धीर किती वेळ राहणार असायचा? थोडासा वेळ गेला नाहीं तोंच मी पुनः "जा ग, आणखी गुळणी आली आहे कीं काय पाहून ये. डाक्तर काय म्हणताहेत पाहून ये," असें बडबडूं लागलें. कोणी उठलें नाहीं, तर आपणच धावत दारापाशीं जावें म्हणून उठूं लागावें. इतक्या थरावर गोष्ट आली म्हणजे मग दोघींपैकीं एक कोणीतरी दाराशीं जाऊन येई. आणखी मला कांहींतरी येऊन सांगे. सासूबाईंना गोपिकाकाकू पुनः खालीं घेऊन गेल्या. परंतु त्या फार वेळ तेथें बसल्या नाहींत. पुनः वर आल्या आणखी माझ्याजवळ येऊन, "मुली, काय ग हें आज आपल्या नशिबीं आलं आहे!" असें म्हणून माझ्याप्रमाणेंच वेड्यासारख्या होऊन त्या नाना तऱ्हेचे नवस बोलूं लागल्या. अशा स्थितींत केव्हांच उजाडून गेलें तें

आम्हांला समजलें नाहीं. आमची फारच निराशा होऊन आम्ही अगदीं गयावया करतों आहोंत असें पाहिलें, म्हणजे एकदा कोणीतरी जाऊन डाक्तरला आणावें आणखी डाक्तराकडून आमचें समाधान करावें असें चाललें होतें. इतक्यांत "गोपाळमामंजींना तरी तार करावी" असें माझ्या मनांत येऊन धोंडू भावजींना सांगितलें. तेव्हां एकदा, कशाला त्यांना उगीच आणखी घाबरवतां? असें तसें झालेंच, परंतु मला वेडीला असें वाटूं लागलें, कीं कोणीतरी नवें येऊन चांगलें औषध देईल. होती ही मंडळी काय कमी मायेची आणखी कमी श्रम करणारी होती? पण नाहीं, बुडणाराला गवताची काडीसुद्धां मोठी आधारशी वाटते. माझा आणखी सासूबाईचाहि आग्रहच पडल्यावर मग काय करतात? केली ताबडतोब तार. इकडे डाक्तरांच्या येरझारा चालल्याच होत्या. आंत काय चाललें होतें त्याच्या गोष्टी बरीक जशा आंतून येतील तसतशा आमच्या कानावर येत, बाकी कांहीं नाहीं. दुपारचे बारा वाजले. तथापि आम्हांला तिकडे न जाऊं देतां फक्त, केव्हां त्यांना झोप लागली आहे, आतां किती वेळांत तरी गुळणी आली नाहीं, असे निरोप येत. परंतु सगळ्या निरोप सांगणारांचे चेहरे अगदीं लबाडीचे असे मला दिसत. ते सांगतात हें अगदीं खोटें असें मला वाटून व सासूबाईनाहि वाटून आम्ही दोघी आंत जाऊन बसण्यासाठीं फार आक्रोश करूं लागलों. आमचा आक्रोश जो जों जास्त होऊं लागला, तों तों ती मंडळीहि आम्ही बाहेर राहण्याविषयीं अतोनात आग्रह धरूं लागली. "आमची अशी ताडातोड करून तुम्हांला काय मिळतं? कां उगीच मायलेकरांची ताडातोड करतां?" असे शब्ददेखील सासूबाईच्या तोंडून निघाले; परंतु कोणी तिकडे लक्ष दिलें नाहीं. दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास एक साहेब डाक्तर येऊन गेला. त्याबरोबर तर माझें धाबें अतिशयच दणाणून मीं तो गेल्याबरोबर तेथून आंत जाईनच असा निश्चय केला; परंतु तो कांहीं केल्या बाहेर येईना. तो जातो केव्हां आणखी मी आंत घुसेन केव्हां असें मला होऊन गेलें होतें. इतक्यांत तो जाण्याचें एकीकडेच राहून त्यानें लिहिलेल्या दोनतीन चिठ्या घेऊन पहिले डाक्तर बरीक बाहेर आले. ते येण्याबरोबर मीं त्यांना अतिशय केविलवाणीनें विचारलें, "काय हो, डाक्तर काय म्हणतात?" "कांहीं नाहीं. म्हणतात कीं अगदीं स्वस्थपणा पाहिजे. आतां गडबड अगदीं करूं देऊं नका कोणाला म्हणजे झालं एवढेंच म्हणतो आहे," असें म्हणून नानांजवळ त्या चिठ्या देऊन ते पुनः पटकन् खोलींत होऊन खोलीचें दार लावून बसले. मला त्या वेळीं काय वाटलें पण? तितक्या त्या क्षांत आवेश येऊन दाराला धक्का मारून आंत जावेंसें वाटलें, परंतु न जाणो त्यांचें म्हणणें जर खरें असलें तर आपण आपल्या हातानें कुऱ्हाडीचा घाव घालून घेतलासेंहि होईल, असेंहि मनांत येऊन मी तशीच सासूबाईच्याजवळ चुळबुळ करीत बसलें. काय करणार! सासूबाई तर आपली माळ घेऊन जपच करूं लागल्या. मला एकसारखें रडूं येत होतें, परंतु मी त्यांच्यासाठीं म्हणून होतां होईल तों दाबीत होतें. मधून मधून आपल्याला तेथें मुळींच जाऊं देत नाहींत, म्हणून सर्व मंडळींस निर्दय थोडाबहुत तिकडे जाण्याचा

यत्नहि करीत होतें; परंतु लक्ष्मीबाई आणखी दुर्गी यां दोघीजणी कांहीं केल्या मला कांहीं हलूं देईनात. इतक्यांत आणखी एक साहेब व दोन आपलेच डाक्तर आले; तेहि आंत गेले. बराच वेळ आंत बसल्यानंतर एक एक चालते झाले. त्यांनीं तिथें बसून काय केलें मला कांहींच समजेना. मीं केव्हांहि विचारलें तरी " कांहीं नाहीं, बरें आहे. इतक्यांत सगळयांनीं मिळून नवीन औषध दिलें तें फार चांगलें आहे. ते आतां बरे होतील, तुम्ही अशा घाबरूं नका, तुम्ही घाबरलांत म्हणजे मग आमचा कांहीं उपाय चालत नाहीं–" असें तसें नाना रीतींनीं त्यांचें बोलणें चाललें. परंतु सुमारें चार साडेचार वाजतां मी अगदीं निश्चयच केला, कीं कांहीं होवो, जें काय व्हायचें असेल तें होईल, मीं आतां जवळ जाऊन बसणार असें म्हणून उठलें आणि आंत घुसलेंच. मग मागें पुढें पाहिलें नाहीं. " हें काय ? हें काय ?" करीत मंडळी दोन्ही बाजूला झाली. सर्वांचे चेहरे अगदीं काळे ठिक्कर पडलेले होते. हीं पांघुरणें रक्तानें भिजलीं होतीं ! त्या राशींकडे पाहण्याबरोबर मीं एकदम दादाकडे वळून म्हटलें, " दादा, तूं दिखील का रे इतका निष्ठुर झालास ? तूं दिखील माझ्यापासून हें सारं लपवून ठेवलंस ?" परंतु त्यानें " यमूताई, तूं इथें असतीस तर कांहीं अधिक केलं असतंस असं तुला वाटतं का ?" इतकेच शब्द उच्चारले आणि माझ्याचप्रमाणें रडकुंडें तोंड करून बाजूला सरला. मी आतां कोणीकडे न पाहतां तडक उशाशीं जाऊन बसलें. आतां ती स्थिति पाहून माझ्या डोळयांतले सर्व अश्रु नाहींसे झाल्यासारखे झाले. रडूं म्हणून येईना. काय करावें कांहीं सुचेना. तीनतीनदा उरावर, कपाळावर हात ठेवावा, पण तिकडे टकमका पाहण्या-पलीकडे कांहींएक केलें नाहीं. हात उचलण्याचीदेखील शक्ति नव्हती. या कुशीचें त्या कुशीवर होण्यास ताकद नाहीं, इतकी स्थिति येईपर्यंत आपल्याला निर्दयपणानें या सार्‍यांनीं दूर ठेवलें याबद्दल मला काय वाटलें आणि काय नाहीं ! असा विचार आला नाहीं, कीं मी जवळ असतें तर कांहीं दुखणें कमी का केलें असतें ? पण नाहीं, मी असतें तर......काय झालें असतेसें मला वाटलें कांहींच सांगतां येत नाहीं. इकडून उठावें तिकडे बसावें. उशापासून उठावें पायथ्याशीं जावें. मधेंच आपल्या हातांत हात घ्यावे; आणखी पांघरूण नीट सांवरावें; एकदा कांहीं बोलल्याचा भास होऊन कान तोंडाशीं न्यावा. असें एकसारखें चाललें होतें. मधेंच डाक्तराकडे वळून म्हटलें, " संपलीं काहो सारीं तुमचीं औषधें ? मला तरी एक या चांगलंसं म्हणजे बरोबरच......"

हे शब्द पुरते माझ्या तोंडून निघतात न निघतात तों पुनः तें काळरक्त एकदम तोंडावाटें बाहेर आलें आणि तें आतां दृष्टीस पडल्याबरोबर माझ्या डोळयाला अंधारी येऊन मी धाडकन् पलीकडे पडलें. किती वेळ झाला मला मुळींच ठाऊक नाहीं. मला तेथून उचलून कोणी कुठें नेलें तेंहि ठाऊक नाहीं. किती वेळ तरी मी मेल्याप्रमाणेंच पडलें होतें; परंतु इतकें माझें कोठलें पुण्य ! मी टवळी कांहीं वेळानें पुनः सावध झालें. ऐन तिन्हीसांजांची वेळ होती. मला आणून कोठेंसें निजविलें होतें व माझ्याजवळ दुर्गी आणखी लक्ष्मीबाई बसल्या होत्या. जागी झाल्याबरोबर मी पुन्हा बवताळून

उठून "अहो, मला कां तुम्हीं इथें आणलेंत ? काय असा मीं तुमचा अपराध केला तर तुम्ही माझा असा छळ चालवला आहे ?" अशा अर्थाचें कांहीं पुटपुटत–अर्थाचेंच म्हणायचें, कारण त्या वेळीं मीं काय काय बोललें आणखी काय केलें याचें मला मुळींच स्मरण कुठलें ?—पुनः दांडगाई करून आंत गेलें, तों सर्व मंडळी पहिल्याप्रमाणेंच बसली होती. सासूबाई कुठें दिसेनात. मी जवळ गेलें. त्याबरोबर माझ्या हातावर हात ठेवला, आणखी कांहीं बोलल्याप्रमाणें ओंठ हालविलेसें मला वाटलें. मीं 'दादा, दादा,' करून ओरडलें. दादा जवळ आला. दादाचा हात धरून माझ्याकडे पाहिलें आणखी माझ्याकडे पाहून कांहीं बोलण्याची इच्छा आहेसें दाखविलें मला त्या वेळीं कुठलें धैर्य आलें कोणास कळे ! मी अगदीं गडबड न करतां तोंडापाशीं कान नेला तों "आईला... अंतर... देऊं... नको . कोणी... नाहीं... शंकरमामा" इतकेच शब्द माझ्या कानीं पडले व लागलीच दादाकडे वळून "पॉलिसी... पेटींत..." असे अर्धवट शब्द उच्चारले. पुढें काय म्हणायचें होतें आणखी काय सांगायचें होतें तें त्या शब्दांच्या लागोपाठ आलेल्या गुळणींतच गेलें. सगळें अंग पिळवटल्यासारखें केलें. "सासूबाईना तरी आणा हो एकदा" असें मी ओरडलें पुनः "अग, मी तुझ्याबाहेर का आहें !" असें म्हणून आतां कसेंहो बाहेर चाललां ?' असे कांहीं शब्द माझ्या तोंडावाटे निघून मीं हात घट्ट धरला, व 'मीं तरी येतें, थांबा' असें स्पष्ट म्हटलें व ताडकन् कपाळ हापटून घेतलें, इतकें मला अगदीं स्पष्ट आठवतें. पुढे सर्व अंधारच झाला. परंतु तो अंधार कायमचा कुठला राह्यला ? डोकें हापटून जर अंधार होता तर मग आणखी काय पाहिजे होतें ! मला मग आणखी किती वेळपर्यंत कांहीं ठाऊक नाहीं मधल्या सगळ्या वेळीं भ्रांतींत होतें, कीं मी मेलें होतें,—पण मला टवळीला कुठलें मरण आलें आहे !—कांहीं कळलें नाहीं. भ्रांतींतून म्हणा किंवा कशांतून म्हणा, पण सावध झाल्यावर माझ्या कानीं पहिले शब्द पडले ते—"मी टवळी जिथें जाईन तिथें असंच होणार काहो ?" हे होत. हे शब्द दुर्गीनें उच्चारलेले होते. तिच्यासमोर दादा उभा होता. मी शुद्धीवर आलेली किंवा जागी झालेली त्या दोघांना ठाऊक नसावें असें दिसतें. कारण "दुर्गाताई, तूं हें असं कां बोलतेस ? अग तूं काय केलं आहेस ? तुझ्याकडे काय आहे ? आईनं मरते वेळीं माझ्या कानांत हेंच सांगितलं होतं समजलीस ? पण मला त्याचं स्मरणदिखील नव्हतं, अन् कधीं झालंच स्मरण, तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं म्हणून मी आपला उडवून देत असें." इतकें बोलून दोघेंहि स्तब्ध राहिलीं. त्याबरोबर मी एकदम उठून "दादा, दादा, तर मग आतां तूं कोणाबरोबर रे पुण्यास वकिली करणार ? अन् हें तुला ठाऊक होतं, तर मला रे कां नाहीं तूं सांगितलंस ? मीं कांहीं तुझ्याबाहेर नाहीं बरं का ? आतां कुठें रे जायचं ! अं ? माझी कैद जन्माची, पण ती तोडलीना !" असें कांहीं, कांहीं तरी बडबडूं लागलें, असें एक मला आठवतें. पण तेथून पुढें मला दोन तीन दिवस भ्रम झाला असावा असें दिसतें; कारण मला सरळ असें कांहींच आठवत नाहीं. सासूबाई कुठें आहेत, आपण कुठें आहोंत, दादा कुठें

आहे ? कांहीं ठाऊक नसावेंसें दिसलें; पण तो भ्रम जाऊन मी ताळयावर कशी आलें हें मला चांगलें आठवतें. मी ज्या खोलींत बसलें होतें, त्या खोलींत चवथे दिवशीं सकाळीं कोणी नव्हतें असें मला वाटतें. मी आपली जमिनीवर कीं चौघडीवर तळमळत होतें. इतक्यांत माझ्या शेजारीं कोणाचीं पावलें वाजलेलीं कानीं पडलीं " कोण ? दादा !" असें मी स्पष्ट विचारलें. परंतु " नाहीं, मी आहें. सूनबाई, आतां झालं तें कांहीं परत येत नाहीं, पण जनरीतीप्रमाणें सगळया गोष्टी......" इतके शब्द कानीं पडतात न पडतात, तों तो शब्द मीं ओळखला आणखी " कोण ? शंकरमामंजी ?—दादा ! " करून मोठयानें किंकाळी फोडली. माझ्या दृष्टीसमोर तो पुन्हा शेवटचा देखावा दिसूं लागला. ते शेवटचे "शंकरमामा.. " हे शब्द माझ्या कानीं पुन्हा पडताहेत असा भास झाला; इतकेंच नव्हे, तर " संभाळ, तो तुझा गळा कापील " असे शब्द त्याच मुखांतून निघून माझ्या कानीं पडताहेत असें मला पक्कें वाटलें; स्वप्नांत जशी एखादी गोष्ट खरी खरी वाटते, त्याचप्रमाणें मला तो शेवटला सर्व देखावा दिसूं लागला, आणखी ते शब्द कानांत घुमत असतांना जेव्हां शंकरमामंजींची ती काळमूर्ति दृष्टीस पडली, तेव्हां माझ्या जिवाचें काय बरें झालें असेल ! मी " दादा " म्हणून हांक मारली असतांना दादा आला नाहीं, तेव्हां धैर्य येऊनच कीं काय, शंकरमामंजी पुढें येऊन मला म्हणतात, " अग, तूं काय या वेडांत शिरली आहेस ? तुझ्या मनांतून त्याला नरकांत का ठेवायचं आहे ? जिवंतपणीं त्याच्याकडून पापं करवलींस तेवढीं थोडीं नाहीं झालीं ? " देवा, नारायणा ! ते तसले दुष्ट शब्द ऐकून घेण्याला कशाला तरी मला जगवलंस ! काय कोणता तुझ्या घरीं मीं जसा अपराध केला होता ? पण त्या देवाला तरी काय म्हणून बोल लावायचा ? माझ्या नशिबीं जें जें होतें तें तें घडलें. शंकरमामंजींचे ते शब्द ऐकून घ्यावे लागले. जास्त बोलतां येईना. तेथून उठून जातां येईना. फक्त ओरडायचें माझ्या हातचें होतें, परंतु त्या समोर उभ्या राहिलेल्या मूर्तीला पाहिल्याबरोबर माझी जीभ चिकटून बसल्यासारखीच झाली. कांहीं केल्या शब्द निघेना, शंकरमामंजी पुढें पुढें येऊन कांहीं बडबडतच होते. " सगळयांना सांग कीं तें कांहीं नाहीं. मामंजी सांगतील तसं आपलं मला ऐकलं पाहिजे. भलत्याच सुधारल्या मनांत शिरून भलतंच करूं नको. आमच्या कुळाला डाग लावूं नको. झाल्या गोष्टींची मी अगदीं क्षमा करतों. समजलीस ? तो तुझा भाऊ एक विक्षिप्तच आहे. मीं परवां गोष्ट काढल्याबरोबर प्राण घेईन म्हणाला. मग काय बोलायचं ? " तो त्यांचा प्रत्येक शब्द म्हणजे डागणीनें काळजावर डागल्याप्रमाणें माझ्या हृदयांत भिनून गेला. आतां यांना दृष्टीआड होण्याला करूं तरी काय ? असें मला झालें. पण काय इलाज ? पुन्हा ते " काय ? बोलत नाहींस ती ? तो नरकांत राहिलेला बरा वाटतो तुला ? ' हे शब्द उच्चारलेले ऐकण्याबरोबर मी अगदीं हताश झालें, आणखी अंगांत होतें नव्हतें तेवढें सारें बळ एकवटून " दादा ! " असें अतिशय मोठयानें ओरडलें. त्याबरोबर बाहेरून " ओ " अशी हांक येतांच " रड ! त्याच्या नशिबींच असलं तर तूं काय करशील ! अन् तुझ्यापायीं त्याचा साराच घात

व्हायचा असला, तर आम्ही तरी काय करणार ? आमच्या नांवासाठीं आम्हांला वाटतं ! " असें पुटपुटत लगबगीनें स्वारी बाहेर गेली, तों बाहेरून " बाबा, तुम्ही वहिनींच्या खोलींत गेलां होतां ? तुम्हांला कांहीं वाटलं नाहीं आंत जायला अशा स्थितींत ! " " गप्प बैस कारट्या ! तोंड दाखवूं नको मला. सारे शिंचे कुळदीपकच निघाले आहेत ! " असे शब्द माझ्या कानीं पडले. आणखी धोंडूभावजी व त्यांच्या पाठोपाठ दादाहि आंत आला, त्याबरोबर मीं धांवत जाऊन त्याच्या गळ्याला घट्ट मिठी मारली. काय झालें तें त्याला कळलेंच नाहीं. त्यानें मला कां, काय, वगैरे पुष्कळ विचारलें; परंतु माझ्या तोंडून शब्दच निघेना. आतां मी त्याला काय सांगूं ! पण धोंडू-भावजींनीं " बाबा इतक्यांत इथें येऊन गेले तेव्हां......"

" कोण, कोण ? तुझा बाप आला होता इथें ? या खोलींत ? अरे......" असे म्हणत दादा त्वेषानेंच पुन्हा बाहेर गेला. आतां काय होतें आणि काय नाहीं याची मला मोठी काळजी लागली.

◆ ◆ ◆

## ८३ : शंकरमामंजी

* * * * * * * * * * * * * * *

मागलें तें भयंकर प्रकरण लिहिल्याला आज बरोबर दीड पावणेदोन महिने झाले. इतक्या अवधींत मीं त्या कागदांकडे पाहिलेंसुद्धां नाहीं, माझ्यानें पाहवलेंच नाहीं ज्या वेळीं दादाचें व माझें, आपलें सर्व चरित्र लिहिण्याबद्दल ठरलें, त्या वेळीं हा भाग मला लिहावा लागणार, हें कांहीं मीं जाणून नव्हतें असें नाहीं; तथापि प्रत्यक्ष त्या सगळ्या गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर दिसूं लागून जेव्हां पुनः एकदा त्याचा अनुभवच मी घेत आहें असें मला दिसलें, तेव्हां माझ्यासारख्या हतभाग्येच्या मनावर जो कांहीं परिणाम व्हायचा तो झाल्याखेरीज कसा राहावा ? आतां यापुढें आपण कांहीं लिहूं नये, आणखी संवरूं नये, झालें एवढें पुरें झालें, असें पक्कें मनांत येऊन आणखीं त्यांत माझ्या खोकल्यानें व तापानें जास्तच उचल घेऊन त्याच माझ्या निश्चयाला मदत केली; तेव्हां अर्थातच मीं तें सोडून दिलें. तरी पण हातीं घेतलेलें एवढें काम पुरें झालें तरच त्याचा कांहीं उपयोग, नाहीं तर काय ? असें पक्कें वाटून व दादाला दिलेलें वचन पुरें करण्याच्या आधींच जर आपलें बरें वाईट झालें तर कसें ? असाहि विचार मनांत येऊन मीं आज-पासून पुनः ती राहिलेली हकीकत अगदीं आजतागाईत लिहून ठेवण्याचें मनांत आणलें आहे. परमेश्वरकृपेनें काय होईल तें खरें ! आपल्या हातीं काय आहे ? सध्यां भोगावे लागत असलेले किंवा पुढें भोगावे लागणारे त्रास निमूटपणीं सहन करून त्यांचा अंत एकदाचा केव्हां होईल, एवढें पाहात बसण्यापलीकडे आपण काय करणार ? त्याच्या

मनांत येईल तेव्हां तो नेईल, तोंपर्यंत हें असें चालावयाचें. असो. आतां मी तो मागला भाग पाहतें तों दादा त्वेषानें बाहेर गेला एवढें लिहिलेलें दिसतें आहे. तो मला दूर सारून गेला, तेव्हां आतां विलक्षणच तंटाभांडण होणार, असें मला पक्कें वाटून फार भय वाटलें. हे दिवस कसले ? आणखी आहे तरी काय ! म्हणून मीं लागलीच धोंडभावजींना "जा. जा. तुम्ही जा मागोमाग" असें म्हटलें, पण तो बिचारा काय करणार ? खरोखर पुढें काय झालें मला कांहींच कळलें नाहीं. मी आपल्या खोलींत दुःखांत पडलेली आणखी अशा स्थितींत नाहीं नाहीं तें येऊन बोलण्याला कसें बरें धैर्य झालें ? त्यांना काळीज नाहीं की काय ? अशा तऱ्हेचे चमत्कारिक विचार माझ्या मनांत येऊं लागले. आज जर ही स्थिति तर आतां आपली पुढें स्थिति होणार तरी कशी ? असाहि विचार मनांत येऊन माझें मन फारच गोंधळून गेलें. सासूबाईंना सोडून राहणें कालत्रयीं आपण करणार नाहीं, असा तर माझ्या मनाचा पक्का निर्धार झाला होता. पण नुसता माझ्या मनाचा निर्धार होऊन काय उपयोग आहे ? सासूबाईंच्या मनास गोष्ट आली पाहिजे ना ? त्या जर सासरीं राहायचें म्हणाल्या, तर आतां माझें कसें जुळावें ? बरें, मी तरी आतां राहणार कोठें ? माहेरीं तर आतां आपलें काय जुळणार ? आपल्याला कोणाची जरूर नव्हती, तेव्हांचें ठीक होतें; परंतु आतां निराधार झाल्यावर कशाहि स्थितींत असलें तरी आपणाला त्रास हा व्हायचाच व्हायचा ! असेहि कांहीं विचार मनांत येऊं लागले. लक्ष्मीबाई, यशोदाबाई या माझ्या मैत्रिणींच्या जवळ आतां मी बोलूं काय ? त्यांचा विचार विचारूं काय ? असें एकसारखें काहूर माझ्या मनांत उठलें. अहो, तीनचार दिवसांपूर्वी जी मी स्वर्गसुखांत पोहत असून माझ्यासारखी सुखी मीच असें मला वाटत होतें, त्याच मला आज नरकयातनांपेक्षांहि दुर्धर यातना ज्यापासून होताहेत अशी स्थिति यावी अं ? परंतु आला प्रसंग त्याला काय करणार ? एक दिवसांत मागला सगळा उजेड जाऊन काळोखांत तोंड लपविण्याची स्थिति आली अं ? माझ्यासारख्या आणखी अनाथ गाई कितीतरी असतील ! त्यांना काय हाल सोसावे लागत असतील ! याबद्दल ऐकीव माहिती घेऊन ज्या मीं लेख लिहिलें व भाषणें केलीं, तीच मी आज त्याच स्थितींत येऊन पडून दुःखाच्या डोहांत अगदीं तळीं जाऊन बसलेंना ? असे काय काय आणखी किती तऱ्हेचे विचार माझ्या मनांत आले, कांहीं सुमारच नाहीं. मला अशा दुःस्थितींत पडलेली पाहून दुर्गी तर माझ्यासमोर उभी राहीनाशी झाली. तिला असें वाटूं लागलें, आणखी तिनें कितीकदा तरी बोलूनहि दाखविलें, कीं आपण जिथें जाऊं तिथें कोणाचें बरें म्हणून व्हायचें नाहीं. या तिच्या विचारांवरून तिला माझ्याबद्दल किती दुःख झालें असेल, याची कल्पना सहज कोणालाहि करतां येईल ! असो. आणखी दोन दिवसांनीं दादा एके दिवशीं मजकडे आला आणखी म्हणाला, "यमूताई, आतां जी गोष्ट झाली ती कांहीं परत येत नाहीं; आतां पुढें कसं काय करायचं ? तुमचे शंकरमामंजी तुमच्या सासूबाईंना आपल्या घरीं घेऊन जाणार असं धोरण दिसतं. तूं तर म्हणतेस, कीं मी सासूबाईंना सोडून घटकाभरदेखील

राहायची नाहीं. मग कसं करायचं ? तूं तिकडे राहायला जाऊन तुझं कसं जुळावं ? शंकरमामंजी तुला कांहीं चैन पडूं देणार नाहीत. माझी इच्छा आहे, कीं तूं आतां माझ्याजवळ राहावंस. इथून आतां आपण गेलों, म्हणजे प्रथम जाऊं घरींच. पण महिना दोन महिन्यांत काय अनुभव येतो तो पाहूं. बऱ्यांतच जर असल तर ठीक; जर घरीं नाहीं जुळलं, तर मग मुकाट्यानं दुसऱ्या कुठल्या तरी गांवीं जाऊन राहूं. पण तूं आतां माझ्यापासून दूर राहूं नकोस, आणखी मी तुला राहूंहि देणार नाहीं."

तो केव्हांतरी आतां हें बोलणें काढणार असें मला पक्कें ठाऊकच होतें. त्याचप्रमाणें गोपाळमामंजींना तार केली असतां, ते न येतां शंकरमामंजी आले, तेव्हां संथपणानें कोणतीहि गोष्ट होणार नाहीं हेंहि पण मला समजून चुकलें होतें. पहिलेच दिवशीं कांहींतरी गोंधळ व्हायचा ! कदाचित् तो झालाहि असेल. पण तो मला समजला नाहीं एवढेंच. बाकी जे दिवशीं सकाळीं शंकरमामंजी माझ्या खोलींत येऊन त्यांनीं माझ्या होरपळून, करपून गेलेल्या अंतःकरणावर चराचर चटके दिले, ते दिवसापासून त्यांनीं घरांत शोधाशोधी चालविली होती, हेंहि माझ्या कानीं आलेंच होतें. परंतु मीं दादाच्या कानांवर एक अवाक्षरदेखील जाऊं दिलें नाहीं. मी आपल्या मनांत म्हटलें, "माझें सर्वस्व बुडालें ! आतां एवढया तेवढयानें कोठें माझा संसार नडतो आहे ?" मला बातम्या देणारी माझी दुर्गी. ती हल्लीं घरांत असे मी आपली एका खोलींत पडलेली; सासूबाई दुसऱ्या कोठेंतरी असत; माझें आणखी त्यांचें दर्शन नाहीं. मला आपल्या खोलींतून बाहेर जाण्याला कसेंसें वाटे. त्यांना माझ्याकडे येऊं नये असें वाटे. लक्ष्मीबाई किंवा यशोदाबाई कोणीतरी बहुशा माझ्याकडे असत. घरांत करी सवरी काय ती दुर्गी, यामुळें तिच्या नजरेला शंकरमामंजींचे सर्व खेळ येत, आणखी ती मला अगदीं इत्थंभूत येऊन सांगे. आज काय माझी चिरगुटापांघुरणांची पेटी उघडून पाहिली, उद्यां काय दागिन्यांची पेटी उघडून पाहिली, असें चाललें होतें. सातवे कीं आठवे दिवशीं आजेसासूबाई स्वतः आल्या—आतां दहावा दिवस झाला कीं आम्हांला साऱ्यांना नेण्यासाठीं त्या आल्या. नंतर दुःखाचा भाग थोडाच झाला, परंतु जनरीतीप्रमाणें अवश्य व्हायला पाहिजे ती गोष्ट झाली नाही. आणखी एकंदर हकीकतीवरून पुढेंहि होणें संभवनीय नाहीं, असें पाहण्याबरोबर त्यांच्या अंगाची आग झाल्यासारखीच दिसली. त्यांत तेल ओतायला शंकरमामंजी तयार होतेच. आतां त्यांच्या त्या वृद्ध आईचें पाठबळ—किंबहुना तोंडबळ—मिळाल्यामुळें तर त्यांना दुप्पट स्फुरण चढल्यासारखें झालें; आणखी त्यांनीं दादाच्या पाठीमागें माझ्या खोलींत येऊन नाहीं तसले शब्द उच्चारून माझा छळ आरंभला. जी गोष्ट तिकडे मुळींच आवडत नव्हती तसला कांहीं प्रसंग मजवर येऊं नये, स्वतंत्रपणानें मला राहायला यावें म्हणून सर्व तजवीज करून ठेवली होती. तर तिकडच्या मर्जीविरुद्ध मुळींच वागायचें नाहीं हा तर माझा कृतनिश्चय. परंतु यांच्या या जोडगोळीनें—आणि मनाच्या त्या दशा स्थितींत वैतागून जाऊन एकदा यांचें तरी समाधान होऊं द्यावें, असा कुविचार एखादे वेळ तरी क्षणभर माझ्या मनांत येईल असें वाटूं लागलें. मी आपल्याकडून अगदीं

निश्चय करीतच होतें परंतु न जाणों अति झालें म्हणजे काय होईल हातून आणखी काय नाहीं ! नववा दिवस उजाडला, दहावा दिवस जों जों जवळ आला, तों तों आजेसासूबाईचें तोंड जास्त बडबडूं लागलें. ते दिवशीं रात्रीं दादा माझ्या खोलींत निजला, आणखी त्या खोलींत आल्याबरोबर तो त्यांस एकदम म्हणाला, " चला, चालत्या व्हा इथून तुम्ही. मी मघांपासून ऐकतों आहें तुमचं काय चाललं आहे तें. माझ्या जिवांत जीव आहे, तोंपर्यंत तिच्या अंगाला कोण हात लावायला येतो आहे तो पाहीन ! मी आपला तरी प्राण देईन नाहीं तर जो पुढे पाऊल ठेवील त्याचा तरी घेईन ! दहा दिवस देखील झाले नाहींत, तों तुम्हांला दुसरं कांहीं सुचेनासं झालं आहे अं ? तुमचे तुम्हांला दागिने हवे असले तर घेऊन जा. मला तुमच्या दागिन्यांची कीं फुटक्या कवडीचीदिखील जरूर नाही; पण तिच्या अंगाला हात......"

" इतका वेळ ठेवले आहेत कीं काय दागिने घ्यायला, दागिनेन् लुगडीं केव्हांच शंकररावांनीं बांधलीं ! " दुर्गी तितक्यांतल्या तितक्यांत म्हणते. मग काय विचारतां ? एकच हलकल्लोळ झाला. मला रडतां भुई थोडी झाली. आतां ह्या गोष्टी कोण्या थरावर जाणार कांहींच समजेना. तरी पण दादा पुढें बोलेनासा झाल्यामुळें थोड्यावरच निभावून दुसऱ्या बाजूनें अद्वातद्वा बोलणें चाललेंच होतें, पण शंकरमामंजी कांहींएक बोलत नव्हते. फक्त आजेसासूबाईचें तोंड चाललें होतें. त्यांत मग काय आलें आणखी काय नाहीं ! जेवढें म्हणून वाईट तेवढें सारें त्यांत आलें. पण त्या म्हातारीच्या तोंडीं लागावें कोणीं ? असा दादानें विचार करून आणखी बोलण्याचें सोडून दिलें. परंतु चमत्कार काय पाहा ! इतक्या सगळ्या ह्यांत शंकरमामंजी कांहीएक न बोलतां आपणांस दागदागिने वगैरे सर्व कांहीं पचलें असें वाटून आनंदून जाऊनच काय अगदीं शेवटीं दादाला म्हणतात, " गणपतराव, असे संतापतां काय ? आमच्या जुन्या माणसांच्या जुन्या समजुती त्याप्रमाणें आम्ही आपले उपदेश करायला गेलों, तुम्हांला नाहीं पसंत तर आमचा कांहीं जोर का आहे ? का आम्हांला हें असं व्हावं असं वाटलं होतं ? आतां झालं त्याला कोणाचा काय उपाय ? तेव्हां म्हातारीला सहजच वाटलं असेल, की आपल्या साऱ्या कुळांत जी गोष्ट कधीं झाली नाहीं ती आजच् होऊं नये. तिची समजूत आहे, जाऊं द्या, सोडून द्या. पुनः त्यासंबंधानें आम्ही एक अवाक्षरदेखील बोलणार नाहीं. हो, उगीच वैमनस्याला कारण नको. तो गेला म्हणून तुमचं आमचं वांकडं यावं का काय ? तो जरी गेला तरी तुमची बहीण ती आमची सून नाहींशीं नाहींना होत ! तिचा परामर्श आम्हांला घेतलाच पाहिजे. तिच्यावर असा प्रसंग आला तर आम्हीच धावत आलों कीं नाहीं ! दुसरं कोणी येईल का ? झालं तर मग ! असे रागावूं नका बोआ; अहो, तुम्ही आम्ही जर असे तंडत बसलों, तर या दोघींचं कसं व्हावं ? आतां असं कांहीं नको. आपण आतां माझ्या मतानं उद्यां साऱ्यानींच इथून चलावं; माझ्या मतें आतां तिथेंच जाऊन पुढें काय करायचें तें करावें ! तुमच्याआमच्या विचाराखेरीज आतां कांहीं गोष्टी करायच्या नाहींत........" अशी आणखी कितीतरी चर्पटपंजरी त्यांनीं चालविली होती. त्याचें मला कांहीं वाटलें नाहीं.

पण दादानें तें सारें अगदीं निमूटपणानें ऐकून घेतलें, त्याच्यावर एक अक्षरदेखील उच्चारलें नाहीं, हें पाहून मला त्या वेळीं चमत्कार वाटला व अजूनहि वाटतो आहे. त्यानें फारच शांतपणानें " ठीक आहे. आपलं म्हणणं फार विचाराचं आहे. तुम्ही आम्ही जाऊं बरोबरच. पण मी तिला आपल्याबरोबर कांहीं पाठवणार नाहीं. मी आपल्या घरीं नेईन. मग तिला वाटलं आणखी तुम्हीं येऊं दिलं तर येईल ती आपल्या घरीं. पुरे दहा दिवस झाले नाहींत, तोंच तंटयाभांडणाचं मूळ निघावं अशी माझी तर कांहीं इच्छा नाहीं; पण भलतीन् सलतीच गोष्ट जर तुम्ही काढाल, तर मात्र मला कांहीं खपायचं नाहीं ! " इतका शांतपणा आणखी शंकरमामंजींशीं बोलतांना दादाला आला कसा ? याचें आश्चर्य वाटलें. तो कसाहि येवो, पण त्या वेळीं त्याचा फार उपयोग झाला. हें सर्व एकीकडे चाललें असतांना माझ्या मनांत निराळ्याच प्रकारचा विचार येत होता. तो एवढाच कीं, सासूबाईंची आणखी माझी एकीकडे गांठ पडून त्यांच्याशीं बोलायचें कसें जुळावें ? त्यांच्याशीं बोलणें होऊन पुढच्या आपल्या स्थिती-बद्दल व त्यांच्या स्थितीबद्दलहि विचार करणें फार आवश्यक होतें; परंतु तें घडावें कसें ! शेवटीं मी, लक्ष्मीबाई व यशोदाबाई यांच्याजवळ तें काढून त्यांना कांहींतरी युक्ति काढण्याला सांगितलें. गोपिकाकाकूंकडून तें काम चांगल्या तऱ्हेनें जुळेल असें वाटलें नाहीं, तथापि त्यांनीं एकदा त्यांना एकटयांना जर आणलें तर प्रथमतः लक्ष्मीबाईकडून व मग आपण स्वतः गोष्ट काढूं असें मला वाटत होतें. भीति काय ती एवढीच होती, कीं एक तर असा प्रसंग साधणें कठीण, आणखी त्यांतून साधला तरी आपल्या मनांतला हेतु त्यांना कळवून त्याप्रमाणें त्यांचें मन व्हायचें आणि त्यांनीं स्वतंत्रपणें राहण्याचें कबूल करायचें ही गोष्ट अतोनात दुरापास्त दिसली. मला तर असें वाटे, कीं नारायणानें दुर्धर प्रसंग आणला खरा, आतां आम्हीं दोघींनीं एकदिलानेंच राहून एका ठिकाणीं निदान त्यांच्या हयातीपर्यंत–गत–दिवसांच्या आठवणी करीत परमेश्वर ठेवील त्या स्थितींत दिवस कंठावे परंतु तें होणेचें दिसेना. अगदीं शेवटला निरोप तर मला सांगितला तो ' आईला अंतर देऊं नको, ' हा होता. ' तिला कोणी नाहीं...शंकरमामा......' शंकरमामाविषयीं काय सांगायचें होतें आणखी काय नाहीं ? शेवटीं मनांत किती गोष्टी आल्या असतील, काय वाटलें असेल, कांहींदेखील मला ठाऊक नाहीं. मला शेवटपर्यंत जवळदेखील जाऊं दिलें नाहीं, यामुळें कितीदा तरी मला हांका मारल्या असतील. चांगल्यापणीं ज्या मला क्षणभरदेखील विलंबायचें नव्हतें, मी तुला सोडून आतां कुठेंदेखील राहायचा नाहीं, तुझ्याबाहेर मी यत्किंचित् देखील वागायचा नाहीं, तुझ्यासाठीं अमुक करीन, तुझ्यासाठीं तमुक करीन, तें आतां सारें कुठें गेलें ? अर्ध्या आडांत सोडून दोरी कापल्यासारखी स्थिति झाली. आतां मीं पुढें करावें तरी काय ? दादाचें व माझें चांगलें जुळेल. परंतु वहिनीचें व माझें कसें जुळावें ? सासूबाई जर माझ्या हेतूप्रमाणें राहिल्या, तर ठीकच होईल. आणखी पुण्याहून जर शंकरमामंजी व त्यांच्या मागोमाग आजेसासूबाई न येत्या तर तें कदाचित् जुळतेंहि; पण आतां त्याचा संभवच राहिला नाहीं. गोपिकाकाकूंकडून

त्यांना आणण्याचा प्रयत्न केला, परंतु तो साधला नाहीं. कारण त्या एकट्या कधींच सांपडल्या नाहींत आणि दुसरें असें कळलें, कीं त्यांनीं बोलणेंच टाकून दिलें होतें. कोणाशी म्हणून बोलेनात. बोलल्या तर काय बोलत, तें त्यांचें त्यांना समजतें कीं नाहीं याची शंका येई. अशा स्थितींत आपल्याला बोलायचें तें बोलून काय उपयोग ? अशा कांहीं विवंचनेंत मी असतांनाच सासूबाई, आजेसासूबाई व शंकरमामंजी सर्व मंडळी पुण्यास येण्यास निघाली. "आपण एव्हांशी जाऊं नये, पाठोमागून, जावें," असें दादाचें म्हणणें पडलें. परंतु मीं तें एक घटकाभरसुद्धां ऐकलें नाहीं. मला आपलें सासूबाईंच्याबरोबर जायचें, हा माझा कृतनिश्चय मीं त्याला कळविला. त्याचा व इतर मंडळींचाहि आग्रह उलट पडला. शेवटीं मीं जेव्हां त्याला निक्षून म्हटलं, की तूं आपला इथें राहा, पण मी कांहीं राहायची नाहीं. तेव्हां त्यानें निघण्याचें कबूल केलें आणि आम्ही सर्व मंडळी रात्रीच्या गाडीनें निघालों

◆ ◆ ◆

## ८४ : पुण्यास गेल्यावर

* * * * * * * * * * * * * * * * *

आजपर्यंत आम्ही कितीदा पुण्यास आलों आणखी कितीदा परत गेलों, परंतु आतांच्या स्थितींत माझ्या मनांत काय विचार येत असतील याची कोणास कल्पना तरी होईल काय ! मुंबईला प्रथम आम्ही गेलों तेव्हांचे माझे विचार आणि आतां या वेळीं मनांत उभे राहिलेले विचार, या दोहोंचा विरोध दाखविण्याचें माझ्या अंगांत तर नाहींच, पण हें चरित्र वाचणाऱ्यांपैकीं कितीजणांचें अंतःकरण इतकें कठोर असेल कीं त्यांना त्या विरोधाची कल्पना करतां येईल ? त्याच सासूबाई आणखी तीच मी, परंतु एक बंधन तुटण्याबरोबर नुसतें त्यांच्याशीं बोलायचें तरीदेखील मला किती भय वाटूं लागलें. तिकडच्या जिवावर ज्या शंकरमामंजींची मला यत्किंचित् भीति वाटत नसे, त्याच शंकरमामंजींचें आज कोण भय वाटूं लागलें ! मुंबईतील एकंदर सुखाच्या गोष्टींचें स्मरण किती झालें ? एकंदर आठवणी झाल्या म्हणजे, त्या तशा स्थितींत मला भ्रम होऊन वेड कसें लागलें नाहीं, याचेंच मला आश्चर्य वाटलें.

दुर्गी माझ्या शेजारीं होती. ती अगदीं उगीच बसली होती. मी तिच्या पलीकडे कोपऱ्यांत गुडघ्यांत मान घालून स्वस्थ रडत होतें सासूबाई माझ्या पलीकडे बांकावर पडून राहिल्या होत्या. त्यांचा किंचित् डोळा लागला असावा, असें मला वाटलें. आजेसासूबाई पलीकडच्या बांकावर पडल्या होत्या. त्यांना चांगली झोप लागली होती. शंकरमामंजी, धोंडूभावजी व दादा पलीकडच्या कम्पार्टमेंटांत होते. रात्रीं सुमारें दोन वाजण्याचा सुमार असेल. आमची गाडी मोठ्या जोरांत चालली होती. आणखी एकाएकीं, "अरे, आतां नाहीं रे बाबा मी तुला सोडायची. अगदीं धरून बसेन."

असे शब्द चमत्कारिक कर्कश आवाजानें उच्चारीत व उशाशीं असलेल्या दुर्गीचा हात विलक्षण घट्ट धरून सासूबाई उठल्या व कावऱ्याबावऱ्या पाहायला लागून दुर्गीला आपल्याजवळ ओढूं लागल्या. ती अर्थातच घाबरून जाऊन माझ्याकडे घुसूं लागली. " हें रे काय ? असं काय करतों आहेस आज ! " असें म्हणून तितक्यांत त्या हसायलाहि लागल्या. मग मात्र माझ्या मनांत कांहीं चमत्कारिक विचार आला. यांना भ्रमाची लहर तर नाहींना आली ? तें मनांत येण्याबरोबर मलाहि मोठयानें रडूं आलें, आणखी पुनः गोंधळ झाला. आजेसासूबाई उठून त्यांनीं निजण्याविषयीं आग्रह चालविला, पण कांहीं नाहीं. माझा तर्कच खरा झाला. त्या निजल्या असतांना काय त्यांना जें स्वप्न पडलें, त्यांत कोणी दिसलें आणि तें दिसलें त्या हर्षाच्या भरांत त्या ज्या उठल्या, त्या मग त्या स्वप्नांतच राहिल्यासारख्या झाल्या. त्यांना आतां दुसरें कोणी दिसेनासें झालें. त्या आळीपाळीनें हसत व रडत, काय वाटेल तें बोलत. मुंबईस त्यांची व माझी कधींच गांठ पडली नाहीं, पण मी " त्या बोलत नाहींत, बोलल्याच तर काय बोलत तें त्यांचें त्यांनाच समजतें कीं नाहीं हेंच कळत नाहीं, " असें एकदोनदां ऐकिलें होतें. त्याचें कारण मला आतां समजलें परंतु त्या वेळीं तें कोणाच्या लक्षांत आलें नाहीसें दिसलें. त्यांच्या भ्रमाला सुरुवात तेव्हांपासूनच झाली असावी असें मला तर वाटलें. आतां तर स्पष्टच झालें कीं, त्यांना दुसरें कांहींच दिसेना. त्यानंतर कांहीं त्यांना झोप लागली नाहीं. कांहीं वेळ पडत, कांहीं वेळ उठत. मधेंच तिकडलें नांव घेत. मधेंच मला हांका मारीत. मधेंच कांहीं पुटपुटल्यासारखें करीत. आणखी गोपिकाकाकूंचें नांव घेऊन पुनः कांहींतरी बोलत, असें पुण्यास जाईपर्यंत चाललें होतें. पुण्यास जाऊन स्टेशनवर उतरल्यावर कुठें जायचें, काय करायचें याबद्दल एक अक्षरदेखील आमच्याशीं न बोलतां शंकरमामंजींनीं आपलीं गांठोडीं उचलून व आजेसासूबाईकडे कांहीं हेतूपूर्ण दृष्टीनें बघून आणि धोंडूभावजींना " वारूनाईचा हात धरून तिला घेऊन ये " असें म्हणून आपण तडक पुढें चालले मीं जावें कोठें दादाबरोबर कीं त्यांच्याबरोबर हें मला कांहींच समजेना, तरी पण मी आपली सासूबाईच्याबरोबरच त्यांचा दुसरा हात धरून चाललें दादा व दुर्गी कांहीं न बोलतां मुकाटयानें गांठोडीं घेऊन माझ्याबरोबरच निघालीं. दाराच्या बाहेर आल्यावर, शंकरमामंजींनीं माझ्याकडे असें टवकारून पाहिलें. सासूबाईचा हात माझ्या हातांत होता तो झट्कन् ओढला, आणखी, " तूं अन् तुझा तो सुधारक दादा, जा, कुठें पाहिजे तिथें जा; आतां कशाला तिचा हात धरतेस ? आतां तूं आमची कोण ? आणखी आम्ही तुझे कोण ? " असे शब्द उच्चारले व तिरस्कारयुक्त असें हसत त्यांनीं सासूबाईंना आजेसासूबाईच्या बाजूला सारलें. माझ्या डोळ्यांत टच्कन् पाणी आलें व आतां मोठा थोरला हुंदका निघतोसें झालें. तिरिमिरी येऊन आतां मी खालीं पडतेसें मला वाटलें. शंकरमामंजींचें पाहणें व हसणें माझ्या डोळ्यांसमोरून जाईना. ते केव्हांच आपलीं माणसें गाडींत घालून चालते झाले. मी अशी वेड्यासारखी त्यांच्याकडे पाहात, डोळ्यांतून अश्रु गाळीत उभी होतें. लोक

आपल्याकडे पाहात असतील, ते काय म्हणतील, वगैरे कांहीं माझ्या ध्यानांत आलें नाहीं. दादा माझ्यापासून हात दीड हाताच्या अंतरावर असून अगदीं मुकाट्यानें उभा असेल असें मनांतदेखील आलें नाहीं. परंतु तोहि संतापानें लाल झाल्यासारखा दिसत असून अगदीं तटस्थ उभा राहिला होता. लोक आपल्याकडे पाहात असतील, आपल्या मनांत काय म्हणत असतील, वगैरे कांहीं विचार त्यालाहि झाला नसावा. लोक हसले तरी पतकरलें पण त्यानें त्या रागाच्या भरांत कांहीं केलें नाहीं. शंकरमामंजींच्या अंगावर तो चवताळून गेला नाहीं, हें फार चांगलें झालें असें कोण म्हणणार नाहीं? नाहीं तर स्टेशनवरच तमाशा झाला असता! मीं त्याच्याकडे रडत रडत पाहिलें व हलकेंच " दादा ! " असें म्हटलें. त्याबरोबर तो शुद्धीवर आल्यासारखा होऊन त्यानें गाडी केली, त्यांत दुर्गीला बसविलें, मला बसविलें व आपण बसतां बसतां म्हणतो, " यमूताई, मीं तुला सांगितलंना तूं त्यांच्याबरोबर निघूं नको म्हणून? हा दुष्ट असं कांहीं करील असं मला वाटलंच होतं. "

" दादा, तें सारं खरं. पण सासूबाईची काय स्थिति झाली आहे तो पाहिलीस ना? अशा स्थितींत मीं त्यांच्यापासून दूर राहावं असं तुला वाटतं का! मला तर असं वाटतं कीं, कांहीं झालं तरी आपण त्यांच्यापासून दूर राहूं नये. "

" बरं आतां त्याची इथं कशाला गाडींत वाटाघाट? " इतकें बोलून तें बोलणें तितकेंच थांबविलें. दुर्गीला जातां जातां तिच्या माहेरीं पोंचविलें. ती उतरल्याबरोबर माझ्या डोळयांतून पुन्हां अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. कोणत्या स्थितींत असतांना दुर्गीला नेलें आणि आतां कोणत्या स्थितींत आणून परत घातलें, या गोष्टी मनांत आल्याखेरीज राहिल्या काय?

घरीं आल्याबरोबर आपल्या दादाच्या खोलींत जाऊन बसेपर्यंत माझ्या मनाची काय अवस्था झाली, काय नाहीं हें आतां मला कांहीं लिहितां येत नाहीं. असल्या गोष्टी लिहून दाखविण्यापेक्षां ज्याला त्याला त्या मनानेंच समजणाऱ्या आहेत. मला पाहिल्याबरोबर आजीला काय वाटलें असेल? तिच्या मनांतून ताबडतोब येण्याचें असून माईसाहेबांनीं काय हेतूनें असेल तें असो, पण कसा मोडता घातला व तिनें मला सांगितल्याबरोबर माईसाहेबांच्या क्रूरतेबद्दल मला काय वाटलें वगैरे गोष्टी आतां मला मुळींदेखील वर्णन करून सांगतां येत नाहींत. माझी ही लेखणीच चालत नाहीं, त्याला मी काय करूं? माईसाहेबांच्या क्रूरतेबद्दल मला थोडेंसें आश्चर्य वाटलें म्हणून मीं म्हटलें. परंतु दादानें दागिन्यांची पुढें घडलेली हकीकत जेव्हां मला सांगितली, तेव्हां माझें आश्चर्य थोडेंसें कमीच झालें. आणि माझें त्याला गेलेलें एक पत्र त्यांच्याच हातीं लागून त्यांनीं तें फोडून वाचलें ही हकीकत कळतांच तें आश्चर्य अगदीं नाहींसें झालें.

" आहेत तिथें तिच्या सास्वा. त्यांनीं तिथें जाऊन दागदागिन्यांबद्दल भांडतच बसायचं कीं नाहीं? ती तिची आजेसासू आहे मोठी कठीण आणखी तो मामेसासराहि

मोठा तापट. भलतंन् सलतंच व्हायचं एखादं ! आणखी यांना तरी तें दुःख जाऊन कशाला पाह्यला पाहिजे ? आहे गणपतराव, आणील तिला !" असे शब्द माईसाहेबांनीं उच्चारले, असे जेव्हां त्यानें ऐकलें, तेव्हां त्याच्या अंगाचा अगदीं संताप झाला; परंतु तो नंतर एकीकडे मला म्हणतो, "बरं झालं एकाअर्थी ती नाहीं आली तें; कांहीं वावगं नाहीं झालं." अशा तऱ्हेनें एकंदरींत माझ्या परत येण्याची परवड झाली.

काळ सर्व गोष्टी सारख्या करतो म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. काळानें माझ्या मनांतलें दुःख अद्यापिहि जरी कांहीं कमी केलें नाहीं, तरी पण त्या वेळचा जो भर होता तो हळूहळू कमी होत चालला. पंधरा दिवस होऊन गेले. मला घराबाहेर पडायचं नाहीं, यामुळें सासूबाईची हालहवाल कांहींच कळेना. रोज मी दादाच्या पाठीस लागे कीं, "अरे, एकदा तरी तूं त्यांचा समाचार आणीव, त्या आहेत तोंपर्यंत मला त्यांच्याकडे गेलं पाहिजे. जुळलं तर त्यांच्याजवळ राह्यलं पाहिजे." पण तो तिकडे लक्षच देईना. शेवटीं एक दिवस मीं त्याला म्हटलें, "अरे, तूं जर उद्यां कांहीं त्यांचा समाचार आणला नाहींस, तर मग वाटेल तें मी करीन, आपण उठून चालती होईन" असा त्रागा केला, तेव्हां शेवटीं दुसरे दिवशीं त्यानें येऊन मला सांगितलें कीं, "त्यांचा भ्रम आहे तसाच असून त्यांना ताप लागला आहे." तीं अक्षरें ऐकण्याबरोबर माझें काळीच चर्र झालें आणि "आईला अंतर देऊं नको" हे शेवटले शब्द पुन्हां पुन्हां माझ्या कानाशीं घुमूं लागले. आतां आपण तेथें जाण्याला काय युक्ति करावी, कांहीं मला सुचेना. शंकरमामंजींनीं आपल्याला तेथें जातांना पाहिलें तर ते काय म्हणतील ? काय करतील ? असें वाटलें. दादाकडून धोंडूभावजींना बोलावून आणविलें. त्यांना विचारतां त्यांनीं असें सांगितलें कीं, आत्याबाईची प्रकृति बरीच बिघडली असून त्यांना समजत तर कांहींच नाहीं. तुझं व तिकडचं ( नांव घेऊन ) नांव नेहमीं घेत असतात; तुला एकदा आणावी म्हणून गोपाळ-मामंजींनीं सतरा वेळा गोष्ट काढली असेल, परंतु शंकरमामंजींनीं 'असला भ्रष्टाकार आमच्या घरांत नको' असें म्हणून त्रागा केला. असा मजकूर ऐकण्याबरोबर मला काय वाटलें आणि काय नाहीं ? वाटलें कीं एकदा त्यांच्या मनाप्रमाणें का होईना ! पण हा विचार मनांत येतांक्षणींच तिकडची मूर्ति तिरस्कारयुक्त मुद्रेनें आपणाकडे पाहात आहे असें वाटे व लागलीच हाहि विचार मनांत येई कीं, येवढें झालें म्हणजे शंकरमामंजी आपल्याला सुखानें राहूं देणार आहेत काय ? हा विचार तरी कशाला हवा ? असा प्रकार चालला होता. दादानें दोनतीनदा गोपाळमामंजींना भेटून त्यांच्याकडून गोष्ट काढली. ह्या अवस्थेंत आणखी पंधरा दिवस गेले. या इतक्या दिवसांच्या अवधींत एका गोष्टीचें स्मरण मला मुळींच नव्हतें. ती गोष्ट दादाला शेवटीं सांगितलेल्या दोन शब्दांची होय. दादा व मुंबईची मंडळी त्या खटपटींत होतीच. एके दिवशीं नानासाहेबांचें दादाला पत्र आलें, त्यांत त्यांनीं "पूर्वी ज्या कांहीं गोष्टी करावयाच्या त्या सर्व आपल्या सांगीप्रमाणें झाल्या. आतां रुपये आपले ताब्यांत घेण्यापर्यंत काम आलें आहे. सह्या वगैरेंचे कागद पाठविले आहेत. काय ती व्यवस्था

करावी. " ती गोष्ट त्या वेळीं काढली असतां मला फार दुःख होईल हें जाणून दादानें मला त्या खटपटीचें एक अवाक्षरसुद्धां कळू दिलें नाहीं. परंतु आतां माझ्यावांचून कांहीं झालें म्हणून व थोडेसे दिवस गेले आहेत, तेव्हां आतां बोलायला हरकत नाहीं असें वाटून त्यानें ते दिवशीं रात्रीं माझ्याजवळ गोष्ट काढली. त्याबरोबर मला असें रडूं आलें, कीं कांहीं सुमार नाहीं. वाटलें, कीं असले पैसे घेण्यापेक्षां जीव द्यावा कुठें तरी जाऊन ! दादानें तें लक्षण पाहण्याबरोबर ती गोष्ट सोडून दुसरेंच कांहीं काढून तें सर्व नितकेंच ठेविलें. दुसरे दिवशीं मीं होऊनच त्याला म्हटलें, कीं " कांहीं हरकत नाहीं. तूं आज गोपाळमामंजींकडे जा, आणखी त्यांना विचारून त्यांच्या अनुमतानं काय तें कर. सासूबाईंना वेगळं घेऊन राहण कांहीं आतां जमत नाहीं, तेव्हां असं तरी कर, कीं तें जें काय असेल तें गोपाळमामंजींच्या सल्ल्यानें करून त्यांच्या स्वाधीन कर. त्या आहेत तंवर मी आपल्या हातीं कांहीं तें घेणार नाहीं. " माझें बोलणें ऐकून त्यानें किती तऱ्हेनें माझी समजूत घालण्याचा यत्न केला म्हणतां ? पण मीं एक अवाक्षरदेखील त्याचें ऐकून घेतलें नाहीं. त्याला स्पष्ट सांगितलें कीं, " जन्मभर ज्यांनीं पालनपोषण केलं त्यांच्या स्वाधीन सगळ्या कांहीं गोष्टी झाल्या पाहिजेत. अन् जोंवर सासूबाई आहेत, तोंवर मी तर कांहीं तुझं ऐकायची नाहीं. " होय नाहीं करतां करतां मीं जेव्हां कांहीं ऐकत नाहीं असें पाहिलें, तेव्हां त्यानें गोपाळमामंजींकडे जाण्याचें कबूल केलें. गोपाळमामंजींना तो भेटला व त्यांचें आणखी त्याचें त्यासंबंधानें बोलणें झालें. हें बोलणें काय झालें, तें शंकरमामंजींना कळलें की काय, कांहींच समजलें नाहीं. धोंडूभावजींच्या सांगण्यांत असें आलें, कीं कळलें आणि पुढें ज्या गोष्टी झाल्या त्यावरून तें कळलें असावेंच असें मलाहि वाटलें. " आतां ती नाहीं ऐकत तर नाहीं, पण तिची तिच्या सासूच्या ठिकाणीं जर इतकी भक्ति आहे, आणखी सासूयू तिच्यासाठीं कितीकदा हांक मारते आहे, तर बोलवा तरी एकदा तिला, " असे उद्गार तेच दिवशीं कीं त्याच्या दुसरे दिवशीं त्यांच्या तोंडून निघाले. आणखी मला सासूला भेटण्यासाठीं येण्याचा निरोप आला. दोनचार दिवस झाल्यावर शंकरमामंजी स्वतः आले. आणखी बाबांना व दादाला भेटून त्यांनीं " तिला आतां पाठवीत जावं. सास्वासुनांचं चांगलं आहे. ती नेहमीं सुनेचं नांव घेऊन हांका मारीत असते तर पाठवावं तिला, " असें सांगण्यासाठीं व दादाशीं त्या रुपयांच्या संबंधानें कांहीं निरोप सांगण्यासाठीं म्हणून आले होते. पुढें दादाची व गोपाळमामंजींची गांठ पडली असतांना तसा कांहीं निरोप त्यांनीं पाठविलाच नव्हता, अशासारखें त्यांचें बोलणें निघालें. आणि तो निरोप जो त्यांनी सांगितला तो असाच कांहीं चमत्कारिक तऱ्हेचा वाटला, कीं तो कांहीं गोपाळमामंजींनीं पाठविलेला नसावा, अशी दादाला आधींच शंका आली होती. तथापि न जाणों असें वाटून त्यानें तो ऐकून घेतला एवढेंच. गोपाळमामंजींनीं स्पष्ट ' नाहीं ' असें म्हटलें नाहीं. आपण निरोप पाठविला होता, पण तो कांहीं त्यांना पक्का समजला नाहीं, असें तसें बोलून त्यांनीं सर्व पुढल्या

गोष्टी मुकाटयानें कराव्या. शंकरदादांना समजल्या नाहींत तर बरें, असें कांहीं सुचविलें व त्यांनीं असें ठरविलें कीं जे काय पैसे येतील, ते वाटलें, तर घ्यावे न वाटलें तर तसेच सांचू द्यावे. मीं त्यांत त्या वेळीं यत्किंचित्‌हि मन घातलें नाहीं. थोडेच दिवसांत सर्व व्यवस्था झाली. शंकरमामंजींना बरीक कांहीं कळलें नाहीं. ते दोन तीन दिवसांनीं दादाकडे येऊन गोड गोड बोलत आणि दादानेंहि त्यांना तसेंच नादीं लावलें व एका अर्थी तें बरें झालें.

◆ ◆ ◆

## ८५ : सासऱ्यां....

* * * * * * * * * * * * * * *

या नादापासून मलासुद्धां किती उपयोग झाला हें आतां सांगितलें म्हणजे पुरें आहे. त्याचा परिणाम पुढें काय झाला, हें कांहीं मीं आतांच्या आतां सांगितलें पाहिजे असें नाहीं. कारण तो माझ्या पुढल्या चरित्रांत—माझें चरित्र—(आतां माझें चरित्र म्हणजे नरकयातनांपेक्षांहि जास्त अशा यातना नव्हेत काय !)—येणारच आहे. ज्यांच्या कानीं अशा त्या भयंकर मृत्यूची वार्ता जावी, त्यांनीं—विशेषतः बायकांनीं —" बायको आहे की नाहीं टवळी ? ती कुठली मरायला ?" असें म्हणायचें आणि मग सुस्कारा टाकायचा. " अहो, पाप पाप तें कांहीं दूर का आहे ? हेंच पाप. कोणाच्या तोंडचा घांस मागल्या जन्मीं ओढला असेल, तो या जन्मीं देवानं ओढला " असलीं वाक्यें कानीं पडलीं म्हणजे माझ्या मनाचें काय बरें होत असेल ! आजपर्यंत माझ्या आयुष्यांत ज्या ज्या गोष्टी झाल्या, त्या सर्व आनंदाच्या झाल्या असल्यामुळें त्या सर्वांचें यथास्थित वर्णन मला देतां आलें. कित्येक दुःखाचे प्रसंगहि मीं सविस्तरपणें लिहिलेले मला दिसताहेत; परंतु आतां पुढें क्षणोक्षणीं एकाहून एक दुर्धर असे वाटणारे जे प्रसंग मजवर आले, त्यांचें वर्णन मी देऊं कसें ! जें जसें मला आठवेल तें आतां लिहीन एवढेंच. मग त्याचा पूर्वापर संबंध नीट आहे कीं नाहीं, आधीं सांगायची ती गोष्ट आधीं, मग सांगायची ती मग, अशा सांगितल्या जाताहेत कीं नाहीं, हें देखील आतां माझ्या ध्यानांत येईल कीं नाहीं कोणास कळे ?

शंकरमामंजींना तो रुपयांचा नाद लागल्यापासून, आतां मीं सांगितलेंच आहे, कीं मला एक मोठा उपयोग झाला. तो कोणता ? तर सासरीं जाण्याची परवानगी मिळाली हा होय. जे शंकरमामंजी मला दृष्टीसमोर नको म्हणून माझा तिटकारा करीत, त्याच शंकरमामंजींनीं घरीं येऊन बाबांजवळ व दादाजवळ " हिला पाठवा, तिची सासू आजारी आहे; दोघींचं प्रेम भारी आहे, तर आतां उगीच आपण कशाला ताडातोड करा ! आतां हें एक आपल्या चालीप्रमाणें फार गैर दिसतं, पण नाहीं तिच्या मनांत आज येत, येईल

उद्या वर्ष झालं म्हणजे. नाहीं तर काय आपल्यासारख्यांच्या थोड्यांच्या का घरांत आहेत गांवांत! पोटचा गोळा असला म्हणजे तें पाहावेल कसं?" अशा अर्थाचें बोलून त्यांनीं मला घरीं जाण्याची परवानगी दिली. पडत्या फळाची आज्ञा समजून मी लागलीच दादाला सांगून जाण्याची तजवीज केली. कारण सासूबाईंची प्रकृति दिवसानु- दिवस अधिकाधिक बिघडतच चालली होती; त्यांची प्रकृति अशी असावी, त्यांनीं भ्रमाच्या लहरींत आम्हांला दोघांना मोठमोठ्यानें हांका मारीत असावें, आणखी मी जिवंत असून त्यांच्याजवळदेखील असूं नये, यापरतें वाईट तें कोणतें? तेव्हां दुःखानें करपून गेलेल्या माझ्या अंतःकरणाला, त्यांतल्या त्यांत या परवानगीमुळें किंचित् समाधान वाटावें यांत आश्चर्य तें काय? दादाच्याजवळ मी हें सारें बोललें व सासरीं जाण्याविषयींची आपली उत्कंठा दाखविली. त्यानें संथपणानें तें सर्व ऐकून घेतलें व शेवटीं मला म्हणतो, "यमूताई, तूं सासरीं जा; पण तिथें राहण्याच्या भानगडींत पडूं नकोस. तूं रोज जात जा, आणखी संध्याकाळीं आपली परत येत जा; तुला तिथें फार त्रास होईल, हें तुला ठाऊक नाहीं का?"

"दादा, आतां जें झालं आहे याच्यापेक्षां कांहीं वाईट असेल का रे जगांत? मग मी आतां असल्या शुष्क त्रासाला कां बरें भिऊं? त्यांतून सासूबाईंची प्रकृति नीट असती तर मग कांहीं हरकत नव्हती; पण त्यांची प्रकृति अशी, आणखी मी जिवंत असून स्वस्थ कशी बसूं?"

"नाहीं. माझं तसं सांगणं नाहीं, पण मला आपलं असं वाटतं आहे, कीं तुझा फार छळ होईल तिथें, त्याचा आपला विचार कर इतकंच. आणखी कांहीं दिवस तरी निदान संध्याकाळची परत ये."

मी कांहींच बोललें नाहीं. ही वेळ विचार करण्याची नव्हे, हें जाणून आपली सासरीं एके दिवशीं तिन्हीसांजा गेलें. तेथें गेलें तों सर्व माणसें माझ्याकडे कितीतरी तिरस्कारानें पाहताहेत, असें मला वाटलें; पण मी त्याचा यत्किंचित्‌हि विचार न करतां तडक सासूबाईंच्या खोलींत गेलें. तेथें त्यांची स्थिति पाहून गहिंवर येऊन मी त्यांच्या पायथ्याशीं बसायला जातें, तों पलीकडे बसलेल्या आजेसासूबाई एकदम म्हणतात, "दूर, दूर! तिच्या पाण्याला विटाळ होईल." तें शब्द ऐकण्याबरोबर, सासूबाईंना पाहिल्याबरोबर आलेला हुंदका जो मीं मोठ्या कष्टानें दाबून धरला होता, तो एकदम बाहेर पडला, आणखी मी ओक्साबोक्शीं रडूं लागलें. त्याबरोबर आजेसासूबाई कांहीं बोलल्या नाहींत. मला वाटतें तें माझें दुःख पाहून त्यांच्याहि हृदयाला द्रव फुटला असेल! पण मला दुःखावर डागण्या देणारी मंडळी कांहीं थोडी होती!! वनूवन्सं तेथें होत्या, त्या जणू काय मला काय बोलून गांजावें या विचारांत होत्या अशा दिसल्या. त्यांनीं माझें रडणें ऐकून एकदम, "हें ग काय बाई? आमच्या भरल्यासरल्या घरांत एकदम तिन्हीसांजा अशी अवदसेसारखी रडतेस काय?" असा उद्गार काढला. हा उद्गार म्हणजे त्या वेळीं तापलेल्या डागणीनें माझ्या हृदयावर चरचर चटके दिल्या-

प्रमाणेंच मला झाला. त्यामुळें ते सर्व शब्द कसे स्पष्ट दिसताहेत ! त्या बोलल्या तेवढ्यानेंच संपलें नाहीं तर " तुझं कपाळ फुटलं म्हणून आमच्या घरांत कां त्रास ? " हे शब्द मागोमाग आल्यानें माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पनाच करावी. आतां जाऊन कुठेंतरी जीव द्यावा असें वाटलें; परंतु जीव म्हणजे कांहीं कीडामुंगी नव्हे, तर तिला चिरडून टाकलें कीं संपलें. असो.

पहिल्या प्रथम सासरीं जाण्याबरोबर ही संभावना झालेली पाहिली तेव्हां पुढें आपली स्थिति कशी काय होणार हें मला चांगलेंच दिसून आलें. तथापि कांहीं जरी झालें तरी डोळ्यांवर कातडें ओढून आणखी मन घट्ट करून आपण आपल्या सासूबाईसाठीं येथें राहायचें, हा माझा कृतनिश्चय. तेव्हां त्याच्या आड कोण येणार होतें ! मीं आपली तश्शी येऊन त्यांच्या पायथ्याशीं बसेन आणखी त्यांना निदान दृष्टीनें पाहीन तरी, असें मनांत धरून मी नित्य यायला लागलें. पण त्या एकंदर दुःखांत थोडथाशा समाधानाची गोष्ट इतकीच होती, कीं शंकरमामंजी मला फारसा त्रास देत नसत. जें काय ते बोलत ते " लोकं हसतात, काय करावं ? पण हिच्या अजून मनांत येत नाहीं; आतां त्यांची काय शोभा ? हलकें हलकें तिचं मन वळेल तेव्हां खरं " एवढेंच. बाकी मामेसासूबाई, आजेसासूबाई, बनूवन्सं वगैरे यच्चयावत् मंडळी, क्षणोक्षणीं, " अमुक करूं नको, तमुक करूं नको, अमक्याला हात लावूं नको, तमक्याला शिवूं नको, " असें म्हणून माझी अवहेलना करीत असत. एके दिवशीं सासूबाईच्याजवळ कोणी नव्हतें; मी एकटीच बसलें होतें. इतक्यांत त्या उशाकडे पाण्यासाठीं चाचपूं लागल्या म्हणून मीं " काय हवं ? " असें विचारलें, तों त्यांनीं " पाणी " असा शब्द उच्चारला; त्याबरोबर मला भान न राहून मीं पटकन् त्यांच्या तांब्यांतलें पाणी फुलपात्रांत ओतून त्यांच्या तोंडाशीं नेलें. मीं तसें करायला आणखी घरांतून बनूवन्सं यायला एकच गांठ! मग काय विचारतां ? त्यांनीं मीं सासूबाईना पाणी पाजल्याबद्दल एकच गहजब करून आजेसासूबाईना आणलें ! आणखी मग त्यांच्या तोंडाला काय विचारतां ? नाहीं नाहीं तसले शब्द उच्चारून त्यांनीं माझी विटंबना केली. ते शब्द लिहूंदेखील नयेत तरी पण आतां ते शब्द लिहितेंच— " डोक्यावर ठेवलेल्या त्या भाऱ्याचं एकदा कर काय तें, तेव्हां मग आमच्या घरांत कारभार कर. अवदसेनं जसा जसा कांहीं उच्छाद मांडला होतान्. पुरे झाले मुंबईस हिचे भंडवडे केलेत तेवढे, आणखी इथें नकोत व्हायला. समजलांत ? तिचं काय व्हायचं असेल तें नीटपणीं होऊं द्या. येतेस कशाला तूं इथें ! मोठी सासूच्या पढपानं जातेस ती ! आतां करायचंय् काय तुला ! सासू मेली कायन् जगली काय ? जा. त्या ह्याचं एकदा निसंतान कर, अन् मग ये. "—नाहीं, आतां मला पुढले शब्द लिहवत नाहींत. तें सर्व मीं मुकाटयानें ऐकून घेतलें. आपल्या आपल्याशीं किती वेळ तरी रडलें. परंतु दादाच्या कानावर एक लवमात्र देखील जाऊं दिलें नाहीं. त्यानें विचारलें, म्हणजे तेवढ्यापुरतें त्याला " कांहीं नाहीं, बरं आहे " असें सांगून एकीकडे जाऊन रडत बसावें असें चाललें होतें. रडत बसण्याची देखील चोरी !

सासरीं असा प्रकार होता. माहेरीं त्याच्या तितका जरी अजून झाला नव्हता तरी पण माईसाहेब हळूहळू मधून मधून एखादा दुसरा शब्द बोलतच, तरी पण आजीचा थोडासा वचक असे पण माझ्या दुर्दैवानें तो तरी कसा फार दिवस राहील ? बुडत्याचा पाय खोलांत म्हणतात, त्याचप्रमाणें एकदा तें भयंकर संकट आल्यानंतर आतां एका-मागून एक संकटें येऊंच लागलीं. माहेरीं ज्या मायेच्या माणसाचा मला उपयोग व्हायचा ती माझी आजीच एकाएकीं कां जावी ? दुखणें नाहीं, बाणें नाहीं, आज चांगली, आणखी उद्यां नाहींशी झाली. सकाळीं अंग धुऊन आपली पूजाबिजा करते काय ? उपास होता म्हणून चार शेंगाबिंगा खाते काय ? आणखी रात्रीं जुलाब उलट्या व्हायला लागून सकाळला मरते काय ? तेव्हां नारायणाच्या मनांतून माझ्यावर दुःखावर दुःखें आणायचीं, यापेक्षां पलीकडे काय असणार ! करता करविता तोच ! त्याच्या इच्छेला येईल, त्याप्रमाणेंच तो आम्हांला ठेवणार ? मर्जी त्याची ! मरतां मरतां म्हातारी रडत मला म्हणते, " यमे, हीच जर चार महिने आधीं मेलें असतें, तर हें तुझं दुःख तरी पाहण्याचं माझ्या नशिबीं आलं नसतं. पण तसं कुठलं व्हायला ?" हे तिचे शब्द ऐकण्याबरोबर मला काय बरें वाटलें असेल ? "त्यांच्यावाटची मी मेलें असतें तर !" असे उद्गार तर तिनें तेव्हांपासून एक लक्षदा काढले असतील ! असो.

आजी मेली, हें मला फार वाईट झालें. परंतु तिच्या दृष्टीनें पाहतां योग्यच झालें. असती तर आम्हांला हवीच होती, दादाचा संसार तिनें पाहिला असता; परंतु त्याच्या-बरोबर किती दुःखें, आणि किती काळज्या तिला भोगाव्या लागल्या याचा कांहीं सुमारच नव्हता.

आजी वारल्यानंतर मग काय विचारतां ? घरांत सगळा माईसाहेबांचा कारभार झाला. दादा अतिशय त्रासला. त्याच्या मनांतून बाहेरगांवीं जाऊन राहण्याचें फार. परंतु मीं कांहीं केल्या हलेना, हं जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां अर्थातच येथल्या येथेंच राहण्याचा बेत त्यानें केला, सासूबाई जर आजारी आहेत, तर मी बाहेरगांवीं कशी येऊं ? मला इथें राहिलेंच पाहिजे, असें माझें म्हणणें आणखी तेंहि त्याला कांहीं अशीं सयुक्तिक वाटलें. माझ्यापासून सासूबाईंना यत्किंचित् देखील फायदा नव्हता. मला त्यांची चाकरी करूं देत नसत, मला नुसत्या स्वस्थपणें त्यांच्याजवळ बसूंदेखील देत नसत, इतकी स्थिति होती, तरी मी आपली रोज जाऊन त्यांच्यापाशीं बसेंच. अशी माझी एकनिष्ठा पाहून, प्रत्यक्ष दगडालादेखील द्रव आला असता, पण त्या सासरच्या कठोर हृदयाच्या माणसांना कांहीं आला नाहीं. तेथें माझा कैवार घेणारीं माणसें काय तीं दोन ! एक धाकटे मामंजी आणखी दुसरे धोंडूभावजी. गोपाळमामंजी बिचारे घरीं किती असणार आणखी काय करणार ? कधींमधीं त्यांच्या नजरेस कांहीं गोष्टी आल्या किंवा कांहीं शब्द त्यांच्या कानीं पडले म्हणजे त्यांनीं आपल्या-कडून होईल तितकें त्यांना समजावून सांगावें, परंतु त्यांचें ऐकतो कोण ? तितक्यापुरतें तितकें फार झालें तर हो हो करीत. पुनः आपलें त्यांचें आहे तें

आहेच. ही गोपाळमामंजीची स्थिति, तर धोंडूभावजींनी काय असेल ? तरी पण ते आडमुठे असल्याकारणानें वेळ आली, कीं आजीला काय आणखी कोणाला काय, हवें तसें बोलत. आजेसासूबाईच्या तोंडाला तोंड देत नाहीं नाहीं तें बोलत आणि एखादे वेळीं माझ्यावरूनच असें नाहीं पण कांहीं कांहीं कारणांवरून बापाची व त्यांचीहि खडाजंगी उडे. बनूवन्संचें आणखी त्यांचें तर नुसतें खडाष्टकच बनून राहिलें होतें, येतां जातां त्यांनीं तिला शिव्या द्याव्या, नाहींतर नवऱ्याविषयीं कांहींतरी कुचकट बोलून छळावें, असें चालत असे. पण तीं दोघें एकमेकाला फार चांगलीं होतीं, एखादे वेळीं सासूबाईच्या उशापाशीं बसून एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत, अगर एकमेकांना शिव्या देत बसत. अशा वेळीं मग कोणत्याहि तऱ्हेचा त्यांस सुमार नसे. अशी एकंदर स्थिति होती. माहेरीं ती अवस्था. सासरीं ही. तथापि तितकेंहि करून मी सासूबाईच्याकडे पाहून दिवस कंठीत होतें. परमेश्वराच्या मनांतून माझी पुरतीच परीक्षा पाहावी असें होतें असें दिसलें. दादानें त्या रुपयांच्यासंबंधानें शंकरमामंजींस जें नादीं लावलें होतें तो त्यांचा नाद किती दिवस टिकणार ? खरी काय व्यवस्था झाली ती त्यांना कळतांच त्यांचें एकंदर वर्तन उलटणार हें मी जाणून होतेंच आणि त्याप्रमाणें पुढें झालेंच. कसें आणि काय ते मला कांहीच कळलें नाहीं; परंतु ज्या रुपयांबद्दल आपण इतके दिवस नादीं लागलों आहोंत, ते रुपये आतां आपले हातीं येत नाहींत असें त्यांना समजल्याबरोबर, स्वारींनीं उलटून माझ्या छळाला सुरुवात केलीच. मग रोज वाईट बोलण्याखेरीज दुसरें कांहीं नाहीं. जेथें तेथें ज्या त्या गोष्टीसंबंधानें त्रास होऊं लागला. घरीं पाऊल टाकण्याचें बंद होईल कीं काय अशी भीति वाटूं लागली. सासूबाईच्या दुखण्याचें आणि वेडाचें तर पाऊल पुढेंच पडतें आहेसें दिसत होतें. या स्थितींत आतां एकदा मामंजींच्या आणखी दुसऱ्या माणसांच्या म्हणण्याप्रमाणें का होईना ? आतां कशाहि अवस्थेंत असल्यानें काय होणार आहे ? असें निराशेचे व दुःखाचे विचारहि मनांत येत व त्याप्रमाणें केव्हां केव्हां माझे उद्गार निघत. अशा मोठ्या विवंचनेंत मी असतां एके दिवशीं लक्ष्मीबाई व यशोदाबाई यांचें पुढील पत्र मला आलें :—

"वि० वि० आपण येथून गेल्यापासून किती दिवस तरी आपल्याला एक सविस्तर पत्र लिहून आपलाहि सविस्तर समाचार कळावा अशाबद्दल बेत चालले होते; परंतु लेखणी, दऊत, कागद हातीं घेऊन बसल्याबरोबर ल्याहावें काय ? असा चमत्कारिक प्रश्न डोळ्यापुढें येऊन उभा राही व मन गोंधळून जाऊन पुनः कागद वगैरे पलीकडे सारावे लागत. यापूर्वी आपल्याला दोन तीन पत्रें लिहिलीं, परंतु एकाचेंदेखील उत्तर नाहीं. असें कां ? दिवसानुदिवस आपण अधिकाधिक अशक्त व जिवाला कंटाळून चाललां आहां, सासरच्या माणसांच्या त्रासानें नाहीं नाहीं ते विचार आपल्या मनांत येत चालले आहेत, असें परवांच गणपतरावदादांचें पत्र आलें त्यावरून समजतें. असें कां व्हावें ? जी गोष्ट झाली, ती आतां कधींतरी परत येणार आहे का ? आपण कितीहि आक्रोश केला, आपल्या जिवाचा कितीहि कंटाळा केला, तरी त्यापासून आपल्या

स्वतःला त्रास व दुःख यांखेरीज कांहींतरी लाभ आहे काय ? ज्यांच्या जाण्यामुळें आपण असें करतां, त्यांना त्यापासून कांहींतरी बरें वाटणार आहे ? उलट स्वर्गांतून त्यांच्या दृष्टीस जर हें तुमचें चरित्र पडलें, तर ते तुम्हांला काय म्हणतील ? याचा विचार कां बरें करीत नाहीं ? ते जिवंत असतांना तुम्हांला अशा हालअपेष्टांत ठेवते का ? तुम्हांला आपल्या जिवाला कंटाळूं देते का ? अशा तऱ्हेनें तुम्ही आपल्या शरीराची हेळसांड करतां आहां, हें पाहून त्यांना काय वाटलें असतें ? आपण सर्व एका ठिकाणीं बसून नाना तऱ्हेच्या गोष्टी बोलत असूं, त्या वेळीं तुमच्यासारख्या दीन स्थितींत असणाऱ्या बायकांची गोष्ट निघाली म्हणजे त्यांना किती वाईट वाटत असे व त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं कोणीं काय काय केलें पाहिजे, कीं आपण काय करूं इत्यादि गोष्टींविषयीं ते काय बोलत, त्याचें स्मरण या दुःखावेगांत तुम्हांला अगदींच नाहींसें झालें काय ? ज्यांचें आपल्या ठिकाणीं इतकें प्रेम, त्यांच्या इच्छांचें अशा तऱ्हेनें विस्मरण व्हावें हें बरें काय ? आम्हीं या सर्व गोष्टी आपल्याला ल्याहाव्या असें नाहीं. परंतु आपण दिवसानुदिवस अत्यंत क्षीण होत चालला आहां, शरीराची बिलकुल काळजी घेत नाहीं, गणपतरावदादा सांगतात तिकडे लक्ष देत नाहीं, असें कळल्यामुळें लिहिल्यावांचून राहवत नाहीं. शंकरमामंजी व इतर मंडळी हीं किती आपला छळ करीत असतील आणखी किती नाहीं, याची कल्पना आम्हांला फार चांगली होत आहे. मारणाराचा हात धरवेल, परंतु बोलणाराचें तोंड धरतां येत नाहीं; तरी पण अति झालें म्हणजे तिकडे दुर्लक्ष करण्यापलीकडे दुसरा उपाय काय ? आपल्या तिकडचा नेहमीं उपदेश काय असे कीं अशा माणसांकडे नेहमीं दुर्लक्ष करावें. त्याप्रमाणें तुम्हीं कां बरें करूं नये ? तुमची खरी स्थिति काय आहे ही वस्तुतः आम्हांला ठाऊक नाहीं. दादांचें म्हणणें कीं तुम्हीं पहिल्याप्रमाणें मन मोकळें करून त्यांच्याशीं बोलत नाहीं. मग आम्हांला सर्व गोष्टी समजाव्या तरी कशा ? आणि आपल्याला कांहीं उपाय सुचवावासा वाटला तर सुचवावा तरी कसा ? तर इकडे पाहा, असें करूं नका. तुम्हांला ही दीन दशा आली आहे खरी, परंतु त्या स्थितींतहि आपल्यासारख्याच स्थितींत असणाऱ्या बहिणींची स्थिति सुधारण्याचें मनांत आणल्यास आपल्या हातून मुळींच कांहीं होणार नाहीं असें नाहीं. आजच कोणतीहि गोष्ट करण्याला लागलें पाहिजे असें नाहीं. तुम्ही आम्ही जी शाळा म्हणत होतों ती लांबच राहिली, परंतु.........पण नको. या गोष्टी पुढल्या आहेत. आधीं तुम्ही आपली काय हकीकत आहे ती सविस्तरपणीं लिहून पाठवा पाहूं. आम्ही दोघी अगदीं चातकासारख्या वाट पाहात बसतों. सर्व दुःख, सर्व विवंचना अगदीं एकीकडे सारून मन घट्ट करून आधीं दऊत, लेखणी, कागद घेऊन व मन मोकळें करून जी काय तुमची हकीकत असेल ती ल्याहा. बिलकुल अनमान करूं नका. जर आम्ही दोघी तुमच्या खऱ्या मैत्रिणी असूं तर आतां ल्याहाल. जर तुमचें पांच सहा दिवसांच्या आंत पत्र आलें नाहीं तर पाहा, आमच्या दोघींपैकीं कोणी एकजण येऊन तुमच्या पाठीमागें राहील. आमचा अगदीं कृतनिश्चय झाला आहे."

असें तें माझ्या मैत्रिणींचें पत्र मीं कितीदा वांचलें असेल, याचा कांहीं नेमच

नाहीं. दुसऱ्या कोणीं तें पत्र वाचलें, तर त्याला त्यांत कांहींदेखील वाटायचें नाहीं, परंतु मला तें पत्र काय वाटलें आणि काय नाहीं याचें वर्णन करतां येत नाहीं. दादा माझी काळजी किती घेत असे, त्याला माझ्याविषयीं किती प्रेम असे, इत्यादि गोष्टी मी जाणून नव्हतें असें नाहीं; परंतु मीं जरा हट्टानें गोष्ट सांगितली, कीं तोंड अगदीं वाईट करून "बरं तर" असें म्हणे आणि तितक्यावरच सोडी. माझ्या मनाला कोणत्याहि तऱ्हेनें अणुमात्र धक्का बसूं नये अशाबद्दल त्याची किती काळजी ! या माझ्याबद्दल त्याच्या मनांतील काळजीमुळेंच तो, त्याला माझें एखादें बोलणें आवडलें नाहीं तरी कांहीं न बोलतां मुकाट्यानें ऐकून घेई. होतां होतां आपल्यापेक्षां निराळ्या माणसांकडून कांहीं झाल्यास करून पाहावे, असें मनांत येऊनच काय, त्यानें फार चमत्कारिक व इत्थंभूत हकीकतीचें पत्र त्या दोघींस लिहिलें असावें असें दिसलें. तें पत्र वाचल्याबरोबर "जगांतलीं सारींच माणसें कांहीं आपल्याविरुद्ध उठलीं नाहींत, आपल्यावर ज्यांचें अतोनात प्रेम आहे अशीं कांहीं माणसें तरी अजून आहेत" असें वाटूनच काय, कांहीं प्रेम, कांहीं गेल्या गोष्टींच्या आठवणी डोळ्यांसमोर येऊन होणारें दुःख, इत्यादि विकारांचें अतोनात प्राबल्य होऊन इतकें कांहीं रडूं कोसळलें, कीं कांहीं हद्द ? दोन चार घटका जेव्हां स्वस्थ एकीकडे बसून रडलें, तेव्हां मन थोडेंसें हलकें होऊन बराच विचार मनांत आला आणि मीं त्याचें उत्तर लिहिण्याचा निश्चय केला.

परंतु ल्याहायला बसल्यावर लिहूं काय ? असें होऊन मन कितीतरी गोंधळून गेलें ! कितीतरी गोष्टी माझ्या मनांत उभ्या राहिल्या ! या आतां सगळ्या त्यांना सांगूं कशा ? शिवाय जर खरोखर सविस्तर हकीकत लिहीन, तर दादानें ते पत्र पाहिल्यास त्याला काय वाटेल ? माझ्या मनांतून पत्र तर सविस्तरपणें ल्याहावें असें होतें. कारण मनांत फार सांठलें म्हणजे कोठेंतरी दुसरे ठिकाणीं ओकून हें टाकलेंच पाहिजे, त्याखेरीज स्वस्थता वाटायची नाहीं. त्यांतून यशोदाबाई, लक्ष्मीबाई यांच्यासारख्या मैत्रिणींचें पत्र आलेलें, मग काय विचारतां ? कित्येक गोष्टी त्यांत मला अशा ल्याहाव्या लागल्या असत्या, कीं त्या दादाला कळतां कामा नयेतच. नाहीं तर तो डोक्यांत राख घालायला उठायचा. इतका सर्व विचार करून मीं पत्र तर लिहिलेंच. त्यांत मजकूर कसकसा लिहिला होता, काय काय लिहिला होता, वगैरे आतां मला कांहीं आठवत नाहीं. होती सारी कर्मकथाच. घरीं कसा त्रास होतो, माईसाहेब कशा वागतात, कसें बोलतात, वहिनीबाईचें बोलणें काय असतें, त्यांच्या स्वभावांत काय फरक झाला होता, शंकरमामंजी काय बोलले, आजेसासूबाई काय बोलल्या, बनूवन्सं कशा आहेत, त्यांचें बोलणें काय असतें—एक ना दोन—एकदा ल्याहायला लागलें, आणखी मन अतोनात लादलेलें, मग काय ? एकसारखी त्या मंडळींची बोलणीं, आणखी करणीं मला आठवत होतीं, तितकीं सगळीं लिहून काढलीं, आणखी इतकें सगळें झाल्यावर मग सासूबाईंच्या प्रकृतीविषयीं लिहून शेवटीं "तुम्हीं म्हणतां त्या सर्व गोष्टी खऱ्या, माझ्यासारखीनें असें करूं नये, कांहींतरी परोपकाराचें कृत्य आरंभावें, फुकट शिकवायला तरी जावें, कोणाला

कांहीं थोडीबहुत गरज असली तर आपल्या हातून होईल तितकें करून ती दूर करावी, हा मार्ग मलाहि दिसतो आहे. ज्यांनीं मला थोडेंबहुत शहाणे केलें, इतकेंच नव्हे तर, साधारणतः दारिद्र्याच्या तडाक्यांत सांपडूं नये अशीहि तजवीज करून ठेविली, परमेश्वराच्या कृपेनें दादासारखा भाऊ मिळाला आहे, परंतु...परंतु सासूबाईंना अशा स्थितींत सोडून मीं दूर जावें, असें मला वाटत नाहीं. आणखी पुण्यांतल्या पुण्यांत राहून जर कांहीं असें करण्याला लागेन, तर शंकरमामंजी क्षणभरसुद्धां चैन पडूं द्यायचे नाहींत; तेव्हां सासूबाई चांगल्या बऱ्या होईपर्यंत कांहीं त्या गोष्टींचा विचार करतां येत नाहीं. माझ्या प्रकृतीविषयीं म्हणाल तर तें आतां असेंच चालायचें. त्यांत ती काय सुधारणा व्हायची आहे ? आणखी सुधारणा होऊन तरी काय अगदीं तटलें आहे ? तुम्ही कोणी यायला नको, आणखी जायला नको. हें पत्र मीं दादाला दाखविलें नाहीं. आणखी तें त्याच्या दृष्टीस पडावें किंवा त्याला त्यांतल्या गोष्टी कळाव्या, असें मला वाटत नाहीं. तेव्हां माझें तुम्हांला निक्षून एवढेंच सांगणें आहे, कीं तुम्ही जर माझ्या खऱ्या मैत्रिणी आहांत तर हें पत्र वाचतांच फाडून टाका. एकदा वाचा, दोनदा वाचा, पण त्याच्या पलीकडे तें पत्र ठेवूं नका. जर मीं असें ऐकिलें, कीं तें पत्र तुम्हीं फाडलें नाहीं, तर मला मुळी पत्र लिहिल्याबद्दल कितीतरी वाईट वाटेल म्हणतां, कीं कांहीं पुसायला नको. माईसाहेबांच्या विशेषतः वहिनीच्या वर्तनाबद्दल आणखी बोलण्याबद्दल जें लिहिलें आहे, तें तर मी प्राणान्तीं देखील त्याच्या कानांवर जाऊं देणार नाहीं. अति झालें, कोठेंतरी उमदळून पडलेंच पाहिजे, अशा मनाच्या स्थितींत मी होतें, तितक्यांत आपलें दोघींचें पत्र आलें आणखी मग कांहीं राहवेना. तेव्हां जें जें म्हणून कांहीं मनांत आलें तेवढें सारें लिहिलें; इतकें लिहिलें आहे, यावरून सर्व कारण आपल्या ध्यानांत येईलच. '' अशा अर्थाचा मजकूर त्या पत्राच्या शेवटीं होता, हें मला अगदीं पक्कें आठवतें. आणखी पुढे मी कित्येक गोष्टी लिहिणार होतें, इतक्यांत सासऱ्यांहून धोंडू-भावजी येऊन त्यांनीं मला आत्याबाईची ( माझ्या सासूबाईंची ) प्रकृति थोडीशी जास्त बिघडली आहे असें व त्याच्याबरोबर आपल्या दुसऱ्या आईला—आतां मी त्यांचे शब्द कसे लिहूं ?—तें कांहीं नाहीं—आमच्या दुसऱ्या उमासासूबाई वयांत आल्याची बातमीहि त्यांनीं मला सांगितली. त्यामुळें मला ताबडतोब तें पत्र पुरें करून जावें लागलें. मला वाटतें, मी अशा कारणानें हें पत्र आतां येथेंच पुरें करून सासरीं जातें, असें लिहिलेंहि असेल. कांहीं आतां आठवत नाहीं.

मला सासरीं बोलावलें नाहीं कोणींच. परंतु धोंडूभावजींच्या सांगण्यांत जेव्हां सासूबाईंच्या प्रकृतीबद्दल असा प्रकार आला, तेव्हां मी होऊन चालती झालें. तेथें गेलें तों पालखीबिलखीची तयारी चालली होती. आणि आजेसासूबाईंच्या जिवाची मोठी धांदल उडाली होती. मला पाहण्याबरोबर त्यांच्या कपाळाला अशा आंठया चढल्या आणखी अशी शिव्यांना सुरुवात झाली, कीं कांहीं बोलायची सोय नाहीं. कां ? तर असल्या मंगल कार्याच्या वेळीं ही अवदसा घरांत आली कां ? अशा तऱ्हेची पुष्पांजलि झाल्यावर मला

रडायला आलें, तर त्यांत नवल काय ? परंतु रडायला आल्याबरोबर तर दुप्पट शिव्यांची वृष्टि सुरू झाली. वेळ ना वारीं, घरांत मंगल कार्य चाललें असतांना मी अशा तऱ्हेनें रडूं लागलें म्हणजे आहे तरी काय ? पण मी कशाला बोलतें आहे ? मी मागें-पुढें न पाहतां तडक सासूबाईंच्या अंथरुणापाशीं जाऊनच बसलें. ते दिवशीं सासूबाईंची प्रकृति रोजच्या-पेक्षां खरोच जास्त बिघडली होती; आणि मंडळी तर तिकडे मंगल कार्यांत गुंतलेली, तेव्हां त्यांच्याकडे विशेष कोण येतें ? मीच त्यांची चाकरी करण्यासाठीं बसलें, आणखी चार दिवस मला त्याप्रमाणें चाकरी करायला सांपडलेंहि. त्या चार दिवसांत त्यांना परसाकडला फार उपद्रव झाला, व ती सेवा आतां कोणाला होईलसें वाटेना; तेव्हां मला हिडीसफिडीस न करतां, त्यांची सेवाचाकरी करूं देण्याचें ठरविलेंसें दिसलें. आतां कोणी मंडळी जवळसुद्धां बसेनात. आजेसासूबाई काय येत तेवढया; अशी स्थिति असल्यामुळें, मला त्यांच्यापासून हलावेंसुद्धां वाटेना. आज इतके दिवस धीरानें सर्वांच्या शिव्या सोसल्या, त्याच्याबद्दल आपल्याला हें फळ मिळालें कीं, सासूबाईंची सेवा करायला मिळाली, असें त्या वेळीं मला वाटलें. चार दिवसांत मग मी माहेरींदेखील गेलें नाहीं. दादा पहिले दिवशीं रात्रीं मला बोलवायला आला, ' परंतु सासूबाईंची अशी स्थिति आहे, मी आतां येत नाहीं, ' असें मीं सांगितलें. त्या चार दिवसांत मी तेथें असल्या-कारणानें शंकरमामंजींचे सर्व चार, त्यांनीं ओटीभिटी भरण्यासंबंधानें सगळे सोहाळे करून घेतले, वगैरे सर्व प्रकार पाहून माझ्या अंगावर कांटा उभा राहिला. असो. सातवे आठवे दिवशीं सासूबाईंना जरासें बरें वाटलें. आणखी दादाहि मला फार आग्रह करून बोला-वण्यासाठीं आला, तेव्हां " जा. तुला सासूची थोडीच आस्था आहे ? मरेना का ती इकडे ! रांडेच्यांनो ! तिचं इकडे कोण हें ? आणखी तूं आपली खुशाल माहेरीं जाऊं म्हणतेस काय ? जा. असली तुला आस्था तर ये संध्याकाळीं. " असे आजेसासूबाईंचे उद्गार. असे उद्गार निघाल्यावर मी कशी जाईन ? गेलें नाहींच. तेथून पुढें पांच कीं सहा दिवसांनीं उमासासूबाईंचें गर्भाधान होतें, त्याच्याकरितां तयाऱ्या चालल्याच होत्या. ते दिवशीं मी गेलें नाहीं, यामुळें दादाला फारच वाईट वाटलें, पण मी गेलें नाहींच. दुसरे दिवशीं काय झालें असेल तें असो, माझ्यासंबंधानें कांहीं कुजबूज चालली असावी असें वाटलें. ती काय असावी, कांहीं ध्यानांत येईना. परंतु मामंजींच्या तोंडून मीं एवढे शब्द ओझरते ऐकले, " काय तिची कटकट आहे, तिला घालवून तरी या चार दिवस माहेरीं. तो बाबदेवभट सांगत होता, कीं ज्याला विचारावं तो म्हणतो ' मी नाहीं यायचा. मला दुसरं आमंत्रण आहे '..." पुढचे शब्द कांहीं माझ्या कानीं पडले नाहींत. लागलीच संध्याकाळीं माहेरीं जाण्याविषयीं मला हुकूमहि झाला. तो इतका सक्त, कीं गर्भाधान होऊन जाईपर्यंत--किंबहुना आतां मुळींच--इकडे येऊं नये. सासूबाईंची प्रकृति बरी होती. आणखी ते गर्भाधानाचे सुखसोहाळे पाहण्याचें आपल्या नशिबीं न आलें तर फार चांगलें असें मला वाटतच होतें, त्याप्रमाणें झालें असें पाहून माझ्या मनाला एक प्रकारें बरें वाटलें आणि मी माहेरीं गेलें.

◆ ◆ ◆

## ८६ : शेवटीं ! ! !

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मी माहेरीं गेलें ते दिवशीं दादाचा चेहरा फारच म्लान दिसत होता. म्हणून त्याला लागलीच विचारलें तरी तो कांहीं बोलेना. तेव्हां ती वेळ तशीच जाऊं देऊन पुनः गोष्ट काढीन असें म्हणून मीं तेवढेंच ठेवलें. आमचीं संध्याकाळचीं जेवणींखाणीं झाल्यानंतर मीं त्याच्या खोलींत जाऊन त्याला पुनः एकदा तोच प्रश्न केला. तरीहि तो कांहीं बोलेना. मीं पुनः विचारलें तरी तीच स्थिति ! शेवटीं मीं चिडून त्याला म्हटलें, "दादा, तूं असं कां करतोस ? मी तीनतीनदा तुला विचारतें, आणखी तूं कांहींच बोलेनास, असें कां ? " हे शब्द मीं उच्चारले ते इतक्या काकळुतवाणीनें कीं त्याचें त्याला आतां राहवेना. एकदम तो गहिंवरून मला म्हणतो, " यमूताई, माझ्या नशिबीं यत्किंचित् देखील सुख नाहीं असं आपलं मला वाटायला लागलं आहे. चार महिन्यांपूर्वीं मी कोणत्या आशा करीत होतों, कसले बेत करीत होतों, आणखी आज...आज .." पुढें त्याच्यानं एक अक्षरसुद्धां उच्चारवेना आणि अशी त्याची स्थिति झालेली प्रत्यक्ष पाहून माझें काय बरें झालें असेल ? मला काय आठवणी झाल्या ? किती गोष्टी दृष्टीसमोर दिसूं लागल्या ? मी त्याच्या गळ्याला मिठी मारून एकसारखी ओक्साबोक्शीं रडूं लागलें, दुसरे करणार काय ? याप्रमाणें दुःखाचा आवेग जरा कमी झाल्याबरोबर दोघेहि एकमेकांकडे पाहात राहिलों. कोणीच बोलेना. बराच वेळ अशा तऱ्हेनें गेल्यानंतर तो हलकेंच मला म्हणतो, " मी आतां ज्या आठवणी काढल्या त्याचं मला कांहींच वाटत नाहीं; पण यमूताई, याच्याहिपेक्षां कांहींतरी चमत्कारिक प्र—..." परंतु मध्येंच त्यानें जीभ चावली व लागलीच मला म्हणतो, " तें कांहीं असो, पण तुझ्या सासूचं कसं काय ? " मी त्याला कांहीं उत्तर देणार तों बाहेर कोणी कुजबुजल्यासारखा आवाज ऐकूं आला. दादालाहि कोणी बाहेर बोलतें आहे असें वाटलें--मला वाटतें त्याच्या कानीं कांहीं शब्दहि पडले असावे. तो दार ढकलून पुढें गेला. किती वेळ तरी परत आला नाहीं, तों पुढील शब्द माझ्याहि कानीं पडले.

" काय करावें ? मीं हजारदा गोष्ट काढली असेल कीं हें आहे तरी काय ? पण लेक पडली लाडकी. तिला बोलायचं नाहीं. पण हें चांगलं का ? लोक सारीं छीः थूः करताहेत. जें कोणी भेटेल तें म्हणतं आहे, " कायहो ! एवढी लेक...अजून ते छप्पर डोक्यावर...असल्याच मेल्या,...दुसरं, कांहीं नाहीं, त्याला एक युक्ति...... आणखी भावाची... .." पुढच्या शब्दांकडे माझें लक्षच गेलें नाहीं; कारण दादा चवताळून बाहेर जाऊन त्या बोलणारांचें काय करील आणि काय नाहीं अशी भीति पडली. माझ्या कानीं जरी ते शब्द पडले नाहींत, तरी पण त्याच्या कानीं पडले असावेत. ती युक्ति काय ती त्याच्या अगदीं अंतःकरणांत जाऊन बोंचली असावी.

त्याचा चेहरा अतिशय उग्र झाला. तो वेडयासारखें इकडे तिकडे पाहूं लागला. चटकन् माझा त्यानें हात धरला आणखी मला अशी दिव्याजवळ नेऊन माझ्या तोंडाकडे फारच चमत्कारिक तऱ्हेनें न्याहाळून पाहात म्हणतो—" यमे, जी गोष्ट झाली ती माझ्या तर काय, पण ब्रह्मदेवाच्या दिखील हातची नव्हती, याला इलाज नाहीं. पण आतां सारं माझ्या...नाहीं. माझा प्राण गेला तरी बेहेत्तर, पण ही गोष्ट कालत्रयीं देखील घडूं द्यायचा नाहीं. नाहींच नाहींच घडूं द्यायचा. जो हात पुढें करील त्याच्या नरडीचा घोट घेईन ! " हे शब्द उच्चारतांना त्याची चर्या इतकी कांहीं भयंकर दिसूं लागली होती कीं कांहीं सुमार नाहीं. तो कांहीं बोलत होता याच्याकडे लक्ष जा...ं मला त्याच्या चर्येचेंच भय वाटूं लागलें. मीं त्याला " अरे, हें काय ? असं काय करतोस ?" असें कांहीं बोलणार, तों तोच एकदम पुनः माझ्या पाठीवर हात ठेवून म्हणतो, " बस्स ! कांहीं होवो, यमूताई, मला परवांच्या दिवशीं सकाळींच खेडला जायचं आहे. तिथून दोन दिवसांनीं येईन, फार तर तीन दिवस लागतील, पण आलों की चार दिवसांच्या आंत मी वेगळा राहणार. दुसरा विचार नाही. या दोघी-तिघी कोण्या वेळेस काय करतील आणि काय नाहीं, याचा नेम नाहीं. बाबा म्हणजे आतां अगदीं आहेत कीं नाहींत हें समजतदिखील नाहीं. हं ! अशा जमदग्नीसारख्या माणसांत एका ह्यानं इतका बदल व्हावा ! मला असं वाटतं, की कदाचित् ते देखील इकडे कानाडोळा करतील. कांहीं असो म्हणा, पण आपल्याला शंका जर आली आहे तर अशा गोष्टींत सावधगिरी बाळगावी तेवढी थोडी ! " हें सर्व बोलणें तो मला उद्देशून बोलत होता म्हणण्यापेक्षां, आपल्याशींच बोलत होता म्हटलें तरी चालेल. कारण आतां तो माझ्याकडे न पाहतां कोठेंतरी पाहून आपला पुटपुटत होता. मी यावर काय बोलूं ? असें मला वाटलें. इतक्यांत वहिनीबाई तांब्या घेऊन आल्या आणखी मला म्हणतात, " वन्सं, आतां मला झोप यायला लागली बरं का ? मी आपली आत्तां उठाल मग......" पुढचे शब्द ऐकायला मी तेथें उभी राहतें आहे कशाला ? आपली उठून चालती झालें. मी उठून गेलें हें दादाच्या लक्षांत सुद्धां आलं नाहीं असें दिसलें, आणि तें एका अर्थी बरेंच झालें. नाहीं तर ते बायकोचे शब्द ऐकून व मी उठून गेलें हें पाहून तो काय म्हणतां आणखी काय करतां याचा नेम नव्हता. त्यांतून वर सांगितली तशी मनाची उद्विग्न स्थिति झालेली !

मी तेथून उठून गेल्यानंतर अंथरुणावर पडल्यावर माझ्या मनांत किती तऱ्हेचे विचार आले आणि किती आठवणी झाल्या त्या सर्व जर येथें सांगेन म्हटलें, तर कितीतरी भारूड होईल ! शिवाय आतांच्या माझ्या विचारांत दुःख व खेद यांखेरीज दुसरें काय असणार ? तेव्हां तेंच तेंच पुनः पुनः मी कशाला लिहूं ? त्या रात्रीं मला माझ्या लहानपणापासून तों आजपर्यंतच्या सर्व कांहीं प्रसंगांची आठवण झाली. निरनिराळ्या स्थित्यंतरांतून जातां जातां आज आपण कोणत्या स्थितींत आलों आहोंत; आतां याच्यापलीकडे ' वाईट स्थिति ' म्हणून कांहींतरी आहे काय ? आपल्यासारख्या गरीब

गाया कितीक असतील ? त्यांची स्थिति सुधारण्याला आपल्या हातून काय होईल ? आपण एखाद्या शाळेंत शिकवायला लागून आपल्या हातून कोणाचें बरें होईल काय ? किंवा मुंबईच्या मिशनरी बायकांप्रमाणें जेथें सांपडेल तेथें जाऊन अशा बायकांशीं बोलून त्यांना कांहीं शिकवून तेवढ्यापुरतें तरी त्यांचें दुःख कमी होईल काय ? त्या मिशनरी बायकांची परोपकारांत आयुष्य घालविण्याबद्दल तिकडून कितीतरी स्तुति केली जात असे ! ' आमच्या इकडे जर अशा बायका निघाल्या, तर त्याच्यापासून कितीतरी फायदा होईल ? ' असे उद्गार कितीकदा निघाले असतील ! पैशाच्यासंबंधानें पाहतां आपल्या एकट्याच्या पोटाला पुरून उरेल अशी तजवीज आहे, तर मग आपण असेंच कांहींतरी परोपकाराचें कृत्य करून तिकडच्या मनाप्रमाणें आयुष्य कां कंठूं नये ? असें केलें तर चिरकाल तिकडच्या आज्ञेंत वागल्यासारखें होणार आहे. आणखी आपल्याला जें कृत्य करावयाचें तें हेंच कीं जो तिकडचा हेतु तो साधायचा. आजपर्यंत आपला छळ थोडा झाला काय ? माझी खाण्यापिण्याची तजबीज आहे. त्याच्यासाठीं मला दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहायला नको, पाहिजे तेव्हां स्वतंत्र होतां येईल, हें पक्कें ठाऊक असल्यामुळें कीं काय, आपल्याला इतर अनाथ स्त्रियांप्रमाणें छळ सोसावा लागत नाहीं. परंतु ज्यांची खाण्यापिण्याची सोय नाहीं, कुठें सासऱ्याच्या जिवावर, कुठें चुलतदिराच्या, कुठें शंकरमामंजीसारख्या नातेवाइकांच्या जिवावर ज्यांना अवलंबून राहण्याची पाळी येते, त्यांची हे धर्माभिमानी लोक कशी विटंबना करीत असतील, त्यांचा किती छळ करीत असतील, त्यांना किती निर्दयपणानें वागवीत असतील, याची कल्पना मला माझ्या अल्प अनुभवावरून चांगली करतां येत होती. तेव्हां आपली स्थिति तशी नाहीं; आपण मनांत आणलें तर सर्व कांहीं होण्याजोगें आहे; दादासारखा भाऊ आपल्याला अनुकूल. असें सर्व असून आपण अशा तऱ्हेनें कां राहावें ? तें कांहीं नाहीं ! असें मनांत येऊन मला तेवढ्या रात्रीं लक्ष्मीबाईस व यशोदाबाईस एक लांबलचक पत्र ल्याहावेंसें वाटलें. त्यांत आपले सर्व विचार यथास्थितपणें लिहून त्यांचा विचार विचारावा, त्यांचें मत काय पडतें तें पाहावें, असें मनांत आलें. परंतु तेवढ्या रात्रीं दऊत, लेखणी, कागद कुठला ? तेव्हां दुसरे दिवसावर टाकून तसाच विचार करीत पडलें विचार करतां करतां मला दुर्गीची आठवण झाली. तिची स्थिति माझ्याहीपेक्षां किती दुर्धर होती ? आतांशा कायसा तिचा नवरा इथेंच होता, आणखी त्यामुळें तिला सासरच्या दाराबाहेर पडण्याची सुद्धा मोकळीक नव्हती. तिची व माझी गांठ आम्ही पुण्यांत आल्यापासून नाहीं. परंतु ऐकून ऐकून मला असें कळलें होतें, कीं तिला मुंबईला नेल्यामुळें चवताळून जाऊन, ती येण्याबरोबर दुसरे दिवशीं सुगावा काढून तिच्या घरीं तो गेला, आणखी शिव्यागाळी करून तिला घेऊन गेला. आणि आतां दुसरे कांहीं नाहीं मार, हाण, कीं तिसरें एक नवीनच काढलें होतें--कोंडून ठेवावयाचें. उठल्यासुटल्या मारून झोडपून कोंडून ठेवायचं, हें मीं सारें ऐकल्या दिवसापासून आपण तिला मुंबईला नेल्याबद्दल मला किती तरी पश्चात्ताप झाला ! तिची आठवण झाली, म्हणजे असें वाटे कीं, आपण

तिला जर मुंबईस नेलं नसतं तर तिला बिचारीला हे नवे हाल सोसावे लागले नसते. अशा तऱ्हेनें तिची आठवण झाल्यानंतर अर्थातच तिच्यासारख्या दुर्दैवी स्त्रियांबद्दलहि माझ्या मनांत विचार येऊं लागले व लागलीच असें वाटलें कीं, " आपल्याला परोपकाराला जो प्रारंभ करावयाचा त्याला लांब कशाला जायला हवें ? बिचाऱ्या दुर्गीपासूनच सुरुवात करावी. तिला आपल्याजवळ ठेवायला सांपडलें तर तें उत्तम..." असे एक ना दोन !-कितीतरी नानातऱ्हेचे विचार येऊन माझें मन त्या विचारांत गर्क असतांच पहाटेच्या प्रहरीं माझा डोळा लागला व स्वप्नांत माझ्याकडे दुर्गी आली आहे, आणखी एकसारखी रडते आहे. यमूताई, मी जिथें जाईन तिथें पांढऱ्या पायाचीच " अशा अर्थाचे कांहीं शब्द उच्चारून केविलवाणी माझ्याकडे पाहते आहे, मी कांहीं कांहीं बोलून तिचें समाधान करतें आहें, हेंच सारें माझ्या दृष्टीस पडत होतें. परंतु चमत्कार काय पाहा. आदले दिवशींचें हें माझें स्वप्न, आणखी दुसरेच दिवशीं दुर्गी खरोखरी माझ्याकडे आली आणखी मनीं वसें तें स्वप्नीं दिसें, असें म्हणा, किंवा स्वप्नीं दिसें तें मनीं वसें, असें म्हणा, पण मला दुर्गीचा चेहरा स्वप्नांत जसा माझ्या दृष्टीसमोर होता तसाच दिसला. मीं तिला मुंबईला नेलें होतें, तेव्हांपेक्षां ती कितीतरी वाईट झाली होती. नुसती अस्थिचर्म. डोळे किती खोल गेलेले, नाक किती तरी वर आलेलें. छे ! छे ! छे ! माझ्यानें तर तिच्याकडे पाहवेना. मला हकीकत ठाऊक होती तीवरून ती आलेली पाहून मला किंचित् अचंबा वाटला; परंतु लागलीच एकमेकींशी दृष्टादृष्ट होऊन दोघींचेहि डोळे भरून येऊन रडें कोसळलें. तें माईसाहेबांनीं पाहूं नये किंवा वहिनीसाहेबांच्या नजरेला येऊं नये, असें वाटून मी आपली तिला घेऊन दादाच्या खोलींत गेले. तेथें जाण्याबरोबर पहिले उमाळे थोडेबहुत कमी झाल्यावर मीं तिला तिची हकीकत विचारली. तिनें सांगितली. ती बहुतेक ऐकिली होती तशीच होती. किती ठिकाणीं लागलेलें, ठेंचाळलेलें तिनें मला दाखविलें. आतां येतांना तिनें आपल्या मुलाला आणलें नव्हतें, परंतु त्यालादेखील तिचा नवरा अतिशय मारीत असे, असें दिसलें. कारण एकदा बोलतां बोलतां ती म्हणते, " यमे, मी एखाद्या दिवशी खचित त्याला अफू जास्ती देईन आणखी मी खाईन, बघ बरं. पाहातें आहें. मी एकटी असतें तर याच्यापूर्वी कधींच जिवाचं कांहींतरी करून टाकलं असतं. मार मेल्या मग किती मला मारायचं असेल तेवढं—पण यमूताई, त्या बाळाकरितां—कसंगं सोन्यासारखं गुण करतं ? माझ्या अंगावर उगारलं कीं एकसारखं रडूं लागतं, पण तिकडे त्याचं कांहींतरी वाटतं आहे का ? सारा दिवस मारण्यासाठीं हात जळत असतात जसे जसे ! बरी झाली धिंडका आतां गेली आहे कुठें म्हणे मुंबईला; तर मला माहेरीं यायला सापडलं !" हे तिचे उद्गार ऐकून माझ्या मनाला काय वाटलें असेल ? पण उपयोग काय ? ' तिचें दुःख कमी करून तिला समाधान देण्याला माझ्याजवळ काहींतरी साधन आहे काय ? ' असें मनांत येऊन आदल्या रात्रीची आठवण झाली आणि होतां होईल तो दुर्गीला आधीं मदत करायला लागायचें असा मनाचा पक्का बेत केला. दादा बाहेर

गेला होता, यामुळें आम्ही किती वेळ तरी त्याच्या खोलींत बसलों होतों; परंतु वहिनी-बाईंना तें कांहीं पाहवलें नाहीं. त्या आदल्या रात्रींसारख्याच धसफसत म्हणतात, "वन्सं, तुम्हांला आपल्या गोष्टींच्याखेरीज कांहीं सुचतच नाहीं वाटतं. मला इथला आतां केर काढायचा आहे. आपलं जसं कांहीं दुसरं काम नाहीं. अगबाई! दुर्गाबाई का आल्या आहेत? मग तर काय पर्वणीच गोष्टींची! हें असं वागायला पाहिजे, मग सासरचीं माणसं बोललीं म्हणजे छळ करतात! त्यांच्या मतानं जर वागायचं नाहीं...... "

परंतु मी लागलीच "दुर्गे, चल तुला उशीर झाला असेलना? मग आणखी तिन्हीसांजा होतील," असें म्हणून तिला बाहेर आणलें आणि लावूनच दिलें. मी येथें आल्या दिवसापासून माईसाहेब कीं माईसाहेबांच्या आईसाहेब माझ्याशीं नीट भाषण म्हणून करीत नसत; किंबहुना मुळींच बोलत नसत म्हटलें तरी चालेल. परंतु माझी निंदा माझ्या पाठीमागें फार चालत असावी, असें वहिनीच्या प्रत्येक उद्गारावरून मला कळून येई. पण मीं कधींहि तिकडे मन घातलें नाहीं. आज दुर्गीचें आणखी माझें बोलणें झाल्यानंतर मी आपली अशी चिंताक्रांत होऊन विचारांत उभी होतें, तों माईसाहेबांनीं मोठ्या लडिवाळपणानें मला हांक मारून सैंपाकघरांत नेलें आणखी "जगाच्या चालीरीतीप्रमाणें वागावं यांतच काय ती मौज आहे. झाल्या गेल्या गोष्टी आपल्या हातच्या नाहींत; ती तुझी मामेमासू आतां आली होती मला सांगायला. तुझ्या थोरल्या मामेसासूला मखरांत बसवलें आहे परवांपासून म्हणून. दोन तीन दिवसांनीं कायसं गर्भाधान आहे. लोकं सारीं काय म्हणतील?" किती प्रकारांनीं माझ्या कानांत शब्द पडत होते! मी एक नाहीं आणखी दोन नाहीं, अक्षरसुद्धां बोललें नाहीं. शेवटीं मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून, "बरं आहे, त्यांचं त्यांना काय वाटेल तें करतील" असें कांहीं पुटपुटत बसल्या. मला त्या शब्दांचा यत्किंचित् देखील कांहीं अर्थ समजला नाहीं. कशानें समजणार?

दुसरे दिवशीं सकाळींच दादा उठला. त्यानें मला आपल्या खोलींत नेलें, आणखी मोठ्या गंभीरपणानें तो मला म्हणाला :— "यमूताई, मी आतां आज खेडला जातों आहे. पण मला कसंसंच वाटून जाऊं नये, जाऊं नये, असं मनांत येत आहे. त्या पक्षकाराचे पैसे घेऊन चुकलों आहे. आणखी पांच पन्नास रुपये मिळतील. जाऊं नयेसं कां वाटतं हें माझं मलाच समजत नाहीं. कलेक्टरच्या पुढें आहे खटला; कांहीं हरकत नाहीं म्हणा, तुझे गोपाळमामंजी आहेत बरोबर साहेबांच्या; मला वाटतं बाहेरगांवचं मोठंसं काम हेंच जरा आहे म्हणून वाटतं आहे असं झालं—बरं तें कांहीं असो. तूं या गर्भाधानाला सासरींबिसरीं जाऊं नको बरं का! नाहीं तर जाशील आणखी तो तुला पाहावयाचा नाहीं शंकरमामंजींचा आचरटपणा; तुला वाईट वाटेल, रडशील, अन् विनाकारण शिव्यांचा पर्वकाळ होईल."

"अरे, मला त्यांनीं लावून दिलं मुद्दाम, आणखी मी कशी जाईन! सासूबाईंच्या...... "

पण तितक्यांत टांगा आल्याकारणानें त्याला उठावेंच लागलें. त्याचा हा पहिलाच खटला, त्यांतून बाहेरगांवीं कुठें शेतावर जाऊन कायशी चौकशी न् तपासणी व्हायची होती, तिथें त्याला हजर राहायला पाहिजे होतें आपल्या कुळाच्या वतीनें. मला तें कांहीं पुरतें समजलेंसुद्धां नाहीं. एकपरीनें वाटे, कीं असेंच नेहमीं जाऊन त्याला पैसे मिळाले पाहिजेत; एकपरीनें वाटे कुठें एकटा जाऊन आतां हा काम करील ? ही आपली माझी बहिणीची वेडगळ भीति. असो.

दादा गेला. दोनप्रहरीं मला एक निरोप आला 'तुला बोलावलं आहे;' मी तिकडे दुर्लक्षच केलें. कारण मला वाटलें कीं, गर्भाधानासारखें कार्य घरांत असून मला अगदींच घालवून दिलें हें बरें नाहीं, असें वाटून मला बोलावलें असेल, पण आपण जाऊंच नये. पण तिन्हीसांजा निरोप आला, तो मुळीं असा, कीं "वारूताईची प्रकृति फारच बिघडली आहे, तुला बोलावलं आहे, जशा असाल तशा उठा!" मी अतिशय घाबरलें आणखी निघालेच. त्यांची अवस्था आतांशा ठीक नव्हतीच. मधें मधें तर केव्हां काय होईल याचा नेमच नव्हतासें दिसलें. पण पुनः कांहीं बऱ्या होत, पुनः दुखणें परते, असें असे तेव्हां पण आतांचा तो निरोप ऐकून मी फारच घाबरलें. कारण त्या मोलकरणीनें कांहीं चमत्कारिकच सांगितलें. घरीं जाऊन मीं पोंचतें कशी, असें मला झालें होतें. हो, शेवटीं तरी जवळ असलें म्हणजे पावलें, म्हणून घरांत शिरलें. मी तडक सासूबाईंच्या खोलींत गेलें, तों तेथें शंकरमामंजी ! तेव्हां मी दचकून मागें सरलें. आजेसासूबाई मला पाहतांच म्हणतात, "ये. आतां अंमळ हिचं बरं आहे. अग मघांशीं विव्हळायला काय लागली, डोळे काय वटारलेन् ! तुला मोठमोठयानें हांकाय् मारल्यान् ! तेव्हां म्हटलें आतां काय होतं आहेन् काय नाहीं ! तुला बोलावून तरी आणावं......आतां अमळ झोप लागली आहे. आम्हीं म्हटलं पण तूं कांहीं बाई जाऊ नकोस." हे आजेसासूबाईचे शब्द किती प्रेमानें भरलेले होते म्हणतां ! मला तर असें वाटलें, कीं त्यांनीं सांगितलें इतक्यांत सासूबाईनीं माझं नांव घेऊन हांका मारलेली ऐकूनच त्यांचें अंतःकरण द्रवलें असेल काय ? साहजिकच आहे. शंकरमामंजीदिखील किती प्रेमानें माझ्याकडे पाहात होतेसे वाटलें तो मृत्युकाळच्यासारखा देखावा पाहून तर या दोघांची अशी स्थिति झाली नसेल ना ? असें सहजच मला वाटलें, असो. पण ईश्वराची मोठी खैर, कीं त्या मघांच्या झटक्यांतच सासूबाईचा अंत झाला नाहीं. आतां मी आपली त्यांच्याजवळ बसून राहीन, असें मनांत म्हणत मी एकसारखी सासूबाईंच्या-झोप लागल्याप्रमाणें पडलेल्या परंतु मधें उगीच एखाद वेळ ऊं करून कण्हणाऱ्या-शरीराकडे पाहात उभी राहिले. काय बिचारीचे हाल झाले असतील, असें मनांत येऊन व आणखी किती दिवस बिचारीला हाल सोसावे लागणार आहेत, असें वाटून मी आपली मनांतल्या मनांत कष्टी होतें. इतक्यांत मामंजी मला 'बैस बैस. उभी कां ?' असें मोठ्या प्रेमळ आवाजानें म्हणत तेथून उठून गेले. मी सासूबाईंच्या जवळ जाऊन बसलें, तों मला तसा कांहीं फरक दिसला नाहीं. मी जातांना त्या जशा होत्या तशाच दिसल्या. इतक्यांत

आजेसासूबाईहि तेथून उठून गेल्या; आणखी मी एकटीच तिथें होतें. रात्रीं मीं निजलें तेथेंच, पण मन उद्विग्न झाल्यामुळें धड झोंप कांहीं आली नाहीं. ती पहाटे सरासरी चार पांच वाजण्याच्या सुमाराला लागून कांहीं चमत्कारिक स्वप्न पडत होतेंसें वाटलें. त्यांत माझी आई मला दिसली आणखी मला असें वाटलें कीं, जशी कांहीं मी सासरच्या त्रासानें त्रासून तिच्याजवळ गाऱ्हाणें सांगतें आहें आणखी ती जशी कांहीं मला, ‘ बरं हो यमे, मी तुला आतां लवकरच नेईन ’ असें म्हणते आहे—परंतु तितक्यांत माझ्या उशाशीं कोणीं आल्यामुळें मी जागी झालें तों, “ सीताबाळ, अंमळ इकडे येग ! ” असे शब्द माझ्या कानीं पडले. अजून अंधारसाच होता; परंतु आमच्या येथें दिवा असल्यामुळें मीं आजेसासूबाईंना तेव्हांच ओळखलें, आणखी पट्कन् उठलें; त्याबरोबर “ कांहीं नाहीं, त्या खोलींतून आम्हांला कांहीं पाहिजे आहे तेवढें आणून दे चल ” असें म्हटलें. “ कोणत्या ? ” असें म्हणून मी पुढे झालें. त्यांनीं मला “ पलीकडल्या—” अहो, ज्या खोलींत पहिल्या प्रथम मी रडत बसलें होतें, आणखी अगदीं पहिल्यानें माझ्या पाठीवरून हात फिरवून माझें समाधान केलें—त्याच खोलींत मला नेलें. मी आंत पाऊल घातलें तों माझ्या मागोमाग आजेसासूबाई आणखी वनूवन्सं आल्या व माझ्या कानांवर पुढील शब्द पडलेः—“ आता बऱ्या बोलानं मुकाटयानं काय होईल तें होऊं दे, नाहीं तर पाहा ! ” माझ्या लक्षांत कांहींच न येऊन मी मागें वळून पाहतें, तों दाराशीं शंकरमामंजी आणखी--आणखी— आणखी......

त्याला पाहण्याबरोबर सर्व प्रकार माझ्या लक्षांत आला आणखी मी ओरडणार, तोंच “ आतां ओरड कीं बोंबल ! या तुझ्या गुणामुळें तर गर्भाधानाला ब्राह्मण देखील मिळेनात. आणखी त्याला नरकांत पडायला नको समजलांत ? होरे पुढें ! आई... ” परंतु पुढले ते मांगहृदयी शंकरमामंजींचे शब्द मला ऐकूं आले नाहीत. मला कांहीं दिसेनासें झालें ! फिरल्यासारखें झाले ! मी कोणाच्या तरी हाताला झटका देतें आहेसें वाटलें आणि धाडकन् पडलें.

◆ ◆ ◆

## ८७ : प्रकरण शेवटलें

* * * * * * * * * * * * * * * * * * *

( यमूताईचा भाऊ गणपतराव याच्या हातचें )

ज्या हातानें आमचें दोघांचें सर्व चरित्र इतक्या सूक्ष्म तऱ्हेनें लिहिलें, तो हात आतां माझ्या दुर्भाग्याच्या दृष्टीस कधींहि पडावयाचा नाहीं. ती माझी अत्यंत शुद्ध, अत्यंत प्रेमळ, अत्यंत पवित्र अशी बहीण, मागील मजकूर लिहिल्यापासून पुरी एक

पंधरा दिवसदिखील जगली नाहीं. ती वरील भयंकर हकीकत जे दिवशीं तिनें लिहिली ते दिवशींच रात्रीं तिला फार भयंकर असें स्वप्न पडलें आणि त्या स्वप्नांत तो सर्व प्रकार पुनः तिच्या नजरेसमोर होतो आहे, असें तिला वाटून ती मोठमोठ्यानें ओरडूं लागली व त्या सपाट्यास तिला अतोनात ताप भरला. त्याच तापांत तिच्या खोकल्याचा जोर होऊन, आधींच अशक्त होत चाललेल्या त्या शरीराला फार त्रास झाला आणि शेवटीं पंधरावे दिवशीं सकाळीं सहा वाजतां तिचा अंत झाला ! या वेळीं मीं तिच्या अगदीं जवळ बसून होतों. दुर्गाताई रोज येत असे. तिला आदले दिवशीं मी आग्रह करून ठेवून घेतलें होतें. तीहि माझ्याजवळ होती. मला चिन्ह ठीक दिसेना तेव्हां मुंबईहून दोन दिवसांपूर्वींच लक्ष्मीबाई आणखी यशोदाबाई यांना तार करून बोलावलें होतें. त्यांना पाहण्याबरोबर तिला कितीतरी आनंद झाला म्हणतां ? परंतु ती फारशी बोलली नाहीं. त्या दोघी उशाशीं बसल्या असतां दोघींचेहि हात धरून त्यांच्याकडे अत्यंत केविलवाण्या मुद्रेनें पाहात असलेली तिची ती मूर्ति माझ्या डोळ्यांसमोरून कधींतरी हलेल काय ? " अशा पवित्र माणसाचे असे हाल करावेना " असा उद्गार लक्ष्मीबाईंच्या तोंडून निघाल्याबरोबर आपला तो अशक्त हात कपाळाला लावून तिनें आमच्या सर्वांकडे जें पाहिलें, तें माझ्या या हृदयांतून कधींतरी जाईल काय ? इतकीं सगळीं दुःखें तिला सोसावीं लागलीं. आज किती दिवस तरी ती या क्षयाच्या आजारानें झिजत चालली होती, परंतु शेवटीं तिचा अंत फार शांतपणानें आणखी सुखानें झाला. तिच्या जिवलगांपैकीं बाबांखेरीज सर्व आम्ही तिच्याजवळ होतो. मी, दुर्गी, लक्ष्मीबाई आणखी यशोदाबाई चौघेहि अहोरात्र जवळ होतों. मध्यरात्रीच्या सुमारास तिनें फारच हलके मला हाक मारली. मी जवळ गेलों. मला वाटलें हिला कांहींतरी इच्छा झाली असावी, आणखी ती आतां मला सांगणार. हिची शेवटली इच्छा तरी आमच्या हातून आतां पार पडो म्हणून मीं अतिशय उत्कंठेनें तिच्या तोंडाजवळ कान नेला, तों " दादा, माझं सांगितलेलं ऐकशील ना ! " असे अतिशय खोल शब्द मला ऐकूं आले. " यमूताई, हें काय विचारतेस तूं ? बोल. तुला काय सांगायचं असेल तें सांग. मी रतिमात्र चुकेन तर शपथ. " हें उत्तर मीं किती उत्कंठेनें दिलें असेल हें सांगायला पाहिजे का ? एक क्षणभर ती कांहीं बोलली नाहीं. नंतर पुनः माझा हात धरून आपल्या अर्थपूर्ण नेत्रांनीं माझ्याकडे टक लावून पाहात तिनें आपला दुसरा हात तिची वहिनी पलीकडे उभी होती तिजकडे केला आणखी " कांहीं जरी झालं, तरी तिचा अव्हेर करूं नको ! " असे शब्द उच्चारून केव्हां मी उत्तर देतों हें पाहण्यासाठींच काय तिनें फारच आशेनें मजकडे पाहिलें. ज्या माणसानें तिला आजन्म सुख दिलें नाहीं, उलट तिच्या अत्यंत दुःखद अशा स्थितींत तिचा होतां होईल तों छळ केला, त्या माणसाबद्दल इतकी काळजी पाहून मला काय वाटलें असेल, तें फक्त यमूताईसारख्या बहिणी ज्यांना असतील त्यांनाच कळेल, इतरांना काय कळणार ? मी एकसारखा रडत होतों. खरें म्हटलें तर मी निराळें बिऱ्हाड करून राहिल्यावरहि माझ्या बायकोकडून तिला किती त्रास होत होता, ती तिला कसें टाकून

बोले, याची मला कल्पना नव्हती. ही तिला कांहींतरी त्रास देतें एवढें आपलें मला ठाऊक होतें आणि मी तसें न व्हावें अशाबद्दल पुष्कळ काळजी घेत होतों. एखादे वेळीं यमूताईच्या देखत बोललों तर अतिशय रागावे, यामुळें मी तसें करीत नसें. माझ्या देखत जेवढ्या गोष्टी होत तेवढ्याबद्दल मी बंदोबस्त करी परंतु ज्या गोष्टी माझ्या पश्चात् होत त्या मला कशा कळाव्या? यमूताईकडून कधीं कळायच्याच नाहींत. पुढें तिचे हे सर्व कागद जेव्हां पाहिले, तेव्हां मला दोन तीन तुकडे सांपडले तेहि येथें देतो. त्या तुकड्यांवरून मला समजलें तिला किती त्रास होत होता तें. असो.

आतां सांगितल्याप्रमाणें ती बोलल्यानंतर पुष्कळ वेळपर्यंत आम्ही सर्वजण स्वस्थ बसलों होतों. तीहि कांहीं बोलली नाहीं, किंवा तिनें कांहीं खूण केली नाहीं. एकसारखी टक लावून पाहात होती.

पहाटेच्या तीन वाजेपर्यंत असेंच चाललें. पुनः तीन वाजतां तिनें माझा हात धरला आणखी मी "काय?" असें विचारण्याबरोबर तिनें दुर्गीकडे हात केला व 'हिचें कसें होणार?' असा प्रश्न केला. आतां या प्रश्नावर कोण काय उत्तर देणार? शेवटीं तीच म्हणाली, "माझे रुपये आले तर हिची सोय कर. हिला विसरूं नको."

नाहीं, नाहीं. ते रुपये येवोत न येवोत, मी तिला विसरणार नाहीं. माझ्याकडून होईल ती मदत मी तिला देईन. तूं अगदीं काळजी करूं नकोस" असें उत्तर माझ्या तोंडांतून निघण्याबरोबर तिला किती समाधान झालेंसें दिसलें. ती सुखमुद्रेनें माझ्याकडे पाहूं लागली. आणखी थोडा वेळ गेला; मी होऊन तिला 'तुझी आणखी कांहीं इच्छा आहे काय?' असे विचारलें. तिनें 'कांहीं नाहीं' असें उत्तर दिलें. नंतर कांहीं वेळ गेल्यावर तिनें आम्हांला सगळ्यांना जवळ येण्याची खूण केली. आम्ही होतों जवळच तरी पुढें सरकलों. लक्ष्मीबाई अगदीं तिच्या उशाशीं होत्या. त्यांच्या मांडीवर तिनें डोकें ठेवलें. एक हात यशोदाबाईच्या हातीं दिला, एक हात मीं धरला, दुर्गीचा हात तिच्या अंगावर होता; आणि अशा स्थितींत ती आमची अत्यंत जिवलग बहीण आणखी मैत्रीण आम्हांला सोडून गेली.

* * *

## वरील प्रकरणांत आलेले तुकडे

अति झालें म्हणजे कुठें तरी ओकून टाकावेंसें वाटतें, हा अनुभव कोणाला नाहीं! किती दाबून ठेवा, किती आणा घाला; परंतु योग्य स्थळ मिळालें म्हणजे मग तेथें यत्किंचित्हि मागें पुढें न करतां जितकें म्हणून कांहीं बारीकसारीक सांगायचें असेल तितकें सारें सांगावें असें वाटतें; इतकेंच नव्हे, तर एकदा सुरुवात झाली म्हणजे मग तो ओघ दाबण्याचें आपल्या हातीं नाहीं. दादाचें माझ्यावर व माझें दादावर किती प्रेम

होतें हें आतां मीं नव्यानें सांगायला पाहिजे असें नाहीं. माझ्यासाठीं त्याचा जीव तिळतिळ तुटत असे, आणखी अजूनहि तुटतो आहे हें मला समजत नाहीं काय ? परंतु काय असेल तें असो, त्याच्याजवळ सर्व कांहीं आपलीं दुःखे सांगावीं अशाला माझें मन घेत नाहीं. असे वाटतें, कीं आपलें कर्म फुटलें, त्याची कथा जेव्हां तेव्हां त्याला सांगून कां उगीच त्यालाहि आपल्याबरोबर दुःखांत घालावें ? आणखी आतां मीं वर सांगितलेंच आहे, कीं मला कोणत्याहि गोष्टीबद्दल वाईट वाटूं नये, माझ्या मनाला एकदम कसलाहि धक्का बसूं देऊं नये एवढ्याकरितां तो अतिशय जपत असे. असा प्रकार असल्यामुळें आम्ही दोघेंहि एकमेकांला दुःख होईल अशा भीतीनें कोणतीहि दुःख उत्पन्न करणारी गोष्ट बोलण्यांत आण त नसूं ; इतकेंच नव्हे, तर मी आपले सर्व दुःखविचार दाबून धरून ठेवी. हो " तुझी बायको आज मला असं बोलली, आतां राह्यला आहांत किनई पण आमच्याचपाशी ? आणखी तेव्हां कोण तोरा ! अन् तिकडलं मन तर जसं आपल्या हातीं घेऊन ठेवलं आहे. इतकं पाणी प्यायचं म्हटलं तर तितकंच ! बहिणीच्या बाहेर जायचं कुणी ? बायको मरेना, कांहो का करीना तिकडे ! काय तुम्हांला वाटतं असं केलं म्हणजे ? असा जो आमच्या दोघांत तुम्ही बिब्बा घालतां, त्यांत काय मिळतं ? कांहीं तुमचं नशीब फुटलं तें भरून का येतं आहे ? " अशा तऱ्हेचे कुऱ्हाडीचे घाव ती माझ्या हृदयावर घालते. ते त्याला सांगून त्याचें मन विनाकारण वाईट काय म्हणून करूं ? त्याचे प्रेम माझ्यावर अतोनात आहे, याबद्दलच बिचारीला आतां वैषम्य वाटायला लागलें ना ? परंतु एक जन्म काय केलें, तें माझ्यापुढचें हें पक्वान्नाचें ताट देवानें लाथ मारून उडवून दिलें ? आतां या जन्मीं तरी मी आपल्याकडून चांगल्या तऱ्हेनें वागतें आहें, बिचारीनें नवऱ्याशीं चांगलें असावें, त्यांनें तिच्याविषयीं यत्किंचित् देखील वावगेपणा करूं नये, म्हणून मी पहिल्यापासून कितीतरी खटपट करीत होतें, आणखी अजूनसुद्धां मी किती खटपट करतें आहें, तें एका परमेश्वराला ठाऊक ! तिला सर्व प्रकार त्याच्या उलट भासतो भासो बिचारा ! मला निराळें राहायचें म्हटलें तर राहतां यायचें नाहीं, असें नाहीं. आणखी माझ्या दूर राहण्यानें जर त्या दोघांचें उत्तम जुळणार असेल तर मी राहीन कीं नाहीं हे पाहण्याला, नारायणा ! तुलाच डोळे आहेत ! पण उपयोग काय ? आतां मला या जगांत असे किती दिवस राह्यचें आहे ? आठ पंधरा दिवस तरी जगतें कीं नाहीं कोणाला ठाऊक ?.........

* * *

आज दादा म्हणत होता, कीं अशा दुःखस्थितींत असणाऱ्या स्त्रियांना लिहितां वाचतां येऊन त्यांनीं स्वतः किंवा लिहितां वाचतां येणाऱ्या दुसऱ्या स्त्रियांना सांगून जर आपलीं समग्र चरित्रें लिहिलीं, तर त्यांची स्थिति सुधारण्याचा एक मार्ग होणार आहे नाहीं ? हा दादाचा केवढा भ्रम आहे ! आम्हां दीन गायांची खरोखर स्थिति काय असते, आमच्यावर नेहमीं ज्या त्या बाबतींत किती जुलूम होत असतो, अज्ञान अतोनात माज-

विल्यानें आमच्या आम्हीच किती आपलें नुकसान करतों, आम्हांला आमचें मन गुंत-विण्यास श्रेष्ठ श्रेष्ठ असे विषय नसल्यामुळें आमचीं मनें नेहमीं दागदागिने, लुगडीं-चोळया, निंदा कुटाळक्या इत्यादिकांतच किती गुरफटून गेलेलीं असतात? एक ज्ञान नसल्यामुळें आमच्या मनावर दुराग्रहाचें पटल केवढें जबर असतें व तें निघण्याची कोण मारामार पडते? त्याचप्रमाणें 'धर्म! धर्म!! नीति! नीति!!' म्हणून ओरडणाऱ्या लोकांपैकीं शेंकडा ८०–९० लोक केवळ आमचा चेंदा किती करीत असतात, या गोष्टी कांहीं कुणाला दिसत नाहींत असें का आहे? डोळे उघडून पाहील त्याला सर्व दिसेल. लक्षांत घेईल त्याच्या लक्षांत सारें येईल; पण डोळे कोण उघडतो, आणखी लक्षांत कोण घेतो?

* * *

करा. मामंजी, जितकी म्हणून तुमच्या मनांतून आमची दोघांची निंदा, नालस्ती करायची असेल तितकी करा. त्याखेरीज तुमचा धर्माभिमान आणखी कुलाभिमान, कसा लोकांना दिसून यावा! असं करून तरी आतां एकदा सुखी व्हा म्हणजे झालं. मीं आतां थोड्या दिवसांची सोबतीण! मी नाहींशीं झाल्यावर नाहींना मग माझ्या कानीं असल्या गोष्टी येणार? केलंत एवढ्यानं तुमचं समाधान झालं नाहीं? आणखी चालू द्या. ज्या काय विटंबना करायच्या असतील तितक्या होऊ द्यात. तुम्ही काय मागं घ्याल?

* * *

त्या नराधमानें धर्माच्या थोतांडानें ज्या दिवशीं विश्वासघाताचें अघोर कृत्य केलें त्या दिवशीं मी पुण्यांत नव्हतों, हें यमूताईच्या लिहिण्यांत आलेंच आहे. त्याच्या पुढची हकीकत या प्रकरणाला जोडावी असें मनांत आहे, तर तेवढी मी लिहितों. पण फारच थोडक्यांत लिहीन. कारण एक तर मला तिच्याप्रमाणें ती लिहितां यायची नाहीं, आणि जरी आली तरी ती आतां मी लिहूं इच्छित नाहीं. काय करायचें आहे? ती आम्हांला सोडून गेली, सर्व कांहीं झालें!

मी तिसरे दिवशीं गांवाहून आलों. ते दिवशीं मला कांहींच समजलें नाहीं. यमूताई कुठें आहे तें विचारतां, तिची सासू फारच आजारी म्हणून ती गेली आहे, असें मला उत्तर मिळालें. परंतु दुसरेच दिवशीं धोंडूनें मी आलेला ऐकल्याबरोबर तो मला भेटायला आला, आणखी त्यानें मला ती भयंकर हकीकत सांगितली. ती लिहिण्याचें नुसतें मनांत आणतों आहें तर माझ्या अंगावर शहारे उभे राहिले आहेत, आणखी लिहितां येणार नाही असें वाटतें आहे; तेव्हां मी आपला थोडक्यांत सांगतों. त्या नरपशूच्या मनांतून हा डाव साधायचा किती दिवस तरी होता, परंतु तो मला व गोपाळरावांना भीत असे. आम्ही दोघेहि येथें नाहीं ही आयती संधि सांपडली. गर्भा-धानाला ब्राह्मण येत नाहीं म्हणतात ही सबब झाली, तेव्हां त्या खाष्ट म्हातारीच्या मनांत भरवून देऊन त्या गरीब गाईला त्या कसायानें फूस लावून नेलें. तिला बिचारीला असा कांहीं विश्वासाघात होणार आहे असें स्वप्नींसुद्धां आलें नाहीं. ती पडली एकटी–त्या अवदसा तिघी, आणखी, आणखी या धर्माचें थोतांड करणारा–काय त्याला आतां नांव

देऊं ?– तिला मूर्च्छा आली असतांना कींहो या नराधमानें तें क्रूर कर्म करविलें. थोड्या वेळानें ती सावध झाली तेव्हां ओरडली तों, " पुनर्विवाह कर ! पुनर्विवाह ! या चोरांची अशींच नाकं ठेंचलीं पाहिजेत ! " असे शब्द तो उच्चारीत होता. इतक्यांत तिची आरोळी ऐकून धोंडू धावत तेथें गेला. त्यानें बापाला अतोनात शिव्या दिल्या, पण दगडाला काय व्हायचें आहे ? ही सर्व हकीकत त्यानेंच मला सांगितली. जे दिवशीं आपलें गर्भाधान निर्विघ्न व्हावें म्हणून त्या चांडाळानें हें अघोर कृत्य केलें, तेच दिवशीं तिला ताप आला, परंतु आमच्या इकडे तिनें कळविलें नाहीं. मी आल्यावर धोंडूनें मला कळविलें तेव्हां धावत गेलों. तों तो–आतां त्याला नांव द्यायला माझ्याजवळ शब्दच नाहीं–आपल्या त्या नव्या बायकोला घेऊन पुण्याहवाचन बसवीत होता. माझ्या अंगवा किती संताप झाला असेल बरें ! मीं त्याला तेथें शिव्या दिल्या, फिर्याद करीन म्हणून भीति घातली, सगळें कांहीं केलें. शेवटीं तेच दिवशीं संध्याकाळीं दुसऱ्या ठिकाणीं जागा घेऊन निराळें बिऱ्हाड करून तिला घेऊन राहिलों. माईसाहेबांचें त्यांत अंग होतें हा मला पक्का संशय, आणखी तो संशय पुढें चौकशीअंतीं खराहि पण ठरला. तिला सर्व प्रकार ठाऊक होता. पुढें त्या चांडाळावर फिर्याद लावण्यासाठीं मीं अतोनात आग्रह केला; परंतु यमूताई कांहीं केल्या कबूल झाली नाहीं. ते दिवशीं जो तिला ताप आला तोच तिच्या दुखण्याचा मुळारंभ. त्यांत पुढें सासू वारली, हिला खोकला जडला आणि क्षयावर गेलें. नेहमीं चिंताक्रांत बसे. एकदा दोनदा तिला मुंबईस नेलें. पण कुठें तिला चैन नाहींसें झालें. मुंबईस असतांना आम्हीं सर्वांनीं मिळून तिचें मन गुंतवण्याजोगा कांहींतरी उद्योग तिला आवडला तर पाहावा म्हणून हें आपलें चरित्र लिहिण्याचा आग्रह केला. तो तिला बरा वाटून तिनें पुण्यास येतांच आरंभ केला. आणि रोज होईल तसतसें लिहूं लागली. मी तें पाहून वारंवार तिला उत्तेजन देत असें आणि एकदा आरंभ केल्यावर तिचें तिलाच फार बरें वाटून तिचें मन त्यांत गढलें. तरी पण जास्तकमती लिहिणें तिच्या प्रकृतीच्या मनावर आणखी मनाच्या स्वास्थावर अवलंबून असे. कित्येक प्रकरणें लिहून आठ दहा दिवस तिनें पुनः तिकडे पाहूं नये असें चाललें होतें. होतां होतां रघुनाथरावांच्या मृत्यूचें प्रकरण लिहिल्यावर तर ती किती दिवस आपल्या त्या लिहिण्याच्या जागीं सुद्धा गेली नाहीं. पुढें एकदम लिहूं लागल्यावर तिची प्रकृति जास्त बिघडत चालल्याकारणानें लिहिण्याचें नीट जुळेना, तरी ती आपली लिहीत असे. होतां होतां शेवटला तो भयंकर प्रकार लिहिल्यावर तिनें लेखणी दूरच ठेवली. तो प्रकार प्रत्यक्ष झाला तेव्हां तिच्या दुखण्याला आरंभ झाला, आणखी त्याची हकीकत लिहितांना तो सर्व प्रकार पुनः दृष्टीसमोर येऊन धक्का बसून तिचा अंत झाला. याचें कुयश ज्या आत्म्याला आलें त्याची धन्य असो !

हें तिचें चरित्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यास तें अर्पण कोणाला करावें अशाबद्दल एकदा दोनदा विनोदानें गोष्टी निघाल्या असतां तिच्याकडून मीं एक अर्पणपत्र लिहून घेतलें होतें तेंहि माझ्या हातीं आहे.

◆ ◆ ◆

## उपसंहार

* * * * * * * *

ज्या वेळीं हें सर्व माझ्या हातीं आलें आणि तें छापण्याची सदर परवानगी मला माझे मित्र गणपतराव यांनीं दिली, तेव्हां मीं गणपतरावांकडून अखेरच्या भागाचा उत्तरार्ध लिहून घेतला. पूर्वार्ध म्हणजे--यमूताईच्या मरणाच्या हकीकतीचा; त्यांनीं ती वारल्यानंतर थोडेच दिवसांत लिहून ठेविला होता. मीं ज्या वेळीं हें चरित्र वाचलें, त्या वेळीं यांत दोनचार गोष्टी अगदीं अर्धवट राहिल्या आहेत ही गोष्ट माझ्या लक्षांतहि आली नाहीं. मन इतकें त्या चरित्रांत गढून गेलें होतें, कीं कांहीं पुसूं नये. परंतु पुढें तें छापण्याच्या हेतूनें प्रकरणशः वाचीत गेलों, तेव्हां यमूताईच्या अकालिक मृत्यूमुळें कित्येक गोष्टींची शेवटपर्यंत हकीकत लिहिली गेली नाहीं, त्या गोष्टींचा निकाल कळवून घ्यावा असें गणपतरावांस विचारलें; त्यांनींहि या उपसंहारांत छापण्यासाठीं म्हणूनच मला हें त्यासंबंधानें पत्र पाठविलें आहे :—

श्री

सा. न. वि. वि.

आपण लिहिल्यात, त्यांपैकीं एकदोन गोष्टींचीं हकीकत मीं तुम्हांला स्वतः सांगितलीच आहे; परंतु चरित्राची खरी पूर्तता होण्याला माझ्या हातचें पत्रच पाहिजे, असें आपल्यासारख्या परम स्नेह्याचें म्हणणें मला मोडतां येत नाहीं, म्हणूनच मीं हें पत्र लिहीत आहें. वस्तुतः पाहतां मला ज्यांची माहिती तुम्हांला देतां येईल, अशा गोष्टी दोनच आहेत. एक दागिन्यांची खरी खरी हकीकत काय झाली ?--ती देखील आतां स्पष्टपणें लिहिलीच पाहिजे असें नाहीं. दागिन्यांची हकीकत काय व्हायची ? आमच्या माईसाहेबांच्या मातुःश्री जेव्हां काशीयात्रेस गेल्या, तेव्हां त्या आपल्या एका मैत्रिणीला माईसाहेबांचा समाचार घेण्यास सांगून गेल्या. ती बाई अर्थातच वारंवार येऊं लागली. होतां होतां पैशाची देवघेव सुरू झाली. मूल होईना, म्हणून कांहीं दैविक उपचार सुरू करण्याचा उपदेश होऊन अर्थातच देवऋषि वगैरे करण्याच्या नादास आमच्या माईसाहेब लागल्या. देवीच्या उत्सवाच्या दिवशीं देवीला घालायला म्हणून एक दिवस दागिने गेले आणि ते कांहीं परत आले नाहींत--नाहींत ते नाहींतच. त्यांच्याऐवजीं कांहीं खोटे दागिने तयार झाले. मला त्याचा संशय येऊन मीं निर्णय करून घेतला. बाबांच्या कानावर पुढें ती गोष्ट घातलीहि; परंतु "ज्याचें नशीब त्याच्याबरोबर !" एवढाच उद्गार त्यांच्या तोंडून निघाला आणि त्यांचें तोंड अतिशय खिन्न झालेसें दिसलें. यमूताईची अशी स्थिति झाली तें पाहून त्यांना जबरदस्त धक्काच बसला. दुसरें लग्न केल्यापासून

सर्व गोष्टींविषयीं औदासीन्य जें त्यांच्या अंगीं येत चालले होतें, तें आतां पूर्णपणें त्यांच्या ठिकाणीं येऊन ते आपले कसेतरी दिवस ढकलूं लागले--मधेंच एखादे वेळीं मला असेंहि वाटे, कीं आपण लग्न केल्याबद्दल--किंवा निदान अशा स्त्रीशीं लग्न केल्याबद्दल त्यांस अंतःकरणांत पश्चात्तापहि होत असावा. तें कांहीं जरी असलें, तरी ही गोष्ट निःसंशय खरी, कीं आमच्या बाबांसारख्यांच्या पूर्ववयांतल्या वर्तनांत आणि द्वितीय विवाहानंतरच्या वर्तनांत असा विलक्षण फरक कां पडावा, हें मोठें गूढ आहे.

यमूताईवर शेवटला प्रसंग आणण्यांत आमच्या माईसाहेबांचें अंग असावें यांत शंका मुळींच नाहीं. कारण त्याच्यापूर्वी कित्येक दिवस ती बाबांजवळसुद्धां "हें काय हे ! सारं जग तोंडांत शेण घालायला लागलं, कोणी तोंड काढूं देत नाहीं. हें असलं आपल्यासारख्या बाळबोध घराण्यांत कांहीं बाई चांगलं नाहीं. भटभिक्षुक उद्यां येईनासे दिखील होतील ' अशा तऱ्हेचें कुजबुजणें चालत असे, असें मला मागाहून समजलें. त्याचप्रमाणें " तें कांही नाहीं. माझ्याच्यानं तें कांहीं पाहवणार नाहीं," अशा अर्थाचे उद्गार बाबांनी काढले असावेत असें वाटतें. कारण त्यावरून माईसाहेबांनीं असे उद्गार काढले होते--" आपल्याच्यानं पाहवत नाहीं तर सासरीं लावून देऊन काय होईल तें होऊं द्यायचं; ज्या त्या गोष्टींत आतांशा गणपतीचं चालवायचं हें काय? आपल्या कुळाला अशा तऱ्हेनं बट्टा लागेल ना? लोकं नांवं ठेवतील कोणाला ?" अशा तऱ्हेचे उद्गार निघाल्याचें समजल्यावर मग मुळीं शंका घेण्याला जागाच नको होती. परंतु पुढें अगदीं स्पष्ट मला असें समजलें, कीं मी गांवाला जाणार याबद्दल बातमी देऊन त्यांनीं तो घाट जमविण्यास मदत केली. यमूताई जाण्याला कांकूं करील तर सकाळपासून तिच्या पाठीमागें, " अग, तुझी सासू आजारी म्हणून मी ऐकतें आणखी तूं तिकडे जात नाहींस हें काय ! कांहीं उठल्या सुटल्या बोलावणींच पाहिजेत? का अगदीं तिचं प्रेत बाहेर काढल्यावर मग जाणार आहेस?" असलीं बोलणीं चालविलीं होतीं. दोन तीन दिवस आधीं तिकडली मंडळी तिच्याकडे येऊन "काय करावं? आमच्या इथें आतां ब्राह्मण-सुद्धां परवां गर्भाधानाला मिळत नाहींत या हिच्या हट्टामुळें" असे उद्गारहि काढीत असत. इतकें सगळें समजल्यावर कशाला कोणाला आमच्या माईसाहेबांचें, त्या दुष्ट कृत्यांत अंग होतें कीं नाहीं याबद्दल शंका राहील !

नाना व विष्णुपंत यांचे स्नेही गणपतराव हे यमूताई मुंबईस असतां तेथें आलेच नाहींत असें नाहीं, परंतु यांचें नांव कोठेंच नाहीं; त्याचप्रमाणें नानांच्या बहिणीच्या संबंधानेंहि फार क्वचित् लिहिलें आहे, हे पाहून मलासुद्धां आश्चर्य वाटलें; परंतु आतां मला अशी एक गोष्ट आठवते, कीं त्या दोघांच्या संबंधानें--" कांहीं एका विशिष्ट गोष्टी-विषयीं मी निराळीं दोन प्रकरणेंच लिहिणार आहें " असें ती म्हणाली होती. तीं तिनें लिहिलीं किंवा नाहीं हें समजण्याला मार्ग नाहीं. गणपतरावांच्याविषयीं तिच्या मनांत अत्यंत पूज्यबुद्धि होती, आणि गोदावरीविषयींचें प्रेम तर कांहीं विलक्षणच असे. असें असतांना तें कसें राहिलें कोणास कळे ! शेवटलीं दहा पंधरा प्रकरणें लिहिण्यापूर्वीपासून

तिचें चित्त ठिकाणीं नव्हतें, ही गोष्ट लक्षांत आली म्हणजे मला त्याबद्दल कांहीं फार आश्चर्य वाटत नाहीं. आणि दुसरें असें कीं, तिच्या स्वतःच्या चरित्राचा परिणाम जरी गणपतरावांच्या मनावर फार झाला, तरी पण तिच्या चरित्राशीं गणपतरावांचा संबंध फारसा आला नाहीं, यामुळें कांहीं उणीव भासायला नको.

त्या पांच हजार रुपयांच्यासंबंधानें आपण प्रश्न विचारतां, परंतु मला वाटतें त्यासंबंधाची हकीकत एव्हांशींच प्रसिद्ध करणें बरें नव्हे, असें माझें मत आहे. कां तें मीं तुम्हांला खाजगी येऊन सांगेन. इतर कांहीं गोष्टींच्या संबंधानें आणखी तुम्ही लिहिलें आहे, परंतु त्यांचीं उत्तरें मला आतां कांहीं सांगतां देतां येत नाहींत. आणखी तुम्ही असें पाहा, मनुष्याचें चरित्र अकालीं आटोपलें असतांना सर्व गोष्टींची परिपूर्तता त्याच्या हातून होत नाहीं, त्याप्रमाणेंच कित्येक गोष्टी यमूताईच्या हातूनहि अपुऱ्या राहिल्या आहेत. त्या समजल्या तरच तें तिचें चरित्र सुबोध होणार असें थोडेंच आहे ! माझें तर तुम्हांला पहिल्यापासून असेंच सांगणें होतें, कीं जसें तें तिनें लिहिलें तसेंच छापा आणि जिथें तिच्या हातून पुरें झालें तिथेंच पुरें करा; परंतु तसेंच सोडल्यास तें फार भुंडें दिसेल असें तुमचें म्हणणें पडलें म्हणून मीं तें शेवटलें प्रकरण आणि हें पत्र तुम्हांस लिहून दिलें. आतां उरलेल्या त्या सटरफटर गोष्टी राहूं द्या तशाच. इतका वेळ तिच्या अंतःकरणापासून निघालेल्या शब्दांनीं लिहिलेलें चरित्र वाचावयाचें आणि शेवटीं आपलें हें तुटक चरबट कशाला ? तुम्हांला सांगतों-पंत, माझ्या ताईच्या अंगीं इतके गुण असतील, असें मला पूर्ण समजलें नव्हतें असें म्हणावेंच लागतें. रघुनाथराव आणि ती, दोघें जिवंत असतीं तर विष्णुपंत व लक्ष्मीबाई, नानासाहेब व यशोदाबाई, गणपतराव व सरस्वतीबाई या जोडप्यांनीं समाजाकरितां काय केलें असतें आणि काय नाहीं ! रघुनाथराव तर गेलेच होते, परंतु एकटी ताई जरी जगती, तरी तिनें खचित खचित आपल्या भगिनींची आज आहे ती स्थिति एक कांकणभर तरी सुधारली असती. तिची ग्राहकता कांहीं विलक्षण होती आम्ही सर्वांनीं तिला उत्तेजन देऊन 'पुढें हो' म्हटलें असतें, तर ती खास झाली असती; परंतु शरिराचें स्वास्थ्य अगदींच कमी होत चालल्यावर तिचा तरी काय उपाय ? तथापि तिनें मजजवळ घालविलेल्या आपल्या शेवटल्या दिवसांत जितकीं परोपकाराचीं कृत्यें केलीं, तितकीं माझ्यासारख्याच्यानें आपल्या सर्व आयुष्यांत होणार नाहींत. तिनें नियमित असा वर्ग वगैरे काढला नाहीं, परंतु आपल्या कित्येक भगिनींना शिवणकाम व थोडेंसें लिहिणें वाचणें वगैरे शिकविलें, आणखी, आणखी तें काय पण ? अशी तिच्या हातून घटकोघटकीं होत असलेल्या सत्कृत्यांची यादी कोठपर्यंत देऊं ? त्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या असतील त्यालाच त्यांचें महत्त्व समजणार. इतरांना काय ? आणि तिच्या हातून स्त्रियांच्या हिताच्या कितीतरी गोष्टी झाल्या असत्या, असें जें मीं म्हटलें आहे त्याचा खरेपणाहि इतरांना समजणार नाहीं, परंतु आतां त्याचें काय ? कवीनें म्हटलें आहे तेंच खरें, कीं--

*Of all sad words of tongue and pen*
*The saddest are these, — It might have been.*

॥ ओवी ॥

॥ चित्तीं उपजविती खेद । बोलतां लिहितां जे जे शब्द ॥
॥ तयांमाजी अत्यंत दुःखप्रद । 'असें झालें असतें' हे ॥

यमूताईचा दुर्दैवी भाऊ
व
आपला परम मित्र
गणपति

⁂ समाप्त ⁂

⁂ ज्या दिवशीं रघुनाथरावांच्या मृत्यूचें प्रकरण **करमणुकींत** प्रसिद्ध झालें, त्याच दिवशीं आमचे मित्र रा. रा. गणपत केशव भाटवडेकर, बी. ए., एल्एल् बी. हे त्याच तऱ्हेच्या रोगानें एकाएकीं रक्त ओकून वारले. त्यांची एल्एल्. बी. परीक्षा पास होऊन ८।१० दिवससुद्धां झाले नव्हते. ही गोष्ट फार शोचनीय, परंतु स्मरणीय वाटल्यावरून येथें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं.

प्रकाशक